SJIF Impact Factor : 8.33

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

वर्ष-४० / अंक-२८ / एप्रिल, २०२३

३२ वें राष्ट्रीय अधिवेशन विशेषांक

संपादक

डॉ. राहुल भगत

कार्यकारी संपादक

डॉ. अर्जुन जाधव

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबी विषयीचे निवेदन
(नियतकालिकांच्या नोंदणी संबंधी नियम ८ प्रमाणे)

: प्रकाशन स्थळ :
मराठी समाजशास्त्र परिषद, ३२ वें राष्ट्रीय अधिवेशन, दत्ताजीराव कदम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी, जि.कोल्हापूर.

नियतकाल : वार्षिक (ISSN 2230-7745)
प्रकाशन : दि.५ एप्रिल, २०२३.
मुद्रकाचे नाव : **डॉ.अर्जुन जाधव,** कार्यकारी संपादक
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : समाजशास्त्र विभाग, दत्ताजीराव कदम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी, जि.कोल्हापूर.

मुद्रण स्थळ : इचलकरंजी
प्रकाशकाचे नाव : डॉ.राहुल जनार्धन भगत, संपादक.
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : द्वारा – समाजशास्त्र विभाग, सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा–४४१९१२.

संपादकाचे नाव : डॉ.राहुल जनार्धन भगत, संपादक.
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : वरीलप्रमाणे.

मालकाचे नाव : **मराठी समाजशास्त्र परिषद.**
पत्ता : वरीलप्रमाणे.

मी डॉ.राहुल जनार्धन भगत असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

डॉ.राहुल जनार्धन भगत
प्रकाशक.

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ४० - अंक २८ - एप्रिल, २०२३ (अधिवेशन विशेषांक)

मुख्य संपादक:
डॉ. राहुल भगत

कार्यकारी संपादक:
डॉ. अर्जुन जाधव

संपादक समिती सदस्य:
डॉ. संपत काळे, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. ज्योती पोटे,
डॉ. दया पांडे, डॉ. ज्योती गगनग्रास, डॉ. सुधीर येवले.
डॉ. अशोक बोरकर, डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. अनिल जायभाये,
डॉ. राजकुमार भगत, डॉ. मधुकर देसले, डॉ. श्रीनिवास पिलगुलवार,

संपादकीय सल्लागार मंडळ:
डॉ. उत्तम भोईटे, डॉ. शंकर एल. गायकवाड,
डॉ. पी. जी. जोगदंड, डॉ.प्रदीप आगलावे,
डॉ. स्मिता अवचार, डॉ. सुरेश वाघमारे.

संपर्क पत्ता:
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा: एस. एन. मोर महाविध्यालय,
तुमसर जि. भंडारा - ४४१९१२
Website :www.mspmonline.com E-mail : marathisocio@gmail.com

टंकण व मांडणी: मे.गणेश कॉम्प्यूटर टायपिंग ॲन्ड झेरॉक्स सेंटर, राजारामपुरी, कोल्हापूर.
मुद्रित शोधक: संशोधन समितीचे सर्व समन्वयक.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.

सूचना: या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या-त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ४० - अंक २८ - एप्रिल, २०२३ (अधिवेशन विशेषांक)

समकक्ष समीक्षा समिती (Peer Review Committee)

डॉ. संपत काळे, टाटा समाजविज्ञान संस्था, तुळजापूर जि. उस्मानाबाद.

डॉ. संदीप चौधरी, स. भु. कला आणि वाणिज्य महाविध्यालय, औरंगाबाद.

डॉ. प्रदीप मेश्राम, जे. एम. पटेल महाविध्यालय, भंडारा.

डॉ. नलिनी बोरकर, कला व वाणिज्य पदवी महाविध्यालय, पेट्रोल पंप, जवाहरनगर, भंडारा.

डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, लोकमान्य महाविध्यालय, वरोरा जि. चंद्रपूर.

डॉ. दया पांडे, भारतीय महाविध्यालय, अमरावती.

डॉ. दीपक धारवाडकर, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविध्यालय, सेनगाव जि. हिंगोली.

डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, शारदा महाविध्यालय, परभणी.

डॉ. गंगाधर मोरे, यशवंतराव चव्हाण महाविध्यालय, सिल्लोड.

डॉ. बी. एच. किर्दक, संत गजानन महाराज महाविध्यालय, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

डॉ. अर्चना जगतकर, न्यू कॉलेज, गांधी मैदान, कोल्हापूर.

डॉ. अनिल जायभाये, सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डॉ. कालिदास भांगे, आसारामजी भांडवलदार महाविध्यालय, देवगाव रंगारी, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

डॉ. मधुकर देसले, महिला महाविध्यालय, नंदुरबार.

डॉ. राजकुमार भगत, राजीव गांधी महाविध्यालय, सडक-अर्जुनी जि. गोंदिया.

डॉ. शोभा इंगळे, महिला महाविध्यालय, नांदेड.

डॉ. आर. एस. मांजरे, शिवाजी महाविध्यालय, उदगीर जि. लातूर.

संपादकीय

'पर्यावरण, कामगार, आरोग्य आणि वैश्विक समाज'

मराठी समाजशास्त्र परिषद आणि दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी द्वारा आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३२ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' चा हा विशेषांक आपल्या हाती देतांना अतीव आनंद होतो आहे. मराठी समाजशास्त्र परिषद आणि परिषदेचे सदस्य असलेले ज्येष्ठ विचारवंत, समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक, संशोधक सातत्याने समाजातील समकालीन समस्यांच्या संदर्भात मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनातून व्यापक चर्चा घडवून आणण्याचे कार्य सातत्याने करीत आहेत. ५ व ६ एप्रिल २०२३ ला संपन्न होत असलेल्या या अधिवेशनातही आपण वर्तमानकाळातील काही महत्वाच्या विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी एकत्र आलेले आहोत.

समाजशास्त्र सामाजिक–सांस्कृतिक दृष्टीकोनाबरोबरच पर्यावरणीय दृष्टीकोनात सामाजिक व्यवस्था आणि नैसर्गिक परिसंस्था या दोन्ही व्यवस्थातील अविभाज्यतेवर भर देते. आधुनिककाळात पर्यावरणीय बदलांचा परिणाम राष्ट्रीय सीमारेषा ओलांडून संपूर्ण जगावर होत असतांना पर्यावरण आणि समाज यांच्यातील सहसंबंधाचे अधिक सखोल आकलन व परिक्षण होणे आवश्यक आहे. वैश्विक राजकीय परिव्यवस्थेतूनच तापमानवाढ व पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. दुसरीकडे या पर्यावरण बदलांचा दूरगामी परिणाम अन्नधान्य, खाद्य उत्पादन व वितरण, आरोग्य, श्रम, स्थलांतर व प्रादेशिक रचना अशा मुलभूत व्यवस्थांवर आणि अंतिमत: मानवी अस्तित्वावर होत आहे. म्हणूनच पर्यावरण आणि वैश्विक समाज यांच्यातील विविध अभिन्न पैलूंचा अधिक गांभीर्याने विचार व्हावा हा या राष्ट्रीय अधिवेशनाचा उद्देश आहे. या अनुषंगाने प्रकाशित होणाऱ्या 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' साठी पर्यावरणीय बदल, श्रम, आरोग्य, शाश्वत विकास आणि सामाजिक न्याय यांच्यातील परस्परसंबंधावर प्रकाश टाकणारे शोधनिबंध मोठया प्रमाणात प्राप्त झाले त्याबद्दल सर्व शोधनिबंध लेखकांचे हार्दीक आभार व्यक्त करतो.

मित्रांनो, विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांपासून एकंदरीत जागतीकीकरणावर बरीच चर्चा होत आहे. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था वैश्विक भांडवलदारी अर्थव्यवस्थेशी जोडली जात आहे. खुली बाजारपेठ, मुक्त स्पर्धा, व्यापार आणि बहुराष्ट्रीय कंपन्या ही तीन तत्वे जागतिकीकरण प्रक्रियेचा कणा आहेत. स्वाभाविकच अशा एकात्मिक अर्थरचनेचा परिणाम सामाजिक स्थित्यंतरात दिसून येतो आहे. सतत बदलणाऱ्या या सामाजिक वास्तवाला सामोरे जातांना समाजशास्त्राच्या पारंपारिक चौकटीत वापरली जाणारी परिभाषा, संकल्पना तोकडया पडू लागल्यात असे जाणवू लागले आहे. मात्र जागतिकीकरणामुळे समाजशास्त्रासमोर वेगळेच अरिष्ट उभे ठाकले आहे. विशेष म्हणजे हे नवे अरिष्ट आधीच्या समाजशास्त्राच्या विकसन प्रक्रियेत निर्माण झालेल्या आव्हानांचा परिपाक आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. समाजशास्त्रातील अरिष्टांचा दुसरा टप्पा मुख्यत्वेकरून हितीय महायुद्धापासून सुरू झाला. समाजव्यवस्था, समाज विघटन, सामाजिक नियंत्रण आणि समाजधारणेसाठी आवश्यक नियम, रूढी, संकेत व मूल्ये या समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात शिकविल्या जाणाऱ्या संकल्पना आहेत. या सामाजिक वास्तवाची एक विशिष्ट बाजू दाखवतात. प्रस्थापीत वर्गाला अभिप्रेत व पूरक अशीच संकल्पनात्मक मांडणी त्यातून केली जाते.

पर्यावरणाचा प्रश्न सुद्धा विकास प्रक्रियेतूनच उद्भवलेला आहे. कारण शहरी व ग्रामीण भागात विकास प्रक्रिया राबवितांना पर्यावरणाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे, असे आज पर्यावरणवादी म्हणू लागले आहेत. यातील तथ्यांश समजून घेतला पाहिजे. ग्रामीण भागात सहकारी चळवळीने साखर कारखानदारी सुरू करून मोठा बदल घडवून आणला. रोजगाराचे प्रमाण वाढले. जनसामान्यांच्या मिळकतीत म्हणजे क्रयशक्तीत सुधारणा झाली. हयामुळे वस्तूंना मागणी वाढली. देशांतर्गत बाजारपेठ वाढली, पण याचबरोबर साखर कारखान्यातून बाहेर पडणारे रासायनिक द्रव्यांनी युक्त घाण पाणी नद्यांच्या पाण्यात सोडल्याने जलप्रदुषणाचा फार मोठा दुष्परिणाम आज दिसून येवू लागला आहे. असेच जंगलतोडीमुळे झाले आहे.

जंगलतोडीमुळे भुस्खलन तर होतेच, पण पावसाच्या प्रमाणावरही हयांचा विपरीत परिणाम होत आहे. पर्यावरणाचे संरक्षण आणि संतुलन ही संकल्पना आणि त्यासंबधीचे सामाजिक वास्तव यांच्यामधील तफावत दाखवतांना समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी एक महत्वाची गोष्ट मात्र ध्यानात ठेवली पाहिजे. विकास आणि पर्यावरण या दोन्ही संकल्पनाप्रमाणेच कामगार, आरोग्य या संकल्पनाभोवती सुद्धा एक महत्वाचे चर्चाविश्व सामाजिक शास्त्राच्या वर्तुळात आज सुरू आहे.

जगप्रसिद्ध पर्यावरण तज्ज्ञ डॉ. रास पर्यावरणाबद्दल म्हणतात की, मानवी जीवनावर परिणाम करणारी कोणतीही बाह्यशक्ती म्हणजे पर्यावरण होय. वनस्पतीपासून प्राण्यांपर्यंत सगळ्यांच्याच जीवनावर या पर्यावरणाचा प्रभाव आढळून येतो. पर्यावरणाशी जो योग्य प्रकारे समन्वय साधतो तोच या पर्यावरणात जिवंत राहू शकतो. मानवी जीवनसुद्धा याला अपवाद नाही. पर्यावरणाने मानवाला अन्न, वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत सोयीसह अन्य अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परंतु, मानवाच्या स्वार्थी, अज्ञानी, अविचारी वृत्तीने पर्यावरणाचा बेसुमार वापर करून त्याचा ऱ्हास केल्यामुळे अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सखोल संशोधन करून यावर उपाययोजना सुचविण्यासाठी समाजशास्त्राच्या अभ्यासकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.

भारतातील अनेक विद्यापीठांतून पर्यावरण, कामगार, आरोग्य आणि वैश्विक समाज हे आता स्वतंत्र असे आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम अभ्यासक्रमात अंतर्भूत झालेले आहेत. हयाला महत्वाचे कारण म्हणजे पर्यावरण, कामगार व आरोग्याच्या प्रश्नांवर मौलिक संशोधन गेल्या काही दशकांपासून झाल्यामुळे भक्कम स्वरूपाची तथ्ये आज अभ्यासकांना उपलब्ध होवू लागली आहे. पण त्याहीपेक्षा अध्ययन, संशोधन आणि पर्यावरण या तिघांनी परस्परांना समृद्ध केले आहे. आरोग्य व पर्यावरणासंबंधीचे सिद्धांतन आज इतक्या प्रगत अवस्थेला पोहोचले आहे की, सर्वच सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांनी गांभीर्याने हयाची दखल घ्यायला हवी.

या अधिवेशनात आणखी एका महत्वाच्या मुद्यावर चर्चा होत आहे. तो म्हणजे कामगार किंवा श्रमीक. या देशातील कामगार संघटनांकडे कायमच हेटाळणीखोर वृत्तीनेच पाहिले गेले आहे. कधी पगारवाढीसाठी, तर कधी कामातील सुधारणांसाठी, तर कधी कायम स्वरूपी रोजगाराची मागणीसाठी पाठपुरावा करणारे मध्यस्थ, एवढीच त्यांची गणना केली गेली आहे. या कामगार संघटनांनी कायमच नियंत्रणमुक्त कामगारविश्व आणि उदारीकरण धोरणांना विरोध केला. पण या येवढ्याच बाजुंनी विचार करून, कामगार संघटनांविषयी मते बनविली, तर ते फारच अपूर्ण आणि त्रोटक मत ठरेल.

२१ व्या शतकात प्रवेश करीत असतांना हे वास्तव झपाटयाने बदलले. २० व्या शतकाच्या अंताला समाजाच्या प्रगतीला सार्वजनिक क्षेत्र, कामगार संघटना, कामगारांच्या मागण्या यामुळे कार्यसंस्कृती खराब होते, महागाई वाढते. नफे घसरतात. गुंतवणूक होत नाही व समाज मागे पडतो. हे विचार जाणीवपूर्वक पसरविण्यात आले. समाजवादी राजवटी कोसळल्यामुळे या विचारांना 'बळ' मिळाले व 'खाऊजा' धोरणाचा बोलबाला वाढला. याचा परिणाम कामगार चळवळ एकाकी पडली. समाजाचा व सरकारचा पाठींबा मिळणे अवघड झाले. आता राजकारण, अर्थकारण व समाजकारण करतांना कामगारांचे हित व विचार यांना नगण्य स्थान मिळते, त्यांचा विचारच होत नाही. उत्पादन तंत्राचा विकास व समाजव्यवस्थेवरील परिणाम सर्वांनांच मान्य आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाचा आजची परिस्थिती घडवण्यात व बदलण्यात कसा व किती परिणाम झाला आहे, याची फारशी चर्चा होत नाही.

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कमी कामगारात जास्त उत्पादन घेणे शक्य होत आहे. 'विना रोजगार विकास' हे सार्वत्रिक चित्र उभे राहत आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे काम बाहेर देणे सहज शक्य होत आहे. त्यामुळे कामगार व त्यांची संघटीत शक्ती विखुरली जात आहे. दुसरीकडे सेवा क्षेत्राची झपाटयाने वाढ होत आहे. याचा परिणाम ठेकेदारी पद्धत, हंगामी काम किंवा स्वंयरोजगार करणाऱ्या कामगारांची संख्या वाढत आहे. कामाचे स्वरूप सातत्याने बदलत आहे. याचा परिणाम 'कायमचे काम' ही संकल्पनाच रदद् होत आहे. आज विकसित व भारतासारख्या विकसनशिल देशाच्या अर्थव्यवस्थेचा, जीडीपीचा अभ्यास केल्यास एक समान सूत्र आढळते. जीडीपी मध्ये सेवा क्षेत्राचे योगदान ६० टक्के पर्यंत वाढले आहे. शेतीचा वाटा १६ टक्के पर्यंत खाली आला आहे व उद्योग क्षेत्राचा वाटा २० ते २५ टक्के पर्य मर्यादीत झाला आहे.

वर्ग संघर्ष व समानतेचा संघर्ष हा आर्थिक असतोच परंतु यांच्या मागच्या प्रेरणा व मूल्ये ही सांस्कृतिक असतात. हे सांस्कृतिक क्षेत्र कामगार चळवळीने सातत्याने दुर्लक्षित केले. आज माहिती तंत्रज्ञान, करमणूक क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा स्फोट झाला. टी. व्ही., संगणक, मोबाईल, वर्तमानपत्र याद्वारे घरोघर पोहचलेले हे क्षेत्र २४ तास चालू आहे. परंतू त्यांच्या नाडया मात्र बाजारपेठीय अर्थव्यवहाराने ताब्यात घेतल्या आहेत. कामगार कायदे बदलण्याचा जोरदार प्रयत्न होत आहे. 'खाऊजा' धोरण राबविले जात आहे. कामगार स्वस्त करणे, असंघटित करणे यावर भर दिला जात आहे. विकासासाठी हे आवश्यक समजले जात आहे. सांस्कृतिक राष्टवाद व 'खाऊजा' धोरण यांची सांगड घालून विकासाचे चित्र उभे केले जात आहे. या सर्वांचा मुकाबला २१ व्या शतकात कामगार चळवळीला करावयाचा आहे.

विकसित देशांमध्ये कामगार संघटनांचे प्रमाण अधिक असले, तरी कर्मचारी आणि मालक या दोघांसाठीही फलदायी ठरू शकणाऱ्या विविध कामगार संघटना या केवळ विकसित देशांपुरत्याच मर्यादित नाहीत. देशांमधील असंघटित क्षेत्रांत कामगार मोठ्या संख्येने आहेत. येथे कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता आणि विम्यासारख्या गोष्टींचा अभाव सुद्धा मोठया प्रमाणात आहे. तसेच कामगार संघटनांचे अधिकार हळूहळू नष्ट करत आणण्याचा प्रयत्न सुद्धा देशांमध्ये होतो आहे. काळाबरोबर सामाजिक संवादाची व्यासपीठे कमी होणे आणि कामगारांच्या संप करण्याच्या व संघटीत होण्याच्या अधिकारावर कायद्याने आणलेली गदा, हे काळजीचे विषय आहेत. या विषयांसंदर्भात सुध्दा सखोल विचार करणे ही आपली जबाबदारी आहे.

'सामाजिक न्याय' हा आपल्या राज्यघटनेचा पाया आहे. राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत राजकीय, सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या उद्दिष्टाला पहिले स्थान आहे. तसेच राज्यघटनेतील ७ ते ४१, ४२ पर्यंतचे अनुच्छेद सामाजिक न्यायाविषयी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे भाष्य करतात. समता ही सामाजिक न्याय मिळविण्याच्या प्रक्रियेतील पहिली पायरी आणि समता प्रस्थापित करणे ही आधुनिक राज्याचे पहिले कर्तव्य ठरते. आरोग्य आणि सामाजिक न्याय यांचा खूप जवळचा संबंध आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या दृष्टीने 'आरोग्य म्हणजे केवळ रोगांचा अभाव नसून ती एक शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक समतोलाची अवस्था आहे.' १९८६ मध्ये कॅनडातील ओटावा येथे भरलेल्या जागतिक आरोग्य परिषदेतही हे प्रामुख्याने मान्य करण्यात आले की, अन्न, निवारा, शिक्षण, आर्थिक उत्पन्न, पर्यावरण, शाश्वत संसाधने, शांतता, सामाजिक न्याय आणि समानता हे आरोग्याचे पूर्वनिर्धारक घटक आहेत. आपण जाणतोच की, वरील सर्व बाबींचे नियंत्रण हे शासनाच्याच हातात असते. संसाधनाच्या समान वाटपाची जबाबदारी ही केवळ आणि केवळ शासनाचीच असते. म्हणून १९ व्या शतकात होऊन गेलेला जर्मन तत्त्वज्ञ रुडॉल्फ व्हेर्सो म्हणतो की, 'मेडिसिन इज अ सोशल सायन्स, ॲण्ड पॉलिटिक्स इज नथिंग मोअर दॅन मेडिसिन ऑन अ लार्ज स्केल' (वैद्यक हे सामाजिक शास्त्रच होय, आणि राजकारण हे अधिक व्याप्तीचे वैद्यकच ठरते). आज वरील निर्धारकांची स्थिती आपण आकडेवारीसह पहिल्यास आपल्या लक्षात येईल की, हे वाटप निश्चितच न्यायाला धरून नाही.

गेल्या दोन वर्षात आणि विशेषत: 'पहिल्या लॉकडाऊन'नंतर ज्या असंवेदनशीलपणे शासन स्थलांतरित मजूर आणि कामगारांशी वागले, त्याची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. हजारो किलोमीटर मजूर पायी चालत होते आणि प्रशासन त्यांच्यावर सॅनिटायझरचा मारा करीत होते, लाठ्यांनी मारत होते. आजही हा वर्ग पुरता सावरलेला नाही. एका बाजूला आम्ही 'वंदे भारत योजने' अंतर्गत परदेशस्थ भारतीयांसाठी विशेष विमाने सोडत होतो, तर दुसऱ्या बाजूला लाखो कामगार मुलाबाळांना खांद्यावर घेऊन हजारो किलोमीटर उन्हात पायी चालत होते. मानवी हक्कांच्या उल्लंघनाचे हे टोक झाले. यात त्यांची प्रचंड मानहानी आणि अप्रतिष्ठा झाली आहे. उपचारांबाबत आणि लसीकरणाबाबतही प्रचंड सामाजिक आणि आर्थिक तफावत दिसून येते.

आरोग्य सुविधांमध्ये असलेली तफावत दूर करण्यासाठीच्या उपाययोजनांचा ऊहापोह २०१७ च्या राष्ट्रीय आरोग्य धोरणात झालेला आहे. या धोरणपत्रात सांगितलेले अनेक उपाय आदर्शवत आहेत. जसे की, आरोग्यावरील खर्च वाढविण्यात यावा. जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशीप्रमाणे आपण सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान पाच टक्के तरी खर्च आरोग्य सुविधांवर करायला हवाय पण आपण १.२ टक्केपेक्षाही कमी खर्च करतो. आपल्यापेक्षा श्रीलंका आणि

थायलंडही जास्त खर्च करतात. आरोग्याच्या मूलभूत सोयीसुविधांमध्येही आपण खूपच मागे आहोत. मानसिक आरोग्याच्या बाबतीत तर बघायलाच नको. आरोग्य सुविधांचा अभाव तर आहेच, पण ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्यादेखील ग्रामीण, दलित, आदिवासी, मजूर, कामगार, गरीब आदींसाठी आवाक्याच्या बाहेर आहेत. लक्षात घ्या, उपलब्ध असणे आणि आवाक्यात असणे यांत फरक आहे. एकविसाव्या शतकात, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही देशातील बाळंतपणाशी संबंधित दर एक लाख जन्मामागे १३० मातांचा मृत्यू होणे हे मंगळावर जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विश्वगुरू भारताला निश्चितच भूषणावह नाही. आरोग्य विम्यावर आधारित असलेली 'आयुष्यमान भारत' योजना २०१८ मध्ये सुरू झाली, तेव्हा या योजनेमध्ये १५,४३९ खासगी रुग्णालयांचा सहभाग होता. तो वाढून आता २८,०३३ वर गेला आहे. मात्र सरकारी, सार्वजनिक रुग्णालयांची संख्या कमी होत राहणार, हे उघड आहे. ही खासगी–सार्वजनिक दरी मागील दोन वर्षात कोरोनावरील लस उपलब्धतेच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकास उमगते आहे.

राष्ट्राची प्रगती ही व्यक्ती आणि समुदायाच्या प्रगतीवर अवलंबून असते. जर व्यक्तीची किंवा समुदायाची प्रगती घडवून आणायची असेल तर समता आणि समान संधी उपलब्ध करून द्यावी लागेल. आरोग्य सेवा, पोषण यांवर भर द्यावा लागेल आणि दीर्घकाळासाठी शिक्षण व त्यातून मिळणाऱ्या संधी, तसेच आर्थिक समता या ध्येयाचा पाठपुरावा करावा लागेल, तरच सामाजिक न्यायाची प्रस्थापना होऊ शकेल. अर्थात, आरोग्य हे सामाजिक न्यायाचे एक महत्त्वाचे निर्धारक आहे, जे इतर अनेक सामाजिक आणि आर्थिक निर्धारकांवर अवलंबून असते.

आजघडीला बहुतांश सामाजिक समस्या कमी अधिक प्रमाणात जागतिकीकरणाच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकलेल्या नाहीत. संपूर्ण जगाचे एका मोठया बाजारपेठेत रूपांतरित होण्याच्या प्रक्रियेला जागतिकीकरण म्हणतात. वस्तू आणि सेवा तसेच भांडवल आणि श्रम यांच्या व्यापारावरील निर्बंध उठवून जागतिक पातळीवर व्यापार खुला करण्याची प्रक्रिया यात सामावलेली आहे. खऱ्या अर्थाने ही प्रक्रिया १९ व्या शतकापासून सुरू झाली. भांडवलशाहीची वाढ, उपलब्ध सागरी दळणवळण, टेलिग्रामपासून ते २० व्या शतकातील उपलब्ध हवाई मार्ग, दूरध्वनी, संगणक, बहुराष्ट्रीय कंपन्या, व्यापार आणि गुंतवणुकीवरील निर्बंध सैल होण्यातून ही प्रक्रिया सुरू झाली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या पूर्वार्धात माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सेवांचा उदय आणि पुढे जागतिक पातळीवर व्यापार खुला झाल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला.

फ्रान्सिस फुकुयामा यांनी जागतिकीकरणाला 'मानवी शासनाचे उदारमतवादी लोकशाहीचे अंतिम प्रारूप' असे संबोधले. थॉमस फ्रीडमनच्या मते, जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त आणि माहितीच्या एकत्रीकरणातून एकच एक अशी जागतिक बाजारपेठ आणि संस्कृतीची निर्मिती होय. अँथनी गिडन्स म्हणतो त्याप्रमाणे, जागतिकीकरण म्हणजे जगभरात सामाजिक संबंधांचे संगनीकरण घडून येणे होय.

जागतिकीकरणाच्या समर्थकांच्या मते, अविकसित आणि विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला गती प्राप्त होऊन विकसित देश आणि बहुराष्ट्रीय कंपन्या गरीब देशात मोठी भांडवल गुंतवणूक करीत आहेत. अद्ययावत तंत्रज्ञानाचा प्रवाह मागास राष्ट्रांकडे जाताना दिसतो आहे. जागतिकीकरणाच्या धोरणातून दक्षिणपूर्व आशियायी देश आणि ब्राझील यांनी विकास संपादन केला. याउलट जागतिकीकरणांतर्गत उदारीकरण, खासगीकरण, तंत्रज्ञानात्मक क्रांती, बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीयीकरण, राष्ट्र–राज्याचा ऱ्हास, कल्याणकारी राज्याचा ऱ्हास, बाजारपेठांचे सार्वभौमत्व, बहुसांस्कृतिकवाद असेही प्रवाह सुरू झाले. 'जे स्थानिक आहे ते जागतिक आहे आणि जे जागतिक ते स्थानिक आहे' या प्रक्रियेला रॉबर्टसन 'विशिष्टतेचे सार्वत्रिकीकरण' आणि 'सार्वत्रिकतेचे विशिष्टीकरण' या रूपाने ओळखतो. संपूर्ण जग हे जागतिक खेडे बनून आजघडीला 'विचार जागतिक आणि कृती राष्ट्रीय' असाच नारा देत असल्याचे दिसते. ग्लोबल आणि लोकल यातून ग्लोकल बनले आहे. त्यामुळे अरेनाज यांनी यास 'हायब्रीडायझेशन' असे संबोधले. सांस्कृतिक आक्रमण आणि मागास राष्ट्रांचे आर्थिक सार्वभौमत्व पायदळी तुडवण्यामुळे जागतिकीकरणास नववसाहतवादाचे नवे रूप देखील मानण्यात येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही व्यक्ती स्वतंत्र अथवा विभक्त समूहाचा भाग न राहता संपूर्ण समाजच थेट जागतिक व्यवहाराशी जोडला गेला आहे.

जागतिकीकरणाचा सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम झालेला दिसतो. कुटुंब व्यवस्था, विवाह, स्त्री–पुरुष संबंध, जाती, जनजाती, भाषा, इ. सामाजिक घटकांमध्ये सामाजिक–आर्थिक स्थित्यंतरे घडून येत आहेत. जागतिकीकरणामुळे लहान मुले, तरुण वर्ग आणि वृद्धांचे जीवनमान प्रभावित झालेले आहे. ग्राहकवादाच्या प्रभावातून नव समाज आकार घेत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या जीवनाचा सांस्कृतिक आकृतिबंध बदलत असून अमेरिकन कपडे, चायनीज अन्न, फ्रेंच व्हिस्की, इंग्लिश पॉप संगीत याबाबी नित्य परिचयाच्या झालेल्या आहेत. जागतिकीकरणातून नव्या नागरी समाजाची निर्मिती होत आहे. राष्ट्र–राज्याच्या सीमा धूसर होऊन 'राष्ट्रांचे सार्वभौमत्व' धोक्यात आलेले आहे. कल्याणकारी भूमिकेतून माघार घेऊन राज्याने कायदा सुव्यवस्था सांभाळावी, असा दबाव तयार होत आहे. राज्यसंस्था बिगर–राजकीय अभिकर्त्यांच्या मदतीने राज्यकारभार चालवीत आहे. त्यातून प्रातिनिधिक लोकशाही राजकारणाचा अवकाश नागरी समाजाकडून गिळंकृत केला जात आहे. जागतिकीकरणामुळे सामाजिक घटकांतील वाढती दरी आणि सामाजिक प्रश्नांबद्दल वाढती अनास्था याचाही विचार समाजशास्त्राच्या अभ्यासकाने करणे आवश्यक आहे.

उदारीकरण व जागतिकीकरण यामुळे राजकारण, अर्थकारण व समाजकारणावर होणाऱ्या परिणमांचा गेल्या २० वर्षामध्ये मोठया प्रमाणात उहापोह करण्यात आला. पण या प्रक्रियांचा मानवी मनावर होणाऱ्या परिणामांकडे म्हणावे तितके लक्ष दिले गेले नाही. बदलते राजकारण व अर्थकारण हे जसे जगाच्या 'सपाट' होण्याचे अपत्य आहे आणि त्या बदलत्या जीवनशैलीचा एक मोठा ठसा आपल्या मनावर उमटतो आहे. या प्रक्रियांचा आपल्या मनावर होणाऱ्या परिणामांचा एक दृश्य मापदंड म्हणून गेल्या काही वर्षामध्ये आपल्या सर्वांच्या आयुष्यात वाढलेल्या ताणतणांवाकडे बघता येईल.

जागतिकीकरणाचे,खाजगीकरणाचे, उदारीकरणाचे परिणाम राष्ट्राला व बहुसंख्य समाजाला मारक असले तरी त्यांचे फायदे ज्या कोण्या वर्गाला मिळत आहेत, त्या शक्ती या धोरणाचे तुणतुणे वाजविण्यात मश्गुल आहेत. मात्र सर्वसामान्य जनता अक्षरश: होरपळून निघत आहे. या संकटाच्या विरोधात शेतकरी, शेतमजूर, कामगार, कर्मचारी, आपआपल्यापरीने संघर्ष करीत आहेत. मुठभर लोकांच्या हाती ओंजळभर पैसे व बहुसंख्याकांची झोळी फाटकी असं जे चित्र उभं राहिल त्यातून विषमतेची दरी रूंदावल्याच चित्र स्पष्ट झालं. मानवी अधिकाराची पायमल्ली, दहशतवादाचा वाढता प्रभाव, मूल्यांची घसरण ही जागतिकीकरणाची अपत्ये होत, ही बाब समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे.

या अधिवेशनाच्या निमित्ताने प्रकाशित होत असलेल्या या विशेषाकांत एकूण १२८ शोधनिबंध प्राप्त झाले आहेत. मराठी समाजशास्त्र परिषदेने गठीत केलेल्या १० संशोधन समितीच्या माध्यमातून हे शोधनिबंध प्राप्त झाले आहेत. हे शोधनिबंध 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' मध्येच प्रकाशित व्हावे व ही संशोधन पत्रिका अधिवेशनाचे दिवशीच सहभागी प्रतिनिधींना मिळावी, अशी अधिवेशनाचे संयोजक डॉ. अर्जुन जाधव यांची ईच्छा होती. ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतलेत. तसेच संशोधन पत्रिकेत प्रकाशित होणारे शोधनिबंध सुव्यवस्थित, मुदद्देसुद व विषयाला धरून असावेत यासाठी सर्व संशोधन समितीच्या समन्वयकांनी सुध्दा बरेच परिश्रम घेतलेत. संशोधन समितीचे सर्व समन्वयक आणि अधिवेशनाचे संयोजक यांच्या या संयुक्त प्रयत्नाला आपण विशेष दाद द्यावी अशी अपेक्षा करून हे संपादकीय इथेच थांबवितो. धन्यवाद.....!

डॉ. राहुल भगत
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद
मुख्य संपादक, समाजशास्त्र संशोधन पत्रिका

मा.प्राचार्यांचे मनोग□...

□□ □ब्राम□ विवे□ानं□ ि□□ण □□□ा, □ाल□पू□□चार्या□□ □ामच्या □□ाज□□व □□म □ा□□, □ायन□ □ण□ □ाम□ □ा□ज, □च□□□ज□ म□वि□ा□याा ि□□ व □□प्रि□ २०२□□ज□ म□□□□माज□ा□ञ पि□ष□चे □२ वे □□□ञ □ि□वे□न □प□ □ा□ □ा□ □□ि□वे□न 'पर्याव□ण, □ामगा□, □ा□ाग्य □ाणि वै□वे□ □माज' या विषयाव□□ायोजि□ □□ □□ून म□वि□ा□याच्या □माज□ा□ञ वि□ागाचे □योजन □□□□ यजमानप□□ाम□ा□ □ा□□ □□गौ□ाच□गो□□ा□ याचा म□वि□ा□याचा प्राचार्य म□णून म□ा वि□ष □ानं□□□ा□ा□

□□□ ि□वे□ना□□□ □ा□नि□□ाचा □मावे□ □□□□□ पि□ष□च□ □माज□ा□ञ □□ा□न पत्रि□ा प्रि□□ □ा□ □□□ना मा□या मा□□□□च□ □ञ□; वि□वा□ा मानव□चा □□□ □णा□ □□ □ब्राम□ विवे□ानं□ □□□चे □□ल्प□-□□□प□-□व□□ □ा□□ब्रा□ञ्य□नान□ □ि□□ मित्र ि□□णम□ष□ □ँ.□पूज□□ा□□, त्यांना □म□□ा□ □□न त्यांच्या प□ा□ □□□ा वि□□□व वि□ा□ा□ योग□न □णाऱ्या □□□मा□ा □□□□ा□ब□□ा□□ यांना विनम्र □ि□वा□म □□□ा. □च□□□ज□चे □ाग्यवि□ा□ माज□□ा□□□□□ाज□□व □□म □ाणि म□वि□ा□याा□ □□□ार्य □णाऱ्या □□ानि□ ि□□□च□□ांचे □□□□पूर्व□ □म□ण □□□ा.

व्य□□□-व्य□□□चा मि□ून □मू□□या□□□ा. □□ □ने□ □मू□□ब्र□च्या ग□ा□ □गविण्या□ा□□ वि□□ □□-प्र□□व□ □□त्र □□□□. त्यांच्या□ □□□□□यांचे जा□ निर्माण □□. □ब्र□ □माज □ि□□ऱ्वा□ ये□ा. □माजाच्या विवा□, □□□□, ि□□ण □□ा □ने□ □ामाजि□ □□□ा निर्माण □□□. या □□□□च्या मा□ब्रमा□ून पु□□□ पि□ब्रांचे □□□ण व □माज□□□ण □ा□□ जा□. □□णच □□ा □माजाचा वि□ा□ □□ □□□ना त्या□ पा□□□□□ □□□ □□□. □ब्रा□ब्र्यो□□ □ा□□□ब्र □माजा□ ि□□ण प्र□ा□□चे □ार्य मू□□□ मानून □ाप□ ज□□न □मर्पि□ □णाऱ्या ि□□ण□ज□ □ार्य□त्यांम□ब्रे म□□□□पु□□ □□ायचे □ा□ □□ पंजा□□व □□मु□, □र्मव□□ □□□व पा□□□ □ाणि ि□□णम□ष□ □ँ.□पूज□□ा□□ यांचे योग□न मो□ाचे □ा□ ि□□णम□ष□ □ँ.□पूज□□ा□□ यांन□ □१,□□ □ा□□□□पन □□ल्या □□ब्रा□म विवे□ानं□ि□□ण □□□च्या म□□ब्रा□, मुं□□, पुणे, पि□ब्रम म□□□, □ा□ण व □□□ □नां□□ाच्या □□मा प्र□□□ □०□ □ा□ा □ार्य□□ □ा□□. □प□□□ □-प्र□□व□□ ग्राम□ण, □ंग□□, □ुर्गम वा□ब्रा-व□ऱ्या, □□ब्रापा□ब्रांम□ब्रे वा□□□ब्र्य □णाऱ्या □माजाच्या वि□ा□ा□ व पा□□□□ा□ ''□ान, वि□ान □ाणि □□□□□ा□''च्या मा□ब्रमा□ून □वांग□ण प्रग□□म□ब्रे □ँ.□पूज□च्या □ायनि □□□□ □च□ा □ा□ □ाणि म□णूनच 'म□□□□□□ □माज□□ा□णांचा □□□□' या □ब्रा□□मां□ग□ □ाणि म□□□□ा□ऱ्याच्या □ब्रा□□मां□ग□ ि□वाज□ वि□प□□ाने गौ□ाने □ँ.□पूज□च्या □ार्याचा □□□वि□ □□न □न्मान □□ा □ा□ □त्रप□□ ि□वाज□ म□□ाज, म□त्मा □□, □ाजष□ □.□ा□ू म□□ाज, □ँ.□□□□□□ □ं□□□□, म.गां□□, □ब्रा□म विवे□ानं□या म□पु□षांच□ विचा□□□ा जनमान□ा□ □जवण्याचे □ार्य □ा□ऱ्याने या □□□च्या मा□ब्रमा□ून □□□ □ा□ याचाच □□ □ाग म□णून 'पर्याव□ण, □ामगा□, □ा□ाग्य □ाणि वै□वे□ □माज' या □नुषंगाने □माज□च□म □णा□□□□□ञ □ि□वे□न □प□□□□ा□

या निमि□ाने □न ि□ब्र□□ब्र व□□□ □□□ञ □ि□वे□ना□ विवि□ पा□□□वा□च्या मा□ब्रमा□ून वैवि□ब्रपूर्ण विषयांव□ चर्चा □प□ □णा□ □ा□ या □ार्य□माच्या □□□□□म □मा□□□चे □□□न□ष□ म□णून □ँ.गोपा□ गु□

यांच□ प्रमु□ □प्रि□□□□ □ा□□□ □ा□ □□□ □ि□वे□ना□ विवि□ विषयांच्या प्रि□□वा□चे □त्रा□य□ म□णून □ॅ.ि□□□प्र □□ना□, □ॅ.म□मा गोपा□, □ॅ.□□□प्र चौ□□□, □ॅ.मचि□□ □□□ यांच्या□□ □ॅ.□ा□□□पा□□□ यांच्या प्रमु□ □प्रि□□□□ □ □ि□वे□न □प□ □ा□ □ा□ □□च विवि□ मान्यव□ व□त्यांच्या □प्रि□□□□□ व□मान प्रि□□□□□ वै□वे□ □माजा□ □□□वणाऱ्या पर्याव□ण□य ि□□त्यं□□□□ □ा□□ि□□ □न्मा□, □□□□□ □ा□□□□ि□□ व □ा□ग्य, □□□□□□णाचे □व□प, जागि□□ पर्य□म, व□□□ □□□ि□□, □ामि□ पर्य□म, □ा□यनि□ □□□ व □ा□ग्य, □□णव□ण, □ा□ागि□ा□□ण, ज□□□ो□, पर्याव□ण □□□ण व □व□म या व □□ा □ने□ □म□यांच□ □□□ □□ण्याच्या □□□मे प्र□□□ □ि□वे□ना□ चर्चा □ा□ □ा□ या निमि□ाने 'पर्याव□ण, □म, □ा□ग्य □ाणि वै□वे□ □माज' या मु□य विषया□ □नु□□न □प्रविषयांव□□ □ा□नि□□म□न त्याच□ चिं□त□ा □□□ जाणा□ □ा□ त्यानु□ा□□□ा□न □मि□□ व □मन्वय□ यांचे ग□म □□ □ा□ त्याम□ये म□ा□□ □ा□त्य □ाणि प्रि□व□म – □ॅ.□□□□येव□, जागि□□ा□□ण □ाणि वि□ा□ – □ॅ.□नि□ जाय□ाये, □□ग□ाव : □□मान□ा □ाणि वर्जि□□चे प्र□न – □ॅ.□र्चना जग□□□, प्र□ा□मा□यमे □ाणि □माज – □ॅ.ज्यो□□□ गगनग्रा□, नागा□□ □माज – □ॅ.म□□□□□□, □ृष□ □माज □ाणि ि□□त्यं□□ – □ॅ.□या पां□, □ामाजि□ च□व□□□ □ाणि प्रि□व□म – □ॅ.□प□ □ा□, नागा□□□ांच□ □□□च्ये – □ॅ.□ज□□मा□□ग□, □□□ा, गुन□गा□□ □ाणि □□चा□ – □ॅ.ज्यो□□पो□, □□मां□□ □मू□ □ाणि वर्जि□□चा प्र□न – □ॅ.□□निवा□ पि□गु□वा□या □□ा □□ा□न □मि□□□□□म या □प्रा□□ विषयांना □व□मावे□□ व्याप□ □प □ण्याचा प्रयत्न □ा□ □ा□

म□वि□ा□या□ □ा□ □□□□ □न ि□व□□य □□□य □ि□वे□न य□□व□ □ण्या□ा□□ म□□□ □माज□ा□न प्रि□व□चे □□य□, □ॅ.□□□ □ग□, □चिव □ॅ.□□ा□ □□□□ व □षा□य□ □ॅ.□संजय □ान□□□ यांचे योग□न व □□□ार्या□□□ त्यांना □न्यवा□ □□ा. □□च म□वि□ा□याचे □माज□ा□न वि□ागप्रमु□ व प्रि□व□चे निमंत्र□ □ॅ.□र्जुन जा□व, □□निमंत्र□ □ॅ.□पा□□ □ा□ा□ व प्रा.मयु□□ पा□□□ या □र्वांना म□ □न्यवा□ □□ा. □□□य □ि□वे□नाच्या निमि□ाने □प्रि□□□ □र्व □□ा□□, □□या□□ांना नव□ि□□ा □णा□□ □२ वे □ि□वे□न नि□□च□च प्रे□णा□य□□□□.

□□□□माज□ा□न □□ा□न पत्रि□म□□□ □□ा□नप□नि□□ □□या□□ा□□□□□□मूल्य म□णून □प्रयु□□ □□□□□ □□□ □ा□ा □ा□ या प्रि□व□□ा□□□ □□□ा□□ म□णून □□ □व्याम□ विवे□ानं□ ि□□ण □□□चे □ार्या□य□ मा.प्राचार्य □□य□मा□□ा□□ यांचे मार्ग□□न □ा□णा□□ा□ त्याच□□□□□□□□□□ मा.प्राचार्या □ा.□□ाग□□□ गाव□, □□□चिव-प्र□ा□न मा.प्राचार्य □ॅ.□ा□व□□ □जव□, □□-□□□चिव मा.प्राचार्य □□.□म.गव□□, □□□चे □□□□□ा मा.प्रा.□ा□□□ गाव□ यांचे□□ □ि□वे□ना□ मार्ग□□न □ा□□ □ा□ □र्वांचे मन:पूर्व□ □ा□□

(□ॅ.□नि□ पा□□□)
प्राचार्य,
□□□.□□□.□□ □ा□ज, □च□□□□□

भाषण

पर्यावरण आणि मानवी समाजाचे भवितव्य

— प्रा.गोपाळ गुरू.

मराठी समाजशास्त्र मंडळानी आयोजित केलेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेत मला बिजभाषण देण्यास आमंत्रित केल्याबद्दल संबंधितांचे आभार, आयोजकांचे आभार, आणखी एका महत्वाच्या कारणासाठी कौतुक करणे स्तुत्य वाटते. ते म्हणजे इचलकरंजी येथे भरत असलेल्या परिषदेच्या विषय निवडीबद्दल दाखविलेल्या व्यापक दृष्टीकोनाबद्दल आयोजक अभिनंदनास पात्र आहेत. पर्यावरण व मानवी भवितव्य या गाभ्याच्या विषयावर सामाजिकशास्त्रांच्या अंगाने केलेल्या आखणीमुळे परिषदेचे महत्व स्पष्ट होते हे वेगळे सांगावयाची गरज नाही. दोन दिवसाच्या परिषदेमध्ये चर्चीले जाणाऱ्या विषयाच्या मांडणीमुळे वैचारिक चर्चा ही पारंपरिक समाजशास्त्रीय कल्पना प्रणालीच्या पलीकडे जाण्याचे आश्वासन परिषद देवू पहात आहे. उत्तर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पुढे जाणाऱ्या चर्चेमुळे हे शक्य होवू घातले आहे.

अर्थातच विषयाचा आवाका व्यापक असल्यामुळे काही महत्वाच्या मुद्यांना हात घालणे इष्ट ठरेल. पर्यावरणांच्या असमतोलामुळे मानवाच्या अस्तित्वाला अनेक कठीण आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या आव्हानांचा उल्लेख परिषदेच्या 'उद्देश विधानात' पुरेसे स्पष्ट करण्यात आले असल्यामुळे त्याचा पुर्णर्विचार करण्याची आवश्यकता नाही. परंतू विषयांचा आवाका व्यापक असल्यामुळे विषयाची मांडणी सुत्ररूपाने करणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

मानवी हितसंबंध व निसर्गातील साधनांचा समतोल यामध्ये असमतोल, तणाव व संघर्ष निर्माण झाला आहे व असमतोल अलिकडच्या काळात अतिशय तीव्र झाला आहे. या असमतोलाचे स्वरूप समजावून घेतांना असे काही आपल्या लक्षात येते की, या असमतोलाला मानवाचा पक्षाच्या बाजूने विचार मांडण्याचा प्रयत्न विशेषत: पाश्चिमात्य तत्ववेत्त्यातून झाला आहे. मानवाच्या 'हित कल्याणासाठी' निसर्गाचा उपयोग करण्याची परवानगी खुद्द देवानेच दिल्याची भूमिका काहींनी घेतली. यालाच मानवकेंद्री भूमिका म्हणूनही संबोधित केले गेले आहे. ही भूमिका अर्थातच पर्यावरणाचा गांधीवादी दृष्टीकोण याच्या विरोधात आहे. गांधी म्हणत, निसर्गात मनुष्याच्या गरजा पूर्ण होतील इतकी साधने आहेत. परंतू मनुष्याची लालसा पूर्ण करण्याइतकी साधन निश्चितच नाहीत. याची मनुष्याला आपल्या हितसंबंधासाठी निसर्गाला ओरबडून काढण्याची मुभा देत नाहीत. गरजा व चढत्या क्रमाची लालसा यातील द्वंद्वांशी पर्यावरण व मानवी समाजात असमतोल व ततसंबंधी आव्हाने निर्माण झाली आहेत.

उदारमतावर व तसेच नवउदारमतवादावरील आधारित आर्थिक दृष्टीकोन सुध्दा निसर्गाच्या तुलनेत मानवी हितसंबंधांना झुकते माप देणे. उदा.उदारमतवादी आर्थिक विचार निसर्गातील स्त्रोताकडे बघतांना हितसंबंध कसे सुरक्षितरित्या वाढत जातील याकडेच अधिक लक्ष देतो.

याउलट, समाजाच्या समानता व न्यायावर आधारित सर्वांगीण व समतोल तसेच शाश्वत विकासासाठी निसर्गाच्या स्त्रोतांचा वापर होणे अपेक्षित असते. परंतू उदारमतवादी विचारात हे बसत नाही. नवउदारमतवादावर केवळ ग्रोथ या बाबींवरच अधिक भर देतात. त्यांचा असा युक्तीवाद असतो की, निसर्ग किंवा पर्यावरणातील साधनसामुग्रीची खेडयातील समाज, आदिवासी समाज यांच्या वर सोपविणे म्हणजे, सामुहीक साधनांच्या संदर्भात शोकांतिका निर्माण करण्यासारखे होईल. सामुहिक साधनांची शोकांतिका टाळावयाची असेल उदा.पाणी, खनिजे, सामुदायिक, जमिन, तर या साधण्याच्या संदर्भातील वापराची मालकी खाजगी कंपन्याकडे देणे अधिक शहाणपणाचे आहे. कारण खाजगी हस्तक्षेप साधनांचा वापर बाजारपेठयाच्या अनुषंगाने अवगत होणारे शहाणपणा मुळे अधिक अचूकपणे व कार्यक्षमतेने करू शकते त्यामुळे निसर्गाच्या साधनांच्या वापराची तात्पुरती मालकी खाजगी कंपन्याकडे देणे अधिक शहाणपणाचे ठरेल असा युक्तीवाद पुढे येतांना दिसतो. या दृष्टीकोनाला गांधीवादी तर विरोध करतातच पण स्त्रीवादी व आदिवासी दृष्टीकोण विचारांच्या तसेच चळवळीच्या माध्यमातून विरोध करतात. स्त्रीवादी पर्यावरणाचा दृष्टीकोन निसर्गाच्या साधन सामुग्री साधण्याच्या स्वामित्व ओरबडण्यामध्ये

व स्त्रियांच्या श्रमाला पुरूषी ओरबडण्यात एक प्रकारचे साम्य आहे अशी मांडणी सातत्याने करतांना दिसतात. त्याचप्रमाणे भारतातील कोळी समाज नवउदारमतवादी दृष्टीकोणांच्या शहाणपणच्या दाव्यामधील उणिवा स्पष्ट करतांना असे पटवून देतात की, मासेमारीमध्ये उतरलेल्या बड्या कंपन्या ज्यांना ते बिग शार्क म्हणून ओळखतात, मोठ्या मास्यांबरोबर छोट्या मास्यांना सुध्दा आपल्या जाळ्यात पकडतात. यामध्ये कुठले शहाणपण आले आहे. कारण यातून मासेमारीचा व्यवसाय धोक्यात येवू शकतो.

रेशनॅलिटीचे तत्व धरणे बांधतांना, पाणी अडवतांना व ते जिरवतांना लक्षात घेणे गरजेचे आहे असाही दृष्टीकोन समतोलवादी विचार मांडत असते. तसे न झाल्यास जमिनीत मिठ फूटून जमिन नापिक होण्याची शक्यता असते. निसर्ग व मानवी हितसंबंध यांचा समतोल साधण्यासाठी हा समतोल व सम्यक दृष्टीकोण अंगिकारणे महत्वाचे आहे. यालाच एक शिक्षित अर्थाने सम्यक शहाणपण म्हणता येईल.

शहाणपण हे केवळ पाश्चिमात्य किंवा पौर्वात्य संदर्भात निर्माण झालेल्या पर्यावरणाच्या सम्यक समुहांच्या बाबतीत लक्षात घेणे संयुक्तीक नाहीतर या शहाणपणाची गरज स्थानिक पातळीवर पर्यावरण व मानवीहीन संबंधामध्ये समतोल साधण्यासाठी अतिशय गरजेचे मानावे लागेल. प्रमाणापेक्षा पेस्टीसाईड व पाण्याचा वापर झाल्यास शेतकरी व शेतमजुर यांचा आरोग्याचे व शेतीच्या आरोग्याचे काय झाले हे पंजाब राज्याच्या अनुभवावरून ध्यानात येते.

ज्याप्रमाणे मानवीहीन संबंध व पर्यावरणाचे संवर्धन यामध्ये समतोल साधण्यासाठी सम्यक शहाणपणाची गरज आहे. त्याचप्रमाणे, समतोल साधण्यासाठी सम्यक शहाणपणा राज्याच्या व राज्यकर्त्यांच्या ठायी असणे आवश्यक असते. उदा.बड्या कंपन्यांना निसर्गातील साधनांचा उपयोग करण्यासाठी परवाने देतांना, मानव व निसर्गाचे हित साधण्याचे ध्येय लक्षात ठेवणे गरजेचे. बहुतांशी सम्यक शहाणपणाचा अभाव राज्यामध्ये व राज्यकर्त्यामध्ये कमीच दिसून येतो. राज्याच्या शहाणपणच्या उणिवा पर्यावरणाच्या संरक्षणासाठी होत असलेल्या लोक चळवळीतून वेळोवेळी स्पष्ट होतात. उदा. ओरिसातील आदिवासीयांचे यशस्वी लढे म्हणा, किंवा केरवळमधील प्लाचीमाडा येथील यशस्वी लढे या उणिवांकडे आपले लक्ष वेधतात.

निसर्गाच्या कोपामुळे जसे अवकांळी पाऊस किंवा महापूर यामुळे झालेले शेतकऱ्यांचे व सर्वसामान्यांचे झालेले नुकसान व त्यासाठी राज्याकडून, मोठ्या प्रयासाने मिळालेली तुटपुंजी मदत सुसाह्य ठरू शकते. ही मदत राज्याच्या सम्यक शहाणपणाचा भाग म्हणून देण्यात आली असे मानणे चुकीचे ठरेल. कारण राज्यांनी सम्यक शहाणपणा दाखवून मानवनिर्मित नैसर्गिक संकट टाळण्यासाठी वेळोवेळी योग्य ती उपाययोजना केली असती तर याला आपण सम्यक शहाणपणा म्हणू शकलो असतो. परंतू निसर्गाच्या मानवनिर्मित संकटामुळे दिलेल्या नुकसान भरपाईला आपण फार तर पश्चात किंवा उशिरा सुचलेले शहाणपण म्हणू शकतो. सम्यक शहाणपणात जबाबदारीचे तत्व जरूर असते परंतू ही जबाबदारी प्रोॲक्टीव्ह पध्दतीने संकट टाळण्यासाठी घेतलेली असते. नैसर्गिक संकटातून होणारा अन्याय टाळण्यासाठी घेतलेल्या जबाबदारीचे महत्व संकट ओढवल्यानंतर राज्याने नंतर घेतलेल्या जबाबदारीपेक्षा अधिक आहे. जबाबदारी घेणे राज्याच्या संवेदशनशीलतेचे लक्षण आहे. तर राज्यावर मदत देण्याच्या संदर्भात जबाबदारी घेण्यास भाग पाडणे हे निश्चित राज्यात संवेदनशिलतेचा अभाव दर्शविते. वातावरणात कार्बन इमिशनातून निर्माण होणारी उष्णता टाळण्यासाठी आगाऊ प्रयत्न करणे हे चांगल्या जबाबदारीचे लक्षण होय.

भावी पिढीसाठी निसर्गाच्या संपत्तीचे संवर्धन करणे हे चांगले व दुलक्षी जबाबदारीचे महत्वाचे लक्षण आहे.

शहरांच्या होणाऱ्या अंधधूंद विकासाला आळा घालण्याची जबाबदारी ही अर्थातच राज्याची आहे. नागरी समाजाचे सार्वजनिक हितसंबंध लक्षात घेवून शहरांचा विकास करण्याची जबाबदारी स्थानिक सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असते. परंतू हे जबाबदारीचे तत्व न पाळल्यामुळे व महानगराचे आता काँक्रीट डोंगर झाले आहेत. याचा परिणाम मानवी जीवनावर, त्यांच्या आरोग्यावर तर झालाच परंतू चेन्नई, बंगलोर, मुंबईसारख्या शहरात पूर येवून तेथील लोकांचे जीवन उध्वस्त होतांना आपण पाहिले आहे. एका बाजूला स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या हितसंबंधांमुळे निर्माण झालेल्या शहरी समस्या, दुसऱ्या बाजूला या समस्यांना काही हतबल झालेले लोक तोंड देतात, त्यांना तोंड देतांना फार मोठी किंमतही मोजावी लागते. साधनांचा अभाव असलेले लोक शहरी समस्यांत ट्रॅप झालेले लोक सर्वसामान्यपणे त्यांच्या लढ्यातून राज्यामध्ये जाणिवा उत्पन्न करण्याची

जबाबदारी घेतांना दिसतात. परंतु साधनांची रेलचेल असलेले उच्च मध्यमवर्गीय लोक समस्यांत सापडलेल्या समस्यांना तोंड न देता संधी मिळते तेंव्हा रविवारी/शनिवारी जवळपासच्या थंड हवेच्या ठिकाणी पळून जाताना दिसतात. ज्या–ज्या ठिकाणी धार्मिक स्थळे आहेत, तेथे ही मंडळी आजकाल पोहचू पाहत आहेत. याला वेगवेगळ्या ठिकाणी विरोधही होतांना दिसत आहे. उदा.झारखंडमधील संदर्भातील एका विशिष्ट धर्मस्थळांना पर्यटनात घडविण्याचा संबंधात होणारा विरोध, धर्मस्थळे व पर्यटन घडविण्याचा संबंधात होणारा विरोध धर्मस्थळे व पर्यंत यातील सिमारेषा पुसट होत चालल्या आहेत. परंतू यातून पर्यावरण व मानवी हितसंबंध यातील नेमके संबंध काटेकोरपणे अधोरेखित करणे तेवढेसे सोपे नाही.

शेवटी, एका अतिशय महत्वाच्या मुद्याचा माझ्या भाषणात उल्लेख करणे महत्वाचे वाटते. तो म्हणजे निसर्ग व मानव या दोहींमध्ये सम्यक शहाणपण, प्रगल्भ शहाणपण कुणाकडे आहे. निसर्ग प्राण्यात, झाडाझुडपात, नदी नाल्यांना, खडकांना, स्वत:च्या संरक्षणासाठी, Instrumental Rationality केवळ जगण्याच्या गरजेतून सुचलेले शहाणपण असते. उदा. समुद्र किनाऱ्यावरील नारळाची झाडे वाऱ्याच्या उन्मादाने उखळून न जावे वा आपली दिशा बदलून वाऱ्याला तोंड देतांना आपण पहावे. परंतु मनुष्याने भविष्यातील सुरक्षिततेसाठी प्रगल्भ टणक व सम्यक शहाणपण असू शकते. असल्या प्रगल्भ शहाणपणाची गरज ही पर्यावरणप्रणित न्यायाच्या कल्पनेशी सुसंगत असावा लागतो. नागरी समाजाला पर्यावरण सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. कारण या सुरक्षितेत, संवर्धनात, भावी पिढीचे भवितव्य अस्तित्व सामावलेले आहेत. सगळीजण चंद्रावर जाण्याची तयारी करतील, पण हे शक्य नाही. म्हणून निसर्गाच्या साधन संपत्तीचा सध्याच्या पिढीचा केवळ चंगळवादी गरजा पूर्ण करण्यासाठीच करता कामा नये, होता कामा नये. पुढची पिढी, सुपिक जमिन, निर्मळ पाणी, शुध्द हवा, सुबक शहरे व ग्रामीण भाग इत्यांदी मुल्यवान गोष्टी हस्तांतरित करणे म्हणजे भावी पिढीला न्याय देण्यासारखे होईल. तेंव्हा भावी पिढीला न्याय देण्याची जबाबदारी सध्याच्या पिढीची आहे हे नक्की.

***

* [illegible] *

[illegible].	[illegible]	[illegible]	[illegible].
[illegible]	[illegible], [illegible] (Wellbeing)	[illegible]	[illegible]
२.	[illegible], [illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
४.	[illegible]	[illegible]	[illegible]२२
५.	[illegible], [illegible]	[illegible]	२[illegible]२[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	२८-[illegible]
[illegible]	[illegible] २[illegible], [illegible]	प्रा.[illegible]	[illegible]
८.	[illegible]	[illegible]	४[illegible]४४
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	४५-५[illegible]
[illegible]	[illegible]	प्रो.[illegible]	५४-५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible].	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible].	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]८[illegible]
[illegible]५.	[illegible], [illegible]	प्रा.[illegible]	८४-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]३
[illegible].	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]५
[illegible]	[illegible] - [illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
२[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
२[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]५
२२.	[illegible], [illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]३[illegible]

क्र.	[illegible]	[illegible]	पृ.
२[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]५
२४.	[illegible]-[illegible]टर [illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
२५.	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
२[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]४-[illegible]
२[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]४-[illegible]४२
२८.	[illegible]	[illegible]	[illegible]४-[illegible]५[illegible]
२[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]५-[illegible]५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible] [illegible]	[illegible]५-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible] [illegible]	[illegible]४-[illegible]८
[illegible]३.	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible] [illegible]	[illegible]३-[illegible]
[illegible]४.	[illegible]	[illegible]	[illegible]८-[illegible]८२
[illegible]५.	[illegible]	[illegible]	[illegible]८-[illegible]८[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]८-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]४-[illegible]
[illegible]८.	[illegible]	[illegible]	[illegible]८-२[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible] [illegible]	२[illegible]-२[illegible]४
४[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	२[illegible]५-२[illegible]
४[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	२[illegible]-२[illegible]
४२.	[illegible]	[illegible]	२[illegible]४-२[illegible]
४[illegible]	[illegible]	[illegible]	२[illegible]-२२२
४४.	[illegible]	प्रा.[illegible]	२२[illegible]-२२[illegible]
४५.	[illegible]	[illegible]	२२८-२[illegible]
४[illegible]	[illegible]	[illegible]	२[illegible]३-२[illegible]८
४[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	२[illegible]-२४२
४८.	[illegible]	[illegible]	२४[illegible]-२४[illegible]

[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
४[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	२४८-२५[illegible]
५[illegible]	[illegible]	[illegible]	२५२-२५४
५[illegible]	[illegible]	[illegible]	२५५-२५[illegible]
५२.	[illegible]	प्रा.[illegible]	२५८-२[illegible]
५[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	२[illegible]-२[illegible]
५४.	[illegible]	[illegible] ([illegible])	२[illegible]-२[illegible]
५५.	[illegible]	प्रा.[illegible]	२[illegible]-२[illegible]
५[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	२[illegible]-२[illegible]
५[illegible]	[illegible]	[illegible]	२[illegible]-२८[illegible]
५८.	[illegible]	[illegible]	२८[illegible]-२८४
५[illegible]	[illegible]	[illegible]	२८५-२[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	२[illegible]-२[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	२[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[

क्र.	[illegible]	[illegible]	पृष्ठ.
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]२-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible].	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]४
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]५-[illegible]
[illegible]४.	[illegible]	[illegible]	[illegible]३-[illegible]
[illegible]५.	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]४.	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]२-[illegible]५
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]८
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]३
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]२.	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]३-[illegible]
[illegible]४.	[illegible]	[illegible]	[illegible]५-[illegible]
[illegible]५.	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	[illegible]-[illegible]४
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]८
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]

क्र.	शीर्षक	लेखक	पृष्ठ.
[illegible]	[illegible] स्त्री [illegible]रोग [illegible]	[illegible] र [illegible] [illegible] [illegible]	४[illegible]-४[illegible]
[illegible].	[illegible] प्र[illegible] [illegible]रोग प्र[illegible] [illegible] स्त्री [illegible]	[illegible] [illegible]-[illegible]	४[illegible]-४४५
[illegible]	[illegible]	प्रा. [illegible] [illegible] [illegible]	४४[illegible]-४४८
[illegible].	[illegible] [illegible]रोग [illegible]	[illegible] र [illegible] र [illegible]	४४[illegible]-४५२
[illegible].	[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]-[illegible] [illegible]	[illegible] [illegible]	४५[illegible]-४५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible] [illegible]	४५८-४[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा. [illegible] [illegible]	४[illegible]-४[illegible]
[illegible].	[illegible] [illegible]रोग [illegible] [illegible] [illegible] प्र[illegible] [illegible]	प्र[illegible]	४[illegible]-४[illegible]
[illegible]	[illegible] [illegible] (ग्रा.) [illegible]	[illegible] [illegible]	४[illegible]-४[illegible]
[illegible]	[illegible] [illegible]रोग [illegible]	[illegible]र [illegible] प्र[illegible]र [illegible] [illegible]	४[illegible]-४८२
[illegible]	[illegible] [illegible] [illegible] स्त्री [illegible] [illegible] [illegible] [illegible] प्र[illegible]	प्रा. [illegible]	४८[illegible]-४८८
[illegible].	[illegible] [illegible] [illegible] [illegible]	प्रा. [illegible].र [illegible]	४८[illegible]-४[illegible]
[illegible]	[illegible] - [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]	[illegible] [illegible]	४[illegible]-५[illegible]
[illegible].	[illegible]र [illegible], [illegible] प्र[illegible]	[illegible] [illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible].	[illegible]र [illegible] [illegible]र [illegible] [illegible] प्र[illegible] [illegible] [illegible]	[illegible] [illegible]र. [illegible]र	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]र [illegible] [illegible] स्त्री [illegible]	[illegible] [illegible]र [illegible]र [illegible] [illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible] - [illegible]	प्रा. [illegible]र. [illegible] प्रा. [illegible]र	५[illegible]-५[illegible]
[illegible].	[illegible]र [illegible] प्र[illegible] प्र[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]	[illegible] [illegible]	५[illegible]-५२[illegible]
[illegible]	[illegible] [illegible], [illegible]रोग [illegible]	प्रा. [illegible] प्रा. [illegible]	५२२-५२[illegible]
[illegible]	[illegible]र [illegible] [illegible] [illegible] [illegible]	[illegible]	५२[illegible]-५[illegible]

क्र.	[illegible]	[illegible]	पृ.
[illegible]	[illegible]	[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible] प्र[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]	[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५४[illegible]-५४२
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	५४[illegible]-५४[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५४८-५४[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	५५[illegible]-५५[illegible]
[illegible]	[illegible] ([illegible])	[illegible]	५५४-५५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible] प्र[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५८[illegible]-५८[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५८४-५८[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५८[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	प्रा.[illegible]	५[illegible]-५[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]-[illegible]

***

पर्यावरण, विकास आणि स्वास्थ्य/कल्याण (wellbeing)

*डॉ. वैशाली जोशी

प्रस्तावना

पर्यावरण, आरोग्य आणि कल्याण हे तिन्ही घटक एकमेकांत इतके सहजपणे गुंफलेले आहेत की त्यांना वेगळे करून स्वतंत्रपणे त्यांचा विचार करता येणार नाही. पण दुसरीकडे पर्यावरणाच्या सामाजिक पैलूंचा विचार केला तर सामाजिक व्यवस्थांमधून निर्माण झालेल्या विषमतेमुळे या तीन्हींची एकमेकांपासून फारकत झालेली दिसते. म्हणूनच पर्यावरण आणि आरोग्याचा विचार विकासाच्या बदलत्या प्रतिमानाच्या संदर्भात करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखात पर्यावरण, आरोग्य आणि कल्याण या तीन संकल्पनांमधील सहसंबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. भांडवली आणि कॉर्पोरेट राजकीय अर्थव्यवस्थेत पर्यावरणाच्या व्यापक प्रश्नावर सर्वसमावेशक उपाय शोधले जातायत का हे बघताना आरोग्याच्या संकल्पनेत वेलनेस या पैलूची भर कोणत्या टप्प्यावर पडली आणि वेलनेसचे स्वतंत्र अर्थकारण आहे का हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

पर्यावरण, आरोग्य आणि कल्याण या तीनही संकल्पनांमधील सहसंबंध समजून घेताना सुरवातीला पर्यावरण या संकल्पनेची उजळणी आवश्यक आहे. मानवी समाजाच्या दृष्टीकोनातून पहायचे तर पर्यावरणाचे नैसर्गिक व सामाजिक हे दोन्ही पैलू विचारात घ्यावे लागतील.

प्रथम निसर्गचक्राची किंवा **नैसर्गिक पर्यावरणाची काही ठळक वैशिष्ट्ये**लक्षात घेऊ.

१. चक्रीयता आणि परस्परावलंबित्व

नैसर्गिक परिसंस्था/पर्यावरण हे चक्रियतेच्या तत्वावर चालते. या चक्रियतेचा अपरिहार्य परिणाम म्हणजे सर्व सजीव व निर्जीव गोष्टींमधील परस्परसंबंध आणि त्यातून निर्माण होणारे परस्परावलंबित्व. पर्यावरणातील कोणतीही गोष्ट संपूर्णपणे स्वतंत्र, इतरांवर अवलंबून न रहाता अशी जगूच शकत नाही. सजीव-निर्जीव घटकांच्या देवाण-घेवाणीतूनच पर्यावरण समृद्ध व संतुलित राहते.

२. सर्वसमावेशक समानता

पर्यावरणात कोणताही घटक कमी-जास्त महत्वाचा नसतो. सर्वांचा काहीनाकाही वाटा असतो. पर्यावरणीय कोनाडा हा शब्दप्रयोग खूप महत्वाचा आहे. पर्यावरण म्हणजे प्रत्येक जीवजातीसाठी राखून ठेवलेल्या असंख्य कोनाड्यांनी बनलेले घर आहे. प्रत्येकाला विशिष्ट काम, विशिष्ट स्थान नेमून दिलेलं आहे आणि सर्वात महत्वाचं म्हणजे यात श्रेष्ठ-कनिष्ठ अशी श्रेणी नाही. कोणतीही एक प्रजाती शिरजोर व्हावी हे पर्यावरणात मान्य नाही. जैव-वैविध्यांनी भरलेले कोनाडे हे समृद्ध पर्यावरणाचे लक्षण आहे. विविधता हेच पर्यावरणाचे सामर्थ्य आहे. ही परस्परपूरक व्यवस्था असल्याने यात एकच एक केंद्रस्थान नाही किंवा 'सर्वात बलवान' असे एकच स्थान नाही.

३. विकेंद्रितता

निर्मिती आणि पोषणापासून अगदी विघटनापर्यंत सर्व कामांचा भार निसर्ग विकेंद्रीकरणातून पार पाडत असतो. हवा, पाणी, जमीन, झाडं, सर्व सजीव आणि कचरासुद्धा विकेंद्रित आहे. म्हणजे या सर्वांची निर्मिती सर्वत्र होत असते, त्यांची उपलब्धता सगळीकडे आहे. तसेच प्रत्येक पदार्थाचा विनाश होतो किंवा प्रत्येक गोष्ट विघटनक्षम आहे.[1]पर्यावरणाच्या या सर्व वैशिष्ट्यांचा विचार केला की एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे ही एक सतत बदलत असणारी गतिमान व्यवस्था आहे. बदलत्या परिस्थितीनुरूप बदलत संतुलन राखण्याची पुरेपूर क्षमता या व्यवस्थेत आहे.

मानवनिर्मित पर्यावरण

निसर्गाच्या व्यवस्थेत सर्वात शेवटी अवतरलेली प्रजाती म्हणजे माणूस. माणसाला मिळालेल्या प्रचंड बुद्धिमत्तेच्या जोरावर माणसाने स्वतंत्र सामाजिक जग निर्माण केले. मानवनिर्मित पर्यावरणाचा विचार केला तर त्याची

[1] निसर्गचक्राच्या वैशिष्ट्यांचा संदर्भ दिलीप कुलकर्णी यांच्या निसर्गायण या पुस्तकातून घेतला आहे.

दोन ठळक वैशिष्ट्ये लगेच जाणवतात. एक म्हणजे एकेंद्री वर्चस्ववादी वृत्ती आणि दुसरे म्हणजे त्यातूनच आकाराला येणारी विषम श्रेणीबद्धता. ही दोन्ही वैशिष्ट्ये निसर्ग प्रकृतीच्या विरुद्ध जाणारी आहेत. निसर्ग व्यवस्थेचा आपण केवळ एक भाग आहोत हे विसरून मानवाने आपले हित पुढे रेटून नेले. नैसर्गिक पर्यावरणाच्या सर्व वैशिष्ट्यांना छेद देणारी, निसर्गचक्रात प्रचंड ढवळाढवळ करणारी व्यवस्था माणसाने निर्माण केली. या व्यवस्थेचा हेतू निसर्गाला हव तस वाकवणे व निसर्गावर स्वामित्व मिळवणे आहे. आपल्या बुद्धीच्या व ज्ञानाच्या जोरावर निसर्गाची कार्यपद्धती माणसाला जसजशी उमगत गेली तसतशी त्याच्यातील 'जातीश्रेष्ठत्वाची' भावना वाढीस लागली. इतर प्राणिमात्रांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत या विचारात निसर्गचक्रातील आपले स्वतःचे अवलंबित्व तो विसरला. माणूस आपल्या लाभासाठी नैसर्गिक संसाधनं आणि इतर सजीवांचे अपरिमित शोषण करतो. निसर्गातून घेतो, देत काही नाही. किंबहुना जे देतो ते एक प्रकारे निसर्गात टाकून दिलेले विषारी, घातक, अ-विघटनक्षम घटक.आहेत.

मानवनिर्मित पर्यावरण आणि विकास

दुर्दैवाने माणूस निसर्गाशी जितक्या स्वामित्वहक्काने वागत आला तितक्याच वर्चस्ववादी वृत्तीतून त्याने स्वतःचे सामाजिक जग निर्माण केले. श्रेणीबद्धता आणि विषमता हे मानवी समाजाचे ठळक वैशिष्ट्य आहे. सामाजिक व्यवस्थेत सत्ता, संधी आणि संसाधनांचे असमान वाटप होत आले आहे. सामुहिक कल्याणापेक्षा व्यक्तिगत हिताला प्राधान्य देणाऱ्या आणि खाजगी साठा करण्याच्या वृत्तीला मान्यता देण्याच्या व्यवस्थेतून आज मानवी अस्तित्व धोक्यात आले आहे.

आपल्या गरजा भागवण्यासाठी निसर्गाचा उपयोग मानवाने आदिम युगापासून केला आहे. शेतीचे युग, वैज्ञानिक क्रांतीतून अवतरलेले औद्योगीकरणाचे युग हे मानवी समाजाच्या इतिहासातील टप्पे निसर्गावरील माणसाच्या वाढत्या स्वामित्वाचे द्योतक आहेत. निसर्गातील प्रत्येक घटकाचे वस्तूकरण होण्याची सुरुवात औद्योगिक भांडवलशाहीच्या टप्प्यावर झाली. नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे निसर्गाचे व्यवस्थापन करण्याची निकड भांडवलशाहीच्या प्राथमिक अवस्थेत नव्हती. यंत्रांच्या सहाय्याने होणाऱ्या वेगवान उत्पादनातून मानवी समाजाच्या सर्व गरजा भागतील असा आशावाद युरोपमध्ये १९व्या शतकात निर्माण झाला.

या जडणघडणीची बीज १६-१७व्या शतकातील पाश्चिमात्य पुनरुज्जीवन कालखंडात आहेत. रेने देकार्ते-न्यूटन-बेकन या त्रयींच्या प्रतिपादन व सैद्धांतिक मांडणीतून विश्वाचा यांत्रिक दृष्टीकोण प्रचलित झाला. निसर्गाला ओरबाडून जास्तीत जास्त उपभोग व सुखं मिळवण्याला तात्विक-वैज्ञानिक अधिष्ठान प्राप्त झालं. निसर्गातील उर्जेचे विविध स्त्रोत व संसाधनं वापरून अधिक उपभोग, त्यासाठी सुधारित तंत्रज्ञान, ते वापरून अजून जास्त उपभोग अशी व्यवस्था आकाराला आली. मार्क्सवादाच्या प्रभावामुळे साम्यवादी क्रांती झाली. पण विकासाच्या संकल्पनेच्या मुळाशी असलेले दरडोई उत्पादन, दरडोई वापर आणि दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाचे अर्थशास्त्रीय सूत्र बदलले नाही. साम्राज्यवाद आणि वसाहतवादाच्या जोरावर पश्चिमी राष्ट्रांनी जगभरातल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपभोग घेतला. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची राजकीय अर्थव्यवस्था बदलली. अमेरिकेच्या मुक्त बाजारपेठीय सूत्रावर आधारित आर्थिक वाढीवर भर देणारे विकासाचे प्रारूप जन्माला आले. जास्तीत जास्त उत्पादन करण्यामागे संपूर्ण जग धावू लागले. सोविएत महासंघाच्या विघटनानंतर जगाच्या राजकीय अर्थव्यवस्थेत कॉर्पोरेट महासत्तांचे वर्चस्व वाढले आहे.

गेल्या दोन दशकात व्यापक पर्यावरणाचा प्रश्न अधिकाधिक गंभीर बनत चाललेला असताना एकीकडे लोकशाही अवकाश संकुचित होत आहेत तर दुसरीकडे भांडवलशाही हितसंबंध दडपून पुढे रेटले जाताना दिसतायत. आर्थिक विकासाच्या प्रतिमानात पर्यावरणाचा विचार करून शाश्वत विकासाची भाषा बोलायला आपण सगळे शिकलो तरीही नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती संपत नाहीत उलट अधिक उग्र होत आहेत. कोविड महामारीमुळे कोणतीही समस्या किती वेगाने जागतिक स्तरावर पसरू शकते आणि अगदी प्रगत देशातील सार्वजनिक व्यवस्था देखील किती अपुऱ्या पडू शकतात हा धडा आपल्याला मिळाला. हा विरोधाभास समजून घ्यायचा असेल तर मुळात शाश्वत विकासाच्या प्रतिमानाचेदेखील परीक्षण आवश्यक आहे.

शाश्वत विकासाचे वास्तव

मानवी समाजाचे जागतिक स्तरावरील किंवा वैश्विक स्वरूपाचे काही प्रश्न आहेत याची जाणीव १९८०च्या दशकात झाली. १९७० मध्ये प्रकाशित झालेल्या Club of Rome अहवालांपासून विकासाच्या धोरणात मानवी

पर्यावरणाचा विचार सुरु झाला. १९७२ मध्ये स्टोकहोम मध्ये भरलेल्या पहिल्या पर्यावरण परिषदेत १७९ देशातील राजकीय नेते, शास्त्रज्ञ, पत्रकार आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी सामाजिक-आर्थिक विकासाच्या नावाखाली सुरु असलेल्या पर्यावरणाच्या शोषणाकडे लक्ष वेधले. पुढे रिओ मध्ये १९९२मध्ये भरलेल्या 'Earth Summit' मध्ये विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय पैलुंचा समतोल राखला पाहिजे आणि जगातील सर्व देशांनी शाश्वत विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत असा आग्रह करण्यात आला. या परिषदेनंतर आंतरराष्ट्रीय परिषदा आणि करारांची एक साखळीच सुरु झाली. जैव-विविधता, जंगल व वनसंपत्ती, दुर्मिळ व नामशेष होणाऱ्या प्रजाती, खाद्यसंपदा या सर्वांच्या संरक्षण व संवर्धनासाठी त्यांचे योग्य व्यवस्थापन झाले पाहिजे व ही सगळयांची वैश्विक गरज आणि जबाबदारी आहे अशी मांडणी प्रचलित झाली. या सर्व परिषदांच्या बरोबरीने पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आणण्यात महत्वाची भूमिका आहे ब्रंटलंड अहवालाची. १९८३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने 'पर्यावरण आणि विकास' या विषयाच्या सखोल अभ्यासासाठी एक समिती नेमली. नॉर्वेच्या पूर्व-पंतप्रधान ग्रो ब्रंटलंड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या समितीचा 'Our common future' हा अहवाल १९८७ मध्ये प्रकाशित झाला. हा अहवाल प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर असतानाच १९८६ मध्ये रशियातील चेर्नोबिल मध्ये अणुभट्टीत स्फोट होऊन भयंकर दुर्घटना घडली. मानवनिर्मित पर्यावरण किती विनाशकारी असू शकत याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. पर्यावरणाचा विचार न करता केलेला विकास अपूर्णच नाही तर पुढच्या पिढ्यांच्या दृष्टीने अमान्य ठरेल हे निश्चित झाले. ब्रंटलंड अहवाल ही शाश्वत विकासाच्या नव्या पर्वाची नांदी होती असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. विसाव्या शतकाच्या अखेरीस आणि येणाऱ्या एकविसाव्या शतकासाठी शाश्वत विकास हा परवलीचा शब्द बनला. गरिबी आणि अविकासितता दूर करण्याबरोबरच पर्यावरणाचे संरक्षण करणे हा दुहेरी हेतू साध्य करणारे विकासाचे हे प्रारूप झपाट्याने लोकप्रिय झाले.

पण शाश्वत विकासाच्या या प्रतिमानाचे थोडे काळजीपूर्वक अवलोकन केले तर त्याचे मूळ पाश्चिमात्य वर्चस्ववादी विचारप्रणालीत आहे हे स्पष्ट होते. ब्रंटलंड अहवाल व त्यापुढील अनेक परिषदांच्या अहवालांचे विश्लेषण केले तर पर्यावरणीय समस्यांवर संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन हाच मुख्य उपाय आहे याचा पुनरुच्चार होताना दिसतो. वाढत जाणाऱ्या गरजा आणि मर्यादित असणाऱ्या संसाधनांचा प्रश्न सोडवायला एकीकडे मर्यादेत राहून जगायला शिकवणाऱ्या पर्यायी जीवनशैलीचा प्रचार-प्रसार करणे आणि दुसरीकडे आहे त्या साधनसंपत्तीचा काळजीपूर्वक वापर करणे या दुहेरी मार्गाचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. पण १९८० पासून निर्माण झालेल्या नवीन राजकीय-अर्थव्यवस्थेत पर्यावरणाच्या व्यवस्थापनावर अधिक लक्ष केंद्रित केले गेले आहे. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी लोकांना नवीन जीवनमूल्यांचा अंगीकार करण्यासाठी प्रवृत्त करण्यापेक्षा नवीन व्यवस्थापकीय कौशल्यांची निर्मिती करण्यावर भर दिला आहे. एस्कोबार यांनी या व्यवस्थेला 'पर्यावरणशाही' असे नाव दिले आहे (एस्कोबार १९९५, १९३). पर्यावरणशाहीत उत्पादनावर आधारित अर्थव्यवस्थेचेच प्रारूप पुढे चालवले गेले आहे, फरक फक्त संसाधने कशा पद्धतीने वापरावीत यासंबंधी धोरणात आहे. उत्पादन अखंडपणे सुरु राहिलेच पाहिजे, फक्त आता भांडवलाचा व संसाधनांचा पुनर्विचार करणे अनिवार्य आहे. उपभोगवादी जीवनशैली संपली तर भांडवलवादी राजवटी संपतील. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाचा जप करत उत्पादन जोमाने सुरूच ठेवायचे मात्र पर्यावरणपूरक मार्ग, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान वापरायचे. त्यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी भांडवली गुंतवणूक करायची अशी रणनीती वापरली जात आहे. म्हणजे पुन्हा विज्ञान, तंत्रज्ञान, नियोजन, व्यवस्थापनावर आधारित वाढ आणि विकासाच्या आराखड्याची री ओढ्ण्याचाच प्रकार आहे. पृथ्वी सर्वांची आहे, पर्यावरण सर्वांचे आहे, पर्यावरणीय समस्याही सर्वांच्या आहेत, पण जागतिक समस्यांवर उपाययोजना करण्याची क्षमता मात्र प्रगत देशातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यवस्थापक व उद्योजकांकडेच आहे असे भासवले जाते.

Scientific American या नियतकालिकाच्या सप्टेंबर १९८९ मध्ये निघालेल्या Managing planet earth या विशेषांकाचा सूर पृथ्वीवरील उपलब्ध साधनांचा वापर व पुनर्वापर करण्याचे अधिक कार्यक्षम तंत्र कसे विकसित करता येईल हाच होता. पहिल्याच लेखाचे लेखक विल्यम क्लार्क जेव्हा 'we have the responsibility to manage the human

use of planet earth/we need to move peoples and nations towards sustainability' असं लिहितात तेव्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष्य ट्रुमन यांच्या प्रसिद्ध भाषणाची (ज्या भाषणातून जगाचे विकसित आणि अविकसित असे दोन भाग पडले आणि विकासाचे दायित्व अमेरिकेच्या खांद्यावर आहे असे दाखवले गेले) पुनरावृत्ती होते. We हा शब्दप्रयोग करताना इथे जागतिक बँकेत/आंतरराष्ट्रीय समित्यांवर काम करणारे गोऱ्या जगातील शास्त्रज्ञ, अर्थतज्ञ अभिप्रेत आहेत. १९९० पर्यंत जगभर पसरलेल्या NGOs च्या जाळयामुळे यात काही 'तिसऱ्या जगातील' उच्चभ्रू विचारवंतांचा समावेश झाला. पण एकंदरीत पाहता शाश्वत विकासाच्या नावाखाली 'पर्यावरणीय व्यवस्थापन' आणि विकास-तज्ञांचे वर्चस्व निर्माण झाले असे प्रतिपादन एस्कोबार (१९९५), सॅक्स (१९८८) यासारखे विचारवंत करतात.

जगाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या पाश्चिमात्य विचारसरणीतून मुख्य-प्रवाही संकल्पना निर्माण होतात आणि बाकी जगावर लादल्या जातात. या विचारसरणीच्या बाहेरचे किंवा त्या चौकटीत न बसणारे सर्व 'पर्यायी' म्हणून संबोधले जाते. त्यामुळे गरजा मर्यादित ठेवण्याचा व विकेंद्रीकरणावर भर देणारा महात्मा गांधी, शुमाखर यांच्यासारख्या विचारवंतांचा दृष्टीकोन विकासाचे पर्यायी प्रारूप म्हणून अभ्यासक्रमात शिकवण्यापुरताच मर्यादित राहतो. स्त्रीवादी, पर्यावरणवादी आणि उत्तर-वसाहतवादी सिद्धांकनाने प्रचलित विकासाचे केलेले खंडन मुख्यतः या प्रारूपाच्या पाश्चिमात्य वर्चस्ववादी स्वरूपावर प्रहार करते. भांडवलवादी अभिजन वर्गाचे हितसंबंध राखण्याचे काम या प्रारुपाने केले आहे असे प्रतिपादन या विचारवंतानी केले आहे. जगभरातील वंचित, शोषित व सिमान्तिक समूहांची जगण्याची साधने या विकास प्रक्रियेमुळे नष्ट होत आहेत, त्यांचा जगण्याचा संघर्ष अधिकाधिक तीव्र बनत चालला आहे, विकासाचा गाडा ओढण्याचे श्रम करणाऱ्या या समूहांपर्यंत विकासाची फळे मात्र त्या प्रमाणात पोचताना दिसत नाहीत या विरोधाभासाकडे लक्ष वेधले आहे. पण प्रमुख-प्रवाही विकास धोरणात या मुद्द्यांचा अभावानेच समावेश होतो असे खेदाने म्हणावे लागेल. या सर्व विविध परिप्रेक्ष्यातून झालेल्या चिकित्सेतून विकासाची भाषा निश्चित बदलली. मानवी विकास, शाश्वत विकास, लिंगभावात्मक निर्देशांक, अशा जास्त समावेशक संकल्पना व मोजमापाचे निर्देशांक आले. पण यातून होणारे बदल फक्त वरवरचे नाहीत ना हे तपासून पाहणे गरजेचे आहे.

त्यासाठी लेखाच्या शेवटच्या विभागात आरोग्याच्या बदलत्या संकल्पनेच्या आधारे मुख्य-प्रवाही विकास धोरणात वरवर पर्यावरणपूरकतेची भाषा वापरून कॉर्पोरेट भांडवलशाही समीकरणं जपली जातात का, सार्वजनिक आरोग्य यंत्रणेत बदल झाल्याशिवाय खऱ्या अर्थी सामान्यांपर्यंत बदल पोचू शकतील का असे प्रश्न उपस्थित केले आहेत.

आरोग्याकडून वेलनेसकडे

मानवी आरोग्य आणि कल्याणासाठी स्वच्छ व सुरक्षित पर्यावरणाची आवश्यकता असते यावर दुमत होऊ शकत नाही. सर्व वयोगटातील लोकांना निरामय, आरोग्यपूर्ण जीवन आणि समग्र कल्याणाची शाश्वती देणे हे संयुक्त राष्ट्रसंघाने २०१५-१६ मध्ये घोषित केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांतील तिसरे महत्वाचे उद्दिष्ट आहे. नैसर्गिक आपत्ती व पर्यावरण ऱ्हासामुळे ओढवणाऱ्या मृत्यू, अपंगत्व, मानसिक आजार, व व्याधींमुळे एकंदरीत आरोग्य व्यवस्थेवरचा ताण प्रचंड वाढत आहे हे लक्षात घेऊन सुरक्षित पर्यावरणावर मोठा भर दिला जात आहे. शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी निर्देशित केलेल्या उपाययोजनांमधील एक महत्वाचे पाऊल आहे २०३० पर्यंत प्रदूषित हवा, पाणी, व मातीमुळे तसेच घातक रसायनांमुळे होणाऱ्या आजारांची व मृत्यूंची संख्या लक्षणीय प्रमाणात कमी करणे.

थोडक्यात, आरोग्य आणि स्वास्थ्य हवं असेल तर त्यासाठी पर्यावरणाचा विचार आवश्यक आहे हे आता स्पष्ट आहे. पर्यावरण, आरोग्य आणि स्वास्थ्य/कल्याण या तीन गोष्टींना जोडून बघताना एक गोष्ट ठळकपणे जाणवते ती म्हणजे या तीन परस्परपूरक गोष्टींची फारकत झाली आर्थिक विकासाच्या प्रचलित प्रतिमानामुळे. निसर्गचक्राशी जोडल्या गेलेल्या मानवी समाज जीवनपद्धतीत आरोग्य आणि स्वास्थ्यसंबंधी समस्यांचे निराकरण निसर्गाशी सुसंगत उपचारपद्धती वापरून होत होते. विज्ञान आणि वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे मृत्युदर कमी करण्यात यश आले ही चांगली बाजू असली तरी आरोग्य क्षेत्राचेही हळूहळू एका उद्योगात रूपांतरण झाले हे लक्षात घायला हवे.

विकासाच्या सुरवातीच्या कालखंडात आरोग्य हा सामाजिक विकासाचा महत्वाचा पैलू मानला गेला. आरोग्य, शिक्षण, निवारा अशा मुलभूत गरजा भागवण्यासाठी स्वतंत्र सार्वजनिक यंत्रणा उभ्या केल्या गेल्या. वर नमूद केल्याप्रमाणे, साथीच्या रोगांवर माणसाने मिळवलेला विजय ही प्रचलित विकासाच्या प्रतिमानातील फार मोठी जमेची बाजू आहे. विकसित देशांनी ह्या संबंधात केलेली प्रगती नक्कीच स्पृहणीय आहे. पूर्वी हिवताप, विषमज्वर, प्लेग अशा साथींच्या रोगाने हजारो लोक मरत. पण पोषण, सार्वजनिक स्वच्छता, लसीकरण अशी पावले उचलून असे रोग व साथी आटोक्यात आणण्यात पाश्चिमात्य देशांनी फार चांगले यश मिळवले. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेचा मोठा पगडा त्यांच्या सामाजिक विकासाच्या यंत्रणेवर होता. जवळपास १९८० पर्यंत विकासाच्या प्रतिमानात कल्याणकारी राज्य ही संकल्पना महत्वाची होती. नागरीकांचे आयुर्मान वाढवणे, जीवनमानाचा स्तर उंचावणे, वैद्यकीय सुविधांचे वितरण ही सरकारची जबाबदारी मानली गेली. अर्थात त्यांच्या सार्वजनिक आरोग्य सेवेच्या उभारणीत वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीचा जेवढा वाटा आहे तेवढाच नवनवीन औषधनिर्मितीसाठी आणि संशोधनासाठी तिथे उपलब्ध असलेल्या पैशाचा आहे हे विसरून चालणार नाही. पण या उपलब्ध पैशाचा आणि उत्पादन व उत्पन्नाच्या उच्च विकास दराचा चांगला विनिमय या राष्ट्रांनी आपल्या आरोग्य, शिक्षण अशा सामाजिक क्षेत्रात गुंतवणूक करून केला. चांगल्या दर्जाच्या आरोग्य सेवा व नागरिकांचे चांगले आयुर्मान अशा निर्देशांकातून प्रगत देशांचा सामाजिक विकासाचा उच्च स्तर अधोरेखित होतो.

भारतासारख्या विकसनशील देशातही आरोग्यसेवेची जबाबदारी शासनावर होती. पण जसजसे विकासाचे प्रतिमान बदलत गेले तसतसे आरोग्याच्या संकल्पनेत आणि आरोग्यसेवेच्या यंत्रणेत बदल झाला. साधारण १९८० नंतर विकासाचे नव-उदारमतवादी प्रारूप प्रचलित होऊ लागले तसतसे सामाजिक क्षेत्रातून राज्यसंस्थेने आपली जबाबदारी व गुंतवणुक कमी करावी असा आग्रह जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व अर्थतज्ञांकडून होऊ लागला. ही नवीन कॉर्पोरेट राजकीय अर्थव्यवस्थेची नांदी होती. आता आरोग्य, शिक्षण अशा क्षेत्रातही बाजारपेठीय नियंत्रण हवे होते. खाजगी नफेखोरीसाठी ही क्षेत्र खुली करणे आवश्यक होते. आरोग्यसेवांसाठी सरकारच्या तिजोरीतून नाही तर जास्तीत जास्त लोकांच्या खिशातून पैसा बाहेर काढणे आवश्यक होते. प्रत्यक्ष काही रोग/आजार झाला किंवा अपघात झाला तरच दवाखान्यात जाणाऱ्या माणसांना नियमितपणे काहीनाकाही स्वरुपात आरोग्य सेवांसाठी खर्च करायला लावायचा तर त्यासाठी आरोग्याच्या संकल्पनेत बदल करणे आवश्यक होते. त्यामुळे १९९० च्या दशकात प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, नियमित तपासण्या, आहाराची वेगवेगळी कोष्टक या सर्वातून फक्त आजारी पडल्यावर योग्य उपचार व सुविधा मिळणे म्हणजे आरोग्य नसून मुळात आजारी न पडणे व त्यासाठी प्रयत्नशील राहणे अशी आरोग्याची संकल्पना आली. हा विचार चुकीचा नाहीये पण त्यामागे दडलेले बाजारपेठीय गणित लक्षात घेतले पाहिजे. फळफळावळ, सुकामेवा, ओट्स, ब्रोकोली अशा आहार घटकांचा आणि विविध जीवनसत्वांच्या गोळयांचा भडीमार करून प्रतिकारशक्ती वाढवणे कोणत्या आर्थिक वर्गातून येणाऱ्या लोकांना जमणार आहे हा प्रश्न उपस्थित होतोच. नियमित व्यायाम करायला जिमसाठी हजारो रुपये खर्च करणे न जमणारा मजूर दिवसरात्र शारीरिक कष्ट (व्यायाम) करूनही प्रदूषित हवा-पाणी, निकृष्ट व भेसळयुक्त अन्न खाऊन आजारी पडतोच. आणि उपचारासाठी पैसे नाहीत म्हणून तसेच आयुष्य ढकलत राहतो. देशातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत आरोग्यसेवा पोचवायच्या असतील तर सार्वजनिक आरोग्यव्यवस्था मजबूत करणे हाच योग्य पर्याय आहे.

वेलनेस किंवा स्वास्थ्य/कल्याण ही संकल्पना तशी जुनी आहे. आरोग्य आणि स्वास्थ्य या संकल्पना आलटूनपालटून वापरल्या जातात. गेल्या दशकापासून वेलनेस आणि well-being या शब्दांचा वापर जास्त प्रचलित झाला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे विकासाच्या धोरणात होणारा संकल्पनात्मक बदल योगायोगाने होत नसून त्यामागे वर्चस्ववादी राजकारण असते. निसर्ग हा एक दुर्मिळ बनत चाललेला घटक आहे याची जाणीव जसजशी वाढत गेली तसतशी खुद्द निसर्गाकडे भांडवली गुंतवणूकीचे क्षेत्र म्हणून बघायला सुरुवात झाली. नफेखोरी आणि स्पर्धेच्या चरकात सापडलेल्या लोकांना आता निसर्गही तडाखे द्यायला लागला आहे. अनिश्चित पर्यावरण हे आजचे वास्तव बनले आहे.

पर्यावरणाचा अत्यंत गांभीर्याने विचार करणाऱ्या अभ्यासक, कार्यकर्त्यांच्या प्रयत्नातून सम्यक विकासाचा विचार पुढे आला आहे. प्रदूषण, जंगलांचा व जैव-वैविध्याच विनाश, पर्यावरणाचे ढासळते संतुलन, नवनवीन रोग आणि महामारी अशा समस्यांनी ग्रासलेल्या आजच्या समाजात या सर्व समस्यांचे मूळ बाह्य पर्यावरणापेक्षा मानवी मनोवृत्तीत व सामाजिक व्यवस्थेत आहे याचे गांभीर्य पटायला लागले आहे. व्यक्ती, समष्टी, आणि सृष्टी यांचा विभक्तपणे विचार करणे चुकीचे आहे ही जाणीव वाढीस लागून सम्यक विकासाचा विचार होत आहे (कुलकर्णी २०२१, ७). पण पुन्हा अशा मुक्तिदायी प्रारुपांमधील संकल्पना व भाषेचा वापर करून नफा मिळवणारे व्यापारी हितसंबंध जोर धरताना दिसतायत. Well-being या संकल्पनेत शारीरिक आरोग्याबरोबर भावनिक, मानसिक संतुलन आणि अध्यात्मिक शांतीचा अंतर्भाव होतो. पण हे स्वास्थ्य मिळवण्यासाठी ते ज्यामुळे बिघडतंय त्या व्यवस्थांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यापेक्षा ध्यान-धारणा, अध्यात्मिक उन्नती, निसर्गाचे सान्निध्य असे मार्ग सुचवले जातायत. हे मार्ग चांगलेच आहेत पण व्यक्तिकेंद्री आहेत. व्यवस्थात्मक परिवर्तन झाल्याशिवाय व्यक्तीला समष्टीशी जोडून साध्य होणारे सामुहिक कल्याण शक्य नाही. दुसरे म्हणजे यातून पुन्हा एकदा निसर्गाचे अगदी छुप्या वाटेने वस्तूकरण होणार आहे. जंगलांवर, वनांवर, तळ्यांवर ज्यांची पारंपारिक वहिवाट होती त्यांना विस्थापित करून त्यांच्या वाटचा सूर्यप्रकाश, नितळ पाणी, मोकळी हवा धनदांडग्यांना पैश्याच्या मोबदल्यात विकले जाणार आहे. आरोग्याकडून well-being कडे झालेला हा खांदेपालट विकासाच्या नव-उदारमतवादी प्रारुपात चपखल बसतो. पर्यावरण, आरोग्य, आणि स्वास्थ्य यांच्यातील फारकत आणखी तीव्र करतो.

संदर्भ -

1. बसवंत विठाबाई बाबाराव. २०२२ हरितदृष्टी. हरिती प्रकाशन
2. Escobar, Arturo. 1995 Encountering development: The making and unmaking of the third world. Princeton New York, University Press
3. कुलकर्णी दिलीप. २०२१ निसर्गायण. पुणे राजहंस प्रकाशन
4. मोहंती, सुगाता १९९९ विकासाच्या प्रक्रियेतील स्त्रीप्रश्न. पुणे, स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ
5. Sachs, Wolfgang. 1988 The gospel of global efficiency. New Delhi India International Centre

*सहयोगी प्राध्यापक, सेंट मीरा महाविद्यालय, पुणे

***

आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण: चित्रपटांच्या नजरेतून

*डॉ. वैशाली दिवाकर

आधुनिक समाजामध्ये व्यक्तींना जेव्हा अधिकार असणाऱ्या व्यक्ती म्हणून पहिले जाते तेव्हा आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण या तीनही संकल्पना महत्वाच्या ठरतात. आधुनिक, विकसित राज्यसंस्था त्यामधील नागरिकांना हे त्यांचे मूलभूत अधिकार पुरवण्यासाठी बांधील असतात असे मानले जाते. आजवरच्या अनेक अभ्यासकांनी या बाबतच्या राज्यसंस्थे च्या अपयशाची मांडणी केली आहे. या लेखात प्रामुख्याने आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण या तीनही मूलभूत हक्कांचे सादरीकरण माध्यमांमधून आणि मुख्यतः चित्रपटांमधून कसे झाले आहे हे बघण्याचा प्रयत्न केला आहे. त्या आधी आपण थोडक्यात चित्रपट हे माध्यम का महत्वाचे ठरते, तसेच ते अभ्यासण्याची योग्य संशोधन पद्धती काय आहे याचा थोडक्यात विचार करू.

चित्रपट अध्ययन : एक संशोधन पद्धती

साधारण १९८० च्या दशकांपासून सामाजिक घडामोडींचा अभ्यास करण्यामध्ये चित्रपट आणि एकूणच माध्यमे महत्वाची भूमिका बजावतात असे अध्ययनाच्या पातळीवर पुढे आले. समाजशास्त्राचे अभ्यासक म्हणून आपल्याला या टप्प्यावर एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे १९७० ते ८० च्या दरम्यान समाजशास्त्राचा जनमत/पब्लिक ओपिनियन अभ्यासण्याच्या क्षेत्रात पीछेहाट झालेली दिसते. (Manza and Brooks, 2012). परिणामी मानसशास्त्राच्या अंगाने माध्यमांचे परिणाम प्रारूप हेच प्रमुख प्रवाही मानले गेले. चित्रपटांचे समाजावर होणारे परिणाम किंवा दूरचित्रवाणीचे लहान मुलांवर होणारे परिणाम किंवा चित्रपटांचे समाजातील वाढत्या गुन्हेगारीवरील परिणाम या पद्धतीचे अभ्यास मानसशास्त्रामध्ये प्रामुख्याने प्रचलित होते. या प्रकारच्या अभ्यासांना मुख्यतः effect model किंवा परिणाम प्रारूप असे संबोधले गेले होते. या सारख्या प्रारूपांच्या मर्यादा थोड्याच काळात लक्षात आल्याने यावर प्रभावी असे अध्ययन प्रारूप असण्याची गरज सामाजिक शास्त्रज्ञांकडून व्यक्त केली गेली. परिणाम प्रारूप वापरणाऱ्या ह्या अभ्यासकांनी माध्यमांकडे- दूरचत्रवाणी बघणे किंवा चित्रपट बघणे या सारख्या कृतींकडे स्वतंत्र, एकाकी कृती म्हणून पहिली. त्यामुळे चित्रपट पाहून व्यक्ती गुन्हेगार बनतात या सारख्या निष्कर्षांचा ओघ सुरु झाला. खरे तर ह्या सारखे निष्कर्ष हे या अभ्यासाच्या मर्यादा आहेत असे कालांतराने लक्षात आले. एखाद्या समाजातील सामाजिक कृती समजून घ्यायची असेल तर माध्यमे महत्वाची ठरतात परंतु त्याकडे एकाकी घटना म्हणून न बघता माध्यमे किंवा चित्रपट हे त्या त्या समाजमध्ये, त्यातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घडामोडीमध्ये रुजलेली असतात हे बघणे गरजेचे असते. या मध्ये अजून एक महत्वाची समस्या असते ती म्हणजे बहुतांशी अभ्यास हे मानसशास्त्राच्या चौकटीत झालेले असल्याने ते यथास्थिती किंवा मूळ स्थिती (status quo) अभंग ठेवण्याकडे त्यांचा कल असल्याचे लक्षात येते. आणि त्यामुळे माध्यमांकडे क्रांतिकारी माध्यम म्हणून बघण्याला मर्यादा येतात. तसेच त्यांच्या अभ्यासातील वैज्ञानिक अचूकतेच्या अट्टाहासामुळे देखील माध्यमांच्या संशोधनाला मर्यादा येतात. जनमत चाचण्या किंवा राजकीय संपर्क/संवाद संबंधित अभ्यास यातून समाजशास्त्र बाहेर पडल्याने माध्यमांचा सत्तासंबंधांशी असलेला संबंध यातून वगळला गेला- मग ते बातम्यांचे विश्लेषण असो किंवा चित्रपटांचे. अस्मिता, विचारप्रणालींची निर्मिती ही समाजातील

सामाजिक, राजकीय विषमतेशी जोडलेली असते हे लक्षात घेण्यासाठी समाजशास्त्राची कमी भासायला लागली (Waisbord, 2014).

त्यामुळे १९८० नंतरच्या दशकात समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून माध्यमांकडे आणि चित्रपटांकडे बघण्यास सुरुवात केली. या अभ्यासांमध्ये दोन प्रमुख प्रवाह दिसतात. एक प्रवाह जो अडोर्नो या सारखे नव मार्क्सवादी विचारवंत मांडतात. त्यांच्या मते माध्यमांकडे खूप जास्त सत्ता असते आणि ती प्रेक्षकांवर/जनमानसावर परिणाम करत असते. यांच्या मते प्रेक्षक हे निष्क्रिय असतात. या उलट फिस्क (Fiske) या सारख्या विचारवंतांच्या मते चित्रपटांसारखी लोकप्रिय संस्कृती ही मुळातच लोकांकडून घडवली जाते. प्रेक्षक हे निष्क्रिय प्राप्तकर्ता नसून तो अतिशय सक्रिय आणि सृजनात्मक दृष्ट्या माध्यमाशी जोडला गेलेला प्रेक्षक असतो (Gauntlett, 2002). फिस्क याच्या विचारप्रवाहातून पुढे आलेल्या अभ्यासांनी माध्यमाकडे आणि त्यातही चित्रपटांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पहिले. या मध्ये आधिसत्ता, नियंत्रण, वर्चस्व या सारख्या कोटिक्रमांचा विचार केला गेला. आज आपण माध्यमांच्या समाजशास्त्राकडून माध्यम समाजशास्त्राकडे -media sociology कडे प्रवास करतोय. आणि म्हणून चित्रपटांचा केवळ परिणामांच्या दृष्टिकोनातून अभ्यास न करता किंवा चित्रपट हे केवळ फावल्या वेळेतील उपभोगाचे साधन नसून ते आपल्या सामाजिक व्यवहाराचा, दैनंदिन व्यवहाराचा भाग कसे बनतात आणि उलटपक्षी सामाजिक/दैनंदिन व्यवहार कसे घडवतात हे बघणे महत्वाचे ठरते. माध्यम समाजशास्त्र अधिकाधिक गुणात्मक संशोधन करायला, सामाजिक वास्तवाचा पट समजून घ्यायला मदत करतात. वैज्ञानिक दृष्टिकोनातून किंवा संख्यात्मक चौकटीमध्ये जर माध्यमांचा अभ्यास करायला लागलो तर पटावरील अनेक संदिग्ध, गुंतागुंतीच्या सामाजिक प्रक्रिया निसटून जाऊ शकतात आणि दोन टोकाच्या भूमिकांमध्ये आपण अडकून पडण्याची संभावना जास्त असते. त्यामुळे माध्यम समाजशास्त्राचा आणि त्यामध्ये अंगीभूत असलेल्या गुणात्मक संशोधनाचा वापर केल्यास सामाजिक प्रश्नाभोवतीची गुंतागुंत लक्षात यायला मदत होते.

पुढील लेखा मध्ये माध्यम समाजशास्त्राच्या आधाराने आपण आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण या तीनही संकल्पना चित्रपटांच्या माध्यमातून कश्या सादर केल्या जातात याचा आढावा घेणार आहोत. चित्रपट सामाजिक प्रश्न कश्या पद्धतीने हाताळतात, ते कसे सोडवतात, ते कसे बदलवतात आणि त्याचे विकृतीकरण करतात किंवा कसे ते प्रश्न झाकून टाकून त्या प्रश्नाचे अस्तित्वच नामशेष करून टाकतात हे पाहणार आहोत.

चित्रपट आणि आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण

प्लेटो आणि सकस जीवन

आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण ह्यामधील परस्पर संबंध बघत असताना ग्रीक तत्ववेत्ते प्लेटो यांची 'good life' किंवा चांगल्या आयुष्याची संकल्पना बघणे गरजेचे आहे. या लेखामध्ये कल्याण किंवा 'well being' याचा अर्थ चांगले, सकस, गुणात्मक दृष्ट्या समाधानकारक आयुष्य असा घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्या संदर्भात प्लेटो यांचे विचार महत्वाचे ठरतात. त्यांच्या मते प्रत्येक व्यक्ती मध्ये न्याय आणि चांगुलपणाने भरलेले आयुष्य जगण्याची एक नैसर्गिक उर्मी असते. आपल्या आसपासच्या जगाचे यथार्थ ज्ञान आणि स्वतःच्या आंतरिक स्वभावा बरोबर / स्वभाव स्वरुपाबरोबरचा संवाद हेच आपल्याला सकस आयुष्य देऊ शकतात असे ते मानतात (Oppong, 2022). तुम्ही व्यक्ती

म्हणून कोण आहात, तुमचे स्व काय आहे आणि त्याची ओळख तुम्हाला आहे का, हे चांगले आयुष्य जगायचे प्लेटो यांच्यामते निकष आहेत. हे समजल्यावरच खऱ्या अर्थाने तुम्ही आपल्या आसपासच्या जगाचा, जीवन अनुभवांचा अर्थ समजू शकता. अर्थातच चांगले आयुष्य म्हणजे काय हा वैयक्तीक मुद्दा राहतो. परंतु असे असले तरी प्लेटो यांचा 'रिपब्लिक' मधील संवाद हा केवळ virtues-गुण किंवा न्यायाविषयी चा राजकीय संवाद नसून तो समाज, राज्यसंस्था आणि तत्वज्ञान हे तीनही घटक चांगले आयुष्य जगायची अट कशी पुरी करू शकतात या विषयीचा संवाद आहे. समाजातील अधिकाराने बद्ध असणाऱ्या नागरिकांना सकस आणि समृद्ध आयुष्य पुरवण्याची जबाबदारी ही त्या त्या राज्यसंस्थेची देखील असली पाहिजे. आपण थोडक्यात आरोग्य आणि पर्यावरणाची मानवी आयुष्यातील भूमिका समजावून घेऊन परत प्लेटो यांच्या सकस आयुष्याकडे वळूया.

चित्रपट, पर्यावरण आणि आरोग्य

कल्याण याचा अर्थ वैयक्तिक सकस आयुष्य म्हणून बघितले तर आरोग्य आणि पर्यावरण या दोनही सामाजिक संस्था आहेत आणि त्यांची सामाजिक पातळीवर जडणघडण होत असते हे बघणे गरजेचे ठरते. आरोग्य हे वर वर पाहता वैयक्तिक वाटत असले तरी चांगल्या आरोग्याचा प्रवेश मार्ग हा नेहमी सामाजिकच असतो. त्याच पद्धतीने पर्यावरण हे वैयक्तिक पातळीवर राखले जात असले किंवा पर्यावरण राखण्यामध्ये व्यक्तींची भूमिका महत्वाची असली तरी पर्यावरणाची जडणघडण ही सामाजिक असते यामध्ये आपले दुमत असू शकत नाही. जेव्हा प्लेटो यांच्या संदर्भात आपण व्यक्तींचा सकस जगण्याचा अधिकार मान्य करतो तेव्हा सामाजिक पातळीवर होणाऱ्या घडामोडी, भांडवलवादी हस्तक्षेप या सर्व गोष्टी महत्वाच्या ठरतात. वैयक्तिक न्याय हा सामाजिक न्यायापासून अलग करता येत नाही. व्यक्तींचा सकस जगण्याचा अधिकार हा बहुतांशी वैयक्तिक न राहता तो भांडवलशाही व्यवस्थेमध्ये किंवा विकासाच्या रेट्यामध्ये सामाजिक मुद्दा बनायला लागतो का याचा विचार होण्याची गरज आहे. इंग्लिश मधील Erin Brockovich किंवा हिंदी मधील इरादा हे चित्रपट या संदर्भात महत्वाचे ठरतात. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये औद्योगिकरण , शहरीकरणाच्या रेट्यामध्ये, पर्यावरणाची अपरिमित हानी आणि त्यातून आरोग्याच्या समस्या कश्या निर्माण होतात ह्या वर Erin Brockovich हा चित्रपट बनला आहे. हा सत्य घटनेवर आधारित चित्रपट एका साम्यन नागरिकाचा भांडवलशाही व्यवस्थेविरुद्धचा लढा चित्रित करतो. कॅलिफोर्निया मधील हिंकली गावामध्ये एक गॅस प्लांट उभारणीमुळे व त्यातील हानिकारक रसायनांमुळे त्या गावातील अनेकांना कॅन्सर सारख्या गंभीर आजारांना तोंड द्यावे लागले. चित्रपट नायिका एरिनला या विषयी अचानक कळते कारण यातील काही रोग्यांना या प्लांटच्या डॉक्टरांकडून मदत मिळालेली असते. PG & E सारखा एव्हढा मोठ्ठा प्लांट ही मदत का करत आहे हे खोदून काढल्यानंतर एरिन ला लक्षात येते कि या प्लांटमुळे पाण्यामध्ये जे क्रोमियम मिसळले जात आहे त्यातून विशिष्ट प्रकारच्या कॅन्सरचे प्रमाण त्या संपूर्ण गावात वाढत आहे. आणि यातूनच ती सामान्य नागरिकांच्या वतीने या प्लांट विरुद्ध्द्धचा लढा पुढे नेते. या मध्ये अनेक गुंतागुंतीचे मुद्दे पुढे येतात. त्यात अनेक भांडवलशाही शक्तींचे स्वार्थी हेतू गुंतलेले असतात. या चित्रपटातून भांडवशाही व्यवस्था, पर्यावरणवादी लढ्याची गरज आणि आरोग्य यावर अतिशय सक्षम पद्धतीने टिप्पणी केली आहे.

याच विषयाशी संबंधित हिंदी मधील इरादा हा चित्रपट देखील खूप महत्वाचा ठरतो. नसरुद्दिन शाह यांचा हा चित्रपट पंजाब मधील हरितक्रांती आणि त्यानंतरच्या विकास प्रकल्पांचा पर्यावरणावर, आरोग्यावर आणि एकूणच

व्यक्तींच्या सकस जीवन जगण्याच्या अधिकारावर भाष्य करतो. नसरुद्दिन शाह यांची मुलगी तिच्या स्वप्नपूर्तीचा उंबरठ्यावर असतानाच ती कॅन्सरने ग्रस्त आहे हे समजते आणि नंतरचा पूर्ण चित्रपट आपल्या मृत मुलीला न्याय देण्याचा एका बापाचा आणि पर्यायाने एका सजग नागरिकाचा हृदयद्रावक लढा हा चित्रपट उभा करतो. प्लेटो यांची सकस आयुष्य जगण्यासाठी आवश्यक असलेले स्वचे भान, आंतरिक संवाद हा जरी चांगले आयुष्य जगण्याचा निकष हा चित्रपट दाखवत असला तरी आरोग्य आणि पर्यावरण या सामाजिक संस्था असतात आणि कल्याण किंवा प्लेटो यांचे 'good life' ही संकल्पना वैयक्तिक असली तरी ती एका विस्तृत अश्या सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडींवर अवलंबून असते हेच हा चित्रपट मांडतो. Erin Brockovich प्रमाणे इरादा देखील औद्योगिकरण, विकास यांचा परिणाम म्हणून जे घातक वास्तव आपण निर्माण करत आहोत आणि मूठभर लोकांच्या फायद्यासाठी आणि विकासासाठी सर्व सामान्य जनता आज त्यांच्या आरोग्याची जी किंमत मोजत आहे त्यावर भाष्य करतो. आज याचे परिणाम किती गंभीर आहेत हे दाखवण्यासाठी इरादा चित्रपट पंजाब मधील कॅन्सर मेल-रेल्वे चित्रित करते. गावच्या गावं गंभीर आजाराने ग्रासली गेली तरीही भांडवशाही व्यवस्थेमध्ये विकास आणि नफ्याचे तत्वच बघितले जाते हे या चित्रपटातून लक्षात येते. गंमतीचा भाग म्हणजे अमेरिकेमध्ये ज्या पद्धतीने Erin Brockovich सारख्या चित्रपटाला सामान्य जनतेकडून आणि ऑस्कर सारख्या संघटनेकडून मान्यता आणि गौरव मिळाला तशी भारतात इरादा चित्रपटाला फारशी मान्यता किंवा अधिकृत दर्जा मिळालेला दिसत नाही. कदाचित आजही तिसऱ्या देशातील लोकं विकासाबरोबर येणाऱ्या आपल्या सकस आयुष्य जगण्याच्या अधिकाराविषयी पूर्णतः जागरूक नसावीत किंवा चित्रपट हे आजही करमणुकीचे साधन म्हणून बघत असल्याने एखादा चित्रपट जर गंभीर, महत्वाचा विचार मांडत असेल तर त्याकडे कानाडोळा केला जातो. अर्थात ही कारणमीमांसा वरवरची आहे. यामागची का रणे स्वतंत्र पणे शोधावी लागतील.

मानसिक आरोग्य आणि कल्याण

मानसिक आरोग्य हा खूप मोठ्ठा आणि अधिक खोलवर जाणारा विषय आहे पण आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण या तीनही कोटिक्रमांचा विचार करत असताना मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आजच्या काळात विकासाच्या, जागतिकीकरण्याच्या रेट्यामध्ये ज्या गतीने सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक बदल होत आहेत त्यांचा विचार करता एक महत्वाची गोष्ट लक्षात येते ती म्हणजे विकासाची किंवा बदलांची एकरेषीय वाढ. यामध्ये एकाच दिशेने आणि एकाच पद्धतीने वाढ होत असल्याने अनेक सामाजिक घटक यातून वगळले जातात. परिघाबाहेरील समाज हा या विकासाचा भाग बनतच नाही. त्यांना प्रमुख प्रवाहा मध्ये आणण्यात अनेक स्थानिक, देशी वैशिष्ट्ये, सांस्कृतिक कलाकृती नष्ट होतात पण त्याच बरोबर या एकरेषीय विकासाच्या गतीचा भाग न होता येणे ही देखील व्यक्तींसाठी फार मोठ्ठी समस्या निर्माण होते.

त्याचबरोबर मानसिक आरोग्य आणि चित्रपट यांचा विचार करत असताना स्व ची संकल्पना बघणे गरजेचे आहे. एखाद्या व्यक्तीची स्व ची संकल्पना ही समाजातील बहुतांशी व्यक्तींची किंवा बहुसंख्याकांची असली पाहिजे असा अट्टाहास असला तरी ती तशी असतेच असे नाही. तसेच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून आपण जेव्हा काय प्रमाणित आहे आणि काय विचलनात्मक आहे हे ठरवतो तेव्हा अनेक घटकांना आपण परिघाबाहेर ठेवतो. काय नियमनात्मक आहे किंवा योग्य आहे हे ठरवत असताना काही साचेबद्ध प्रमाणबद्ध प्रतिमा तयार केल्या जातात आणि सर्वांना त्या साच्यात

बसवण्याचा आग्रह धरला जातो. प्लेटो यांच्या सकस जीवन जगण्याच्या विचारामध्ये स्व चे भान असणे, त्याची योग्य ओळख असणे हे अपेक्षित आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे स्वतःवर पूर्ण ताबा मिळवणे म्हणजे चांगले आयुष्य जगणे होय. कल्याणाची ही व्याख्या मान्य केल्यास आज आपल्यापैकी अनेक जण चांगले आयुष्य जगत आहेत असे मानणे अवघड होईल कारण आजच्या गुंतागुंतीच्या समाजात स्व वर पूर्ण ताबा मिळवणे हे आपल्या नियंत्रणाच्या पलीकडे आहे. या संदर्भात 'डिअर जिंदगी' सारखा चित्रपट लक्षात घेणे महत्वाचे आहे. सर्वसामान्यांना पटलेल्या रस्त्यावरून न जाता स्वतःच्या अटींवर जगणारी आलीया भट या चित्रपटातील मुख्य पात्र आहे. रुळलेली वाट न चालता स्वतःच्या मर्जीवर जगणारी हि छायाचित्रकार मानसिक असुरक्षिततेची शिकार बनते आणि स्वतःच्या आयुष्याचा अर्थ लावण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञाची मदत घेते. डॉ जहांगीर यांचा एक संवाद इथे महत्वाचा वाटतो-"जब हम आपने आप को अच्छी तरह समज लेते है तो दुसरे क्या समज लेते है, it doesn't matter. Not at all!" आणि म्हणून वारंवार ह्याच मुद्द्याकडे आपल्याला परत यावं लागते कि स्व ची ओळख म्हणजेच सकस, गुणात्मक आयुष्य जगण्याची पाहिली पायरी आहे. याच चित्रपटातील एक संवाद आहे- "अगर तुम अपनी जिंदगी का स्टीईरिंग व्हील अपने हाथ मे नही लेंगे ना, तो कोई दुसरा ड्रायविंग सीट पर बैठ जायेगा". आपल्या स्व वर आपला ताबा हीच समृद्ध जीवनाची गुरुकिल्ली आहे हेच हा चित्रपट मांडतो.

याच संदर्भात 'भुवन शोम' हा चित्रपट व्यक्तीचे स्व आणि त्याचे निसर्गाशी/पर्यावरणाशी असलेले नाते यावर भाष्य करतो. १९६९ मध्ये आलेला मृणाल सेन यांचा भुवन शोम हा चित्रपट व्यक्ती जर निसर्गापासून/पर्यावरणापासून तुटल्या तर स्वतःच्या स्व पर्यंत पोहचू शकत नाही हे अतिशय समर्थपणे मांडतो. एक अतिशय दुराग्रही, कणखर , रागीट असा नोकरशाहीचा प्रतिनिधी आपल्या रुक्ष, एकांगी आयुष्याला कंटाळून सौराष्ट्रामध्ये शिकारीसाठी म्हणून जातो. तिथे त्याला गौरी नावाची ग्रामीण मुलगी भेटते जी या निसर्गाशी एकरूप तर झालेली आहेच आणि त्याच्या संरक्षणाची/संवर्धनाची आणि भुवनचीही काळजी घेते. शिकारीसाठी म्हणून गेलेल्या भुवन मधील परिवर्तन खूप महत्वाचे आहे. सुरवातीला घातलेला शिकाऱ्याचा गणवेश, नंतर घातलेला सौराष्टातील पारंपरिक वेष, आणि त्यानंतरची सायरस क्रेन सारखी केलेली वेशभूषा ही भुवनमधील परिवर्तना वरील टिप्पणी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. जर सायरस क्रेन ची शिकार करायची असेल तर तुला त्यासारखा दिसायला लागेल तरच ते पक्षी तुला पाहून घाबरून उडून जाणार नाहीत असे गौरीने सांगितल्यावर भुवन क्रेन दिसेल असा वेष परिधान करतो. गौरी भुवन आणि पर्यावरणातील दुवा बनते आणि परत एकदा त्याला निसर्गाशी/पर्यावरणाशी जोडायला मदत करते. क्रेन पक्ष्यांची शिकार करण्यापेक्षा क्रेन पक्ष्यांचा थवा पाहून आनंदित होणारा भुवन हा खऱ्या अर्थाने सकस जीवन जगायला कसा शिकतो हे हा चित्रपट मांडतो. सौराष्ट्रामधून भुवन जेव्हा परत आपल्या गावी जातो तेव्हा तो पूर्णतः बदलेली व्यक्ती असतो. भुवन हा आपल्या आसपासच्या पर्यावरणातून आनंद शोधायला शिकतो आणि सकस आयुष्य जगण्याची हीच गुरुकिल्ली आहे हे प्रेक्षकांपर्यंत पोचवतो. भुवन सारख्या एककल्ली पुरुषाचे निसर्गाशी नाते जुळवून देण्यासाठी गौरी सारखी स्त्रीच आणि ते सुध्दा ग्रामीण स्त्रीच सेन याना का दाखवावीशी वाटली यावर स्त्रीवादी दृष्टिकोनातून भाष्य करणे हा स्वतंत्र लेखाचा विषय होईल परंतु विषय आणि जागेची मर्यादा लक्षात घेता तो इथे घेतला जात नाहीये.

निष्कर्ष :

वरील सर्व उदाहरणांमधून लक्षात येते कि आरोग्य, पर्यावरण आणि कल्याण ह्या तीनही संकल्पनांमधील संबंध बघायचा असेल तर प्लेटो यांची सकस आयुष्याची संकल्पना वापरून आजच्या आधुनिकीकरणाच्या, विकासाच्या आणि जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये आपण जे गुंतागुंतीचे जीवन जगत आहोत त्याचा फेरविचार झाला पाहिजे. आज जगण्याच्या किंवा खरंतर नुसत्याच धावण्याच्या शर्यतीत आपण खऱ्या अर्थाने जगायचे विसरत चाललो आहोत का हे विचार करायला लावणारे अनेक चित्रपट आपल्या आवती भोवती असतात. प्लेटो म्हणतात त्याप्रमाणे चांगले आयुष्य जगण्याचे दोन भाग असतात- नैतिकतेच्या आधाराने सत्सदविवेकबुद्धीने काय योग्य आणि काय अयोग्य हे ठरवून जगायचे आणि दुसरे म्हणजे आपल्याला जे आवडते ते करत आनंदी आयुष्य जगायचे आणि हाच चांगल्या आयुष्याचा मार्ग असेल. कासव, अस्तु, स्माईल प्लीज अशी प्रचंड मोठ्ठी यादी आहे जी आपल्याला या विचारांपर्यंत पोचवते, स्वतः ची स्वतःला ओळख करून देते. परंतु चित्रपट केवळ करमणुकीचे साधन म्हणून बघायला लागलो तर यातून मिळणारा संदेश हातातून निसटून जाईल. स्व ची ओळख, स्वतःला काय हवंय, निसर्गाशी/पर्यावरणाशी असलेले नाळेचे नाते शिकवायला चित्रपट सक्षम आहेतच. आपण फक्त तो संदेश काळजीपूर्वक वाचायला शिकला पाहिजे. अर्थात चित्रपट प्रमुखप्रवाही विचारप्रणाली रुजवण्याचे कामही तितक्याच प्रभावीपणे आणि सातत्याने करत असतात हे नाकारून चालणार नाही. तरीही चित्रपटांमध्ये असणारी परिवर्तनाची ही उदंड क्षमता लक्षात घेऊन लेखाचा शेवट Runaway Bride या चित्रपटातील एका डायलॉगने करणे रास्त ठरेल - how do you like your eggs. म्हणजेच आपल्या आयुष्यातील प्राधान्ये, आवडीनिवडी आपणच ठरवायच्या आहे आणि कधी सामाजिक चौकटीत राहून तर कधी बाहेर पडून आपल्यासाठी प्लेटो च्या परिभाषेतील सकस समृद्ध आयुष्य उभारायचे आहे.

References :

1. Gauntlett, Media, gender and identity, Routledge, New York, 2002.
2. Manza and Brooks,How sociology lost public opinion-a genealogy of missing concepts in the study of the political in Sociological theory, 30 (2),2012, 89-113.
3. Oppong Thomas, Plato On Living The Good Life, Medium, July 19, 2022
4. Waisbord, Media Sociology-A Reappraisal, Polity, UK, 2014.

*सेंट मिराज महाविद्यालय, पुणे. vaishali.diwakar@gmail.com

***

मृत्यूनंतरची मानखंडना : लातूर जिल्ह्यातील स्मशानभूमी प्रश्नाची उकल करताना

*अनिलकुमार जायभाये

पर्यावरण, आरोग्य आणि कल्याण याबाबत अधिक व्यापक भूमिकेतून आपल्या समाजाचे आजचे सामाजिक आरोग्य, सामाजिक पर्यावरण, स्वास्थ्य आणि आनंदी मंगलमय जीवन जगण्यासंदर्भात एका व्यापक पातळीवर विचार केल्यास आपणास आजच्या ग्रामीण भागातील काही कळीचे प्रश्न आव्हान म्हणून पुढे येताना दिसतात. ज्यामुळे आपल्या समाजात व्यक्तीला, समूहाला सन्मानजनक, स्वास्थपूर्ण आनंदी जगता येत नाही. अश्या अनेक प्रश्नांपैकी एक प्रश्न म्हणजे गावा-गावातील स्मशानभूमी संदर्भातील हिंसाचार आणि मानखंडना हा होय.

स्मशानभूमी: मृत्यु झालेल्या कोणत्याही व्यक्तीला एका सार्वजनिक जागी दहन किंवा दफन करतात त्या जागेला स्मशानभूमी असे म्हणतात. त्यास इतरही नावे आहेत, जसे मसणवटा, स्मशान, हडकी, हडवळी इत्यादी. माणूस मृत्यु झाला की, समाज, जात, धर्मानुसार वेगवेगळे संस्कार व व्यवहार त्यावर केले जातात व त्याला सर्व कुटुंब, नातेवाईक, आप्तसंबंधी लोक एकत्र येऊन त्याचे दहन किंवा दफन केले जाते. त्यामागे अनेक धार्मिक कल्पना आहेत. परंतु त्यातील एक महत्त्वाची बाब म्हणजे मृत्युपावलेल्या व्यक्तीच्या शरीराची अवहेलना, अपमान किंवा मानखंडना होणार नाही याचा विचार केला जात आहे. त्यामुळे अंत्यसंस्काराची प्रथा संपूर्ण जगात दिसून येते. इंग्रजीमध्ये Cremation Ground ही संकल्पना स्मशानभूमीसाठी वापरली जाते.

मानखंडना : मानवी समाजात व्यक्तीला प्रतिष्ठा ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे माणूस सतत सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा संपादन करण्याचा तयारीत असतो. जगाच्या पाठीवर कोणत्याही व्यक्तीला आपली प्रतिष्ठा गेलेली आवडत नाही किंवा त्यांचा अपमान, मानखंडा, चेष्टा केलेली आवडत नाही. परंतु भारतीय समाजाचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, जातीयतेमुळे पुर्वाश्रमीच्याअस्पश्यांना व शूद्रांना वेळोवेळी मानखंडनेला सामोरे जावे लागत होते. या विवंचनेतून वंचितांना बाहेर काढण्यासाठी अनेक समाजसूधारकांनी प्रयत्न केला आहे. त्यातून मानखंडनेचे स्वरुप काही प्रमाणात कमी झाले आहे. परंतु आजही मानवी समाजाचे सहजपणे निरीक्षण केले तर असे दिसून येते की, माणसांना केवळ जिवंतपणीच मानखंडनेला सामोरे जावे लागते असे नसून मृत्यु झाल्यानंतरही त्यासाठी त्यांच्या देहाची मानखंडा केवळ मानवी समाजाच्या चुकीच्या धारणामुळे होत आहे.

लातूर जिल्ह्यातील स्मशानभूमी एक वास्तव :

ग्रामीण समूदायात आधुनिक काळापुर्वी स्मशानभूमीविषयी कोणत्याही प्रकारचा प्रशासकीय स्तरावर विचार झालेला नाही. गावात जातीव्यवस्था कायम असलेली दिसून येते त्यामुळे स्मशानभूमी प्रत्येक जात, जमाती समुहांची वेगळी दिसून येते. बौद्ध, हिंदू, ईस्लाम व लिंगायत धर्मियांच्या स्वतंत्र स्मशानभूमी आहेत. या चारही धर्माचे अंत्यसंस्कार करण्याच्या पध्दती वेगवेगळया आहेत. त्यांच्या परंपरा वेगळया आहेत. वतनदार लोकांकडे स्मशानभूमीसाठी जागा असलेली दिसते. परतु उपरे असलेल्या लोकांना गावात स्वत:ची स्मशानभूमीची व्यवस्था असलेली दिसून येत नाही. शासकीय स्तरावर अनेक गावात स्मशानभूमीमध्ये शेड बांधून देण्यात आले आहे. परंतु हे शेड कोणत्याही एका जातीच्या पारंपारिक जागेवर बांधण्यात आले आहे. त्यामुळे ते शेड त्याच जातीचे आहे असे गृहित धरुन गावातील इतर जातीचे लोक शेडचा उपयोग करीत नाहीत. अल्पसंख्याक जातींना मानखंडनेला सामोरे जावे लागते. गावामध्ये जातवार स्मशानभूमी आहेत. परंतु भावकीनूसार देखील स्वतंत्र स्माशानभूमीच्या जागा आहेत. भावकी म्हणजे एकाच आडनावाचे लोक जे दोन गटात विभागले आहेत. गावामध्ये दलित समाजात येणारे महार, मांग, चांभार, ढोर या प्रमुख जाती आहेत. या प्रत्येक जातीच्या स्वतंत्र स्मशानभूमी आहेत. जेथे लोक शिक्षित आणि प्रबोधनाचा प्रभाव आहे अशा गावात सार्वजनिक स्मशानभूमी सर्वच जातीतील लोक वापरतात. त्यामुळे स्मशानभूमीसाठी कोणत्याही प्रकारचा वाद होत नाही. स्मशानभूमीसाठी दलितांनी निरोपयोगी जागा उपयोगात आणली जाते. निजाम राजवटीत स्मशानभूमी व

कब्रस्थानच्या बाबतीतील प्राधान्याने विचार केलेला दिसतो. कारण बोरी गावात बहुतांश प्रमुख सर्व जाती, धर्मांसाठी विस्तृत अशी स्मशानभमीसाठी जागा आहे. काही गावांमध्ये मराठा जातीचे प्रभुत्व आहे. त्यामध्ये गढीवरील देशमुख यांचे प्रभुत्व गावावर आहे. एकूण सर्व धार्मिक व सांस्कृतिक परंपरामध्ये त्यांचे परिणाम दिसते. तसेच स्मशानभूमीसाठीही स्वत:चे श्रेष्ठत्व ठिकवून ठेवलेले दिसते. ज्या गावांमध्ये राजकीय नेतृत्त्व प्रभावशाली आहे. त्या गावात एकापेक्षा अधिक सार्वजनिक स्मशानभूमी बांधण्यात आल्या आहेत. तरीही या सार्वजनिक स्मशानभूमी जाती समूहात विभागल्या गेल्या आहेत असे दिसते. गावात उशीरा स्थिर झालेल्या भटक्या समाजाला स्मशानभूमीच्या अनुषंगाने मानखंडेला समोरे जावे लागते. गोसावी समाजातील लोक तर घरामध्ये मृत व्यक्तीला दफन करुन अंतविधी पूर्ण करतात. अनेक गावात दलितांना गावच्या पवित्र समजल्या गेलेल्या मंदीर व वेस अशा जागेवरुन प्रेत यात्रा नेऊ दिली जात नाही किंवा अप्रत्यक्ष विरोध करुन पर्यायी जागा दिली जाते. एखादी व्यक्ती गावातील नसेल व त्यांचा मृत्यु झाला तर त्याचा अंतविधी कोणत्या स्मशानभूमीत करायचा हा प्रश्न पडतो. त्या व्यक्तीची जात माहिती नसेल तर गावातील प्रत्येक समूह त्याला विरोध करतो. काही गावामध्ये गायराण जमीन किंवा वनक्षेत्र मोठया प्रमाणात आहेत परंतु शासनाने या जमिनीचा उपयोग सर्वांसाठी सार्वत्रिक स्मशानभूमीसाठी केलेला दिसून येत नाही. गावात असलेल्या स्मशानभूमींना संरक्षण भिंती नाहीत. त्यामुळे स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रम व स्मशानभूमीची दुरावस्था झालेली दिसून येते. दलितांना निजाम काळात स्मशानभूमीसाठी जमिनी दान करण्यात आल्या होत्या परंतु नंतरच्य काळात राजकीय हस्तक्षेप झाल्याने, या जमिनी कागदपत्रे नसल्याने उच्च जात वर्गांनी बळकावल्या आहेत. गावातील लोक वारंवार तहसील कार्यालय व जिल्हा प्रशासनाकडे स्मशानभूमीची मागणी जातीनूसार करतात तरीही त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जाते. काही गावात स्मशानभूमी गावाच्या शेजारी होती. परंतु लोकसंख्या वाढीमुळे गावाचा विस्तार झाला आहे. अशावेळी या पारंपारिक स्मशानभूमीत अंतविधी करण्यास गावकऱ्यांचा विरोध होत आहे. मात्र अंत्यविधी करण्यासाठी पर्यायाची सुलभ अशी व्यवस्था शासनाने निर्माण करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसत नाहीत. काही स्मशानभूमीमध्ये व आजूबाजूच्या शेतात पिक घेतले जाते. अशा स्मशानभूमीत अंतविधी करण्यासाठी गेल्यावर पिंकाचे नुकसान होते. त्यामुळे साधारणपणे दलितांना स्मशानभूमीत जाण्यास रस्ते दिले जात नाही. काही गावात आजपर्यंत सार्वजनिक शासकीय स्मशानभूमी बांधण्यासाठी अनुदान मिळाले नाही. काही गावांमध्ये स्मशानभूमी गावापासून दुर असल्यामुळे त्याची योग्य निगा, स्वच्छता, सुविधांचा अभाव असल्याचे दिसून येतो. स्मशानभूमीसाठी प्रशासनाचे नियोजन, सुविधा उपलब्ध करण्यासाबाबत आनास्था आहे. गावामध्ये स्मशानभूमीवर होणारे अतिक्रमण हे साधारणपणे मागसवर्गीय जातींच्या पारंपारिक स्मशानभूमीच्या जमिनीवर केले जातात. काही गावात कोणत्याच जाती व धर्मांच्या लोकांना स्मशानभूमीसाठी जागा नाहीत. काही स्मशानभूमी गावाच्या लगत आल्यामुळे गावच्या लोकांना स्मशानभूमीचा त्रास होत आहे. जसे प्रेत, प्रेत यात्रा, सरण, दहन, दफन इत्यादी बाबत लोकांमध्ये शंका असतात. जळत असलेल्या प्रेताचा त्रास होतो. त्यामुळे गावात असा स्मशानभूमी बंद करण्यात आल्या आहेत. दफन केले जाणाऱ्या स्मशानभूमीत जागा कमी पडत असल्याने पुर्वीच्या आस्थी बाहेर निघत आहेत. त्यामुळे नवीन जागे अभावी मानखंडनेला सामोरे जावे लागते. गावात स्मशानभूमी बांधण्यासाठी दुहेरी संकट आहे. शासनाने मंजूर केलेले शेड कंत्राटदार व राजकीय पुढारी भ्रष्टाचार करुन निकृष्ट स्मशानभूमी बांधतात. त्यामुळे काही दिवसातच पुन्हा स्मशानभूमीत शेडची दुरावस्था होते. अनेक गावात कंपाऊड नसल्यामुळे प्रेत प्राणी उघडे पाडतात किंवा दफन केलेले असेल तर उकरुन काढण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे प्रेताची मानखंडना होते. स्मशानभूमीसाठी स्वतंत्र कायदेशीर तरतुद नाही.

थोडक्यात, ग्रामीण महाराष्ट्रातील दैनंदिन जीवनावर लक्ष केंद्रित केल्यास माणसांची मृत्युनंतरही मानखंडना दिसून येते. 'मरणे आणि मृत्यू' ही घटना मानवी जीवनात अंतिम घटना आहे. त्याचा मानवी समाजातील धर्म, जाती, संस्कार, भौतिकता, जमीन इत्यादी घटकांशी संबंध येतो. जात, जमिनीवरील संबंध आणि राजकीय धोरणाचा ''मृत्यू'' या घटनेकडे कोणत्या दृष्टीने पाहिले जाते आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांनंतरही ग्रामीण महाराष्ट्रातील स्मशानभूमीशी संबंधित हिंसाचाराशी विशेषत: मृत्युनंतर प्रेताची विल्हेवाट लावण्यासंदर्भात संघर्षाच घटना घडत आहे. अशा परिस्थितीत हे सर्व समजून घेण्यासाठी बाबासाहेबांनी केलेल्या लोकशाहीच्या व्याख्येकडे पुन्हा एकदा बघावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीची व्याख्या करताना म्हणतात, "एकमेकांबद्दल आदर आणि सन्मान मनात ठेवून समूहात जगण्याचा एक प्राथमिक मार्ग म्हणजे लोकशाही होय." लोकशाहीविषयी त्यांनी गांभीर्याने केलेल्या अवलोकनात राजकीय लोकशाही आणि सामाजिक लोकशाही असा स्पष्ट फरक ते करतात. या अवलोकनात ते सामाजिक लोकशाहीचा भारतासारख्या देशात असलेला अभाव किंवा कमतरता यावरही बोट ठेवतात. जात, वर्ग, लिंगभाव यावर आधारित असमानता आणि भूमिहीनता या सर्व घटकांचा अभावग्रस्त वर्गाच्या सन्मानाने मरण्याच्या हक्कावर कसा परिणाम होतो, हे अभ्यासताना होतो. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर इतक्या मूलभूत गरजांपासून परिघावरील समूहांना वंचित ठेवले असेल तर अशा सामाजिक परिस्थितीत व्यक्ती व समूहाला "वेल बेइंग" आनंदी, स्वास्थपूर्ण कसे जगता येईल हा प्रश्नच आहे?

संदर्भ:

1. Ghotale, Vivek (2007). *Dalit Aatmasanmanacha Ladha: Khopi Gavasandharbat,* Vikas Adhyan Kendra Mumbai (Unpublished).
2. Guru, Gopal (1994). 'Understanding Violence against Dalits in Marathwada', *Economic and* Guru, Gopal (2009). Introduction: Theorizing Humiliation in Guru, Gopal(Ed). *Humiliation Claims and Context*, Oxford University Press: New Delhi, Pages 1 to 19.
3. Jodhka, Surinder. S. (2002). 'Nation and Village: Images of Rural India in Gandhi, Nehru and Ambedkar', *Economic and Political Weekly*, Vol.37.No.32, pp.3343-3353.
4. More, Sadananda (1996). *Tukaram Darshan*, Gaj Prakashn: Ahmadnager.
5. Mungekar, Bhalchandra (2006). 'Dr. Ambedakar yanche bhartiy shetivishayak vichar' in Pavar, Daya (ed.) *Dr. Babasaheb Ambedkar Guraogranth*, Maharashtra Rajya Sahitya ani Sanskruti Mandal: Mumbai. Pages 377 to 394.
6. Pawar, Yogesh (2008). Maharashtra Dalits face Indignity in Death, September 10 sourced from http:// www. ndtv.com/convergence/ndtv/story.aspx?id=NEWEN20080064879. *Political Weekly*, Vol.29 No.9, Feb 26, pp.469-472.
7. Teltumbde, Anand (2007). 'Khairlanji and Its Aftermath: Exploding Some Myths', *Economic and Political Weekly,* March 24. Page1019- 1025.
8. Teltumbde, Anand et.al. (2003). 'Violence against Dalits in Marathwada - the Caste Cauldron of Maharashtra', Committee for Protection of Democratic Rights, Mumbai.
9. Tupe, S. D (2006). Dr. Babasaheb Ambedkar and Jamindharna *(Dr. Babasaheb Ambedkar and Landholding),* in Daya Pavar (ed.) *Dr. Babasaheb Ambedkar Guraogranth*, Maharashtra Rajya Sahitya ani Sanskruti Mandal: Mumbai. Pages No- 401 to 407.
10. V, Geetha (2009). 'Bereft of Being: the Humiliations of Untouchability' in Guru, Gopal (ed). *Humiliation Claims and Context*, Oxford University Press: New Delhi. Pages 103 to 104.

***सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर-, लातूर**

***

महाराष्ट्राच्या विकसीत समाजातील कचरावेचक कामगारांचे पर्यावरण संरक्षणाचे योगदान

*कैलाश गंगाधर अंबुलगेकर

प्रस्तावना :

भौगोलिक पर्यावरणातील मानव हा महत्वाचा घटक आहे. भौगोलिक पर्यावरणातील मानवी जीवनावर मोठा परिणाम झालेला आहे. त्यामुळे पर्यावरण विकास व मानवी श्रम याबद्दल अभ्यास होणे आवश्यक आहे. गेली काही दशके विकासाच्या नावाखाली भारतातच नव्हे तर जगामध्ये देखील मानवाने नैसर्गिक पर्यावरणामध्ये हस्तक्षेप केलेला आहे. त्यामुळे पर्यावरणाची ऱ्हास व हानी प्रचंड प्रमाणात होत असताना पहावयास मिळते. पण त्याचसोबत आपल्या प्राचीन भारतवर्षात अथवा कालापासून ते मध्ययुगीन, आधुनिक काळापर्यंत मानव नदीचे पाणी पिण्यासाठी वापरत असे पण सरकारी धोरणांनी नद्या प्रदुषित करून टाकलेल्या आहेत. त्यामुळे शहरातील सांडपाणी नदी, नाले, ओढ्यात सोडल्यामुळे कित्येक जलचर प्राण्यांचे मृत्यू झालेले आहेत. आणि आता सरकार जंगलावर डोळा ठेवून आहे. दरवर्षी थोडे थोडे करून जंगल वा नैसर्गिक संपत्ती विकासाच्या नावाखाली संपुष्टात येत आहे. औद्योगिक प्रकल्प द्रुतगती महामार्ग यांच्या नावाखाली जंगल विरळ करण्याच्या मार्गावर शासन आणि प्रशासन विविध योजनांच्या नावाखाली संपवण्याच्या कामाला लागलेले आहेत, सोबतच जंगलातले प्राणीही मानवी वस्ती ही ग्रामीण अथवा नागरी असेल तेथे ते संचार करतात. जे लोक जंगलात वा त्याभोवती राहातात ते बहुतेकदा जंगलतोडीच्या प्रभावामुळे सर्वात असुरक्षित असतात. आदिवासी समुदाय आणि इतर वनाश्रित लोकांना जंगलाच्या नुकसानीमूळे अनेकदा विस्थापन उपेक्षितपणा आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो.

औद्योगिकीकरण, आधुनिकीकरण आणि शहरीकरण इ. प्रक्रियेमुळे सामाजिक, आर्थिक, तांत्रिक, सांस्कृतिक क्षेत्रात अमुलाग्र बदल झाला. शहरातील वाढते उद्योगधंदे, व्यवसाय, दळवणवळणाच्या व वाहतुकीच्या सुविधा, रोजगारांच्या आणि व्यक्तीविकासाच्या विविध संधी इ. मुळे ग्रामिण भागातील लोकांना शहराकडे स्थलांतर होण्यासाठी कारणीभूत ठरल्या. त्याचप्रमाणे ग्रामिण भागातील नैसर्गिक आपत्ती, नेहमी पडणारा दुष्काळ आणि मोडकळीस आलेली बलुतेदारी व्यवस्था, तसेच रोजगाराची मर्यादित संधी यामुळे बेकार झालेला कारागीर, भूमीहिन शेतमजूर, अर्धकुशल, अकुशल कामगारांचे स्थलांतर शहराकडे होऊ लागले. छोट्या अथवा मोठ्या स्वरुपाचा रोजगार उपलब्ध होईल कसेबसे दोन वेळचे अन्न मिळेल या हेतूने शहरात येणाऱ्यांचे प्रमाण (ग्रामिण भागातून स्थलांतराची प्रक्रिया) वाढले. 'ढकल-ओढ' (Push and Pull factors theory) या सिध्दांतानुसार (प्रतिकुल परीस्थितीमुळे खेड्यातुन ढकलेला व अनुकूलतेमुळे शहरात ओढल्या जाणे) लोक स्थलांतरीत होत गेले. येथे पण रोजगाराची सोन संधी सर्वांनाच उपलब्ध होईल असे नाही. त्यामुळे अकुशल कामगारांना पडेल ते काम करुन उदरनिर्वाह करण्याची गरज वाढत गेली.

नव नवीन भौतिक सुखसाधनांचा शोध व वापरांमुळे 'वापरा आणि फेका' (Use and throw culture) संस्कृती शहरी समाजात रुढ झाली. औद्योगिक क्षेत्रात देखील उत्पादन प्रक्रियेतून निर्माण झालेले अवांतर पदार्थ बाहेर फेकून देण्यात येऊ लागले. सोबत '(reuse and recycling processes)' पुनर्वापर व पुनर्चक्रियकरणामुळे टाकाऊ पदार्थापासुन चांगल्या वस्तू निर्माण करण्याची प्रक्रिया अस्तित्वात आली. त्यामूळे फेकून दिलेले अवांतर पदार्थ वा टाकाऊ वस्तूंना बाजारात मागणी वाढली. या वस्तूंना बाजारात 'आर्थिक मूल्य' प्राप्त झाले. या माध्यमातूनग्रामिण भागातून रोजगाराच्या शोधात शहरी भागात आलेल्या अकुशल कामगारांना व कोणतेच काम न मिळालेल्या कामगारांना आर्थांजन मिळवून देण्याचा एक नवीन व्यवसाय मिळाला. असा व्यवसाय करणाऱ्यांची संख्या शहरात काही कमी नाही.

भंगार अथवा टाकावू वस्तू म्हणजे सर्वसाधारणपणे अनावश्यक आणि निरुपयोगी वस्तू घरातून फेकून दिल्या जातात. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाची प्रक्रिया करत असताना निर्माण झालेला टाकाऊ वा अवांतर पदार्थ म्हणजे कचरा अथवा भंगार असे संबोधले जाते.

प्लॅस्टिक, काच, पत्रा, पॉलिथिनच्या पिशव्या, लोखंडी खिळे, दुधाच्या पिशव्या, धातूचे तुकडे, जनावरांची हाडे, फाटके कपडे, कागद-कपट अशा प्रकारच्यापुर्न्उत्पादन करता येण्याजोगे टाकाऊ वस्तू गोळा करणाऱ्यांना भंगार गोळा करणारे असे संबोधले गेलेले आहे. हे लोक जमिनीवर फेकलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून, कचरा कुंडीतूनसडकेवर, घर,कार्यालये, इस्पितळ इत्यादी ठिकाणातून त्या वस्तू मोफत मिळवल्याजातात वा जमा केल्या जातात.

सदरील व्यवसाय हा शहरी भागामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो कारण औद्योगिकरण, मोठी बाजारपेठ, शासकिय व निमशायकीय कार्यालये, दवाखान्यातील, मंगल कार्यालयातील, औषधे दुकानातील, मोठ-मोठी उपहारगृह इत्यादी मधुन टाकाऊ वस्तू फेकल्या जातात. कचऱ्याची निर्मिती ही एक अखंड प्रक्रिया आहे. म्हणून आज मोठ्या प्रमाणात शहरी भागात भंगार गोळा करुन आपली उपजिवीका करणारे अनेक कामगार या असंघटीत क्षेत्रातून काम करताना पाहवयास मिळतात.

वास्तविक पाहता या कामासाठी कोणत्याही प्रकारचे कौशल्य अथवा

औरंगाबाद शहरात वरील औद्योगिक क्षेत्रामळे औद्योगिकीकरणाला चालणामिळाली. परिणामत: संघटीत व असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या. ग्रामिण भागात नेहमीच पडणारा दुष्काळ म्हणून कृषितील रोजगार मंदावला त्यामुळे नागरी भागात रोजगार मिळविण्यासाठी ग्रामिण भागातील माणसे शहराकडे वळली. जागेच्या अभावी मिळेल त्या ठिकाणी वस्त्या कराव्या लागल्या व झोपडपट्टी संस्कृती उदयास आली. तसेच सर्वच लोकांना रोजगार पुरविण्याची क्षमता नसलेले विशेषत: अकुशल, अशिक्षित, मागासलेल्या वर्गातील कामगारांना उदरनिर्वाहासाठी पडेल ते काम करणे भाग पडले. याला अनुसरुनच प्रामुख्याने झोपडपट्टीतून राहणाऱ्या वरील वर्गापैकी काहींनी भंगार वा टाकाऊ वस्तू गोळा करुन त्या विकणे हा व्यवसाय स्वीकारलेला आहे.

असंघटीत क्षेत्राची माहिती

कामगार ज्या क्षेत्रात काम करतात, ठळकणपणे त्यांची दोन क्षेत्रात विभागणी करता येऊ शकते. एक संघटीत व दुसरे असंघटीत क्षेत्र. संघटीत वा औपचारिक क्षेत्राच्या तुलनेत अनौपचारिक वा असंघटीत क्षेत्रातील कामगार मोठ्या प्रमाणात असतात.

असंघटीत क्षेत्रातील कामगारांचे राष्ट्रीय उत्पादने प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात योगदान आहे. जवळपास ८०-९० टक्के उत्पादन प्रक्रियेत त्याचा सहभाग असतो, मात्र त्याच्या योगदानाची दखल घेतली जात नाही, ही वास्तविकता आहे.

भारतातील कामगारांचा विचार केल्यास ९० टक्के २ कामगार या अनौपचारीकवा असंघटीत क्षेत्रातून दिसून येतात. अलिकडे १९९१ पासून सरकारने स्विकारलेले जे नवीन आर्थिक धोरण आहे. त्याचा परिणाम म्हणून कामगारांचे संघटीत क्षेत्रातील प्रमाण कमी होऊन त्यांचे असंघटीत क्षेत्रातील प्रमाण वाढत आहे. संघटीत क्षेत्रात कामकरणाऱ्यांची परिस्थिती असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्यांसारखीच होत चाललेली दिसते.

असंघटीत क्षेत्राचे स्वरुप

असंघटीत क्षेत्र एकजिनसी नाही. त्यात अंतर्गत विविधता आहे. भारतात या असंघटीत क्षेत्राची आधुनिक व पारंपरीक अशा दोन प्रकारात विभागणी केली जाते.

असंघटीत क्षेत्र व असंघटीत क्षेत्रातील कामगारांची पार्श्वभूमी

भारतीय समाजात प्राचिन काळापासून असंघटीत क्षेत्र पहावयास मिळते. असंघटीत क्षेत्रातील कामगार हा वर्ण व्यवस्थेच्या माध्यमातून उदयास आलेला दिसतो.शूद्र जातीतील लोकांना नेहमी अगदी खालच्या दर्जाची अत्यंत वाईट पध्दतीने उच्च वर्णीयांकडून वागविले जात होते. अगदी खालच्या दर्जाची वा निम्न स्वरुपाची कामे त्यांच्याकडून करुन घेतली जात असे. त्यांना गुलामांसारखे वागणूक देत व त्यांचा तिरस्कार करत असत. मौर्य आणि गुप्ताच्या काळात कामगारांचे श्रम विकत घेतले जात असे. असेच नाहीतर बळजबरीने शुद्र वर्णाकडून काम करुन घेतले जात असे. असंघटीत क्षेत्रातून श्रम करणारे कामगार हे जास्तीत जास्त मागासवर्गीय समुहातून विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचीत जमातीतील असलेले पहावयास मिळते. त्यासाठी 'जाती संरचना'" हे भारतातील असंघटीत कामगारांच्या मुख्य कारणापैकी एक आहे असे म्हटले जाते.

संघटीत क्षेत्र व असंघटीत क्षेत्रातील कामगार हे प्राचीन काळापासून भारतात अस्तित्त्वात आहे, ती काही नवीन नाही.

असंघटीत क्षेत्रातील कामे

असंघटीत क्षेत्रातील कामे करणाऱ्यात मुख्यतः रस्त्याच्या कडेला बसून भाज्या फळे, फुले विकणारे विक्रेते, पेपर वाटणारे, फेरीवाले, बांधकाम मजूर, रस्त्यावर विविध वस्तू विकणारे फेरीवाले, घरगुती आचारी, बांधकाम मजूर छोटी दुकाने व उपहार गृहात काम करणारे, छोट्या छापखाण्यातून काम करणारे, दुचाकी व चारचाकी वाहने दुरूस्त करणारे कामगार.

संशोधन पध्दती

संशोधनाचे उद्दिष्टये-

१. औरंगाबाद शहरातील कचरावेचक कामगारांची सामाजिक-शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासणे
२. औरंगाबाद शहरातील कचरावेचक कामगारांची पर्यावरण संरक्षणाचे योगदान अभ्यासणे

नमुना निवड

औरंगाबाद शहरातील १३ विविध वसाहतीतून (परिशिष्ट-२) विशेषत: झोपडपट्टी वा गलिच्छ वस्तीत वास्तव्य करीत असलेल्या भंगार वा टाकाऊ वस्तू गोळा करणाऱ्यांपैकी १०० लोकांची निवड केलेली आहे. या निवड केलेल्या एकंदरीत १०० कचरा वेचक उत्तरदात्याकडून प्रस्तूत संशोधनाच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने आवश्यक असलेली संपूर्ण माहिती मिळविण्यात आलेली आहे. विश्वाची वा समग्राची संख्या निश्चीत मोठी असावी कारण त्या बाबतची निश्चीत संख्या उपलब्ध झालेली नाही. अशा परिस्थितीत ठराविक नमुना वा त्या प्रमाणात निवड ही एक अवघड समस्या असते. अभ्यासांची उद्दिष्टे व विश्वाचे ठळक मानाने वैशिष्ट्यांची असलेली माहिती लक्षात घेऊन १०० उत्तरदात्यांची संख्या निश्चीत करणे सोयीचे वाटते. हि निवड अर्थातच 'सहेतूक पध्दती' व सोयीची अशी आहे.

संशोधकांनी त्यांच्या कामाच्या ठिकाणी, निवास स्थानी आणि ज्या ठिकाणीभंगार वा कचरा विकतात त्या ठिकाणी जाऊन उत्तरदात्यांची निवड करण्यात आलेली आहे. स्वतः संशोधक या शहरात बऱ्याच वर्षापासून वास्तव्य करीत असल्यामुळे शहरातील प्रत्येक भागाची चांगल्या प्रकारे माहिती आहे. त्यामुळे कचरा वेचक कामगारांची वस्ती स्थाने त्याच सोबत भंगार विकण्याचे ठिकाण ह्या सर्व बाबींची माहिती संशोधकाला आहे.

म्हणजेच उत्तरदात्यांच्या निवडीत अनौपचारीक पध्दतीचाही वापरअवलंबिलेला आहे.

तथ्य संकलनाची साधने

संशोधकाने प्रस्तूत अभ्यासाचे महत्व, स्वरुप, व्याप्ती, आणि उद्दिष्ट्ये डोळयासमोर ठेवून त्या अनुषंगाने तथ्य संकलन करण्याच्या दृष्टिकोनातून योग्य अशा विविध प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्त्रोताचा वा साधनांचा वापर केलेला आहे.

तक्ता 1 : उत्तरदात्याची धर्मनिहाय संख्या

अ.क्र.	धर्म	वारंवारता
1	हिंदू	40
2	बौध्द	56
3	मुसलमान	02
4	ख्रिश्चन	01
5	शिख	01
	एकूण	100

उपरोक्त तक्त्यावरुन असे स्पष्टपणे लक्षात येते की, भंगार गोळा करणा-या उत्तरदात्यांमध्ये बौध्द धर्मीय उत्तरदात्यांचे प्रमाण जास्त आहे. त्या पाठोपाठ हिंदू उत्तरदाते आहेत.

तक्ता 2 : उत्तरदात्याची तीनिहाय संख्या

अ.क्र.	धर्म	वारंवारता
1	महार	56
2	मांग	30
3	चांभार	02
4	वडार	04
5	माळी	01
6	बंजारा	04
7	शिखलकरी	02
8	शाहा	02
	एकूण	100

उपरोक्त तक्त्याचे निरिक्षण केले असता असे निदर्शनास येते की, या व्यवसायात विशिष्ट जातीच्याच लोकांचा प्रामुख्याने समावेश होतो. हे समजवण्यासाठी त्यांच्या जातीचा विचार करताना असे आढळून येते की, यात प्रामुख्याने पुर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातीचे (महार आणि मांग जातीचे) सदस्य आहेत. त्याखलोखाल हिंदूतील व मुस्लीम आणि शिखातील मागासवर्गीय जातीचे लोक दिसून येतात. ज्यांनी आपला धर्म बौध्द सांगीतलेला आहे ते सर्वच महार जातीचे आहेत. संख्येतही फाक जाणवतो.

प्रस्तुत अभ्यासांच्या उत्तरदात्यात बहुतांशी उत्तरदाते निरक्षर आहेत. फार कमी उत्तदात्यांचा शैक्षणिक स्तर जेमतेम प्राथमिक आहे. शाळेत जाणारे पाल्यसुध्दा अत्यंत कमी आहे. याच अनुषंगाने त्यांची (उत्तरदात्यांच्या) शैक्षणिक पार्श्वभूमी जाणून घेण्याच्या दृष्टी उत्तरदात्यांच्या आई-वडिलांचे आणि पती-पत्नीचा शैक्षणिक स्तर ही जाणून घेण्यात आला.

तक्ता 3 : उत्तरदात्यांचे व त्यांच्या आई-वडिलांचे शिक्षण

अ.क्र.	शैक्षणिक स्तर	उत्तरदाते	वडील	आई
1	साक्षर	04	04	02
2	निरक्षर	76	90	96
3	प्राथमिक	09	02	00
4	माध्यमिक	11	02	02
5	उच्चमाध्यमिक	00	02	00
	एकूण		**100**	**100**

वरील तक्त्यावरुन अगदी स्पष्ट दिसते की उत्तरदात्याच्या आई-वडिलांचे साक्षरतेचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. जवळपास सर्वच उत्तरदात्यांचे आई-वडिल निरक्षर असल्याचे दिसून येते. या दोघांच्या (आई-वडिलांच्या) तुलनेत उत्तरदात्यांतील साक्षरतेचे

प्रस्तुत अभ्यासातील उत्तरदाते विशिष्ट प्रकारच्या वस्तूच गोळा करण्याचे कामकरतात असे नाही, तर कच-यात वा फेकून दिलेल्या वस्तूत त्यांना जे काही मिळालेले असते, ते गोळ कीरत असतात. सर्व एकत्रित गोळा केलेल्या वस्तू नंतर वेगवेगळया केल्या जातात जसे की, लोखंड, कागद, काचेच्या बाटल्या, कापडी चिंध्या व प्लॅस्टिक वेगवेगळे करुन संबंधित व्यापा-यांना विकतात. काही लोक फक्त विशिष्टच वस्तू गोळा करतात. म्हणून हे उत्तरदाते कोणत्या प्रकारच्या वस्तू गोळा करतात याची माहिती घेण्यात आली.

गोळा केल्या जाणा-या भंगार वा टाकाऊ वस्तू :

१. दुधाच्या पिशव्या
२. पॉलिथिनच्या पिशव्या
३. प्लॅस्टिकच्या वस्तू किंवा रबर
४. लोखंड/पत्रा/खिळे
५. कागद/कपट
६. बाटली/काचा
७. कापडी चिंध्या
८. केस / हड्डी
९. धातुचे तुकडे, तारा

प्रस्तूत प्रकरणात उत्तरदात्यांचे भंगार गोळा करणाऱ्या व्यवसायातील समाधानआणि समाज व्यवस्थेतील भिन्न-भिन्न घटकाकडून त्यांच्या असलेल्या अपेक्षाच्या संदर्भात उत्तरदात्यांचा दृष्टीकोण जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला

आहे. त्यांना या बाबत काही प्रश्न विचारलेले आहेत. तसेच उत्तरदात्यांना त्यांच्या पाल्यांच्या भवितव्याविषयी कोणत्या स्वरुपाची चिंता वा काळजी आहे याचीही माहिती घेण्यात आलेली आहे.

समाधान पूर्तता आणि अपेक्षा

एकूण १०० उत्तरदात्यांपैकी ९० उत्तरदाते कचरा वा भंगार वस्तू गोळा करणे हे समाजाला योगदान आहे असे मत व्यक्त करतात तर १० उत्तरदाते नकार दर्शवितात. त्यांच्या मते भंगार गोळा करणे हे त्यांच्या आर्थिक उपजिविकेचे एक साधन आहे व ते त्यांच्या सामाजिक योगदानाविषयी अनभिज्ञ आहेत. योगदानाच्या विषयी विचारणा करता जी उत्तरे मिळाली ती खालीलप्रमाणे-

तक्ता 4 : सामाजिक योगदानाचे असलेले स्वरुप

अ.क्र.	योगदानाचे स्वरुप	वारंवारिता
1	परिसर स्वच्छ ठेवतो	81
2	म.न.पा.तील सफाई/झाडू कामगारांचे अर्धे काम करतो	09
3	समाजाला योगदान नाही	10
	एकूण	**100**

उत्तरदात्यांचे वास्तव्य निहाय वर्गीकरण

अ.क्र.	**वास्तव्य असलेल्या ठिकाणांचे नांव**	**उत्तरदात्यांची संख्या**
1	बेगमपुरा	02
2	जयभीमनगर	17
3.	गुलाबनगर	24
4.	जलाल कॉलनी	04
5.	राजीव गांधी नगर (रेल्वे स्टेशन)	15
6.	वसंतराव नाईक नगर (रेल्वे स्टेशन)	06
7.	उस्मानपुरा	08
8.	छोटे मुरलीधर नगर	04
9.	कबीर नगर	04
10.	महात्मा फुले नगर	09
11.	प्रगती कॉलनी	01
12.	समता नगर	02
13.	पानचक्की	04
	एकूण	**100**

समारोप-

स्वत:चे आरोग्य धोक्यात घालून भौगोलिक व सामाजिक पर्यावरण संरक्षित व करण्याचे कार्य कचरावेचक कामगार करतात. वास्तविक पाहता आधुनिक औद्योगिकीकरणातून आपोआप निर्माण झालेला कचरा हा कचरावेचक

कामगारांच्या जीवनाचा उपजिवीकेचे साधन बनलेला आहे. चंगळवाद संस्कृतीमध्ये भौगोलिक व सामाजिक स्वास्थ्याचा विचार नकरता फक्त आणि फक्त विकास या संकल्पनेमध्ये मश्गुल झालेला मानव विकास व विनाश यामध्ये फरक करू शकत नाही मात्र सामाजिक व आर्थिकदृष्टया वंचित असलेला सामाजिक समुदाय हा स्वत:च्या आर्थिक उत्पन्नाच्या शोधात समाजातील विविध स्तरातील फेकून दिलेला अथवा औद्योगिक क्षेत्र, वैद्यकीय महाविद्यालय अथवा दवाखाने यांच्यातून निर्माण झालेला जैविक कचरा, औषधी, सिरींज व सुया अशा वस्तू गोळा करून आपली आर्थिक निकड भागवतो व त्याचसोबत कचरा गोळा करण्याच्या प्रक्रीयेत भौगोलिक व सामाजिक पर्यावरणाचे समतोल व संवर्धन साधन्याचे काम करतो. विकास प्रक्रीयेतून निर्माण झालेला कचरा हा पर्यावरणाला प्रतिकूल असून आणि कामगारांना आर्थिक उत्पन्नासाठी अनुकूल आहे यामध्ये विकास, पर्यावरण आणि मानवी श्रमाला आपोआप मूल्य प्राप्त होते.

संदर्भ-

१. अहुजा, राम. १९९५, भारतीय सामाजिक समस्या, जयपूर: रावत पब्लिकेशन

२. अवचट, अनिल. २००५ माणसं, मुंबई: मौज प्रकाशनगृह, नववी आवृत्ती.

३. अंभोर छाया, नामदेव. १९९५, औरंगाबाद: औरंगाबाद शहरातील टाकाऊ वस्तू गोळा करणाऱ्या व्यक्तींचा सामाजिक व आर्थिक अभ्यास, अप्रकाशित एम.एस.डब्ल्यु., लघु शोध प्रबंध, सामाजिक कार्य महाविद्यालय.

४. ॲडव्होकेशी इन्टरनेट, जुलै/ ऑगस्ट २००५, सक्सेसफुल रॅली ऑफ नॅशनल कम्पेनेनिंग कमिटी फॉर अनआर्गनाईज्ड सेक्टर वर्कर्स.

५. भांडारकर, पू.ल. १९८६, नागपूर: सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ

६. चिकरमाने, पौर्णिमा, देशपांडे, मेधा, लक्ष्मीनारायण.2001, पुणे: रिपोर्ट ऑन स्टडी ऑफ स्क्रॅप कलेक्टरर्स अँन्ड स्क्रॅप ट्रेडर्स अँन्ड रिसायकलिंग, एन्टरप्राईजेस इन पुणे, एस.एन.डी.टी विमेन्स, युनिव्हर्सिटी,

७. चंदनकर, पी. एस. २००४-०५, औरंगाबाद शहरातील कचरा वेचणाऱ्या मुलांच्या विविध समस्याचा अभ्यास, एम.एस.डब्ल्यु., लघु शोध प्रबंध,एम.एस.डब्ल्यु.,सामाजिक कार्य महाविद्यालय.

८. चौधरी, विक्रमाधित्येकुमार.२००३, वेस्ट ॲन्ड वेस्ट पिकर्स इकॉनॉमिक ॲन्ड पॉलिटिकल विकली. मुंबई, समिक्षा ट्रस्ट, व्हॅल्यूम XXXVIII NO.50

*समाजशास्त्र विभाग, डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर, मो. नं. 9421224798

***

पर्यावरण, विकास आणि श्रम : कृषक व शेतमजूर स्त्रियांच्या श्रमाचे राजकीय अर्थकारण

*नागेश शेळके

प्रस्तावना

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी म्हटल्यानुसार पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नाही तर ती कष्टकऱ्यांच्या, श्रम करणारांच्या, राबणारांच्या तळहातावर उभी आहे. अर्थात हे श्रम करणारे, राबणारे हात सतत बदलत असतात. तशीच पृथ्वी सुध्दा आपली जागा बदलत असते, हेही तितकेच वास्तव आहे. पृथ्वीवर मालकी कोणाची, तिला पेलणार, तोलणारा व स्वत:च्या सात बारावर नाव नोंदवणारा हात कोणाचा हेही ठरत असत, काळानुसार बदलत असत. त्यासाठी युध्द, महायुध्द होतात.नवनवीन शोध लावले जातात. औदयोगिकीकरणासारख्या प्रक्रियेला खतपाणी घातले जाते. नवनवीन तंत्रज्ञान वापरुन विकासाच्या नव–नवीन संकल्पना वापरुन तिच्यावरच्या मालकीला अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रक्रियेत तंत्रज्ञान, श्रम, भांडवल, सत्ता यांचा वापर करुन पृथ्वीची मालकीच बदलली जात आहे. पृथ्वी श्रमिकांची न राहता ती भांडवलदार, नवभांडवलदार आणि तथाकथित विकास प्रक्रियेतील राजकीय शिलेदारांची बनली आहे. आजच्या नवउदारमतवादी डिजीटल काळामध्ये तर मेहनत, श्रम करणारे हात पूर्णपणे अदृश्य करुन संगणकाला महत्त्व आले आहे. जास्तीत जास्त सुखसुविधा कशा वाढतील यासाठी मोठया प्रमाणावर भौतिक विकास साध्य करण्याकडे व भौतिक सत्ता स्वत:कडे खेचण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे साध्य करण्यासाठी राष्ट्र–राज्यातील संसाधनांचा हत्यार म्हणून वापर केला जात आहे. या सर्व प्रक्रियेचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष ताण पर्यावरणावर पडतो आहे. हा ताण एवढा वाढत चालला आहे की, हि परिस्थितीकीयच संपुष्टात येतेय की काय अशी भीती निर्माण होत आहे. विकास साधण्याच्या अतोनात हव्यासामध्ये नैसर्गिक संसाधनांचा आणि स्त्रोतांचा पुरेपुर वापर करुन घेण्याची स्पर्धा सुरु होवुन खूप मोठा काळ उलटत चाललेला आहे. आज राष्ट्र–राज्याच्या माध्यमातुन प्रत्येक भांडवलदार आपले आर्थिक राजकारण घडवत आहेत. एका बाजूला नैसर्गिक संसाधने तर दुसऱ्या बाजून श्रमिकांचे श्रम अशा दुहेरी सांधनांचा वापर करुन आर्थिक सत्ता निर्माण केली जात आहे,आणि या सत्तेतून विकास हि संकल्पना निर्माण होत आहे.

भांडवलशाही तथाकथीत विकासाच कारण दाखवून श्रमामध्ये आणि श्रमिकांमध्ये विभाजन करण्याचा प्रयत्न करत असते. भांडवलशाहीला तसे केले तरच अतिरिक्त मूल्य मिळवण्यात गतीशीलता मिळत असते. विकासाच्या नावाखाली भौतिक वस्तूंना अतोनात महत्तव येत असते. तंत्रज्ञानाचा वापर करुन श्रमिकांचे श्रममूल्य दुय्यम केले जाते. एका बाजूला मानवाच्या गतीशीलतेसाठी नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करण्यामध्ये कोणताही आडपडदा लावला जात नाही,तर दुसरीकडे श्रमिकांचे श्रम पूर्णपणे वापरले जाते. परंतु ते वापरताना त्यांचे दुय्यमत्वही अधोरेखीत केले जाते. पर्यावरण आणि श्रमिक यांचे श्शोषण एकाच वेळेस विशिष्ट रणनितीचा वापर करुन होताना दिसते. हि रणनिती पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाटी राष्ट्र–राज्याच्या माध्यमातून निर्बंध घालते परंतु दुसऱ्या बाजूला विकासाचे प्रकल्प समोर ठेवून नव–नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणाला अप्रत्यक्षपणे नियंत्रणात ठेवते. सर्वसामान्य लोकांच्या व्यवहारांवर पर्यावरण संरक्षणाच्या नावाखाली अंकुश ठेवला जातो.

या प्रक्रियेला जर समजून घ्यायचे असेल तर पर्यावरण,विकास आणि श्रम यांच्यामील सहसंबंधांना व त्यातील अंतरछेदांना समजून घ्यावे लागेल. त्याची चिकित्सक मांडणी करावी लागेल. विकासाची गती आणि परिणाम हा दिसतो तितका सरळ आणि मानवी हिताचा नाही, याचे सूक्ष्म विश्लेषण करावे लागेल. हा विकास वरकरणी गरजेचा जरी वाटत असला तरी त्याचा पर्यावरणीय व मानवी मूल्यव्यवस्थेत नेमका काय बदल घडतो? विशेषता मानवी श्रमव्यवस्थेमध्ये तो संतुलन साधतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे. प्रस्तुत लेखातून हाच प्रयत्न केला आहे. साधारणत: या लेखाची दोन टप्प्यात मांडणी केली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये पर्यावरण,विकास आणि श्रम या तीनही संकल्पनांना समजून घेऊन पर्यावरण आणि विकास यांचा सहसंबंध तपासला आहे. तर दुसऱ्या विभागात पर्यावरण विकास आणि श्रम यांच्यातील आंतरसंबंध अधोरेखीत करण्यासाठी या सर्व प्रक्रियेत श्रमाचे महत्व व त्यातून श्रमाची केली जाणारी चोरी याची चिकित्सा केली आहे. पर्यावरण व विकास याचा ग्रामीण पातळीवर विचार करताना या प्रक्रियेत श्रमाच काय होते? तसेच पर्यावरण आणि विकासाची चर्चा होत असताना महाराष्ट्रातील कृषक व शेतमजूर स्त्रियांचे श्रम कशाप्रकारे अदृश्य बनते. स्त्रिया त्यांच्या श्रमातून पर्यावरण आणि विकासाला हातभार लावत असतात,परंतु त्यांच्या श्रमाची व्यवस्थात्मकरित्या चोरी होते याचे राजकीय अर्थकारण प्रस्तुत लेखातून पाहिले आहे. श्रमाच होणार अनौपचारीकरण, स्त्रीसुलभीकरण हि प्रक्रिया नेमके कोणते सत्ताकारण मांडते, यातून श्रमाचा दृष्टीकोण कसा पुढे येतो याची मांडणी केली आहे.

पर्यावरण आणि विकास :

पर्यावरण आणि विकास यांचा खूप जवळचा व गुंतागुंतीचा संबंध आहे. या संबंधाची चिकित्सा करणे खूप आवश्यक आहे. साधरणत:विकासाची संकल्पना हि व्यक्ती सापेक्ष संकल्पना आहे. विकासाचा संबंध हा व्यक्तीच्या वास्तविक दरडोई उत्पन्नावर होणाऱ्या वाढीच्या संदर्भात आहे. याला आर्थिक विकास असेही म्हटले जाते. तसेच विकास हा उत्पन्नाच्या समान

वितरणावरही अवलंबून आहे. व्यक्तीला मिळणारे राजकीय, आर्थिक स्वातंत्र्य, संसाधने, शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगार संधी आणि न्यायासंबंधीच्या समान संधी इत्यादींचा विकास संकल्पनेत समावेश होणे अपेक्षीत आहे. वास्तविकता विकासाचा प्रमुख निर्देशक म्हणजेच दारिद्रय, विषमता आणि बेरोजगारी या प्रश्नांना राष्ट्रराज्याच्या धोरणांमधून कसे सोडवले जात आहे. विषमता नष्ट करण्यासाठी काय उपाययोजना आखल्या जात आहेत. या सर्व घटकांमध्ये जर नियंत्रण आणले जात असेल तर नक्कीच त्या राष्ट्रराज्याच्या दृश्टीने हा काळ विकासाचा काळ म्हणून अपेक्षीत असतो. समाजात विषमता, दारिद्रय आणि बेरोजगारी यांच्यामध्ये कमालीची वाढ होत असेल व दरडोई उत्पन्न दुप्पट जरी झाले असेल तरी याला 'विकास' म्हणणे चुकीचे ठरेल. व्यक्तीच्या जीवनातील अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच प्राथमिक साक्षरता, आरोग्य सुविधा, जीवीत व वित्ताची हमी इत्यादी व्यक्तीच्या प्राथमिक गरजा आहेत या गरजा पूर्ण झाल्या म्हणजे व्यक्तीचा व पर्यायाने राष्ट्रराज्याचा विकास साध्य होत असतो. समाजात जी विषमता निर्माण होत आहे. तिचे पाळेमुळे समाजातील सामाजिक विषमतेमध्ये व असमान संसाधनाचे वितरण यामध्ये आहेत त्यावर भर देणे हे देखील विकास संकल्पनेचे महत्त्वाचे लक्षण आहे.

प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक राष्ट्रराज्य कुठल्या ना कुठल्या प्रकारच्या स्वाभिमानाची प्रतिष्ठेची किंवा सन्मानाची भावना बाळगून असते. परंतु ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या स्वाभिमानाचा अभाव असतो. ते व्यक्ती किंवा राष्ट्रराज्य अविकसित मानावे लागतील तसेच व्यक्तीला राजकीय, वैचारीक, आर्थिक स्वातंत्र्य तसेच सामाजिक गुलामगिरीपासून मुक्ती मिळणे म्हणजेच स्वातंत्र्य होय. जोपर्यंत एखादया समाजातील लोक निसर्गाच्या, अज्ञानाच्या, प्रस्थापितांच्या, संस्थांच्या कर्मठतेच्या दास्यत्वामध्ये अडकलेले असतात. तोपर्यंत त्या समाजाने विकासाचे उदिदश्ट गाठले आहे असे म्हणता येणार नाही. दास्यत्व हेच त्या समाजाचे मागासलेपण आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने विकास म्हणजे काय याचे समाजशास्त्रीय विश्लेषण करायचे असेल तर जीवन आवश्यक गरजांची पूर्तता, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य या तीन घटकांच्या परिपूर्ततेतून निर्माण झालेला आहे.

विकास म्हणजे आर्थिक प्रगती नाही तर विकासाच्या व्याख्येत आर्थिक पैलुबरोबरच सामाजिक, नैसर्गिक परिसंस्थेविषयक मानसिक, तात्विक, नैतिक आणि आध्यात्मिक इ. बाबींचा समावेश होणे अपेक्षीत आहे. विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक आणि सामाजिक संस्थांचे पुनर्घटन आणि पुनर्विन्यास (Recrganisation and reorientation) यांचा अंतर्भाव होत असतो. आय आणि उत्पन्न यांच्या पातळीत आणि वितरणात सुधारणा होण्याबरोबरच या प्रक्रियात्मक, संस्थात्मक, सामाजिक आणि प्रशासकीय संरचनामध्ये क्रांतिकारी बदल घडून येतात. विकासाची व्याख्या जरी सामान्यत: राष्ट्रराज्याच्या संदर्भात करण्यात येत असली तरी त्याची अनुभुती आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक, सामाजिक आणि राजकीय व्यवस्थांमध्ये मूलभूत बदल घडून आल्यानंतरच येत असते. विकास हि सर्वसमावेशक प्रक्रिया असणे गरजेचे आहे. यातून सर्व मानव जातीला मुक्तीदायी बनवण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. याबरोबरच पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनांचा योग्य पध्दतीने वापर करणे. या संसाधनांच्या उपलब्धतेनुसार राष्ट्रराज्याच्या विकासाची धोरणे आखणे, सुयोग्य तंत्रज्ञान विकसित करणे ज्यामुळे पर्यावरणालाही हानी पोहचणार नाही व विकासाची प्रक्रिया देखील निरंतर चालू राहिल.

भारतासारख्या देशात आजही अशा विकास प्रक्रियेचा अभाव आहे. वास्तविकता भारताकडे मुबलक नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता आहे. परंतु या नैसर्गिक साधनांचा कलयाणकारी वापर होत नाही. भारतातील सर्वसामान्य लोकांचा जास्तीत जास्त वेळ हा अन्न,इंधन, गुरांचा चारा यांसारख्या मुलभूत गरजा भागवण्यामध्ये जातो. भारतात जवळजवळ एक कोटी हेक्टर जमीनीवरील वने ही सामायिक मालकीची आहेत. बहुतेक सारेच जलसाठे हे सामायिक मालकीचे आहेत. भारतात या नैसर्गिक सामायकि मालकीच्या संसाधनांवर गरीबांना आपली उपजीविका व्यवस्थितपणे साधता येत नाही. विशेषत: ग्रामीण भागातील लोकांना आपल्या मुलभूत गरजा भागवण्यासाठीच अतोनात झगडावे लागत आहे. सामायिक मालकीच्या जमीनी, वने, जलसाठे यांच्यावरील सार्व्रजनिक मालकी नव्या उदारमतवादी व भांडवली विकासप्रक्रियेत खाजगी बनत चालली आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मुलभूत गरजा भागवण्यावरील वेळ आणखीनच वाढत चाललेला दिसतो. ग्रामीण गरीबांच्या कल्याणासाठी तसेच पर्यावरणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सामायिक मालकीच्या नैसर्गिक स्त्रोतांची पुर्नमांडणी व काटेकोर नियोजन होणे आवश्यक आहे तरच भारतासारखे राष्ट्रराज्य स्थिर विकासाच्या दिशेने जावू शकते.यामुळे विकास आणि पर्यावरण हे यांच्यातील आंतरसंबंध अतिशय महत्त्वाची आहेत. अगदी जागतिक पातळीवर जरी यांचा विचार केला तरी विविध क्षेत्रातील विकास हा एकतर पर्यावरणाच्या मुळावर घाव घालताना दिसतो किंवा पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने विधायक पावले उचलताना दिसतात.

कृषक व शेतमजूर स्त्रियांच्या श्रमाचे अदृष्यीकरण

पर्यावरण आणि विकास यांची सांगड घालताना श्रमिकांचे काय होते हा प्रश्न अभ्यासणे महत्त्वाचे आहे. या लेखाच्या पुढच्या टप्प्यात श्रमिक (प्रामुख्याने स्त्रिया) पर्यावरण आणि विकासाच्या प्रक्रियेत नेमके कुठे जातात या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. श्रमिकांमध्ये विशेषत स्त्रियांच्या श्रमाला श्रम म्हणून न पाहिल्याने त्यांचा विकासाच्या निर्देशकात, किंवा दरडोई उत्पन्नाच्या निकषांमध्ये समावेश होत नाही. त्यातली त्यात शेती करणाऱ्या कृषक व शेतमजूर स्त्रियांचे श्रम हे

पर्यावरण पूरक असते. व त्यातून राष्ट्रराज्याच्या विकासाला हातभार लागत असतो. तरीदेखील त्याकडे दुर्लक्ष केले जाते. यापाठीमागच्या राजकीय अर्थकारणाची चौकशी होणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून या अभ्यासातून कृषक व शेतमजूर स्त्रियांच्या श्रमाची चोरी कशी केली जाते. तसेच त्यांना विकासाच्या प्रक्रियेतुन दूर कसे लोटले जाते हे पाहता येईल.

बिना अगरवाल यांच्या मते भारतातील अनेक खेडेगावच्या विकासामध्ये स्त्रियांचा खूप मोठा सहभाग आहे. अनेक ग्रामप्रमुख स्त्रिया पुरुषांच्या तुलनेने अधिक स्थिर व पर्यावरण पूरक विकास करताना दिसतात. गावातील आरोग्य सुविधा सुधारणे, पिण्याच्या पाण्याची आणि निर्माल्याची सुविधा सुधारणे इत्यादीसारख्या मुलभूत सुविधांवर स्त्री प्रमुखांनी अधिक लक्ष दिलेले दिसते. स्त्रिया त्यांच्या उपस्थितीत सार्वजनिक ठिकाणची संस्कृती आणि मूल्याचे स्थित्यंतर घडवून आणू शकतात. हे गृहितक आता सर्वदूर पसरलेले आहे. स्त्रिया या सतत मूलभूत विकासावर भर देत असतात त्यामळे त्या एकमेकांतील स्पर्धेपेक्षा राजकारणात सहभागी न होता एकमेकांना मदत करण्याच्या भूमिकेत अधिक असतात. स्त्री प्रमुख कमीत कमी भ्रष्टाचार करतात. जास्तीत जास्त एकमेकांची काळजी घेण्याचे काम करतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने विकासाच्या दिशेने नेण्याचे काम स्त्रिया करतात.

पर्यावरण संवर्धन हा मुद्दा विकासाच्या विचारांमधून अधिक प्रभावीपणे पुढे आलेला दिसतो. विकासाचा अर्थ निसर्गाला नियंत्रित, नियमित करण्याची क्षमता या पध्दतीने लावला जातो. त्यामुळे एका अर्थाने विकासाबाबतीतल्या कुठल्याही चर्चेच्या गाभ्याशी पर्यावरणाचे प्रश्न आपसूकच येतात. साधरणत: १९७० च्या दशकापर्यंत विकासाचा अर्थ केवळ आर्थिक विकास अशाच पध्दतीने लावला जायचा. यानंतरच्या काळात मात्र विकासाच्या संकल्पनेत बदल होत गेला. वेगवेगळया टप्प्यावर विकासाची सामाजिक विकास, मानवी विकास व नंतर चिरंतन विकास अशी पुर्नव्याख्या केली गेली. सध्याचे विकासाचे परिणाम जे औदयोगिकीकरण, शहरीकरण व जास्तीतजास्त उपभोगावर आधारलेले आहे. त्याच्याच चिकित्सेतून चिरंतन विकासाची संकल्पना पूढे आली. वाढते प्रदूषण, नैसर्गिक साधनांची होत असलेली क्षती आणि एकंदर पर्यावरणाची होणारी हानी यामुळे या मुदद्याला अधिक दृष्यता मिळाली. तथाकथित विकसित राष्ट्रांकडून ओरड केली गेली की, गरीब देश आणि गरीब लोक हे लोकसंख्या वाढीस जबाबदार आहेत आणि जास्त लोकसंख्या ही अविकासाचे मुळ आहे. तसेच ही जादा लोकसंख्या पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनावरील भार वाढवित आहे. त्यामुळे असे गृहीत धरले गेले की गरीब देश हे जास्त प्रदूशण पसरविणारे असतात. चीन, भारतासारख्या जास्त लोकसंख्या असणाऱ्या देशामुळे ओझोनचा थर कमकुवत बनत चालला आहे. त्यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे असे गृहितके मांडण्यात आली.

या गृहितकाला १९७२ मध्ये भरलेल्या स्टॉकहोम परिषदेत ज्यामध्ये ११४ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते, त्यामध्ये प्रश्न उपस्थित केला. या परिषदेतून असे अधोरेखीत करण्यात आले की जगातील विकसित राष्ट्रे हि मोठया प्रमाणावर नैसर्गिक संसाधनांचा वापर करत आहेत. त्यांचे शोषण करतात व पृथ्वीच्या नैसर्गिक संसाधनांवर जास्त भार टाकतात. त्यामुळे या परिषदेतून नैसर्गिक संसाधनांच्या क्षतीचा प्रश्न जागतिक राजकीय अर्थकारणाच्या संदर्भातून उपस्थित केला गेला. तसेच अविकसित व विकसनशील राष्ट्रांतील परिघावरील समुहांना पर्यावरण हानीमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांना मोठया प्रमाणावर सामोरे जावे लागते. ग्रामीण समूहांवर विशेषत: शेतीवर अवलबून असलेल्या समूहांना, आदीवासी समूहांना उपजीविकेसाठी नैसर्गिक संसाधनावर मोठया प्रमाणावर अवलंबून रहावे लागते. शेतीवर आधारीत श्रमिक पर्यावरणाच्या अति ऱ्हासामुळे संकटात आलेले दिसतात. त्यातली त्यात कृषक व शेतमजूर स्त्रियांचा प्रश्न हा त्यांच्या अदृष्य श्रमाभोवती फिरताना दिसतो.

कृषक आणि शेतमजूर स्त्रियांच्या उपजीविकेचा प्रश्न विकासाच्या प्रक्रियेत अधिक गंभीर बनलेला दिसतो. कारण या स्त्रियांसाठी पाण्याची, सरपणाची आणि जनावरांना लागणाऱ्या पाण्याची उपलब्धता भौतिक विकासाच्या प्रकल्पांमुळे कमी झालेली असते. ग्रामीण भागात शेती, जमीन नवउदारमतवादी अर्थव्यवस्थेत बाजारू वस्तू म्हणून पुढे येतात. या बाजारू वस्तू राष्ट्रराज्यातील भौतिक विकासाला, पायाभूत सोयीसुविधांना वाढवण्याचे साधन बनतात. नवनवीन विकासाच्या प्रकल्पांमुळे शेतीची व जमीनीची उपजीविकेची व्यवस्था मोडकळीस आणली जाते. मोडकळीस आनण्याच्या प्रक्रियेलाच विकास मानले जाते. परंतु या विकासाची फळे समाजातील भांडवलदार आणि मध्यम वर्ग चाखतो परंतु यामध्ये ज्यांची उपजीविकाच ज्यावर अवलंबून असते त्या कृषक आणि शेतमजूर स्त्रियांच्या उपजीवीकेवरच, श्रमावरच घाला घातला जातो. त्यांना मात्र परिघावरच ठेवले जाते. त्यामुळे या स्त्रियांची सर्व बाजूने कोडी झाल्याचे दिसते.

भारतासारख्या कृषीआधारीत विकास प्रक्रिया असलेल्या देशात शेतजमीन जंगले व सामाईक जमीनी यांची अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. ही संसाधने अन्न,चारा,सरपण आणि चारा गोळा करुन त्याचा साठा करण्याची जबाबदारी हि स्त्रियांची असते. विशेषत: कृषक व शेतमजूर कुटुंबांमध्ये हे सर्व श्रम स्त्रियांकडे असते. त्यामुळे सामायिक संसाधने ही जरी सर्वजण सामूहिकपणे वापरत असले तरी त्यांचा सर्वात मोठा उपयोग जेमतेम उदरनिर्वाह करणाऱ्या कृषक व शेतमजूरी करणाऱ्या कुटुंबासाठी व प्रामुख्याने त्या कुटुंबातील स्त्रियांना निर्वाहासाठी होत असतो. कृषक व शेतमजूर स्त्रिया मोठया प्रमाणावर

सामुदायिक संसाधनांवर अवलंबून असतात. विकासाची प्रक्रिया व त्यांचा पर्यावरणाशी असणारा सहसंबंध तपासताना चिकित्सक विचार होणे आवश्यक आहे. कारण सामाजिक संरचनेमुळे त्यांचे हे श्रम विकासाच्या निर्देशकाला पुरक मानले जात नाही. राष्ट्रराज्याच्या दरडोई उत्पन्नामध्ये या श्रमाची मोजदात होत नाही. महाराष्ट्रातील खेडेगावांमध्ये जात. वर्गानुसार या स्त्रियांचे प्रमाण साधरणत: ६० ते ६५ टक्के आहे. हे प्रमाणाण जात व वर्गानुसार आणि महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेनुसार कमी जास्त प्रमाणावर आहे.

विकास, पर्यावरण आणि श्रमाचे सहसंबंध तपासताना लिंगभाव आधारीत श्रमविभागणी व त्यातील राजकीय अर्थकारण महत्त्वाची गुंतागुंत समोर आणते. कृषीसंरचनेमध्ये मोठया प्रमाणावर बदल घडून आले आहेत. सर्वसाधारणपणे जमीनीची मालकी ही पुरुषांच्याच नावावर असते. परंतु त्यांच्याश्शेतात कृषक म्हणून किंवा शेतमजूर म्हणून मोठया प्रमाणावर स्त्रियाच काम करत असतात. २००१ सालच्या जनगणनेनुसार एकूण पुरुष कामगारांपैकी ३० टक्के कृषक तर २१टक्के शेतमजूर म्हणून काम करत होते. तर एकूण स्त्रीकामगारांपैकी ३० टक्के तर ३७ टक्के शेतमजूर म्हणून काम करत होते. आज हे प्रमाण जवळ जवळ ४३ टक्के व ४७ टक्केपर्यंत वाढले आहे. त्यामुळे मोठया प्रमाणावर श्रमिक कषी क्षेत्रावर अवलंबून आहेत.

शेती क्षेत्रातील अनिश्चितता आणि नव उदारमतवादी जीवन पध्दतीचा वाढता प्रभाव यामुळे शेतीतील पुरुषांचे प्रमाण कमी होत जाते. प्रत्येक तरुण सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी क्षेत्रामध्ये काम शोधू लागतात. अनेकवेळा या कामासाठी स्थलांतर करतात. परंतु याच पुरुषाच्या कुटुंबातील स्त्रिया मोठया प्रमाणावर कुटुंबाच्या शेतीमध्ये अडकून पडतात. तर बऱ्याच कुटुंबात पुरुष कारखान्यात कामगार म्हणून कामाला जातो तर स्त्रिया गावामध्येच शेतमजूर म्हणून काम करतात. या स्त्रियांना बिना अगरवाल यांनी "वारसाहक्क नसलेल्या स्त्रिया" व "परिघीकरण झालेल्या शेतमजूर" असे संबोधले आहे. पुरुष कुटुंबातील कमावते मानले जातात व त्यांचा राष्ट्रराज्याच्या तथाकथित आधुनिक विकास प्रकल्पांमध्ये उत्पादीत म्हणून काम करत असतात. परंतु हेच मोठाले विकासप्रकल्प पर्यावरणाचा एकांगी वापर करुन पर्यावरणाला हानी पोहचवत असतात. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला कुटुंबातील स्त्रिया आजही मोठया प्रमाणावर असंघटीतपणे शेतात कृषक, शेतमजूर म्हणून काम करतात. शेतातील खुरपणी, मळणी, जलव्यवस्थापन इ.कामे करतात आणि त्या श्रमाच्या मोबदल्यात स्वत:च्या कुटुंबाची उपजीविका भागवतात. महाराष्ट्रातील बीड, परभणी, अकोले जिल्हयात अशा प्रकारचे असंघटीत श्रम मोठया प्रमाणावर दिसते. यांच्या श्रमातून पर्यावरणाचे संवर्धनही होताना दिसते. शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञान आल्यामुळे यांच्या रोजंदारीवर याचा दुष्परिणाम झालेला दिसतो. शेतात मोठया प्रमाणावर तणनाशक, फवारणी इ. आधुनिक साधनांचा वापर केल्यामुळे शेतमजूर स्त्रियांना बेरोजगारीला सामोरे जावे लागत आहे.

विमर्श :

आज नवउदारमतवादी विकास प्रक्रियेत जमीन हे दोलायमान साधन बनले आहे. त्यामुळे जमीनीचे खाजगी व संवेदनशील प्रतिमान भांडवलशाहीच्या प्रक्रियेत बाजारु स्वरुप धारण करताना दिसते. जमीनीची मालकी हि फक्त उपजिविकेची नैसर्गिक साधन म्हणून मर्यादीत राहत नाही तर ती नवउदारमतवादी विकास भांडवलशाही प्रक्रियेत गुंतवणुकीचे साधन बनते. हे साधन कृषकांच्या मालकीचे नसल्यामुळे त्यांना या क्षेत्रातुन अलगदपणे बाजूला लोटले जाते. तसेच अनेक शेतमजूर स्त्रिया या नवीन विकासप्रकल्पामध्ये (बागकाम, स्वच्छता इ.) सेवा देताना दिसतात. त्यामुळे विकास प्रकल्पांमध्ये देखील स्त्रियांच्या श्रमप्रतिष्ठेत फरक पडलेला दिसत नाही. कृषक स्त्रिया आणि शेतमजूर स्त्रिया पर्यावरणातील बदलाचा सर्वाधिक भार पेलतात आणि त्याच या संपूर्ण प्रक्रियेत अदृश्य असतात.

विकास पर्यावरण आणि श्रम यांचा सहसंबंध तपासताना कृशक व शेतमजूर स्त्रिया या अगदी गाभ्यापाशी कार्यरत असतात. आपल्या श्रमातून त्या विकास व पर्यावरणाला पूरक ठरत असतात तरी देखील त्या या सर्व प्रक्रियेपासून परात्म ठरत असतात. विकास या प्रक्रियेला समजून घेताना त्याकडे फक्त भौतिक बदलापुरते न पाहता त्याच्या मानवी संसाधन व उपजीविकेच्या अंगाने समजून घेऊन त्यातून पर्यावरण पूरक स्वरुपाला अधिक विकसित करणे गरजेचे आहे. तसेच स्थिर विकासाच्या प्रक्रियेला अधिक मजबूत करण्यासाठी पर्यावरणाच्या सूचक वापरातून व परिघावरील श्रमाचे महत्त्व समजून विकास प्रक्रियेला अधिक मजबूत करणे महत्त्वाचे आहे.

संदर्भसूची :

- भागवत विद्युत २००८, 'स्त्री– प्रश्ना' ची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
- शिवा, वंदन, २००६, संमृद्धीची लूट, (अनु. देसाई, कमल), जनआंदोलन राष्ट्रीय समन्वय, पुणे. भागवत, रवी (संपा.), २००२, परिसरबार्ता: पर्यावरणस्त्रीवाद विशेषांक, पुणे..
- दातार, छाया आणि तांबे, श्रुती (संपा.), २००२, अस्तित्व संघर्ष आणि सार्वभौमत्व, महाराष्ट्र स्त्री अभ्यास व्यासपीठ, मुंबई.

- कांबळे, उत्तम. (संपा) २०१२. श्रमिकांचे जग :काल,आज आणि उद्या.लोकवाङ:मय गृह.मुंबई.
- Agarwal, Bina. 1994. A Field of One's Own: Gender and Land Rights in South Asia. Cambridge: Cambridge University press.
- Atwood, A. D. and Baviskar, B.S. 1988. (Eds) Who Shares? Co-operatives and Rural Development. Bombay: Oxford University.
- Beteille, A. 1971. Caste Class & Power: Changing Patterns of Stratification in a Tanjore Village, Berkeley: University of California Press.
- Breman, J. and P.Kloos. 1997. The Village In Asia Revisited. New Delhi: Oxford University Press.
- Chakravarti, U.1999. 'Whatever Happened to Vedic Dasi? Orientalism, Nationalism and a Script for the Past' In Recasting Women: Essays in Colonial History edited by Kumkum Sangari and Sudesh Vaid. New Delhi: Kali for Women.
- Chandhoke, Neera. 'Marxian Political Economy as Method: How Political Is Political Economy?' Economic and Political Weekly, Vol. 29, No. 5 (Jan. 29, 1994), pp. PE15-PE24
- Dhanagare, D. N.1980. Agrarian Structure: Social Change and Peasant Revolts in India. In The Journal of Development Studies. Vol. 17, Issue-1.
- Dhanagare, D.N. 1994. 'The Class Character and Politics of the Farmers Movements in Maharashtra during the 1980s'. Journal of Peasant Studies, Vol.21, No.3 and 4:72-94.
- Hall, S. & All (Eds). 1996. Modernity: An Introduction to Modern Societies, London: Blackwell (Wiley).
- Ilaiah, Kancha. 2009. Turning the Pot, Tiling the Land: Dignity of labour in our times. Chennai: Navyana Publication.
- Jha, H. 1977. 'Low caste peasants and upper caste Zamindars in Bihar (1921-1925): An analysis of Sanskritisation and Contradiction between two groups'. Indian Economic and Social History Review, Vol. XIV No. 4, pp. 549-59.
- Jodhaka, Surinder and Paul D'souza. 2009. 'Marginalization and Return: Agrarian Studies in India During 1990s'.In Themes in Social Stratification and Mobility, edited by Ishwar Modi, B.K.Nagala and Arvind Kumar Agrawal. Jaipur: Rawat Publication.
- Jodhaka, Surinder. 2003. 'Agrarian Structures and their Transformations'. In Oxford Handbook of Sociology, edited by Veena Das. Delhi: Oxford University Press.
- Mohanty, B.B. 1999. Agricultural Modernization and Social Inequality: Case Study of Satara District. Economic and Political Weekly, A-50-61.(26 June)
- Omvedt, G. 1976. Cultural Revolt in a Colonial Society: The Non-Brahman Movement in Maharashtra in Western India, 1873-1930. Bombay: Scientific Socialist Education Trust.
- Omvedt, Gail. 1992. 'Capitalist Agriculture andRural Classes in India'. In Class, State and Development in India, edited by B Berberogly. New Delhi: Sage Publications.
- Agarwal, Bina. 2001.'The Gender and Environment Debate: Lessons from India' in Nivedita Menon (ed). Gender and Politics in India, New Delhi: Oxford University Press.
- Cold Hearths and Barren Slopes.1986.The Woodfuel Crisis in the Third World. New Delhi: Allied Publishers Private Limited and Institute of Economic Growth.
- Bandyopadhyaya, J. and Vandana Shiva. Drought Development and Desertification, Brief Report on the 2-day seminar on the Control of Drought Desertification and Famine, held at India International Centre, New Delhi, 17-18 May 1986.
- Choudhary, Prem, 1999. 'Ideology, Culture and Hierarchy: Expenditure- Consumption Patterns in Rural Households' in K. Sangari and U. Chakravarti (eds.) From Myths to Markets, New Delhi: Manohar and Indian Institute of Advanced Study.
- Dankelman, Irene and Joan Davidson, 1988. Women and Environment in the Third World: Alliance for the Future, London: Earthscan Publications.
- Omvedt, Gail, 1993.'The Environmental Movements' in Reinventing Revolution, New York: M.E. Sharpe.
- Sheth, Malini Chand, 'Indian Women in Defence of Forests' in Women and the Environmental Crisis. Report of the Workshops on Women, Environment and Development, Nairobi, 10-20 July 1985.

*न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर

***

महात्मा फुले आणि सत्यशोधक समाज

*डॉ.प्रतिभा अहिरे

मराठी समाजशास्त्र परिषदेचे 32 वे राष्ट्रीय अधिवेशन श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज इचलकरंजी येथे होत असलेल्या या अधिवेशनात मसपच्या कार्यकारिणीने अत्यंत महत्त्वाच्या अशा परिसंवादामधे मला वक्ता म्हणून बोलण्याची संधी दिली हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय, सोनेरी क्षण आहे. एखाद्या नोबेल पुरस्कारापेक्षा हा सन्मान मुळीच कमी नाही हे प्रारंभीच मी इथे नम्रपणे नमूद करते. यासाठी मी मसपचे अध्यक्ष मा.प्रा. राहुल भगत व सर्व कार्यकारणीची मनःपूर्वक ऋणांकित आहे ."महात्मा ज्योतिबा फुले आणि सत्यशोधक समाजाची 150 वर्ष" हा या परिसंवादाचा विषय आहे. त्या अनुषंगाने मी या ठिकाणी मांडणी करणार आहे. मी मराठी समाजशास्त्र परिषदेची मनःपूर्वक ऋणी आहे की यासाठी नव्हे की, परिसंवादामध्ये बोलण्याची संधी त्याहीपेक्षा की" महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाला दीडशे वर्षे झाली" त्या प्रित्यर्थ मराठी समाजशास्त्र परिषदेने या परिसंवादाचे आयोजन केले आहे.

बंधूंनो,

क्रांतिबा ज्योतिबा फुले यांचा उल्लेख आजही" समाज सुधारक" म्हणून केला जातो. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या या अधिवेशनात या परिसंवादात "क्रांतीबा ज्योतिबा फुले हे समाज सुधारक नव्हते तर क्रांतिकारक होते" अशी स्पष्ट भूमिका मी आपणांसमोर ठेवत आहे. आपण सर्व समाजशास्त्राचे सुज्ञ आणि तज्ञ अभ्यासक आहात. समाजशास्त्रीय संकल्पनांचे आपले आकलन समाजाला दिशा देणारे असते. म्हणून या ठिकाणी अत्यंत जबाबदारीने मी माझी ही भूमिका आपणांसमोर ठेवत आहे. समाज सुधारणा आणि क्रांती या दोन स्वतंत्र संकल्पना आहेत त्या आपण जाणतोच. "सुधारणा," या संकल्पनेमध्ये आहे ती व्यवस्था कायम ठेवून केवळ दुरुस्त्या करणे अभिप्रेत असते. ज्योतिबा फुले यांचे जीवन आणि कार्य अभ्यासले असता आपणास हे स्पष्टपणे लक्षात येते की त्यांनी त्यांच्या कार्य, त्यांची वाणी, लेखणीमधून केवळ डागडुजा किंवा सुधारण्या केल्या नाहीत किंबहुना डागडुजी आणि सुधारणेला स्पष्टपणे विरोध केला आणि समग्र व्यवस्था परिवर्तनाचा कार्यक्रम त्यांनी भारतीय समाजाला दिला. विषमतामूलक ब्राह्मणी व्यवस्था त्यांनी आमूलाग्र नाकारली होती, केवळ नकार देऊन ते थांबले नाहीत तर त्यांनी पर्यायी समताधिष्ठित व्यवस्था उभी केली. समताधिष्ठीत व्यवस्थेच्या उभारण्यासाठी त्यांनी सतत संघर्ष केला आणि म्हणूनच ज्योतिबा फुले हे सुधारक नव्हतेच तर ते क्रांतिकारक होते हे आपण आधी समजून घेतलं पाहिजे. तसेच सत्यशोधक समाजाकडेही "सुधारणावादी चळवळ"म्हणून पाहिले जाते त्या संदर्भात सुद्धा ही सुधारणावादी नव्हे तर क्रांतिकारी चळवळ होती हे आपण समजावून घेतले पाहिजे. म. ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना क्रांतीबा केली त्यामागे अज्ञानी, अडाणी, शूद्रातीशूद्र समुदायाला उच्चवर्णीय ब्राह्मणी पुरोहितांच्या गुलामीतून मुक्त करणे, जागृत करणे , संघटित करणे हा उद्देश होता. "सर्व साक्षी जगत्पती तेथे नकोच मध्यस्थी" किंवा "ब्राह्मणाचे येथे नाही प्रयोजन" हा सत्यशोधक समाजाचा मूळ उद्देश होता.ज्योतिबांनी वर्णाश्रम, विवाह पद्धती,अर्थसंस्था, आपद्धर्म,धर्मग्रंथ, स्मृती- श्रुतींचे आधार, अधिकार या सर्वांना नकार दिला. या अर्थाने ते सुधारणावादी नव्हे तर क्रांतिकारक होते.

शेतकरी कष्टकरी भूमीहीन स्त्री आणि तमाम बहुजन समाज हा सत्यशोधक समाजाचा केंद्रबिंदू होता ही चळवळ सर्व समावेशक स्वरूपाची होती केवळ वरच्या वर्गासाठी नव्हे तर खालच्या वर्गातील लोकांची ही सामाजिक परिवर्तनाची चळवळ, जातीअंताची चळवळ असेही आपण म्हणू शकतो. ब्राह्मणी धर्म श्रेष्ठत्व आणि शुद्रातीशूद्र स्त्रिया व तमाम बहुजनांचे कनिष्ठत्व यावर आधारित असल्याने या मांडणीला नाकारणे हे सत्यशोधक समाजाच्या कार्यामागील

मूळ उद्दिष्ट होते मात्र केवळ ब्राह्मणी धर्म, त्याची गृहीतके, त्याचे विधी कर्मकांड याला नकार देणे एवढाच त्यांचा उद्देश नव्हता तर क्षेत्रातील शूद्र बहुजनांसाठी नवा धर्म निर्माण करणे नवी विधी निर्माण करणे म्हणजेच ब्राह्मणी श्रेष्ठत्व असणाऱ्या सामाजिक संस्थांना नकार देऊन नवीन सामाजिक संस्थांची, नवीन समाज व्यवस्थेची निर्मिती करण्याचे क्रांतिकार्य म. ज्योतिबा फुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केल्याचे आढळते आणि म्हणूनच महात्मा ज्योतिबा फुले आणि सत्यशोधक समाज हे सुधारणावादी नव्हे तर क्रांतिकारक परिवर्तनवादी आहेत हे या ठिकाणी मी मांडते आहे.

"ब्राह्मण भट जोशी उपाध्ये इत्यादी लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांना मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्ष ते शूद्र लोकांस नीच मांडून गफलतीने लुटत आलेत आलेले आहेत यांस तो सदुपदेश व विद्याद्वारे त्यास त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथांपासून त्यास मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ शूद्र मंडळींनी हा समाज तारीख 24 माहे सप्टेंबर 1873 इसवी रोजी स्थापन केला." खरेतर ज्योतिबांचे "वासुदेव बाबाजी नवरंगे" नावाचे एक मित्र होते आणि त्यांचा (साचे) बनविण्याचा व्यवसाय होता .त्या उत्पादनाची एजन्सी ज्योतिबांकडे होती. ज्योतिबांच्या मुशीच्या दुकानात रामशेठ उखणे, विठोबा गुठाळ, कुशबा माळी, धोंडीराम कुंभार, ज्ञानोबा झगडे ,रामचंद्र व कृष्णराव भालेकर, विनायकराव बाबाजी, बाबाजी मनाजी, पिंजण, महंत ज्ञानगिरी बुवा यांच्या बैठक होत आणि त्यांच्या चर्चेतून "सत्यशोधक समाज" अस्तित्वात आला. वास्तविक पाहता" गुलामगिरी" या ग्रंथातूनच विद्रोही विचारांची पेरणी ज्योतिबांनी सुरू केली होती. 24 सप्टेंबर १८७३ रोजी त्यांचे महाराष्ट्रातील साठ अनुयायी पुण्यामध्ये जमले. या ठिकाणी ज्योतिबांनी सत्यशोधक समाजाची म्हणजेच एका मध्यवर्ती संस्थेची गरज नमूद केली आणि या बैठकीमध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्याचे जाहीर करण्यात आले.

सत्यशोधक समाजाचे ज्योतिबांचे कार्यकर्ते सहकारी "तुकाराम हनुमंत पिंजन "हे म्हणतात की, "ब्राह्मणांपासून ब्राह्मणेतरांची सुटका कशी होईल हे विचार त्यांच्या मनात खेळू लागले ते म्हणत की माझ्या एकट्याच्याने ब्राह्मणेतरांची ब्राह्मणांपासून सुटका होणार नाही. मला मंडळी सहाय्य होईल तर काही करता येईल त्यावरून जमत असलेल्या मंडळीने त्यांस सहाय्य करायचे आश्वासन दिले नंतर त्याने विवक्षित मंडळ स्थापन करून त्या मंडळास एक नाव द्यावे असे ठरवले. या मंडळीस कोणते नाव द्यावे याबद्दल सर्वांमध्ये मंडळीत बरीच वाटाघाट झाली शेवटी सत्य म्हणजे खरे, शोधक म्हणजे तपास करणारा, मंडळ म्हणजे समाज म्हणजे "सत्याचा तपास करणार समाज" असे नाव देण्याचे ठरवून ता 24 माहे सप्टेंबर सन 873 रोजी सत्यशोधक समाज स्थापन झाला.

ब्राह्मणी पुरोहितांच्या गुलामगिरी आणि पिळवणुकीतून शूद्रातीशूद्रांना मुक्त करून मानवी हक्क आणि अधिकाराची शिकवणूक त्यांना देणे. मानसिक, धार्मिक ,सामाजिक, सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना समता मानवतावादी बनवणे हा या चळवळीचा मानवतावादी उद्देश होता. चळवळीमध्ये सभासदत्व प्राप्त करण्यासाठी "तळी उचलण्याचा " विधी केला जाई. खंडोबा- बहिरोबा या बहुजनांच्या देवांची नावे घेऊन येळकोट किंवा चांगभलं चा जयघोष केला जाऊन तळी उचलली जात असे आणि त्यानंतर ज्योतिबा सभासदांची नोंद रजिस्टर मध्ये घेत असत. मानवी हक्काविषयी जाणीव जाणीव जागृती करून शुद्रातीशूद्र आणि बहुजनांना त्यांनी संघर्षरत बनविले. ब्राह्मणी समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था ही विकृत आहे. तिचे संपूर्णतः उच्चाटन केल्याशिवाय नवीन आधुनिक मूल्यांवर आधारित

समताधिष्ठित समाज उभा करता येणार नाही आणि म्हणून पारंपरिक विषमतावादी सामाजिक संस्था "खारीज" करून समता स्वातंत्र्य बंधुतेवर आधारित समाज निर्मितीचे कार्य ज्योतिबांनी केले. ज्योतिबांची समता ही संकल्पना अखिल मानव जातीच्या मुक्तीशी संबंधित असणारी संकल्पना आहे. सामाजिक आणि आर्थिक समते शिवाय राष्ट्रभावना विकसित होऊ शकणार नाही. "शूद्रातीशूद्रांची गुलामगिरी तसेच ठेवून तुम्ही अशा प्रकारची एकता साकारणार आहात काय "? अशा स्वरूपाचा प्रश्न ज्योतिबा विचारतात. ज्योतिबा ब्राह्मण हे भावासारखे आहेत पण ब्राह्मण्यवाद हा घृणास्पद आहेत असे स्पष्टपणाने मांडणी करतात.

सत्य, समता, मानवता हा सत्यशोधक समाजाचा पाया होता. जातीअंत आणि मानव मुक्तीचे कार्य हा त्यांचा उद्देश होता. 19 व्या शतकामध्ये पेशवाई नष्ट झाली आणि कायद्याचे राज्य म्हणजेच इंग्रजी राज्यव्यवस्था प्रस्थापित झाली आणि त्याचा आधार घेऊन ज्योतिबांनी ब्राह्मणी धर्म व्यवस्था मोडीत काढली .ब्राह्मणी संस्कृतीला त्यांचा ठाम विरोध होता आणि म्हणून मानवी हक्काची मशाल पेटवण्यासाठी व्यक्ती स्वातंत्र्य, मत स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांनी केली. प्रस्थापित व्यवस्थेचा मूलगामी अभ्यास, विश्लेषण, चिंतन करून, धर्मचिकित्सा करून त्यांनी ही चळवळ उभी केली. ज्योतिबांनी," अब्राह्मणी राष्ट्रवादाची" निर्मिती केली. "ब्राह्मण म्हणजे काव्यबाज कावळे आहेत त्यांच्या अंगी राष्ट्रवाद नाही तर राष्ट्रद्रोह आहे" असे ते सांगत असत. मात्र ज्योतिबा हे ब्राह्मण दृष्टी नव्हते त्यांच्या कार्यामध्ये ब्राह्मण स्त्री ही केंद्रस्थानी होती. केशवपन, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, पुनर्विवाहाची चळवळ, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, ब्राह्मण विधवेचे मूल दत्तक घेणे यासारख्या त्यांच्या कार्यातून त्यांचे जातीपातीच्या पल्याड असणारे मन आणि विचार स्पष्ट होतात.

त्यांच्या क्रांतिकार्याला जातीपातीच्या मर्यादा नव्हत्या. माळी जातीच्या लोकांपुरते किंवा विशिष्ट जातीच्या लोकांपुरते कार्य त्यांनी केले नाही तर स्व जातीच्या मर्यादा तोडून त्यांनी कार्याला प्रारंभ केला. स्त्री- शूद्रांतीशूद्र हा वर्ग त्यांच्या कार्याच्या केंद्रस्थानी होता. समाजव्यवस्थेतील शोषित वंचित पीडित श्रमिक स्त्रीया या सर्वहारा वर्गाच्या मुक्ती, उन्नतीचा विचार ते करत होते. त्याप्रमाणे कृती कार्यक्रम, आंदोलन ते करत होते. ज्योतिबांनी स्त्रीकडे एक स्वतंत्र मानव प्राणी म्हणून पाहिले. सत्यशोधक समाजाचा विचार मांडताना ,सार्वजनिक सत्यशोधक धर्माची मांडणी करताना प्रत्येक विधानात" एकंदर सर्व स्त्री आणि पुरुष" या स्वरूपाचा स्त्रीचा एक "स्वतंत्र व्यक्ती "म्हणून उल्लेख ते करतात हे महत्त्वाचे आहे.ज्योतिबा स्त्री प्रश्नाकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहतात. स्त्रीच्या अवस्थेमध्ये सुधारणा करणे हा त्यांचा इतर सुधारकांप्रमाणे दृष्टिकोन नव्हता. स्त्री आदर्श माता, आदर्श पत्नी, आदर्श भगिनी व्हावी किंवा ब्रिटिश स्त्रीप्रमाणे आपली स्त्री हीसुद्धा मॅडम बनावी, मडमे सारखे तिने बोलावे ,वागावे हा मर्यादित हेतू त्यांच्या शिक्षणामागे नव्हता तर शिक्षणाची त्यांनी केलेली काव्यमय व्याख्या आणि त्या व्याख्येत सांगितलेली सहा कारणे आपणाला विदित आहेतच पण ज्योतिबा" शिक्षण म्हणजे गुलामी नष्ट करण्याचे हत्यार आहे" असेही सांगतात आणि तेच अत्यंत महत्त्वाचे आहे म्हणूनच जेव्हा ज्योतिबा 1848 मध्ये पहिली शाळा काढतात, त्यामागील त्यांचा दृष्टिकोन पुरोहितशाहीच्या दास्यत्वातून स्त्री आणि बहुजनांना मुक्त करण्यासाठी त्यांना शिक्षण हे गुलामी नष्ट करण्याचे हत्यार देऊन शस्त्रसज्ज करावे आणि सामाजिक स्वातंत्र्याचा संघर्ष सुरू करावा हा हेतू त्यामागे दिसतो आणि म्हणूनच ते प्रारंभी सामाजिक स्तरीकरणात सगळयात खालच्या पदाला दाबून, दडपून ठेवलेल्या स्त्रियांपासून या सामाजिक स्वातंत्र्य चळवळीचा प्रारंभ करताना आपल्याला

आढळून येतात. त्यानंतर 1852 मध्ये अस्पृश्यांसाठी शाळा ते काढतात यातूनच स्त्रीशुद्रांची मुक्तता करणे हा त्यांचा हेतू आपणास दिसून येतो. आजही स्त्रीकडे पाहताना ती एक व्यक्ती म्हणून पाहिले जाताना आढळत नाही. अजूनही सर्वच स्तरांमध्ये स्त्रीकडे ती "अर्धांगिनी" आहे या पद्धतीनेच पाहण्याचा दृष्टिकोन आढळतो. मात्र ज्योतिबा अठराव्या शतकामध्ये त्यांच्या सर्वच लिखाणांमध्ये प्रत्येक ठिकाणी स्त्रीचा स्वतंत्र उल्लेख करून तिला एक व्यक्ती म्हणून स्थान देताना आढळून येतात. मानवी हक्काच्या चळवळीचा पहिला उद्गार ज्योतिबा फुले करताना आढळून येतात. त्यांचा स्त्रीविषयक विचार आणि कार्य यामागे मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. स्त्रियांना शिक्षण देण्याची कारणमीमांसा करताना "ज्यांना कोणाला त्या राष्ट्राचे कल्याण, त्या राष्ट्राचे सुख हवे आहे त्या त्या प्रत्येकाने त्या देशातील स्त्रियांचे कल्याण, स्त्रियांचे सुख निर्माण केले तर राष्ट्राचे कल्याण ,राष्ट्राचे सुख निर्माण होईल "अशी मांडणी ते करतात म्हणजेच स्त्रीच्या कल्याणात राष्ट्राचे कल्याण आहे म्हणूनच राष्ट्राच्या कल्याणासाठी ,एकमय राष्ट्राच्या निर्मितीसाठी स्त्री शिक्षित केली पाहिजे या हेतूने स्त्रियांची पहिली शाळा ज्योतिराव काढतात असे आपणास आढळून येते.

19 व्या शतकातील विज्ञानवाद, बुद्धीप्रामाण्यवाद , स्त्री-पुरुष समतेचे पुरस्कर्तेपण, त्याचे आद्यत्व आणि विशेष म्हणजे मानवी हक्काच्या चळवळीचे नेतृत्व ज्योतिबा फुलेंकडेच जाते. धर्मचिकित्सा करण्याचे धाडस त्यांनी केले. सनातनी धर्म, ब्राह्मणी थोतांड त्यातून त्यांनी उघडे पाडले. धर्माची उत्पत्ती, कार्य याची परखड कारण मीमांसा केली. जातीसंस्था, वर्णव्यवस्था यातील परस्पर संबंध शास्त्रीय पद्धतीने शोधण्याचा प्रयत्न केला .त्यांनी वाणी, लेखणी ,करणी, संघटन, आंदोलन ही सर्व माध्यमे सत्यशोधक समाजाच्या प्रचार आणि प्रसारासाठी वापरली .धर्मप्रणित व्यवस्था, अर्थव्यवस्था, ब्राह्मणांचे वर्चस्व, शुद्रातीशुद्रांचे दैन्य, स्त्रियांची पराधीनता, अज्ञान, अंधश्रद्धा ,ज्योतिष्य, भविष्य ,,ग्रह ग्रहयोग या सर्वांना त्यांनी प्रश्नांकित केले .स्त्री शुद्रांच्या शोषणाची कारणमीमांसा करून ब्राह्मणी धर्मशास्त्र ही त्यांच्या शोषणाचे कारण आहे हे साधार सिद्ध केले. त्यांच्या सर्वच कृती आणि उक्ती मागील हेतू समाजातील शोषितांचे प्रबोधन, त्यांना क्रांती लढण्यासाठी तयार करणे, सामाजिक गुलामीतून मुक्त होण्यास सिद्ध करणे हे दिसून येते. ब्राह्मणी अर्थव्यवस्थेला सुरुंग लावण्याचे काम त्यांनी केले. धर्मचिकित्सा करून गुलामांना जागृत करून त्यांच्यामध्ये शोषणाची जाणीव जागी करून शोषणाविरुद्ध पेटवणे, नवी समतावादी व्यवस्था उभारणे या स्वरूपाचे कार्य सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून ज्योतिबांनी केले. जन्म ते मृत्यूदरम्यानच्या आयुष्यातील सर्व विधींमधील ब्राह्मण पुरोहित नाकारला .त्याची दक्षिणा नाकारली त्यासाठी प्रसंगी कोर्टामध्ये जावे लागले तर त्या स्वरूपाचा संघर्ष त्यांनी केला त्यांच्या हयातीत त्या केस चा निकाल लागला नाही. बाळाजी कुशाबा डुंबरे पाटील यांनी सत्यशोधकी पद्धतीने विवाह केला आणि ग्राम जोशांना दक्षिणा देणे नाकारले म्हणून एक 19 मार्च 1884 रोजी भटांनी डुमरे यांच्याविरुद्ध दक्षिणा बुडवल्याची केस दाखल केली होती ज्योतिबांच्या सत्यशोधक समाजाने यात भूमिका घेतली त्यासाठी जवळपास 42 वर्षे पाच महिने संघर्ष करावा लागला. फुलांच्या निर्वाणानंतर या केसचा निर्णय लागला सी.के. बोले यांनी मुंबई कायदेमंडळात हे विधेयक मांडल्यानंतर या संदर्भातला निकाल आला म्हणजेच ब्राह्मणी वर्चस्व नाकारण्यासाठी सर्व पातळीवरील संघर्ष जोतिबांच्या सत्यशोधक समाजाने केल्याचे आढळून येते.

"सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा विधी "ही पुस्तिका जून 1887 मध्ये प्रकाशित झाली. यामध्ये सत्यशोधक विवाह म्हणजे "मंगल रूप करारातील" विधींचे स्वरूप, पद्धती याविषयी मंगलाष्टकाच्या माध्यमातून

गद्यरूपी प्रतिज्ञावजा वचने या स्वरूपाच्या तपशीलवार सूचना केलेल्या आहेत. त्याचबरोबर विधी संपन्न झाल्यानंतर दान धर्म करण्याच्याही सूचना दिलेल्या आढळतात. विवाह ,वास्तुशांती, दशपिंड या विधीच्याही संदर्भात तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेच्या वेळी त्यांचे समकालीन दादोबा पांडुरंग यांनी स्थापन केलेली परमहंस सभा किंवा रानडे आणि भांडारकरांचे प्रार्थना समाज किंवा दयानंद सरस्वती यांचा आर्य समाज हे सुद्धा कार्यरत होते मात्र या सर्वांमधील मूलभूत फरक म्हणजे परमहंस सभा ,प्रार्थना समाज किंवा आर्य समाज हे वेदकालीन आर्यांच्या धर्माचेच पुनरुज्जीवन करणारे ते पंथ होते तर सत्यशोधक समाज त्यांच्यापेक्षा संपूर्णतः वेगळा होता. ब्राह्मणी प्रभुत्वाला नष्ट करण्यासाठी तमाम शुद्रातीशूद्र बहुजनांची ब्राह्मणी गुलामीतून मुक्तता करण्यासाठी निर्माण झालेला होता. ब्राह्मण पुरोहित, त्यांचे विधी, कर्मकांड या सर्वाला झुगारून देत सत्यशोधक समाजाने स्वतःचे विधी, आचार-विचार पद्धती निर्माण केल्या होत्या. सत्यशोधक समाज हा मानवाला केंद्रस्थानी ठेवत होता. ही अशी मानवतावादी चळवळ होती जी जन्माधिष्टीत जाती व्यवस्था, जाचक ब्राह्मणी धार्मिक रुढी, कर्मकांड, अंधश्रद्धा विषमता हे नष्ट करून समाजाला भटशाहीच्या जाचातून मुक्त करून समता मानवतेवर आधारित समाज निर्मिती करू इच्छित होती."सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा विधी "ही पुस्तिका जून 1887 मध्ये प्रकाशित झाली यामध्ये सत्यशोधक विवाह म्हणजे "मंगल रूप करारातील" विधींचे स्वरूप, पद्धती याविषयी मंगलाष्टकाच्या माध्यमातून गद्यरूपी प्रतिज्ञावजा वचने या स्वरूपाच्या तपशीलवार सूचना केलेल्या आहेत. त्याचबरोबर विधी संपन्न झाल्यानंतर दान धर्म करण्याच्याही सूचना दिलेल्या आढळतात. विवाह , वास्तुशांती, दशपिंड या विधीच्याही संदर्भात तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेच्या वेळी त्यांचे समकालीन दादोबा पांडुरंग यांनी स्थापन केलेली परमहंस सभा किंवा रानडे आणि भांडारकरांचे प्रार्थना समाज किंवा दयानंद सरस्वती यांचा आर्य समाज हे सुद्धा कार्यरत होते मात्र या सर्वांमधील मूलभूत फरक म्हणजे परमहंस सभा, प्रार्थना समाज किंवा आर्य समाज हे वेदकालीन आर्यांच्या धर्माचेच पुनरुज्जीवन करणारे ते पंथ होते तर सत्यशोधक समाज त्यांच्यापेक्षा संपूर्णतः वेगळा होता. ब्राह्मणी प्रभुत्वाला नष्ट करण्यासाठी तमाम शुद्रातीशूद्र बहुजनांची ब्राह्मणी गुलामीतून मुक्तता करण्यासाठी निर्माण झालेला होता. ब्राह्मण पुरोहित, त्यांचे विधी, कर्मकांड या सर्वाला झुगारून देत सत्यशोधक समाजाने स्वतःचे विधी आचार विचार पद्धती निर्माण केल्या होत्या. सत्यशोधक समाज हा मानवाला केंद्रस्थानी ठेवत होता. ही अशी मानवतावादी चळवळ होती जी जन्माधिष्टीत जाती व्यवस्था, जाचक ब्राह्मणी धार्मिक रुढी, कर्मकांड, अंधश्रद्धा विषमता हे नष्ट करून समाजाला भटशाहीच्या जाचातून मुक्त करून समता मानवतेवर आधारित समाज निर्मिती करू इच्छित होती.

सत्यशोधक समाजाच्या विधींमध्ये मानवतेचा, समाज उन्नतीचा विचार प्रकट होतो. प्रत्येक विधीच्या अखेरीस समाजातील जातीतील शुद्रातील शुद्रातील दरिद्री मुलामुलींना शिकवण्यासाठी समाज फंड फंडाची संकल्पना निर्माण केल्याची दिसते प्रत्येक कार्यक्रमाच्या नंतर जाण्यापूर्वी समाज फंड किंवा जात फंड ही संकल्पना निर्माण केली आहे दीनदुबळ्या लेखीभाळीस विपत्तीत सापडलेल्या भाऊबंदास अथवा सोयरा धायऱ्यास गौ प्रदान करून आपल्या जातीतील मुली मुलास विद्यादानासाठी सत्यशोधक फंडात सामर्थ्यानुरूप महा दक्षिणा द्यावी विधी झाल्यानंतर घरी जाण्यापूर्वी एकेक शिवराय फंडात घालावी असा आचार सांगितला आहे समाज उन्नती करता समाजाने आपला फंड उभारावा असा संदेश सत्यशोधक समाजाच्या विधींच्या मध्ये देण्यात आलेला आहे.

सत्यशोधक समाजाच्या भूमिके संदर्भात ज्योतिबा प्रस्तावनेत म्हणतात "जे काही मी माझ्या अल्पवृद्धीनुसार बुद्धीनुसार या ग्रंथात लिहिले आहे ्यात जी आमच्या मानव स्त्री पुरुष विद्वान व सुज्ञ वाचणाऱ्यांच्या ध्यानात व्यंगे दिसून येतील त्याविषयी त्यांनी क्षमा करून गुण देशाचा स्वीकार करावा अशी त्या सर्वच माझी विनंती आहे आणि जर करिता त्यांच्या अवलोकनात कोणताही भाग सार्वजनिक अयोग्य किंवा खोटा दिसला तो किंवा या ग्रंथाच्या धृढीकरणार्थ जर त्यास काही सत्य विचार सुचवणे असेल तर ते त्यांनी वर्तमानपत्राद्वारे आम्हास कळवावे म्हणजेच ते खरेच विचारी पुरुषाचे असल्यास आम्ही कृतज्ञतापूर्वक मान्य करून दुसऱ्या आवृत्तीत दाखल करू"म्हणजेच कोणताही धर्म म्हटला की त्या धर्माची एक चौकट, एक नियमावली आणि कठोर अशी शिक्षा आढळून येते किंवा" वेदम् वाक्यं प्रमाणम" या स्वरूपाचे नियम आपणास आढळतात. या ठिकाणी ज्योतिबा पुन्हा स्पष्टपणे वेगळे दिसतात. सत्यशोधक धर्म मांडताना ज्योतिबांनी त्यामध्ये दुरुस्त्यांचे प्रावधान केले आहे. कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीला या धर्मात जर काही त्रुटी आढळल्या, काही असत्य जाणवले तर प्रश्न विचारण्याची मुभा या धर्मामध्ये दिल्याचे आपल्याला आढळते आणि हे ज्योतिबांचे मोठेपण आहे हा धर्म मानव केंद्री धर्म आहे हे त्यामधून स्पष्ट होते.

ज्योतिबांनी पूजा, नामस्मरण, अनुष्ठान, स्वर्ग, जन्म, मृत्यू, विवाह, बारसे, धर्म जातीभेद, नीती ह्याचा बारकाईने विचार करून आचारविधी तयार केलेल्या आहेत. प्रत्येक शंकेचे विज्ञानवादी बुद्धीनिष्ठ आणि तर्कनिष्ठ विवेचन ते करतात. त्यांचा प्रखर विज्ञानवाद आणि धर्मचिकित्सेतेचा पिंड यातून उलगडतो. सार्वजनिक सत्यधर्माच्या मांडणीतून ज्योतिबांनी विज्ञानवादाची पायाभरणी केली. बुद्धिवाद बुद्धीनिष्ठता, तर्कनिष्ठता, कार्यकारणभावाचा शोध घेण्याची मानसिकता समाजात विकसित केली. आकाशातील ग्रह, क्षण जन्मरास ,जन्मपत्रिका याविषयीचे थोतांड उघडे केले. ज्योतिबांचे धर्मविषयक विचार "एज ऑफ रीजन" या थॉमस पेन, त्याचबरोबर संत कबीर आणि तथागत बुद्ध, बसवेश्वर यांच्या परंपरेशी नाळ जोडणारे, मानवता, समतावादी नीतीचा पुरस्कार करणारे आणि अनीतीला झोडपणारे आणि धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे आहे. 19 व्या शतकात अज्ञान अंधश्रद्धेच्या विरोधातला पहिला एल्गार सुद्धा ज्योतिबांनी पुकारलेला आहे . केवळ ब्राह्मणी व्यवस्थेवर हल्ले करून ते थांबले नाहीत तर प्रबोधनाचे प्रचंड कार्य त्यांनी केले. अज्ञान, आळशीपणा अस्वच्छता, लाचारी याविषयी फटके ओढले. शूद्र बहुजनांना जागे केले. ते म्हणतात

"मानवपदाची जरा लाज धरा विद्वान ती करा मुले मुली!!३९!!
गिर्वाणी शिकता कळीले तुम्हाला
आठवलं बोला माझ्या तुम्ही
ऐकू दिले नाही एकाही शब्दाला वेद बखरीला लपविले !!४१!!
द्विजकुट तुम्ही आणावे मैदानी आली ही पर्वणी ज्योती सांगे"!!४२!!

अठराव्या शतकामध्ये जातीसंस्थेविषयी, धर्म संस्थेविषयी स्त्री प्रश्नांविषयी मानवतावदावर विषयी मांडणी करणार्या क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाविषयी आपण हा परिसंवाद आयोजित केला आणि चौकटीच्या पलीकडे जाण्याची भूमिका घेतली त्यामुळे मी आपले मनःपूर्वक अभिनंदन करते आहे. कारण आपणही टिपिकल अकॅडमी चौकटी स्वतःभोवती निर्माण केलेल्या आहेत असं असं मी पाहते. 1848 हे वर्ष जगाच्या इतिहासात महत्त्वाचे असल्याचे दिसते याच वर्षी स्त्रियांच्या हक्काचा जाहीरनामा मांडण्यात आला यावर्षी मानवी हक्काचा

जाहीरनामा मांडण्यात आला आणि याच वर्षी कम्युनिस्ट मॅनेफेस्टो मांडण्यात आला. युरोपात या पद्धतीचे जाहीरनामे मांडले जात असताना 848 मध्ये ज्योतिबा फुले हे पहिली शाळा काढतात आणि कृती कार्यक्रम देतात आणि ह्या कृती कार्यक्रम देण्यामागे मानवी हक्क चळवळ प्रत्यक्ष कृती कार्यक्रमातून राबवताना दिसतात. एकोणिसाव्या शतकात स्त्रीच्या मानवी हक्काची मांडणी करणारा जगातला हा पहिला क्रांती मानव आहे त्यांनी सार्वजनिक सत्य धर्मात प्रत्येक ठिकाणी एकंदर स्त्री आणि पुरुष असा स्त्रीचा एक व्यक्ती म्हणून स्वतंत्र उल्लेख केला आहे ज्योतिबांच्या पूर्वी कोणीही याप्रमाणे स्पष्ट शब्दात स्त्रीचा मानवी असण्याचा स्वतंत्र उल्लेख केलेला व तिला तसा दर्जा दिलेला आढळत नाही ब्राह्मणी मानसिकता आजही स्त्रीला दुय्यम ठरवून "अर्धांगिनी" मानते हे ज्योतिबाचे वेगळेपण आणि मोठेपण आहे .ते म्हणतात "स्त्री आणि पुरुष एकसारखे एकंदर सर्व मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र असता स्त्रियांस एकतरेचा नियम लागू करणे व लोभी पुरुषांना पुरुषास दुसरा नियम लागू करणे हा निव्वळ पक्षपात आहे "ज्योतिबांच्या समकालीन सुधारकांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा आहे ती अवला आहे तिची सुटका संकटातून सुटका केली पाहिजे असा आहे स्त्रीला शिक्षण देण्याचे समर्थन करण्यामागे हाच दृष्टिकोन दिसून येतो प्रत्येक सुधारक आपापल्या जात वर्णातील स्त्रीचे कौटुंबिक प्रश्न सोडविण्यात पुढाकार घेताना आढळून येतो ज्योतिबा मात्र स्त्रीकडे ती एक मानव आहे केवळ स्त्री नव्हे तसेच ती जन्मदात्री असल्याने पुरुषाहून श्रेष्ठ आहे आणि एक मानव म्हणूनही तिलाही पुरुषाप्रमाणे जे मानवी हक्क आहेत ते मिळाले मिळायलाच हवेत या जाणिवेतून तिच्या हक्काचा लढा ते लढत होते स्त्रीला शिक्षित करण्यामागे त्यांचा हा दृष्टिकोन आढळून येतो. स्त्रिया शिक्षित झाल्या म्हणजे त्या शोषक व्यवस्थेची, शोषकांची फटफजिती करू नये रेवडी रेवडी करून सोडतील असे स्वप्न त्यांनी पाहिले होते. एक व्यक्ती म्हणून असते ताराबाई शिंदे पंडिता रमाबाईंच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे आढळतात ज्योतिबांच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात नितळ पारदर्शकता आढळते.

असे क्रांतिकारी मानवतावादी विचार, असे व्यक्तिमत्व, अशी वैचारिक भूमिका असणाऱ्या ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची निर्मिती केली. सत्यशोधक समाजाची प्रतिज्ञा, नियमावली यातून त्यांचा परिवर्तनवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो सत्यशोधक समाजाच्या नियमावलीमध्ये 1 - शूद्रातीशुद्राच्या भीषण परिस्थितीमध्ये सुधारणा करणे. त्यांच्या दास्य मुक्तीसाठी लढा देणे अभिप्रेत होते. 5 व 6 व्या नियमामध्ये सर्व जाती-धर्माच्या लोकांना समाजाचे सदस्यत्व खुले करण्यात आले आहे. नवव्या नियमाने "सभासदांना व्यक्तिगत सामाजिक आणि धार्मिक जीवनासंबंधी बांधील बनवणाऱ्या शपथ देण्यात आलेल्या आहेत या मध्ये लहान लहान बाबींचा अंतर्भाव आहे उदाहरणार्थ -

1. निर्मिका शिवाय कोणत्याही देवतेची पूजा करणार नाही
2. निर्मिकाने सर्व मानवेतरांना दिलेल्या मानवी हक्कांना बाधा आणणार नाही
3. प्राणी हत्या करण्यामध्ये सहभाग घेणार नाही प्राणी हत्येपासून इतरांना दूर ठेवण्याचा शक्यतो प्रयत्न करीन तसेच दारूचे व्यसन करणार नाही
4. सत्यावर अटळनिष्ठा ठेवून वृद्ध अपंग व लहान मुलांना मदत करीन मुलांच्या शिक्षण प्रसारसाठी कार्यरत राहील अधिकाधिक मुलींच्या शिक्षणासाठी समाज जागृती करेन .या चार शपथा सत्यशोधक समाजाच्या सभासदांना बंधनकारक होत्या.

दहाव्या नियमानुसार सभासदांनी आपली एक दिवसाची कमाई वार्षिक वर्गणी म्हणून संघटनेस द्यावी. बाराव्या नियमानुसार संघटनेतील निर्णय प्रक्रिया लोकशाही बहुमतावर आधारलेली असेल. तेविसाव्या नियमानुसार संघटनेचे ध्येय आणि उद्दिष्टांची चर्चा करण्यात आलेली होती. त्यामध्ये सत्य आणि विवेक निष्ठेचा प्रसार वर्तमानपत्रे, व्याख्याने देऊन प्रचार करणे याची नोंद करण्यात आलेली आहे. एकूण 28 नियमांची नियमावली करून ज्योतिबांनी सत्यशोधक समाजाची बांधणी मजबूत केलेली होती. सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व सर्व जाती-धर्मा वर्गातील स्त्री-पुरुषांना खुले होते. सत्यशोधक समाजाची आचारसंहिता ही देखील अत्यंत महत्त्वाची आणि अभ्यासण्यासारखी आहे.

आजच्या काळामध्ये ही आचारसंहिता आपण प्रत्यक्षात आचरणात आणतो किंवा नाही हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या काळात सत्यशोधक समाज गतिमान करण्यासाठी वृत्तपत्र, ग्रंथ लिखाण, प्रकाशन व्याख्याने या स्वरूपाची साधने वापरली गेली होती. ज्योतिबांचे नेतृत्व विचारवंत तत्वज्ञ कार्यकर्ता असे धाडसी व चिकाटी वृत्तीचे होते. ब्राह्मणी शोषणाविरुद्ध त्यांनी लढा निर्माण केला उभा केला. सामाजिक क्रांती उभे केले. त्या पद्धतीचे कार्यकर्त्यांचे मोहोळ उभे केले. कृष्णराव भालेकर, दिनामित्रकार मुकुंदराव पाटील, गणपतराव पाटील यांनी ही चळवळ निष्ठेने पुढे नेली. सावित्रीबाई फुले, शास्त्री नाना, महागट, कृष्णाजी ससाने, गोविंद गणपत काळे अशा कार्यकर्त्यांनी ही चळवळ जिवंत ठेवली होती. सत्यशोधक समाजाकडे प्रबोधनाचे स्वतःचे साहित्य होते. जलसा करणारी मंडळी, सत्यशोधक शाहिरी, कलापथके, वर्तमानपत्रे या माध्यमातून ही चळवळ पुढे नेण्यात आली होती.

शिक्षणाचा प्रसार, जलसे परिषदांचे आयोजन, अधिवेशन या स्वरूपाची कार्यप्रणाली होती. सत्यशोधक समाजाने शेतकऱ्यांशी, समाजातील कनिष्ठ वर्गीयांशी, स्त्री समूहाची जोडून घेतले होते. समान विचारांच्या व्यक्तींचा सन्मान केला होता. नैसर्गिक आपत्तीमध्ये समाजाला सहाय्य केले होते उदाहरणार्थ. दुष्काळ, प्लेगची साथ.सत्यशोधकांनी समाजाला वेगळा विचार आणि समर्थ नेतृत्व दिले स्त्री शूद्रांना समान अधिकार पटवून दिला आणि मानवी स्वातंत्र्याकडे नेणारा विचार दिला.

ज्योतिबांचे साहित्य कार्याची नियोजन लोकशाही पद्धतीने यामुळे चळवळ पुढे गेली सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे ज्योतिबा फुले यांचा आणि नारायण मेघाजी लोखंडे कृष्णाराव भालेकर यांचा कालखंड सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रबोधनाचा कालखंड, शाहू महाराजांच्या पाठिंबाचा प्रवाहाचा कालखंड, ब्राह्मणेतर चळवळीचा कालखंड आणि 1930 नंतर सत्यशोधक चळवळ असे कालखंड करता येतात.निबंधमाला ,वकृत्वमाला आयोजित करणे. वस्तीगृह, शिष्यवृत्ती देणे या पद्धतीचे कार्य सत्यशोधक समाज करीत होता. सत्यशोधकाच्या कार्यामागे संकुचित, जातकेंद्रि भावना नव्हती.

सद्यःस्थिती :

ज्योतिबांच्या नंतर सावित्रीबाई फुले आणि सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी निष्ठेने सत्यशोधक समाजाची चळवळ पुढे नेली मात्र राजश्री शाहू शाहूंच्या पाठिंबा गेल्यामुळे सत्यशोधक समाज क्षीण झाल्याचे आढळून येते . नंतरच्या काळात सत्यशोधक चळवळ आणि ब्राह्मणेतर चळवळ असे शकले पडत गेले .त्यापुढील काळात जोतिबांच्या काळात असलेली निष्ठावंत विज्ञानवादी क्रांतीकारक कार्यकर्त्यांची फौज क्षीण होत गेली म्हणून आज सत्यशोधक समाज वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये, काही भागांमध्ये, काही संघटनांच्या स्वरूपात विद्यार्थी संघटना, स्त्री संघटना कार्यरत असल्याचे आढळते.

वर्तमान काळात जागतिकीकरण खाजगीकरण उदारीकरण यामुळे शोषित असलेल्या समाज घटकाच्या शोषणाची प्रक्रिया गतिमान झालेली दिसते. स्त्रिया दलित शूद्र बहुजन यांचे मानवी हक्क धोक्यात आलेले दिसतात. अन्याय अत्याचाराच्या घटना नित्याच्या आणि सार्वत्रिक दिसतात त्यांचे स्वरूप, तीव्रता वाढते आहे. जातीय अन्याय अत्याचार वाढलेले आहे, यावेळी तळागाळापर्यंत रुजलेली ही चळवळ सक्रिय दिसत नाही. मानवी जीवनाच्या प्रत्येक स्तरांमध्ये आणि प्रत्येक क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय अनेक आव्हाने आक्रमण करीत असताना तळागाळापर्यंत पोहोचलेली बहुजन शेतकरी स्त्रिया दलित वंचित आदिवासी यांची ही चळवळ आज थंडावलेली दिसते आहे. भटशाही प्रभावी आणि आक्रमक झालेली आहे. ज्योतिबांनी दिलेल्या विद्रोही विचाराचा वारसा सक्षमपणे पुढे नेला जाताना दिसत नाही लोकशाही आणि लोकशाहीची मूल्ये धोक्यात आलेली आहेत. सर्व पातळीवर मूल्यांचे अध:पतन होताना दिसत आहे. याप्रसंगी सत्यशोधक समाजाची चळवळ गतिमान होणे गरजेचे आहे.

वास्तव :

संघटनेत प्रभावी कार्य करण्यासाठी असलेली संघटनेची चौकट खिळखिळी झालेली दिसते सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांचे विघटन झाले असून विविध राजकीय पक्ष संघटनांमध्ये ते विलीन झाले. राजकीय आणि वैयक्तिक स्वार्थ प्रभावी बनला आहे. सत्यशोधक समाजाकडे पुरेसा आर्थिक निधी आढळत नाही. आर्थिक निधीअभावी दीर्घ मुदतीचे, बांधिलकीचे कार्यक्रम ज्योतिबांच्यानंतर राबवले जाताना दिसून येत नाही याचे कारण ज्योतिबांनी सांगितलेली जात फंड किंवा समाज फंडाची महा दक्षिणेची जी कार्यप्रणाली होती ती प्रत्यक्षात पुढे रुजविल्या गेल्याचे आढळत नाही. सद्यस्थितीत योग्य, सक्षम, दिशा देणाऱ्या नेतृत्वाचा अभाव, ध्येयवादाचा अभाव.

योगदान :

ब्राह्मणेतर चळवळीचे जातीअंताच्या चळवळीचे नेतृत्व केले. धर्ममार्तंडांच्या गुलामगिरीतून सर्वसामान्य माणसाला मुक्त करणारा विचार दिला. क्रांतीकारी विचारांची शिदोरी दिली .खरेतर सर्व परिवर्तनवादी चळवळींचा आधार सत्यशोधक समाजाची ज्योतिबांची चळवळ आहे. महाराष्ट्राला पुरोगामी चेहरा व्यक्तिमत्व देण्याचे श्रेय सत्यशोधक समाजाचे आहे. एकूणच वर्तमान समाजात सर्वसामान्य व्यक्तींचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्व पातळयांवर असंख्य प्रश्नांची मोहोळ उभे राहिलेले आहे. यावेळी ज्योतिबा फुले यांचा जातीपातीच्या पलीकडे जाणारा आणि मानवाला केंद्रस्थानी ठेवणारा सत्यशोधक समाजाचा विचार घेऊन निष्ठेने वैयक्तिक जीवनात आचरणात आणणाऱ्या कार्यकर्त्यांची फौज उभे राहणे गरजेचे आहे .वैयक्तिक स्वार्थासाठी बोटचेपेपण करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे सत्यशोधक समाज क्षीण झालेला आहे. ज्योतिबांनी शाळा काढली त्याला 175 वर्षे होत असताना नवीन शैक्षणिक धोरणाच्या द्वारे शाळांना टाळे लावले जात आहेत शिक्षणाचे सावित्रीकरण होण्याची गरज असताना शिक्षण आणि शिक्षक धोक्यात आलेला आहे एक नवी गुलामी समोर उभी आहे अशा परिस्थितीत ज्योतिबांचा क्रांतिकारक विचार आजच्या सर्व प्रश्नांचे उत्तर ठरू शकतो. मला परीसंवादात मत मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मराठी समाजशास्त्र परिषदेचे पुनश्च ऋण करून व्यक्त करते आणि थांबते.

धन्यवाद!

*शिवाजी कॉलेज, कन्नड, छत्रपती संभाजीनगर.

***

नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : उपयोजन, समस्या आणि आव्हाने

*प्रा.डॉ.नारायण तु. कांबळे,

प्रस्तावना :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित नवसमाजाची उभारणी करण्यासाठी त्यातल्या त्यात समाजपरिवर्तन आणि विकासाची निकड ओळखून "उच्च शिक्षण" या घटकाला विशेष महत्त्व दिले गेले. व्यक्ती, समाज आणि राष्ट्रांच्या विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. शिक्षणातून ' अर्थार्जनासाठी' नोकरी किंवा व्यवसाय करण्याचे पुरेसे ज्ञान व प्रशिक्षण मिळावे अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. परंतु, प्रचलित शिक्षणव्यवस्थेतील कालबाह्य ठरलेल्या अभ्यासक्रमाचे ज्ञान घेऊन 'अर्थार्जन' करण्याइतकेही ज्ञान आणि कौशल्ये मिळत नाही पर्यायाने, अशा अभ्यासक्रमातून नोकरी, रोजगार किंवा व्यवसाय करण्यासाठी उपयोगी पडणारे शिक्षण मिळत नसल्याची उच्चशिक्षितांची व्यथा आहे. अशा शिक्षणातून व्यक्तीचा, समाजाचा आणि राष्ट्राचा विकास खुंटतो. त्यासाठी ज्ञान, मूल्ये व कौशल्ये वृध्दिंगत करणारे व व्यवहारोपयोगी शिक्षण देणे काळाची गरज बनली आहे. 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' मध्ये समग्र व बहुविद्याशाखीय शिक्षणास प्राधान्य देत विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे, मानव्यविद्याशाखा आणि व्यावसायिक विषयातील अभ्यासक्रम एकाच छताखाली विद्यार्थ्यांना शिकविण्याचे ठरविले आहे. त्यासोबतच, विद्याशाखांची सीमारेषा ओलांडून आंतरविद्याशाखीय व बहूविद्याशाखीय संशोधन करण्यास प्राधान्य दिले आहे.

उद्धेश:

१. राष्ट्रीय शिक्षण धोरणातील २०२० तरतुदीचा अभ्यास करणे.
२. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० उपयोजनाचा अभ्यास करणे.
३. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील समस्या आणि आव्हाने याचा अभ्यास करणे.

अभ्यासपद्धती : प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रामुख्याने उपलब्ध दुय्यम सामग्रीचा उपयोग केला आहे. विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेख, मराठी भाषेतील विविध नियतकालिके तसेच सेमिनार व शैक्षणिक परिषदातील सहभाग याचा या शोधनिबंधासाठी उपयोग झाला आहे. प्रचलित शिक्षणातील विद्याशाखा व विषयांची बंदिस्त व साचेबध्द चौकट मोडून विविध ज्ञानशाखांत एकता आणि अखंडता आणण्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचे सुचविले आहे. परिणामी, विविध विद्याशाखांच्या विषयातील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना त्याच्या आवडीनुसार निवडता येतील. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी गठित विविध आयोग व समित्यांनीही अभ्यासक्रमाची कालसुसंगत पुनर्रचना करण्याची व विद्यार्थीकेंद्रित प्रभावी अध्यापन पध्दती विकसित करण्याची शिफारस केली आहे. धोरणाने उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याचा, त्यातून बाहेर पडण्याचा आणि परत प्रवेश घेण्याचा विकल्प (Multiple Entry and Multiple Exit Option) आणि शैक्षणिक गुणपेढी (Academic Bank Credit) स्थापन करण्याचे निश्चित केले आहे. शिक्षण धोरणात अंतर्भूत बहूविद्याशाखीय शिक्षणाची परिणामकारक व प्रभावी अंमलबजावणी करण्यातील समस्या व आव्हाने आणि त्यावरील उपायांची विस्तृत चर्चा करणे महत्वाचे आहे.

शिक्षण धोरणातील तरतुदी (Provisions in Education Policy)

शिक्षण धोरणाने संशोधन विद्यापीठे, अध्यापन विद्यापीठे आणि स्वायत महाविद्यालये असे उच शिक्षणसंस्थांचे तीन गटांत वर्गीकरण केले असून त्यामध्ये बहुविद्याशाखीय शिक्षण देण्याचे सुचविले आहे. धोरणाने मुख्यत: तीन शिफारशी केल्या आहेत: एक, सध्या अस्तित्वात असलेली विद्यापीठे आणि महाविद्यालये बहुविद्याशाखीय उच्च शिक्षणसंस्थांत रुपांतरित करणे, दोन, जागतिक दर्जाची आयआयटी/आयआयएमच्या धरतीवर मॉडेल बहूविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे स्थापन करणे आणि तीन, उच्च शिक्षणसमुह (Higher Education Clusters)/ Knowledge Hubs/ बहूविद्याशाखीय विद्यापीठे स्थापन करणे. धोरणाने सर्व उच्च शिक्षणसंस्था २०४० पर्यंत बहुविद्याशाखीय करण्याचे सुचविले आहे. २०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा जवळपास एक मॉडेल बहुविद्याशाखीय उच्च शिक्षणसंस्था स्थापन करण्याचे नियोजित आहे. विविध विद्याशाखा आणि विषयांची साचेबध्द चौकट मोडुन विद्यार्थ्यांना मानव्यविद्या, विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाणिज्य, इंजिनिअरिंग आणि गणित (Science, Technology, Engineering and Mathematics-STEM) यासोबत घालून शिक्षण देण्याचे ठरविले आहे.

या धोरणाने उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची, मध्येच अभ्यासक्रमातून बाहेर पडण्याची आणि पुन्हा प्रवेश घेण्याची (Multiple Entry and Multiple Exit) मुभा दिली आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमाची रचना बहूविद्याशाखीय करून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम निवडीचे स्वातंत्र्य असेल. विज्ञान शाखेतील विद्यार्थी कला किंवा वाणिज्य शाखेतील विषयाची निवड करु शकतील. त्याचप्रमाणे कला शाखेतील विद्यार्थी विज्ञान किंवा वाणिज्य शाखेतील त्यांच्या आवडीचा विषय अभ्यासू शकतील. धोरणाने अभ्याक्रमाची पुनर्रचना व अध्यापन पध्दतील नावीन्यपूर्ण बदल करण्यासाठी शिक्षकांना व संस्थांना स्वायत्तता दिली आहे. अध्यापनात वाद-विवाद, संशोधन आणि आंतरविद्याशाखीय विचारास अधिक प्राधान्य देण्याचे सुचविले आहे. समग्र आणि बहुविद्याशाखीय शिक्षणाचे उदिष्ट साध्य करण्यासाठी सर्व उच्च शिक्षणसंस्थामध्ये लवचीक, सर्वसमावेशक आणि नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम तयार करण्याची धोरणाची योजना आहे. विद्यार्थ्यांना मुख्य विषयासोबत कौशल्य, पर्यावरणीय शिक्षण, मूल्ये शिक्षण, सामुदायिक बांधिलकी इत्यादी विषयाचा अभ्यास व त्यावरील प्रबंधाचा अंतर्भाव करण्याचे निश्चित केले आहे. 'पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दतीला' (Choice Based Credit System) प्राधान्य दिल्याने विद्यार्थ्यांना मुख्य विषयासोबत 'किमान कौशल्ये' (Soft Skills) शिकविण्यावर भर असेल. तसेच भारतीय संगीत, कला, इतिहास, संस्कृती, योगा, औषधनिर्माण इत्यादी विषयांतील अभ्यासक्रमातून रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी विकसित करण्याचे ध्येय ठेवले आहे. समग्र शिक्षणाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान प्राप्त करण्यासाठी स्थानिक उद्योगधंदे, व्यवसाय, कलाकार, शिल्पकला इ. तसेच शिक्षक आणि संशोधकासोबत संशोधन इंटर्नशिप उपलब्ध करण्याची योजना आखली आहे.

या धोरणानुसार देशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाची रचना बहुविद्याशाखीय करण्यात येणार असून विद्यार्थ्यांची प्रगती 'क्रेडीट' मधे मोजली जाणार आहे. पारंपरिक तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम तीन किंवा चार वर्षाचा करण्यात येणार असून, एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास 'प्रमाणपत्र' (Certificate), दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास 'पदविका' (Diploma), तीन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास 'पदवी' (Degree) आणि चार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास 'संशोधनासहित पदवी' (Degree with Research) दिली जाईल. तीन वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमानंतर दोन वर्षे तर चार वर्षाच्या 'संशोधनासहित पदवी नंतर' एक वर्ष अभ्यासक्रम पूर्ण केल्यास 'पदव्युत्तर पदवी' (Post-Graduation Degree) दिली जाईल. चार वर्षाच्या संशोधनासहित पदवी किंवा पदव्युतर पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना थेट पीएचडी ला प्रवेश घेता येईल. एकाच वेळी विद्यार्थ्यांना दुसरीही पदवी घेण्याची मुभा धोरणाने दिली आहे. या नवीन शिक्षणपध्दतीत 'शैक्षणिक गुणपेढी' (Academic Bank Credit) स्थापन केली जाणार असून इतर शिक्षणसंस्थेतून मिळविलेले क्रेडीट्स 'शैक्षणिक गुणपेढीमध्ये' जमा करण्याची योजना आहे. काही कारणाने शिक्षण मध्येच सोडावे लागले आणि एक/दोन वर्षानंतर पुढे शिकायचे असेल तर शैक्षणिक गुणपेठीत आधी जमा झालेली क्रेडीट्स मोजता येतील. ही सुविधा फक्त सात वर्षासाठीच असेल. या पध्दतीत विद्यार्थ्यांना त्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाशिवायही त्यांच्या आवडीचे विषय इतर शिक्षणसंस्थांतुन शिकता येतील. त्या उच्च शिक्षणसंस्थांतून मिळविलेले क्रेडीट्स पदवीसाठी ग्राह्य धरून एकत्रित गुणांच्या आधारे त्यांना पदवी देण्यात येईल. या धोरणाने शिक्षकांना विद्यार्थीकेंद्रित अध्यापनासाठी विविध अध्यापन पध्दती विकसित करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याबरोबरच त्यांचे मार्गदर्शक म्हणून काम करण्यावरही भर आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव लक्षात घेता शिक्षकांनी अध्यापनात तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे सुचविले आहे. त्यासाठी शिक्षकांना तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यास अधिक महत्त्व दिले आहे. अध्यापनात विद्यार्थ्यांना विषयाची रूची निर्माण करून त्यांचा प्रत्यक्ष सहभाग वाढविण्यासही धोरणाने प्राधान्य दिले आहे.

समस्या आणि आव्हाने (Issues and Challenges) : एकाच विद्याशाखेतील विषय घेऊन करावे लागणारे अध्यपन, काळाशी व प्रत्यक्ष समाज व्यवहाराशी सुसंगत नसलेले अभ्यासक्रम आणि एकमार्गी अध्यापन पध्दती, महाविद्यालये मोठया प्रमाणात विद्यापीठांशी संलग्नित असणे, शिक्षणसंस्था खाजगी व विनाअनुदानावर देण्याचे धोरण, सरकारची आर्थिक गुंतवणूक करण्याची उदासीन मानसिकता, अभ्यासक्रमाची बंदिस्त व साचेबध्द रचना, इतर विद्याशाखातील विषय निवडण्याची नसलेली मुभा इत्यादी समस्या भारतीच उच्च शिक्षणव्यवस्थेपुढे आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणात बहुविद्याशाखीय शिक्षणाचा प्रयोग राबविण्यासाठी एका विद्याशाखेची महाविद्यालये बंद करणे, कमी विद्यार्थीसंख्या असलेली महाविद्यालये इतरत्र विलीन करणे, पदवीचा अभ्यासक्रम तीन किंवा चार वर्षाचा करण्याचा विकल्प निवडणे, कला विद्याशाखेतील महाविद्यालयात व्यावसायिक आणि तांत्रिक विषय सुरु करणे, अध्यापन आणि संशोधन अशी दोन वेगवेगळ्या प्रकारची विद्यापीठे स्थापन करणे, इत्यादी उपाय सुचविले आहेत. बहुविद्याशाखीय शिक्षण प्रत्यक्ष अंमलात आणण्यात काही

महाविद्यालये इतरत्र विलीन झाल्याने त्या भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न, महाविद्यालयात बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाचे नवीन विषय कायम विनाअनुदानावर देण्याचे धोरण, त्यासाठी आर्थिक निधी उपलब्ध न करण्याची शासनाची मानसिकता, चार वर्षांची पदवी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शिक्षणावर वाढलेला ख्रर्च, पदव्युतर शिक्षण विद्यापीठात तर पदवी शिक्षण महाविद्यालयात, रोजगारासाठी शिकविल्या जाणाऱ्या कौशल्यांच्या नावाखाली मानवी मूल्यांचा विसर पडू न देणे इत्यादी आव्हाने आहेत. वरील समस्यांचे निराकरण करुन बहुविद्याशाखीय शिक्षणाची अंमलबजावणी केल्यास त्याचे अनुकूल परिणाम शिक्षणक्षेत्रात होतील. तथापि, उच्च शिक्षणव्यवस्थेत सध्या कोणत्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

उपाययोजना (Remedies) : भारतीय उच्च शिक्षणसंस्थांमध्ये बहुविद्याशाखीय शिक्षणची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी धोरणात सुचविलेली एक विद्याशाखा व ३००० पेक्षा कमी प्रवेश प्रमाण असलेली महाविद्यालये बंद न करणे, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा जवळपास एक मॉडेल बहूविद्याशाखीय उच्च शिक्षणसंस्था व आयआयटी/आयआयएमच्या धर्तीवर मॉडेल बहुविद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे स्थापन करण्यासाठी आर्थिक निधीची तातडीने तरतुद करणे (ही तरतुद फक्त कागदोपत्री राहता कामा नये) व अशा उच्च शिक्षणसंस्था निर्माण करणे, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित समूहांचे वास्तव्य असलेल्या शैक्षणिक मागास भागात बहुविद्याशाखेचे शिक्षण देणाऱ्या सार्वजनिक संस्था निर्माण करणे, सरकारी महाविद्यालये, सामाजिक राज्य/केंद्रीय विद्यापीठांचा विस्तार करुन त्यात बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम सुरु करणे, पायाभूत सुविधा आणि क्षमता असलेल्या उच्च शिक्षणसंस्थांना बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम सुरुवात करण्यास प्रोत्साहन देणे, त्यांना नवीन रोजगाराभिमुख व्यावसायिक अभ्यासक्रम अनुदान तत्त्वावर सुरु करण्यास मान्यता देणे, त्यांना आर्थिक निधी देणे, महाविद्यालयात पदवी, पदव्युतर आणि पीएच.डी. अभ्यासक्रम चालविणे, त्या त्या भागातील समाजाच्या निकडीच्या गरजावर भर देणे, विद्यार्थ्यांची मागणी आणि पुरवठा, उद्योगासाठी लागणारे मनुष्यबळ इत्यादींच्या आधारे उच्च शिक्षणसंस्थांमध्ये नवीन विषय अनुदानित तत्त्वावर सुरुवात करण्यास व ते शिकविण्यासाठी शिक्षक पदास मान्यता देणे काळाची गरज आहे. बहुविद्याशाखेतील अभ्यासक्रमात कौशल्य, संविधानिक मुल्ये, स्वातंत्र्य, समता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि धर्मनिरपेक्षता, प्रादेशिक विषयांपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावरचे विषय, कला, मानव्यविद्या, मूलभूत विज्ञान, सामाजिक शास्त्रे, व्यावसायिक व तंत्रशिक्षण, कृषी व लघुउद्योग इत्यादींचा अंतर्भाव करणे, आरोग्य, फार्मा कंपनी, आयटी क्षेत्र इत्यादी क्षेत्रांमध्ये लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे, पदवीच्या तिसऱ्या वर्षात इंटर्नशिप, प्रात्यक्षिके, संशोधन, उद्योगातील प्रशिक्षण इत्यादींच्या माध्यमातून व्यावहारिक ज्ञान देण्यास प्राधान्य देणे, पदव्युत्तर अभ्यासक्रमात संशोधन व इंटर्नशिपवर अधिक प्राध्यान्य, पोस्ट डॉक्टरल संशोधन स्कॉलरशिप व फेलोशिप देऊन विद्यार्थ्यांना संशोधनास प्रोत्साहित करणे व सर्व मागास समाजघटकांतील विद्यार्थ्यांना सक्तीचे, मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची सांविधानिक जबाबदारी निभावणे, ही २१ व्या शतकातील ज्ञानाधिष्ठित समाजाची (Knowledge Society) गरज आहे. त्या दिशेने बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाची रचना करुन ते प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे.

संदर्भ : १) धनागरे, द.ना.२०१०. उच्च शिक्षण: ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे.मुंबई:लोकवाङ्य गृह

२) कांबळे, नारायण.२०१३.उच्च शिक्षणापुढील आव्हाने.औरंगाबाद:चिन्मय प्रकाशन.

३) एरंडे,व्ही. एल.२०१७.उच्च शिक्षणातील बदल:वास्तव आणि अपेक्षा. पुणे:हार्मीस प्रकाशन.

४) रणसुभे, विलास (संपा) २००५. शिक्षण. मुंबई:लोकवाङ्मयगृह प्रकाशन.

५) पानसे, सुधीर. २००६. खाजगी विद्यापीठ आणि उच्च शिक्षणाचे भवितव्य. मुंबई : लोकवाङ्मयगृह

६) मोरे,डी.एन.२०२३.उच्च शिक्षण धोरण:आव्हाने आणि दिशा. पुणे : युनिक अकॅडमी पब्लिकेशन.

७) पटनाईक, प्रभात.२०११.उच्च शिक्षण:दोन दृष्टीकोन, उच्च शिक्षणाचा मासळी बाजार (अनुवादित) नारकर, उदय. कोल्हापूर : श्रमिक प्रतिष्ठान.

८) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०. शिक्षण मंत्रालय. भारत सरकार. ९) बिर्ला अंबानी अहवाल (उच्च शिक्षण) २०००.

*समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद, जिल्हा. लातूर email: ntkamble1211968@gmail.com

***

प्रसार माध्यमे आणि वाढती गुन्हेगारी यांचा सहसंबंध सामाजिक पर्यावरणातील बिघाड

*डॉ ज्योती सुहास गगनग्रास

प्रस्तावना :

समाजातील वाढते गुन्हेगारी व प्रसार माध्यमे यांचा सहसंबंध आहे ? का प्रसार माध्यमांमुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढते का? आणि त्यामुळे सामाजिक पर्यावरणात बिघाड निर्माण होतो? का हे पाहणे महत्त्वाचे आहे विशेषतः आज ओटीटी, वेब मालिकांचे होणारे प्रक्षेपण आणि अजानत्या वयातील मुलांच्या हातात सहज उपलब्ध होणाऱ्या मोबाईल, इंटरनेट याचा परिणाम या मुलांवर कशा पद्धतीने होतो आहे हे पाहणे गरजेचे आहे अजून त्या वयात गुन्हेगारी कृत्य घडत आहेत परदेशी व आपल्या देशातही त्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे वेब मालिका खरंचच समाजातील या पर्यावरणात बिघाड निर्माण करतात का? आणि याचा सहसंबंध आहे का? हे पाहणे गरजेचे आहे अजानत्या वयातील मुलांमध्ये खुंनशी, दुसऱ्यांचे नुकसान करणे, आकस निर्माण होणे मत्सर द्वेष आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळवण्यासाठी वाटेल ते करण्याची मानसिकता दिसून येते व गुन्हेगारीचे प्रवृत्ती वाढते याचा अभ्यास या शोधनिबंधात करण्यात आला आहे की गुन्हेगारी, वेब मालिका अजाणतेपण,मानसिकतासमाजामध्ये आजूबाजूला अल्पवयीन मुलांच्याकडून वाढणारे गुन्हे व गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या तर थरकाप होतो गेले काही दिवस अल्पवयीन मुलांकडून घडलेल्या गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झालेली दिसते त्यांच्या हाती असलेले मोबाईल व त्यावर अति सहज उपलब्ध होणारे व्हिडिओ, पालकांचे कार्यबाहुल्यामुळे आपल्या पाल्याकडे होणारी दुर्लक्ष तसेच इतर हिंसक गुन्हेगारी विश्वाशी संबंधित असणाऱ्या वेब सिरीज यासारख्या गोष्टींमुळे अल्पवयीन मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होऊ लागला आहे त्यामुळे ही मुले गुन्ह्यांच्या विळख्यात सापडू लागली आहेत असे तज्ञांचे मत आहे.

अत्यंत किरकोळ कारणावरून हिंसेची तसेच सूड घेण्याची वृत्ती, अल्पवयीन मुलांमध्ये आढळून येते समवयस्कांच्या बद्दल मत्सर, द्वेष याची बरीच कारणे असलेली दिसतात मानसोपचार तज्ञांनी देखील या घटनांची गंभीर दखल घ्या असा इशारा दिलेला आहे आज या वेगवेगळ्या घटनांमध्ये पोलीस तपास सुरू आहेत व त्याची कारणे ऐकता अत्यंत किरकोळ कारणांवरून अशा प्रकारचे अत्याचार झाल्याच्या घटना दिसून येतात केवळ लैंगिक अत्याचारच नाही तर हिंसाचाराच्या घटनाही दिसून येतात पोलीस सदरच्या विद्यार्थ्यांवर मुलांवर गुन्हा नोंदवताना दिसून येतात पण ही मुले अल्पवयीन असल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल होऊ शकत नाही त्यांना बालसुधारगृहामध्ये पाठवले जाते आज कोविड मधून व त्यातून होणाऱ्या लोकडाऊन मधून आपण सगळेजण बाहेर येत आहोत या लॉकडाऊन मध्ये घरातच असलेल्या अल्पवयीन मुलांकडे अधिक इंटरनेटचा वापर ओटीटी वेबसेरीज पाहणे यामुळे ही गुन्ह्यात वाढ झाली आहे व तो चिंतेचा विषय होऊन बसलेला दिसून येतो. किरकोळ गुन्हेयांचा विचार करता साधारणपणे एक ते तीन आठवड्यामध्ये या मुलांना जामीन मिळतो तर गंभीर गुन्ह्यांमध्ये त्यांना निरीक्षण गृहात किंवा बाल सुधार गृह मध्ये पाठवले जाते त्यामुळे या गुन्ह्यांचे प्रमाणही वाढताना दिसून येते. आज वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये अडकलेल्या मुलांकडे पाहिले तर त्यामध्ये झोपडपट्टीतील मुलांचे प्रमाण खूप अधिक असलेले दिसून येते.

उद्दिष्टे :

- अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी वाढत आहे का ते तपासणे
- अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारीमुळे समाजमाध्यमांचा परिणाम होत आहे का ?
- अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी वाढण्याची करणे कोणती ?

- अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारी साठी शिक्षेची तरतूद काय आहे

संशोधन पद्धती : सदरच्या संशोधनासाठी दुय्यम संशोधन स्रोतांचा वापर केला असून इंटरनेट वरील साईट, पुस्तके, वृत्तप्रत्रातील लेख याचा वापर करण्यात आलेला आहे .

कारणे आणि उपाययोजना :

अल्पवयीन मुलांचे गुन्हेगारी हा आता सामाजिक प्रश्न बनू लागला आहे मात्र तो सोईस्कर रित्या पोलिसांच्या कडे देऊन समाजातील हात झटकण्याची तयारी केलेली दिसते आज बदलती लाईफ स्टाईल, अत्यंत महागडे मोबाईल व त्याचे असणारे आकर्षण अगदी लहान वयामध्ये मुलांच्या हातामध्ये वाहन देणे अशा अनेक कारणांचा असतो मुले गुन्हेगारीकडे वळतात.

लहान लहान वयामध्ये मुलांच्या हातात भरपूर पैसा दिला जातो पालकांना असे वाटते की आपण त्यांना वेळ देत नाही तर पैसा देऊन आपल्या वेळेची कुठेतरी किंमत पालकांकडून चुकवली जाते आज प्रत्येक विद्यार्थ्यांची किंवा मुलाची मानसिकता वेगवेगळी आहे त्याचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे आज आर्थिक जबाबदारीमुळे पालक त्यामध्ये माता पिता दोघेही नोकरी करतात त्यामुळे मुलांशी त्यांचा संबंध खूप घटलेला दिसून येतो, टेलिव्हिजन, इंटरनेट यामध्येही तुमचं बाबी सहजगत्या पाहायला मिळतात तटकारस्थानी असणाऱ्या या सिरीयल मुलांना सुद्धा तशाच प्रकारचे विचार करायला प्रवृत्त करू लागले आहेत.

या मनोवृत्तीमध्ये आज जर बदल करायचा असेल तर पालकांनीही सजग राहिला हवे असे दिसते मुलांमुळे मध्ये अलीकडील काळात वाढती वाढता हिंसाचार फुलांचा वाढलेला उद्धटपणा तसेच गुन्हेगारी वाढती प्रवृत्ती याला रोखण्याचे पहिले काम पालकांवर असते व त्यानंतर हे काम शिक्षक इतर नातेवाईक यांच्यावरती व पर्यायाने संपूर्ण समाजावरतीच येते आज अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा सजतपणे करण्याची आवश्यकता आहे अत्यंत सजग पणे करण्याची आवश्यकता आहे जो तो सजतपणे झाला नाही तर त्याचे परिणाम पुष्परिणाम आपल्याला निश्चितपणे भोगावे लागते आज आई-वडिलांचा आणि मुलांचा संपर्क कमी झाला आहे आयटी वगैरे क्षेत्रामध्ये आई-वडील आणि मुलांच्या फारशा भेटी होत नाही पैसा मात्र खर्च करण्यासाठी वारे माप दिला जातो अशामुळे मुलांचा कल जास्तीत जास्त चैन करणे आळशीपणा येणे त्यांच्यामध्ये आणि खेळ वगैरे मैदान खेळ वगैरे अलीकडल्या काळात खूप कमी झाले आहे घरात बसून मुले वेब सिरीज पाहणे कोटी वरील वेगवेगळया मालिका पाहणे सिरीयल पाहणे यामध्ये आपला वेळ देताना दिसतात त्यामुळे आज अल्पवयीन मुलांच्या गुन्हेगारीच्या प्रकरणांमध्ये समाजातील गरीब मुलांचा समावेश आहे तसेच श्रीमंत मुलांचाही समावेश आहे यामध्ये अमली पदार्थाचे सेवन करणे हिंसा करणे अत्याचार करणे हिंसाचाराची प्रवृत्ती असली छोट्या मोठ्या चुरा करणे त्याचप्रमाणे अमली पदार्थाचे वाहक होणे ही पैशासाठी केली जाणाऱ्या कामांचाही समावेश आहे उच्चभ्रू मध्यमवर्गीय या सर्वच कुटुंबातील मुले या प्रकरणाला बळी पडलेली दिसून येतात लॉकडाऊन नंतरच्या काळात अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारीचा ट्रेंड अधिक मोठ्या प्रमाणामध्ये पाहायला मिळतो. शाळा बंद असल्यामुळे मुलं असल्यामुळे मुलं घरी बसली होती लॉकडाऊन मध्ये बराच काळ शाळा बंद राहिल्या आपणच मुलांना ऑनलाइन शिकवण्यामुळे ऑनलाइन राहण्याची सवय लावली त्याचप्रमाणे ऑनलाईन या शिक्षणामुळे त्यांना इतरही अनेक पर्याय उपलब्ध आहेत हे सहजगत्या समजले सोशल मीडिया या प्लॅटफॉर्मने सर्वसामान्य वापरकर्त्यांना सदर केले असले तरी त्याच्या दुरुपयोगाबद्दल माहिती होण्याची आवश्यकता आहे व ती जाणीव जागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे आज डिजिटल मेडिया ओटीपी या संदर्भातल्या नियमांमुळे नियमांमध्ये अंतर्गत स्वनियमानियंत्रणेवर अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे त्याचप्रमाणे पत्रकारिता सुर्जनाशी स्वातंत्र्याची जपणूक करणे तक्रार यंत्रणा प्रभावी असणे व या तक्रार यंत्रणांनी जास्तीत जास्त जाणीव जागृती वरती भर देणे गरजेचे आहे आज प्रस्तावित सर्व ढाच्या बराच पुरोगामी उदारमतवादी आणि समकाली या तीनही गोष्टी लक्षात घेऊन करण्याची आवश्यकता आहे चित्रपटगृहे

दूरचित्रवाणी पाहणाऱ्या वर्ग तसेच इंटरनेट पाहणाऱ्या वर्ग त्याच्यातील फरक ही आपल्याला लक्षात घेतला पाहिजे व त्यानुसार मार्गदर्शक तत्वे आपण निर्माण केली पाहिजे डिजिटल मीडिया वापरकर्त्यांचे हक्क उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेचा अभाव मोठ्या प्रमाणावर ती चिंतेचा विषय झाला आहे हे मान्य करावे लागेल आज 2021 ला काही मार्गदर्शक तत्वे डिजिटल मीडिया आचारसंहितेच्या संदर्भात करण्यात आली माहिती तंत्रज्ञान कायदा 2004 कलम (872) अंतर्गत मिळालेल्या अधिकारांतर्गत आधीचे माहिती तंत्रज्ञान नियम 2011 पर्यंत रद्द ठरवत नवीन नियमावली असण्यात आली आहे

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म डिजिटल मीडिया आणि ओटीपी प्लॅटफॉर्म यासंबंधी सुसंवादी आणि मृदू यंत्रणेच्या दृष्टीने हे नियम निश्चित करताना इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि माहिती प्रसारण मंत्रालयाने विस्तृतपणे चर्चा करण्याचे चर्चा करणे गरजेचे आहे आज Whats app, YouTube फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर या सगळयांचे वापर करते खूप मोठ्या प्रमाणात म्हणजे कोट्यवधीच्याघरामध्ये आहेत त्यामुळे त्याच्यावर नियंत्रण ठेवणे काहीमोठा प्रश्न आहे

पालक जर या समाज माध्यमांच्या प्रमाणापेक्षा जास्त त्याच्यावर अवलंबून असतील तर कदाचित मुलांची पण अवलंबिताअधिक प्रमाणामध्ये वाढेल आज पालकांनीही मुलांना वेळ देणे त्यांना समजून घेणे त्यांच्याबरोबर खेळण्यासाठी वेळ घालवली त्यांना चांगल्या प्रकारचे मनोरंजनाचे कार्यक्रम उपलब्ध करून देणे चांगल्या त्यांच्याबरोबर असणाऱ्या मित्रमंडळींच्या संदर्भामध्ये विचार करणे हे पण आवश्यक असलेले आपल्याला दिसून येते.

सोशल मीडिया माध्यम या संस्थेचा विकास पाहता तो केवळ माध्यम संस्था म्हणून पाहता येणार नाही बऱ्याच वेळेला आज त्यांची भूमिका पाहता त्याला स्वयं नियमन सुद्धा गरजेचे आहे त्याचप्रमाणे यामध्ये केवळ दुसऱ्यांनी कुठले तरी नियम लागावे यावरती अवलंबून न राहता पालकांनी आपल्या स्वतःच्या पाल्यांकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची नितांत गरज असलेली दिसते.

माध्यमांकडून आवश्यक ती खबरदारी अध्ययन नियम पाणी जा पाळले जाणे आवश्यक आहे या नियमानुसार आवश्यक तीस जगताप खबरदारी पाहणे आणि विषयाचे योग्य अध्ययन करणे हे अनिवार्य आहे समाज माध्यमांचाही यामध्ये समावेश आहे त्याच्याकडून जर खबरदारी घेतली नाही तर भविष्य काळामध्ये वेगवेगळया प्रकारच्या समस्यांना आपण सामोरे जाऊ असे आपण गुन्हेगारीचे वाढते प्रमाण पाहता मोठ्या प्रमाणावर लहान बालके मुले चालती शाळेत शाळकरी विद्यार्थी महाविद्यालयातले विद्यार्थी यामध्ये गुंतलेले दिसून येतात.

गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळण्याची काही कारणे :

पालकांचा आपल्या पाल्यांचा सोबतवेळ घालवण्याचा अभाव, सभोवतालच्या परिसरातील व समवयस्क वाईट सांगत, सध्याची बदललेली जीवनशैली, स्मार्टफोन, स्मार्ट टीव्ही आणि इतर महागड्या उपकरणां प्रति वाढणारे तरुण पिढीचे आकर्षण, बऱ्याचदा मोठ्यांकडून मिळणारे चुकीचे मार्गदर्शन तसेच ओटीटी, टीव्ही व इतर कार्यक्रमांमधून आणि वेब सेरीज मधून वाढती गुन्हेगारी दाखवणे व त्याच्यावर कोणतेही बंधन नसणे, लैंगिकता आणि वाढते गुन्हेगारी ती दाखवली जाते त्यासंदर्भामध्येसेन्सॉर बोर्डचे कोणतेही नियंत्रण नसणे हे पण कारण असलेले आपल्याला दिसून येते अल्पवयीन गुन्हेगार सध्या पोलिसांच्या ही डोकेदुखीचा विषय होत असल्याचे दिसून येते शहरांमधील झोपडपट्टी परिसर, तसेचउच्चभ्रू कुटुंबांमध्येही याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर आढळून येताना दिसून येते.

अमली पदार्थाचे व्यसन, संस्कारांचा अभाव, वाईट संगत त्यामुळे अनेक मुले वाम मार्गाला लागत आहेत असे चित्र दिसून येते. हाणामारी करणे, विनयभंग करणे, चोरी किंवा घरफोडी करणे,खुनकिंवाखुनाचा प्रयत्न करणे, मोबाईल

किंवा टीव्हीमुळे कौटुंबिक वातावरण पूर्णपणे बिघडणे, पालकांचे आपल्या आपत्यांच्याकडे दुर्लक्ष असणे,वारेमाप पैसा खर्च करण्यासाठी हातामध्ये देणे, चांगल्या प्रकारची सांगत नसणे मैदानी खेळांचे खेळणे पूर्णपणे बंद होणे व घरात कुटुंबातच अधिका अधिक वेळेत घालवणे.

आज सराईत गुन्हेगारांकडूनही मुलांचा अल्पवयीन मुलांचा वापर गुन्ह्यासाठी साठी केला जातो ज्यामध्ये हाणामाऱ्या करणे, पाकीटमार करणे, मोबाईलची चोरी करणे,घरफोडी करणे अशा गुन्हेगारी टोळया आज अस्तित्वात आहेत व ते अल्पवयीन मुलांच्या कडून हे गुन्हे करून घेतात कारण या मुलांना अधिक शिक्षा होत नाही, यामध्ये पर्यटकांच्या पर्स लंपास करणे, मोबाईल मौल्यवान वस्तू चोरून नेण्याचाही घटना घडतात आणि यामध्ये अल्पवयीन गुन्हेगार दिसून येतात संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर येईल ते अल्पवयीन असल्या करणामुळे त्यांना न्यायालयात हजार न करता बाल निरीक्षण गृहात दाखल केले जाते काही दिवसातच पुन्हा बाहेर येऊन ते चोऱ्या व इतर गोष्टी करताना दिसून येतात.

सराईत गुन्हेगारांकडून या मुलांना नशेची सवय लावली जाते त्याच्या आहारी जातात मग ती मुले पैसा मिळाल्यानंतर नशा करतात व त्या नशेतच राहण्याची सवय त्यांना मोठ्या प्रमाणावरती लागते. आज लहान मुलांच्या हाती स्मार्टफोन आल्याने सोशल मीडियावरती खूपऍक्टिव्ह झाले आहेत समाज माध्यमावर येणाऱ्या वेब सिरीज गुन्हेगारी सिनेमे याचा थेट परिणाम या अल्पवयीन मुलांवर होतोय त्यामुळे झटपट पैसा, मौज मजा करण्याची वृत्ती त्यामुळे अल्पवयीन मुले याकडे अधिक वळू आहेत, अल्पवयीन मुलांमध्ये नवनवीन गोष्टींचे फॅड वाढल्याचे पाहायला मिळते सोशल मीडियावरचा अपघात अपवाद वगळता काही फारशी बंधने किंवा गुन्हेगारीचे उदारीकरण करण्याची वृत्ती याच्यामध्ये मोठ्या प्रमाणावरती आढळून येते.

अल्पवयीन मुलांमधील गुन्हेगारी वाढण्यासाठी सोशल मीडिया मोठ्या प्रमाणावर कारणीभूत असलेला आपल्याला दिसून येतो अनेक गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग वाढता आहे शाळा महाविद्यालयात शिकणारी मुले मागच्या पुढचा विचार न करता बेधडकपणेगुन्हांमध्ये सहभागी होतात, त्याचवेळी त्यांचं अल्पवयीन असणं त्यामुळे त्यांना कायद्यातून मिळणारी सूट या वेगवेगळया बाबी आज अस्तित्वात आहे हे सत्यही नाकारून चालणार नाही आणि त्यामुळे अल्पवयीन मुलांच्या गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावरती वाढत आहे या अल्पवयीन गुन्हेगारांमध्ये थोडासा धाक निर्माण करण्याची गरज नाही सध्याच्या काळात सोशल मीडियाचा जो सरळ वापर होतो त्याचप्रमाणे वेगवेगळया प्रकारची शस्त्रे हातात घेऊन फोटो काढणे, तलवारीने केक कापणे,तलवारी हातात घेऊन रात्री अपरात्री दहशत माजवणे यासारख्या घटना आपण घडताना दिसतात आणि पोलीस यंत्रणांकडून ते केवळ अल्पवयीन आहेत म्हणून कारवाई केली जात नाही आणि कारवाई केली तर समाजातले तथाकथित काही तत्त्वज्ञ त्या मुलांचेच बाजू घेताना दिसतात, आज भविष्य काळामध्ये ही अल्पवयीन मुले त्यांना योग्य धाक बसला नाही की योग्य शिक्षा झाली नाही तर निश्चितपणे संपूर्ण समाजाची डोकेदुखी ठरणार आहेत हे निश्चितपणे खरे आहे.त्यामुळे शिक्षा अजिबातच नाही असे न करता धाक बसेल अशी व्यवस्था करणे.

निष्कर्ष आणि उपाययोजना :

- पालकांनी मुलांना वेळ देणे.
- पालकांनी मुलांवर लक्ष ठेवणे.

- त्यांच्या आवडी निवडी, त्यांचे मित्रमंडळ याची माहिती असणे.
- मुलासमोर पालकांनीही समाजमाध्यमांवर अधिक वेळ न घालवणे.
- मोबाईल चा वापर कमीत कमी करण्यावर भर देणे.
- इंटरनेटचा वापर शक्यतो आपल्यासमोर करण्यास सांगणे.
- मनोरंजनाची चांगली साधने व पर्याय उपलब्ध करून देणे.
- आवश्यकतेनुसार समुपदेशकाची मदत घेणे.
- शिक्षा अजिबातच नाही असे न करता धाक बसेल अशी व्यवस्था करणे.

संदर्भ :

- https://www.mahamtb.com/Encyc/2022/12/26/The-growing-journey-of-minors-to-the-criminal-world.html
- https://www.esakal.com/uttar-maharashtra/nashik/use-of-minors-by-criminals-increasing-crime-rate-nashik-child-crime-news-psl98
- https://aaplibaramatinews.com/maharashtra/special-report-khaki-fear-needed-to-prevent-juvenile-criminals-ignorance-of-the-police-system-will-be-dangerous
- Ahuja, Ram.2001.Criminology. Jaipur: Rawat Publications.
- Ahuja, Ram. 2014.Social Problems in India. Jaipur: Rawat Publications.
- Haralambos and Holborn. 2007. Sociology: Themes and Perspectives. London: Collins.
- Radhakrishna, M. 2007. Urban Denotified tribes: Competing Identities, Contested
- Citizenship. EPW. Vo. 42. No 51. (Dec 22-26, 2007) pp. 59-64.
- Sutherland, Edwin and Donald R. Creassy. 1968. Principals of Criminology. Bombay:
- Times of India Press.

*समाजशास्त्र विभागप्रमुख आणि उपप्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे १६.

मो.नं. ९८२२६५६३६२ Email ID – jyotigagangras@gmail.com

***

भारतातील डिजिटल असमानता : वास्तव आणि आव्हाने

*प्रा.डॉ.प्रियदर्शन भवरे

संक्षिप्त आढावा

सध्याचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे, ज्यामुळे संपूर्ण जग ग्लोबल व्हिलेजमध्ये बदलून लोकांमधील सामाजिक अंतर कमी झाले आहे. सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात तंत्रज्ञान हे सामाजिक बदल आणि सामाजिक प्रगतीचे प्रमुख शक्ती आणि सर्वात प्रभावी साधन आहे. नाविन्यपूर्ण कल्पनांची निर्मिती करण्यात आणि लोकांमधील संवादाचे अडथळे दूर करण्यात तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावते. अलिकडच्या दशकात, 'डिजिटल डिव्हाईड' च्या कल्पनेवर व्यापक आणि व्यापक संशोधन केले गेले आहे आणि त्याच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिणामांची मोठ्या प्रमाणात चर्चाही झाली आहे. अनेक अभ्यासाचे निष्कर्ष असे आहे की, ज्यांना माहिती व संपर्क तंत्रज्ञानामध्ये प्रवेश आहे आणि ज्यांना प्रवेश नाही, अशा परिस्थितीमुळे त्यांच्यात असमानता निर्माण होते, सामाजिक एकात्मता धोक्यात येते आणि आर्थिक वाढीस अडथळा निर्माण होतो. हा लेख डिजिटल माहितीच्या प्रवेशासाठी भारत सरकारने घेतलेल्या पुढाकारांची आणि डिजिटल विभागणी कमी करण्यासाठी राष्ट्रव्यापी कार्यक्रमांद्वारे बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची चर्चा करतो. या लेखात डिजिटायझेशनमधील काही प्रमुख अडचणी आणि अडथळे आणि देशातील डिजिटल अंतर कमी करण्यासाठीचे दृढ निश्चय, चांगले धोरण आणि राजकीय पाठबळ यांवरही लक्ष केंद्रित केले आहे.

मुख्य शब्द: डिजिटल डिव्हाइड, ऍक्सेस, इंटरनेट वापरकर्ते, इंटरनेट, आयसीटी, इन्फ्रास्ट्रक्चर.

भारत इंटरनेट बाजारपेठेतील जागतिक स्तरावर आघाडीचे नेतृत्व करणारा आहे ४५० दशलक्षाहून अधिक वापरकर्त्यांसह, भारत हे चीननंतरचे दुसरे सर्वात मोठे इंटरनेट मार्केट आहे. जागतिक इंटरनेट बाजारपेठ झपाट्याने भरभराट होत आहे आणि भारताचीही वाढ होत आहे. भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या २०१५ मध्ये ३०० दशलक्ष वरून २०१९ पर्यंत ४५० दशलक्ष झाली आहे. यामुळे भारत जागतिक स्तरावर इंटरनेट वापरकर्त्यांसाठी दुसरा सर्वात मोठा देश बनला आहे आणि केवळ ४ वर्षात १५० % च्या वाढीसह, यात आश्चर्य नाही की भारतीय कंपन्या डिजिटल सेवांसाठी जागतिक बाजारपेठांमध्ये आक्रमकपणे त्यांची पोहोच वाढवत आहे.

स्मार्टफोन वापरकर्त्यांच्या वाढत्या संख्येमुळे, भारतीय कंपन्या देखील मोबाइल ॲप्ससह त्यांची पोहोच वाढवण्याचा विचार करत आहेत. त्यांनी भारतीय ग्राहकांसाठी डिजिटल उत्पादने तयार करण्यासाठी गुगल आणि फेसबुक सारख्या परदेशी संस्थांसोबत भागीदारी केली आहे. भारत हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा देश आहे आणि जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या आहे. इंटरनेट वापराच्या बाबतीत भारत जागतिक पातळीवर आघाडीवर आहे. भारताची इंटरनेट बाजारपेठ झपाट्याने विस्तारत आहे, आणि जागतिक बाजारपेठेत त्याचे महत्त्वाचे स्थान आहे. येत्या काही वर्षांत या बाजारपेठेत लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. भारताचा इंटरनेट प्रवेश दर सध्या ५२ % इतका आहे, ज्यामुळे तो ऑनलाइन मार्केटिंग आणि ई-कॉमर्सचा व्यवहार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसाठी सर्वात महत्त्वाचा देश बनतो.आज जगातील सुमारे ४० % लोकसंख्येकडे इंटरनेट कनेक्शन आहे. १९९५ मध्ये, ते १ % पेक्षा कमी होते. १९९९ ते २०१३ पर्यंत इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या दहापट वाढली आहे. २००५ मध्ये ती एक अब्जामध्ये, २०१० मध्ये दोन अब्जामध्ये, २०१४ मध्ये तीन एक अब्जापर्यंत पोहोचली.परंतु जागतिक लोकसंख्येच्या मोठ्या प्रमाणात विशेषतः तिसऱ्या जगातील विकसनशील देशांमध्ये मूलभूत गोष्टींचा अभाव आहे. इंटरनेटच्या प्रवेशामुळे डिजिटल डिव्हाईड निर्माण झाली आहे. डिजिटल विभाजनामुळे आहे रे आणि नाही रे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ज्यांच्याकडे इंटरनेट आणि डिजिटल स्त्रोत आहेत ते डिजिटल स्त्रोत ज्यांच्याकडे नाही अशा लोकांपेक्षा खूप श्रेष्ठ मानले जातात. भारत हा अशा देशांपैकी एक आहे जिथे डिजिटल विभाजन मोठ्या प्रमाणावर आहे. अमेरिका आणि चीननंतर जगातील इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये तिसरा क्रमांक असूनही भारत डिजिटल डिव्हाईडच्या समस्येने त्रस्त आहे.

ऑक्सफॅमने नुकत्याच केलेल्या अभ्यासानुसार, लॉकडाऊन दरम्यान सुमारे 80% भारतीय विद्यार्थी ऑनलाइन शालेय शिक्षणात प्रवेश करू शकले नाहीत आणि बरेच जण पुन्हा उघडल्यावर वर्गात परत येऊ शकत नाहीत. साथीच्या रोगाने देशाची डिजिटल अंतर कसे वाढवले आहे याचे हे फक्त एक उदाहरण आहे - इंटरनेटचा फायदा मिळवण्यासाठी

साधने आणि ज्ञान असलेले आणि नसलेले-आधीच विषमतेची तीव्र पातळी बिघडत आहे आणि आर्थिक वाढीवर दबाव आहे. ही फाळणी भारतासाठी अद्वितीय नसली तरी, ती विशेषतः अशा राष्ट्रात तीव्र आहे जिथे १.३ अब्ज लोकसंख्येपैकी निम्म्याहून अधिक लोकसंख्या २५ वर्षांपेक्षा कमी आहे.लॉकडाऊन घोषित केल्यावर, बँकिंग आणि शालेय शिक्षणापासून ते वैद्यकीय सल्लामसलत आणि नोकरीच्या शोधांपर्यंत सेवा ऑनलाइन केल्या गेल्या आणि बऱ्याच कंपन्या आजही 'वर्क फ्रॉम होम'या रीतीने सुरु आहेत.

साथीच्या आजारापूर्वी, सरकारी संशोधकांचा अंदाज होता की भारतातील डिजिटल व्यवहार (शिफ्ट) पाच वर्षांत $1 ट्रिलियन इतके आर्थिक मूल्य अनलॉक करू शकते. परंतु हे संकट असमानतेने ते फायदे पसरवत आहे आणि सामाजिक-आर्थिक असमानता वाढवत आहे, मुलांपेक्षा मुलींना अधिक त्रास होत आहे आणि शहरांपेक्षा ग्रामीण भाग अधिक प्रभावित आहेत.न्याया येथील नवी दिल्लीस्थित इंटरनेट-ॲक्सेस संशोधक सुमेष श्रीवास्तव म्हणतात, "भारतातील डिजिटल विभाजन ही नेहमीचीच समस्या आहे आणि साथीच्या रोगामुळे ती निश्चितच बिघडली आहे,"

"सरकारने हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की सर्व भारतीयांना डिजिटायझेशनचा लाभ देण्याच्या तयारीच्या स्थितीत तेआहेत, अन्यथा डिजिटल गरीब नागरिकांचा एक नवीन वर्ग समाजात तयार होण्याचा धोका आहे."

भारतामध्ये इंटरनेट वापरकर्त्यांचा जगातील दुसरा सर्वात मोठा देश आहे, सुमारे ६०० दशलक्ष, ज्यामध्ये जागतिक स्तरावरील सर्व वापरकर्त्यांपैकी १२ % पेक्षा जास्त आहेत. तरीही त्याच्या निम्म्या लोकसंख्येकडे इंटरनेटचा अभाव आहे, आणि जरी ते ऑनलाइन मिळवू शकत असले तरी, सरकारी आकडेवारीनुसार केवळ २० % भारतीयांना डिजिटल सेवा कशी वापरायची हे माहित आहे.

इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्सच्या २०१८ च्या अहवालानुसार, भारताच्या इंटरनेट ट्रॅफिकमध्ये प्रत्येक १० % वाढ दरडोई सकल देशांतर्गत उत्पादनात ३.१ % वाढ देते. परंतु त्या नफ्यांचे फायदे प्रत्येकापर्यंत पोहोचत नाहीत: श्रीवास्तव म्हणतात की, सरकारद्वारे चालवले जाणारे डिजिटल साक्षरता कार्यक्रम ५ % किंवा त्याहून कमी लोकसंख्येपर्यंत पोहोचतात, केवळ ग्रामीण भागांवर लक्ष केंद्रित करतात आणि विविध डिझाइन आणि अंमलबजावणी समस्यांनी ग्रस्त आहेत.

"डिजिटल क्रांतीने सेवा अधिक व्यापार करण्यायोग्य बनवल्या आहेत आणि चीनच्या तुलनेत वेगळ्या विकास मॉडेलसह भारताला वेगाने वाढण्यास सक्षम केले आहे," जागतिक बँकेचे माजी अर्थतज्ज्ञ एजाज घनी म्हणाले. "परंतु हे आता डिजिटल विभाजनाद्वारे रोखले जात आहे."लॉकडाऊन दरम्यान फिरण्यासाठी मजुरांसाठी ऑनलाइन जॉब पोर्टल आणि ई-पास लॉंच करणे म्हणजे डिजिटल साक्षर नसलेल्या भारतीयांनी उपजीविकेच्या संधी गमावल्या असत्या.

"डिजिटल डिव्हाइड कमी करणे हे डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये वाढीव गुंतवणूकीद्वारे होईल," घनी म्हणतात "चीनने भारताच्या पुढे कूच केले आहे आणि अमेरिकेशी असलेली दरी पूर्ण केली आहे. डिजिटल क्रांतीवर. आमच्याकडे खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे. - ब्लूमबर्ग

डिजिटल डिव्हाइड या शब्दामध्ये अपुरा निधी, आवश्यक संगणक आणि इंटरनेट कौशल्यांचा अभाव आणि इंग्रजी भाषेतील प्राविण्यतेचा अभाव यांचा समावेश होतो. ज्यामुळे डिजिटल माहिती संसाधनांचा विस्तार आणि वापर करण्यात अडथळा येतो. तंत्रज्ञान हे बदल घडवण्याची मोठी शक्ती आहे. हा एक गतिशील विषय असूनसतत नवीन कल्पना आणि विकास निर्माण करतो. माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाच्या (ICT) वापरामध्ये कुशल आणि आत्मविश्वास असलेल्या कार्यरत लोकसंख्येची आर्थिक गरज मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली आहे. त्याचप्रमाणे, ट्रेनचे वेळापत्रक तपासणे, खाद्यपदार्थ खरेदी करणे, टॅक्स रिटर्न पूर्ण करणे आणि तुमच्या कारवर कर भरणे यासारखी दैनंदिन कामे करण्यासाठी ऑनलाइन संप्रेषणाचा सतत वाढता वापर करून तंत्रज्ञान हा संपूर्ण समाजात एक महत्त्वाचा घटक बनला आहे. त्याने आपल्या दैनंदिन जीवनाचा प्रत्येक भाग व्यापला आहे.

अशा समाजात जिथे ज्ञान-केंद्रित व्यवहार हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे, लोकसंख्येमध्ये ज्ञानाचे वितरण हे वाढत्या प्रमाणात सामाजिक स्तरीकरणाशी जोडलेले आहे. संपूर्ण लोकसंख्येमध्ये इंटरनेटच्या मोठ्या प्रमाणात प्रसारामुळे अनेकांना नवीन माध्यमाच्या समाजावर होणाऱ्या संभाव्य परिणामांबद्दल अंदाज लावला जात आहे.

वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीच्या लोकांना त्यांचे मानवी भांडवल सुधारण्यास, त्यांचे सामाजिक नेटवर्क वाढविण्यास, नोकऱ्या शोधणे आणि शोधणे, आरोग्यविषयक माहितीचा अधिक चांगला प्रवेश करणे आणि माहितीमधील अडथळे कमी करून असमानता कमी करणे हे तंत्रज्ञानाच्या संभाव्य फायद्यांची माहिती आहे.

अशी अनेक संबंधित वैशिष्ट्ये आहेत, जी आयसीटीच्या प्रवेशाला आकार देण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. उत्पन्न, शिक्षण, वय आणि शहरी आणि ग्रामीण स्थान ही सर्वात निश्चित किंवा निर्धारक अशी वैशिष्ट्ये आहेत. अधिक इंटरनेटचा वापर हा अधिक उत्पन्न आणि शिक्षणाशी संबंधित आहे. आजही इंटरनेटची उपलब्धता ही मुख्यत: शहरी घटना आहे, ज्याला भारतासारख्या विकसनशील देशांसाठी अधिक उपयुक्त बनवण्यासाठी मोठ्या सुधारणांची गरज आहे जिथे तिची अर्धी लोकसंख्या अजूनही खेड्यांमध्ये राहते, मुख्यतः गरिबी आणि निरक्षरता. इंटरनेटमुळे भारतातील विद्यमान असमानता वाढत असल्याची भीती आहे.

अभ्यासाची पद्धत आणि व्याप्ती

या शोधनिबंधाच्या स्त्रोताची उपलब्धता आणि व्यवहार्यता लक्षात घेऊन, लेखकाने माहितीच्या दुय्यम स्त्रोतांच्या आधारे त्यांचे संशोधन अभ्यास केले. विविध पुस्तके, जर्नल्स, संशोधन लेख इत्यादींमधून दुय्यम माहिती गोळा केली गेली आहे. अभ्यासाच्या पद्धतीमध्ये शैक्षणिक, संशोधन आणि कॉर्पोरेट उद्योगाच्या प्रवाहातील विविध लेखकांचे विचार आणि लेखन देखील समाविष्ट आहे. अशाप्रकारे, लेखकाने उपलब्ध स्त्रोतांचा वापर केला. या शोधनिबंधाची व्याप्ती भारताने डिजिटल डिव्हाईड दूर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे मूल्यमापन करणे आहे. हे सरकार, गैर-सरकारी संस्था आणि खाजगी व्यावसायिक संस्थांनी सुरू केलेल्या अनेक कार्यरत प्रकल्प आणि कार्यक्रमांची चर्चा करते आणि या अडथळयांवर मात करण्यासाठी देशासमोरील काही आव्हानांचे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

देशातील दुर्गम आणि ग्रामीण भागात "आहेरे " आणि "नाही रे " मधील अंतर कमी करण्याच्या दिशेने देशाने केलेले प्रयत्न अधोरेखित करण्यासाठी उपलब्ध विविध माहितीपट, अहवाल आणि ई-संसाधनांमधून गोळा केलेल्या माहितीवर ही चर्चा आधारित आहे. चर्चा खालील संबंधित बाबींवर आधारित आहे:

१. सूचना (माहिती)समाजाची वाढ आणि विकास.
२. डिजिटल डिव्हाईड कमी करण्यासाठी पुढाकार, संधी आणि अपेक्षा.
३. सामुदायिक माहिती केंद्रे, सरकारी कार्यक्रम, ग्रंथालये आणि सामाजिक संस्थांची भूमिका.
४. डिजिटल डिव्हाईड मधील अंतर करण्यासमोरीलआव्हाने आणि अडथळे.

१. डिजिटल डिव्हाईड कमी करण्यासाठी पुढाकार, संधी आणि अपेक्षा.

देशांसाठी डिजिटल डिव्हाईड कमी करण्यासाठी मूलभूत गरज म्हणजे देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांना माहितीचा सार्वत्रिक आणि परवडणारा प्रवेश प्रदान करण्यासाठी त्यांच्या दूरसंचार आणि आयटी पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देणे हे महत्वाचे आहे.

स्वातंत्र्याच्या वेळी केवळ ८०,००० दूरध्वनी ग्राहक बहुतेक सरकारी क्षेत्रात होते. तथापि, १९९४ मध्ये राष्ट्रीय दूरसंचार धोरण तयार केल्यानंतर आणि त्यानंतर १९९९ मध्ये धोरणात केलेल्या सुधारणांमुळे २००० मध्ये दूरसंचार सेवांचे कॉर्पोरेटायझेशन करून दूरसंचार क्षेत्रात लक्षणीय आणि प्रगतीशील वाढ झाली.

सेल्युलर मोबाइल क्षेत्राचीही झपाट्याने वाढ झाली आहे. देशाच्या दूरसंचार नियामकाने नुकत्याच जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, १.२ दशलक्ष ते बेस १ अब्ज वापरकर्ते असून चीनपेक्षा फक्त एक पाऊल मागे आपण आहोत.

पण अनेक तज्ज्ञ या बाबीला मैलाचा दगड म्हणून न पाहता काही नाट्यमय कृतीची सुरुवात म्हणून पाहतात. "या अब्जावधी मोबाइल ग्राहकांपैकी एक मोठा भाग पुढील काही वर्षांमध्ये स्मार्टफोन वापरकर्ते बनतील, ही रोमांचक वाटचाल पुढची लहर आहे. येथून पुढे भारतात, मोबाइलद्वारे डेटा वापर आणि इंटरनेट वापरात वाढ होणार आहे, ज्यामुळे कोट्यवधी भारतीयांना त्यांच्या फोनद्वारे व्यवसाय करणे, त्यांना सामाजिक बनवणे आणि प्रशासनात सहभागी होणे शक्य होईल.

भारतात सध्या केवळ १२५ दशलक्ष स्मार्टफोन वापरकर्ते आहेत, चीन आणि युनायटेड स्टेट्स नंतर जगातील तिसरा सर्वात मोठा आधार आहे. तथापि, वाढीची संधी खूप मोठी आहे. हा देश २०१६ मध्ये युनायटेड स्टेट्सला मागे टाकून स्मार्टफोनसाठी जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी बाजारपेठ बनणार आहे, २०० दशलक्ष स्मार्टफोन वापरकर्ते रिसर्च फर्म ई-मार्केटर म्हणतात. याउलट, चीनमध्ये आधीपासूनच ५०० दशलक्ष स्मार्टफोन वापरकर्ते आहेत.

आयटी पायाभूत सुविधा, विशेषत: माहिती तंत्रज्ञानाचा प्रवेश सुधारला आहे, परंतु विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागात अजूनही बरेच काही करण्याची आवश्यकता आहे. आयटी उद्योगातील जलद प्रगती आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम यामुळे लक्षणीय सामाजिक बदल झाले आहेत.

पूर्वी, लोक आयटी कम्युनिकेशनमध्ये प्रवेश करण्यास नाखूष होते. आता सर्व राज्यांच्या विचारसरणीत अचानक बदल झाला आहे आणि ते त्यांच्या IT क्षेत्राला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय असलेल्या ICT चा वापर करण्यासाठी दबाव आणत आहेत. भारत सरकारने IT ला एक अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित केले आहे आणि देशाच्या प्रगतीशील वाढ आणि विकासासाठी एक महत्त्वाचा आणि महत्त्वाचा भाग आहे. अनेक राज्य सरकारांनी ई-गव्हर्नन्स प्रकल्पांसाठी आयटी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यास सुरुवात केली आहे.

२. सामुदायिक माहिती केंद्रे, सरकारी कार्यक्रम, ग्रंथालये आणि सामाजिक संस्थांची भूमिका.

माहितीच्या प्रसारासाठी ग्रंथालये महत्त्वाची आहेत आणि डिजिटल दुरावा दूर करण्यासाठी ते मध्यवर्ती भूमिका बजावतात. आज व्यावसायिक ग्रंथपाल हे माहितीचे संरक्षक न होता माहिती प्रसारक किंवा संवादक म्हणून ओळखले जात आहेत. भारतात डिजिटायझेशन संथ गतीने होत असले तरी, नॅशनल सायन्स डिजिटल लायब्ररी (NSDL), विद्या वाहिनी प्रकल्प आणि डिजिटल मोबाइल लायब्ररी यासारख्या अनेक प्रकल्पांनी डिजिटल विभाजन कमी करण्यासाठी सरकारने वेळोवेळी हस्तक्षेप केला आहे.

1. नॅशनल सायन्स डिजिटल लायब्ररी (NSDL):नॅशनल सायन्स डिजिटल लायब्ररी (NSDL) चा उद्देश देशातील विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक S &T माहिती प्रदान करणे आहे. वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचा (CSIR) दहावा पंचवार्षिक योजना नेटवर्क प्रकल्प म्हणून सुरू झालेला, NSDL हा अशा प्रकारचा एकमेव आहे जो विज्ञानाच्या पदवीपूर्व विद्यार्थ्यांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अभ्यासक्रमावर आधारित सामग्री प्रदान करतो. विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार सामग्री उपलब्ध करून देण्यासाठी NSDL साठी सामग्री निर्मिती आणि विकास कठोर प्रक्रियेतून गेला आहे. नियोजन आयोगाने एप्रिल २००२ मध्ये टास्क फोर्सची स्थापना केली आणि २००४ मध्ये या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली.

2. विद्या वाहिनी प्रकल्प: पंतप्रधान, अटल बिहारी वाजपेयी यांनी "विद्या वाहिनी" लाँच केला, एक महत्वाकांक्षी शाळा संगणकीकरण कार्यक्रम ज्याचा उद्देश 60,000 सरकारी आणि अनुदानित शाळांना इंटरनेट आणि इंट्रानेटद्वारे जोडणे आहे. सात जिल्ह्यांतील 140 शाळांमध्ये एक पथदर्शी प्रकल्प यापूर्वीच हाती घेण्यात आला होता. या कार्यक्रमात राज्य सरकारांशी सल्लामसलत करून प्रत्येक राज्यातील 20 सरकारी आणि अनुदानित शाळांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक शाळेत रु.च्या हार्डवेअर असलेली संगणक प्रयोगशाळा 10 लाख उभारण्यात येणार आहे.

3. डिजिटल मोबाईल लायब्ररी: डिजिटल विभाजन मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी भारत सरकारने, पुणे स्थित सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (C–DAC) च्या सहकार्याने, सुमारे 10 लाख डिजिटल पुस्तके घरापर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सामान्य नागरिकांचे. डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोरच्या ऑनलाइन सेवांचा एक भाग आणि मिलियन बुक प्रोजेक्टमधील भागीदार, इंग्रजी आणि भारतीय भाषांमधील अनेक पुस्तकांचा विनामूल्य प्रवेश प्रदान करते. भारतीय भाषेतील पुस्तकांच्या स्कॅनिंगमुळे भारतीय भाषा ऑप्टिकल कॅरेक्टर रिकग्निशन (OCR) सॉफ्टवेअर विकसित करण्याची संधी निर्माण झाली आहे. प्रकाशने प्रामुख्याने PDF किंवा QuickTime फॉरमॅटमध्ये असतात. कॉपीराइट कायद्यांमुळे, मजकूर सर्व कॉपीराइटच्या बाहेर आहेत आणि म्हणून वर्तमान माहितीसाठी स्रोत नाहीत, परंतु इतिहास आणि पार्श्वभूमीसाठी उपयुक्त आहेत. २००६ (नोव्हेंबर १०)

पर्यंत, DLI ने ८४,८९५ शीर्षके स्कॅन केली होती. सर्वात गरीब आणि वंचित विद्यार्थी यापुढे त्यांच्या दुर्गमतेमुळे किंवा परवडण्यामुळे नवीनतम वाचन साहित्यापासून वंचित राहणार नाहीत.

4. लायब्ररी नेटवर्क: लायब्ररी नेटवर्क लोकांच्या माहितीच्या गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ही गरज लक्षात घेऊन नियोजन आयोगाने १९८४ मध्ये सरकारने ग्रंथालय सेवा आणि माहितीचे सातव्या पंचवार्षिक योजनेत ग्रंथालय नेटवर्कद्वारे आधुनिकीकरण करण्याची शिफारस केली. परिणामी सर्वात मोठे ग्रंथालय नेटवर्क, INFLIBNET (माहिती आणि ग्रंथालय नेटवर्क), १९९१ मध्ये अहमदाबाद येथे मुख्यालय असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाने सुरू केले. हा कार्यक्रम ग्रंथालये आणि माहिती केंद्रांचे आधुनिकीकरण आणि माहितीचे हस्तांतरण आणि भारतातील शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधकांपर्यंत पोहोचण्यासाठी यंत्रणा उभारण्याच्या दिशेने आहे. अनेक शहरातील नेटवर्क, जसे की कॅलिबनेट, कोलकाता लायब्ररी नेटवर्क; DELNET, विकसनशील लायब्ररी नेटवर्क, दिल्ली; बॉम्बे लायब्ररी नेटवर्क (बोनेट); मद्रास लायब्ररी नेटवर्क मॅलिबनेट; पुणे लायब्ररी नेटवर्क (PUNET); आणि, अहमदाबाद लायब्ररी नेटवर्क (सर्व NISSAT वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन विभागाद्वारे प्रायोजित) त्यांच्या होल्डिंग्सचे केंद्रीकृत युनियन कॅटलॉग तयार करून संसाधनांच्या वाटणीला आणि माहितीचा प्रसार करत आहे.

5. सार्वजनिक ग्रंथालये: भारतातील सार्वजनिक ग्रंथालये नवीनतम तंत्रज्ञान आणि आयटी पायाभूत सुविधांनी सुसज्ज असणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने लोकांना माहिती मिळवण्यासाठी ई-मेल आणि इंटरनेट वापरण्यास मदत करण्यासाठी अनेक सामुदायिक माहिती केंद्रे सेट केली आहेत. पश्चिम बंगालसारख्या बहुतांश राज्यांनी ग्रामीण भागात सामुदायिक ग्रंथालय आणि माहिती केंद्रे (CLIC) स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले आहे. भारतात ज्या ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालये उभारली गेली नाहीत अशा ठिकाणी सुमारे 1,500 CLIC स्थापन केले जातील.

शैक्षणिक आणि संशोधन संस्थांची भूमिका :

शैक्षणिक संस्था, विशेषतः इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT), ग्रामीण भागातील लोकांना इंटरनेटचा वापर करून देण्यासाठी सतत प्रयत्न करत आहेत. IIT कानपूरने एक प्रकल्प सुरू केला आणि बॅटरी-चालित सुविधा विकसित केली, "इन्फोथेला" (माहिती बॉक्स), “Infothela” (Information Box),ज्यामध्ये शिक्षण, हवामान कृषी आणि रोजगार याविषयी माहितीचा प्रसार समाविष्ट आहे. सुशिक्षित आणि बेरोजगारांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी, गावातील तरुणांना प्रकल्प चालवण्यासाठी सक्षम करण्यात आले आहे. आयआयटी खरगपूरने “दृष्टीहीन आणि न दिसणारे यांच्यातील संवादाचे अंतर कमी करण्यासाठी” आणखी एक प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पामुळे अंधांना इंटरनेटवर सर्फ करणे, भारतीय भाषांमधील मजकूर वाचणे आणि सामान्य कार्यालयीन कामही करणे शक्य झाले आहे. ब्रेलचे सरळ इंग्रजीत भाषांतर करण्यासाठी आयआयटी वेबेल हे सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाइंडने मायक्रोसॉफ्टच्या मदतीने दोन प्रकल्प सुरू केले: मुंबईत अंधांसाठी सायबर कॅफे आणि बंगळुरूमध्ये ब्रेल प्रिंटिंग युनिट. या प्रकल्पांनी डिजिटल डिव्हाईड दूर करून अंध लोकांना सशक्त करण्याचा उत्साहवर्धक प्रयत्न केला आहे.

सामान्य माणसाच्या फायद्यासाठी तंत्रज्ञान भारतातही मोठ्या प्रमाणात टेलिमेडिसिनची ओळख करून देत आहे. इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (ISRO) ने २००२ मध्ये "तंत्रज्ञान प्रात्यक्षिक" सह एक पथदर्शी प्रकल्प सुरू केला आणि सुमारे १०० रुग्णालयांमध्ये स्थापित केले गेले, त्यापैकी वीस सुपर-स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आणि त्यापैकी ८० दुर्गम जिल्ह्यांमध्ये आणि ट्रस्ट हॉस्पिटलमध्ये. या तंत्रज्ञानाच्या वापराचा परिणाम अत्यंत उत्साहवर्धक आहे. १५,००० रूग्णांनी मोठ्या शहरांमध्ये प्रवास न करता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधून सल्ला व सेवा घेतल्याची नोंद आहे. या सुविधेच्या मदतीने तज्ज्ञांकडून मिळालेल्या सूचनांद्वारे दुर्गम ठिकाणी जीव वाचवण्यात आला आहे. भारताच्या किनाऱ्यावर आणि अंदमान आणि निकोबार बेटांवर झालेल्या ताज्या त्सुनामी आपत्तीच्या वेळी, ISRO द्वारे प्रदान केलेले SATCOM-आधारित टेलिमेडिसिन आणि GRAMSAT आयलंड नेटवर्क ताबडतोब सेवेत दाबले गेले.

खाजगी उद्योगधंद्यांनी केलेले प्रयत्न

टाटा कौन्सिल ऑफ कम्युनिटी इनिशिएटिव्हसारखे काही खाजगी व्यवसाय देशात प्रौढ शिक्षणाला चालना देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत आहेत. मल्टीमीडिया सादरीकरणे तयार करून भारताचे प्रौढ शिक्षण

सुधारण्यासाठी परिषदेने अनेक नाविन्यपूर्ण संगणक-आधारित साक्षरता कार्यक्रमांचा विस्तार केला आहे. त्याचप्रमाणे अझीम प्रेमजी फाऊंडेशन शाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रभावी आणि मोजमाप करण्यायोग्य मॉडेल तयार करून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात सहभागी आहे. "हिंदुस्थान लिव्हर" सारख्या काही कॉर्पोरेट दिग्गजांनी ग्रामीण गरजा पूर्ण करण्यासाठी माहिती पुरवण्यासाठी आय-शक्ती, एक IT-आधारित ग्रामीण माहिती सेवा नावाचा प्रकल्प सुरू केला आहे.

आंध्र प्रदेशातील ७,००० खेड्यांमधील १० दशलक्षाहून अधिक ग्रामीण लोकांपर्यंत माहिती सेवा वितरीत करण्यासाठी १,५०० किऑस्क उभारण्याचा प्रकल्पाचा विचार आहे. Oglivy आणि Mather कंपनीचा प्रकल्प "परम" देशातील ग्रामीण कनेक्टिव्हिटी सुरू करत आहे. या इलेक्ट्रॉनिक कनेक्टिव्हिटी नेटवर्कची संकल्पना अतिदुर्गम कोपऱ्यात पोहोचण्यासाठी केली गेली आहे जिथे कोणतीही लँड लाईन किंवा मीडिया-आधारित संप्रेषण उपलब्ध नाही. प्रकल्पाचे ब्रीदवाक्य " समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंतपोहोचणे " हे आहे. "परम" संगणक ऑपरेटरशी स्थानिक भाषेत बोलले जाणारे आणि लिखित स्वरूपात संवाद साधतो.

गुजरात राज्यातील आणंद येथील "अमूल इंडिया" या प्रसिद्ध कॉर्पोरेट डेअरी कंपनीने डेअरी इन्फॉर्मेशन सिस्टीम किओस्क (DISK) चे नेटवर्क विकसित केले आहे. सध्या २,५०० गाव-स्तरीय किऑस्क जोडले गेले आहेत आणि जेव्हा हा प्रकल्प पूर्ण होईल तेव्हा ७०,००० गावातील दूध संस्थांचा समावेश होईल.

३. डिजिटल डिव्हाईड मधील अंतर करण्यासमोरील आव्हाने आणि अडथळे.

डिजिटल डिव्हाईड कमी करण्यासाठी मूलभूत गरज म्हणजे दळणवळणाच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देणे आणि देशातील सर्व भौगोलिक विभागांमधील लोकांना माहितीचा सार्वत्रिक आणि परवडणारा प्रवेश प्रदान करणे. डिजिटल डिव्हाईड कमी करण्यासाठी अनेक अडथळे आहेत. जरी भारतातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समुदाय माहिती तंत्रज्ञान आणि इंटरनेटचा वापर मिळवत आहेत परंतु खालील कारणांमुळे त्यांचे फायदे मर्यादित आहेत.

पायाभूत (इन्फ्रास्ट्रक्चरल) अडथळे

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून माहिती तंत्रज्ञानाची प्रचंड वाढ होऊनही, भारतात अजूनही मजबूत दूरसंचार पायाभूत सुविधांचा अभाव आहे. आवश्यक पायाभूत सुविधा इतर राष्ट्रांच्या बरोबरीने नाहीत; त्यामुळे इंटरनेटचा झपाट्याने प्रसार होत असूनही, तंत्रज्ञानाची मानके अधिक वाढल्याने डिजिटल विभाजन अधिक व्यापक होत आहे. योग्य निधीच्या अभावामुळे भारत व्यावसायिकांच्या प्रशिक्षणासाठी अपेक्षित पायाभूत सुविधा विकसित करू शकत नाही. माहितीपर्यंत पोहोचणे आणि आयुष्यभर शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे त्यांचे प्राथमिक उद्दिष्ट असलेले भारताकडे अद्याप मजबूत आणि पूर्ण सुसज्ज ग्रंथालये आणि माहिती केंद्रे नाहीत. सार्वजनिक वाचनालय ज्या इंटरनेटचा वापर करू शकतात त्यांच्याकडे संगणक आणि इंटरनेट प्रवेश नाही. जरी भारताने सायबर-कॅफेची प्रचंड आणि प्रगतीशील वाढ पाहिली असली तरी आर्थिकदृष्ट्या गरीब लोक त्यांच्या आर्थिक अडचणींमुळे प्रवेश घेऊ शकत नाहीत.

साक्षरता आणि कौशल्य अडथळे

शिक्षण आणि माहिती साक्षरता समाजाला 'आवश्यक आणि नसलेल्या'मध्ये विखंडित होण्यापासून रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. डिजिटल माहितीपर्यंत पोहोचण्यासाठी माहिती तंत्रज्ञान (IT) स्वरूपात साक्षरता खूप महत्त्वाची आहे. भारतासारख्या तिसऱ्या जगातील विकसनशील देशांमध्ये, माहिती साक्षरतेचे शिक्षण समाजाला अबाधित ठेवण्यासाठी आणि माहिती असलेल्या आणि नसलेल्या लोकसंख्येमध्ये त्याचे विखंडित होण्यापासून व त्याला रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

आर्थिक अडथळे

आर्थिक अडचणींमुळे किंवा अपुऱ्या निधीमुळे, निम्न सामाजिक-आर्थिक स्थितीतील लोकांकडे खाजगी सायबर-कॅफेवर खर्च करण्यासाठी किंवा डिजिटल माहिती मिळविण्यासाठी स्वतःहून इंटरनेट कनेक्टिव्हिटी ठेवण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत.

माहिती/सामग्री अडथळे

माहिती तंत्रज्ञानाचा प्रवेश जागतिक स्तरावर लोकांमध्ये माहितीचा मुक्तपणे प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. कोणतीही संस्था इंटरनेट नियंत्रित करत नसल्यामुळे, इंटरनेटवर प्रवेश असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे

त्याच्या कल्पना आणि माहिती सामायिक करण्याची क्षमता असते. म्हणूनच, डिजिटल विभाजनाची समस्या सोडवायची असेल, तर सर्व नागरिकांना त्यांच्या जीवनाशी संबंधित माहिती सामग्री प्राप्त करता यावी तसेच त्यांचे उत्पादन करण्यास सक्षम व्हावे तसेच त्यांच्या समुदायांसाठी आणि इंटरनेटसाठी स्वतःच्या कल्पना किंवा सामग्री यासाठी सरकारने वेळोवेळी आणि प्रगतीशील प्रयत्नांची आवश्यकता आहे.

भाषेतील अडथळे

भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे जे लोकांना जोडते आणि विविध गटांमध्ये माहितीची देवाणघेवाण करण्याचे स्त्रोत आहे. भारत हा बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक देश आहे. सध्या आपण जगातील माहिती क्रांतीचे साक्षीदार आहोत जिथे इंटरनेटवरील मोठ्या प्रमाणात माहिती इंग्रजीमध्ये आहे, जी त्या देशांतील लोकांसाठी एक अडथळा किंवा अडथळा म्हणून काम करते जिथे लोकांची प्राथमिक भाषा इंग्रजी नाही.

भारतातील डिजिटल डिव्हाइड – परिणाम

शैक्षणिक: भारतातील डिजिटल विभाजनामुळे मुलांच्या शिकण्याच्या आणि विकसित होण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल. इंटरनेट प्रवेशाशिवाय, विद्यार्थी आवश्यक तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्ये तयार करू शकत नाहीत.

सामाजिक: इंटरनेट प्रवेश हे राष्ट्राच्या मोठ्या सामाजिक प्रगतीशी संबंधित आहे. अशा प्रकारे डिजीटल विभागणी देशाच्या सामाजिक प्रगतीला बाधक ठरते. भारतातील डिजिटल विभाजनामुळे ग्रामीण लोकसंख्या माहितीच्या अभावाने त्रस्त आहे, यामुळे गरिबी, वंचितता आणि मागासलेपणाचे दुष्टचक्र बळकट होईल.

राजकीय: सोशल मीडियाच्या युगात, डिजिटल कनेक्टिव्हिटीशिवाय राजकीय सक्षमीकरण आणि गतिशीलता कठीण आहे.

आर्थिक: डिजिटल विभाजनामुळे ज्यांना तंत्रज्ञान परवडते आणि ज्यांना परवडत नाही त्यांच्यामधील आर्थिक असमानता वाढेल.

प्रशासन: पारदर्शकता आणि जबाबदारी हीडिजिटल कनेक्टिव्हिटीवर अवलंबून आहे. डिजिटल विभाजनाचा ई-गव्हर्नन्स उपक्रमांवर नकारात्मक परिणाम होतो. ई-गव्हर्नन्स आणि त्याचे महत्त्व जाणून घ्या.

भारतातील डिजिटल डिव्हाईड अंतर करण्यासाठी सरकारचा पुढाकार.

भारताच्या डिजिटल डिव्हाईडला तोंड देण्यासाठी माहिती आणि तंत्रज्ञानामध्ये सक्षमता संपादन करण्याच्या दिशेने भारत सरकार महत्त्वपूर्ण पावले उचलत आहे.

१. देशातील इंटरनेट सुविधा सुधारण्यासाठी सरकारचे डिजिटल इंडिया उपक्रम. या अंतर्गत काही उपक्रम आहेत - 2011 मध्ये, 0.25 दशलक्ष पंचायतींना ऑप्टिकल फायबर (100 MBPS) द्वारे जोडण्यासाठी आणि भारतातील गावांना जोडण्यासाठी भारतनेट प्रकल्प सुरू करण्यात आला.2014 मध्ये, सरकारने राष्ट्रीय डिजिटल साक्षरता अभियान आणि डिजिटल साक्षरता अभियान सुरू केले.2015 मध्ये, सरकारने संपूर्ण देशाला जोडण्यासाठी डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत अनेक योजना सुरू केल्या.PM ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान, 2017 मध्ये सुरू करण्यात आले, जे ग्रामीण भारतामध्ये 60 दशलक्ष कुटुंबांना डिजिटल साक्षरतेत आणण्यासाठी त्यांना अंतर्भूत करणे.

२. डिजिटल साक्षरतेचे महत्त्व पाहून, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने इंटरनेटवर वापरकरण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून घोषित केला आहे, तो गोपनीयतेच्या अधिकाराचा आणि संविधानाच्या कलम 21 अंतर्गत येणाऱ्या शिक्षणाच्या अधिकाराचा भाग बनवला आहे.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, 2020 चे उद्दिष्ट डिजिटल शिक्षणावर विशेष भर देऊन भारतीय शिक्षण व्यवस्थेत शालेय ते महाविद्यालयीन स्तरापर्यंत अनेक बदल करून "भारताला जागतिक ज्ञान महासत्ता" बनवणे आहे.

४. इंटरनेट साथी कार्यक्रम - इंटरनेट साथी कार्यक्रम 2015 मध्ये गुगल इंडिया आणि टाटा ट्रस्टने सुरू केला होता. ग्रामीण भारतीय महिलांमध्ये डिजिटल साक्षरता सुलभ करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

५. ऑप्टिकल फायबर नेटवर्क (NOF-N), भारतातील दोन लाख (200,000) ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने एक प्रकल्प.

६. DIKSHA (नॉलेज शेअरिंगसाठी डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर) प्लॅटफॉर्म- DIKSHA हे सर्व राज्यांसाठी आणि केंद्र सरकारसाठी इयत्ता 1 ते 12 पर्यंत उपलब्ध शालेय शिक्षणाचे राष्ट्रीय व्यासपीठ आहे आणि सप्टेंबर 2017 मध्ये लॉन्च केले गेले. PM eVidya चा भाग म्हणून आत्मनिर्भार अंतर्गत घोषित भारत कार्यक्रम, DIKSHA 'एक राष्ट्र आहे; भारतातील शालेय शिक्षणासाठी एक डिजिटल प्लॅटफॉर्म.

७. उन्नती प्रकल्प - हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (HPCL) जी गरीब आर्थिक आणि सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणासाठी प्रवेश देऊन शाळांमधील डिजिटल अंतरकमी करण्याचा प्रयत्न करते.

८. ज्ञानदूत हा एक इंट्रानेट-आधारित सरकार ते नागरिक (G2C) सेवा वितरण उपक्रम आहे ज्याची सुरुवात मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यात जानेवारी 2000 मध्ये ग्रामीण लोकसंख्येला संबंधित माहिती प्रदान करणे आणि जिल्हा प्रशासन आणि जनतायांच्यातील इंटरफेस म्हणून कार्य करण्याच्या दुहेरी उद्देशाने करण्यात आली.

९. डिजिटल मोबाईल लायब्ररी: भारत सरकारने पुण्यातील सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग (C–DAC) च्या सहकार्याने डिजिटल अंतर मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी डिजिटल मोबाईल लायब्ररीची व्यवस्था केली आहे.

१०. स्वयम पोर्टलवर एनआयओएस (ओपन स्कूलिंगची इयत्ता 9 ते 12) शी संबंधित MOOC अभ्यासक्रम ऑनलाइन मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्स अपलोड केले जातात; सुमारे 92 अभ्यासक्रम सुरू झाले आहेत आणि 1.5 कोटी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ही संख्या आज अधिक वाढली आहे.

११. ऑन एअर शिक्षा वाणी, NIOS द्वारे भिन्न-दिव्यांगांसाठी, ई-पाठशाळा- रेडिओ प्रसारणाचा वापर दुर्गम भागातील मुलांसाठी केला जात आहे जे ऑनलाइन नाहीत (विशेषतः इयत्ता 1 ते 5 साठी).

१२. ई-पाठशाळा: ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांना अभ्यासाचे साहित्य पुरवणे.

सूचना आणि निष्कर्ष

- माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाच्या असमान प्रवेशामुळे केवळ विकसनशील देशांमध्येच नव्हे तर विकसित देशांमध्येही डिजिटल विभाजन झाले आहे. भारताने ग्रामीण आणि दुर्गम भागांसाठी अनेक प्रकल्प आणि कार्यक्रम सुरू करून ही दरी भरून काढण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत, लोकांना माहिती समाजात आणण्यासाठी आणखी बरेच काही करण्याची गरज आहे. फक्त गरज आहे ती लोकांमध्ये दृढ निश्चय, चांगले धोरण-निर्माते आणि डिजिटल फूट कमी करण्यासाठी राजकीय पाठबळ. ज्यांच्याकडे डिजिटल माहिती मिळवण्याची सुविधा आहे आणि ज्यांना उपलब्ध नाही त्यांच्यातील दरी कमी करण्यासाठी सर्वांना माहिती पुरवण्यात ग्रंथालये आणि माहिती केंद्रांची विशेष भूमिका आहे. देशाला सार्वजनिक ग्रंथालयांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याची आणि त्यांना सामुदायिक माहिती केंद्रांशी जोडण्याची गरज आहे.
- ग्रामीण भारताच्या गरजेला अनुकूल अशा तंत्रज्ञानाचा प्रचार करणे ही काळाची गरज आहे. उदाहरणार्थ, डिजिटल डिव्हाईडची खऱ्या अर्थाने अंतर भरून काढण्यासाठी पीसी प्रवेश वाढवणे आवश्यक आहे. कारण अगदी सोपे आहे; मोबाईल सर्व काही पीसी करू शकत नाही. परंतु, मोबाइल स्वस्त, अधिक पोर्टेबल आहेत आणि त्यांचे विस्तारित बॅटरी आयुष्य अशा प्रदेशांसाठी अनुकूल आहे जेथे विजेचा प्रवेश नाही किंवा अस्तित्वात नाही. वायरलेस उपकरणांना इंटरनेटशी जोडण्यासाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा तयार करणे सोपे आणि कमी खर्चिक आहे. तेथे कोणतीही शिकण्याचे बंधन नाही, साक्षरतेचा अडथळा नाही आणि मात करण्यासाठी कोणतीही तांत्रिक-समर्थ आव्हाने नाहीत. लोड, देखरेख आणि अद्यतनित करण्यासाठी कोणतेही महाग आणि बोजड अनुप्रयोग नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांसाठी मोबाईल सर्वात योग्य आहे.
- भारतीय ग्रामीण समाजातील मुख्य अडथळा म्हणजे दळणवळण तंत्रज्ञानाच्या महत्त्वाचा अंदाज असलेले लोक आयसीटीकडे अत्यंत निष्क्रीयपणे वागतात. जर या 'निष्क्रिय लोकांना' राष्ट्रीय पुरोगामी बनवायचे असेल तर 'प्रत्येकासाठी आयसीटी'ची व्यापक समज वाढवावी लागेल. जगातील महिलांना ज्या समस्यांचा सामना करावा लागतो त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि कालबद्ध धोरणे विकसित करण्याची गरज आहे, ज्याचा त्यांना ICT मध्ये प्रवेश आणि वापर करावा लागतो. त्यांनी वापरलेली माहिती सामग्री उपयुक्त आणि

उद्देशपूर्ण असणे आवश्यक आहे जेणेकरुन महिलांना उत्पन्न निर्मिती आणि शिक्षणासाठी इंटरनेटचा वापर करता येईल.

- ग्रामीण भारतातील दूरसंचार पायाभूत सुविधांना चालना देणे ही ग्रामीण-शहरी डिजिटल दुरावा दूर करण्यासाठी सर्वात महत्त्वाची अट आहे आणि ग्रामीण भारतात आयटी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात सरकार महत्त्वाची भूमिका बजावू शकते. प्रदेशांमधील डिजीटल विभागणी कमी करण्यासाठी विशेष खर्चाची नोंद करावी.
- भारतात, विविध भाषा बोलणाऱ्या लोकसंख्येच्या विविध भागांमुळे उद्भवणाऱ्या भाषिक समस्यांचे निराकरण करण्याची गरज आहे. आजकाल जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात इंग्रजी भाषेचा वापर केला जातो. भारतातील इंग्रजी न बोलणाऱ्या लोकसंख्येमध्ये सांस्कृतिक विविधता आणि सामाजिक बहिष्कार टाळण्याची गरज आहे.
- सरकारकडून निधीच्या कमतरतेमुळे, बजेटची मर्यादा आणि जागतिक आर्थिक मंदीमुळे ICT प्रकल्प कमी होत आहेत. यासाठी खाजगी क्षेत्राकडून संसाधने आणि गुंतवणुकीची अधिक गरज आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी शिक्षण, आरोग्यसेवा आणि कनेक्टिव्हिटी या प्रमुख क्षेत्रांमध्ये ICT च्या प्रभावी उपयोजनामुळे, वायरलेस आणि सॅटेलाइट लिंक्समुळे ते किफायतशीर आणि परवडणारे बनले आहेत म्हणून डिजिटल विभाजन कमी केले जाऊ शकते.

संदर्भ:

1. Ellen HelsperThe Digital Disconnect: The Social Causes and Consequences of Digital Inequalities SAGE Publications Ltd , २०२१
2. Singh, Neena (2007) “Bridging the Digital Divide in India: Challenges and Opportunities”, World Libraries, Vol. 17, No. 1.
3. Sumanjeet (2006) “E-Governance: An Overview in the Indian Context”, Indian Journal of Political Science, Vol. 67, No. 4.
4. Venkat, Kumar (2001) Digital divide and poverty, dalam Journal of Poverty, Volume 5, Number 4, pag. 113-116.
5. Jan van Dijk (2019) The Digital Divide, United Kingdom
6. https://indiaeducationdiary.in/the-internet-in-india-everything-you-need-to-know/
7. https://theprint.in/india/education/as-digital-divide-widens-india-risks-losing-a-generation-to-pandemic-disruption/568394/
8. https://byjus.com/govt-exams/digital-divide
9. वरखेडे रमेश नारायण (२०१५) सायबर-संस्कृती, Institute of Knowledge Engineering, Nashik.

***समाजशास्त्र विभाग प्रमुख, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना. संपर्क: ९४०५९१३२९७**

priyadarshan1971@gmail.com

***

लिंगभाव संवेदना आणि सामाजिक वास्तव

*प्रो. डॉ. सुजाता जगन कराडे

'स्त्री' आणि 'पुरुष' समाजव्यवस्थेचे घटक असले तरी, समाजव्यवस्थेने दिलेल्या लिंगभावानुसार भूमिका पार पाडत असतात. या भूमिका भारतीय समाजव्यवस्थेतील पुरुषप्रधान संस्कृतीला केंद्रस्थानी म्हणून निर्माण केली आहे. कारण वर्षानुवर्षे चालत आलेली संस्कृती ही स्त्रियांचे शोषण पूर्वीपासून ते आज अखेरपर्यंत होत असलेले दिसते.

लिंगभावानुसार स्त्रियांना दुय्यमता का व कसे दिले याचे विश्लेषण केले तर स्त्री व पुरुष ही विषमता समाजरचित लिंगभाव हे देह पातळीवर आहे. सामाजिकीकरण्याच्या प्रक्रियेतून स्त्रियांच्या दुय्यमतेचे कारण हे शरीररचना असून लिंग व लिंगभावामध्ये आहे. 'लिंग' हे नैसर्गिक आणि जीवशास्त्र आहे. 'लिंगभाव' ही संकल्पना सर्वप्रथम स्त्रीवादातील विचारवंत, ॲन ओकले यांनी मांडली. त्या म्हणतात, '' लिंगभाव ही सांस्कृतिक बाब आहे त्यातून स्त्री व पुरुषांची बाई पणात व पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सूचित करते.'' लिंगभाव हे नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे. यातून समाजाने कसे जगावे? याचा कृती कार्यक्रम हा लिंगभावानुसार असून तिची भूमिका व दर्जा हा स्थल, काल व समाजपरत्वे आहे.

'लिंगभाव' विषमता ही बाईपणाशी निगडित न राहता सामाजिक परिस्थितीशी निगडित आहे. हे पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये समाजातील वेगवेगळ्या वर्गात दिसून येते. म्हणून झिला ॲसनस्टाईन, यांनी ''वर्गावर आधारित सत्तेच्या सिद्धांताची सांगड लिंगावर आधारित सत्तेच्या सिद्धांताशी घालण्याची निकड प्रतिपादन केली आहे''. या विचारानुसार स्त्रियांच्याकडे पाहताना लिंगभेदातून निर्माण होणारी स्त्रीसंवेदनाही विषमता दर्शवते. सामाजिक विकास घडविण्यासाठी लिंगभावात्मक दृष्टिकोण बदलणे गरजेचे आहे. 'लिंग' हे शारीरिक आहे आणि 'लिंगभाव' समाजाने घडवलेला आहे. यामध्ये स्त्रियांना व पुरुषांना विशिष्ट प्रकारे वाढवले जाते. सामाजिक संरचनेनुसार समाजामध्ये लिंगात्मक अधिकार व कर्तव्य ठरवले जातात. स्त्रियांना कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शिक्षण यामध्ये लिंगभाव विषमता दिली आहे. ही विषमता समाजामध्ये रूढीबद्ध पद्धतीने मांडली जाते. समाजात लिंगभाव संवेदनशीलता ही सामाजिक वास्तवता हा कळीचा मुद्दा ठरत आहे का? हे पाहणे गरजेचे आहे.

लिंगभाव संवेदनशीलता

लैंगिक संवेदनशीलता म्हणजे वर्तन बदल होय. हा बदल पारंपारिक विचारातून स्वत: आणि विरुद्ध लिंगाबद्दल सहानुभूती निर्माण करणे या द्वारे विरुद्ध लिंगाचे व्यक्तिमत्व समानतेचे आहे. याची जाणीव निर्माण करून देणे. आज जरी लिंगभाव संवेदनाची संकल्पना विकसित होत असली तरी, समानतेबाबत जागृती किती आहे हे पाहणे गरजेचे आहे. 'स्त्री' व 'पुरुष' यांच्यातील संवेदनशीलता ही खुल्या विचारातून व्यक्त होते. अर्थात लिंगसंवेदनशीलता 'स्त्री' व 'पुरुष' यांच्यातील फरक दर्शवत नाही तर, ही संकल्पना मानवामध्ये सामाजिक, मानसिक समानतेची भावना निर्माण करते.याकरिता लिंगभाव संवेदनशीलता हे शिक्षणाद्वारे विचारधारा निर्धारित करून केवळ बौद्धिक जागृती न करता खुल्या विचारातून समानतेची वागणूक समाजामध्ये दिली जावी. याकरिता 'स्त्री' ही एक मानव आहे तिला दुय्यम स्थान देवू नये. अशा जुन्या विचारसरणीतून मुक्त होऊन स्त्रियांना लिंगभावानुसार व्यवहार न करता समान आदर व अधिकार आहेत अशी विचारधारा निर्धारित करून लैंगिक जागृती करावी. लिंगभाव म्हणजे स्त्रियांच्याबाबत वेगळी विचारधारा नव्हे तर, लिंगभाव म्हणजे स्त्री व पुरुष यांच्यातील सामाजिक स्थिती की, जी आज स्त्री व पुरुष यांच्यातील अस्मितेचा विचार हा लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून केला जावा असा आहे.

लिंगभाव संवेदनशीलता व समाज

'स्त्री' कोणत्याही समाजातील असो तिला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते हे जरी खरे असले तरी, भारतीय समाजातील स्त्री ही रूढी, परंपरेनुसार सामाजिक–आर्थिक जीवन हे लिंगभाव भेदाच्या आधारे स्त्रियांना दुय्यमता दिली जाते. सामाजिक दर्जानुसार स्त्रियांच्यावर सतत वर्चस्व प्रस्थापित होऊन स्त्रियांना सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक बंधने घालून तिचे जीवन जखडून टाकले आहे. तेव्हा तिने समाजात नेहमी दुय्यम राहून सेवा करावी व सहकार्य करत राहावे अशी समाजाची धारणा असते. समाजामध्ये स्त्रियांना लिंगभावानुसार स्त्रीत्व ही संकल्पना बहाल केली. स्त्री–पुरुष यांचा शारीरिक फरक असून त्यातून स्त्रियांच्या जबाबदाऱ्या आणि पुरुषांच्या जबाबदाऱ्या या लिंगभावनुसार समाजामध्ये घडवल्या गेल्या आहेत. आजही स्त्रियांच्या प्राथमिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली जाते. 'चूल आणि मूल', घरकाम, मुलांचे आणि वयोवृद्ध लोकांचे संगोपन, घर कामाबरोबरच जिथे स्त्रिया काम किंवा नोकरी करतात तेथील कामही जबाबदारीनुसार पार पाडतात पण दुय्यमतेचे

कारण देऊन शरीररचनाही लिंग व लिंगभाव आहे ही संवेदना सामाजिक वर्गवारी सूचित करते. तेव्हा स्त्रियांना समाजामध्ये कसे वागावे? कसे जगावे? याचा कृती कार्यक्रम हा लिंगभाव संवेदनशील दृष्टिकोनातून देऊन त्याची चिकित्सा होणे गरजेचे आहे. लिंगभावा संवेदनशीलकरिता शाळा, महाविद्यालयात व स्वयंसेवी संस्था यांनी कार्यशाळा आयोजित करून समाजातील मुलींना सन्मानाची व समानतेची वागणूक दिली पाहिजे. मुलगा व मुलगी असा भेदभाव करणार नाही, इतरांनाही करून देणार नाही, ही संवेदना समस्त समाजामध्ये निर्माण करणे गरजेचे आहे.

संशोधन समस्या

आज एकविसाव्या शतकात आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगातही महिलांना असमानतेची वागणूक ही स्त्री पुरुष समानतेकडे न रुजवता ती लिंगभाव संवेदनाशीलतेनुसार रुजत आहे. कारण आजही तिला घरातून व समाजातून समानतेच्या उंबरठ्यावर नेले जाते. भारतीय समाजाने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला असला तरी, स्त्रीचे रूप आजही बिन चेहऱ्याचे आहे. स्त्रियांना अनेक संधी देऊन त्यांचे सबलीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. पण स्त्रिया कोणत्या व्यवस्थेच्या शिकार होत आहेत? हे पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे शोषण कोणकोणत्या घटकात होत आहे? या प्रश्नांचा विचार सदर संशोधनामध्ये केलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१) लिंगभाव संवेदनशीलतेनुसार स्त्रियांची कौटुंबिक पार्श्वभूमी तपासणे.
२) लिंगभाव संवेदनशीलतेनुसार स्त्रियांची शैक्षणिक व आरोग्य विषयक माहिती अभ्यासणे.
३) लिंगभाव संवेदनशीलतेनुसार स्त्रियांच्यावर होणारा हिंसाचार व लैंगिक छळ तपासणे.

अभ्यास क्षेत्र : 'लिंगभाव संवेदना व सामाजिक वास्तव' याचा समाजशास्त्रीय अभ्यासाकरिता सांगली शहरातील काही भागातील मध्यम वर्गातील काम करणाऱ्या स्त्रियांची निवड केली आहे.

नमुना निवड : प्रस्तुत शोध निबंधाकरिता सांगली शहरातील खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या, दवाखान्यामध्ये आया व घरगुती काम करणाऱ्या, तसेच घरगुती व्यवसाय करणाऱ्या, स्त्रिया अशा एकूण ३०स्त्रियांची निवड केली आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांची भूमिका व दर्जा हा आधारित आहे का? स्त्रियांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा अभ्यास करायचा झाल्यास आज स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम आहे का? आजही स्त्रियांना कौटुंबिक हिंसाचार व जिथे काम करतात त्या कामाचे स्वरूप आणि कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक छळाला बळी पडावे लागते का? हे लिंगभाव संवेदनशीलतेतील वास्तवता अभ्यासणे गरजेचे आहे.

कौटुंबिक पार्श्वभूमी : लिंगभाव संवेदनशीलतेतील सामाजिक वास्तवता अभ्यासताना प्रस्तुत संशोधनाकरिता स्त्रियांची कौटुंबिक पार्श्वभूमी अभ्यासणे गरजेचे आहे. कौटुंबिक परिस्थिती आणि निर्णयामध्ये स्त्रियांचा सहभाग हा लिंगानुसार कसा आहे याचा विचार करणे गरजेचे आहे.

सारणी तक्ता क्र. १ : स्त्री सहभागास कारणीभूत घटक

अ. क्र.	कुटुंब प्रमुख	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	स्वत:	११	३६.६६
२	पती	१३	४३.३३
३	सासरे	०६	२०.०१
	एकूण	३०	१००

आजच्या युगामध्ये स्त्रिया कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून नोकरी व घरगुती कामे करत असल्या तरी कुटुंबप्रमुख म्हणून पती व सासरे यांच्याकडे आहे. ४३.३३ टक्के व २०.०१ टक्के पति व सासरे कुटुंब प्रमुख आहेत. तेव्हा मध्यमवर्गीय स्त्रियांच्या कुटुंबामध्ये आधी पुरुषप्रधान व्यवस्था दिसून येते, त्यानंतर ३६.६६ टक्के स्त्रिया स्वत: कुटुंब प्रमुख आहेत पण त्या परिस्थितीनुसार कुटुंब प्रमुख आहेत यामध्ये विधवा व घटस्फोटीत स्त्रियांचा समावेश आहे. असे सारणी तक्ता क्र.१ मधून दिसून येते.

सारणी तक्ता क्र. २ : वैवाहिक स्थितीनुसार वर्गीकरण

अ. क्र	वैवाहिक स्थिती	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	विवाहित	१३	४३.३३
२	विधवा	१०	३३.३४
३	घटस्फोटित	०७	२३.३३
	एकूण	३०	१००

वरील सारणी तक्ता क्रं.२ नुसार असे दिसून येते की, ४३.३३ टक्के विवाहित स्त्रियांचे प्रमुख पती आहे. त्या कुटुंबप्रमुख आणि घरकाम/नोकरी अशी दुहेरी भूमिका पार पडतात असे दिसून येते. तसेच विधवा महिलांची संख्या ३३.३४ टक्के आहे व घटस्फोटीत स्त्रियांची संख्या २३.३३ टक्के इतकी असलेली सारणी क्रं. २ नूसार दिसून येते.

सारणी तक्ता क्र. ३ : कुटुंबांच्या मासिक उत्पन्नावरून वर्गीकरण

अ. क्र	कुटुंबांचे मासिक उत्पन्न	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	५,००० ते १०,०००	०७	२३.३३
२	१०,००० ते १५,०००	१७	५६.६६
३	१५,००० ते २०,०००	०६	२०.०१
	एकूण	**३०**	**१००**

वरील सारणी तक्ता क्रं. ३ नुसार असे दिसून येते की, कुटुंबाच्या मासिक उत्पन्नामध्ये ५,००० ते १०,००० असे उत्पन्न असणारे ५६.६६ टक्के आहेत. १०,००० ते १५,००० उत्पन्न असणारे ५६.६६ टक्के इतके आहेत. यावरून असे दिसून येते की कुटुंबातील मासिक उत्पन्नात बदल झालेला नाही कारण वाढती महागाईची झळ ही कुटुंबातील सदस्यांना भेडसावत असून खाजगी नोकरी करणाऱ्या स्त्रिया आणि घरगुती व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया शिक्षण असूनही त्यांना चांगल्या पगाराची नोकरी आजही त्यांना प्राप्त नाही.

सारणी तक्ता क्र.४ : आर्थिक स्थितीनुसार वर्गीकरण

अ. क्र	आर्थिक स्थिती	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	मध्यम	२२	७३.३३
२	हलाखीची	०७	२६.६७
	एकूण	३०	१००

वरील सारणी तक्ता क्रं. ४ नुसार असे दिसून येते की, स्त्रिया ह्या कुटुंबातील आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी काम करताना दिसत आहे. ७३.३३ टक्के प्रतिसादकांची आर्थिक स्थिती मध्यम असून २६.६७ टक्के स्त्रियांची आर्थिक स्थिती हालाखीची आहे.

सारणी तक्ता क्र. ५ : कौटुंबिक निर्णयामध्ये सहभागी

अ. क्र	कौटुंबिक निर्णयप्रक्रियेत सहभाग	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	होय	११	३६.६७
२	नाही	१२	४०.००
३	स्वत:	०७	२३.३३
	एकूण	३०	१००

कौटुंबिक निर्णयामध्ये सहभागी असणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी पाहिली तर ३६.६७ टक्के स्त्रिया कौटुंबिक निर्णयामध्ये सहभागी आहेत हे सारणी तक्ता क्रं.५ दिसून येते परंतु घरातील कोणताही निर्णय घेतला तर फारसा विचार केला जात नाही तसेच ४०.०० टक्के स्त्रिया ह्या कौटुंबिक निर्णयामध्ये सहभागी होत नाही जर निर्णयामध्ये स्वत:चे मत व्यक्त केले तर तुम्हाला काय कळतं असे बोलले जाते त्यामुळे या स्त्रिया 'पती' व सासरे यांच्यावर अवलंबून आहे त्याचप्रमाणे २३.०० टक्के स्त्रिया या घटस्फोटीत असल्याकारणाने स्वत: निर्णय घेतात.

शैक्षणिक व आरोग्य विषयक वर्गीकरण

शिक्षण हा व्यक्तीचा मूलभूत हक्क मानला जातो शिक्षणामुळे मानवाचा विकास होतो हे अनेक विचारवंताने सिद्ध केले आहे. स्वत:चे जीवन सुखी व समृद्ध करावयाचे असेल तर, शिक्षण हे महत्त्वाचे आहे हे मानवाला उमगले. मानव म्हणून स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी जे प्रयत्न झाले त्यामध्ये स्त्री शिक्षण महत्त्वाचे मानले जाते.

सारणी तक्ता क्र. ६ : शैक्षणिक स्थितीनुसार वर्गीकरण

अ. क्र	शिक्षण	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	प्राथमिक आणि माध्यमिक	०९	३०.०१
२	पदवी	१७	५६.६६
३	पदव्युत्तर	०४	१३.३३
	एकूण	३०	१००

स्त्रियांच्या शैक्षणिक स्थितीनुसार विचार केला तर, आज स्त्री शिक्षण हे महत्त्वाचे मानले जाते. त्याचप्रमाणे स्त्रियांना शिक्षण हे बंधनकारक असल्यामुळे अशिक्षितपणा आज राहिला नाही. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ३०.०१ टक्के इतके आहे तर पदवी पर्यंत शिक्षण घेतलेले ५६.६६ टक्के इतके आहे. विशेषत: १३.३३ टक्के स्त्रिया ह्या पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या आहेत. पदव्युतर शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी नसल्यामुळे त्यांना खाजगी क्षेत्रामध्ये काम करत असल्याचे सारणी तक्ता क्रं. ६ वरुन दिसते.

शैक्षणिक पात्रतेनुसार स्त्रियांचा विचार केला तर, घरगुती निर्णय किंवा स्वत:चे मत कमी प्रमाणात विचारात घेतले जाते कारण पुरुषप्रधानत: अजूनही भारतीय कुटुंब व्यवस्थेचा गाभा आहे. तेव्हा किती मुलं असावे? मुलांचे व मुलींचे शिक्षण कुटुंबनियोजनाच्या संदर्भातील गर्भनिरोधकांच्या नेमक्या पद्धती इच्छेविरुद्ध गर्भपात या कारणामुळे जर पाहिले तर, आजही स्त्रिया लिंगभाव समस्येबद्दल संवेदनशील नाहीत हे सामाजिक वास्तव दिसून येते.

आरोग्यविषयक संदर्भातील पार्श्वभूमी

सारणी तक्ता क्र. ७ : आरोग्य उपचार पद्धती

अ. क्र	आरोग्य उपचार पद्धती	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	घरगुती उपचार	—	—
२	डॉक्टर	३०	१००
	एकूण	३०	१००

वरील सारणी तक्ता क्रं. ७ नुसार असे लक्षात येते की, १००.०० टक्के स्त्रिया आरोग्य उपचार पद्धती डॉक्टरकडे घेतात परंतु आरोग्या संदर्भात माहिती घेत असताना असे लक्षात आले की, स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घरातील सदस्य म्हणावे इतके घेत नाहीत कारण बर्‍याच स्त्रिया दुखणे अंगावर काढताना दिसून येतात याचे प्रमाण घरकाम करणाऱ्या स्त्रियांमध्ये दिसून येते तसेच व्यवसाय करणाऱ्या आणि नोकरी करणाऱ्या स्त्रिया विशेषत: आरोग्याकडे लक्ष देतात परंतु नोकरी व व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भामध्ये बोलायचं तर, आरोग्य आणि काम याचे संतुलन सांभाळत असताना काही गंभीर आजारांना सामोरे जावे लागते.

सारणी तक्ता क्र. ८ : कौटुंबिक हिंसाचार व अन्याय

अ. क्र	आरोग्य उपचार पद्धती	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	पती	१३	४३.३३
२	घरातील इतर व्यक्ती	०५	१६.६७
३	कोणाकडूनही नाही	१२	४०.००
	एकूण	३०	१००

वरील सारणी तक्ता क्रं. ८ वरून असे म्हणता येते की, कौटुंबिक हिंसा ही शारीरिकतेबरोबर भावनिक व मानसिकतेचा विचार करणे गरजेचे आहे. ४३.३३ टक्के स्त्रियांची कौटुंबिक हिंसा आहे हे मान्य असले तरी, या स्त्रियांचे पती

संशय घेणारे व दारू पिणारे आहेत. १६.६७ टक्के स्त्रियांच्या वर केवळ घरातील इतर व्यक्ती ज्या स्त्रिया विधवा आहेत त्यांना त्रास होतो. स्त्रिया या घटस्फोटीत व विधवा आहेत या स्वावलंबी असल्यामुळे त्यांच्या संदर्भात त्यांना कोणताही त्रास होत नाही असे प्रतिपादन केले.

सारणी तक्ता क्र. ९ : कामाच्या ठिकाणी होणारे अन्याय व अत्याचार

अ.क्र.	अन्यायाचे स्वरूप	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	(नोकरी आणि घरकाम करणाऱ्या स्त्रिया) अपमानास्पद वागणूक, दबाव, आणि कामावरून काढून टाकण्याची धमकी	१४	४६.६६
२	घरकाम आणि घरगुती व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया) अनुभव नाही	१६	५३.३४
	एकूण	३०	१००

वरील सारणी तक्ता क्रं. ९ वरून असे लक्षात येते की, स्त्रिया ह्या प्रत्येक क्षेत्रात नोकरी व घरकाम करणाऱ्या आहेत. या स्त्रियांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अन्यायास सामोरे जावे लागते. स्त्रियांना अपमानास्पद वागणूक, दबाव आणि चूक नसताना कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली जाते. या अत्याचाराचे स्वरूप छुप्या पद्धतीने दिसून येते. स्त्रिया ह्या घरकाम व घरगुती व्यवसाय करत असल्यास त्यांनी अनुभव नाही असे प्रतिपादन केले.

सारणी तक्ता क्र. १० : स्त्री हक्क कायदाविषयक माहिती

अ. क्र	कायदाविषयक माहिती	प्रतिसादकांची संख्या	टक्केवारी
१	होय	२७	९०.००
२	नाही	०३	१०.००
	एकूण	३०	१००

वरील सारणी तक्ता क्रं. १० वरून असे लक्षात येते की, स्त्री कायदा विषयक जनजागृती ९०.०० टक्के आहे. स्त्रियांना कायदा विषयक माहिती आहे पण या स्त्रिया कायद्याचा वापर करण्यासाठी फारश्या उत्सुक दिसत नसतात. आज ही खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित असाव्यात या संदर्भात तरतुदी केल्या आहेत परंतु आजही स्त्रियांना काही प्रमाणात अन्याय व अत्याचार यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्याशी व्यवहारही लिंगभावात्मक दृष्टिकोनात दृष्टीने तिच्याकडे पाहिले जाते.

सदर संशोधनात लिंगभाव संवेदनशील आणि सामाजिक वास्तव यासंदर्भात ही उद्दिष्टे सत्य दर्शवते.

निष्कर्ष व शिफारशी

१) लिंगभाव संवेदनशीलता व सामाजिक वास्तव या दृष्टिकोनातून विचार केला तर, कुटुंबातील वेतनामध्ये आर्थिक गरजा भागत नाही त्यामुळे स्त्रिया या खाजगी क्षेत्रात काम करतात.

२) आज स्त्रियांनी सर्व क्षेत्र पादांक्रांत केली आहे हे जरी खरे असले तरी, काही कामाच्या ठिकाणी त्यांना दिली जाणारी वागणूक ही आज ही दुय्यम आहे.

३) समाजात पुरुषांच्या वर्चस्वामुळे स्त्रियांना समस्या निर्माण होत असूनही कौटुंबिक व कामाच्या ठिकाणी लिंग पातळीनुसार भेदभाव केला जातो.

४) आज वेगाने बदलणाऱ्या युगात लिंगभाव संवेदनशीलतेचा महत्त्वाचा मुद्दा आहे कारण स्त्री सबलीकरणाबाबत जागतिक पातळीवर चर्चा होते पण स्त्रिया ज्या क्षेत्रात काम करतात त्या ठिकाणी तिच्या कार्यक्षमतेपेक्षा तिच्याकडे लिंगभावानुसारच पाहिले जाते.

५) स्त्रिया कामाच्या ठिकाणी अन्याय झालास विरोध करण्याचा प्रयत्न केला तर, स्त्रीची उपजीविका धोक्यात येते.

शिफारशी

१) स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा वाचवण्यासाठी ज्या शासकीय योजना आहेत त्या योजनांचा लाभ मिळाला तरच खऱ्या अर्थाने स्त्री सक्षम होईल.

२) समान संधी व समान स्थान मिळवण्याकरिता महिलांसाठी केलेल्या सर्व कायदेशीर तरतुदी आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे गरजेचे आहे.

३) महिलांनी प्रत्येक कामात सक्रिय होऊन स्वत:चे निर्णय स्वत: घेतले गेले की जेणेकरून लिंगभेदाची भावना मनात येणार नाही.

४) पुरुष आणि स्त्रियांचे हक्क मिळवून देऊन स्त्रियांच्या निर्णयाचा आदर केला पाहिजे यामुळे लिंगभाव कमी होईल.

५) स्त्रिया ज्या खाजगी क्षेत्रात काम करीत आहे त्या ठिकाणी तक्रार निवारण यंत्रणा असली पाहिजे आणि कामाच्या ठिकाणातील वातावरण निरोगी वृत्तीने विकसित केले पाहिजे तरच लिंगभाव कमी होईल.

सारांश :

प्रतिसादकांना कुटुंबाची आर्थिक पार्श्वभूमी कमी दर्जाची असल्याकारणाने आर्थिक समस्यांना स्त्रियांना तोंड द्यावे लागते, याकरिता आज स्त्री ही मिळेल ते काम स्वीकारत आहे पण स्त्री सबलीकरणाच्या माध्यमातून पाहिले तर, स्त्रियांना सामाजिक समस्येच्या पैलूंना तोंड द्यावे लागते. स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व सामाजिक समस्येबरोबर अन्याय व अत्याचार या समस्यांना तोंड द्यावे लागते. याबाबत काही कळीचे मुद्दे दिसून येतात म्हणून पुरुषांनी स्त्रियांना समानतेचे आणि सर्व प्रकारचे स्वतंत्र अधिकार दिले तरच लिंगभाव संवेदनशीलता योग्य प्रकारे विकसित होईल.

संदर्भ :

१) धनागरे द. ना. २००५, संकल्पनाचे विश्व व सामाजिक वास्तव, प्रकाशक अरुण वि. पारंगावकर, पूणे.

२) धाडियाली रेहाना, २००७, समकालीन भारतातील नागरी स्त्रिया, अनुवाद, गोसावी मंजुषा, प्रकाशक डायमंड पब्लिकेशन, पूणे.

३) नाईक चित्रा, डिसेंबर १९९२, स्त्रियांचे शिक्षण व विकास, शिक्षण आणि समाज.

४) भसीन कमला, २०१० (अनुवाद: तांबे श्रुती), लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ:मय गृह, मुबंई.

५) दुबे लिला, २००९ (अनुवाद: भागवत विद्युत), मानवशास्त्रातील लिंगभावाची शोधमोहिम, डायमंड पब्लिकेशन, पूणे.

६) भागवत विद्युत, २००८, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन, पूणे.

७) गायकवाड सुप्रिया, स्त्रियांचा राजकीय सहभाग: जात, वर्ग लिंगभावाची चिकित्सा, बायजा, फेब्रुवारी २००७.

८) भागवत विद्युत व रेगे शर्मिला, पलसाने वंदना, १९९४, स्त्री जिवनाची गुंतागुंत, स्त्री अभ्यास केंद्र, समाजशास्त्र विभाग, पूणे विद्यापीठ, पूणे, विकास अध्ययन केंद्र, मुंबई.

९) Ahlawat Neerja, 2005, Domestic Violence Against Women: Emerging concerns in Rural Haryana, Social Action. Vol. 55

१०) Chandra Keshav, 2011. Women law and Society, Aarati Prakashan, New Delhi.

११) Desai Neera, 1987, Women and Society in India; Ajanta Publication, New Delhi.

१२) Jayapalan N, 2001, Women and Human Rights, Atlantic Publication, New Delhi.

१३) Madhurima, 1996, Violence Against Women: Dynamies of Conjugate Relations Gyan, Publishing, New Delhi.

१४) Omvedt Gail. 1986, Violence Against Women: New Movement and New Theories in India, Kali for Women; New Delhi.

१५) Wikipedia- Protection of women from domestic violence act-2005.

***प्रमुख, समाजशास्त्र विभाग, श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय, सांगली.**

***

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत विविध कालखंडातील भारतीय महिलांचे सामाजिक स्थान

*डॉ.रमेश एच. पाटील

सारांश:

हा अभ्यास प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या प्रत्येक कालखंडातील भारतातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो. या अभ्यासाचे निष्कर्ष असे दर्शवतात की प्रत्येक कालखंडात पुरुषांच्या तुलनेत आणि पितृसत्ताक समाजात स्त्रियांची स्थिती नेहमीच दुय्यम राहिली आहे.म्हणजेच आपल्या समाजात महिलांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैवाहिक, सांस्कृतिक आणि धार्मिक स्थिती ही पुरुषांच्या तुलनेत निकृष्ट आहे. आजही एकविसाव्या शतकातील भारतीय पितृसत्ताक समाजात महिलांना पुरुषांइतका दर्जा नाही. या अभ्यासाचे निष्कर्ष पितृसत्ताक समाजातील सर्व क्षेत्रातील महिलांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतात.

भारतीय समाजात कुटुंब, धर्म, कायदा आणि प्रसारमाध्यमे अशा समाजाच्या सर्व घटकांमध्ये महिलांची भूमिका दुय्यम आहे. पुनरुत्पादन, श्रमशक्ती, लैंगिकता, उत्पादनाची साधने या सर्व गोष्टी पुरुषप्रधान संस्कृतीच्या नियंत्रणाखाली आहेत. त्यामुळे या सर्व बाबतीत स्त्रीला पुरुषांच्या तुलनेत सामाजिक स्थितीत दुय्यम स्थान दिले गेले आहे. समाजजीवनाच्या विविध पातळयांवर स्त्री-पुरुष यांच्यातील सामाजिक संबंधांचा विचार केल्यास असे दिसून येते की, कुटुंब, धर्म, जात, संस्कृती अशा सामाजिक जीवनातील सर्वच बाबतीत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळत नाही. तीला पुरुषांची दासी, गुलाम, संपत्ती समजली जाते. सामाजिक जीवनात महिलांना राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक हक्कांपासून वंचित ठेवले गेले आहे. "चूल आणि मूल", "मुकी बिचारी- कुणीही हाका" ही महिलांबद्दलची वृत्ती आहे. ती पुरुषी वर्चस्वाखाली प्रेरित असल्याचे आढळून येते. समाजजीवनाच्या विविध पातळयांवर स्त्री-पुरुष यांच्यातील सामाजिक संबंधांचा विचार केल्यास असे दिसून येते की, कुटुंब, धर्म, जात, संस्कृती अशा सामाजिक जीवनातील सर्वच बाबतीत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळत नाही.सामाजिक जीवनात महिलांना राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक हक्कांपासून वंचित ठेवले गेले आहे.

प्रस्तावना:

आज एकविसाव्या शतकात स्वत:ला आधुनिक म्हणवणाऱ्या पुरुषांचा दृष्टिकोन स्त्रियांच्या बाबतीत अपवादात्मकपणे आधुनिक आहे. बहुसंख्य पुरुष महिलांकडे पारंपरिक दृष्टिकोनातून पाहतात. स्त्रियांबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या अनेक समस्यांच्या मुळाशी आहे. इतकेच नाही तर पुरुषप्रधान समाजात खरेच पुरुष आपल्यापेक्षा वरचढ आहेत, आपण कनिष्ठ आहोत, त्यामुळे आपल्याला पुरुषांचे संरक्षण हवे आहे असे वाटते. त्यामुळे समाजात निर्माण झालेली ही लिंग आधारित वृत्ती महिलांच्या जीवनात समस्या निर्माण करत आहे. महिला आणि पुरुष हे समाजाचे घटक आहेत आणि समाज त्यांच्याकडे समानतेने न पाहता वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो. तसेच त्यांच्याशी समान वागणूक न देता वेगळ्या पद्धतीने वागते. म्हणजेच समाज स्त्री-पुरुष असा भेदभाव करतो. उदा. स्त्रियांनी असे वागावे, पुरुषांनी असे वागावे आणि समाजाने स्त्रियांचा पेहराव, स्त्रियांचे राहणीमान, पुरुषांचे राहणीमान अशा अनेक बाबींमध्ये भेदभाव केला जातो. लिंग हा शब्द समाजातील स्त्री आणि पुरुष यांच्यातील फरक दर्शविण्यासाठी वापरला जातो.पुरुष आणि स्त्रियांची जैविक आणि शारीरिक वैशिष्ट्ये भिन्न आहेत. समाज सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावर स्त्री आणि पुरुषांची काही भिन्न वैशिष्ट्ये देखील ठरवतो. यात प्रामुख्याने स्त्रिया भ्याड, पुरुष धाडसी, स्त्रिया कमकुवत, पुरुष बलवान, स्त्रिया सहिष्णू, पुरुष आक्रमक, स्त्रिया भावनिक, पुरुष सक्षम, स्त्रिया अधीनता, पुरुष वर्चस्ववादी आणि महत्त्वाकांक्षी असण्याबद्दल आहे. समाज निसर्गाने निर्माण केलेला नसतो. यातून लिंग या शब्दाचा उदय होतो. स्त्री आणि पुरुषांनी वेगळे वागावे अशी समाजाची अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे स्त्रीने काय करावे, तिने कसे वागावे याविषयी समाजाने काही गोष्टी सांगितल्या आहेत, मुख्यत्वे घरकाम, स्वयंपाक, मुलांचे संगोपन या गोष्टी स्त्रियांशी निगडित आहेत, तर

पुरुषांनी कुटुंबाबाहेर कठोर परिश्रम करणे अपेक्षित आहे. पुरुषांच्या तुलनेत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैवाहिक,सांस्कृतिक व धार्मिक पातळीवर असणारे स्थान गौण असलेले आढळते. आजही एकविसाव्या शतकात भारतीय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळत नाही हे वास्तव आहे. जगाच्या इतिहासात प्रत्येक कालखंडात स्त्रीला दुय्यम म्हणूनच वागवले गेल्याचे आढळते.स्थलकाल व देशाचाही त्यात अपवाद नाही. आजची परिस्थितीही यापेक्षा वेगळी आढळत नाही. समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीला धार्मिक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पातळीवर नेहमीच दुय्यम महत्त्व दिले जाते.भारतीय समाजात प्रत्येक कालखंडात स्त्रीची सामाजिक स्थिती वेगवेगळी दिसत असली तरी पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत आजचे स्थान निश्चितच गौण आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :

1) महिलांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या दुय्यम स्थानाचा अभ्यास करणे

संशोधन पद्धत :

प्रस्तुत संशोधन निबंध दुय्यम साधनांवर आधारित आहे. या अभ्यासासाठी लागणारा सर्व डेटा विविध पुस्तक, इंटरनेट आणि वर्तमानपत्रांच्या माध्यमातून प्राप्त करण्यात आला आहे. या अभ्यासाचा उद्देश भारतातील महिलांची सामाजिक स्थितीच अभ्यास करणे त्यामुळे संबंधित डेटा गोळा करून हा अभ्यास पूर्ण करण्यात आला आहे.

प्राचीन कालखंड :

प्राचीन कालखंडाचे सामान्यतः मातृसत्ताक कालखंड, वैदिक कालखंड, उत्तर वैदिक कालखंड असे तीन कालखंड पाडता येतात. या कालखंडामध्ये स्त्रियांची सामाजिक स्थिती काय होती याचा आढावा घेता येईल

1) मातृसत्ताक कालखंड :

प्राचीन काळात स्त्रियांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा समानतेचा होता. किंबहुना स्त्रिया या महात्ममंडित आहेत अशी भावना होती. कारण अपत्य निर्मितीमध्ये पुरुषांचा सहभाग असतो हे पुरुषांना ठाऊक नव्हते .पृथ्वी आणि स्त्रिया यांच्यातच नवनिर्मितीची क्षमता आहे आणि यासाठी काहीतरी दैवी आधार असला पाहिजे, अशी सर्वांची भावना होती. याशिवाय शेतीचा शोधदेखील स्त्रियानी लावला होता. स्त्रियांच्या या अत्यंत महत्त्वाच्या कामगिरीमुळे भटका समाज काही प्रमाणात स्थिर झाला.नदीकाठी वास्तव्य करून गाळाच्या मातीत शेती करण्याची कल्पना स्त्रिला सुचली. त्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटला, समाज स्थिर झाला व त्यानंतरच समाजात मातृसत्ताक व्यवस्था अस्तित्वात आली. मातृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्री पुरुष हे समान होते. युद्धकला, आयुर्वेद व सांख्यिकी तत्त्वज्ञानामध्ये स्त्रिया अग्रेसर होत्या. अनार्य संस्कृती स्त्रीप्रधान होती. व आर्य संस्कृती पुरुषप्रधान होती. शूर्पणखा, त्राटीका या अनार्य स्त्रिया गणाधिपती असल्याचे संदर्भ रामायणात येतात. या स्त्रिया कुटुंब प्रमुख असत. त्यांना समाज व कुटुंबामध्ये सन्मानाची वागणूक मिळत असे. अनार्य स्त्रीला निर्णय स्वातंत्र्य होते .त्यांच्यामध्ये स्वयंवराची पद्धत अस्तित्वात होती. आदिम गण समाजात यज्ञाची चौकट बांधणे ,विटा रचणे इत्यादी कामे स्त्रिया करत, इतकेच नव्हे तर गणभूमिकेच्या वाटपाचे अधिकार देखील त्यांच्याकडे होते. स्त्रियांनी मानवी जीवनासाठी महत्त्वाचा शोध लावला तो म्हणजे भूमितीचा शोध होय. सहाजिकच मातृसत्ताक समाजात स्त्रीचा दर्जा उच्च राहिला होता. पुढे शेती तंत्रज्ञानात परंपरागत शेती कल्पना मागे पडून शेतीसाठी नांगराचा व पशुचा वापर करण्याची पद्धती रूढ झाली. त्याचबरोबर अपत्यनिर्मितीमध्ये पुरुषाचे स्थानही स्पष्ट झाले. परिणामी स्त्रीविषयक महात्म्याची कल्पना संपुष्टात आली व समाजात मातृसत्तेची जागा पुरुषप्रधान संस्कृतीने घेतली आणि येथूनच स्त्रियांच्या दर्जाचा ऱ्हास होऊन स्त्रियांना दुय्यम वागणूक मिळण्यास सुरुवात झाली.

2) वैदिक कालखंड:

इसवी सन पूर्व ३००० ते इसवीसन पूर्व २५०० या कालावधीदरम्यान आर्यांचे भारतात आगमन झाले. आर्यांनी भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अस्तित्वात असणाऱ्या मातृसत्ताक अनार्य संस्कृतीचा पराभव केला. आणि भारतीय व्यवस्थेमध्ये वर्णाची स्थापना करून भेदभाव प्रस्थापीत केला .वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता.त्यामुळे "ब्रह्मवादिनी" आयुष्यभर अविवाहित राहून ज्ञानसाधना करीत असत. बालविवाह, सतीप्रथा अशा जाचक चालीरीती त्या काळात नव्हत्या, परंतु संपत्तीवर अधिकार मात्र स्त्रियांचा नव्हता. भारतातील स्त्रियांच्या संदर्भात दोन विचार प्रवाह आढळतात. एक प्रवाह स्त्री-पुरुष समानता मानतो, तर दुसरा प्रवाह स्त्रीला केवळ कनिष्ट मानतो. याबाबत "आपस्तंभ" म्हणतात, की जेव्हा स्त्री-रस्त्यावरून जात असेल तेव्हा तिला सर्वांनी वाट द्यावी . यातून त्यांचा उदार दृष्टिकोन दिसतो आणि मनुस्मृती पूर्व काळावर अनार्यांच्या सांस्कृतिक मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचा प्रभाव असल्याने स्त्रीला काही प्रमाणात पुरुषाच्या बरोबरीचे स्थान देण्याचा प्रघात दिसतो. "प्रा. राम आहुजा" म्हणतात, या काळात स्त्री अर्थार्जन करीत नव्हती पण कृषी क्षेत्रात कार्य करताना दिसते. स्त्रीला पितृधनाचा वाटा मिळत असे. तर मातेची संपत्ती मुला-मुलींमध्ये समान वाटली जाई. आर्य आणि अनार्य यांच्यात सतत संघर्ष होत असे. त्यामुळे स्त्रीयांच्यावर घरची जबाबदारी पडत असे. स्त्रीया घरकाम,कापड तयार करणे,अन्न तयार करणे, शिकार ,फळे गोळा करणे अशा प्रकारच्या उत्पादन प्रक्रियेत सहभागी होत असत .धार्मिक कार्यक्रमांमध्ये स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते.याचा अर्थ वैदिक काळात स्त्रीचा दर्जा समाधानकारक होता. कारण काही उपनिषदामध्ये गार्गी, मैत्रेयी यांच्या कथा आलेल्या आहेत. त्या वैदिक काळातील विदुषी स्त्रीया होत्या असे सांगून त्या काळची थोरवी सांगितले जाते.या संदर्भातही "डॉ. आ.ह.साळुंके" म्हणतात की, पण त्याबरोबरच एक विलक्षण खंत मनाला लागून राहते व ती म्हणजे गार्गी व मैत्रेयीचे चित्र हे तत्कालीन भारतीय स्त्रीचे प्रातिनिधिक चित्र नाही तर अपवादात्मक वास्तव आहे.

3) उत्तर वैदिक कालखंड

इसवीसन पूर्व १५०० ते इसवी सन ५०० हा कालखंड उत्तर वैदिक कालखंड म्हणून ओळखला जातो. याच काळात रामायण, महाभारत ही "महाकाव्ये" निर्माण करण्यात आली. हा कालखंड स्त्रियांच्या दर्जाविषयी संक्रमणाचा कालखंड होता.उत्तर वैदिक कालखंडात स्त्रीचा दर्जा घसरण्यास प्रारंभ झाला.'ज्या देशाचे नेतृत्व स्त्री करत असेल तेथे वास्तव्य करु नये' हे मनूवचन त्या काळात स्त्रीची स्थिती कशी होते याचे चित्र सांगते. या काळात आर्यांनी अनार्यांचा पराभव केल्यामुळे त्यांना आपले जीवन स्थिर करण्यास सहाय्य झाले. आर्यांना कोणीच विरोधक उरला नव्हता, अशा स्थिर जीवनात स्त्रीयांचा आर्थिक आणि राजकीय सहभाग कमी झाला. त्यामुळे स्त्रीयांचा दर्जा व स्थानात घसरण होण्यास सुरवात झाली. वैदिक काळात असणारा स्त्री शिक्षण दर्जा उत्तर वैदिक काळात फार संकुचित होत गेला.सार्वजनिक जीवनातील स्त्रियांचा सहभाग फारच संकुचित झाला. आर्य- अनार्यांच्या संघर्षात अनार्यांचा पराभव झाल्यामुळे अनार्य पुरुषांच्याप्रमाणे अनार्य स्त्रियादेखील आर्यांच्या सेवेत दाखल झाल्या. त्यामुळे आर्य पुरुष आणि अनार्य स्त्रिया यांच्यात विवाह देखील होऊ लागले."डॉ. आळतेकर" म्हणतात की, आर्य पुरुषांनी अनार्य स्त्रियांशी अनुलोम विवाह-संबंध प्रस्थापित केले. परंतु धार्मिक कार्यात अनार्य स्त्रियांना सहभागी करून घेण्यात आर्य धर्मशास्त्रकारांनी विरोध केला. त्यामुळे धार्मिक जीवनात स्त्रियांचा प्रवेश निषिद्ध करण्यात आला. याच काळात मुलींचे विवाहाचे वय कमी झाले, बाल विवाहामुळे स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. वर्ण व्यवस्था बळकट झाल्यामुळे वर्णसंकराच्या भीतीमुळे बालविवाहास मान्यता मिळाली. पुरुषसत्ताक व्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तर स्त्रीयावर अनेक बंधने याच काळात लादली गेली.

अनार्यांच्या मातृसत्ताक व्यवस्थेत बदल करून पितृसत्ताक व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्त्रियांचा कसा बळी गेला . याबाबत "डॉ गाडगीळ" म्हणतात की, पुरुषप्रधान वैदिक आर्य समाजाने अनेक क्रूर चालीरीतीच्या साह्याने मातृसत्ताक व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांना दिली जाणारी अमानुष वागणूक आणि सतीची चाल या सर्व गोष्टी या दृष्टीने उद्बोधक आहेत. स्त्रीच्या तुलनेत पुरुष श्रेष्ठ आहे.हि पुरुषप्रधान समाजाची कल्पना येथील मातृसत्ताक समाज मनावर बिंबवण्यासाठी वैदिक आर्य परंपरेत वाढलेल्या विचारवंतांनी या चाली रूढ केल्या. याच काळात स्त्रियांच्या हिन व दुय्यम दर्जाला धर्माची जोड देण्यासाठी धर्मग्रंथाची रचना करण्यात आली. मनुस्मृति देखील याच कालावधीत रचली गेली. स्त्रीयांच्या दुय्यम दर्जाला धर्माची जोड दिल्यामुळे स्त्रीयांचा दर्जा खालावला गेला.एकूणच या काळात स्त्रीयांचा दर्जाच्या मनुस्मृति व इतर तत्सम धर्मग्रंथाच्या प्रभावामुळे खालावला.स्त्रीचे विवाहाचे वय कमी झाले. बालविवाह प्रथा अस्तित्वात आली.स्त्रीने पुरुष जातीचेच अपत्य जन्माला घालावे अशी अपेक्षा तिच्याकडून करण्यात येऊ लागली.तिच्यासाठी चूल व मूल हेच कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आले.म्हणून अज्ञान ,बालिका,धार्मिक कृती न जाणणारी, केवळ पुत्रप्राप्ती व कामतृप्तीचे साधन अशी स्त्रीची अवस्था झाली. स्त्री-पुरुषांच्या चारित्र्याविषयी वेगळे-वेगळे नियम बनवण्यात आले. तिच्यासाठी विवाह अनिवार्य ठरला. राजे-राजवाड्यांच्या काही स्त्रियांना अपवादात्मक स्वरूपात स्वातंत्र्य मिळत असे. महाकाव्य, पुराणे व इतर धर्मग्रंथ मनुस्मृतीला आदर्श मानणारे होते.म्हणजे या काळातील स्त्रीची अवस्था सर्वाधिक बिकट होती. एकूण पुराण काळामध्ये ब्राह्मणी संस्कृती,जातीप्रथेची ताठरता ,संयुक्त कुटुंब ,स्त्री शिक्षणाचा अभाव, आर्य कुटुंबात अनार्य स्त्रीचा पत्नी म्हणून प्रवेश आणि परकीयांचे आक्रमण यामुळे स्त्रीची स्थिती दयनीय झाली होती.

ब) मध्ययुगीन कालखंड:

साधारणत इसवी सन १२०० ते १८१८ हा कालखंड मध्ययुगीन कालखंड म्हणून मानला जातो .या काळात भारतीय जीवन हे विषमता, अन्याय, अज्ञान या घटकांचे प्राबल्य असणारे व धर्मग्रंथावर आधारलेले जीवन होते.धर्मग्रंथाच्या आधारे निर्माण केलेली महाकाव्ये हा समाजाच्या आधार होते. रामायण व महाभारत हे सर्व अशा आदर्शानी भरलेले आहे. उदा.महाभारतामध्ये ब्राह्मणाचा मुलगा ब्राह्मण असतो मग त्याची आई क्षत्रिय व वैश्य असली तर त्यात काही फरक पडत नाही.

मध्ययुगीन काळात वर्णव्यवस्थेचे जातिव्यवस्थेत रूपांतर झाल्यामुळे स्त्रियांच्या जीवनाचा हा कालखंड अंधकारमय कालखंड मानला जातो.ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णाचे वर्णसंकर होऊन त्यातून असंख्य जातींची निर्मिती झाली. या जातीव्यवस्थेच्या सर्वात मोठ्या बळी स्त्रीयाच ठरल्या. कारण जातीची शुद्धता टिकवण्याची फार मोठी जबाबदारी स्त्रियांवर येऊन पडली.त्यासाठी स्त्रियांच्यावर अनेक बंधने घातली गेली. त्यासाठी स्त्रीचा शिक्षण अधिकार काढून घेण्यात आला व स्त्रीला बौद्धिक गुलामगिरीत अडकवले गेले. स्त्रीच्या पावित्र्याला धर्माशी जोडून देव-धर्म, व्रत-वैकल्य यामध्ये गुंतवून ठेवण्यात आले. मुलीने आंतरजातीय विवाह करू नये म्हणून बालविवाहाची प्रथा अस्तित्वात आली. विधवेनेही आंतरजातीय विवाह करू नये म्हणून विधवापुनर्विवाहाला बंदी घालण्यात आली. त्याच बरोबर सती प्रथा अस्तित्वात आली. आदर्श माता, आदर्श पत्नी या सारख्या गोष्टींनी स्त्रीयांचे गौरवीकरण करून त्यांना बंदिस्त करण्यात आले.

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारतावर इस्लामी राजवट सुरू झाली. त्यामुळे हिंदू-मुस्लिम यांच्यातील परस्पर संबंधातून एकमेकावर रूढी परंपरेचा प्रभाव पडला. इस्लाम आणि हिंदू धर्म यांच्यातील परस्पर भिन्न संस्कृतीमुळे

इस्लामपासून हिंदू धर्म व स्त्रियांच्या रक्षणाचा प्रयत्न केला गेला. याचा परिणाम स्त्रीच्या आधीच खालावलेल्या दर्जावर होऊन आधीच हीन असणारा स्त्रीचा दर्जा आणखीन गौण बनला.

यामुळे हिंदू स्त्रियांना चार भिंतीच्या आत बंदिस्त केले.मुस्लिम स्त्रीयांची स्थितीदेखील अत्यंत विदारक अशीच होती. तिला कोणतेही अधिकार दिले गेले नव्हते ,बुरख्याआड आपले जीवन जगावे लागत होते. त्यामुळे त्यांच्या दर्जाची स्थिती देखील अत्यंत विदारक अशीच होती.

क) आधुनिक कालखंड:

भारताचा आजपर्यंतचा इतिहास पितृसत्ताक व्यवस्थेच्या वर्चस्वाखाली असलेला आहे.त्याला आजचे 21 वे शतक देखील अपवाद नाही. त्यामुळेच सामाजिक,आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक ,शैक्षणिक दृष्ट्या स्त्रियांचा दर्जा आधुनिक काळात देखील खालावलेला दिसून येतो. भारताच्या इतिहासात मातृसत्ताक कालखंडातील काही गोष्टी सोडल्या तर ब्रिटिश कालखंडात प्रामुख्याने राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या प्रश्नावर एकोणिसाव्या शतकात प्रचंड कार्य केले. त्यांच्या कार्याने परिवर्तनाला सुरुवात झालेली दिसून येते. स्त्रियांच्या विकासाचे आधुनिक कालखंडात दोन भाग पाडता येतील.त्यातील एक स्वातंत्र्यपूर्व कालखंड, दुसरा स्वातंत्र्योत्तर कालखंड होय. या दोन्ही कालखंडातील स्त्रीचे समाजातील स्थान समजून घेता येईल.

1) स्वातंत्र्यपूर्व कालखंड:

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीला माता, देव म्हणून पूजले जात होते तर दुसरीकडे स्त्रीला दुय्यम म्हणून वागवले जात होते. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांचे समाजातील व घरातील स्थान दुय्यमच होते. चूल-मूल यात स्त्रीला बंदिस्त करून तिला पत्नी, माता, बहीण, सून, सासू या नात्यांच्या बंधनामध्ये बांधून ठेवले होते. तिच्या क्रियाशीलतेला कोणताही वाव दिला जात नव्हता . एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला भारतामध्ये ब्रिटिश राजवटीला सुरुवात होऊन त्यातून वसाहतवाद व भांडवलशाहीची एक नवीन व्यवस्था भारतीयांच्या वाट्याला आली. या काळात ब्रिटिशांनी भारतीय स्त्री नावाचा दडपलेला एक गट आहे, असे मानून आपले नैतिक वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला .भारतीय समाज सुधारक राजाराम मोहन रॉय यांनी लॉर्ड बेटिंग यांच्या साह्याने पहिल्यांदा १८२९ मध्ये सतीबंदीचा कायदा केला. पण १८३९ साली त्यात ऐच्छिक सतीचे कलम घुसडले गेले. भारतीयांच्या मागासलेपणाचे मुख्य कारण स्त्रियांना बंदिस्त करून ठेवणे हे आहे, हे ओळखून महात्मा ज्योतिबा फुले यांनी१८४८ मध्ये पुणे येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या अत्यंत क्रांतिकारी निर्णयामुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात बदल घडून यायला सुरुवात झाली. पुढे १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह हा कायदा करण्यात आला परंतु तत्कालीन समाज व्यवस्थेने हा कायदा स्वीकारला नाही. पुढे महात्मा फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा हा दृष्टिकोन होता की, तो म्हणजे पुरूषी अन्याय अत्याचाराला बळी पडलेल्या समाजातील विधवा, परित्यक्ता, निराधार महिलांनी आपले जीवन संपवू नये,त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहात त्यांच्या मुलांना जन्म द्यावा व बाळ हवे असल्यास आपल्या घरी घेऊन जावे किंवा बालहत्या प्रतिबंधकगृहात ठेवून जावे. सुरुवातीला ब्रिटिशांच्या शिक्षण व्यवस्थेतुन स्त्रीया शिक्षण घेऊ लागल्या. सत्यशोधकी विद्रोही वारसा घेऊन पंडिता रमाबाई आणि ताराबाई शिंदे यांनी आपले विचार मांडले."स्त्री-पुरुष"तुलना या सारख्या निबंधातून ताराबाई शिंदे भारतातील सर्व स्त्रियांच्या वतीने प्रश्न उभे करीत होत्या.समाज परिवर्तनशील असल्याने या काळात ब्रिटिश शिक्षण,पुरोगामी कायदे,समाजसुधारकांचे प्रयत्न यामुळे स्त्रिया अगदी थोडया प्रमाणात स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाल्या. तसेच राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीच्या स्थितीत फारसा फरक पडला नाही.

2) स्वातंत्रोत्तर कालखंड:

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही व्यवस्था स्वीकारली गेली. स्वतंत्र संविधान भारताने स्वीकारले. संविधानाने किंवा राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान स्थान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय कायदे मंडळात कायदामंत्री म्हणून निवड झाली.त्यांनी स्त्रियांना समानता मिळवून देण्यासाठी' 'हिंदू कोड बिल' संसदेत मांडले,परंतु ते त्यावेळच्या पुरुषी मानसिकतेच्या नेत्यांमुळे मान्य झाले नाही.भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्त्रियांना समानतेचा दर्जा देण्यासाठी हा पहिला प्रयत्न होता. त्यासाठी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे धैर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले होते. त्यानंतर स्त्रीयांच्या बुद्धीला,कर्तुत्वाला व कार्यशक्तीला वाव देण्यासाठी अनेक स्त्री मुक्ती संघटना निर्माण झाल्या. या संघटना स्त्रीयांच्यामध्ये जागृती,स्वाभिमान व आत्मसन्मान निर्माण करून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्नशील आहेत. स्त्रियांनी आज शिक्षण,साहित्य, कला,राजकारण व समाजकारण इत्यादी क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखवले आहे. 20 वे व 21 वे शतक भारतीय समाजजीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे ठरते आहे .या कालखंडाने खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रियांच्या जीवनात अनेक आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. या काळात स्त्रीचे व्यक्तिमत्व बदलले,स्त्रीचे सामाजिक,सांस्कृतिक व कौटुंबिक दृष्टीने असणारे अस्तित्व अर्थपूर्ण बनत गेले. स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन नव्याने तयार होत आहे. मुख्य म्हणजे स्त्रीला स्वतःलाच आत्मप्रतिष्ठेची जाणीव झाल्याने स्वतःकडे आणि जीवनातील अनेक बाबीकडे बघण्याची नवीन दृष्टी निर्माण होत आहे. आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाबाबत निर्णय घेण्याची क्षमता आधुनिक काळात प्राप्त झाली आहे.

स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील आजवर सुप्त असणाऱ्या, दबल्या गेलेल्या अनेक क्षमता व अनुभूती ओळखता आल्याने स्वतःची ओळख विकसित होत आहे.आज शिक्षण, विज्ञान, उद्योग, व्यवसाय, साहित्य, संगीत,कला ,राजकारण, प्रशासन, नाट्य-चित्रपट अशा विविध क्षेत्रात स्त्रियांनी पदार्पण केले आहे. आज कोणतेही क्षेत्र स्त्रीला वर्ज्य राहिले नाही. समाजाच्या विविध क्षेत्रात कार्य करण्याची क्षमता सिद्ध करून स्त्रीने आपले अस्तित्व निश्चित करण्याच्या प्रयत्न केला आहे.आज स्त्रीच्या भोवतालचे सामाजिक व सांस्कृतीक पर्यावरण बदलत आहे .त्यातून निर्माण होणाऱ्या प्रत्येक संधीत स्त्रियांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. तरीदेखील समाजव्यवस्थेत स्त्रीच्या सामाजिक स्थितीचा विचार करता आणि सामाजिक स्तरीकरणातील लिंग या घटकाचा विचार केला असता स्त्री-पुरुष दर्जाचा विचार होतो. ब्रिटिश कालखंडापासून भारतीय स्त्रियांच्या दर्जात सुधारणा होण्यास प्रारंभ झाला .स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध पुरोगामी कायदे, विविध प्रकल्प, स्त्रियांसाठी विविध क्षेत्रात संधी इत्यादीच्या माध्यमातून जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. स्त्रियांनीदेखील स्वतःच्या क्षमतांचा विकास करून आपला दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला. मात्र पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रीला खरोखरच पुरुषांच्या बरोबरीचे मानले आहे का? बरोबरीचा दर्जा दिला आहे का? हे याठिकाणी पाहणे महत्त्वाचे ठरते. या काळात स्त्रियांनी शिक्षण,नोकरी, व्यवसाय, राजकारण ,समाजकारणात आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्योत्तर कालखंडात केलेला दिसून येत आहे.

ड) निष्कर्ष:

आधुनिक काळात महिलांचे समाजातील स्थान आणि महिलांच्या समस्यांवर जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. भारतातही महिलांच्या प्रश्नावर मोठ्या प्रमाणावर विचार केला जात आहे. महिलांचे समाजातील स्थान, त्यांच्या समस्या, समस्या यांचा अभ्यास करण्यासाठी विविध महाविद्यालये, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था इत्यादी ठिकाणी महिला अभ्यास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.महिलांच्या प्रश्नांवर संशोधन सुरू आहे. स्त्रीवादी विचारवंत महिलांच्या प्रश्नाकडे समाजातील सर्वांचे लक्ष वेधत आहेत. पण एकविसाव्या शतकात बुद्धिमत्ता,

शारिरीक क्षमता, सर्जनशीलतेचा धोका इत्यादी बाबींचा विचार करता पुरुषांपेक्षा कमी लेखण्याची प्रवृत्ती कायम असल्याचे दिसते.

जगातील बहुसंख्य समाज पुरुषप्रधान आहेत. पुरुषप्रधान समाजात स्त्रियांचा दर्जा दुय्यम मानला जातो, किंबहुना तसा आहे. पुरुषांच्या सामाजिक भूमिकांचा विचार करता पुरुषांच्या भूमिकेचा विचार केला जातो महिलांची भूमिका दुय्यम मानली जाते तर श्रेष्ठ. तसेच, महिलांनी केलेल्या कामाचा सामाजिक दर्जा निकृष्ट मानला जातो तर पुरुषांनी केलेल्या कामाचा दर्जा श्रेष्ठ मानला जातो. पितृसत्ताक समाजात पुरुषांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात अधिकार आहेत तर महिलांना नेहमीच हक्कांपासून वंचित ठेवले जाते. याकडे मर्दानी दृष्टिकोनातून पाहिले जाते. त्या दृष्टीने सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, ऐतिहासिक, न्यायाच्या अनेक पातळ्यांवर महिलांवर अन्याय आणि अत्याचार होत आहेत. स्त्री-पुरुष प्रजनन आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असले तरी सामाजिक स्तरावर स्त्रीच्या जन्माचे स्वागत होत नाही. एकूणच महिलांकडे त्या शारीरिक, मानसिक आणि वैचारिकदृष्ट्या कमकुवत असल्याच्या भावनेने बघितल्या जातात. विवाहाच्या संदर्भात लैंगिक असमानता व्यापक आहे. पारंपारिक समाजात लहान वयातच लग्न केले जायचे. मुलीचे लग्न आज पालक ठरवतात. पारंपरिक समाजात घटस्फोट घेण्याचा अधिकार फक्त पुरुषांनाच होता. आज कायद्याने महिलांना घटस्फोटाचा अधिकार दिला असला तरी त्याचा वापर सर्वच महिला करत नाहीत. आज अनेक महिला बेबंद जीवन जगत आहेत.

भारतीय समाजात संस्कृती आणि धर्माच्या नावाखाली महिलांवर अत्याचार केले जातात. पुस्तकामध्ये; "मनुस्मृती" स्त्रीला निर्जीव म्हणतात. निर्जीव म्हणजे ज्या स्त्रीला हातपाय नसतात, म्हणजेच ज्याचे स्वतःच्या अवयवांवर नियंत्रण नसते, ज्या स्त्रीला पतीची इंद्रिय असते तिला निर्जीव म्हणतात. याचा अर्थ असा आहे की स्त्रीने तिच्या पतीच्या इंद्रियांवर, बुद्धीवर आणि विचार करण्याच्या पद्धतीवर पूर्णपणे अवलंबून असले पाहिजे. धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्वच पातळ्यांवर महिलांना दुय्यम स्थान दिल्याचे आपल्याला दिसून येते. धार्मिक आणि सांस्कृतिक घटक जीवनाच्या प्रत्येक स्तरावर विविध निर्बंध लादतात. सर्व समाजाची सांस्कृतिक व्यवस्था पितृसत्ताक आहे. म्हणून, ज्ञान, कला, गाणे, संगीत, नृत्य इत्यादी सांस्कृतिक घटकांच्या निर्मिती आणि सादरीकरणात पुरुषांचे वर्चस्व आहे. आज कथा, कादंबरी, चित्रपट, दूरदर्शन मालिका आणि पारंपारिक मनोरंजन या सर्व गोष्टी पुरुषांना केंद्रस्थानी ठेवून तयार केल्या जातात. बहुतांश नाटके आणि चित्रपटांमध्ये स्त्रीच्या भूमिकेपेक्षा पुरुषांची भूमिका दुय्यम असते. कपडे, दागिने, धार्मिक जीवन, सांस्कृतिक बाबींमध्येही महिलांना दुय्यम स्थान दिले जाते. लिंग हा सामाजिक-सांस्कृतिक संरचनेचा भाग आहे. पुरुषप्रधान समाजात पुरुषांचे श्रेष्ठत्व आणि स्त्रियांची कनिष्ठता अनादी काळापासून वाढत चालली आहे. हा लिंगभावाच्या दृष्टिकोनातून महिलांवर झालेला अन्याय आहे. पुरुषांना कौटुंक्कि संपत्तीचे हक्क, वारसा हक्क मिळत आहेत. लग्नानंतर मुलींना वडिलांचे घर सोडून पतीच्या घरी जावे लागते. कुटुंबात होणारे सर्व व्यवहार पुरुष नियंत्रित करतात. कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग असला तरी, हा निर्णय नेहमीच स्त्रीच्या मतावर आधारित नसतो. पारंपारिक कुटुंबात, स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार नव्हता, परंतु आज कायदा मुलीला तिच्या लग्नानंतर तिच्या वडिलांची मालमत्ता सोडण्याची परवानगी देतो.

पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत मुलीच्या जन्मापेक्षा मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाते. मुलगी म्हणजे शाप, जबाबदारी, परदेशी मानसिकता. आज स्त्री भ्रूण हत्या ही समस्या आहे. परिणामी, आज भारतातील अनेक राज्यांमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. भारतीय समाजात कुटुंब, धर्म, कायदा आणि प्रसारमाध्यमे अशा समाजाच्या सर्व घटकांमध्ये महिलांची भूमिका दुय्यम आहे. पुनरुत्पादन, श्रमशक्ती, लैंगिकता, उत्पादनाची साधने या सर्व गोष्टी संस्कृतीच्या नियंत्रणाखाली आहेत. त्यामुळे या सर्व बाबतीत स्त्री पुरुष म्हणून सामाजिक स्थितीत मागे राहिली आहे. भारतीय समाजात काही अपवाद वगळता अनादी काळापासून महिलांना राजकारणापासून दूर ठेवले जाते. आज, बहुतेक देशांमध्ये, एक लोकशाही राजकीय व्यवस्था आहे जिथे स्त्रियांना राजकीय प्रक्रियेत पुरुषांप्रमाणेच भाग घेण्याची संधी आहे, परंतु लोकशाही व्यवस्थेतही, स्त्रियांचा राजकीय सहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी आहे.

आज अमेरिकेसारख्या प्रगत देशातही स्त्रीला राष्ट्रप्रमुख होण्याची संधी नाही. भारतासारख्या देशात राजकीय पक्षांमध्ये महिलांना प्रतिनिधित्व दिले जात नाही. भारतात महिलांना ३३ टक्के राखीव जागा देण्याचे विधेयक विधिमंडळात मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे केंद्र व राज्याच्या विधी मंडळात महिला प्रतिनिधींचे प्रमाण कमी आहे. पंचायत व्यवस्थेत ३३ टक्के आरक्षण असल्याने त्यांचा राजकारणातील सहभाग वाढत आहे. मात्र, स्थानिक राजकारणात महिलांकडे केवळ पुरुषच दिसत आहेत. महिलांना कोणतेही राजकीय नेतृत्व दिले जात नाही. स्वातंत्र्योत्तर काळात

महिला शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्या तर खऱ्या अर्थाने त्यांचा सामाजिक स्तर उंचावेल या विचाराने त्यांना शिक्षण, नोकरी आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. नोकरी-व्यवसायात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत, तिने आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. तरीही समान वेतनाचा प्रश्न, त्यातून होणारे मानसिक-शारीरिक अत्याचार आणि भेदभावाची वृत्ती दिसून येते. आर्थिक क्षेत्रातही श्रमविभागणी, मालमत्तेचे हक्क अशा अनेक क्षेत्रात स्त्री-पुरुष भेदभाव केला जातो.

भारतीय समाजाला मोठा इतिहास आहे. भारतातील प्रत्येक समाज पितृसत्ताक व्यवस्थेने प्रभावित आहे. प्राचीन काळी, काही अपवाद वगळता, भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा नेहमीच कनिष्ठ राहिला आहे. हा महिलांवर अन्याय आहे. आज एकविसाव्या शतकात स्वत:ला आधुनिक म्हणवणाऱ्या पुरुषांचा दृष्टिकोन स्त्रियांच्या बाबतीत अपवादात्मकपणे आधुनिक आहे. बहुसंख्य पुरुष महिलांकडे पारंपरिक दृष्टिकोनातून पाहतात. स्त्रियांबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या अनेक समस्यांच्या मुळाशी आहे. इतकेच नाही तर पुरुषप्रधान समाजात पुरुष खरोखरच आपल्यापेक्षा वरचढ आहेत, आपण कनिष्ठ आहोत, त्यामुळे आपल्याला पुरुषांचे संरक्षण हवे आहे असे वाटते. त्यामुळे समाजाच्या वृत्तीमुळे महिलांच्या जीवनात समस्या निर्माण होत आहेत. प्रत्येक समाजात, लोकसंख्येच्या जवळपास निम्मी लोकसंख्या स्त्री-पुरुषांची असते. स्त्रिया हा पुरुषांइतकाच समाजाचा एक भाग आहे, त्यामुळे समाजाच्या कोणत्याही स्वरूपाचे मूल्यमापन केवळ सामाजिक स्थिती, स्थिती आणि स्त्रियांच्या भूमिकेच्या आधारावर केले जाऊ शकते. जगाच्या इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात मानवाला दुय्यम मानव म्हणून वागणूक दिली गेली आहे. आजची परिस्थिती काही वेगळी नाही. समाजात स्त्रीला धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळीवर नेहमीच दुय्यम महत्त्व दिले जाते.

संदर्भ :

1. अहिरे, पी., समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून स्त्री आत्मकथने, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद,(2011)
2. गर्गे, एस., (ETD), भारतीय समाजविज्ञान कोष, भाग-5, समाज विद्या मंडळ, पुणे, (1991)
3. भिडे, एल., महाराष्ट्रतील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, (1991),
4. खडसे, एस आणि खडसे एस, एतिहासिक परिप्रेक्ष्यतुन स्त्री, शुभम पब्लिकेशन पुणे. (2010)
5. आहुजा, आर (1995), भारतीय सामाजिक व्यवहार, रावत प्रकाशन, जयपूर.
6. साळुंखे, ए. (1989), हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
7. गाडगीळ, एस., लोकायत, लोकवाङ्मय गृह, मुंबई. (2000).
8. धोंडगे, ए, स्त्री- पुरुष, दीपराज प्रकाशन, पुणे, (2003) पृष्ठ-134

*प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, श्रीमती. कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर जिल्हा- सांगली. E-mail-rhpkrishnaa@gmail.com, Mobile-9881550149

***

लिंगभाव समानता आणि शाश्वत विकास

*डॉ.सुषमा अर्जुन जाधव

गोषवारा

भारतीय समाजव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्टये म्हणून पितृसत्ताक संयुक्तपध्दती होय. या पुरूषसत्ताक पध्दतीने वैदिक कालखंड सोडल्यास प्रत्येक कालखंडात स्त्रीयांना दुय्यमतेचे स्थान दिले आहे. सातत्याने स्त्रीयांना अवहेलनेला सामोरे जावे लागत आहे. लिंग हा जैविक आणि लिंगभाव ही सामाजिक बाब लक्षात न घेता, लिंगभेदाची भावना सर्वपरिचित असलेली दिसून येते. परंतु ज्यावेळी राष्ट्राच्या विकासाची चर्चा केली जाते. तेव्हा जवळपास एकूण लोकसंख्येपैकी निम्म्या व्यक्तींना वंचित ठेवून शाश्वत विकास होऊ शकत नाही म्हणून समाजातील ''लिंगभाव असमानता आणि शाश्वत विकास'' याचा सर्वांगपूर्ण अध्ययन करण्याकरिता संशोधिकेने शोधनिबंधाकरिता विषय निवडला आहे. या शोधनिबंधाचे उद्दिष्टये लिंगभाव संकल्पनाचे सखोल अध्ययन करणे, शाश्वत विकास आणि लिंगभाव असमानता यातील सहसंबंधाचे अध्ययन करणे. या अध्ययनाकरिता तथ्य संकलनाकरिता दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर करून, वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला आहे.

लिंगभाव असमानता नष्ट करण्याकरिता विविध विकासात्मक कार्यक्रमाची शासकीय–निमशासकीय स्तरावर आखणी केली जात आहे. विविध महिला विकासाची धोरणे आखली जात आहेत. परंतु लिंगभाव समानता समाजात रूजविण्याकरिता स्वत: स्त्रियांनी आत्मभान ठेवून, स्वत:वरील आत्मविश्वास वाढविणे गरजेचे आहे. सर्वांगपूर्ण लिंगभाव समानता समाजात रूजवून देशाच्या शाश्वत विकासामध्ये महिलांचा सक्रियतेने सहभाग वाढविला पाहिजे. लिंगभाव विषमता संपवून लिंगभाव समानता निर्माण करण्याच्या दिशेने सातत्याने विविध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. परंतु अद्यापही त्या दिशेने लक्षणीय प्रगती झालेली दिसत नाही. याकरिता सर्व स्तरावर शिक्षणचा प्रसार करून लिंगभाव समानतेचा विचार रूजला म्हणजे स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यास मदत मिळू शकेल. त्यासाठी पुरूषांमध्ये जागृती करून त्यांची प्रतिगामी मानसिकता बदलविण्याची गरज आहे.

सुचक शब्दावली : लिंगभाव, समानता, समाजीकरण, शाश्वत, विकास.

प्रस्तावना :

भारतीय समाजव्यवस्था ही पितृसत्ताक वा पुरूषप्रधान समाज आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास निम्मी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. परंतु समाजातील एकूण लोकसंख्येपैकी निम्मा समुह हा नेहमीच दुर्लक्षित, वंचित व शोषित राहिलेला दिसतो. तरीदेखील भारतीय समाजात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना कनिष्ठ स्थान व दर्जा दिलेला आहे. वास्तविकता स्त्री ही संस्कृती रक्षक व संस्कृतीवर्धक समजली जाते. एकूणच विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रियांचे योगदान हे उल्लेखनीय आहे. मानवी संस्कृतीच्या निर्मितीमध्ये अत्यंत महत्वाची कामगिरी महिलांनी पार पाडली आहे. संस्कृती आणि स्त्री या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भारतीय संस्कृती चिरंजीवी करण्याचे कार्य भारतीय स्त्रीनेच केलेले आहे. पुरूषांना मोह, माया, प्रेम व ममता शिकविण्याचे व कुटूंबवत्सल बनविण्याचे कार्य स्त्रीनेच केले आहे. तरीदेखील भारतीय समाजामध्ये स्त्रीयांचे स्थान हे दुय्यम किंवा कनिष्ठ मानले गेले आहे. समाजामध्ये स्त्रीकडे नेहमी अबला म्हणून पाहिले जात आहे. समाजामध्ये व्यक्तीला जे स्थान असते त्याला दर्जा असे म्हणतात. प्रामुख्याने अर्पित दर्जा हा जन्मभेदावर व लिंगभेदावर प्राप्त होत असतो. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्री–पुरूष भेद केला जातो. स्त्री–पुरूषांना असमान दर्जा दिला जातो. पुरूषांच्या तुलनेने स्त्रियां या नाजूक, चंचल, कोमल, भावनाप्रधान मानल्या जातात. तसेच जीवशास्त्रीय नियमानुसार त्यांना काही नैसर्गिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. या हेतूने भारतीय समाजामध्ये स्त्रीयांकडे नेहमीच कमीपणाचे व दुय्यमपणाने बघितले जाते. यातूनच ''लिंगभाव असमानता'' ही समस्या अधिक तीव्र होत असून ही समस्या कोणत्याही एका समाजापुरती मर्यादीत नाही. ही एक जागतिक समस्या झालेली आहे. भारतीय समाजातही या समस्येने जटील रूप धारण केले आहे. दररोजच्या वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या, न्यूज चॅनल वरील बातम्या यातून लिंगभाव असमानता प्रकर्षाने निदर्शनास येते. मानवी

समाजात स्त्री–पुरूष ही लिंग आधारे होणारी विभागणी हे जैविक सत्य असले तरी, बाईपणा आणि पुरूषपणा हा लिंगभाव मात्र मानवनिर्मित आहे. लिंगभावाच्या आधारे समाजात उच्च–निच्च प्रवर्गात विभागणी केली जात आहे. त्यातून विषमता अधिकाधिक दृढ होत आहे. पुरूषाला 'अधिकार' आणि स्त्रियांना 'अनाधिकार' ठरविले जात आहे. स्त्रियांना सत्ता, प्रतिष्ठा आणि संपत्तीपासून वंचित ठेवण्यात येत आहे. जवळजवळ एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या ही विकासाच्या मूळ प्रवाहापासून दूर ठेवली जात आहे. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे ''राष्ट्राचा विकास घडून यायचा असेल तर स्त्रियांचा विकास होणे गरजेचे आहे.''

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधिकेने ''लिंगभाव असमानता आणि शाश्वत विकास'' या विषयावरील अध्ययन केले आहे.

अभ्यासपध्दती :

संशोधनाची उद्दिष्टये –

१. लिंगभाव असमानता संकल्पनेचे स्वरूप समजावून घेणे.

२. लिंगभाव असमानता आणि शाश्वत विकास यांच्या सहसंबंधाचे अध्ययन करणे.

संशोधन आराखडा – वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला आहे.

तथ्य संकलन – प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम स्रोतावर आधारित असून विविध पुस्तके, लेख, इंटरनेट माहितीस्तोत्र इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

लिंगभाव असमानता संकल्पना – १९८० नंतर अनेक अभ्यासक विद्वान विशेषत: महिला अभ्यासक या लिंगभावविषयक अभ्यासात विशेष रूची दाखवित आहेत. सामाजिक स्तरीकरणाच्या प्रमुख निर्धारकात जात, वर्ग, वंश, धर्म, उत्पन्न याबरोबरच एक महत्वाचा निर्धारक म्हणून 'लिंग' या घटकाचा विचार केला जातो. कारण समाजाची विभागणी प्रामुख्याने जैविक तत्वावरच होते आणि ती म्हणजे स्त्री–पुरूष या आधारावर केले जाते. लिंग ही संज्ञा सर्वपरिचित सर्वश्रुत आहे. दैनंदिन जीवनात आपण सतत वापरतो. लिंग हे जैविक तर लिंगभाव ही सामाजिक वैशिष्टय आहे. परंतु बऱ्याचदा लिंग आणि लिंगभाव यात बऱ्याचदा गल्लत केली जाते.

लिंगभाव वा जेंडर हा शब्दप्रयोग समाजशास्त्रीय अर्थाने किंवा संकल्पनात्मक वर्गीकरणासाठी केला जातो. त्याला एक विशिष्ट अर्थ आहे. या नवीन अर्थानुसार जेंडर या संज्ञेचा वापर, स्त्री आणि पुरूषांची सामाजिक आणि सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्यासाठी करतात. मराठीत याला लिंगभाव म्हणता येते. स्त्री–पुरूषांची समाजातील स्थान व भूमिका यात समाजात कसा भेद केला जातो. याचे आकलन या संज्ञेतून होते. म्हणजेच स्त्री–पुरूषासंबंधीच्या सामाजिक वास्तवाचे आकलन होण्यासाठी विश्लेषणाचे एक साधन म्हणून ही संकल्पना वापरली जाते. लिंगभाव या संज्ञेचा अर्थ हा लिंग संज्ञेच्या अर्थाहून भिन्न असा आहे. साधारणपणे एखाद्या समाजाने किंवा संस्कृतीने स्त्रीया व पुरूष यांच्यात भेद केलेले असतात, यामध्ये पुरूषत्वाची म्हणजे पुरूषपणाची आणि स्त्रीत्वाची म्हणजे बायकीपणाची जी वैशिष्टये निश्चित केलेली असतात. त्या भेदाच्या व वैशिष्टयांना निर्देश करण्यासाठी लिंगभाव ही संज्ञा वापरली जाते. थोडक्यात स्त्री–पुरूषातील जैविक व शारीरिक भेद म्हणजे लिंग होय, याउलट स्त्री–पुरूषातील सामाजिक व सांस्कृतिक भेद म्हणजे लिंगभाव होय.

प्रत्येक संस्कृतीत मुलगे आणि मुलगी यांच्या मुल्यमापनाच्या विशिष्ट पध्दती असतात. त्यानुसार मुलामुलींना वेगवेगळ्या भूमिका, गुणदोष, प्रतिसादाच्या पध्दती त्या–त्या समाजाने दिलेल्या असतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, जन्मापासून मुलामुलींसाठी जणू एक भिन्न सामाजिक आणि सांस्कृतिक असा कृतीकार्यक्रमच आखून दिला जातो. यालाच लिंगभाव म्हणता येईल.

इ.स.१९७२ मध्ये 'Sex, Gender and Society' या ग्रंथात लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम ॲन ओकले यांनी वापरली. लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम वापरणाऱ्या ज्येष्ठ विचारंत ॲन ओकले म्हणतात की, लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरूषांची बाईपणात व पुरूषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सुचित होते. जन्म घेतलेले प्रत्येक नवजात अर्भक सुरूवातीला एक जैविक प्राणी असते. पण सामाजिकीकरणच्या माध्यमातून त्याच्यावर वेगवेगळे संस्कार करून या हाडामासांच्या त्या जीवाला स्त्री किंवा पुरूषामध्ये परावर्तीत केले जाते. जन्माला येणाऱ्या नवजात अर्भकापासून मुलगा–मुलगीची कपडे, खेळणी, बोलण्याची, वागण्याची पध्दत यामध्ये पूर्णपणे भिन्नत्व दिसून येते. या समाजीकरणाच्या माध्यमातून स्त्री–पुरूषाचा आकार ते अर्भक घेत असतो. थोडक्यात 'जेन्डर' ही संकल्पना स्त्रीत्व किंवा पुरूषत्व यांच्या समांतर किंवा सामाजिक स्वरूपावर आधारित असलेल्या असमान विभाजनाशी संबंधित असते.

लिंगभाव असमानता ही संकल्पना अधिक पुढील मुद्याआधारे स्पष्ट होते.

मानवी जीवनात, समाजात विविध ठिकाणी समाजीकरणाच्या माध्यमातून लिंगभाव असमानता रूजवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जातो.

१. कुटूंबात लिंगभाव असमानता – कुटुंबात मुलीच्या जन्मापासून तिच्या वाढीच्या प्रत्येक टप्प्यावर ती मुलापेक्षा व पुरूषापेक्ष वेगळी आहे. याची जाणीव सातत्याने तिला करून दिली जाते. मुलीचे वागणे, बोलणे, हसणे या सर्व आज्ञाधारक, प्रतिउत्तर न देणारी प्रश्न न वाचणारी अशी असली पाहिजे, तर याउलट मुलगा, पुरूष म्हणजे धाडसी, स्वातंत्र्य, बलवान कार्यक्षम असे गुण बालकामध्ये रूजविले जातात.

२. वेशभूषा असमानता – बहुतेक सर्व समाजात मुला–मुलींमध्ये वा स्त्री–पुरूषांमध्ये पोषाख, वेशभूषा वेगवेगळा असतो. बहुतांशी समाजात स्त्रियांनी नखशिखांत पोषाख परिधान करावा लागतो. त्याचा चेहरा देखील उघडा ठेवण्याची मुभा नसते. लोकांच्या पोषाखाच्या पध्दतीवरून, लोकांची एकत्र भेटण्या–मिसळण्याची क्षमता, त्यांच्यातील हक्क व स्वातंत्र्याची जाणीव आणि समाजातील प्रतिष्ठा व्यक्त होत असते.

३. शैक्षणिक लिंगभाव असमानता – महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली, आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण देऊन पहिल्या स्त्री शिक्षिका म्हणून गौरवले गेल्या. परंतु या पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेत खेळण्यातून, शिक्षणातून, खाणपान, वेशभूषा, केशभूषा, निर्णय प्रक्रियेतून सातत्याने लिंगभाव असमानता निदर्शनास येते. मुलांना खेळायला महागडया गाड्या, रोबोट तर मुलींना बाहुली, भांडी–कुंडीचा सेट दिला जातो.

मुलांना व्यावसायिक, महागडे उच्चशिक्षण दिले जाते. तर मुलींची पात्रतेचा विचार न करता केवळ ती मुलगी आहे म्हणून कमी खर्चाचे, कलाशाखेचे, तिच्या आवडी– निवडीचा, कौशल्याचा, क्षमतेचा विचार न करता शिक्षण दिले जाते.

४. मानसिकता आणि लिंगभाव असमानता – मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणाचा आधार आणि मुलगी म्हणजे परक्याचे धन, डोक्यावरचे ओझे, काचेचे भांडे अशी मानसिकता असते. स्त्रीने तिचे चारित्र्य आयुष्यभर जपायला हवे असे संस्कार तिच्या मनावर बिंबविले जातात. तिला नेहमी तडजोड करणे, आज्ञाधारक बनविले जाते. लहानपणापासून तिची सतत झालेली हेळसांड, उपेक्षा, दुर्लक्ष आणि विशेषत: मुलांपेक्ष वेगळी वागणूक मिळाल्यामुळे मुलींची मानसिक कुचंबणा होऊन तिला मानसिकदृष्टया असुरक्षित वाटू लागते.

५. समाजीकरणातून लिंगभाव विषमता – प्रसिध्द स्त्रीवादी विचारवंत सिमॉ द बोव्हा यांच्या विचारप्रणालीनुसार ''स्त्री ही जन्माला येत नाही तर ती घडविली जाते.'' लिंगभाव असमानता ही एक अनिवार्य वस्तुस्थितीच आहे. स्त्रियांचे समाजीकरण स्त्रीत्वाच्या दृष्टीकोनातून आणि पुरूषांचे समाजीकरणातून पुरूषत्वाच्या दृष्टीकोनातून केले जाते. मुलगा–मुलगी या नात्याने कोणते कपडे वापरावेत, खेळ कोणते खेळावेत, कोणती कामे करावीत, समाजातील त्याच्या जबाबदाऱ्या कर्तव्य रूजविण्याचा प्रयत्न केला जातो.

स्त्री ही मृदु, काळजी घेणारी, जोपासना करणारी व आज्ञाधारक असली पाहिजे. तर पुरूषांकडून बळकट आत्मविश्वासपूर्ण, स्पर्धात्मक व तार्कीक असण्याची अपेक्षा केली जाते.

६. आरोग्य आणि लिंगभाव असमानता – विकासाच्या संकल्पनेत आरोग्याला खूप महत्व आहे, परंतु स्त्रीच्या आरोग्याचा विचार येतो तेव्हा गरोदरपणा, बाळंतपण, गर्भाशय इत्यादीपुरता मर्यादित विचार केला जातो. तर पुरूष म्हणजे घरातील कर्ता, घर चालविणारा, वंश पुढे नेणारा असे मानले जाते. त्यामुळे कुटुंबात पुरूषांची काळजी अधिक घेतली जाते. स्त्रीया नेहमी शिळे, उरलेले अन्न खातात, कमी पोषण असलेले, कमी प्रथिनेयुक्त अन्न दिले जाते. तर मुलाला पुरेपूर आहार दिला जातो. आरोग्य ही धनसंपदा असूनही स्त्रीयांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते.

७. श्रमविभागणी आणि लिंगभाव असमानता – बहुतांश समाजात कामाची विभागणी देखील लिंगभेदावर आधारित केलेली दिसून येते. स्त्रियांकडे प्रामुख्याने घरकाम, घरगुती, मुलांचे पालनपोषण, वृध्दांची सेवा–सुश्रुषा, तसेच शेतातील कामे स्त्रीच्या वाट्याला दिली जातात. याउलट पुरूष म्हटले की, घराबाहेरची कामे, अवजड कामे, अर्थार्जन करणे अशी कामे करत असतात. घरी स्त्रीया स्वयंपाक, देवपूजा, धुणी–भांडी, घरगुती स्वच्छता करतात. परंतु बाहेर मोठ–मोठ्या हॉटेलमध्ये आचारी पुरूष, मंदिरामध्ये पुजारी पुरूष, कपडे धुणारा परिट पुरूष, म्हणजे जेथे जेथे आर्थिकता येते तेथे–तेथे पुरूष असलेला दिसून येतो. म्हणूनच कार्ल मार्क्स म्हणतात, ज्याच्याकडे आर्थिक सत्ता अधिक तो सत्ताधीश असतो.

अशा स्वरूपात लिंगभाव असमानता ही पावलागणिक व्यवहारातून समाजात आढळून येते. लिंगभाव असमानतेला बळकटी देणारे काही भ्रामक कल्पना समाजामध्ये आढळून येते. जसे की स्त्रिया शारीरिक कमकुवत असतात, स्त्रियांना संरक्षणाची सतत गरज असते, त्या बौध्दिकदृष्ट्या पुरूषापेक्ष कमी असतात, स्त्रिया योग्य निर्णय घेऊ शकत नाही, मुलगी ही

परक्याचे धन असते, यामुळे लिंगभाव असमानता समाजामध्ये अधिकाधिक दृढ होत होता. परंतु काही स्त्रीवादी चळवळींना समाजसुधारकाच्या प्रयत्नातून आज स्त्री–पुरूषांना समानता प्रस्थापित व्हावी याकरिता जोराचा प्रयत्न सुरू आहे.

लिंगभाव असमानता आणि शाश्वत विकास – भारताच्या इतिहासाचा अभ्यास केल्यानंतर दिसून येते की, प्राचीन वैदिक काळामध्ये लिंगभाव असमानता नव्हती. याउलट स्त्रिया या विविध कलांमध्ये पारंगत होत्या. वेदहवन, पठण करण्याच्या, उपनयनाचा अधिकार होत्या, शिक्षणाचा, प्रौढविवाह पध्दती अस्तित्वात होती. परंतु मध्ययुगीन काळातील प्रस्थापित सामाजिक परिस्थितीमुळे सामाजिक परिवर्तन झाले. आणि स्त्रियांच्या दर्जात घसरण झाली. शिक्षणाबरोबरच तिचे अनेक अधिकार नाकारले, तिला समाजात कनिष्टतेचे दुय्यमत्व प्राप्त झाले. तिला अनेक बंधनामध्ये जखडून ठेवण्यात आले. अनेक अन्याय–अत्याचारांचा सामना करावा लागला. स्त्रियांचे आत्मभान जागृत करण्यासाठी तिला माणूसपणाचं जीवन जगण्यास यावे याकरिता काही स्त्रीवादी चळवळी, समाजसुधारक यामध्ये शाहु, फुले, आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण ठरले. तसेच स्वातंत्र्योत्तर नंतरच्या कालखंडात भारतीय राज्यघटना, हिंदू कोड बीलाच्या माध्यमातून स्त्रियांना दिलेले अधिकार तिला जगण्यासाठी निश्चितच उभारी देणारी ठरले. भारतामध्ये १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे करण्यात आले. ''समता, विकास, शांतता ही आंतरराष्ट्रीय महिला वर्षाची ध्येय घोषीत केले. स्त्री सुधारणाचे अनेक मसुदा, महिला आयोगाची निर्मिती केली.

लिंगभाव समानता प्रस्थापित करण्यासाठी अनेक शासकीय निमशासकीय स्तरावर विविध, कार्यक्रम, उपक्रमाची योजना आखण्यात आल्या. ८ मार्च या जागतिक महिला दिनाची २०२३ ची ''लिंगभाव समानतेकरिता नावीन्य वा नवकल्पना आणि तंत्रज्ञान'' अशी थीम ठेवण्यात आली. तसेच पंतप्रधानांनी ''बेटी बचाओ बेटी पढाओ'' यासारख्या अभियानाद्वारे विद्यापीठ, महाविद्यालयातील युवक–युवतींच्या मनामध्ये लिंगभाव समानता रूजविण्याचे उपक्रम हाती घेतले आहेत.

स्वामी विवेकानंद म्हणतात, ''स्त्री–पुरूष हे एकाच पक्ष्याचे दोन पंख आहेत, ते समतोल नसतील, तर घर, परिवार, समाज, राष्ट्र खऱ्या अर्थाने उभेच राहू शकणार नाही.'' तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्र विकासाची संकल्पना मांडत असताना म्हणतात की, ''राष्ट्राचा विकास करायचा असेल तर स्त्रीयांचा विकास होणे गरजेचे आहे.'' कारण एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या ही स्त्रीयांची आहे. या लोकसंख्येला विकासाच्या प्रक्रियेतून वंचित ठेवून आपण राष्ट्राचा विकास करू शकणार नाही.

जर भारतीय समाजाचा शाश्वत विकास घडून आणायचा असेल तर लिंगभाव असमानता संपुष्टात येऊन लिंगभाव समानता समाजात रूजविणे गरजेचे आहे. त्यातून निश्चितच शाश्वत विकासाची संकल्पना ही सत्यता उतरू शकेल अन्यथा ते केवळ स्वप्नच राहील. शाश्वत विकास म्हणजे काय हे सांगत असताना जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो अशा विकासाला ''शाश्वत विकास'' असे म्हणतात, ''थोडक्यात जो विकास मानवाच्या सध्याच्या व भविष्यातील गरजांची संतुलित पूर्ती करतो, तोच शाश्वत विकास होय.'' १९९२ साली झालेल्या, रिओ दि जनेरो (ब्राझील) येथील वसुंधरा शिखर परिषदेमध्ये अजेंडा २१ मान्य करण्यात आले. त्यांच्या पाठपुरावा करण्यासाठी शाश्वत विकास आयोग स्थापन करण्यात आला. शाश्वत विकासास ''टिकाऊ विकास'' असा पर्यायी शब्द वापरला जातो. २०१५ मध्ये १९३ देशांनी जवळजवळ शाश्वत विकासाकरिता १७ ध्येयांना मान्यता दिली. त्यामध्ये दारिद्रय निर्मुलन, भूक निर्मुलन, चांगले आरोग्य दर्जेदार शिक्षण, लैंगिक समानता, शुध्द पाणी आणि आरोग्य, स्वच्छता, चांगल्या नोकऱ्या इत्यादी, सांगण्याचा मतितार्थ इतकाच की जर आपल्या राष्ट्राचा, देशाचा शाश्वत वा टिकाऊ विकास करायचा असेल तर स्त्री–पुरूष समानता समाजामध्ये प्रस्थापित झाले पाहिजे. त्या दिशेने वाटचाल केली पाहिजे.

आज पाहिले तर सर्व क्षेत्र स्त्री कर्तृत्वाने व्यापून टाकले आहे. असे कोणतेही क्षेत्र नाही की तेथे स्त्रीयांनी स्वत:चा ठसा उमटविला नाही. आज स्त्रीया घर आणि स्वत:चे करीयर सांभाळून, तारेवरील कसरत करीत, सुपरवूमन बनून स्वत:चे अस्तित्व तयार करीत आहे. आज सर्वत्र महिला सक्षमीकरण, सबलीकरण योजना राबविल्या जात आहेत. महिलांचा आत्मविश्वास जागृत करून त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची क्षमता निर्माण केली जात आहे. महिलांना शिक्षणाची व रोजगाराची समान संधी उपलब्ध करून दिली जात आहे. तर स्वयंसहाय्यता वा बचत गटाच्या माध्यमातून महिला स्वत:चा व समाजाचा शाश्वत कायमस्वरूपी विकास घडवून आणण्याची धडपड करीत आहेत. महिलांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक, विकासाकरिता तसेच जगभरातले अनेक स्त्री–पुरूष आदि, पितृसत्ताक विचारपध्दती, दृष्टीकोन, संरचना आणि सुव्यवस्था यामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी वेगवेगळे पातळीवरून प्रयत्न केले जात आहेत. शालेय, महाविद्यालयीन अभ्यासक्रमामध्ये लिंगभाव संवेदनशील बनवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार माध्यमाद्वारे पितृसत्ताक पूर्वग्रहावर प्रकाश टाकून त्यामधील लिंगभेदाचे उच्चाटन करण्यासाठी काही कायदे, नियम व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. वर्ल्डोमीटर्सनुसार भारताची लोकसंख्या या

वेबसाईटनुसार २०२२ मध्ये १,३९,४०,२६,९३५ आहे. एवढया मोठया लोकसंख्येचा देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. या लोकसंख्येला बरोबर घेवूनच देशाचा राष्ट्राचा शाश्वत विकास होवू शकतो. म्हणजे भविष्यातील पिढीसाठी स्त्री–पुरूष समानतेतूनच राष्ट्राचा विकास होवू शकतो.

निष्कर्ष :

लिंगभाव असमानता नष्ट करून स्त्रियांच्या विकासाच्या विविध योजना हाती घेतलेल्या असल्या तरी पूर्णाशांने त्यांचा विकास झाला असे म्हणता येणार नाही. स्त्रियांचे प्रश्न संपले नाहीत तर प्रश्नांच्या स्वरूपात बदल झाले आहे. विविध महिला सक्षमीकरणाचे योजना, विकास, कार्यक्रम, शासकीय–निमशासकीय स्तरावरील उपक्रम राबविले गेले. यातून प्रत्येक क्षेत्रात महिलांनी त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. याचे उदाहरण म्हणून भारताच्या सध्याच्या राष्ट्रपती द्रौपती मुर्मू, अर्थमंत्री निर्मला सीतारमन, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची नांवे देता येतील.

परंतु दुसरीकडे आजही महिलांचा काही समुह हा या विकास प्रवाहापासून वंचित आहे. ज्यांच्यासाठी या योजना राबविल्या जातात. त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. अंमलबजावणीतील कसूर यामुळे समाजात आजही स्त्रीविरोधी, अनेक घटना घडत आहेत. लिंगभाव असमानता नष्ट करण्याकरिता महिलांनी स्वत: पुढाकार घेतला पाहिजे. स्त्रियांनी स्वत:चे आत्मभान आबाधित ठेवून, आत्मविश्वासाने स्वत:ला सिध्द केले पाहिजे. थोडक्यात स्त्री–पुरूष हा जैविक भेद बाजूला ठेवून, स्त्रियांनादेखील एक व्यक्ती, माणूस म्हणून पाहिले पाहिजे, राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुलतत्वाची अंमलबजावणी स्त्री–पुरूष हा भेदभाव न करता केली पाहिजे. स्त्रीयांना आर्थिक, सामाजिक, राजकीय क्रियामध्ये सामावून घेत नाही तोपर्यंत आपले महासत्ता बनण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहील.

संदर्भ ग्रंथ :

१. कमला भसीन, भाषांतर श्रुती तांबे (२०१०) : लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मय गृह.
२. प्रा.सौ.माधवी कवि : महिला कल्याण आणि विकास, विद्या प्रकाशन, नागपूर.
३. डॉ.शैलेश भंगाळे, डॉ.रंजना सोनवणे, (२०१९) : लिंगभाव, विद्यालय आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.
४. डॉ.रविंद्र वाघ, डॉ.सुधाकर जाधव (२०१५) : भारतीय समाज–संरचना व बदल, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.
५. स्त्री–प्रश्नाची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने, (२००९) प्रतिमा प्रकाशन.
६. डॉ.भा.कि.खडसे (२००४) : भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई
८. इंटरनेट – माहितीस्त्रोत.

*प्रमुख, समाजशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर.

***

'ग्रामीण महिलांचे आरोग्य आणि पोषण स्थिती : सांगली जिल्ह्याच्या विशेष संदर्भात

***डॉ.पाटील अमोल अशोककुमार**

गोषवारा :

महिलांच्या आरोग्याच्या स्थितीचा संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्यावर आणि कल्याणावर थेट परिणाम होतो. माता विकृती आणि मृत्यूचा परिणाम फक्त आईवरच होत नाही तर संपूर्ण कुटुंबावर होतो. बहुतेकदा, स्त्रिया केवळ घराचे व्यवस्थापन आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी घेत नाहीत, तर घराबाहेरील आर्थिकदृष्ट्या फायदेशीर रोजगारातही सक्रिय सहभाग घेतात किंवा कौटुंबिक व्यवसायात, मग ते शेती असो किंवा उद्योग असोत. ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांचा मोठा वाटा आहे. महिलांची आरोग्य आणि पोषण स्थिती त्यांच्या स्वतःच्या कुटुंबासाठी तसेच देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. खराब आरोग्य स्थितीमुळे कुटुंबातील सदस्यांची काळजी घेण्याची त्यांची क्षमता आणि त्यांची कमाई करण्याची क्षमता कमी होते.या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील ग्रामीण महिला लोकसंख्येमध्ये आरोग्य आणि पौष्टिक स्थिती अभ्यासने आणि त्याच्याशी संबंधित घटक शोधणे आहे. याकरिता सांगली जिल्ह्यातील ९ गावांतील एकूण १८० ग्रामीण महिलांची यादृच्छिकपणे निवड करण्यात आली. सामाजिक-आर्थिक स्थिती, पौष्टिक स्थिती आणि अन्न वापरावरील माहिती गोळा करून निरीक्षण केलेल्या तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण केले गेले. सदर अभ्यासातून ग्रामीण महिलांमध्ये दुय्यम आरोग्य आणि कमी पोषण पातळीचे प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळले यासाठी कमी साक्षरता, व्यवसाय, निम्न राहणीमान आणि आरोग्य विषयीची कमी जागरूकता हे घटक जबाबदार आढळले.

मुख्य शब्द : ग्रामीण महिला, आरोग्य, पोषण स्थिती.

प्रस्तावना:

जागतिक आरोग्य संघटना 'आरोग्य' ची व्याख्या "संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कल्याणाची स्थिती आणि केवळ रोग किंवा अशक्तपणा नसणे" अशी करते. ही आरोग्याची आदर्शात्मक संकल्पना आहे. व्यावहारिकदृष्ट्या, आपण पाहतो की आरोग्य ही एक गतिमान अवस्था आहे आणि बहुतेक लोक संपूर्ण आजारी आरोग्य आणि परिपूर्ण आरोग्य यांच्यामध्ये येतात. पोषण ही आरोग्य स्थितीची पूर्व-आवश्यकता आहे. आरोग्य ही मूलभूत गरज आणि प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे आणि स्त्रियांच्या बाबतीत त्याला विशेष महत्त्व आहे. याची अनेक कारणे अनेक आहेत:, पहिली गोष्ट म्हणजे, एकूण लोकसंख्येच्या जवळपास अर्धा भाग आणि एकूण कर्मचाऱ्यांपैकी एक तृतीयांश पेक्षा जास्त स्त्रिया आहेत. दुसरे म्हणजे, मुले जन्माला घालण्याची आणि त्यांचे संगोपन करण्याची मोठी जबाबदारी महिलांवर असते. त्यांच्या आरोग्याची स्थिती थेट मुलांच्या आरोग्यावर आणि कल्याणावर परिणाम करते. पोषक तत्वांचे अपुरे सेवन केल्याने कुपोषण आणि कमतरतेचे आजार होऊ शकतात. कमी पोषण स्थिती महिलांना काही आजारांना बळी पाडते. खालावलेल्या आरोग्याची स्थिती, कमी आयुर्मान, विकृती आणि मृत्यूचे उच्च दर, उत्पादकतेची कमी पातळी आणि कमाई आणि समर्थन करण्याची क्षमता कमी होण्यामध्ये स्वतःला प्रकट करते. वरील विवेचनावरून असा अंदाज लावला जाऊ शकतो की आरोग्य आणि पोषण हे एकमेकांशी सुसंगत बाबी आहेत. महिलांचे आरोग्य आणि पोषण यांचा संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्य स्थितीवर, विशेषतः त्यांच्या संततीवर थेट आणि तीव्र परिणाम होतो.

अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे की, पितृसत्ताक सामाजिक रचना, जन्मापासूनच लैंगिक भेदभाव, कुपोषण, निरक्षरता, अकुशल श्रम, कठोर शारीरिक श्रम, लवकर विवाह, वारंवार आणि अनेक गर्भधारणा आणि गरिबी हे काही घटक विशेषता: ग्रामीण भागातील महिलांच्या विरोधात आहेत. महिला जैविक दृष्ट्या श्रेष्ठ असूनही, स्त्रियांमध्ये विकृतीचे प्रमाण जास्त असते. स्त्रिया तिहेरी धोका सहन करतात. पौष्टिकतेच्या कमतरतेच्या विकारांव्यतिरिक्त, त्यांना अनेकदा स्त्रीरोग आणि गर्भधारणेशी संबंधित आजार असतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील

ग्रामीण महिला लोकसंख्येतील आरोग्य आणि पोषण स्थिती निश्चित करणे आणि त्याशी संबंधित घटकांचा शोध घेणे हा या अभ्यासाचा उद्देश आहे.

अभ्यासाची मुख्य उद्दिष्टे:

सदर अभ्यासाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

- ग्रामीण महिलांची सामाजिक-आर्थिक स्थिती, अन्न सेवन पद्धती आणि पोषक आहाराचे मूल्यांकन करणे.
- महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीचे मूल्यांकन करणे.

अभ्यास पद्धती:

- **संशोधन आराखडा** : या अभ्यासासाठी वर्णनात्मक प्रकारची संशोधन रचना स्वीकारण्यात आली.
- **अभ्यास क्षेत्र** : महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्याची सदर अभ्यासासाठी हेतुपुरस्सर निवड करण्यात आली आहे.
- **नमुन्याची निवड** : सांगली जिल्ह्यातून यादृच्छिकपणे नमुने निवडण्यात आले, एकूण ९ गावांतील १८० ग्रामीण महिलांची निवड करण्यात आली.
- **तथ्य संकलन तंत्र आणि सांख्यिकीय विश्लेषण** : माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली पद्धत वापरली गेली. संकलित माहितीचे विश्लेषण संगणकाच्या साहाय्याने एसपीएसएस सॉफ्टवेअर आणि एक्सेलच्या सहाय्याने करण्यात आले.

परिणाम आणि चर्चा :

तक्ता क्रमांक १ मध्ये, त्यांच्या नमुना लोकसंख्येच्या संदर्भात गावाचे नाव नोंदवले गेले आहे, सध्याच्या अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातून यादृच्छिकपणे ९ गावांची निवड करण्यात आली आहे.

तक्ता १: एकूण गावे आणि महिला प्रतिसादकर्त्यांची संख्या(n = १८०).

सांगली जिल्ह्यातील तहसीलचे नाव	गावाचे नाव	प्रतिसादकर्ते संख्या
१. मिरज	१. कवलापूर, २.नांद्रे ३. सोनी	२० २० २०
२. तासगाव	१. कवठेएकंद २. मणेराजुरी ३. कुमठे	२० २० २०
३. पलूस	१. नागठाणे २. अंखलखोप ३. पलूस	२० २० २०
एकूण	९	१८०

सामाजिक-आर्थिक स्थिती :

तक्ता २ : ग्रामीण महिलांची वैयक्तिक आणि सामाजिक पार्श्वभूमी (n = १८०)

अ .क्र.	श्रेणी	वारंवारता	टक्केवारी
१.	**वय:**		
	२१-३०वर्षे	०३	०१.७
	३१-४०वर्षे	४२	२३.३
	४१-५०वर्षे	११६	६४.४
	५१-६०वर्षे	०९	०५.०

अ .क्र.	श्रेणी	वारंवारता	टक्केवारी
२.	**वैवाहिक स्थिती:**		
	अविवाहित	०५	०२.८
	विवाहित	१५८	८७.८
	विधवा	१७	०९.४
३.	**धर्म:**		
	हिंदू	१३७	७६.१
	मुस्लीम	११	०६.१
	जैन	२६	१४.४
	इतर	०६	०३.३
४.	**जात प्रवर्ग:**		
	खुला	८९	४९.४
	अनुसूचित जाती	३६	२०.०
	इतर मागास	४२	२३.३
	इतर	१३	७.२
५.	**शिक्षण:**		
	निरक्षर	१३	७.२
	प्राथमिक	४३	२३.९
	माध्यमिक	९४	५२.२
	उच्च माध्यमिक	२६	१४.४
	पदवी	०४	२.२
६.	**मुख्यव्यवसाय:**		
	स्वत:ची शेती आणि मजुरी	१२६	७०.०
	मजुरी	५४	३०.०

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट झाले आहे की बहुसंख्य प्रतिसादकर्ते, ६४.४टक्के ४१-५० या वयोगटातील होते. उत्तरदात्यांपैकी ८७.८टक्के विवाहित होते, ७६.१टक्के प्रतिसादकर्ते हिंदू होते, बहुसंख्य प्रतिसादकर्ते खुल्या जाती प्रवर्गातील होते (४९.४टक्के), त्यानंतर इतर मागास जाती प्रवर्गात 23.3 टक्के आणि अनुसूचित जाती प्रवर्गात २० टक्के होते. उत्तरदात्यांच्या शैक्षणिक स्तरावरून असे दिसून आले की त्यांच्यापैकी ५२.२टक्के प्राथमिक शिक्षण घेतलेले आहेत . महिलांपैकी ७० टक्के महिलांनी शेती आणि मजूर अशी दोन्ही कामे केली आणि ३० टक्के महिलांचा मुख्य व्यवसाय शेतमजूरी होता.

पोषण स्थिती:

तक्ता ३: प्रतिसादकर्त्यांची पोषण स्थिती

पौष्टिकस्थिती	प्रतिसादकर्ते संख्या	टक्केवारी
पोषणाखाली	६२	३४.४५
कुपोषण	१०३	५७.२२
अतिपोषण	१५	०८.३३
एकूण =	**१८०**	**१००.०**

तक्ता : ३ स्पष्टपणे दर्शविते की, एकूण ५७.२२ % उत्तरदाते कुपोषित होते. अल्प पोषण प्रतिसादकर्त्यांची टक्केवारी ३४.४५ होती.

एका वर्षातील आजारांची वारंवारता :

तक्ता क्र. ४- वर्षात प्रतिसादकर्ते किती वेळा आजारी पडले हे दर्शविते.

तक्ता ४: एका वर्षात आजारपणाची वारंवारता

आजार	वारंवारता	टक्केवारी
एकदा	०६	०३.३
दोनदा	२७	१५.०
तीनदा	७४	४१.१
चारवेळा	६०	३३.३
पाचवेळाकिंवाअधिक	१३	७.२
एकूण	**१८०**	**१००.०**

तक्ता क्र. ४ मध्ये दाखवल्याप्रमाणे बहुसंख्य प्रतिसादकर्ते (७४.४टक्के) गेल्या वर्षभरात तीन किंवा चार वेळा आजारी पडले, त्यामुळे सरासरी तीन किंवा चार महिन्यांत एकदा. फक्त फारच कमी (७.२टक्के) पाच किंवा अधिक वेळा आजारी पडले तर इतर प्रतिसादकर्ते वर्षातून एक किंवा दोन वेळा आजारी पडले.

आरोग्यविषयक जागरूकता आणि आहारातील पदार्थांचे सेवन:

सर्व गावांतील बहुसंख्य ग्रामीण महिलांकडे किचन गार्डनसाठी जमीन होती. निम्म्याहून अधिक प्रतिसादकर्त्यांकडे पोषणाबाबत जनजागृती करणाऱ्या कोणत्याही आरोग्य संस्था नाहीत. याशिवाय त्यांच्या घरातील ५.३% महिलांनी आयोडीनयुक्त मीठ वापरले नाही. जवळपास ८५ टक्के महिला शिळे अन्न सेवन करतात. कर्बोदकांमधे समृध्द असलेल्या मुख्य अन्नपदार्थांच्या सेवनाच्या वारंवारतेबाबत, ७७ % पेक्षा जास्त महिलांनी दिवसातून एकापेक्षा जास्त वेळा अन्नधान्यांचे सेवन केले. बहुसंख्य महिला दिवसातून एकदा डाळी/द्विदलवर्गीय धान्ये खातात.

सारांश आणि निष्कर्ष:

महिलांचे आरोग्य आणि कुपोषण ही एक गंभीर समस्या आहे कारण ती मानवी संसाधनांच्या विकासात अडथळा आणते. महिलांमध्ये आरोग्य आणि पोषणाच्या निम्न पातळीचे अनेक संकेतक आहेत. यापैकी काही म्हणजे अशक्तपणा, कमी वजन आणि उंचीआणि मातामृत्यू. स्त्री मूलत: जैविक दृष्ट्या श्रेष्ठ असल्याने, अनेक घटक या 'क्षमते' विरुद्ध कार्य करतात आणि तिचे आजारी आरोग्य आणि कुपोषणास कारणीभूत ठरतात. त्यापैकी प्रमुख म्हणजे निरक्षरता, लवकर विवाह, वारंवार आणि कमी अंतरावर असलेली गर्भधारणा आणि सामाजिक-सांस्कृतिक घटक. सध्या याकरिता जननी शिशु आरोग्य कल्याण कार्यक्रम आहे, जो गरोदर मातांना आरोग्य सेवा सुविधा पुरवतो. पोषणाच्या कमतरतेमुळे महिलांना अशक्तपणा, हिमोग्लोबिनची समस्यांना तोंड द्यावे लागते यासाठी रोगप्रतिबंधात्मक औषधांचा नियमित पुरवठात्यांना वेळीच केला पाहिजे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना या प्रमुख योजना आहेत, ज्या आईच्या आरोग्य आणि पोषण स्थितीची पूर्तता करतात आणि त्यानंतर तिच्या जीवनाची गुणवत्ता वाढवतात यांची व्याप्ती अधिक क्षमतेने वाढविण्याची नितांत गरज आहे. महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी त्यांना शिक्षित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांच्या आरोग्याला चालना देण्यासाठी सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांनी ग्रामीण भागातील महिलांच्या आहाराच्या पद्धती सुधारण्यासाठी कार्य करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण महिलांच्या सकारात्मक पैलूंबद्दल प्रसारमाध्यमांद्वारे सामान्य जागरूकता निर्माण केली पाहिजे.

संदर्भ:

1. Batliwala S. (1987), Women's access to food, Indian Journal Soc, Work; 48(3): 225-71
2. http://www.ipcbee.com/vol67/018-ICFSN2014-N2007.pdf
3. http://www.njcmindia.org/uploads/2-3_388-393.pdf
4. https://archpublichealth.biomedcentral.com/track/pdf/10.1186/s13690-016-0114-3.pdf
5. https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC6917366/
6. MüllerO. & Krawinkel M., 2005, 'Malnutrition and health in developing countries', *Canadian Medical Association Journal* 173(3), 279–286.
7. Smyke P. (1991), Women and health, London, Zed Books Ltd.

*सहयोगी प्राध्यापक , समाजशास्त्र विभाग, श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली.

***

लोकशाहीच्या विस्तारातील जनआंदोलनांची भूमिका : गडचिरोली जिल्यातील जल, जंगल, जमिनीचे लढे

*श्रुती तांबे

**पुरुषोत्तम वारलु चांदेकर

प्रस्तावना

भारत हा समकालीन जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. लोकशाहीत नागरिकांचे प्रत्यक्ष–अप्रत्यक्षात शासन अपेक्षित असते. अन ही व्यवस्था लोकांच्या विकासासाठी कटिबद्ध असते परंतु प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही. उलटपक्षी लोकशाहीत बहुदा राज्यसंस्थेच्या कायदे, धोरणांतून वंचित घटकांना आणखीन वर्जित केले जाते. प्रत्यक्षात राज्यसंस्था ही भांडवलशाहीसाठी पूरक धोरणे, उद्योगस्नेही धोरणे व मोठ्या प्रमाणात खाजगीकरणाला समर्थन देत असल्याने प्रत्यक्षात कायद्याची म्हणावे त्याप्रमाणात स्वयंशासनाची अंमलबजावणी होताना दिसून येत नाही.

जे काही थोड्या प्रमाणात लोकांना हक्क मिळालेला आहे तेही व्यापक जनआंदोलनामुळे मिळालेला आहे. सदर शोधनिबंधात अशाच काही जनआंदोलनाचा मांडणी करणार आहो. जे सद्यपरिस्थितीमध्ये महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यामध्ये कार्यरत आहेत. येथे खूप वेगवेगळ्या विचारसरणीचे आंदोलने कार्यरत असलेली दिसतात. परंतु येथे प्रातिनिधिक स्वरुपात तीन आंदोलनांना येथे घेतलेला आहे. या तीन व्यष्टीच्या अध्ययनाआधी वनकायद्याच्या संदर्भात भारतात झालेल्या आंदोलनाची पार्श्वभूमी पडताळून पाहणे हे महत्वाचे होऊन जाते.

भारतातील वनविषयक जनआंदोलनांचा इतिहास हा जुना आहे. ती मागील काही वर्षात सुरु झाली आहेत असे नाही. ब्रिटिशांची जुलमी धोरणे, नवे बेदखल करणारे कायदे यांच्या विरोधात जल, जंगल, जमिनीसाठी आदिवासींनी दिलेल्या लढ्यांचा इतिहास आपल्याला कागदोपत्री तसेच लोककथेतून पाहायला मिळतो. के.एस.सिंग (१९८५) यांनी आदिवासी चळवळींचे तीन टप्प्यामध्ये विभाजन केले आहे. पहिला टप्पा हा ब्रिटिश राजवटीचा भारतात उदय, उभारणी आणि विस्तार होत असतानाचा १७९५ ते १८६० चा आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये १८६० ते १९२० या काळात वसाहतवादाचा विस्तार होताना 'व्यापारी' भांडवलाचा आदिवासी अर्थव्यवस्थेमध्ये प्रवेश झाला. त्याचा परिणाम आदिवासींच्या जमीनीसोबत व जंगलासोबत असलेल्या संबंधांवर झाला. तिसऱ्या टप्प्यामध्ये १९२० पासून १९४७ साली स्वातंत्र्य मिळेपर्यंतचा काळ समाविष्ट आहे. या काळामध्ये आदिवासींनी केवळ तथाकथित 'विभाजनवादी' चळवळींना सुरुवात केली नाही, तर त्याचवेळी ते राष्ट्रवादी आणि शेतीविषयक चळवळींमध्येही सहभागी झाले" (शाह २०१७:१०२)

शहा यांच्या मते "जमिनीपासून दुरावलेपण, जबरदस्ती, वेठबिगारी, अत्यल्प मजुरी, जमीन बळकावणे इत्यादी मुद्दे" हे स्वातंत्र्यापूर्वी आणि त्यानंतरही आदिवासी चळवळीतील प्रमुख मुद्दे राहिले" (शाह २०१७:१०६)

मुळात ब्रिटीशांच्या आगमनानंतर अतिनफ्याकरिता, आपल्या भांडवली आधुनिकीकरणाच्या एकूण गरजेकरिता त्यांना भारतातील वनसंसाधने खूप मोठ्या प्रमाणात लुटली. त्यामधून मिळणारा नफा ते आपल्या स्वत:च्या देशात पाठवीत होते. येथील प्रत्येक समाज घटकांचे शोषण करून, लोकांच्या श्रमाचे शोषण करून, अनेक प्रकारच्या पिळवणुकीच्याद्वारे युरोपीय भांडवली व्यवस्था आपला स्वार्थ साध्य करत होती. भारतातील एतद्देशीय लोकांना वनसंसाधनांचा वापर कसा करावा, हे माहिती नाही. त्यासाठी कायदे करणे गरजेचे आहेत. त्यासाठी वनसंसाधनाचे व्यवस्थापन होणे गरजेचे आहे. अशी कारणेपुढे करून वनविभाग आणि वनकायद्यांची निर्मिती ब्रिटिशांनी भांडवली व्यवस्थेच्या विस्तारासाठी केली. त्याद्वारे येथील आदिवासींचे शोषण करण्यास सुरुवात केली. या पिळवणुकीविरुद्ध आदिवासींनीही लढा दिला. भारतातील अनेक भागातील लोकनेत्यांचे नाव या संदर्भात घेतले जाते. जसे तंट्या भिल्ल, बिरसा मुंडा, वीर बाबुराव शेडमाके तसेच त्या - त्या भागातील आदिवासी जननायक यांच्यासोबत तेथील जनसमुदायांनी आंदोलन पुकाराल्याचा इतिहास स्पष्टपणे दिसतो. अशा काही तीव्र संघर्षाच्या प्रदेशांना ब्रिटिशांनी 'एक्सक्लुडेड एरियाज' तर काही भागांना 'पार्शली एक्सक्लुडेड एरियाज' असे नाव दिले होते.

१८ डिसेंबर २००६ चा वनहक्क कायदा आणि ३१ डिसेंबर २०१७ ला आलेली अधिसूचना हा ऐतिहासिक निर्णय होता. परंतु यासाठी वननिवासी, आदिवासी हक्कांच्या संदर्भात काम करणारे कार्यकर्ते एकत्र झटले होते. त्यांनी वनविभाग आणि पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली आदिवासींना वनांपासून दूर करणाऱ्या व भांडवलदारांच्या लॉबीच्या विरोधात संघर्ष करून मिळवलेला होता. वनजमीन ही जमातीपासून दूर ठेवायला पाहिजे, ह्या नकारात्मक संवर्धनवादी दृष्टीकोनामुळे आदिवासींना विशिष्ट प्रकारे मागास ठेवले व एकटे पाडले. संवर्धनाच्या नावाखाली वननिवासी समुदायांनी दडपशाही अनुभवली. आदिवासी यामुळेच स्वतंत्र भारतातही अर्धनागरिक म्हणून जीवन जगत आहेत (कुमार २०११: ३४)

उल्का महाजन (२०११) असे प्रतिपादन करतात की, देशभरातील आदिवासी संघटनांच्या वतीने श्री. प्रदीप प्रभू यांनी आदिवासी समूहांच्या शोषणाची परिस्थिती मांडणारे निवेदन सादर केल्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी हा कायदा करण्याचे आदेश २००४ मध्ये दिले. तेव्हा वन खाते आणि आदिवासी यांचे शोषक - शोषित नाते लक्षात घेऊन हा कायदा बनवण्याचे काम जाणीवपूर्वक आदिवासी विकासखात्याकडे सोपवण्यात आले होते. कायद्याच्या अंमलबजावणीतही महत्त्वाची जबाबदारी अदिवासी विकासखात्याकडेच देण्यात आली (महाजन २०११).

सदर शोधनिबंधाच्या पहिल्या भागात संकल्पनात्मक चौकट आणि पद्धतीशास्त्राचे वर्णन केले आहे. दुसऱ्या भागात ब्रिटिशकालीन वनकायदे, स्वातंत्र्योत्तर वनकायदे व वन हक्क कायदा २००६ ची मांडणी केलेली आहे. तिसऱ्या भागात गडचिरोली जिल्ह्यातील जल, जंगल व जमीनीच्या संदर्भात लढा देणाऱ्या व्यष्टीचे चिकित्सक विश्लेषण केला आहे. तर चौथ्या भागात निष्कर्ष व समारोप प्रस्तुत केले आहे.

भाग पहिला: संकल्पनात्मक चौकट व पद्धतीशास्त्र

१) **समुदायवादी लोकशाही :**

जयप्रकाश नारायण यांच्या प्रतिपादनानुसार, लोकशाही ही सत्तावान आणि नियंत्रित पक्षांकडून संपत्तीवान आणि निर्दयी, धूर्त मध्यमांद्वारा हातचालाखीने वापरली जाते. या पद्धतीमध्ये जनसामान्यांना शोषणाला सामोरे जावे लागते. सांसदीय लोकशाहीचा सर्वात मोठा दोष म्हणजे तिची केंद्रीकरणाची प्रवृत्ती होय; या अशा प्रकारच्या लोकशाही ऐवजी जयप्रकाशांनी समुदायवादी लोकशाहीची कल्पना मांडली आहे. (डाल्टन डेनिस १९८६ :२९९) (व्होरा आणि पळशीकर २०१४ : १४-१५).

२) **नागरी समाज**

नागरी समाज नवश्रीमंतांचा आवाज भांडवलशाहीला पूरक म्हणून ही भूमिका बजावते. तेव्हाच त्यातील दुसरा गट लोकशाहीवादी, शोषणमुक्ती, पर्यावरणवादी, शोषित – पीडितांचा बुलंद आवाज म्हणूनही आपले कार्य पार पाडते. सदरच्या शोधनिबंधात शोषणमुक्ती, लोकशाहीवादी, मानवतावादी संदर्भात लढा देणाऱ्या गटाचा समावेश केला आहे.

पद्धतीशास्त्र

सदर शोधनिबंधाकरिता दुय्यम स्त्रोतांचा वापर केला असून 'गुणात्मक आशय विश्लेषण' व चिकित्सक संभाषित विश्लेषण हे पद्धती म्हणून वापरले आहे.

भाग दुसरा : ब्रिटिशकालीन वनकायदे, स्वातंत्र्योत्तर वनकायदे व वन हक्क कायदा २००६ ची मांडणी

ब्रिटीश राजवटीने तर वनविभाग आणि वनकायद्यांची निर्मिती करून मोठ्या प्रमाणात आदिवासींचे शोषण केल्याचा संदर्भ एकूण इतिहासातून स्पष्ट होतो. जीवनोपयोगी वनसंसाधने पूर्वी आदिवासी व गैर आदिवासी कोणत्याही निर्बंधाच्या दबावाखाली न राहता वापरू शकत होती, परंतु ब्रिटीशांनी मोठ्या प्रमाणात भांडवली नफा कमाविण्यासाठी वनसंसाधनावर निर्बंध घालणे महत्वाचे मानले. त्यातून मोठ्या प्रमाणावर महसूल कमविणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्टे होते. त्यात त्यांनी येथील आदिवासींचा मोठ्या प्रमाणात पिळवणुक केली. भांडवली धोरणे राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संसाधनांना नष्ट केले.

१७९३ चा 'कायमधारा पद्धती' पारित करून उपजीविकेच्या संसाधनावर समुदायाच्या मालकी हक्कांवर मोठा मारा करण्यात आला. १८६५ च्या वन कायद्यातून असे स्पष्ट होते की, विशेषत: ब्रिटीशांची नजर ही इमारती लाकूड आणि महसूल गोळा करणे यावर होती. १८७८ च्या वन कायद्यात फिरती शेतीपध्दत बंद करण्याचे अधिकार वन

खात्याला देण्यात आले. तसेच वननिवासी यांच्याकडून वनोत्पादने घेऊन जाणे ह्या बाबीला पुढे करून किंवा वनांच्या संदर्भात वननिवासी यांनी काही चुकीचा उपक्रम केला आहे असा आरोप करून वननिवासींना कारावास व दंड केला जात होता. १९२७ च्या कायद्याद्वारे वननिवासी जे वनांचा वापर दैनदिन गरजांकरिता करत होते त्यांच्या हक्कावर गदा आणली गेली व ब्रिटीश शासनाने नियंत्रण करण्यासाठी दंड आणि जी प्रक्रिया राबविली ते खूपच अन्यायकारक असे होते. गाव समुदायाचा जे वनांशी सांस्कृतिक नाते जोडलेले होते, त्या सर्वावर सदर कायद्याने खूपच विपरीत परिणाम केले.

स्वातंत्र्योत्तर भारताची पार्श्वभूमी

१९५२ च्या राष्ट्रीय धोरणांत आदिवासी विरोधी पैलूंना वाव देण्यात आला. या कायद्यामुळे दावा करण्यास निर्बंध घालण्याबरोबरच वनात शेती करण्यासही तेवढी मुभा दिलेली नव्हती. वन्य प्राणी संरक्षण अधिनियम १९७२ गुन्ह्याकरिता शिक्षेची तरतूद करते. वन्य जीवांच्या संदर्भात गुन्हा करण्यासाठी वापरण्यात येणारे कोणतेही उपकरण, वाहन किंवा हत्यारांना ताब्यात घेण्याच्या संदर्भात सदर कायद्यात तरतूद आहे. या कायद्यातून त्यांच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या त्यांच्या उपजीविकेवर तसेच त्यांच्या संस्कृतीवर मारा झालेला दिसून येतो. १९८० च्या कायद्याने वननिवासींना अतिक्रमणदार असे मानले गेले.

राष्ट्रीय वन धोरण १९८८ हे पर्यावरण संतुलन आणि जलवायू बनवून ठेवणे हा उद्देश पुढे ठेऊन बनवले गेले. ह्या धोरणांतून मनुष्य, प्राणी, आणि वनस्पती ह्या सर्वांकरिता उपयुक्ततेचे होईल, या पद्धतीची मांडणी केली होती परंतु त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी मात्र झाली नव्हती. त्यानंतर १९९० मध्ये संयुक्त वन व्यवस्थापन परिपत्रक पारित झाले. ज्यामध्ये भारत सरकारने पहिल्यांदा वन व्यवस्थापन आणि वनरोपनांमध्ये समुदायाच्या भागीदारीचा स्वीकार केला. परंतु त्यातही अनेक त्रुट्या होत्या. ह्या परिपत्रकात नमूद असलेला नफा हा फक्त अभिजनांना आणि त्यातल्या त्यात पुरुषांना मिळालेला दिसतो. असा हा एकूण वन हक्क कायद्याची पार्श्वभूमी असलेली दिसून येते. २००२ च्या बेदखलीकरण आदेशाद्वारे तर २५ हजार कुटुंबाना बेदखल करून त्यांच्यावर हिंसा करण्यात आली, असा हा ब्रिटीश काळात सुरु झालेला शोषण व पिळवणूक ह्या पद्धतीने विकसित झालेला दिसतो.

वन हक्क कायदा २००६

वनहक्क कायदा २००६ ला मान्य करण्यात आला आहे. तसेच आदिवासींवर व इतर पारंपरिक वननिवासींवर ऐतिहासिक अन्याय झालेला आहे, त्याकारणास्तव आम्ही वन हक्क कायदा तयार करत आहोत, ह्या प्रकारची मांडणी कायद्यात असूनही राज्यसंस्थेचा एकूण व्यवहार मात्र तसाच राहतो. प्रत्यक्षात राज्यसंस्था भांडवलशाहीसाठी पूरक धोरणे, उद्योगस्नेही धोरणे व मोठ्या प्रमाणात खाजगीकरणाला समर्थन देत असल्याने प्रत्यक्षात कायद्याची म्हणावे त्याप्रमाणात अंमलबजावणी होताना दिसून येत नाही.

ब्रिटीशकालीन वनकायदे, धोरणे तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील वनकायदे, धोरणे व परिपत्रके या सर्व बाबींचे चिकित्सक संभाषित विश्लेषण केल्यास आपल्याला हे स्पष्ट होते की, ब्रिटीश शासन काळात वनसंसाधनांना केवळ क्रय वस्तू म्हणून बघितले जात होते. तसेच उपभोग्य वस्तू म्हणून नफाकेंद्री धोरणातून मोठ्या प्रमाणात त्याची लूट केली जात होती. त्याकाळी निस्तार सारखे हक्क दिले गेले तरी म्हणावे त्या प्रमाणात त्यांची अंमलबजावणी झाली नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात वसाहतकालीन कायद्यांची पुनरावृत्ती करण्यात आली. तसेच मोठ्या प्रमाणात १९८० च्या वनसंवर्धन कायद्यापर्यंत भांडवलशाहीच्या समर्थनार्थ प्रकट स्वरुपात दमनकारी उपाय व त्याशिवाय विचारप्रणालीयुक्त राज्ययंत्रणा राज्यसंस्था राबवीत असलेली दिसते. १९८८ व १९९० चा संयुक्त वनव्यवस्थापन परिपत्रकात काही आदिवासींना संधी दिल्याचे भासत असल्यातरी मुळात मिळणारा नफा हा अभिजन आणि पुरुषांनाच होत होता. त्यात दलित, स्त्रिया, आदिवासी डावलल्या गेल्या होत्या. वन हक्क कायदा २००६ ह्या कायद्यात हक्क मिळवण्याचे अनेक संधी दिसत असल्या तरी प्रत्यक्षात राज्यसंस्थेनी भांडवलशाहीसाठी पूरक धोरणे, तसेच मोठ्या प्रमाणात नवउदारमतवादी धोरणांचा स्वीकार केल्याने वनदावे मान्य केले जात नाहीत तर मोठ्या प्रमाणात नाकारले जात आहेत. जे दावे मान्य केले जात आहेत. तेही व्यापक जनआंदोलनामुळेच मान्य केले जात आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

भाग तिसरा : गडचिरोली जिल्ह्यातील जल, जंगल व जमीनीच्या संदर्भात लढा देणाऱ्या व्यष्टीचे चिकित्सक विश्लेषण

महाराष्ट्रातील नागपूर या प्रशासकीय विभागाच्या अंतर्गत गडचिरोली जिल्ह्याचा समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी, २३ लाख, ७४ हजार ३३३ एवढी आहे. त्यात गडचिरोलीची एकूण

लोकसंख्या १० लाख, ७२ हजार ९४२ एवढी असून आदिवासींची लोकसंख्या ४ लाख, १५ हजार ३०६ एवढी आहे. गडचिरोली जिल्ह्यात एकूण १२ तालुक्यांचा समावेश होतो. हा आदिवासीबहुल जिल्हा असून येथे गोंड, माडिया, परधान, हलबी इत्यादी जमाती वास्तव्य करतात ह्या जिल्ह्याला एक मागास जिल्हा असे संबोधले जाते.

प्रस्तुत संशोधनप्रकल्पाच्या दृष्टीने महत्वपूर्ण बाब अशी की, मागास म्हणवल्या जाणाऱ्या याच जिल्ह्यात सामूहिक वनहक्क दावे सर्वात जास्त प्रमाणात मान्य झाले आहेत, ही विरोधाभासाची गोष्ट आहे.

महाराष्ट्र प्रॉमिस एन्ड परफॉर्मन्स १० एरर्स ऑफ द फॉरेस्ट राईटस ॲक्ट इन इंडिया या २०१७ च्या अहवालानुसार गडचिरोलीमध्ये ग्रामसभेच्या वनहक्क समितीत एकूण वनदावे १७९१ एवढे प्राप्त झाले आणि सर्वच दावे मान्य करण्यात आले. उपविभागीय वन हक्क समितीत एकूण १७९१ वनदावे प्राप्त झाले. त्यातून त्यांनी ३१७ एवढे नाकारले आहे तर १४७४ दाव्यांना मान्यता मिळाली आहे. जिल्हास्तरीय समितीत एकूण १४७४ दावे प्राप्त झाले आहेत त्यातून ४७ दावे नाकारले गेले आहेत. तर १३५५ दाव्यांना मान्यता दिली असून ७२ दावे प्रलंबित आहेत.

अ) मेंढा (लेखा)तील सामूहिक सहभागी लोकशाही आंदोलन

भारतात गावाजवळच्या वनांवर तसेच वनसंसाधने वापरण्याचा हक्क मिळविलेले पहिले गाव म्हणून मेंढा (लेखा) या गावाची ओळख आहे. मेंढा (लेखा) हे गाव गडचिरोली जिल्हातील धानोरा तालुक्यात वसलेले गोंड आदिवासींचे मध्य भारतातील इतर गांवासारखेच एक लहानसे गाव आहे. एकुण १०५ घरे व ४७५ लोकसंख्या असलेले हे गाव गडचिरोली धानोरा रस्त्यावर धानोरा या तालुक्याचा गावापासून फक्त ३ कि.मी. अंतरावर व जिल्ह्याच्या ठिकाणापासून ३० कि.मी. वर आहे.

मिलिंद बोकील आपल्या 'गोष्ट मेंढा गावाची' या पुस्तकात मेंढा या गावाच्या संदर्भात सविस्तर मांडणी करतात. तसेच तेथे करण्यात आलेल्या जनआंदोलनांचा ऊहापोहही ते करतात. "१९८४ मध्ये चंद्रपूर - गडचिरोली जिल्हात **'जंगल बचाव, मानव बचाव'** ही एक चळवळ सुरु झाली होती. आंध्रप्रदेशात इंचमपल्ली येथे गोदावरीवर तर शेजारच्या बस्तर जिल्ह्यात भोपालपट्टनम येथे इंद्रावतीवर; असे दोन संयुक्त जलसिंचन प्रकल्प योजलेले होते. हे प्रकल्प महाराष्ट्र, छत्तीसगड आणि आंध्रप्रदेश यांच्या सीमेवर जरी असले तरी त्यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातला फार मोठा आदिवासी विस्तार आणि जंगल बुडणार होते. फायदा तर काहीच होणार नव्हता. या आंदोलनाचे नेतृत्व लालश्याम महाराज नावाचे आदिवासी नेते करत होते. लालश्याम महाराज जमीनदार असले तरी प्रत्यक्षात त्यांची राहणी आणि वागणूक ही सर्वसामान्य कास्तकारासारखी होती. ते समाजवादी विचारांचे होते आणि १९७२ साली चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून अपक्ष खासदार म्हणून निवडून गेले होते. स्वतंत्र भारतातले हे गडचिरोला जिल्ह्यातील असामान्य नेतृत्व.

भारत सरकारच्या दंडकारण्य प्रकल्पाच्या अंतर्गत मध्यभारतात म्हणजे बस्तर व चंद्रपूर जिल्ह्यात बांगलादेशी निर्वासितांना वसवायला सरकारने सुरुवात केली तेव्हा त्याच्या निषेधार्थ लालश्याम महाराज खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनी आपले आयुष्य हे केवळ जनजागृतीकरिता वाहून घेतले होते. चंद्रपूर जिल्ह्यात भूमीहीनांची जंगलजमिनीचे पट्टे उदरनिर्वाहासाठी वहिवाटीला आणण्याची 'जबरान् जोत' चळवळ सुरु होती. परंतु केवळ जमीन वहितीखाली आणून विकास होणार नाही, तर जंगलाचे संरक्षण व जोपासनाही करावी लागेल या विचाराने आंदोलन संघटित करण्यात आले होते. हा विषय सगळयाच जनतेच्या जिव्हाळयाच्या असल्याने पक्षीय मतभेद बाजूला ठेऊन सगळे पुढारी एकत्र आले होते" (बोकील २०१३:३-४)

या आंदोलनात आदिवासी विकासाविषयी कळकळ असणारे मध्यमवर्गीय कार्यकर्तेही जोडले गेले. मोहन हिराबाई हिरालाल हे चंद्रपूरचे तरुण कार्यकर्ते त्यापैकीच एक होते.ते जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालच्या 'छात्र युवा संघर्षवाहिनी' या विद्यार्थाच्या व तरुणांच्या संघटनेमध्ये सामील होते. संघर्षवाहिनीची शाखा त्यांनी चंद्रपूरमध्ये स्थापन केली होतीच परंतु १९७८ पासून चंद्रपूर जिल्हात चालत असलेल्या 'महाराष्ट्र जबरान जोत आंदोलन कृती समिती' मध्येही ते सक्रीय होते. १९७९ पासून ते १९८६ पर्यंत 'आपला मार्ग आपण शोधूया 'नावाची एक अनोखी प्रक्रिया ते या भागात चालवत होते. १९८४ साली 'वृक्षमित्र' नावाची संस्था स्थापन केली होती. १९८७-८८ मध्ये गडचिरोली जिल्हातील धानोरा तालुक्यातल्या बावीस गावांचा 'जंगल आणि लोकांची उपजीविका' यांचा एक अभ्यास त्यांनी केला. या अभ्यासादरम्यान सर्वसहमतीने निर्णय घेऊ शकणारे एखादे गाव आहे का असं त्यांचा शोध चालू होता. 'जंगल बचाव, मानव बचाव' चळवळीमध्ये ज्या पदयात्रा निघत त्यातून त्यांची देवाजी तोफा यांची ओळख झाली होती.

देवाजींनी त्यांना सांगितल की हो, आमच गाव असं आहे, आम्ही सर्वसहमतीने निर्णय घेतो. आमच्या गावाचा नाव मेंढा(लेखा)!

पुढे मोहन हिराबाई हिरालाल आणि देवाजी तोफा यांची वैचारिक व सामाजिक, राजकीय भागीदीरीसोबतच घनिष्ठ मैत्री झाली. ती मैत्री वनहक्क मिळविणे तसेच गावात स्वशासनाची बांधणी करणे अशाप्रकारचे सर्व जनआंदोलनच्या संदर्भात ते काम करतात. मेंढा (लेखा) वन हक्क मिळवणारे पहिले गाव अशी त्याची ओळख होते. भारतातील वन हक्क मिळविणारे पहिले गाव, तसेच 'मुंबई, दिल्लीत आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार' ह्या आपल्या एकूण लढ्याला केंद्रस्थानी ठेऊन, सर्वसहमतीने निर्णय घेऊन शासनाकडून आपले हक्क मिळवीत आहे. मेंढा (लेखा) या गावात सर्वसहमतीने निर्णय घेतले जातात, प्रत्येक स्त्री- पुरुषांच्या मताला तेवढेच महत्व असते. गावातील एकजुटता ही विलक्षण अशी आहे, काही अपवाद आहेत. परंतु ह्या एकूण पार्श्वभूमीतून राज्यसंस्थेला आदिवासीबहुल गाव म्हणून सामूहिक हक्क् लोकशाही मार्गाने, शांततेने, सर्वसहमतीने 'आपला हक्क परत द्या' म्हणून मेंढा गावातील नागरिकांनी आपले हक्क मिळविले आहेत. मेंढा (लेखा) या गावापासून प्रेरणा घेऊन आता महाराष्ट्रातील काही ठिकाणी त्याच पद्धतीने काम सुरु झाले आहे. जनआंदोलने तसेच सामाजिक संस्था लोकांसोबत काम करत आहेत. त्याचवेळी इतर काही संस्थांबद्दल मात्र शंका उपस्थित होते.

ब) पारंपरिक इलाखा गोटूल समिती

गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड या भागातून मोठ्या प्रमाणात कच्च्या लोहाची लूट केली जात आहे. एकीकडे मेंढा (लेखा) या गावाला भारतात पहिल्यांदा वन हक्क देण्यात आले होते तर त्याच जिल्ह्यातील सुरजागड येथे त्याच कायद्याकडे दुर्लक्ष करून अमाप संसाधनाचा लूट करण्यात येत आहे. फक्त वन हक्क कायद्याकडे दुर्लक्ष करण्यात आले नाही तर अशा अनेक पर्यावरणविषयक कायद्यांकडे, पेसा कायद्याकडे दुर्लक्ष करून भांडवलशाहीला मोठ्या प्रमाणात खतपाणी घालण्यात येत आहे.

"सुरजागड इलाख्यातील बांडे, सुरजागड, दमकोंडवाही, मोहंदी - गुंडजुर यासह ११ खाणी शासनाने प्रस्तावित केलेल्या आहेत. तर लॉयड्स मेटल्स अंड इंजिनीअर्स या कंपनीला खाण मंजूर केले आहे. सदर खाणीना मंजुरी देताना क्न संवर्धन अधिनियम १९८०, पर्यावरण अधिनियम १९८६, पंचायत उपबंध (पेसा) अधिनियम १९९६, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील प्रकरण ३ अ चे कलम ५४, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२ तसेच खाण व खनिजे अधिनियम व इतर अनेक कायदेशीर तरतुदीचे भंग शासनस्तरावरून करण्यात आले आहे" (समिती २०१६). त्यात आदिवासींचे पवित्र डोंगर, पहाड व जंगल ह्याचा विध्वंस होणार आहे. त्यात त्यांचा सांस्कृतिक व धार्मिक वारसा ही संपुष्टात येत आहे. या खाणीकरिता १५९४६ एकर जंगल व साधारणत: ४० एकर जंगल खाणीपूरक कामाकरिता नष्ट केले जाणार आहे. ह्यामध्ये मुख्य म्हणजे सर्व कायद्यांकडे दुर्लक्ष करून आपली नवउदारमतवादी धोरणे राज्यसंस्था अभिजनांच्या नफ्याकरिता वापरत असलेली दिसून येते. त्यात राजकीय आणि प्रशासकीय वर्ग हे विकास आणि रोजगाराचे नाव पुढे करून भांडवलदारांना जंगल विकत आहेत. ह्याप्रकारची मांडणी तेथील जनआंदोलनांची असलेली दिसून येते.

सुरजागड क्षेत्रातीलच नव्हे तर संपूर्ण एटापल्लीतील तोडसा क्षेत्राच्या ४० ग्रामसभेच्या वतीने नंदू मट्टामी, कसनसूर क्षेत्राच्या ६८ ग्रामसभा वतीने कोत्तुराम पोटावी, बेज्जूर (भामरागड) क्षेत्राच्या १२६ ग्रामसभेच्या वतीने ॲड. लालसू नरोटी, झाडापापडा क्षेत्राच्या ४० ग्रामसभेच्या वतीने बावसू पावे, खुटगाव क्षेत्राच्या ६५ ग्रामसभेच्या वतीने बाजीराव उसेंडी, कोरची येथील ९० ग्रामसभा तर टिप्पागड क्षेत्रातून ३० ग्रामसभा क्षेत्रातून विरोध दर्शविण्यात आला" (समिती २०१६). "७० गावांच्या सुरजागड पारंपरिक इलाखा गोटूल समितीचा विरोध असून ग्रामसभांनी कायदेशीर ठराव व निवेदन देऊन खाणी रद्द करण्याची ठाम भूमिका घेतली आहे" (समिती २०१६). या सर्व पारंपरिक इलाखा गोटूल समित्या त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय व शोषणाविरुद्ध लढा देताना दिसतात. सत्ताधारी राजकीय वर्गांकडून खाणीला समर्थन दिले जात आहे, तर विरोधी पक्षाचे नेते या प्रकल्पाला विरोध करताना दिसत आहेत. वर म्हटल्याप्रमाणे आपापले स्वार्थ साधण्याचा प्रयत्न हे राजकीय वर्ग करत असलेले दिसतात.

क) अखिल भारतीय किसान सभा (आरमोरी, गडचिरोली)

कॉ. डॉ. महेश कोपुलवार, अखिल भारतीय किसान सभेच्या राष्ट्रीय कौन्सिल सदस्य म्हणून कार्यरत आहेत. ते गडचिरोली येथील आरमोरी येथे काम करणारे कार्यकर्ता आहेत. कॉ. डॉ. महेश कोपुलवार १९९१ पासून अखिल भारतीय किसान सभेशी ते जोडले गेले आहेत. त्यांचे कार्य विशेषत: वैयक्तिक दावे मिळविण्यासाठीचे असलेले दिसून येते.

वनहक्कविषयक मागण्या

वन हक्क कायद्यातील तरतुदीनुसार २००५ पूर्वी वन जमीन कसणाऱ्याचे प्रलंबित दावे कबजात /वहिवाटीत असणा-या संपूर्ण क्षेत्रासाठी त्वरित मंजूर करा. सर्व फेटाळलेल्या दाव्यांची फेरचौकशी करण्यात यावी, सर्व प्रलंबित अपिले मंजूर करावी. प्रत्येक गावाचे जंगलावरील सामुहिक वन हक्कांचे दावे मंजूर करावे. वन हक्क कायद्यातील नियम १३ (१) मध्ये नमूद केल्यानुसार ज्येष्ठ व्यक्तीचा जबाब हा बिगर आदिवासी दावेदारासाठी ते तीन पिढ्यांपासून त्या क्षेत्रात राहत असल्याचा पुरावा मानायला हवा.

जमीन संपादनाच्या संबंधी मागण्या

सर्व प्रकारच्या प्रकल्पांसाठी जमीन संपादन करताना जमीन संपादन कायदा २०१३ चीच अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच मुळ कायद्यातील कलम १०५ रद्द करण्यात यावे. जेणेकरून सर्व प्रकल्पांसाठी जमीन संपादित होणाऱ्या जमीनधारकांना एकसारखा न्याय मिळेल. आजवर संपादित झालेल्या परंतु न वापरलेल्या जमिनी मूळच्या जमीनधारकांना परत करण्यात याव्यात. गावाच्या सामूहिक उपभोगाच्या जमिनी ग्रामसभेच्या मंजुरीशिवाय हस्तांतरित करण्यात येऊ नयेत. अशा प्रकारचे मागण्या ठेऊन जनआंदोलन गडचिरोली जिल्ह्यात सुरु ठेवल्याचे एकूण चित्र दिसते.

गडचिरोली जिह्यात जवळपास ह्या तीन पद्धतीचे जनआंदोलने होत असलेले दिसून येत आहेत. मेंढा (लेखा) या गावात गांधीवादी विचारातून काम होताना दिसतो. पारंपरिक इलाखा गोटुल समितीमध्ये तेथील स्थानिक आदिवासींचा समुच्चय असा गट आहे. जे आता आपल्या जल- जंगल- जमिनीच्या संदर्भात लढा देत आहेत. खाणींच्या कामावर ज्यातून मोठ्या प्रमाणात विस्थापन होण्याची शक्यता आहे. त्याचा विरोध करताना दिसतात. अखिल भारतीय किसान सभा ह्या डाव्या शेतकरी, आदिवासी व इतर शोषित घटकांच्या संदर्भात जल – जंगल - जमिनीच्या संदर्भात काम करत असलेले दिसून येतात.

निष्कर्ष आणि समारोप

ब्रिटिश काळापासून आदिवासी व इतर पारंपरिक वननिवासी यांना वनसंसाधन वापण्यावर निर्बंध घालून अनेक प्रकारचे कठोर कायदे करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर भारतातही त्याच प्रकारच्या शोषणाची पुनरावृत्ती राबविली गेली. शासनाकडून १९९३ ला ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे विकेंद्रीकरणाच्या संदर्भात पावले उचलण्यात आले. परंतु पाचव्या अनुसूचीतील आदिवासी क्षेत्रासाठी विशेष पद्धतीची विकेंद्रीकरण करण्याची आवश्यकता होती. त्याकारणास्तव १९९६ मध्ये पेसा कायद्याची निर्मिती करण्यात आली, परंतु प्रत्यक्षात आजतागायत पेसा कायद्याची म्हणावे त्यापद्धतीने अंमलबजावणी झाली नाही. परंतु अनेक जनआंदोलनांनी आपले हक्क मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लढा दिला.

आदिवासी क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात जनआंदोलने उभ्या केल्यानंतर २००६ ला वन हक्क कायदा मान्य करण्यात आला. परंतु भांडवलशाही ही ईस्ट इंडिया कंपनीच्या शासनकाळातच मोठ्या प्रमाणात फोफावलेली दिसून येते. तसेच विशेषत: आता नवउदारमतवादी धोरणे राज्यसंस्थेनी अधिक आक्रमकपणे स्वीकारलेली आहे. अनेकदा कंपन्याच जमीनमहसूल, वहिवाट इ. विषयीच्या गोष्टी ठरवताना दिसत आहे. तसेच खाजगीकरण, पायाभूत संरचना निर्मिती, उद्योगस्नेही धोरणे राज्यसंस्थेनी स्वीकारलेली असल्यामुळे वन हक्क कायद्याची म्हणावे त्या पद्धतीने अंमलबजावणी होताना दिसून येत नाही

गडचिरोलीतील मेंढा (लेखा), शंकरगाव अशा काही गावातील जनआंदोलने ही 'दिल्ली, मुंबई मे हमारी सरकार, और हमारे गाँव मे हम ही सरकार' (मावे नाटे, मावा सरकार) अशी घोषणा देत स्थानिक पातळीवरील संसाधनावर आपला हक्क सांगत आहेत. अशा वेळी लोकशाहीविषयक विविध विचारप्रवाहांच्या धारणा तपासणे गरजेचे आहे. गडचिरोलीतील एकूण विकेंद्रीकरणाचे यशस्वी प्रयोग बघून ती संकल्पना व प्रक्रिया सर्वत्र लागू होईल का हे पडताळून पाहण्याची गरज भासते.

परंतु त्याचवेळेला सुरजागड प्रकल्पाच्या संदर्भातील इलाखा गोटूल समितीची बाजू तपासून पाहिले असता भांडवलशाही व नवउदारमतवादी धोरणे राज्यसंस्थेने स्वीकारल्यामुळे उदारमतवादी लोकशाहीवर आधारलेली राज्यसंस्थाच लोकशाहीच्या विकेंद्रीकरणात महत्त्वाचा अडथळा म्हणून उभी राहते. तेव्हा लोकशाही मार्गाने लढा देऊन लोकशाहीचे विकेंद्रीकरण मिळविता येईल का? स्वयंशासन राबविता येईल का ? अशा सर्व बाबींवर चिंतन होणे गरजेचे आहे.

कोणत्याही लोकशाही समाजात सुजान नागरिक असणे अत्यंत गरजेचे असते. आपल्या हक्कांची जाणीव असलेल्या व्यक्ती वा समुदाय यांच्यामुळे लोकशाही आणखी प्रबळ होते. लोकशाही चिरकाल टिकवायची असल्यास तेथील नागरिक हे जागृत असायला हवा. तेव्हा समुदाय म्हणून त्या त्या समाजाला आपला विकास करून घेता येतो.

संदर्भ सूची :

१) बोकील, मि. (२०१२). खरे स्वशासन कसे येईल?. *परिवर्तनाचा वाटसरू*, ३३-५२.

२) बोकील.मि. (२०१३). *गोष्ट मेंढा गावाची*. गडचिरोली : ग्रामसभा, मेंढा .

३) ब्रुमे व इतर. (२०१७). *महाराष्ट्र प्रॉमिस एन्ड परफॉर्मन्स १० एरर्स ऑफ द फॉरेस्ट राईटस ॲक्ट इन इंडिया.* सीएफआर लर्निंग ॲण्ड ॲडव्होकेशी ग्रुप महाराष्ट्र: ऑक्सफम - इंडिया. पुनर्प्राप्त ऑगस्ट ५, २०१८ https://fra.org.in/document/Maharashtra%20Promise%20and%20Performnce.pdf

४) व्होरा राजेंद्र., पळशीकर, सुहास.(२०१४). *भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार*. पुणे : डायमंड प्रकाशन.

५) सुरजागड़ पारंपरिक इलाखा गोटुल समिती.(२०१६). *"जान देंगे पर पहाड़ नहीं देंगे", "एटापल्ली तहसील की सभी जनविरोधी खदाने तुरंत रद्द करो"* – सुरजागड़ पारंपरिक इलाखा गोटुल समिती. *संहती*. पुनर्प्राप्त जानेवारी ५, २०१९. (http://sanhati.com/articles/18044/).

६) गाडगीळ, मा., गुहा, रा. (२०१८). यह दरकती जमीन: भारत का परिस्थितिक इतिहास (क. चौबे, अनु.). नवी दिल्ली : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी.

७) घाटे, ऋ.(२००९,जाने.-मार्च). वनव्यवस्थापन, विकेंद्रीकरण आणि आदिवासींचे जीवनमान वन हक्क कायदा, २००६ च्या संदर्भात भारतीय वनधोरणांची चिकित्सा. *समाज प्रबोधन पत्रिका, १८५*, ५८-७०.

८) तांबे, श्रुती.(२०११).नागरी समाजाच्या पुनर्व्याख्येची गरज. *परिवर्तनाचा वाटसरू*, ११(८), १३-१६.

९) तांबे,श्रुती.(२०१२). नागरी समजाचे गौडबंगाल! . *आंदोलन-शाश्वत विकासासाठी* , (९४-९७).

१०) तेलतुंबडे, आ. . "महाराष्ट्र शासनाचे नैसर्गिक संसाधनविषयक धोरण: एक चिकित्सात्मक आढावा.पृ.२०-१०३. *जागतिकीकरण आणि महाराष्ट्र*, बेहार अमिता द्वारा संपादित. पुणे: एन.सी.ए.एस.पुणे.

११) मोनिपल्ली जॉर्ज., कुमारी सुनीता., मल्लिक.,संजय व सिंह, बनारस.(२०१६). *झारखंड मे वनाधिकार कानून का दशक, उपलब्धियां, मुद्दे, चुनौतियां एवं सीख.* रांची : झारखंड प्रेस.

१२) घाटे. ऋ. (१९९२). फॉरेस्ट पॉलीसी एन्ड ट्रायबल डेव्हलपमेंट : अ स्टडी ऑफ महाराष्ट्र. न्यू दिल्ली : कन्सेप्ट पब्लिशिंग कंपनी.

१३) शाह, घ.(२०१७). भारतातील सामाजिक चळवळी.पुणे :सेज भाषा प्रकाशन.

*प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, ईमेल : stambe@unipune.ac.in

**पीएच.डी विद्यार्थी(समाजशास्त्र विभाग), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. ईमेल : purushottamc74@gmail.com

मोबाईल : 9405962633.

***

जागतिकीकरणात पर्यावरण, नैसर्गिक संसाधने आणि विकास अभ्यासाची दिशा

*प्रा.संजयकुमार कांबळे

आशय:

पर्यावरणीय जागतिकीकरण म्हणजे पर्यावरण संरक्षणासंबंधी आंतरराष्ट्रीय स्तरावर समन्वित पद्धती आणि नियम (बहुतेकदा आंतरराष्ट्रीय करारांच्या स्वरूपात) असतात. आर्थिक जागतिकीकरण हे जागतिकीकरणाच्या अनेक आयामांपैकी एक आहे. आर्थिक जागतिकीकरणाचे महत्त्वपूर्ण पर्यावरणीय परिणाम आहेत. जागतिकीकरणाने मागील दशकात अर्थव्यवस्था, पर्यावरणशास्त्र आणि समाजावर लक्षणीय प्रभाव टाकला आहे. दरम्यान, हरित अर्थव्यवस्था विकसित आणि विकसनशील देशांमधील वाढ आणि विकासासाठी एक महत्त्वपूर्ण धोरण/ फ्रेमवर्क म्हणून उदयास आली आहे. या अभ्यासातून जागतिकीकरण, अर्थव्यवस्था आणि हवामानातील आणि पर्यावरणीय आव्हाने यावर तपशीलवार आढावा घेताना अनेक महत्वाच्या प्रश्नाची चर्चा केली आहे.पर्यावरणीय प्रश्न सहजपणे न दिसणाऱ्या अमूर्त राजकीय आर्थिक ढाच्यातून तयार झाले आहेत. म्हणून पर्यावरणीय प्रश्नांची फोड करून सांगतसा बिगर पर्यावरणीय विषयांनाही भिडावेच लागेल.

आपल्या पृथ्वीचे रक्षण करणे, गरिबीचे निर्मूलन करणे, आर्थिक प्रगती साधने, ह्या सर्व लढती मुळात एकच आहेत.हवामान बदल रोखणे, पेयजलाचे दुर्भिक्ष संपवणे, ऊर्जेचा तुटवडा नसणे, वैश्विक आरोग्याचे इफसीत साधने, अन्नसुरक्षा आणि स्त्रियांचे सक्षमीकरण या सर्व अधोरेखितांना एकमेकांशी जोडणे आवश्यक आहे. यातले कोणतेही एक उद्दिष्ट गाठण्यासाठी करायचे उपाय खंडित स्वरूपात नव्हे तर एकात्मिक रीतीने अन्य उद्दिष्टांशी पूरक असे असणे आवश्यक आहे.

बांण की मून (सेक्रेटरी जनरल संयुक्त राष्ट्र संघ 2007 ते 2016)

प्रस्तावना :

पृथ्वीवरील सर्व सजीव निर्जीव गोष्टी पर्यावरणीय संकल्पनेत येतात. माणसाला मिळालेल्या बुद्धीच्या जोरावर त्यांनी आपली जीवनशैली बदलायला सुरुवात केली इतर प्राण्यांना त्यांनी माणसाला हून त्यांच्या शक्तीचा उपयोग करून घेतला शेती करायला सुरुवात केली जमिनीची सपाटीकरण केले. अशा रीतीने त्यांनी निसर्गाच्या रचनेत बदल केली सुरुवातीला हे बदल हानिकारक नव्हते. पण गेल्या दोनशे तीनशे वर्षात नवनवे शोध लागून नव्या वस्तू तो कारखान्यातून निर्माण करू लागला. आता मात्र तो नैसर्गिक अन्न जाळ्याच्या मर्यादित राहिला नाही व पर्यावरणाची मूलभूत घटक हवा जमीन पाणी यांच्या कृतीने दूषित व्हायला लागली इतर प्राणी वनस्पतींची विश्व यांच्यावरही तो जणू राज्य करू लागला. त्याचा अमर्याद वापर व निसर्गाबद्दलची बेपरवाही फक्त स्वतःच्या सुख सोयींचा विचार अशा कारणाने सतत मोठ्या प्रमाणात हानी होत गेली. आपल्या आधुनिक जीवनशैली तिच्या नव्या गरजा निर्माण झाल्या त्या भगविण्यासाठी आपण ज्या ज्या गोष्टी केल्या त्यात पर्यावरणाची हानी होत गेली.

भारतातील पर्यावरण व विकासाच्या आणि निसर्गसंवर्धनाच्या प्रश्नाचा या शोधनिबंधातून विचार करताना त्याची चर्चा खालील प्रश्नाच्या अनुषंगाने करण्यात आली आहे.

1. जागतिकीकरणात पर्यावरणाचा अर्थ काय?
2. जागतिकीकरणाचा पर्यावरणावर कसा परिणाम होतो?
3. पर्यावरणीय जागतिकीकरणाचे फायदे काय आहेत का ?
4. पर्यावरण संरक्षणात जागतिकीकरणाची भूमिका काय आहे?
5. पर्यावरण आणि विकासाच्या प्रश्नाकडे चिकित्सकपणे कसे पाहता येईल?
6. पर्यावरणविषयक साहित्याचा आढाव्यातून आपणाला कोणते मुद्दे लक्षात येतात?
7. भारतातील आणि जगभरातील पर्यावरणाचे प्रश्न कोणते आहेत ते प्रश्न सोडविण्यासाठी कोणते उपाय सुचविले जात आहेत?

या शोध निबंधातून जात , लिंगभाव आणि पर्यावरणीय प्रश्न आणि विकास या समाजशास्त्रातील मुख्य वादविवादांवर चर्चा केली जाईल.निसर्गसंपत्तीचे विषम वाटप आणि विषम उपभोग यावर प्रकाशझोत टाकला जाईल.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पर्यावरणीय बनविणाऱ्या विविध आयामांमधील संबंध आणि स्त्रीवादी पर्यावरणवाद ज्यात छाया दातार, गेल ओम्व्हेत ,वंदना शिवा आणि बिना अग्रवाल,मेधा पाटकर,सुमी कृष्णा यांच्या कार्यातून पर्यावरण विषयक चर्चा कोणत्या दिशेने गेली ते लक्षात येवू शकेल.पर्यावरण आणि आर्थिक विकास या दोन परस्परविरोधी बाबी नाहीत. त्यामुळे या अभ्यासातून उथळ पर्यावरंणवाद आणि सखोल पर्यावरंणवाद यातील फरक समजण्यास मदत होईल.

भारतात पर्यावरणाचा अभ्यास जात वर्ग लिंगभाव आणि राज्य या संदर्भात केला पाहिजे. या पेपरमध्ये मी असा युक्तिवाद करेन की स्त्रिया, विशेषत: भारतातील गरीब ग्रामीण कुटुंबातील स्त्रिया विशिष्ट मार्गांनी पर्यावरणाच्या ऱ्हासाला बळी पडत आहेत.तसेच जगातील निसर्ग संपत्ती मर्यादीत असून हवा, पाणी, जमीन, खनिजे, तेलसाठे, वने, माळराने, समुद्र आणि शेती व पशुधनापासून मिळणारे पदार्थ आपल्या जीवनासाठी पूरक आणि अत्यंत आवश्यक आहेत. वाढल्या लोकसंख्येमुळे आपल्याला लागणाऱ्या साधनांची गरज वाढल्यामुळे पृथ्वीवरील उपलब्ध संसाधने ही सतत वाढती गरज पुरवू शकतील, अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. पृथ्वीवरील संसाधनांचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होत असून दैनंदिन व्यवहारासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा गैरवापर करून नैसर्गिक जलसाठे प्रचंड प्रमाणात प्रदूषित करीत आहेत. गेल्या तीन दशकांमध्ये, साहजिकच जागतिक स्वरूपाच्या समस्यांचा विचार करणे नित्याचे झाले आहे. वायू प्रदूषण, आम्ल पाऊस, उष्णकटिबंधीय जंगलतोड आणि ओझोन थर पातळ होण्याच्या स्वरूपात पर्यावरणाचा ऱ्हास संपूर्ण जगावर परिणाम करतो, म्हणून तो जागतिक चिंतेचा विषय आहे.

1960च्या आसपास अमेरिकेतील रॅचेल कार्सन यांनी 'सायलेंट स्प्रिंग' नावाचे एक पुस्तक लिहिले. वसंत ऋतू आला आहे. वनस्पती बहरत आहेत. सर्वत्र फुले फुलली आहेत. पण हा वसंत स्मशानासारखा शांत आहे. एकाही मधमाशीचा गुंजारव, पक्ष्याची किलबिल नाही. कारण कीटनाशकांच्या वापरामुळे सर्व कीटक, मधमाश्या व पक्षी नष्ट झाले आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास या प्रश्नाप्रती जग जागे करण्याचे श्रेय त्या पुस्तकाला दिले जाते.त्यानंतर तर जागतिक पातळीवर अनेक पुस्तके, कमिशनचे रिपोर्ट्स, आंतरराष्ट्रीय करार व संकल्प आले. भारतात अनिल अग्रवाल, सुनीता नारायण, क्लॉड अल्वारिस, वंदना शिवा इ. शेकडो व्यक्तींनी हा आधुनिक 'सृष्टिधर्म' प्रस्थापित करण्यासाठी हातभार लावला. मराठीत चाळीस वर्षांपूर्वी 'परिसर' नियतकालिक सुरू झाले. वसंत पळशीकर, सुजित पटवर्धन, सदा डुम्बरे, संजय संगवई ,राम बापट हे या क्षेत्रातले जागले होते. माधव गाडगीळांसारख्या विख्यात नावापासून कितींची नावे घ्यावीत! अतुल देऊळगावकर मेहनतीने लिहीत आहेत. पर्यावरण हे सजीव वस्तूंचे सभोवतालचे वातावरण आहे. जे सजीव किंवा निर्जीव वस्तूंमधील संवाद आणि परस्परसंवादाद्वारे तयार होते. पहिल्या महायुद्धानंतर मानवांनी निसर्गावर विविध प्रकारचे प्रभाव पाहिले. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीच्या परिणामी त्याचे दूरगामी गंभीर परिणाम मानवजातीवर पडू लागले. माणूस हा पर्यावरणाचा अविभाज्य भाग आहे. परंतु पर्यावरणाच्या प्रत्येक बाबींमध्ये मानवी हस्तक्षेप वाढत आहे.

पर्यावरणविषयक साहित्याचा आढावा:

मधुश्री प्रकाशनाचं 'इंडिका' हे पुस्तक पंधरा वेगवेगळ्या प्रकरणात विभागले आहे. पृथ्वीच्या निर्मितीपासून ते थेट आजच्या प्रगत होमो सेपियन माणसाच्या उत्क्रांतीपर्यंत येऊन हे पुस्तक थांबतं. सोबतच भारताची निर्मिती कशी झाली, इथल्या नद्या कशा आल्या, इथं कोणकोणते डायनासॉर होते, हिमालय कसा तयार झाला अशी चित्तथरारक माहितीही या पुस्तकात दिली आहे.

भूगोलाच्या अभ्यासाची फार मोठी परंपरा आहे. सध्या भौगोलिक इतिहास हा शाळेतला अभ्यासक्रम आणि स्पर्धा परिक्षेपुरताच मर्यादित झालाय. पण त्यापलीकडे जाऊन पाहिलं तर काही पुस्तकं अशी असतात जी भुगोल,

मानवी उत्क्रांती, जीवसृष्टीचा नैसर्गिक इतिहास या विषयातही रस निर्माण करतात. असंच एक पुस्तक म्हणजे प्रणय लाल लिखित आणि नंदा खरे अनुवादित 'इंडिका'. मधुश्री प्रकाशनाने हे प्रकाशित केले आहे.एक लुप्तप्राय प्रजाती मानव जातीसमोर नैसर्गिक अधिवासातील एक महत्त्वाची जैविक प्रजाती या प्रजातींच्या जलद आणि हळूहळू वाढत्या नाशामुळे नामशेष होण्याचा धोका आहे. या समस्येची जाणीव अशा वेळी होत आहे. जेव्हा ती रोखण्याची वेळ जवळजवळ हाताबाहेर गेली आहे. पर्यावरणाच्या या भीषण विनाशाला प्रामुख्याने उपभोगवादी समाज जबाबदार आहे., हे विशेष.या सोसायट्या पूर्वीच्या वसाहती महानगरांचा वारसा आहेत. बहुसंख्य मानवतेचा नाश करणाऱ्या गरिबी आणि मागासलेपणाला स्वतः जबाबदार असलेल्या साम्राज्यवादी धोरणांची ही अपत्य आहेत.जगाच्या लोकसंख्येच्या केवळ 20 टक्के असूनही, ते जगातील एकूण धातू उत्पादनाच्या दोन तृतीयांश आणि जगातील एकूण ऊर्जा उत्पादनाच्या तीन चतुर्थांश वापरतात. त्यांनी नद्या आणि महासागरांना विष दिले आहे., हवा प्रदूषित केली आहे. आणि ओझोन थर कमकुवत करून छिद्र पाडले आहे. वायूंनी वातावरण संतृप्त करून, त्यांनी पर्यावरणात असे विध्वंसक बदल घडवून आणले आहेत., ज्याचा परिणाम आपल्यावर होऊ लागला आहे.जंगले नाहीशी होत आहेत. वाळवंटांचा विस्तार होत आहे. दरवर्षी कोट्यवधी टन सुपीक माती समुद्रात वाहून जाते. अनेक प्रजाती नामशेष होत आहेत. लोकसंख्येचा दबाव आणि गरिबीत जगण्याची सक्तीही माणसाला हताश प्रयत्नांकडे ढकलते, अगदी निसर्गाचा नाश करूनही. तिसऱ्या जगातील देश - कालच्या वसाहती आणि आजची राष्ट्रे जे अन्यायकारक आर्थिक जागतिक व्यवस्थेत शोषण आणि लुटमारीचे बळी आहेत. - या सर्वांसाठी जबाबदार धरता येणार नाही.केवळ त्या देशांचा विकास थांबवणे हा त्यावर उपाय असू शकत नाही.ज्यांना त्याची सर्वात जास्त गरज आहे. कारण आज गरिबी वाढवणारा प्रत्येक घटक हा पर्यावरणावर केलेला घृणास्पद बलात्कार आहे. परिणामी, तिसऱ्या जगात दरवर्षी लाखो पुरुष, स्त्रिया आणि मुले मरतात.दोन्ही महायुद्धांमध्ये इतके लोक मारले गेले नाहीत.असमान व्यापार, संरक्षणवाद आणि परकीय कर्ज यांचा पर्यावरण संतुलनावर घातक परिणाम होतो आणि त्याचा नाश होतो. या आत्महत्येपासून मानवजातीला वाचवायचे असेल, तर आपल्याला संपत्ती आणि उपलब्ध तंत्रज्ञानाचे संपूर्ण पृथ्वीवर अधिक चांगल्या पद्धतीने वितरण करावे लागेल.

निसर्ग संवर्धनाचा भारतातील इतिहास:

भारतात फार पूर्वीपासून राजा महाराजांकडून तसेच लोकसमोहांकडून निसर्गाची संवर्धन केले जात आहे. दोनशे वर्षांपूर्वी भारतात ब्रिटिश लोकांची सत्ता होती त्या काळात जागतिक स्तरावर औद्योगीकरण दोन माहिती इत्यादी खूप मोठ्या घटना घडल्या तेव्हा व्यापारी कारणासाठी भारतातील जंगलांची बेसुमार तोड झाली. भेटीवर आलेले अधिकारी व आपल्या देशातील राजे महाराजे यांच्या शिकारीच्या शोकासाठी वन्य प्राण्यांची अमर्याद हत्या आणि शिकार केली गेली. भारतातील जैवविविधतेच्या दृष्टीने हा अत्यंत वाईट कालखंड ठरला आहे. औद्योगिकीकरणाच्या काळानंतर नैसर्गिक साधन संपत्तीची मागणी सातत्याने वाढतच आहे. गेल्या काही दशकांपासून जैव आणि जीव विविधता वन्यप्राणी व वनस्पतींची जतन करण्याची प्रयत्न भारतात सुरू झाली आहेत. हा विषय केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयातर्फे हाताळला जातो. केंद्रीय मंत्रालय धोरण ठरवते योजना आखते कायदे तयार करते. राज्यस्तरावरील पर्यावरण खात्याकडून या योजना राबविल्या जातात. कायद्यांची अंमलबजावणी केली जाते. शिवाय स्थानिक प्रश्नासंबंधीचे काम ही केंद्राच्या सल्ल्यानेच केली जाते.

काही महत्त्वाच्या कायद्याचा विचार करता भारतीय वन्यजीव कायदा 1972 ला पारित झाला जैवविविधता कायदा 2002 साली पारित झाला जगभरातील पर्यावरण व सांस्कृतिक मूल्य असलेली अति महत्त्वाची क्षेत्रे जागतिक वारसा क्षेत्र म्हणून युनोस्कोमार्फत घोषित केली जातात जगभरातील पाणथळेच्या जागा जपण्यासाठी रामसर क्षेत्र हा प्रकल्प आहे. पर्यावरणात पाणथळीच्या जागांना खूप महत्त्व आहे. याशिवाय 1993 मध्ये अनेक देशांनी एकत्र येऊन एका आंतरराष्ट्रीय करार मान्य केला आहे. त्याचे नाव 'दि युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑफ बायोडायव्हर्सिटी' जैवविविधता जपण्यासाठी भविष्यात काय धोरणे आखावीत संवेदनशील परिसंस्थांना जपण्यासाठी काय करता येईल कुठल्या गोष्टींना बंदी घालावी इत्यादी मध्ये यात विचारात घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे समुदायांद्वारे काही सुरक्षित क्षेत्र असतात.

जसे देवराया. जगातल्या अनेक देशांप्रमाणे भारतात ही हजार वर्षांपासून स्थानीय समुदायांची आपल्या आजूबाजूच्या क्षेत्रांची व त्यातील वन्यजीवांची नियोजन व संवर्धन करण्याची परंपरा आहे. भारतात ठिकठिकाणी लहान मोठ्या प्रमाणात या समुदायांनी जंगल जतन करून ठेवलेली आढळते. देवदेवतांच्या नावाने राखून ठेवलेल्या जंगलाला देवराई म्हणतात.

पर्यावरण चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी एक अत्यंत उपयुक्त पुस्तक आहे त्याचे नाव 'Ecology and Equity : The use and abuse of nature in contemporary India' त्याचे लेखक आहेत माधव गाडगीळ आणि रामचंद्र गुहा. माधव गाडगीळ आणि रामचंद्र गुहा या दोघांचे This Fissured Land An Ecological History of India' हे पुस्तक याआधी भरपूर खपले आहे. समाजातील घटकांचा विचार करताना आपण वर्ग, वर्ण, लिंग वगैरे प्रकारे तुकडे करून अभ्यास करतो. या पुस्तकात समाजाचे तीन गट मानले आहेत. हे गट त्यांच्या निसर्गाशी असलेल्या संबंधांवरून ठरतात. पहिला गट म्हणजे 'जोडलेले'. हा मोठा गट आसपासच्या निसर्ग संपत्तीवर पूर्णपणे अवलंबून असतो. मच्छीमार पाण्यातून अन्न मिळवतात. आदिवासी जंगलातून कंदमुळे, फळे आणतात. ग्रामीण गोरगरिबांचे इंधन म्हणजे जंगलफाटा. गरिबांच्या झोपड्या बनतात त्या कारवी, बांबू, लाकूड, चिखल यापासून. वर छप्पर गवताचे. बुरूडांना टोपल्या विणण्यासाठी बांबू हवा तर मांगाना दोर वळण्यासाठी वाख त्याव रच त्यांचे पोट अवलंबून सर्वांना नद्यांचे, तळयाविहि-रींचे जवळच मिळणारे पाणी पिण्यासाठी आवश्यक. यांचं सगळं जीवनच निसर्गावर अवलंबून. म्हणून जोडलेले. (Ecosystem People) ग्रामीण भारतातीलसुमारे ८० टक्के लोक (म्हणजे देशातील निम्मे) असे जगतात.

दुसरा गट म्हणजे तोडलेले (Ecological Refugees) हे खरे मूळचे जोडलेलेच. पण या ना त्या कारणाने हा मूळ नातेसंबंध गमावून बसलेले. उदा. धरणांखाली बुडलेल्या गावांचे रहिवासी, प्रदुषणांने नद्यांमधली मासळी संपल्याने भिकेला लागलेले कोळी/भोई, दुष्काळामुळे गाव उठले म्हणून शहरात येऊन पडलेले झोपडपट्टीवासी, शेतीतून बारमास पुरेल येवढं पिकत नाही म्हणून जगायला लांब जाणारे कातकरी, तशाच कारणांसाठी बीडमधून नगरला येणारे ऊसतोडणी मजूर. भारताच्या लोकसंख्येचा तिसरा हिस्सा अशा परिसर निर्वासितांचा असावा.उरले सुमारे १६ टक्के लोक. ही 'आहे. रे' मंडळी. विकासाचा पुरेपूर फायदा मिळणारी. यांच्यासाठी नैसर्गिक व्यवस्था बदलून / मोडून यांच्या सोयीची / फायद्याची कृत्रिम व्यवस्था केलेली असतेआपली स्वातंत्र्योत्तर काळातील जंगल धोरणे गरिबाला नाडणारी, धनिकांना लाडवणारी आणि निसर्ग संपत्ती काटकसरीने वापरण्याऐवजी उधळ माधळ करणारी ठरली आहेत.

संरक्षणखातेसुद्धा नागरिकांच्या गरजांचा थोडाही विचार न करता जंगल जमीन ताब्यात घेण्याची योजना करते. प्रत्येक प्रांतात दिसते ते निसर्गसंपत्तीचे विषम वाटप आणि विषम उपभोग. मागास प्रदेशांकडून संपत्ती काढून घेतली जाते या बदल्यात त्यांना फारसे काही मिळत नाही. मध्य भारतात बिहार, बंगाल, ओरिसा, मध्यप्रदेश अशा प्रातांत विखुरलेले मोठे आदिवासी क्षेत्र आहे. तेथे कोळसा, लोखंड ही खनिजे व जंगलसंपत्ती अफाट आहे. वनसंपत्ती राज्य सरकारे लुटतात तर खनिज संपत्ती केंद्रसरकार लाटते. त्याविरोधात वारंवार पदयात्रांचा उपयोग करण्यात आला आहे . अशा काही मोठया पदयात्रांची यादी पुढील प्रमाणे-

१९८२-८३ काश्मीर ते कोहिमा (४००० कि. मी.) बहुगुणांची पदयात्रा १९८७-८८ पश्चिम घाट बचाओ (४००० कि.मी) कन्याकुमारी ने गोवा व भूळे ते गोवा) १९८८ निलगिरी बचाओ (तामिळनाडू), शिवलिक बचाओ (गढ़वाल) १९८९ कन्याकुमारी मार्ग (पाणी वाचवा, जीवन वाचवा)१९९१ वन्यप्रान्त चैतन्य यात्रा (आंध/ ओरिसा)१९९३ अरवली चेतना यात्रा (राजस्थान, हरियाना) या चळवळीना वृतपत्रांनी भरघोस प्रसिद्धी दिली आहे. या लढयातील नेते विकासाच्या पारंपारिक कल्पनेवर हल्ला चढविताना दिसतात. विकास चिरंजीवी/टिकाऊ (Sustainable) आणि समतावादी हवा असे त्यांचे म्हणणे आहे. भारताच्या पारंपारिक निसर्गपूजक रीतीरिवाजांकडे

पुन्हा एकदा समाज वळला तर प्रश्न सुटतील, निदान सोपे होतील असे यांचे म्हणणे आहे. उलट मार्क्सवादी आंदोलक म्हणतात की येथील विषम समाजरचनाच मोडली पाहिजे.

पर्यावरणीय संकट आणि तिसरे जग:

पर्यावरण आणि विकास परिषदेत रिओ दि जानेरो येथे महत्त्वाची बैठक झाली आणि मानवतेची सुरक्षितता आणि त्याचे केवळ अस्तित्व सुनिश्चित करण्यासाठी एक प्रभावी पाऊल आहे. तातडीची गरज आहे. मानवजातीच्या इतिहासात संपूर्ण ग्रहाच्या जीवन प्रणालीवर इतका व्यापक आणि विनाशकारी हल्ला कधीच झाला नव्हता. अविकसित देशांमधील गरिबी आणि अविकसित हे नैसर्गिक वातावरणावर दबाव वाढवणारे मुख्य घटक आहेत. कृषी आणि कुरण जमिनीचे अतिशोषण, अयोग्य शेती पद्धती आणि आर्थिक आणि तांत्रिक संसाधनांचा अभाव या सर्वांचा पर्यावरणावर हानिकारक परिणाम होतो. जास्तीत जास्त नफा मिळविण्याच्या लालसेपोटी नैसर्गिक साधनसंपत्तीचे आणि औद्योगिक क्षमतेचे भांडवलशाही शोषणही पर्यावरणाच्या नाशात मोठी भूमिका बजावते आणि नवीन मार्गांनी वातावरण प्रदूषित आणि खराब करते. बुद्धीहीन उपभोगतावाद आणि अपव्यय आणि अपारंपरिक संसाधनांचा नाश यांना प्रोत्साहन देणाऱ्या जीवनशैली विकसित देशांमध्ये अस्तित्वात आहेत., ज्यामुळे भौतिक वातावरणातील जोखीम आणि तणाव स्थानिक आणि जागतिक पातळीवर अभूतपूर्व आणि अकल्पनीय पातळीवर वाढतात.

महेश रंगराजन आणि के शिव रामकृष्णन यांनी 'इंडियन इन्व्हरमेंटल हिस्ट्री' याविषयी दोन खंड संपादित केली आहे. यात वसाहत काळापासून समकालीन पर्यावरणाच्या चर्चाविश्वाचा त्यांनी वेध घेतला आहे. इरफान हबीब यांनी 'मॅन अँड एन्व्हायरमेंट द इकॉलॉजिकल हिस्टरी ऑफ इंडिया' या पुस्तकात प्रस्तावनेत अलिकडच्या दशकांमध्ये पर्यावरणाशी संबंधित बाबींमध्ये, विशेषत: हवामान बदलावरील चर्चेच्या प्रभावाखाली वाढती स्वारस्य दर्शविली गेली आहे. इकोलॉजीची व्याप्ती अर्थातच, केवळ हवामानापेक्षा खूप विस्तृत आहे. आणि त्याव्यतिरिक्त केवळ प्राणी आणि वनस्पतींच्या सर्व प्रजातींशीच मानवी संबंध नाही तर मानवी समाजाच्या (भौतिक आणि बौद्धिक) परिस्थितींचा देखील समावेश आहे. जे आपल्या प्रतिसादांवर परिणाम करतात. निसर्गाने निर्माण केलेल्या संधी आणि आव्हाने. हा व्यापक अर्थ लक्षात घेऊनच या मोनोग्राफमध्ये पर्यावरणशास्त्राच्या इतिहासाची चिकित्सा करण्यात आली आहे.

'ए पीपल्स हिस्ट्री ऑफ इंडिया' या योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेला हा खंड मालिकेच्या आधीच्या खंडांनंतरचा दृष्टिकोन, शैली आणि परंपरा यांच्याशी सुसंगत राहण्याचा प्रयत्न करतो. स्त्रोतांकडून विस्तृत अर्क प्रदान केले गेले आहेत.; आणि इकोलॉजी, क्लायमेटोलॉजी, झू-पुरातत्व, नैसर्गिक इतिहास आणि वनशास्त्र या विषयावर विशेष नोट्स आहेत., वाचकाला प्रत्येक प्रकरणाला जोडलेल्या ग्रंथसूची नोटमध्ये पुढील वाचनासाठी उपयुक्त मार्गदर्शक सापडेल असे लेखक म्हणतात.अतुल देवूळगावकर, अच्युत गोडबोले, छाया दातार, माधव गोडबोले इत्यादी महत्वाच्या लेखकांनी सात्तत्याने पर्यावरण विषयक मांडणी केली आहे.संतोष शिंत्रे यांनी पर्यावरण विषयक चार पुस्तके प्रकाशित केली आहे. त्यात पर्यावरणातील अधोरे किती वृत्तांत निरीक्षणे विश्लेषण तरंग अंतरंग समकालीन पर्यावरणाची चिकित्सा अशा स्वताच्या समशेरीवर भारतातील हवामान बदल अपाय आणि उपाय या पुस्तकांचा समावेश होतो. संतोष शिंत्रे म्हणतात हवामान बदलाविरुद्ध आवश्यक कृतीत स्थानिक स्वराज्य संस्था या राज्य सरकारी केंद्र सरकार ही शासकीय घटक अनेक बाबतीत कमी पडत आहेत. गेली वीस वर्षे प्रकाशित होणाऱ्या जागतिक पर्यावरण निर्देशांकात 2020 साली 180 देशांमध्ये हवामान बदलाशी झुंज यांनी कशावर आपण एकशे सहाव्या क्रमांकावर आहोत.प्रदूषक उत्सर्जने इथे अपेक्षेनुसार आपण 145 व्या क्रमांकावर आहोत. लोकसंख्येची वाढ आणि काही विशिष्ट आर्थिक घडामोडींचा परिणाम म्हणून गेल्या दोन दशकांमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. थोडक्यात हरितगृह वायूमुळे तापमान वाढ होते आणि त्यामुळे हवामान बदल होतो ओझोन थर कुठे असतो त्याची विरळ होणे या बदलाला हातभार कसा लावते त्यामुळे झालेले नुकसान तसेच हवामान बदल तापमान वाढ आणि ओझोन थर विरळ होणे म्हणजे नक्की काय हे सर्व एकच आहे. की वेगवेगळे त्यात काही परस्पर संबंध आहे. का इत्यादी प्रश्नांचाही विचार केला पाहिजे.

विकास आणि विकासोत्तर – संकल्पना आणि चिकित्सा :

विकास ही संकल्पना वसाहती कालखंडानंतर उदयास आली या संकल्पनेचे मुख्य सूत्र असे म्हणता येईल, की जगातील सर्व देशांच्या विकासाचा मार्ग पाश्चात्य देशांच्या विकास मार्गानेच व्हावा असे दडपण टाकले जाते.या देशाने ज्याप्रमाणे वसाहतीतून वाढावा लुटून आपल्या विकासाचा पाया घातला त्याच पद्धतीने विकास होणे शक्य असते . रोजा लक्झेम्बर्गच्या मताप्रमाणे वसाहतवाद हा भांडवलशाहीचा प्राण आहे. पूर्व आठ आहे. आणि नैसर्गिक चक्राच्या आधारे चालणाऱ्या अर्थव्यवस्थेला नष्ट करूनच ती वाढू शकते म्हणूनच एका बाजूला ती संपत्ती निर्माण करते दुसऱ्या बाजूला ती लोकांचे हातातून साधने काढून घेते आणि दारिद्र्य जन्माला घालते याच प्रक्रियेतून या नव्याने स्वातंत्र्य झालेल्या देशांतर्गत वसाहती तयार झाल्या.

वंदना शिवा यांच्यामते थोडक्यात आजची विकासाची संकल्पना ही पाश्चात्य पुरुषप्रधान आर्थिक दर्शनाची एकवटली गेली आहे. या दर्शनाचे मुख्य सूत्र आहे. स्त्रियांचे शोषण किंवा त्यांचे अर्थव्यवस्थेमधून उच्चाटन पाश्चाते व पाश्चात ते तर देशातील स्त्रियांबाबत हेच सत्य आहे. निसर्गाची शोषण व निकृष्ट अवस्था आणि इतर संस्कृतींचे शोषण व राज याचाच परिणाम म्हणून आज आपण बघत आहोत. की जगभरच्या स्त्रिया छोटी शेतकरी आदिवासी या सर्वांचा विकासापासून मुक्तता मिळवण्यासाठी संघर्ष चालू आहे.

पर्यावरण आणि आर्थिक विकास या दोन परस्परविरोधी बाबी नाहीत:

अमिताभ घोष या प्रख्यात भारतीय कादंबरीकाराने 'द ग्रेट डिरेंजमेंट क्लायमेट चेंज अँड दि अन थिंकेबल' हा बहुचर्चित ग्रंथ लिहून या समस्येकडे लक्ष वेधण्याचा प्रभावी प्रयत्न सहा वर्षांपूर्वीच केला होता घोष यांच्या कादंबरीच्या शीर्षकात असलेल्या डेऱ्यांचमेंट या शब्दाचा अर्थ आहे विकृती.त्यामुळे या शीर्षकातूनच हवामान बदल आणि त्यासंबंधीतील आपली बेफिकिरी जाणवते हवामान बदल आणि पर्यावरणाचा ऱ्हास याकडे दुर्लक्ष करणे मागीलपणापासून पुढे या पद्धतीने सुरू राहिले.

पर्यावरण आणि विकासावरील संयुक्त राष्ट्र परिषदेने पारित केलेली तत्वे:

3 ते 14 जून 1992 या कालावधीत रिओ दि जानेरो येथे भेटून, 16 जून 1972 रोजी स्टॉकहोम येथे स्वीकारलेल्या मानवी पर्यावरणावरील संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेच्या घोषणेला पुष्टी दिली आणि त्यावर उभारणी करण्याचा प्रयत्न केला. राज्ये, समाजातील प्रमुख क्षेत्रे आणि लोक या सर्वांच्या हिताचा आदर करणाऱ्या आंतरराष्ट्रीय करारांच्या दिशेने काम करणे आणि जागतिक पर्यावरण आणि विकास प्रणालीच्या अखंडतेचे रक्षण करणे,पृथ्वीचे अविभाज्य आणि परस्परावलंबी स्वरूप ओळखून, अशी घोषणा करतो- मानव हा शाश्वत विकासाच्या चिंतेच्या केंद्रस्थानी असतो.

संयुक्त राष्ट्रांच्या सनद आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या तत्त्वांनुसार, राज्यांना त्यांच्या स्वत:च्या पर्यावरणीय आणि विकासात्मक धोरणांनुसार त्यांच्या स्वत:च्या संसाधनांचा उपभोग घेण्याचा सार्वभौम अधिकार आहे. आणि त्यांच्या अधिकारक्षेत्रात किंवा नियंत्रणात असलेल्या घडामोडींची खात्री करण्याची जबाबदारी आहे. इतर राज्यांच्या किंवा राष्ट्रीय अधिकार क्षेत्राच्या मर्यादेपलीकडे असलेल्या क्षेत्रांच्या पर्यावरणाला हानी पोहोचवू नये.सध्याच्या आणि भावी पिढ्यांच्या विकासाच्या आणि पर्यावरणीय गरजा समानतेने पूर्ण करण्यासाठी विकासाची मार्ग स्वीकारला पाहिजे.शाश्वत विकास साध्य करण्यासाठी, पर्यावरण संरक्षण हे आवश्यक आहे. सर्व राज्ये आणि सर्व लोक शाश्वत विकासासाठी एक अपरिहार्य आवश्यकता म्हणून गरिबी निर्मूलनाच्या अत्यावश्यक कार्यात सहकार्य करतील, ज्यामुळे असमानता कमी होईल आणि जगातील बहुसंख्य लोकांच्या गरजा चांगल्या प्रकारे पूर्ण करता येतील.पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन, राष्ट्रीय साधन म्हणून, प्रस्तावित घडामोडीसाठी हाती घेतले जाईल ज्यांचा पर्यावरणावर महत्त्वपूर्ण प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. आणि सक्षम राष्ट्रीय प्राधिकरणाच्या निर्णयाच्या अधीन आहेत.पर्यावरण व्यवस्थापन आणि विकासामध्ये स्त्रिया ची भूमिका महत्त्वाची आहे.

भारतातील पर्यावरणाचा प्रश्न:

भारतातील पर्यावरणाचा प्रश्न लक्षात घेता पर्यावरणाचा ऱ्हास आणि जमीन आणि नैसर्गिक संसाधनांचा विनियोग यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. शोषित वंचित गट आणि आणि स्थानिक समुदायांना संसाधनांच्या उपभोगाला प्रवेश आणि नियंत्रणापासून बाजूला केली जात आहे. मग ते जमीन असो पाणी असू जंगल असो किंवा शहरी सामान्य लोकसमुदाय असोत. जगभरातील ग्रीन मार्केट इकॉनोमीच्या चर्चाविश्वाच्या आगमनाने पर्यावरण संरक्षणाच्या बहाण्याने निसर्गाचे कमोडिफिकेशन आणि विभाजन करण्याचे नवीन मार्ग उदयास आले आहेत. सध्याच्या काळात हरित पट्टे बळकावणे कायदेशीर तेच्या आधारे बाजार नियंत्रणेद्वारे चालते निसर्ग अनुभवण्याचे काही सर्वात स्पष्ट मार्ग म्हणजे पर्यटन, अलीकडच्या वर्षात शाश्वतता समर्थन आणि हरित मूल्यांच्या नावाखाली निसर्गाचे कमोडिफिकेशन वाढले आहे. हे कमोडिफिकेशन अनेक प्रकारचे स्वरूप घेते जसे की जैवविविधता संवर्धन कार्यक्रम कार्बन क्रेडिटची विक्री बाजार आणि कचरा आणि प्रदूषणाचे उत्पादन परिसंस्थेचे परिवर्तन जसे की जंगलांचे वृक्षारोपणात रूपांतर करणे आणि शेत जमिनीची जैव इंधनाच्या उत्पादनाकडे वळविणे. निसर्गाच्या या नवउदारीकरणांमध्ये समाजाचे शासन नैसर्गिक संसाधनाची खाजगीकरण यांच्या समावेश होतो.

गेल्या काही दशकांमध्ये सरासरी धोरणाच्या अजेंड्यामध्ये बदल झाला आहे. पूर्वी जमिनीचा वापर मोठ्या प्रमाणावर संवर्धनासाठी नियंत्रित केला जात होता आता ते मुख्यतः बाजारासाठी नियंत्रित केले जातात. हे बदल मुख्यत्वे पर्यावरणीय समस्यांच्या प्रशासनातील नवउदारमतवादी वळणामुळे झाले आहे. ज्यामुळे खाजगीकरण आणि निसर्गाचे वस्तूकरण केली आहे. शिवाय निसर्गाला अधिकाधिक आर्थिक व्यवस्थेत सामील केले जात आहे. स्थानिक समुदायाला एकतर पर्यावरणास विध्वंसक किंवा मागास म्हणून संबोधले जात आहे. परंतु त्यांना पर्यावरणाची मूळ संरक्षक म्हणून अधोरेखित करणे आवश्यक आहे.

गेल्या काही वर्षात वाढीच्या मागे लागून पर्यावरण आणि वन मंत्रालयाने पर्यावरणीय कायदे आणि प्रक्रिया सौम्य केले आहेत. आणि वेगवेगळ्या मंजुरी सुलभ केले आहेत. सुधा वासन यांचे 'इकॉलॉजिकल क्रायसिस आणि द लॉजिक ऑफ कॅपिटल' हे भांडवलशाही उत्पादनाची पद्धत आणि पर्यावरण संकट यांच्यातील विरोधाभास शोधतात. बहुतेक वेळा सर्वात शक्तिशाली आणि सर्वात उपभोग्य समाज आणि व्यक्तीं हवामान बदलामध्ये मोठ्या प्रमाणात भर घालतात. जगातील सर्वात वंचित लोक पर्यावरणीय ऱ्हासाच्या ओझाने आणि विषमतेने ग्रासलेली आहेत. त्यांनी आतापर्यंत झालेल्या नुकसानीमध्ये सर्वात कमी प्रमाणात योगदान दिले आहे. कारण ते विकासाचे फायदे घेणारी नसल्यामुळे त्यांचे हवामानातील बदलामुळे होणाऱ्या नुकसानीमुळे त्यांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. पर्यावरणीय आपत्ती आणि लोकांच्या गतिशीलतेवरील धोरणे, वारसा आणि मालमत्ता म्हणून निसर्गावरील संघर्ष आणि जमाती, महिला, नद्या आणि मानवी सुरक्षेवर परिणाम करणाऱ्या विशिष्ट विकास धोरणांची चरित्रे या विषयी माधव गाडगीळ आणि रामचंद्र गुहा यांनी इकोसिस्टममधील लोक पर्यावरणीय निर्वासित बनण्याबद्दल लिहिले तेव्हा हेच चित्रित केले होते."

'दलितांना पर्यावरणवादी का आवडत नाहीत?'-पर्यावरणीय अभ्यासात जातीची अदृश्यता

विकासप्रकल्प पर्यावरणविरोधी आहेत. ही समजूत जनमानसात रुजते आहे. पण या विषयाकडे काळा आणि पांढरा या दोन रंगातच पाहिले जाते. या दोन टोकाच्या रंगांमध्ये करड्या रंगाच्या अनेक छटा आहेत., हे आपण विवेकबुद्धीने समजून घेणार आहोत. की नाही, हा प्रश्न देशातील अणुऊर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने पुन्हा एकदा उभा राहिला आहे. आमच्या पर्यावरणाची वर्तमान स्थिती आणि विचारहीन विकास मॉडेल, वाढीच्या पश्चिम मॉडेलचे अनुकरण,पृथ्वीकडे व्यवहार्य पर्यायांचे परीक्षण करण्यासाठी संबंधित विद्वान चालविण्यामध्ये अतुलनीय सहभाग नसल्याचे आमचे मत आहे. छाया दातार आमच्या पारिस्थितिकिय तंत्रासंबंधीच्या वेगवेगळ्या स्थानांवर भास्य करण्याचा प्रयत्न करतात..या चर्चेत गंभीर समस्या उद्भवतात ज्यात स्त्रिया आणि निसर्ग प्रामुख्याने येतात.मानवी पुनरुत्पादनात त्यांच्या विशेष भूमिकेमुळे स्त्रियांचा निसर्गासह एक अद्वितीय संबंध आहे का?असे म्हणता येऊ शकते की

स्त्रियांना जन्म देताना आणि तिच्या काळजीमध्ये समर्पण करण्याच्या स्त्रियांची पुनरुत्पादनक्षम शक्ती आणि निसर्गाच्या बाबतीत स्त्रियांना समान पोषण गुणवत्ता टिकवून ठेवणारी एक समानता सांभाळते. तथापि, ही 'बायोलॉजिस्ट' दृष्टीकोन असेल, ऐतिहासिक आणि सामाजिक कारणाकडे दुर्लक्ष करणे बर्याच ग्रामीण अर्थशास्त्रामधील स्त्रिया आपल्या घराच्या गरजेसाठी इंधन, चारा आणि पाणी गोळा केल्यावर आपल्या मर्यादित संसाधनांचे संरक्षण करतात. उत्पादक आणि पुनरुत्पादन घडामोडी घरात व आजूबाजूच्या परिसरात घडतात आणि अशा प्रकारे आसपासच्या पर्यावरणाशी त्याचा संबंध वाढला. औद्योगिक समाजात स्त्रिया निसर्गापासून दूर फेकल्या जातात. तरीही प्रख्यात शैक्षणिक संस्थांमध्ये जातीविरोधी चर्चाविश्व आणि शोषितांचे साहित्य आणि संस्कृती अद्याप संस्थात्मक होऊ शकलेले नाही हे आपले अपयश आहे. प्रथम, सर्वसाधारणपणे पर्यावरणीय अभ्यासात आणि विशेषतः पर्यावरणीय ज्ञानशाखेत असे का होते. दुसरे, भारतीय शैक्षणिक क्षेत्रात जातीविरोधी पर्यावरणीय ज्ञानशाखेच्या शक्यता काय आहेत.?

जेव्हा आपण भारतीय शैक्षणिक क्षेत्रात पर्यावरणाच्या मुद्द्यांवर चर्चा करतो, तेव्हा जातीचा संदर्भ देण्याबाबत अनिच्छा असते. बहुतेक संस्थांमध्ये पर्यावरण हा औपचारिक विषय म्हणून शिकवला जातो. पर्यावरणशास्त्र जात या कोटीक्रमाला स्पष्टपणे वगळून कार्य करते.यात दोन मुद्दे आहेत. प्रथम, सर्वसाधारणपणे पर्यावरणीय अभ्यासात आणि विशेषतः पर्यावरणीय ज्ञानशाखेत असे का होते. दुसरे, भारतीय शैक्षणिक क्षेत्रात जातीविरोधी पर्यावरणीय ज्ञानशाखेच्या शक्यता काय आहेत.?

1997 मध्ये, डॉ. गेल ओम्व्हेट यांनी 'दलितांना पर्यावरणवादी का आवडत नाहीत?' या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधले होते. साधनसंपत्तीचे जतन, प्रजातींचे संरक्षण, संरक्षित क्षेत्रांची स्थापना आणि पर्यावरणासाठीच्या मोहिमा अनेकदा उपेक्षित, प्रामुख्याने दलितांवर या उपक्रमांच्या प्रभावाची भूमिका स्वीकारत नाहीत. पर्यावरणाच्या संदर्भात जातीच्या मुद्द्यांचा शोध घेणारे नवीन अभ्यास चालू असताना, उदाहरणार्थ मुकुल शर्मा यांची जात आणि निसर्ग, जात-संबंधित चर्चा अद्याप औपचारिक अध्यापनशास्त्रात समाविष्ट करणे बाकी आहे.

दलितांचे प्रश्न आणि त्यांचा जमीन, पाणी आणि अन्न यांच्याशी असलेला संबंध पर्यावरणीय शैक्षणिक चर्चांमध्ये क्वचितच का अधोरेखित केला जातो? पर्यावरणीय ज्ञानशाखेच्या क्षेत्रात, मानव, अमानव यांच्यातील "इंटरकनेक्टेडनेस" वर जोर दिला जातो; निसर्ग, संस्कृती; आणि लोक, पर्यावरण हे भारतीय समाजव्यवस्थेत संसाधनांमध्ये असमान प्रवेशासह, जातीच्या ग्रेडियंटसह श्रेणीबद्ध आहेत.पर्यावरणीय अभ्यासात जातीची अदृश्यता मुद्दाम मांडली जाते. खरे तर, काही अभ्यास जातिव्यवस्थेला "सामायिक" संसाधनांमध्ये "अस्सल सांस्कृतिक समायोजन" प्रतिबिंबित करणारा एक टिकाऊ मार्ग म्हणून न्याय्य ठरवतात. एम गाडगीळ आणि के. सी. मल्होत्रा यांचा एक विशेष अभ्यास, 'भारताच्या जातिव्यवस्थेचे अनुकूली महत्त्व: एक पर्यावरणीय दृष्टीकोन', असा दावा करतो की "संसाधन विभाजनामुळे" दुर्मिळ नैसर्गिक संसाधनांवरील स्पर्धा कमी करण्यात मदत झाली आहे. आणि योग्य मानसिक वातावरण निर्माण झाले आहे. अशाप्रकारे असे अभ्यास दलितांना रोखून ठेवणाऱ्या अंतर्भूत संरचनात्मक यंत्रणेवर शंका न घेता संसाधनांच्या अयोग्य वितरणास कायदेशीर ठरवतात. या संस्थांमध्ये दलित किंवा आदिवासींचे प्रतिनिधित्व नसणे हे देखील एक कारण आहे. जातीविरोधी चर्चाविश्व, उपेक्षित लोकांचे साहित्य आणि संस्कृती, हे प्रमुख शैक्षणिक संस्थांमध्ये अद्याप संस्थात्मक होऊ शकलेले नाही हे आपले अपयश आहे. पर्यावरणीय अभ्यासाच्या औपचारिक अभ्यासक्रमात जातीचा समावेश केवळ वैयक्तिक विद्याशाखा स्तरावरच शक्य आहे. उच्चभ्रू संस्थांमध्ये जातीचा समावेश करण्यात कमी उत्साह दिसून येत असला तरी, जातीच्या समस्यांना औपचारिक वातावरणाच्या अभ्यासक्रमाचा भाग बनवण्याची व्यक्तींची शक्ती शक्य आहे. आम्हाला ठाम विश्वास आहे. की जातीविरोधी दृष्टीकोन आणि मार्जिनमधील दृष्टीकोन फुले-आंबेडकरी दृष्टिकोनातून

अधिक गंभीर प्रतिबिंब जोडण्याच्या दृष्टीने हे क्षेत्र अधिक सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण बनेल.ब्राह्मण्यवादी अध्यापनशास्त्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या ब्रजरंजन मणीच्या युक्तिवादाच्या धर्तीवर जातिवाद नष्ट करण्याचा आणि ब्राह्मणीकरण संपविण्याचा हा प्रयत्न असेल.

तात्पर्य, आधुनिकीकरण आणि विकास ह्या केवळ सिद्धांतिक संकल्पना न राहता त्या एका विचारधारेच्या अधिष्ठान बनल्या. या प्रक्रियचा लाभ थोड्यांना आणि नुकसान सर्वसामान्य जनतेला झाले त्यातून नवे अंतविरोध निर्माण झाले. आर्थिक विकास झाला तरी सामाजिक न्यायाची पिछेहाट झाली. परिस्थिती अगदीच सुधारली नाही असे नाही, मात्र साधनसंपत्तीच्या न्याय्य वाटपाचा आग्रह धरला गेला नाही. परिणामत: सामाजिक विषमतेची दरी वाढली. (धनागरे डी.एन. 2005-51) 1950 ते 1980 अशा तीन दशकान आर्थिक नियोजन करणान्यांनी विकास' म्हणजे आर्थिक वाढ या अर्थाने ती संकल्पना रुढ केली. त्यानंतर विकासाच्या परिणामांवर भर दिला गेला. हा परिणाम संपत्तीच्या समान नाही तर निदान न्याय्य वाटपाच्या दिशेने बदल झाला किवा नाही हे पाहण्यावर भर दिला जाऊ लागला हे देखील घडले ते 'विकास' या संकल्पनेची विचारधारा बदलल्यामुळे. थोडक्यात, विकास' प्रक्रियेत नेमका बदल काय होत आहे. ? कोणत्या सामाजिक स्तरामध्ये या बदलाचे लामदायक किवा हानिकारक परिणाम दिसून येतात, बदल कोणत्या गतीने होत आहे. ? आणि एकूणच विकास प्रक्रियेचे सामाजिक फलश्रुती काय ? किंवा त्यासाठी समाजाला कोणती किंमत मोजावी लागते ? अश्या प्रश्नामुळे विकासविषयक चर्चामुळे आपल्या विकास प्रक्रियेकडे पाहण्याच्या आपल्या परिदृष्टीतच फरक पडला आहे असे म्हटले पाहिजे.

मार्क्सवाद्यांच्या मते, जोपर्यंत उत्पादनतवाची आणि राष्ट्रीय साधनसंपत्तीची मालकी काही मोजक्या उद्योगसमूहाटांच्या किवा धनदांडग्यांच्या हातात आहे. तोपर्यंत जनसामान्यांच्या जीवनस्तरात गुणात्मक बदल होणे शक्यच नाही. त्यामुळे आधी मूलभूत स्वरुपात क्रांतिकारी असे संरचनात्मक बदल घडवून आणायला हवेत. त्यानंतर 'विकास' हा गुणात्मकतेच्या जोडीने शक्य असतो. अन्यथा प्रस्थापित संपत्ती- मालकाच्या चौकटीत होणारी तथाकथित विकास प्रक्रिया त्या प्रस्थापित व्यवस्था पुरकच करने, बळकटी देणारी असते.

1987 मध्ये बुन्टलैंड आयोगाचा (world commission on Environment and Development) अहवाल तयार झाला त्या अहवालाने जीवनमानातील गुणात्मक बदल या अर्थाने विकास संकल्पनेन पर्यावरणवाद्यांचा विरोध का होता आणि याबाबत त्याचा नेमका आरोप कोणता होता ? काही पर्यावरणवाद्यांच्या मते पर्यावरण आणि विकास प्रक्रिया यांच्यात मूलत: विरोध आहे. आर्थिक वृद्धी (वाढ), सामाजिक न्यायाच्या तत्वावर साधन सामुग्रीचे वितरण किंवा, जीवनमानातील गुणात्मक बदल यापैकी कुठल्यातरी अर्थाने 'विकास' ही संकल्पना वापरली ती त्यात किंवा आधुनिकीकरण प्रक्रियेमध्ये वस्तू-उपभोगाची पातळी (level of Consumption) वाढणे ते अनुस्थ्युत असते आणि उपभोग पातकी वाढवायची म्हणजे पर्यावरणाचा विनाश अटळ होऊन बसतो. कारण अधिक वस्तु उत्पादनासाठी पाणी ,जमीन, , कच्चा माल, वनसंपत्ती ते सगळेच वगणार. विकसित तंत्रज्ञान लागणार त्यामुळे विकास - प्रक्रिया म्हटली की नैसर्गिक साधनसंपत्ती आटोटी लगणे हे ओघाने आलेच.

बऱ्याचवेळा पायाभूत सुविधा म्हणजे विकास असे समजले जाते. पण हा विकासाचा मर्यादित अर्थ आहे. स्त्रीवाद्यांनी विकासाची चिकित्सा करून, पर्यावरणीय विनाश हा मुद्दा घेऊन स्त्रियांचे निसर्गाशी असणाऱ्या आंतरिक जोडून मांडणी केली गेली. चिपको आंदोलन, वंदना शिवा यांची प्रकृती - पुरुष' या जोडीच्या आधारे स्त्रीशक्ती विषयक मांडणी, मधु किश्वर यांचे पाश्चात्य जगात घडलेले स्त्रीवादाचे प्रारुप नाकारून आणि अस्सल भारतीय स्त्रीत्व आधारित माडणी तसेच मनेका गांधी यांचे प्राण्यांविषयीचे प्रेम आणि कोंबड्या वा गायींना यांत्रिकपणे मांस निर्माण करणारे जीव मानने या बाजारपेठी प्रवृत्ती विरोध करणे हे सर्वत्र चर्चिले गेले. मोठ्या धरणांना विरोध करणारे नर्मदा बचाव आंबेलन,

शेती मालाला रास्त भाव मागणार परंतु स्त्रियांना माजघर शेती, सीता शेती करण्याची वाट दाखविणारे शेतकरी आंदोलन अशा एक कलमी), एक नेतृत्व कथिखाली भारतात आंदोलने झाली. 1990 च्या दशकात बाजारपेठी मुलतत्ववादाबरोबरच धार्मिक मूलतत्ववाद फोफावू लागला आणि दंगलीचे रण माजले. 'सेवा' सारख्या खियांच्या सक्षमीकरणाचे काम करणाऱ्या संघटनांचा आवाज अशा हिंसक दंगलीच्या काळात हरवला. या पार्श्वभूमीवर लिंगभाव संस्कृती आणि विकास यांच्यातीलपरस्परसंबंध पाहण्याची आवश्यकता वाटू लागली.

अर्थशास्त्र आणि इकोलॉजी विध्वंसक संवाद साधू शकतात आणि दुष्काळामुळे उद्भवलेल्या आपत्तीमध्ये जाऊ शकतात, त्याची खरी कारणे खोलवर आहेत. ते राष्ट्रीय धोरणांमध्ये काही प्रमाणात आढळतात ज्यांनी अल्पभूधारक शेतीच्या गरजांकडे लोकसंख्येच्या वेगाने निर्माण होणाऱ्या धोक्यांकडे फारच कमी, उशीराने लक्ष दिले .इतर विकसनशील जगातील क्षेत्रांचा उत्पादन आधार स्थानिक अपयश आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रणालींच्या कार्यामुळे सारखाच ग्रस्त आहे. वाढत्या दुर्मिळ संसाधनांची निर्यात करताना तुलनेने गरीब देशांनी एकाच वेळी वाढती गरिबी स्वीकारणे आवश्यक आहे. बहुतेक विकसनशील देशांचे आता दशकाच्या सुरुवातीच्या तुलनेत कमी दरडोई उत्पन्न आहे. वाढती गरिबी आणि बेरोजगारीमुळे पर्यावरणावर दबाव वाढला आहे.

थोडक्यात, स्थानिक लोक आणि त्यांचे समुदाय आणि इतर स्थानिक समुदाय त्यांच्या ज्ञानामुळे आणि पारंपारिक पद्धतींमुळे पर्यावरण व्यवस्थापन आणि विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. राज्यांनी त्यांची ओळख, संस्कृती आणि हितसंबंध ओळखून त्यांचे समर्थन केले पाहिजे. आणि शाश्वत विकास साध्य करण्यासाठी त्यांचा प्रभावी सहभाग सक्षम केला पाहिजे.दडपशाही, वर्चस्वाखाली असलेल्या लोकांचे पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधने आणि व्यवसाय संरक्षित केला जाईल. युद्ध हे शाश्वत विकासासाठी नैसर्गिकरित्या विनाशकारी आहे. म्हणून राज्यांनी सशस्त्र काळात पर्यावरणाचे संरक्षण प्रदान करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करावा. शांतता, विकास आणि पर्यावरण संरक्षण एकमेकांवर अवलंबून आहेत. आणि परस्परांपासून अविभाज्य आहेत.

उपाय योजना

1. पर्यावरण धोरण वन विषयक धोरण यामध्ये आवश्यकते निसर्गस्नेही बदल घडविले पाहिजे.
2. पर्यावरण विषयक कायदे सक्षम आणि बळकट केले पाहिजे.
3. पर्यावरण आघात पडताळणीचे नियम सर्वांकष विविध ऋतूंमध्ये वेगळ्या पडताळण्या करू शकणारे आणि एखाद्या प्रकल्पापुरते मर्यादित न ठेवता त्या क्षेत्राशी निगडित असे अत्यंत कडक स्वरूपात लागू करणे आवश्यक आहे. .
4. पर्यावरणासंदर्भात भारतापुढे कोणती मोठी आव्हाने आहेत. याचा कालबद्ध शोध घेऊन प्रत्येक विषयातील उपलब्ध तज्ञांची समिती नेमून त्यांच्या शिफारशींना कायदेशीर तरतुदींचे स्वरूप देण्यासाठी संसदेत त्यानुसार विधेयक आणून तात्काळ कायद्यात रूपांतर करणे अनिवार्य आहे.
6. पर्यावरण संरक्षणासाठी स्थापल्या गेलेल्या वैधानिक संस्था आणि यंत्रणा गेल्या काही वर्षात पार अशक्त आणि किरकिळ्या झाले आहेत. त्यांना त्यांचे काम करता येण्यासाठी स्वातंत्र्य आणि बळ दिले पाहिजे.
7. पर्यावरणीय शिक्षणाचे मुख्य उद्दीष्ट आपल्या देशातील पर्यावरणाची गुणवत्ता विकसित करणे, लोकांमध्ये पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धनाची भावना जागृत करणे आणि निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे हे होते.
8. हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की देशाच्या पर्यावरण संरक्षणाच्या घटकांवर (महसूल, अक्षय आणि अपारंपरिक ऊर्जा, आर्थिक वाढ, शहरीकरण आणि वाणिज्य) भारतातील पर्यावरण आणि विकास आधारित आहे. इतर घटक, जसे की जंगले, तांत्रिक प्रगती, ऊर्जा कार्यक्षमता, औद्योगिक वाढ, आर्थिक मोकळेपणा इ., हवामान बदलावर परिणाम करू शकतात. आंतरराष्ट्रीय वाणिज्य, तांत्रिक विकास आणि औद्योगिकीकरण हे सर्व सर्वसाधारणपणे ऊर्जा-संबंधित

हरितगृह वायू उत्सर्जनाचे घटक मानले जातात. त्यांचा पर्यावरण गुणवत्तेवर कसा परिणाम होतो हे पाहण्यासाठी भविष्यातील अभ्यास या पैलूंवर लक्ष केंद्रित करू शकतो.

9. पर्यावरणाचा विचार हा जात, वर्ग, लिंगभाव, राज्य या संदर्भात करावा लागेल .भांडवलशाहीचा प्रभाव हा सध्याला विध्वाश घडवीत आहे. त्यामुळे उथळ पर्यावारांवादापेक्षा सखोल पर्यावरणवादाकडे आपणाला जावे लागेल.

संदर्भ:

- माधव गाडगीळ व रामचंद्र गुहा, इकॉलॉजी ऍन्ड इक्वीटी : द युज ऍन्ड ऍब्यूज ऑफ नेचर इन कॉटेंपररी इंडिया पेग्विन, दिल्ली, किंमत १५०, पाने ८१३
- Agarwal, B. 1992 "The Gender and Environment Debate Lessons from India, Feminist Studies, 18 (1) 119-158
- Agarwal, B., 1986a, 'Women, Poverty and Agricultural Growth in India', The Journal of Peasant Studies, Vol.13, No.4, pp. 165-220
- Agarwal, Bina (1998) Environmental management, equity and ecofeminism: Debating India's experience. The Journal of Peasant Studies, 25:4, 55-95. Accessed on 17 Novemeber 2020.
- Agarwal, Bina. (1992). The Gender and Environment Debate: Lessons from India. Feminist Studies. Vol 18. PP 120- 142.
- http://dx.doi.org/10.1080/03066159808438684
- Kelkar, Meghana 2017 Journeying through an "Alien Terrain: Feminist Research Methodology and Local Knowledge of Soil Management', in Sumi Krishna and Gita Chadha (eds), Feminists and Science. Critiques and Changing Perspectives in India, Vol. 2, pp 46-71. New Delhi Sage Publications
- Mahesh Rangarajan (ed), Environmental Issues in India: A Reader New Delhi Pearson Longman
- Rao, Manisha. (2012). Ecofeminism at the Crossroads in India: A Review. ISSN. Pp 125-138.
- Shiva, Vandana 1988. Staying Alive Women, Ecology and Survival in India, New Delhi: Kali for Women Tsing.

***स्त्री आणि लिंगभाव अभ्यास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.**

***

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये

*डॉ. सतिश नामदेव धनवडे

गोषवारा:

मागील काही दशकापासून मानव निसर्गाशी स्पर्धा करून आपली आर्थिक समृद्धी प्राप्त करण्याचा प्रयत्न करत आहे. मानवाने आपला विकास साधत असताना निसर्गातील संपादांचा अमर्याद वापर केल्यामुळे निसर्गाची कधीही न भरून निघणारी हानी व त्यामुळे मानवास अनेक पर्यावरणविषयक गंभीर समस्यांना आज सामोरे जावे लागत आहे. पर्यावरण ऱ्हासासाठी मानवाची उपभोगी प्रवृती कारणीभूत ठरत आहे. भारतामध्ये सन १९७० पासून पर्यावरण चळवळीचा उगम झाला आहे. भारतातील प्रमुख पर्यावरण चळवळी मध्ये बिष्णोई चळवळ, चिपको चळवळ, नर्मदा बचाओ आंदोलन, अपीको चळवळ, सायलेंट व्ह्याली चळवळ, टेहरी धरण आंदोलन इत्यादी प्रमुख चळवळीचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सन १९८० नंतर स्थानिक पर्यावरणीय समस्यांची व्याप्ती वाढल्यानंतर अनेक पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी काम करणाऱ्या अनेक संघटना उदयास आल्या. यातूनच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पर्यावरण चळवळीचा उगम झाल्याचे दिसून येते. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पर्यावरण क्षेत्रामध्ये ३३ बिगर शासकीय संघटना काम करतात. पर्यावरणीय प्रश्न सोडवीण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांचे योगदान हे अत्यंत मोलाचे आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण संघटनानी अनेक पर्यावरण प्रश्न हाती घेतले आहेत आणि यातूनच अनेक स्थानिक पर्यावरण चळवळीचा उगम झाला. त्यामध्ये प्रामुख्याने पंचगंगा नदी पाणी प्रदूषण चळवळ, रंकाळा तलाव वाचवा आंदोलन, बॉक्साईड खाणी विरोधी चळवळ, अवैध वृक्षतोड विरोधी आंदोलन अशा अनेक चळवळी उदयास आल्या. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक पर्यावरण चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक माहिती स्त्रोतावर आधारीत असून त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पर्यावरण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या ३३ बिगर शासकीय संघटना कडून माहितीचे संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलन प्रश्नावली तंत्राच्या साह्याने तसेच संघटनेतील पदाधिकारी यांच्या मुलाखती घेऊन करण्यात आले आहे.

प्रस्तावना:

भारतामध्ये तसेच संपूर्ण जगभरामध्ये १९७० च्या दशकापासून पर्यावरण विषयासंबंधी नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रातील अभ्यासकांचे लक्ष प्रामुख्याने वेधले गेले. पर्यावरणाचे प्रश्न हे आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असल्यामुळे त्यासंबंधी आंतरराष्ट्रीय पातळीवर उपाय योजना करण्यास सुरवात झाली. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्वाच्या घटना घडून आल्या त्यामध्ये सर्वप्रथम १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाची मानव पर्यावरण परिषद स्टोकहोम येथे झाली. त्यातील ठरावानुसार World Commission on Environment and Development स्थापन होऊन त्याचा अहवाल १९८७ मध्ये 'आपले 'सामाईक भविष्य' Our Common Future' ह्या शीर्षका खाली प्रसिद्ध झाले. तसेच १९९२ मध्ये रेओ दि जेनेरो, ब्राझील येथे वसुंधरा परिषदेचे आयोजन करण्यात आले. या सर्व आंतरराष्ट्रीय घटनांच्यामुळे जगभर आणि भारतामध्ये पर्यावरण प्रश्नाकडे लक्ष वेधले गेले आणि त्यातूनच भारतामध्ये पर्यावरण चळवळीचा उदय झाला. भारतातील प्रमुख पर्यावरण चळवळी मध्ये बिष्णोई चळवळ, चिपको चळवळ, नर्मदा बचाओ आंदोलन, अपीको चळवळ, सायलेंट व्ह्याली चळवळ, टेहरी धरण आंदोलन इत्यादी प्रमुख चळवळीचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. या पर्यावरण चळवळी चे विवेचन अनेक अभ्यासकांनी आपल्या अभ्यासात केले आहे. भारतीय पर्यावरण चळवळीची वैशिष्ट्ये, उदय, चळवळीची विचारप्रणाली, चळवळीचे यश अपयश याविषयीचे विवेचन पुढील अभ्यासकांनी आपल्या अभ्यासात केले आहे. (करण, पी. पी. १९९४; गाडगीळ माधव आणि रामचंद्र गुहा १९९४; अंधारिया, जानकी आणि चंद्रसेन गुप्त १९९८).

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सन १९८० नंतर स्थानिक पर्यावरणीय समस्यांची व्याप्ती वाढल्या नंतर अनेक पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी काम करणाऱ्या अनेक संघटना उदयास आल्या. यातूनच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पर्यावरण चळवळी चा उगम झाल्याचे दिसून येते. सद्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पर्यावरण क्षेत्रामध्ये ३३ बिगर शासकीय संघटना काम करतात. पर्यावरणीय प्रश्न सोडवीण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांचे योगदान हे अत्यंत मोलाचे आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण संघटनानी अनेक पर्यावरण प्रश्न हाती घेतले आहेत आणि यातूनच अनेक स्थानिक पर्यावरण चळवळीचा उगम झाला. त्यामध्ये प्रामुख्याने पंचगंगा नदी पाणी प्रदूषण चळवळ, रंकाळा तलाव वाचवा आंदोलन, बॉक्साईड खाणी विरोधी चळवळ, अवैध वृक्षतोड विरोधी आंदोलन अशा अनेक चळवळी उदयास आल्या. प्रस्तुत शोधनिबंधा मध्ये महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक पर्यावरण चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अभ्यासाचे उद्दिष्ट:

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक पर्यावरण चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये अभ्यासणे हे प्रस्तुत अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

अभ्यासपद्धती:

प्रस्तुत शोधनिबंध हा प्राथमिक माहिती स्त्रोतावर आधारीत आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या एकूण ३३ बिगर शासकीय संघटनाकडून स्नोबॉल नमुना निवड तंत्राचा अवलंब करून सर्वप्रथम सर्व्हेस्टडी द्वारे अभ्यास करण्यात आला आहे. तथ्य संकलन प्रश्नावली तंत्राच्या साह्याने तसेच संघटनेतील पदाधिकारी यांच्या मुलाखती घेऊन करण्यात आले आहे. सदरच्या अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये:

१] समान उद्दिष्ठ:

कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरणीय प्रश्न सोडविणे हे सर्व संघटनांचे समान उद्देष्ट आहे.

२] पर्यावरण संघटनामधील आंतरसंबंध:

स्थानिक पातळीवरील समान पर्यावरणीय प्रश्नासंबंधी (नदी प्रदूषण, तलावांचे प्रदूषण, अवैध वृक्षतोड, बॉक्साईड खाणी) जिल्ह्यातील संघटना मध्ये आंतरसंबध दिसून येतो. त्या एकत्रितपणे या प्रश्नावर काम करतात.

३] उद्दिष्ठमधील सातत्य:

पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी सातत्याने जिल्ह्यातील पर्यावरण संघटना या विविध प्रकारचे उपक्रम, कार्यक्रम हाती घेतात.

४] पर्यावरण संघटनांची संघटनात्मक वैशिष्ट्ये:

१] नागरी भागामध्ये पर्यावरण संघटनांचा उदय

२] सदरच्या संघटना या व्यावसायिक संघटना नसून त्या पूर्णपणे स्वयंसेवी भावनेने काम करीत आहेत.

३] अनेक संघटनांचा आकार हा लहान आहे. म्हणजे ५० पेक्षा कमी सदस्य असलेल्या या संघटना आहेत.

४] अनेक संघटना या अनोंदणीकृत आहेत.

५] संघटनांचे कार्यकारी मंडळातील सदस्य हे प्रामुख्याने मध्यम वर्गातील उच्च शिक्षित आणि नागरी समाजातील आहेत.

५] पर्यावरण संघटनामधील कार्यकर्त्यांची सामाजिक पार्श्वभूमी:

१] बहुतांशी कार्यकर्त हे मध्यम वयोगटातील आहेत.

२] पर्यावरण संघटना मध्ये पुरुष कार्यकर्ते हे प्रामुख्याने अधिक आहेत.

३] बहुतांशी पर्यावरण कार्यकर्त हे उच्च जातीतील आहेत.

४] बहुतांशी पर्यावरण कार्यकर्त हे मध्यम वर्गातील व नागरी पार्श्वभूमी असलेले आहेत.

५] उच्च शिक्षित सदस्य अधिक आहेत.

६] पर्यावरण विज्ञान या शाखेतील पदवी, उच्च पदवी असलेले काही कार्यकर्ते हे संघटनेमध्ये आहेत. यामुळे पर्यावरण क्षेत्रासंबंधीचे विज्ञानिक ज्ञान मिळवण्यासाठी याचा उपयोग होतो. आणि ही कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळी साठी एक सकारात्मक बाब आहे.

६] पर्यावरण संघटनांनी हाती घेतलेले पर्यावरणीय प्रश्न:

कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीचा मुख्य भर हा स्थानिक पर्यावरणीय समस्यावर लक्ष केंद्रित करणे हा आहे. संघटनानी हाती घेतलेल्या पर्यावरण समस्यांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

१] नदी प्रदूषण,

२] तलावांचे प्रदूषण,

३] अवैध वृक्षतोड,

४] बॉक्साईड खाणीमधून निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्या,

५] जैवविविधता ऱ्हास

या सर्व समस्या स्थानिक पातळीवरील महत्वाच्या पर्यावरणीय समस्या आहेत. परंतु भारतातील आणि जागतिक पातळीवरील पर्यावरणीय चळवळीच्या प्रमुख अजेंड्या मध्ये प्रामुख्याने या पर्यावरणीय समस्या दिसून येतात. याबरोबरच इतरही अनेक पर्यावरणीय प्रश्नावर कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरणीय संघटना काम करत आहेत. त्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

१] साखर कारखाने आणि इतर औद्योगिक कारखान्यामुळे होणारे प्रदूषण,

२] प्लास्टिकचा दुरुपयोग,

३] वाहनांचे प्रदूषण,

४] विकास प्रकल्पामुळे निर्माण झालेले पर्यावरणीय प्रश्न,

५] कचरा समस्या,

६] प्राण्यांची अवैध्यरीत्या केली जाणारी शिकार,

७] जैविक कचरा समस्या,

८] नरक्या वनस्पतीची तस्करी

इत्यादी अनेक पर्यावरणीय प्रश्नासंबधी संघटनानी अनेक जाणीव जागृती कार्यक्रम, कृती कार्यक्रम, आंदोलने हाती घेतली आहेत.

७] पर्यावरणीय संघटनानी अवलंबलेले मार्ग:

पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी पर्यावरणीय संघटनानी पुढील मार्गाचा अवलंब केलेला आहे.

१] शांततापूर्ण मार्ग: यामध्ये विविध सभांचे आयोजन करणे, वर्तमान पत्रामधून लेखन करून जाणीव जागृती करणे, लेखी तक्रार करणे, प्रसार माध्यमाद्वारे जाणीव जागृती करणे इत्यादी.

२] आंदोलनात्मक मार्गाचा अवलंब: यामध्ये मोर्चाचे आयोजन करणे, घोषणा देणे, शासकीय अधिकारी यांना घेरावो घालणे, शासकीय अधिकारी यांना प्रश्न विचारणे, शासकीय कार्यालयास टाळे ठोकणे.

३] माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविणे, न्यायालयामध्ये केसेस दाखल करणे.

८] विचारसरणीचा कल:

पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी गांधीवादी आणि सुयोग्य तंत्र ज्ञानावर भर देणाऱ्या विचार प्रणालीचा प्रभाव हा कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळी वर आहे.

९] कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीचा प्रभाव:

कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरणीय प्रश्ना संबंधी लोकांमध्ये जाणीव जागृती करण्यामध्ये जिल्ह्यातील संघटनानी अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडली आहे. अनेक जाणीव जागृती कार्यक्रम, प्रत्यक्ष कृती कार्यक्रम, विविध आंदोलने यांच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण संरक्षण व संवर्धन क्षेत्रामध्ये या संघटनानी भरीव असे काम केले आहे.

समारोप:

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये सन १९८० नंतर स्थानिक पर्यावरणीय समस्यांची व्याप्ती वाढल्यानंतर अनेक पर्यावरण संरक्षण व संवर्धना साठी काम करणाऱ्या अनेक संघटना उदयास आल्या. यातूनच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पर्यावरण चळवळी चा उगम झाल्याचे दिसून येते. पर्यावरणीय प्रश्न सोडवीण्यामध्ये स्वयंसेवी संस्थांचे योगदान हे अत्यंत मोलाचे आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण संघटनानी अनेक पर्यावरण प्रश्न हाती घेतले आणि यातूनच अनेक स्थानिक पर्यावरण चळवळीचा उगम झाला आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक पर्यावरण चळवळीची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणून आपणास संघटनाचे समान उद्दिष्ठ, पर्यावरण संघटनामधील आंतरसंबंध, उद्दिष्ठमधील सातत्य, पर्यावरण संघटनांची संघटनात्मक वैशिष्ट्ये, पर्यावरण संघटनामधील कार्यकर्त्यांची सामाजिक पार्श्वभूमी, पर्यावरण संघटनांनी हाती घेतलेले पर्यावरणीय प्रश्न, पर्यावरणीय संघटनानी अवलंबलेले मार्ग, विचारसरणीचा कल, कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यावरण चळवळीचा प्रभाव ही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील.

संदर्भ:

1. **Andharia, Janki and Chandan Sengupta (1998):** 'The Environmental Movement: Global Issues and the Indian Reality', *The Indian Journal of Social Work,* Vol. 59, No. 1, pp. 429-431.
2. **Gadgil, Madhav and Ramchandra Guha (1994):** 'Ecological Conflicts and the Environmental Movement in India', *Development and Change,* Vol. 25, pp. 101-136.
3. **Karan, P. P. (January, 1994):** 'Environmental Movements in India', *Geographical Review,* Vol. 84, No. 1 pp. 32-41.

***सहाय्यक प्राध्यापक, एस. एम. आर. के. बी. के. ए. के. महिला महाविद्यालय, नाशिक, मो. नं. ८९८३६८६२५२,**

इमेल – satishdhanawade@rediffmail.com

***

जागतिकीकरण : कृषी क्षेत्रावरील परिणाम

*डॉ नानासाहेब पाटील

प्रस्तावना:

मानवास जीवित रहाण्यासाठी वा पुढील पिढीचे जतन वा पोषण करण्यासाठी, शेतकरी हाच जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जातो औद्योगिक क्रांती पूर्वीपासून जगात शेती हाच महत्वपूर्ण व्यवसाय आहे औद्योगिक क्रांती नंतरही विकसित व विकसनशील राष्ट्रांत शेती व्यवसायाला अत्यधिक महत्व दिले जातेय शेती व्यवसाय हाच राष्ट्रीय विकासाचा मुख्य स्रोतांपैकी एक आहे जागतिक स्तरावर सातत्याने परिवर्तन व त्यात वाढ होत आहे सामाजिक परिवर्तन त्याची व्याप्ती यांत्रिकीकरण उदयोग धंद्यातील वाढ व औद्योगिकीकरण आधुनिकीकरण खाजगीकरण ह्या स्तरात होत असलेली वाढ ह्यांवर होत असलेला जागतिकीकरनाचा परिणाम त्यातील प्रगती, विकास ह्या बाबतीत अद्ययावत चालू असलेलं संशोधन ह्या सर्वांचा मूलभूत आधार कृषी विषयक संस्कृती व तिचे होत असलेले पिढी दर पिढी हस्तांतरण त्यातील उणिवा व विकास विषयक समस्या व उपाय योजना व त्यांचा योग्य अंमल ह्या विषयी चिंतन करणे गरजेचे ठरते देशास स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशाची लोकसंख्या जवळपास चाळीस कोटी होती आज ह्या लोक संख्येच्या आकड्याने एकशे चाळीस कोटी च्या संख्येच्या सीमा ओलांडल्या आहेत ह्या लोकसंख्येच पोषण करणारी एक मुख्य व्यवस्था म्हणजे कृषी व्यवस्था होय ह्या व्यवस्थेत राबणारा तुम्हां आम्हांस जिवंत रहाण्यासाठी पोषण होण्यासाठी अहोरात्र मेहनत करणारा सतत तोट्याचा व्यवसाय करणारा सातत्याने बदलत रहाणाऱ्या निसर्गावर आधारित व्यव साय करणारा खेडूत म्हणजे जमीन कसनारा भारतातील जवळपास सहा लाख खेड्यात विस्तारलेल्या लोक संख्येपैकी 65 टक्के लोकसंख्येचा एक मुख्य हिस्सा व त्यातील हा घटक अर्थात शेतकरी आणि त्यांचा मुख्य व्यवसाय शेती भारतीय संस्कृती जीवन पद्धती ही मुळात शेती वा कृषी संस्कृती वर आधारित आहे ह्या बाबतीत सापेक्ष दृष्टीने विचार करता परिवर्तन हा समाजशास्त्रीय अभ्यासकांच्या दृष्टीने महत्वपूर्ण भाग समाज बदलतोय त्यात नेमका बदल कोणत्या क्षेत्रात आदिवासी ,ग्रामीण की शहरी परंतु ग्रामीण वा आदीवासी क्षेत्रात प्रचंड लोक संख्येने विस्तारलेला हा कृषक समाज त्यांची जीवन पद्धती त्यांचा व्यवसाय त्यातील होत असलेले बदल त्यावर परिणामकारक ठरणारे घटक ह्या बाबतीत संशोधन वा अध्ययन होणे काळाची गरज वा अनिवार्यता ठरते.

1991 च्या सुमारास आपल्या देशाचे तत्कालीन पंतप्रधान पी वि नरसिंहराव व तत्कालीन अर्थ मंत्री अर्थ तज्ञ डॉ मनमोहन सिंग ह्यांनी "खाऊजा " (खाजगीकरण - उदारी करण - जागतिकीकरण) ह्या धोरणाचा अवलंब केला ह्यामुळे समाजाचं अर्थ कारण बदलण्याच्या धोरणास सुरुवात झाली दळण वळण औद्योगिक वा आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनाचा परीघ हा देश पातळीवर नाही तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर गेला आंतरराष्ट्रीय स्तरावरून होत असणाऱ्या आर्थिक धोरणाचा परिणाम देशांतर्गत धोरणावर होण्यास सुरुवात झाली औद्योगिक क्षेत्रात परकीय गुंतवणूकित वाढ होण्यास सुरुवात होऊ लागली त्याचा परिणाम देशातील समाज व्यवस्थेवर होऊ लागला परिणामी शेती व शेतकरी समाजावरील होत जाणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे व मत मांडणे क्रमप्राप्त ठरते .

उद्देश :

1 जागतिकीकरणाचा शेती व शेतकऱ्यांच्या विकास व परिणाम ह्यांचा अभ्यास करणे.

2 शेती शेतकरी व जागतिकीकरण ह्यांच्या सार्वत्रिक परिणामांचा अभ्यास करणे.

3 जागतिकीकरनाचा उदयोग, व्यापार, खाजगीकरण व त्यात होणाऱ्या वाढीचा शेती व शेतकरी सह संबंध ह्यावरील परिणामांचा अभ्यास करणे

गृहीतक :

1. जागतिकीकरनाचा शेती विकासाबाबत सार्वत्रिक परिणाम दिसून येत नाही.

2. जागतिकीकरणामूळे सामान्य व अल्प अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत फारशी वाढ वा परिणामकारकता झाल्याचे दिसून येत नाही.

संशोधन पद्धती

सदर शोधनिबंधासाठी सुक्ष्म निरीक्षण सहभागी व असहभागी निरीक्षण, शासकीय व सार्वजनिक अहवाल, वर्तमानपत्रे व शोध निबंध पर लेखांच्या आधारे व्दितीयकमाही तिच्या आधारे विश्लेषण केले आहे.

भारतीय समाज व संस्कृती चा शेती हाच मुख्य आधार

भारतीय समाजात लोक परंपरा, सण, समारंभ, नितीतत्वे, श्रद्धा,संस्कार, साहित्य, काव्य, लोक परंपरा, लोक साहित्य ह्या सर्व बाबी शेती आणि शेतीच्या मौसमा नुसार प्रवाहित प्रसारित व्हॉयच्या ग्रामीन समाज ग्रामीण साहित्य, बलुतेदारी, अलुतेदारी पद्धती कृषी पूरक व्यवसाय व सामाजिक व्यवहार, भाषा वाक्प्रचार, म्हणी कथा कादंबऱ्या लोकनाट्य,नाटक ह्या सर्वच क्षेत्रात शेती व्यवसाय एक मूळ संदर्भ होता व शेतकरी एक नायक होता.

जगाचा पोशिंदा ज्याचा आदर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजा राजर्षी शाहू महाराज, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्या जाणत्या राजे महाराजे व समाज सुधारकांनी शेती टिकली व शेतकरी जगला तर समाजाचं अस्तित्व टिकेल ह्या विषयी आपले विचार व योजना मांडल्या आणि अस्तित्वातही आणल्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या कष्ट कर्यांच्या अस्तित्वासाठी आर्थिक परिवर्तनासाठी शेतकरी कामगार पक्षाने विविध चळवळीच्या माध्यमातून थोर विचारवंत भाई उद्धवराव पाटील प्रा.भाई एन डी पाटील न्यायाधीश बी एन देशमुख अविरतपणे लढा दिला जागतिकीकरण व तत्ससंबंधीय धोरणास शेतकरी कामगार पक्षाचा कणखर विरोधच होता ह्यासाठी अनेक जन आंदोलने ही झाली ह्या आंदोलनाच्या माध्यमातून अविरत शेतकरी टिकला पाहिजे जगला पाहिजे शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनासाठी गेल्या चाळीस वर्षा पासून शेतकरी कामगार पक्ष्याचे राज्य खजिनदार राष्ट्रीय रत्न पुरस्कार प्राप्त गोदकाठ बचाव आंदोलनाचे प्रणेते लोकनेते भाई लक्ष्मणराव गोळेगावकर ह्यांच्या मते -विश्वात जैव व जनुकीय तंत्रज्ञानास चालना देण्याचे कारण जन्मास येणाऱ्या प्रत्येकास भूक भागविण्याची गोळी निर्माण होणे अशक्यप्राय आहे त्यासाठी अन्न च लागेल म्हणून पोटाची भूक शमविनारा जगाचा पोशिंदा शेतकरीच आहे त्यादृष्टीने शेतीला औद्योगिक दर्जा मिळाला पाहिजे तरच जागतिकीकरनाचा शेतकऱ्यांना लाभ होईल नाहीतर औद्योगिक दृष्ट्या समृद्ध देशातील शेतकऱ्यांच्या शेती उच्च प्रतीच्या मालासमोर भारतीय शेतीमाल कवडीमोल भावात विकला जाईल जागतिकीकरनाच्या धोरणात कृषी क्षेत्रास औद्योगिकी करणाचा दर्जा व सुविधा निर्माण होणे देशाच्या व मानवी प्रगतीच्या हितावह असेल.

आधुनिक काळात शेती व शेतकऱ्यांविषयी आस्था कमी होताना दिसून येतेय औद्योगिकरणात वाढ होत असल्याने ग्रामीण भागातील लोक शहरात स्थलांतरित होण्याच्या प्रमाणात वाढ होतेय परिणामी ग्रामीण भाग ओस पडण्याची चिन्ह दिसत आहेत शेतकऱ्यांच्या मुलास शेती करणे परवडत नसल्याने हतबल होऊन तो शहरात हातास मिळेल ते काम स्वीकारतोय परिणामी जागतिकीकरनाच्या झगमगाटात मुंबईचे शांघाय करण्याच्या दिशेने वाटचाल करणारा शासक जगाचा पोशिंदा बळीराजा लाखोंच्या संख्येने गळयाला फास लावून आत्महत्या करतोय हया विषयी समाजात प्रखर उदासीनता निर्माण होतेय त्या विषयी बुद्धिजीवी विचार करण्याची आवश्यकता व काळाची गरज आहे .

मोहंजोंदडो हडप्पा येथील उतखन्नात गव्हॉचे दाणे सापडले असले तरीही तांदूळ हा खऱ्या अर्थाने भारताचाच नाही तर संपूर्ण आशिया खंडाचा जगण्याचा व पोषणाचा एक मुख्य आधार आहे आपणास जितक्या कॅलरीज मिळतात

त्या पैकी 20 टक्के कॅलरीज ह्या तांदळा पासून मिळतात पाच हजार वर्षा पासून मिळणारा तांदूळ भारताद्वारा पिकवला जातो त्याचे उत्पादन गेल्या सहा दश कात जवळ पास पाच पटीने वाढून ह्या वाढीव उत्पन्नाच्या जोरावर 2012 पासून भारत जगातील सर्वाधिक तांदूळ निर्यात करणारा देश बनला आहे ह्या अगोदर थाय लंड हा सर्वाधिक तांदूळ निर्यात करणारा देश मानला जात होता 2012 -13 ह्या वर्षात 10 कोटी 50 लाख टन तांदूळ उत्पादन करून भारताने सर्वाधिक तांदूळ निर्यात करणारा देश म्हणून आघाडी घेतली होती परंतु पुन्हा थाय लंड ने तांदूळ उत्पादनात विक्रमी उत्पादन घेऊन जागतिक बाजार पेठेत सर्वाधिक स्वस्त दरातील तांदूळ आणला आहे त्याचा विपरीत परिणाम आपल्या तांदूळ उत्पादनावर अर्थात शेतकऱ्यांवर होताना दिसून येतोय

अन्न धान्य उत्पादन व साठवणूक क्षमता आपल्या देशात जास्तीचे अन्न धान्य उत्पादन झालेल्या मालाची साठवणूक क्षमता व प्रक्रिया उद्योगास पाहिजे तेव्हढि चालना व उपक्रम राबवले जात नाहीत. आपल्या देशात 10 ते 20 टन अन्न धान्य पिकात पाणी घुसल्याने नुकसान होते ह्या विषयी अभ्यास-संशोधन-उपाय व अंमल बजावणी होत नाही ह्या कामी देशातील अभ्यासक अक्षम्य दुर्लक्ष करतात ह्या विषयी जागतिक बँकेने अभ्यास करणे भाग पडते. ही एक जागतिकीकरच्या काळातील उदासीन बाब समोर येतेय.

जल व्यवथापन त्याचे म्हहत्व व आवशयकता ह्या देशातर्गत प्रयत्न होणे अधिक गरजेचे आहे काही ठिकाणी प्रचंड पाणी शेती योग्य व पिण्यायोग्य पाणी समुद्रात वाहून जाते तेव्हा नदीजोड प्रकल्प कार्यान्वित होने मेट्रो लाइन पेक्षा अधिक महत्वाचे असल्याचे प्रखर पणे जाणवते. सध्या विद्यमान राज्य शासनाने 14000 कोटी रुपये रस्ते विकासासाठी तरतूद घोषित केलेली दिसून येते हिच तरतूद बंधारे बांधणी व दुरुस्ती साठी केली असती तर राज्यातील सिंचन क्षमतेत वाढ होण्यास मदत झाली असती.

सरासरी अन्न धान्य उत्पादन व साठवणूक क्षमता

आपल्या देशात दर वर्षी 25 ते 30 कोटी टन धान्य उत्पादन होते कृषी तज्ज्ञांच्या मते 12 ते 14 कोटी धान्य शेती व शेती सबधित उद्योगास लागते 12 ते 13 कोटी धान्य राष्ट्रीय बाजार पेठेत येतेत्यापैकी निम्मे धान्य रेशनिग साठी शासन खरेदी करते आणि दरवर्षी सहा कोटी टन धान्य बाजारपेठेत विक्री केले जाते अर्थात आपण क्षमते पेक्षा जास्त पिकवतोय जगातील दूध उत्पादनात व भाजीपाला फळे ह्यातही आपण अग्रेसर आहोत.

तांदूळ गहू, कापूस, ह्याच्या निर्यातीत आपला जगात दुसरा क्रमांक लागतो परंतु साठवणूक क्षमता व प्रक्रिया उद्योग ह्या बाबत आपली उदासीनता आहे. आपल्या देशातील अन्न धान्य महा मंडळ गोदमाची क्षमता 32 कोटी टन इतकी आहे. पण नासाडीचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे अन्नाविना भुके रहाणारांची संख्या 20 कोटींच्या घरात आहे व दुसरीकडे अन्न परब्रम्ह मानणारे आपण मात्र काहींना ते मिळत नाही काहींच्या द्वारा ते जाग्यावरच गोदामात नासत जाते ह्यावर विचार करण्याची गरज आहे.

शेतीवर आधारित लोक संख्या :

शेतीवर आधारित लोक संख्या जवळ पास 65 टक्यांच्या घरात आहे कृषी क्षेत्र पूर्णतः नैसर्गिक घटकावर अवलंबून आहे नैसर्गिक घटकातील अनियमितता व प्रमाण बद्धता असंतुलित झाली आहे .कृषी व्यवस्था व त्यांच्या अनेक धोक्यातील तीव्रता टाळण्याविषयी नव्या धोरणात विचार करणे गरजेचे आहे 1091 च्या नव्या धोरणानुसार जागतिकीकरनामुळे जिडीपी च्या दरात वाढ झाली पण शेतकऱ्यांच्या आत्महत्येस सुरुवातही झाली .

साधारणतः National crime record Bearing च्या आकडेवारी नुसार 1995-2003 च्या दरम्यानच्या काळात 138321 व 2003-2013 च्या दरम्यान 296548 शेतकऱ्यांनी जागतिकीकरण-खाजगीकरण-उदारीकरण ह्या नव्या धोरणाचा अवलंब केल्या नंतर आजही शेतकऱ्यांच्या आत्म हत्येचे सत्र बंद होत नाही.

1991 च्या जागतिकीकरनाच्या धोरणानंतर 1995 ते आजपर्यंत देशात सुमारे जवळपास 45 शेतकरी आत्महत्येचा फास आवळून जीवन यात्रा संपवित आहेत.

गृहखर्च आणि शेती व्यवसाय

शेती उत्पादन घटकांच्या व कृषी साहित्य ह्यात सातत्याने होणारी भाव वाढ त्या प्रमाणात शेती मालाच्या भावात वाढ होताना दिसून येत नाही परिणामी शेतकरी शेती व्यवसाय व त्यातील प्रचंड गुंतवणूक वाढीमुळे त्याच्या मूलभूत गरजा आरोग्य ,मुलांचे शिक्षण व भविष्यासाठी तरतूद ह्यात कोणतही संतुलन ठेवू शकत नाही पर्यायाने गृह खर्च निभावणे अशक्य होतं आहे.

जागतिकीकरनाच्या भरभराटीत आपल्या देशात महत्वाच्या सार्वजनिक बाबींचे खाजगीकरण होत चालले आहे ह्यात मोठे उद्योगपती ह्यांच्याआर्थिक विकासात प्रचंड वाढ झाली जागतिकीकरनामुळे शेतकऱ्यांच्या बाबत सार्वत्रिक विकासाच्या दिशेने त्याचे प्रत्यक्ष आर्थिक परिणाम दिसून येत नाहीत फार तर देशातील 2 टक्के मोठ्या शेतकऱ्यांना ह्याचा लाभ होत असेल परंतु 90 टक्के अल्प भुधारकाना ह्याचा लाभ होताना दिसून येत नाही.

उद्योगपती व राजकीय नेते ह्यांचे आर्थिक हित संबंध गुंतलेले असतात कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज ह्या अश्या महत्वपूर्ण बाबींचे खाजगीकरण होताना दिसून येत आहे.

जागतिक बाजारपेठ व जागतिकीकरण ह्याचा शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात सर्व सामान्य शेतकरी व त्याचा सार्वत्रिक परिणाम ह्यात ज्या प्रमाणात अपेक्षा व्यक्त केल्या जात होत्या त्या प्रमाणात जागतिकीकरनाचे अपेक्षित लाभ व शेतकऱ्यांच्या जीवनपद्धतीत फारसे बदल झाल्याचे चित्र जाणवत नाही परिणामी औद्योगिक क्षेत्र व त्याचा वाढता विस्तार ह्यामुळे लागवडी योग्य जमिनींचे क्षेत्र कमी होऊन गणिती पद्धतीने वाढणारे उत्पादन आणि भूमिती पद्धतीने वाढणारी लोकसंख्या ह्यातील असंतुलन वाढतच जाण्याची शक्यता मात्र निर्माण होऊ शकते.

संदर्भ :

1. Second Agriculturists,relief act of 1879 Govt Central press .
2. जागतिकीकरण नवीन गुलामगिरी - ऍडमिरल विष्णू भागवत.
3. शेतकरी आत्महत्या :एक चिंतन –गोविंदराव भोसले
4. भारतीय समाज संरचना आणि समस्या - डॉ प्रदीप आगलावे
5. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था -डॉ मंगला जंगले
6. www.loksatta.com- Globalization
7. www.marathimati.net - jagtikikaran
8. prahar.in - कोलाज.

drnanasahebpatil@gmail.com

***

जागतिकीकरण संकल्पना आणि इतिहास

*शिवाजी अशोक उकरंडे,

प्रस्तावना :

१९९० च्या दशकात भारतातील समाजविज्ञानात वारंवार वापरला जाणारा शब्द म्हणजे जागतिकीकरण होय. राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, माध्यम आणि मार्केटिंगमधील लोक, टेलिव्हिजनचे कार्यकारी आणि पर्यावरणवादी यांचेकडून हा शब्द वारंवार उच्चारला जातो. दरम्यानच्या काळात हा विद्यापीठातील अध्ययनाचा विशेषत: सांस्कृतिक, माध्यम आणि संप्रेषण अध्ययन, समाजशास्त्र, आंतरराष्ट्रीय अध्ययन आणि नवउदयोन्मुख अशा जागतिक अध्ययनाचा मुख्य विषय बनलेला आहे.

देशांच्या अर्थव्यवस्था वैश्विक भांडवलदारीशी जोडण्याची ही प्रक्रिया काही अचानक घडलेली नाही. त्यामुळे या प्रक्रियेचे ऐतिहासिक संदर्भ अभ्यासणे हे जागतिकीकरणाचे आकलन विस्तृत होण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे त्यासाठी केलेला हा लेखन प्रपंच. जागतिकीकरणाचे ऐतिहासिक संदर्भ अभ्यासताना जगातील भांडवलशाहीचा प्रवास अभ्यासावा लागतो. त्या प्रवासाचे वासाहतिक साम्राज्यवाद, आधुनिकीकरण व जागतिकीकरण असे तीन टप्पे मी केले आहेत.

उद्देश:

१. जागतिकीकरण संकल्पना स्पष्ट करणे.

२. जागतिकीकरणाचे ऐतिहासिक संदर्भ अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत निबंध हा पूर्णपणे दुय्यम तथ्य सामग्रीवर आधारलेला आहे. त्यासाठी संदर्भग्रंथ, मासिके, पक्षिके, पुस्तिका यांचा आधार घेतला आहे.

जागतिकीकरण संकल्पना :

१. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था वैश्विक भांडवलदारी अर्थव्यवस्थेशी जोडली जात आहे. खुली बाजारपेठ, मुक्तस्पर्धा, व्यापार आणि बहुराष्ट्रीय कंपन्या ही तीन तत्वे जागतिकीकरण प्रक्रियेचा कणा आहेत. स्वाभाविकच अशा एकात्मिक अर्थरचनेचा परिणाम सामाजिक स्थित्यंतरात दिसून येऊ लागला आहे. (धनागरे,२००५)

२. **वाटर्स** यांनी जागतिकीकरणाच्या उदयाशी संबंधित तीन शक्यता अधोरेखित केल्या आहेत.

अ) जागतिकीकरणाचे रूप संपूर्ण इतिहासाच्या प्रगतीमध्ये दिसते.

ब) आधुनिक काळातील भांडवलशाहीचे ते फलित आहे

क) अगदी अलिकडे उत्तर औद्योगिक आणि उत्तर आधुनिकतेच्या विसंघटीत (disorganized) भांडवलाचे उत्पादित आहे. (Beynon and Dunkerley,2012:3)

३. जागतिकीकरण हे प्राय: भांडवलाचे जागतिकीकरण आहे, जागतिकीकरणाचा अजेंडा हा जागतिक-कॉर्पोरेट भांडवलाने रेटलेला अजेंडा आहे. तो सर्व प्रकारच्या भांडवलाचा अजेंडा नाही.

४. जोखीम आणि विश्वास

समाजशास्त्राच्या उदयापासूनच आधुनिकतापूर्व समाज ते आधुनिक समाज ह्या स्थित्यंतराचे अध्ययन, विश्लेषण हा समाजशास्त्राच्या आशयाचा गाभा राहिला आहे. मार्क्स, वेबर, दुर्खिम यांनी आपापल्या प्रकारे हे स्थित्यंतर समजून घेण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी नव्या संकल्पना विकसित केल्या.

आजचा काळ हा जागतिकीकरणामुळे अतिशय वेगाने होणाऱ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतराचा व तदनुषंगीक मंथनाचा आहे. आधुनिकोत्तर जागतिक समाजाचे स्वरूप कसे समजून घेता येईल? आजचा समाज कोणत्या संकल्पनाच्या आधारे समजून घ्यायचा? आजच्या समाजशास्त्रज्ञांचे उत्तर आहे जोखीम आणि विश्वास (तांबे श्रुती,२००७ : ६)

जागतिकीकरणामुळे सर्वत्र विश्वास आणि जोखमीच्या जाळयात प्रत्येकजण सामील होत आहे, ज्यामध्ये आपण सर्वांनी आपला विश्वास तज्ञांवर आणि इतर अज्ञात व्यक्तींवर ठेवलाच पाहिजे असा जागतिकीकरणाचा आग्रह आहे. तसेच आमचा विज्ञान आणि औषधांवर विश्वास आहे, तरीही कोणीही एड्स आणि सीजेडीचा (प्राण्यांचे प्रदूषित मांस खाल्ल्यामुळे माणसांना संभावणारा आजार) अंदाज लावू शकत नाही. त्याचप्रमाणे न्यूयॉर्कमधील शेअर्सच्या किमतीत वाढ आणि घसरण यासारख्या वरवर पाहता दूरच्या एखाद्या गोष्टीने, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, आपल्यापैकी प्रत्येकावर परिणाम होऊ शकतो. **बेक** (१९९२) हेच सूत्र पर्यावरणीय दृष्टीने पुढे नेतो आणि जागतिक समाज जोखीम समाजापेक्षा काही कमी नाही, असे अधोरेखित करतो. (Beynon and Dunkerley, 2012:4)

जागतिक भांडवलशाही : वॉलरस्टाईन यांच्या मते, भांडवलशाही ही एकच अशी अर्थव्यवस्था आहे की, जी जागतिक-वैश्विक रूपातच जन्मास येते. त्यामुळे राष्ट्र-राज्यांची बिरुदे तिला न शोभणारी असतात. या जागतिक भांडवलदारी व्यवस्थेच्या रचनेत ते प्रथम गाभा आणि परिघ प्रदेशांमध्ये भेद करतात.

भांडवलाचा प्रवास : खरेतर अर्थव्यवस्थांच्या जागतिकीकरणाची प्रक्रिया गेली काही वर्षे नव्हे तर काही शतके जुनी आहे.

साम्राज्यवाद

१७ व्या शतकापासून ब्रिटन, फ्रान्स, स्पेन या साम्राज्यवादी देशांनी आपापल्या वसाहती आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेन देशात स्थापन केल्या, वसाहतीतील कच्चा माल आपल्या देशातील उद्योगांना मिळवून देणे आणि आपल्या देशातील पक्क्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे हा राजकीय सत्ता राबविण्याचा आर्थिक अजेंडा होता.

आपल्या देशावरची काही शतकांची ब्रिटिश राजवट किंवा जगात इतर भागात झालेल्या फ्रेंच, स्पॅनिश राजवटी जागतिकीकरणाच्याच आधीच्या आवृत्त्या म्हणता येतील. प्रथम एखाद्या व्यापारी कंपनीला पुढे करून, नंतर प्रत्यक्ष राजकीय सत्ता स्थापन करण्याचे साम्राज्यवादाचे हे प्रतिमान (Model) होते. (चांदोरकर,२०१९:८)

साम्राज्यवादातून महायुद्धे

साम्राज्यवाद्यांमधील सत्तासंघर्षातून दोन महायुद्धे पेटली. दोन महायुद्धादरम्यान आलेल्या महामंदीचा फटका साम्राज्यवादी देशांना बसला. त्यांनी अनेक वसाहती सोडून दिल्या. अमेरिका सोडून युरोपीयन देश व जपानच्या कंबरडे मोडलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये भांडवल निर्मिती होणे शक्य नव्हते. अमेरिकेने मोठ्या प्रमाणावर भांडवल पुरवठा केला. 'मार्शल प्लान' सारख्या महाकाय योजना, जागतिक बँक, युरोपीयन बँक, आशियाई बँक अशा विविध वित्तीय संस्थांची निर्मिती करून हे कार्य तडीस नेले. (चांदोरकर,२०१९:८)

आधुनिकीकरण विकास प्रक्रिया

आधुनिकीकरण या संकल्पनेची आणि सिद्धांताची चलती सुरू झाली ती प्रामुख्याने द्वितीय महायुद्धांनंतर. राष्ट्रे वसाहतवादाच्या दास्यत्वातून मुक्त होऊन स्वतःच्या अस्मितेचा शोध घेऊ लागल्यानंतर. शेकडो वर्षाच्या शोषणानंतर उद्ध्वस्त झालेल्या त्यांच्या अर्थव्यवस्थेला वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या आशा–आकांक्षाची पूर्ती करणे कठीण होते. अशा वेळी युरोपीकरण किंवा पाश्चात्यीकरण ह्या संकल्पनांना काहीसे इतिहासजमा मानले गेले. कारण नव-स्वतंत्र राष्ट्राच्या अस्मितेवर त्यामुळे आघात होण्याची शक्यता होती. आपण युरोप अथवा प्रगत पाश्चात्य देशांचे अनुकरण करतो आहोत, अशी कबुली दिल्यास नववसाहतवादाचा विकसनशील देशांमध्ये मागील दाराने पुन:प्रवेश झाला, असे वाटले असते. म्हणून युरोपीकरण आणि पाश्चात्यीकरणाऐवजी आधुनिकीकरण ही संकल्पना वापरात झपाट्याने आली.

शहरीकरण होणे, साक्षरतेचा प्रसार होणे, प्रसारमाध्यमांचा प्रभाव, उत्पादनाच्या नव्या तंत्रपद्धतीचा वापर होणे, त्यासाठी लागणारे विशेष प्रशिक्षण लोकांना मिळणे, त्यातून अधिक आर्थिक संधी उपलब्ध होणे, परिमाणत: देशातील दरमाणशी उत्पन्नात वाढ होणे, त्याद्वारे राहणीमानात सुधारणा होणे व परत आर्थिक क्षेत्रात लोकांचा वाढता सहभाग लाभणे असे हे एकंदर आधुनिकीकरण प्रक्रियेचे इष्टचक्र मानले गेले. जे घडायला युरोपात शतके लागली ते

नवस्वतंत्र राष्ट्रांना काही दशकात अनुभवणे शक्य आहे. मात्र त्यासाठी त्यांनी अमेरिका, युरोपमधील प्रगत राष्ट्रांच्या आधुनिकीकरणाचा म्हणजे त्याच्याशी संबंधित संस्था आणि तंत्रज्ञान, आचार-विचार, मूल्यव्यवस्था यांचे डोळे झाकून अनुकरण केले पाहिजे, हे त्या संकल्पनेत अभिप्रेत होते. तसे केल्याने नवोदित राष्ट्रांचा वेळ वाचेल आणि त्यासाठी साधनसामग्री व संपत्तीचा काटेकोरपणे उपयोग करता येईल असे त्या अनुकरणाचे समर्थन दिले जात असे.

अशा स्वरूपाचे आधुनिकीकरण प्रारूप हातघाईला येऊन स्वीकारल्याने अनेक नवस्वतंत्र राष्ट्रांचा कालांतराने भ्रमनिरास झाला. अनुकरणाने नवोदित राष्ट्रे स्वावलंबी तर बनली नाहीतच पण नवे तंत्रज्ञान, भांडवली वस्तूंची आयात, त्यासाठी आंतरराष्ट्रीय मुद्राकोश, विश्व बँक यांची कर्जे घेणे इ. दृष्टचक्रात विकसनशील राष्ट्रे अधिकच गुंतत गेली आणि विकसित देशांवर कायमची परावलंबी बनली (धनागरे,२००५:५६). तिसऱ्या जगातील मागासलेपणाची चिकित्सा परावलंबन सिद्धांतकारांनी केली आहे.

नव-उदारवाद

१९५० ते ८० या तीन दशकांत युरोप आणि जपानच्या अर्थव्यवस्थांनी पुन्हा एकदा भरारी घेतली. त्यांना मदत करणाऱ्या अमेरिकेनेदेखील आपली आर्थिक उन्नती साधली. पुनर्जीवित झालेल्या युरोपीयन, जपान आणि अमेरिकेच्या अर्थव्यवस्थांमधून तयार झालेले अतिरिक्त भांडवल ८० च्या दशकात परत एकदा जग जिकण्याच्या मोहिमेवर निघाले होते. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या आर्थिक युगाला ही पार्श्वभूमी होती (चांदोरकर,२०१९:८). या प्रक्रियांचा तात्विक आधार होती ॲडम स्मिथ यांनी मांडलेली निर्हस्तक्षेपाची उदारवादाची नीति आणि तिचा नव्याने उदय झाल्याने तिला नवउदारवाद म्हणून संबोधले गेले.

रशियाची पिछेहाट आणि शीतयुद्ध समाप्ती

१९९१ च्या अखेरीस सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्याने जागतिक राजकारणातील संदर्भच बदलून गेले. याने शीतयुद्ध संपुष्टात येवून अमेरिका ही जगातील एकमेव महासत्ता ठरली. तसेच भांडवलशाहीला पर्यायी असणारे समाजवादाचे एक भव्य मॉडेल असणाऱ्या रशियाच्या कोसळण्यादेखील खूप खोल परिणाम जगावर विशेषत: आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांवर झाला. (युवराज बी,२०१२:१५)

सारांश

जागतिकीकरण ही अर्थव्यवस्थेच्या बदलाबरोबरच सामाजिक स्थित्यंतरची प्रक्रिया आहे. केवळ १९९० च्या अगोदर आणि नंतर असे जागतिकीकरणकरणाचे आकलन मांडणे घाईचे ठरेल. वरवर पाहता ते नवे वाटत असले तरी त्याचा ऐतिहासिक प्रवास पाहता अशा अनेक लाटा येऊन गेल्याचे संसूचन अभ्यासक करतात. औद्योगिक क्रांतीनंतरचा जागतिक भांडवलशाहीच्या प्रवासाचा साम्राज्यवादी, आधुनिक आणि जागतिकीकरण असा पट रेखाटला तर जागतिकीकरणाचे आकलन विस्तृत होईल असे वाटते.

संदर्भ:

१. Beynon John and Dunkerly David(ed. 2012) Globalization:The reader,Rawat Publication, New Delhi.

२. धनागरे. द, ना (२००५) संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव, प्रतिमा प्रकाशन,पुणे.

३. चांदोरकर संजीव (२०१९) जग 'अगतिकी 'करण, हरिती पब्लिकेशन, पुणे.

४. युवराज बी (२०१२) उदारीकरणाच्या पर्वाचे राजकीय अर्थकारण,परिवर्तनाचा वाटसरु, अंक २४.

५. तांबे श्रुती (२००७) समाजशास्त्रातील विचारविश्वे: जागतिक आणि भारतीय, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी. ईमेल : shivaji282@gmail.com

***

कोवीड १९ काळात भारतात झालेले कामगार स्थलांतर – एक समाजशास्त्रीय अभ्यास

*प्रा.सुनिल बुद्धे

ढोबळमानाने सदर शोध निबंधाचे शीर्षक जरी कोविड–काळात झालेले कामगारांचे स्थलांतर हे असले तरी मुळात कामगार हा शब्द या ठिकाणी श्रमजीवीसाठी वापरण्यात आला आहे. याची जाणीवपूर्वक नोंद घेण्यात यावी. जागतिक पातळीवर विचार करता कामगारांचे आजवर कधीही झाले नव्हते इतके स्थलांतर या कालखंडादरम्यान झाले. केवळ स्थलांतर म्हणून नव्हे तर त्याचा एकूणच कामगार वर्गावर झालेला दूरगामी परिणाम अभ्यासणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

दिनांक २३ मार्च २०२० रोजी भारताचे महामहीम प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी संध्याकाळी वृत्तवाहिन्यांवर येऊन भारतामध्ये राष्ट्रीय पातळीवरचा लॉकडाऊन जाहीर केला. अर्थात (लॉक डाऊन ही संकल्पना भारतीयांसाठी नवीन असली तरी त्याबाबत थोडेफार वाचन किंवा समाज माध्यमांच्या वर चर्चा तत्पूर्वी झाली होती. त्यामुळे वातावरण निर्मिती होतीच. हा (लॉक डाऊन जवळपास पंधरा दिवसांचा होता. त्यानंतर सर्व काही सुरळीत होईल आणि पुन्हा एकदा सर्व व्यवहार सुरू होतील, अशी आशा फक्त कामगार वर्गालाच नव्हे तर तमाम भारतीयांना वाटत होती. मात्र २३ तारखेनंतर पंधरा दिवसांचा कालावधी उलटून गेला त्या दिवशी पुन्हा एकदा प्रधानमंत्री यांनी भारतातल्या सर्व माध्यमांवर लाईव्ह येत पुन्हा हा लॉक डाऊन वाढवण्याचा निर्णय घेतला असल्याचे दक्षतेच्या उपाययोजना म्हणून सांगितले.

आता खरी भारतीयांची कसोटी होती. थोडीफार पुंजी जिच्यावर येणाऱ्या कालखंडातील उपजीविकेचा प्रश्न अवलंबून होता ती संपलेली असल्यामुळे आपल्या मूळ गावाकडे जाण्यासाठी आता कामगार वर्गाने स्थलांतर करण्यास सुरुवात केली. स्थलांतरणाचा पहिला टप्पा यादरम्यान कामगारांसह सर्वच लोक हे गोंधळलेल्या अवस्थेत असल्याचे आपल्याला पाहायला मिळाले.

खरंतर ३० जानेवारी २०२० रोजी भारतातली कोरोनाची पहिली केस उघडकीस आली. त्यानंतर मार्चमध्ये २१ दिवसांचा लॉकडाऊन करण्यात आला. शहरांतर्गत/गावांतर्गत/राज्यांतर्गत सीमा तातडीने प्रशासनाच्या मदतीने सील करण्यात आले. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तसेच वाहतुकीच्या सर्व साधनांवर बंदी घालण्यात आली. अत्यावश्यक सेवांच्या बाबतीत सुद्धा कार्यपद्धतीवर बंधने घालण्यात आली, अशाप्रकारे हा पहिला टप्पा म्हणजे एक अतिशय भयानक असे स्वप्न कामगारांना वाटावे अशा अवलबून आहे अशा असे पद्धतीचे होते.

या सर्वापासून संरक्षण होण्यासाठी आणि उपासमार टाळण्यासाठी लाखो लोकांचे आपल्या मूळ घराकडे जाण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. समाज माध्यमांच्या आधारे प्रयत्न करण्यात आलेल्या ३००० व्यक्तींच्या सर्व्हे मध्ये जनसाह्य २०२० मध्ये केलेल्या सर्व्हेच्या अनुषंगाने ४२ टक्के लोकांना अन्न पाण्याविना वणवण भटकंती करावी लागली होती.

तब्बल ९४ लोकांच्याकडे कामगार असल्याबद्दलचे ओळखपत्र कोणत्याही प्रकारचे उपलब्ध नव्हते, त्यामुळे त्यांना प्रशासकीय मदत मिळणे अशक्य झाले होते. अनेक लोकांची अवस्था तर अशी होती की, मूळ ठिकाणापासून निघून आपल्या ग्रामीण भागातील गावाकडे जात असताना वाहतूक व्यवस्था अचानक बंद झाल्याने, त्यांना आहे त्या ठिकाणी बस स्थानके आणि रेल्वे स्टेशनचा आधार घ्यावा लागला, मात्र त्या ठिकाणी सुद्धा त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आणि अनेक लोकांचे मृत्यू झाले.

स्थलांतरणाची भयावहता : वरील सर्व मुद्यांच्या अनुषंगाने केलेल्या मांडणी नुसार स्थलांतरण हे किती विचित्र प्रकारचे होते.हे पाहिल्यानंतर ते स्थलांतर अतिशय विचित्र अशा टप्प्यावर लोकांसाठी जीवघेणी ठरले हे या निमित्ताने अभ्यासणे हा या शोधनिबंधाचा विषय आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये तब्बल ४५.६ कोटी स्थलांतरित कर्मचारी मजुरांची संख्या आहे. जी संख्या भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ३८ टक्के आहे. २०११ ते २०२१ या दरम्यान भारताची लोकसंख्या १८ टक्के वाढली असे गृहीत धरले तरी वरील संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे असेही म्हणता येईल. वरील आकडेवारी ही केवळ भारतातील अंतर्गत स्थलांतरणाची असून यामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरून झालेले स्थलांतरण गृहीत धरण्यात आलेले नाही, विचारात घेतलेले नाही.

स्थलांतरणाच्या दरम्यान जनसेवकांची मदत : स्थलांतरणाचा हा प्रश्न जरी कोरोनाच्या काळामध्ये भयावह असला तरी असेही काही जनसेवक या काळात लोकांना दिसून आले, की ज्यांनी अनेक लोकांनीची अन्नधान्याची राहण्याची व्यवस्था केली. २०११ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र आणि दिल्ली या ठिकाणी उपजीविकेच्या कारणासाठी संसाधने शोधण्यासाठी बिहार आणि उत्तर

प्रदेश या ठिकाणाच्या लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झालेले आपल्याला आढळून येते. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन सारख्या एका संस्थेने यावर मोठी महत्त्वाची टिप्पणी केली आहे. २०२०/२१ च्या कालखंडामध्ये भारतातील ४० कोटी मजुरांचे आणि कामगारांचे स्थलांतर झाले आहे आणि त्यांची अवस्था अतिशय विपन्न आहे. त्यातील मुख्यत्वे करून लोक हे उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, झारखंड आणि ओरिसा या प्रदेशातून आले आहेत. यापैकी बरेच लोक हे एकसारखे काम करणारे नसून पडेल त्या ठिकाणी मजूरी अथवा हमाली करण्याकडे त्यांचा कल असल्याचे निरीक्षण संस्थेने नोंदवले आहे.

स्थलांतरणाच्या दरम्यान जीवघेणा प्रवास : अचानक जाहीर झालेल्या लॉक डाऊन मुळे लोकांची मानसिकता बिघडली असल्यामुळे त्यांनी मिळेल त्या वाहनांनी आपल्या मूळ गावाकडे जाण्यासाठी स्थलांतर करायला सुरुवात केली हे करत असताना ज्यांच्याकडे आर्थिक साधने उपलब्ध नव्हती त्यांनी अगदी हजारो किलोमीटर पायी प्रवास केल्याच्या घटना सुद्धा समकालीन माध्यमांमध्ये आपल्याला पाहायला मिळतात. द वायर नावाच्या एका नियतकालिकाने यातलीच एक अतिशय हृदय द्रावक घटना बातमी म्हणून छापली होती त्या बातमीच्या नुसार एकाच घरातील १७ स्थलांतरित मजूर आपल्या पाच लहान मुलांसहित शेकडो मैल चालत प्रवास करत होते, त्या सर्व लोकांचा अथक चालण्यामुळे आणि उपासमारीमुळे चार ते पाच दिवसांमध्ये मृत्यू झाला.

अन्न संरक्षणाबाबत : मुळात कोरोनाच्या साथीमध्ये लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न उद्भवल्यामुळे स्थलांतर झाले, हे जरी गृहीत धरले असले तरी अनेक लोकांनी सामाजिक उत्तरदायित्व म्हणून अनेक ठिकाणी अशा स्तलांतरित मजुरांसाठी व इतर व्यक्तींसाठी अन्नछत्रे किंवा अन्नाची व्यवस्ता केली होती. मात्र अनेक ठिकाणी त्या अन्नछत्रांमधून किंवा अन्नपुरवठ्यांच्या घटकांमधून विषबाधा किंवा आजारपणासारखे गंभीर प्रकार सुद्धा पाहायला मिळाले आहेत.

आरोग्य विषयक बाबी : २०२० ते २०२१ दरम्यान झालेल्या कोविडच्या महाप्रकोपामुळे लाखो लोकांना स्थलांतर तर करावेच लागले. . मात्र त्यासोबतच उपासमारीचा प्रश्न भेडसावत होता. आणखी एक मोठी समस्या त्यांच्या मागे लागली होती, ती म्हणजे आरोग्यविषयक सेवा सुविधांचारिभाव. या काळात आपण पाहिले तर जवळपास सर्व रुग्णालये,खाजगी आणि सरकारी असली तरी त्यांच्यामध्ये केवळ आणि केवळ कोविड १९ च्या रुग्णांचा उपचार करण्याचा सपाटा तत्कालीन प्रशासन यंत्रणेने लावल्यामुळे इतर रुग्णांच्या प्रकृती विषयक प्रश्नांकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले आणि त्यामध्ये अनेक रुग्णांना त्याची खूप मोठी किंमत चुकवावी लागली. इतकेच काय अनेक रुग्णांना आपला जीव सुद्धा गमवावा लागला.

शासनाने केलेल्या सेवा सुविधा आणि व्यवस्था : यादरम्यान शासन प्रशासनाने काहीच केले असे मात्र म्हणता येणार नाही. स्थलांतरित होणाऱ्या लोकांच्या प्रवासाची काही अंशी व्यवस्था शासनामार्फत करण्यात आली होती,तसेच स्थलांतरितांच्या मध्ये उद्भवणाऱ्या अनेक संकटांना तोंड देण्यासाठी त्या काळात मदत केंद्र उभारण्यात आली होती. ती मदत केंद्र केवळ शासनाची होती असे नव्हे तर अनेक सेवाभावी संस्थांनी सुद्धा त्यामध्ये मोलाचा वाटा इतर उचललेला होता.

निरीक्षण: अशाप्रकारे कोवीड–१९ कालखंडात झालेल्या स्थलांतरणाचा परिणाम भारतातील दिसून येसे तब्येत ४२% इतक्या लोकसंख्येवर झालेला आहे. असे दिसून येते. आजवरच्याभारताच्या फाळणीनंतरचे इतिहासातील सर्वात मोठे स्थलांतर असे म्हणूनही या घटनेकडे पाहता येईल. सुखद लवकरच बाब म्हणजे हे झालेले स्थलांतर पुन्हा एकदा लवकरच रिव्हर्स झाले आणि या महामारीतून वाचलेल्या अनेक लोकांचे प्रश्न आता हळूहळू सुटायला लागले आहेत, हे निरीक्षण या निमित्ताने नोंदवणे महत्त्वाचे वाटते. भारताच्या काळात

संदर्भ –

१. भगत आर. बी., इंटरनॅशनल मायग्रेशन इन इंडीया, २०२०
२. इंटरनॅशनल ऑर्गनायजेशन ऑफ मायग्रेशन, अहवाल, २०२०
३. जागतीक बँक अहवाल, २३ एप्रील २०२०
४. द अटलांटीक मधील लेख, २२ एप्रील २०२०
५. टाईम्स ऑफ इंडीया, ११ जुन २०२२

*जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी.

***

स्थलांतरित उसतोड कामगारांच्या मुलांच्या समस्या:एक अध्ययन

*प्रा.संतोष विश्वनाथ यादव

सारांश :-

साखर कारखान्यांना उसतोड करून पुरविण्याकरीता हजारो कामगारांची आवश्यकता असते.यातीलबहुतांश उसतोड कामगार हे स्थलांतरित उसतोड कामगार म्हणूनच ओळखले जातात.उसतोडीचे काम हे समूहाच्या किंवा गटाच्या माध्यमातून केले जाते,या गटातही दोन दोन जणांच्या जोडीने हे काम केले जाते.त्यामुळे जे उसतोड कामगार उसतोडिकरिता स्थलांतर करतात ते सहकुटुंब स्थलांतर करतात असे निदर्शनास येते.सहकुटुंब स्थलांतर करतांना या कामगारांच्या समोर त्यांच्या मुलांचा प्रश्न मोठा गंभीर असतो.ज्यांच्या घरी इतर सदस्य अथवा मुलांना घरी ठेवण्याची काही सुविधा असते ते कामगार आपल्या मुलांना घरी ठेवतात.परंतु ज्यांच्या घरी कोणी नाही अथवा कोणतीही सोय नाही त्यांना आपल्या मुलांना उसतोडीकरिता जातांना सोबत घेऊन जावेच लागते.एक कामगार म्हणून त्यांना ज्या ज्या समस्यांना सामोरे जावे लागते त्या त्या समस्यांना त्यांच्या मुलांनाही सामोरे जावे लागते.उसाच्या फडात उघड्यावर राहणे असो वा उन,वारा,पावसात राहणे असो याचा लहान मुलांना जास्तच त्रास सहन करावा लागतो.लहान मुलांना योग्य त्या वयात योग्य तो आहार त्यांच्या शारीरिक वाढीसाठी मिळणे आवश्यक असतांना उसतोडीच्या ठिकाणी त्यांना असा पोषक आहार मिळणे मात्र शक्य नसते.याचा त्यांच्या शारीरिक आणि बौद्धिक वाढीवर विपरीत परिणाम होतांना दिसून येतो.सर्वात महत्वाचे म्हणजे उसतोड कुटुंबांच्या सोबत येणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर असतो.या मुलांना उसतोडीसाठी येतांना शाळा सोडून यावे लागते.ज्या ठिकाणी ते उसतोडीसाठी आलेले आहेत तेथे त्यांच्या पर्यायी शिक्षणाची सोय होईलच याची कोणतीही शास्वती नसते.काही वेळा या प्रक्रियेत या मुलांची शाळा कायमची सुटूनही जाते.यासारख्या अनेकानेक गंभीर स्वरूपाच्या समस्या उसतोड कामगारांच्या मुलांच्या संदर्भात असलेल्या दिसून येतात.सदर अध्ययनाच्या माध्यमातून याच उसतोड कामगारांच्या मुलांच्या समस्यांचा आणि स्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

संज्ञा :- स्थलांतर,साखर शाळा,वसतिगृह

1.प्रस्तावना :-

महाराष्ट्रात साखर उद्योगाचा झपाट्याने विकास झाल्या नंतर साखर कारखान्यांना उस तोडून पुरविणारा उसतोड कामगार वर्गही चर्चेत आला.उसतोड कामगार वर्गाच्या विविध समस्यांवर चर्चा होत राहिली आहे मात्र या समस्या सोडविण्यासाठी काही ठोस उपाययोजना झाल्याचे निदर्शनास येत नाही.उसतोड कामगारांच्या मुलांच्या संदर्भातील प्रश्नही तेव्हडेच गंभीर स्वरूपाचे असूनही त्याविषयी सुद्धा केवळ चर्चा होतांना दिसून येते.हे प्रश्न सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना मात्र केल्या जात नाहीत.उसतोड कामगार 15 ते 20 किलोमीटर पासून ते 300 – 400 किलोमीटर पर्यंतच्या अंतरावरही उसतोड करण्यासाठी स्थलांतर करून जातात.आपल्या मुळ गावापासून एव्हड्या दूर 4 ते 6 महिन्यांसाठी त्यांचे हे स्थलांतर असते.मूळ गावी आपल्या मुलांना ठेवण्याची कोणतीही सुविधा नसेल तर त्यांना आपल्या मुलांना आपल्या सोबत उसतोडीच्या ठिकाणी घेऊन जावेच लागते.तर काही उसतोड कामगार आपल्या 10 ते 16 वर्ष वय असणाऱ्या मुला-मुलींना उसतोडीच्या कामात मदत होते म्हणूनही सोबत घेऊन जातात.उसतोडीच्या ठिकाणी उसतोड कामगारांची मुले वेगवेगळया प्रकारची कामे करतांना दिसून येतात.यामध्ये पिण्याच्या व वापराच्या पाण्याची व्यवस्था करणे,वस्तीच्या जागेची स्वच्छता,स्वयंपाक यासारख्या कामासह मोठी मुले आई वडिलांना उसतोडीच्या कामातही मदत करतांना दिसून येतात.उस तोडणे,उस साळणे आणि काही वेळा उसाच्या मोळयाची वाहतूक यासारखी कामे हि मुले करतांना दिसून येतात.उसतोडीच्या ठिकाणी आल्याने 4 ते 6 महिन्यांपर्यंत उसतोड कामगारांची मुले शाळेपासून दूर असतात परिणामी उसतोड कामगारांच्या मुलांची शाळा बुडते.काही साखर कारखाण्यांवर कारखाना परिसरात उसतोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु केल्या गेल्या आहेत मात्र उसतोड कामगारांची मुले या साखर शाळेत जाने टाळतात असे निदर्शनास येते.तर काही ठिकाणी अशी कोणतीही सुविधा उपलब्ध असलेली दिसून येत नाही.त्यामुळे उसतोड कामगारांच्या मुलांचे मोठे शैक्षणिक नुकसान होतांना दिसून येते.काही वेळा असेही निदर्शनास येते कि उसतोड कामगारांच्या मुलांची शाळा बुडते,त्यातून या मुलांमध्ये शिक्षणाबद्दल

उदासीनता निर्माण होऊन त्यांची शाळा कायमचीच सुटते.या व यासारख्या अनेक समस्यांचा आढवा सदर अध्ययनाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

2. पूर्वलिखित साहित्याचा आढावा :-

वाघ त्र्यंबक आपल्या अध्ययनात असे म्हणतात कि केवळ 60% उसतोड कामगार आपल्या मुलांना शिक्षण देत असल्याचे संशोधकाला आढळून आले.याचाच अर्थ अनेक उसतोड कामगारांची मुले शिक्षण प्रक्रियेतून बाद झाली आहेत. **सुनिता चौहान**आपल्या अध्ययनात असे म्हणतात कि उसतोड कामगार घरी सोय नसल्याने आपल्या मुलांना उसतोडीच्या ठिकाणी सोबत घेवून जातात,मात्र कारखाना या मुलांची कोणतीही जबाबदारी घेतांना दिसून येत नाही.उसतोडीच्या ठिकाणी यावे लागल्या मुळे या मुलांची शाळा सुटते तर काही वेळा यातील काही मुले कायमची शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेरही फेकली जातात.**K.V. Somasundaram** आणि **Vidyadhar B. Bangale** आपल्या अध्ययनात अशी मांडणी करतात कि उसतोड कामगारांच्या 14 वर्षा पर्यंतच्या मुलांची पोषण विषयक स्थिती चिंताजनक आढळून आली.यासंदर्भात संशोधक अशी मांडणी करतात कि एकूण मुलांपैकी 11.03% मुलांना सामान्य पोषण मिळते असे दिसून आले,तर 36.03% मुलांमध्ये सौम्य कुपोषण आढळून आले.31.06 % मुलांमध्ये मध्यम कुपोषण आढळून आले,तर 20.08% मुलांमध्ये गंभीर स्वरूपाचे कुपोषण आढळून आले.**मनीषा तोकले**यांनी **मिळून साऱ्याजणी**या मासिकातील लेखात अशी मांडणी केली आहे कि जवळपास 14 लाख उसतोड कामगार वेठबिगारासारखे जीवन जगतात.या 14 लाख कामगारांसोबत साधारण 3 लाखाच्या आसपास मुलांनाही कुटुंबाबरोबर स्थलांतर करावे लागते.

3.अध्ययनाची उद्दिष्टे :-

अ.उसतोड कामगारांच्या मुलांची स्थिती जाणून घेणे.

ब.उसतोड कामगारांच्या मुलांशी संबंधित समस्या जाणून घेणे.

4.अध्ययन पद्धती :-

सदर अध्ययन "स्थलांतरित उसतोड कामगारांच्या मुलांच्या समस्या:एक अध्ययन' या अध्ययनाकरिता प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा उपयोग करण्यात आला

5. उसतोड कामगारांच्या मुलांची स्थिती व समस्या :-

उसतोड कामगारांचे कामच अश्या प्रकारचे आहे कि त्यांच्या कामाचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम त्यांच्या संपूर्ण कुटुंबावर आणि विशेषतः त्यांच्या मुलांवर होतांना दिसून येतो.मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना वयानुसार योग्य शिक्षणाच्या आणि आरोग्याच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत.त्यांना शरीरिक आणि बौद्धिक वाढीसाठी योग्य आणि पुरेश्या प्रमाणात सकस आहार मिळाला पाहिजे.सुध्रूढ अश्या सामाजिक वातावरणात त्यांचे सामाजीकरण व्हायला पाहिजे.याशिवाय मुलांची शारीरिक आणि बौद्धिक वाढ व्यवस्थित होणार नाही.या सगळ्या सुविधा मुलांना मिळाव्यात म्हणून कौटुंबिक आणि प्रशासकीय दोन्ही पातळीवरून प्रयत्न होत असतात.कौटुंबिक पातळीवरील जबाबदारी व्यतिरिक्त प्रशासकीय पातळीवरून आंगणवाडीच्या माध्यमातून सहा वर्षाच्या आतील मुलांना सकस आहार,आरोग्य सुविधा आणि प्राथमिक पातळीवरील शिक्षण तसेच वेळोवेळी योग्य मार्गदर्शन या सुविधा पुरविल्या जातात.शिवाय 6 ते 14 वर्षतील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण उपलब्ध करून दिले जाते.शिवाय जी मुले शालाबाह्य असतील त्यांना RTE च्या कायद्यांतर्गत शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची तरतूद केली गेली.शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून मुलांना शालेय साहित्य, शाळेचा गणवेश मोफत पुरविला जातो.मध्यांन्न भोजन योजने अंतर्गत मुलांना शाळेतच एक वेळचा सकस आहार पुरवीला जातो.

शासकीय पातळीवरून लहान मुलांच्या सर्वांगीण विकासाकरिता यासह वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना राबविल्या जातात काही सवलती दिल्या जातात मात्र या सवलती उसतोड कामगारांच्या मुलांपर्यंत पोहचतात का,ज्या योजना राबविल्या जातात त्या उसतोड कामगारांच्या मुलांपर्यंत पोहचतात का या प्रश्नांचे उत्तर मात्र नकारात्मक येते. उसतोड कामगारांना घरी सोय नसेल तर आपल्या मुलांना उसतोडीसाठी जातांना सोबत न्यावे लागते,त्यातही मुले लहान असतील तर ती आई-वडिलांशिवाय राहू शत नसल्याने त्यांना सोबत न्यावेच लागते.तर काही वेळेला उसतोडीच्या कामात मदत म्हणूनही मुलांना सोबत नेले जाते.अश्या वेळी प्रश्न निर्माण होतो तो या मुलांच्या शिक्षणाचा.

उसतोडीच्या ठिकाणी या मुलांच्या शिक्षणाची काही सोय होईल याची कोणतीही शास्वती नसते. काही ठिकाणी साखर शाळांच्या माध्यमातून मुलांची शिक्षणाची सोय करण्याचा प्रयत्न होतो मात्र योग्य शैक्षणिक वातावरणाचा अभाव आणि शिक्षणाविषयीची उदासीनता यामुळे या प्रयोगाला म्हणावे तसे यश येतांना दिसून येत नाही.शिंदे सुरेश यांनी एका अध्ययनाकरीत दि सासवड माळी साखर कारखान्यातील उसतोड कामगारांची सामाजिक आर्थिक पाहणी केली असता त्यांना असे आढळून आले कि बीड,अहमदनगर,उस्मानाबाद व सोलापूर या 4 जिल्ह्यातून उसतोड कामगार या कारखान्यासाठी उसतोडीच्या कामाला आले होते.उसतोडीच्या कामासाठी जे मजूर आले होते त्यांच्या सोबत मुलेही त्यांनी आणली होती.या मुलांपैकी 54 मुले पहिली ते दहावीच्या वर्गात शिकणारी होती मात्र आता उसतोडी साठी आल्या मुळे त्यांची शाळा सुटली होती.तसेच 164 मुले अशी आढळली कि जी पहिलीच्या वर्गात शाळेत जाण्यासाठी त्यांच्या वयानुसार पात्र होती मात्र असे असतांनाही त्यांचा शाळेत दाखला केला नव्हता.आणि आता तर उसतोडीसाठी आल्याने त्यांचा दाखला होणारही नव्हता.तर 298 मुले अशीही आढळली कि जी आई वडिलांना त्यांच्या कामात मदत करण्यासाठी आली होती,ज्यांच वय 6 ते 14 या वयोगटातील असूनही त्यांनी कधी शाळेच तोंडही पाहिलं नव्हत.

महाराष्ट्रात सर्वाधिक साखर कारखाने पश्चिम महाराष्ट्र या विभागात असलेले दिसून येतात.मात्र या कारखान्यांना उस तोडून पुरविण्यासाठी लागणारे उसतोड कामगार या भागातून नाही तर मराठवाडा या भागातून स्थलांतरित होऊन येतांना दिसतात.मराठवाड्याच्या दुष्काळी भागातून त्यातही बीड या जिल्ह्यातून सर्वाधिक उसतोड कामगार स्थलांतरित होतात.पश्चिम महाराष्ट्रात स्थलांतरित होणाऱ्या या उसतोड कामगारांच्या सोबत जवळपास 2 लाख मुलेही स्थलांतरित होतात.हि स्थलांतरित मुले आई-वडिलांना मदत करण्यासह वस्तीची जागा सांभाळणे,स्वच्छता ठेवणे तर काही वेळा उसतोडीचेही काम करतांना दिसून येतात.international Labour Organaization या संस्थेने केलेल्या अध्ययनाच्या माध्यमातून “Child Labour in the PrimaryProduction of Sugarcane”,हा अहवाल प्रकाशित केला.या अहवालात अशी मांडणी आली आहे कि पूर्ण कुटुंबच उसतोडीच्या कामात असल्याने या मुलांनाही याच कामात गोवले जाते.6 ते 10 वर्षाची मुले वस्तीची जागा राखणे,साफ सफाई आणि काही वेळा पिण्याचे पाणी आणणे यासारखी कामे करतात.तर याच वयातील मुली साफ सफाई,पिण्याच्या पाण्याची सोय लावणे आणि आपल्या लहान भावंडांना सांभाळणे यासारखी कामे करतात.11 ते 14 या वयोगटातील मुले तोडलेल्या उसाच्या मोळया बांधण्याचे काम करतात,तर काही वेळा उस तोडन्याचेही काम करतात.तसेच उसाच्या मोळया वाहून वाहनात भरण्याचे आणि कारखान्यापर्यंत पोहचवण्याचेही काम करतात.तर याच वयातील मुलींना वस्तीच्या जागेची स्वच्छता,आपल्या लहान भावंडांचा सांभाळ या बरोबरच सर्वांसाठी स्वयंपाक सुद्धा करावा लागतो.तर 15 ते 18 या वयोगटातील मुले उस तोडने ,त्याला साळून मोळया बांधने त्या मोळया वाहनात भरूनकारखान्यापर्यंत पोहचवने यासारखी सर्वच कामे करतात.तर याच वयातील मुली काही वेळा उस तोडण्याचे कामही करतात.मोळया बांधणे आणि वाहन्याचेही काम करतात.शिवाय स्वयंपाक करणे आणि उस फडातील सर्व कामगारांना पिण्याकरिता पाणी पुरवणे हि कामे सुद्धा करताना दिसून येतात.

एकूणच उसतोड कामगारांना उसतोडीच्या कामाकरिता स्थलांतर करण्याशिवाय पर्याय नसतो.आणि ज्या कामगारांची घरी सोय नाही अथवा ज्यांची मुले लहान आहेत त्यांना आपल्या मुलांना उसतोडीसाठी जातांना सोबत घेवून जाण्याशियाव पर्याय नसतो.परंतु या स्थलांतराचा उसतोड कामगारांच्या मुलांच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचा परीणाम होतांना दिसून येतो.उसतोडीदरम्याण तर या मुलांना वेगवेगळे त्रास सहन करावेच लागतात जसे कि वस्तीची जागा सांभाळणे,पिण्याच्या पाण्याची दूरवरून सोय करणे व काही वेळा उसतोड करणे,उस वाहतूक करणे.परंतु या त्रासाबरोबरच या मुलांच्या शिक्षणात खंड पडणे हि खूप दूरगामी परिणाम करणारी समस्या आहे.उसतोडी दरम्यान 4 ते 6 महिने या मुलांची शाळा बुडते हे त्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतेच,पण त्याच बरोबर या प्रक्रियेत हळू हळू यातील काही मुलांचा शिक्षणातील उत्साह कमी होत जातो.शिक्षनाबाद्दलाच्या या उदासीनतेतून काही मुलांची शाळा कायमची बंद होऊन ते शाळाबाह्य होतात.आणि एकदा का शाळाबाह्य झाले कि या मुलांना कायम स्वरूपी उसतोडीच्या कामात जुंपले जाते.यातून पुढच्या पिढीचे उसतोड कामगार निर्मितीची प्रक्रिया सुरु राहते.परिणामी दोन-दोन तीन-तीन पिढ्या एकाच कुटुंबातून उसतोडीसाठी स्थलांतर होतांना दिसून येते.हे एक प्रकारचे दुष्ठ्चक्र सुरूच राहिलेले दुसून येते.जे कि उसतोड कामगारांच्या पुढच्या पिढ्यांसाठी अत्यंत घातक आहे असे म्हणता येईल.

6. निष्कर्ष :-

उसतोड कामगारांच्या मुलांना काही वेळा त्यांच्या इच्छेच्या विरुद्ध किंवा काही वेळा ते लहान असल्याने अजाणतेपणी त्यांच्या आई-वडिलांच्या सोबत उसतोडीसाठी स्थलांतरित होऊन स्थलांतरीताचे जिने जगावे लागते.स्थलांतरित म्हणून जगतांना पहिला आघात या मुलांच्या आरोग्य आणि शिक्षणावर होतांना दिसून येतो.ज्या वयात या मुलांना सकस आहार,योग्य सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण मिळायला हवे त्या वयात त्यांना उसतोडीच्या ठिकाणी ना सकस आहार मिळू शकतो नाही योग्य सामाजिक सांस्कृतिक वातावरण.याचा विपरीत परिणाम उसतोड कामगारांच्या मुलांच्या शारीरिक वाढीवर तर होतोच शिवाय या मुलांच्या बौद्धिक आणि मानसिक विकासावरही विपरीत स्वरूपाचा परिणाम होतांना दिसून येतो.सर्वत महत्वाचे म्हणजे उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न.उसतोडीच्या ठिकाणी या मुलांची शाळा तर बुडतेच पण सोबतच दरवर्षी यातील काही मुले शक्षणाच्या प्रवाहातूनच कायमची बाहेर फेकली जातात.आणि कोणत्याही पर्यायाच्या आभावी या मुलांनाही रोजगारासाठी पुढे चालून उसतोडीसाठी स्थलांतर करावे लागते व नकळत ते सुद्धा उसतोड कामगारच होतात.

7. उपाययोजना :-

सर्वात प्रथम शासन आणि कारखाना प्रशासन या दोन्ही घटकांनी उसतोड कामगारांच्या मुलांच्या संदर्भातील आपली धोरणे बदलने गरजेचे आहे.ज्या गावातून उसतोड कामगार स्थलांतर करतात त्याच गावात उसतोड कामगारांच्या मुलांच्यासाठी शासनाच्या माध्यमातून वसतिगृह सुरु करावी जेणे करून या मुलांच्या राहण्याचा,सुरक्षिततेचा आणि जेवणाचा प्रश्न अश्या वसतिगृहाच्या माध्यमातून सोडवता येईल.शिवाय ज्या कामगारांना आपल्या मुलांना घरी अथवा गावी ठेवणे शक्य नाही अश्या उसतोड कामगारांच्या मुलांची कारखाना परिसरात योग्य ती सोय शासन आणि कारखाना प्रशासनाच्या माध्यमातून केली जावी.ज्यामध्ये सर्व प्रथम या मुलांना साखर शाळांच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण दिले जावे.त्यांना पुरेसा आणि सकस आहार दिला जावा जेणे करून त्यांची बौद्धिक आणि शारीरिक वाढ योग्य प्रकारे होऊ शकेल.याशिवाय शासनाच्या माध्यमातून उसतोड कामगारांच्या मुलांसाठी योग्य त्या शैक्षणिक योजना व सवलती दिल्या जाव्यात.

संदर्भ :-

1. **वाघ त्र्यंबक.,** "उसतोड कामगारांचे सामाजिक आर्थिक अध्ययन 1986-87,संदर्भ –गिरणा सहकारी साखर कारखाना ली. भाऊसाहेब नगर, दाभाडी, ता.मालेगाव जी. नाशिक" एम.फिल,प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ, पुणे, 1990. Page no.221-222.
2. **सुनिता चौहान.,** "उतोडणी मजुरांच्या समस्या,संदर्भ- विघ्नहर सहकारी साखर कारखाना ता.जुन्नर जी.पुणे" एम.फिल,प्रबंध,श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ,मुंबई 1994. Page no. 246.
3. **Machindranath Chudhari** आणि **Ruchi Jaggi, Research Gate** (Rupkatha Journal on Interdisciplinary Studies in Humanities), "Documenting Migrant Lives of Sugarcane Harvesting Labourers in Maharashtra – Auto ethnographic Reflection", Vol – 12 , issn ISSN 0975-2935, October 2020, Page no.1 to 6.
4. **मनीषा तोकले.,**."मिळून साऱ्याजनी','उसतोड महिलांच्या समस्या',सप्टेंबर 2018. Page no.48 to 50.
5. **महाराष्ट्र शासन** "बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम -2009",प्राधिकरणाची कर्तव्य पुस्तिका. पान क्र.56.
6. शिंदे सुरेश "कारखान्यावर साखर शाळा" गोडवा, सप्टेंबर 1987,पान क्र.24 ते 25.
7. **International Labour Organaization** "Child Labour in the PrimaryProduction of Sugarcane",May 2017 Page no. 18-20.

*विभागप्रमुख – समाजशास्त्र विभाग, सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव, जी.वर्धा

Email – svyadav10384@gmail.com

***

शेतकरी आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन

*डॉ. बळीराम परशराम अवचार,

मैंने (किसान) मौसम से ज्यादा, हुकूमत की मार को सहा है।
मैं (किसान) बाढ़ में कम, आंसुओं में ज्यादा बहा है।
मैं उगाता हूं कपास, तो दुनिया कपड़े पहनती हैं।
आखिर मेरी ही लाश क्यों, एक कफन के लिए तरसती है।
—(अज्ञात)

प्रस्तावना:

भारत हा कृषिप्रधान देश आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. स्वातंत्र्यानंतर नियोजनाच्या माध्यमातून देशाचा जलद गतीने विकास साधण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती झाली. परंतु या औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीनंतरही देशातील वाढत्या लोकसंख्येला पुरेसा रोजगार उपलब्ध करून देण्यात शासकीय यंत्रणा अपयशी ठरली. त्यामुळे आपल्या देशातील शेती व्यवसायाचे महत्त्व व शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण कमी झालेले नाही. उलट नवनवीन तंत्रज्ञानाच्या अतिरिक्त वापरामुळे औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते. विविध पंचवार्षिक योजनांद्वारे धोरण आखून त्यानुसार अंमलबजावणी करणे, शेती विषयक समस्यांचे निवारण करणे हे शासनाच्या विविध कार्यांपैकी एक महत्त्वाचे कार्य आहे.

जगाचा पोशिंदा शेतकरी आजही मात्र अनेक समस्यांचा सामना करीत आहे. भारतीय शेतकऱ्यांच्या शेतीची समस्या चिंता व चिंतनाची बाब आहे. शेतकरी ही एक अशी व्यक्ती आहे जी आपल्या कष्टाने मेहनतीने आपल्या शेतात राबराब राबते. वेगवेगळ्या हंगामामध्ये वेगवेगळी पिके घेऊन त्यातून उत्पादन मिळवते आणि बाजारपेठेत नेऊन व्यापाऱ्याला किंवा ग्राहकाला मातीमोल भावाने विकते. अशी व्यक्ती म्हणजे शेतकरी. शेतकऱ्यांची या व्यापारी वर्गाकडून फसवणूक होते. त्यामुळे शेतकरी आज अनेक समस्यांना तोंड देत आहे.

शेतीच्या उत्पन्नावर शेतकरी कुटुंबाच्या गरजा पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना बँकेचे किंवा खाजगी सावकाराचे कर्ज घ्यावे लागते आणि हे कर्ज फेडण्यासाठी शेती विकणे, गहाण ठेवणे, दाग दागिने गहाण ठेवणे, शेतातील उत्पन्न कमी व खर्च जास्त, दुष्काळ, वाढती महागाई, बेरोजगारी, कोरडवाहू शेती, आयात निर्यात धोरण, शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव न मिळणे, विभक्त होत चाललेली कुटुंब पद्धती, जलसिंचनाचा अभाव, शेती विषयक तंत्रज्ञानाचा अभाव, व्यवस्थापनाचे अज्ञान, विजेची अडचण, बियाणांची फसगत अशा विविध समस्यांनी आजचा शेतकरी त्रासलेला दिसून येतो. त्यामुळे शेतकरी आत्महत्या हा एकमेव पर्याय शेतकऱ्यासमोर निर्माण होतो.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती हाच असून देखील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याने शेती व शेतकऱ्यांची अवस्था वाईट झाली. तर त्याची शेती परवडणारी राहिली नाही. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असलेल्या शेतीला अवकळा आली. शेतीमालाला उत्पादन खर्चाची सांगड घालून वाजवी भाव मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी असंख्य आंदोलने केली, अन्नदाता शेतकरी कंगाल झाला, भिकेला लागला तरीही त्यांच्या समस्या सोडविल्या गेल्या नाही. परिणामत: वर्षभर शेतात राबवून रात्रंदिवस मेहनत करूनही त्यांच्या डोक्यावरचा कर्जाचा बोजा कमी झाला नाही. शेतकऱ्यांना संरक्षण देण्याकरिता स्थापन झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांची लुबाडणूक केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या कायम राहिल्या व त्यांची कर्जबाजारीपणातून सुटका झाली नाही.

अलीकडच्या काळात भारतीय शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांपैकी जास्त कुटुंबांकडे कमी जमीन आणि श्रीमंतांकडे जास्त जमीन अशी विषम वाटणी तर आहेच, याशिवाय हरितक्रांती पासून खते, रसायने यांच्या अतोनात वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होऊन जमिनी खराब होत आहेत. त्याचबरोबर खते–बियाणे यांच्या किमती खूप वाढल्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढत जाऊन शेती घाट्यत चालली आहे. त्यामुळे देखील शेतकरी कर्जबाजारी होत आहे.

जागतिकीकरणाच्या काळात जागतिक वापर संघटनेने शेती क्षेत्रावर प्रभाव पडला आहे. जागतिक व्यापार संघटनेचा शेतीशी संबंधित करार विचारात घेतला तर बाजार प्रवेश, देशीय अर्थसहाय्य आणि निर्यात अनुदाने या तीन मुख्य बाबी त्यामध्ये आहेत. या तिन्ही मुख्य बाबींमुळे विकसनशील देशाचा फायदा होऊ शकेल अशी चित्र रंगवल्या गेले, पण प्रत्यक्षात

मात्र तसं घडले नाही. विकसित देशांनी स्वत:ची अर्थव्यवस्था खुली केली असा आव आणला तरी प्रत्यक्षात भारतासारख्या देशातून आयात होणार नाही, याची काळजी घेतली. कृषी मालासाठी त्यांचे आयात शुल्क प्रचंड होते. ते कमी जरी केले तरी भारतासारख्या विकसनशील देशाच्या तुलनेत ते खूपच जास्त होते. त्यामुळे जागतिक पातळीवर शेतमालाच्या किमतीत घट व अस्तैर्य निर्माण होऊन त्याचा फटका भारतीय शेतकऱ्यांना बसला. घटत्या किमती आणि शेतकरी आत्महत्या यांचा जवळचा संबंध असल्याचे जागतिक व्यापार संघटनेला मान्य करावे लागले.

आज शेतकरी आत्महत्या ही समस्या केवळ भारताची नसून जगाची समस्या बनली आहे. शेतकरी आत्महत्या का करतो? त्याची मूळ कारणे काय आहेत? व त्यावर काय उपाय करणे गरजेचे आहे? याचे सविस्तर अध्ययन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे.

अध्ययनाची उद्दिष्टे:

कोणत्याही विषयाचे सविस्तर अध्ययन करणे शक्य व्हावे, यासाठी त्या अध्ययन विषयाशी संबंधित काही उद्दिष्ट ठरविणे आवश्यक ठरते. प्रस्तुत अध्ययनाचा विषय शेतकरी आत्महत्यांची कारणे शोधून त्यावर योग्य त्या उपाययोजना करणे हा असल्याने या अध्ययन विषयाची काही प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. शेतकरी आत्महत्येची वास्तविक स्थिती जाणून घेणे.
३. शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी जबाबदार असलेल्या विविध कारणांचा शोध घेणे.
४. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

अध्ययन पद्धती:

कोणत्याही विषयाचे सविस्तर ज्ञान प्राप्त करावयाचे असेल तर त्यासाठी योग्य त्या वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करणे संयुक्त ठरते. संशोधन हा ज्ञानाचा विभाज्य घटक आहे. म्हणून प्रस्तुत विषयाच्या संदर्भात वस्तुनिष्ठ संशोधन करता यावे, यासाठी प्रस्तुत संशोधनांमध्ये द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. विविध शासकीय व अशासकीय स्तरावर प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, अहवाल, संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख, आकडेवारी, अहवाल तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांची भेट घेऊन केलेली चर्चा व त्यांचे निरीक्षण करून प्रस्तुत अध्ययन करण्यात आलेले आहे.

आत्महत्येची संकल्पना:

प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ इमाईल दुरखिम यांनीश्द सुसाईडश या ग्रंथामध्ये आत्महत्या ही एक सामाजिक तथ्य असल्याची विवेचन केलेले आहे. आत्महत्या ही एक विनाशाची प्रक्रिया आहे ही गोष्ट दुरखीमला मान्य नाही. त्याने आपल्या अध्ययनातून असा निष्कर्ष काढला की, आत्महत्येकरीता मानसिक, जैविक, प्रजातीय, भौगोलिक, जलवायु ही कारणे जबाबदार नसून आत्महत्या ही सामाजिक एकीकरणाच्या अभावाचा परिणाम आहे.

थोडक्यात, श्एखाद्या व्यक्तीकडून जाणीवपूर्वक घडणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक कृतीची परिमिती जेव्हा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जर त्याच्या मृत्यूमध्ये होत असेल तर असा मृत्यू म्हणजे आत्महत्या होय.श

शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती:

भारत हा कृषिप्रधान देश आहे असे आपण गर्वाने म्हणतो. परंतु या कृषिप्रधान देशांमध्ये जेव्हा जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जाणारा शेतकरी हाच हवालदिल होतो, तेव्हा मात्र शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा विचार करणे अत्यंत आवश्यक ठरते. शेतकरी हा एकमेव असा उद्योजक आहे, ज्याला आपल्या शेतीमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार नाही. जेव्हा एखादा कारखानदार किंवा उद्योजक त्याच्या कारखान्यात तयार झालेल्या मालावर त्याला हवी ती किंमत टाकू शकतो, त्याच वेळेस दुसरीकडे शेतकऱ्याला मात्र त्याच्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार नसणे ही शोकांतिका म्हणावी लागेल.

मुळात याच कारणामुळे जेव्हा शेतकरी आपला माल बाजारपेठेत घेऊन जातो, तेव्हा त्याच्या मालाची किंमत ठरवणारे दलाल त्याची लूट करत असतात. शेतकरी हा जेवढा निसर्गाने लुटला जात नाही, त्यापेक्षा जास्त व्यापारी, दलाल यांच्याकडून लुटला जातो आणि त्यामुळे शेतकऱ्याला अतिशय हलकीच्या परिस्थितीत आपले जीवन जगावे लागते. यावरून असे लक्षात

येते की, शेतकऱ्याला आपण जगाचा पोशिंदा म्हणत असलो तरी शेतकरी मात्र स्वत: अतिशय सामान्य अशा सामाजिक व आर्थिक स्थितीत जीवन जगत असतो. परिणामी शेतकऱ्याची सामाजिक व आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली असल्याचे दिसून येते.

शेतकरी आत्महत्येची आकडेवारी:

वर्तमान काळामध्ये झालेल्या आत्महत्येची आकडेवारी बघितली तर असे दिसते की, महाराष्ट्र कर्नाटक, आंध्र प्रदेश व केरळ या चार राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या सर्वाधिक होती. १९९७ ते २००२ या कालखंडात या चार प्रांतात एकूण ८९३६२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. विशेष म्हणजे या चार प्रांतातील एकूण आत्महत्या पैकी २८९११ म्हणजे एकूण आत्महत्यांपैकी ३२.३५ टक्के आत्महत्या महाराष्ट्रात होत्या. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी डिसेंबर ह्यज्ज्ह्व मध्ये व जुलै २००६ मध्ये पंतप्रधानांनी विदर्भातील सहा जिल्ह्यांसाठी जे पॅकेज जाहीर केले होते. त्यानंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्येचेसत्र चालूच राहिले ही दुर्दैवी शोकांतिका आहे.

२००१ पासून शेतकरी आत्महत्यांची नोंद घेण्यास सुरुवात झाली. जानेवारी २००१ आजचा गायक महाराष्ट्रात जवळपास १८३४७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यामध्ये अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांचा समावेश आहे.

शेतकरी आत्महत्यांची कारणे:

शेतकरी आत्महत्या ही एक ज्वलंत समस्या आहे. घरातील प्रमुख कर्ता पुरुष जेव्हा आत्महत्या करतो, तेव्हा त्या कुटुंबातील त्याचे आई, वडील, पत्नी, मुले, भाऊ यांच्यासमोर फार मोठे संकट निर्माण होते. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीला आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. एवढेच नाही तर जमिनीचा मालकी हक्क मिळविण्यासाठी विधवांना कुटुंबातील इतर सदस्यांशीच संघर्ष करावा लागतो. तरुणपणी विधवा म्हणून जीवन जगणे अतिशय कठीण असते. समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. कुटुंबातील मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, आजारपण, कर्ज या सर्व गरजांची पूर्तता करणे अशक्य होते. मग एवढ्या टोकाचा निर्णय एखादा शेतकरी का घेतो? शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त का होतो? याची वेगवेगळी कारणे आहेत. प्रस्तुत संशोधनातून जी कारणे समोर आलीतत्या कारणांचे विवेचन मुद्देनिहाय खालील प्रमाणे करता येईल.

१. निसर्गाचा लहरीपणा
२. सावकाराचे कर्ज
३. रोजगाराचा अभाव
४. सिंचन सुविधांचा अभाव
५. जोडधंदाचा अभाव
६. शिक्षणाचे कमी प्रमाण
७. हमीभावाचा अभाव
८. शेती विषयक नवनवीन तंत्रज्ञानाचा अभाव
९. विभक्त कुटुंब पद्धती
१०. स्वत:च्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार नसणे
११. विजेची टंचाई
१२. व्यापारी दलाल यांचे कडून होणारी फसवणूक
१३. प्रसंगी ओला व कोरडा दुष्काळ
१४. शासनाचे उदासीन धोरण
१५. शासकीय बँकांचा कर्ज देण्यास मिळत असलेला नकार
१६. रस्त्यांचा अभाव
१७. सामाजिक प्रथा व परंपरा
१८. मुला मुलींच्या लग्नांचे व शिक्षणाचे टेन्शन

१९. बोगस बी बियाणे

२०. सेंद्रिय शेतीचा अभाव

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीचे उपाय:

शेतकरी आत्महत्यांची वरील कारणे लक्षात घेता शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी काही महत्त्वपूर्ण उपाय योजना करणे गरजेचे आहे. त्या प्रमुख उपाय योजना खालील प्रमाणे आहेत.

१. शेतकऱ्यांना स्वत:च्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार प्रदान करावा.

२. शेतकऱ्यांना शेतीसाठी रात्री ऐवजी दिवसा वीज उपलब्ध करून देण्यात यावी.

३. शेतकऱ्यांना रासायनिक खता ऐवजी सेंद्रिय खते वापरण्यास प्रोत्साहन देऊन सेंद्रिय खतास अनुदान देण्यात यावे.

४. शेतातील माती परीक्षण व त्यानुसार पिकांची योग्य निवड करण्यासाठी प्रत्येक गावामध्ये शेतकरी मार्गदर्शक सल्ला केंद्र स्थापन करावे.

५. शेतीला सिंचनाची व्यवस्था व्हावी यासाठी विशेष सिंचन कार्यक्रमांची आखणी करावी.

६. शासकीय बँकांकडून अत्यल्प व्याजदरावर दीर्घ मुदत कर्ज उपलब्ध करून द्यावे.

७. शेतीशी निगडित असलेला जोड धंदा करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

८. शेती व शेतीशी संबंधित विविध उद्योगांचे प्रकल्प खेड्यांमध्ये स्थापन करावे.

९. शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाची बी बियाणे योग्य दरात उपलब्ध करून देण्यात यावीत.

१०. शेतकरी आत्महत्या केल्यानंतर देण्यात येणारी अनुदान शेतकरी आत्महत्या होऊ नये यासाठी तरतूद करावी.

११. नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी समुपदेशन केंद्र स्थापन करून त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करावा.

१२. शेतकरी शेतकऱ्यांच्या मुलींचे विवाह करण्यासाठी सामूहिक विवाह समारंभांचे आयोजन करावे.

१३. शेतकऱ्यांच्या शेती व कौटुंबिक खर्चासाठी किसान क्रेडिट कार्ड योजना अमलात आणावी.

१४. पिक विमा योजनेच्या रकमेत वाढ करून मुदतीत पिक विमा मिळण्याची तरतूद करावी.

वरील प्रमाणे उपायोजना केल्यास शेतकरी आत्महत्या रोखण्यास मदत मिळू शकेल यात शंका नाही.

निष्कर्ष:

वरील अध्ययनावरून असे निदर्शनास येते की, शेतकरी आत्महत्येस अनेक कारणे जबाबदार आहेत. या आत्महत्या रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्यास आत्महत्येचे प्रमाण कमी होण्यास मदत मिळेल यात शंका नाही. शेतकरी आत्महत्या झाल्यानंतर मदत करण्याऐवजी शेतकरी आत्महत्याच होऊ नये यासाठी शासनाने प्रयत्न करावे अशी अपेक्षा आहे.

संदर्भ:

१. जाधव नरेंद्र (२००८), शेतकरी आत्महत्या आणि कृषी समोरील आव्हाने,

२. बोरसे शिवनाथ (२००५), शेतकऱ्यांच्या समस्या शोध आणि बोध, सुधा प्रकाशन, नाशीक.

३. खूपसे मार्तंड(२००६), शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंता आणि चिंतन, समीर प्रकाशन, कळंब.

४. गायकवाड मुकुंद (२००३), शेतकरी मित्राचे प्रश्न आणि उत्तरे, उत्कर्ष प्रकाशन, पुणे

५. बोकरे दिवाकर (२००८), शेतकऱ्यांच्या आत्महत्या, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

६. कवीमंडण विजय (२००५), कृषी अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, पुणे

७. वानखडे चंद्रकांत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, परिसर प्रकाशन, आंबेजोगाई

८. लोकराज्य मासिक

*सहाय्यक प्राध्यापक, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला. मो. नं. ७५८८८४६१३५.

***

भारतातील नैसर्गिक संसाधने, पर्यावरण संवर्धन चळवळ आणि महिलांची भूमिका : समाजशास्त्रीय दृष्टिकोन

*डॉ.संपत काळे,

गोषवारा:

भारतातील नैसर्गिक संसाधने संरक्षण आणि पर्यावरण संवर्धन चळवळीचे एक अनन्य साधारण महत्व गेल्या तीन दशकात वाढीस लागलेले आपणाला दिसून येत आहे. एकविसाव्या शतकातील सर्वात महत्वाचे प्रश्न म्हणजे वाढ आणि विकासाच्या नावाखाली होणारे बेसुमार औद्योगीकरण, नागरीकरण आणि उपभोगवादी संस्कृती, पर्यावरणाचा विनाश आणि वाढती विषमता होय. हा शोधनिबंध माझे काही संशोधन प्रकल्प तसेच विविध संस्था, लोक चळवळींशी घेतलेल्या भेटी, लोकांसोबतची चर्चा आणि उपलब्ध दुय्यम साहित्यावर आधारित आहे. सध्या नैसर्गिक सांसाधनांची काय स्थिती आहे, चळवळीचे मुख्य विषय काय आहेत, वंचित समाजातील लोकांचे म्हणणे काय आहे ते मांडण्याचा प्रयत्न आहे. लोकांचा सहभाग, स्थानिक लोकांचे शहाणपण, लोकांच्या उपजीविकेवर होणारे परिणाम तसेच शाश्वत सहभागी विकास, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर होणारे प्रयत्न यांचा मागोवा सदर शोधनिबंधात घेण्याच्या प्रयत्न आहे. या चळवळींमधून वंचित समूह आणि महिलांचे सक्षमीकरण कशा रितीने होत आहे याचाही आढावा घेण्यात आला आहे.

प्रस्तावना:

भारतातील पर्यावरण संवर्धन हा एक महत्त्वाचा विषय आपल्यासमोर आहे. आज सर्वांना भेडसावणारा प्रश्न म्हणजे पर्यावरण संरक्षण. त्यासाठी जगभरातून वेगवेगळे प्रयत्न होत आहेत. या सर्व प्रयत्नांमध्ये वेगवेगळ्या राज्यातून पर्यावरणाच्या चळवळी काम करीत आहेत जंगलाचे रक्षण करण्यासाठी अनेक अनेक संस्था संघटना चळवळी सक्रियपणे काम करीत आहेत. देशाच्या उत्तरेकडची पर्यावरण संवर्धनाची सर्वात महत्त्वाची चळवळ म्हणजे चिपको आंदोलनाची झाडझाडोरा वाचवा व पुढील पिढीसाठी काहीतरी बाकी ठेवा. ही शाश्वत सुरक्षित विकासाची चळवळ आपण पाहिलेली आहे. या चळवळीने आपल्या देशामध्ये एक महत्त्वाचा पायंडा पाडलेला आपल्याला दिसून येतो. राजस्थानातील आदिवासी समाजाने सुरुवात केलेली चळवळ देशाच्या विविध भागात पोहोचली. या चळवळीचे प्रमुख प्रवर्तक म्हणजे श्री. चंडीप्रसाद भट्ट तसेच श्री. सुंदरलाल बहुगुणा आणि त्यांच्याही आधी पाहिले तर राजस्थान राजस्थानातील बिष्णोई समाज यांनी वन संवर्धनासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आपल्याला पाहायला मिळते. चिपको आंदोलन आणि विविध पर्यावरण संवर्धन चळवळींनीही महत्त्वाचे मुद्दे उचललेले आपल्याला पाहायला मिळतात.

संशोधन पद्धती:

हा शोधनिबंध प्राथमिक आणि दुय्यम स्वरूपाच्या साहित्य आणि तथ्यावर आधारित आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. लोकाभिमुख आणि सहभागी विकास, शाश्वत आणि सुरक्षित विकास, लोकसहभाग या संकल्पनाचा उपयोग या पेपरसाठी केला गेला आहे. गावभेटी, गटचर्चा, क्षेत्र कार्ये, सामूहिक चर्चा आणि गाव बैठक यांचाही उल्लेख करण्यात आला आहे. शेतकरी गटचर्चा, सहभागी निरीक्षण, प्राथमिक आणि दुय्यम स्वरूपाची माहिती विचारात घेऊन समाजशास्त्रीय विश्लेषण केले आहे. अभ्यासाठी चौकट ही बिना अगरवाल, वंदना शिवा, अमिता बाविसकर, माधव गाडगीळ आणि रामचंद्र गुहा यांच्या सैद्धांतिक विश्लेषणांवर आधारित आहे.

पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन चळवळीचे स्वरूप:

देशभर, खासकरून दक्षिण भारतात अनेक पर्यावरण संवर्धनाच्या चळवळी आपल्याला पाहायला मिळतात. यातली सर्वात महत्त्वाची चळवळ म्हणजे सेव्ह वेस्टर्न घाट्स किंवा पश्चिम घाट बचाव होय. पर्यावरण संवर्धनासाठी वेगवेगळ्या संस्था, संघटना, शासनाचे प्रयत्न त्याचबरोबर युनेस्को सारख्या संघटनांचे प्रयत्न देखील खूप महत्त्वाचे आहेत. महाराष्ट्रापासून ते अगदी केरळपर्यंतचा सर्व भाग आणि त्या भागामध्ये जे वेगवेगळे पर्यावरणविरोधी किंवा विनाशकारी प्रकल्प औद्योगीकरणाच्या नावाखाली येऊ घातलेले आहेत त्यांच्यावरती आज मोठ्या प्रमाणावर वादविवाद सुरू आहेत. विशेष करून केरळ राज्यात झालेले प्रयत्न आहेत खूप महत्त्वाचे आहेत. त्या भागामध्ये जंगल संवर्धनासाठीची चळवळ असेल, आदिवासींचे वेगवेगळे लढले असतील. जसे की सी. के. जानू यांचा जमीन वाचवा व आदिवासींची मालकी निर्माण करणार लढा असेल, त्या भागातले असे अनेक प्रयत्न केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्रात देखील पहायला मिळतात.

पश्चिम घाट बचाव:

मोठ्या प्रमाणावर काम करणारी लोकाभिमुख चळवळ म्हणजे पश्चिम घाट बचाव होय. डॉ. माधव गाडगीळ यांनी सह्याद्रीच्या पश्चिम घाटांच्या संवर्धनासाठी अहवाल तयार केला व सरकारला सादर केला. विशेष करून संवर्धनाच्या संदर्भात तो फार महत्त्वाचा आहे. त्यानंतर कस्तुरीरंगन कमिटीचा रिपोर्टही महत्त्वाचा आहे. आपण पर्यावरणाचा ऱ्हास कशा पद्धतीने थांबवू शकतो, त्याच्यामध्ये भर टाकायची का जंगलाची होणारी जी काही नासधूस आहे ती आपण थांबवायची?

विनाशकारी प्रकल्प आणि कोकणचा लढा

आजमितीला खाणींचे साम्राज्य झपाट्याने वाढत आहे आणि उत्खननाच्या माध्यमातून त्या ठिकाणी जंगलाचा जो ऱ्हास होतोय ते कशा पद्धतीने थांबवता येईल यासाठी काही प्रयत्न आपल्याला वेगवेगळ्या भागांमध्ये होताना दिसून येतात. विशेष करून कोकणामध्ये जे काही नवीन प्रकल्प येऊ घातलेले आहेत मग ते विनाशकारी प्रकल्प असतील, ज्यात अणुऊर्जा प्रकल्प येतील किंवा पेट्रोलियम इंडस्ट्रीजचे जे काही मोठे प्रकल्प आहेत. कोकणासारख्या भागामध्ये आणि पर्यावरणाचा त्यातून जे काही नुकसान होणार आहे त्याच्यासाठी लोकांनी आता गावागावातून कंबर कसलेली आपल्याला पाहायला मिळते. जेणेकरून गोव्यापासून कर्नाटक आणि महाराष्ट्राचा जो काही सागरी किनारा आहे त्या सागरी किनाऱ्यावरती येणारे जे काही विनाशकारी प्रकल्प आहेत त्याला थोपवण्यासाठी थांबवण्यासाठी वेगवेगळ्या भागातून विरोध देखील आपल्याला होत असताना पाहायला मिळतो. शासनातर्फे आपल्याला सांगितलं जातं की हे प्रकल्प खूप महत्त्वाचे आहेत, त्यातून रोजगार निर्मिती होणार आहे. त्यातनं वेगवेगळ्या लोकांची उपजीविका मोठ्या प्रमाणावरती उभारणार आहे, वगैरे वगैरे. पण त्याच वेळी अनेक वर्ष अनेक पिढ्यनपिढ्य ज्यांची उपजीविका त्या समुद्रावरती किंवा समुद्री मासेमारीवर अवलंबून असेल, खाडी क्षेत्रात काम करणारे असतील किंवा भाताची शेती करणारी, नारळाच्या पोफळीच्या, आंब्याच्या बागा असतील याच्यावरती नेमके काय परिणाम होणार, त्याचाही सखोल अभ्यास कुठेतरी व्हायला पाहिजे. मात्र तो आपण करत नाही आहोत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे की आज स्थानिक लोकांकडे जे शहाणपण आहे त्या शहाणपणाच्या आधारावरती एक चळवळ उभी करतायेत. आपल्या गावातील माणूस, आपल्या भागातील माणूस, त्याची उपजीविका, त्याच जगणं हे त्याला फार महत्त्वाचं वाटतं. आपल्यालाही एका समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून या विषयाकडे पाहण्याची गरज आहे.

समाजशास्त्रामध्ये आपण कुटुंब पाहतो, त्यानंतर आपले नातेसंबंध पाहतो, त्यानंतर आपला धर्म, चालीरिती या सगळ्या गोष्टी पर्यावरणाशी कुठेतरी जोडल्या गेल्या पाहिजेत की जेणेकरून आपली नाळ ही पर्यावरणाशी, मग ती जल जंगल जमीन या सगळ्या गोष्टींशी कुठेतरी जोडली गेलेली पाहिजे. आपण आज पर्यावरणाचा नाश करून आपण खूप मोठा विजय मिळवत आहोत हा अविर्भाव कुठेतरी थांबायला पाहिजे. जे काही विनाशकारी प्रकल्प वगैरे आहेत त्यावर आपण सैद्धांतिक दृष्टिकोनातून संशोधन करण्याची आज गरज आहे.

औद्योगीकरणाचा खरा चेहरा कोणता?

मागील दोन दशकांचा जर विचार केला तर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आपल्याकडे अनेक प्रकल्प येऊ घातलेले आहेत. त्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये औद्योगीकरण व्हावे, नागरिकीकरण मोठ्या प्रमाणामध्ये व्हावे, लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी खूप मोठे प्रयत्न वेगवेगळ्या माध्यमातून होत असले तरी या सर्व औद्योगीकरणाचे लोकांच्या जीवनावरती नेमके परिणाम काय होत आहेत, नातेसंबंधांवरती, कुटुंबांवरती नेमके काय परिणाम होतात हे देखील पाहणे खूप गरजेचे आहे. जसे की आपल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर स्पेशल इकॉनोमिक झोन्स किंवा सेझ निर्माण करण्यात आले. त्यातून मोठ्या प्रमाणामध्ये औद्योगीकरण होईल, नोकऱ्या मिळतील असे दावेही केले गेले. पण खरंच आपण किती प्रमाणामध्ये नोकऱ्या उभ्या करू शकलो हा प्रश्न गावागावातील लोक आपल्याला विचारत आहेत. त्याच वेळेला आपण पर्यावरणाचा किती नाश केला हेही देखील त्या ठिकाणी पाहणे गरजेचे आहे. प्रदूषण मोठ्या प्रमाणामध्ये वाढत आहे. नद्यांच्या प्रदूषणाकडे आपण डोळेझाक केलेली आहे किंवा जे पाण्याचे स्रोत आहेत, मुख्य करून पिण्याच्या पाण्याचे स्रोत आहेत ते आज खूप प्रदूषित झालेले आपल्याला दिसून येतील.

आज जर आपल्याला आपली उपजीविका उत्तम प्रकारे भागवायची असेल तर स्थानिक ज्या काही गोष्टी घडत आहेत किंवा शेतीला जोडून जे उपजीविकेचे प्रकल्प त्या ठिकाणी होत असतील, शेतीला जोडधंदा म्हणून वेगवेगळं पशुधन, बकऱ्या, कोंबडया पाळण्याचा व्यवसाय असेल किंवा इतर भाजीपाला करणारी काही मंडळी असतील या सगळ्या गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. स्थानिक पातळीवरती रोजगार कशा पद्धतीने निर्माण होईल, लोकांना स्वच्छ हवा, पाणी किंवा इतर ज्या महत्त्वाच्या गोष्टी, जगण्यासाठीची साधनं कशा पद्धतीने मिळतील किंवा ती निर्माण होतील यावरती जास्तीत जास्त भर देण्याची गरज आपल्याला दिसून येते.

पाण्यासाठी लढा ते समन्यायी पाणी वाटप

आम्ही मागच्या अनेक वर्षापासून काही राज्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास करत आहोत. पाण्याच्या संदर्भात पाण्याचे समन्यायी वाटप कशा पद्धतीने होईल जेणेकरून भूमीहीनांना देखील पाण्यावरती अधिकार कसा मिळेल, जसे पाणी पंचायतीच्या माध्यमातून गावा–गावामध्ये लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतीच्या पाण्यासाठी कशा पद्धतीने अधिकार मिळवता येतील हे प्रयत्न आपण पाहिलेले आहेत. त्याचबरोबर हे प्रयत्न फक्त महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता ते

राजस्थानसारख्या भागामध्ये किंवा ओरिसासारख्या भागामध्ये आपल्याला पाहायला मिळतात आणि ही संकल्पना आज वेगवेगळ्या राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावरती एक वेगळं वळण घेत असतानाही आपल्याला दिसत आहे.

स्थानिक पातळीवरती लोकांच्या सहभागातून, लोकांनी तयार केलेले जे काही पाण्याचे स्रोत आहेत त्यावर त्यांची मालकी निर्माण होणं हा एक महत्त्वाचा भाग आहे त्याच वेळी मायक्रो इरिगेशन किंवा सूक्ष्म सिंचनाच्या ज्या काही सोयीसुविधा आहेत किंवा स्थानिक पातळीवरती पायाभूत सुविधा कशा पद्धतीने निर्माण होतील ते देखील पाहिलं जात आहे. त्याचबरोबर झाडझाडोरा किंवा जी काही वनसंपदा आहे किंवा वनीकरणासारखे प्रकल्प आहेत त्याच्यावरती विशेष लक्ष दिले जात आहे. गावाच्या पातळीवरती लोकसहभागातून ही चळवळ उभी होत असताना आपल्याला दिसत आहे. पाण्याच्या संवर्धनाचे प्रयत्न असतील, जमिनीच्या हक्कांसंदर्भातले प्रयत्न असतील, वन संवर्धन असेल किंवा वन हक्का कायदा, २००६ असेल, अशा अनेक चळवळी सुरू असल्याचं आपण पाहू शकतो. या कायद्यातील तरतुदींची, हक्कांची अंमलबजावणी होण्यासाठी आदिवासी बंधुभगिनी आज मोठ्या प्रमाणामध्ये काम करीत आहेत जेणेकरून पर्यावरणाचा संवर्धन ही होईल त्याच वेळेला त्यांची उपजीविका वनातून भागवली जाईल, उपजीविका भागवत असताना त्यांचा जीवनाचा जो काही स्तर आहे तो आणि त्यांचे जीवनमान उंचावण्याचे पर्यायही त्याद्वारे निर्माण होतील अशा पद्धतीचे प्रयत्न आज वेगवेगळ्या चळवळीच्या माध्यमातून होत आहेत.

नदी संवर्धन: पर्यावरण रक्षण, समन्याय, सांस्कृतिक दुवा

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यामध्ये युवा मित्र या संस्थेच्या माध्यमातून नदीचे संवर्धन करताना एक आगळा वेगळा विचार मांडण्यात आला. आज नदीला एक वेगळं स्वरूप प्राप्त करून देण्याची गरज आहे जेणेकरून आजची युवा पिढी आज तिच्याकडे एक वेगळ्या नजरेने पाहू शकेल. नदी म्हणजे केवळ एक पाण्याचा स्रोत म्हणूनच नाही तर ती आपली जीवन जगण्याची एक संस्कृती आहे, एक पद्धती आहे हे त्यांना जाणवले पाहिजे. त्याच बरोबर नदीला जाणून घेण्यासाठी युवकांमधून जे काही वेगळे प्रयत्न होत आहेत ते फार महत्त्वाचे आहेत.

हे सर्व करत असतानाच त्या पाण्याचं समन्यायी वाटप कशा पद्धतीने होईल हे केंद्रस्थानी ठेवून समन्यायी पाणी वाटपासाठीचे प्रयत्न आज वेगवेगळ्या भागांमध्ये होत आहेत. त्यामध्ये एक सर्वात महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे सिन्नर तालुक्यातील देव नदीचे खोरे. या खोऱ्यात आज शेतकरी वेगवेगळ्या प्रकारची शेती फुलवत आहेत. पारंपारिक शेतीला जोडूनच ते आधुनिक शेती देखील करत आहेत आणि त्यांच्या शेतमालाला जवळपास बाजारपेठाही उपलब्ध होत आहेत. नाशिकसारखी बाजारपेठ असेल किंवा पुण्यासारखी बाजारपेठ असेल, किंवा थेट मुंबई असेल.

लोकांच्या पाणी वापर संस्था निर्माण करून, त्याच बरोबरीने फार्मर्स प्रोड्युसरस ऑर्गनायझेशन म्हणजेच शेतकरी उत्पादक संस्था निर्माण करून देखील शेतीला एक उत्तम दर्जा मिळवून देण्याचे, आणि तितक्यावर न थांबता, शेतकऱ्यांना सन्मानाने जगता येईल अशी एक व्यवस्था निर्माण करण्यासाठीचे प्रयत्न देखील होत आहेत. त्याच बरोबर मोठ्या प्रमाणावरती पाणी वापर संस्थांची निर्मिती होत आहे. उदा. कडवा डॅम आणि त्याच्यावरच्या कॅनॉलवरती वेगवेगळ्या पाणी वापर संस्थांची निर्मिती केली जात आहे. अनेक भागांमध्ये जिथे जिथे धरण झालेली आहे त्या धरणातून पुढे आलेले कॅनॉल्स आहेत त्या कॅनॉलच्या माध्यमातून पाणी वापर संस्था निर्माण करणे आणि समन्यायी पाणी वाटपासाठीचे प्रयत्न देखील त्या ठिकाणी होत आहेत.

पाणी वापर संस्था संघटन, संवर्धन, समृद्धी

आज आपल्याला महाराष्ट्रामध्ये जवळपास २८८० पाणी वापर संस्था कार्यरत असलेल्या पाहायला मिळतील. त्यांचं स्वरुप आणि काम यामध्ये आपल्याला प्रांताप्रमाणे फरक दिसून येतो. पश्चिम महाराष्ट्रामध्ये त्यांचं स्वरूप वेगळं आहे आणि विदर्भामध्ये वेगळं. मराठवाड्यामध्ये आणि उत्तर महाराष्ट्रामध्ये या संस्था वेगवेगळ्या प्रकारे तयार झाल्याचे तसेच विविध पद्धतीने कार्यरत असल्याचे आपल्याला दिसते. त्या त्या भागांमध्ये स्थानिक पातळीवरती सहभागी सिंचनातून सहभागी सिंचनाच्या कायद्याच्या अनुषंगाने त्या ठिकाणी सिंचनामध्ये भर टाकण्यासाठीचे प्रयत्न आज होताना दिसतात. सहभागी पद्धतीने म्हणजे पाणी वापर करणाऱ्या शेतकरी व इतरांच्या सहभागातून असा त्याचा अर्थ होतो. व्यापक स्तरावर विचार केला तर ही जलसंवर्धनाची चळवळ आहे, वनसंवर्धनाची चळवळ आहे आणि शेती सुधारण्याचीही. शेती जास्तीत जास्त फायद्याची कशा पद्धतीने होईल यासाठीचे सगळे प्रयत्न आज आपल्याला महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांमध्ये दिसून येते.

सर्वसमावेशक विकासातून दारिद्रय निर्मूलन

संयुक्त राष्ट्रसंघाने पर्यावरण आणि त्या ठिकाणची शाश्वत उपजीविका केंद्रस्थानी ठेवून शाश्वत उपजीविकेची १७ उदिद्ष्टं तयार केली आहेत. या १७ उद्दिष्टांसोबत १६९ लक्ष्य नमूद केली आहेत. ही उद्दिष्टं आणि लक्ष्यं मोठ्या प्रमाणावरती आता विविध प्रकारच्या कामामध्ये सहभागी करून घेतली जात आहेत. जसे की गरिबी निर्मूलनासारखे प्रयत्न आपल्याकडे

मोठ्या प्रमाणावरती होत आहेत. एकीकडे दारिद्रय कमी करणे आणि दुसरीकडे दारिद्रयरेषेखालील लोकांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना दारिद्रयरेषेच्या वर आणण्यासाठीचे प्रयत्न आहेत किंवा त्याच वेळी त्यांना शेती क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा कशा पद्धतीने उपलब्ध करून देता येतील हे देखील प्रयत्न शासनातर्फे केले जात आहेत. स्वयंसेवी संस्था किंवा कॉर्पोरेट सोशल रेस्पोंसिबिलिटीच्या माध्यमातून देखील होत आहेत. शेती आणि शेतजमीन असणाऱ्यांसाठी अशा स्वरुपाचे काम होत असतानाच महत्त्वाची गोष्ट म्हणजे भूमिहीन लोकांची उपजीविका कशा पद्धतीने भागवली जाईल यासाठीही वेगवेगळे प्रयत्न आज आपल्याला महाराष्ट्रातच नाही तर केरळसारख्या राज्यामध्ये देखील दिसत आहेत.

केरळच्या कुटुंबश्रीस शासनाचा भक्कम पाठिंबा

कुटुंबश्री ही केरळ राज्यातील एक महत्त्वाची आणि खूप यशस्वी वाटचाल करणारी एक संकल्पना आपल्याला पाहायला मिळते. समाजशास्त्रामध्ये आपण पाहतो की काही गोष्टी जेव्हा सामूहिक पद्धतीने होतात, संघटित स्वरूपामध्ये होत असतात तेव्हा त्याला एक वेगळे वळण मिळत असते. कुटुंबश्री ही एक महिलांची चळवळ केरळमध्ये उभी राहिलेली आहे. गावापासून ते अगदी राज्याच्या राजधानी पर्यंत जवळपास चार ते साडेचार लाख महिला या कार्यक्रमात सहभागी झालेल्या आपल्याला दिसून येतात. १३ जिल्ह्यांमध्ये ही चळवळ मोठ्याा प्रमाणामध्ये आज केरळमध्ये काम करत आहे. म्हणजे गाव पातळीवरती जर आपण पाहिले तर वॉर्ड स्तरापासून ते ग्रामपंचायतीपर्यंत, ग्रामसभेमध्ये आणि ग्रामसभेपासून ते तालुका आणि जिल्हास्तरापर्यंत मोठ्या प्रमाणावरती कुटुंबश्रीचे गट विविध प्रकारचे उपक्रम राबवत असताना दिसत आहेत. पण एवढ्यावरच न थांबता केरळ सरकारने या गटांमधून महिला उद्योजिका निर्माण करण्यासाठीची चळवळ त्या ठिकाणी उभी केलेली दिसते. म्हणजे त्या स्थानिक भागात जे काही काम करत आहेत त्यासाठी जे आवश्यक व्यवसायभिमुख काही प्रशिक्षण त्या ठिकाणी दिले जात आहे. उदाहरणार्थ शिलाई मशीनसारखे प्रयत्न असतील, किराणा दुकान चालवायचे असेल किंवा बांगड्यांचा व्यवसाय करायचा, शेळीपालनाचा व्यवसाय करायचा असेल कुकुट पालनाचा व्यवसाय करायचा असेल तर वेगवेगळ्या व्यवसायाच्या संधी निर्माण करून दिल्या जात असल्याचे आज आपल्याला कुटुंबश्रीच्या माध्यमातून दिसत आहे. एक सामूहिक हक्काची आणि सामूहिक सक्षमीकरणाची चळवळ स्थानिक पातळीवरती उभे राहते आणि त्याला शासनाचे पाठबळ असते, त्याच्यासाठी लागणारी बजेट किंवा आर्थिक तरतुदी कराव्या लागतात ते देखील मोठ्या प्रमाणावरती केले जाते. जेणेकरून महिलांना आज गावपातळीवरती त्यांचे सक्षमीकरण व्हावे त्यांची उपजीविका भक्कम व्हावी व सन्मानाने जगण्यासाठी त्यांना एक अवकाश तयार करता येईल किंवा एक जागा निर्माण करण्यास करता येईल असे प्रयत्न केरळ सरकारच्या कुटुंबश्रीच्या माध्यमातून आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून होत आहे.

माझ्या मते ही एक मोठी चळवळ आहे आणि ही चळवळ वेगवेगळ्या राज्यांमध्ये आज आकार घेत आहे. म्हणजे केरळपुरती मर्यादित न राहता ती आज इतर सहा राज्यात, उदा. बिहार, उत्तर प्रदेश किंवा ईशान्येकडील काही राज्य किंवा राजस्थानपर्यंत या चळवळी आज पोहोचलेल्या आपल्याला पाहायला मिळतात. सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की त्या ठिकाणी महिलांच्या सक्षमीकरणासाठीचे जे प्रयत्न आहेत त्या त्या राज्यातील राज्य शासनाचा सहकार्य असेल मग ते आर्थिक तरतुदी करणे किंवा सीएसआरचे फंडिंग आहे त्यातून महिलांच्या गटांना फंडिंग दिले जात आहे. गाव पातळीवरती त्यांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना तयार करणे आणि त्यांना स्वत:च्या पायावरती उभे करणे हे सगळं प्रयत्न आज आपल्याला मोठ्या प्रमाणावरती दिसून येत आहेत.

निष्कर्ष आणि अवलोकन:

पर्यावरण संवर्धनाची चळवळ, महिलांची चळवळ किंवा बचत गटाच्या चळवळी असतील किंवा महाराष्ट्रातील आणि विशेष करून मराठवाडा भागातील उपजीविकेच्या महत्त्वाच्या प्रश्नावर सुरू असलेले वेगवेगळे प्रयत्न असतील तर गाव पातळीवर महिलांचे संघटन घडत असल्याचे दिसते. या भागात स्वयंशिक्षण प्रयोग संस्थेच्या माध्यमातून गाव पातळीवरती वेगवेगळे प्रयत्न केलेले आपल्याला पाहायला मिळतात. महिलांच्या उपजीविकेचा महत्त्वाचा प्रश्न त्यांनी हाताळलेला आहे. गावा–गावातून महिलांना उद्योजकता कशा पद्धतीने वाढीस लावता येईल किंवा त्यांना त्यांच्या पायावरती उभे करण्यासाठी कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. विशेष करून समाजातील अतिशय दुर्लक्षित, वंचित, आदिवासी किंवा दलित समाजातील किंवा इतर भटके विमुक्त समाजातील महिला मोठ्या प्रमाणामध्ये त्यात सहभागी झालेल्या आपल्याला पाहायला मिळतील. जसे की उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये त्यांनी शेळीपालनाच्या प्रकल्पातून शेळी पालन करून आपली उपजीविका उभी करणे इतक्यापुरते काम मर्यादित ठेवलेले नाही. तर दुग्ध व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये सहभागी झालेल्या महिला आज आपल्याला दुग्ध व्यवसायातून वेगवेगळ्या प्रक्रिया करून उद्योग वाढवत असलेल्या पाहायला मिळतील. जसे की खवा उत्पादन असेल, दूध आहे, किंवा दुधापासून वेगवेगळे जे पदार्थ बनवले जातात, पेढा वगैरे सारखे पदार्थ आहेत. हे पदार्थ आज त्या स्थानिक बाजारपेठेमध्ये किंवा देवस्थानाच्या ठिकाणी देखील विकत आहेत.

एवढ्यावरच न थांबता त्यांनी शेतीमध्ये देखील प्रयोग करायला सुरुवात केलेली आहे. आज आपल्याला शेती ही व्यवसायाभिमुख कशी करता येईल, त्यातून उपजीविका भागवत असतानाच दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज प्रपंच चालवण्यासाठी त्या मोठ्या प्रमाणामध्ये प्रयत्न करत आहेत. आज आपल्याकडे मोठ्या प्रमाणावरती वेगवेगळ्या आपत्ती दिसून येतात पण त्या आपत्तीला कधीही न घाबरता, न डगमगून जाता त्या जबरदस्त ताकदीने काम करत असल्याचं आपल्याला पाहायला मिळतं.

मधल्या काळामध्ये आणि साधारणपणे काही वर्षांच्या अंतराने मराठवाड्यामध्ये दुष्काळ पाहायला मिळतो. दुष्काळाला किंवा अशा आपत्तीला तोंड देण्यासाठी काय करता येईल, आपली शेती अजून शाश्वत पद्धतीने कशी करता येईल, पाण्याच्या किंवा सिंचनाच्या सुविधा असतील, पायाभूत सेवा सुविधा त्या ठिकाणी निर्माण करता याव्यात यासाठी देखील प्रयत्न या संस्थांच्या माध्यमातून केले जात आहेत. विशेष करून महिलांच्या सक्रीय सहभागातूनच या गोष्टी केल्या जात आहेत. पूर्वीप्रमाणे त्यांचा सहभाग न नोंदवता परस्पर कोणत्याही गोष्टी आज केल्या जात नाहीत ही एक जमेची बाजू आहे. आणि आपल्याला ती समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पहावी लागेल.

महिलांचे सक्षमीकरण म्हणजे फक्त त्यांना आपण कुठल्यातरी माध्यमातून भागीदार बनवणं किंवा फक्त लाभार्थी म्हणून त्यांच्याकडे पाहणं दृष्टिकोन मागील एक ते दोन दशकांमध्ये बदललेला आपल्याला पाहायला मिळतो. एवढंच नाही तर त्या महिला आज वेगवेगळ्या बँकांकडून जी छोटी मोठी कर्जं घेत आहेत ती कर्जं देखील वेळेच्या आधी फेडण्यासाठी या महिलांनी कंबर कसलेली आपल्याला पाहायला मिळते. जो काही व्यवसाय असेल त्या व्यवसायातून निर्माण होणारी संपत्ती आपल्याला कशा पद्धतीने सामूहिक रूपाने वापरता येईल, कौटुंबिक गरजांसाठी वापरता येईल याकडे महिलांचा भर असल्याचंही दिसून आलं आहे. त्यातही विशेष म्हणजे त्यांनी स्वत:च्या किंवा कुटुंबाच्या आजारपणाचा खर्चही उचललेला आहे. मुलांच्या शिक्षणासाठीचा खर्च भागवला आहे. शेतीमध्ये जे काही बदल करायचे किंवा त्यात लागणारी पायाभूत सुविधा आहेत त्यात त्या भर टाकत आहेत. एकंदरीतच काय तर महिलांनी आज मोठ्या प्रमाणावरती जबाबदारी घेऊन सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन त्या ठिकाणी काम करत आहेत.

संदर्भ:

- Fernandes, W. and A.M. (1997): Development Induced Displacement in Orissa 1951-1995, New Delhi: Indian Social Institute.
- Gadgil, M., & Guha, R. (1993). This fissured land: an ecological history of India. University of California Press.
- Harvey, D. (2005): A Brief History of Neoliberalism, New York: Oxford University Press.
- Kale Sampat, (December 2021). Maharashtratil Sahabhagi Sinchanache Punarujjeevan, a Sociological analysis, Marathi Samajshtra Sanshodhan Patrika, Maharashtra.
- Mehta, J. & Tiwari V. (2022). From the Realm of Necessity to the Realm of Freedom: A Study of Women Farmers under Kudumbashree Collective Farming in Kerala. Aakar Books. New Delhi.
- Olson, M. (1965). The Logic of Collective Action. Cambridge, MA: Harvard University Press
- Ostrom, E. (1990). Governing the commons: The evolution of institutions for collective action: Cambridge university press.
- Save the Western Ghats. Retrieved March 17, 2023, (http://www.savethewesternghats.org/index.php)
- Shah, G. (2004). Social movements in India: A review of literature. Sage Publications.
- Singh, K. (1999): "Sustainable Development: Some Reflections", Indian Journal of Agricultural Economics, 54(1), January-March, New Delhi.
- (2022). Report of the Western Ghats Expert Panel, MoEF. New Delhi.

*टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर परिसर, तुळजापूर, जिल्हा धाराशिव मो.८९९९७४४४४८,
E-mail : samkale@gmail-com

***

विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून विश्लेषण

*प्रा. किरण सुरवसे

गोषवारा:

विद्रोही सांस्कृतिक चळवळ ही संस्कृती, समतावादी व क्रांतिकारी मुल्ये यांचा जागर करणारी चळवळ म्हणून महाराष्ट्रात उदयाला आली. गेली २३ वर्षे ही चळवळ सुरु आहे. या चळवळीवर चार्वाक, बुद्ध, फुले आंबेडकर यांच्या विचारांचा अधिक पगडा आहे.विरोध करणे हा या चळवळीचा मुख्य हेतु आहे. समतेला होकार आणि विषमतेला नकार या बोधचिन्हातून आपले विचार स्वतंत्रपणे मांडणारी, वर्चस्ववाद, पुरुषसत्ताकवाद, भांडवली मुल्ये, दमनकारी व्यवस्थेविरुद्ध निर्भिडपणे उभे राहून आपले विचार स्पष्टपणे मांडणारी ही चळवळ आहे. दलित, भटके विमुक्त, आदिवासी, कष्टकरी, स्त्रिया आणि निराश झालेला तरुणवर्ग, या सगळयांचे आवाज उमटवण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध समांतरपणे प्रयत्न होण्याच्या उद्देशाने विद्रोही सांस्कृतिक चळवळ स्वतंत्रपणे संमेलन आयोजित करत आली आहे.

प्रस्तावना :

विद्रोह म्हणजे प्रस्थापितांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी केलेला सर्वांगीण स्वातंत्र्याचा जाहीरनामा. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी विद्रोहाची नितांत आवश्यकता असते.चार्वाक, तथागत गौतम बुद्ध, नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय इत्यादी संप्रदायातून विद्रोह प्रकटला आहे. तसेच संत चक्रधर, संत नामदेव, संत चोखामेळा या संतांच्या रचनांमध्येही विद्रोही भूमिका दिसते.महाराष्ट्रात १९९९ पासून विद्रोही सांस्कृतिक चळवळीची बीजे रोवली गेली आहे. आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्णझाली असली तरी या देशातील दलित, आदिवासी, कष्टकरीसमाजाला अजूनहीस्वातंत्र्य मिळाले नाही.आजही त्यांनाउपेक्षितांचे जीवन जगावे लागत आहे.विद्रोही साहित्य संमेलनाच्या माध्यमातून हा उपेक्षित समाज आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराविरोधातआवाज उठवू लागला. आपल्या व्यथा समाजापुढे आणि शासनापुढे मांडू लागला. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड पुकारू लागला.समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी संघर्ष करू लागला.त्यामुळे साहित्याच्या माध्यमातून बहुजन,दलित, आदिवासी, कष्टकरी यांच्या व्यथा पुढे येऊ लागल्या.थोडक्यातअखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर बहिष्कार टाकून विद्रोही सांस्कृतिक चळवळीने स्वतंत्र विद्रोही साहित्य संमेलने भरविण्याची विद्रोहीने परंपरा सुरु केली.त्यामुळेप्रस्तुत शोधनिबंधात विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा आणि विद्रोहीच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेल्या विद्रोही साहित्य संमेलनाचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

बीज संज्ञा : चळवळ, विद्रोह, साहित्य, समाजव्यवस्था, संघर्ष इत्यादी

संशोधन पद्धती : प्रस्तुत शोधनिबंध लेखन करण्यासाठी तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा वापर केला गेलाआहे. वर्तमान पत्रे, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित लेख, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) विद्रोहही संकल्पना अभ्यासणे.

२) द्रोह आणि विद्रोह यातील फरक अभ्यासणे.

३) विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा अभ्यास करणे.

४) विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या विद्रोही साहित्य संमेलनाचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहीतके :

१) विद्रोही साहित्य संमेलनाच्याविकासासाठी विद्रोही सांस्कृतिक चळवळीची भूमिका महत्त्वाची आहे.

२) विद्रोही सांस्कृतिक चळवळ समाजपरिवर्तन अधोरेखित करते.

विद्रोह म्हणजे काय? :

विद्रोह ही अतिशय व्यापक अशी संकल्पना आहे. जी शत्रुत्व, वैर, नकार, संघर्ष, बंड, उठाव, विरोध, बंडखोरी अशा अनेक अर्थांनी ओळखली जाते.समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी विद्रोहाची नितांत आवश्यकता असते.विद्रोह हा प्रस्थापित व्यवस्थेशी केला जातो. तसेच विद्रोह हा प्रस्थापित मूल्यांच्या विरोधात ठामपणे उभा असतो.मानवी मुल्ये आणि समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी विद्रोह हा दीर्घकाळ सुरु असतो.विद्रोह म्हणजे पारंपरिक टाकाऊ मूल्यांशी द्रोह.

व्याख्या: विद्रोह

१) विद्रोह म्हणजे बंड पुकारणे होय.

२) विद्रोह म्हणजे अन्यायाविरुद्ध लढा उभारणे होय.

३) विद्रोह म्हणजे मानवी मुल्ये प्रस्थापित करण्यासाठी अस्तित्वात आलेले तत्त्व होय.

४) प्रस्थापित व्यवस्था आणि शासनसंस्था यांच्या शोषण आणि दडपशाहीला सहन करण्यास नकार देऊन हृदयात साठलेल्या प्रचंड असंतोषाचा समूहाचा सहभागाने झालेला विस्फोट म्हणजे विद्रोह होय.

५) जनतेने स्वयंस्फूर्तपणे शोषणाविरुद्ध असलेला राग व्यक्त करण्यासाठी प्रस्थापित सत्ता आणि व्यवस्थेवर केलेल्या आंदोलनात्मक हल्ल्याची कृती म्हणजे विद्रोह होय.

६) प्रस्थापितांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी केलेला सर्वांगीण स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणजे विद्रोह होय.

७) विद्रोह म्हणजे –

- जनतेचा शोषणाविरुद्धचा लढा.
- माणसाला माणूस म्हणून जगू देण्यासाठीचा लढा.
- प्रस्थापित समाजव्यवस्था व शासनाविरुद्धचा लढा.
- सामाजिक समतेच्या समर्थनात केलेली कृती.
- शोषित – वंचित यांचे जीवन नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष.
- सांस्कृतिकपुनर्मांडणीचाविवेक.
- सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी उभारलेली चळवळ.

द्रोह आणि विद्रोह यातील फरक :

विषमता, अन्याय, अत्याचार, अनैतिकता, अस्पृश्यता, वैर, उपेक्षा, शत्रुत्व यांचे समर्थन करणे म्हणजे द्रोह होय.तर विद्रोह म्हणजे याविरूद्धचेबंड होय. द्रोह हा स्वार्थप्रेरित आणि तीव्र विध्वंसक असतो तर विद्रोह हा निस्वार्थीवृत्तीने समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्याचा ध्यास असतो. द्रोहातसामाजिक,आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक सत्ता मिळविण्यासाठी लालसा असते.मात्र विद्रोह हा समाज परिवर्तनासाठी, बहुजनांच्या हितासाठी, कल्याणासाठी असलेली एक चळवळ असते. द्रोहाविरूद्धच विद्रोहाचा जन्म होतो.द्रोह समाजाशी शत्रुत्व पत्करतो. विद्रोह समाजाचा मित्र असतो.

विद्रोहीसाहित्य संमेलनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

१९ व्या शतकात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची प्रक्रिया न्यायमूर्ती रानडे यांनी सुरु केली. १८८५ मध्ये न्यायमूर्ती रानडें यांनी ग्रंथकार सभेसाठी महात्मा ज्योतीराव फुले यांना सहभागी होण्यासाठी आमंत्रित केलं होतं. तेव्हा महात्मा ज्योतीराव फुले यांनी ग्रंथकार सभेला एक पत्रलिहिलंआणि त्यात असं म्हटलं की, तुमच्या ग्रंथकार सभेत सहभागी होऊन आमच्या समाजाचं भलं होणार नाही.याचं कारण म्हणजे अखिल मानवी समाजात समानता निर्माण व्हावी अशा एकीचं बीज तुमच्या साहित्य संस्कृतीत नाही. त्यामुळे मी तुमच्या ग्रंथकार सभेत सहभागी होऊ इच्छित नाही. पुढे ते म्हणाले की, जेव्हा आमचा बहुजन समाज शिकेल,तेव्हा तो आपल्या स्वतःची साहित्यनिर्मिती करून साहित्य संमेलन घेईल आणि ते खरं साहित्य संमेलन असेल. महात्मा फुले यांनी ग्रंथकार सभेला लिहलेले हे पत्रच पुढे विद्रोही साहित्य संमेलन चळवळीला जन्म देणारं प्रतीक ठरले. अर्थातच महात्मा ज्योतीराव फुलेयांनी लिहलेल्या या पत्राला

विद्रोही सांस्कृतिक चळवळआपला जाहीरनामा मानते, विद्रोहीचा वैचारिक पाया मानते. कारण या पत्राच्या आधारावरच विद्रोही मराठी साहित्य संमेलनाची परंपरा सुरू झाली.

वेगवेगळया जाती, धर्म असलेल्या विषमतापूर्ण समाजात शांतता, समता स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, सन्मान इत्यादी मुल्यांची प्रस्थापना करणे आवश्यक असते आणिसाहित्य यामध्ये अत्यंतमहत्त्वाची भूमिका बजावू शकतात. यावर विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा ठाम विश्वास आहे.महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभ्या केलेल्या परिवर्तनवादी चळवळीचे, महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या समतेच्या चळवळीचे परिणाम विद्रोही साहित्यावर फार मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसते.तसेच दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी या चळवळींचा देखील विद्रोही साहित्य निर्मितीवर फार मोठा परिणाम झाला आहे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातूनसन १९९९ पासून महाराष्ट्रात दरवर्षी स्वतंत्र विद्रोही सांस्कृतिक साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते.उपेक्षितांना आपला आवाज मिळावा हा विद्रोही साहित्य संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. विद्रोही साहित्य संमेलनात सर्व अध्यक्षांची भाषणे ही विद्रोही परंपरा उलगडून दाखविणारी आहेत.विद्रोही साहित्य संस्कृती संमेलनात लघु चित्रपट, माहितीपट भारुड, चळवळीतील गीते, अभंग आणि नाटक याचे सादरीकरण करून विविध विषयावर आपले विचार मांडले जातात.विद्रोही साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दलित, बहुजन, कष्टकरी वर्गातील लोक बोलू लागली, लिहू लागली. आजविद्रोही साहित्य संमेलनाने महाराष्ट्राच्या वैचारिक वाटचालीत एक वेगळा ठसा उमटवला आहे.

विद्रोही साहित्य :

समाजातील प्रत्येक व्यक्ती मानवी संस्कृतीचा एक घटक आहे. तसेच समाजव्यवस्था ही व्यक्तीच्या हितासाठी असते. या प्रस्थापित समाजव्यवस्थेत प्रत्येक नागरिकास माणूस म्हणून जगण्याचा नैसर्गिक अधिकार आहेत. मात्र या व्यवस्थेत जेव्हा माणसाचेकिंवा एखाद्या समूहाचे नैसर्गिक हक्क नाकारले जातात, त्यांच्यावर अन्याय-अत्याचार केले जातात, जेव्हा प्रस्थापित समाजव्यवस्थेत त्यांचे अस्तित्व धोक्यात येते, त्यांना कोणत्याही प्रकारच्या अस्मिता उरत नाही, प्रतिष्ठा मिळत नाही.त्यांच्याकडून माणूस म्हणून जगण्याचे हक्क हिरावून घेतले जाते. त्यांच्या जगण्यावर मर्यादा घातल्या जातात.तेव्हा प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध संघर्ष उद्भवतो आणिया समाजव्यवस्थेच्या विरोधात विद्रोहाची बीजे अधिकाधिक पेरली जातात. या मानसिकतेतूनच जे साहित्य निर्माण झाले त्याला विद्रोही साहित्य असे म्हटले जाते. विद्रोही साहित्य हे प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात असलेले साहित्य होय.

मानवाच्या जन्मापासूनच विद्रोहाची सुरुवात झाली आहे. तसेच मानवी संस्कृतीत विद्रोह नावाची गोष्ट सतत घडत असते. विद्रोह हा विषमतावादी धर्म, रूढी, परंपरा आणि इतिहास यांच्या विरुद्ध कायम सुरु असतो. त्यामुळेच ते माणसाच्या जगण्याचा साहित्याशी दुवा जोडत असते. प्राचीन काळापासूनच साहित्यामध्ये माणसाच्या, समूहाच्या जगण्याचा संघर्ष अधोरेखित केला गेला आहे. हा संघर्ष माणसाला माणूस म्हणून जगण्याची मागणी करण्यासाठी साहित्यातून मांडला गेला. अशा विषमतेविरुद्ध चळवळीच्या माध्यमातून बहुजन, कष्टकरी, दलित, आदिवासी,स्त्रिया, कामगार यांचे साहित्य जन्म घेत असते. परंपरागत ब्राह्मणी, प्रस्थापितांच्या साहित्याशी विद्रोह करून अन्याय, अत्याचार, विषमता आणि शोषणाच्या वेदना जगापुढे मांडणारे साहित्य म्हणजे विद्रोही साहित्य होय. अशा विद्रोहाची सुरुवात चार्वाक, तथागत भगवान गौतमबुद्ध, महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णभाऊ साठे, अण्णा बसवेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत चक्रधर, संत गाडगेबाबा यांच्या प्रेरणेने मराठी साहित्यातून झाली.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ :

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे बहुजन, कष्टकरी, दलित, आदिवासी, स्त्रिया यांना बेदखल करणारे आहे. अशी टीका करून काही पुरोगामी विचारवंत, कार्यकर्ते आणि साहित्यिक यांनी एकत्र येऊन ब्राह्मणी भांडवली, पुरुषसत्ताक मुल्ये व संस्कृतीच्या विरोधात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला तोड देण्यासाठी तसेच

उपेक्षितांच्या परिवर्तनवादी साहित्याचा जागर मांडण्यासाठी विद्रोही सांस्कृतिक चळवळ स्थापन केलीआणि इथूनच विद्रोही या नव्या पर्वाला सुरुवात झाली. चार्वाक, तथागत भगवान गौतमबुद्ध, स्वराज्य संकल्पक राजमाता जिजाऊ, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, समतावादी शिक्षिका सावित्रीबाई फुले, क्रांती शिक्षिका फातिमा शेख, स्त्री–पुरुष तुलनाकार ताराबाई शिंदे, पहिल्या निबंधकार मुक्ता साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,अण्णभाऊ साठे, अण्णा बसवेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत चक्रधर, संत गाडगेबाबा आणि कार्ल मार्क्स या सर्वांपासून विद्रोही सांस्कृतिक चळवळीने प्रेरणा घेतेली असून या महान सत्यशोधकांचा, समाज सुधारकांचा वारसा विद्रोही सांस्कृतिक चळवळीला ललामभूत आहे.

१९९९नंतर संपूर्ण महाराष्ट्रात विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा प्रभाव प्रचंड वेगाने वाढू लागला आणिविद्रोह हा सामाजिक परिवर्तनासाठी अधोरेखित होत गेला.लोकशाही आणि संविधानावर विश्वास असणारीसमताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी विद्रोही सांस्कृतिक चळवळ आज संपूर्ण महाराष्ट्रात काम करीत आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळ आणि विद्रोही साहित्य संमेलनाच्या माध्यमातून विद्रोही साहित्याची निर्मिती झाल्यामुळे प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध आवाज बुलंद झाला. परिणामी बहुजन, कष्टकरी, स्त्रिया, दलित, आदिवासी, कामगार इत्यादी घटकांचे श्वास मोकळे झाले. ब्राह्मणी व्यवस्थेने जातीव्यवस्थेच्या नावावर स्त्रियांवर लादलेली गुलामगिरी, जातीची उतरंड, मानवी अधिकार नाकारणारी व्यवस्था, पितृसत्ताक संस्कृती नष्ट करण्यासाठी विद्रोही सांस्कृतिक चळवळ कार्यरत आहे आहे. प्रस्थापित अन्याय अत्याचार आणि शोषण करणाऱ्या बाबींना सांस्कृतिक पर्याय देणे हे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे प्रमुख काम आहे. त्यामुळे वर्चस्ववाद, पुरुषसत्ताक परंपरा, भांडवली मूल्ये यांच्या विरोधात ही सांस्कृतिक चळवळ आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून शोषितांकडून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय- अत्याचार या विरोधात आवाज उठविला जातो. जातीविषमता, वर्गविषमता, स्त्री-पुरुष असमानता, अन्यायव्यवस्था इत्यादींना विद्रोही सांस्कृतिक चळवळ नकार देते.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीची भूमिका :

विद्रोह म्हणजे प्रस्थापित अन्यायी व्यवस्थेविरुद्ध केलेले बंड होय. असा विद्रोह करणारी प्रत्येक व्यक्ती विद्रोही आहे. समतावादी, संविधानावर विश्वास असणारी समाजव्यवस्था निर्मितीसाठी विद्रोही संस्कृतिक चळवळ महाराष्ट्र काम करीत आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळ सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन कार्य करते.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीची उद्दिष्ट्ये आणि ध्येय :

प्रस्थापित समाजव्यवस्थेतून संपूर्ण जातिव्यवस्था नष्ट करणे, स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणे आणि संपूर्ण शोषणमुक्ती ही विद्रोही सांस्कृतिक चळवळीची तीन प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. तसेच समतावादी जगाची निर्मिती हे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे प्रमुख ध्येय आहे.त्याच्या बोधचिन्हातच 'समतेला होकार, विषमतेला नकार' हे सूत्र असल्याचे दिसते.

एक मुठ धान्य आणि एक रुपयाची देणगी

महाराष्ट्र शासनामार्फत दरवर्षी साहित्य संमेलनासाठी निधी पुरविला जातो.विद्रोही साहित्य संमेलनाची परपंरा अनेक वर्षांपासून सुरु आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निधीवरअवलंबून न राहता 'एक मुठ धान्य आणि एक रुपया'ची देणगी विद्रोही मराठी साहित्य संमेलनासाठी जनतेकडून गोळा करून विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने महाराष्ट्रात दरवर्षी विद्रोही साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते.एखादी व्यक्ती जेव्हा 'एक मुठ धान्य आणि एक रूपया' विद्रोहीसाठी निधी म्हणून देते तेव्हा त्याच्या मनात अशी भावना तयार होते की, माझाही विद्रोहीसाठी हातभार लागला आहे. त्यामुळे ती व्यक्ती साहित्य संमेलनात सहभागी होते.

विद्रोहीची कार्यपद्धती:-

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने तरुण-तरुणींसाठी अभ्यास शिबिरे घेतली जातात. विद्रोही विद्यार्थी संघटना ही विद्रोहीची विद्यार्थी आघाडी असूनया मार्फत विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातात.विद्रोही

सांस्कृतिक चळवळीने अनेक प्रकारची आंदोलने केली आहेत.बडवे-उत्पात हटाव आंदोलन हे अतिशय महत्त्वाचे आंदोलन आहे. दरवर्षीवारकाऱ्यांसाठी आरोग्यसेवा पुरविल्या जातात. विद्रोहीच्या माध्यमातून पथनाट्य आणि शाहिरी या माध्यमातून प्रबोधन केले जाते. याशिवाय विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या मार्फत 'सम्यक विद्रोही' नावाचेनियतकालिक प्रकाशित केले जाते.

समारोप:

विद्रोही सांस्कृतिक चळवळ ही१९९९ पासून संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असूनविद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने विद्रोही साहित्य संमेलने संघटित करण्यात आली. त्यामुळेविद्रोही साहित्य संमेलन ही विद्रोही सांस्कृतिक चळवळीची एक खास ओळख बनलेली आहे. महात्माज्योतीराव फुले यांच्यापत्रातून विद्रोही साहित्य चळवळीला प्रेरणा मिळाली. विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्वच क्षेत्रात समतावादी साहित्य-संस्कृती आणि विचारधारेचा पुरस्कार करते. विद्रोही साहित्याच्या परिवर्तनाशी असलेला संबंध अतूट आहे. स्वातंत्र्य, समता आणि न्यायाशी नाते असणारे विद्रोही साहित्य हे बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर आणि साठे यांच्या चळवळीशी आणि संतांच्या चळवळीशी नाते सांगते. विद्रोही सांस्कृतिक चळवळीने महाराष्ट्रात आजपर्यंत एकूण १७ विद्रोही सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन यशस्वीपणे केले आहे. साहित्य निर्मिती, महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण यावर विद्रोही सांस्कृतिक चळवळीचा प्रभाव दिसून येतो. मात्रविद्रोही सांस्कृतिक चळवळ अजूनही साहित्य कला, उत्सव, सामाजिक सण इत्यादी क्षेत्रांच्या अंतर्गत जीवनाचा भाग झालेली नाही. तसेचअहंकार, आत्मस्तुती अशा अनेक कारणांनी आज पुरोगामी विद्रोही साहित्यिकांत व विचारवंतांत फूट पडली असून विद्रोही सांस्कृतिक चळवळीला फुटीचे तडे गेले आहे.

संदर्भ सूची:

१) सम्यक विद्रोही २००८
२) सम्यक विद्रोही २०१०
३) महाराष्ट्र टाइम्स २०१३
४) लोकमत २०२१
५) लोकसत्ता २०२२
६) लोकमत २०२३

*विभाग: समाजशास्त्र, श्री सिद्धिविनायक महिला महाविद्यालय, कर्वे नगर पुणे ५२
ईमेल आयडी : surwasekiran7@gmail.com संपर्क क्रमांक : ९९६००७०१३३

***

पर्यावरण संवर्धनात आणि ग्रामीण आत्मनिर्भरतेत पाणी फाऊंडेशन- वॉटर कप स्पर्धेचे योगदान

*डॉ. सुधीर आश्रुबा येवले

❖ **गोषवारा (Abstract):**

प्रस्तुत अभ्यास हा महाराष्ट्रात २०१६ पासून पाण्याच्या बाबतीतील लोकसहभागातुन शाश्वत विकासाकरिता सुरु झालेल्या सत्यमेव जयतेच्या पाणी फौंडेशनने वाटर कप स्पर्धे बाबतीत आहे. हा अभ्यास पाणी फौंडेशन वाटर कप स्पर्धेने मराठवाड्यात पर्यावरण संवर्धनात केलेले योगदान या संदर्भात आहे. हा अभ्यास करताना पाणी फाउंडेशन स्पर्धे निमित्ताने झालेल्या ग्राम स्वच्छता, शोषखड्डा, जल व्यवस्थापन, आगपेटी मुक्त शिवार, कुऱ्हाड बंदी, विहिरीची पाणी पातळीतील वाढ, सिंचन क्षेत्रातील वाढ, पीक पद्धतीतील बदल यामुळे शेतकऱ्याच्या आर्थिक उत्पन्नातील वाढ इत्यादी बाबी स्पर्धेत सहभागी पुरस्कार प्राप्त गावातील १३५ प्रतीसाद्कांचा अभ्यास करून निष्कर्ष काढले आहेत. हा अभ्यास करताना मुलाखत अनुसुचीचा वापर करून प्राथमिक माहिती मिळवली व बहुप्रतिसादक सारणीच्या आधारे प्राप्त प्राथमिक माहितीचे विश्लेषण केले असून पर्यावरण संवर्धन करताना पाणी फाउंडेशन वाटप स्पर्धेने गावात शोषखड्डा ते कुऱ्हाड बंदी व समृद्ध गाव स्पर्धेतील सहभाग इथपर्यंतचा प्रवास पाणी फाउंडेशन मधील लोकसहाभागामुळे होउन ग्रामीण भागात शाश्वत विकासाला चालना मिळाल्याचे दिसून येते.

मुख्य शब्द(Key words) : शाश्वत विकास, लोकसहभाग, जल व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन

❖ **प्रस्तावना (Introduction):**

पर्यावरण संवर्धन काळाची गरज असून याकरिता विविध सामजिक चळवळी सुरु असून त्यापैकी पाणी फौंडेशन वाटर कप ही चळवळ सुरु झाली असून या लोक सहभागाच्या माध्यमातून सुरु झालेल्या चळवळीचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात केला आहे. मानवाच्या मुलभूत गरजांपैकी पाणी ही सर्वात महत्वाची गरज मानली जाते. त्यामुळेच पाण्याला जीवन म्हटले जाते. पाण्याशिवाय सजीव प्राणी जिवंत राहू शकत नाहीत. वाढती लोकसंख्या आणि त्यांची पाण्याची गरज भागविण्यात सध्या खूप मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यातच पाण्याचे प्रदुषण, सततचा दुष्काळ, पाण्याचा अनियोजित वापर इत्यादींमुळे पाण्याची तीव्र टंचाई जाणवते. मानवनिर्मित व निसर्गनिर्मित कारणामुळे महाराष्ट्रात आजपर्यंत १९७२, १९९१, २०१२, २०१६ व २०१९ मध्ये मोठे दुष्काळ पडले होते. २०१९ च्या पूर्वीच्या दुष्काळापर्यंत अन्नधान्याची टंचाई जाणवत होती. परंतु अलिकडील काळात अन्नधान्याऐवजी पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई दिसून येऊ लागली आहे. मागील दुष्काळात आणि अलिकडच्या दुष्काळात हा फरक दिसून येतो. अभिनेता अमीर खान आणि किरण राव यांनी २०१६ साली "पाणी फाउंडेशन" या संस्थेची स्थापना करून महाराष्ट्रातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रश्न पुढे नेण्याचा निर्णय झाला आणि सत्यमेव जयते वॉटर कप या जलसंधारणाच्या स्पर्धेचा जन्म झाला. हि चळवळ केवळ पाणी अडवा पाणी जिरवा इतकी मर्यादित नसून ग्रामीण भागात पर्यावरण संवर्धनात महत्वाची लोक चळवळ सुरु केली.

२०१६ पासून ३ तालुक्यांपासून सुरू झालेली वॉटर कप स्पर्धा १०१९ पर्यंत ७६ तालुक्यामध्ये झाली. गावागावातून मोठ्या संख्येने गावकरी श्रमदान करण्यासाठी माळरानावर जमत होते. हसत खेळत हे अंगमेहनतीचे काम करत होते. स्त्री पुरुष, लहान मुलं, दिव्यांग, वृद्ध अशा सर्वांनी कुदळ-फावडे हातात घेऊन ४५ दिवस कष्ट केले. पाणी फाउंडेशनचा उद्देश म्हणजे महाराष्ट्र अगदी तांत्रिक पद्धतीने दुष्काळमुक्त करणे. यासाठी गावांमध्ये वॉटर कप नावाची स्पर्धा घेतली जाते. जे गाव जास्तीत जास्त जलसंधारणाची कामे करेल म्हणजेच पाणीसाठवण क्षमता निर्माण करेल. तो गाव यात विजयी ठरतो. हे करताना सर्वच गावे काही न काही काम करत दुष्काळापासून मुक्त होतच असतात म्हणजे सर्व गावे विजयी होत असतात हे करताना जसं गावातली लोक श्रमदान करतात तसंच जोवर या चळवळीमध्ये समाजातील सर्व स्तरातील लोक सहभागी होत नाहीत तोवर हे काम पूर्ण होणार नाही यासाठी पाणी फाउंडेशनने लोकांचे अगोदर मनसंधारण केले.

पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून लोकसहभागात्मक मार्गाने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. आणि हे सर्व लोकाच्या माध्यमातून, त्यांच्या सहकार्याने राबविले जातात. यासाठी लोकांच्या मनात समस्या सोडविण्याची प्रेरणा निर्माण केली जाते. लोकांना त्या दृष्टीने प्रशिक्षण दिले जाते. त्यांच्या सहकार्यानेच संसाधनाची जुळवाजुळव केली जाते म्हणून पाणी फाऊंडेशनची आवश्यकता आज मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. गाव पातळीवर स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने त्यांच्या सहकार्याने सहभागात्मक पद्धतीचा वापर करून जलसंवर्धनाचे कार्य ते करत आहेत. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून लोकात स्थानिक प्रश्न सोडविण्याची इच्छाशक्ती निर्माण केली जाते. त्यांना त्या दृष्टिकोनातून प्रशिक्षण दिले जाते. नेतृत्वाची क्षमता त्यांच्यात निर्माण केली जाते. आणि एक वेगळ्या दृष्टिकोनातून पाण्याच्या ह्या आव्हानाला भिडण्याची क्षमता लोकांत निर्माण करण्याचे कार्य पाणी फाउंडेशन करीत आहे. जलसंधारणासोबतच गावकऱ्यांमध्ये मनसंधारण झाले. आपापसातील वाद, राजकीय मतभेद विसरून स्पर्धेच्या निमित्ताने गावकरी एकत्र आले. या गावकऱ्यांनी एकत्र येत श्रमदानातून स्वतःच्या गावात जलसंधारणाचे उपचार उभे केले. पावसाने त्यांच्या श्रमाला साथ दिली आणि कोट्यवधी लिटर पाणी भूगर्भात जिरले. गावाची पाणीपातळी वाढली.

वॉटर कप स्पर्धेत शास्त्रशुद्ध पाणलोट व्यवस्थापनाबरोबरच सांडपाण्याचा वापर, वृक्ष संवर्धन, श्रमदान, यंत्राचा वापर, माथा ते पायथा उपचार पद्धती, कामाची गुणवत्ता, माती परीक्षण, आगपेटी मुक्त शिवार, पाणीबचत तंत्रज्ञान, शोषखड्डा, वॉटर बजेट, कुऱ्हाडबंदी व चराईबंदी, पर्जन्यमापक यंत्र आणि जुन्या रचनाची दुरुस्ती करणे अशा कामाला एकूण १०० गुण देऊन गावकऱ्यांमध्ये स्पर्धा लावली जाते. पाण्याचे मानवनिर्मित व काही अंशी अज्ञानातून उद्भवलेल्या संकटावर मात करण्यासाठी पाणी फाउंडेशन लोकसहभागात्मक मार्गाचा अवलंब करीत आहे. लोकांचे प्रश्न लोकांच्या माध्यमातून सोडवणारी लोकसहभागात्मक चळवळ असल्याने पाण्याचा प्रश्न सोडविताना चांगले यश मिळाल्याचेही दृष्टीस पडत आहे. त्याकरिता लोकांच्या मनात प्रश्नाविषयी जागृती निर्माण झाली व केली जात आहे. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला जात आहे. समुदायातील लोकांना प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून लोकांचे सक्षमीकरण केले जात आहे. ४५ दिवसांच्या कालावधीत सी. सी. टी., डीप सीसीटी, माती आणि सिमेंट बंधारे, विहिरी पुनर्भरण, एल. बी. एस., बोअरवेल पुनर्भरण, शोषखड्डा, तलाव, शेततळी इत्यादी जलसंधारणाच्या उपचारा बद्दलचे तंत्रशुद्ध ज्ञान, त्यातील तांत्रिक बारकावे सर्वसामान्य गावकऱ्यांपर्यंत पोहोचावे यासाठी पाणी फाउंडेशनने स्पर्धेत निवडलेल्या तालुक्यांच्या गावांना ट्रेनिंग द्यायला सुरुवात केली.

❖ **संशोधनाचे महत्व (Importance of study) :**

पर्यावरण संवर्धन आणि रासायनिक शेतीकडे वाढता कल लक्ष्यात घेऊन पाणी फौंडेशन वाटर कप स्पर्धा ही समस्या सोडवणुकीसाठी प्रयत्नशील असल्यामुळे आणि ही पाणी चळवळ लोकसहभागावर आधारित असल्याने अभ्यासलेल्या मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील २२ तालुक्यातील २७ गावातील पर्यावरण संवर्धनात या चळवळीनची काय भूमिका होती, हे अभ्यासणे महत्वाचे वाटले.

❖ **संशोधनाची उदिष्ट्ये (Objectives of Study):**

पर्यावरण संवर्धनात पाणी फौंडेशन वाटर कप लोकचळवळीची भूमिका अभ्यासताना,

१) पर्यावरण संवर्धन करताना ग्रामस्वच्छता, जल व्यवस्थापन, आगपेटी मुक्त शिवार, कुऱ्हाड बंदी याविषयी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे:

२) पर्यावरण संवर्धन करताना केलेल्या उपाय योजनांचा शेतकऱ्याला झालेल्या फायद्याचा अभ्यास करणे, या संशोधन उदिष्ट्ना अनुसरून हा अभ्यास केला आहे.

❖ **संशोधन पद्धती (Research Methodology) :**

प्रस्तुत अभ्यास करताना सामजिक संशोधन पद्धतीचा वापर केला असून हा अभ्यास प्राथमिक माहितीवर अवलंबून आहे. प्राथमिक माहिती संकलनाकरीता मुलखात अनुसूचीचा वापर केला असून मराठवाड्यातील ८

जिल्ह्यातील २२ तालुक्यातील २७ गावातील १३५ प्रतीसादकाकडून माहिती संकलित केली व बहुप्रतीसाद्क सारनीकरणच्या आधारे माहितीचे विश्लेषण करताना टक्केवारीचा आधार घेतला आहे.

❖ **अभ्यास क्षेत्र (Research Area):**

पाणी फाउंडेशन २०१६ पासून महाराष्ट्र भर राबवण्यात येत असून २०१६ ते २०१९ या दरम्यान राबवण्यात आले. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील ज्या गावांना राज्य आणि तालुका पातळीवरील प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिक मिळाले आहे, अशा मराठवाड्यातील २२ तालुक्यातील २७ गावातील १३५ सरपंच, उपसरपंच, जलदूत आणि पाणी फौंडेशन चळवळीतील सक्रीय कार्येकर्त्यांचा अभ्यास केला आहे.

❖ **अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा (Scope and Limiteation of Study) :**

प्रस्तुत अभ्यास हा मराठवाड्यापुरताच मर्यादित असून पाणी फौंडेशन वाटर कप स्पर्धा राबवताना पर्यावरण संवर्धन करताना कोणती भूमिका होती व या भूमिकेचा ग्रामस्थांना कोणता फायदा झाला या उद्दिष्टा पुरताच मर्यादित आहे.

❖ **अभ्यासाचा कालखंड (Period Of Study) :** प्रस्तुत अभ्यास हा २०१६ ते २०१८ दरम्यान वाटरकप स्पर्धेत सहभागी गावांचा २०२०-२१ या दरम्यान करण्यात आला आहे.

❖ संकलित माहितीचे विश्लेषण:

सारणी क्र. १

पाणी फाउंडेशन वाटर कप गावात राबवताना पर्यावरण संवर्धन करताना केलेल्या उपाययोजना

अ.क्र.	पर्यावरण संवर्धन करताना केलेल्या उपाययोजना	होय		नाही	
		एकूण (१३५ पैकी)	%	एकूण (१३५ पैकी)	%
१	ग्राम स्वच्छतेची सवय	१३१	९७.०३	०४	०२.९७
२	शोषखड्डा घरोघरी आणि परस बाग	१२७	९४.०७	०८	०५.९३
३	जल व्यवस्थापन	१३२	९७.७७	०३	०२.२३
४	आगपेटी मुक्त शिवार	१३५	१००	००	००.००
५	कुऱ्हाड बंदी	१३४	९९.२५	०१	०.७५
६	पीक पद्धतीतील बदल	१३३	९८.५१	०२	०१.४९

(बहुप्रतीसादक सारणी)

सारणी क्रमांक १ वरून पाणी फाउंडेशन वॉटर कप स्पर्धा गावात राबवताना पर्यावरण संवर्धनाची काळजी घेत असताना ग्राम स्वच्छतेची सवय ग्रामीण भागात ९७ टक्के गावांना लागल्याचे दिसून येते. शोष खड्डा घरोघरी व परसबाग ही संकल्पना अभ्यासलेल्या सर्व गावात आजही सुरू आहे. पर्यावरण संवर्धनाकरिता आगपेटी मुक्त शिवार व कुऱ्हाडबंदी हेही जवळपास सर्व गावांनी केलेली असून, पाणी वाचवण्याकरिता पीक पद्धतीत बदल घडूनही आणलेला आहे. अर्थातच जल व्यवस्थापन करण्यामध्ये व पर्यावरण संवर्धनामध्ये या गावांची भूमिका व वाटप स्पर्धा महत्त्वाची ठरलेली आहे.

सारणी क्र. २

पर्यावरण संवर्धनातील भूमिकेचा ग्रामस्थांना झालेला फायदा

अ.क्र.	पर्यावरण संवर्धनातील भूमिकेचा ग्रामस्थांना झालेला फायदा	होय		नाही	
		एकूण (१३५ पैकी)	%	एकूण (१३५ पैकी)	%
१	टँकर मुक्त गाव	१३३	९८.५१	०२	१.४९
२	विहिरीची पाणी पातळी वाढली	१३५	१००	००	००.००
३	सिंचन क्षेत्रात वाढ	१३१	९७.०३	०४	२.९७
४	जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न कमी	१३५	१००	००	००.००
५	दुग्ध व्यवसायात वाढ	१३२	९७.७७	०३	२.२३

(बहुप्रतीसादक सारणी)

सारणी क्रमांक २ चे निरीक्षण केले असता पाणी फाउंडेशन वॉटर स्पर्धेने सुरू केलेल्या पर्यावरण संवर्धनाच्या भूमिकेचा फायदा शेतकऱ्यांना होताना दिसून येतो. पाणी आडवा पाणी जिरवा या तंत्रशुद्ध तंत्रज्ञानामुळे विहिरींची पाणी पातळी वाढली व जवळपास ९९ % गावे ही टँकर मुक्त झाली असून सिंचन क्षेत्रातही वाढ झाल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न कमी होऊन ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायात वाढ झाल्याचे दिसून येते.

❖ **निष्कर्ष (Conclusion)**

गावातील अर्थ व्यवस्था हि कृषी प्रधान असल्याने व आता मोठे प्रकल्प व त्यातून होणारे विस्थापन हा मोठी समस्या बनत असल्याने स्मॉल इज ब्युटीफुल या सिद्धांतानुसार आता लहान लहान प्रकल्पावर भर देऊन पाणी प्रश्न सोडवावा लागेल आणि तेच पाणी फौंडेशन वाटर कप स्पर्धेने लोकसाहाभाग चळवळीत सक्रीय सहभागी होऊन लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण दुवा असणारी ग्रामसभा, पुन्हा ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू ठरण्यास मदत होऊन स्मॉल इज ब्युटीफूल या न्यायाने पर्यावरण संवर्धनात आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता या वॉटर कप स्पर्धेने ग्रामीण भागात एक लोक चळवळ सुरू केली असून या लोक चळवळीमध्ये ग्रामस्वच्छता अभियान प्रकर्षाने राबवून लोकांना ग्राम स्वच्छतेची सवय लावण्यास त्याचबरोबर ग्रामस्वच्छतेमध्ये शोषखड्ड्याचे महत्त्व व पाणी जिरवण्याचे महत्त्व असल्याने प्रत्येक घरोघरी शोष खड्डे घेऊन या बरोबरच सांडपाण्याचा वापर करून परसबाग पुन्हा फुलवण्याचे काम या स्पर्धेने केली आहे. एवढेच नव्हे तर ग्रामीण भागामध्ये अनेक वेळा अनावश्यक शेतीमधील साहित्य उदा. पालापाचोळा, ऊसाचे पाचट जाळून टाकण्यात येत असे परंतु याचा उपयोग व अनावश्यक शेतीतील साहित्याचा उपयोग सेंद्रिय खत निर्माण करण्याकरिता केला जाऊ लागला. त्यामुळे शेतकऱ्यांना सेंद्रिय खतही मिळाले व शेतीतील कचरा जाळल्यामुळे शेतीमधील अवश्यक जीवजंतू नाहीशे होत असत. वृक्षारोपण ही महत्त्वाची चळवळ वाटर स्पर्धेमध्ये असून त्याकरिता गावांमधील कोणतेही वृक्ष तोडायचे नाही याकरिता कुऱ्हाड बंदी ही करण्यात आली. त्याचबरोबर उसासारखी पाणी जास्त लागणारी पिके ग्रामीण भागात घेतले जात असल्याने पाणी प्रश्न नेहमीच निर्माण होतो. याकरिता कमी पाण्यावर येणारी पिके घेण्याकरिता पाणी फाउंडेशन वाटर कप स्पर्धेने प्रेरणा दिली असून ग्रामीण भागात पीक पद्धतीतही बदल करण्यात आलेला आहे. त्यामुळे पाणी अडवण्याबरोबरच पाणी वाचवण्याकरिता सुद्धा लोकांमध्ये जनजागृती करण्याच काम या वॉटर कप स्पर्धेने केलेले आहे. एवढेच नव्हे तर याचा फायदा विहिरींची पाणी पातळी वाढण्यात होऊन उन्हाळयामध्ये टँकर लागणाऱ्या गावांची टँकर मुक्ती झाली. पाणी आडवा आणि पाणी जिरवा या शास्त्रशुद्ध पद्धतीमुळे गावातील पाणी गावातच अडवले गेल्यामुळे पाण्याची पातळी वाढली तेवढेच नव्हे तर ही वाढलेली पातळी टिकवण्याकरिता बोरवेल वर बंदी सुद्धा घालण्यात आलेली आहे. एकंदरीतच या चळवळीमुळे ग्रामीण भागात सिंचन क्षेत्र वाढल्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणावर कमी होऊन ग्रामीण भागामध्ये शेती व्यवसायाला पूरक असा व्यवसाय असणाऱ्या दुग्ध व्यवसायात वाढ झाली व ग्रामीण भागात सुबत्ता येण्यास वाटप स्पर्धेने मदत झाली असल्याचे प्रस्तुत अभ्यासावरून दिसून येते.

❖ **संदर्भसूची (References):**

१. रमेश पाध्ये आणि अमित नारकर, महाराष्ट्रातील पाण्याचा प्रश्न एक शोधयात्रा, द युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे.

२. प्रज्ञा पवार, तुकाराम जाधव, विजय कुंजीर, अभय कांता (संपादित) (२०१३): महाराष्ट्रातील दुष्काळ (टंचाई पाण्याची आणि शेती उसाची) - (परिवर्तनाचा वाटसरू), द युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा. लि. पुणे.

३. कुलकर्णी दिलीप (२००३): वेगवेगळया विकासाच्या वाटाड्या; राजहंस प्रकाशन, पुणे.

४. धनागरे द. ना. (२००५): संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव; प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५. लढा दुष्काळाशी (२०१३) : ॲग्रोवन कृषी ज्ञानमाला, सकाळ पेपर प्रा. लि. पुणे.

६. भवताल दिवाळी अंक २ (०२१): भूजल विशेषांक, भवताल प्रकाशन, पुणे.

७. https://www.paanifoundation.in

८. पाणी फाऊंडेशनच्या ॲप

*समाजशास्त्र विभागप्रमुख, कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर (का) जि. बीड,

संपर्क न.: ९६८९०६६८४६, ई मेल :syevle6@gmail.com

***

ए.व्ही.एच. केमिकल्स कंपनीच्या कोलटार डिस्टिलेशन प्रकल्पाच्या विरोधातील चंदगड तालुक्यातील जनआंदोलन.

*प्रा.सदाशिव नाना पाटील,

समाजात जेव्हा विशीष्ट परिस्थिती निर्माण होते आणि ती परिस्थीती समाजातील बहूसंख्य लोकाना जाचक. हानीकारक वाटते तेव्हा त्या परीस्थीत बदल घडवून आणण्यासाठी किंवा त्या परिस्थितीला विरोध करण्यासाठी समाजातील बहूसख्य लोक उर्स्फुतपणे एकत्र येतात. आणि त्या परिस्थितीला विरोध करतात. तेव्हा समाजात सामाजिक चळवळ निर्माण होते.

सामाजीक आंदोलणाचा भाग म्हणून चंदगड तालुक्यात निर्माण झालेल्या ए.व्ही.एच केमिकल्स कंपनीच्या कोलटार डिस्टीलेशन विरोधातील जन आंदोलन.

कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुका हा कर्नाटक राज्याच्या सिमेवर आहे. कोल्हापूर पासून १३० कि.मी. अंतरावर चंदगड तालुका आहे. संपुर्ण चंदगड तालुका पश्चिम घाटाचा भाग आहे. चंदगड हे तालुक्याचे ठिकाण आहे. चंदगड पासून २२ कि.मी अंतरावर आणी बेळगांव पासून २३ कि.मी अंतरावर पाटणे फाटा आहे. पाटणेफाटापासून १.५ किमी अंतरावर हलकर्णी औदयोगिक वसाहकतीमध्ये ए.व्ही.एच केमिकल प्राव्हेट लिमीटेड या कंपनीने कोलटार डिस्टीलेशन प्लॅट उभा केला आहे.हा प्रकल्प प्रदुषणकारी आहे. या प्रकल्पाचा धोका मानव मानवेत्तर प्राणी वनस्पती यांच्यावर होणार असल्याने या प्रकल्पाला चंदगड तालूक्यातून प्रथम पासून विरोध झाला आहे. चंदगड तालुका विनाशापासून वाचवण्यासाठी या प्रकल्पाला विरोध होत आहे.

➢ उददेश

१. ए.व्ही.एच प्रकल्पाची माहिती घेणे.
२. ए.व्ही.एच प्रकल्पाच्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. समाजिक आंदोलणाची पार्श्वभुमी समजावून घेणे.

➢ गहीतकत्ये

१. ए.व्ही.एच प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी झाली
२. ए.व्ही.एच प्रकल्पाची चुकिच्या पध्दतीने उभारणी झाली.

➢ अभ्यासपध्दती

प्रस्तूत शोध निंबधासाठी प्रामुख्याने प्राथमिक व दुयम सामग्रीवर भर देण्यात आला आहे. प्राथमिक सामग्रीमध्ये समाजातील विविध सामाजीक कार्यकर्ते राजकीय व्यक्ती अभ्यासू व्यक्ती यांच्या मुलाखती घेवून माहिती गोळा केली आहे. दुयम सामुग्रीमध्ये वेगवेगळी वर्तमापत्रे मासिके यांचा आधार घेवून माहीती गोळा केली आहे.

➢ तथ्यांचे विश्लेषन

हलकर्णी औदयोगिक वसाहती पासून १० किमी चा परीसर पर्यावरणीयदष्टया अत्यंत संवेदनशिल असून अत्यंत समध्द अशी जैवविविधता आहे. या परिसरात सुमारे २२२७ वनस्पती आहेत. त्यापैकी १३६ प्रजाती धोकादायक यादीतील आहेत. या परीसरात जवळपास ६०० औषधी वनस्पती आहे. १४७ प्रकारचे सस्तन प्राणी २६४ प्रकारचे पक्षी ५९ प्रकारचे सरपटणारे जीव ६६ प्रकारची फुलपाखरे आहेत. अनेक प्रकारचे जलचर येथे आहेत. याच परीसरात वाघ, हत्ती,अस्वल,गवा,वनगायी, स्लेडर लोरीस, ढोलकुत्रे, ससा, हरण, भेकरे, शेखरू यासारख्या प्राण्याचे वास्तव आहे. या परीसरात गंधर्वगड, पारगड, काळा नंदीगड, महिपाळगड या किल्याबरोबर स्वप्नवेल पाईट, पारगड पाईट इ. प्रेक्षणीय स्थळे आहेत. तसेच गोवा आंबोली जवळ असलयाने पर्यटन क्षेत्र म्हणून तालुका विकसीत होत आहे. मुबलक पाणी स्वच्छ हवामान वर्षाला सुमारे २५०० मिलीमिटर इतका पाउस पडतो सुपीक व कसदार जमीन असल्यामुळे उस भात, नाचना, भुईमुग, भाजीपाला, बटाटा, रताळी यासारखी पिके घेतली जातात. काजू, आंबा, फणस, यांच्या फळबागा मोठा प्रमाणावर आहेत. मुबलक पाणी बारामहिने पिके यामुळे येथील दुग्ध व्यवसाय भरभराटीला आला आहे. शेतीबरोबर उदयोग व्यवसाय वाढीस लागावा. शेतीपूरक उदयोग निर्माण व्हावेत म्हणून महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाने हलकर्णी येथे

औदयोगिक क्षेत्राची निर्मीती केली आहे. याच औदयोगिक क्षेत्रात ८५ एकर जागेत ए.व्ही.एच केमीकल्स कंपनीचा कोलटार डिस्टीलेशन प्रकल्प उभा आहे.

➢ **प्रकल्पाचे स्वरूप**

ए.व्ही.एच केमीकल्स कोलटार डिस्टीलेशन कारखान्याची वार्षीक क्षमता १,५०,००० हजार मे.टन कोलटार डिस्टीलेशनची आहे. त्यामधून प्रत्येक वर्षी पुढील केमीकल्स तयार होतात.

१. १५००मे.टन नॅपथॅलिन
२. ८२,५०० मे.टन कोलटार पिच
३. २२,५०० मे.टन लाईट ऑईल
४. २२,५०० मे.टन हेवी आईल

➢ **प्रकल्पासाठी साधन सामुग्री**

सदर प्रकल्पासाठी ताशी ३० घनमिटर पाणी ८०० किलो वॅट विज आणि ३० टन इंधन (डिझेल) प्रतिदिन लागणार आहे. तसेच दरमहा १२,५०० टन कोलटार ५६५ टन कॉस्टिक सोडा ३१० टन फार्म लाड हाईड ३३५ टन सल्फूरीक ॲसीड वापरले जाणार आहे. सदर प्रकल्पासाठी १८० कोटी रुपये इतका खर्च आला आहे.

➢ **कच्चा माल**

सदर प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल (कोलटार) कर्नाटकातून सुमारे ३५० किमीवरुन विजयनगर तोरंगल्लू जि. बेल्लारी येथून टॅकरव्दारे आणला जातो.

➢ **पक्का माल**

सदर प्रकल्पामध्ये तयार होणारे केमीकल्स २१२ किमी वरील जयगड बंदर येथून परदेशात जाणार आहे.

➢ **कर्मचारी वर्ग**

सदर प्रकल्पासाठी अधिकारी व कर्मचारी मिळून ४२ कर्मचारी वर्ग आहेत.

➢ **परिणाम**

ए.व्ही.एच केमीकल्स कोलटार डिस्टीलेशनमुळे पुढील परिणाम होणार आहेत.

१. कोलटार १८० ते २०० अंश से. तापमाणाला उकळल्यानंतर बेन्झीन, टोलीन, झेलीन हे हलके ऑईल तयार होते. त्यामुळे हवेत परसलेल्या वायूमुळे अस्तमा, दमा , डोळे चुरचुरणे हे आजार होतात.
२. कोलटार २२० ते २३० अंश से. तापमाणाला उकळल्यानंतर नॅपथॅलीन आईल तयार होते त्यामुळे हवेत पसरणारया वायुमुळे फुफुसाचा व स्तनाचा कर्करोग होतो. मुले जन्मजात मतिमंद, अपंग, निर्माण होतात. गरोदय स्त्रियाना वेळेपूर्वी प्रस्तूतीला सामोरे जावे लागेल.
३. कोलटार ३०० ते ४५० अशं से तापमाणाला उकळल्यानंतर ॲथरासिन ऑईल तयार होते. तयार होणाऱ्या वायूपासून मुले गर्भातच मतीमंद , लुळी ,पांगळी, पुरूष नपूसकत्व हे आजार होतात.
४. कोलटार जाळण्यासाठी दिवसाला ३० टन डिझेल लागते त्यामुळे उष्णता वाढून कार्बन डायऑक्साईट वायू तयार होतो. त्यामुळे सर्व पिके ,फळबागा नष्ट होती काजू, आंबा , फणस यांच्या फलधारणेवर परीणाम होतो.
५. सदर प्रकल्पासाठी लागणारे पाणी जवळच्या जंगमहटटी लघूप्रकल्पातून घेतले जाते. प्रक्रिया झालेले दुषीत पाणी ताम्रपर्णी नदीत सोडले जाणार त्यामुळे पाणी प्रदुषणाची समस्या निर्माण होउन पाण्यातील जिवजंतू नष्ट होणार आहेत.
६. कोलटार डिस्टीलेशन मधून CO2, CO, SO2, NOX, PM, NH3 ACID mist.voc इ. विषारी वायू बाहेर पडणार.
७. कोलटार डिस्टीलेशन मधून बाहेर पडणा या रासायनिक पदार्थाचा परीणामाचा अभ्यास जागतीक स्तरावर झाला आहे. त्यानुसार ही रसायने घातक असून त्याचा जिवसष्टीवर परीणाम होतो. उदा. डोळे चुरचुरणे, त्वचेला खाज सुटणे, मोती बिंदू होणे, डोळे दुखणे, डोके जड होणे, उलटया होणे, अतिसार, रक्तातील पेशीचे प्रमाण अचानक घटणे इ.आजार सुरवातीला जाणवतात. त्यानंतर शरीरातील पांढ या पेशींची संख्या कमी झाल्याने शरीराची रोगप्रतिकारक शकती कमी होते. परीणामी ॲनीमिया, हगवण, भुक मंदावणे, ताप येणे, पोटात दुखणे, लघवी करताना जळजळ होणे.इ आजार

होतात . तसेच त्वचेचा, यकताचा मुत्राशयाचा, तोंडाचा किंवा पोटाचा कॅन्सर होउ शकतो . तसेच रक्ताचा कॅन्सर होउ शकतो. असे जागतीक आरोग्य संघटनेचे मत आहे.

८. सल्फुरीक ॲसीड मुळे आम्लयुक्त धुके तयार होईल किंवा आम्लयुक्त पाउस पडतो.

९. सदर प्रकल्पापासून हवाई २५ किलोमिटर पर्यत या प्रकल्पाचा परीणाम होईल त्यामुळे हवा, पाणी, जमीन प्रदुषण होते. तसेच जवळच्या बेळगांव शहरावर ही परीणाम होउु शकतो.

१०. सदर प्रकल्पाच्या दुष्परीणामामुळे चंदगड तालुक्यातील जैवविविधता नष्ट होईल.

➢ **जनआंदोलकांचा आक्षेप**

वरील परीणामांचा विचार करून सदर प्रकल्पाला चंदगड तालुक्यातून हददपार करण्यासाठी व पर्यावरणाच्या बचावासाठी ए.व्ही.एच केमीकल्स कंपनी विरोधी जन आंदोलन झाले आहे त्याची कारणे पुढीलप्रमाणे.

१ सदर प्रकल्पाला शासनाच्या पर्यावरण विभागाने २० मार्च २०१२ च्या पत्राने मंजूरी दिली प्रदुषण नियंत्रण मंडळाने २५ जुर्ले २०१२ ला ना हरकत दाखला दिला. परंतू मोठया प्रमाणात प्रदुषण करणा या या कारखान्याला मंजूरी देताना जन सुनावणी होणे आवश्यक होते. पंरतू जन सुनावणी झाली नाही.

२ कंपनीने ६ डिसेंबर २०१० रोजी औदयोगिक विकास महामंडळाकडे सदर प्लॉटसाठी अर्ज केला पंरतू औदयोगिक विकास मंडळाने सदर प्रकल्प हा घातक रसायने तयार करणारा असल्याने पर्यावरण मंडळाचा ना हरकत दाखला मागीतला कंपनीने पर्यावरण मंडळाला खोटी व बनावट माहीती देउुन ना हरकत दाखला मिळवला.

३ केमीकल्स झोनमध्ये समाविष्ट नसलेल्या चंदगड मध्ये हा प्रकल्प येत नाही. त्यासाठी कंपनीने प्रकल्पाचा पत्ता चुकीचा दाखवला आहे. गडहिंग्लज तालूकयातील हलकर्णी गावचा पत्ता दाखवून चंदगड तालुक्यातील संवेदनशील क्षेत्रातील हलकर्णी औदयोगिक वसाहतीत प्रकल्प सूरू केला आहे.

४ सदर प्रकल्प हा महाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या सिमेवर येत असल्याने सदर प्रकल्पाला परवानगी केंद्र सरकारची असावी लागते. परंतू कंपनीने खोटी माहीती देउुन महाराष्ट्र राज्याची परवानगी घेतली आहे.

५ वरील परीणामाचा विचार करता या प्रकल्पामुळे येथील पर्यावरणाला धोका आहे त्यामुळे येथील जैवविविधता नष्ट होईल आणि सजीवाना वेगवेगळे आजार होतील.

६ कंपनीने सुरवातील ३५०० तरणांना नोक या देणार अशी जाहीरात बाजी केली होती. परंतू प्रत्यक्षात ४२ लोक कर्मचारी म्हणून लागणार आहेत.

➢ **आजपर्यंत झालेली आंदोलने**

ए.व्ही.एच हटावसाठी आजपर्यत चंदगड तालुक्यात व कोल्हापूर जिल्हात वेळोवेळी जन आंदोलने झाली आहेत.

१. हलकर्णी औदयोगिक वसाहतीतील ए.व्ही.एच केमीकल्स प्रकल्प बंद करण्यासाठी चंदगड तालुक्यातील जनतेने २८ डिसेंबर २०१२ रोजी कडकडीत हडताळ पाडून न्यायमुर्ती श्री. कोळसे पाटील यांच्या नेत?त्वाखाली पाटणेफाटा येथे मेळावा घेतला सदर मेळाव्याला २०,००० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. सदर मेळाव्या दिवशी काही आंदोलकानी कंपनी कार्यालयावर हल्ला करून कार्यालयाची मोडतोड साहीत्याची मोडतोड जनरेटरला आग लावली या प्रकरणी २३ आंदोलकावर गुन्हा नोंद झाला त्यापैकी कित्येक आंदोलक मेळाव्याला उपस्थीत नव्हते.

२. ९ जानेवारी २०१३ रोजी जिल्हा अधिकारी राजाराम माने यांनी चंदगड तहसिल कार्यालय, येथे जन आंदोलकांची बैठक घेतली या बैठकीला प्रांताधिकारी विवेक आगवणे उपस्थित होते.

३. २३ जानेवारी २०१३ पासून कंपनी विरोधात धरणे आंदोलने करण्यात आली. परंतू शासनाने जमाव बंदी आदेश लागू केल्याने ५ फेबुवारी २०१२ पासून आंदोलन स्थगीत करण्यात आले. सदर जन आंदोलनामध्ये सर्वपक्षीय लोक आहेत. त्यामध्ये माजी आमदार नरसिंगराव पाटील,प्रा. एन.एस.पाटील, आमदार संध्यादेवी कुपेकर, नंदाताई बाभुळकर,संग्राम कुपेकर,रामराजे कुपेकर यानी कषीमंत्री शरद पवार याना हा प्रकल्प बंद करण्यासाठी साकडे घातले.

४. २० जानेवारी २०१३ रोजी शिवसेनेमार्फत प्रदुषण नियंत्रण मंडळावर मोर्चा काढला

५. १७ जानेवारी २०१३ ला जनता दलाने प्राताधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले. सदर जनआंदोलनामध्ये दलित महासंघ, श्रमीक मुक्तीदल, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना, मनसे, राष्ट्रवादी कॉंग्रेस, राष्ट्रीय कॉंग्रेस अशा सर्व पक्षानी भाग घेतला.

६. २५ जानेवारी २०१३ रोजी रात्री जन आंदोलनाकानी कंपनीवर हल्ला करून जाळपोळ केली त्यामूळे जनरेटर,डोजर,चार डंपर, दोन पोकलॅन्ड, जाळले गेले ५ कामगाराना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी १५० जनांवर गुन्हा नोद करण्यात आला. तसेच आंदोलन कर्ते रवि पाटील याना अटक झाली त्यांना ६ महिने तुरुगवास भोगावा लागला तर काही आंदोलन कर्ते भुमीगत होते.

७. २४ एप्रील २०१३ रोजी मनसेने पाटणे फाटा येथे रस्ता आंदोलन केले.

८. ३ एप्रील २०१३ रोजी उपमुख्यमंत्री अजीत पवार यानी मुंबईच्या बैठकीत कारखाना बंद करणार अशी हमी दिली. तेव्हा चंदगड तालुक्यात फटाके वाजवून आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

९. २४ एप्रील २०१३ रोजी राष्ट्रवादी कॉग्रेसने मेळावा घेवून आंदोलन केले.

१०. ४ जून २०१३ रोजी शिवसेनेने पाटणेफाटा येथे दिंडी मोर्चा काढला.

११. २७ मे २०१३ ला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला तेव्हा आंदोलन कर्त्यानी कार्यालयाची तोडफोड केली म्हणून ७० जणांना अटक झाली. कोल्हापूर जिल्हा परीषद, चंदगड पंचायत समीती, गडहिग्लज पंचायत समीती यांच्या सर्वसाधारण सभेत कंपनी बंद करण्यासाठी एकमताने ठराव करण्यात आला.

१२. २५ मे २०१३ ला सर्व पक्षाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले अडीच तास वाहतूक ठप्प होती.

१३. ३० जूलै २०१३ रोजी सदर प्रकल्पाला स्थगीती देण्यासाठी विधान सभेमध्ये सर्व पक्षीय सदस्यानी मागणी केली.

१४. २० ऑगष्ट २०१३ ला कंपनी विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली.

१५. २० नोव्हेबंर २०१३ ला जिल्हा अधिकारी कार्यालयात बैठक झाली या बैठकीवेळी अधिका याना धक्काबुक्की करण्यात आली.

१६. ९ जुन २०१४ ला रविंद्र पाटील यानी कंपनी विरोधात उपोषण सुरु केले.

१७. १० जून २०१४ ला महिलांनी मोर्चा काढला. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायातीनी कंपनी बंद करण्यासाठी एकमताने ठराव दिला

१८. २३ जून २०१४ ला श्री. जावडेकर याना निवेदन देण्यात आले.

१९. २९ मे २०१४ ला सर्व पक्षानी एक दिवस उपोषन केले.

२०. २ जून २०१४ सर्व पक्षीय प्रांताअधिका यावर मोर्चा काढला.

२१. ४ फेबुवारी २०१५ ला २००० विदर्याथाशी कंपनी अधिका याना गुलाब पुष्प देवून गांधीगिरी पध्दतीने आंदोलन केले.

२२. ९ फेबुवारी २०१५ पासून चंदगड तहसिल कार्यालयावर ठिया आंदोलन करण्यात आले.

२३. ६ फेब्रुवारी २०१५ ला कंपनी उत्पादनावर बंदी घालण्यात आली परंतू शासनाचा आदेश कंपनीपर्यत आलाच नाही. त्यामूळे आजही उत्पादन चालू आहे.

२४. ३ फेब्रुवारी २०१५ ला २००० वारक यानी आंदोलन केले.

२५. तालुक्यातील आमदार, जिल्हा परीषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य यानी सामुदायीक राजीनामे दिले.

२६. ११ फेबुवारी २०१५ ला तालुका बंद ठेवण्यात आला.

२७. ६ फेबुवारी २०१५ ला महाविदयालयातील विदयार्थानी कॅन्डल मोर्चा काढला.

२८. २६ फेबुवारी २०१५ पासून साखळी उपोषन करण्यात आले.

२९. ए.व्ही.एच केमीकल्स कंपनीच्या विरोधात फसवणूकीच्या दोन तक्रारी दाखल करण्यात आलेल्या आहेत.

➢ **निष्कर्ष** : वरील आंदोलनाचा परीणाम म्हणून कंपनीबंद झाली आहे. हे सामाजीक आंदोलनांचे यश आहे. अशा सामाजीक आंदोलनामुळे चंदगड तालुक्यात सामाजीक परीवर्तनाला वाव मिळाला आहे.

*यशवंतराव चव्हाण, महाविदयालय, हलकर्णी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर.मो.नं. ८८८८००६५३८

***

स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर भारतातील आदिवासी चळवळ

*साहेब विरभद्रराव पडलवार

गोषवारा

'आदिवासी' या शब्दाबद्दल इतरांना आस्था अपेक्षित असण्याचे कारण नाही, कारण तो शब्द अडचणीचा आहे. भयानक व हीन दर्जाच्या शोषणातून, दडपणातून, सांस्कृतिक आक्रमणातून पिढ्या न् पिढ्या आपली भाषा, जीवनपद्धती, कला, संगीत, नृत्य, रीती अजूनही टिकवून धरण्यासाठी या समाजास जो प्रतिकार करावा लागला, आदिवासीचे अस्तित्व टिकवण्यासाठी जो संघर्ष करावा लागला तीसुद्धा एक अभिमानास्पद मूक चळवळच होती. आदिवासी बद्दल इतरांनी कोणता दृष्टिकोण बाळगावा, कोणती विधाने करावी हा त्यांचा प्रश्न आहे. आदिवासीनी ती खरी मानण्याचे कारण नाही. मुळात आदिवासी समतावादी व सह-अस्तित्वावर विश्वास ठेवणारे आहेत. म्हणून एखादी चळवळ उगीचच हाती घेण्याचे कारण नव्हते व नाही. परंतु आदिवासीच्या परंपरागत स्वातंत्र्यावर गदा आली, आदिवासीच्या जीवनपद्धतीवर आघात झाला, त्या त्या वेळी भारतात सर्वदूर या समाजाने बंडखोरी केली. ५७ बहाद्दूर आदिवासींनी ढोलाच्या ठोक्यावर गोळ्या झेलून स्वातंत्र्ययुद्धात बलिदानाचा पहिला मान मिळवला आहे. ही स्वातंत्र्यचळवळ आदिवासींना अभिमान वाटावा अशीच आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे

- ✓ स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात झालेल्या आदिवासी चळवळींची माहिती घेणे.
- ✓ स्वातंत्र्योत्तर काळातील चळवळीच्या कारणाचा मागवा घेणे
- ✓ चळवळींच्या कारणाचा सविस्तर माहिती घेणे.

गृहीतके

आदिवासींच्या परंपरागत स्वातंत्र्यावर गदा आली आदिवासींच्या जीवन पद्धतीवर आघात झाला. भाषा जीवनपद्धती कला संगीत नृत्यर्थी टिकून राहण्यासाठी आदिवासी जमातीस आजही संघर्ष करावा लागतो आहे.

संशोधन पद्धती

या शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती स्वीकारली असून त्याप्रमाणे संशोधन निबंधाचे लेखन केले आहे व संदर्भासाठी दुय्यम प्रकाशित साधनांचा उपयोग केला आहे

प्रस्तावना

स्वातंत्र्यानंतर आदिवासींची सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांना दिलेले संविधानिक संरक्षण टिकवून ठेवण्यासाठी विविध प्रयत्न करण्यात आले आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी आदिवासी कल्याण आणि विकासाच्या दिशेने सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या विकासासाठी लागोपाठ पंचवार्षिक योजनांमध्ये विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यांना समाजातील इतर विकसित घटकांच्या बरोबरीने आणणे हा यामागचा उद्देश होता. परंतु विकास योजनांचा परिणाम असा झाला की आदिवासी समुदायांमध्ये कुठल्याही परिवर्तन घडवून आलेले नाहीत, परिणाम उत्साहवर्धक नाहीत.

आदिवासींच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये अवजड उद्योगांची स्थापना, धरणे बांधणे आणि विकास योजना सुरू करणे विविध विकास योजना सुरू केल्या त्यामुळे स्थानिक आदिवासींना जबरदस्तीने विस्थापन करणे गरजेचे झाले. हजारो आदिवासी कुटुंबे त्यांच्या पारंपारिक वस्त्यांमधून विस्थापित झाली, बाहेरील लोकांशी संपर्काची परिस्थिती तितकीच हानिकारक आहे. या आदिवासींचा बाहेरील लोकांशी आलेल्या संपर्कामुळे त्यांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक हानी झाली.

ज्यांनी विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला त्यांची परिस्थिती इतर मागास आदिवासी समुदायापेक्षा चांगली आहे असे निदर्शनास येते, तर आदिवासींचा एक मोठा वर्ग, नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पुरेसा तयार नसलेला , आदिवासी समुदायाचा असा एक मोठा गट आहे की जो बदलत्या आव्हानांना सामोरे जाऊ शकला नाही,

वेगवेगळया शासकीय योजनांचा फायदा त्यांच्यापर्यंत पोहोचला नाही त्यामुळे त्यांची आर्थिक सामाजिक परिस्थिती आहे तशीच राहिली. परिणामी आर्थिक आणि सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांनी सामूहिक आवाज उठवला आहे.

विशेषत: मध्य भारतातील आदिवासींनी त्यांच्या शोषकांविरुद्ध प्रतिक्रिया व्यक्त केली होती. ज्यांनी त्यांचे आर्थिक आणि सांस्कृतिक शोषण केले त्यांच्यापासून त्यांची जमीन मुक्त करण्याच्या दिशेने या चळवळी केल्या होत्या. त्याच वेळी, प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे आदिवासी संस्कृतीचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली ,आदिवासी संस्कृती वाचावी म्हणून अनेक चळवळी निर्माण झाल्या या प्रत्येक चळवळीने त्यांच्या संस्कृतीच्या पुनरुज्जीवनावर भर दिला.

स्वातंत्र्यापूर्वीची आदिवासी चळवळ:

इंग्रजांनी पूर्व भारत ताब्यात घेताच परकीय राजवटीला आव्हान देण्यासाठी आदिवासी विद्रोह सुरू झाला. वसाहतीकरणाच्या सुरुवातीच्या काळात, भारतातील इतर कोणत्याही समुदायाने ब्रिटीश राजवटीला *इतका तीव्र प्रतिकार* केला नाही.

या वस्तुस्थितीचा अग्रक्रमाने उल्लेख करणे आवश्यक आहे आणि इतिहासात अधोरेखित करणे आवश्यक आहे की, ओरिसाच्या आदिवासींनी ब्रिटीश वसाहतवादाविरुद्ध युद्ध पुकारले. 1768 मध्ये घुमसरचा सरंजामशाही राजा कृष्ण भांजाच्या नेतृत्वाखाली कोंढाने इंग्रजांविरुद्ध लढा दिला आणि त्या लढ्यात अनेकांना प्राण गमवावे लागले.

त्याच वर्षी परलाखेमुंडी येथील राजा नारायण देब यांनी जलवाडा येथे दुसरी लढाई लढली ज्यात 30 आदिवासी मरण पावले. दरम्यान, इंग्रजांनी मद्रास प्रेसिडेन्सीचा एक भाग म्हणून गंजम ताब्यात घेतला आणि एडवर्ड कोर्टाची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. परंतु घुमसर येथील महारंदपता महादेवी परळ बिकाराम भांजा आणि दिवंगत श्रीकर भांजा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी इंग्रजांशी वारंवार केलेल्या लढाईमुळे इंग्रजांनी या भागावर राज्य करण्याचा विचार सोडला आणि तो 'ओसाड' म्हणून घोषित केला.

१७७२ मध्ये पहारिया विद्रोह झाला आणि त्यानंतर १७८५ मध्ये तिलका मांझी यांच्या नेतृत्वाखाली सतत पाच वर्षे ब्रिटिशांविरुद्धलढा दिला, ज्यांना १७८५ मध्ये भागलपूर येथे फाशी देण्यात आली. त्यानंतरच्या पुढच्या दोन दशकांमध्ये सिंगभूम, गुमला, बीरभूम, बांकुरा मोनभूम आणि पलामा येथे विद्रोह झाला.

१८३७ मध्ये "कोंढमेली" चे विविध उठाव आणि त्यांच्या सरंजामशाहीच्या विरोधात बंड झाले, चकारा बिसोच्या नेतृत्वाखाली १८४६-५६ या दशकातील खोंडांचा उल्लेखनीय लढा दिला गेला, आणि ब्रिटिशांच्या शोषणाविरुद्ध प्रतिकार झाला. मुर्मू ब्रदर्सच्या नेतृत्वाखाली ओरिसातील संथाल आणि इतर अनेकांनी इंग्रजांविरुद्ध तीव्र लढा उभारला, ही घटना ओनसाच्या संघर्षाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना म्हणून ओळखली जाते.

1855-1857 चे बंड ही संथालांच्या इतिहासातील एक मोठी घटना होती. १८५५ मध्ये संथालांनी लॉर्ड कॉर्नवॉलिसचे कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी युद्ध पुकारले. 30 जून 1855 रोजी दहा हजारांहून अधिक संथालांनी त्यांच्या शोषण आणि अत्याचाराचा निषेध केला. सिधो आणि कानो यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या रॅलीने इंग्रज, जमीनदार आणि सावकारांची जुलमी राजवट संपवण्याची शपथ घेतली आणि स्वतंत्र संथाली राजाची स्थापना केली.

सावकार आणि जमीनदारानी संथाल भागात घुसखोरी केली. संथालांची पिके बळजबरीने जप्त करण्यात आली, कर्जावरील व्याज पन्नास ते पाचशे टक्क्यांपर्यंत केली. संथाल उठाव (१८५५-१८५७) हा बाहेरच्या लोकांकडून सातत होत असलेले आत्याचार व जबरदस्तीने आदिवासीच्या काबीज केलल्या जमीनी परत मिळवण्याचा आणि बिगर आदिवासींना त्यांच्या प्रदेशातून बाहेर घालवण्याचा प्रयत्न होता. या उठावात पंधरा ते पंचवीस हजार संथाल मारले गेल्याचा अंदाज आहे.

आधी सांगितल्याप्रमाणे, 1855 मध्ये संथालांनी कॉर्नवॉलिसच्या कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी युद्ध पुकारले आणि एक वर्षानंतर, 1857 च्या स्वातंत्र्ययुद्धात अनेक आदिवासी नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली

1865 मध्ये पास झालेल्या वन नियमन कायद्याने ब्रिटिश सरकारला झाडे किंवा झुडपानींयुक्त आशी कोणतीही जमीन सरकारी जंगल म्हणून घोषित करण्याचा आणि स्वतःच्या मर्जी व अटींनुसार त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी नियम बनविण्याचा अधिकार प्राप्त झाला.या कायद्याने आदिवासी जे ही जामीन वापर करीत होते त्यांच्या हक्कांबाबत कोणतीही तरतूद केली नाही, 1878 मध्ये एक अधिक व्यापक भारतीय वन कायदा संमत करण्यात आला, ज्याने संरक्षित आणि राखीव जंगलांमधील वनजमीन आणि उत्पादनावरील आदिवासी अधिकारांवर कठोर निर्बंध लादले. या कायद्याने आदिवासी समुदायांच्या पारंपारिक सामान्य मालमत्तेचे स्वरूप आमूलाग्र बदलले आणि ते राज्य मालमत्ता बनवले.

झारखंड पट्ट्यातील आदिवासी उठाव हा ब्रिटिशांनी संपूर्ण प्रदेशात मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात करून थोपवले. तरी ही तेथे उठाव झाला. ही बिरसामुंडा चळवळ ही ब्रिटिश शासन आणि त्यांच्या स्थानिक एजंट विरुद्धची - 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात सर्वात महत्त्वाची आणि उल्लेखनिय चळवळ होती. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील प्रदीर्घ संघर्ष ब्रिटीश धोरणांच्या विरूध्द केला गेला. ज्या जमीनदार आणि सावकारांना आदिवासीचा अमानूषपणे शोषण करण्यास परवानगी दिली. त्या कायद्याविरूध्द हा उठाव होता. जुलमी जमीनदार, ख्रिश्चन मिशनरी आणि ब्रिटीश अधिकारी यांच्याशी लढण्यासाठी त्यांनी एक सैन्य संघटित केल्यामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात आले. दोन वर्षांनीच त्याची सुटका झाली.

तुरुंगातून, बिरसाने आपल्या लोकांना अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी शस्त्रे तयार करण्यास सांगितले, त्याने आपल्या सैन्याला प्रशिक्षण दिले आणि आपल्या लोकांना त्यांच्या स्वराज्याच्या ध्येयाकडे नेणारा राजकारणी बनला, तथापि त्याला पुन्हा अटक करण्यात आली आणि तुरुंगातच त्याचा मृत्यू झाला. तरीही त्यांच्या लोकांमध्ये अशांततेची बीजे पेरली गेली आणि ते अन्यायाविरुद्ध लढत राहिले. या चळवळीचे मूळ झारखंडमध्ये होते.

1914 ओरावांनी ताना भगत चळवळ सुरू केली. ताना भगत चळवळ ही एक अशा प्रकारची भगत चळवळ आहे, जी बिहारच्या छोटानागपूरच्या ओरावमध्ये उदयास आली. ताना भगत चळवळ मूलत: धार्मिक स्वरूपाची आहे. बिरसा मुंडा चळवळ मुळात सामाजिक-धार्मिक चळवळी म्हणून सुरू झाली असली तरी नंतर त्यांच्या चळवळीने अर्ध-राजकीय आणि लष्करी स्वरूप धारण केले.

ओराओनमध्ये भगत हा शब्द भक्तीच्या पंथाचे सदस्य असलेल्या जमातीच्या एका विशिष्ट समुहासाठी लागू केला गेला आहे. भगत चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदू प्रथांचा त्यांच्या विचारधारेत मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यात आला आहे. तथापि, दोन्ही चळवळींचे आदिवासी नेते मूलत: जमीनदार आणि कंत्राटदारांसारख्या परदेशी शोषकांशी लढत होते.

या सर्वांनी 1857 मध्ये ओरिसा मध्ये शिपायांच्या विद्रोहासाठी पार्श्वभूमी तयार केले .स्वातंत्र्याच्या या पहिल्या बंडात कोल्हा, गोंड, संथाल, बिरझाल आणि खोंड हे आदिवासी समूह सामील झाले यांनी सुरेंद्र साईंसोबत हातमिळवणी केली.

नंतरच्या भजन मेलीने 1868-1891 पर्यंत 2 दशकांहून अधिक काळ ब्रिटीशांना चकमकी, घातपात आणि युद्धांमध्ये गुंतवून ठेवले, ब्रिटीशांना त्यानी कधीही थारा दिला नाही. या साम्राज्यवाद्यांविरुद्ध मुंडांचा संघर्ष हा आणखी एक महत्त्वाची नोंद आहे. "बिरसा मुंडा" च्या नेतृत्वाखाली मुंडा आदिवासींनी 1900 मध्ये ब्रिटीशांशी लढा दिला. 9 जानेवारी 1900 रोजी, इंग्रजांनी मोठ्या प्रमाणात लोकांचा बळी घेतला. पण ते त्यांना परावृत्त झाले नाही आणि इतिहासाची पुनरावृत्ती झाली. यावेळी मुंडांनी इंग्रजांच्या मदतीने लोकांचे शोषण करणाऱ्या गांगपूरच्या राणीविरुद्ध

बंड केले. निर्मला मुंडा यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी ब्रिटिशांशी लढा दिला. ब्रिटिशांनी 1939 रायबोगाजवळील "अमेकोसिमाको" येथे निर्दयीपणे निष्पाप जीवांना गोळया घालून ठार केले, भारतातील ब्रिटीशांच्या इतिहासात आणखी एक काळा डाग निर्माण केला. स्वातंत्र्यपूर्व ओरिसात ब्रिटिशांविरुद्धच्या आदिवासी संघर्षाचा अंतिम लढा हा लक्ष्मण नाईक यांच्या नेतृत्वाखाली कोरापूट आदिवासींचा आहे. हा संघर्ष छोटा होता आणि लकमानचे आयुष्य हौतात्म्याने संपले. 29 मार्च 1943 रोजी त्यांना बेरहामपूर तुरुंगात फाशी देण्यात आली.

आंध्र प्रदेशातील पहाडी आदिवासी भागात ऑगस्ट 1922 मध्ये अल्लून रामचंद्र राजू (सीताराम राजू या नावाने ओळखले जाते) यांच्या नेतृत्वाखाली बंड झाले, आंध्रातील आदिवासीनीं ब्रिटिशांना पूर्ण-गनिमी युद्धात ओढण्यात यशस्वी झाले. मलबार स्पेशल फोर्समध्ये आणलेल्या ब्रिटीशचां ते यशस्वीपणे सामना करू शकले नाही आणि त्यात अल्लुरी राजूला वीरमरण आले. ब्रिटिशानीं आदिवसींवर विजय मिळवला.

स्वातंत्र्य चळवळ जसजशी फोफावत गेली, तसतसे त्यांनी संघर्षाच्या सर्व पैलूंमध्ये आदिवासीना समाविष्ट होत गेले, बऱ्याच भूमिहीन आणि शोषित, अत्याचारित आदिवासीनी स्वातंत्र्यसैनिकांसोबत या अपेक्षेने सहभाग घेतला की ब्रिटीशांच्या जाण्यामुळे नवीन लोकशाही युग निर्माण होईल.

स्वातंत्र्यानंतरच्या आदिवासी चळवळी

दुर्दैवाने, स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतरही, आदिवासींना स्वातंत्र्याचा फारसा फायदा झाला नाही. स्वातंत्र्यामुळे बहुसंख्य भारतीय जनतेला व्यापक लाभ मिळाले असले तरी दलित आणि आदिवासींना अनेकदा डावलले गेले आहे आणि आदिवासी समुदायासाठी नवीन समस्या निर्माण झाल्या आहेत. 1947 पासून लोकसंख्येमध्ये तिप्पट वाढ झाल्यामुळे जमिनीच्या संसाधनांवर ताण निर्माण झाला त्याचा परिणाम आदिवासींच्या जमिनीवर पडला. ही स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील आदिवासी चळवळींमागील मूलभूत समस्या आहे. त्याच बरोबर बाहेरील लोकांचा जंगलाकडे वाढणार ओघ, सांस्कृतिकरण आणि असंतुलित विकासामुळे वनविभागाचे विविध कायदे यामुळे आदिवसी समुदायावर अन्याय झाला.

स्वातंत्र्यानंतर, आदिवासी चळवळींचे तीन गटांमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते

(i) बाहेरील लोकांच्या शोषणामुळे निर्माण झालेल्या चळवळी

(ii) आर्थिक वंचिततामुळे निर्माण झालेल्या चळवळी (जसे मध्य प्रदेशातील गोंड आणि आंध्र प्रदेशातील महार)

(iii) फुटीरतावादी प्रवृत्तींमुळे निर्माण झालेल्या चळवळी (नागा आणि मिझोसारख्या).

आदिवासींच्या चळवळींचे वर्गीकरण त्यांच्या अभिमुखतेच्या आधारे चार प्रकारांमध्ये करता येईल:

(i) जंगलावर आधारित चळवळी,

(ii) सामाजिक-धार्मिक चळवळी किंवा सामाजिक-सांस्कृतिक चळवळी

(iii) राजकीय स्वायत्तता आणि राज्यांची निर्मिती (नागा, मिझोस, झारखंड) आणि

(iv) कृषी चळवळ,

(v) नक्षलबन चळवळ-1967 आणि बिरसादल चळवळ 1968-69. धरली आबांच्या शक्तिशाली नेतृत्वाखाली मुंडांमध्ये सुधारणावादी चळवळ सुरू झाली, ज्यांनी धार्मिक पवित्रता, संन्यास या हिंदू आदर्शांचा प्रचार केला आणि पुरोहितांच्या उपासनेवर टीका केली.

नाग क्रांतीची सुरुवात 1948 मध्ये झाली आणि ती1972 पर्यंत चालू राहिली. जेव्हा नवीन निवडून आलेले सरकार सत्तेवर आले तेंव्हा नाग बंडखोरी नियंत्रित झाली. या क्रांतीचा परिणाम म्हणजे मिझो सरकारने एप्रिल 1970 मध्ये मेघालय राज्याची स्थापना केली.

बिहार, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेशातील आदिवासींची नक्षलवादी चळवळ; मध्य प्रदेशातील गोंड आणि भिल्लांची कृषीप्रधान चळवळ आणि गोंडांच्या जंगलावर आधारित चळवळी प्रामुख्याने दडपशाही आणि भेदभाव, मागासलेपणा आणि गरिबी, भूक, बेरोजगारी आणि शोषण यांनी ग्रासलेल्या समुहाच्या चळवळी होत्या. आदिवासींच्या या दुर्दशेला आणि अत्याचारी सरकार यापासून मुक्तीसाठी चळवळी सुरू केल्या होत्या.

झारखंड चळवळ सुरू झाली ज्यामध्ये,आदिवासींना त्यांच्या मुळ वस्तीस्थानापासून म्हणजेच जंगलापासून दूर करणे, नौकऱ्यांची वानवा आणि बाहेरील लोकांचा वाढता हस्तक्षेप इत्यादींमुळे नवीन राज्य निर्माण करण्याची मागणी करण्यात आली. बिहार ते ओरिसातील केओंजार आणि मध्य प्रदेशातील सुरगुजा ते पश्चिम बंगालमधील मणिपूर पर्यंत, ज्या भारतीय संघराज्यातील आदिवासी लोक संख्यात्मकदृष्ट्या प्रबळ असतील अशा समुदायांकरीता झारखंड पक्षाने स्थापन केलेल्या मुंडा जमातीच्या ऑक्सफर्ड शिक्षित ख्रिश्चनाने नवीन राज्य निर्माण करण्याची मागणी केली होती.

१९९३ मध्ये बॉक्साईट उत्खनन आणि प्रक्रियेसाठी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रवेश केला तेव्हापासून, रायगडा जिल्ह्यातील काशीपूर आणि लक्ष्मीपूर ब्लॉकमधील कोरापुट जिल्ह्यातील दमंतपूर ब्लॉक आणि ओरिसातील कालाहंड जिल्ह्यातील थुआमुल रामपूर या भागातील आदिवासी लोकांचे विस्थापन आणि उपजीविकेचे नुकसान होण्याची भीती होती. .आपली मुळ वस्तीस्थान सोडावे लागेल या भीतीने चिंतेत लोकांनी स्वत:च रस्ता रोको, निदर्शने करण्यास सुरुवात केली.

भुईया, जुआंग, मुंडा, संथाल आणि कोंढ यांसारख्या आदिवासी समुदायामध्ये खाणकाम विरुद्धची चळवळ लोकप्रिय आहे. 'आमच्या जमिनी, आमची खनिजे आणि आमचे हक्क' ही खाणबंदीच्या चळवळीची प्रमुख घोषणा होती. सभा, रॅली उपोषणाचे आयोजन करण्यात आले. यामुळे गावकऱ्यांचा पोलिसांकडून छळ करून खोट्या केसेसमध्ये त्यांना अडकवले जात होते. 1994 ते 1999 या काळात अनेक गावकऱ्यांना खोट्या खटल्यात तुरुंगात पाठवण्यात आले होते.

आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम जिल्ह्यातील रल्लागारुवू गावातील ग्रामस्थ आणि आदिवासींनी गेल्या काही दशकांमध्ये विविध कंपन्यांच्या बेकायदेशीर खाणकाम विरोधात जोरदार प्रतिकार केला. कोंडाडोरा जमात ही उत्तर आंध्र प्रदेशातील सर्वात मोठी जमात आहे जी राज्याच्या डोंगराळ प्रदेशात वसलेली आहे रल्लागारुवू तिच्या कॅल्साइट, फायरस्टोन आणि अभ्रक साठ्यांसाठी प्रसिद्ध आहे आणि खाणकामासाठी सर्वात जास्त मागणी असलेल्या ठिकाणांपैकी एक आहे. आदिवासींच्या जमिनी बेकायदेशीरपणे संपादित करण्याचे शेकडो प्रयत्न झाले. आदिवासींच्या प्रदीर्घ संघर्षामुळे बरीच जमीन अवैध खाणकामाच्या तावडीतून मुक्त केली आहे. अजूनही बरीच बाकी आहे.

वेगवेगळया आदिवासी चळवळी या त्यांच्या अस्मितेच्या समस्येभोवती केंद्रित आहेत असे म्हणता येईल. ईशान्येकडे, बोडो आणि नागा चळवळ ही जातीय अस्मिता त्यांच्या हितसंबंधांसाठी राजकीय मार्ग कसा स्वीकारतात याची उत्तम उदाहरणे आहेत. या सर्व अलिप्ततावादी चळवळींमध्ये, असमान विकास आणि आधुनिकीकरण, काही क्षेत्रातील नफ्याचे केंद्रीकरण आणि त्यांचे इतर क्षेत्रांमध्ये विखुरलेले असणे आणि विकासाचे शहरी-भिमुख मॉडेल ही प्रमुख कारणे आहेत.

आदिवासी अस्मितेचा उदय, आदिवासी प्रादेशिकता, सीमावर्ती आदिवासीवाद इत्यादींना ईशान्य सीमावर्ती भागातील चळवळी नंतर महत्व प्राप्त झाले. आदिवासी प्रादेशिकता, राजकीय स्वरूप, मूलभूत स्त्रोतांपासून त्यांना दुर ठेवणे हे घटक आदिवासी अस्मितेचा संघर्ष असल्याचे म्हटले जाते. भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये नेपाळी भाषेचा समावेश आणि इतर विविध आर्थिक घटक यासारख्या मुद्द्यांवर गोरखालँड आंदोलनाला वेग आला.नागरिकत्वाच्या मागणीद्वारे भारतीय नेपाळी ओळख सांगण्यावर मुख्य जोर देण्यात आला. गोरखा हिल डेव्हलपमेंट कौन्सिलची स्थापना करणाऱ्या गोरखालँड करारात (1988) दोन्ही मुख्य मुद्दे अस्पर्श राहिले. परिषदेत 'गोरखा' हा शब्द टाकल्याने ओळखीचा प्रश्न सुटल्याचे सांगण्यात आले.

झारखंड आणि छत्तीसगडला राज्याचा दर्जा दिल्याने भारताच्या आदिवासीच्या परिस्थितीमध्ये सुधारणा होते का हे पाहणे बाकी आहे. तथापि, सर्व आदिवासी जिल्ह्यांनी शिक्षणक्षेत्रातील गुंतवणूक, सहभागी वन व्यवस्थापन आणि संरक्षण, प्रदूषण विरहीत उद्योग आणि आदिवासी समुदायांसाठी संधी आणि त्यांचा समृद्ध वारसा जतन करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारकडून विशेष लक्ष देणे आवश्यक आहे आदिवासीना शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संधींमध्ये विशेष प्रवेश असणे आवश्यक आहे जेणेकरुन औद्योगिकरणाचे परिणाम आणि आदिवासी समुदायांनी अनुभवलेल्या पूर्वीच्या अन्यायाकारक घटना यावर निश्चित परिणाम होईल व आदिवासींचा विकास होण्यास मदत होईल त्याच वेळी, आदिवासीच्या समृध्द अशा सामाजिक प्रथांच्या माध्यमातून देशाला खूप काही शिकता येईल. सर्वांना सामावून घेण्याची सामायिक करण्याची त्यांची संस्कृती आणि त्यांच्या सर्व खोल नम्रता आणि निसर्गावरील प्रेम आणि सर्वात जास्त सामाजिक समता आणि नागरी समरसतेबद्दल त्यांची सखोल निष्ठा यातून बरेच काही शिकता येते.

निष्कर्ष -

महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीचा आढावा घेतल्यास चळवळीची मुख्य तीन कारणे दिसून येतात.

1) आदिवासींना जमीन कसण्याचे पट्टे अथवा हक्क मिळण्याबाबत.
2) बिगार किंवा वेठबिगार यातून मुक्तता मिळण्याबाबत.
3) विविध प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या चळवळी म्हणजेच त्यांच्यातील जास्तीत जास्त चळवळी या आर्थिक शोषण आणि बाह्य संस्कृतीच्या घटकाकडून त्यांच्या निवासस्थानावर म्हणजेच जंगलावर केलेले अतिक्रमण, जंगलतोड, पर्यावरणातील असंतूलन, आदिवासींचे विस्थापन, पुनर्वसन इत्यादी संदर्भात झालेले आहेत. वरील चळवळीच्या माध्यमाने आज त्यांच्यात जाणीव-जागृती निर्माण झालेली आहे असे दिसून येते.

संदर्भ :

1) बी. एम. कऱ्हाडे - सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, प्रकाशक: मनोहर पिंपळापुरे, जून 2011.
2) तुकाराम जाधव, मल्हार पाटील सुवर्ण महोत्सवी वर्ष महाराष्ट्र, वार्षिकी 2010. प्रकाशक : युनिक ॲकॅडमी.
3) मेघा नानिवडेकर - महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन आणि स्त्री- अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 1 जानेवारी 2006.
4) माधव बंडू मोरे, आदिवासीचे बंड, सुगावा प्रकाशन, गणेश मुद्रणालय, शनिवार पेठ, पुणे - ३०
5) वा.भा.पाटील, महाराष्ट्रातील चळवळी,प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, जळगाव ४२५००१, जुलै २०१४.
६) घनश्याम शहा मराठी अनुवाद : प्रा. योगिनी वेंगुर्लेकर, सामाजिक चळवळी आणि सरकार, डायमंड पब्लिकेशन्स,१६९१, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ४११०३०, जून २००९.

*सह.प्राध्यापक, जजिमविप्र सह. समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , जळगाव 9850560527,
padalwarsaheb@gmail.com

***

पर्यावरण आणि मानवस्वास्थ

*प्रा. डॉ. राजकुमार भगत

सारांशः—

पर्यावरण देशाच्या स्थानावर तसेच त्याच्या प्रगत, विकसनशील, अप्रगत स्थितीवर म्हणजेच लोकसंख्या, नागरिकांच्या राहणीमानावर म्हणजेच स्वास्थ, ग्रामीण नागरी इ. परिणामावर अवलंबून असल्यामुळे पर्यावरण संतुलन हाताळतांना त्यात विविधता असने सहाजीक आहे. त्यामुळे देशवर्तनाप्रमाणे अनुरुप पर्यावरण कायदे करुन त्याचे पालन होणे गरजेचे आहे. मनुष्याच्या उज्वल भविष्यासाठी तेवढेच उज्वल आणि स्वच्छ पर्यावरण राखणे हे त्याचे कर्तव्य आहे. आज दिवसेंदिवस वाढत्या पर्यावरण प्रदुषणचे प्रमाण वाढू लागले आहे. जल, वायू, मृदा, सागर, ध्वनी, उष्णता यांच्या माध्यमातून प्रदुषणाचे प्रमाण जानवू लागले, त्याचा परिणाम आजच्या मानवी समाजावर फार मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. याविषयी समाज आणि शासन स्तरावर पडणाऱ्या जबाबदारीचे ज्ञान असायला पाहीजे. त्यासाठी गावपातळी पासून आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण जागृतीच्या चळवळी उभारणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना मुल्यात्मक शिक्षण देवून पर्यावरण स्वरक्षण करणे गरजेचे आहे, पर्यावरणाच्या संदर्भात नियमित होत असलेले अवमुल्यन लक्षात घेवून त्या विरोधात पर्यावरण संरक्षणात्मक स्वरुपाचे कडक कायदे करणे व त्याची तेवढ्याच तिव्रतेने कायदयांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तेव्हाच मानवस्वास्थ व्यवस्थित राहू शकते.

प्रस्तावनाः—

माणसाने नैसर्गीक संसाधनांचा वापर बेसुमारपणे केल्याने पर्यावरणात असमतोल निर्माण होऊन परिसंस्थामध्ये संतुलन बिघडले आणि पर्यावरण प्रदूषित झाले. लोकसंख्या वाढ, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि संसाधनांच्या अतिवापराचा हव्यास यामुळे पर्यावरण प्रदूषण झाले आणि वाढले. वायू, भूमी, जल ह्या घटकांमध्ये होणाऱ्या, रासायनिक किंवा कोणत्याही इतर अवांछनीय बदलामुळे होणाऱ्या गुणात्मक आणि अहितकारक परिणामाला प्रदूषण म्हणतात. मानवी जीवनावर आणि स्वास्थावर तसेच सजीवांच्या परिसंस्थावर व त्यांच्या परिसरातील अनिष्ठ परिणाम करणाऱ्या क्रियेला प्रदूषण म्हणतात. ज्या घटकांद्वारे पर्यावरण दूषित होते त्यांना प्रदूषण (Pollutants) म्हणतात. मानवी व्यवहाराने निर्माण होणारे त्याज्य पदार्थ आणि ऊर्जा ह्यामुळे मूळ पर्यावरणात होणाऱ्या हानिकारक बदलांना प्रदूषण म्हणतात. पर्यावरण अनेक माध्यमांशी संबंधित आहे. ज्या माध्यमात पर्यावरण प्रदूषित झाले असेल त्यावरुन प्रदूषणाचे खालील मुख्य चार प्रकार पडतात.

(अ) वायुप्रदूषण (Air Pollutants) (ब) जलप्रदूषण (Water Pollutants)

(क) ध्वनिप्रदूषण (Noise Pollutants) (ड) भू—प्रदूषण (Land Pollutants)

क्षेत्र व तीव्रता यावरुन प्रदूषणाचे (१) स्थानिक (२) प्रादेशिक (३) जागतिक असे तीन प्रकार पडतात. एखाद्या कारखान्यातून होणारे प्रदूषण ठराविक क्षेत्रापूरते मर्यादित असते त्याला स्थानिक प्रदूषण म्हणतात. प्रदूषणाने मोठे क्षेत्र व्यापल्यास त्यास प्रादेशिक प्रदूषण असे म्हणतात. उदा. भोपाळ दुर्घटना (१९८४) किंवा चर्नोबील प्रदूषण घटना (रशिया) ही प्रादेशिक प्रदूषणाची उदाहरणे आहेत. वातावरणात सोडले जाणारे क्लोरोप्ल्युरो कार्बन, NO_2, CO_2, SO_2, हे जागतिक स्तरावरील प्रदूषण होय, कारण हे विषारी वायू मोठ्या प्रमाणावर असल्यास वातावरणातल्या हतर वायूंचे निर्धारित प्रमाण बिघडवितात.

संशोधनाचा उद्देश :—

१. दिवसेंदिवस वाढत चाललेले पर्यावरण प्रदुषण या विषयी नागरिकांना माहिती करुन देणे.
२. पर्यावरण प्रदुषणमुळे मानवस्थावर कसा परिणाम घेतो याची माहिती करुन देणे.
३. पर्यावरण प्रदुषणासंदर्भात सैध्वांतिक अभ्यास करणे.
४. पर्यावरण प्रदुषणामुळे होणाऱ्या परिणामा विरोधात पर्यावरण बचाव चळवळ नागरिकांमध्ये उभी करणे.
५. पर्यावरण प्रदुषणामध्ये नागरिक, समाज, किंवा संस्था जबाबदार असतील तर त्यांचेवर कडक कारवाई करण्यास भाग पाडणे.

वरील प्रकारच्या पर्यावरण प्रदुषणाच्या अध्यापनाचा उद्देश आहे.

संशोधनाची गृहितकृत्ये :—

१. पर्यावरण प्रदुषणाचा मानवसंस्थावर किती वाईट परिणाम झाला आहे.
२. आज जल, वायु, ध्वनी यांचा पर्यावरणावर किती घातक परिणाम होत आहे ते अभ्यासणे.
३. पर्यावरणा संदर्भात कडक कायदे करुन त्याची अंमलबजावणी करण्याची सक्त गरजत आहे का? ते तपासणे.

संशोधनाचे महत्व :—

१. पर्यावरण आणि मानवस्वास्थ यांचा परस्परांशी कसा संबंध आहे याची जाणीव करुन देणे.
२. आजच्या पर्यावरणाचा मानवस्वाथावर अतिशय भयंकर परिणाम होत आहे या विषयी नागरिकांमध्ये जातीय जागृती करणे.

३. पर्यावरणाचे रक्षण करायचे असेल सर्वसामान्य जनतेपर्यंत पर्यावरणाची माहिती पोहचविते.

४. पर्यावरणाच्या संदर्भात शासनानी कडक कायदे करण्याची त्यांना जाणीव तयार होईल.

५. पर्यावरण चांगले तर आपले आरोग्य चांगले हा संदेश समाजापर्यंत पोहचविने.

संशोधन पद्धती :– प्रस्तुत संशोधनात अध्ययन पद्धत म्हणून द्वितीय स्त्रोतांचा अध्ययन पद्धतीत वापर करण्यात आला आहे. जसे की संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे इत्यादी.

प्रदुषणाची कारणे :– पर्यावरण प्रदूषण हवा, पाणी, भूमी, मृदा, ध्वनी इ. प्रकारातून झालेले दिसून येते. काही प्रदूषकांचा परिणाम तात्काळ होतो तर काहींच्यामुळे कालांतराने प्रदूषण होते. जसे समुद्रात झालेल्या तेल गळतीचा परिणाम चटकन होऊन तेथील जीवजंतू नष्ट होतात. डीडीटी वगैरेंच्या अप्रत्यक्ष सेवनामुळे शरीरात विषारी पदार्थाची मात्रा हळूहळू वाढत जाते. मानवाने अवलंबिलेल्या औद्योगिकीरणामुळे विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ॲटिमनी, अर्सेनिक, कोबाल्ट व निकेल यांसारखी विषारी मूलद्रव्ये वातावरणात विखुरली गेली. औद्योगिकीकरणाचा वाढता वेग, त्यानुसार झालेले हवेचे व पाण्याचे दूषितीकरण, कचऱ्याचे प्रचंड वाढते डोंगर, शहरीकरण व त्यामुळे गलिच्छ वस्त्यांची (झोपडट्टयांची) अनिर्बंध वाढ, वाहनांची संख्या, आवाजाच्या वेगापेक्षा अधिक वेगाने प्रवास करणारी अत्याधुनिक स्वनातित जेट विमाने या सर्व घटकांमुळे प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. कालवे खणून पाण्याचा अनिर्बंध वापर करतांना त्यात साठणाऱ्या गाळामुळे होणारे परिणाम लक्षात घेतले नाही म्हणून पूर्वीच्या सुमेरीयन संस्कृतीचा नाश झाला. दारु गाळणाच्या भांड्यात असणारे शिसे दारुत जाऊन त्याचा परिणाम श्रीमंतांच्या मेंदूवर होऊन रोमन संस्कृती नष्ट झाली हा इतिहास आहे. तरीदेखील हे प्रदुषण जागतिक स्तरावर जाणवणारे नव्हते. आजच्या घडीला प्रदुषणाचा वेग मात्र भयानक वाढला आहे. प्रदूषणाची तीव्रता कोणत्याही वेळी जगाच्या पाठीवर कुठेही घडल्यास संपूर्ण मानव जातीचा सर्वनाश करण्यास समर्थ आहे.

प्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. (१) औद्योगिकीरण, (२) लोकसख्यां, (३) जंगलतोड, (४) शहरीकरण, (१) वाहतूक व इंधन ज्लवन (६) रासायनिक खते व जंतुनाशकांचा वापर, (७) औद्योगिक अपघात, (८) अणुप्रकल्प, (९) युद्धे.

पर्यावरण व माणूस :– माणूस समाज करुन राहात असल्याने त्याच्यापुढे निर्माण होणाऱ्या समस्यांचा संबंध समाजजीवनाशी येतो. समाजात कुटूंब, संस्था, जाती, जमाती हे घटक अंतर्भूत आहेत. पर्यावरण प्रश्नाची उकल करण्यासाठी त्याच्याशी संबंधित असलेले नीतिनियम समजून घेतले पाहिजेत. हे नितिनियम अर्थात नैतिक स्वरुपाचे आहेत. पर्यावरणाची सांप्रत स्थिती आणि त्याच्याशी जुळलेले घटक म्हणजे पृथ्वीवरील मानवाला सोडून इतर सर्व सजीव, निर्जीव वस्तू, ह्यांच्याबरोबर येणारा माणसाचा संबंध समजून घेतला पाहिजे.

जर माणसाच्या एखाद्या कृतीने पर्यावरण प्रदूषित होत असेल तर अशा कृतीने होणारे विकासकार्य अशाश्वत स्वरुपाचे समजावे लागले. ह्या विचाराला पर्यावरणीय नितिमत्तेचा विचार समजावा लागेल; पण केवळ पर्यावरणीय नीतिमत्तेचा सुटा विचार करणे योग्य होणार नाही. ह्यासाठी विकासाची व्याप्ती, त्यापासून होणारे दीर्घ पल्ल्याचे फायदे–तंटे, आर्थिक, सामाजिक परिणाम इत्यादींचादेखील साकल्याने विचार होणे गरजेचे आहे. विकास आणि संभावित प्रदूषणाचा एकूण समग्र विचार केल्यानंतरच अशा प्रश्नांवर निर्णय घेणे योग्य ठरेल. कारण नैतिकतेचे परिणामात मूल्यांकन करणे गुंतागुंतीचे तसेच जिकिरीचे आहे. शिवाय पर्यावरण सुस्थितीत राहील तो पर्यंत माणसाचे अस्तित्व अबाधित राहील हा विचारदेखील तेवढाच महत्त्वाचा आहे. शेवटी सगळ्या समस्येची व्याप्ती लक्षात घेऊन त्यामुळे होणारे वैश्विक, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रांतीय, स्थानिक असे परिणाम लक्षात घ्यावे लागतात. विकासकार्य करावयाचे ठरले तर प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी योजलेल्या उपायांची अंमलबजावणी होणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

पर्यावरण आणि मानवस्वास्थ :– मानवी आरोग्यावर पर्यावरणाचा प्रभाव अपरिहार्य आहे. स्वच्छ पर्यावरण म्हणजे चांगले आरोग्यमय जीवन. पर्यावरणाच्या गुणवत्तेच्या ऱ्हासामुळे लोकांचे, समाजाचे, आरोग्य बिघडत जाते. डॉक्टर्स किंवा दवाखन्यांच्या संख्येवर लोकांचे आरोग्य अवलंबून नसते, पर्यावरणाच्या स्वच्छतेवर ते अवलंबून असते. परिसराचे पर्यावरण रोगांवर नियंत्रण ठेवू शकते परंतु दूषित झाल्यास ते रोगाला नियंत्रणसुद्धा देऊ शकते.

मानवाला १) मागासलेपणा आणि २) लोभापायी संसाधनाचा अविचारपूर्वक केलेला वापर, ह्यामुळे दूषित पर्यावरणापासून बचाव करावा लागतो. मागासलेपणामुळे गरीबी, भूक, कुपोषण, वैद्यकीस सोईचा अभाव, दूषित पाणी, नागरी सोईचा अभाव इ. समस्या उभ्या राहतात. अविचारामुळे स्वास्थ आणि पर्यावरण सुरिक्षत राखणाऱ्या उपायांकडे कानाडोळा करुन संसाधनाचा अपरिमित वापर केल्यास जल आणि वायू – प्रदूषणाच्या गंभीर समस्या निर्माण होतात. हवामानात प्रतिकूल बदल, वैश्विक तापमानात वाढ, हरितगृह परिणाम इ. समस्यादेखील मानवासमोर उभ्या राहतात तेव्हा विकास साधतांना पदोपदी पर्यावरणाचा विचार केला नाही तर अनेक स्वास्थ समस्यांना तोंड द्यावे लागते.

पर्यावरण प्रदूषण आणि पर्यावरण ह्यांच्यातील साखळी समजून घेतल्यास त्यापासून निर्माण होणाऱ्या स्वास्थ समस्यांचे निराकरण करु शकतो. त्याबरोबर हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की पर्यावरणाच्या सहाय्याने आपले स्वास्थ राखता येऊ शकते. परंतु ह्यासाठी समाजातील सर्व थरातील लोकांचा सहभाग असला पाहिजे. स्त्रियांची भूमिका ह्यात महत्वाची असते. स्वास्थ मंत्रालय ह्यासाठी महत्वपूर्ण काम करु शकते. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील स्वास्थ कार्यक्रम घेण्यात येतात. जागतिक स्वास्थसंस्थेच्या (WHO) नीतीप्रमाणे २१ व्या शतकात स्वास्थ आणि पर्यावरणसंबंधी काही निर्देश केले आहेत. त्यामुळे स्थायी विकासाला मदत होईल.

पर्यावरणाचा मानवावर होणाऱ्या परिणामासाठी तापमान, आर्द्रता आणि सूर्यकिरणे हे घटक जबाबदार आहेत. उष्णतेमुळे शरीरातील रक्तसंचार वाढल्याने पित्ताची वाढ होऊन विषारीद्रव्ये शरीरात जमतात. ह्यामुळे अजीर्ण, रक्ताची कमी, भूक न लागणे, त्वचा दूषित होऊन फोड येणे, ताप येणे इ. परिणाम जाणवतात. अधिक उष्णतेने माशा, मच्छर इ. चा प्रकोप वाढून प्लेग, फायलेरिया, हत्तीपाय, मलेरिया इ. रोगांचा प्रादुर्भाव होतो. ह्याउलट शीत वातावरणामुळे बेचैनी वाढते, मलेरिया डोके वर काढतो. सूर्यकिरणांत असलेल्या अतिनील किरणांमुळे कर्करोग, त्वचा भाजणे, अनुवांशिक विकार इ. होऊ शकतात.

पाण्याच्या प्रदूषणातून अनेक रोग उद्भवतात रासायनिक खते, कीटकनाशक, जंतुनाशक ह्यांचा स्वास्थावर विपरित परिणाम होतो. शिसे, पारा, आर्सेनिक, कोबाल्ट इत्यादीमुळे देखील स्वास्थावर दुष्परिणाम होतात. वायुप्रदूषात कार्बनमोनॉसाईड, सल्फर डायॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड यांचे विपरित योगदान आहे. रेडिओ गुणधर्मी पदार्थांच्या सान्निध्याने कर्करोग व इतर गंभीर आजार होऊ शकतात. स्त्रियांना विशेषत: गर्भवती स्त्रियांना दूषित पर्यावरणामुळे स्वास्थहानी होते. अविकसित आणि विकसनशील देशात लाकडे गोवऱ्याच्या इंधनासाठी होणाऱ्या वापराने निघणाऱ्या धुरामुळे अनेक स्वास्थसमस्यांना तोंड द्यावे लागते, कारण ह्या धुरांत बरेच अपायकारक वायू असतात.

आपल्या देशात सर्व वयोगटातील तसेच गर्भवतींपैकी अर्ध्याअधिक स्त्रियांमध्ये रक्तभाव असतो. डीडीटीचा वापर आणि महिलांच्या कर्करोगात सबंध असल्याचे वैज्ञानिक संशोधातून स्पष्ट झाले आहे. वाहतुकीत वापरलेल्या इंधनामुळे विषारी वायूनिर्मिती होऊन त्यामुळे श्वसनसंस्था, मज्जासंस्था, पचनसंस्था इ. प्रभावित होतात. डोळे, कान, नाक प्रभावित होतात. पशुपालनाशी संबंधित आजार विषाणु, कोंबड्या, गायी, डुक्कर ह्यांद्वारे माणसाकडे संक्रमित होतात, त्यामुळे बर्ड फ्ल्यु, मॅडकाऊ, सार्स इत्यादी साथीचे रोग उद्भवतात. शेतीत वापरल्या जाणाऱ्या रासायनिक द्रव्यांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा उल्लेख याआधी येऊन गेला आहे. कारखान्यांतून निघणाऱ्या सांडपाण्यामुळे कावीळ, दमा, मेंदूज्वर तसेच डोळे, कान त्वचासंबंधी रोग होऊ शकतात. खाणकामाने उत्पन्न होणाऱ्या धुळीमुळे वायुप्रदुषण होते. त्यामुळे खोकला, दमा व इतर श्वसनसंस्थेशी संबंधित होऊन शकतात. क्लेट, मॅगनीज, अस्बेसटॉस इ. खनिजांच्या खाणकामामुळे सिलिकोसिस, ॲसबेस्टोसिस रोगाने खाणकामगार ग्रस्त होऊ शकतो. जेथे संयंत्राचा वापर खनिजाच्या परिष्कारणासाठी केला जातो तेथील पाणी दूषित असते. तांबे आनि सोन्याच्या परिष्करणात कॅडमीयम, पारा इ. विषारी धातू निर्माण होतात. पर्यावरण दूषित झाल्यामुळे आम्लवर्ग, ओझोनक्षय ह्यासारखे परिणाम दिसून येतात. दूषित पर्यावरण शुद्ध कसे करता येईल ह्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण स्वच्छ पर्यावरण ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे.

पर्यावरण विषयक जनजागृती :

वाढत्या पर्यावरण ऱ्हासाबरोबर ते रोखण्यासाठी जनजागृतीची गरज आहे. काहींच्या म्हणण्याप्रमाणे शासनाने हे कार्य करावे. पर्यावरण जर आपल्या घरापासून सुरु होते तर ते आपले देखील कर्तव्य ठरते. पर्यावरणाचे संरक्षण हे केव्हाही फायदेशीर ठरते कारण असंतुलित पर्यावरण पुनस्थापित करणे ही अतिशय खर्चाची बाब आहे. रोगाच्या साथीकरिता ज्याप्रमाणे आपण स्वत: प्रतिबंधक उपाय करतो तसे प्रयत्न आपण सभोवतालचे पर्यावरण स्वच्छ राखण्यासाठी केले पाहिजेत.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. रमेश उमाठे, रेखा ठाकरे : पर्यावरण शास्त्र, विसा बुक्स 'स्वागत' ५५ डागा लेआऊट नागपूर, ४४००३३, २००६.
२. लईक फतेहअली : आपले पर्यावरण, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ग्रीन पार्क, नई दिल्ली, १९९९.
३. प्रा.डॉ. आनंद सहस्त्रबुद्धे : सामाजिक वनिकरण, निरंतर शिक्षण, २००३.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, राजीव गांधी महाविद्यालय, सडक/अर्जुनी, जि.गोंदिया.
Mob. No. 9422348295, Email ID : rajkumarbhagat293@gmail.com

***

चिपको आंदोलन एक पर्यावरण विषयक चळवळ

*डॉ. ज्योती पोटे

गोषवारा :-

पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे वातावरण आणि मानवाचे नाते खूपच जवळचे आहे. पर्यावरणामुळे आपल्याला असंख्य फायदे मिळतात. ज्यांची आपण आयुष्यभर परतफेड करू शकत नाही. ते जंगले, झाडे, प्राणी, पाणी आणि हवा यांच्याशी जोडलेले आहेत. ते पाणी शुद्ध करतात, पुराची शक्यता कमी करतात व नैसर्गिक संतुलन राखतात.

आजच्या युगात पर्यावरण प्रदूषण झपाट्याने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जिथे जिथे दाट झाडे आहेत ती पाडून टोलेजंग इमारती उभारल्या जात आहेत. आज विज्ञान क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आहे आणि जगात खूप विकास झाला आहे. दुसरीकडे पर्यावरण प्रदूषण वाढण्यासही ते कारणीभूत आहे. आधुनिकीकरण तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. मानव स्वतःच्या स्वार्थासाठी झाडे तोडत आहे आणि नैसर्गिक साधन संपत्तीशी खेळत आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे जी मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे. असा हा पर्यावरणीय संघर्ष हा पर्यावरणीय संसाधनांच्या गैरव्यवस्थापनामुळे, ऱ्हासामुळे होणारा संघर्ष आहे. यामध्ये दोन गट असतात ज्यात पर्यावरण रक्षकांचा समावेश असतो ज्यांना पर्यावरणाचे रक्षण करायचे असते. तर दुसऱ्या गटाला इतर कशासाठी तरी पर्यावरणाचे गैरव्यवस्थापन करायचे असते. पर्यावरणीय संसाधनांच्या गैरव्यवस्थापनामुळे अक्षय स्त्रोतांचा अतिवापर करणे, प्रदूषण आणि इतर बाबींना प्रतिसाद देण्याच्या पर्यावरणाच्या क्षमतेवर जास्त ताण येतो. त्यामुळे मानव आणि निसर्गासाठी राहण्याच्या जागेचा पोत हा दिवसेंदिवस निकृष्ट होत आहे. वारंवार हे संघर्ष स्थानिक लोकांच्या हक्कांशी संबंधित पर्यावरणीय न्यायाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करतात.

त्या अनुषंगाने चिपको आंदोलनासारख्या पर्यावरण विषयक चळवळीच्या अभ्यासातून पूर्वीच्या काळी असणारी पर्यावरणाची स्थिती मोठ्या प्रमाणात बदलत चाललेले पर्यावरण तसेच प्राचीन काळच्या अनेक पर्यावरणीय घटनांमधून निसर्ग आपल्यासाठी किती महत्त्वाचा आहे. त्याची काळजी आपण कशाप्रकारे घेतली पाहिजे याची जाणीव निर्माण होते. ओसाड होत चाललेल्या धरतीला पुन्हा हिरवेगार करण्याची वेळ आली आहे. म्हणून पर्यावरण विषयक चळवळीचा अभ्यास हा शोध निबंधाचा एक महत्त्वाचा घटक आहे.

मुख्य **शब्द :** पर्यावरण चळवळ, चिपको आंदोलन, पर्यावरणीय संघर्ष

प्रस्तावना :-

प्राचीन काळापासून मानवाचे निसर्गाशी नाते आहे. निसर्ग हा अन्नदाता आहे. निसर्गातूनच आपल्याला विविध प्रकारची औषधे मिळतात. निसर्ग आपल्याला पदोपदी एक महत्त्वाचा संदेश देत असतो. तो म्हणजे आपल्याकडे आहे ते दुसऱ्याला द्यावे. परंतु हा निसर्गच आज धोक्यात आला आहे. आज माणूस इतका बेफाम झाला आहे की, त्याचे निसर्गाशी असलेले नाते तो विसरत चालला आहे. निसर्गाने युगानुयुगे दिलेले वैभव, सुबत्ता याची मानवाला आठवण राहिलेली नाही. थोड्याशा स्वार्थासाठी तो झाडे तोडतो, जंगले उद्ध्वस्त करतो याचा परिणाम म्हणजे पर्यायाने पर्यावरणाची हानी झालेली दिसते. तसेच विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात आर्थिक विकासाच्या कल्पना शहरी जीवनाला सुखकर होतील अशा रूढ झाल्या. मानवाच्या बहुतांश गरजा पर्यावरणातूनच भागविल्या जातात. परंतु भरमसाठ लोकसंख्या वाढीमुळे

पर्यावरण व मानव यांच्यातील समतोलत्व बिघडते. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी मानवाने नैसर्गिक संपत्तीचा अविचाराने नाश केला. त्यातूनच पर्यावरण संतुलन बिघडले. औद्योगीकरण, नागरिकरण, नवनवीन तंत्रज्ञान, अणुबॉम्ब चाचण्या, पृथ्वीचे वाढते तापमान इत्यादी विविध कारणाने पर्यावरणातील प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. वातावरणातील हे फेरबदल मानवी जीवनावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम करतात. एकंदरीत व्यक्ती जीवन संयमित न राहता जेव्हा व्यक्ती पर्यावरणाचे संवर्धन करण्याऐवजी पर्यावरणाची उपेक्षा करून पर्यावरणाला साधन मानू लागला. त्यातूनच त्याने पर्यावरणाचा नाश करण्यास सुरुवात केली. त्यातून पर्यावरण प्रदूषणाची समस्या निर्माण झाली. या प्रदूषणाकडे लक्ष न दिल्यास मानवाचे अस्तित्व धोक्यात येईल व नष्ट होईल म्हणून सन १९५० पासून एक स्वतंत्र शाखा म्हणून पर्यावरणाच्या अभ्यासाला सुरुवात झाली.

सजीवांच्या अस्तित्वासाठी पर्यावरणाचे संतुलन टिकवण्यासाठी वने ही महत्त्वाची आहेत ५ जून १९७२ मध्ये स्वीडन मधील स्टॉकहोम येते आंतरराष्ट्रीय स्तरावरील पहिली जागतिक पर्यावरण परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये भारतासह अनेक देशांचा सहभाग होता. यामध्ये पर्यावरणाच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन हेच मानवासह अखिल सजीव सृष्टीचे भविष्यकालीन अस्तित्व आहे हा मूलमंत्र संपूर्ण जगाला देण्यात आला. देशाच्या निरनिराळ्या भागात पर्यावरण संरक्षणासाठी लोकांनी काही चळवळी करून निसर्ग आणि मानव यांच्यातील नाते टिकवून ठेवणे किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. परंतु मानवाच्या बदलत्या जीवनशैलीमुळे विविध नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर होऊ लागला आहे. यामुळे नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला आहे. अशाप्रकारे नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास सतत चालू राहिला तर मानवी मूलभूत गरजांची पूर्तता करणे कठीण होणार आहे.त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास ही एक जागतिक ज्वलंत समस्या बनली आहे. जेव्हा नैसर्गिक साधनांचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी प्रत्येक देशात मोठ्या प्रमाणात प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजात पर्यावरण जनजागृती होणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षणासाठी झालेल्या लोक चळवळींमध्ये बिश्नोई लोकांचे आंदोलन, उत्तराखंडमधील आंदोलन, चिपको आंदोलन, एप्पिको आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, टिहरी धरणाविरुद्धचे आंदोलन, वनराई आंदोलन अशी विविध आंदोलने झाली आहेत. त्यापैकी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये चिपको आंदोलनाविषयी सखोल विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनाचा उद्देश :-

१) पर्यावरणाविषयी सजगता निर्माण करणे.

२) पर्यावरणविषयक चळवळीचे स्वरूप जाणून घेणे.

३) पर्यावरण संवर्धनासाठी केलेले विविध कायदे जाणून घेणे.

४) चिपको आंदोलनाची पार्श्वभूमी जाणून घेणे

५) चिपको तंत्रातील आदिवासींचे योगदान स्पष्ट करणे.

गृहीतकृत्ये :-

१. चिपको आंदोलनाने अहिंसक मार्गाचा अवलंब केला.

२. चिपको आंदोलनात आदिवासी, शेतकरी आणि स्त्रिया या दुर्लक्षित गटांना एकत्र आणले.

३. चिपको आंदोलनात महिलांचा विशेष सहभाग होता.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत अध्ययनाकरता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे.

तथ्य संकलन :-

प्रस्तुत अध्ययनाकरता दुय्यम स्त्रोतांचा वापर केला असून यामध्ये या विषयाशी संबंधित प्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासिके, जर्नल, साप्ताहिके आणि इंटरनेटवरील माहितीचा वापर केला आहे.

पर्यावरण चळवळीचे स्वरूप:-

बहुतेक वेळा ज्या लोकांचे जीवनमान जंगल आणि त्यावरच्या संसाधनांवर आधारलेले असते त्यांच्या संघर्षालाच पर्यावरण चळवळ म्हणूनच संबोधले गेले आहे.गाडगीळ आणि गुहा यांनी 'पर्यावरण चळवळ' याची व्याख्या अशी केली आहे की, "नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत उपयोग, पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे किंवा पर्यावरणाचे जतन करणे या दिशेने जाणीवपूर्वक निर्देशित केलेली एक संघटित सामाजिक प्रक्रिया म्हणजे पर्यावरण चळवळ होय" पश्चिमात्य देशांमध्ये नैसर्गिक स्त्रोतांचा अधिकाधिक आणि उपयुक्ततेसाठी वापर करणे आणि शक्य तेवढे त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या कृतीला पर्यावरणाची चळवळ म्हणून संबोधले जाते. जयंता बंडोपाध्याय आणि वंदना शिवा यांच्या मते, "स्वतंत्र भारतातील पर्यावरणवादी चळवळ ही बाजारीकरणाच्या दबावामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक स्त्रोतांच्या शोषणाच्या विरोधातच अधिक वाढली आहे. निसर्गाचे शोषण करणाऱ्यांच्या अशा कृतीमुळे गरीब आणि निर्बलांचे जीवन धोक्यात आले आहे".

पर्यावरण चळवळ ही मानवाने पर्यावरण विरोधी केलेल्या वर्तनामुळे करावी लागणारी बाब झाली. पर्यावरण चळवळ ही अमेरिकेतील हरितक्रांतीमुळे इ.स.१९८० जगभर पसरली. सन १९३० मध्ये जंगलवासीयांनी जंगलातले अतिक्रमण या मुद्द्यावरून केलेला फॉरेस्ट डिपार्टमेंट विरोधचा सत्याग्रह ही आदिवासींची चळवळ म्हणून प्रसिद्ध झाली. जंगल आणि धरणे यांच्या जतनासाठी केलेल्या भारतभर प्रसिद्ध झालेल्या चळवळींमध्ये सुंदरलाल बहुगुणा यांचे चिपको आंदोलन, टिहरी गढवाल मध्ये धरणाला विरोध करण्यासाठी झालेले टिहरी बांध आंदोलन आणि महाराष्ट्र गुजरातच्या सीमेवरील नर्मदा बचाव आंदोलन ही पर्यावरणाच्या जतनासाठी झालेली प्रमुख आंदोलने म्हणून ओळखली जातात. हरित चळवळ, संवर्धन चळवळ या संज्ञा वैकल्पिकरीत्या पर्यावरण चळवळीसाठी वापरल्या जातात. पर्यावरणवाद हे एक व्यापक तत्वज्ञान आहे. हे तत्वज्ञान आपल्या सभोवतालाच्या परिसराच्या संवर्धन आणि विकासाला केंद्रीभूत मानून पर्यावरण आणि संस्कृतीच्या सुधारणेसाठी कळकळीचे प्रयत्न करते. आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामांमुळे मानवी जीवनासमोर अनेक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आव्हाने आहेत. जीवनशैलीतील, लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि सांस्कृतिक अनियमित विसंगती पर्यावरणीय संतुलनाला घातक आहेत.

पर्यावरणवादी **चळवळीच्या उदयाची कारणे :-**

- पर्यावरण ऱ्हासातून पर्यावरण चळवळीचा उदय झाला. औद्योगीकरण, शहरीकरण आणि तंत्रज्ञानाचा अत्याधुनिक वापर यामुळे वेगाने होणारा पर्यावरण ऱ्हास हे चिंतेचे प्रमुख कारण आहे. लोकसंख्येच्या वेगवान वाढीमुळे नैसर्गिक स्त्रोतांचा अनिर्बंध वापर होत आहे. जमीन, पाणी, जैवविविधतेशी संबंधित प्रमुख समस्या समाजाच्या पर्यावरणीय संतुलनावर विपरीत परिणाम करत आहे जंगलतोड, वायू प्रदूषण, सागरी आणि किनारी प्रश्न, मृदा प्रदूषण यासारख्या समस्या हे पर्यावरणीय असमतोलपणाचे दृश्य परिणाम आहेत.
- मनुष्य आणि निसर्गाच्या दरम्यानच्या परस्परक्रिया या चळवळीची मध्यवर्ती संकल्पना आहे. गांधीजींची ग्रामस्वराज्य ही संकल्पना विवेकवाद आणि स्वयंपूर्णता यावर आधारित आहे. मार्क्सवाद्यांच्या मते पर्यावरणीय

ऱ्हास हा सामाजिक विषमतेची परिमिती आहे. पर्यावरणीय चळवळीची कारणे केवळ पर्यावरणाशी संबंधित नसून ही आर्थिक आणि सामाजिक आहेत.

- भारतातील पर्यावरणीय चळवळ ही व्यापक आहे. यामध्ये पर्यावरणीय आरोग्य, मानवअधिकार, आदिवासींचे हक्क आणि पर्यावरणीय स्त्रीवाद इत्यादी घटकांचा समावेश आहे.

पर्यावरण **संरक्षण कायदा :-**

भारतातील पर्यावरणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी व पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने अनेक कायदे केले आहेत.भारतीय राज्यघटनेनुसार भारतातील घटक राज्यांना पर्यावरणासंबंधी महत्त्वाच्या विषयावर कायदा करण्याचा अधिकार दिला आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या धोरण विषयक कायद्यात मूलभूत कर्तव्य कलम ४८(अ) समाविष्ट करण्यात आले आहे या कलमानुसार प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे त्याचप्रमाणे कलम ५१(अ) भारतीय नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यात पर्यावरण संवर्धन विषयक घटकांचा समावेश करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या ४२व्या घटनादुरुस्तीनुसार पर्यावरण संदर्भातील तरतुदींचा अंतर्भाव करण्यात आला. यानुसार भारत सरकारने काही महत्त्वपूर्ण कायद्यांचा समावेश केला आहे

१) पर्यावरण संरक्षण कायदा - १९८६

२) हवा प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण कायदा - १९८७

३) जल प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण कायदा - १९७४

४) वन्य जीव संरक्षण कायदा - १९७२

५) वनसंवर्धन कायदा - १९८०

याशिवाय वनसंपत्ती वन्यप्राणी पशुपक्षी यांच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी भारतात ५८९ वनक्षेत्रे, ८९ राष्ट्रीय उद्याने आणि ५०० अरण्ये निर्माण केलेली आहेत. पर्यावरणातील नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी शासनाने विविध कायदे करून त्यांची कार्यवाही केलेली असली तरीही या संदर्भात पर्यावरणाच्या संरक्षणाविषयी जनजागृती घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे.

चिपको आंदोलनाची पार्श्वभूमी :-

पर्यावरणाच्या संरक्षणार्थ झालेले चिपको आंदोलन हे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. पर्यावरण विषयक सर्वात शक्तिशाली चळवळ म्हणून 'चिपको आंदोलन' या आंदोलनाचा उल्लेख केला जातो. इ.स.१९७३ मध्ये जंगलांचे महत्त्व विज्ञानाच्या माध्यमातून पटवून देण्याचा प्रयत्न चिपको आंदोलनात झाला. या आंदोलनाचा सरळ संबंध पर्यावरणाशी आहे. म्हणजेच वन व वनसंपत्तीशी आहे. ते संपूर्ण भारताचे आंदोलन बनलेले आहे. ते प्रथम पर्यावरण आंदोलन आहे जे संपूर्ण भारताच्या वन समस्येची जुळलेले आहे. सुंदरलाल बहुगुणांच्या नेतृत्वाखाली हजारो आदिवासींनी या आंदोलनात भाग घेतला. कारण आदिवासींच्या उपजीविकेचे साधन म्हणजे जंगले व जंगलातून मिळणारे वन उत्पन्न व तेच त्यांच्या जीवनाचे आधार आहेत. तेच त्यांच्या उपजीविकेचे एकमेव साधन आहे म्हणून या आदिवासींनी या आंदोलनामधून जंगलाचे संतुलन राखण्याचा प्रयत्न केला. कारण भारत स्वतंत्र झाल्यानंतर इथल्या सरकारने जंगल विषयक जी धोरणे अंमलात आणली ती स्थानिक लोकांच्या गरजांच्या अगदीच विरोधात असल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये असंतोष पसरला होता.जंगलातील लाकडाचे मोठमोठे ओंडके बाहेरच्या ठेकेदारांना विकण्याच्या चालत आलेल्या पद्धती बद्दल लोकांमध्ये असंतोष होता. गोपेश्वर पासून काही मैलावर असलेल्या मंडल जंगलातील अँशच्या

झाडाचे वितरण सायमंड कंपनीला करण्यात आले. तेव्हा सर्वोदय कार्यकर्त्यांमधील चंडीप्रसाद भट्ट यांना झाडांना घट्ट मिठी मारून बसण्याची कल्पना सुचली. अशा तऱ्हेने चिपको म्हणजे 'मिठी (आलिंगन) मारा' या आंदोलनाचा जन्म झाला. मंडल मधील ग्रामस्थ अमलसंग बिस्त याने त्याची सुरुवात केली त्याने असे ठरवले की कुऱ्हाडीचे घाव बसून पोटातील कोथळा बाहेर आला तरी झाडाची मिठी सोडायची नाही. चिपको आंदोलनाला जेव्हा विज्ञानाच्या माध्यमातून पाठिंबा दिला तेव्हा ते खऱ्या अर्थाने पर्यावरणवादी आंदोलन झाले त्यावेळी महिलांनी अशा घोषणा दिल्या की, "जंगलामध्ये काय असते? 'जमीन ,पाणी व शुद्ध हवा' असते."

चिपको तंत्र आणि **विस्तार :-**

रेनी:-

रेनी हे एक खेडे आहे. जंगल तोडीच्या विरोधात एवढे विशेष मोर्चे होऊन सुद्धा नोव्हेंबर मध्ये सरकार जंगलाच्या लिलावाच्या तयारीला लागले अलीकडील काळात दगडी कोळशांच्या घटना घडलेल्या ठिकाणी अलकनंदा नदीच्या खोऱ्यात जोशी मठाजवळ असलेल्या रेनी जंगलातील एक तुकडा लिलावासाठी निश्चित करण्यात आला. लिलावाची बातमी ऐकून दशौली ग्रामस्वराज्य संघाच्या कार्यकर्त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जोशीमठ येथील गटप्रमुख असलेले गोविंदसिंग रावत यांच्याशी संपर्क साधला. त्या भागातील चौकशीअंती असे आढळून आले की, तेथील जंगलातील दोन हजार झाडांवर ती झाडे तोडण्यासाठी अगोदरच खुणा करून ठेवल्या होत्या. त्यासाठी लागणारे मजूर ग्रामस्थांनीच पुरविले होते त्यावेळी गावात सभा भरविल्या गेल्या त्यात १९७० च्या पुराच्या आठवणी ताज्या केल्या. पुरामुळे किती पशुधन व जिवीतहानी झाली. या सर्वांची आठवण करून दिली. कधी आयुष्यात अनुभवला नाही असा तो महापूर होता अशी आठवण करून देण्यात आली व वृक्षतोडीला आपण विरोध केला पाहिजे असे सूचित केले चंडीप्रसाद भट्ट यांनी ग्रामस्थांना चिपको तंत्र अवलंबण्याची सूचना दिली.

सन १९७४ च्या मार्च महिन्यात झाडे तोडण्याचे ठरविले. २५ मार्चला भव्य असा मोर्चा काढण्यात आला. चिपको आंदोलक आंदोलन करतील या कारणाने झाडे तोडण्याचे रद्द करण्यात आले. पण २६ मार्चला १९६२ या युद्धात भारतीय लष्कराने ज्या जमिनी ताब्यात घेतल्या होत्या त्या पुन्हा देण्याच्या उद्देशाने सर्व ग्रामस्थांना बोलवण्यात आले व त्याच दिवशी ग्रामस्वराज्य संघाचे कार्यकर्ते दुसरीकडे गुंतलेले असताना झाडे तोडण्यात आली. ठेकेदारांची माणसे जी जोशी मठाकडून रेनीकडे प्रवास करत होती. खेड्यांच्या परीघाकडे असलेल्या जंगलांकडे ते चालू लागले. एका लहान मुलाने हत्यारे घेऊन जात असलेल्या त्या कामगारांना पाहिले तसा तो पळत त्या खेड्यातील महिला मंडळाच्या प्रमुख असलेल्या गौरादेवीकडे आला व त्यांना तो प्रकार मुलाने सांगितला. मग गौरादेवीने ताबडतोब गावातील सर्व महिलांना गोळा केले आणि ती जंगलात गेली तिथे त्यांनी त्या कामगारांना झाडे न तोडण्यासाठी वनविले तेव्हा सुरुवातीला महिलांचा अपमान करून त्यांना धमकावण्यात आले तेव्हा महिलांनी तेथून दूर होण्यास नकार दिला आणि झाडांना चिटकून त्यांचे संरक्षण केले. अशावेळी नाईलाजाने त्या मजुरांना तिथून निघून जावे लागले.

चिपको आंदोलनात रेनी येथे घडलेल्या घटनेचे महत्त्व दुहेरी होते. सरकारच्या जंगलांवरील आक्रमणाला शंभर वर्षांपासून विरोध करणारी शेतकऱ्यांची चळवळ हे स्वरूप या चळवळीने अंगीकारले. कागद निर्मितीचे कारखाने उभारण्यासाठी सरकारने पुढाकार घेतलेला दिसून येतो. महापुराच्या अलकनंदेच्या अनुभवामुळे पुढील दहा वर्षे व्यापारी तत्त्वावरील वृक्षतोडीला बंदी घालण्यात आली.

टिहरी:-

रेनी **म**धील घटनेनंतर गढवालांच्या वेगवेगळया भागात जंगलांचा लिलाव करण्याच्या पद्धतीला विरोध होऊ लागला. डेहरादून मध्ये चक्रताल विभागातील जंगलांचा लिलाव स्थानिक पातळीवरील विद्यार्थ्यांनी केलेल्या विरोधामुळे रद्द झाला. नव्याने स्थापन केलेल्या वन विभागांमध्ये आणि कामगारांच्या सहकारी संस्थांमध्ये सहकार्य नसल्यामुळे चिरच्या झाडाचे मोठे नुकसान झाले होते. या मुद्द्यावर पुन्हा एकदा मोठी चळवळ सुरू करण्यात आली. वन दिवसाचा मुहूर्त साधून चिपकोच्या कार्यकर्त्यांनी टिहरी जिल्ह्यातील वन खात्याला कळविले की, चिरच्या ज्या झाडांना चिक काढताना दुखापत झाली आहे त्यावर मलमपट्टी केली पाहिजे.तेव्हा वन विभागाने चिपकोच्या कार्यकर्त्यांच्या म्हणण्याला दाद दिली नाही. श्रीदेव सुमन यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष कृती म्हणून खुजनी पट्टीच्या ग्रामस्थांनी चिक पाझरण्यासाठी झाडाच्या बुंध्यावरील ख़ाचामध्ये खोचून ठेवलेली खुरपी ओढून बाहेर काढण्यास सुरुवात केली. अडवाणी जंगलातील झाडांना पाडण्यासाठी खुणा करण्यात आलेल्या होत्या. सर्वोदय कार्यकर्ते धुमसंग नेगी झाडे पाडली जाऊ नयेत म्हणून उपोषणाला बसले. ज्यावेळी ग्रामस्थांनी त्यांना वचन दिले की, आम्ही झाडे पाडून देणार नाही तेव्हाच त्यांनी उपोषण सोडले. वृक्षांची असलेल्या अनुबंधाचे प्रतीक म्हणून महिलांनी वृक्षांना ज्या ठिकाणी खापा मारल्या होत्या जखमी केले होते त्या ठिकाणी राख्या बांधल्या.

कुमाऊँ :-

१९७४ मध्ये नैनीताल येथे नैना देवीच्या जत्रेच्यावेळी कुमाऊँमध्ये चिपको अंदोलक पहिल्यांदा उतरले व लगेच कार्यकर्त्यांनी अनेक ठिकाणच्या जंगलांच्या लिलावाला विरोध करायला सुरुवात मध्ये तवा घाट मध्ये मोठी दुर्घटना घडून सुद्धा जंगलांचा लिलाव करण्याचे निश्चित करण्यात आले. त्याला उत्तराखंड संघर्ष वाहिनीच्या तरुण कार्यकर्त्यांनी प्रचंड विरोध केला होता.

अलमोराच्या 'हार्ट फॉरेस्ट' जेथे चिरच्या ५००० झाडांवरती तोडण्यासाठी ख़ुणा करून ठेवलेल्या होत्या तेथेही चिपक़ोचे आंदोलन कार्यकर्ते पोहोचले याला विरोध केला व त्याबरोबर डोंगराळ भागातून कच्चामाल निर्यात करण्यावर बंदी घालण्याची मागणी केली गंगा नदीच्या पात्राजवळील अत्यंत संवेदनशील बनलेल्या चिंन्नीधर जंगलात वन निगमाने ६००० झाडे पाडण्याचे ठरवले होते त्याला तीव्र विरोध दर्शवल्याने तो पाडण्याचा लिलाव माघार घेण्यात आला.

चामोली:-

चिपको आंदोलनाला यश मिळाले असूनही कार्यकर्त्यांना असे दिसून आले की, चामोलीमध्ये व्यापारी तत्त्वावर झाडे पडण्याचे काम चालूच आहे व त्यामुळे येथील वन्य प्राण्यांना धोका उत्पन्न झाला आहे. पुलना खेड्याजवळील ६२१ झाडे झाडांना पाडण्यासाठी खुणा करण्यात आल्या. तेव्हा तेथे बर्फाळ भागात बर्फ पडले होते तेथील स्त्रियांनी झाडांचे प्राण वाचवले.

डुंग्री-पिंतोली :-

या गावातील पुरुष मंडळी ओक वृक्षाचे जंगल फळे-फुले विभागाला विकणारे होते. या विभागाला येथे बटाट्याची लागवड करायची होती. जर हे जंगल तोडले गेले असते तर तेथील महिलांना खूप दूर सरपण व चारा आणायला जावे लागले असते. महिलांनी याला विरोध दर्शविला त्यांच्या मते गुरे पाळणे व शेती या दोन्ही गोष्टी पूर्णतः जंगलावर अवलंबून असतात चिपको आंदोलनाच्या सहकार्याने महिलांनी जंगलाचे महत्त्व पटवून दिले आणि जंगल तोडण्यास विरोध केला.

सर्वोदय कार्यकर्ते चिपकोचे नेते सुंदरलाल बहुगुणा यांचे विश्वासू सहाय्यक ग्रामस्थांच्या अडचणींची विचारपूस करण्यासाठी आले.धुमसंग नेगी,प्रताप शिखर, कन्वर प्रसुन व विजय जरदारी ही मंडळी त्यांच्याबरोबर इतर काही खेड्यापाड्यात हिंडली आणि अशा भेटींमध्ये त्यांना लोकांना मालगड्डीच्या जंगलात लवकरच झाडे पाडली जाणार असल्याची माहिती दिली व त्याबरोबरच या वृक्ष पाडण्यामुळे पर्यावरणावर कसा भीषण परिणाम होईल याचीही माहिती दिली. त्याच वेळी बहुगुणांची पत्नी विमल आणि इतर स्त्रियांनी त्या भागातील महिलांना या प्रश्नांची संपूर्ण माहिती दिली सुंदरलाल बहुगुणा उपोषणाला बसले. सर्व लोक एकत्र आले .त्या ठिकाणी एका झाडाला एक माणूस या प्रमाणात स्त्रिया, मुले, पुरुष अशी सर्वजण झाडाला चिकटून बसले यामुळे अधिकाऱ्यांना झाडे न तोडताच परत जावे लागले.

यानंतर ठेकेदारांच्या माणसांना झाडे तोडण्यासाठी थोपविण्याचे काम महिला वर्ग ही करू लागला.पुरुष मंडळी गावात हजर नसताना महिलांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन जंगल संपत्ती वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे चिपको आंदोलनाला मूर्त स्वरूप देण्याचे श्रेय उत्तर प्रदेशातील सहासी व बहादूर महिलांकडे जाते त्यांनीच ठेकेदारांना व जंगलतोड कामगारांना ललकारून सांगितले की जंगल हे आमचे माहेर आहे आम्ही त्याला तोडू देणार नाही कारण अनादी काळापासून कंदमुळे, पशुंसाठी चारा, वनौषधी, निवासासाठी प्राकृतिक स्वच्छ वातावरण प्राप्त होते. म्हणूनच इंग्रज शासन काळापासून आंदोलने केली आहेत. म्हणूनच सुंदरलाल बहुगुणा म्हणतात की, या पृष्ठभूमीवर चिपको आंदोलनाने आदिवासीतील एक पिढीपूर्वीपासून दबून असलेला आक्रोश बाहेर आला.

चिपको आंदोलनाचे यश :-

चिपको आंदोलनाच्या प्रखर विरोधामुळे सरकारने दिल्ली विद्यापीठातील वनस्पतीशास्त्रज्ञ श्री. विरेंद्र कुमार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने चिपको आंदोलन योग्य ठरवून १२०० चौ.कि.मी. क्षेत्रात व्यावसायिक वृक्षतोडीस दहा वर्षासाठी बंदी घालण्याची व तेथे वृक्ष लागवड कार्यक्रम युद्धपातळीवर राबविण्याची शिफारस केली. त्यामुळे सरकारने १३३७१ हेक्टरमधील वृक्षतोड योजना रद्द केली. हे चिपको आंदोलनाचे मोठे यश मानले जाते.

चिपको आंदोलनाच्या प्रमुख सहा मागण्या पुढील प्रमाणे आहेत.

१. जंगल परिसरातील लोकांच्या व खुद्द जंगलाच्या गरजा विचारात घेऊन विकास योजना आखाव्यात.
२. विशिष्ट भौगोलिक भागात विशिष्ट वृक्षांची लागवड फायदेशीर ठरते हे ओळखून जमीन,पाणी, खते, ऊर्जा इत्यादीचे नियोजन करावे.
३. जंगलांच्या आधारे आपल्या गरजा भागविण्यासाठी लोकांनीच जंगलांचे संरक्षण केले पाहिजे.
४. जंगलाच्या कुशीत राहणाऱ्या लोकांचा आर्थिक व सामाजिक दृष्टीने अभ्यास केला पाहिजे.
५. जंगल क्षेत्र, जलसाठे, भूमी इत्यादीचे सर्वेक्षण करून शासनाने जंगलपुत्रांचे अधिकार मान्य केले पाहिजेत.
६. वृक्षतोडीची ठेकेदारी प्रथा बंद करून जंगलपुत्रांसाठी जंगल संपत्तीवर आधारलेले ग्रामोद्योग सुरू करावेत.

निष्कर्ष:-

उत्तराखंडातील चिपको आंदोलन बाहेरच्या राज्यातही पसरले. या आंदोलनाने जंगलाचे रक्षण केले. झाडे व जंगलाप्रती जनजागृती निर्माण केली. या आंदोलनात महिला, बालके व युवकांनी आपली अग्रणी भूमिका पार पाडली. जंगलांना तोडून वनवासींना बेरोजगार आणि प्रकृतीपासून दूर करण्याच्या इराद्याने उत्तर प्रदेशात चिपको आंदोलनाला

जगाच्या नकाशावर आणले. जंगलाच्या संरक्षणासाठी पहाडी, जंगली निवासी आदिवासींनी एकत्र येऊन आंदोलन केले आहे.

- संपूर्ण मानवतेचे कल्याण हेच पर्यावरण चळवळीचे लक्ष्य आहे.
- या चळवळीचे उद्दिष्ट व्यापक व सर्वसमावेशक आहे. आदिवासी, शेतकरी आणि स्त्रिया अशा वेगवेगळ्या कारणांसाठी दुर्लक्षित गटांना पर्यावरण चळवळीने आपल्या कक्षेत सामावून घेतले आहे.
- पर्यावरण जतानाचा विषय मांडण्यासाठी चळवळीने अहिंसक मार्ग अवलंबिला आहे.
- पर्यावरण विषयक धोरणे तयार करताना आणि कायदे अंमलात आणताना सामूहिक हिताचा आधार घेण्यास सरकारला या चळवळीने भाग पाडले आहे.

सारांश :-

जंगल संरक्षणार्थ सुरू झालेले हे आंदोलन आज पर्यावरण संरक्षणाची गरज जनता व शासन यांना पटवून देण्यासाठी प्रयत्न करत आहे. वृक्ष लागवड करून जंगलक्षेत्र वाढविणे, जमिनीची धूप थांबवणे, जंगल संवर्धनाची कामे करणे, जंगलतोडीची ठेकेदारी पद्धत बंद करणे, जंगल संपत्तीवर आधारित उद्योग उभारून लोकांना स्वावलंबी बनविणे इत्यादी उपक्रम चिपको आंदोलन राबवत आहेत. दशौली ग्रामस्वराज्य संघाने जोशीमठ प्रदेशातील भूस्खलन रोखण्यासाठी अलकनंदा व तिच्या उपनद्यांच्या खोऱ्यात वनीकरण कार्यक्रम राबविला आहे. पर्यावरण संरक्षणाची लोकांमध्ये जाणीव व जागृती करण्यासाठी दरवर्षी अनेक शिबिरे आयोजित करून स्त्रिया, पुरुष,विद्यार्थी, खाजगी संस्थांचे तसेच शासकीय कर्मचारी इत्यादींना पर्यावरणाच्या संवर्धनाचे शिक्षण,प्रशिक्षण चिपको आंदोलकांद्वारा दिले जाते. पर्यावरण संरक्षणासाठी झालेल्या विविध आंदोलनांमधील चिपको आंदोलनाचे योगदान महत्वपूर्ण आहे.

संदर्भसूची :-

१. कऱ्हाडे बी. एम,.(२०११), सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, पिंपळापुरे आणि कं., प्रकाशन नागपूर.

२. देवगावकर एस.जी. आणि इतर(२००९), सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन, साईनाथ प्रकाशन नागपूर.

३. घनश्याम शहा (अनु. प्राची चिकटे), (२०११) भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड प्रकाशन पुणे.

४. रोकडे तुलसीदास (२०१६), चळवळ एक सैद्धांतिक आणि समीक्षात्मक विश्लेषण, पेनक्राफ्ट पब्लिकेशन मुंबई.

५. पंडित -बापट सुरेखा, (२००९), पर्यावरणशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

६. पाटील बी.बी.(२०१५), महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि चळवळी, फडके प्रकाशन कोल्हापूर.

Website

1. https://mr.m.wikipedia.org
2. https://YouTube.be/-ZvbRToz1ro
3. http//mahaerastratimes.com/India news

*विभाग- समाजशास्त्र पी.डी.कारखानीस महाविद्यालय, अंबरनाथ

***

वन संवर्धन आणि शासनाची भूमिका

*डॉ.आनंद आंबेकर

प्रस्तावना :-

नैसर्गिक संपदावर ताण येत आहे. त्यांचा ऱ्हास होत आहे म्हणून त्याचा वापर न करणे असा अजिबात अर्थ होत नाही. साधन संपत्तीच्या संपदांच्या वापरावर पूर्ण नियंत्रण असा संवर्धनाचा अर्थ नाही तर संपदा संवर्धन म्हणजे एखाद्या संपदेचा उचित व काळजीपूर्वक वापर करुन त्या संपदेचा अनावश्यक विनाश टाळणे होय. त्याचप्रमाणे साधन संपदा पुनउर्पयोगात आणता येतील असा प्रयत्न करणे आणि साधन संपदेची गुणवत्ता टिकवून ठेवणे होय. वनसंरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासन कशाप्रकारे व्यवस्थापन करते तसेच शासन दरबारी कोणते निर्णय घेते यावर अध्ययन होणे आवश्यक आहे.

अध्ययनाचे उद्देश :-

1) पर्यावरण संरक्षणातील वन संरक्षण संकल्पना समजून घेणे.
2) पर्यटन विकासातील वनसंरक्षणाची भूमिका अभ्यासणे.
3) वन संरक्षणातील शासनाची भूमिका अभ्यासणे.

अध्ययनाची गृहितके :-

1) पर्यावरण संरक्षणामध्ये वनसंरक्षणाला नगण्य स्थान आहे.
2) नैसर्गिक वनसंरक्षणाकडे दुर्लक्ष आहे.
3) वनसंरक्षणामध्ये शासनाचे निर्णय वास्तविक नसतात.

अ) वनसंरक्षण संकल्पना आणि स्वरुप :-

प्रसिध्द शास्त्रज्ञ ओडम यांच्या मते, "संवर्धन म्हणजे संपदांचे केवळ जतन नव्हे तर पर्यावरणातील संपदांचा डोळसपणे केला जाणारा व्यवस्थित वापर होय." सद्यस्थितीची राखण व त्यात अधिकाधिक सुधारणा घडवून आणणे म्हणजे संवर्धन. थोडक्यात साधनसंपत्तीचे संवर्धन म्हणजे पर्यावरणात उपलब्ध असणाऱ्या संपदेला वाया जाण्यापासून वाचवणे होय. अतिरेकी उपभोग झाल्यास तो त्वरीत थांबवून संपदेचे रक्षण करणे तसेच संपदेची गुणवत्ता खालावू न देणे ही संवर्धनाची महत्वाची वैशिष्टये आहेत. संवर्धनासाठी संपदांचा सविस्तर अभ्यास व नियोजन यांची गरज असते.

वनसंवर्धन (Forest Conservation)

पृथ्वीवर विविध प्रकारच्या वनस्पती आढळतात. यामध्ये उंच वाढणारे वृक्ष, मध्यम उंचीची झाडे, लहान-मोठी झुडुपे, गवत, वेली, बांबू यांचा समावेश होतो. **विविध नैसर्गिक वनस्पतींच्या आवरणास जंगल किंवा अरण्य किंवा वन म्हणतात.** गवताने व्यापलेल्या क्षेत्रास गवताळ प्रदेश म्हणतात. जंगलात वेगवेगळया वनस्पतींचे सामूहिक अस्तित्व असते. पर्यावरणाचा समतोल व एखाद्या प्रदेशाचा आर्थिक विकास यादृष्टीने जंगलांना विशेष महत्व असते. जंगलांचे महत्व काय आहे हे आपण यापूर्वी पाहिलेच आहे. वनांचा ऱ्हास मोठया प्रमाणावर होतो आहे. त्याची कारणे व त्याचे दुष्परिणामही आपण पाहिले. आपण प्रत्येक जीवनाश्यक गोष्टीसाठी वनांवर अवलंबून असतो. जंगलात जैवविविधता मोठी असते. अनेक प्रकारच्या वनस्पती, प्राणी-पक्षी जंगलात असतात. वनसंपत्तीचे हे महत्व लक्षात घेऊन वनांचे संवर्धन करणे महत्वाचे आहे.

वनांचे संवर्धन दोन प्रकारांनी करता येऊ शकते :

अ) लोकसहभागातून ब) कायद्याच्या मदतीने.

1) लोकसहभागातून वनांची कटाई, वृक्षतोड थांबविता येईल. यासाठी प्रथमत: समाज शिक्षणाची आवश्यकता आहे. सामाजिक संस्था, मंडळे यांच्या माध्यमातून व्याख्याने, चर्चासत्रे, स्लाईड शो याद्वारे वनांचे महत्व, उपयोग पटवून द्यावे लागतील.
2) लोकसहभागातून नवीन वृक्ष लावणे, वने वाढविणे या गोष्टी करता येतील. उदा.सामाजिक वनीकरणासारखा प्रकल्प राबविता येईल. एक मूल एक झाड असा प्रकल्प राबविता येईल.

वनसंवर्धनासाठी काय करता येईल?

1) कारण नसताना वृक्षतोड करु नये.
2) जीवनावश्यक गोष्टींसाठी आपण जंगलावर, वृक्षांवर अवलंबून असतो. त्यासाठी झाडे तोडावी लागली तर तेवढीच झाडे पुन्हा लावावीत. रस्ता रुंदीकरणासाठी झाडे तोडावी लागलीच तर पुन्हा झाडे लावावीत. किंवा तेच तोडलेले झाड दुसऱ्या ठिकाणी लावावे. जुना, मोठा वृक्ष रस्त्यावर असेल तर तो तसाच ठेवून रस्त्याची रचना करता येते का हे पाहावे.
3) ठरवून वृक्षशेती किंवा वनशेती करावी. वनशेतीसाठी पडिक जमिनीचा वापर करता येतो. महाराष्ट्रातील मंचर गावाजवळील माळरानावर श्रम आणि जिद्दीने अशी वनशेती फुलविलेली आहे.
4) वनशेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली की वनसंवर्धनाचे उद्दिष्ट आणखी सोपे होते. भोर येथील वनविभागाने राबविलेल्या प्रकल्पात निलगिरीची मोठया प्रमाणावर (350 हेक्टर) लागवड केली आहे.
5) पुण्याच्या परिसरात, कात्रजच्या जवळ, टेकडयांच्या समूहात एक निसर्गरम्य स्वप्न उभे आहे- चैत्रबन! या चैत्रबनाचे निर्माते आहेत पुण्यातील सुप्रसिध्द निसर्गप्रेमी उद्योजक श्री.अविनाश वारदेकर, जपानमधील वनीकरणाने प्रेरित होऊन त्यांनी या चैत्रबनाची उभारणी केली. जपानमध्ये 95% जमीन हिरवीगार आहे. वनीकरणाने नटलेली आहे. उजाड, उघडया टेकडयांवर झाडे लावून तिथे नंदनवन फुलवता येऊ शकते. मोठे उद्योजक यासाठी प्रयत्नशील राहू शकतात. बजाज-टेम्पो, टेल्को या कारखान्यांच्या परिसरात मोठया प्रमाणात वृक्षारोपण केले आहे.
6) नांदेड जिल्हयातील सागरोळी येथील एका हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.म.बा.सगरोळीकर यांना राष्ट्रपदी पदक मिळाले ते सामाजिक वनीकरण व वृक्षारोपण यासाठी!
7) राळेगणसिध्दी हे राज्यातले आदर्श गाव ठरले ते वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनामुळे! अण्णा हजारेंनी ही किमया गावातील तरुणांना हाताशी धरुन केली. त्यांनी तिथल्या जनावरांनासुध्दा अशी शिस्त लावली की ते कोणत्याच झाडाला किंवा रोपटयाला तोंड सुध्दा लावत नाहीत.
8) महाबळेश्वरच्या पायथ्याशी असणाऱ्या गोगजे गावातील श्री.लक्ष्मणराव कदम यांनी गावात गोविंद वनाची उभारणी केली. आजअखेर 1 लाख 35 हजार झाडे त्यांनी लावली आहेत. या वनांमुळे भरपूर फायदे झालेले आहेत. जमिनीची धूप थांबली, भूजलाची पातळी वाढली आहे.

अशा पध्देतीने गावातील तरुण मंडळे, शाळा, सामाजिक संस्था वनीकरण करु शकतात.

1) (3) जंगलतोड थांबविण्यासाठी लोकचळवळीची आवश्यकता आहे. चिपको चळवळ, पश्चिम घाट बचाओ चळवळ, सायलेंट व्हॅली चळवळ अशा चळवळींमधून समाज ढवळून निघतो आणि जंगलतोडीपासून जंगले वाचू शकतात.
24) कायद्याच्या सहाय्याने वृक्षतोड करणाऱ्या लोकांचा बंदोबस्त करता येऊ शकतो. आपल्या भारतात जंगल संरक्षण, वन्य-जीव संरक्षणासाठी कायदे आहेत. वन्य-जीव संरक्षक कायद्यान्वये चित्रपट अभिनेता सलमान खान याला

काळवीट शिकारप्रकरणी झालेली शिक्षा सर्वश्रुत आहेच. अशा कायद्यांचा, चळवळींचा अभ्यास आपण पुढे करणार आहोत.

नुकतीच कोल्हापूर जिल्हयात अमृता ऊर्फ नरक्या या दुर्मीळ औषधी वनस्पतीची होणारी तस्करी उघडकीस आली. दुर्मीळ वनस्पतींचे, प्राण्यांचे जतन झाले नाही तर त्या कायमच्या नष्ट होऊ शकतात. अशा वनस्पती, प्राण्यांचे संरक्षण करुन ठरवून त्यांची वाढ केली पाहिजे. आज नष्ट होण्याच्या मार्गावर असणाऱ्या अशा अनेक वनस्पती व प्राणी आपल्याला वाचवता येतील.

या सर्व चर्चेवरुन आपल्याला असे सांगता येईल की, वनसंवर्धनासाठी

1) विनाकारण जंगलतोड, वृक्षतोड करु नये.
2) लोकसहभागातून वनीकरण, वृक्षारोपण करावे.
3) अनावश्यक जंगलतोड थांबण्यासाठी लोकचळवळीची गरज आहे.
4) जंगलांचा ऱ्हास थांबविण्यासाठी कायदे अस्तित्वात आहेत. त्यांची योग्य अंमलबजावणी झाली पाहिजे.
5) प्राण्यांच्या, वनस्पतींच्या विशिष्ट जातींना संरक्षण दिले पाहिजे.
6) दुर्मीळ प्राणी, वनस्पतींच्या निर्यातीवर बंदी घालणे आवश्यक आहे.
7) वनसंवर्धनाविषयी लोकशिक्षण देणे गरजेचे आहे.

ब) पर्यटन विकासातील शासनाची भूमिका :-

चंद्रपूर-बल्लारपूर मार्गावरील विसापूर येथील बॉटनिकल गार्डनचे लोकार्पण येत्या 25 डिसेंबर रोजी करण्याचा प्रयत्न करत आहे. हा दिवस अत्यंत महत्वाचा आहे कारण त्या दिवशी भारताचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती असते. याशिवाय विसापूर येथे नव्याने उभ्या राहणाऱ्या वनस्पती उद्यानासही स्वर्गीय भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात येणार आहे. या दोन्हीचे लोकार्पण स्व.अटलजींच्या जयंतीदिनी करण्यात येणार आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामुळे चंद्रपूर जिल्हयाला पर्यटनाच्या दृष्टीने विशेष महत्व आहे. ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक वर्षभर येत असतात. देशातील अत्याधुनिक बॉटनिकल गार्डनची जवळच विसापूरमध्ये तयार होत असल्याने या गार्डनला देश-विदेशातील पर्यटकांनाही भुरळ पडणार आहे. वनसंपदा व वनेतर क्षेत्रातील जैविक संवर्धन साठा बघण्यासाठी जगभरातील पर्यटक, अभ्यासक, विद्यार्थी या गार्डनला भेट देतील. या बॉटनिकल गार्डनमुळे विसापूर आणि सभोवतालची गावे विकासाचे हब म्हणून पुढे येईल. बॉटनिकल गार्डन, कन्झर्वेशन झोन आणि रिक्रीएशन झोन अशा तीन विभागामध्ये उद्यान तयार होत आहे. ताडोबात टायगर व बिबट सफारी सुरु करण्याचे नियोजन आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प हे उत्तम पर्यटन स्थळ म्हणून जगाच्या नकाश्यावर यावे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. टायगर व बिबट सफारीच्या माध्यमातून येथे येणाऱ्या पर्यटकांना वन्यजीव दर्शनाची विशेष सोय उपलब्ध होणार आहे. चंद्रपूर जिल्हयातील बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र हा रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्वपूर्ण प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या ठिकाणी बांबु कामावर फायर रिटारडंट पॉलीश करणे, आग प्रतिबंधक योजनेनुसार कार्यशाळा इमारत व स्वयंपाकगृह इमारतीचे बांधकाम करणे तसेच विद्युत विषयक कामांना गती देण्यात येत आहे.

चंद्रपूर येथील वनप्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी अर्थात वनअकादमीशी संबंधित कामांना गती देत पुढे नेण्याची आवश्यकता आहे. वनअकादमीत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्राच्या निर्मितीची आवश्यकता आहे. अकादमीतील रिक्त पदांची भरती करणे सुध्दा गरजेचे आहे. वन अकादमीचे वनविद्यापीठात रुपांतर करण्याच्या दृष्टीने

समिती नेमून त्यादृष्टीने जलदगतीने कार्यवाही करण्याचे निर्देश वनमंत्र्यांनी दिले. देशातील अत्याधुनिक अशा स्वरुपाची ही वनअकादमी सर्व सोयीसुविधांनी परिपूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. कांदळवन संरक्षणासाठी देशभरातील सर्वोत्तम पध्दतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. आपली जैव विविधता आणि कांदळवनाचे महत्व शाळेपासूनच विद्यार्थ्यांना होणे गरजेचे असल्याने यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना यासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक असून महाराष्ट्र कांदळवन आणि सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठानने याबाबत योग्य ती कार्यवाही सुरु करावी. याशिवाय कांदळवन म्हणजे नेमके काय, याची जपणूक कशी करावी, कांदळवन संवर्धनासाठी काय करण्यात येत आहेत याची माहिती देणारे लेख वेळोवेळी वृत्तपत्र आणि मासिकांमधून प्रसिध्दीला देण्यात यावेत.

कांदळवन क्षेत्रांत सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवण्यात येणार आहे. भिवंडी परिक्षेत्र, पश्चिम व मध्य मुंबई, नवी मुंबई व ठाणे खाडी, फ्लोमिगो अभयारण्य परिक्षेत्र येथे सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. साधारणपे 106 ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील स्थलांतरित पक्ष्यांच्या स्थलांतरित मार्गाचा अभ्यास करणे, ठाणे खाडी येथे फ्लोमिंगो अभयारण्य उभारणे, ऐरोली येथे गस्तीसाठी सौरऊर्जेवर चालणारी इलेक्ट्रिक बोट, कांदळवन संरक्षण आणि संवर्धन यासाठी सुरक्षारक्षक यांची नेमणूक, आवश्यक तेथे कांदळवन याची जपणूक करण्यासाठी भिंत घालणे असे विषय प्राधान्याने मार्गी लावण्यात येणार आहेत. मुंबई महानगर प्रदेशाच्या किनारपट्टीवरील समुद्री सस्तन प्राण्यांचा अधिवास, त्यांचा विस्तार आणि गणना यांचा अभ्यास येत्या 18 महिन्यात करण्यात येणार आहे. यामध्ये इंडियन ओशन हम्पबॅक डॉल्फिन आणि फिनलेस पोरपॉईस या प्रजातींवर प्रामुख्याने काम केले जाणार आहे.

या अभ्यासामध्ये मुंबई किनारपट्टीच्या 10 किमीच्या पट्टयात आढळणाऱ्या इतर सागर सस्तन प्राण्यांच्या नोंदी करण्याबरोबरच महाराष्ट्राच्या सागरी किनारपट्टीतील करण्यात येणाऱ्या आत्तापर्यंतच्या या पहिल्या अभ्यासात मुंबई महानगरातील साधारण 70 किमी (उत्तर-दक्षिण) किनारपट्टीचा समावेश करण्यात येणार आहे. राज्य शासनाने हाती घेतलेला हा प्रकल्प संपूर्ण देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे. हा प्रकल्प मा.पंतप्रधान, श्री.नरेंद्र मोदी यांनी ऑगस्ट 15, 2020 मध्ये घोषित केलेल्या Project Dolphin या दूरदर्शी उपक्रमाला अनुसरुन असून, त्यामुळे देशातील नद्या व खड्यांमधील डॉल्फिनच्या संरक्षण व संवर्धनात मोठा हातभार लागण्यास मदत होणार आहे. ऑक्टोबर 2022 पासून हा प्रकल्प सुरु होणार असून कांदळवन प्रतिष्ठान आणि कोस्टल कॉन्झर्व्हेशन फाऊंडेशन (CCF) स्वायत संस्थेच्या सहयोगाने हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे अभ्यास क्षेत्र उत्तरेकडील वैतरणा नदीच्या मुखापासून सुरु होऊन दक्षिणेकडील ठाणे खाडी तसेच बृहन्मुंबईच्या दक्षिण टोकापर्यंतचा पश्चिम समुद्र किनारा व्यापेल.

या क्षेत्रामध्ये बँक बे, हाजी अली आणि माहीम खाडी यांसारख्या अनेक खाडया तसेच एमएमआर क्षेत्रामधील मिठी, दहिसर, पोईसर, ओशिवरा आणि वैतरणा या पाच नदीच्या मुखांचा समावेश असेल, जे डॉल्फिन आणि पॉरपॉईज या दोन प्रमुख प्रजातींच्या अधिवासाचा अभ्यास करतील. समुद्री सस्त्र प्राण्यांच्या अधिवासाची प्राधान्ये, खाद्य आणि मत्स्यव्यवसायाशी त्यांचे परस्पर संवाद तपासण्यासाठी विस्तृतपणे अभ्यास करण्यात येणार आहे. पाण्यातील समुद्री सस्तन प्राण्यांच्या प्रजातीला मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण होणारे धोके ओळखणे हा यामागील उद्देश असून किनाऱ्यावरील मासेमारीमुळे हया प्रजातींचे जाळयात अडकल्यामुळे जाळयांचे नुकसान होऊ शकते तसेच त्यांच्या परिसंस्थेवर कसा परिणाम होतो हे यामुळे समजण्यास मदत होणार आहे.

वनसंरक्षणासाठी शासनाने घेतलेले निर्णय :

लोणार सरोवर पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी 369 कोटी 78 लाखांच्या विकास आराखडयास मंजूरी.

लोणार सरोवराचे जतन, सवंर्धन आणि विकासाकरीता अमरावती विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली लोणार सरोवर विकास समिती स्थापन करण्यात आली आहे. लोणार सरोवर जतन, संवर्धन आणि विकास करण्यासाठी 369 कोटी 75 लाख रुपयांच्या विकास आराखडयास मंजुरी देण्यात आली आहे. आठ विभाग जसे नगरविकास विभाग, नियोजन विभाग, वन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, गृह निर्माण विभाग, जलसंपदा विभाग आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत विकास आराखडयानुसार मंजूर करण्यात आलेली कामे करण्यात येणार आहे.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांना 20 लाख रुपये अर्थसहाय्य

वन्य प्राण्यांच्या (वाघ, बिबटय, अस्वल, गवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती व रानकुत्रे) हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईच्या रक्कमेत 15 लाखावरुन 20 लाख इतकी वाढ करण्यात आली आहे. तर या हल्लयात संबंधित व्यक्तीला कायमचे अपंगत्व आल्यास 5 लाख रुपये तर संबंधित व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास 1 लाख 25 हजार रुपयांची मदत केली जाणार आहे. तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात संबंधित व्यक्ती किरकोळ जखमी झाल्यासही 20 हजार रुपयांपर्यंतची मदत करण्यात येणार आहे.

मृत झालेले पशुधन व जखमी पशुधन तसेच पिक हानी प्रकरणातील नुकसान भरपाई च्या रक्कमेत देखील लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. गाय, म्हैस आणि बैल यांचा मृत्यू झाल्यास बाजार भाव किंमतीच्या 75 टक्के किंवा 70 हजार रुपये यापैकी कमी असणारी रक्कम शासनामार्फत देण्यात येणार आहे. मेंढी, बकरी व इतर पशुधन यांचा मृत्यू झाल्यास बाजार भाव किंमतीच्या 75 टक्के किंवा 15 हजार रुपये यापैकी कमी असणारी रक्कम दिली जाणार आहे. गाय, म्हैस, बैल या जनावरांना कायमचे अपंगत्व आल्यास बाजार भाव किंमतीच्या 50 टक्के किंवा 15 हजार रुपये यापैकी कमी असणारी रक्क्म दिली जाणार आहे. गाय, म्हैस, बैल, बकरी आणि इतर पशुधन जखमी झाल्यास औषधोपचाराचा खर्च देण्यात येईल. तसेच देय रक्क्म मर्यादा 25 टक्के किंवा 5 हजार रुपये यापैकी कमी असणारी रक्कम दिली जाणार आहे.

वने कर्मचाऱ्यांना मिळणार पोलीस कर्मचाऱ्याप्रमाणे लाभ :

आपला जीव धोक्यात घालून वनांचे संरक्षण करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना आता पोलिस कर्मचाऱ्याप्रमाणेच लाभ मिळणार आहे. नागरी संपत्तीचे आणि मनुष्यांचे संरक्षण करताना जीव धोक्यात घालणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना राज्य शासनातर्फे विविध लाभ देण्यात येतात. तसेच लाभ वनांचे संरक्षण करताना जीव धोक्यात घालणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना मिळणार आहेत. वणवे विझवताना, शिकार रोखताना, वनांतील वृक्षचोरी वा अन्य प्रकारची चोरी रोखताना, जखमी किंवा मानवी वस्तीत शिरलेले वन्य प्राणी वाचविताना वन कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका असतो. अनेकदा नैसर्गिक आपत्तींना तोंड देताना वन कर्मचाऱ्यांच्या जीवाला धोका असतो. काही वेळा वनांचे व वन्य प्राण्यांचे संरक्षण करताना दुर्दैवाने वन कर्मचारी मृत्यूमुखी पडल्यास अशा मृत वन कर्मचाऱ्यांच्या वारसास 25 लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येईल. त्याचप्रमाणे अशाप्रकारे कर्तव्य बजावताना मृत्यू पावलेल्या वन कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर प्राधान्याने नोकरी देण्यात येईल. जर वारस नोकरी करण्यास सक्षम नसेल किंवा वारसाने नोकरी नाकारली तर सदर मृत वन कर्मचाऱ्याच्या नियत सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंतचे वेतन सदर कुटुंबाला देण्यात येईल. तसेच कर्तव्य बजावताना मृत्यू पावलेल्या वन कर्मचाऱ्यांच्या पार्थिवाचे कुटुंबाने ठरवलेल्या ठिकाणपर्यंतचे रस्ते/रेल्वे/विमान इत्यादी मार्गे वहन करण्याचा खर्च शासनातर्फे करण्यात येईल. कर्तव्य बजावताना वन कर्मचारी जर कायमचा दिव्यांग झाला तर सदर वन

कर्मचाऱ्यास श्रेणी प्रमाणे रु.3 लाख 60 हजार ते रु.3 लाख इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येईल. अशाप्रकारे कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या वन कर्मचाऱ्याचा उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करणार आहे.

सारांश :-

1) पर्यावरण संरक्षणामध्ये वनसंवर्धन संकल्पना सुस्पष्ट असलेली दिसते.
2) शासकीय पातळीवर वनसंरक्षण नियोजन बंद आहे.
3) वनसंवर्धनासाठी समजाउपयोगी निर्णय घेतलेले आहेत.

संदर्भ :-

1) प्रा. पाथरे वनीला "पर्यावरण शिक्षण" चैतन्य प्रकशन, कोल्हापूर.
2) कुलकर्णी दिलीप, दैनंदिन पर्यावरण, राजहंस प्रकाशन, पुणे.
3) करकरे सुनिल – संपादन, पर्यावरण शिक्षण विश्व प्रकृति निधी भारत, कोल्हापूर.
4) मुग्धा प्रकाशन, निसर्ग सेवकाचा "अभिजात" दिवाळी 96, पुणे.
5) डॉ. वांगीकर पो.बी., प्रदुषण सूचक झाडे, लोकसाहित्य प्रकाशन सिडको, औरंगाबाद.
6) डॉ.चव्हाण बलभीम, पवार, ढेरे, पर्यावरण अभ्यास, शब्दवेळ प्रकाशन, कोल्हापूर.
7) सुधीर मुनगंटीवार शब्दांकन फडके वर्षा ऑक्टोबर 2029, योजना मासिक.

*समाजशास्त्र विभाग, गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी. Email ID: anand.ambekar.gjc@gmail.com

***

आनंदवनातील शाश्वत विकास प्रक्रियेत कुष्ठमुक्तांचे योगदान: समाजशास्त्रीय विश्लेषण

*डॉ.श्रीनिवास पिलगुलवार
**डॉ. प्रविण दि. मुधोळकर

गोषवारा:

आजच्या आधुनिक युगात भौतिकदृष्टया संपन्न मानवजात आपल्या अस्तित्वासाठी धडपड करते आहे हे विरोधाभासी चित्र मानवजातीच्या निसर्गव्यवस्थेतील अतिरेकी हस्तक्षेपामुळे निर्माण झाले आहे.विज्ञानाच्या वरदानामुळे गतिशील व अनियंत्रित जीवन जगणाऱ्या मानवाने थोडे थांबून आत्मचिंतन करण्याची गरज आहे. विकासाच्या निमित्ताने निसर्गव्यवस्था आणि त्यातील परिस्थितीकीला धक्का पोहोचवून आपण खरच सुखी होणार काय? या प्रश्नावर गंभीर चिंतन करण्याची वेळ आली आहे. खरे तर ही जबाबदारी समाजातील बुध्दिजीवी वर्गाची आहे. पण समाजातून बहिष्कृत केलेल्या कुष्ठमुक्तांनी या प्रक्रीयेवर चिंतन करून तीला प्रत्यक्षात साकार करावे ही गोष्ट सुदृढ समाजाला आत्मचिंतन करायला लावणारी आहे.अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आनंदवनाची सुरूवात झाली.पण श्रध्देय बाबा आमटे,साधनाताई आमटे आणि डॉ विकास आमटे आणि त्यांच्या कुटूंबातील सदस्यांच्या कल्पक नियोजनामुळे आनंदवनात अनेक पर्यावरणपूरक उपक्रमांची सुरूवात झाली. यामध्ये हात आणि पायांची बोटे गळालेल्या कुष्ठमुक्तांसोबत अपंग लोकांनीही आपले योगदान दीले. हे जगातील मानवतावादी परिवर्तनाचे एकमेव उदाहरण असावे. निसर्गव्यवस्था आणि परिस्थितीकी यांच्या मुळ तत्वाला धक्का न लावता मानव स्वत:च्या गरजा जास्त चांगल्या रीतीने पुर्ण करू शकतो. यातून व्यक्ती आणि समाज यांचा विकास होऊ शकतो हे आनंदवनाच्या शाश्वत विकास प्रक्रियेतून लक्षात येते.प्रस्तूत अध्ययन विषयातून शाश्वत विकास,परिस्थितीकी तंत्र, निसर्गाची कार्यप्रणाली, याबाबत विश्लेषण करण्यात आले असून आनंदवन स्थापनेसाठी बाबा आमटे यांच्या जीवनातील कारणीभूत परिस्थिती, आनंदवनाची स्थापना, आनंदवनाच्या वैचारिक तत्वप्रणालीने प्रेरित झालेल्या कुष्ठमुक्तांनी शाश्वत विकासात केलेले योगदान या सर्व बाबींवर शास्त्रीय स्वरूपाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

बिजशब्द—शाश्वत विकास, कुष्ठमुक्त, आनंदवन.

प्रस्तावना:

आनंदवन हे कुष्ठसेवेसाठी प्रसिध्द आहे. आनंदवनाने आतापर्यंत कुष्ठमुक्तांचा केलेला उपचार त्यांना दीलेला आश्रय आणि त्यांचे केलेले पुनर्वसन यामुळे आनंदवनाला कुष्ठबाधितांचे पुनर्वसन केंद्र अशीच ओळख आहे. परंतू आनंदवनाचे सुक्ष्म निरिक्षण केल्यानंतर असे लक्षात येते की, येथील कुष्ठबाधित व्यक्तींनी आनंदवनाला एक प्रयोगशाळा बनवून त्यामध्ये अनेक पर्यावरणपूरक उपक्रम साकारले. निसर्गातील टाकाऊ समजल्या जाणाऱ्या सर्वच वस्तूंचा उपयोग करून तेथील जीवन सुखकर बनविण्यामध्ये या कुष्ठमुक्तांचा फार मोठा वाटा असल्याचे लक्षात येते. यामुळे उपलब्ध स्त्रोतांचा उपयोग करण्यात येऊन निसर्गाचा समतोल साधण्यात यश आले आहे. रस्त्यावर पडलेल्या एका कुष्ठरोग्याच्या दयनीय स्थितीने विश्वविख्यात कुष्ठसेवक बाबा आमटे यांच्या विचारात आणलेल्या बदलाने आनंदवनाची निर्मिती झाली.आनंदवनाची निर्मिती हा योगायोग असला तरी कुष्ठबाधितांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांच्यासोबत केलेले कार्य, त्यांच्यात निर्माण केलेला आत्मविश्वास तसेच स्वावलंबन, शिस्त आणि श्रमप्रतिष्ठेला दीलेले महत्व या सर्व गोष्टी आनंदवनाच्या अधिष्ठानासाठी कारणीभूत आहेत. कुष्ठसेवा, कुष्ठरूग्णांचे पुनर्वसन या पलिकडे जाऊन आनंदवनातील कुष्ठमुक्तांनी पुर्नप्रक्रिया आणि पुनर्वापराचे प्रयोग यशस्वी केले आहेत.आमटे कुटूंबियांनी त्यांच्यात निर्माण केलेल्या आत्मविश्वास आणि त्यांच्या प्रती दाखवीलेला जिव्हाळा यामुळे समाजातून बहिष्कृत आणि अपमानित झालेल्या वंचित लोकांनी प्रयोगशीलतेची इतकी मोठी उंची गाठणे हा मानवतावादी परिवर्तनाचा मोठा चमत्कार होय. बाबा आमटे यांच्या नंतर डॉ विकास आमटे यांच्या कल्पनेतून साकारलेल्या वेगवेगळे उपक्रम आणि स्वरानंदवनाने सुदृढ समाजाशी जवळीक साधल्यामुळे अंध अपंग यांच्याबद्दलची दयेची आणि लाचारीची भावना तसेच कुष्ठबाधितांबद्दलची लांच्छनाची भावना कमी होण्यास मदत झाली.कुष्ठमुक्त झालेल्या लोकांनी कुटुंब आणि समाजात परत जाण्याची संधी असतांनाही आनंदवनाला आपले कुटूंब मानून आपले संपूर्ण जीवन आणि कष्ट अर्पित केले आणि मानवतावादी,पर्यावरणपूरक अशा सौंदर्यस्थळाची निर्मिती केली. प्रस्तुत अध्ययनात आनंदवनातील कुष्ठबाधितांनी स्वत:च्या समस्यांवर मात करून आंनंदवनाला शाश्वत विकासाचे केंद्र म्हणून कशा प्रकारे विकसित केले, याबाबतचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

संशोधनाची उद्दीष्टे:

१. परिस्थितिकी आणि प्रदुषण समस्येचा अभ्यास करणे.

२. आनंदवनातील शाश्वत विकास प्रक्रियेमध्ये कुष्ठमुक्तांचे योगदानाबाबत विश्लेषण करणे.

३. पुर्नप्रक्रिया आणि पुर्नवापर प्रणालीमध्ये आनंदवनात आलेल्या परिवर्तनाबाबत अध्ययन करणे.

अध्ययन पध्दती: प्रस्तुत संशोधन लेखासाठी प्रामुख्याने व्दितियक अध्ययन साहित्य यामध्ये संदर्भ ग्रंथ मासिके, माहिती पुस्तीका, इंटरनेटवरील साहित्य तसेच मुलाखत आणि निरिक्षण तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

माहितीचे विश्लेषण:

मानवाचा निसर्गव्यवस्थेतील अतिरेकी हस्तक्षेप आणि नैसर्गिक स्त्रोतांवर अतिक्रमण यामूळे निसर्गाचे आणि परिस्थितीकीचे संतुलन बिघडत आहे. त्यामुळेच मानवी समाजासमोर जीवघेणे प्रश्न निर्माण झाले आहेत.मानवाने आपल्या गरजा भागवीण्यासाठी हे अतिक्रमण टाळून व निसर्गाशी अनुकूलन साधून नैसर्गिक जीवनपध्दतीचा अवलंब केला तर मानव आणि निसर्ग या दोघांचेही अस्तित्व कायम राहून शाश्वत विकास साधता येतो.

शाश्वत विकासाची संकल्पना:

शाश्वत विकासाची संकल्पना जवळपास तीन दशकांपूर्वी विकसित झाली. शाश्वत विकास (Sustainable Development) या शब्दाचा सर्वप्रथम वापर 'जागतिक संवर्धन रणनीती'(World Conservation Strategy) मध्ये इ.स. १९८० मध्ये केला गेला. परंतू याचा सविस्तर रितीने प्रसार **'जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगा'**व्दारे केला गेला. WCED ने शाश्वत विकासाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "Sustainable development as meeting the needs of present without compomising the ability of of future generation to meet their needs". ''भावी पिढीच्या गरजा पुर्ण करण्याच्या पर्यावरणाच्या क्षमतेचा ऱ्हास न करता वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणे म्हणजेच शाश्वत विकास होय.''

वरील व्याख्यांचा विचार केल्यास असे लक्षात येते की या व्याख्या मानवाला संकेत करतात की त्याने आपल्या बुध्दी आणि शक्तीच्या बळावर पर्यावरणाला नुकसान न पोहचविता आपल्या गरजा पुर्ण केल्या पाहिजेत.त्यासाठी परिस्थितिकी, पर्यावरण आणि मानवाचे अस्तित्व यांचा अन्योन्य संबंध काय आहे हे समजून घेणे गरजेचे आहे.

परिस्थितिकी आणि पर्यावरण:

परिस्थितिकी आणि पर्यावरण हया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समस्त जीव आणि मानवी समुदायाचे अस्तित्व प्राकृतिक पर्यावरणावर आधारीत आहे. मानवाचा इतिहास आणि संस्कृती, त्यांचा सामाजिक आणि आर्थिक विकास आणि सूखी जीवन आणि कल्याणात त्यांच्या पर्यावरणीय प्रभावांचे महत्व सर्वज्ञात आहे.पर्यावरणाचे क्षेत्र व्यापक असून हा केवळ जीव विज्ञानाचा विषय नाही.पर्यावरणात भूगोल, भौतिकी, रसायन, भूगर्भ, अर्थशास्त्र, सामाजिक विज्ञान इ. अनेक विज्ञानाचा योग आहे. वस्तुत: पर्यावरण ज्ञान बहुआयामी आहे हे समस्त जीव आणि मानवी समुदायांना परिस्थितीसोबत साम्यावस्था स्थापित करण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावते.

हेकल यांनी परिस्थितिकी विज्ञान याबाबत व्याख्या करतांना म्हटले आहे. ''पर्यावरण आणि सजिवांच्या परस्पर संबंधांचे ज्ञान आणि सजीवांच्या परस्पर आंतरक्रीया याबाबत ज्ञान हेच संमिश्रीत रूपातील परिस्थितीकी विज्ञान किंवा परिस्थितीकी होय.''

पर्यावरणीय समस्या आणि शाश्वत विकासाची आवश्यकता:

आधुनिक काळात प्राकृतिक संसाधन आणि त्यांच्या वितरणात असंतुलन असल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. यामुळे अनेक मागास देश प्रभावित झाले आहेत. १९९० पर्यंत शेती करण्याच्या पध्दतीमुळे जमिनीच्या उत्पादकतेचा ऱ्हास झाला आहे. १९९० पर्यंत ५६२ मिलीयन हेक्टर जमिनीचा जी संपुर्ण विश्वाच्या ३८ टक्के भाग आहे तो नष्ट झाला आहे. मृदा संसाधनाला निकृष्ट बनविण्यात मुख्यत: वृक्ष आणि वने यांचा ऱ्हास,जमिनीचे अत्याधिक उपयोग अदाधुंद स्वरूपाची पशु चराई औद्योगिकरण याचा फार मोठया प्रमाणात सहभाग आहे. शेतीमध्ये जैविक किंवा कंपोस्ट खते न वापरल्यामुळे शेतजमिनीचा पोत कमी होत आहे.यामुळे शेतीसाठी उपकारक असणारे जिवजंतु नष्ट होत असून येणाऱ्या काळात जगावर उपासमारीचे संकट येण्याची शक्यता आहे. आधुनिक प्रगत अशा संपन्न राष्ट्रांनी अधाशीपणे केलेला संसाधनांचा उपभोग हे देखील महत्वाचे कारण आहे.मानवी जीवनात पाण्याला अनण्यसाधारण असे महत्व आहे. परंतू अनियंत्रित स्वरूपाच्या पाणी वापरामुळे आज पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मानवाच्या अतिलालसेमुळे त्याच्या स्वत:च्या अस्तित्वावर अनेक प्रश्न

निर्माण झाले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रदुषण होय. कारखाने वाहने विटाभट्टया धुळ, धुर, विषाणु, आजारी माणसे अशा अनेक कारणांनी प्रदुषण वाढत आहे. कारखान्यांव्दारे सोडलेले सांडपाणी, नद्यांवर गुरे धुणे, कपडे धुणे शौचास धुणे या सर्व बाबी जलप्रदुषण करण्यासाठी कारणीभूत ठरत आहेत.शेतीमध्ये वापरली जाणारी कीटकनाशके रासायनिक खते, प्रशितन यंत्र किंवा वातानुकूलन यंत्रातून बाहेर पडणाऱ्या क्लोरोफ्लोरो कार्बनमुळे ओझोन या संरक्षक थराला झालेले नुकसान या सर्व बाबी मानवी अस्तित्वाला घातक ठरत आहेत. यावर उपाय म्हणून मानवाने पर्यावरणपूरक उर्जास्त्रोतांचा वापर करणे अनिवार्य आहे. यादृष्टीने आनंदवनातील शाश्वत विकास प्रक्रियेमध्ये कुष्ठमुक्तांचे योगदान हे समाजासाठी दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरत आहे. आनंदवनातील प्रत्येक गोष्टीची रचना ही पर्यावरणपुरक पध्दतीने केली आहे.त्यामुळे निसर्गातील प्रत्येक गोष्टीचा उपयोग करण्यात आनंदवन यशस्वी झाले आहे. या प्रारूपाचा अभ्यास करण्यापूर्वी आनंदवन या संस्थेची पार्श्वभूमी जाणून घेणे आवश्यक ठरते.

आनंदवन या समाजसेवी संस्थेची निर्मिती आणि त्याची वैचारिक तत्वप्रणाली:

कुष्ठरोगाशी घृणा, कीळस आणि बहिष्कृततेची भावना संबधीत आहेत. जगातील अनेक देशांच्या विविध परंपरांनुसार या कुष्ठरोग्यांशी व्यवहारांच्या पध्दती या अमानवीय होत्या असे लक्षात येते. अशा भयाण परिस्थितीत बाबा आमटे यांनी जे कार्य करून दाखवीले ही घटना जगाच्या इतिहासातील उल्लेखनीय घटना होय.कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन, त्याचा आनंदवन निर्मितीत सहभाग आणि पुढे सर्वांगिण विकास ही अशक्यप्राय वाटणारी गोष्ट शक्य होण्यामागे बाबा आमटे यांचे व्यक्तीमत्व कारणीभूत आहे.जमीनदारीचे ऐश्वर्य त्यागून सेवाकार्यात झोकून देण्याची त्यांची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. आणि याच तळमळीतून आनंदवन उभे राहीले. कुठल्याही संस्था उभे राहणे,टीकणे आणि अखंड प्रगतीच्याच दीशेने वाटचाल करीत राहणे हे फार मोजक्या संस्थांच्या बाबतीत अनुभवायला मीळते. आनंदवन संस्थेचा पाया भक्कम करण्यात बाबा यांनी काय केले हे पाहणे महत्वाचे आहे. वर आलेल्या उल्लेखानूसार बाबा आमटे यांना तुळशीराम नावाचा एक कुष्ठरोगी रस्त्याच्या कडेला आढळून आला. त्याच्या दयनीय अवस्थेमुळे त्यांच्या मनावर परिणाम झाला. त्यामुळे त्यांनी कुष्ठसेवाकार्यात स्वत:ला झोकून दीले. त्यासाठी त्यांनी कुष्ठरोग कार्यकर्त्याचे प्रशिक्षण घेतले. कुष्ठकार्यात गढून गेल्यावर त्यांना असे लक्षात आले की विकृती झालेल्या कुष्ठबाधिताला समाज आणि त्याचे कुटूंब स्वीकारास मान्यता देतच नाही. त्यामुळे त्यांच्यात आनंद निर्माण करण्यासाठी त्यांना कामात गुंतवणे आवश्यक आहे. बाबा आमटे यांनी हया संस्थेची पायाभरणी फार वेगळया पध्दतीने केली असे लक्षात येते.

कुष्ठरोग आणि आनंदवन प्रकल्पाची तत्वप्रणाली:

कुष्ठरोग हा मानवाइतकाच जुना आहे. जगातील कुठल्या ना कुठल्या देशात याचे अस्तित्व दीसून येते. आणि काही कारणांमुळे याचे अस्तित्व नष्ट देखील झाल्याचे लक्षात येते. कुष्ठरोगावर औषध माहित नसल्याने कुष्ठरोग्यांना समाजापासून दूर ठेवल्या जाई.काही ठीकाणी तर 'कुष्ठरोग्याला समाजापासून दूर ठेवण्याची पध्दत' म्हणून काही खास 'विधी' अस्तित्वात होते. भारतात देखील या रोगासंबंधी भ्रामक समजूती असून कुष्ठरोग्याला विविध राज्यांमध्ये अमानवीय वागणूक देण्याच्या वेवेगळया पध्दती अस्तित्वात होत्या. कुष्ठरोगाला फक्त एक रोग किंवा व्याधी म्हणून स्वीकारले गेलेले नाही.संपुर्ण जगात कुष्ठरोगाकडे अतिंद्रीय शक्तीचा परिणाम किंवा पुर्वजन्माचे पाप म्हणून पाहिल्या जाते. कुष्ठरोगाचा संबंध हा अनैतिक वर्तन किंवा तथाकथित अशुध्द रक्ताशी देखील जोडल्या जातो.याकडे एक लाच्छन किंवा अपराध म्हणून पाहिले जाते. ज्याचे परिणाम संबंधित कुटूंबाला भोगावे लागतात. कुष्ठरोगाशी जुळलेला लांच्छनाचा संबंध हा धर्माशी जोडल्या जातो. कुष्ठरोग हा ईश्वराने दीलेली शीक्षा किंवा पाप आहे असे मानल्या जाते.कुष्ठरोग हा माणसाला जीवनाच्या सर्वच क्षेत्रातून उध्वस्त करून टाकतो म्हणूनच त्याला दीलेल्या **महारोग** या नावामध्ये त्याचे नाममाहात्म्य दीसून येते. कुष्ठरोग हा त्वचा आणि मज्जातंतूचा आजार **'मायक्रोबॅक्टेरियम लेप्रि'** या जिवाणुमुळे होतो. कुष्ठरोगावरील उपचारामध्ये सर्वात प्रचलित डॅप्सोन हे औषध दिले जात असे. जेव्हा हे औषध नव्याने वापरात आले, त्यावेळी त्याची परिणामकारकता उत्तम होती.पण काही वर्षामध्ये डॅप्सोन प्रतिकार जिवाणू आढळल्यानंतर बहु उपचार पध्दती वापरण्यात येऊ लागली. आनंदवन ही कुष्ठरूग्णांच्या पुनर्वसनासाठी समर्पित संस्था महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हयातील वरोरा या तालुक्याच्या ठीकाणी आहे. कुष्ठरूग्णांच्या आश्रय,उपचार व पुनर्वसनासाठी फादर डेमियन, महात्मा गांधी, मनोहर दिवाण, शिवाजीराव पटवर्धन यासारख्या अनेक लोकांकडून अनेक प्रकल्प सुरू करण्यात आले. त्यातील मुरलीधर देवीदास उर्फ बाबा आमटे यांनी स्थापन केलेले आनंदवन हे जगातील सर्वात महत्वाच्या प्रकल्पांपैकी एक आहे. भीती न्युनगंड यामुळे ग्रस्त असलेल्या कुष्ठबाधितांचे पुनर्वसन हे इतर व्याधींपेक्षा वेगळया स्वरूपाचे आणि आव्हानात्मक कार्य होते.या पुनर्वसन कार्यात आनंदवन हे यशस्वी मॉडेल ठरले. आनंदवनाने कुष्ठरोगाला कुरवाळत ठेवले नाही तर

कुष्ठरोग्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना आपणही सामान्य माणसांप्रमाणेच आहोत ही भावना निर्माण केली. श्रमप्रतिष्ठेतून सन्मान प्राप्त झाल्यामुळे त्यांच्यातील न्युनगंड दूर होऊन त्यांच्यातील अपार कौशल्यांची अनुभूती आली. आत्मप्रतिष्ठेमुळे ते जीवनातील नकारात्मक भावनेपासून दूर राहीले आणि आपल्यातील कलागुणांचा उपयोग समाजासाठी केला. महारोगी व त्यांचे पुनर्वसन हे आनंदवनाचे प्रमुख उद्दीष्ट आहे. १९४९ साली १२ विश्वस्त सदस्यांच्या सहाय्याने प्रकल्पाचे कार्य, व्यवस्थापन आणि संचालन करण्याकरिता महारोगी सेवा समितीची संस्था म्हणून नोंदणी कायद्याच्या अनुच्छेद २१ अंतर्गत अधिकृतरीत्या नोंदणी करण्यात आली. त्यानंतर संस्थेच्या कार्याला कायदेशीररीत्या प्रारंभ झाला. बाबा आमटे यांच्या कारकिर्दीत येथील लोकांनी आगळेवेगळे प्रयोग केले. त्यामध्ये पाणी, पर्यावरण, शेती या मानवी मुलभूत समस्यांना महत्व देण्यात आले. बाबा आमटे यांचा समाजाकडून बहिष्कृत केलेल्या व्यक्ती आणि वस्तू यांच्या पुनर्वसन आणि पुननिर्माण यावर भर होता. त्यातूनच जलसिंचन, आधुनिक शेती किंवा वृक्षसंवर्धनाचे उपक्रम त्यांच्या काळात सुरू झाले होते. त्यांच्या वारशाला पुढे नेत आनंदवनाने अपरंपरागत उर्जाक्षेत्रात तंत्रज्ञानाचा यशस्वीपणे उपयोग करून घेतला. यामध्ये उल्लेखनीय असे दोन प्रकल्प आहेत. ते म्हणजे जैविक कचऱ्यावर चालणारा बायोगॅस प्रकल्प तर सुर्यप्रकाशावर चालणारा सौर उर्जा यंत्र. यामुळे आनंदवन हे उर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भर झाले असून स्वच्छ उर्जेसोबत मोठया प्रमाणात आर्थिक बचतीसोबत सामाजिक परिवर्तन झाले असल्याचे लक्षात येते.

बाबा आमटे यांच्यासोबत कुष्ठमुक्तांचे कार्य:

कुष्ठरूग्णांची घाणेरडी जागा म्हणून ओळखली जाणारी ही भूमी आणि तेथील कुष्ठभूमीपुत्र हे समाजाच्या घृणेचाच विषय होता.बाबांनी त्यांच्या कार्यात गांधीवादी तत्वाव्दारे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. **'हाथ लगे निर्माण मे, न मॉगने नही मारने'** आणि **'श्रम ही श्रीराम है हमारा'** अशा प्रेरणात्मक विचारांनी कुष्ठबाधितांमध्ये श्रमाप्रती निष्ठा निर्माण केली. स्वयंपुर्ण समाजाची निर्मिती हे आनंदवन प्रकल्पाचे प्रमुख वैशिष्टय राहीलेले आहे.या प्रकल्पांतर्गत २००० पेक्षा जास्त व्यक्ती भारताच्या विविध भागांमधून आलेल्या असून त्यांच्या बहुतांश गरजा ते स्वत:च भागवीत आहेत. यातूनच एक स्वयंभू गाव विकसीत झाले आहे. येथील कुष्ठबाधित व्यक्तींच्या कौटुंबिक, सामाजिक जीवनाची पायाभरणी ही बाबा आमटे आणि त्यांच्या सहचारीणी स्व. साधनाताई आमटे यांच्या काळात झाली. या भूमीवर हळूहळू समाजातील कुष्ठरोगी मोठया प्रमाणात येवू लागल्यावर त्यांच्या सहजीवन अर्थात वैवाहिक जीवनाचा प्रश्न निर्माण झाला. या कुष्ठरोग्यांपैकी बहुतांश लोक हे एकएकटे होते. कारण कुष्ठरोगामुळे कुणी नवऱ्याने सोडलेल्या स्त्रीया किंवा बायकांनी सोडलेले पुरूष होते. एकटेपणामुळे नैराश्याच्या अधिन झालेल्या या लोकांना अन्न वस्त्र निवारा प्रतिष्ठा यासोबतच लैंगीक भावनांची पुर्ती देखील आवश्यक होती. यावर साधनाताई यांनी कुष्ठरोग्यांचे आपसात विवाह करण्यात यावे यासाठी आग्रह धरला. त्यातून पुढे कुष्ठरोग्यांची कुटूंबे निर्माण झाली.१९५६ नंतर आनंदवन प्रकल्पाच्या कार्याने झपाटयाने वेग घेतला. कौटुंबिक समाजजीवन सुरू झाल्यावर गरजांमध्ये वाढ होत गेली. या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने विविध प्रकल्प हाती घेण्यात आले. परिणाम स्वरूप प्रत्येक गरजेची वस्तू आनंदवनात निर्माण होत असल्याचे लक्षात येते. सामुदायीक विकास प्रकल्पांच्या धर्तीवर महात्मा गांधींच्या संकल्पनेतील स्वयंपुर्ण खेडे येथे साकारल्याचा अनुभव येतो. आज उर्जानिर्मीती, साधनांचा पुनर्वापर, यामुळे आनंदवन हे आदर्श खेडे म्हणून विकसीत झाले आहे.

आनंदवनाच्या शाश्वत विकास प्रक्रियेत डॉ. विकास आमटे यांच्यासोबत कुष्ठमुक्तांचा सहभाग:

आनंदवनाचे कार्य मार्गी लागल्यानंतर बाबा आमटे यांनी पाणी, पर्यावरण, राष्ट्रीय ऐक्य, मोठी धरणे यासारख्या प्रश्नांमध्ये लक्ष घातले. त्यामुळे डॉ विकास आमटे यांच्याकडे आनंदवनाची जबाबदारी आली. अंध अपंग कुष्ठबाधित लोकांसोबत काम करणे फार कठीण होते. परंतू डॉ. विकास आमटे यांनी कल्पकतेने या सर्वांचे नियोजन करून आव्हानांचा स्वीकार केला. त्यांच्या मार्गदर्शनात आनंदवनात पर्यावरणपूरक प्रकल्पांनी आकार घेतला. त्यांनी कुष्ठमुक्तांच्या मदतीने आनंदवनातील विभिन्न प्रकल्पांना कल्पकतेने जोडले. डॉ विकास आमटे यांच्यासोबत कुष्ठमुक्तांनी खालील प्रश्नांवर काम केले.

पाण्याची टंचाई निर्मुलनासाठी श्रमदानातून तलाव निर्मिती– १९७९ मध्ये कुष्ठमुक्तांनी श्रमदानातून पहिला तलाव खोदला. त्यानंतर अनेक तलाव आनंदवनात खोदले गेले.पाण्याचे पुनर्भरण झाल्यामुळे अशोक बोलगुंडेवार या तंत्रज्ञाच्या मार्गदर्शनात कुठलेही परिपूर्ण असे तंत्रज्ञान आणि साधने नसतांना प्रयोग पध्दतीने अनेक विहिरी, बोअरवेल्स खोदण्यात आल्यात.

जलक्रांतीतून हरितक्रांती–तलावाचे खोलीकरण झाल्यामुळे आनंदवनात पाण्याचे रीचार्जीग झाले.त्यातून आनंदवनाची शेती आणि फळबागा फुलल्या, पॉलिहाऊस मधूनही भाजीपाला उत्पादन घेतल्या जाऊ लागले. तलावातून मत्स्योत्पादन होऊ लागले. तलावातील पाण्याचा उपयोग प्रोटीनयुक्त चारा लागवडीसाठी झाला आणि त्यातून पशूधन आणि दुग्धोत्पादन वाढत गेले.

हरितक्रांती ते धवलक्रांती– प्रोटीनयुक्त चारा आणि त्यातून पशूधन आणि दुग्धोत्पादनाची वाढ यामुळे आनंदवनात आणि परिसरामध्ये दुध आणि त्यापासून बनविलेले पदार्थ यांची मोठी मागणी निर्माण झाली. **गजानन वसु या कुष्ठमुक्त कार्यकर्त्याच्या प्रयोगशीलतेमुळे आनंदवनातील डेरीमधील गुणवत्तापूर्ण उत्पादनात वाढ झाली. या कार्यकर्त्याने गाई म्हशी आणि त्यांचा चारा यांचा अभ्यास वेगवेगळया ठीकाणी जाऊन केला. गोठयात गाई म्हशींसाठी संगीताची व्यवस्था केली. दुधापासून वेगवेगळे पदार्थ तयार केले. वरोरा येथील लोकांना ते फार आवडले. कधीकाळी कुष्ठरोग्याचा हात लागला म्हणून वस्तूला नाकारणारे लोक अनेक तास रांग लावून दुध आणि इतर ऊत्पादने घरी न्यायला लागली.** आनंदवनाच्या डेअरीचे दुध १० ते २० रूपयांनी महाग विकल्या जात असूनही लोक आनंदाने घेत असत. २००९ साली डेअरीचा टर्नओव्हर ३२ लाख तर त्याच्या पुढच्या वर्षी ८५ लाखांवर पोहोचला.२०१२–१३ साली तो एक कोटींवर पोहोचला. सातवा वर्ग उत्तीर्ण असलेल्या कुष्ठमुक्त व्यक्तीने केलेले हे कार्य म्हणजे उद्योजकतेमधील यशस्वीतेचे आगळेवगळे उदाहरण होते.

पशुधनापासून उर्जानिर्मिती– डेअरीतील पशुधनापासून मिळणारे दुध महत्वाचे असले तरी त्यापेक्षा शेण हे जास्त उपयुक्त ठरले कारण या शेणाचा उपयोग बायोगॅस मध्ये करण्यात आला. त्यामुळे कधीकाळी रोज २ हजार लोकांच्या स्वयंपाकासाठी लागणाऱ्या १८ गॅस सिलेंडर्सची बचत झाली. या प्रकल्पाचे व्यवस्थापन कुष्ठमुक्त कार्यकर्ते करीत असतात.

कचऱ्यापासून खत निर्मिती–आनंदवनातील लोकसंख्यमुळे कीचन वेस्ट वाढले. त्यातून सात बायोगॅस प्लॅट तयार केले. याचा उपयोग चारा निर्मितीसाठी खत म्हणून झाला. यामुळे माशांच्या उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली.

आनंदवनातील उद्योगक्रांती– आनंदवनाच्या सुरूवातीच्या काळात येथे दाखल झालेली माणसे ही शरीराने जीवंत असली तरी मनाने खचलेली असत, कुटूंबाने घराबाहेर हाकललेली जखमांच्या वेदना, नसांचे दुखणे, जीवनाप्रती नैराश्याचा भाव अशा विविध समस्यांनी ग्रस्त लोकांना मन गुतवण्यासाठी उद्योग सुरू करणे गरजेचे होते. यासाठी बाबा आमटे यांनी आनंदवनातील चरख्यांपासून उद्योगाला सुरूवात केली. पुढे आनंदवनात यंत्रावर टीन कॅन आणि इतर उत्पादने सुरू झाली. डॉ. विकास आमटे यांच्या काळात हॅंडलूम्सनंतर पॉवरलूम्स आले. मोठया प्रमाणात सतरंज्यांचे उत्पादन सुरू झाले.यासाठी सुधाकर कडू या तपोवनातून आलेल्या कार्यकर्त्याने महत्वाची भूमिका बजावली आनंदवनात टेबल, कपाट, खुर्च्या, पलंग, कुलर्स, व्हिलचेअर 'मायक्रो सेल्युलर रबरापासून बनणाऱ्या खिळेविरहित चपलां या सर्वांचे उत्पादन होऊ लागले. बाबा आमटे यांच्यांवर गांधी विचारांचा प्रभाव होता. ते श्रमप्रतिष्ठेला अत्यंत महत्व देत. कुष्ठरूग्णांना **'दान देऊ नका, तर संधी द्या'** अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे आनदवनाची निर्मिती ही आपली व आपल्यासाठी आहे ही भावना कुष्ठरूग्णांच्या मनात पक्की रूजली.यामुळे कुष्ठरूग्ण हे पक्के उपक्रमशील बनले.व ते आनंदवन निर्मितीच्या प्रक्रियेत सामिल झाले.बाबा कुष्ठरूग्णांना राबवून घेतात असा आरोप होत राहीला. पण बाबा आमटे आपल्या भूमिकेपासून ढळले नाहीत. त्यामुळे आनंदवन उभारणीचा पाया मजबुत झाला. तो आजही तसाच मजबूत आहे.

कुटीर आणि कलात्मक उद्योग– ज्या व्यक्तींना अवजड कामे शक्य नाही त्या सर्व लोकांना शिलाईकाम आणि शुभेच्छापत्र तयार करण्याचे काम दील्या गेले. कागदाचे तुकडे,धान्याचे फोलपट,केळीच्या साली, अशा टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून रिसायक्लींग आणि रियुज या तत्वावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे या उपक्रमातून पर्यावरणविषयक जनजागृती होत आहे.

स्वस्त आणि टीकाऊ घरे– आनंदवनाच्या सुरूवातीच्या काळात महाविद्यालयासहित अनेक इमारतींना आता ५० पेक्षा जास्त वर्षांचा कालावधी उलटला असल्यामुळे त्याला वाळवी आणि इतर समस्या तयार झाल्या. अशा परिस्थितीत कमी किंमतीची घरे कुष्ठमुक्त लोकांनी बांधली. फक्त विटा आणि सिमेंट यांच्या उपयोगाने कार्यकत्यांची घरे,कार्यालये, महाविद्यालयाचे वर्ग खोल्या, प्राचार्यांचे कक्ष निर्माण करण्यात आले. हा उपक्रम मोठया प्रमाणात यशस्वी झाला. या सर्वच इमारती अजूनही भक्कमपणे उभ्या आहेत.

प्लास्टिक पुर्नवापर– प्लास्टीकच्या अतिरेकी आणि अनियंत्रित उपयोगामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर आनंदवनाने पथदर्शी आणि प्रभावी प्रयत्न केले. गजानन वसु, या कुष्ठमुक्त व्यक्तीने प्लास्टीक निर्मुलनाच्या समस्येला हात घातला.प्लास्टीकच्या गाद्या बनवून त्याचा वापर आनंदवनाच्या दवाखान्यात करण्यात आला. याच चुऱ्याचा उपयोग कॉंक्रीटमध्ये करण्यात आला. तसेच आनंदवनाच्या आसपासच्या दगडांच्या खाणीच्या खड्डयांमध्ये देखील प्लास्टीक भरून त्यावर माती टाकून जंगल निर्माण केले. जुन्या टायर्समध्ये प्लास्टीक मिश्रित सिमेंट भरून स्पिल ओव्हर डॅमची निर्मिती करण्यात आली. शासकीय पध्दतीच्या

बंधाऱ्याच्या तुलनेत हे बंधारे स्वस्त आणि टीकावू असून सोमनाथ, मुळगव्हाण आणि आनंदवनाच्या परिसरात आजही मजबूत स्थितीत आहेत. यासोबतच आनंदवनाने नाविण्यपूर्ण पध्दतीने देशी वृक्षांची अभयारण्ये तयार केली आहेत.

आनंदवनाच्या शाश्वत विकास प्रक्रियेमध्ये कुष्ठमुक्तांच्या सहभागाची मानसशास्त्रीय कारणमिमांसा:

कुष्ठबाधितांसोबत कार्य करतांना बाबा आमटे यांनी समाजकार्याला अभिप्रेत असणाऱ्या दक्षता घेतल्यामुळेच संस्था म्हणून महारोगी सेवा समितीची पायाभरणी अत्यंत मजबूतपणे झाली असे लक्षात येते. आनंदवनाच्या प्रगतीसाठी खालील घटक कारणीभूत होते.

१) बाबा आमटे यांच्या श्रमप्रतिष्ठेच्या तत्वामुळे कुष्ठरोगाशी संलग्नीत नकारात्मकता आणि उदासीनतेतून निर्माण होणाऱ्या भिक्षावृत्ती किंवा आत्महत्येपासून कुष्ठबाधित परावृत्त झाले.विविध उपक्रमांव्दारे समाजाला आनंदवनासोबत जोडण्याचा प्रयत्न, मानवी मुल्ये आणि व्यक्तींच्या कलागुणांना यांना निरंतर प्रोत्साहन यामुळे कुष्ठबाधितांच्या जीवनातील एकाकीपण दूर झाले. रूग्णांवर काटेकोरपणे व बंधनकारक औषधोपचारामुळे येथील व्यक्ती निश्चितपणे रोगमुक्त होतो तसेच त्याच्या विकृतीवर आळा बसतो.त्यामुळे कुष्ठरोग निर्मुलनासाठी आनंदवन हे विश्वासाचे ठीकाण बनले.

२) आनंदवनातील सामुहिक जेवण आणि जीवन, शिस्त, कामाचे स्वरूप, मनोरंजनाची साधने आणि त्यांच्या आरोग्यात सुधारणेची हमी यामुळे येथील रूग्णाचा जीवनक्रम आनंदी असून त्याला आपल्या कुटूंब किंवा समुदाय यापासून दूर असल्याचे दु:ख कमी प्रमाणात जाणवते.

३) आनंदवनाने कुष्ठमुक्तांना त्यांच्यातील गुण आणि कौशल्यानूसार तेथील विकासप्रक्रीयेत सामावून घेतले.त्यातून निर्माण झालेल्या आत्मसन्मानामुळे त्यांना ही संस्था सोडून दुसऱ्या संस्थेत जाण्याची गरज वाटली नाही. ही या संस्थेची जमेची बाजू होय.

४) आनंदवनात 'इंटरकास्ट आणि इंटरडिसॲबिलीटी मॅरेज' आणि संतती जन्माला घालण्याचे स्वातंत्र्य यामुळे समाजापासून वेगळे पडल्याची भावना, स्वयंकेंद्रीतता किंवा न्युनगंड यापासून कुष्ठरूग्ण दूर राहू शकले.

५) संस्थेचा प्रमुख आणि पालक या नात्याने बाबा आमटे यांच्या कृतीशील तत्वज्ञानामुळे कुष्ठबाधितांमध्ये जीवनाबाबत सातत्याने सकारात्मक दृष्टीकोण कायम ठेवण्यास मदत झाली.

६) कुष्ठबाधितांच्या कलागुणांच्या सर्वश्रेष्ठ प्रदर्शनामुळे आनंदवन ही कुष्ठरोग्यांची भूमी नसून कर्तृत्वाची आणि पुरूषार्थाची भूमी आहे याची समाजाला जाणिव झाली. त्यामुळे कुष्ठबाधित लोकांना सामान्य व्यक्तीप्रमाणे मान मीळू लागला. त्यामुळे समाजात त्यांच्याप्रती सदिच्छा निर्माण झाली. समाजाचा मोठा वर्ग आनंदवन आणि त्यांच्या कुष्ठबाधित लोकांच्या कार्याने प्रभावित झाला. अनेक सीनेकलावंत आनंदवनाला भेटी देतात व आनंदवनात निर्माण झालेल्या वस्तू नित्यनेमाने वापरत असतात. त्यामागे सहानुभूती नसून गुणवत्ता व कौशल्याप्रती आदर हे घटक कारणीभूत आहेत.

७) आनंदवनातील श्रमप्रतिष्ठेच्या तत्वामुळे कुष्ठबाधितांनी प्राप्त केलेल्या जीवनकौशल्याचा उपयोग त्यांच्या पुढील जीवनात चरितार्थासाठी झाला.

८) आनंदवनात अनेक आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या मुद्यांवर कार्य केल्या गेले. या कार्यातील सहभाग व त्यांना मिळालेला सन्मान यामुळे नैराश्यापासून हा वर्ग दूर राहीला.

९) समस्याग्रस्त व्यक्तीसाठी काम करण्यापेक्षा व्यक्तीसोबत काम करणे हे समाजकार्याचे महत्वाचे तत्व या कार्यात वापरल्या गेले. त्यामुळे कुष्ठबाधित व्यक्तींच्या मनातील लांच्छनाची भावना दूर होण्यास मदत झाली.

निष्कर्ष:

१. तंत्रज्ञान आणि भौतिक हव्यासापोटी मानवाचा निसर्गाच्या परिस्थितिकीमध्ये अतिरेकी हस्तक्षेप वाढल्यामुळे विभिन्न समस्यांमुळे मानवी समाजाच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण झाले आहेत.यावर चिंतन करणे गरजेचे आहे.

२. बाबा आमटे यांची तत्वप्रणाली आणि डॉ. विकास आमटे यांची प्रयोगशीलता आणि आनंदवनातील कौटूंबिक वातावरण यामुळे आनंदवनातील शाश्वत विकास प्रक्रियेमध्ये कुष्ठमुक्तांचे योगदान प्राप्त झाले.

३ आनंदवनातील पुर्नप्रक्रिया आणि पुर्नवापर प्रणालीमुळे आनंदवनातील प्रदुषण कमी होऊन पर्यावरण पुरक उर्जानिर्मिती होण्यास मदत झाली त्यामुळे आनंदवनातील अतिरिक्त खर्च टाळल्या गेला.

संदर्भ सूची:

- आमटे,वी.,कुलकर्णी,सु.(संपा.).(२०१४).*आनंदवन प्रयोगवन.* पुणे,समकालीन प्रकाशन.
- बापट,बी.(२००६).*बाबा आमटे.* पुणे,राजहंस प्रकाशन.
- भावसार,आर.(२००२).*पर्यावरण प्रदूषण.* पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
- घारपुरे,व्ही.(२०११).*पर्यावरणशास्त्र.* नागपूर, पिंपळापुरे अॅंड कं. पब्लिशर्स.
- गुप्त,जी.(२०१४).*पर्यावरण विज्ञान.* इलाहाबाद, जनभारती प्रकाशन.
- किर्लोस्कर इंटिग्रेटेड टेक्नॉलॉजिज्,*बायोगॅस उर्जानिर्मिती प्रकल्पाची माहिती पुस्तिका,* पुणे.
- कुमार,आर.(२००२).*पर्यावरण,शिक्षा एवं गांधी,* जयपुर,श्री बुक डिस्ट्रीब्युटर्स.
- मधुवाल,आर.(२०१६). *पर्यावरण पर प्रदूषण का कहर.* दिल्ली, गरिमा बुक्स.
- सोनेगांवकर,ए.(२००५).*आनंदवन प्रकल्पांची यशोगाथा.* नागपूर, विद्या विकास पब्लिशर्स प्रा.लि.
- वर्मा,एल.,खत्री,एल.,कायमखानी,आय.(२००८).*पर्यावरण अध्ययन.* जयपुर, राजस्थान हिन्दी ग्रन्थ अकादमी.
- ASTHANA,D.,ASTHANA,M.(2007).A TEXTBOOK OF ENVIRONMENTAL STUDIES, NEW DELHI,S.CHAND & COMPANY LTD.
- Mehandale,M. *Health Education and Social Aspects in Leprosy Work.*Poona, District Leprosy Committee,Poona.
- MUTATKAR,R. *SOCIETY AND LEPROSY.*Wardha, Gandhi Memorial Leprosy Foundation.
- REPORT OF THE STUDY TEAM ON LEPROSY MAHARASHTRA STATE.
- TRIVEDI,R.(1997).A TEXTBOOK OF ENVIRONMENTAL SCIENCES, NEW DELHI,ANMOL PUBLICATIONS PVT LTD.

*सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर विभाग,लोकमान्य महाविद्यालय,वरोरा, snpilgulwar@gmail.com

**संशोधक विद्यार्थी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. pmudholkar17@gmail.com

***

भटक्या जमातींची अलगीकरणाची प्रक्रिया

*डॉ. मधुकर जी. धुतुरे

गोषवारा:

भटक्या जमाती या भारतीय समाजव्यवस्थेच्या सर्वात प्राचीन समाजघटकांपैकी एक आहेत, परंतु भटक्या जीवनशैलीमुळे कोणत्याही समाजव्यवस्थेने त्यांना स्वीकारले नाही. त्यामुळे भटक्या जमाती दीर्घकाळापासून तत्कालीन प्रस्थापित समाजापासून अलग पडत गेल्या. या दीर्घकालीन परिस्थितीचा परिणाम भटक्या जमातींना स्वातंत्र्योत्तर काळातसुद्धा भोगावा लागत आहे. या अलगीकरणाच्या प्रक्रियेचे स्वातंत्र्योत्तर भारतातील स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न संशोधकाने प्रस्तुत शोध निबंधात केला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतातील भटक्या जमातींचे अलगीकरणाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी स्थिर निवारा, दस्तऐवजीकरण किंवा नोंदणी, गुन्हेगारी कलंक, एकत्रित ओळख, सांस्कृतिक वंचितता आणि भटक्या-विमुक्तांची स्वतंत्र अस्मिता या मुद्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. प्रस्तुत शोध निबंध प्रामुख्याने दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित असल्यामुळे संशोधकाने अर्थनिर्वचनाच्या माध्यमातून वर्णनात्मक स्वरुपाची मांडणी केली आहे. तसेच या मांडणीच्या आधारावर असा निष्कर्ष मांडला आहे की, भटक्या जमातींच्या मूळ समस्यांचा विचार न करता भटक्या जमातींना विकासाच्या प्रवाहात सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आले, त्यामुळे भटक्या जमाती आजही प्रस्थापित समाजापासून अलग पडल्याचे दिसून येते.

मुख्य शब्द: अलगीकरण, स्वातंत्र्योत्तर भारत

प्रस्तावना:

कोणताही समाज समताधिष्ठित नसतो, प्रत्येक समाजात असमानता निर्माण करणारे काही घटक अस्तित्त्वात असतात. यामध्ये प्रामुख्याने सत्ता, संपती, व्यवसाय, शिक्षण या घटकांचा सार्वत्रिक घटक म्हणून उल्लेख करता येईल. परंतु भारतीय समाजात या घटकांव्यतिरिक्त वर्ण व जात हे घटक असमानता निर्माण करणारे प्रमुख घटक होते. वर्णव्यवस्था जरी नष्ट झाली असली तरी जातीचे वर्चस्व आजही भारतीय समाजामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. थोडक्यात असे म्हणता येईल की, समाजातील घटकांची अलगीकरणाची प्रक्रिया या व्यवस्थांपासून सुरवात झाली व याचा परिणाम आजही काही समाजघटकांवर होताना दिसून येतो, यामध्ये प्रामुख्याने आदिवासी जाती, दलित व भटक्या जमातींचा उल्लेख करावा लागेल.

वर्तमान दलितांना जातीव्यवस्थेत व प्राचीन गावगाड्यात स्थान होते परंतु हे स्थान अस्पृश्यतेच्या आधारावर निश्चित करण्यात आले होते, त्यामुळे तत्कालीन अस्पृश जातींची परिस्थिती अत्यंत दयनीय स्वरुपाची होती. तर आदिवासी व भटक्या जमातींना जातीव्यवस्थेत व प्राचीन गावगाड्यात स्थिर स्वरूपाचे स्थानच नव्हते. त्यामुळे आदिवासी जाती, दलित व भटक्या जमाती तत्कालीन प्रथापित समाजापासून अलग पडत गेल्या, असे असले तरी या लोकसमूहांच्या अलगीकरणाचे स्वरुप भिन्न आहे व हे अलगीकरणाचे स्वरुप कालानुरूप बदलत गेले आहे. प्रस्तुत शोध निबंधात वर्तमान समाजव्यवस्थेमध्ये भटक्या जमातींचे अलगीकरण कशा स्वरूपाचे आहे? याबाबत मांडणी करण्यात आली आहे.

संशोधनाचे उदिष्टे:

वर्तमान समाजव्यवस्थेमधील भटक्या जमातींची अलगीकरणाची प्रक्रिया समजावून घेणे, हे प्रस्तुत संशोधनासाठी एकच उदिष्ट निश्चित करणयात आले आहे.

संशोधन आराखडा:

प्रस्तुत शोध निबंध प्रामुख्याने दुय्यम माहिती स्त्रोतांवर आधारित असल्यामुळे संशोधकाने अर्थनिर्वचनाच्या माध्यमातून वर्णनात्मक स्वरुपाची मांडणी केली आहे, त्यामुळे प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

भटक्या जमातींचे अलगीकरण:

भटक्या जमाती या भारतीय समाजव्यवस्थेच्या सर्वात प्राचीन लोकसमुहांपैकी एक आहेत, याचे अनेक ऐतिहासिक पुरावे आढळतात. भटक्या जमाती प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेचा भाग असल्या तरी वर्तमान काळात भटक्या जमातीची परिस्थिती हलाखीचे असल्याचे चित्र दिसते. अशी परिस्थिती वर्षानुवर्षे का टिकून राहिली? हे समजावून घेण्यासाठी भटक्या जमातींच्या अलगीकरणाची प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. मानवाच्या प्राथमिक अवस्थेत ज्यावेळी संपूर्ण मानवी वंश भटकंतीच्या अवस्थेत होता त्यावेळी अलगीकरणाचा प्रश्न उद्भवत नाही, परंतु

जसजसे मानवी समूहाला संघटीत रूप प्राप्त होऊ लागले आणि समाज अस्तित्वात येऊ लागला तसतशी अलगीकरणाची प्रक्रिया सुरवात झाली. वर्षानुवर्षे विविध कारणांमुळे भटका समाज प्रस्थापित समजापासून वेगळा राहिला. वर्णव्यवस्थेत आणि जातीव्यवस्थेत विशिष्ट आणि कठोर समाज संरचनेमुळे भटका समाज समाज प्रस्थापित समजापासून अलग राहिला. तर अलीकडच्या काळात भटक्या जमातींचा प्रस्थापित समाजापासून अलगीकरणाचा विचार केला तर आपणास असे दिसून येते की, भटक्या जमाती या औद्योगिकिकरण, आधुनिकीकरण, पाश्चिमात्यकरण इ. गोष्टी जेंव्हापासून भारतीय समाजात परिवर्तनास कारणीभूत ठरू लागल्या तेंव्हा पासून प्रामुख्याने भटक्या जमाती या प्रस्थापित समाजापासून मोठ्या प्रमाणात अलग किंवा वंचित राहण्यास सुरवात झाली. जर आपण स्वातंत्र्यपूर्व परिस्थितीचा विचार केला तर, राजेशाही व्यवस्थेत या भटक्या जमातींना एक महत्वाचे स्थान होते. कारण राजेशाही व्यवस्थेतील महत्वाची कामे या भटक्या जमातींवर सोपवली जायचीत, उदा. वस्तू पुरवठा, करमणूक, सैन्याला शस्त्रसाठा पुरविणे, शत्रूच्या गोटात जाऊन हेरगिरी करणे, भटकंतीमुळे परिसराचा चांगला परिचय असल्यामुळे युद्ध काळात सैन्याला किंवा प्रवासाला मार्गदर्शन करणे इ. महत्वाची कामे प्रामुख्याने भटक्या जमाती करीत आल्यामुळे राजेशाही व्यवस्थेत भटक्या जमातींना महत्वाचे स्थान होते. परंतु औद्योगिकिकरण, आधुनिकीकरण, पाश्चिमात्यिकरण आणि वसाहतवादी साम्राज्य कालीन भारतातील ब्रिटीश धोरणांमुळे भटक्या जमातीच्या जीवनावर गंभीर परिणाम होऊ लागले. औद्योगिकिकरणामुळे भटक्या जमातींचे पारंपारिक व्यवसाय धोक्यात येऊ लागले, आधुनिकिकरणामुळे आणि पाशिमात्यिकरणामुळे भटक्या जमाती सांस्कृतिकदृष्ट्या अलग पडू लागल्या. गुन्हेगारी कायद्यामुळे भटक्या जमाती बंदिस्त झाल्या आणि अलगीकरणाची प्रक्रिया वेग घेऊ लागली. परिणामी, भटक्या जमाती या भारतीय समाजव्यवस्थेतील सर्वात वंचित घटकांमध्ये गणल्या जाऊ लागल्या. स्वतंत्र भारतात भटक्या जमातींच्या वंचिततेच्या स्वरूपाचा विचार करता असे दिसून येते की, वंचिततेमध्ये प्रामुख्याने पाच मुद्यांचा विचार करावा लागेल. यामध्ये स्थिर निवरा, दस्तऐवजीकरण, गुन्हेगारी कलंक, एकत्रित ओळख, सांस्कृतिक वंचितता या महत्वाच्या मुद्यांचा समावेश होतो.

स्थिर निवारा:

भटक्या जमातींचा इतिहास हा भटकंती स्वरूपाचा असल्याने सहजासहजी भटक्या जमाती या स्थिर होऊ शकल्या नाहीत. भटक्या जमाती या भटकंतीला आपल्या पारंपारिक संस्कृतीचा भाग समजत असल्यामुळे त्या स्थिरावण्याच्या दृष्टीने उदासीन असल्याचे दिसून येते, आणि जरी काही भटक्या जमाती स्थिर झाल्या तरी त्यांच्याकडे शासकीय कल्याणकारी सुविधांचा उपयोग करून घेऊन स्थिर होण्यासाठी पुरेसे कागदपत्रे नसतात, या परिस्थितीत या जमाती शासकीय कल्याणकारी सुविधांपासून वंचित राहतात. त्यामुळे भटक्या जमातींमध्ये निवारा स्वीकारून स्थिर होण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. भटक्या जमातीं प्रस्थापित समाजापासून अलग पडण्याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे, भटक्या जमातींकडे कायमस्वरूपी स्थिर निवाऱ्याची व्यवस्था नाही.

दस्तऐवजीकरण किंवा नोंदणी:

भटक्या जमातींच्या वंचिततेचा दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे, शासनाकडून भटक्या जमातींचे केलेले दस्तऐवजीकरण किंवा नोंदणी. जर भारतात भटक्या जमातींच्या दस्तऐवजीकरण, नोंदणी, किंवा जनगणना याकडे लक्ष दिले तर असे दिसून येते की, १९३१ नंतर भारतात भटक्या जमातींची जनगणना झालेली नाही, म्हणजेच भारतात शासकीय पातळीवर भटक्या जमातीची धार्मिक, भाषिक आणि लोकसांख्यिकीय माहितीच उपलब्ध नसल्याचे जाणवते. तसेच भटक्या जमातींचे शासनाने केलेल्या वर्गीकरणातील त्रुटी असल्याचे दिसून येते. भारतातील जाती-जमातीच्या सूचीवर नजर टाकल्यास असे निदर्शनास येते की, एकच भटकी जमात ही विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रवर्गात समाविष्ट आहे. जर शासनाकडे भटक्या जनसमुदायाची अचूक लोकसंख्याच उपलब्ध नसेल आणि वर्गवारीत एकवाक्यता नसेल तर विकास कार्यक्रम राबविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. परिणामी भटक्या जमाती विकास प्रक्रियेपासून वंचित राहतात.

गुन्हेगारी कलंक:

"भटक्या जमातींची गुन्हेगार जमाती म्हणून शासकीय स्तरावर नोंद करण्याची व त्या अनुषंगाने त्यांना वागणूक देण्याच्या प्रथेची सुरूवात ब्रिटिश अमदानीच्या सुरूवातीच्या कालखंडात १७९३ साली निर्माण केलेल्या 'रेग्युरलेशन २६' या अधिनियमाने झाली. याचे पुढे रूपांतर ठगी व डकॉइटी खात्याच्या निर्मितीत झाले. १८६० साली भारतीय दंड संहिता (इंडियन पीनल कोड) अंमलात आली. पुढे १८७१ मध्ये गुन्हेगार जमाती कायदा (क्रिमिनल ट्राइब्ज अक्ट) करण्यात आला व या कायद्याचे १९२४ सालच्या गुन्हेगार जमाती केंद्रीय अधिनियम (क्रिमिनल ट्राइब्ज सेंट्रल अक्ट) या कायद्यात रूपांतर झाले. हा कायदा १९५२ पर्यंत अंमलात होता."

या विविध कायद्यांचे संपूर्ण भटक्या जाती-जमातींच्या जीवनावर दीर्घकालीन परिणाम झाले, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुद्धा या जमातींकडे गुन्हेगारी जमाती म्हणूनच पहिले जाऊ लागले आणि आजही काही भटक्या-विमुक्त जमाती या गुन्हेगारी कलंक माथी घेऊनच जीवन जगात आहे. या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनामुळे या भटक्या जमातींवर प्रस्थापित समाज विश्वास ठेवण्यास आजही तयार नाही. परिणामी, या भटक्या जमाती प्रस्थापित समाजाशी आंतर्क्रिया करण्यात आणि सामाजिक संबंध प्रस्थापित करण्यात असमर्थ ठरल्या आणि मुख्य विकास प्रवाहापासून वंचित राहिल्याचे दिसून येते.

एकत्रित ओळख:

क्रिमिनल ट्राइब्ज सेंट्रल अक्ट हा कायदा १९५२ पर्यंत अंमलात होता. स्वतंत्र भारतात १९५२ ला ब्रिटिश अमदानीतील जाती-जमीतींच्या संदर्भात तयार केलेला गुन्हेगार जमातींचा कायदा रद्द करण्यात येऊन त्यांच्या हालचालींवरील व राहण्यावरील सर्व निर्बंध काढून टाकण्यात आले. म्हणून या जाती-जमातींना स्वतंत्र भारतात 'डीनोटिफाइड' म्हणजे नोंदणीवर्जित किंवा विमुक्त जाती-जमाती या संज्ञेने ओळखण्यात येते आणि उर्वरित जमाती या भटक्या जमाती म्हणून ओळखण्यात येऊ लागेल.

"महाराष्ट्रात १९८६ च्या शासकीय परिपत्रकानुसार २८ भटक्या जमाती व १४ विमुक्त जाती आहेत. बेरड, बेस्तर, भामटा, रामोशी, वडार, वाघरी व छप्परबंद या १४ विमुक्त जाती होत. भटक्या जमातींच्या गोटात गोसावी, बेलदार, भराडी, भुते, चित्रकथी, गारूडी, घिसाडी, गोंधळी, गोपाळ जोशी, कोल्हाटी, नंदीवाले, पांगुळ, वासुदेव, बहुरूपी या काही प्रमुख जाती आहेत."तर "Report of National Commission for De-Notified, Nomadic and Semi Nomadic Tribes, Ministry of Social Justice & Empowerment, Government of India, 2017 नुसार महारष्ट्रात ३६ भटक्या जमाती व १४ विमुक्त जाती आहेत."

विमुक्त जाती-जमाती व भटक्या जाती-जमाती या कायद्याच्या आणि वर्गीकरण निकषांच्या आधारे पूर्णतः वेगळ्या असल्या तरी सामान्य जनमानसात या वेगळेपणाबाबत पूर्णता जाणीव आणि स्पष्टता नसल्याने विमुक्त जाती-जमाती आणि भटक्या जाती-जमाती यांना एकत्रित ओळख या समस्येचा सामना करावा लागतो. या एकत्रित ओळखीमुळे भटक्या जमातींनाही गुन्हेगारी कलंक व भेदभावाला सामोरे जावे लागते.

सांस्कृतिक वंचितता:

भारत हा एक सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण देश आहे. भारतीय समाज हा वेगवेगळे धर्म, जाती, जमाती, पंथ, संस्कृतीचा संगम आहे. सांस्कृतिक विविधता हे एक भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. त्याचबरोबर भारतीय समाजाचा इतिहास हा वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था या व्यवस्थांशी संबंधित असल्याने जाती-जमातींप्रमाणे विविध संस्कृतीचीही स्तरित रचना भारतीय समाजात आढळते. ज्या जाती वर्ण आणि जाती व्यवस्थेत उच्च स्थानी होत्या त्यांची संस्कृती ही स्वाभाविकच श्रेष्ठ समजली जाते आणि ज्या जाती-जमाती वर्ण आणि जाती व्यवस्थेत खालच्या स्तरावर होत्या किंवा ज्या जाती-जमाती या गावगाड्याशी संबंधित नव्हत्या त्या जाती-जमातींची संस्कृती ही निम्न दर्जाची समजली जात असे.

सांस्कृतिक वंचिततेचा संबंध सामाजिक आणि आर्थिक विकास यांच्याशी जोडला जाऊ शकतो. उदा. महाराष्ट्रात ब्राह्मण आणि गोंधळी या जाती धार्मिक विधी पार पडण्याशी संबंधित आहेत. परंतु ब्राह्मण आणि गोंधळी जमातीचा तुलनात्मक विचार करता ब्राह्मण जातीच्या तुलनेत गोंधळी जमात ही फार मागासलेली दिसून येते. गोंधळी जमातीचा विचार करता, गोंधळी जमात ही महाराष्टार्तील धार्मिक विधी पार पडणारी एक देवभक्त जमात म्हणून ओळखली जाते. गोंधळ घालणे हा या जमातीचा पारंपारिक व्यवसाय म्हणून ओळखला जातो. परंतु गोंधळाला समाजात असणारी मागणी ही इतर धार्मिक परंपरांच्या तुलनेत फार कमी आहे. उदा. महाराष्ट्रात लग्न कार्यानंतर सत्यनारायणाची पूजा घालणे आणि ठराविक जाती मध्ये लग्नानंतर गोंधळ घालण्याची प्रथा आहे. परंतु प्रत्येक लग्नकार्यानंतर ब्राह्मणाकडून सत्यनारायणाची पूजा घातलीच जाते परंतु गोंधळ हा ठराविक जातींचाच धार्मिक विधी असल्यामुळे गोंधळ घालणे बंधनकारक नसते.

यावरून हे स्पष्ट होते की, जरी एखादी जात किंवा जमात ही धार्मिक कार्याशी संबंधित असली तरी त्या समाजातील सांस्कृतिक रूढी, परंपरा, श्रद्धा, विधी याबाबत प्रस्थापित समाजात असणारी धार्मिक आणि सांस्कृतिक भावना किती तीव्र आहे? आणि एखादी प्रथा पाळण्यात त्या समाजात त्या प्रथेमागे काय धार्मिक संदर्भ आहे?, हे सुद्धा

त्या प्रथेच्या अस्तित्वासाठी महत्वाचे आते. त्यामुळे गोंधळ हा धार्मिक विधी असला तरी त्याचे समाजातील असणारे धार्मिक महत्व किती तीव्र स्वरूपाचे आहे? यावर गोंधळी जमातीचा उदरनिर्वाह आणि गोंधळी विधीचे अस्तित्व अवलंबून आहे.

भटक्या जमातींच्या संस्कृतीच्या संदर्भात विचार करता, भटक्या जमातींच्या भटक्या जीवनशैलीमुळे या जाती जमाती प्रस्थापित समाज संस्कृतीच्या संपर्कात पूर्णवेळ येऊ शकल्या नाही, त्यामुळे इतर जातीच्या तुलनेत भटक्या जमातींमध्ये संस्कृतींकरणाच्या प्रक्रियेचा वेग हा मंद असलेला दिसून येतो, परिणामी भटक्या जाती-जमाती सांस्कृतिक दृष्ट्या अलग पडलेल्या दिसतात.

भटक्या-विमुक्तांची स्वतंत्र अस्मिता:

भटक्या विमुक्तांच्या सांस्कृतिक व्यवहाराचे आकलन केले असता असे दिसून येते की, या समाजाला स्वतंत्र अस्मिता आहे, ही अस्मिता स्थानिक नागरिकत्वाच्या संघर्षातून अधिक स्पष्ट दिसून येतो. भटका विमुक्त समाज हा आपल्या उपजीविकेसाठी सातत्याने भटकंती स्वरूपाचे जीवन जगत आहे, त्यांचे स्थिर जीवन दिसून येत नाही त्यामुळे त्यांचे स्वतःचे अस्तित्व हे त्यांच्या प्रथा, परंपरा, रूढी, कायदे, लोकनीती, लीकरूढी जीवनपद्धतीतून स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे हे समुदाय स्व-अस्मिता केंद्री समाज म्हणून स्वतःची ओळख, स्वतःची अस्मिता जपतात. असे असले तरी आधुनिक काळात भटके लोक स्थानिक लोकांच्या वारंवार संपर्कात येत असल्यामुळे व स्थानिक लोकांची जीवन पद्धती काही प्रमाणात स्वीकारावी लागल्यामुळे या संपर्काचा परिणाम यांच्या व्यवहारिक जीवनात अधिक स्पष्ट दिसतो. स्थानिक लोकांचे झालेले सभ्याताकरण आधारित जीवनपद्धती त्यांचातील श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व या व्यवहाराचे निरीक्षण भटके विमुक्त लोक करत असतात, त्यामुळे आपल्या समुदायाची अस्मिता आणि स्थानिक सभ्य समाजाची अस्मिता यातील फरक व्यवहारात समजून घेतात यातून स्थानिक संस्कृतीशी आपले मिळते जुळते का? त्यापेक्षा आपण वेगळे आहोत काय? विषयीचे प्रश्न सातत्याने उपस्थित केले जातात. त्यामुळे स्थानिक जीवनपद्धती आणि भटक्यांची जीवन पद्धती यामध्ये गुंतागुंत अधिक प्रमाणात दिसून येते. ही गुंतागुंत अस्मितेचा विषय बनत जाते. कारण सभ्यताकरणाच्या नावाखाली वरिष्ठ समुदायाची सांस्कृतिक श्रेष्ठता बहुसंख्य समुदायावर सांस्कृतिक वर्चस्वाच्या आधारे लादली जाते. परिणामी नागरिकत्वाच्या अस्मितेचे प्रश्न दिसून येतात.

भटक्या विमुक्तांची स्वतंत्र अस्मिता परिवर्तनवादी प्रक्रियांमधून अधिक स्पष्ट दिसून येते. कारण हा समाज शहरीकरण, नागरीकरण आणि अधुनिकीकरण या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा भाग बनत आहे. त्यामुळे प्रस्थापित समाजाच्या जीवन व्यवहार मूल्यांशी यांचा संबंध पहावयास मिळतो व या समुदायाच्या जीवन पद्धतीवर स्थानिक नागरिकांच्या जीवन पद्धतीचा परीणाम होत असल्याचे दिसून येते. असे असले तरी आपल्या समाजाची प्रथा, परंपरा, कायदे, जीवनमूल्य जपण्याचे काम करण्यासाठी भटक्या विमुक्त जमातींमध्ये स्वयंकेंद्री अस्मिता दिसून येते. तसेच स्थानिक समुदायाच्या जीवन व्यवहाराचे काही प्रमाणात अनुकरण केल्याने स्थानिक आणि भटक्यांची संमिश्रीत सांस्कृतिक अलगता दिसून येते आणि यातूनच गोंधळी जमात आपल्या मूळ निवासी संस्कृतीकडून सभ्यताकरणाच्या अनुकरण प्रक्रियेचा भाग बनत असल्याचे दिसून येते. तसेच नवीन सांस्कृतिक जीवनमुल्यांचा स्वीकार करून नवी संस्कृतीसुद्धा विकसित होताना पहावयास मिळते. परंतु नवीन संमिश्र संस्कृतीशी आर्थिक व सामाजिकदृष्ट्या जुळवून घेणे भटक्या जमातींना सहजासहजी शक्य होत नाही. परिणामी, भटक्या जमाती आपली पारंपारिक व सांस्कृतिक अस्मिता जपण्यास बाध्य ठरतात व आपली नवीन ओळख निर्माण करण्यात असमर्थ ठरतात.

चर्चा व निष्कर्ष:

भटक्या जमातींच्या अलगीकरणाची प्रक्रियेचे मुळ जरी वर्ण व जातीव्यवस्थेत आढळून येत असली तरी, वर्तमान समाजात भटक्या जमातींचे अलगीकरणाचे स्वरूप भिन्न आहे. अलीकडच्या काळात वसाहतकालीन धोरणांमुळे भटक्या जमातींच्या सामाजिक व आर्थिक जीवनाची क्षेत्रे मोठ्या प्रमाणावर प्रभावित झालेली दिसून येतात. स्वतंत्र भारतामध्ये भटक्या जमातींना विकासाच्या मुख्य प्रवाहत सामावून घेणे अपेक्षित होते, परंतु या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. कारण विकास आराखडा तयार करताना भटक्या जमातींना जरी केंद्रस्थानी ठेवण्यात आले असले तरी, त्यांना येणाऱ्या अडचणी न समजून घेता विकास आराखडे तयार करणयात आले. त्यामुळे जरी भटक्या जमातींसाठी विकास आराखडा, विकास योजना असल्या तरी त्यांचा लाभ भटक्या जमातींना सुलभतेने घेता येत नाही व भटक्या जमाती प्रस्थापित समाजापासून अलग पडू लागतात.

संदर्भ

- अवचट,अ. (१९८०).*असेहेभटकेअसेहेविमुक्त.* पुणे,विलासवाघप्रकाशन.
- अवचट, अ. (१९८५).*माणसं.* मुबई, मौजप्रकाशन.
- अत्रे,त्रिं. (१९९०).*गुन्हेगारजाती.* पुणे,वरदाबुक्स.
- कदम,ना. (१९९५).*महाराष्ट्रातीलभटकासमाजसंस्कृतीवसाहित्य.* पुणे,प्रतिमाप्रकाशन.
- कर्वे,इ. (१९८०).*मानववंशशास्त्रवसमाजशास्त्र.* पुणे, श्रीविद्याप्रकाशन.
- कर्वे,इ. (१९५३).*परिपूर्ति.* पुणे,देशमुखॲण्डकंपनी.
- काळे,कि. (१९९४).*कोल्हाट्याचेपोर.* मुंबई,ग्रंथावलीप्रकाशन.
- कालेलकर,गो. (१९९९).*मुंबईइलाख्यातीलजाती.* पुणे,वरदाप्रकाशन.
- कांबळे,उ. (१९८८).*भटक्याचेलग्न.* पुणे,मेहतापब्लिशिंगहाऊस.
- कोळेकर,ग. (१९९९).*साप्ताहिकअहिल्यासंदेश.* सोलापूर,ल.ना. श्रीगिरेप्रकाशित.
- खरात,शं. (१९८२).*सांगावा.* मुंबई,कॉन्टिनेन्टलप्रकाशन.
- खरात,शं. (१९९५).*तडीपार.* पुणे,साधनाप्रकाशन.
- गस्ती,भी. (१९८६).*बेरड.* पुणे,वनश्रीप्रकाशन.
- गायकवाड,ल. (१९९०).*उचल्या.* पुणे,श्रीविद्याप्रकाशन.
- ढेरे,रा. (१९६४).*मराठीलोकसंस्कृतीचेउपासक.* पुणे,ज्ञानराजप्रकाशन.
- जोशी, ल. (१९७९).*विश्वकोश.*मुंबई,महाराष्ट्रसाहित्यसांस्कृतिकमंडळ.
- दवणे,अ. (१९९५).शब्ददानप्रकाशन, नांदेड.

*सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र अधिविभाग, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, कोल्हापूर

***

वीटभट्टी कामगार: एक समाजशास्त्रीय अभ्यास

*डॉ.विनोदकुमार धोंडीराम कुंभार,

प्रस्तावना:

आशिया खंडामध्ये वीट उत्पादनासाठी चीन या देशाचा प्रथम क्रमांक लागतो. तर भारत हा वीट उत्पादनामध्ये आशिया खंडात दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्यमध्ये सुद्धा वीटभट्टी हा उद्योग मोठ्या प्रमाणावर केला जातो. तसेच महाराष्ट्रमध्ये वीटभट्टी उद्योग पारंपारिक पद्धतीने सुरु असल्याचे दिसून येते. वीटभट्टी हा उद्योग किंवा व्यवसाय प्रामुख्याने असंघटित क्षेत्रामध्ये येतो. प्रामुख्याने वीटभट्टी कामगार हे असंघटित क्षेत्रात काम करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांची सद्यस्थिती अभ्यासणे तसेच त्यांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या व्यवसायामुळे मोठ्या प्रमाणावरती कामगारांना रोजगार उपलब्ध होतो. जे.एस.कामेत्रा यांनी आपल्या लेखामध्ये वीट उद्योगाबाबत सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यांच्या मते ९९ टक्के वीट उत्पादन पारंपरिक पद्धतीने केले जाते. तसेच वीट उत्पादनासाठी अनेक अनावश्यक घटकांचा वापर केला जातो. राष्ट्रीय कामगार कमिशनच्या २००२ मधील अहवालामध्ये वीटभट्टी कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार सामाजिक सुरक्षिततेपासून वंचित असल्याचे नमूद करण्यात आलेले आहेत. तसेच या अहवालामध्ये या कामगारांच्या विविध समस्या मांडण्यात आलेल्या आहेत. दामले आनंद यांनी आपल्या संशोधन प्रकल्पामध्ये वीटभट्टी कामगारांची सामाजिक विभागणी, कामाचा अनुभव, शिक्षण, वार्षिक उत्पन्न, कामगारांच्या स्थलांतराची कारणे, महिला कामगारांची स्थिती इत्यादी विषयांवर संशोधन केले आहे. प्रगतीश व जैन यांनी आपल्या लेखांमध्ये मांडलेल्या निष्कर्षानुसार, भारतात वीटभट्टी व्यवसायात एक कोटी पेक्षा अधिक लोकसंख्या कार्यरत आहे. तसेच भारतातील वीटभट्टी व्यवसाय पारंपरिक असल्याने प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या वीटभट्टी उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना कमी वेतन दिले जाते.

उद्दिष्टे:

१. वीटभट्टी कामगारांच्या सामाजिक–आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. वीटभट्टी कामगारांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती अभ्यासणे

३. वीटभट्टी कामगारांच्या समस्यांचा शोध घेणे.

संशोधन पद्धती: प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच प्राथमिक आणि दुय्यम साधनांद्वारे माहिती संकलन करण्यात आलेली आहे. प्राथमिक माहिती स्त्रोतामध्ये मुलाखत, निरीक्षण या साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. तर दुय्यम माहितीस्त्रोतामध्ये विविध अहवाल, संदर्भ ग्रंथ, मासिके इत्यादींचा आधार घेण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी पाच वीटभट्टी वर काम करणाऱ्या ८० कामगारांची निवड असम्भाव्यता नमुना निवड पद्धतीमधील सहेतूक नमुना निवडपद्धतीचा वापर करण्यात आला.

माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन :

वीटभट्टी कामगारांचा अभ्यास करण्यासाठी नमुन्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या पाच वीटभट्टी उद्योगांना प्रत्यक्ष भेट देण्यात आली. यावेळी कामगारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. तसेच निरीक्षणाच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली. संकलित माहितीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण व विश्लेषण करण्यात आले आहे.

सारणी क्र.१. वीटभट्टी कामगारांमधील कुटुंबप्रमुखाची भूमिका

अ.न.	कुटुंबप्रमुख	संख्या	सरासरी
१	पुरुष	७८	९७
२	स्त्री	०२	०३
एकूण		८०	१००

या सारणीवरून असे दिसून येते की, सरासरी ९७ टक्के पुरुष कामगार हे कुटुंबप्रमुख म्हणून भूमिका बजावताना दिसतात, कुटुंबातील महत्वपूर्ण निर्णय पुरुष घेतात, तर फक्त ०३ टक्के महिला वीटभट्टी कामगार या कुटुंबप्रमुख म्हणून भूमिका बजावताना दिसतात.

आलेख क्र १ कुटुंबाचा प्रकार

वरील आलेखावरून असे दिसून येते की, जास्तीत जास्त ६० (७५ टक्के) वीटभट्टी कामगारांच्यामध्ये विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात असलेली दिसून येते, कारण यामधील अधिकतर कुटुंबे हि इतर राज्यातून स्थलांतरित झालेली आहेत. तर एकत्र कुटुंब पद्धती असणाऱ्या वीटभट्टी कामगारांचे प्रमाण २० (२५ टक्के) असल्याचे दिसून येते.

आलेख क्र. २ कामगारांचे वयोगट

वरील आलेखावरून असे स्पष्ट होते की, प्रामुख्याने ३१ ते ४५ या वयोगटातील कामगारांचे प्रमाण जास्त ६३ (७९ टक्के) आहे तर १६ ते ३० या वयोगटातील कामगारांचे प्रमाण ९ (११ टक्के), तसेच ४६ ते ६० या वयोगटातील कामगारांची संख्या कमी ८ (१० टक्के) इतकी असल्याचे दिसून आले.

निष्कर्ष :

- वीटभट्टी कामगारांमधील कुटुंबप्रमुख म्हणून पुरुष भूमिका बजावत असल्याचे प्रमाण ९७ टक्के आहे तर ३ टक्के स्त्रिया कुटुंब प्रमुखांची भूमिका बजावताना दिसतात.
- ७५ टक्के वीटभट्टी कामगारांच्या मध्ये विभक्त कुटुंब पद्धती दिसून येते, तर एकत्र कुटुंब पद्धती असणाऱ्या वीटभट्टी कामगारांचे प्रमाण २५ टक्के असल्याचे दिसून येते. थोडक्यात, वीटभट्टी कामगारांच्या मध्ये विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण जास्त आहे.
- वीटभट्टी उद्योगांमध्ये कुशल व अकुशल असे दोन्ही प्रकारचे कामगार दिसून येतात.
- वीटभट्टी कामगारांमध्ये प्रामुख्याने ३१ ते ४५ या वयोगटातील कामगारांचे प्रमाण जास्त आहे तर १६ ते ३० या वयोगटातील व ४६ ते ६० या वयोगटातील कामगारांची संख्या कमी असल्याचे दिसून येते.
- वीटभट्टी कामगारांमध्ये बालकामगार आढळून आले नाहीत.

- वीटभट्टी उद्योगांमध्ये कामगार म्हणून अनुसूचित जातीमधील कामगारांची संख्या जास्त असल्याचे दिसून येते.
- प्रामुख्याने प्राथमिक शिक्षण पूर्ण करणारे कामगार सर्वात जास्त प्रमाणात दिसून येतात. तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करणारे वीटभट्टी कामगार खूप कमी आहेत. तसेच अशिक्षित वीटभट्टी कामगारांचे प्रमाण हे २० टक्के असल्याचे दिसून आले.
- या कामागारांच्या ८० टक्के मुलांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध होत आहेत. परंतु त्यांना शिक्षण घेत असताना काही मुख्य अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामध्ये दारिद्र्य, शाळेमधील भाषा माध्यम, मुलांवर कुटुंबाची लवकर येणारी जबाबदारी, मुलांमध्ये शिक्षणाची आवड नसणे, वीटभट्टी उद्योगापासून शाळा लांब असणे इत्यादी आढळून आल्या.
- विटांचे वर्गीकरण कच्च्या विटा व भाजलेले विटा अशा प्रकारे केले जाते. भारतामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने विटा भाजल्या जातात.
- वीटभट्टी उद्योगावरती कामगार म्हणून आलेले ८० टक्के लोक बाहेरील राज्यातील असल्याचे दिसून आले. तर २० टक्के कामगार महाराष्ट्रातील रहिवासी आहेत.
- वेगवेगळ्या सण उत्सव समारंभासाठी बाहेरील राज्यातील कामगार आपल्या मूळ गावी जातात. थोडक्यात वीटभट्टी उद्योगांमध्ये स्थलांतराचे प्रमाण मोठे असल्याचे दिसून आले.
- वीटभट्टी उद्योगांमध्ये काम करणारे कामगार हे वर्षातील सहा महिने विटा तयार करण्याचे काम करतात. तर इतर वेळेस शेतीशी संबंधित कामे करत असल्याचे दिसून आले.
- वीटभट्टी वरील ९६ टक्के कामगार कुटुंबे आपल्या आरोग्यविषयक अडचणी सोडवण्यासाठी खाजगी दवाखान्यात जातात तर चार टक्के कुटुंबे सरकारी दवाखान्यात जात असल्याचे दिसून येते.
- वीटभट्टी कामगारांच्या कुटुंबांना वीटभट्टी मालकांनी राहण्याची सोय पिण्याच्या पाण्याची सोय करून दिल्याचे दिसून आले.
- वीटभट्टी मालकांकडून ८० टक्के वीटभट्टी कामगारांना वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
- वीटभट्टी कामगार हे वीटभट्टी उद्योगाच्या ठिकाणीच वास्तव्यास आहेत या ठिकाणी वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणावर दिसून आले या कामगारांची घरे पर्त्याची व विटांपासून बनविलेली आहेत.

आजही जास्तीत जास्त वीटभट्टी कामगार हे स्थलांतरित असल्याचे दिसून येतात. वीटभट्टी कामगारांच्यामध्ये प्रामुख्याने अत्यल्प उत्पन्न, शैक्षणिक समस्या, निकृष्ट राहणीमान, कामाचे स्वरूप हंगामी असणे, व्यसनाधीनता इत्यादी समस्या दिसून येतात. तसेच शिक्षण, आरोग्य व शासकीय सुविधांपासून ते वंचित आहेत. विविध शासकीय योजनांची माहिती नसणे, मानवी हक्कांबाबत वीटभट्टी कामगारांच्या मध्ये जागरूकता नसल्याचे दिसून आले. वीटभट्टी उत्पादक व्यावसायिकांना पारंपारिक व्यवसाय ऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रवृत्ती करणे आवश्यक आहे. वीटभट्टी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांचे संघटन होणे आवश्यक आहे.

संदर्भसूची:

- Ahuja, R. (2002). *Indian Social System*, New Delhi. Rawat Publications.
- Kothari, C. (2007). *Research Methodology Methods and Techniques*, New Delhi. New Age International (P) Ltd., Publications.
- Kamyotra, J. (2016). *Brick Kilns In India*, Delhi. Central Pollution Control Board.
- Ministry Of Labour, (2022). *Report Of The Study Group On Social Security*, National Commission On Labour, Government Of India.
- Jain, P. (2013). *Thadagam Vally of Brick kilns-lost River and disturbed wildlife*, India. ERC, Nilagiris.
- Parashurama, K. (2011).*Contract Labour In India: Problems And Prospect,Delhi*. Neha Publishers.
- Rao, S. (2008). *SOCIOLOGY*, Delhi. S Chand Pub.
- Sharma, S. (2007). *Research Methodology*, New Delhi. Deep and Deep Publications.

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, पी.डी.व्ही.पी.महाविद्यालय, तासगाव. मोब.–९९७५५६४६२२
vinodkumarkumbhar9@gmail.com

***

जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थाने ग्रामीण आरोग्याच्या समस्या संबंधित केलेल्या कार्याचा अभ्यास

प्रा.स्मिता अशोक पाटील
डॉ. रामचंद्र भिसे

गोषवारा

दारिद्रय लोकांच्या जीवनाची दशा आणि त्यांच्या जीवंत राहण्याच्या संधीवर उत्पन्नाच्या पडणाऱ्या प्रभावाचे स्पष्टीकरण करते दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या विकासासाठी प्रयत्न करणारे प्रमुख लिगल शासकीय स्वयंसेवी संस्था म्हणून जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाचा उल्लेख करावा लागेल. सांगली जिल्हयात वाळवा तालुक्यात काम करणारी जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान एक महत्वपूर्ण स्वयंसेवी संस्था आहे. जी कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता निरपेक्ष भावनेने काम करते.

सध्या महागाई वाढली आहे शस्त्रक्रिया अवयव रोपण यासारखे खर्च गोरगरिबांना परवडत नाहीत व कौटुंबिक व सामाजिक समस्या वाढल्या आहेत. अशा वेळी जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान आरोग्य क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण काम करीत आहे. गुणात्मक व संख्यात्मक दोन्ही पध्दतींचा वापर केला गेला आहे. आरोग्याची समस्या जाणून गुणात्मक तंत्राचा वापर करण्यात आला आहे व दारिद्रय रेषेतून कुटूंबातील लाभार्थ्यांची संख्या प्रमाण टक्केवारी यासाठी संख्यातंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

दारिद्रय निर्मुलनासाठी असणाऱ्या शासकीय उपाययोजना सदर अभियानाव्दारे दारिद्रय रेषेखलील कुटुंबापर्यंत चांगल्या तऱ्हेने पोहचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे शासनाने देखील अशा बिगर शासकीय संस्थाद्वारे अशा योजनांची कामे करण्याची प्रयत्न करावा. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील आरोग्य क्षेत्रातील कार्याच्या संशोधनातून व उद्देशातून दारिद्रयरेषेखालील कुटूंब आरोग्य क्षेत्रापासून वंचित राहून नये. यासाठी यशस्वी प्रयत्न केला जाणार आहे. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाचे सरकारी योजना समक्षपणे दारिद्रय रेषेखालील कुटूंबापर्यंत पोहचवून सरकारी अंमलबजावणीतील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

प्रस्तावना –

मानवी गरजा या सतत वाढणाऱ्या व अमर्यादित असतात. मानवाच्या मूलभूत गरजा सुध्दा पूर्ण झाल्याशिवाय जीवन जगणे अशक्य असते. अर्थव्यवस्थेतील चढउतारामुळे तसेच चुकीच्या सामाजिक रचनेमुळे व्यक्ती किंवा समुह हा विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकला जातो. तेव्हा शासनाला किंवा सामाजिक संस्थांना दारिद्रय निर्मूलनाासाठी उपाययोजना कराव्या लागतात. आपल्या मूलभूत गरजा जे पूर्ण करु शकत नाहीत अशा व्यक्ती व समूहाला दारिद्रय रेषेखालील लोक म्हणावे लागेल असें लोक उपासमारीच्या जवळपास टेकलेले असतात. त्यांचा राहणीमानाचा दर्जा खालावलेला असतो. दारिद्रय हे एक सापेक्ष कल्पना आहे. दारिद्रयाचे आपत्तकालीन दारिद्रय दीर्घकालीन सामूहिक दारिद्रय, दीर्घकालीन,व्यक्तीगत दारिद्रय, निरपेक्ष दारिद्रय व सापेक्ष दारिद्रय असे दारिद्रय पडतात. आदर्श राज्यव्यवस्थेमध्ये सर्वांचा विकास व्हावा गरीबी व दारिद्रय हटावे ही जबाबदारी शासनाची असते. काही व्यक्ती व सामाजिक संघटना सुध्दा दारिद्रय निर्मुलनासाठी काम करत असतात.

लोकहित साधण्याच्या दृष्टीने जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाची सुरवात सन २००६ सालापासून झाली आहे. राजारामबापू ज्ञानप्रबोधिनी यांचे मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेले हे अभियान सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्हयातील लोकांच्या पर्यंत पोहचले आहे. हे अभियान आरोग्य, शैक्षणिक, रक्तदान शिबीरे, कृत्रिम अवयव रोपण, स्वयंरोजगार सहाय्य, गृहबांधणी इत्यादी अनेक विषयावर काम करत आहे. हजारो लोकांना या अभियानाचा फायदा झाला आहे. आरोग्य, शिक्षण स्वयंरोजगार व्यसन मुक्ती व विविध योजनांचा लाभ हजारो कुटुंबाना मिळाला आहे.

नमुना शब्द – दारिद्रय निर्मुलन, आरोग्य

संशोधन समस्या – जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान या स्वयंसेवी संस्थाने ग्रामीण आरोग्याच्या समस्या संबंधित केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

पद्धतीशास्त्र – या समस्येचा अभ्यास करताना व्यष्टी अध्ययन पद्धती (Case Study Method) सामजिक सर्वेक्षण (Social Survey) पध्दतीचा वापर केला आहे. व्यष्टी अध्ययन पद्धतीत खूप सखोल व सूक्ष्म पद्धतीने अभ्यास केला जातो. सर्वेक्षण पद्धती द्वारा भौगोलिक क्षेत्राचा आढावा व स्थानाचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधनाचे महत्त्व – प्रस्तुत संशोधनामध्ये निवडलेला विषय हा गरिबीत जीवन जगणाऱ्या व्यक्तींच्या व समाजाच्या विकासासाठी काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेचा आहे. आर्थिक व सामाजिक विकासात भर टाकणारा आहे. कुठलेही समाजशास्त्रीय संशोधन हे प्रस्थापित ज्ञानामध्ये नवीन भर टाकण्याचे कार्य करीत असते. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाचा संदर्भात अभ्यासकरण्यामागील उद्देश देखील अशाच प्रकारे नवीन ज्ञानाचा, शोध घेण्याचा आहे. एकतर विषय संशोधकांच्या आवडीचा असतो. किंवा त्या विषयाबाबत संशोधनकर्त्यास शास्त्रीय उत्सुकता असते. म्हणून एखादा विषय संशोधनकर्ता निवडतो. एखादी योजना, अभियान त्यांचे फायदे जास्तीत जास्त गरजु व्यक्तींपर्यत पोहचावेत व ते आव्हान स्विकारल्यामुळे संशोधक एखादे संशोधन कार्य हाती घेतो.

जयंत दारिद्रय निर्मुलन यांचे पश्चिम महाराष्ट्रात मोठे काम असून त्या कामाचे संशोधन होणे गरजेचे आहे. या अभियानाची भूमिका, उद्दिष्टये, यश, अपयश यांचे अन्वेषण होणे आवश्यक आहे. या अभिमानाची दिशा समजून घेण्यासाठी, त्यांचे काम राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी सदरचे संशोधन आवश्यक वाटते. देशात अनेक गैरसरकारी संस्था कार्यरत असून त्यांचे उद्दिष्ट गरीब लोकांना मदत करणे व त्यांची अडचण व समस्या सोडविणे असते. शासकीय सुविधा, आरोग्य, शैक्षणिक, रोजगार इत्यांदीचा लाभ लोकांपर्यत पोहचवणे हे असते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने दारिद्रय निर्मुलनाच्या विविध योजना राबविल्या. पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा प्रयत्न केला. मात्र अपेक्षेप्रमाणे आपण दारिद्रयावर मात करू शकलो नाही. कारण सरकारी योजना कागदावर भरभक्कम वाटतात. त्या जाहीर केल्या जातात. मात्र अशा योजनांच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी राहतात. अनेक योजना संबंधित घटकापर्यंत पोहचत नाहीत. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील आरोग्याविषयी लाभ मदत दारिद्रयरेषेखालील जास्तीत जास्त व्यक्तींच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करणे.

अभियानाने आरोग्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाची चिकित्सा करून हे अभियान जास्तीत जास्त कार्यरत होणाऱ्या दृष्टीकोनातून या अभियानाचा अभ्यास करून उपाययोजना सुचविणे गरजेचे आहे. या अभियानाचे महत्त्व राष्ट्रीय स्तरावर पोहचविणे हे उद्दिष्टय आहे.

संशोधनाचा उद्देश –

१. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानानाने आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास करणे.
२. अभियानाची उपयुक्तता सिद्ध करणे.
३. जनतेला झालेल्या लाभाचा अभ्यास करणे.
४. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील आरोग्य क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणे.

अध्ययनाची उद्दिष्टये –

दारिद्रय निर्मुलनासाठी असणाऱ्या शासकीय उपाययोजना सदर अभियानाद्वारे दारिद्रयरेषेखालील कुटूंबापर्यंत आरोग्य सेवा चांगल्या तऱ्हेने पोहोचविण्याचा प्रयत्न करावा.

१. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील आरोग्य क्षेत्रातील स्वरुप व व्याप्तीचा अभ्यास करणे.
२. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील आरोग्य क्षेत्रातील कार्याचा आढावा घेणे.
३. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानातील आरोग्य क्षेत्रातील कार्याची चिकित्सात्मक मांडणी करणे.
४. जयंत दारिद्रय निर्मुलनाच्या संख्यात्मक व गुणात्मक बाबींची चिकित्सा करणे.
५. जयंत दारिद्रय निर्मुलनाच्या अभियानातील आरोग्य क्षेत्रातील लाभार्थी कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीचा अभ्यास करणे.

अध्ययनाची गृहितके –

१. सामाजिक समस्यांवर सामाजिक संघावर दारिद्रय निर्मुलन अभियान निरपेक्षपणे कार्य करीत असतात.
२. बदलत्या सामाजिक गतीनुसार नव्या समस्या व प्रश्न उभे राहतात. अशावेळी शासनसुध्दा हतबल होते. तेव्हा लोकसमूहातूनच सामाजिक संस्था उभ्या राहातात.

ग्रामीण भागातील लोकांची आरोग्यविषयक स्थिती –

ग्रामीण भागामध्ये लोकसंख्या दरात मोठया प्रमाणात वाढ, नियंत्रण करण्याजोगा आजाराचा प्रादुर्भाव व मृत्यू गुंतागुंतीच्या प्रसुती याबरोबरच कुपोषणात वाढ झाल्याचे दिसून येते. याशिवाय जुन्या न सुटणाऱ्या प्रश्नांबरोबरच देशातील आरोग्य यंत्रणेसमोर नवीन आव्हाने जसेकी देशातील अंदाजे ५ लक्ष रुग्न HIV/ऍडस ग्रस्त, असंसर्ग जन्य रोग जसे हदयरोग,

कर्करोग, अंधत्व मानसिक आजार आणि तंबाखूजन्य रोग यासारख्या दुर्धर आजाराने त्रस्त आहेत. यातील ग्रामीण भागातील लोकांची संख्या जास्त आहे.

खाजगी क्षेत्रातील आरोग्य सेवेवरील नियंत्रण नसल्याने आरोग्य सेवेतील खर्चात वाढ झाली असून ती ग्रामीण भागातील जीवन जगणाऱ्या कुटुंबांना न परवडण्याजोगी आहे. आरोग्य सेवेचा खर्च आणि जनतेच्या अपेक्षांमध्ये वाढ होत आहे. दुर्गमग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्याचे आव्हान अधिक महत्वाचे आहे. सदर प्रश्नांचे गांभीर्य व व्याप्ती लक्षात घेता लहान योजनांवर लक्ष केंद्रित करणे पुरेसे नाही. सार्वजनिक आरोग्य सेवेत सहसाध्य परवडण्याजोगी कार्यक्षम गुणवत्तापूर्ण सेवेत रुपांतरित करणे अत्यंत आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील आरोग्य समस्या

महाराष्ट्राने गेल्या ५० वर्षांत आरोग्य आणि आरोग्यसेवांच्या बाबतीत बऱ्यापैकी मजल मारली आहे. महाराष्ट्रातल्या स्त्री–पुरुषांचे अपेक्षित आयुर्मान ६९ पर्यंत उंचावले आहे. जन्मदर १९ पर्यंत तर मृत्यूदर ६.६ इतका कमी झाला आहे. लोकसंख्या वाढीचा प्रश्न निवडक समस्यांपुरता सीमीत आहे. ग्रामीण जनतेने पण यात शहरांच्या बरोबरीने भाग घेतला आहे. महाराष्ट्राचा मातामृत्यूदर हजारी एकच्या थोडा वर असला तरी देशाच्या तुलनेत तो बराच कमी आहे. बालमृत्यूदर ३३ पर्यंत कमी झाला आहे. खरे म्हणजे ही समस्या केवळ काही तालुक्यांपुरती आहे. पण मूलत: बालमृत्यूदर एक व्यामिश्र आणि प्रतिनिधीक मोजमाप आहे. फक्त तेवढ्यापुरती कार्यवाही करून एकूण आरोग्यसेवांबद्दलच्या सुधारणा प्रलंबितच राहतील. राज्यात प्राथमिक आरोग्य केंद्राचे आणि उपकेंद्राचे जाळे विस्तारले आहे. अधिक डॉक्टर्स, अधिक विशेषज्ञ, वैद्यकीय महाविद्यालये, खाजगी रुग्णालये यामुळे वैद्यकीय क्षेत्र गजबजले आहे. हायटेक रुग्णालयेही वाढत आहेत.

असे जरी असले तरी महाराष्ट्राच्या आरोग्याच्या विशिष्ट समस्या आहेत. महाराष्ट्रातले कुपोषण ४०:च्या आसपास आहे. नव्या कुपोषण मानदंडानुसारही ही समस्या लक्षणीय आहे. शहरांमध्ये लठ्ठपणा (त्यामुळे मधुमेह, अतिरक्तदाब) वाढतोय. दगडांच्या, राकट, कणखर महाराष्ट्र देशाला हे भूषणावह नाही. महाराष्ट्रातली अस्वच्छता, (संत गाडगेबाबा अभियान असूनही), पिण्याच्या पाण्याची समस्या, प्रदूषण, शहरी गलिच्छता लक्षणीय आहे. कष्टकरी स्त्रियांचा नगण्य शरीरभार (ग्रामीण भागात ४३: स्त्रिया कुपोषित) महाराष्ट्रातले दारिद्रय, पिचलेपण व शोषण यांचे निदर्शक आहे. आपला रस्ते–अपघात दर देशात तामिळनाडू वगळता सर्वाधिक आहे. मुलग्याच्या हव्यासाने स्त्री–गर्भ हत्यांची समस्या दक्षिण महाराष्ट्रात जास्त आहे. कायद्याने त्यात साधले एवढेच प्रत्येक शहरात त्याचे टगे–डॉक्टर निर्माण झाले. हा धंदा काही मंडळींनी नावारुपाला आणला आहे. त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही, उलट इतरांवर किरकोळ कारवाया केल्या जातात. लवकर लग्ने, लवकर बाळंतपण, अपुरे जन्मवजन या समस्या आहेतच. मराठवाड्यात त्या जास्त आहेत. भटक्या विमुक्तांपर्यंत गेली ५० वर्षे आपल्या आरोग्यसेवा धडपणे पोहोचू शकल्या नाहीत. वाढत्या वयोमानामुळे दीर्घकालीन आजार वाढतात, त्यासाठी आपण काहीही केलेले नाही. (अपवाद फक्त मोतीबिंदू शस्त्रक्रिया)

महाराष्ट्राच्या सार्वजनिक (सरकारी) आरोग्यसेवा पोखरलेल्या आहेत. ग्रामीण रुग्णालयात विशेषज्ञांचा कायमचा तुटवडा आहे, सुमारे ५०: जागा रिकाम्या असतात. शहरांमध्ये काही सरकारी रुग्णालये गर्दीने टेकीला आली आहेत. डॉक्टर्स आणि परिचारिका विशेषत: ग्रामीण क्षेत्रात असंतुष्ट, उदासीन मन:स्थितीत आहेत. बदल्या–नेमणूकांमधला मोठा भ्रष्टाचार, शोषण, औषध/उपकरणे खरेदीतले घोटाळे, अटका, वर्तमानपत्रातील ''प्रसिद्धी', प्रशासकीय हडेलहप्पी आणि बळीचे बकरे शोधण्याची परंपरा, मोक्याच्या पदांवर प्रतिनियुक्ती किंवा जादा अधिभार देऊन केलेल्या ''तडजोडी' या सगळ्या प्रतिकूल परिस्थितीत सार्वजनिक आरोग्यसेवा निष्प्रभ होत चालल्या आहेत. आरोग्यसेवांसाठी मंजूर झालेली राज्य अंदाजपत्रकीय तरतूद निम्मीच वापरायला मिळते, तर केंद्रीय निधीही निम्माच वापरला जातो. कामगार रुग्णालये अल्प क्षमतेने चालविली जातात, तिथेही निधीचा वापर धड होत नाही. राज्याच्या आरोग्यसेवांमध्ये एकेकाळी सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांचा वरचष्मा होता, तो संपला आहे. आरोग्यसेवांना दिशा देण्यासाठी ना धोरण आहे ना तज्ज्ञ समिती. वैद्यकीय मनुष्यबळ किती लागणार आहे ते लक्षात न घेता मेडिकल कॉलेजेस वाटली जाताहेत, त्यामुळे शहरांमध्ये डॉक्टरांची दाटी आणि स्पर्धा तीव्र होत आहे. वैद्यकीय शिक्षण–संशोधन खाते आणि सार्वजनिक आरोग्य खात्यात ताळमेळ असायला पाहिजे, खरे म्हणजे अन्न आणि औषध प्रशासनही आरोग्य खात्याला जोडलेले पाहिजे. मोठ्या शहरात पालिका रुग्णालय बहुश: अकार्यक्षम आहेत, (के.ई. एम. नायर इ. अपवाद) त्यासाठी नगर विकास खात्याने पद्धतशीर आढावा घेऊन सुधारणा करायला पाहिजे. शहरांमध्ये प्राथमिक आरोग्यसेवांची वानवा आहे, ती कधी दूर होणार?

खेडेगावांसाठी मराठीतून छोटे वैद्यकीय मान्यताप्राप्त प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम उपलब्ध असायला हवेत. ग्रामपंचायती, नगरपालिका, सार्वजनिक संस्थांनी प्रथमोपचार व आरोग्यशिक्षणध रोगप्रतिबंधक सेवांसाठी पुढाकार घ्यावा, त्यात अशा प्रशिक्षित कार्यकर्त्यांना मानधनध्मोबदला देऊन आरोग्यसेवा खोलवर, दूरवर जायला पाहिजेत. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या ''आशा' कार्यकर्त्यांचा नव्याने विचार करायला पाहिजे. सध्यातरी प्रशिक्षण, मानधन, औषधपुरवठा या तीनही बाजूंनी आशा योजना लंगडत आहे. सर्वत्र सक्षम प्राथमिक आरोग्यसेवा नसतील तर एकूण आरोग्यसेवा रुग्णालयकेंद्री होऊन त्या महाग आणि अप्राप्य होणार आहेत. सरकार आरोग्य उपकेंद्रांचाही यथायोग्य वापर करीत नाही.

खाजगी वैद्यकीय सेवांचे क्षेत्र वरून ठाकठीक दिसले तरी ते समस्याग्रस्त आहे. खाजगी क्षेत्रात जी.पी. स्तरावर ऍलोपथीचे डॉक्टर संपून केवळ होमिओ–आयुर्वेद शाखेचे डॉक्टर्स आहेत. इथे एक मूलभूत विसंवाद खदखदतोय. योग्य, कायदेशीर व प्रशिक्षणात्मक व्यवस्था करून ही समस्या लवकरात लवकर संपवणे आवश्यक आहे. पॅरामेडिक क्षेत्रात परिचारिकांची संख्या कमी असणे ही समस्या शासन आणि नर्सिंग कौन्सिल यांनी जणू मुद्दामहून टिकवून ठेवली आहे असे वाटते. प्रशिक्षित पॅरेमेडिक्स मोठ्य प्रमाणावर लागणार आहे. याबद्दल पॅरामेडिक कौन्सिल काय करते आहे हे कळत नाही. खाजगी रुग्णालयांचा दर्जा सुधारण्यासाठी महाराष्ट्र नर्सिंग होम रेग्युलेशन ऍक्ट आहे, पण त्याचे उपनियम न झाल्याने आणि मूळ उद्दिष्ट बाजूला पडल्याने हा कायदा सध्या फक्त एक चराऊ कुरण झाला आहे. याऐवजी शासन आता श्रेयांकनाचा पर्याय शोधत आहे. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या निवडणुका यावेळी आय.एम.ए. संघटनेने जिंकल्या ही स्वागतार्ह गोष्ट आहे पण गेले दीड वर्ष कौन्सिलच्या नेमणुका न केल्याने कौन्सिल असून नसल्यासारखेच आहे. मग गुणवत्ता नियंत्रण कोण करणार?खाजगी रुग्णालयातली भरमसाठ बिले आणि अनेक ठिकाणी चालणारी फसवणूक यामुळे रुग्ण–डॉक्टर संघर्ष होत आहेत. मारहाण विरोधी कायदा करून ही मूळ अविश्वासाची समस्या आपण सध्या झाकून ठेवतो आहोत. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना वैद्यकीय उपचार हे आर्थिक संकट झाले आहे. जनस्वास्थ्य विमा योजना केवळ कागदोपत्री आहेत, या योजनेच्या दरपत्रकाप्रमाणे इतक्या कमी दरात खाजगी सेवा मिळणे जवळ जवळ अशक्य आहे. याऊलट जीवनदायी योजना द्राविडी प्राणायामाप्रमाणे उगाचच किचकट केलेली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या आणि लोकप्रतिनिधींना खाजगी वैद्यकीय बिलांची भरपाई मिळणे हा क्रूर विनोद चालू आहे. शासनाच्या स्वत:च्या आरोग्यसेवा नीट चालत नसताना ही भरपाई कशासाठी, बक्षिस म्हणून? शिवाय त्यातही टक्केवारीचा भ्रष्टाचार आहेच.

महाराष्ट्राच्या आरोग्यसेवा अकार्यक्षम, विस्कळीत व दिशाहीन झाल्या आहेत. त्याला सुसंघटित कार्यक्षम, दर्जेदार आणि सर्वसमावेशक करण्यासाठी योग्य धोरण आणि नीति असायला पाहिजे. त्यासाठी निदान पाच वर्षांसाठीमुख्यत: सार्वजनिक आरोग्य व रुग्णालय व्यवस्थापन तज्ज्ञांच एक सुकाणू समिती असायला पाहिजे. मुख्य म्हणजे सकल आणि उत्तम आरोग्यसेवांचे स्वप्न पाहणारे नेते – कार्यकर्ते, अधिकारी पाहिजेत. मोफत आरोग्यसेवांचा मुद्दा केवळ गरीबांपुरता आहे, बाकीची जनता खिशातून दाम मोजतच आहे. लोकांना हव्या आहेत चांगल्या आरोग्य वैद्यकीय सेवा., सत्वर शास्त्रीय उपचार, वाजवी खर्च, माणुसकी, आणि भरवसा हे आरोग्यसेवांसाठी आवश्यक गुण आहेत. सध्या याचाच दुष्काळ आहे

जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाची सुरुवात –

१६ फेब्रुवारी हा मा. आ. जयंतराव पाटील साहेब हा त्यांचा वाढदिवस, स्वत:चा वाढदिवस थाटामाटात साजरा न करता त्यांनी आपल्या सर्व सहकार्यांच्या मदतीने नेटके नियोजन करुन जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाची स्थापना २००६ ला केली. संपूर्ण वाळवा तालुका व मिरज तालुक्यातील काही गावात आरोग्य, शिक्षण, स्वयंरोजगार, व्यसनमुक्ती महिला सबलीकरण आणि सामाजिक दारिद्रय निर्मुलन या सर्वच सामाजिक प्रश्नांचे समूळ उच्चाटन करण्याच्या हेतूने काम हाती घेतलेले असून अतिशय प्रभावीपणे काम सुरु आहे.

स्थानिक लोकांचा सहभाग, सरकारी मदतीशिवाय निधीची निर्मिती तसेच सरकारी योजना सर्व सामान्य घटकांपर्यत पोचणे व दारिद्रय रेषेखालील व्यक्तींची सर्वांगीण प्रगती साधने अशा व्यापक उद्दिष्टांनी फेब्रुवारी २००६ पासून वाथ्वा तालुका व विधानसभा मतदार संघातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या विकासासाठी प्रयत्न करणारी एक प्रमुख बिगर शासकीय संघटना म्हणून जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाचा उल्लेख करावा लागेल. वाळवा तालुका हा संपूर्ण महाराष्ट्रात पुढारलेला तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील ८५,००० कुटुंबापैकी १५,५९४ कुटुंबे शासनाने जाहीर केलेल्या दारिद्रयारेषेखालील यादीमध्ये समाविष्ट आहेत. सन २००२ या सर्वे ही बाब समाजातील विसंगती दर्शविते. १९८५ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेकडून कला, क्रीडा, आरोग्य, साहित्य, संगीत, शिक्षण, विज्ञान व स्पर्धा क्षेत्रात सातत्याने काम सुरु आहे. राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी या संस्थेने दारिद्रयामध्ये जीवन जगणाऱ्या समाजातील सामान्य माणसास केंद्रबिंदु मानून त्यांचा अर्थिक, सामाजिक व शैक्षणिक राहणीमानाचा दर्जा उंचवण्यासाठी जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान सुरु केले.

अभियानाची उद्दिष्टये

१. ग्रामीण भागातील जनतेस प्रभावी सहजसाध्य गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करुन देणे.

२. ग्रामीण भागातील जनतेस सहजसाध्य परवडण्याजोगे कार्यक्षम उत्तरदायी आणि विश्वासार्ह प्राथमिक आरोग्यसेवा उपलब्ध करुन देणे.

३. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान आरोग्य क्षेत्राच्या माध्यमातून रुग्नवाहिकेतून मोठमोठया हॉस्पिटल रुग्नांना मोफत तर काही रुग्नांची ने–आण करणे.

४. हदयरोग, कर्करोग, दमा, किडणीविकार, मेंदूविकार, महिलांच्या शस्त्रक्रिया डोळयांच्या शस्त्रक्रिया अपंग व्यक्तींच्या शस्त्रक्रिया अनेक आजारांच्या रुग्नांची ने–आण करुन शासनाच्या विविध योजनांचा आधार घेवून मोफत तपासणी व औषधोपचार करुन सेवा देणे.

५. अभियान माध्यमातून आरोग्य, रक्तदाब, शिबीरे, रुग्नवाहिका सेवा, ॲनिमिया शिबीरे आरोग्यासाठी रोख मदत वाटप, अपंगासाठी श्रवणयंत्र वाटप, आरोग्यासाठी सेवा पुरविणे हा उद्देश आहे.

अभियानाचे स्वरुप व व्याप्ती –

जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान प्रस्तुत संशोधनाचे हे क्षेत्र पश्चिम महाराष्ट्रात असून सन २००६ ते २०२२ सालापर्यत केलेल्या कामाचे संशोधन केले जाणार आहे. सदरच्या अभिमानामधून आरोग्य क्षेत्रातील काम व गरजूंना शासकीय लाभ इत्यादी क्षेत्रात केलेल्या कामाचा अभ्यास केला जाणार आहे. सदर संशोधन हे विषय समाजशास्त्र याचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यासाठीच मर्यादित असेल. प्रस्तुत संशोधनातून समाविष्ट असणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. प्रस्तुत जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाच्या मदतीने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, राज्य व केंद्र शासनाच्या सर्व शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाचे आरोग्य क्षेत्रातील कार्य –

अभियानाच्या माध्यमातून उपजिल्हा रुग्णालय इस्लामपूर, मिशन हॉस्पिटल, मिरज, भारती, हॉस्पिटल, कल्लोळी हॉस्पिटल, आदित्य हॉस्पिटल, मेहता हॉस्पिटल, सिव्हिल हॉस्पिटल, सांगली सिध्दीविनायक कॅन्सर हॉस्पिटल, वॉन्लेस हॉस्पिटल, महात्मा गांधी कॅन्सर हॉस्पिटल मिरज, सहयाद्री हॉस्पिटल, कृष्णा चॅरिटेबल कराड, सि. पी. आर हॉस्पिटल, सिटी हॉस्पिटल, ॲपल हॉस्पिटल, आधार हॉस्पिटल, सनलाईफ हॉस्पिटल, कोल्हापूर के. एल्. ई. बेळगांव, बेल इअर हॉस्पिटल पाचगणी, जे. जे. हॉस्पिटल मुंबई, के. ई. एम्. फोर्टिज, रहेना सेवन हिल्स, कोकिलाबेन हॉस्पिटल, धिरुबाई अंबानी हॉस्पिटल, नायर हॉस्पिटल, महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल, बॉम्बे हॉस्पिटल, वाडिया हॉस्पिटल, हिंदूजा हॉस्पिटल मुंबई तसेच दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल पुणे या शहरातील हॉस्पिटलमध्ये व इतर काही ठिकाण ज्याच्या गरजेप्रमाणे दमा, मधुमेह, मुळव्याध, त्वचारोग, क्षयरोग, हृदयरोग, कर्करोग, महिलांचे गर्भाशयाचे आजार, अपेंडिक्स, हार्निया, डोळयांच्या शस्त्रक्रिया याशिवाय इतर रूग्णांवरही औषधोपचार व सेवा दिल्या जातात. आजअखेर ४९३५ रूग्णांना ८,८८,८८,५८०/– रूपयाची मदत मिळवून दिलेली असून सन २०१७–१८ या चालू आर्थिक वर्षात ४८६ रूग्णांना ७०,५०,१५०/– रूपयांची मदत मिळवून दिलेली आहे.

जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानाच्या माध्यमातून लोकउपयोगी कार्ये पार पाडली जावू लागलीत. जनसेवा हा उद्देश पार पाडला जावू लागला. सर्वसामान्य नागरिक विकासाचा केंद्र बिंदू बनलीत. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानामुळे गावात प्रत्येक गावात जाणीव जागृती काम हाती घेण्यात आले जयंत दारिद्रय निर्मूलन अभियानामुळे अनेक दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची भेट, संपर्क व त्यांच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्या दैनंदिन गरजा, त्यांना आपण काय मदत करू शकतो याबाबत प्रत्येक गावातून ९८ विभागीय संघटकांच्या माध्यमातून एका कुटुंबाला वर्षातून चार ते सहा गृहभेटी देण्यात आल्या आहेत. जनसेवा हाच उद्देश जयंत दारिद्रय निर्मुलनाचा आहे व सर्वसामान्य विकासाचा केंद्रबिंदू आहे.

रुग्णवाहिका सेवा – अभियानाकडे दोन रुग्णवाहिका असून या रुग्णवाहिकांतून सांगली, मिरज, कोल्हापूर बारामती, पाचगणी, बेळगाव इ. ठिकाणी रुग्णांची ने–आण केली जाते.

१)लाभार्थी संख्या – ४१४४ २) मोठी रुग्णवाहिका – २८४९ ३) लहान रुग्णवाहिका – १२९५

आरोग्य सहाय्य – अभियानामार्फत गंभीर आजारावर हृदयरोग, कॅन्सर, हार्निया, अपेंडीक्स, इ. शस्त्रक्रियेसाठी शासन दरबारी प्रस्ताव करून सहाय्य केले. जति आज अखेर ५९५६ रुग्णांना रू. २,३९,६५,५३०/– ची मदत केलेली आहे.

आरोग्य – लाभार्थी संख्या रूपये ३२,२८,८३० हृदयरोग शस्त्रक्रिया ४०१, कॅन्सर २२४, किडणी उपचार ९६, मेंदू विकार ९८, मणक्याचे उपचार ७१, अपेंडिक्स ९७, दिव्यांग व्यक्ती शस्त्रक्रिया १७९, मोती बिंदू शस्त्रक्रिया १६१३, हार्निया शस्त्रक्रिया

६७, महिलांच्या शस्त्रक्रिया २४३, अस्थि उपचार १२९, इतर तपासण्या व औषध उपचार २५४२, जननी सुरक्षा ४२७, इतर २१९.

निष्कर्ष –

सदर दारिद्रय निर्मुलन अभियानातील आरोग्य क्षेत्रातील कार्यामुळे पश्चिम महाराष्ट्रामधील आर्थिक दृष्टया दुर्बल असणाऱ्या जे घटक वंचित राहिले होते. त्यांना या अभियानामुळे आरोग्य सेवेचा लाभ मिळाला आजअखेर जवळपास १०५५० गरजू व्यक्तींना याचा लाभ मिळाला. त्यामुळे आजअखेर १०५५० व्यक्तींच्या सामाजिक स्तरामध्ये सुधारणा झाली.

उपाययोजना –

१. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियानापासून अजूनही वंचित राहिलेल्या गरजू व्यक्तीचा शोध घेवून लाभ देणे.
२. सध्या कोविड सारखे नवनविन आजार निर्माण होत आहेत. अशा रूग्णांना आरोग्य सोयी उपलब्ध करून देणे.
३. ग्रामीण भागातील स्त्रिया व मुली यांच्यामध्ये मासिक पाळीविषयी जे गैरसमज आहेत ते दूर करून त्यांचे मोठया स्तरावर प्रबोधन करणे. तसेच शाळा, कॉलेज याठिकाणी सॅनटरी पॅड व्हेडिंग मशीन बसवण्यासारख्या उपाययोजना करणे.
४. गरजु गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांना पोषण आहार विविध प्रकारच्या लसी आणि टॉनिकची औषधे विविध शासकीय, सामाजिक संस्था, खाजगी दानशूर व्यक्तींच्या मार्फत पुरविणे.

संदर्भ सूची –

१. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती व तत्रे – २०१५
२. इंटरनेट.
३. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियात राजारामनगर यांचा कार्यअहवाल १/४/२०२१ ते ३१/३/२०२२.
४. जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान लघु संशोधन प्रकल्प – प्रा. रमेश एच पाटील, २०१५.
५. राजारामबापू ज्ञान प्रबोधनी, इस्लामपूर संचलित जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान, राजारामनगर कार्यपुस्तिका २०१८, पान नं. ३, ६, १०.
६. राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी, इस्लामपूर संचलित जयंत दारिद्रय निर्मुलन अभियान राजारामनगर लाभार्थी अहवाल, सन २०२२–२०२३.
७. वेबसाईट - https://www.gkexams.com/ask/62206-Gramin-Aarogaya-Samasya
८. वेबसाईट - www.mr.vikaspedia.in

***

जागतिकीकरण आणि सामाजिक परिवर्तन

*डॉ.सुषमा अर्जुन जाधव

गोषवारा

''जागतिकीकरण ही सर्वव्यापी अशी व्यापक प्रक्रिया आहे. जागतिक संघर्ष किंवा कलहात मानवजातीची हानी होवू नये म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे वैश्विक पातळीवर मानव अस्तित्व व मानवी हितासाठी अनेक कायदे आणि करार केले जातात. तसेच सर्व जगभरातील समाजव्यवस्थांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा लाभ करून देण्याचा प्रयत्न ही प्रक्रिया करीत आहे. खऱ्या अर्थाने १९८० नंतरच्या सालानंतर अधिक वेगाने होणाऱ्या जागतिकीकरणच्या या संकल्पनेमुळे किंवा प्रक्रियेमुळे आज जगातील विविध राज्यांच्या सिमा संपुष्टात येवू लागल्या आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधकाने जागतिकीकरणामुळे समाजव्यवस्थेमध्ये जे सामाजिक परिवर्तन झाले याच्या अध्ययनाकरिता संशोधकाने जागतिकीकरण आणि सामाजिक परिवर्तन या विषयावर शोधनिबंध लिहिण्यात आला आहे.

सदरील शोधनिबंधाकरिता अभ्यासपध्दतीमध्ये अभ्यासाची उद्दिष्टये सांगत असताना जागतिकीकरण संकल्पनेचा सविस्तर अभ्यास करून त्यांचे सामाजिक परिवर्तनाचे अध्ययन करणे असे आहेत. तसेच अभ्यासपध्दतीमध्ये संशोधकाने वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आला असून, द्वितीय माहिती स्तोत्राचा अवलंब केला आहे. जागतिकीकरणावर सामाजिक जीवनावर परिणाम होऊन फार मोठया प्रमाणात सामाजिक परिवर्तन होत आहे. यामध्ये पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण होत असून वेशभूषा, केशभूषा, खाद्यपदार्थ, फॅशन्स, कुटुंबपध्दतीत बदल झाले. उद्योग–व्यापारात परिवर्तन झाले आहे. शेती क्षेत्र, आरोग्य सेवेत, लघु उद्योगांवर एकूण भारतीय समाजव्यवस्थेवर काही सकारात्मक व नकारात्मक परिणाम होऊन सामाजिक परिवर्तन झालेले दिसून येते.

सूचक शब्दावली : जागतिकीकरण, सामाजिक, परिवर्तन, संस्कृती इत्यादी.

प्रस्तावना :

मानवी समाजाचे परिवर्तन हे स्थायीभाव वैशिष्टये आहे. कोणताही समाज हा वर्षानुवर्षे आहे त्याच स्थितीत राहत नाही. परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. ज्याप्रमाणे नैसर्गिक परिस्थितीमध्ये सतत परिवर्तन होत असते, त्याचप्रमाणे मानवी समाजामध्ये देखील परिवर्तन होत असते. मानव हा स्वभावत:च एक गतिशील प्राणी आहे. त्यामुळे तो ज्या समाजात राहतो तो समाजही स्थिर स्वरूपाचा नसतो. समाजाचे रचनात्मक व कार्यात्मक स्वरूप नेहमी बदलत जात असते. म्हणजेच सामाजिक परिवर्तन ही एक अटळ प्रक्रिया आहे. या परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळेच मानवी समाजाच्या सामाजिक संरचनेत बदल घडून येत असतो. मानवाचे रितीरिवाज, आचार–विचार, संस्था, संघटना, जीवनपध्दती, भोवतालचा परिसर, व्यक्ती–व्यक्तीमधील वर्तन यामध्ये सातत्याचे परिवर्तन होत असते. या प्रक्रियेतूनच आजच्या मानवी समाजाचे रूपांतर आदिम अवस्थेपासून ते आधुनिक सांप्रत काळापर्यंत मानवी समाजाच्या सर्व अवस्थांमध्ये सतत परिवर्तन झाल्याचे दिसते. मॅकायव्हर यांच्या मते सामाजिक संबंधातील परिवर्तनाला सामाजिक परिवर्तन म्हणता येईल. तर अमेरिकन समाजशास्त्रज्ञ हॅरी जॉन्सन यांच्या मते मुलभूत अर्थाने समाजरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. या परिवर्तनामध्ये जैविक, सांस्कृतिक, आर्थिक, तांत्रिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांचा समावेश होता.

परंतु सर्वच समाजातील कोणताही बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन म्हणता येणार नाही. तर सामाजिक कृतींचे व आंतरक्रियांचे आकृतिबंध मुल्ये, सांस्कृतिक फलिते आणि प्रतीके या अविष्कारांसह होणाऱ्या बदलांना सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. थोडक्यात समाजाच्या विविध भागांच्या परस्पर संबंधाच्या स्वरूपात बदल झाला की, समाजरचनेत परिवर्तन घडून येते. पर्यायाने सामाजिक परिवर्तन घडून येते. समाजरचनेत होणारा बदल हा सहजासहजी होत नसतो. तर या बदलास परिवर्तनास अनेक घटक कारणीभूत असतात. या सामाजिक बदलास आणि परिवर्तनास विविध कारणे जबाबदार आहेत. या कारणांना प्रक्रिया म्हणून संबोधता येते.

सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये संस्कृतिकरण, औद्योगिकरण, पाश्चात्यिकरण, आधुनिकीकरण व वैश्विकीकरण वा जागतिकीकरणाचा समावेश होता. या प्रक्रियेत जबाबदार असणाऱ्या अनेक घटकांपैकी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झालेली ही एक महत्वपूर्ण प्रक्रिया म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेकडे पाहिले जाते. जागतिकीकरणाची संकल्पना ही अत्यंत व्यापक व सर्वव्यापी प्रक्रिया आहे. सदरील शोधनिबंधामध्ये संशोधकाने ''जागतिकीकरण आणि सामाजिक परिवर्तन'' या विषयाचे अध्ययन केले आहे.

अभ्यासपध्दती :

१. अभ्यासविषय वा संशोधनविषय –

जागतिकीकरणाच्या परिणामातून जे सामाजिक परिवर्तन घडून येते. त्या सामाजिक परिवर्तनाच्या अध्ययनाकरिता संशोधकाने, ''जागतिकीरण आणि सामाजिक परिवर्तन'' हा अभ्यास विषय निवडण्यात आला आहे.

२. अभ्यासविषयाची उद्दिष्टये –

''जागतिकीकरण आणि सामाजिक परिवर्तन'' या विषयाच्या अध्ययनाकरिता वा संशोधनाकरिता पुढील उद्दिष्टये समोर ठेवून संशोधन करण्यात येत आहे.

अ. जागतिकीकरणाच्या संकल्पनेचे सखोल अध्ययन करणे.

ब. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जे सामाजिक परिवर्तन घडून येते त्याचा अभ्यास करणे.

३. संशोधन आराखडा –

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता संशोधकाने वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात आला आहे.

४. तथ्य संकलन –

प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक माहिती वा तथ्य संकलित करण्याकरिता दुय्यम स्त्रोत साधनाचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध संदर्भग्रंथ, नियतकालिक, इंटरनेट, प्रकाशित–अप्रकाशित संदर्भ साहित्यांचा वापर करून तथ्य संकलन करण्यात आले आहे.

जागतिकीकरणाची संकल्पना :

जागतिकीकरण वा वैश्विकरणाच्या प्रक्रियेला १९८० च्या दशकात विशेष लोकप्रियता मिळाली आहे. ही प्रक्रिया उदारीकरण आणि खाजगीकरणाचा तार्किक परिणाम आहे. जागतिकीकरण ही संकल्पना खूप व्यापक, बहुआयामी आणि विवादित आहे. जागतिकीकरण ही एक संकल्पना किंवा प्रक्रिया असून यामध्ये वस्तू, सेवा, ज्ञान, विचार इत्यादींचा प्रसार जागतिक स्तरावर केला जातो. देशादेशांमध्ये वाढीस लागलेला व्यापार, वस्तू व सेवांना सहज उपलब्ध होणारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाजारपेठ आणि त्यातून जास्तीत जास्त होणारा नफा हे जागतिकीकरण या संकल्पनेत दिसून येते. जागतिकीकरणास आर्थिक पैलूबरोबरच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, पर्यावरणविषयक या सर्व पैलूंचादेखील समावेश होतो म्हणून जागतिकीकरण ही संकल्पना सर्वस्पर्शी आणि संकीर्ण प्रक्रिया आहे.

जागतिकीकरणाची संकल्पना जरी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजेच अलिकडच्या काळात चर्चेस आली असली तरी, १९०६ साली हाबहाऊसने असे मत व्यक्त केले होते की, ''मानवजात जलदगतीने एकात्म समाजात बांधली जात आहे.'' हाबहाऊसच्या या विवेचनातील ''मानवजात'' हा शब्द जागतिक लोकसख्येचा निर्देश करणारा आहे. भारतीय धर्मग्रंथातही या संकल्पनेच्या छटा दिसून येतात. वेद व उपनिषदामध्ये ''वसुर्धेव कुटुंबकम्'' म्हणजे वैश्विक कुटुंबाचा उल्लेख आढळतो. जागतिकीकरणाची संकल्पना अधिक स्पष्ट होण्याकरिता संशोधकाने काही व्याख्यांचे अध्ययन केले आहे.

१. वेबस्टरच्या शब्दकोशानुसार जागतिकीकरण म्हणजे – सामाजिक घटकांच्या व सामाजिक संबंधाच्या वैश्विक स्तरावरील वैशिष्टयपूर्ण आंतरक्रिया व आंतरसंबंधांना जागतिकीकरण असे म्हणतात.

२. मार्टिन अल्ब्रो यांच्या मतानुसार, ''विश्वाची लोकसंख्या एकात्म संबंधात बांधली जाणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.''

३. ॲथनी गिडन्स – यांच्या मते जागतिकीकरण म्हणजे ''दुरवरील स्थानीयतेला जोडणाऱ्या जगभरातील सामाजिक संबंधाच्या विस्तारीकरणाची अशी प्रक्रिया आहे की, ज्यातून कित्येक मैल अंतरावर घडणाऱ्या स्थानिक घटनांना आकार देण्याचा प्रयत्न असतो.''

उपरोक्त व्याख्यांच्या असे लक्षात येते की, जागतिकीकरण ही जगभरातील विविध समुदायांच्या आंतरक्रिया, सामाजिक संबंध व सांस्कृतिक संबंधाना एक धाग्यात गुंफणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू होण्याची काही सामाजिक पार्श्वभूमी जाणून घेणे आवश्यक वाटले.

जागतिकीकरणाचा इतिहास :

जागतिकीकरणाची सुरूवात ही मानवी संस्कृती सभ्यतेच्या उदयापासूनची आहे असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे. १९९० नंतर माहिती व तंत्रज्ञानाच्या ओघामुळे झालेल्या बदलाची परिणीतीदेखील मानले जाते. तर प्राचीन काळातील रस्त्यावर

होणारा रेशीम व्यापार, मध्ययुगातील मसाल्याचा वापर, पंधराव्या ते अठराव्या शतकातील शोधांमुळे स्पेन, पोर्तुगाल, डच, इंग्रज, फ्रेंच व इतर राष्ट्रांची व्यापारासाठी लागलेली चढाओढ हेदेखील जागतिकीकरणाचे प्राचीन व मध्ययुगीन टप्पे आहेत. तसेच एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर दक्षिण जगाचे झालेले वसाहतीकरण, तसेच १९८० च्या दशकात जगात तीन महत्वाचे बदल झाले. त्यामुळे जागतिकीकरणाचे जगात एक नवीन पर्वच सुरू झाले. यामधील पहिला बदल म्हणजे सोविएत युनियनच्या नेतृत्वाखालील देशाच्या गटाने अमेरिकेच्या गटापुढे शरणागती पत्करली. दुसरा बदल म्हणजे तिसऱ्या जगातील देशांच्या अर्थव्यवस्था रसातळाला जावून तिसऱ्या जगातील देशांपुढे आर्थिक संकट उभे राहिले, तिसरा बदल म्हणजे खुद्द विकसित देशांच्या अर्थव्यवस्था संकटग्रस्त झाल्या. त्यांच्यापुढे स्थायी स्वरूपाची मंदी निर्माण झाली. यातील महत्वाच्या बदलामुळे १९८० च्या दशकातील या महत्वपूर्ण घडामोडींनी जागतिकीकरणाची पार्श्वभूमी तयार केली.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारत २४ जुलै १९९१ साली तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली नवे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण आर्थिक धोरण स्विकारण्यात आले. त्याचदिवशी डॉ.मनमोहन सिंग यांनी पूर्णपणे नव्या दिशेने जाणारा अर्थसंकल्प भारतीय संसदेला सादर केला. या अर्थसंकल्पाने भारतीय अर्थव्यवस्था केवळ जागतिक बाजाराशीच जोडली गेली असे नाही, तर तिने आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाच्या मर्जीप्रमाणे स्वत:ची रूपे धारण करण्याचे मान्य केले. अर्थव्यवस्थेला राजकारणाने नियंत्रित करण्याऐवजी राजकारणालाच अर्थव्यवस्थेने नियंत्रित करण्याचा अमेरिकेने पाया घातलेल्या नव्या युगात भारतानेही प्रवेश केला. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या पूर्वाधात माहिती, तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सेवांचा उदय आणि पुढे जागतिक पातळीवर व्यापार खुला झाल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला.

ॲन्थनी गिडन्स यांच्या मते, जागतिकीकरणाचा जन्म हा आधुनिकीकरणाच्या धोरणातून झालेला आहे. तसेच गिडन्स म्हणतो त्याप्रमाणे, जागतिकीकरण म्हणजे जगभरात सामाजिक संबंधाचे संघटनीकरण घडून येणे होय. तसेच रोनाल्ड रॉबर्टन यांच्या मते, जागतिकीकरणाची प्रक्रिया केवळ भौतिक संरचनांशी संबंधित नसून ती एक संख्यात्मक प्रक्रिया आहे. म्हणून या प्रक्रियेचे अध्ययन आंतरविद्याशाखामध्ये केले जाते.

थोडक्यात जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक सिमांचे मोकळेपण होय. जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणीमान, शासन, समाजव्यवस्था व संस्कृती यासारख्या सर्व क्षेत्रातून होत राहणारे संक्रमण वा रेलचेल असे म्हणता येईल. १९८० सालानंतर अधिक वेगाने विकसित पावणाऱ्या संकल्पनेमुळे किंवा प्रक्रियेमुळे आज जगातील विविध राज्यांच्या सिमा संपुष्टात येवून हे 'विश्वच माझे घर' बनले आहे. मानवी कल्याणाबाबत राज्याचा एकाधिकार न राहता तो आता वैश्विक भाग बनला आहे. जागतिकीकरणातून उत्पादन, सेवा तसेच सांस्कृतिक क्षेत्रात संघर्षापेक्षा संतुलन प्रस्थापित केला जात आहे. लष्करी स्पर्धा करण्यापेक्षा जागतिक पर्यावरण संतुलन, प्रदुषण नियंत्रण, मानवी विकासात्मक कार्यक्रमास प्राधान्य देण्यात येत आहे. थोडक्यात जागतिकीकरण ही केवळ एक आर्थिक प्रक्रिया नसून ती समाजव्यवस्थेला प्रभावित करणारी प्रक्रिया आहे. जागतिकीकरणाची संकल्पनेच्या स्पष्टीकरणानुसार जागतिकीकरण प्रक्रियेच्या परिणामातून काही सकारात्मक आणि नकारात्मक सामाजिक परिवर्तन झाले.

जागतिकीकरण प्रक्रियेतून सकारात्मक–नकारात्मक सामाजिक परिवर्तन :

जागतिकीकरणास 'वैश्वीकरण' किंवा 'भूमंडलीकरण' या पर्यायी शब्दानेही ओळखले जाते. या प्रक्रियेच्या माध्यमातून राज्यातंर्गत अनेक पायाभूत बदल घडून आले. जागतिकीकरणाचे समाजावरील काही सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. जागतिकीकरणाचा सकारात्मक परिणामातून जे काही सामाजिक परिवर्तन झाले त्यामध्ये अविकसित आणि विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला गती प्राप्त होऊन विकसित देश आणि बहुराष्ट्रीय कंपन्या गरीब देशात मोठी भांडवली गुंतवणूक करीत आहेत. जागतिकीकरणाच्या धोरणातून दक्षिणपूर्व आशियाची देश आणि ब्राझीलसारख्या देशांनी विकसित संपादनास वाव मिळत आहे. तसेच उत्कृष्ठ संघटित मुक्त बाजारपेठांची निर्मिती होत आहे. विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्था सुधारण्याकरिता सुसंघटित आणि प्रभावी उत्पादन बाजारपेठ होणे ही अनिवार्य बाब आहे. या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेच्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे अशा बाजारपेठा सहज उपलब्ध होत आहेत. थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे फलित म्हणून प्रगतीशील स्पर्धात्मकता वाढली आहे. देशी बाजारपेठा केवळ मर्यादित स्थानिक मागणीनुसार उत्पादन केले जात होते. आज ती मर्यादा धुसर होवून वस्तू व सेवेचे उत्पादन करणाऱ्या सर्वच उत्पादकांना मुक्त होते. वस्तु बाजारात स्पर्धात्मकता वाढत

आहेत. आणि या स्पर्धेमध्ये टिकण्याकरिता प्रत्येकजण अधिकाधिक चांगले उत्पादन करून स्वत:ला सिध्द करण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. थोडक्यात स्पर्धात्मकता वाढल्यामुळे गुणवत्तेत वाढ आणि कार्यक्षमतेत वाढ होत आहे. ग्राहकांना आकर्षित करण्याकरिता एकाच वस्तुमध्ये सातत्याने नाविण्यात्मक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला जातो. ''बाजारपेठांचे जे स्थानिक आहे ते जागतिक आहे आणि जे जागतिक ते स्थानिक आहे'' या प्रक्रियेला रॉबर्टसन म्हणतात–विशिष्टतेने सार्वत्रिकीकरण आणि सार्वत्रिकतेचे विशिष्टीकरण या रूपाने ओळखले जात आहे. संपूर्ण जग हे जागतिक खेडे बनून आजघडीला ''विचार जागतिक आणि कृती राष्ट्रीय असाच नारा देत असल्याचे दिसते.

जागतिकीकरणामुळे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम होऊन सामाजिक परिवर्तन मोठया प्रमाणात दिसून येत आहे. कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्था, स्त्री–पुरूष संबंध, जाती, जनजाती, भाषा इत्यादीवर मोठया प्रमाणात प्रभाव पडला आहे. सांस्कृतिक वैचारिक आदान–प्रदान होत आहे. सामाजिक सहिष्णुता वाढ होऊन, धर्म, जात, वंश, लिंग या पलिकडे जाऊन व्यक्तीवादी दृष्टीकोनाची वाढ होत आहे.

जागतिकीकरणामुळे लहान मुले, तरूण वर्ग आणि वृध्दांचे जीवनमान प्रभावित झालेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या जीवनाचा सांस्कृतिक आकृतिबंध बदलला आहे. जागतिक संस्कृतीच्या नावाखाली पाश्चिमात्य संस्कृती जगावर लादली जात आहे. पाश्चात्य कपडे, केशभूषा, वेशभूषा, खानपान पध्दत, संगीत या सर्व बाबतीत परिवर्तन होऊन जागतिकीकरणातून नव्या नागरी उपभोगवादी समाजाची निर्मिती होत आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय सर्व सीमा खुल्या झाल्यामुळे लोकांच्या विचाराचे, संस्कृतीचे, अनुभव आणि जीवनशैली आदान– प्रदान होऊ लागले. जागतिक संघर्ष किंवा कलहात मानवजातीची हानी होऊ नये म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे वैश्विक वा जागतिक पातळीवर मानव अस्तित्व व मानव हितासाठी विविध कायदे आणि करार केले जाते.

राष्ट्र–राज्याच्या सीमा धुसर होऊन ''राष्ट्रांचे सार्वभौमत्व'' धोक्यात येत आहे. जागतिकीकरणामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचे एकीकरण झाले. जागतिकीकरणामुळे परस्परावलंबीत आणि एकात्मतेच्या दिशेने जग बदलण्याच्या उद्देशाने विविध धोरणाचा परिणाम समाजावर होत आहे. देशातील व्यापाराचे अडथळे दूर झाले. सेवाक्षेत्र, औद्योगिक उत्पादन वाढले, गुंतवणूकीमध्ये वाढ झाली. कुशल रोजगारात वाढ झाली. भारतीय नागरिकांच्या आर्थिक उत्पादनात वाढ झाली. परंतु लिंगभाव क्षेत्रीयता, सामाजिक, धार्मिक भेदभाव, कुपोषण, गरीबी, दारिद्रय, शेतकरी आत्महत्या, स्त्री–प्रश्न, लिंगभाव याचे प्रश्न अद्यापही सुटलेले नाहीत. तर त्या प्रश्नांच्या स्वरूपात बदल झालेला दिसून येतो. जागतिकीकरण या प्रक्रियेमुळे स्त्रियांच्या जगण्यावर थेट हल्ला झालेला दिसतो आहे. गरीब देशातील सृष्टीसौंदर्य आणि सुंदर स्त्रिया या श्रीमंत प्रवाशांच्या दृष्टीने अधिक आकर्षक, हौशीला बळी ठरत आहेत. हौशी प्रवासांच्या सुखसोयीचे व्यवस्थापन करणाऱ्या सरकारी आणि खाजगी संस्थांचा जसजसा विकास झाला तसतसा तिचे वेश्या व्यवसायही वाढला. वेश्या व्यवसायात स्त्रियांबरोबरच पुरूष वेश्याही निर्माण झाले. जागतिकीकरणामुळे काही चांगले बदल स्त्रियांसाठी झाले जसे की, कोरियासारख्या देशात मुली नोकऱ्या करू लागल्या. त्यामुळे त्यांच्या विवाहाच्या वयात वाढ होऊन बाळंतपणाची संख्या कमी झाली. भारतातील मध्यमवर्ग नोकरीच्या संधीच्या अपेक्षेमुळे आपल्या मुलींच्या शिक्षणावर पूर्वीपेक्षा अधिक गुंतवणूक करीत आहेत.

जागतिकीकरणामुळे जगभरात मोठमोठया शहरांची निर्मिती होऊन ठिकठिकाणी शहरे एकसारखी भासू लागली आहेत. कॉर्पोरेट संस्कृतीचा उदय होऊन तिने उत्पादन आणि स्पर्धा वाढविणाऱ्या मुल्यांना जन्म दिला. जागतिकीकरणामुळे धर्मसंस्था दुबळी होईल असे समजले जात होते. परंतु धर्मांध संघटना मजबूत होवून टोकाचा मुलतत्ववाद पसरवू लागला आहे. सध्या जातीव्यवस्था ही कमी न होता, जातीव्यवस्थेची पाळेमुळे घट्ट रूतून बसली आहेत. महिला सबलीकरणाची केवळ चर्चा केली जात आहे. परंतु स्त्रीत्वाचा साचा घट्टच होत गेला. विशिष्ट भाषा प्रभावशाली बनल्यामुळे जगभरातील बहुसंख्य इतर भाषा परिघाबाहेर फेकल्या गेल्या. धार्मिक, भाषिक, जातीय तेढ वाढून संघर्ष अधिकाधिक तीव्र होत आहे. प्रत्येक गोष्टीचे मुल्यात रूपांतर करू लागल्यामुळे मानवी संबंध, सामाजिक संबंधाचे, जीवनाचे वस्तुकरण होत आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि संवादाच्या जाळयामुळे ''मी–तू'' सारख्या लोकशाहीवादी चळवळी जगभर पोहोचल्या. जागतिक पातळीवर वैचारिक देवाण–घेवाण होऊ लागली. स्वातंत्र्य, समता, बंधुता यासारख्या लोकशाही मुल्यांचा प्रसार, प्रचार होवू लागला. परंतु त्याचबरोबर वाढलेले जागतिक दारिद्रय, गरीबी आणि असमानतेने जागतिक दहशतवादाला जन्म दिलेला दिसून येत आहे. मानवनिर्मित अनुबॉम्ब, संसर्गाचे रोग यामुळे पूर्ण विश्वाचे अस्तित्व धोक्यात येत आहे.

थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे विरोधाभागी जगाची निर्मिती झालेली दिसून येत आहे. जागतिकीकरणामुळे आज जग अशाप्रकारे जोडले गेले आहे की, जगाच्या एका भागात घडणाऱ्या घटनांचे परिणाम सर्व जगावर होत आहे.उदा. कोविड–१९.

जागतिकीकरणाचा शहरी मध्यम वर्गाला फायदा झालेला दिसून येतो. परंतु दलित, मुस्लिम, महिला, आदिम हे समुह वंचित राहिलेले दिसून येते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत देशातील राज्ये दोन स्तरामध्ये विभागली गेली ती म्हणजे विकसित आणि अविकसित, विकसित राज्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि केरळ तर अविकसित राज्यामध्ये ओरिसा, बिहार, उत्तरप्रदेश, आणि मध्यप्रदेश या राज्यांचा विकास खुंटला ही असमानता दिसून येते.

निष्कर्ष :

जागतिकीकरणाच्या ओघात सिमांतताही वाढीस लागली. यामध्ये, रोजगार, शिक्षणाचा अभाव, अज्ञान याचा समावेश होतो. नवीन तंत्रज्ञानाने कुशल–अकुशल वर्ग निर्माण झाले. तंत्रज्ञानाचा विकास झाला परंतु देशी उद्योगांना स्थानिक मारक ठरला आहे. अकुशल बेरोजगारीत वाढ झालेली दिसून येते. अलिकडील भारतीय समाजातील सामाजिक मुद्दे हे कमी–अधिक प्रमाणात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेशी जोडलेले आहे. यातून नवसमाज आकार घेत आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे समाजात आमुलाग्र असा बदल घडून आल्याने आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक, जातीय, भाषिक, पर्यावरण यावर परिणाम होऊन परिवर्तन या जागतिकीकरणाच्या प्रभावातून झालेले दिसून येते. काही नकारात्मक तर काही सकारात्मक परिणाम होवून सामाजिक परिवर्तन हे मोठया प्रमाणात होत आहे. जागतिकीकरणामुळे खाजगीकरण, उदारीकरणाला प्रोत्साहन मिळालेले दिसून येते. वरवर हवीहवीशी वाटणारी जागतिकीकरणाची प्रक्रिया ही विध्वंसतेकडे तरी नेत नाही ना असा भविष्यातील चिंतनाचा विषय ठरेल.

संदर्भ ग्रंथ :

1. Sociology Environmentalism Globalization, (1996) Reviventing the Globe Steven Yearly, Sage Publication.
१. राम आहुजा (२०२१), सामाजिक समस्याएँ, रावत पब्लिकेशन्स, जयपूर.
२. शिवबहाल सिंह (२०२०), विकास का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन्स, जयपूर.
३. उत्तम कांबळे (२०१०), जागतिकीकरणाची अरिष्ठे, कॉ.गोविंद पानसरे, अमृत महोत्सव समिती.
४. शरद गायकवाड, प्रा.गौतमीपूत्र कांबळे (२०१०), जागतिकीकरणाचा अवकाश आणि परिवर्तनाच्या चळवळी, दलितमित्र व्यंकाप्पा भोसले कार्य गौरव ग्रंथ.
५. जगन कराडे, (२००८) जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड प्रकाशन, पुणे.
६. रविंद्र वाघ, सुधाकर जाधव (२०१५) भारतीय समाज संरचना व बदल, प्रशांत पब्लिकेशन्स.
७. भागवत विष्णू (२००४), जागतिकीकरण नवीन गुलामगिरी, नागपूर.
८. इंटरनेट – माहितीस्त्रोत.

* प्रमुख, समाजशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर.

***

नोकरदार स्त्रिया : कार्य–कुटूंब संघर्ष आणि ताणतणाव

*डॉ.चैत्रा विक्रम राजाज्ञा

प्रस्तावना :

आधुनिक जगात जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानात सातत्याने होत असलेल्या बदलांमुळे कार्यजगताचे स्वरूप अधिकाधिक संकीर्ण बनत चालले आहे. कामाच्या वेळा कौटुंबिक जीवनावर आक्रमण करीत आहेत. दुहेरी करिअर असणाऱ्या जोडप्यांची संख्या वाढत चालली आहे. संयुक्त कुटुंबाची जागा आता विभक्त कुटूंब पध्दतीने घेतल्याने नोकरदार जोडप्यांना बालसंगोपनामध्ये अडचणी येत आहेत आणि अशा बदलत्या कौटुंबिक–सामाजिक–व्यावसायिक परिस्थितीत अनेक नवीन आव्हाने कर्मचाऱ्यांसमोर, विशेषत: नोकरदार स्त्रियांसमोर उभी ठाकली आहेत. कारण सध्या आपण २१ व्या युगात वावरत असूनही अपवाद वगळता स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान दर्जा अद्यापही मिळालेला नाही. जून, २०२२ मध्ये प्रसिध्द झालेल्या जागतिक बॅकेच्या अहवालानुसार, भारतीय महिलांच्या श्रमशक्तीचा सहभाग – आर्थिकदृष्ट्या सक्रिय असलेल्या १५ वर्षावरील लोकसंख्येचे प्रमाण – २००५ पासून सातत्याने घटत आहे आणि २०२१ मध्ये ते १९ टक्के इतके कमी आहे (The Print, 2023). याशिवाय नोकरी सोडून देण्याचे किंवा गमावण्याचे प्रमाणही स्त्रियांमध्ये अधिक दिसून येते. यामागील अनेक कारणांपैकी एक महत्त्वपूर्ण कारण आहे कार्य–कुटूंब संघर्ष. प्रस्तुत शोधनिबंधात नोकरदार स्त्रियांना सामोरे जावे लागणाऱ्या कार्य–कुटूंब संघर्ष या समस्येचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. कार्य–कुटूंब संघर्षाचे स्वरूप समजून घेणे.

२. कार्य–कुटूंब संघर्षाचे नोकरदार स्त्रियांवर होणारे परिणाम अभ्यासणे.

३. कार्य–कुटूंब संघर्ष कमी करण्याकरीता उपाययोजना सुचविणे.

संशोधनाचे महत्त्व :

कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे अनेक स्त्रियांना इच्छा आणि क्षमता असून देखील अर्थार्जनाची संधी मिळत नाही किंवा अपत्य जन्मानंतर नोकरी सोडून द्यावी लागते. यामुळे कार्य जगतात महिलांच्या श्रमशक्तीचा सहभाग हा अद्याप खूपच कमी आहे. हा सहभाग वाढविल्यास राष्ट्राच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादना (GDP) वर सकारात्मक परिणाम होऊ शकतो. याशिवाय स्त्रियांना अर्थार्जनाची संधी मिळणे आणि त्याकरीता सहकार्य मिळणे हे त्यांच्या मानसिक कल्याणाकरीता देखील आवश्यक आहे. म्हणूनच स्त्रियांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न सामाजिक, शासकीय, संघटनात्मक आणि कौटुंबिक पातळीवर होणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनामुळे नोकरदार स्त्रियांना नोकरी आणि घर अशी दुहेरी कसरत करीत असताना भेडसावणाऱ्या कार्य–कुटूंब संघर्ष या समस्येचे स्वरूप, कारणे आणि त्यावरील उपाययोजना समजून घेण्यास मदत होणार आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधाकरीता वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

संशोधन स्त्रोत :

प्रस्तुत शोधनिबंधाकरीता शोधनिबंध, पुस्तके आणि इंटरनेट या दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे.

आशय विश्लेषण :

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांना अनुसरून खालील प्रकारे आशय विश्लेषण करण्यात आलेले आहे.

कार्य–कुटूंब संघर्षाचे स्वरूप :

ग्रीनहॉस आणि ब्युटेल (१९८५) यांनी केलेल्या व्याख्येनुसार कार्य–कुटूंब संघर्ष हा भूमिकांतर्गत संघर्षाचा एक प्रकार असून ज्यामध्ये काम आणि कौटुंबिक क्षेत्रांमधील भूमिका काही बाबतीत परस्पर विसंगत असतात आणि यामुळे एक भूमिका पार पाडीत असताना दुसरी भूमिका पार पाडण्यात अडचणी उद्भवतात. म्हणजेच नोकरी किंवा कामाच्या ठिकाणच्या जबाबदाऱ्या आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांच्यातील समतोल जेव्हा बिघडतो तेव्हा कार्य–कुटूंब संघर्ष निर्माण होतो.

ग्रीनहॉस आणि ब्युटेल (१९८५) यांनी कार्य–कुटूंब संघर्षाचे तीन प्रकार स्पष्ट केले आहेत.

१. वेळ–आधरित : विविध भूमिकांमध्ये वेळेकरीता स्पर्धा निर्माण होणे.

२. एका भूमिकेच्या दबावामुळे दुसरी भूमिका निभावण्यात व्यत्यय निर्माण होणे.

३. वर्तनाधारित : दोन विभिन्न भूमिकांशी संलग्न वर्तन परस्परविरोधी असणे.

विवाहीत नोकरदार व्यक्ती ही एकाच वेळेस कर्मचारी, वैवाहिक जोडीदार आणि पालक अशा विविध भूमिका एकाच वेळेस निभावत असते. भूमिका संलग्न जबाबदाऱ्या पार पाडीत असताना व्यक्तीस प्रत्येक भूमिकेकरीता वेळ, ऊर्जा आणि अवधान खर्ची पाडावे लागते. Goode (१९६०) यांनी मांडलेल्या कमतरता गृहितकानुसार हे तिन्ही स्त्रोत मर्यादित असल्याने जेव्हा एका भूमिकेकरीता अधिक स्त्रोत खर्ची पडतात, तेव्हा दुसरी भूमिका निभावण्याकरीता पुरेसे स्त्रोत शिल्लक रहात नाहीत आणि यातून कार्य–कुटूंब संघर्ष निर्माण होऊ शकतो. याचबरोबर जितक्या अधिक भूमिका व्यक्तीस पार पाडाव्या लागतात, तितक्या प्रमाणात हे स्त्रोत घटतात. त्याचमुळे अविवाहीत नोकरदार महिलांच्या तुलनेत विवाहीत, अपत्य संख्या अधिक असणाऱ्या नोकरदार महिलांमध्ये कार्य–कुटूंब संघर्ष अधिक आढळतो (Sultana, 2012). नोकरी किंवा कामाशी संबंधित कामाचे वाढलेले तास, कामाच्या वेळापत्रकातील ताठरता, रात्रपाळी यासारख्या घटकांमुळे नोकरदार महिलांना कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्याकरीता पुरेसा वेळ मिळू शकत नाही. यातून शारीरिक आणि मानसिक थकवा, अपराधीपणाची भावना यांसारख्या शारीरिक आणि मानसिक त्रासांना महिलांना सामोरे जावे लागू शकते.

पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना कार्य–कुटूंब संघर्ष अनुभवास येण्याची शक्यता अधिक असते. कारण अधिकाधिक स्त्रिया अर्थार्जनासाठी बाहेर पडून कार्यक्षेत्रात प्रवेश करीत असल्या तरी अद्याप त्यांच्यावरील स्वयंपाक करणे किंवा बालसंगोपन यांसारख्या पारंपारिक कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा भार फारसा कमी झालेला नाही. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, अहमदाबाद यांनी केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, स्त्रियांचा घरकामात ७.२ तास इतका वेळ व्यतीत होतो, तर पुरूष केवळ २.८ तास घरकामात व्यतीत करतात. यात पुढे असेही दिसून आले आहे की, नोकरदार महिलांच्या तुलनेत पुरूष दररोज सुमारे १५० मिनिटे अधिक वेळ पगारी कामावर खर्च करतात (The Economic Times, 2023). ही सर्व आकडेवारी हे स्पष्ट करते की, स्त्रियांना कौटुंबिक जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्याकरीता अधिक वेळ द्यावा लागत असल्याने नोकरी किंवा पगारी कामाकरीता त्यांना कमी वेळ उपलब्ध होतो.

सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत मुलींवर घरकाम आणि बालसंगोपन ही स्त्रियांची जबाबदारी असल्याचे बिंबविले जाते. परिणामी, नोकरदार स्त्रिया नोकरी आणि घर अशा दोन्ही आघाड्यांवर स्वत:ला सिध्द करण्याचा प्रयत्न करीत असतात. यातून कार्य–कुटूंब संघर्ष वाढीस लागतो आणि ताण निर्माण होतो.

याशिवाय कार्य–कुटूंब संघर्ष निर्माण होण्यास अनेक घटक कारणीभूत ठरत असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, अब्राहम आणि इतर (२००७) यांनी आय.टी. क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांवर झालेल्या संशोधनाच्या घेतलेल्या आढाव्यात त्यांना असे दिसून आले की, ज्या क्षेत्रांमध्ये (उदाहरणार्थ, आय.टी. क्षेत्र, बांधकाम क्षेत्र) कामाचे तास अधिक आहेत, त्या क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांमध्ये कार्य–कुटूंब संघर्ष अधिक दिसून येतो. कारण त्यांना कौटुंबिक भूमिका पार पाडण्याकरीता कमी वेळ उपलब्ध होतो.

कार्य–कौटुंबिक संघर्षाचे संभाव्य परिणाम :

स्पिलओव्हर सिध्दांतानुसार कार्य (नोकरी किंवा व्यवसाय) आणि कुटूंब ही दोन्ही क्षेत्रे परस्परांना सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही रितीने प्रभावित करीत असतात. उदाहरणार्थ : व्यक्ती कौटुंबिक संघर्ष अनुभवत असेल तर तिला नोकरीच्या ठिकाणी कामावर लक्ष केंद्रित करणे कठीण जाऊन तिचे कार्य निष्पादन घसरते.

कार्य–कुटूंब संघर्षाचे परिणाम कर्मचाऱ्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य, कौटुंबिक स्वास्थ्य आणि कार्य–समाधान, कार्य–निष्पादन, बढतीच्या संधी यांसारख्या नोकरी किंवा कामाशी निगडीत घटकांवर होत असतात.

- **कार्य–कुटूंब संघर्ष आणि शारीरिक स्वास्थ्य :**

कार्य–कुटूंब संघर्ष अनुभवणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये उच्च उष्मांकाच्या पदार्थांचे अधिक सेवन, आरोग्यदायी पदार्थांचे कमी प्रमाणात सेवन, शारीरिक हालचालींचे घटलेले प्रमाण, वजनवाढ आणि लठ्ठपणा, बदललेल्या झोपेच्या सवयी यांसारख्या शारीरिक स्वास्थ्यास धोकादायक ठरू शकणाऱ्या समस्यांचे प्रमाण अधिक आढळते. (Lea-Sphie, B. et.al., 2019).

- **कार्य–कुटूंब संघर्ष आणि मानसिक स्वास्थ्य :**

श्रीवास्तव (२००७) यांनी महिला व्यवस्थापकांवर केलेल्या संशोधनात कुटुंबासाठी वेळेची अनुपलब्धता, मुलांचे गृहपाठ हे कार्य–कुटूंब संघर्षाचे स्त्रोत आणि कार्यक्लांती (Burnout), अपराधीपणाची भावना हे कार्य–कुटूंब संघर्षाचे परिणाम नोंदविले आहेत.

झोऊ आणि इतर (२०१८) यांनी चीन मधील ३५१ पूर्ण वेळ नोकरीत असणाऱ्या नोकरदार महिलांचा अभ्यास केला ज्यामध्ये त्यांना संवेदित कार्य–कुटूंब आणि कुटूंब– कार्य संघर्ष यांचा मानसिक आरोग्याशी ऋणात्मक सहसंबंध असल्याचे आढळून आले.

हॉबफॉल (१९८९) यांनी मांडलेल्या 'स्त्रोत संवर्धन' प्रारूपानुसार (Conversation of Resources-CoR Model), प्रत्येक व्यक्ती विविध स्त्रोत संकलित करण्याचा आणि त्यांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करीत असते. जेव्हा हे स्त्रोत गमावण्याचा धोका उत्पन्न होतो किंवा प्रत्यक्षात व्यक्ती हे स्त्रोत गमावते तेव्हा व्यक्ती ताण अनुभवते. व्यक्तीची स्थिती (उदा. वैवाहिक दर्जा किंवा नोकरीचा कालावधी), व्यक्तीगत गुण–वैशिष्ट्ये (उदा. स्व–आदर) आणि ऊर्जा (वेळ, पैसा आणि ज्ञान) हे काही महत्त्वाचे स्त्रोत आहेत. या प्रारूपाच्या आधारे कार्य–कुटूंब संघर्ष स्पष्ट करता येतो. उदा. जेव्हा व्यक्ती नोकरीच्या ठिकाणी भूमिका संघर्ष अनुभवते तेव्हा ती तिचे अधिकाधिक स्त्रोत त्या भूमिकेकरीता वापरते आणि त्यामुळे स्त्रोत गमावण्याचा धोका निर्माण होऊन व्यक्ती असमाधान, निराशा, चिंता, शारीरिक ताण यांसारखी नकारात्मक अवस्था अनुभवते.

- **कार्य–कुटूंब संघर्ष आणि नोकरीशी संबंधित घटक :**

साफ्रीझाल आणि इतर (२०२०) यांनी केलेल्या संशोधनात त्यांना असे आढळून आले की, कुटूंब– कार्य संघर्षामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या कार्यताणात वाढ होऊन कार्य–निष्पादनात घट होते. याशिवाय कार्य–कुटूंब संघर्षामुळे कामाप्रती असणारी निष्ठा यामध्ये घट होणे आणि अनुपस्थितीचे वाढलेले प्रमाण, कार्य–समाधानात घट होणे (Karatepe & Tekinkus, 2006) हे परिणाम दिसून येतात.

- **कार्य–कुटूंब संघर्ष आणि कुटुंबाशी संबंधित घटक :**

कौटुंबिक आणि वैवाहिक जीवनाविषयी असमाधान, अपराधीपणाची भावना हे कार्य–कुटूंब संघर्षाचे कौटुंबिक आणि वैवाहिक जीवनावर होणारे काही परिणाम आहेत (Judge et al., 2006).

अमीन आणि इतर (२०१७) यांनी इंडोनेशियामध्ये नर्सेसच्या केलेल्या सर्वेक्षणात त्यांना जोडीदाराचा आधार आणि करिअरमधील यश यांच्यात धनात्मक सहसंबंध असल्याचे आणि या दोन्ही चलांमधील सहसंबंधावर "कार्य–कुटूंब संघर्ष" हा चल परिणाम करीत असल्याचे आढळून आले आहे. भूमिका सिध्दांतानुसार विविध भूमिकांच्या मागण्यांची पूर्तता करण्याकरीता आवश्यक अशा वेळ, ऊर्जा आणि ज्ञान यांसारख्या स्त्रोतांची कमतरता कर्मचाऱ्यांना भासत असते. अशावेळेस जोडीदाराकडून मिळालेला सल्ला, मदत आणि समजून घेणे यामुळे कार्य–कुटूंब संघर्ष सोडविण्यात मदत होऊ शकते.

निष्कर्ष :

- कार्य–कुटूंब संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारा ताण याचा अनुभव नोकरदार पुरूषांच्या तुलनेत नोकरदार स्त्रियांना अधिक येतो.
- वेळ, ऊर्जा आणि अवधान यांच्या कमतरतेतून कार्य–कुटूंब संघर्ष निर्माण होतो.
- कार्य–कुटूंब संघर्षाचे विपरीत परिणाम नोकरदार स्त्रियांच्या व्यक्तिगत, कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवनावर होतात.
- कार्य–कुटूंब संघर्षाचा विपरीत परिणाम नोकरदार महिलांच्या करिअर विकासावर होतो.

उपाययोजना :

- संघटनांकडून कुटुंबस्नेही संघटनात्मक धोरणे राबविली जावीत. उदाहरणार्थ, कामाच्या तासांमधील लवचिकता, पाळणाघर उपलब्धता, घरून काम करण्यास परवानगी देणे, कामांचे तास कमी करणे, जेणेकरून स्त्रियांना अधिकाधिक फावला वेळ उपलब्ध होईल, ज्यामुळे कुटुंबास अधिक वेळ देणे शक्य होईल. गरोदरावस्था, कौटुंबिक जबाबदाऱ्या यांच्या आधारावर स्त्री–कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वेतन किंवा बढती इत्यादी संदर्भात भेदभाव केला जाणार नाही याची काळजी संघटनांनी घेणे आवश्यक आहे.
- सरकारने स्त्रियांना अनुकूल धोरणे अवलंबिणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ : प्रसुती रजा कालावधीत वाढ, महिलांसाठी कामाची जागा सुरक्षित आणि अधिक अनुकूल बनविणे.
- घरकाम आणि बालसंगोपन ही स्त्रियांची तर अर्थार्जन ही पुरूषांची प्राथमिक जबाबदारी आहे. या समाजाच्या दृष्टीकोनात बदल घडून येणे आवश्यक आहे. याकरीता शालेय वयापासूनच लिंगसमभाव रूजविण्याकरीता जाणीवपूर्वक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

- जोडीदाराकडून प्रेम, सहानुभूती, विश्वास आणि अडचणी समजून घेणे या स्वरूपात भावनिक आधार मिळाल्याने कार्य–कुटूंब संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारा ताण कमी होत असल्याचे संशोधनात स्पष्ट झालेले आहे. याशिवाय घरकाम आणि बालसंगोपन जबाबदाऱ्यांचे वाटप या स्वरूपात जोडीदाराकडून प्रत्यक्ष सहकार्य मिळणेदेखील आवश्यक आहे.
- पुरूषांनी घरकाम करणे हे कमीपणाचे आहे या मानसिकतेतून पुरूषांनी बाहेर पडून घरकाम ही स्त्री–पुरूष दोहोंची जबाबदारी आहे हे स्वीकारणे आवश्यक आहे.
- स्त्रियांना देखील घरकाम ही आपलीच जबाबदारी असून ती व्यवस्थित पार न पाडल्यास आपल्याला कुटुंबीय आणि समाज नांवे ठेवेल या विचारांच्या पगड्यातून बाहेर पडावे लागेल.

संदर्भ :

1. Allen, T.D. The Work-Family Role Interface: A Synthesis of the Research from Industrial and Organizational Psychology.
2. Goode, W.J. (1960). A Theory of Role Strain. *American Sociological Review, 25*, 483-496.
3. Greenhaus, J. & Beutell, N. (1985). Sources of conflict between work and family roles. *Academy of Management Review, 10*, 76 – 88.
4. Judge,T.A., Ilies,R., & Scott,T.A.(2006). Work-Family Conflict and Emotions: Effects at Work and at Home. *Personnel Psychology, 59*, 779-814.
5. Karatepe,O.M.,& Tekinkus,M. (2006). The Effects of Work-Family Conflict, Emotional Exhaustion, and Intrinsic Motivation on Job Outcomes of Front-line Employees. *International Journal of Bank Marketing, 24*(3), 173-193.
6. Kochumol, A., Win, M.J., & Thomas, J. (2017). A Review on Work Family Conflict of Women Employeesin IT Industries. *International Journal of Innovative Research in Computer and Communication Engineering*, 5(5), 87-93.
7. Lea-Sophie, Petra, R., & Thomas, L. (2019). Health-Related Consequences of Work-Family Conflict From a European Perspective: Results of a Scoping Review. *Frontiers in Public Health, 7*(189). DOI:10.3389/fpubh.2019.00189
8. Safrizal,H.B., Eliyana, A. & Febriyanti, K. L. (2020). The Effect of Double Role Conflict (Work Family Conflict) on Female Worker's Performance with Work Stress as Intervening Variable. *Systematic Reviews in Pharmacy, 11*(10), 418-428.
9. Srivastava, S. (2007). Women in Workforce: Work and Family Conflict. *Management and Labour Studies, 32* (4),411-421.
10. Sultana, A.M. (2012). A study on stress and work family conflict among married women in their families. *Advances in natural and applied sciences, 6*(8), 1319+. https://link.gale.com/apps/ doc/A324761100/ AONE?u=anon~70c96288&sid=googleScholar&xid=2baaf361
11. Zhou, S., Da, S., Guo, H. & Zhang, X. (2018). Work–Family Conflict and Mental Health Among Female Employees: A Sequential Mediation Model via Negative Affect and Perceived Stress. *Frontiers in Psychology, 9*:544. doi: 10.3389/fpsyg.2018.00544
12. The Print (2023). Retrieved from https://theprint.in/opinion/what-reports-on-indian-womens-falling-participation-in-labour-force-dont-tell-you/1311436/
13. Economic Times (2023). Retrieved from https://economictimes.indiatimes.com/news/india/women-spend-7-2-hours-on-unpaid-domestic-work-compared-to-2-8-hours-spent-by-men-iima-profs- research /articleshow/97837422.cms?utm_source=contentofinterest&utm_medium=text&utm_campaign=cppst

*सहाय्यक प्राध्यापक, न्यू कॉलेज, कोल्हापूर. मोबाईल नंबर : ७०६६९३७१२०. ई–मेल : cvrajadnya@gmail.com

***

जेंडर-डेंजर बॉक्स – एक समाजशास्त्र विशलेषण

*प्रा. डॉ. अक्षता अमितकुमार गावडे

प्रस्तावना:

स्त्री ही जन्माला येत नाही तर ती घडविली जाते – सिमोन बुवा

लिंग आणि लिंगभाव या दोन्ही संकल्पनेचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की 'लिंग जन्मजात तुम्हाला मिळालेली अर्पित दर्जा आहे आणि पूर्ण पणे जैविक संकल्पनेवर आधारलेली आहे. प्रजनन ही एकमेव अशी – जैविकक्षमता आहे. जी फक्त 'स्त्री' मध्येच आहे. या उलट 'लिंगभावांवर भेद घडवून आणण्यासाठी कारणीभूत घटक असतो तो समाज आणि समाजातील लोकामधील असलेली मानसीकता. जन्मापासून मृत्यू पर्यंत पुरुषानी कोणते कार्य करावे आणि त्याचे वर्तवणुक कसे असावे हे ठरविले समाजाने आणि पुरुषसत्ताक- कुटुंबपद्धतीने या गोष्टीला दुजोरा देत स्त्री ही कशी कमजोर आहे किबुहूना कशा पद्धतीने दुय्यम वागणूक मिळल, तिचे समाजातील स्थानमान कसे दुय्यम राहिल या गोष्टी कडे लक्ष दिले. तिलासमाजाच्या प्रवाहातून कश्या पधदतीने बाहेर फेकले जाईल याचा ही सांगडा तयार केला तो समाजानेच. म्हणुनच १सिमोन बुवा त्याच्या सेकंड सेक्स या पुस्तकात म्हणतात की स्त्री हि जन्माला येत नाही तर ती घडवीली जाते. आणि तीने केलेल हे भाष जीवनाच्या प्रत्येक पातळीवर खरे ठरते.

स्त्री ही कशी घडवीली जाते या वर अतिश्य मारमीक पणे विवेचन महेंद्र यांनी आपल्या 'जेंडर – डेंजर बांक्स या पुस्तकात केला आहे. आणि म्हणूनच या पुस्तकाचे समाजशास्त्रीय विश्लेषण करण्याचा छोटासा प्रयत्न संशोधकांनी आपल्या संशोधनपर निबंधा मध्ये केला आहे.

उद्दिष्ट्ये

1. लिंगभावाची संकल्पना जाणून घेणे.
2. लिगभावाच्या सैध्दातिक दृष्टीकोनाचा विविचेन करणे
3. धार्मिक दृष्टीकोनातून लिंगभाव असमानता समजून घेणे.
4. विषमतेकडुन समतेकडे जाण्याचा मार्ग अधोरेखित करणे.

संशोधन पध्दती : संशोधकानी वर्णनात्मक संशोधन आराखाडयाचा उपयोग केला आहे.

संशोधन स्त्रोत : संशोधकानी या संशोधन निबंधाचे लेखनकरीत असताना दुय्यम स्त्रोताचा वापर केला असून या साठी महेंद्र यांनी लिखित जेंडर- डेंजर बॉक्स' या पुस्तकाचा आणि इंटरनेट माध्यमांचा उपभोग केला आहे.

सैद्धांतिक दृष्टीकोन :

जेडर किंवा लिंगाभावाचे संबंध जैविकतेसी नसते तर ते सामाजिकते वर आधारलेले असते. काही समाजशास्त्रीय सिद्धांताच्या आधारा वर आपण लिंगभाव किवा जेंडरशी निगडीत दृष्टीकोन समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. सिद्धांत पुढील :

1) कार्यात्मक सिद्धांत
2) संघर्षात्मक सिद्धांत
3) प्रतिकात्मक सिद्धांत
4) स्त्रीवादात्मक सिद्धांत

1) कार्यात्मक सिद्धांत –

या सिद्धांता प्रमाणे जेडर किंवा लिंगावर अधारीत भूमिका आपल्या समाजाला बळकटी देण्यासाठी व समाज्याचे स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी कशापद्धतीने महत्वाचे असते या वर विविचेन केले आहे. समाज लोकांनी मिळूण बनलेला असतो आणि या साठी समाजाच्या प्रत्येक सदस्यानी आपली भूमिका व्यवस्थरित्या पार पाडली तरच समाजाचे संतुलन टिकून राहण्यास मदत होते. उदा. या सिद्धांता प्रमाणे स्त्री यांनी मुलांना जन्म देणे त्यांचे संगोपन करणे, घरतील कामे करणे आणि पुरुषानी त्यांच्या कुटूंबाच्या पालन पोषणाची जबाबदारी पेलणे आवश्यक समजले जाते म्हणूनच या दृष्टीकोना प्रमाणे स्त्री आणि पुरुषा आपली भूमिका व्यवस्थीत पणे पार पाडली तरच समाज्याची सुवस्था टिकून राहिल या वर लक्ष्यकेंद्रीत केलेले दिसून येते.

२) संघर्षत्मक सिद्धांत –

कार्ल मार्क्स प्रमाणे समाज हा संघर्ष निर्माण झाला आहे. येथे व्यक्ती आपली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करतो या सिद्धांता प्रमाणे समाज त्याच वेळी स्थीर राहील ज्या वेळी एक सामाजिक वर्ग दुसया सामाजिक वर्गावर सत्ता गाजवेल. उदा – कामगारांनी मालकाचे ऐकावे इ. फेडरिक ऐजल्सने या स्थितीला पुरुष व स्त्री यांच्या संबंधाशी, त्यानी पार पाडावयाच्या जबाबदारीशी जोडले आहे. त्यांच्या मते ज्या पद्धतीने मालक आणि कामगाराच्या वर्ग आहे. त्याच पध्दतीने स्त्री आणि पुरुषाचा वर्ग आहे. कारण स्त्रीया घरातील सर्व कामे करतात आणि त्याच्या मोबदल्यात त्याना कोणतेही वेतन दिले जात नाही आणि म्हणूनच त्या आपल्या गरजांच्या पुरततेसाठी पुरुषावर अवलंबून असतात. या सिद्धांतामध्ये स्त्रीला घरगुती कामगाराचा दर्जा दिलेला दिसतो समकालीन संघर्षात्मक सिध्दांताचे पुरस्कर्ते म्हणतात की ज्या वेळी स्त्री कमवती होईल.त्या वेळी ती कुटुंबामध्ये सत्ता मिळवू शकेल पण त्याची प्रचिती आता पर्यंत तरी आलेली आपल्याला दिसून येत नाही.

3) प्रतीकात्मक परस्पर संबधित सिद्धांत :

या सिद्धांताच्या पुरस्कर्यांच्या म्हणण्या प्रमाणे "व्यक्ती आपल्या अनुभवा वर आधारित विश्लेषण करीत असतो आणि याच विश्लेषणाच्या आधारा वर आपण क्रीया करतो. या सिध्दांता प्रमाणे ज्या वेळी एक व्यक्ती दुसया व्यक्ती सोबत आंतर क्रिया करते त्या वेळी आपल्याला त्याच्या वरर्तनामध्ये बदल जाणवते. या सिद्धांतामध्ये लिंगभावाशी जोडून असताना सांगितले गेले आहे की दोन कुटुंब आहेत. दोन्ही कंटुंबा मध्ये एक मुलगा आणि एक मुलगी असे आपत्य आहे. एका कुटुंबा मध्ये मुलगा- मुलगी भेद, त्यांच्या शिक्षण व आरोगा संबंधी कोणताही भेद केलेला दिसून येत नाही या उलट दुसऱ्या कुटुंबामध्ये विपरित परिस्थिती आढळून येते. ज्या वेळी ते दुसरे कुटुंब पहिल्या कुटुंबाशी अंतर क्रिया करते आणि मुलगा-मुलगी असा भेद न करता दोघाना समान पातळीवर वाढवल पहिजे हे जाणून घेते त्यावेळी त्याच्या मध्ये घडून येणाऱ्या आंतर क्रीयेतून पहिले कंटुब दुसऱ्या कुटुबा वर प्रभाव टाकते आणि दुसरे कुटुब पहिल्या कटुबाचे निरिक्षण केल्या नंतर नविन दृष्टिकोनाचा पुरस्कार करते आणि ते म्हणजे स्त्री-पुरुष दोघानाही समान पातळीवर वागणूक दिली पाहिजे

4) स्त्रीवादात्मक सिद्धांत :

या सिद्धांता मध्ये कशा पद्धतीने स्त्री- पुरुषा मध्ये भेद केला जातो आणि स्त्री यांनी कशा पद्धतीने आपल्या अधिकारासाठी आवाज उठविला पहिजे याचा दृष्टीक्षेप या सिद्धांता मध्ये टाकण्यात आला आहे.

1) उदारमतवादी स्त्रीवाद :

यांच्या मते आपण ज्या असमानतेला, मान्य करतो तो आपल्या परंपरेमुळे आलेला असतो आणि या गोष्टीला प्रतीउत्त्र देण्यासाठी प्रत्येकाना समानसंधी व अधिकार दिला पाहिजे.

2) सामाजिक स्त्रीवाद : या मध्ये भांडवलदारी समाजव्यवस्थेचा उहापोह करीत असताना स्त्री यांना चिपलेबर समजल गले आहे व त्यांना आपल्या घरात करण्यात येणाऱ्या कामासाठी कोणतेही मोबदला देण्यात येत नाही आणि म्हणून ती पुरुषावर अवलंबून राहते.

3) जहाल वादी स्त्रीवाद : या मध्ये पितृसत्ताक कुंटूब असल्यामुळे असमानते चा दर्जा दिला जातो. कारण निर्णय क्षमाता, सत्ता पुरूषाकडे असतात.

4) बहुवंशीय स्त्री वाद:

लिंगभाव,वश, वर्ग हे सर्व आंतरक्रियात्मक घटक असून त्यामुळे स्त्री – पुरुष वेगवेगळ्या वातावरणात वाढता म्हणून त्यांचे विचार देखील निश्चित होतात.

विशलेषण :

धार्मिकता आणि लिंगभाव असमानता:

महेंद्र यांनी आपल्या विवेचनाच्या सुरुवातीला काही सण समारंभ आणि त्या मधून निर्माण होणारे लिंग भाव विषमते वर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. **धूलिकोत्सव आणि लिंगभाव या विषयावर विवेचन करीत असताना ते म्हणतात की विवेक बुद्धीने विचार करताना कोणत्याही वाईट अगर विनाशकारी गोष्टीला उदाततेच लेबल लावून त्याचे समर्थन होत नसते.**

कोणत्याही सणसमारंभाचा ज्यावेळी आपण विचार करतो त्या वेळी एक गोष्ट आपल्या निदर्शनास येते की सर्व व्रतवैक्यल्य त्या साठी लागणारी तयारी सर्व स्त्रीयाच करीत असताना दिसतात. आणि काही सणउत्सव स्त्री शोषणाचे अधिक प्राधान्याने प्रदर्शन करीत असल्याचे निदर्शनास येते

होली आणि लिंगभाव असमानता:

होळी या सणाविषयी मांडणी करताना म्हणतात होळी सणात स्त्री यांच्या शोषणाचे उदात्तीकरण होत असताना दिसते. आणि पर्यावरणाच्या प्रदुषणा पेक्षाही विक्षमतेचे प्रदुषण सर्वाथाने होत असल्याची जाणिव आपल्याला होत असते. ते म्हणतात की होलीका हि देवी होती की सामान्य स्त्री होती, तिला कल्याणकारी की सुड बुध्दीने जाळली गेली या वर चर्चा करीत बसण्यापेक्षा ती एक स्त्री लिंगी व्यक्ती होती आणि तिला जाळणे योग्य असते काय? विवेकी बुध्दीने आपण विचार केल्यावर असे जाणवेल की तिला जाळूण कोणत्या उदातीकरणाचा पुरस्कार केला गेला? तिला एकदा जाळल्या नंतर पुन्हा पुन्हा जाळणे स्त्रीयांच्या लैगिंक अवयवशी संबधी शिवी स्त्रीया समोरच देणे आणि स्त्री यांनी देखील प्रता परपरेच्या नावा खाली या गोष्टीला समर्थन करणे म्हणजे क्लेष दायकच. या मागचे कारण म्हणजे काही ना यामध्ये विषमता असते हे ही माहित नसते आणि काही ना ते जाणून घेण्याची इच्छा असत नाही. लेखक पुढे जाऊन या गोष्टी निदर्शनास आणतात कि आपल्याला धर्म परंपराण विरोध करायचा नाही तर र्धमाचया नावा खाली होणाऱ्या स्त्री विटबंनेला तिलांजली द्यावयाचे आहे.

देवाभळीच्या निमित्ताने – बा विठ्ठल

पुरुषी व्यवस्थेतील स्त्री जो पर्यंत पुरुष आणि स्त्री कडे तटस्थ पणे पाहत नाही तो पर्यंत तिला पुरुषसत्ताकथेचे जोखड उमगत नाही उपरोक्त विषयावर भाष्य करताना लेखक म्हणतात की देव भाळी या नाटका मध्ये स्त्री च्या वेदनेवर, आक्रोशावर आणि तिला होणाऱ्या कोड मारायावर अतिशय मारमीक पणे विवेचन केले आहे. हे नाटक रुकमाई आणि तुकारामांच्या पत्नी आवढीच्या जीवनावर अधोरेखित केले आहे. लेखकाने या प्रकरणामध्ये स्वतः विठ्ठलाला काही प्रश्न विचारले आहेत. आवलीचे चित्रण, आतीशय भांडखोर, त्रासदयाक असे केले आहे. म्हणजे बाई पणाची लेबल त्याना चिकटवल गेले ज्यामधून देव पत्नी देखील सुटल्या नाही.

तुकाराम त्याना जाणिव पूर्वक त्रास देत होते ते म्हणणे चुकीचेच. पण ज्या वेळी सांसारिक पुरुष सांसारिक जबाबदारी पासून दूर राहतो आणि त्या कडे लक्षन देता. स्त्रीला गृहितधरतो म्हणजे – अनभीतज्ञपणे स्त्री चा केलेला हा छळच नव्हे का? आवलीची जी फरफट झाली तिला ज्या वेदना झाल्या त्या जाणण्यासाठी विठ्ठलानी रुक्मिणीला पाठविले. म्हणून लेखक विठ्ठलाला उद्देशून म्हणतात की तू रुक्मिणीला पाठवूलस म्हणजे एका स्त्री चे दुःख समजून घेण्यासाठी तू दुसया स्त्री ला पाठवलस पण तूकोबा म्हणजे पुरूष मात्र या वेदने पासून अनभिज्ञच राहिला. विठ्ठल एकटच उभा आहे यावर लोकांची अफाट श्रद्धा असते पण एकटी उभी असलेल्या रुक्मिणीचा कधीकुण विचार तरी केला आहे का? म्हणजे हि गोष्ट आपल्या दृष्टीकोनामधील फरक दर्शविते.

पुढे जाऊन लेखकखक म्हणतात की **पुरुषी व्यवस्थेतील स्त्री जो पर्यंत पुरुष आणि स्त्री कडे तटस्थ पणे पाहत नाहीत, जोपर्यंत तिला पुरुष सत्ताकतेचे जोखड उमंगत नाही तो पर्यंत तिला बाईपणाचे कर्तव्य आणि पुरुष पणाचे अधिकारच वाटतात.**लेखकानी अतिशय संवेदनशील प्रश्नाकडे वाचकाला वळवित असताना असे म्हटले आहे की जगाच्या कल्याणा निघालेल्या तुकारामान आवलीला स्त्री-पुरुष नात्यातील सहजीवनातील समतेचा विचार दिला होता का? स्वतः तुकारामांनी ते स्वीकारले होते का? आणि विठ्ठलालाहि ते मान्य होते का? नाही तर रुकमिणीला वेगळे काढले गेले नसते. ते म्हणातात की भलेही भक्तीचळवळीने सर्व जाती धर्म लिंगाच्या व्यक्तीना एक होण्याची हाक दिली. पण एक होण्याच्या प्रक्रियेतील अडचणी वरचे भाष्य राहूनच गेले असावे पुरुष ज्या वेळ पुरुषपणातून बाहेर पडतो त्या वेळी तो क्रांती घडावा असतो. ज्या पद्धतीने जोतीबा आणि सावित्रीने घडविली.

इतिहासातील अपूर्णता हा गुन्हा नसतो तर तो पुढच्या पिढीसाठी शिकवण असते. या मधून निदर्शनास येते की ज्या वेळी समानतेचा विचार येतो त्यावेळी आवली आलिप्त राहणार नाही की,रुक्मिणी वेगळी राहणार नाही. एका समानतेच्या पातळी वर त्याचे विवेचन होणे गरजचे आहे.

विषमतेची शुभ-अशुभता :

कुणीही व्यक्ती स्वभावाने, वर्तवणुकीने चांगली किंवा वाईट असू शकते पण त्यावरून तिच्या पावित्र्याची. निकष ठरत नाहित. या मुद्यावर विश्लेषण करताना लेखक म्हणतात की शुभ-अशुभ हे ठरवण्या मागे जेंडरचा रोल फार महत्वाचा असतो.

शुभ – अशुभच्या गोष्टी करत असताना पुरुषाला कधी अपशकुनी, काळया-तोंड्या, जिभे वर डाग असलेला असे म्हणून अशुभ मानत नाहीत. पण स्त्रीच्या बाबती मात्र अपशकुन शिक्का खूप वेळा मोर्तब झालेला दिसतो. पूर्वीच्या काळ

खंडाचा विचार केला तर लग्नाच्या वेळी स्त्रीचे पाय तपासले जायाचे. पायाचे तळवे सपाट आहेत की त्या मध्ये बाक आहे. हे पाहिले जायाचे ज्या स्त्रीचे पाय सपाट असायचे ती अपशकुनी किवा पाढयापायाची असे ग्रहीत धरले जायचे. प्रत्येकाचा पायाचा रंग पांढराच असतो ना? मग त्याचा संबंध कोणत्या अन्य व्यक्ताच्या बर-वाईटाशी का लावावा? असा सवाल लेखक करतात. मुलगी नाकी डोळी निटच हवी ती लक्ष्मी सारखीच दिसायला हवी म्हणजेच स्त्रीच्या शरिराचा तिच्या रंगाचे केलेले चित्रण हे विकृती करणा कडे घेऊन जाते हे नक्की.

सुवासिनी स्त्री ने कोणत्याही शुभ प्रसंगी समोरून जाने शुभ मानले जायचे. राजा महाराज त्यांच्या कडुन आरती करून घेत असताना आपल्या निदर्शनास येतात. पण याच्या दुसऱ्या पैलुचा विचार केल्यास ज्या विधवा स्त्रीया आहेत त्यानी तोड देखील दाखविणे अशुभमानले जाते. किती हा पक्षपात आणि स्त्रीयाची केलेली अवहेलना.

विधवा स्त्रीयांनी नटण, संजण, कोणत्याही शुभसमारंभाला जाणे त्याही हळदी कंकु सारख्या समारभ त्याच्यासाठी वर्जच. पुनर्विवाहाला बंधी, कुठे फिरायची नामुष्की म्हणजेच नवऱ्याचे मरण स्त्रीच्या आयुष्याचे शेवट असे म्हटले तर वावग ठरणार नाही. अलिकडेच कोल्हापूरच्या हेरवाड या ग्रामपंचायतीने एक मोठा व धाडसी निर्णय घेत स्त्रीयाच्या सौभाग्याचे लेणे असलेले बांगड्या, मंगळसूत्र, जोडवी हे काढण्यास (पती निधनानंतर) मनाई केली आणि गावातिल सर्वानी या निर्णयाचे स्वागतही केले आणि याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्र शासनाने एक जी.आर प्रसिद्ध करून हा निर्णय राज्य भर लागू केला.

मूल बाळ नसणेही स्त्रीयांसाठी शापच ठरते. मुल बाळ नसलेल्या स्त्रीच्या हाती बाळ द्यायला देखील घाबरणारे लोकांच्या प्रमाण काही कमी नाही तिला ओटी भरण्याच्या, बारशाच्या कार्यक्रमाला बोलविले जात नाही वाझुटी हा शिक्का तिच्या वर मोर्तब केला जातो.

मासिक पाळी ही अपर्वित्रच :

एक नवीन जीवाला जन्म घालण्याच्या प्रकियेला निगडित असलेल्या मासिक पाळीला ही अपर्वित्र या गटात समाविष्ट केले आहे. पाळीला विटाळ मानायचे आणि पाळीन येणाऱ्या स्त्रीला पणातून बाद ठरवायच असा परस्पर विरोधा भासी, खेळ तिच्या जगण्याशी सुरु असतो.

अखंड सौभाग्यवतीचा आशीर्वाद :

लेखक या मुधावर अतिशय मार्मिक पणे आपले मत व्यक्त करताना असे म्हणतात की स्त्रीने अखंड सौभाग्यवती राहणे म्हणजे तिच्या मृत्यु पर्यंत तिच्या नवऱ्याने जिवंत रहाणे होय. यात पुना: दिर्घाआयुष्याची मागणी कोणाची तर नवऱ्याची अखंड सौभाग्यवतीचे शब्द ऐकताना छान पवित्र असे वाटत पण त्याचा मतितार्थ पडताळून पाहिल्यास त्या वाक्या मधील लिंगभाव असमानता प्रतिल होते.

स्त्रीच्या आगमनावरूनही शुभ व अशुभ या गोष्टी ठरविल्या जातात. स्त्री नव्या घरात आली आणि काही अनुचित घडले तर तिलाच वाईट प्रसंगाला कारणी भूत घटक मानले जाते.

मंगळ :

लग्नात कुंडली जुळवताना त्यात मंगळ असेल तर मुलां पेक्षा त्याचा अधिक त्रास मुलीच्या वाट्याला येतो. मंगळ असलेल्या मुली बरोबर जर लग्न केले तर नवारा किंवा सासरा जाण्याची शक्यता आहे असे म्हणत तिच्याशी विवाह केला जात नाही. व्रत वैकल्य देखील नवरा व त्याचे कुटुंब या साठी केले जात असलेले दिसतात.

वरील सर्व बाबी लक्षात घेता या सर्व कारणामुळे फार मोठ्या सामाजिक विषमते कडे झालेली वाटचाल पाहवयास मिळते. माणसाल नाकारणे, त्यांच्या वर काही रोल लावून शोषण करणे, माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क काढून घेणे हे सर्व हिन दिशे कडे आपल्या समाज व्यवस्थेला घेऊन जाताना दिसतात.

विषमत्तेची व्रत नाकारण्याचे व्रत हवे:

स्त्रीला दिलेल देवत्व असेल की उदात्ती करण असेल यात तिच्या बंधनाची बीजे पेरलेली असतात. या बाबत विवेचन करताना लेखक स्पष्ट करतात की भारतीय संस्कृती मध्ये स्त्री ला महान, देवत्वा चा दर्जा दिला जातो तिच्या कष्टाचे, त्यागाचे गोडवे गायिले जाते पण वैचारिक पातळीवर त्याचा गहन अभ्यास केला तर हे लक्षात येईल की हे सर्व गोडवे एका अभासी जगतात आपल्याला घेऊन जातात. या ठिकाणी तिच्या कडून सस्कृती रक्षणाचा आग्रह असलो पण सुसंस्कृत पणा कुठे दिसत नाही. पूजा असेल पण सन्मान कुसुभरही आढळत नाही, उदात्तीकरण असेल पण समता नाही देवत्त्व असेल पण माणुस पणाचा समान दर्जा नाही

आपल्या भारतामध्ये अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्या साखरे केले जातात. इथेही हे सर्व करीत असताना आपल्याला स्त्रीच आढळते. आणि हे व्रत वैकल्ये ति स्वतःसाठी न करता आपल्या पतीसाठी मुलगा कुटुंब, भाऊ अशा अनेक नात्यांना आरोग्य, ऐश्वर्यासाठी, सुखासाठी करीत असताना दिसते.

या सर्व गोष्टींचा उहापोह केल्यानंतर असे लक्षात येते की पितृ सत्ताक व्यवस्थेने स्त्रीच्या शोषणाची, दुय्यमत्वाची पुरेपुर कशी व्यवस्था करून ठेवली हे कळत. यातील सर्वात मोठी चालाकी म्हणजे, या वृत्तांतुन स्त्रीलाच पध्दशीर पितृस्तेचे वाहक बनवले आहे. ते तिच्या लक्षातच येत नाही. व्रताला जोडून उपवास आलेच. उपवासाच्या दिवशीचे काम आणखी दुप्पट होते त्या सोबत त्या वृताला साजासे नटणे आले आणि कहर म्हणजे उपवासाला शास्त्रीय दृष्टीकोना तून विषलेशन करताना काही शिकलेल्या महिला दिसतात. – उपवास काही नाही फक्त एक दिवस पोटाला आराम म्हणत पोटाला मारताना दिसतात. हे जर खरे असेल तर उपवासाची संकल्पना पुरुषाना ही लागू झाली पाहिजे ना? उपवास करणे आरोग्यासाठी लाभदायक असेल तर तो स्त्रीच्या वैवाहिक स्थिती प्रमाणे कसा लागू पडतो हा ही प्रश्नच आहे. अशा या उपवासामुळे ॲनिमिया, हिमोग्लोबिनचे अल्पप्रमाण, बाल मृत्यु असे अनेक गंभीर आजाराने स्त्रीयाना आपल्या कुशीत समजावून घेतले दिसून येते.

वडाला फेऱ्या मारणे, होलीकेची पुजा करणे या सर्व गोष्टीना स्त्रीया विज्ञानाचे जोड देताना दिसतात. वडाच्या झाडाचे ऑक्सिजन थेअरी, अनवाणी चालायातले अक्युप्रेशर, पूजा साहित्यतील फळ, तुळशीची पूजा आणि शुद्ध ऑक्सिजन यावर भाष्य केल जात, उपवासामध्ये फळ खाल्या मुळे शरीर चांगले राहते यांची थेयरी मांडणे म्हणजे आणखिन मजेशीर वाटते. हे सर्व करीत असताना असे आढळून येते की स्त्रीयांना हे सगळ करायला आवडत. त्या आवढीने करतात पण काही ना हे सक्तीने लादले जाते त्याचे काय? आणि असे न करने म्हणजे कुंटुबा विषयी आदर नसणे, नवऱ्यावर प्रेम नसणे असा शिक्का मोर्तब केला जातो. आणि तिला तिच्या प्रमावर भावनांवर शंका उपस्थित झालेली मान्य नसते. मग येवढे सगळे विरोध अविशवासच्या वातावरणात घुटमळण्यापेक्षा उपवास केलेला काय वाईट? असा व्यावहारीक अर्थ लावला जातो.

उपवास करण्यामागेही एक प्रकारची दहशतच असते. जर समजा हि उपसावस नाही केला आणि काही नाही केला आणि काही अनुचित घडले तर ? म्हणून काहीना हि रिस्क नको असते जर बाळ होत नसेल तर अनेक उपवास सुचवल्या जातात आणि ते उपवास स्त्रीयानीच करायाचे असतात हे काही सांगायला नको. समाजात स्त्रीपण जर सिद्ध करायचे असेल, सुसंस्कृत म्हणून घ्यावयाचे असेल तर व्रतवैकल्य केलेच पाहिजे असा अट्टाहास सोबतीला असतोच. उच्चशिक्षित, उच्चपदावर असून ही संस्कृती कसे जपले आहे हे सन्मान घेण्यामध्ये काहींना विशेष आनंद असतो हे हि तितकेच खरे आहे.

वटपौणिमा नवऱ्याच्या दिर्घेआयुष्यासाठी केला जातो तर हरितालिकेचे व्रत चांगला जोडिदार मिळावा म्हणून. नागपंचमीच्या आदल्या दिवशी भावाचा उपवास केला ला जातो म्हणजे हे सर्व उपवास पुरुष केंदीत असलेले आपल्यालाच दिसुन येतात.

निष्कर्ष :

लेखकांच्या धार्मिकता आणि स्त्री विषमतेची पायमल्ली या वर विशलेशण करताना असे दिसुन येईल की धर्माचे कायदे, रितीरीवाज, कर्मकांड, धर्म संरक्षणाच्या कलाना हे सगळच स्त्रीचा स्वतंत्र माणुस म्हणून दर्ज नाकार असत स्त्रीने सुद्धा धर्म पालनाच्या नावाखाली या सर्व गोष्टीचा स्विकार केलेला असतो. कर्मकांडेही स्त्रीला निगडीत असतात, सतीसारख्या अमानुष प्रते पासून व्रतवैकल्य हे सर्व काही स्त्रीयांच्या जीवनाभवतीच फिरत असलेली आपल्याला दिसून येतात. स्त्रीच्या जन्मापासून मृत्युनंतर ही आणि शिक्षणा पासुन विवाहापर्यंत धर्माचा काही ना काही म्हणणे असतेच. आणि हि गोष्ट तिला सन्मानाने जगू देत नाही धर्माचे विश आपल्या देशात पसरलेले आपल्या दिसते आणि या गोष्टीला मोठया प्रमाणत युवा वर्ग सामील झालेला दिसतो. जात धर्माची युती लिंगभाव भेदाला मजबुत करते आणि यातुनच अमानुष विषयला जन्मान येते. अशा या व्रतवैकल्यातून स्त्री ने बाहेर पडासाठी पुरुषाने साथ देणे आवश्यक आहे. पुरूषाने तिच्या बरोबर असणे हा समतेच्या प्रवासासाठीचा विधाय पर्याय असतो.

संदर्भ सुची :

- महेद्र (2022), जेडर – डेंजर बॉक्स, राजयग्रह प्रकाशन, कोल्हापूर
- अमल्या अलवीरा (2021) प्रसपेक्टीवज ऑफ जेडर,
- युटूब : https://youtu.be/p_dhzQ7er3s

*समाजशास्त्र विभाग, नाइट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

***

ग्रामीण शेतकरी महिला कामगार समस्या आणि परिस्थिती अभ्यास

*मयुरेश तानाजी पाटील

प्रस्तावना :

स्त्री–पुरूष नात्याचा प्रभाव स्त्रियांच्या प्रत्येक टप्प्यावर दिसून येतो. अनेक वेळा स्त्रियांचे स्थान हे पुरूषाच्या बरोबरीने असलेले दिसून येत नाही. याला कारण ही तसेच आहे. ते म्हणजे जीवनमूल्ये, दृष्टिकोन, सामाजिक रितीरिवाज यामध्ये पुरूष प्रधान संस्कृतीकडे झुकते माप दिसून येते. याचबरोबर २०११ च्या जनगननेनुसार स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५४.१ इतके आहे हेच प्रमाण पुरूषांमध्ये ७६ टक्के आहे. या तुलनेमधूनच काही स्त्रीया नोकरी करतात मात्र काही प्रमाणात व त्याच्या कितीतरी पटीने महिला या शेती करतात. भारतीय समाज प्रामुख्याने कृषी प्रधान असला तरी तो सद्य:स्थितीत भांडवलशाहीकडे जाणाऱ्या मार्गावर संक्रमण करीत आहे. देशातील अर्थकारणावर बदल होत चालले आहे. त्याचा प्रभाव कृषी क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती अधिकच नाजूक व संवेदनशील होण्यावर पडला आहे.

याउलट संख्यात्मकदृष्टया सर्वाधिक रोजगाराचे भारतातील क्षेत्र म्हणजे कृषीक्षेत्र होय. या रोजगार उपलब्धतेच्या मार्गावर महिला शेतात असो वा इतर क्षेत्रात असो परंतु कामाचे ठिकाणी स्त्रीयांचा सहभाग आहेच. मात्र स्त्रियांना शेतीबाह्य क्षेत्रात उपलब्ध असणारे पर्याय खूप कमी आहेत. उद्योग व सेवा व्यवसायासाठी ज्या प्रकारच्या शिक्षणाची व कौशल्याची गरज आहे. त्या क्षेत्रात स्त्रीयांचा सहभाग हा कमी आहे. कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या ७१ टक्के महिला निरक्षर तर १८ टक्के महिला प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आहेत. हेच प्रमाण पुरूषाच्या बाबतीत बघायचे झाले तर अनुक्रमे ३९ टक्के व ३० टक्के एवढे आहे. याचे मूळ कारण साक्षरतेचा अभाव, घरातल्या जबाबदाऱ्या आणि कामाचा भार यांचा संबंध पितृसत्तेशीच जोडला जातो.

उद्दिष्टये :

१) ग्रामीण शेतकरी महिला कामगार आर्थिक सामाजिक समस्या अभ्यास.

२) ग्रामीण शेतकरी महिला कामगार कामाची परिस्थिती आणि समस्या अभ्यास.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. दुय्यम माहिती संकलनासाठी पुस्तके, वृत्तपत्र, इंटरनेट या साधनांचा वापर केला आहे.

कुटुंब प्रमुख महिला :

ज्या घरात महिला कुटुंब प्रमुख आहेत. त्या स्त्रीयांच्यावर कुटुंबाची आर्थिक जबाबदारी पडते व त्या पार पाडतात. स्त्रियांना एक प्रकारे वाढत्या साचलेपणाला व निष्क्रियतेला सामोरे जावे लागते. त्यांना त्यांची वाढ व्हावी यासाठी वाव राहत नाही असे दिसून येते. ज्यावेळी जनगणना आणि राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण करताना कुटुंब प्रमुख कोण? असे जेव्हा विचारण्यात येते त्यावेळी त्या कुटुंबाच्या प्रमुख असल्या तरी जेष्ठ पुरूषाचे नाव घेतले जाते. माहिती स्त्रोताच्या आधारावरून ३० पैकी कुटुंबे उपरोक्त गटात समाविष्ट होतात. कामाच्या विकल्पांचा अभाव, संसाधनांचा तुटवडा आणि त्यांना मिळणारे कनिष्ठ दर्जाचे काम यामुळे अशी कुटुंबे सर्वात गरीब असतात. कामाची स्थिती रोजगार आणि बेरोजगारीचे प्रमाण आणि लिंग भिन्नतेनुरूप रोजंदारीतील तफावत यापैकी काही होत.

महिलांच्या रोजगाराचे निकष:

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या निकषांनुसार कृषी क्षेत्रातील कामागारांचे स्थान, नियमित कामगार, स्वयंरोजगारी आणि रोजंदारी मजुर अशा तीन गटात विभागले जाते. नियमित कामगार गटात काम करणाऱ्यांना वेतन मिळते. व इतर लाभही मिळण्यास ते पात्र असतात. वार्षिक पगारवाढ, पगारी रजा, भविष्यनिर्वाह निधी व निवृत्ती वेतन असे लाभ मिळतात. या कामगार सर्वात सुरक्षित समजले जातात. या व्यतिरिक्त नैमित्तिक व गौण काम करणाऱ्या कामगारांना नियमित वेतन व मोबदला मिळत नाही व इतर लाभ नसतात. स्वत:चाच व्यवसाय सुरू करून कमाई करणारे स्वयंरोजगार या गटात येतात. दुसऱ्यांसाठी काम करत नसल्याने स्वत: जबाबदार असतात. शेतकरी व विनावेतन काम करणारे त्यांचे कुटुंबीय यांचा समावेश होतो. भारतातील कृषी क्षेत्रातील सर्वाधिक कामगार, स्वयंरोजगार गटातील असतात. मग ते पुरूष वा स्त्री असोत. यांच्या खालोखाल नैमित्तिक कामगार म्हणजेच रोजंदारी मजूर या वर्गातील आहेत. कृषी क्षेत्रात नियमित कामगारांचे त्यातही महिला वर्गाचे प्रमाण खूप कमी आहे म्हणजे अगदी तीन ते चार टक्के ऐवढे आहे.

भोगवटयाची जमिन व स्त्रिया :

एखादी व्यक्ती स्वत: इतरांच्या मदतीने कृषी उत्पादन घेण्याकरीता तांत्रिक व आर्थिक दृष्टीने सोयीचे जमिनीची एकक पूर्ण अथवा भाग वापरते अशा जमिनीस भोगवटयाची जमिन म्हणतात. मग ती जमीन मालकीची, भाडे तत्वावरील किंवा अधिक्षेपित असो त्या प्रत्यक्षात तांत्रिक व आर्थिक दृष्टीने एकक म्हणून मानली जाते.

स्वयंरोजगारातील महिला स्वयंराजगारात वाढ होणे व वाढत्या लहान व अल्पभूधारणेचे प्रतिबिंब आहे. जगातील निर्वाही शेतीत कुटुंबातील व्यक्तींचे खासकरून महिलांचे विनावेतन काम करणे प्रचलित झाले आहे. अविभक्त कुटुंब पध्दती व शेती यांचा ऱ्हास झाल्याने आणि विभक्त कुटुंबाची संख्या वाढल्याने स्वत:च्याच शेतात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली. एकूणच शेतीतील महिलांचे योगदान वाढले आहे. एकूण मजूरामध्ये भूमीहीन हा वर्ग खूप मोठा आहे व किरकोळ काम करणारे कामगार शेतीकाम करतात. अल्पभूधारक व किरकोळ म्हणजेच लहान शेतकऱ्याची शेती आर्थिकदृष्टया अडचणी निर्माण होत असल्याने कुटुंबाच्या मिळकतीला हातभार लावण्याच्या उद्देशाने अशा घरामधील व्यक्ती रोजंदारी मजूर कामे करू लागला. रोजंदारी मजूर वर्ग वाढत आहे. मजुरांचे प्रमाण घटत आहे. नैमित्तिक महिला मजुरांमधील घट तीव्र स्वरूपाची आहे. पुरूष बिगर कृषी क्षेत्रात काम शोधात व नागरी क्षेत्रात स्थलांतर ही करत स्त्रिया मात्र कौटुंबिक क्षेत्रात व्यवस्थापक व मदतशीस म्हणून कामे करतात. याचप्रमाणे स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांची नोंद घेतली जातेच असे नाही. कारण महिला जे काम करत ते घरातील कामाचाच एक विस्तारित भाग आहे असे स्वत: महिलांनाही वाटत असते. या व्यतिरिक्त रोजंदारीवरील नैमित्तिक मजूर मात्र प्रत्यक्ष दिसत असल्याने त्याची नोंद होते. प्रत्यक्षात मात्र स्वयंरोजगार गटातील महिलांचे प्रमाण प्रत्यक्षात अधिक असण्याची शक्यता आहे.

बेरोजगारीचे वाढते प्रमाण :

भारतातील ग्रामीण बेरोजगारीचे गुणधर्म लक्षात घेता नागरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण जास्त आढळत नाही. ग्रामीण भागातील बेरोजगारीचे मापन केल्यास ती फार कमी आहे. तुलनेने दैनंदिन सद्य:स्थितीनुसार बेरोजगारी बरीच जास्त आहे. म्हणजेच याचा अर्थ मधून अधून बरोजगारीचे प्रमाण हे वाढलेले दिसते. याचे कारण मोठया कामगार वर्गाला नियमित काम उपलब्ध नसते. २००४–०५ मधील चार प्रकारच्या निकषांनुसार पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक होते. १९९९–२००० या वर्षाशी तुलना केल्यास असे दिसते की नेहमीच्या स्थितीनुसार ग्रामीण व शहरी भागात पुरूषांमधील बेरोजगारीचे प्रमाण सारखेच आहे. महिलांमध्ये ही टक्केवारी दुपटीने वाढली.

बेरोजगारीबाबत सांगायचे झाले तर माध्यमिक शाळेतील शिक्षण व घेतलेल्यांच्या तुलनेत जास्त शिकलेल्या लोकांमध्ये अधिक बेरोजगारी आहे आणि शिक्षितांमध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांमध्ये बरीच बेरोजगारी अधिक प्रमाणात आहे. उच्च माध्यमिक शिक्षण किंवा अधिक शिक्षण घेतलेल्यांमध्ये लिंगाधिष्ठित विषमता खूप जास्त आढळते.

याप्रमाणे स्त्री पुरूषांनी बेरोजगार असल्याचे सांगितले. नैमित्तिक मजूर म्हणून शेतीत काम केलेले होते. परंतु शेतीत काम न राहिल्याने त्या ठिकाणी बेरोजगार झाले असे नमूद केले. याचाच अर्थ ग्रामीण भागात बिगरशेती क्षेत्रात शिक्षित स्त्रियांना फार कमी विकल्प उपलब्ध असतात. शिवाय पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचा रोजगार तात्पुरता, विखंडित आणि नैमित्तिक स्वरूपाचा असतो.

न्यून सेवा योजनस्थिती

कामाच्या तासामध्ये किंवा वेळ कामगारांना काम नसणे म्हणजे न्यून सेवा योजन स्थिती होय. दृष्य स्वरूपाचा न्यून सेवायोजन याचा अर्थ सर्वेक्षण काळात संदर्भित सप्राहात नेहमी काम मिळवू शकणाऱ्या लोकांपैकी जे लोक त्या काळात मात्र बेरोजगार होते अशाचे शेकडा प्रमाण असा आहे. न्यून सेवा योजनेची समस्या ही पुरूषांपेक्षा नेहमीच काम मिळवू शकणाऱ्या ग्रामीण महिलांमध्ये अधिक भयानक स्वरूपाचा आहे. २००४–२००५ मधील न्यून सेवायोजन गटात स्त्रियांचे देशाच्या ग्रामीण भागातील प्रमाण १७ टक्के तर नागरी भागात ९ टक्के इतके होते. सर्वेक्षण संदर्भित सप्राहात ज्या स्त्रियांनी 'काम नाही' असे सांगितले व स्पष्ट केले की, बहुतांश वेळा काम मिळते. बेरोजगार गटात समाविष्ट होत नाहीत.

स्त्रिया स्वत:ला काम नाही असे सांगतात आणि काम करणाऱ्या गटाच्या बाहेर पडतात. तेव्हा त्या स्त्रियांच्या एकूण कामाची जी दखल घ्यावी असे वाटत नसते यामधून त्याच्या न दिसणाऱ्या अदृश्य कामात भर घालत असतात. अदृश्य स्वरूपाचा न्यून सेवा योजन वय वर्षे १५ किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या लोकसंख्येपैकी नेहमी काम मिळवू शकणाऱ्या

लोकसंख्येमधील किती लोकांना नियमित काम मिळू शकले नाही याचे शेकडा गुणोत्तर होय. शेतीमधील अनेक स्त्रिया अदृश्य न्यून सेवा योजनात काम करतात असा निश्चित अर्थ होतो. मिळणारे काम खूप खालच्या दर्जाचे असते. ग्रामीण भागात शेतीक्षेत्रातील नैमित्तिक स्त्री मजुरांचे सर्वाधिक प्रमाण या अदृश्य स्वरूपाच्या न्यून सेवा योजनात आढळते. व या गटात पुरूष सहकारीही जवळपास तेवढयाच प्रमाणात आढळतात. वय वर्षे १५ पेक्षा अधिक वयाचे ११ टक्के पुरूष रोजचे काम करून जास्तीचे काम करण्यासाठी उपलब्ध होतात. या तुलनेत अतिरिक्त काम करावयास ७ टक्के स्त्रिया तयार होत्या. अतिरिक्त काम करावयास तयार असण्याचे मुख्य कारण, कुटुंबाच्या उत्पन्नाला हातभार लावण्यासाठी असे काम मिळवतात असे ५० टक्के अधिक स्त्री पुरूषांनी सांगितले. २६ टक्के स्त्रिया व २० टक्के पुरूष यांच्यामते, पुरेसे काम नसल्याने ते आणखी काम शोधतात. पर्यायी काम करण्यासाठी इच्छुक असणारे वा ते शोधणारे ग्रामीण पुरूष अधिक असून केवळ ६ टक्के स्त्रिया असे काम करावयास इच्छुक होत्या. ७० टक्के स्त्रिया व ६७ टक्के पुरूषांच्या मते, जे काम करत आहेत त्याचा त्यांना योग्य, पुरेसा मोबदला मिळाला नाही म्हणून ते कामात बदल करावयास तयार आहेत. अतिरिक्त काम करण्यास इच्छुक महिलांचे प्रमाण कमी असण्याची दोन स्पष्टीकरण आपल्याला समोर येते. यापैकी एक म्हणजे बाहेर अधिक काम करून पैसे मिळविण्यापेक्षा घरातील काम जास्त महत्वाचे आहे. या भावनामुळे ती कामे त्यांना योग्यवेळी करणे व योग्य वेळात करणे अगत्याचे असते. याउलट पुरूषांना वैकल्पिक काम अथवा अतिरिक्त काम मिळविण्यासाठी इकडे तिकडे फिरणे सहज शक्य असते. शिवाय लिंग भिन्नत्वामुळे रोजंदारीतील तफावत हे ही कारण आहे.

मजुरी व मजुरीतील भेद :

काही वेळा अनेक क्षेत्रात लिंगभिन्नतेनुसार कामाचा मोबदला वा मजुरी दिली जाते. शेतीतील स्त्री–पुरूषांच्या मजुरीतील फरक लक्षणीय आहे. १९८० मध्ये शेतात स्त्री व पुरूष प्रत्यक्ष कमाई वाढली. याचे कारण हरितक्रांतीमुळे मजुरांची उत्पादकता वाढली. म्हणून मजुरी वाढ झाली. पण १९८७–८८, १९९३–९४ या वर्षामध्ये व त्यानंतर १९९९–२००० या दरम्यान मजुरीचे दर कमी झाले. १९८३ पर्यंत देशात स्त्री व पुरूषांच्या मजुरीतील तफावत कमी झाली होती. पण १९८० च्या उत्तरार्धापासून १९९० च्या दशकात मजुरीतील तफावतीची दरी पुन्हा रुंदावली. कारण पुरूषांच्या कमाई बरोबरीने स्त्रियांची कमाई वाढली नाही ते त्यांची मजुरी कमी प्रमाणातच राहिली. लिंगभिन्नतेनुसार मजुरीतील तफावत एक पैलू म्हणजे स्त्री व पुरूष शेतमजुराची रोजंदारी आणि किमान रोजंदारी कायदा यांच्यामधील सहसंबंध होय. सरकार कष्टकऱ्यांना चरितार्थासाठी आवश्यक असणारी किमान रोजंदारी निश्चित करते म्हणून त्यापेक्षा कमी रोजंदारी देता येत नाही. मूलत: लिंगभिन्नतेनुसार रोजंदारीत फरक नाही. मध्यप्रदेश पश्चिम बंगाल ही राज्य सोडली तर उर्वरित राज्यामध्ये २००४ साली रोजंदारी कायद्यातील तरतुदीपेक्षा अधिक रोजंदारी शेतमजुरांना दिली जात होती. परंतु स्त्रिया मजुरांच्या बाबतीत अशी स्थिती नव्हती. केरळ, हिमाचल, आसाम, गुजरात राज्ये सोडून इतरत्र राज्यांमध्ये महिलांना किमान रोजंदारी कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी मजुरी दिली जात असे.

अर्थातच सर्व परिस्थितीमुळे स्त्रि कामगाराच्या सरासरी उत्पन्नात राज्यनिहाय बराच फरक आढळतो. पंजाब, केरळ राज्यांमध्ये मजुरीचे दर सर्वात जास्त आह. बिहार, महाराष्ट्र, ओरिसा, कर्नाटक, मध्यप्रदेशात मजुरी दर कमी आहे. तर हरियाणा, राजस्थान, गुजरात वरील दोन गटांच्या दरम्यानचे दर आहेत. लिंगभिन्नता रोजंदारीतील भेद सर्व प्रकारच्या शेती कामात आढळते. पुनर्रोपण व गवत काढणे, खुरपणे कामे स्त्रियांची समजली जात. महिला पैसे कमी दिले जातात. कारण जी कामे करतात ती फक्त स्त्रियासाठी नसतात. त्याच्या उत्पादकतेशी काही संबंध नसतो असा समज आहे. पंजाब कृषी विद्यापीठातील एक संशोधन असे सिध्द झाले की पुरूषापेक्षा महिलांची काम करण्याची कार्यक्षमता चौपट आहे. व पुरूषांच्या रोजंदारीच्या तुलनेत स्त्रियांना रोजंदारी कमी आहे. लिंगभावानुसार रोजंदारी असलेली आढळून येते. जोपर्यंत महिलांच्या कामाची दखल घेतली जात नाही तोपर्यंत महिलांच्या कामाचा मोबदला मिळणार नाही.

निष्कर्ष :

ग्रामीण भारतातील ५० टक्के पेक्षाही जास्त महिला रोजगारासाठी शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. रोजगार पुरूषांपेक्षा स्त्रियांच्या दृष्टीने हंगामी, विखंडीत आणि असुरक्षित अशा स्वरूपाचा आहे. स्त्रियांच्या स्वत:च्या शेतात व्यवस्थापन व मदतनीस म्हणून काम करतात तेव्हा विनामोबदला काम करत असतात. किंवा अल्प मोबदल्यात कमी अधिक रोजगारात उत्पादकतेशी संबंध नसण्याच्या स्थितीत त्या नैमित्तिक गौण कामासाठी मजूर म्हणून काम करतात. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण यांची नोंद घेत

नसला तरी महिला कष्टदायक, खालच्या दर्जाचे, वेळखाऊ काम करत असतात. कृषी बाह्य क्षेत्रात उद्योग व सेवा व्यवसायात काम करण्याची जागा, कामाचे स्वरूप चांगले असते. निम्न दर्जाचे शिक्षण, कौशल्याचा अभाव व प्रवास करण्याच्या मर्यादा यामुळे त्यांना फारसे पर्याय उपलब्ध होऊ शकत नाहीत. असे भाकित झाले की काही काळातच स्त्रियांपेक्षा पुरूषांनाच पुढे जाण्याच्या संधी प्राप्त होत राहणार आहेत. कारण शेती बाह्य क्षेत्रातील नोकऱ्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत येऊ घातल्या आहेत. काही प्रमाणावरील स्त्रिया उच्च माध्यमिक किंवा जास्त शिकल्या आहेत त्यांना सामाजिक, आर्थिक परिस्थितीमुळे निरक्षर आणि अशिक्षितांपेक्षाही कमी संधी उपलब्ध आहेत, असा विरोधाभास दिसून येतो. अशा या परिस्थितीची अधिक विस्ताराने कारणमिमांसाचा शोध घेणे गरजेचे आहे. शेती अलिकडच्या काळात महिलांनी सांभाळण्याचे क्षेत्र होत चालले आहे. आणि याचा शेतीविषयक धोरणावर महत्वाचा असा प्रभाव असणारा आहे. आतापर्यंतचे शेतीधोरण बऱ्याच अंशी लिंगभावाकडे डोळेझाक करणारे राहिले आहे. जेव्हा स्त्रियांवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक झाले तेव्हा दुय्यम प्रवर्गातील आहेत अस मानून त्यांच्यासाठी विशेष कार्यक्रम आखले जातात. अलिकडे लिंगभावात्मकतेला मुख्य प्रवाहात समाविष्ट केले पाहिजे याची जाणीव झाल्यान ध्येय धोरणातील मांडणीत दृगोचर होऊ लागले आहे. स्त्री संवेदनक्षमता समाविष्ट व्हावी यासाठी शेतीकामातील आवश्यकता व विविध कामे यांचे मापन करण्याच्या पध्दतीत सुधारणा होणे गरजेचे आहे. शेतीकामातील त्यांचा सहभाग व योगदान ठळकपणे समोर येऊ शकेल.

संदर्भ ग्रंथ :

१) भारताच्या शेतकरी महिला, लेखक – मैत्रेयी कृष्णराज अरूणा कंची, विजया साळुंखे, प्रकाशक नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया २०१३.

२) भारतातील कामगार चळवळ, लेखक–सुकोम सेन न्यू. एज प्रिटींग प्रेस, नागरी सेवा प्रबोधनी, डिसेंबर २०००.

३) भारतीय स्त्री जीवन, लेखक–डॉ.लीला पाटील, प्रकाशक अनिलकुमार मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४) ग्रामीण विकास, लेखक–विनायक चर्तुवेदी प्रकाशक बुक्स, जयपुर, २०११.

५) जनगणना २०११.

*संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

***

लिंग समानता आणि भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती

*डॉ. बळीराम पवार

प्रस्तावना :

प्राचीन भारतीय समाजाचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की प्राचीन काळामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा उंचावलेला म्हणजेच पुरुषासमान होता. अशी परिस्थिती वैदिक काळामध्ये स्त्रियांची होती. विवाहाचा जोडीदार निवडण्यास महिलांना त्या काळामध्ये स्वातंत्र्य होते. वैदिक काळात स्त्रियांचा दर्जा पुरुषापेक्षा उच्च मानला जात होता. त्या काळात अनेक देवदेवतांच्या अस्तित्व स्त्रियांमध्ये असल्याचे आढळले. मजेगीन काळामध्ये स्त्रियांच्या दर्जा व अधिकारावर बंधने आले प्रदान संस्कृती अस्तित्वात आल्यामुळे स्त्रियांच्या अधिकारांमध्ये कमतरता निर्माण झाली.

लिंग समानता : ज्या समाज व्यवस्थेमध्ये श्री आणि पुरुष यांच्यात लिंगभेदावरून शिक्षण आरोग्य धार्मिक आर्थिक कार्यात भेद केला जात नाही अशा समाज व्यवस्थेला लिंग समानता असे म्हणतात. ज्या समाजामध्ये लिंगाच्या आधारे स्त्री आणि पुरुष यांना समान सामाजिक दर्जा दिला जातो त्याच लिंग समाजाचे मानता येईल.

संशोधनाचा उद्देश:

1. **भारतीय समाजातील स्त्रियांची शेती अभ्यासणे**
2. **भारतीय समाजातील स्त्रियांची वैवाहिक व शैक्षणिक अभ्यासणे**
3. **भारतीय स्त्रियांचा समाजातील कौटुंबिक दर्जा अभ्यासने**

संशोधनाची गृहितके :

1. **भारतीय समाजातील स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारली आहे**
2. **भारतीय समाजातील स्त्रियांचा वैवाहिक व शैक्षणिक दर्जा सुधारला आहे**
3. **भारतीय समाजातील स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा उंचावलेला आहे**

उपनिषदातील स्त्रियांची स्थिती :

हिंदू धर्म ग्रंथातील चार वेद हे प्रसिद्ध धर्मग्रंथ म्हणून ओळखले जातात. या चार वेदांपैकी प्रत्येक वेद हा चार उपविभागामध्ये विभागला गेलेला आहे. त्यापैकी चौथ्या भागात उपनिषद आहेत, जे वेदांचे तात्विक अर्थ स्पष्ट करतात. बृहदारण्यक उपनिषद (यजुर्वेदाचा भाग) मध्ये विदेहाचा राजा जनक याने बोलावलेल्या तत्त्वज्ञानाच्या संमेलनाचे वर्णन केले आहे. प्रख्यात सहभागींपैकी एक, उपरोक्त गार्गी, विद्वान याज्ञवल्क्य यांच्यासमोर आत्म्याविषयी चिंता व्यक्त केली, ज्यामुळे तो गोंधळून गेला. याच उपनिषदातील आणखी एक उदाहरण याज्ञवल्क्यने मैत्रेयीला दिलेले आध्यात्मिक धडे संबंधित आहे.

महाभारतातील स्त्रियांची स्थिती:

महाभारत हे हिंदू धर्माचे महाकाव्य म्हणून ओळखले जाते. राजकुमार भीष्म पितामह यांनी महाभारतातील महाकाव्य इतिहासात असी टिप्पणी केली आहे, "शुद्ध ज्ञान देणारा शिक्षक 10 शिक्षकांपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहे." अशा दहा वास्तविक ज्ञान प्राध्यापकांपेक्षा वडील अधिक मौल्यवान आहेत आणि अशा दहा वडिलांपेक्षा आई अधिक मौल्यवान आहे. "आई ही सर्वात मोठी गुरू आहे." काही लोक द्रौपदीला पाच जोडीदार असणे हे तिच्या निम्न सामाजिक दर्जाचा पुरावा मानतात. उलटपक्षी, बहुपत्नीत्वाचा अर्थ त्याच्या पुरुष अभ्यासकांसाठी कमी दर्जाचा आहे का?

प्राचीन महिला आणि शिक्षण:

प्राचीन भारतीय साहित्यात स्त्रियांचा मोठा वाटा आहे. प्राचीन भारताच्या इतिहासात अनेक सुशिक्षित स्त्रिया होत्या. ब्रह्मवादिनी, किंवा स्त्रिया ज्यांनी कधीही लग्न केले नाही आणि आयुष्यभर वेद शिकले नाहीत आणि सद्योद्वाह, ज्यांनी लग्न होईपर्यंत वेदांचा अभ्यास केला, या दोन प्रकारच्या बौद्धिक स्त्रिया होत्या. वेद शिकणाऱ्या महिला विद्यार्थ्यांची पाणिनीने नोंद घेतली. कात्यानाने महिला शिक्षकांना उपाध्याय किंवा उपाध्यायी असे संबोधले. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये अनेक विद्वान स्त्रिया होऊन गेल्या आहेत.

राजकारणातील प्राचीन महिला :

प्राचीन भारताच्या इतिहासावरून असे लक्षात येते की त्या काळामध्ये अनेक स्त्रिया यांनी राजकारणामध्ये हिरेरीने पुरस्कार घेतलेला होता. राजकारणात महिलांनी परंपरेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मेगास्थेनिसने सरकार चालवणाऱ्या पांड्या महिलांचे वर्णन केले. "नयनिका" ने तिच्या लहान मुलाच्या वतीने सातवाहन राज्य नियंत्रित केले. चंद्रगुप्त II ची मुलगी प्रभावती हिने वाकाटक राजपुत्राच्या वतीने राज्य केले. कुलीन स्त्रियांना शिक्षण आणि इतर फायद्यांचा फायदा झाला, तर सामान्य स्त्रियांना अपमान, त्रास आणि अडथळयांचा सामना करावा लागला. म्हणजेच प्राचीन काळामध्ये राज घराण्यातील स्त्रियांना सन्मानाची वागणूक होती.

ब्रिटिश काळातील स्त्रियांची स्थिती:

ब्रिटिश राजवटीत म्हणजेच १८व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रिया इंग्रजांच्या संपर्कात आल्यावर भारतीय स्त्रियांची स्थिती अत्यंत खालच्या पातळीवर गेली होती. स्त्रियांना वैचारिकतेच्या दृष्टीने मूलभूतपणे कनिष्ठ प्रजाती म्हणून ओळखले जात होते, ज्यामध्ये स्त्रियांना कोणतेही महत्त्व आणि चांगला दर्जा नव्हता. त्यांना कठोर अशा सामाजिक गुलामगिरीत ठेवण्यात आले, त्यांना सर्व अधिकार नाकारण्यात आले आणि "मूलत: नैतिक तंतू नसणे" असे लेबल लावल्यामुळे त्यांचा छळ करण्यात आला.समाजातील काही स्त्रिया त्यांच्या सामाजिक गुलामगिरीवर मात करून महत्त्वाच्या पदावर पोहोचल्या. तोरू दत्ता, पहिली डॉक्टर आनंदीबाई जोशी, रमाबाई, स्वराणा कुमारी देवी आणि कामिनी रॉय यांचा त्यात समावेश होता. या प्रयत्नांना न जुमानता, स्त्रियांना पाश्चात्य शिक्षणासाठी प्रवेश नाकारण्यात आला. त्या काळात विधवा पुनर्विवाला मान्यता नसल्यामुळे सक्तीच्या विधवापणाची प्रथा आणि घटस्फोटावरील निर्बंधामुळे उच्चवर्गीय स्त्रियांना वैधव्यात जीवन जगावे लागले. सर्वसामान्य गरीब समाजातील स्त्रियांना देवदासी प्रथा जातींमध्ये लोकप्रिय होती. तथापि, काही उत्साहवर्धक सुरुवात झाली. युनिव्हर्सिटी कोर्सेस, विशेषत: वैद्यकशास्त्र, 1878 पासून भारतीय महिलांना आकर्षित करू लागले आणि 1888 पर्यंत, काही स्त्रिया नवीन ज्ञानाच्या शोधात समुद्र ओलांडून अमेरिकेत गेल्या. पहिल्या भारतीय महिलेने 1892 मध्ये इंग्लंडमध्ये नागरी कायद्याची पदवी प्राप्त केली. इंग्लंडमध्ये, 1920 मध्ये कायद्याचा अभ्यास करणाऱ्या महिलांवरील निर्बंध उठवण्यात आले. लंडन बारमध्ये बोलावलेल्या पहिल्या महिलांमध्ये एक भारतीय महिला होती. महात्मा गांधींच्या असहकार आंदोलनादरम्यान त्यांनी भारतातील महिलांना थेट आवाहन केले, त्यामुळे महिलांची विचारशक्ती जागृत झाली. भारतीय स्वातंत्र्याच्या ऐतिहासिक लढाईत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सामील झाल्या. म्हणजेच स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये महिलांचे ही मोलाचे योगदान आहे

स्वातंत्र्य लढाईत महिलांच्या सहभागाने त्यांना बांधलेले सामाजिक बंधनातून मुक्तता मिळाले . पुरुषांसोबतच्या लढाईत त्यांच्या समान सहभागामुळे जुन्या बुरसटलेल्या कल्पना नष्ट झाल्या. समाजात स्त्रियांकडे पाण्याच्या दृष्टिकोनात बदल झाला.

ब्रिटीश काळात स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस, स्त्री शिक्षणाबाबतच्या पूर्वकल्पना दूर करण्यात झपाट्याने प्रगती झाली. त्यामुळे अनेक महिला गट स्थापन झाले. श्रीमती ॲनी बेझंट यांनी 1917 मध्ये महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या प्राथमिक उद्दिष्टाने महिला भारतीय संघाची स्थापना केली. महिलांचे स्थान अधिक प्रभावीपणे वाढवण्यासाठी महिला पदवीधर गटांना एकत्र आणण्यासाठी फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी वुमनची स्थापना 1920 मध्ये करण्यात आली. प्रांतीय महिला परिषद आणि इतर महिला गट 1925 मध्ये राष्ट्रीय महिला परिषदेत विलीन करण्यात आले. 1926 मध्ये, अखिल भारतीय महिला शैक्षणिक आणि सामाजिक काँग्रेस प्रथमच झाली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने 26 जानेवारी 1931 रोजी भारतीय महिलांबाबत ऐतिहासिक ठराव मंजूर केला. स्वातंत्र्यानंतर, भारतीय महिलांनी राज्यपाल, मंत्रिमंडळ सदस्य आणि राजदूत म्हणून महिलांची स्थिती आणि उंचीची प्रगती दाखवून त्यांची छाप पाडली. महिलांना आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात समान वागणूक मिळावी

यासाठी भारत सरकारने अनेक पावले उचलली आहेत. त्यांना आता त्यांच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी आणि राष्ट्रीय कार्यक्रमांशी संबंधित असल्याची भावना निर्माण करण्याच्या अधिक संधी आहेत.

भारतातील महिलांची सद्यस्थिती:

आजच्या भारतात महिलांना समाजात मोठे स्थान आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी निम्मी महिला लोकसंख्या आहे. एखाद्या देशाला किंवा समूहाला सुसंस्कृत समजण्यासाठी महिलांचा आदर केला पाहिजे. भारतीय कायद्याच्या निर्मितीमध्ये महिलांशी भेदभाव केला गेला नाही. परिणामी आपल्या संस्कृतीत भारतीय स्त्रियांना मानाचे स्थान आहे. आज महिला उच्च पदावर आहेत जसे की I.A.S. आणि I.F.S. आपल्या सशस्त्र दलातही भारतीय महिला सेवा करतात. फुटबॉल, हॉकी, क्रिकेट, टेबल टेनिस, लॉन टेनिस आणि ऍथलेटिक्स हे खेळ आणि मनोरंजन हे आधुनिक भारतीय स्त्रिया स्पर्धा करतात. भारतातील महिला आज M.P., M.L.A., राज्यपाल आणि मंत्री अशी पदे भूषवतात. मदर तेरेसा, इंदिरा गांधी, विजयलक्ष्मी पंडित, एम.एस. सुभलक्ष्मी, लता मंगेशकर आणि आता भारताच्या अध्यक्षा प्रतिभा पाटील या सर्वांनी अलिकडच्या वर्षांत आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवली आहे. साहित्य, संगीत आणि अभिनयातही महिलांनी भरीव योगदान दिले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जगात महिलांचा मोठ्या प्रमाणावर प्रवेश होत आहे. प्रत्यक्षात, असे एकही क्षेत्र नाही ज्यामध्ये महिला अयोग्य किंवा अयोग्य आहेत. चला नाण्याची दुसरी बाजू पाहूया. भारतीय कायदा स्त्री-पुरुष असा भेदभाव करत नाही हे वास्तव असूनही, आज आपल्या समाजात स्त्रियांचे स्थान पुरुषांच्या बरोबरीचे आहे. आवश्यकतेनुसार हुंडा न दिल्याने पत्नीला जाळण्याचे प्रकार भारतभर सर्रास घडतात.

दरवर्षी अशा घटनांमध्ये वाढ होत असल्याचे वास्तव धक्कादायक आहे. हुंडा न दिल्यास आपल्या देशात नववधूंना जाळले जाते किंवा मारले जाते. भारतात जवळपास सर्वत्र महिलांची साक्षरता टक्केवारी पुरुषांपेक्षा कमी आहे. आजच्या भारतीय महिलांचा दर्जा उच्च असूनही, भारतातील महिलांच्या स्थितीची एकूण प्रतिमा असमाधानकारक आहे.

निष्कर्ष :

एका भारतीय महिलेचे पूर्वी चार प्रकारच्या भूमिका बजावत असे.. मुलगी, पत्नी, गृहिणी आणि आई म्हणून तिच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे होत्या. समाजातील महिलांचे स्थान आणि भूमिका, जी पूर्वी जवळजवळ स्थिर होती, आजच्या आधुनिक काळामध्ये स्त्रियांच्या दर्जामध्ये मोठा बदल झालेला आहे आज भारतीय स्त्री ही सर्व क्षेत्रांमध्ये पुरुषाच्या बरोबरीने काम करत आहे मुलापेक्षा मुलीला समाजामध्ये दर्जा उच्च प्रतीचा दिला जात आहे मुलगी हीच वंशाचा दिवा मानणारे बहुसंख्य कुटुंब समाजामध्ये आहेत. लक्षणीय बदल होत आहेत. सध्याच्या काळात, स्त्रिया महिलांच्या भूमिका-संचांसाठी पूर्वी अज्ञात क्षेत्र असलेल्या नवीन डोमेनमध्ये प्रवेश करत आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्रियाकलापांमध्ये सहभागी होणे अधिक सक्रिय होत आहे. सध्याच्या पिढीतील स्त्रियांनी, मागील पिढ्यांतील स्त्रियांपेक्षा सरासरी जास्त शालेय शिक्षण घेतले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातून महिला कुटुंब उदरनिर्वासाठी आर्थिक मदत करू लागले आआहेत

संदर्भ ग्रंथ :

1 Dube S.C.,Caste Dominance and Factionalism.' Contribution to Indian Socialogy, new series- 1967-68.

2 Dube, S.C.Contemporary India And Its Modernaistation, New Delhi, - 1974.

3 Ram Ahuja: Social problem in India, Rawat Publication, Jaipur - 2007

4 प्रज्ञा शर्मा : महिला व लैंगिक असमानता एक अपराध, अविष्कार पब्लिकेशन अँड डिस्ट्रीब्युटर्स ,जयपुर- 2006

5 डॉ. शुभांगी गोटे (गव्हाणे) महिला सबलीकरण स्वरूप आणि समस्या, वरद प्रकाशन, औरंगाबाद - 2004

*प्रमुख, समाजशास्त्र विभाग, महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव, ता.अहमदपुर जि.लातूर . महाराष्ट्र, ईमेल:
balirampawar76@gmail.com, Mobile Number : 9766637239

***

हळद कारखान्यातील महिला कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ–सांगली शहर

*डॉ.रूपाली विश्वनाथ सांभारे

प्रस्तावना:

सांगली शहराची ओळख जगाच्या नकाशावर हळदीची बाजारपेठ म्हणून आहे. सांगलीची हळद व सांगलीच्या हळद बाजार देशात प्रसिद्ध आहे. सांगली हे आशियामध्ये मोठे हळद व्यापारी केंद्र आहे. सांगली जिल्हा हळद उत्पादन व व्यापारासाठी प्रसिद्ध असला तरी सांगलीला हळदीचे शहर म्हणून ओळखले जाते. सांगली शहरात आशियातील हळदीचे सर्वात मोठे हळद मार्केट या ठिकाणी आहे. देशातील सर्वाधिक हळद आंध्र प्रदेशात जरी पिकवली जात असली तरी सांगली किंवा सांगली जिल्हा हे हळद पिकवणारे मुख्य केंद्र नसूनही संपूर्ण देशातील हळदीची उतारपेट व बाजारपेठ तयार झाली. येथील वायदा बाजारावर देशातील हळदीचे भाव ठरू लागले आहेत. शंभर वर्षाची परंपरा असलेल्या येथील हळद व्यापारामुळे सांगलीचे नाव देशात आणि परदेशातही प्रसिद्ध आहे. हळद साठवणुकीची नैसर्गिक पेवे असल्यामुळे सांगली शहरात देशातील एकमेव हळद एक्सचेंज केंद्र आहे. ही नैसर्गिक पेवे सांगलीवाडीत व हरिपूर मध्ये खुल्या शेतात आहेत.हीपेवे देशातील सर्वात असामान्य कृषी धान्य साठवणुकीची प्रणाली आहे.नैसर्गिक पेवे म्हणजे निसर्गाचा चमत्कार आहे कोणतेही कुलूप नसलेल्या या अजब कोठारामधील हळद दोन ते तीन वर्ष खणखणीत तर राहतेच मात्र तिचे वजनही वाढते व रंगही खुलतो हळद साठवणूक करण्याची ही परंपरा सुमारे २०० वर्षांपूर्वीची आहे. हळद साठवणुकीच्या या नैसर्गिक पेवा मुळे हळदीचा व्यापार सांगलीत वाढीस लागला. शेतकरी जी कच्ची हळद विकतो ती यामध्ये साठवले जाते. भारतातील ८० प्रतिशत हळद व्यापाराची जागा सांगलीने घेतलेली आहे. सांगली शहराच्या आजूबाजूला हळद साठवणुकीची असलेल्या नैसर्गिक पेवा मुळे व तेथील वातावरणामुळे येथे हळद व्यापार वाढला. या पेवांमध्ये हळद ठेवल्यास हळद किडतही नाही व रंगही सुधारत असल्यामुळे येथे हळद साठवणे साठी बाहेरील राज्यातून हळद येऊ लागली. हळद साठवणूकी बरोबरचयेथे हळद पावडर तयार करण्याचे कारखाने निर्माण झाले. या कारखान्यांमध्ये अनेक कामगारांना काम मिळू लागल्यामुळे साहजिकच सांगली जिल्ह्याच्या आजूबाजूला असलेल्या ग्रामीण दुष्काळी भागातील लोक शहराकडे कामासाठी आले.

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये असंघटित कामगारांच्या समस्या खूप गंभीर स्वरूपाच्या आहेत. देशातील जवळजवळ ९८ प्रतिशत कामगार हे असंघटित क्षेत्रात काम करीत आहेत. देशातील ६० प्रतिशत उत्पन्नाचा वाटा हा या असंघटित कामगार ने केलेला कष्टातून मिळतो. या असंघटित कामगारांपैकी हमाल माथाडी कामगार हा एक कष्टकरी वर्ग असलेला दिसतो. या हमाल माथाडी कामगारांच्या मध्ये माथाडी कामगार म्हणून सांगली शहरातील हळद कारखान्यात काम करीत असलेल्या महिला कामगार देखील काम करत असलेल्या आपल्याला दिसून येतात. या हमाल माथाडी कामगार कामगारांना १९६९ रोजी माथाडी कामगार कायदा लागू झाल्यामुळे त्यांचे प्रश्न काही प्रमाणात सुटले असले तरीही, माथाडी कामगारांना आजही वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. त्यांच्यासमोर अनेक प्रश्न समस्या म्हणून उभे आहेत. परंतु त्यातील काही प्रमुख समस्या अशा आहेत की, ज्यांचा थेट त्यांच्या जीवनावरती परिणाम होतो त्या ज्या समस्या आहेत त्यावर थोडासा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या संशोधनामार्फत या ठिकाणी केला गेला आहे.

उद्दिष्टे :

१.सांगली शहरातील हळद कारखान्यात काम करीत असलेल्या स्त्रियांचा सामाजिक आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२.सांगली शहरातील हळद कारखान्यात काम करीत असलेल्या माथाडी कामगार यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती: प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मकसंशोधन पद्धतीचा व निरीक्षणात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

सैद्धांतिक दृष्टिकोन:

सांगली शहरातील हळद कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांचा अभ्यास यासाठी लागू पडणारे सैद्धांतिक दृष्टिकोन:

प्रस्तुतच्या संशोधनाच्या अध्ययनासाठी आपल्याला या ठिकाणी कार्ल मार्क्सचा वर्ग संघर्ष सिद्धांत हा लागू पडत असलेला दिसून येतो. याचे कारण म्हणजे कार्ल मार्क्सने मांडलेल्या वर्ग संघर्षाच्या सिद्धांतात असे प्रतिपादन केले आहे की, समाजात नेहमी दोन वर्ग अस्तित्वात असतात त्यात एका वर्गाकडे सत्ता एकवटलेली असते तर दुसऱ्या वर्गाची मालकी फक्त श्रमावर असते यालाच लौकिक अर्थाने एक आहे आणि दुसऱ्या नाही रे असे म्हणतात. आणि या दोन्ही वर्गाचे हितसंबंध नेहमी परस्पर विरोधी असलेले दिसते. माथाडी कामगारांच्या बाबतीतही मालक वर्ग व कामगार वर्ग या दोन्ही वर्गामधील आर्थिक हितसंबंध हे परस्पर विरोधी असलेले दिसतात.

याचबरोबर कार्ल मार्क्सचा शोषणाचा सिद्धांत हा देखील या हळद कारखान्यात काम करीत असलेल्या महिला कामगारांना लागू पडतो कारण माथाडी कामगार कायद्यातील तरतुदीनुसार माथाडी कामगारांना दर दोन वर्षांनी जी पगारवाढ

मिळत असते ती महागाईच्या प्रमाणात दिली जावी अशी अपेक्षा असते पण कामगार संघटना आस्थापनाच्या मालकांना दोन महिने आधी करार संपत आल्याची नोटीस पाठवूनही महागाईचा विचार करून दरवाढ केली जात नाही. कराराचे नूतनीकरण करण्यास मालक वर्ग नेहमीच चाल ढकल करीत असलेला दिसून येतो.

संशोधन समस्या:

हळद कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांचा अभ्यास प्रामुख्याने त्यांच्या जीवनाच्या आणि कामाच्या शोषित स्थितीबाबत असून त्यांचे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व व्यावसायिक आयुष्य समजून घेण्याचा प्रयत्न या अभ्यासातून केला आहे. तसेच त्यांच्या प्रश्नावर समस्या सोडवण्याच्या दृष्टीने विचारांना आणि उपायांना दिशा मिळू शकेल या दृष्टीने काही सुधारणा करण्यासाठी उपाय शोधण्याचा प्रयत्न करण्यासाठी या संशोधन विषयाची निवड केली गेली आहे.

संशोधनाचे स्त्रोत:

प्रस्तुत शोधनिबंध लिहीण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून यामध्ये मुलाखत, प्रकाशित, अप्रकाशित साहित्य, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, संकेत स्थळे इत्यादी स्रोतांचा वापर करण्यात आला आहे. सांगलीमध्ये हळद पावडर तयार करण्याच्या ३८ कारखाने आहेत हे कारखाने मिरज एमआयडीसी, कुपवाड एमआयडीसी आणि दक्षिण शिवाजीनगर सांगली येथे आहेत यामध्ये जवळजवळ ९००महिला माथाडी कामगार काम करत आहेत या महिला कामगारांचा मुलाखतीच्या माध्यमातून माहिती घेण्यात आलेली आहे. कारण यातील बऱ्याचश्या महिला कामगार या अशिक्षित आहेत.

समान काम समान दाम:

समान काम समान दाम भारतीय संविधानात स्पष्ट तरतूद असूनही अंग मेहनती कष्टकरी क्षेत्रात काम करीत असलेल्या महिला कामगारांना पुरुष कामगारांपेक्षा दिले जाणारे वेतन समान मिळत नाही. महिला कामगार पुरुषांच्या तुलनेत कमी काम करतात असा सार्वत्रिक गैरसमज आहे. त्याचे निराकरण करून समान काम समान कामाची अंमलबजावणी या ठिकाणी करण्यात यावी. सांगली जिल्हा हमालपंचायतीची स्थापना करण्या अगोदर हमालांना कोणत्याही कायद्याचे संरक्षण नव्हते सुरुवातीला कामगारांच्यासाठी कोणत्याही प्रकारचा कायदा नसल्याने माथाडी कामगारांना पहाटे सहा वाजल्यापासून रात्री बारा वाजेपर्यंत काम करावे लागत असे. त्यामुळे या हळद कारखान्यांमध्ये काम करीत असलेल्या कामगारांना त्यांची परिस्थिती अत्यंत सोचणीय अशी होती. यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू होता परंतु संघटनेची मजबूतपकड नसल्याने याबाबत काहीच करता येत नव्हते. याच काळात तोलायतदारांनी संघटना स्थापन करून कामाची वेळ निश्चित करून घेतली. हमालांच्या संघटनेला जसजशी बळकट येऊ लागली तसतसे हमालींनीही आपली कामाची वेळ निश्चित करण्यात आली तरी देखील यासाठी हमालपंचायतीच्या प्रमुख हमालांना यासाठी रात्री फिरावे लागत होतेच.शासकीय यंत्रणेला हमालांच्या परिस्थितीची जाणीव करून देऊनही शासकीय यंत्रणेने काहीही हालचाल केली नाही.शासनाने माथाडी कामगार कायदा लागू केल्याचे जाहीर केले यामुळे सांगली जिल्ह्यातील हमालांना हा कायदा लागू होण्यासाठी प्रयत्न केला गेला. तरीही व्यापारी, बाजार समिती, स्थानिक पुढारी हमालांच्या वर दबाव टाकून निरनिराळ्या प्रकारे हमालांना त्रास देऊन संघटना फोडण्याचा प्रयत्न करीतच होते. तरीदेखील बहुसंख्य हमाल त्याची दखल न घेता संघटनेत सहभागी झाले. सांगली हमालपंचायतीने सतत संप, मोर्चा, मेळावे, घेराव अशा प्रकारे सतत आंदोलने सुरू ठेवून हमालांच्या व्यथा शासनापर्यंत पोहोचवल्या. या सर्वाच्या बारा–तेरा वर्षाच्या लढाच्या कालावधीनंतर सुरुवातीला सांगली व मिरज शहरासाठी १३ जुलै १९८४ पासून माथाडी कामगार कायदा लागू केल्याचे जाहीर केले व नोटिफिकेशनही काढले. १६ जुलै १९८४ पासून माथाडी कामगार कायदा लागू केल्याचे जाहीर केले. परंतु शासकीय यंत्रणा स्थानिक राजकारणाला व व्यापाऱ्यांना बळी पडत असल्यामुळे प्रत्यक्ष कायद्याला सुरुवात झाली नव्हती. त्यामुळे परत संप, मोर्चा, मेळावे, घेराव या माध्यमातून लढा चालू ठेवला व दोन ऑक्टोबर १९८६ पासून माथाडी कायद्याला प्रत्यक्ष सुरुवात झाली. दोन अडीच वर्ष कायद्याच्या अंलबजावणीसाठी सतत लढाई चालू ठेवावी लागली होती. सुरुवातीस फक्त सांगली व मिरज शहरापुरताच माथाडी कायदा लागू झाला होता त्यामध्येही हळद विभागास वगळण्यात आले होते. त्यामुळे हळद विभागातील, गिरण्या मधील, तसेच पेव भरणारे व पेव काढणारे व महिला कामगारांना या कायद्यातून वगळण्यात आले होते. हमाल पंचायतीने पुन्हा संघर्ष करून संपूर्ण सांगली जिल्ह्यासाठी व सर्वच क्षेत्रातील हमालांना हा माथाडी कामगार कायदा लागू व्हावा यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे १८ जून १९९२ पासून माथाडी कामगार कायदा सांगली जिल्ह्यातील सर्व कामगारांना लागू झाला. परंतु हळद गिरण्यामध्ये काम करीत असलेल्या महिला कामगारांना हा कायदा लागू होत नाही अशी भूमिका व्यापाऱ्यांनी घेतल्यामुळे हमाल पंचायतीने या महिला कामगारांना घेऊन परत त्यांच्यासाठी लढा दिला. महिलांनीही हमालपंचायतीच्या मदतीने सतत पाच वर्ष संघर्ष करून सत्य, जेलभरो असे आंदोलन केल्यानंतर हळद कारखान्यात काम करत असलेल्या महिलांच्यासाठी ही माथाडी कायदा लागू करून घेण्याबाबत सांगली जिल्हा हमालपंचायतीला संपूर्ण यश आले.

प्रमुख निष्कर्ष:

१. **पुरुष माथाडीकामगारप्रमाण जास्त** : सांगली तील माथाडी कामगारांमध्ये बहुतांशी ७८ प्रतिशत कामगार हे पुरुष आहेत कारण ओझे उचलण्याचे काम व कष्टाचे काम शारीरिक दृष्ट्या स्त्रियांना शक्य होत नसल्यामुळे महिला माथाडी कामगारांची संख्या ही पुरुष माथाडी कामगारांच्या तुलनेने कमी असलेली दिसते.

२. **जात व जातीचा प्रवर्ग** : माथाडी कामगारांमध्ये बहुतांशी एनटी प्रवर्गाचे प्रमाण हे जास्त असलेले दिसून येते.

३. **शैक्षणिक स्थिती** : माथाडी कामगारांच्या मध्ये शैक्षणिक स्थितीचा अभ्यास केला असता ६८ प्रतिशत माथाडी कामगार शिक्षित असलेले दिसून येतात.

४. **कामाच्या ठिकाणाचा आरोग्यावर होणारा परिणाम:** काम करत असलेल्या ठिकाणच्या अस्वच्छता आणि असुरक्षित वातावरणामुळे त्यांना शश्वनासंबंधीत व सांधेदुखी यासारखे विविध आजार होतात आणि या आजाराकडे, आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे पुढे त्यांच्या आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होतात.

५. **कामाच्या ठिकाणाची दोषपूर्ण स्थिती** :काही कामगारांना तर व्यावसायिक आजारांनाही बळी पडावे लागते आहे. हे कामगार सुरुवातीला धडधाकट असतात परंतु सतत ओझे उचलावे लागत असल्यामुळे तसेचशिवाय प्रकाश व्यवस्था ही पुरेशी नसते. ऊन, वारा, पाऊस अशा परिस्थितीतही कामगार सतत काम करत असतो. या सर्वाचा परिणाम कामगारांच्या शारीरिक आरोग्यावर होतो.

६. **कामाच्या ठिकाणाचीपरिस्थिती:**हळद कारखान्यात काम करीत असलेल्या स्त्रियांसाठी पाळणाघराची सोय करण्यात यावी की जेणेकरून, त्यांचे कामात लक्ष लागेल. व त्या विना काळजी आपले काम करू शकतील..

७. **अपुरे वेतन:** माथाडी कामगारांना मिळत असलेले वेतन हे मुळात कमी असते त्यामुळेकामगारांच्या उत्पन्नातून कुटुंबाच्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत त्यामुळे अनेक समस्यांना या कामगारांना तोंड द्यावे लागते.

८. **घराची समस्या:**हळद कारखान्यात काम करणाऱ्या महिला माथाडी कामगारांच्या समस्या घराची समस्या, बऱ्याच महिला या दुष्काळी भागातून सांगलीमध्ये स्थलांतरित होऊन आल्यामुळे त्यांना राहण्यासस्वत:चे घर नाही आहे. बऱ्याच महिला कामगार या झोपडपट्टीमध्ये किंवा भाड्याच्या घरामध्ये राहत असलेल्या दिसून येतात.

९. **कर्जाची समस्या:** महिला कामगारांच्या मध्ये त्यांच्या दररोजच्या दैनंदिन किमान गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना मिळणारे उत्पन्न हे अपुरे पडत असल्यामुळे त्यांनी कर्ज घेतलेले दिसून येते. त्यामुळे कर्जाची समस्या ही त्यांना फार मोठ्या प्रमाणामध्ये भेडसावत आहे. याचबरोबर

१०. **हंगामीकाम:**या महिला कामगार हळद कारखान्यात काम करतात हा व्यवसाय हा हंगामी स्वरूपाचा आहे वर्षातील काही महिने हे काम त्यांना मिळते. यानंतर हळद कारखान्यातील कामगारांची संख्या कमी केली जाते. जशी गरज असेल तसंच त्यांना बोलावलं जाते. त्यामुळे या हंगामी कामानंतर दररोज काम त्यांना मिळत नाही.

११. **व्यसनाधीनता**या महिलांचे बरेचसे पती हे व्यसनाधीन असलेले दिसून येतात. कारण ते जेवढे कमवतात तेवढे ते त्यांच्या व्यसनावरती खर्च करत असतात. त्यामुळे या महिला कामगारांना घर चालवणे ही अशक्य होऊन बसते. आणि त्यामुळे त्यांना कर्ज काढावं लागते.

१२. **मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न:**या महिला कामगारांना आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयी ही प्रश्न भेडसावत असलेला दिसून येतो. कारण त्यांच्या पगारातून मुलांचे उच्च शिक्षण देऊ शकत नाहीत.

१३. **धुळीचा त्रास:** हळदीच्या धुळीचा त्रासही या महिला कामगारांना सहन करावा लागतो. या हळदीच्या धुळीमुळे त्यांना अनेक गंभीर अशा आजारांना सामोरे जावं लागतं.

१४. **सोयीसुविधाची वाणवा:** ज्या हळद कारखान्यात या स्त्रिया काम करतात त्या ठिकाणी त्यांना पिण्याची स्वच्छ पाण्याची सोय नाही आहे. त्याचबरोबर स्वच्छतागृहाची सोय नाही. विश्रांती ग्रहाची सोय नाही.

१५. **राहत्या जागेचा प्रश्न:**या महिला कामगार ज्या वस्तीमध्ये राहतात त्या ठिकाणीही नगरपालिका काही सोयीसुविधा पुरवत नाहीत, ड्रेनेज सिस्टीम नाही, की पिण्याच्या पाण्याची योग्य सोय नाही, घरे ही अरुंद असलेली दिसून येतात.हे माथाडी कामगार पत्राच्या घरात तसेच दोन खोल्यांच्या मध्ये वास्तव्यात असलेल्यांची संख्या ही जास्त प्रमाणात असलेली आपल्याला दिसून येते.

१६. **लिंगभेदावर आधारित वेतन:** या असंघटित क्षेत्रातील महिलांच्या संशोधन केले असता असे दिसून येते की, या ठिकाणीही या स्त्रियांना पुरुषांच्या पेक्षा कमी पगार मिळतो आहे.

१७. **कायदेशीर संरक्षणाचा अभाव:**संघटित स्त्रियांच्या तुलनेत असंघटित क्षेत्रात काम करत असलेल्या स्त्रियांची कष्टकरी स्त्रियांच्या समस्या ह्या गंभीर आहेत. तरीही कसलेही कायदेशीर संरक्षण मिळत नसते. त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असते.

सारांश

माथाडी कामगार हे समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक असल्याने त्यांच्या समस्या खूप गंभीर स्वरूपाचे आहेत. माथाडी कामगार तर अनेक प्रकारच्या समस्यांनी त्रस्त आहेत. त्यांना पुरेसे कायद्याचे संरक्षणही नाही. या कामगारांना मूलभूत सोयी सुविधाही मिळत नाहीत..अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांचे काम कष्टप्रद आहे. किमान वेतन दिले जात नाही. निवृत्तीवेतन नाही, वैदयकीय सोईसुविधा नाही. याकामगारांना चांगल्या सोयी सुविधा व संधीही दिल्या गेल्या पाहिजे.स्वच्छताविषयक सुविधा, स्वच्छपिण्याच्या पाण्याची सोय या गोष्टीकडे लक्ष दयायला हवे. संशोधकाच्या मते, या असंघटित कामगारांना अपघात विमा नाही, किमान वेतन नाही, औपचारिक शाब्दिक करार, अनिश्चित कामाचे तास हया सर्व समस्या या कामगारांच्यात असलेल्या दिसुन येतात. भारतासारख्या विकसनशील देशात आज अनेक सामाजिक समस्यांनी उग्ररूप धारण केले आहे या सर्व समस्यांच्या झळा देखील या माथाडी कामगारांना बसत आहे. माथाडी कामगारांच्या या विविध समस्या वर उपाययोजना करणे गरजेचे आहे. यासाठी देशपातळीवर धोरणात्मक बदल करण्याची गरज आहे. कायद्याने व्यावसायिक आजार काम करण्याच्या ठिकाणी असलेले सुरक्षा नियम आणि मोबदला याविषयी कार्यवाही करून नियम तयार करावेत व त्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होते की नाही हे पाहावे. माथाडी कामगारांचे वेतन अनिश्चित आणि कमी असल्यामुळे या कामगारांना मोफत आरोग्यसेवा पुरवण्यात यावी. त्याचबरोबर मालक वर्गाशी संपर्क साधून त्यांच्याशी चर्चा करून त्यांना या कामगारांच्या समस्यांचे माथाडी कामगारांना काम करीत असल्यामुळे होत असलेल्या आजारांचे गांभीर्य पटवून द्यायला हवे. या कामगारांच्या वरती त्यांचे पूर्ण कुटुंब अवलंबून असल्यामुळे जर या कामगारांचे काही बरे वाईट झाले तर त्यांची मुले अनाथ होण्याबरोबरच बालमजुरीची संख्या देखील वाढेल. गरिबीशी सामना करण्यासाठी बरेचसे कामगार आपले घर सोडून आले आहेत व त्यांचेच जर बरे वाईट झाले तर हा वर्ग पुन्हा गरीबीच्या खाली लोटला जाईल. यासाठी या समस्यावर गंभीरपणे विचार विनिमय होणे हे गरजेचे आहे. माथाडी कामगारासाठी कायदा झाला असला तरी तो सर्वव्यापी स्वरूपाचा नाही. कामाचे स्वरूप सर्वत्र सारख्या आढळत नाही. तसेच कामाच्या वेळा निश्चित असू शकत नाही. निश्चित काम व हमखासदाम हे संघटित कामगारांच्या बाबतचे तत्व इथे लागू होऊ शकत नाही. कायदा, न्यायव्यवस्था इत्यादी माध्यमातून संघटित कामगारांनी वेळोवेळी त्यांच्या प्रश्नांची मागण्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे या तुलनेने माथाडी कामगार हा वर्ग नेहमीच शासन, जनता, समाज, संशोधक अभ्यासक यांच्याकडून उपेक्षित राहिला आहे.

संदर्भसूची:

१. तुळूपुले बगाराम(१९७१):कामगार आकांक्षा आणि आव्हाने, साधना पब्लिकेशन
२. पवार जे. के.(१९७१): कामगार विश्व, कोल्हापूर, राज पब्लिकेशन
३. भांडारकर पु.ल.(१९८७): सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ प्रकाशन
४. देशपांडे वसंत(१९८९): हमालपंचायत, मुंबई, मौज प्रकाशन
५. कोरपे आप्पा (१९९२): मी तो हमाल, मुंबई, मोरया प्रकाशन
६. अरोडा वेदप्रकाश(१९९६): असंघटित क्षेत्रातील कामगारांची दुर्दशा, योजना मे ११– १३
७. नानावटी रीमा (२००७): अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांच्या चरितार्थासाठी एकात्मिक वित्तीय सेवा, योजना डिसेंबर २००७
८. देशपांडे लक्ष्मीकांत (२०१०): माथाडी कामगार आणि संघटना, नागपूर, विसा बुक
९. सहस्त्रबुद्धे चिंतामणी (२०१३): इतिहासाची सुवर्ण पाने, सांगली, आदित्य प्रकाशन

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी.

***

पर्यावरण ऱ्हासाचा समाजावरील परिणाम

*प्रा.डॉ.दीपक कृष्णराव पवार

सारांश –

विकास की पर्यावरण हा मुद्दा पुन्हा ज्वलंत होऊन आपल्यासमोर आला आहे. विकास की पर्यावरण हा मुद्दा १९७२ ला पहिल्यांदा जागतिक पटलावर आला तो 'स्टॉक होम' कॉन्फरन्सच्या निमित्ताने, १९९२ च्या दरम्यान ब्राझील मधल्या 'अर्थ समीट' नंतर एक संघर्ष सुरू झाला . इकॉलॉजी की इकॉनोमी अस ही जागतिक परिभाषेत या संघर्षाला म्हटलं जाऊ लागलं. ॲमेझॉन च्या जंगलाला लागलेल्या आगीनंतर हा सुद्धा मुद्दा पुन्हा ठळकपणे पुढे आला आहे. ४७ वर्षानंतरही आजही या प्रश्नाचे उत्तर जगाला शोधता आलेलं नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि आपल्या सर्वांना चढलेली विकासाची नशा, हे त्याचे मुख्य कारण आहे. आज जगातंल्या सर्व मानसांना सर्व साधनांचा अतीव उपभोग घ्यायचा आहे. आणि त्याकरीता निर्सगाचे प्रचंड शोषन सुरु आहे. याचेच विपरित परिणाम संपूर्ण जगाला भूकंप, अतिवृष्टी, दुष्काळ, चक्रीवादळ, त्सुमामी, महापूर या विविध घटनांच्या माध्यमातुन भोगावे लागत आहे. तरीदेखील मनुष्याचे निसर्गाच्या विरोधात जाऊन दोहन सुरुच आहे. त्यामुळे काही देशाची प्रगती वेगाने होत असल्याचे चित्र दिसत असले तरी, ते देश कालांतराने अधोगतीच्या मार्गाने जाईल यात शंकाच नाही. याचे उत्तम उदा. म्हणजे चिन, अमेरिका, फ्रान्स, जापान, कोरिया इ. देशांचे देता येईल. या देशांनी कितीही प्रगती केली असली तरीही पर्यावरणात संतुलन राखण्यात हे देश अयशस्वी ठरले आहे. संपन्न जैवविविधता असलेल्या जगातल्या मोजक्या प्रदेशांपैकी भारत देश एक आहे. सध्या भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. याचाच परिणाम म्हणून भारतातील उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचा देशातील पर्यावरण आणि जैवविविधतेवर नकारात्मक परिणाम होत आहे. त्याचबरोबर आधुनिकीकरणाच्या युगात नैसर्गिक साधन संपत्तीवर मोठ्या प्रमाणात संकट येत आहेत. भारतात राष्ट्रीय व राज्य महामार्ग फार मोठी करण्यात आलीत, त्यामुळे वाहने फार जलद गतीने जात आहे. परंतु ही महामार्गे मोठी होताना ब्रिटिशांच्या किंवा त्यापूर्वीच्या काळापासून महामार्गाच्या लगत असलेली लाखो झाडे तोडल्या गेली. रस्ते बनविण्यावर लाखो कोटी रुपये खर्च करण्यात आले. परंतु झाडे लावण्याबाबत आणि झाडे वाढवण्याबाबत काही हजार कोटी खर्च करण्याची सरकारची मानसिकता नाही.

प्रस्तावना –

ॲमेझॉन च्या जंगलाला लागलेल्या आगीमुळे विकास की पर्यावरण हा मुद्दा पुन्हा ज्वलंत होऊन आपल्यासमोर आला आहे. विकास की पर्यावरण हा मुद्दा १९७२ ला पहिल्यांदा जागतिक पटलावर आला तो 'स्टॉक होम' कॉन्फरन्सच्या निमित्ताने, १९९२ च्या दरम्यान ब्राझील मधल्या 'अर्थ समीट' नंतर एक संघर्ष सुरू झाला . इकॉलॉजी की इकॉनोमी अस ही जागतिक परिभाषेत या संघर्षाला म्हटलं जाऊ लागलं. ॲमेझॉन च्या जंगलाला लागलेल्या आगीनंतर हा सुद्धा मुद्दा पुन्हा ठळकपणे पुढे आला आहे. ४७ वर्षानंतरही आजही या प्रश्नाचे उत्तर जगाला शोधता आलेलं नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि आपल्या सर्वांना चढलेली विकासाची नशा, हे त्याचे मुख्य कारण आहे. २०१६साली सत्तेवर येताना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हवामान बदल हे वास्तव नसून ती एक अफवा आहे, अशी घोषणा केली होती. त्यानंतर त्यांनी त्यांच्या भूमिकेचे बदल केला होता. या बाबातचा अहवाल आल्यावर 'कोणता गट असे हवामान बदलाचे निष्कर्ष काढत आहे, हे पहावे लागेल'. असे विधान करून त्यांनी 'ते एक राजकीय कारस्थान आहे, हवामान बदलास मानव जबाबदार नाही. वैज्ञानिकांचे निष्कर्ष मानून लक्षावधी लोकांचे रोजगार घालविण्यास आणि अब्जावधी रूपये खर्च करण्यास मी तयार नाही' अशी प्रतिक्रिया दिली होती. यावरून लक्षात येते की भारतातीलच नव्हे तर जगातील राजकारणी पर्यावरण असंतुलनाकडे गांर्भीयाने अजुनही बघत नाही.

परंतू जागतिकीकरणाच्या तांत्रिक युगात 'पर्यावरण' या शब्दाला महत्वाचे स्थान देण्यात आले आहे. कारण आज पर्यावरण या शब्दाचा अर्थ केवळ व्यक्ति, समाज किंवा देशापुरता मर्यादित न राहता जागतिक स्तरावर व्यापक झाला आहे. याला कारण मानवानेष्तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घेतलेली उत्तुंग भरारी. या जागतिक प्रगतीचा धोका प्रत्येक स्तरावर पर्यावरणाच्या माध्यमातून आपण अनुभवत आहोतच. तांत्रिक प्रगतीचा टप्पा आज या स्तरावर येऊन पोहचला की, आपण आहो त्या परिस्थितीत समाधान न मानता ती टिकवून ठेवने महत्वाचे आहे. मंगळावर मानव वस्ती करण्याच्या प्रयत्नात आहे. आज जगातंलया सर्व मानसांना सर्व साधनांचा अतीव उपभोग घ्यायचा आहे. आणि त्याकरीता निर्सगाचे प्रचंड शोषन सुरु आहे. याचेच विपरित परिणाम संपूर्ण जगाला भूकंप, अतिवृष्टी, दुष्काळ, चक्रीवादळ, त्सुमामी, महापूर या विविध घटनांच्या माध्यमातुन भोगावे लागत आहे. तरीदेखील मनुष्याचे निसर्गाच्या विरोधात जाऊन दोहन सुरुच आहे. त्यामुळे काही देशाची प्रगती वेगाने होत असल्याचे चित्र दिसत असले तरी, ते देश कालांतराने अधोगतीच्या मार्गाने जाईल यात शंकाच नाही. याचे उत्तम उदा. म्हणजे

चिन, अमेरिका, फ्रान्स, जापान, कोरिया इ. देशांचे देता येईल. या देशांनी कितीही प्रगती केली असली तरीही पर्यावरणात संतुलन राखण्यात हे देश अयशस्वी ठरले आहे. आज आपण पाहत आहो की या देशांचा विकास हळूहळू खुंटतो आहे. या देशांनी असा एकही भाग, प्रदेश, जागा सोडलेली नाही जिथे सर्वसुविधायुक्त सोयी नाही. विकासाची फळे अनेक वर्षे चाखल्यानंतर आज मात्र हे सर्व देश पर्यावरणाच्या झालेल्या ऱ्हासापायी वैतागुन पर्यावरण संरक्षणार्थ कडक कायदे व अधिनियमाची अंमलबजावणी प्राथमिक स्तरावर करतांना दिसुन येतात.

संकल्पना

पर्यावरण– पर्यावरण म्हणजे, ज्या वातावरणात संपूर्ण जग किंवा विश्व किंवा जीवंत जग वेढलेले आहे. आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक, भौतिक आणि सामाजिक आवरणाला खऱ्या अर्थाने पर्यावरण म्हणतात. जीव ज्या वातावरणात किंवा परिस्थितीमध्ये राहतो त्याला त्याचे वातावरण म्हणतात. पर्यावरणाचा सजीवांवर परिणाम होतो आणि सजीवांचा पर्यावरणावर परिणाम होतो.

पर्यावरण म्हणजे आपला परिसर, जमीन, आकाश व पाणी हे पर्यावरणाचे प्रमख घटक आहेत तर यामधील जैविक व अजैविक घटक मिळून परिसर अर्थात पर्यावरण तयार होते. जैविक घटकामध्ये आपण म्हणजे मानव, सर्व प्रकारचे जीव, वनस्पती, झुडपे यांचा समावेश आहे. तर अजैविक घटकामध्ये हवा, आकाश, हवेतील सर्व वायू, सूर्य किरणे, प्रकाश, सर्व प्रकारचे रासायनिक मूलद्रवे इत्यादी येतात. या सर्व घटकाचा उपयोग करून जीव सृष्टी जीवित राहते.

पाण्याचे साठे ज्यात महासागर, समुद्र, नद्या, तळी, पाण्यातील जीव सृष्टी, पाण्यातील रसायनाचे घटक, त्याचे साठे, आकाश, सूर्य, चंद्र, सूर्यकिरणे, सूर्य ऊर्जा, तसेच आकाशातील इतर ग्रह, जमिनीवरील उंच, लहान पर्वत, मोठं –मोठी वाळवंट, वोल्कॅनो, डोंगरातील दऱ्या, हे सारे पर्यावर्णाचे घटक आहेत.

पर्यावरण असंतुलन – जेव्हा एखाद्या नैसर्गिक किंवा मानवामुळे उद्‌भवलेल्या अशांतीमुळे पर्यावरणातील नैसर्गिक संतुलन बिघडते तेव्हा त्याला पर्यावरणीय असंतुलन म्हणतात. हा त्रास म्हणजे परिसंस्थेच्या संतुलनात व्यत्यय आणणारा कोणताही बदल.

समाज – समाज हा व्यक्तींचा समूह असतो, ज्यात सामान्य स्वारस्य असते आणि त्यांची विशिष्ट संस्कृती आणि संस्था असू शकतात. धार्मिक, परोपकारी, सांस्कृतिक, वैज्ञानिक, राजकीय, देशभक्ती किंवा इतर हेतूंसाठी एकत्र जोडलेल्या लोकांचा संघटित गट देखील समाज मानला जाऊ शकतो.

मानव हा मूलत: सामाजिक प्राणी आहे, त्याला इतरांशी जवळीक साधण्याची इच्छा आणि गरज असते. कुटुंबापासून सुरुवात करून, मानवी जीवन हे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक गोष्टींचे परस्परावलंबन आणि सामायिकरण आहे. नागरिकत्व, हक्क आणि नैतिकता या संदर्भात समाजाचा विचार केला जातो. कोणत्याही समाजातील सदस्यांची एकमेकांना मदत करण्याच्या तयारीची ताकद आणि ऐक्याचे मोजमाप करणे याला सामाजिक भांडवल म्हणता येईल.

व्याख्या –

ग्रीन – 'समाज हा खूप मोठा समूह आहे ज्याचा कोणीही सदस्य होऊ शकतो. समाज हा लोकसंख्या, संघटना, काळ, स्थळ आणि आवडींनी बनलेला असतो'.

डॉ.जेम्स – 'माणसाच्या शांतीपूर्ण संबंधांच्या स्थितीचे नाव समाज आहे'.

प्रा.गिडिंग्स –'समाज स्वत:च एक संघ आहे, ती एक संस्था आहे आणि कार्यपद्धतींचा योग आहे ज्यामध्ये सहकारी व्यक्ती एकमेकांशी संबंधित आहेत'.

प्रा.मॅकआयव्हर –'समाज म्हणजे माणसाने प्रस्थापित केलेले असे संबंध, जे त्याला प्रस्थापित करायला भाग पाडावे लागतात'.

समाजात एकापेक्षा जास्त सदस्य असतात, वेगळी संस्कृती, प्रादेशिकता, सामाजिक संबंध, सामाजिक सहकार्य आणि सामूहिक कार्य इ. वेशिष्ये असतात.

अभ्यासाचे महत्व – मानवाने आपल्या अतीव सुखाकरिता निसर्गाचे मोठ्या प्रमाणात शोषण केले. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडलेले आहे. भारतावरच नव्हे तर संपूर्ण जगावर या पर्यावरणाच्या असंतुलनाचे खूप मोठे परिणाम होत आहे. त्यामुळे जीव सृष्टी बरोबर मानवाचे अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

अध्ययनाची उद्दिष्टये –

१. जीवसृष्टीची हानी न होता विकास करणे

२. चिरंतर विकासाची (Sustainable Development) संकल्पना राबविने.

३. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्रोत्साहन देने.

४. पर्यावरण संरक्षणाकरीता कडक कायदे करून त्याची सर्व स्तरात अमंलबजावनी करणे

अभ्यासाचे गृहितके:

१. विकासाकरीता मोठया प्रमाणत निर्सगाचे शोषन केल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे.

२. पर्यावरणीय असंतुलनाचे अनेक विपरित परिणाम जल, जमीन, वातावरण, हवामान, मनूष्य, आरोग्य इ. घटकांवर पडलेला आहे

संशोधन पद्धती – पर्यावरण ऱ्हासाचा समाजावरील परिणाम या समाजशास्त्रीय विषयाचे अध्ययन करण्याकरीता सामाजिक संशोधन पध्तीचा वापर करण्यात आला आहे. द्वितीयक स्त्रोतातील सार्वजनिक प्रलेख स्त्रोताचा अवलंब करण्यात आलेला असून यामध्ये प्रकाशित संदर्भ ग्रंथ, नियतकालीके, जर्नल, विविध शासकीय, गैरशासकीय व आंतरराष्ट्रीय संस्थाद्वारे प्रकाशित आकडेवारीचा वापर करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत शोधनिबंधात दर्शविण्यात आलेली माहिती ही प्रत्यक्ष अनुभवातुन, व्यक्तिगत वैचारिक मतांमधुन, चालु घडामोडींचा अभ्यास करुन, प्राथमिक स्त्रोताचा आधार घेऊन मांडण्यात आलेली आहे.

पुर्व अध्ययने – १) डॉ. (सौ.) मंजूषा राजेंद्र ठाकरे – २०२२, पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे ताणवाचा ऱ्हास (शोध निबंध)] SANSHODHAN – ISSN 2249-8567

२) डॉ. राजेद्र बगाटे पर्यटनाचा – पर्यावरणावर होणारा परीणाम (शोध निबंध), Research Gate, net

पर्यावरण ऱ्हासाचा समाजावरील परिणाम –

संपन्न जैवविविधता असलेल्या जगातल्या मोजक्या प्रदेशांपैकी भारत देश एक आहे. सध्या भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. याचाच परिणाम म्हणून भारतातील उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचा देशातील पर्यावरण आणि जैवविविधतेवर नकारात्मक परिणाम होत आहे. त्याचबरोबर आधुनिकीकरणाच्या युगात नैसर्गिक साधन संपत्तीवर मोठ्या प्रमाणात संकट येत आहेत. त्यात शहरीकरण, वाढत जाणारी लोकसंख्या, जंगलाची होत असलेली तोड, नष्ट होत चाललेले वन्यजीवांचे अधिवास, जैविक संपत्तीचा अमर्याद वापर. यामुळे प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे जैविक उत्पादने व साधनसंपत्तीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येला तसेच एकूण जैवविविधतेच्या संपत्तीवर विपरीत परिणाम होत आहे.

पृथ्वीच्या तापमानात गेल्या दोनशे वर्षात १.० अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. सध्याचे प्रयत्न पाहता २०३० ते २०५० या काळात जागतिक तापमानात किमान १.५ अंश सेंल्सिअसने वाढ होईल. त्यामुळे येणाऱ्या काळात अवर्षण, महापूर, चक्रीवादळ, उष्णतेची लाट, शीतलहर, अग्नितांडव यांची तीव्रता व वारंवारता वाढत जाणार असून आपत्तीग्रस्तांच्या संख्येत प्रचंड वाढ होणार आहे. शिवाय समुद्र पातळीत वाढ, प्रवाळांचा अंत, शेतीच्या उत्पादनात घट, धान्याच्या किंमतीत वाढ होणार आहे, या आपत्तीमुळे गरिबांचे स्थलांतरण वाढणार असून गरीब देश आणि श्रीमंत देशातील गरीब यांची अवस्था आणखी बिकट होणार आहे. आधीच प्रदूषण, जंगलतोड, बेकायदेशीर बांधकाम, यामुळे आपत्ती जनक परिस्थिती निर्माण करून ठेवलेल्या राष्ट्रात हाहाकार माजेल असे आयपीसीसीचा अहवाल बजावतो आहे. प्रस्तुत अहवालात भारत हे हवामान बदलामुळे सर्वाधिक असुरक्षित राष्ट्रांपैकी एक राष्ट्र आहे. आत्ताच भारतातील काही भागात १.२ ते २.० अंश सेल्सिअसने तापमानात वाढ झाली आहे. अवर्षण, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिष्य, महापूर यामुळे भारताच्या सकल उत्पादनात १.५ टक्क्यांनी घट होऊन अर्थव्यवस्थेवर भीषण परिणाम होणार आहेत. त्यामुळे २०३० पर्यंत किमान पाच कोटी जनता दारिद्रयाकडे ढकलली जाईल. तिथूनच पुढे केरळ सारखे महापूर, उष्णतेची लाट व समुद्र पातळीत वाढ, या धोक्याची टांगती तलवार भारतावर राहणार असा भविष्यवेध आहे.

तापमान वाढीमुळे होणारी जगाची अवस्था याविषयी वैंज्ञानिकांचे अंदाज सादर होत आहे. धनवान व बलवान राष्ट्रांचा 'जगाचे तापमान २.० अंश सेल्सिअसने वाढले तरी काही बिघडणार नाही असा हेका होता. तसे झाल्यास मालदीव, किरीबाती, फिजी, मॉरिशस यासारख्या ४४ बेटांना जलसमाधी मिळणार असल्यामुळे त्यांचा यास कडाडून विरोध होता. अवर्षण व दुष्काळामुळे होरपळणारी इथिओपिया, कंबोडिया ही राष्टे सुध्दु विरोधात होती. जगातील अशा ५० हवामान असुरक्षित राष्ट्रांचा तापमान वाढ १.५ अंश सेल्सिअसने वर रोखण्यावर कटाक्ष होता. त्यांनी आमच्या राष्ट्रांना नामशेष करणाऱ्या करारावर सह्या करणार नाही अशी भूमिका घेतली. त्यामुळे परिषदेचा कालावधी वाढून पॅरिस करार पार पाडला. या दोन्ही गटांची मर्जी राखून जगाची तापमान वाढ २.० अंश सेल्सिअस वरून १.५ अंश सेल्सिअस पर्यंत खाली आणण्याचा प्रयत्न करणे हे उद्दिष्ट मंजुरी झाले.

भारताकरीता हे वास्तव फार महाभयंकर आहे २१ व्या शतकातील १७ व्या वर्षात भारतातील ३०० नैसर्गिक आपत्तींमध्ये ७६ हजार बळी व ४ लाख कोटी रुपयांच्या मालमत्तेची हानी झाली आहे. आपत्तीमुळे दरवर्षी सरासरी १० हजार कोटी रुपयांच्या मालमत्तेचा विनाश होतो आहे. यां वर्षीच्या केरळमधील महापुराने ३०००० कोटींची हानी झाली आहे. सुमारे ७५०० किमी लांबीचा समुद्रकिनारा व त्यावरील मुंबई, चेन्नई, कोलकत्ता या सारखी अवाढव्य महानगरे असलेला आपला देश हा आपत्तींच्या खाईत आहे. म्हणून हवामान बदलास 'धोक्यांची साखळी निर्माण करणारा विनाशक धोका' म्हटले जाते. या कारणांमुळे आयपीसीसीच्या उद्दीष्टानुसार 'तापमान वाढ १.५ अंश सेल्सियवरच रोखणे अनिवार्य असून, त्या करीता जगाने तातडीने निकराचे प्रयत्न करावेत असा आग्रह आहे. त्यासाठी जगातील अनेक ख्यातनाम वैज्ञानिक संस्था हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांची संभाव्यता प्रक्षेपित करीत आहेत.

नासाच्या संशोधनातून '२०४० च्या उन्हाळ्यात दक्षिण ध्रुवावरील बर्फ शिल्लक असणार नाही. २०५० सालापर्यंत उत्तर ध्रुवावर बर्फ दिसणे सुद्धा कठीण होईल. दोन ध्रुवावरील बर्फ वितळल्यामुळे २१०० साली समुद्रपातळी २.५ मीटरने वाढेल' असा अंदाज व्यक्त केला आहे. 'वर्ल्डवाइड फंड फॉर नेचर' या संस्थेने '१९७० पासून आज पर्यंत जगातील जीवसृष्टी ५२ टक्क्यांनी घटली आहे' असा इशारा दिला आहे. आम्लीकरण व तापमान वाढीमुळे सागरी संपदेची अपरिमिमित हानी होत असून २१०० सालापर्यंत जगभरातील प्रवाळ (कोरल्स) संपुष्टात येतील असं सांगितले आहे. एकंदरीत पृथ्वीची वाटचाल नायनाटाकडे आहे.

मानवाने जशी स्वत:ची उत्तरोत्तर प्रगती केली त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रगती प्रत्येक विकसित, अविकसित व विकसनशील देशाने केलेली दिसून येते. ही विकासाची फळे चाखताना जसा आनंद मनुष्याने उपभोगला त्यापेक्षा जास्त आनंद विविध देशांनी उपभोगला व त्यानंतर मात्र पर्यावरणीय विविध समस्यांनी ते विविध देश त्रस्त झालेले दिसुन येत आहे. भारताच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास भारत नैसर्गिक संसाधनांनी युक्त देश असुनसुद्धा नैसर्गिक संसाधनांचा अपुरा वापर किंवा गैरवापर या कारणांमुळे समृद्ध होऊ शकला नाही. उदा. उत्तराखंड किंवा काश्मिर. काश्मिरला भारताचा स्वर्ग म्हटले जाते तर उत्तराखंड ही भारताला मिळालेली देवी देणगी होय, आणि त्यालाच देवभुमी या नावाने संबोधले जाते. निसर्गाने जणू या ठिकाणी आपले अधिराज्य निर्माण केले असा भास होतो. परंतु या निसर्गाच्या अधिराज्यावर अतिक्रमण केले ते मनुष्याने. मानवाने स्व:हितार्थ या नैसर्गिक देणगीचा उपहास केला. एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध झालेल्या उत्तराखंडला मानवाने व्यावसायिक दृष्टिने वापर करुन तिथल्या पर्यावरणाचा ऱ्हास केला मोठ–मोठया पर्वतरांगा खोदून कमी वेळात विशिष्ट ठिकाणी पर्यटक पोहचले पाहिजे यासाठी पहाड नेस्तनाबुत केलीत. ही मोठमोठी पहाड आधुनिक तंत्राच्या द्वारे उखडून टाकल्याने व इकडून तिकडे जाण्याकरीता रोपवे टाकल्यामुळे नैसर्गिक सौंदर्याचा हळूहळू ऱ्हास होऊ लागला. पर्वतरांगावर मोठमोठी रस्ते तयार करताना अत्याधुनिक संयत्रे वापरल्यामुळे जमिनीच्या आतील भागाला तडा गेला. त्यामुळे काही ठिकाणी हवेचा दाब तर काही ठिकाणी भुपृष्ठाखालील भागाला इजा पोहचली. त्यामुळे जमीनीच्या आतील वातावरणात बदल होऊन जोशीमठ आणि रोतोगांव हे गांव जमीन ढसल्यामुळे तेथील रहीवाश्यांना स्थालांतरीत करावे लागले आहे. आज उत्तराखंडातील अनेक गावांची परीस्थिती अशीच आहे. थोडक्यात विकासाच्या नावाखाली चाललेली ही प्रगती मनुष्याला विनाशाकडे घेऊन जात आहे.

मानवाने निर्मळ–स्वच्छ–नैसर्गिक वाहणाऱ्या नद्या बंधारे बांधुन आटवल्या, तिथे कृत्रिम कालवे काढले. परंतु जिथे नद्याच आटल्या तिथे पुढे पाणी नाही पण कालव्यांना पाणी. विकास करताना नियोजनबद्ध पद्धतीने आखणी करुन प्रायोगिक तत्वावर त्याची अंमलबजावणी एखाद्या भागात करणे गरजेचे असते. परंतु तसे न करता तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार योजना आखुन अनुकूल किंवा प्रतिकुल परिणामांचा विचार न करता, नको त्या नियमांची तात्काळ अंमलबजावणी केली जाते. परंतु अंमलबजावणीच्या प्रक्रियेत मात्र अनेक अडथळे दिसुन येतात. व योजनेचे फायदे मिळण्यापासून मानव वंचित राहतो. मानवाने प्रगतीचा वरचा टप्पा अशा पद्धतीने गाठला की त्याला आता जमीन कमी पडायला लागली. आणि आता त्याची नजर खवळलेल्या तर कधी शांत अशा समुद्राकडे लागली. याचे उत्तम उदाहरण दयावयाचे झाल्यास अरबी समुद्राचे देता येईल. हा समुद्र देखील निसर्गाची देण आहे. समुद्रात मध्यभागी किंवा समुद्रसपाटीपासुन काही अंतरावर एखादा पुतळा तयार करणे हे भावणात्मक राजकारणाकरीता ठीक आहे परंतू त्या समुद्राची म्हणजे निर्सगाची छेडखानी करणे होय. ज्या समुद्राचा वापर दोन देशांमधील व्यापारासाठी केला जातो. त्याचा वापर मनुष्य कुबुद्धीने स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी करत आहे. यापेक्षा अधोगतीचा खालचा स्तर कोणता असु शकतो ? एखादया विशाल समुद्रात क्रॉकीटयुक्त जागा तयार करण्याकरिता ज्या भव्य

दिव्य प्रक्रियेतुन मनुष्याला जावं लागतं त्यापेक्षा जास्त क्लेशदायक वेदना त्या समुद्राला अंत:करणात (समुद्राच्या खोलवर तळयातील जागा) सोसाव्या लागतात. परंतु मनुष्य मात्र बुद्धिहीन झाल्यासारखं वागुन प्रगतीचा ताज स्वत:च्या डोक्यावर मिरविण्यातच आयुष्य घालवितो. काही वर्षानंतर मात्र त्सुनामी, कॅटरिना यासारख्या वादळाला सामोरे जाता जाता शहरें किंवा गावे कधी ओस पडली हे कळलेच नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुंबई शहरातील वायुप्रदूषण. मुंबई शहरात रोज काही हजार टन कार्बन उत्सर्जन करणारे, मोटार हे सर्वात मुख्य कारण आहे, ही गोष्ट लपवली जाते. शहरातील सुमारे ५० लाख मोटारींची वायुप्रदूषणात आणि त्यामुळेच विक्रमी तापमानात गुन्हेगारी स्वरूपाची भूमिका आहे. परंतु, मोटारीचे प्राणघातक आकर्षण आणि तिला अर्थव्यवस्थेचे प्रतीक बनवल्यामुळे हा निखारा मुठीत लपवला जात आहे. अर्थात हात जळत आहे. मोटारीलाच जोडलेले दुसरे कारण सर्व रस्त्यांचे सीमेंट काँक्रिटीकरण हे आहे. एकामागून एक रस्ते फोडले जात आहेत. एकाच रस्त्याचे काम एक – दोन वर्षे देखील चालत आहे. एकच रस्ता पुन्हा पुन्हा फोडला व बनवला जात आहे. 'माहीम' या मूळ बेट असलेल्या व ब्रिटिश येण्याच्या आधी या प्रदेशाची राजधानी असलेल्या भागाचे उदाहरण घेऊ. सन १८४५ सालात मुंबईची बेटे व उपनगरे जोडणारा 'लेडी जमशेटजी' रस्ता, ज्याचा मिठी नदीवरचा पूल हा भाग आहे, तो बांधला गेला. सुमारे १७५ वर्षांपूर्वी बांधलेला हा ऐतिहासिक रस्ता डांबरी आहे. त्याचा प्रचंड वापर अस्तांनाही रस्ता उत्कृष्ट स्थितीत आहे. मग ही सीमेंटच्या रस्त्यांची हजारो कोटी खर्चाची टूम कुणाचे खोके भरण्यासाठी आहे? यातुन मुंबईची चाळण केली जात आहे. नागरिक धूळ आणि इतर समस्यांमुळे हैराण झाले आहेत. पण आम्ही 'नॉन पोलिटिकल, 'अशी नपुंसक भूमिका गेली २५–३० वर्षे घेतल्याने, छातीत प्रदूषण भरून घेऊन, जीव मुठीत धरून नागरिक यंत्रवत जगत, धावत आहेत.

अजुन एक ज्वलंत उदा. देता येईल. ते म्हणजे राष्ट्रीय, राज्य व समृद्धी महामार्गाचे. राष्ट्रीय व राज्य महामार्ग फार मोठी करण्यात आलीत, त्यामुळे वाहने फार जलद गतीने जात आहे. परंतु ही महामार्गे मोठी होताना ब्रिटिशांच्या किंवा त्यापूर्वीच्या काळापासून महामार्गाच्या लगत असलेली लाखो झाडे तोडल्या गेली. रस्ते बनविण्यावर लाखो कोटी रुपये खर्च करण्यात आले. परंतु झाडे लावण्याबाबत आणि झाडे वाढवण्याबाबत काही हजार कोटी खर्च करण्याची सरकारची मानसिकता नाही. आज राष्ट्रीय, राज्य किंवा समृद्धी महामार्गावरून जाताना भकास वाटते. कुणी स्वत:ला रस्तेकरी, पुलकरी म्हणून घेत असेल किंवा लोक त्यांना तशी उपमा देत असेल पण पर्यावरण प्रेमी, वृक्ष लागवडकरी, वृक्षसमृद्धकरी म्हणून घेणे त्यांना आवडत नाही असेच वाटते, कारण निसर्ग त्यांना समजलाच नाही असे म्हणावे का?

निष्कर्ष –

विकासाच्या नावाखाली चाललेला पर्यावरणाचा ऱ्हास हा नैसर्गिक आपत्तीला कारण ठरत आहे. विकासाची फळ काही मुठभर श्रीमंत व विशिष्ट वर्ग चाखत आहे. परंतु त्यातून होणऱ्या पर्यावरण ऱ्हासाची झळ देशातल्याच नव्हे तर जगातल्या ८० टक्के लोकांना बसत आहे. अशाच प्रकारे पर्यावरण विनाशाचा खेळ खेळला गेला तर या पृथ्वीचे, जीवसृष्टीचे आणि पर्यायाने मानवाचे अस्तित्व नष्ट होईल,

संदर्भ–सूची –

१. आगलावे डॉ. प्रदीप (२०२०), समाजशास्त्र – विषय आणि दृष्टिकोन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
२. आगलावे डॉ. प्रदीप (२००९), भारतीय समाज – प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशांन, नागपूर
३. घारपुरे विट्ठल (२००७), पर्यावरणशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर
४. दैनिक लोकसत्ता, लोकरंग, (रविवार २१ ऑक्टोबर २०१८), अतुल देऊळगावकर, विनाशवेळा
५. दैनिक लोकमत, मंथन, नागपूर, (दिनांक १ सप्टेंबर २०१९), पर्यावरण तज्ञ राजेंद्र शेंडे यांची मुलाखत, घुमसत्या ॲमेझॉनचे धडे
६. m.panjabkesari.com
७. htttp://www.gangainstituteofeducation.com
८. unishivaji.ac.in

*प्राध्यापक व समाजशास्त्र–विभाग प्रमुख, **विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट ॲन्ड कॉमर्स,** ३१०–ब, नविन नंदनवन, नागपूर–०९
Email: drdipakpawar62@gmail.com, profdipakpawar@rediffmail.com Mob. : 9423405816 / 8983314468

***

महिला धोरण व महिलांचे सबलीकरण – एक वास्तव

*प्रा. डॉ. दिलीप आर. चव्हाण

महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही 20 व्या शतकात गतिमान बनली असली तरी या प्रक्रियेची सुरुवात काही शतकांपूर्वी झालेली आहे अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि फ्रेंच व्यक्ती स्वातंत्र्याचा जाहीरनामा यामध्ये महिला सबलीकरण प्रक्रियेचे पहिले प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते.

भारतामध्ये 19व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 20 व्या शतकाच्या प्रारंभी राजा राम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, न्यायमूर्ती रानडे, इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रियांच्या गुलामगिरी विरुद्ध आवाज उठवून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात समान अधिकाराची मागणी केली. दुसऱ्या महायुद्धानंतर सबलीकरणाची संकल्पना सर्वप्रथम अमेरिकेतील कृष्णवर्णीय जहाल गटांनी 1960 मध्ये मांडली. प्रामुख्याने 1960 च्या दशका मध्ये महिला सबलीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. महिला सबलीकरणाची जाणीव वैश्विक बनविण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेचे योगदान महत्त्वाचे आहे.

भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात महिला सबलीकरणाचे प्रयत्न होत आहेत भारतात 1975 पासून व सहाव्या पंचवार्षिक योजने पासून या विषयाकडे गांभीर्याने पाहिले जाऊ लागले. आणि त्या दिशेने सरकारद्वारे सर्व स्तरांवर समतोल साधण्याचा प्रयत्न सुरू झाले. पहिल्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कल्याणकारी होता, हळूहळू त्याची जागा विकसनशील दृष्टिकोनाने घेतली आहे असे असले तरी आपला देश 21 व्या शतकाच्या भौतिक आणि वैज्ञानिक प्रगतीच्या शिखरावर पोहोचला असला तरी पाहिजे त्या प्रमाणात स्त्री पुरुष समानतेच्या प्रश्न अद्यापही सोडवता आलेला नाही. स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनात्मक तरतुदी केलेल्या आहेत त्यानंतर अनेक कायदे देखील स्त्रियांच्या यांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने करण्यात आलेले आहेत. तसेच विविध पंचवार्षिक योजना व 1992 पासून राव सरकारने राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. तसेच महाराष्ट्र सरकारने आजपर्यंत तीन महिला धोरण राबविलेले आहेत तसेच चौथे धोरण लवकरच जाहीर होणार आहे. असे प्रयत्न होऊनही भारतात आजही महिला सबलीकरण व सक्षमीकरण का होऊ शकले नाही हा उद्देश डोळयासमोर ठेवून अभ्यास करणे गरजेचे आहे.

अभ्यास विषयाचे महत्व

महिला सबलीकरणासाठी राष्ट्रीय व राज्य महिला सबलीकरण धोरण राबविण्यात आले. महिलांची प्रगती घडवून आणणे या हेतूने सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या महिलांचा विकास व्हावा त्या सबळ शक्तिशाली व स्वावलंबी व्हाव्यात या दृष्टिकोनातून महिलांविषयक धोरण निश्चित करण्यात आले. त्यांना सर्वच क्षेत्रात समान संधी व समान वागणूक मिळायला हवी, असे असले तरी हे उद्देश साध्य होतांना दिसून येत नाही म्हणून त्या दृष्टीने संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. महिला सबलीकरणाचा अर्थ समजून घेणे.
2. महिलांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करणे.
3. महिला सबलीकरणासाठी शासनाने निश्चित केलेल्या धोरणांची माहिती घेणे.

शोधनिबंधाची गृहितके

1. महिलांना स्वतःच्या अधिकाराची जाणीव निर्माण झाली.
2. महिलांचे पूर्वीच्या तुलनेत सबलीकरण होत आहे.
3. महिलांची कौटुंबिक, सामाजिक व राजकीय स्थिती सुधारत आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत विषयावरील शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोताचा (Secondary Sources) चा आधार घेण्यात आलेला आहे. त्यासाठी मासिके, वर्तमानपत्रातील लेख, संदर्भ ग्रंथ यांचा आधार घेतला आहे व वर्णनात्मक, ऐतिहासिक, तुलनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

सबलीकरणाचा अर्थ

महिलांचे सबलीकरण ही संकल्पना महिलांच्या विकासाच्या संदर्भात रूढ झाली असून अबला महिलांना सबला करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हेच यामागील प्रमुख तत्व आहे. स्वतः वंचित व संधी वंचित महिलांना कोणत्याही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची संधी देणे म्हणजेच महिलांचे सबलीकरण होय. भारत सरकारने 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष घोषित करून महिलांना जीवनातील बदलाला मोठी चालना दिली आहे. अलीकडच्या काळात सर्वच क्षेत्रात महिला सबलीकरणाचे धोरण राबवले जात असून त्यामुळे विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

सारांश महिला स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांचा सत्ता विभागणीत समान वाटा निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक आर्थिक तसेच राजकीय जीवनात त्याबाबतची समानता प्राप्त करणे होय. महिलांच्या सबलीकरणासाठी स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्य नंतर झालेले कायदे, घटनात्मक अधिकार आणि विविध महिला धोरणे यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

भारत सरकारने स्त्री उद्धारासाठी केलेले कायदे

- बालहत्या प्रतिबंध पहिला कायदा 1802
- सतीबंदी कायदा 1819
- विधवा पुनर्विवाह चा कायदा 1856
- नोंदणी विवाह कायदा 1872 आणि 1954
- बालविवाह प्रतिबंधक कायदा 1878 आणि 2006
- देवदासी प्रतिबंधक कायदा 1891
- संमती वयाचा कायदा 1891
- आंतरजातीय विवाह बाबतचे पटेल बिल 1921
- बालविवाहाचा शारदा कायदा 1929
- हिंदू विवाह कायदा 1955
- घटस्फोटाचा कायदा 1955
- पोटगी कायदा 1956
- हुंडा प्रतिबंधक कायदा 1961, 1984, 1986
- मुलींचा अनैतिक व्यापार विरोधी कायदा 1956
- दत्तक घेण्याचा कायदा 1956
- वेश्या व्यवसाय प्रतिबंधक कायदा 1956
- गर्भपात कायदा 1972
- गर्भजल परीक्षण विरोधी कायदा 1994 व 2003
- स्त्रियांचे बीभत्स प्रदर्शन विरोधी कायदा 1982
- कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळाविरोधी कायदा 1994
- कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा 2005
- हिंदू वारसा दुरुस्ती कायदा 2005

वरील कायदे महिलांवर होणारे अन्याय अत्याचार थांबण्यासाठी व स्त्री पुरुष समानता निर्माण करण्यासाठी करण्यात आलेले आहेत, परंतु वास्तवात मात्र या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचे दिसून येते.

भारतीय संविधानातील तरतुदी -

स्वातंत्रप्राप्तीनंतर राज्यघटनेनुसार कायद्यासमोर स्त्री-पुरुषांना समानता देण्यात आली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासाची समान संधी मिळावी यासाठी भारतीय संविधानात काही तरतुदी करण्यात आल्या आहेत त्या पुढील प्रमाणे.

- कलम 14 कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतील त्यात स्त्री पुरुष असावेत केला जाणार नाही.
- कलम 15 यात लिंगाच्या आधारावर भेद केला जाणार नाही.
- कलम 16 यात लिंगाच्या आधारावर भेद केला जाणार नाही.
- कलम 19 भारतीय नागरिकांना विकासासाठी दिलेल्या सप्त स्वातंत्र्यात स्त्री पुरुष असा भेदभाव केला जाणार नाही.
- कलम 23 स्त्रियांची विविध कारणासाठी पिळवणूक करता येणार नाही (क्रयविक्रीय देवदासी प्रथा इत्यादी)
- कलम 39 बी स्त्री पुरुष यांना समान कामासाठी समान वेतनाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- कलम 42 महिलांना प्रसुतीकालीन रजेची तरतूद करण्यात आली आहे.
- कलम 52A स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि प्रत्येक भारतीयांनी तिची प्रतिष्ठा जपली पाहिजे.
- कलम 243B नुसार पंचायत राज किंवा शहरी स्थानिक संस्थांमध्ये कलम 73 व 74 व्या घटनादुरुस्तीनुसार महिलांसाठी 33 टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली 110 व्या घटनादुरुस्तीने 14 एप्रिल 2011 मध्ये यात वाढ करून 50 टक्के पर्यंत महिला आरक्षणाची तरतूद करण्यात आली.

असे असले तरी सर्वच स्त्रियांच्या बाबतीत याचा फार फायदा झाला असे म्हणता येणार येत नाही स्त्रियांना 50% राजकीय आरक्षण देऊनही त्यांचा मनावर तसा राजकीय सहभाग वाढला नाही निर्णय प्रक्रियेत त्यांना अजूनही डावलले जाते, आरक्षण कालावधी पुरतीच स्त्री राजकारणात असते आरक्षण संपले किती राजकारणाचा परिघाबाहेर जाते.

महाराष्ट्रातील महिला सबलीकरण

महाराष्ट्र राज्य हे देशातील पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. देशात पहिल्यांदा महिला धोरण तयार करणारे राज्य महाराष्ट्र होते 1994 मध्ये पहिल्या महिला धोरणाची घोषणा करण्यात आली होती, त्यानंतर 2001 मध्ये दुसरे महिला धोरण जाहीर झाले आणि 2014 मध्ये तिसरे महिला धोरण आखण्यात आले व आता 2023 मध्ये चौथ्या धोरणाची प्रतीक्षा आहे. राज्यातील या तिन्ही धोरणांनी महिलांना काय दिले हे तपासले तर मुलींना वडिलांच्या मालमत्तेत कायदेशीर अधिकार दिला घटस्फोट आणि पोटगीच्या कायद्यात काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या गेल्या महिलेला पतीच्या समान वाटा स्त्रियांना नोकरी 30%आरक्षण मिळाले स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50% आरक्षण मिळाले.

कायदेशीर मदतीसाठी राज्य महिला आयोग स्थापन झाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्व उत्पन्नातील 10% निधी महिला व बालकल्याणासाठी राखून ठेवण्यात आला त्यामुळे काही प्रमाणात महिलांच्या स्थिती सुधारणा झाल्याचे दिसून येते.

आता महाराष्ट्राची चौथे महिला धोरण येऊ घातले आहे मागील वर्षी या धोरणाचे प्रारूप जाहीर करण्यात आले या धोरणात एलजीबीटीक्यू (तृतीयपंथी समलैंगिक आदी) आणि वेश्या व्यवसायातील महिला यांच्या कल्याणाचा विचार करण्यात आला आहे. याशिवाय -

1. महिलांना वारसा हक्क मिळतो की नाही यावर सरकारची नजर.
2. महिलांच्या नावावर घर केल्यास मुद्रांक शुल्कात सवलत.
3. महिलांना जमीन भाडेतत्वावर देण्यासाठी प्राधान्य दिले जाईल.
4. महापालिका नगरपालिका स्थायी समितीमध्ये महिलांना आरक्षण.
5. महिलांसाठी स्वतंत्र सुरक्षित असे रात्र निवारे उभारणार.

6. प्लॉट घरांच्या खरेदी-वेळी महिलांना सामायिक मालकीचा हक्क देणार.
7. सार्वजनिक वाहन तळांवर महिलांसाठी शौचालय, रॅम, रेलिंग, चेंजिंग रूम, सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन, आपत्कालीन वैद्यकीय सेवा तसेच मदतीसाठी असलेले पॅनिक बटन सेवा ते दाबताच मदत यंत्रणा धावून येईल.
8. ऑटो, टॅक्सी, अवजड वाहनांसाठी चे परवाने देताना महिलांना प्राधान्य.

अशा अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी या धोरणात ठेवण्यात आल्या आहेत. असे असले तरी घरकाम करणाऱ्या महिला शेतकरी, विधवा महिला, कोविडमुळे व गिंग अर्थव्यवस्थेचा परिणाम असंघटित क्षेत्रातील महिलांवर होताना दिसून येतो. ऑनर किलिंगच्या घटना वाढताना दिसून येत आहे यावर देखील चौथ्या धोरणाचा धोरणात समावेश करायला हवा.

आतापर्यंतच्या विविध कायद्यांचा व योजनांचा आणि धोरणांचा अभ्यास करता प्रत्यक्षात स्त्रियांच्या जीवनात अशी समानता मिळत नाही हेच दिसून येते. पुरुष वर्गाच्या वर्चस्व वादामुळे महिलांना आजही प्रचंड दडपणाखाली जगावे लागते. शोषण विरहित समाज पुरुषप्रधान संस्कृतीच्या अंतशिवाय येऊ शकत नाही त्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे. समानतेचे ध्येय साध्य होण्यासाठी स्त्रियांची मानसिकता बदलणे आवश्यक आहे राज्यघटनेने व कायद्याने स्त्रीला अनेक अधिकार दिलेले आहेत जाणीव त्यांना होणे आवश्यक आहे आणि तेच घटक सबलीकरण प्रक्रियेला प्रभावी करीत आहेत.

संदर्भ ग्रंथ:

1. आधुनिक भारतातील स्त्रीजीवन HIS- 282 य. च. म. मुक्त विद्यापीठ नाशिक
2. महिलांचे राजकीय सक्षमीकरण- डॉ. दीपक पवार साईनाथ प्रकाशन नागपूर
3. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा सहभाग व सामाजिक परिवर्तन- डॉ. प्रमिला जाधव पानसंबळ, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
4. आधुनिक राजकीय विचार प्रमाणे प्रणाली -डॉ. शुभांगी राठी, अथर्व पब्लिकेशन जळगाव
5. विचार मंथन महाराष्ट्रातील स्थित्यंतरे- डॉ. प्रमोद पवार, अथर्व पब्लिकेशन, जळगाव
6. आधुनिक भारतातील महिला सबलीकरण- प्रा. ए बी महाजन.
7. दिव्य मराठी, मधुरिमा, प्रा निलीमा देशमुख - महिला धोरण काय मिळाले आणि काय हवे? दि. 21 फेब्रुवारी 2023.
8. सबलीकरणाला प्रभावित करणारे घटक- दिव्य मराठी 21.2.2023.
9. लोकमत दिनांक- ६ मार्च 2023.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, ज. जि. म. वि. प्र. सह समाजाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव

***

लिंगभाव आणि समाज : एक समाजशास्त्रीय अध्ययन

*डॉ.सुप्रिया आनंदराव देसाई

प्रस्तावना :

निसर्गनिर्मितीमध्ये सजिवसृष्टीत लिंगभेदानुसार नर व मादी या जातींची निर्मिती झाली असून, लिंगभेद हा शारीरिक भेदावरून निश्चित करण्यात आला. त्याला इतर कोणताही आधार दिला गेला नाही. मात्र मानवी समाजात या नर व मादी जातीचे पुरूष व स्त्री भेदामध्ये रूपांतर झाले. म्हणजेच लिंग हा शारीरिक भेदावर आधारित आहे. म्हणजेच तो जैविक स्वरूपाचा आहे. मात्र लिंगभाव हा सामाजिक व सांस्कृतिक घटकांवरून निर्धारित झाल्याचे स्पष्ट होते.

लिंगभावाची निर्मिती घडून येत नसून, तो समाजात घडवला जातो. स्त्रिया आणि पुरूषांना विशिष्ट प्रकारे वाढवले जाते, यात स्त्रीयांनी व पुरूषांनी कसे वागावे हे शिकविले जाते. याच स्त्रीत्व व पुरूषत्वाच्या कल्पना होत. ज्या माणसांच्या वागणुकीवर खोलवर प्रभाव टाकतात, त्याचबरोबर स्त्रिया आणि पुरूषांना साचेबध्द करून एकमेकांच्या विरूध्द उभे करतात. ज्यामध्ये उदा.स्त्रीने सहनशील, नम्र असावे तर पुरूषांना आक्रमक बनायला मुभा दिली जाते.

लिंगभाव हा सामाजिक–सांस्कृतिक संरचनातून घडवला जातो. जात, धर्म, वय इ. वेगवेगळ्या संस्कृतीनुसार लिंगभाव बदलत राहतो. पुरूषप्रधान समाजात लिंगभावाची जडण–घडण पुरूषांना झुकते, माप देणारी असते आणि तुलनेने स्त्रियांना पक्षपाताला अधिक तोंड द्यावे लागते. पुरूष कुटुंबप्रमुख, पुरूषाकडे मालमत्तेची मालकी, लग्न झाल्यावर स्त्रियांनी सासरी जाणे, पितृवंशीय व्यवस्था या सामाजिक प्रक्रिया आपली समाजव्यवस्था पुरूषप्रधान असल्याचे दर्शविते. अशा समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम बनते. याचा एक गंभीर परिणाम म्हणजे स्त्रियांवर होणारे अत्याचार.

अभ्यासपध्दती :

उद्दिष्टये :

१. सामाजिकरणाच्या प्रक्रियेतील लिंगभाव अभ्यासणे.

२. समाज अवस्थेतील लिंगभावावर आधारित स्त्री व पुरूष निगडीत गुणवैशिष्ट्यांचा वर्गीकरणाचा अभ्यास करणे.

३. आजच्या आधुनिक समाजव्यवस्थेतील स्त्री–पुरूष समानतेच्या वास्तवाचा अभ्यास करणे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत अभ्यासासाठी अभ्यासिकेने वर्णनात्मक संशोधन आराखडा अवलंबिला आहे.

संशोधनाचे स्त्रोत :

प्रस्तुत अभ्यासामध्ये अभ्यासकाने दुय्यम स्त्रोतांचा आधार घेऊन ग्रंथालय, संदर्भ साहित्य, वर्तमानपत्रातील लेखा यांचा अवलंब करून माहितीचे संकलन केले आहे.

१. सामाजिकरणाच्या प्रक्रियेतील लिंगभाव.

२. लिंगभाव आधारीत गुणवैशिष्ट्ये.

३. स्थळ वा कामाच्या ठिकाणांचे लिंगभावीकरण.

४. आधुनिक समाजातील लिंगभावाचे वास्तव.

१. सामाजिकरणाच्या प्रक्रियेमधून लिंगभाव :

मुलत: बालकांच्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेमधून लिंगभावाची बिजे रूजविली गेल्याचे स्पष्ट होते. स्त्री–पुरूषांमध्ये लैंगिक भेद असतात. बाळ जन्माला येतात तेंव्हा त्यांचे केवळ लैंगिक वर्गीकरण होत नसून, लिंगभावाची चौकटही त्यांच्याभोवती निर्माण केली जाते. बहुतांश संस्कृतीमध्ये मुलगी आणि मुलगा यांच्या जन्माचे स्वागत करण्याच्याही पध्दती वेगवेगळ्या आहेत. मुलामुलींची नावे विशिष्ट प्रकारचीच देणे, पोषाख वेगवेगळे असणे, त्यांच्यावर केले जाणारे संस्कारही वेगवेगळे करणे, त्यांच्या केले जाणारे व्यवहारिकही भिन्नभिन्न ठेवले जातात. या सर्व बाबींमधून त्यांना शिकविले जाते की, या समाजाचा सदस्य म्हणून राहताना तुम्ही स्त्री किंवा पुरूष म्हणून कसे वागले पाहिजे. यालाच 'सामाजिकरण' असे म्हणतात. लिंगभावाचे धडे शिकविणाऱ्या सामाजिकरणच्या या विशिष्ट प्रक्रियेला 'लिंगभावीकरण' असे म्हटले जाते. या सामाजिक प्रक्रियेतून मुलांमध्ये पुरूषत्व आणि स्त्रीत्व घडविले जाते, त्या प्रक्रियेशी संबंधित वर्तनातून ती पध्दतींना आणि भुमिकांना

आत्मसात करीत असतात. यांतून मुलगा आणि मुलगी यामध्ये आढळणाऱ्या फरकाला निसर्ग नाही, तर मुलामुलींचे पालन–पोषण, वाढ थोडक्यात त्यांचे घडून येणारे सामाजिकरणंच जबाबदार असते.

आपणांस विशिष्ट पध्दतीने घडविले जात आहोत, हे माहित नसल्यामुळे मुलेदेखील या भुमिका आत्मसात करीत असतात. यामुळे मुलगा आणि मुलगी यांच्यात विकसित झालेल्या वेगळेपणाला सर्वस्वी कुटुंब, समाज आणि शिक्षणपध्दती यांकडून दिली जाणारी वागणूक जबाबदार असते.

२. लिंगभाव आधारीत गुणवैशिष्ट्ये :

याच पुरूषप्रधान समाजाने ठराविक गुणवैशिष्टयांवर बाईपणाचा वा पुरूषपणाचा शिक्का मारून विनाकारण स्त्रीनिगडीत व पुरूषनिगडीत असे गुणवैशिष्टयांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. ज्यामध्येही त्यात एक प्रकारची उतरंडी आहे.

स्त्री	पुरूष
शरीर	मन व बुध्दी
निसर्ग	संस्कृती
भावना	विचार
खाजगी	सार्वजनिक

या वर्गीकरणानुसारही पुरूषी श्रेष्ठत्व स्पष्ट करण्यात आले आहे. बुध्दी आणि मन हे शरीरापेक्षा श्रेष्ठ समजले जाते. संस्कृती ही निसर्गापेक्षा अधिक सुधारित आणि म्हणून श्रेष्ठ, बुध्दीवादी व्यक्ती या भावनाशील व्यक्तींपेक्षा श्रेष्ठ यातून एवढेच सुचवायचे आहे की, स्त्रीया या निसर्गाप्रमाणे एक शरीर असतात व त्या प्राण्यांप्रमाणे प्रजननाचे काम करतात, तर पुरूष हे विवेकशील, विचारशील व कृतीशील असतात. ते निसर्गावर संस्कार करून त्यांचे संस्कृतीत रूपांतर करतात. यांमुळेच पुरूष हे निसर्गापेक्षा कितीतरी पटीने अधिक श्रेष्ठ असतात व निसर्गाला आपल्या इच्छेनुसार हव्या त्या साच्यात घडविण्याचे सामर्थ्य पुरूषांत असते.

३. स्थळ वा कामाच्या ठिकाणांचे लिंगभावीकरण :

केवळ गुणवैशिष्टयांचेच नव्हे तर स्थळांचेही लिंगभावीकरण झालेले असते. जसे की दारूचे गुत्ते, चहाची टपरी, पानाचे दुकान, रस्त्यांचे कोपरे किंवा चौक, गावचे पार ही पुरूषी स्थळे बनलेली आहेत. या ठिकाणी/स्थळांवर स्त्रियांनी पुरूषांसारखे रेंगाळू नये, अशी अपेक्षा असते. तर स्वयंपाकघर किंवा पाणवठा ही स्त्रीयांची ठिकाणे आहेत. आतापर्यंत तरी केवळ स्त्रीयांसाठी आरक्षित असलेले सार्वजनिक ठिकाण तयार झाले नाही. घरातील कांही वस्तुंचेही लिंगभावीकरण झालेले असते. जसे की, घरातील मोठे ताट, पेला, केंद्र खुर्ची किंवा पलंग हे पुरूषांच्या नावे राखीव केलेले असतात. सर्व वर्गातील स्त्रियांना कुटुंबात, कामाच्या ठिकाणी आणि समाजात आपल्या दुय्यमत्वाचे अनुभव वेगवेगळ्या रूपात येत असतात. यांत एकूण समाजात सोसावा लागणारा भेदभाव, दुर्लक्ष, अपमान, नियंत्रण, शोषण, पिळवणूक, हिंसा इ. समावेश असतो. या सर्वांचा तपशील वेगळा असला, तरी सुत्र समान असते.

समाजातील कुटुंब, धर्म, कायदा, राजसत्ता, शैक्षणिक व आर्थिक संस्था आणि प्रसारमाध्यमे व ज्ञानव्यवस्था यांच्या विश्लेषणातून हे स्पष्ट होते की, पुरूषसत्ताक संरचनेचे ते आधारस्तंभ आहेत. अशाप्रकारे खोलवर मुळे रूजलेल्या भक्कम व्यवस्थेमुळे पुरूषसत्ता अभेद्यच नव्हे तर नैसर्गिक भासते. अशा या पुरूषसत्ता समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीवर नियंत्रण ठेवून तिला दुय्यम ठरविण्यासाठी विविध प्रकारच्या हिंसेचा वापर केला जातो. अश हिंसेला अधिमान्यताही दिली जाते. स्त्रीवाद्यांच्या मते, स्त्रीविरोधी हिंसा ही केवळ सार्वत्रिक नसून पुरूषसत्ताक समाजाचे ती एक व्यवस्थात्मक अंग आहे.

४. आधुनिक समाजातील लिंगभावाचे वास्तव :

शिक्षण आणि सर्वांगीण आधुनिकता वा विकास यांमुळे स्त्री–पुरूषांमध्ये समानता प्रस्थापित व्हायला हवी, पण होईलच असे नाही. कारण बऱ्याचदा शिक्षण हेच पुरूषसत्ताक असते आणि स्त्री–पुरूषातील प्रस्थापित विषमता न्याय ठरवून ती रूजविण्याचा किंवा विषमतेकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न त्यात केलेला असतो. साहित्यांच्या विश्लेषणात लिंगभावात्मक पुर्वग्रह जोपासताना लिखाणाचा कल पुरूषांकडे अधिक झुकलेला असतो. अशा प्रकारचे पुर्वग्रह साधारणत: सर्व शैक्षणिक ज्ञानशाखांमध्ये आढळतात. सर्व ठिकाणच्या स्त्री चळवळींचा व स्त्री अभ्यासकांचा लढा मुख्यत: याच मुद्यावर राहिलेला आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, लिंगभाव म्हणजे स्त्रियांचा वेगळा विचार नव्हे तर समाजातील स्त्रिया आणि पुरूषांची सापेक्ष सामाजिक स्थिती जाणून त्यांच्या अस्मितांचाच विचार झाला पाहिजे. त्यांच्या अस्मिता समजावून घेवून संवेदनशील दृष्टीकोनातून चिकित्सा होणे गरजेचे आहे.

भारतात सध्या 'विकास' हा सामाजिक–राजकीय मंत्र बनलेला असल्यामुळे आर्थिक वाढीचा स्त्रियांनाही खुप फायदा होतो आहे. असे सर्वसाधारण चित्र निर्माण केले जाते. प्रत्यक्ष परिस्थिती मात्र काही वेगळेच सांगते. EM2030 या संस्थेने 'Gender Index' प्रकाशित केले. ज्यामध्ये त्यांनी भारतातील लिंगभाव समानतेचा आढावा घेतला गेला. यांमध्ये त्यांनी नवजात बालक व मातांसाठी केलेल्या सुविधा, महिलांचे सक्षमीकरण, आणि महिलांची आर्थिक स्थिती या तीन घटकांचा आढावा घेतला गेला. या अहवालानुसार असे दिसून येते की, भारताला अजुनही या समस्यांवर ठोस उपाय शोधावे लागतील आणि बराच मोठा पल्ला गाठावयाचा आहे. यामध्ये इथल्या सत्ताधाऱ्यांची आणि धोरणकर्त्यांची अपुरी समज आणि पुरूषप्रधान मानसिकता ही भारतातील एक महत्वाची अडचण आहे. याला कुठलेच सरकार अपवाद नाही. 'विकासाच्या' रेट्यात केवळ आर्थिक आकडेमोड करून चालणार नाही तर मुळात आपल्या समाजात रूढ असलेली शोषक पितृसत्ताक पध्दती आणि तिच्यामुळे निर्माण होणारी असमानता याचीही चर्चा होणे आवश्यक आहे. यांमधील सकारात्मक एक बाब म्हणजे 'जेंडर बजेटिंग' विषयी किमान कागदोपत्री तरी सजगता आल्याचे दिसून येते. अधिकाधिक जनजागृतीमुळे आणि संघटनांच्या कार्यामुळे बदल हळूहळू घडेल हे निश्चित!

निष्कर्ष :

१. स्त्री (मुलगी) आणि पुरूष (मुलगा) यांमध्ये आढळणाऱ्या फरकाला निसर्ग नाही, तर मुलामुलींचे घडून येणारे सामाजिकरणच जबाबदार असते.

२. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये विनाकारण स्त्री व पुरूष यांच्याशी निगडीत गुणवैशिष्ट्यांचे वर्गीकरण करण्यात आले असून त्यामध्ये एक प्रकारची उतरंडी आहे. त्यानुसार पुरूषी श्रेष्ठत्व स्पष्ट करण्यात आले आहे.

३. वास्तवात सत्ताधाऱ्यांची आणि धोरणकर्त्यांची अपुरी समज आणि पुरूष–प्रधान मानसिकता ही लिंगभाव टिकून राहण्यासाठी जबाबदार आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. आगलावे, प्रदीप (२०००) : 'आधुनिक भारतातील सामाजिक समस्या', विद्या प्रकाशन, नागपूर.
२. आहुजा, राम (२०००) : 'सामाजिक समस्याँ', रावत पब्लिकेशन, जयपूर.
३. मारूळकर व पाडळकर (२०१९) : 'भारतातील सामाजिक समस्या', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
४. मारूळकर व पाडळकर (२०२१) : 'लिंगभाव आणि हिंसाचार', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
५. साने, गीता (२०१०) : 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशन, पुणे.
६. खंडागळे, चंद्रकांत (२०२१) : 'लिंगभाव हिंसाचार' मिरर प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर.
७. शर्मा, जी.एफ. (२०१६) : 'सामाजिक मुद्दे, रावत पब्लिकेशन, जयपुर.
८. यसीन कमला (२०१०) : 'लिंगभाव समजून घेताना' न्यू एज प्रिंटिंग प्रेस, मुंबई.
९. जेजुरकर, क्रांती (२०११) : 'लिंगभाव संवेदनशीलता', न्यू एज प्रिंटींग प्रेस, मुंबई.

*सहा.प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज, अर्जुननगर.

***

'तृतीयपंथी समुदायासोबत होणारे भेदभाव आणि उपाययोजनांचा अभ्यास'

***अरविंद अनिल घोडके**

प्रस्तावना:

सध्या भारतीय समाजात अनेक ज्वलंत समस्यांपैकी तृतीयपंथी व्यक्तींसोबत होणारा भेदभाव आणि हिंसाचार ही एक गंभीर समस्या आहे. लिंगाधारित भेदभावाचे बळी म्हणजे तृतीयपंथी व्यक्ती होय. तृतीयपंथी ही अशी व्यक्ती असते जिची लिंग ओळख जन्माच्या वेळच्या लिंगापेक्षा वेगळी असते. जन्मावेळी मिळालेल्या लिंगापेक्षा विरुध्द लिंगी वर्तन करणारी व्यक्ती तृतीयपंथी म्हणून ओळखली जाते. स्त्री आणि पुरुष या दोनच लिंगांचे अस्तित्व मानणाऱ्या भारतीय समाजात तृतीयपंथी व्यक्तीवर्षानुवर्षे अनेक प्रकारचे भेद्भाव आणि असमानता सहन करीत आहेत. स्व: ओळख प्राप्त करण्यासाठी कित्येक वर्षे समाज व्यवस्थेशी संघर्ष करीत आहे.हा समुदाय पिढ्यानपिढ्या वंचित, दुर्लक्षित, उपेक्षित, भेदभावपूर्ण आणि असुरक्षित जीवन जगत आलेला आहे.

तृतीयपंथी समुदाय इतर समुदायाच्या तुलनेत विविध भेदभाव आणि हिंसाचाराला बळी पडलेला आहे. त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. उदरनिर्वाहाची कोणतेही सन्मानीय समाजमान्य मार्ग उपलब्ध नसल्यामुळे नाईलाजास्तव शरीरविक्रय करावा लागत आहे. त्यांना देवा-धर्माच्या नावावर पैसे मागून गुजराण करावी लागते.कुटुंब तसेच समाजाकडून शारीरिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागतो. घरातून बेदखल केल्यामुळे भावनिक तसेच आर्थिकदृष्ट्या संपूर्ण परावलंबी जीवन जगावे लागते. समाजातील विविध घटकांकडून त्यांचे लैंगिक शोषण, बलात्कार, अन्याय अत्याचार केले जातात. या अन्याय अत्याचाराची पुसटशी दखलही कायदा किंवा न्याय व्यवस्थेकडून घेतली जात नाही. सर्व प्रकारच्या मुलभूत अधिकार आणि हक्कांपासून वंचित ठेवला गेलेला हा अल्पसंख्यांक समुदाय अत्यंत हलाखीचे, घृणास्पद आणि अपमानित जीवन जगत आहे. स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाची ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातूनवर्तमान परिस्थितीत तृतीयपंथी समुदायाबरोबर केले जाणारे भेदभाव आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या यांचा अभ्यास करण्यात आलेला असून त्यासंबंधित उपाययोजनावरही दृष्टिक्षेप टाकण्यात आलेला आहे.

संशोधन हेतू :

१. तृतीयपंथी समुदायाशी निगडीत भेदभावाचा अभ्यास करणे.

२. तृतीयपंथीयांसोबत होणारा भेदभाव कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधन पद्धती : सदर शोध निबंध लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यातआलेला आहे.

संशोधन स्त्रोत : प्रस्तुत शोध निबंध लेखनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे.यामध्ये उपलब्ध संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, मासिके या सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे.

सैद्धांतिक दृष्टिकोन :

प्रस्तुत शोध निबंधाचे लिखाण करताना 'सामाजिक वांचितता' या सैद्धांतिक दृष्टिकोनाचा आधार घेतलेला आहे. सामाजिक वंचितता म्हणजे जेव्हा एखादी व्यक्ती, समुदाय अथवा समूह एखाद्या विशिष्ट समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच राजकीय व्यवस्थेपासून वंचित ठेवले जाणे होय. या प्रक्रियेमध्ये एखाद्या समुद्याला सर्व प्रकारच्या सामाजिक क्रिया-प्रकियामध्ये सहभागी होण्यापासून वंचित ठेवले जाते. त्यांच्याशी वेगवेगळ्या पातळयांवर भेदभाव केला जातो. त्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार व हक्क मिळू दिले जात नाहीत. उदा. व्यक्तीचे आरोग्य, शिक्षण, उदरनिर्वाह, कल्याणकारी योजना तसेच निवारा यासारखे मुलभूत हक्क नाकारले जातात. जगभरातील लोक धर्म, अपंगत्व, वंशिकता, रंगभेद, लिंगभेद, स्थलांतर तसेच गरिबी या विविध कारणांमुळे व्यक्ती किंवा समूह सामाजिक वंचितता अनुभवत आहेत. यामध्ये बहुसंख्य लोकांच्याकडून सामाजिक भेदभावकेला जातो.

या अर्थाने तृतीयपंथी समुदायाला जाणीवपूर्वक सर्व पातळयांवर वर्षानुवर्षे दुर्लक्षित आणि वंचित ठेवले आहे. त्यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय हक्क आणि अधिकार नाकारले गेले आहेत.सर्वच क्षेत्रात त्यांच्याशी भेदभाव केल्यामुळे त्यांना सामाजिक बहिष्कृतपणाचे जीवन जगावे लागत आहेत.सामाजिकदृष्ट्या वंचित राहिलेला हा तृतीयपंथी समुदाय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही समाजच्या मुख्य प्रवाहात येऊ शकलेला नाही.

आशय विश्लेषण :

तृतीयपंथी समुदायाबरोबर केले जाणारे भेदभाव :

तृतीयपंथी व्यक्तींना विविध प्रकारच्या भेदभाव आणि समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामुळे त्यांचे जीवन कमालीचे अन्यायग्रस्त, हलाखीचे आणि घृणास्पद बनले आहे. खालील विविधमुद्द्यांच्याआधारे त्यांच्यासोबत विविध पातळ्यांवर होणारे भेदभाव आणि त्यातून निर्माण झालेल्या विविध समस्या याची दाहकता समजून येण्यास मदत होईल.

स्व: ओळख नाकारणे:

स्त्रीलिंग आणि पुल्लिंग या दोनच ओळखींना प्राधान्य असणाऱ्या भारतीय समाज व्यवस्थेत तृतीयपंथीयांना त्यांची स्व: ओळख नाकारलेली आहे. समाजाने त्यांना अजूनही पूर्णपणे स्वीकारलेले केलेले नाही.त्यांच्याकडे घृणास्पद दृष्टीनेच पहिले जाते. सर्वच क्षेत्रात भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते.भारतीय समाज जीवनात व्यक्तीचे नाव, पेहराव, केसांची रचना, दिसणे, वर्तणूक, व्यवसाय इत्यादीतून विशिष्ट लिंगाचाच निर्देश केला जातो. व्यक्तीचा जन्मदाखला, रेशन कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट, वाहन परवाना, जात दाखला हेच दर्शवितात. सार्वजनिक सेवा, दळणवळण साधने, एसटी, बसेस, विमाने, रेल्वे, सार्वजनिक शौचालये, बाथरूम सर्वच ठिकाणी स्त्रीलिंगी व पुल्लिंगी व्यक्तींनाच प्राधान्य दिले जाते.तृतीयपंथीयांना कोणत्याही क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळालेले नाही.त्यांचे अस्तित्व पूर्णत: दुर्लक्षितकेलेले आहे. त्यांचा स्व: ओळख जपण्याचामुलभूत हक्कच डावलला गेला आहे. स्व: ओळख हिरावून घेतलेला हा समुदाय वर्षानुवर्षे अन्यायग्रस्त जीवन जगत आहेत.

कुटुंबाकडून होणारा भेदभाव:

बहुतांशी तृतीयपंथी व्यक्ती कुटुंबापासून आपली खरी ओळख लपवून ठेवतात. पालकांच्या समोर आपली ओळख उघड केल्यास त्यांना शारीरिक मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. पाल्याने वेगळी लैंगिक ओळख दाखविल्यास अथवा विरुद्ध लिंगी वर्तन केल्यासघरातील सदस्यांकडून भेदभाव केला जातो.पालकांच्या अज्ञानामुळे पाल्याच्या अशा वर्तनाला मानसिक आजार किंवा विकृती मानून डॉक्टर अथवा मानसोपचार तज्ञाकडे उपचार घेतले जातात.यासाठी निरनिराळी औषधे,इंजेक्शन दिली जातात. ग्रामीण भागात तर यांचे देवाशी लग्न लावले जात होते. बहुतांशी पालक अशा मुलांच्या बाबतीत सुरक्षात्मक भूमिका घेत नाहीत. घरातील सदस्यांच्या समोर शाब्दिक टीका, टिंगल टवाळी, अपमान तसेच मारहाणही केली जाते. त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते. समाजात आणि नातेवाईकात कुटुंबाची प्रतिष्ठा कमी होईल या भीतीने अशा मुलांना घरातून हाकलून दिले जाते. त्यांचा भावनिक व आर्थिक आधार हिरावून घेतला जातो. वडीलोपार्जित संपत्तीतून हद्दपार केले जाते. त्यांचे कौटुंबिक वारसा हक्क काढून घेतले जातात.सर्वच बाजूंनी असहाय झालेले तृतीयपंथी उदरनिर्वासाठी नाईलाजास्तव शरीरविक्रय करून तसेच भिक मागून चरितार्थ चालवतात.

समाजाकडून भेदभावपूर्ण वागणूक:

समाजातील लोकांच्या चुकीच्या मानसिकतेमुळे तृतीयपंथी व्यक्तींचा स्थानिक लोक, शेजारी, गुंड, पोलीस, नागरिक यांच्याकडून तिरस्कार केला जातो.त्यांच्याकडे घृणास्पद दृष्टीने पाहिले जाते. यांच्याविषयी चुकीची, अतिरंजित आणि भीतीदायक मते पसरवली जातात.गैरसमज आणि अज्ञानामुळे समाज त्यांच्यापासून अलिप्त राहतो. त्यांच्याशी भेदभाव करतो. विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रम, सण उत्सवांमध्ये त्यांना जाणीवपूर्वक टाळले जाते.त्यांना सदैव समाजाच्यानकारात्मकतेला सामोरे जावे लागते. संपूर्ण समाजातील एक दुर्लक्षित आणि अदृश्य घटक म्हणून तृतीयपंथी उपेक्षिताचे जीवन जगत आहेत.तृतीयपंथी समुदाय सामाजिक बहिष्कृतपणा अनुभवत आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही समाजाचा त्यांच्याकडे माणूस म्हणून पाहण्याचा दृष्टिकोनही विकसित होऊ शकलेला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

शैक्षणिक पातळीवरील भेदभाव:

वेगळी लैंगिक ओळख प्राप्त झालेल्या मुलांना शाळा महाविद्यालयातूनच शारीरिक आणि मानसिक छळ सहन करावा लागतो. त्यांचे शोषण केले जाते.वर्गमित्र, विद्यार्थी, शिक्षक, शिपाई तसेच प्रशासकीय कर्मचारी यांच्याकडून लैंगिक अत्याचार केले जातात. प्रसंगी बलात्कारही केले जातात.शाब्दिक टीका, चिडवणे, टिंगलटवाळी, अश्लील शेरेबाजी या गोष्टी त्यांच्यासोबत सर्रास घडतात. अशी मुलं मानसिक पातळीवर एकटी पडतात. त्यांना घरातून, शाळा महाविद्यालयातून भावनिक पाठिंबा मिळत नाही. शाळा महाविद्यालयांमध्ये समुपदेशन अथवा मार्गदर्शनाची पर्याप्त

सोय नसल्यामुळे त्यांचे मानसिक खच्चीकरण होते. परिणामी अनेक मुलं शिक्षण अर्धवट सोडून देतात. शिक्षण प्रवाहातून बाजूला फेकली जातात. पुरेसे शिक्षण नसल्यामुळे या व्यक्ती आर्थिकदृष्ट्या परावलंबी जीवन जगतात. शिक्षण व्यवस्थेशी संबंधित घटकांमध्ये यांच्या प्रश्नांविषयी असलेली अनभिज्ञता, अज्ञान आणि गैरसमजुतीतून त्यांच्या शारीरिक तसेच मानसिक प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाते.

वैवाहिक जीवनाच्या हक्काबाबत भेदभाव :

भारतीय समाज व्यवस्थेत स्त्री आणि पुरुषांचाच विवाहाचा हक्क मान्य करण्यात आलेला आहे. विरुध्द लिंगी वर्तन करणाऱ्या किंवा वेगळी लैंगिक ओळख धारण करणाऱ्या व्यक्तींना विवाहाचा अधिकार नाही. तृतीयपंथी व्यक्तींचाही विवाहाचा हक्क अमान्य करण्यात आला आहे. तृतीयपंथी व्यक्तीचा विवाह कायद्याने अनैसर्गिक किंवा निसर्ग नियमांच्या विरुध्द वर्तन मानून निषिध्द ठरवला आहे.त्यामुळे या व्यक्ती विवाह करू शकत नाही. इच्छा असतानाही त्यांना आपले कुटुंब स्थापन करता येत नाही. समाजमान्य मार्गाने लैंगिक गरजांची पूर्तता करता येत नाही. परिणामी अनेक तृतीयपंथी नातेसंबंधात (लिव्ह इन रिलेशनशिप) राहतात. अशी नाती फार काळ टिकत नाही. अशा नातेसंबंधात त्यांचे लैंगिक तसेच आर्थिक शोषण केले जाते. त्यांच्या भावनेचा फायदा उठवून फसविले जाते. फसविले गेल्यामुळे अशा व्यक्ती निराशेच्या गर्तेत जातात. व्यसनाधीन बनतात. एकाकी आणि उद्ध्वस्त जीवन जगतात.

नोकरी, व्यवसाय तसेच कामाच्या ठिकाणचा भेदभाव:

तृतीयपंथी व्यक्तींना उदरनिर्वाहाची समाजमान्य साधने मिळवण्यात प्रचंड अडचणी येतात. त्यांना खाजगी अथवा सरकारी नोकरीत सहजासहजी सामावून घेतले जात नाही. कमी वेतनावरहलक्या दर्जाचीकामे त्यांच्याकडून करवून घेतली जातात. उदरनिर्वाहासाठी त्यांना देवधर्म करणे, देव बसवणे, देवीचा जागर करणे, देवाच्या नावावर पैसे मागणे (मंगत) शरीर विक्रय करणेअशी घृणास्पद कामे करावी लागतात.कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण तसेच मारहाणही केली जाते.परिणामी त्यांना कामाची संधी अथवा उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध होत नाहीत.शिक्षित तसेच काही कौशल्य आत्मसात केलेल्या तृतीयपंथीयांना तृतीयपंथी असल्यामुळे नोकरीच्या संधी नाकारल्या जातात. उदरनिर्वाची पर्याप्त साधने नसल्यामुळे त्यांना आयुष्यभर आर्थिकदृष्ट्यापरावलंबी जीवन जगावे लागते. त्यांना सन्मानाने जगण्यासाठी उदरनिर्वाहाच्या विविध संधी उपलब्धकरून देणे ही समाजाचे उत्तरदायित्व आहे.

आरोग्याच्या सोयी सुविधांच्या हक्काबाबत भेदभाव:

तृतीयपंथीयांच्या आरोग्याचे प्रश्न अतिगंभीर आहेत. त्यांना अनेक शारीरिक व मानसिक आजारांना सामोरे जावे लागते. शरीरविक्रय करणाऱ्या अनेक तृतीयपंथी व्यक्तींना गुप्तरोग,एचआयव्ही तसेच इतर शारीरिक आजार होण्याचे धोके असतात. यासाठी सरकारी दवाखान्यात मापक व मोफत वैद्यकीय औषधोपचार मिळणे आवश्यक असते. मात्र त्यांना पुरेशा वैद्यकीय सोयी सुविधा मिळत नाहीत. उपचाराच्या दरम्यान डॉक्टर्स, कंपाउंडर, शिपाई यांच्याकडून लैंगिक शोषण केले जाते.अनेक तृतीयपंथी लिंगबदल, कृत्रिम स्तनवाढ, केशरोपण,मातृत्वासाठी गर्भाशय रोपण शस्त्रक्रिया करून घेतात. त्यासाठी महागडी औषधे तसेच इंजेक्शन घ्यावी लागतात. हे सर्व औषधोपचार आणि शस्त्रक्रिया खर्चिक, न परवडणाऱ्या तसेच आरोग्यास घातक असतात. सरकारच्या उदासीन आणि नकारात्मक भूमिकेमुळे दुर्दैवाने तृतीयपंथी व्यक्तींना सरकारकडून मोफत व माफक दरात विविध वैद्यकीय सोयीसुविधामिळण्यात भेदभाव होतो. परिणामी त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते.

निवारा मिळविण्यातील भेदभाव :

तृतीयपंथीयांच्या निवाऱ्याचाही प्रश्न उग्र बनलेला आहे. भारतात कोणत्याही भागात तृतीयपंथी व्यक्तीला राहण्यासाठी सहजासहजी जागा मिळत नाही. त्यांच्या वेगळ्या ओळखीमुळे त्यांना कोणीही घर, फ्लॅट, भाडेकरू म्हणून जागा देत नाही.श्रीमंत वस्त्या, उंची हॉटेल्स, चाळी अशा ठिकाणी त्यांना भाडेतत्त्वावर राहण्यासाठी अनेक अडचणी येतात. त्यांच्याकडे ओळखीचे पुरावे नसणे, तृतीयपंथी भाडेकरू स्वीकारण्याची मानसिकता नसणे तसेच अविश्वास यामुळे घरमालक, हॉटेलमालक,अपार्टमेंटस तसेच गृहनिर्माणसोसायटीत तृतीयपंथी व्यक्तीला सहजासहजी घर अथवा खोली देण्यास तयार होत नाहीत.परिणामी तृतीयपंथी शहरापासून दूर उपनगरात, दलित वस्त्या, झोपडपट्टी भागात किंवा गलिच्छ वस्त्यात अधिक भाडे देऊन असुरक्षित जीवन जगतात. त्यांना कायमचा आसरा मिळत नाही. भारतीय राज्यघटनेने मान्य केलेला निवाऱ्याचा हक्क तृतीयपंथींना अजून तरी मिळालेला नाही.

आर्थिक क्रिया उत्पादन क्षेत्रातील भेदभाव:

विविध आर्थिक क्रिया, चलन वलन, उत्पादन तसेच रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात तृतीयपंथीयांचे अस्तित्व नगण्य आहे. कोणत्याही प्रकारची संधी नसणे,अपुरे शिक्षण, कौशल्याचा अभाव, तांत्रिक ज्ञानाचा अभाव, व्यवसाय करण्यास पुरेसे भांडवल नसणे इ. विविध कारणामुळे तृतीयपंथी समुदाय सर्व प्रकारच्या आर्थिक प्रक्रियेतून बाजूला फेकला गेल्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागास राहिला आहे. रोजगाराच्या पुरेश्या संधी नसल्यामुळे उदरनिर्वासाठी त्यांना पदोपदी संघर्ष करावा लागत आहे. आर्थिक मागासलेपणामुळे अत्यंत हलाखीच्या आणि गरीबीच्या परिस्थितीत तृतीयपंथी समुदाय जीवन जगताना दिसतात.

कायदेशीर न्याय प्रक्रियेतील भेदभाव:

कायदा सर्वांसाठी समान असला तरी प्रत्यक्षात भारतीय समाज व्यवस्थेत तृतीयपंथींना न्यायासाठी संघर्ष करावा लागत आहे. न्याय मिळवण्याच्या प्रक्रियेत सर्वात शेवटच्या स्थानी तृतीयपंथी आहेत.त्यांच्याशी संबंधित गुन्हे नोंद करण्यास बऱ्याच वेळा पोलिसांकडून टाळाटाळ तसेच दिरंगाई केली जाते. तपासणी दरम्यान त्यांचा छळ तसेच शोषण केले जाते. सामुहिक बलात्काराला बळी पडलेले तृतीयपंथी पोलिसांकडून आलेल्या वाईट अनुभवामुळे पोलिसांची मदतघेण्यास अनुत्सुक असतात. गुन्हेगार किंवा अत्याचारी व्यक्तीकडून लाच घेऊन गुन्हे नोंद केले जात नाहीत. त्यांच्या केसेस कोर्टासमोर येऊ दिल्या जात नाहीत. यांच्यासोबत होणारे बलात्कार, लैंगिक शोषण, पिळवणूक, छळ, अत्याचार, खून याविरुद्ध आवाज उठवला जात नाही. यांची फारशी दखलही घेतली जात नाही. परिणामी तृतीयपंथी न्यायापासून वंचित राहतात. कायद्याची समानता यांच्याबाबतीत कागदावरच राहिलेली आहे. तृतीयपंथीयांच्या विवाहाला कायद्याने अजूनही मान्यता दिलेली नाही हेन्यायातील भेदभावाचे ज्वलंत उदाहरण सांगता येईल.

निष्कर्ष :

१. भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकाला दिलेला स्व: ओळख जपण्याचा हक्क तृतीयपंथीयांच्या बाबतीत डावलला गेला आहे.

२. कुटुंबातील सदस्यांकडून तृतीयपंथी व्यक्तीसोबत भेदभाव केला जातो. त्यामुळे अशा व्यक्तींना कुटुंबापासून आपली खरी ओळख लपवावी लागते.

३. उपलब्ध संदर्भ साहित्याच्या वाचनातून असे दिसून येते की, समाजाने तृतीयपंथी यांचे अस्तित्वच दुर्लक्षित केलेले आहे.

४. शाळा महाविद्यालय पातळीवर वेगळी लैंगिक ओळख मिळालेल्या विद्यार्थ्यांसोबत भेदभाव होतो त्यामुळे त्यांना मध्येच शिक्षण सोडावे लागते.

५. तृतीयपंथी व्यक्तीला विवाहाचा हक्क नसल्यामुळे त्यांना समाजमान्य मार्गाने लैंगिक गरजांची पूर्तता करता येत नाही.

६. तृतीयपंथी व्यक्तीला त्यांच्या वेगळ्या लैंगिक ओळखीमुळे उदरनिर्वाहाची समाजमान्य साधने मिळत नाही.

७. कामाच्या ठिकाणी यांच्याशी भेदभावपूर्ण वर्तणूक केली जाते तसेच लैंगिक शोषणही केले जाते.

८. सरकारकडून मोफत व माफक दरात औषधोपचार, वैद्यकीय सोयी सुविधा मिळत नसल्यामुळे यांच्या आरोग्याच्याबाबतीत अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या आहेत.

९. तृतीयपंथी व्यक्तींना मुख्य वस्ती, गृहनिर्माण सोसायटी, हॉटेल्स तसेच भाडेतत्वावर राहण्यासाठी घरे अथवा जागा दिली जात नाही.

१०. तृतीयपंथी समुदायाला सर्व प्रकारच्या आर्थिक प्रक्रियेपासून वंचित ठेवल्यामुळे आर्थिकदृष्ट्या मागास आणि परावलंबी जीवन जगत आहे

११. तृतीयपंथी व्यक्तींसोबत होणाऱ्या अन्यायअत्याचार बाबत न्याय मिळत नाही.

वरील विविध मुद्यांच्या सहाय्याने हे निदर्शनास येते की, तृतीयपंथी समुदायाबरोबर जवळपास सर्वच पातळयावर भेदभाव केला जातो. त्यांना असमान वागणूक दिली जाते. त्यांचे मुलभूत हक्कच डावलले जातात. हे भेदभाव आणि असमानता कमी करण्याच्या दृष्टिकोनातून संशोधकाने खालील उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तृतीयपंथी समुदायासोबत होणारे भेदभाव कमी करण्यासाठी उपाययोजना :

तृतीयपंथीयांसोबत होणारे भेदभाव कमी करण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाज, शासन आणि प्रत्येक नागरिकाने त्यांच्याप्रती संवेदनशील राहून काही गोष्टी करणे गरजेचे आहे. त्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. तृतीयपंथी व्यक्तींना शिक्षण प्रवाहात आणणे. त्यांना सरकार मार्फत व्यावसायिक, तांत्रिक तसेच कौशल्याधारित शिक्षण देण्याची सोय करणे.

२. तृतीयपंथीयांना विविध व्यवसाय, स्वयंरोजगार, लघु उद्योग सुरू करण्यासाठी बिनव्याजी भाग भांडवल पुरवणे.यासाठी त्यांना प्रशिक्षित करणे.

३. सरकारी तसेच खाजगी नोकऱ्यांमध्ये चार टक्के आरक्षण देऊन तृतीयपंथींना प्राधान्य देणे.

४. शाळा, महाविद्यालय, पोलिस यंत्रणा, दवाखाने, सरकारी कार्यालय तसेच इतर आस्थापना विभागातील सर्व घटकांमध्ये तृतीयपंथीयांच्या प्रश्नांसंबंधी जाणीवजागृती निर्माण करणे. तसेच त्यांचे समुपदेशन करणे.

५. शाळा महाविद्यालयांमध्ये समलिंगी, उभयलिंगी, व्दिलिंगी व तृतीयपंथी मुला-मुलींसाठी समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र सुरू करणे.

६. सरकारी दवाखान्यातून मोफत व माफक दरात तृतीयपंथींसाठी वैद्यकीय तपासणी, सल्ला व मार्गदशन, समुपदेशन, औषध उपचार तसेच विविध शस्त्रक्रियांची सोय करण्यात यावी.

७. तृतीयपंथी व्यक्तींनी समाजमान्य मार्गाने उदरनिर्वाह करता येण्यासाठी जास्तीत जास्तसंधी उपलब्ध करून देणे जेणेकरून त्यांचे आर्थिक परावलंबित्व कमी करता येईल.

८. तृतीयपंथीयांच्याबाबतीत असलेले गैरसमज वा अज्ञान दूर करण्यासाठी आणि त्यांना समजून घेण्यासाठी त्यांच्याशी सातत्याने संवाद तसेच चर्चा घडवून आणाव्यात.

९. तृतीयपंथी व्यक्तींना विविध सामाजिक उपक्रम तसेच कार्यक्रमांमध्ये सन्मानपूर्वक सामील करून घेण्यात यावे जेणेकरून त्यांचा सामाजिक क्षेत्रातील सहभाग वाढेल. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊन वागण्यात सहजता येईल.

१०. विना विलंब तसेच विना अडथळा तृतीयपंथीयांना त्यांच्या ओळखीचे पुरावे, आधार कार्ड, रेशन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, बँक पासबुक अशी अत्यावश्यक कागदपत्रे देणारी सुलभ यंत्रणा राबवली जावी.

११. तृतीयपंथींयांच्या निवाऱ्याची सोय व्हावी म्हणून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी होस्टेल्स,निवासी घरे, गृहनिर्माण सोसायटी तसेच घरकुल योजना सरकारी अनुदानातून उभारण्यात याव्यात.

१२. तृतीयपंथींच्या उदरनिर्वासाठी दरमहा किमान काही रक्कम बेरोजगार भत्ता किंवा पेन्शन म्हणून सुरू करण्यात यावी.

१३. तृतीयपंथी व्यक्तींना रेशनकार्ड वर मोफत धान्य तसेच जीवनावश्यक वस्तू पुरविल्या जाव्यात.

१४. तृतीयपंथी समुदायाला त्यांच्या हक्क आणि कर्तव्याबाबत जागृत करण्यासाठी प्रबोधनपर कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करणे आवश्यक आहे.

१५. तृतीयपंथीयांशी संबंधित गुन्ह्यांची तात्काळ दखल घेऊन त्यांना जलद गतीने न्याय देण्यात यावा जेणेकरून त्यांचा पोलीस व कायदा यंत्रणेवरील विश्वास वाढेल.

१६. तृतीयपंथी कल्याणकारी मंडळांच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सरकारपर्यंत पोहोचवता येतील.

१७. तृतीयपंथी समुदायानेही कालानुरूप सुयोग्य बदल स्वीकारून जुन्या रूढीवादी मानसिकतेतून बाहेर येण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास समाजाचा त्यांच्याप्रती निर्माण झालेला संकुचित दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल.

सारांश :

तृतीयपंथी समुदाय समाजाचा अविभाज्य घटक आहे.सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे त्यानांही घटनेनुसार दिलेले हक्क उपभोगण्याचे स्वातंत्र्य आहे. आपल्या शारीरिक क्षमतांचा विकास करून सर्वांगीण प्रगती साधणे हा त्यांचा मुलभूत हक्क आहे. समाजाच्या भेदभाव आणि पक्षपाती वागणुकीमुळे हा समुदाय वर्षानुवर्षे अन्यायग्रस्त आणि अभावग्रस्त राहिला आहे. त्यामुळे या समुदायाला स्वाभिमानाने, सन्मानाने आणि आत्मविश्वासपूर्वक जगण्यासाठी सुरक्षित आणि

भेदभावरहित वातावरण निर्माण करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. तृतीयपंथी व्यक्तींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, शैक्षणिक तसेच राजकीय पातळीवर सर्वोतोपरी प्रयत्न होणे यातच सर्व समाजाचे हित सामावलेले आहे. यासाठी प्रथम त्यांचे माणूस असणे समजून घेणे हे सामाजिक समता आणि न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने एक आश्वासक पाऊल ठरेल.

संदर्भ ग्रंथ:

१. Sharma S.K. (2000). Hijras The Labelled Deviants, Gian Publishing House, New Delhi.

२. Talwar Rajesh (2016), The Third Sex and Human Rights, Gian Publishing House, New Delhi.

३. Madhusudhan B. (2021). Transgender Rights, Identity and Mobility, Kalpaz Publications, Delhi.

४. Chandra Satish (2019).Psychological and Educational problems of LGBTQ Community in India, IP Innovative Publication Pvt. Ltd., New Delhi.

५. Chandra Satish (2018).Reengagement of Transgender Persons, Challenges and Opportunities, Power Publication, Delhi.

६. National Human Rights Commission Report (2017). Study on Human Rights of Transgender as a Third Gender, Kerala Development Society (KDS-Delhi)

७. MajumdarA., TarafderR. (2019). A Scientific Aspect of Transgender, Notion Press, Chennai.

८. बंधोपाध्याय मनोबी (२०१८), होय, मी स्त्री आहे, विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे.

९. त्रिपाठी लक्ष्मीनारायण (२०१६). मी हिजडा मी लक्ष्मी, मनोविकास प्रकाशन, पुणे.

***सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर.**arvindghodake99@gmail.com

***

लिंग असमानता

*प्रा. डॉ. पांडुरंग किसनराव मगर

प्रस्तावना :-

लिंग असमानतेची समस्या ही खूप मोठी समस्या आहे. भारतात अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या आहेत. दारिद्र्य, बेरोजगारी, भिकारी, झोपडपट्टी या समस्ये बरोबरच "लिंग असमानतेची" समस्या ही तितकीच महत्त्वपूर्ण आहे. भारतीय समाजात प्राचीन काळापासून स्त्रियांच्या संदर्भात भेदभाव करण्यात येतो. पुरुषांना अनेक प्रकारचे अधिकार दिले आहेत. परंतु स्त्रियांना मात्र तेवढे अधिकार दिले गेले नव्हते, हीच खऱ्या अर्थाने लिंग समानता होय. साधारणपणे अधिकार, हक्क याविषयी स्त्री पुरुष या दोघांमध्ये केलेला फरक म्हणजे भारतीय समाज व्यवस्थेतील लिंग असमानता होय. भारतीय समाज हा रुढी, प्रथा, परंपरा, दैववाद, अज्ञान, अंधश्रद्धा यांना मानणारा समाज आहे ,त्यामुळे अनेक वेळेला स्त्रियांनी कसे जीवन जगले पाहिजे, याविषयी अनेक बंधने निर्माण करण्यात आली. ती प्रत्यक्ष आचरणात आणली गेली. ही समाज समाजात रूढ होत गेली. याच्याच आधारे स्त्री -पुरुष भेदभाव सातत्याने वाढत गेला. भारतामध्ये आजही सर्वच जाती, धर्म ,पंथ, वंश प्रदेश सर्व कमी अधिक प्रमाणात स्त्री पुरुष असमानता, लिंग असमानता, चालत असलेली अप्रत्यक्ष प्रत्यक्षपणे पाहायला मिळते. मुली विषयी विचार करण्याचा दृष्टिकोन, आणि मुलासंबंधी विचार करण्याचा दृष्टिकोन, यामध्ये कुटुंबात फरक असलेला दिसून येतो. काही कुटुंब अपवाद असले तरी काही कुटुंबात अजूनही समस्या असलेली दिसते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत लिंग असमानतेचा अनेक स्त्रियांना सामना करावा लागतो. लिंग असमानतेमुळे पुरुषापेक्षा स्त्रियांचा जास्त वेळेला छळ होतो. त्यांचाच अधिक बळी जातो. लिंग असमानतेमुळे छळवणूक, अपहरण, बलात्कार, लैंगिक छळ, यासारख्या अनेक घटना सातत्याने घडल्या आणि घडत असतात. प्रत्येक क्षेत्रामध्ये याची कमी अधिक प्रमाणात प्रचिती येत असलेली दिसून येते .भारतीय समाज व्यवस्थेमध्ये लिंग असमानता वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त झालेली दिसून येते. त्यातील एक प्रमुख बाब म्हणजे सातत्याने पुरुषांच्या तुलनेमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी असलेले दिसून येते. सन 2001 च्या जनगणनेनुसार भारतात दरहजारी पुरुषांच्या पाठीमागे स्त्रियांचे प्रमाण 933 इतके होते. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कितीतरी अधिक कामे करावी लागतात, त्यांना उपभोग्य वस्तू मानली जाते, काही केल्याने हे विचार आजही पूर्णपणे निघून गेलेले दिसून येत नाहीत .

भारतीय समाज व्यवस्थेत नेहमीच स्त्रियांचा आदर केला जातो. आणि केला जात आहे, कधीही त्यांना पुरुषापेक्षा ना कमी ना जास्त समजले गेले. हिंदुत्वज्ञानानुसार स्त्री ही पुरुषाची अर्धांगिनी समजली जाते. हिंदू समाजात परमेश्वरी शक्तीचे, लक्ष्मी, सरस्वती इत्यादी स्त्रियांच्या रूपात वर्णन केले आहे. अशाप्रकारे स्त्री ही ज्ञानाची प्रतीक मानले जाते, तीच आपल्या देशाची प्रतीक सुद्धा आहे, आपल्या देशाला "भारत माता 'म्हणून तिच्या प्रती आपल्या श्रद्धा प्रकट करतो. प्राचीन काळी ही अवस्था अत्यंत चांगली होती. माता, भगिनी, पत्नी म्हणून तिची पूजा केली जात होती. जगाच्या इतिहासात मागोवा घेतला असता, हे स्पष्ट होते, की सुरुवातीच्या काळात स्त्री-पुरुष विषमतेचा विचार नव्हता, दोघांनाही समान समजले जात होते. त्याचबरोबर स्त्री-पुरुषांमध्ये कोणतेही बंधन नव्हते ,त्यामुळे कोणी कोणापासून मुक्त होण्याचा, बंदिस्त होण्याचा प्रश्नच नव्हता. मानसिक ,बौद्धिक दृष्टीने दोघेही समान मानले जात असत. सर्वच क्षेत्रात स्त्री पुरुष दोघांनाही समान संचार होता. दोघांनाही समान सन्मान समान प्रतिष्ठा होती .ही ख्रिस्त पूर्व 12 व्या शतकात सुद्धा स्त्रिया न्यायाधीश, भविष्यवेता असल्याचे उदाहरणे आढळतात. सुरुवातीच्या काळात अरेबियातील मुसलमान स्त्रिया सुद्धा, पुरुषांच्या बरोबरीने काम करीत होत्या .परंतु कालांतराने या परिस्थितीत बदल झाला .पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांना बंदिस्त केले गेले. तिला शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. विवाहाचे जोडीदार निवडण्याचे अधिकार स्त्रियांचे काढून घेण्यात आले. धार्मिक, सामाजिक उत्सवात भाग घेण्याची प्रथा बंद करण्यात आली. तिला अनेक बंधनामध्ये अडकवण्यात आले. सती प्रथा, वरून पतिव्रतेच्या खोट्या कल्पनेवर आधारित जिवंत जाळण्याची प्रक्रिया

अस्तित्वात आली. शारीरिक पावित्र्याचे अवाजवी महत्त्व वाढविण्यात आले. वयात येण्यापूर्वीच विवाह करून मोकळे होण्याची स्पर्धा सुरू झाली. एकंदरीत अनेक समस्यांमध्ये महिलाना बंदिस्त करण्यात आले होते .

1) अध्ययन विषयाची उद्दिष्टे :-

1) लिंग असमानतेची संकल्पना स्पष्ट करणे

2) लिंग असमानतेचे अध्ययन करणे

3) लिंग असमानतेचे सविस्तर विश्लेषण करणे

4) लिंग असमानता कमी करण्यासाठी उपाय स्पष्ट करणे सुचविणे.

2) तथ्य संकलन पद्धती:- सदर विषयाचे संशोधन पूर्ण करण्यासाठी तथ्य संकलन करण्याकरिता दुय्यम तथ्य संकलन अध्ययन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

3) संशोधन विषयाचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे :

1) वैदिक काळातील स्त्रीयांची स्थिती:

भारतीय समाजातील सुवर्णकाळ म्हणून वैदिक काळ ओळखला जातो. हा कालखंड इसवी सन पूर्व 6000 वर्षापर्यंतचा मानला जातो. या काळात स्त्रियांची सामाजिक परिस्थिती अत्यंत चांगली होती .या काळामध्ये स्त्री -पुरुष समानता खूप मोठी होती. स्त्रियांचा आत्मविश्वास, विवाह ,संपत्ती ,शिक्षण याबाबतीत पुरुषांब बरोबरीचे सर्व अधिकार होते. पत्नीच्या रूपात स्त्रीला कुटुंबात उच्च दर्जा होता. कुटुंबामध्ये स्त्रीला "राणी" म्हणूनही आशीर्वाद दिला जात होता. महाभारताच्या कथेनुसार, ज्या घरामध्ये पत्नी नाही, ते घर "जंगल "मानले जात असे. पती-पत्नी दोघेही संपत्तीचे त्याकाळी मालक होते. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही उपनय संस्कार करण्याचा अधिकार होता .स्त्री-पुरुष दोघेजण एकत्र येऊन संयुक्तरीत्या यज्ञ करत होते .तर दुसऱ्या बाजूला अपतनिक व्यक्तीला येथे करण्याचा अधिकार नव्हता. एकंदरीत या काळामध्ये स्त्रियांचे स्थान पुरुषाच्या बरोबरीचे होते. जीवनात विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांना मुक्त संचार करण्याची पूर्णपणे मुभा होती .स्त्री पुरुष हे श्रेष्ठ कनिष्ठ न राहता त्या काळामध्ये एकमेकासाठी पूरक मानले जात होते. थोडक्यात वैद्यकीय कालखंडामध्ये स्त्रियांची स्थिती ही अतिशय चांगल्या प्रकारची होती .

2) उत्तर वैदिक काळातील स्त्रियांची स्थिती:

उत्तर वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांच्या समानतेच्या दर्जात बदल झाला. वैदिक काळातील स्थिती फार काळ स्थिर राहिली नाही. इसवी सन पूर्व 700 ते इसवी सन 600 वर्ष हा काळ महाभारत रामायणाचा काळ समजला जातो. या काळामध्ये स्त्रियांच्या सामाजिक दर्जाच्या बाबतीत औनती झाल्याची दिसून येते. भारतात इसवी सन 300 नंतर झालेल्या सामाजिक बदलामुळे स्त्रियाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल झाला ,रामायण काळात विवाहित जीवन वैयक्तिक बाब मानली जाऊ लागली, व स्त्री चरित्रावर अधिक संवेदनशीलता निर्माण झाली. त्यातच बालविवाहाची निर्देश देण्यात आले. त्यामुळे स्त्रियांचे शिक्षण . स्त्रियांची प्रगती ,स्त्रियांचा सामाजिक दर्जा याला धक्का पोहोचला. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला, गेल्यामुळे या कालखंडात स्त्रियावर अनेक बंधने लादली गेली. स्त्रीचे प्रमुख कर्तव्य म्हणून पतीचे आज्ञापालन हे बंधनकारक करण्यात आले .दिवसेंदिवस स्त्रियावर वेगवेगळी बंधने लादली जाऊ लागली. ही त्यामुळे अनेक वेळेला आर्य -अनार्य यांच्यामध्ये वैवाहिक संबंध प्रस्थापित होऊ नयेत यासाठी हे नियम लावले गेले व स्त्रियांच्या चरित्रविषयक कल्पनेमुळे समाजाची त्यांच्यावर नजर राहू लागली. स्त्रियांसाठी विवाह अनिवार्य करण्यात आला. विवाह विधवा विवाहावर अनेक बंधने घालण्यात आली. बहुपत्नी विवाह प्रथा वाढू लागली. याच काळामध्ये पुत्रप्राप्तीला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा या कालखंडामध्ये खालावत गेलेला स्पष्ट होतो.

3) स्मुर्ती काळातील स्त्रियांची सामाजिक स्थिती. :

स्मृती काळामध्ये स्त्रियांचा सामाजिक दर्जा वेगाने ढासळू लागला .साधारणपणे हा कालखंड इसवी सन पूर्व 600 ते 1000 वर्षापर्यंतचा कालखंड मानला जातो .या काळात स्त्रियांना फक्त मातेच्या स्वरूपातच मानसन्मान दिला जात होता. या काळात स्त्रियांचे शिक्षणाची सर्वदारे बंद करण्यात आली. स्त्रियांसाठी विवाह विषयक बंधने अनिवार्य करण्यात आली .जीवनसाथी निवडण्यावर अनेक बंधने घालण्यात आली. स्त्रियांचे विवाहाचे वय घटले गेले. स्त्रिया ऋतुप्राप्ती होण्यापूर्वीच म्हणजे बाराव्या तेराव्या वर्षी मुलींचे विवाह होऊ लागले. विधवा पुनर्विवाह अनेक बंधने घालण्यात आली बहुपत्नीत्व विवाहाची पद्धती याच कालखंडामध्ये वेगाने वाढत गेली. या काळात स्त्रियांचे सर्व हक्क अधिकार काढून घेण्यात आले. त्यामुळे स्त्रिया समोर अनेक प्रश्न निर्माण झाले. स्त्रियांना कोणत्याही अवस्थेत स्वतंत्र सोडू नये, असे निर्देश दिले जाऊ लागले, स्त्रीने बालपणी हे पित्याच्या आधारावर जीवन जगावे तर तरुण वयात पतीच्या आधारावर जीवन जगावे. आणि वृद्धावस्थेमध्ये पुत्राच्या संरक्षणात राहावे ही स्त्रीची परम, कर्तव्य निश्चित केली गेली. आणि पती कसा का असेना तोच तिचा देव समजण्यात यावा ही समाजाची मानसिकता बनू लागली. आणि मानसिक दृष्ट्या पुरुषापेक्षा स्त्री कनिष्ठ आहे ही धारणा या कालखंडामध्ये हळूहळू वेगाने वाढू लागली.

4) मध्ययुगीन काळातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा स्थिती:

या कालखंडामध्ये स्त्रियांच्या सामाजिक स्थितीमध्ये अधिकच अवंनती होत गेली. दिवसेंदिवस स्त्रियांचा दर्जा कनिष्ठ मानला जाऊ लागला. इसवी सन ११ व्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंतचा काळ हा मध्ययुगीन कालखंड मानला जातो. यामध्ये हिंदू धर्माचे ब्राह्मणांनी रक्षण केले पाहिजे, स्त्रियांचे अस्तित्व आणि रक्ताची शुद्धता कायम राखण्यासाठी स्त्रियासंबंधीचे नियम अधिक कठोर केले गेले. उच्च जातीतील स्त्रियांसाठी सुद्धा शिक्षणाची द्वारे पूर्णपणे बंद करण्यात आली. हा कालखंड स्त्रियांच्या बाबतीत अशांततेचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडामध्ये स्त्रियावर अन्याय करणे ही प्रक्रिया वेगाने चालू होती. मुसलमानांच्या आक पासून वाचवण्यासाठी स्त्रियांना घरात कोंडून ठेवण्याची पद्धत सुरू झाली .याच काळात पडदा पद्धतीत सुरू झाली. विधवा विवाहावर बंधने लादण्यात आली. स्त्रियावर अनेक प्रकारचे जुलूम केले जाऊ लागले. देवदासी पद्धत, बालविवाह पद्धत ,जठर कुमारी विवाह पद्धती याच कालखंडामध्ये सुरू झाली. देवदासी पद्धतीमध्ये तर देवाला अर्पण केल्या जात असे. त्यांचा देवा सोबतच विवाह लावला जाई. त्यामुळे स्त्रियांना पूर्ण आयुष्य हयात भर भंडाऱ्याप्रमाणे आपला देह जळण राहणे हेच तिच्या वाट्याला आले होते. विधवा स्त्रियांची स्थिती ही अत्यंत वाईट बनली होती. पती निधनानंतर सती जाणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले गेले. जर सती नाही गेली तर आयुष्यभर तिला जिवंतपणे जळत राहण्याशिवाय दुसरा पर्याय समाजव्यवस्थेने शिल्लक ठेवला नव्हता. केशव पण करून सर्व सौभाग्य चिन्ह उतरवली जात असे. अंधार कोठडीमध्ये एक पापी म्हणून तिला जीवन कंटाळावे लागत असे, तसेच स्त्रियांना जठर कुमारी विवाहप्रतीने खूप मोठी कोंडी केली होती.पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य काढून घेण्यात आले होते. याशिवाय मुलींच्या विवाहाचे वय घटत जाऊन केवळ आठ वर्षे ते नऊ वर्षांमध्ये त्यांचा विवाह लावून देण्याची पद्धत अरुढ होऊ लागली .आई वडिलांनी ठरवतील त्याच विवाहाला मान्य करणे याशिवाय त्यांच्यापुढे दुसरा पर्याय शिल्लक ठेवलेला नव्हता पंडिता रमाबाई यांचे लग्न 45 वर्षाच्या पुरुषाशी झाले होते तेव्हा त्यांचे वय फक्त नऊ वर्षाचे होते. थोडक्यात यावरून हे स्पष्ट होते की, या कालखंडामध्ये स्त्रियांची अत्यंत वाईट अवस्था दिवसेंदिवस बनत गेली.

5) ब्रिटिश कालखंड किंवा आधुनिक कालखंडातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा:

या कालखंडामध्ये स्त्रियांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. परंतु भारतात ब्रिटिशांचा प्रवेश झाल्यानंतर स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी सुरुवात झाली. ब्रिटिश सरकारने आणलेले उदारमतवादी धोरण याला कारणीभूत ठरले. १९ व्या शतकात म्हणजेच ब्रिटिश सरकारने भारतात राज्यकारभार चालवताना धार्मिक बाबतीत ढवळाढवळ न करण्याचे धोरण अवलंबिले होते .परंतु त्यांच्या या नवीन विचाराने भारतातील नवीन पिढी प्रभावित झाली. सती पद्धती किती अमानवी आहे हे त्यांनी खाजगी मध्ये पटवून दिले. याच कालखंडामध्ये पंडित ईश्वरचंद्र

विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, राजा राम मोहन राय, गोपाळ कृष्ण गोखले, महर्षी कर्वे इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रियांच्या बाबतीत अनेक सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडामध्ये ख्रिश्चन मिशनरी ब्रिटिश सरकारची आलेली कायदे, महिलांच्या झालेल्या वेगवेगळया चळवळी, सर्वांसाठी आलेले शिक्षण, पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव इत्यादी कारणामुळे स्त्री सुधारणेच्या कार्याला अधिकच गती मिळाली. याच काळात महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी शाळा काढल्या. परिणामी स्त्रियांचे शिक्षण प्रमाण वाढू लागले. अनेक कुप्रथा,नष्ट होऊ लागल्या. स्त्रियांमध्ये जाणीव जागृती निर्माण होऊ लागली. समाज सुधारक व राजकीय पुढारी स्त्रियांच्या, उत्थानासाठी प्रयत्न करू लागले, या सर्वांच्या परिणामी भारतीय सामाजिक स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी मदत होऊ लागली. परंतु अत्यंत मंद गतीने का होईना, येथून पुढे भारतीय स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यास सुरुवात झाली.

वैदिक कालखंडापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या कालखंडापर्यंत स्त्रियांचा सामाजिक दर्जा सातत्याने घसरत गेला.

5) लिंग असमानतेची कारणे पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील

1) भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या शिक्षणावर प्रदीर्घ कालखंडापासून प्रतिबंध घातले गेले होते.

2) प्राचीन काळापासून भारतात स्त्रियांचे चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र बनवले गेले आणि अनेक प्रकारच्या रूढी, प्रथा, परंपरा यांचे पालन करण्यात आले .त्यामुळे स्त्रियांना बंदिस्त केले गेले.

3) स्त्रियांच्या अधोगतीच्या कारणाच्या पाठीमागे भारतातील संयुक्त कुटुंब पद्धती ही सुद्धा काही अंशी जबाबदार असल्याची दिसून येते.

4) भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या विधवा पुनर्विवाह वर घातलेली अनेक बंधने ही सुद्धा सामाजिक दर्जाच्या कारणीभूत असलेली दिसून येतात.

6) भारतात हजारो वर्षे चालत असलेली बालविवाहाची पद्धती कुलीन विवाहाची, पद्धती जरठ कुमारी विवाहाची पद्धती, हुंडा पद्धती अशा वाईट पद्धतीमुळे स्त्रियांचा दर्जा कमी होण्यासाठी चांगली मदत होत गेली.

7) भारतावर अनेकांची परकीय आक्रमणे झाली या परकीय आक्रमणापासून स्त्रियांचे संरक्षण व्हावे त्यांचे अपहरण होऊ नये, म्हणून स्त्रियांना घराच्या चार भिंतीत दाबून ठेवल्या जात असे त्यामुळे ही स्त्रियांच्या विकासाला संधी मिळाली नाही. त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा घसरत गेला.

8) भारतीय समाज व्यवस्थेत चालत आलेली पितसत्ता कुटुंब पद्धती ही सुद्धा स्त्रियांचा सामाजिक दर्जा कमी करण्यासाठी जबाबदार असल्याचे स्पष्ट होते.

9) भारतीय समाजाच्या मानसिकतेमुळे सुद्धा स्त्रियांचा सामाजिक दर्जा कालावत गेला.

10) भारतीय मानसिकतेमध्ये आई-वडिलांचा खरा आधार मुलगा असतो, म्हातारपणी सांभाळ मुलगाच करील अशी भारतीयांची सर्वसाधारण मानसिकता असते. त्यामुळे ही मुलीकडे दुर्लक्ष केले गेले.

11) हिंदू धर्माचे जिवंतत्वज्ञानानुसार वंशाचा दिवा मुलगाच आवश्यक असतो. किंवा मुलगाच पितृ ऋण फेडू शकतो ही संकल्पना समाजात रुजल्यामुळे ही स्त्रियांचा दर्जा कमकुवत ठरवला गेला आणि लिंग विषमतेला खतपाणी घातले गेले.

12) समाज व्यवस्थेने भारतीय स्त्रियांना दिलेला कनिष्ठ सामाजिक दर्जा हा सुद्धा लिंग भेदभावासाठी जबाबदार आहे. मुलगी कुटुंबावरचा भार असते ही विचारसरणी सुद्धा लिंग भेदभावासाठी तेवढीच कारणीभूत आहे मुलगी परक्याचे धन असते ही विचारसरणी ही स्त्रियांच्या सामाजिक दर्जाच्या पूर्णपणे विरोधी असलेली दिसून येते.

6) भारतीय लोकसंख्येतील स्त्रि-पुरुष प्रमाण.

वर्ष	दर हजारी पुरुष -स्त्री प्रमाण.
1901	972
1911	964
1921	955
1931	950
1941	945
1951	946
1961	941
1971	930
1981	934
1991	927
2001	933

7) संशोधन विषयातील निष्कर्ष:

1) लिंग असमानतेची समस्या प्राचीन काळी जास्त होती आधुनिक काळात अनेक बदलामुळे लिंग असमानता कमी होत आहे.
2) लिंग असमानता वाढते शिक्षणाचे प्रमाण व्यक्तिस्वातंत्र्य नोकरी व्यवसायाच्या संधी अशा अनेक कारणामुळे दिवसेंदिवस कमी होत आहे.
3) आधुनिक काळात समाजाचा लिंग असमान तिकडे पाण्याच्या दृष्टिकोन बदलला आहे.
4) लिंग असमानता कमी होऊन दिवसेंदिवस समानतेत वाढ होत आहे ही सकारात्मक बाजू आहे.

8) संदर्भ ग्रंथ:-

१. प्रा. माने माणिक :भारतातील सामाजिक समस्या ,विद्या प्रकाशन, नागपूर ,जुलै 1997.
२. प्रा.लोटे रा.ज. भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, पिंपळापुरे अँड कंपनी, पब्लिशर्स नागपूर, जून 2003
३. मुखर्जी रवींद्रनाथ: भारतीय समाज व संस्कृती, विवेक प्रकाशन, जवाहर नगर, दिल्ली, अष्टम संस्करण 1993
४. डॉ.खैरनार दिलीप आधुनिक भारतातील सामाजिक समस्या. चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद .सप्टेंबर 2007.
५. प्राचार्य डॉ. दा.धो.काचोळे भारतीय समाज प्रश्न आणि समस्या. कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद .सप्टेंबर 2005
६. प्रा. डी .एल.तोरवणे. प्रा. सौ. जयश्री महाजन. भारतीय समाज प्रश्न आणि सामाजिक समस्या ,प्रशांत पब्लिकेशन , जळगाव
७. प्रा. रा. ना. घाटोळे : भारतीय समाज व्यवस्था, मंगेश प्रकाशन रामदास पेठ, नागपूर 1983.
८. प्राचार्य डॉ. सामाजिक न्यायासाठी कायदे. चंद्रपूर .
९. प्रसाद गोपीकृष्ण: विकास का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन, जयपुर.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक, शहीद भगतसिंग महाविद्यालय किल्लारी,
तालुका औसा जिल्हा लातूर महाराष्ट्र.

***

लिंगभेदभाव आणि तृतीयपंथी

*डॉ. नलिनी ईश्वरदास बोरकर

प्रस्तावना :

पृथ्वीवरील जवळ जवळ सर्वच प्रजातींमध्ये नर आणि मादी अशी लैंगिक आधारावर विभागणी झालेली आपल्याला आढळून येते. मानवाच्या संदर्भातही हे कथन तंतोतंत लागू पडते. मानव तसा फार बुद्धिमान प्राणी आहे. त्यामुळे इतर प्राण्यांच्या तुलनेत त्याने सर्वार्थांनी खूप प्रगती केली आहे. बुद्धिचातुर्याच्या जोरावर त्याने पृथ्वीतलावर आपले अनभिषिक्त असे राज्य स्थापन केले आहे. त्यामुळे स्त्री- पुरुष असा भेद निर्माण करून समाजव्यवस्थेवर आपली पकड कशी मजबूत ठेवता येईल, हे आजवर मानव करीत आहे. परंतु एक गोष्ट मात्र मानवाला कधीच जमली नाही ती म्हणजे लिंगनिश्चिती. लिंगनिश्चिती हि पूर्णपणे जैविक प्रक्रिया आहे. त्यात मानवी प्रयत्न कुठेच कमी यात नाही. मात्र एखादी व्यति पूर्ण विकसित होऊन, जन्माला आल्यानंतर तिचे लिंग बदलण्याची वैज्ञानिक पद्धत मानवाने आत्मसात केली आहे. परंतु जन्मापूर्वी बाळ कोणत्या लिंगाचे जन्माला यावे यावर आजही फारसे नियंत्रण मानवाला स्थापन करता आल्याचे दिसून येत नाही.

त्यामुळे लिंगभाव हा निसर्गनिर्मित नसून तो मानवनिर्मित आहे, तसाच सांस्कृतिकही आहे. शारीरिक इंद्रियांच्या फरकांमुळे दृश्य स्वरूपातील लिंगाचे निदान केले जाते. पुढे समाजात वावरताना भूमिका, गुण, वर्तन प्रकार, जाणीव, जबाबदाऱ्या, कर्त्यव्य आणि अधिकार या विविध आधारावर स्त्री- पुरुष अशी विभागणी केली जाते. त्यालाही स्थळ. काळाचे वेगवेगळे संदर्भ लागू पडतात. समाजात मुलगा व मुलगी यांना लहानपणापासूनच वाढवतांना भेदभाव केला जातो. वागणे, बोलणे, वस्त्रे, कामे इत्यादींची विभागणी केली जाते. स्त्री म्हणजे रडणारी, पुरुष म्हणजे रडू न येणारा, कणखर. स्त्री म्हणजे सहनशील, शोशिक तर पुरुष म्हणजे वर्चस्व गाजवणारा, आक्रमक, रुबाबदार, अशी जडणघडण लहानपणापासूनच केली जाते. कोणताही पुरुष फक्त पुरुष म्हणून जन्माला येत नाही. स्त्री मध्ये आढळणारी करुणा, सेवाभाव, लाडिकपणा हे गुण सुद्धा त्याच्यात असतातच. पण जसजसा तो मोठा होत जातो त्याला कुटुंब, समाज, सामाजिक प्रतिमानांच्या आधारावर पुरुष म्हणून घडविले जाते. तद्वतच कोणतीही स्त्री जैविक दृष्ट्या सोडली तर केवळ स्त्री म्हणून जन्माला येत नाही. तिला वारंवार हे दाखवले जाते की ती स्त्री आहे आणि तिने स्त्री सारखेच वागले पाहिजे.

लिंगभेदभावाची ही चौकट इतकी मजबूत आहे कि यापलीकडेही काही लोक असू शकतात हे समाजाला मान्य नाही. साधी भातुकली खेळतांना सुद्धा मुलांनी बाबासारखे आणि मुलीने आईसारखे वागावे असे बिंबविले जाते. त्यात एखादा मुलगा मला स्वयंपाक करायचा आहे, असे म्हणाला तर, तू मुलगा आहेस, तू घराबाहेरची कामे कर, स्वयंपाक मुलगी करेल असे म्हटले जाते. एखादा मुलगा रडू लागला तर 'काय रडतोस रे मुलीसारखा' असे म्हटले जाते. स्त्री व पुरुष या दोनच लिंगामध्ये संपूर्ण समाज विभागलेला आहे. परंतु ज्यांच्या अस्तित्वाचा साधा विचारही कोणी करीत नाही असा तिसरा घटक, तिसरे लिंग याच समाजात कित्येक वर्षांपासून अस्तित्वात आहे. ज्याला आपण तृतीयपंथी असे म्हणतो. आज तृतीयपंथीयांसाठी वापरण्यात येणारी "LGBTQIA+" ही संज्ञा अनेकदा ऐकिवात येत असते. या संशोधनपर पेपर च्या माध्यमातून हि संज्ञा उलगडून दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

गृहीतक:- लिंगभेदभाव या दृष्टीकोनातून तृतीयपंथीयांचे स्थान सर्वात कनिष्ठ आहे.

उद्दिष्ट :- लिंगभेदभाव या दृष्टीकोनातून तृतीयपंथीयांचे सामाजिक स्थान कोणते? याचा आढावा घेणे.

संशोधन पद्धती :- या संशोधनपर लेखासाठी द्वितीयक तथ्ये सामुग्री वापरण्यात आली आहे. संदर्भ ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रातील लेख, इंटरनेटवरील माहिती,य यु ट्यूब वरील विडीओ चा वापर करून हि माहिती संकलित केलेली आहे.

संकल्पनेचा अर्थ : महाभारतातील युद्धामध्ये ' श्रीखंडी' या पात्राचा उल्लेख येतो. पुढे हाही उल्लेख आहे की, श्रीखंडी ला पुढे करताच युद्ध थांबले कारण श्रीखंडी तृतीयपंथी होता आणि तृतीयपंथी व्यक्तीवर आक्रमण करणे किंवा मारणे भित्रेपणा किंवा कायार्त समजले जात होते. अशा पात्राचा उल्लेख अनेक पौराणिक कथांमध्ये आढळून येतो. अनेक प्राचीन लेण्यांमध्ये समलैंगिक संबंधाचे चित्रीकरण आढळते. जात, वर्ग, धर्म, पंथ, व्यवसाय इत्यादींच्या परत्वे समाजातील प्रत्येकच स्तरात अशा व्यक्ती आढळतात.

भारतीय समाजात मुलगा झाला तर पेढे वाटून आनंद साजरा केला जातो. मुलगी जन्माला आली तर तोंड पाडून 'बेटी हुई है' म्हणत घरी आणले जाते. पण जर कोणाला कळले कि मध्य पोटी तृतीयपंथी जन्माला आला आहे तर.. कल्पनेतही कोणी असा विचार स्वीकारणार नाही कारण हि गोष्टच मुळात समाज स्वीकारत नाही. "लिंगाच्या आधारावर स्त्रियांसोबत केला जाणारा भेदभाव" अशी साधारणतः लिंगभेदाची व्याख्या केली जाते. (प्रा. अनिलकुमार गुप्ता, २०२१) या व्याख्येमध्ये कुठेच तृतीयपंथीयांच्या सोबत होणाऱ्या भेदभावाचा उल्लेख आढळत नाही. स्त्रियांसोबत होणाऱ्या भेदभावाचे स्वरूप सामाजिक अन्याय, अत्याचार. शिक्षणामधील भेदभाव, श्रमवीभाजनातील भेदभाव, लैंगिक शोषण, आरोग्यविषयक भेदभाव अशा विविध घटकांच्या आधारे सिद्ध करता येतो तद्वतच तृतीयपंथी लोकांसंबंधी होणारा भेदभाव अधोरेखित करता येतो. आज घडीला देशात पन्नास लाखापेक्षाही जास्त 'किन्नर' आहेत आणि दरवर्षी यात वेगाने भर पडत आहे. तर सदैव उपेक्षित असलेला हा तिसरा लिंग जैविकरित्या कसा निर्माण होतो हे अभ्यास्नेही आवश्यक आहे.

जैविक प्रक्रिया : स्त्री- पुरुष समागमानंतर गर्भाशयातील भ्रूण हा XX क्रोमोझोम असेल तर मुलगी आणि XY असेल तर मुलगा असतो. पहिले सहा आठवडे हा गर्भ मुलाचा किंवा मुलीचा आहे, हे निश्चित सांगता येत नाही कारण दोन्ही लिंग समसमान प्रमाणात अस्तित्वात असतात त्याला इंग्रजीत 'गोनाल्डस' असे म्हणतात. त्यानंतर Y क्रोमोझोम sry हा जीन्स कार्यान्वित होऊन गोनाल्ड्स मधील सर्व पेशींच्या DNA ना एकत्रित करून त्यांना तेस्तीज्मध्ये बदलवतो व अश्या रीतीने भविष्यातील पुरुष जन्माला येतो. प्रत्येक गर्भामध्ये 'बुल्फियन' व 'मुलेरीन' या दोन कार्यपद्धती विकास करीत असतात. अनुक्रमे मुलगा व मुलगी असा 'एन्द्रोजन' आणि 'इस्ट्रोजन ' या दोन हार्मोन्सनी विकास प्रक्रिया राबविल्यानंतर जननेंद्रिये विकसित होतात. 'एन्द्रोजन' हे पुरुष हार्मोन आहे तर 'इस्ट्रोजन' हे स्त्री हार्मोन समजले जाते. हि नैसर्गिक क्रिया सुरळीत पार पडली तर लिंग निश्चिती मध्ये कोणताच अडथडा येत. परंतु काही खालील चार प्रकारे यात सरमिसळ होते.

१. टर्नर सिंड्रोम - हे अपत्य स्त्री योनी घेऊन जन्माला येतो परंतु स्त्री बीज आणि गर्भाशय अविकसित असते.
२. एन्द्रोजन- इंसेन्सिटीव सिंड्रोम - या प्रकारात गर्भ पुरुष म्हणून जन्माला येतो परंतु त्याला पुरुष जननिन्द्रीये नसतात तर स्त्री जननिन्द्रीये असतात पण स्त्रीबीज व गर्भाशय नसते म्हणजे पाळी न येणारी, मुले न होणारी स्त्री म्हणून ती वाढते.
३. एन्द्रोजन वाढणे - या प्रकारात एन्द्रोजन इतके वाढते कि जन्माला येणारे बाळ जर मुलगी असेल तर ती टोमबायीज (Tomboys) किंवा पुरुषी म्हणून जन्माला येते.
४. टेस्टेटेरोन कमी असणे- या प्रकारात टेस्टेटेरोन या एन्द्रोजन मधील घटकाचे प्रमाण एवढे कमी असते कि गर्भ मुलाचा असल्यास त्याची जननेंद्रिये पुरुषाची असतात परंतु मेंदू पुरुषी निर्माण करण्यामध्ये कमी पडतो त्याचा परिणाम म्हणून जन्मलेल्या मुलाचे विचार, भावना यात स्त्रीत्व दिसतं. वयात आल्यानंतर त्याला स्त्री सारखे राहावे, वागावे, वस्त्र व केशभूषा करावी असे वाटते. तसेच अश्या मुलांना पुरुषांचेच आकर्षण असते. (डॉ. विलास चव्हाण २०२१)

'हिजडा' या शब्दाची उत्तपत्ती : हिजडा हा शब्द साधारणतः आपल्या समाजात शिवी प्रमाणे किंवा तुच्छतेने वापरला जातो. परंतु या शब्दाला एक विशिष्ट अर्थ आणि इतिहास आहे. हा शब्द उर्दू मधील हिजर या शब्दापासून उत्पन्न झाला आहे. तर हिजर हा उर्दू शब्द अरबी भाषेमधून आला आहे, ज्याचा अर्थ ' आपली जमत सोडलेला किंवा जमातीतून बाहेर पडलेला' असा होतो. म्हणजेच स्त्री- पुरुषांच्यस सामान्य समाजातून बाहेर पडलेला असा तो घटक म्हणजे 'हिजडा' होय असे सर्वसाधारण मत आहे. किन्नर दिशा शेख म्हणतात," ज्यांची आत्मा स्त्री असते तो हिजडा असतो. हि एक संस्कृती आहे, परंपरा आहे." हिजडा जन्म घेतो तो पुरुष म्हणून पण पुढे वयात येत-येत तो मुलीप्रमाणे वागतो, राहतो, हावभाव व बोलणे मुलींसारखे असते. वेशभूषा, केशभूषा स्त्री प्रमाणे असलेला पुरुष. यांना समलिंगी, तृतीयपंथी, किन्नर, जोगता, हिजडा, अरवणी, हेमल्या, इत्यादी नावांनी सुद्धा ओळखले जाते.

तृतीयपंथीयांचे समाजातील कनिष्ठ स्थान: भारतीय समाज विषमताप्रधान आहे. पुरुषसत्ताक कुटुंबपद्धती मुले या समाजात पुरुष वर्गाला सर्वात वरचे स्थान आहे. स्त्रीला लैंगिक आधारवर द्वितीय स्थान देण्यात आले आहे. परंतु पुरुषांचा

संसार चालविण्याकरिता, प्रजोत्पादनाची गरज भागविण्याकरिता लैंगिक गरजांची पूर्ती करण्याकरिता पुरुषाला स्त्री ची पावलोपावली गरज भासते म्हणून सामाजिक व्यवस्थेमध्ये अनेकदा स्त्रीला पूज्यनीय, देवी अश्या गोंडस नावाने उल्लेखिले जाते. तरीही तिचे स्थान कधीच पुरुषांच्या वरचे मात्र नसते. सामाजिक, कौटुंबिक जबाबदार्या पालन करण्यासाठी तिला लहानपणापासूनच ती दुय्यम आहे, पुरुषांपेक्षा कनिष्ठ आहे या संस्कारांनी वाढविले जाते. श्रमविभाजनात तिच्या वाट्याला उत्पन्न न देणारी कामे दिली जातात. लिंगभेद भावाचा एवढा कठोर पगडा असलेल्या समाजात जिथे स्त्री ची हि अवस्था आहे. तिथे निरुपयोगी समजल्या जाणाऱ्या तृतीयपंथियांचा दर्जा हा कोणत्याच गटात न मोडणारा ठरविला जातो. ज्या आई-बापाच्या पोटी हिजडा जन्माला येतो तेच हि गोष्ट स्वीकारू शकत नाही कि आपले बाळ तृतीयपंथी आहे. त्याच्याकडे गृनास्पद नजरेने पहिले जाते, त्याला पावलोपावली हिणविले जाते. कुटुंबातील इतर सदस्य, लहान भावंडे त्याला अस्पृश्यतेची वागणूक देतात. त्याला स्वीकारणे तर दूरच उलट त्याच्या जन्माने अपमानित झाल्याचे दर्शवितात. किन्नर म्हणून जन्माला येणे जणूकाही त्याने स्वतःच केलेले पाप असावे असा त्याचा अपमान केला जातो. अनेक आई-वडील आपल्या अशा मुलांना घराबाहेर हाकलून देतात कारण त्यांना आपले अपत्य म्हणणे लाजिरवाणे वाटत असते. सामाजिक प्रतिष्ठेच्या खोट्या मुखवटयासाठी पोटच्या पोराला अनाथ म्हणून सोडून दिले जाते. त्यामुळे त्यांचे शिक्षण होत नाही. शिक्षण नाही, डोक्यावर आई-बापाचे चात्र नाही,पोट भरण्याचे कोणतेही साधन नाही किंवा कौशल्य सुद्धा नाही कारण कोणीच जवळ करीत नाही. अश्या परिस्थितीत किन्नर जीवन जगत असतात.

उदरभरणासाठी तृतीयपंथी नाचगाणे करणे, भिक मागणे, शरीरविक्रय करणे किंवा वेश्याव्यवसाय करणे या तीनचा मार्गाचा अवलंब करताना दिसतात. राजेशाही काळात आणि त्यातही मुस्लीम बादशहांच्या पदरी जनानखाना असायचा , तिथे हे हिजडे काम करीत असत कारण ते ना पुरुष ना स्त्री त्यामुळे बादशहाला आपला जनानखाना सुरक्षित राखायला त्यांची मदत होत असे. पण आधुनिक काळात ना राजे राहिले ना राजेशाही. त्यामुळे जवळ-जवळ प्रत्येकच शहरात ट्राफिक सिग्नल ला हातवारे करीत 'तुम्हारे बाल बच्चे जिये' म्हणत टाळी वाजवून भिक मागणारे किन्नर दिसतात. शारीरिक दृष्ट्या धडधाकड असूनही त्यांच्यावर हि पाळी का येते? तर त्यांना कोणी काम देत नाही, त्यांच्याकडून कोणती वस्तू कोणी विकत घेत नाही. अनेक किन्नर देहव्यापारामुळे अनेक गुप्त रोगांना बळी पडून त्यांचा दुर्दैवी अंत होतो. जोगते किंवा देवीला सोडलेले किन्नर लैंगिक अन्याला बळी पडतात. किन्नर लक्ष्मी म्हणतात," मी सात वर्षांचा असतांना माझे लैंगिक शोषण केले गेले आणि त्यानानातर मला अनेकवेळा अश्या अत्याचाराला तोंड द्यावे लागले."

समाजातील लोकांच्या त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन अत्यंत घृणित असतो त्यामुळे त्यांनी जरी काम केले तरी त्याचा मोबाद्ल्ला त्यांना पुरेसा दिला जात नाही. लोक त्यांना पाहून नाक मुरडतात, त्यांच्या सावली पासूनही दूर पळतात. त्यामुळे त्यांनीही एक भीतीचा बागुलबुवा उभा केला आहे कि आम्हाला भिक दिली नाही तर आम्ही तुम्हाला शिव्याशाप देऊ आणि त्यामुळे तुमचे वाईट होईल. परंतु सशोधनातून हे सिद्ध झालेले आहे कि त्यात कोणतेही तथ्य नाही, ती केवळ एक अंधश्रद्धा आहे. परंतु हे सर्व करूनही किन्नारांचे सामाजिक स्थान यत्किंचितही बदलले नाही. लोक कुत्र्या मांजराला जवळ करतील पण एखाद्या अनाथ किन्नाराला कोणी वाढविले, शिकविले आणि त्याच्या पायावर उभे केले असे उदाहरण सापडत नाही. त्यामुळे हे सिद्ध होते कि तृतीयपंथी समाजात सर्वात खालच्या दर्जाचे समजले जातात.

किन्नर गौरी सावंत आपल्या मुलाखतीत म्हणतात," मि जन्माला आले ते पुरुष म्हणून पण भावनात्मक दृष्ट्या मी स्त्री होते. लहानपणापासून स्त्रीयान्सारखे राहणे, वागणे, बोलणे मला आवडायचे. माझ्या वडिलांना ते लक्षात आले, त्यांनी मला पुरुषासारखे वागण्याचा सल्ला दिला पण मि वागत नाही हे बघून त्यांनी मला खूप मारहाण केली. मी तेंव्हा आठ वर्षांची होते. आणि मला घर सोडावे लागले. वडिलांचा तिरस्कार बघून मला हि त्यांचा खूप राग यायचा परंतु पुढे कळले कि हि तर आमच्या बद्दलची संपूर्ण समाजाचीच मानसिकता आहे." किन्नर श्रेया म्हणतात," चित्रकार होण्याचे स्वप्न उराशी बाळगून महाविद्यालयात प्रवेश घेतला होता परंतु माझ्या लीन्गाबद्दल कळताच ला महाविद्यालयातून काढून टाकण्यात आले. परिणामी माझी शिक्षण व स्वप्न दोन्ही अर्धवट राहिले." किनार दिव्या म्हणतात," सरकारने आम्हाला सुविधा देऊ केल्या असल्या तरी समाज मात्र आम्हाला स्वीकारत नाही. स्त्रियांची छेडछाड झाली तर पोलीस एफआयआर नोंदवितात पण आमच्यावर अनेक लैंगिक अत्याचार होवूनही पोलीस आम्हाला म्हणतात कि ,' हिजडे कि

कोनसी इज्जत है, जो लुट जायेगी', आमची थटटा करून पोलीस स्टेशन मधून हाकलून देतात.' किन्नर दिशा शेख या संवेदनशील कवियत्री आहेत. प्रत्येक किन्नाराची आपबिती त्या आपल्या कवितांच्या माध्यमातून मांडतात. देवाला सोडलेल्या किन्नाराची व्यथा मांडताना त्या म्हणतात,' कुणीतरी अखंड सौभाग्याचं

कुंकू लावले भाळावर,
कुणीतरी मग त्या देव्पात्रीच्या
पायात घुंगरू बांधले आणि
तिला नाचवलं गावाच्या मनोरंजनासाठी
तिला त्या अपमानाच शल्य बोचू नये
म्हणून दैवी घोषित केलं '

भारतीय समाजातील प्रतिष्ठेची खोटी संकल्पना, लोक काय म्हणतील याची अनाठायी भीती, घरात हिजडा जन्माला आला म्हणजे मागील जन्मीचे पाप आहे अस्य अनेक वाल्गानांमुळे ' किन्नर' हा तृतीयपंथी घटक समाजाच्या अवहेलनेला बळी पडतो. शिक्षण नाही, आरोग्य नाही, पैसा नाही, प्रतिष्ट नाही अश्या दिशाहीन बुमिकेत तो समाजात जगतो आणि मरतो सुद्धा.

निष्कर्ष : १. लिंगभेदभाव दृष्टीकोनातून तृतीयपंथीयांचे सामाजिक स्थान अत्यंत कनिष्ठ , हीन व नकारात्मक आढळून येते. २. तृतीयपंथीयांची समाजाकडून व कुटुंबाकडून अवहेलना केली जाते. ३. तृतीयपंथीयांची अवस्था समाजात अत्यंत खालावलेली दिसून येते. ४. दारिद्र्य, निर्धनता यांनी तृतीयपंथी समाज ग्रासलेला आहे.

सूचना व शिफारसी : १. तृतीयपंथी हा एक माणूस आहे हे समाजाने स्वीकारले पाहिजे. २. तृतीयपंथी हा समाजाचा एक घटक आहे अशी समाजाची मानसिकता तयार झाली पाहिजे. ३. खोट्या प्रतिष्ठेच्या आहारी जावून तृतीयपंथीयाला घराबाहेर हाकलणे, त्याचा छळ करणे, मारहाण करणे थांबविले पाहिजे. ४. तृतीयपंथीयांचे लैंगिक शोषण, शिक्षणातील अडसर दूर करणे, त्यांची मानहानी थांबविणे, अवहेलना थांबविली पाहिजे. ५. स्वतः तृतीयपंथी आपल्या हक्कासाठी जागृत झाले पाहिजे. ६. तृतीयपंथीयांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. त्यासाठी समुपदेशन केंद्राची स्थापना व्हावी. ७. शासनाने स्त्री- पुरुषांना देत असलेले सर्व फायदे, सोयी सुविधा तृतीयपंथीयांना सुद्धा पुरविल्या पाहिजेत किंबहुना त्यांचे पुनर्वसन करण्याचा एक ठोस कार्यक्रम आखला पाहिजे. ८. शासनाच्या ज्या योजना कार्यान्वित असतील त्यांची माहिती प्रत्येक तृतीयपंथीयापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी.

संदर्भ:-

१. https://vishwakosh.marathi.gov.in
२. https://youtube.be/nt569/GIXTE
३. लिंगभाव आणि तृतीयपंथी : एक आकलन - विलास चव्हाण , पेज न. ७९, समाजशास्त्र संशोधन पत्रिका ,डिसेंबर २०२०, वर्ष ३८ वे , अंक २५ वा, ISSN- २२३०-७७४५
४. तृतीय पंथीयांचे समायोजन आणि पुनर्वसन एक सामाजिक समस्या, प्रा. कविता वामनराव उईके , पेज न. ६१-६५, AJANTA, Volume- X, Issue -II, April-June 2021, Marathi Part -I, ISSN- 2277-5730.
५. भारतीय समाज एवं लैंगिक असमानता- अनिलकुमार गुप्ता, पेज न. ४१, Social Issues and Problems, Volume-10, Issue-01, January-June, 2021, ISSN- 2278-3199.

*समाजशास्त्र विभाग, कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप, जवाहरनगर जि. भंडारा.
मो. ९५१८९४३५२७. Email:drsanchib@gmail.com

***

समाज माध्यमांवरील जाहिरातींचा समाजावर होणारा परिणाम

*डॉ.अंजली जोशी

प्रस्तावना:

जागतिकीकरणाच्या या युगाने समाजाला अर्थ केंद्रित बनवले आहे.संपूर्ण विश्व आर्थिक प्रगतीला मापदंड मानून आचरण करत आहे. व्यावसायिकरणाने पूर्ण व्यवस्थेला आपल्या नियंत्रणात आणले आहे. समाज आणि मीडिया यापासून दूर नाही.परंतु या प्रवृत्तीचा सर्वाधिक लाभ संचार माध्यमाने उठवला आहे. आज जागतिकीकरणाच्या युगात जाहिरातींना आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.सर्व उद्योगांना गती देणारा एक उद्योग म्हणून जाहिरात उद्योगाकडे पाहिले जाते. भारतीय परंपरेत 64 कला असलेल्या दिसतात. त्यापुढे जाऊन 65 वी कला म्हणजे जाहिरात कला असे मानले जाते. जाहिरातीमध्ये उत्पादक आणि मालक संपूर्ण समाजाबरोबर एक संवाद प्रस्थापित करतात. त्यातून आपल्या उत्पादित मालाकडे ग्राहकाला आकर्षित केले जाते आणि अधिकाधिक वस्तूची विक्री करण्याकडे उत्पादकांचा कल असतो.जाहिरातींचे मूलभूत कार्य व्यापार -उद्योग वाढवणे, वस्तूंची विक्री वाढवणे हे आहे. त्यासाठी नवीन ग्राहकांचा शोध घेणे, वस्तू वापरा विषयी त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे, वस्तूंचा परिचय करून देणे,त्यातून सामाजिक संबंध वाढवणे हे आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्र, मासिके, प्रसिद्धी पत्रक,चित्रपट ही जाहिरातींची विविध माध्यमे आहेत. अनेक शतकांपासून उत्पादक आणि व्यापारी जाहिरातींना विक्रीचे एक प्रमुख साधन म्हणून पाहत आले आहेत. मुद्रण पूर्व काळात जेव्हा लेखन कला विकसित झालेली नव्हती त्यावेळी राजा किंवा प्रधान गावांमध्ये दिंडोरा पीटून लोकांपर्यंत आपले विचार पोहोचवत होते. काही काळापूर्वी फेरीवाले, दूधवाले मोठ्याने ओरडून आपली सेवा लोकांना घेण्यास प्रवृत्त करत होते. विविध दुकानांसमोर रेखाचित्र काढून दुकानातील वस्तूंची जाहिरात केली जाते होती,अशिक्षित व्यक्तीलाही दुकानात काय विकले जात आहे याची कल्पना येते. रोमन संस्कृतीमध्येही उपलब्ध असणाऱ्या जाहिरातींचे चिन्ह प्राचीन पोपी शहरात सापडले आहेत.मुद्रित कला आल्यानंतर जाहिरातींचा पाया पक्का होत गेला. वर्तमानपत्र सामान्य लोकांच्या हातात आले आणि जाहिरातींना लोकप्रियता मिळाली. जाहिरातींना वास्तवात लोकप्रियता मिळवून दिली ती दूरदर्शन ने. कमी वेळात अधिक प्रभावी जाहिरात करण्याचे काम दूरदर्शनने केले. तसेच प्रत्येक वस्तू आणि सेवा यांचा परिचय घराघरात देण्याचे काम दूरदर्शनच्या माध्यमातून झाले. जाहिराती या समाज जीवनाच्या अविभाज्य भाग झाल्या आहे. जाहिरातींचा खूप मोठा प्रभाव समाजावर पडलेला दिसतो. वस्तू आणि सेवांची खरेदी करण्यापूर्वी जाहिरात स्मृती पटलावर येते आणि ती ग्राहकाच्या खरेदीवर परिणाम करते हे वास्तव पुढील अभ्यासातून स्पष्ट होते.

मुख्य शब्द (Key Words) : जाहिरात, कला, माध्यम, मानसिकता, जागतिक बाजारपेठ, वस्तूंची खरेदी,व्यापार.

अभ्यासाचे महत्त्व :

आज जगभरात मीडियाची स्वतःची एक वेगळी ताकद निर्माण झाली आहे. जनसंचार या शब्दाचा अर्थच चालवणे, सांगणे, प्रसार करणे असा आहे आणि प्रसार ही एक सामाजिक आवश्यकता आहे. भारतात नृत्य, संगीत,नाटक, लोककला ही प्रसारण करण्याची माध्यमे राहिली आहेत. यांत्रिक युगामध्ये आकाशवाणी, दूरदर्शन,चित्रपट या माध्यमांमधून माहितीचे केवळ प्रसारण नाही तर दृश्यावलोकान होत आहे. जागतिकीकरणाच्या युगात मुक्त बाजारपेठेचे समर्थन होत असताना त्यात जाहिरातीचे योगदान खूप मोठे आहे. उत्पादक आणि विक्रेता यांच्यासाठी मुक्त बाजारपेठेमध्ये जाहिरात ही मोठ्या प्रमाणावर लाभकारक आहे. जाहिराती या लोकांच्या मानसिकतेमध्ये परिवर्तन करण्याची क्षमता बाळगतात.

भौतिक चंगळ वाद असणाऱ्या आजच्या समाजामध्ये केवळ गरजेपोटी वस्तू खरेदी केली जाते असे नाही. भौतिक वस्तूंचे आकर्षण खरेदीला प्रोत्साहित करते. आणि जाहिरातीच्या प्रभावातून हे आकर्षण निर्माण केले जाते. गरज नसतानाही वस्तूंची खरेदी प्रचंड मोठ्या प्रमाणावर ग्राहकांकडून होत आहे याचे कारण आकर्षक जाहिरातींमध्ये दडले आहे. बाजारपेठेमध्ये मोठ्या प्रमाणावर उलाढाल घडवण्याचे बळ जाहिरातींमध्ये दिसते.

मुक्त बाजारीकरणाच्या आजच्या जगात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात तयार झालेली एखादी वस्तू जाहिरातीच्या माध्यमातून जगाच्या दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत क्षणार्धात पोहोचवली जाते. जाहिरातींबरोबरच विकसित झालेली दळणवळणाची माध्यमे खरेदी विक्रीची उलाढाल गतिमान करताना दिसतात. यातून विशिष्ट देशातील विशिष्ट वस्तूना प्रचंड मागणी निर्माण होते. विकसित देश विकसित आणि विकसनशील देशांना मोठ्या प्रमाणावर आपले ग्राहक बनवून त्यांच्या मानसिकतेवर अधिराज्य गाजवत आहेत. भारतीय बाजारपेठेतील वस्तूंवर चिनी वस्तूंचा असणारा प्रभाव हे त्याचे अत्यंत महत्त्वाचे उदाहरण आहे. 'स्वस्त आणि मस्त वस्तू ' अशा जाहिरातींमधून अत्यंत साधारण वस्तू ग्राहकांच्या माथी मारल्या जातात. ग्राहकांची अजागरूकता आणि जाहिराती यांचा अन्योन्यसंबंध असलेला दिसतो.

जाहिरात बघून वस्तू खरेदी करणारे ग्राहक जगाच्या पाठीवर सर्वत्र दिसतात. गरज नसताना वेळ, पैसा आणि श्रमाचा अपव्यय केवळ आकर्षक जाहिरातींमुळे होत असतो. ही बाब जितकी सत्य तितकेच जाहिरातींमुळे अनेक लाभ जनमानसाला किंवा समाजाला होत असतात. आरोग्य विषयक सूचना, पर्यावरण विषयक जागरूकता, कायदे आणि नियम यांच्या विषयीची माहिती अशा असंख्य महत्त्वाच्या बाबी जाहिरातीद्वारे समाज माध्यमांवर पोहोचवल्या जातात आणि प्रत्येक व्यक्तींपर्यंत त्या सहज जाऊन पोहोचतात. शिक्षित अशिक्षित अशा दोन्ही वर्गाला सरकारी आणि बिगर सरकारी कामकाजाबाबत किंवा वस्तू आणि सेवांबाबत महत्त्वपूर्ण माहिती देण्याचे काम जाहिराती करतात.

या सर्व पार्श्वभूमीवर जाहिरातींचा समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे.

अभ्यास पद्धती :

प्रस्तुत अभ्यासात तथ्य संकलनाच्या प्राथमिक साधनाचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये गुगल फॉर्म तयार करून तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आला. आजची तरुण पिढी जाहिरातींबाबत किती जागरूक आहे, वस्तू खरेदी करताना जाहिराती किती परिणाम घडवतात याचा अभ्यास विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवरून करण्यात आला आहे. पदवीच्या प्रथम,द्वितीय आणि तृतीय वर्षाचे विद्यार्थी अभ्यासासाठी निवडण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे तथ्य संकलनाच्या द्वितीय साधनांचाही उपयोग या अभ्यासासाठी करण्यात आला आहे. त्यामध्ये वर्तमानपत्र,मासिके, जर्नल, पुस्तके आणि ई -साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

अभ्यासाचे उद्देश:

1. सामाजिक माध्यमांवरील जाहिरातींचे महत्त्व तपासणे
2. वस्तू विकत घेणे आणि जाहिराती यांचा अन्योन्य संबंध तपासणे.
3. जाहिरातींचा समाज मनावर पगडा आहे का याचा अभ्यास करणे
4. जाहिरातींचे फायदे आणि तोटे अभ्यासणे

गृहितके :

1. समाज माध्यमांवरील जाहिरातींची लोकप्रियता वाढत गेलेली दिसते.
2. वस्तू खरेदी करण्यापूर्वी जाहिराती पाहून निर्णय घेतले जातात
3. जाहिरातींचा मोठा पगडा व्यक्ती मनावर दिसून येतो

4. जाहिरात ही लाभदायक आणि हानिकारकही असू शकते.

जाहिरात म्हणजे काय?

जाहिरात म्हणजे दृकश्राव्य किंवा दृक संदेश अशा विविध संपर्क माध्यमातून वस्तू व सेवा उपलब्ध आहे हे जनतेस कळवणे किंवा जाहीर करणे होय.

फ्रँक प्रेस बी याच्या मते, मुद्रित, लिखित, मौखिक अथवा चित्रित विक्रीकलेला जाहिरात असे म्हणतात.

जाहिरात शब्दाला हिंदी मध्ये विज्ञापन शब्द वापरला जातो. विज्ञापन शब्द वी आणि ज्ञापन या दोन शब्दातून बनला आहे. विज्ञापन शब्दाचा अर्थ विशेष रूपामध्ये ज्ञापन करणे किंवा सूचना प्रदान करणे असा आहे. जाहिराती ला इंग्रजी मध्ये advartise असे म्हणतात. या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील एडवर्ड या शब्दापासून झाली आहे.याचा अर्थ विशिष्ट दिशेने वळणे असा होतो.

ब्रिटन विश्वकोशानुसार, जाहिरात अशी घोषणा आहे जी विशिष्ट वस्तू आणि सेवेची विक्री करण्यासाठी एखाद्या विचाराचा प्रभाव निर्माण करण्याच्या उद्देशाने केली जाते. जेव्हा कोणतीही ज्ञात व्यक्ती प्रायोजक, उत्पादक, संस्था स्वखर्चाने आपली वस्तू किंवा सेवा किंवा कल्पना व्यक्तिविरहित स्वरूपात लोकांपुढे मांडते किंवा प्रचार करते त्याला जाहिरात असे म्हणतात,अमेरिकन मार्केटिंग असोसिएशन, शिकागो.जाहिरात ही एक कला आहे जी ग्राहकांचे मन वळवते. वृत्तपत्रांना निम्म्याहून अधिक उत्पन्न मिळते. राहणीमानात बदल होतात आणि परस्पर संबंध जाहिरातींमुळे वाढताना दिसतात. जाहिरात कला डॉट कॉम या पुस्तकाचे लेखक जयप्रकाश जगताप यांच्या मते जाहिरातीमुळे वस्तूंची मागणी वाढते. स्पर्धा वाढते आणि त्यातून गुणवत्ताही वाढते.

जाहिरात आणि समाजाचा संबंध:

आपले दैनंदिन जीवन जाहिरातींनी व्यापलेले आहे. जाहिरातींचा हेतू सुरुवातीच्या काळात प्रसिद्धी देणे हाच केवळ उत्पादकच जाहिरातींचा वापर करत. परंतु आज वाढदिवस,लग्न, सरकारी कार्यक्रम,सभा, संमेलने, वैद्यकीय गुंतवणूक आणि विविध संस्थांच्या कार्यक्रमांसाठी जाहिरातींचा सर्रास वापर केला जातो.सध्या निम्म्याहून अधिक उत्पन्न वर्तमानपत्रांना जाहिरातींमुळे मिळते.केवळ भारतातच नव्हे तर जगभरामध्ये सध्या जाहिरातींचे युग आले आहे. सकाळी वर्तमानपत्र उघडताच जाहिरातीच जाहिराती पाहायला मिळतात. टीव्हीवरील वेगवेगळया चैनल वर बातम्या पासून कोणत्याही कार्यक्रमापर्यंत त्यातील ठराविक वेळ जाहिरातींसाठी राखलेली आहे. त्यामुळे अनिवार्यपणे जाहिराती पहाव्या लागतात. मोबाईल हातामध्ये घेतल्यापासून सतत जाहिराती आपले अस्तित्व निर्माण करतात. घरातून बाहेर पडल्यापासून सातत्याने आपल्याला इमारतींवर रस्त्याच्या कडेला भिंतींवर मोठ मोठ्या फलकांवर जाहिरातीच जाहिराती दिसतात. कोणत्याही कंपनीमध्ये कार्यालयामध्ये किंवा बँकेमध्ये प्रवेश करतात जाहिरातींनीच स्वागत होत असते. बाजारीकरणाच्या या व्यवस्थेमध्ये प्रत्येक जण आपली वस्तू व सेवा विक्री करण्यासाठी प्रचंड स्पर्धा निर्माण करतो आहे. ग्राहकाला गोंधळुन टाकण्याचे काम अनेकदा जाहिरातीद्वारे केले जाते. वस्तू विक्री करण्यासाठी प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. समान फायदा असणाऱ्या एकाच प्रकारच्या असंख्य वस्तू बाजारामध्ये आहेत. त्यांच्या किमती वेगवेगळया आहेत.गुणवत्ता वेगवेगळी आहे आणि त्यासाठी जाहिरातींचा वापरही वेगवेगळया पद्धतीने केला गेला आहे. वस्तू खरेदी करताना ग्राहकांच्या मनावर जाहिराती अधिराज्य गाजवतात. जाहिरात जितकी आकर्षक, मनावर ठसायला सोपी, आपल्या जीवनातील भावनांशी संबंध जोडणारी, आपल्या आवडत्या व्यक्तींवर चित्रित केलेली तितकी ती जाहिरात आपल्या मनावर प्रभाव टाकते आणि विशिष्ट वस्तू घ्यायला आपल्याला प्रेरित करते. प्रत्यक्ष वस्तू घ्यायला ग्राहक जेव्हा दुकानात जातो तेव्हा त्याच्या दृष्टी पटलावर ती जाहिरात सतत येत असते.

एखाद्या वस्तूची निकड किंवा गरज ही ग्राहकाला वस्तू खरेदीसाठी दुकानापर्यंत नेते असा आजपर्यंतचा समज होता. परंतु आता जाहिरात बघता क्षणी वस्तू घेण्याची प्रेरणा गरज असो वा नसो ग्राहकाच्या मनात निर्माण होते. बाजारात जाऊन ती वस्तू सहजच विकत घेतली जाते. त्यामुळे वस्तू खरेदीसाठी केवळ गरज कारणीभूत नसून जाहिरात कारणीभूत ठरते. वस्तूंचे ब्रँड नेम आज वस्तूंची ओळख ठरली आहे.

बिसलरी हे ब्रँड नेम आहे. पाणी बंद बाटली हे मूळ उत्पादन आहे. कोणत्याही प्रकारच्या पाणीबंद बाटलीला आज बिसलरी म्हटले जाते. जाहिरातींनी बिसलरी हे नाव इतके लोकप्रिय केले आहे. सकाळी दात घासण्यासाठी भारतातील बहुतांश लोक कोलगेट वापरतात. कपडे धुण्यासाठी निरमा वॉशिंग पावडर किंवा सर्फ एक्सेल चा वापर केला जातो. बिस्किटे खायची तर ती पार्ले जी चीच, आंघोळ करायची ती हमाम किंवा मोती साबणानेच , पॉंड्सची पावडर, लहान बाळांसाठी जॉन्सन अँड जॉन्सन, डोळयात जाई काजळ, वूड वर्ड्स चे ग्राईप वॉटर, लेस चे वेफर्स, सुहाना मसाले, सोसायटी चहा, हिरोची सायकल अशी ग्राहकांची मानसिकता बनवण्यात जाहिरातींचा वाटा मोठा आहे.' वाह ताज 'असे जेव्हा झाकीर हुसेन म्हणतात तेव्हा उच्च घराण्यातील लोकांनी ताजमहलचा चहा पिला पाहिजे अशी मानसिकता बनते. सर्फ एक्सेल चा वापर श्रीमंत घरात वॉशिंग मशीन साठी केला जातो. हेमा मालिनीने सांगितले म्हणून एक्वागार्ड प्रत्येक घरात बसवले जाते. एरवी नळाचे किंवा विहिरीचे पाणी पिऊन मोठे झालेली पिढी आता एक्वागार्ड शिवाय पाणी पीत नाही. एवढा जाहिरातीचा प्रभाव आपल्या जीवनावर पडलेला दिसतो. पूर्वी बजाजचे पंखे घरोघरी होते, याचे कारण दर पंधरा मिनिटांनी लागणारी जाहिरात आणि त्याचा वारंवार ग्राहकांवर होणारा मारा हे होते. मच्छर मारण्यासाठी आज आपण 'गुड नाईट' लाव असे म्हणतो. म्हणजे मच्छर मारणारी वस्तू गुड नाईट नावानेच ओळखली जात आहे.

जाहिरातींना लोकप्रियता का मिळते?

भारतामध्ये पोलिओला बळी पडणाऱ्यांची संख्या मोठी होती. पोलिओ साठी लसीकरण मोहीम हातात घेतली गेली. परंतु कोणत्याही रोगाचे प्रतिबंधन करण्यासाठी भारतीय लोकांची अजागरूकता कारणीभूत ठरते. त्याप्रमाणेच पोलिओबाबतही घडले. पोलिओचा डोस मोफत देऊनही लोक आपल्या मुलांना लसीकरण करण्यासाठी घेऊन जात नव्हते. दरवर्षी पोलिओचे रुग्ण समाजामध्ये वाढत गेले. पोलिओ लसीकरण संदर्भात जाहिरात करण्यासाठी अमिताभ बच्चन यांनी 'दो बूंद जिंदगी के' असे सांगताच लोकांना पोलिओ लसीकरणाचे महत्त्व पटले आणि मोठ्या प्रमाणावर लसीकरणाला प्रतिसाद मिळू लागला. हे समाजाचे वास्तव आहे.

तंबाखू खाल्ल्याने, सिगारेट ओढण्याने तोंडाचा कॅन्सर निर्माण होतो आणि तो माणसाचा बळी घेऊ शकतो, याबाबत जागृती समाज माध्यमांवर वारंवार करण्यात येत होती. या जाहिरातीमध्ये तरुणांचा आयडॉल राहुल द्रविड ज्यावेळी लोकांना तंबाखू खाण्यापासून परावृत्त करतो तेव्हा तरुणांमध्ये त्याची जागृती निर्माण होते.

बूस्ट इज द सिक्रेट ऑफ माय एनर्जी.. असे जेव्हा कपिल देव किंवा सचिन तेंडुलकर म्हणतो तेव्हा घरोघरी सर्वजण आपल्या मुलांना बूस्ट प्यायला देतात.

सध्या चित्रपट आणि दूरदर्शन वरील सॅनिटरी पॅडच्या एका जाहिरातीमध्ये अक्षय कुमार झळकतांना दिसतो. तो सध्याच्या पिढीचा गळयातील ताईत बनला आहे. तो जेव्हा सॅनिटरी पॅडचे महत्त्व सांगतो तेव्हा ते सर्वसामान्य लोकांना पटते. भारतामध्ये क्वचित सुट्टी प्रसंगी लोक पर्यटनाला जात होते. केसरी टूर्सच्या जाहिरातींमुळे लोक आता पर्यटनाला जीवनाचा अविभाज्य भाग मानत आहेत. यावरून जाहिराती लोकांच्या मनावर सखोल परिणाम करतात हे दिसून येते.

जाहिरातींचे फायदे :

जाहिराती आणि खरेदी यांचा जवळचा संबंध आहे. तो असला तरीही नेहमीच जाहिराती नुकसानकारक नसतात. जाहिरातींचा वापर समाजाच्या फायद्यासाठी केला जातो. अनेक वेळा माहिती व सूचना यांचे प्रसारण प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचू शकत नाही. अशावेळी जाहिरातींच्या माध्यमातून या सूचना आणि माहितीला लोकांपर्यंत पोहोचवली जाते.

राज्य आणि केंद्र शासनाच्या योजना आणि धोरणे सामान्य जनांपर्यंत पोहोचवण्यासाठी जाहिरातींचा वापर होऊ लागला आहे. जाहिराती अगदी कमी कालावधीमध्ये लोकांच्या मनात घर करतात आणि लोक त्या वस्तू आणि सेवांचा वापर करतात. पंतप्रधान योजना,जनधन योजना, शेतकऱ्यांसाठी लाभदायक योजना, स्त्रियांसाठी लाभदायक योजना,रोजगार योजना, शिक्षणासाठीच्या योजना या जाहिरातींनी सामान्यांपर्यंत पोहोचवल्या आहेत. भारतामध्ये स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाणही चिंताजनक होते. मुलगी जन्माला आली की तिला नाकारले जाऊ नये म्हणून बेटी बचाव बेटी पढाव हे स्लोगन वापरून मुलींसाठी अनेक कल्याणाच्या योजना शासनाने सुरू केल्या आहेत. जाहिरातीद्वारे त्याचे प्रसारण होताना दिसते.

कोरोना काळामध्ये आरोग्य सेतू हे जाहिरातीद्वारे लोकांच्या पर्यंत पोहोचवले गेले. फोनची रिंग वाजता क्षणी फोन उचलल्या बरोबर कोरोना मध्ये घ्यायची काळजी याबाबतच्या सूचना अमिताभ बच्चन यांच्या आवाजामध्ये ऐकवल्या गेल्या. वारंवार या सूचना कानावर पडत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर हे नियम अंगीकरले गेलेले दिसतात.

समाज माध्यमांवरील जाहिरातींचा समाजावर होणाऱ्या अभ्यासातील निरीक्षणे:

गुगल फॉर्म द्वारे एकूण 64 विद्यार्थ्यांचे रिस्पॉन्सेस प्राप्त झाले. हे सर्व विद्यार्थी अंडर ग्रॅज्युएट शिक्षण घेणारे आहेत. म्हणजेच 18 ते 21 वयोगटातील आहेत.

1. शंभर टक्के लोकांनी जाहिराती आवडतात हे नमूद केले आहे.
2. प्रथम जाहिराती पाहून नंतर वस्तू घेण्याचे प्रमाण 85.7% आहे. 14.3% लोक फक्त जाहिराती न बघता वस्तू विकत घेतात.
3. वस्तू खरेदी करताना किंवा वस्तू निवडताना ग्राहक प्रथम दर्जा बघतात, 41.3%, त्यानंतर वस्तूंच्या किमती पेक्षाही अधिक प्राधान्य जाहिरातींना असलेले दिसते 38.1%, तिसऱ्या क्रमांकावर वस्तूची किंमत पाहून वस्तू खरेदी केली जाते 20.6%.
4. जाहिरात आवडली तर ती वस्तू वापरून पाहणाऱ्यांची संख्या लक्षणीय म्हणजे 95.2% आहे.

निष्कर्ष :

1. शंभर टक्के लोकांनी जाहिराती आवडतात असे नमूद केले आहे.यावरून जाहिरातींची लोकप्रियता लक्षात येते. केवळ मनोरंजन म्हणून जाहिरातींकडे पाहिले जात नाही. जाहिराती पाहून त्यांचा विचार करून त्यातील वस्तू घेण्यार्यांचे प्रमाण 85.7% आहे. याचा अर्थ 14.3% लोक फक्त जाहिराती न बघताच वस्तू विकत घेतात. समाज माध्यमांनी जाहिरातींचा कितीही मारा ग्राहकांवर केला तरीही ग्राहक या जाहिराती आवडीने बघतात. बाजारात येणाऱ्या नवनवीन वस्तूंची माहिती करून घेतात. गरज असणाऱ्या वस्तू तर विकत घेतल्या जातातच परंतु जाहिराती आवडल्या म्हणूनही वस्तू विकत घेतल्या जातात. त्यामुळे जाहिरातींचा पगडा व्यक्तिमनावर प्रचंड असलेला दिसतो. ग्राहकांच्या मनावर एखादी वस्तू ठसवण्यासाठी जाहिरातींचा पुरेपूर वापर करून घेतला जातो.

ग्राहक कोणत्या वर्गातील आहे, ग्राहकांचे राहणीमान,त्यांची संस्कृती, त्यांच्या श्रद्धा,विचार करण्याची पद्धत या सर्वांचा अभ्यास जाहिरातींमध्ये असतो. पापक्षालनासाठी गंगेचे पाणी महत्त्वाचे मानले जाते ही श्रद्धा हेरून स्नानासाठी गंगा साबण आणला गेला. आणि त्याला पवित्र स्नानाचा अनुभव असे म्हटले गेले. अल्पावधीतच हा साबण लोकप्रिय झाला. यावरून लोकांच्या श्रद्धा, त्यांचे विचार, त्यांची संस्कृती यांचे बाजारीकरण कसे केले जाते याची प्रचिती येते. आईचा चेहरा पाहिल्यानंतर मुलांना आनंद होतो, त्यांचा दिवस चांगला जातो असे दाखवून आईचा चेहरा पीयर्स साबणाने फ्रेश दिसतो अशी जाहिरात करून ग्राहकांच्या मानसिकतेचा उपयोग वस्तू विक्रीसाठी करून घेतलेला दिसतो.

2. जाहिरातींमुळे ग्राहकांना वस्तूंची माहिती मिळते.वस्तू वस्तूंमधील फरक कळतो. रंग,रूप, आकार असे वास्तव स्वरूप लक्षात येते.काही वेळा किंमतही समजते.एका शाम्पूच्या मोठ्या बाटलीची किंमत 90 रुपये असेल तर छोटा पॅक पाच रुपयाला मिळतो हे जाहिरातीमधून समजल्यावर ग्राहक त्याकडे आकर्षित होतात. वस्तूंना मागणी वाढते. त्यामुळे ग्राहकांना रूचेल त्या पद्धतीने उत्पादनाचे स्वरूप बदलून जाहिरातीत दाखवले जाते.
3. ज्या वस्तूंची जाहिरात होत नाही त्या वस्तूच्या विक्रीवरही परिणाम झालेला दिसतो. अशा वस्तू त्यांच्या घरात पाहायला मिळत नाहीत.
4. एखादी वस्तू एखाद्या जाहिरातीने घराघरात जाऊन पोहोचते.
5. वस्तूंची निवड करताना ग्राहक प्रथम दर्जा बघतात आणि नंतर जाहिराती बघून वस्तूंची निवड करतात. ही निवड करताना किमतीला तिसरे स्थान दिले जाते हे विशेष. याचा अर्थ खिशाला परवडत नसेल तरीही जाहिरात आवडली तर वस्तू विकत घेणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठी आहे. वस्तूंच्या किमती पेक्षाही वरचे स्थान जाहिरातींनी मिळवले आहे.
6. जाहिरात आवडली तर वस्तू वापरून पाहणाऱ्यांची संख्या 95.2% आहे. याचा अर्थ जाहिराती ग्राहकांच्या मानसिकतेवर निश्चित परिणाम करतात आणि त्यांना वस्तू खरेदीसाठी बाजार पेठेत जाण्यास प्रवृत्त करतात. त्यामुळे आर्थिक क्षेत्रात प्रचंड उलाढाल होते. वस्तूंना जशी मागणी वाढते तशीच जाहिरातींसाठी ही मागणी वाढते.
7. जाहिराती ग्राहकांच्या मनावर ठसाव्यात म्हणून ग्राहकांच्या आवडत्या व्यक्तींचा वापर करून घेतला जातो . उदाहरणार्थ सेलिब्रिटी मोठ्या प्रमाणावर जाहिराती करताना दिसतात आणि त्यांनी वापरायला सांगितलेल्या वस्तू ग्राहक हमखास वापरतात. भारतामध्ये खेळाडू ,चित्रपट अभिनेते हे सामान्य लोकांचे आयडॉल आहेत. त्यांचा पूर्ण वापर वस्तूंच्या मागणीत वाढ होण्यासाठी करून घेतला जातो. लक्स साबणाच्या जाहिरातीत सर्व स्टार हीरोइन जाहिरात करताना दिसतात.
8. जाहिराती या केवळ वस्तूंची ग्राहकांना माहिती व्हावी आणि वस्तूंना मागणी वाढावी एवढ्या पुरत्याच मर्यादित नसतात. जाहिराती समाजामध्ये नवीन संस्कृती निर्माण करतात. ग्राहकांना चंगळवादाकडे नेण्यास प्रवृत्त करतात. सामान्य लोकांनाही गरज नसलेल्या वस्तू विकत घ्यायला भाग पाडतात. गरीब लोकांना आपल्यापेक्षा वरच्या वर्गातील लोक जसे राहतात ते बघून त्या पद्धतीने राहणीमान बदलण्याची इच्छा असते. हे हेरून उत्पादक जाहिरातींच्या माध्यमातून ग्राहकांच्या जीवन पद्धतीवर फार मोठा परिणाम घडवतात.त्यामुळे असे म्हणता येईल की जाहिरातींनी आज समाज मनावर अधिराज्य गाजवले आहे.

जाहिरातींमुळे होणारी हानी :

सतत जाहिरातींचा मारा अनेक समाज माध्यमांच्या द्वारे ग्राहकांवर होत असल्याने क्वचित प्रसंगी जाहिराती त्रासदायक वाटतात. टीव्हीवरील बातम्या किंवा कार्यक्रम बघत असताना मध्ये मध्ये येणाऱ्या जाहिराती अडथळे निर्माण करतात. ग्राहकांचा वेळ वाया घालवतात. जाहिरातीमुळे 18 वर्षाखालील मुलांना अनेक गोष्टींची माहिती अर्धवट रित्या समजते आणि त्यातून त्यांच्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. सिगारेट ओढणारा हिरो बघितला की तसे करून बघण्याची इच्छा मुलांना निर्माण होते. अधिक किमतीच्या वस्तूंची जाहिरात आवडल्यामुळे खिशाला परवडत नसतानाही अशा वस्तूंची मागणी वाढते. आणि त्यामुळे कर्जबाजारीपणा किंवा नकळत ताण निर्माण होतात. अनेकदा जाहिराती फसव्या असतात हे ग्राहकांना कळत नाही. आणि बरेचदा कळले तरी वळत नाही. जाहिरातीमध्ये दाखवलेल्या वस्तूचा फायदा प्रत्यक्षात असेलच याची खात्री करून घेतली जात नाही आणि बरेच वेळा ग्राहक फसवला जातो. फेअर अँड लवली हे क्रीम चेहऱ्याला गोरा बनवते असे वर्षानुवर्षे सांगितले गेले आहे. परंतु आजवर कोणाचा चेहरा गोरा झालेला नाही. तरीही उत्पादनाला मागणी मिळते. जाहिराती कितीही सुंदर आणि आकर्षक केल्या तरीही वस्तूचे गुण तितके चांगले असतील याची खात्री देता येत नाही.

लाभ :

जाहिरातीमुळे विविध वस्तू,उत्पादन आणि कल्पना ग्राहकांना समजतात.घरी बसल्या बसल्या वस्तूंची माहिती मिळवता येते. एकसमान असणाऱ्या वेगवेगळया कंपन्यांच्या वस्तूंची तुलना करून पाहता येते.जाहिरातीमुळे खरेदी विक्री मोठ्या प्रमाणावर होते आणि पैशांची उलाढाल होते. बाजारपेठेला तेजी येते. उदा सौंदर्यप्रसाधनांच्या जाहिरातींनी सौंदर्यवर्धक उत्पादनांची मागणी खूप वाढलेली दिसते. प्रत्येक व्यक्तीला आपण सुंदर दिसावे असे वाटते ही मानसिकता ओळखून प्रत्येक व्यक्तीमध्ये सुंदर दिसण्याची इच्छा आणि वस्तूंची मागणी जाहिराती निर्माण करतात. फेअर अँड लव्हली हा स्त्री सौंदर्याचा अविभाज्य भाग होता, आता फेअर अँड हँडसम ने पुरुषांनाही सुंदर दिसण्यासाठी भाग पाडले आहे. सॅनिटरी पॅडच्या जाहिरातीमुळे पारंपारिक कपडे वापरणे कमी होत असून स्वच्छतेबाबतही जागृती केली जात आहे. गर्भपात हा कायद्याने गुन्हा आहे हे जाहिरातीद्वारे माहित करून दिले जाते. संघटनात शक्ती असते हे सुद्धा जाहिरातीद्वारे व्यक्तिमत्वावर ठसवले जाते. विविध राज्यांची बोली वेगळी असली तरीही सर्व राज्य जोडून अखंड भारत तयार करण्याचे स्वप्न जाहिरातीद्वारे दाखवले जाते. मिले सुर मेरा तुम्हारा तो सुर बने हमारा या जाहिरातीने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला आहे.

संदर्भ :

1. सामाजिक मूल्य आणि माध्यमे, जयदेव डोळे ,जनशक्ती वाचक चळवळ, 2011
2. प्रसार माध्यमांची परखड हालहवाल, ई महाराष्ट्र टाइम्स, 19.6.2011.
3. advertising concept and copy, 6.9.2013, George Felton,ww Norton & vompony.
4. what is advertising, Ashish pahwa, shopify, 12.3.2023
5. Facebook advertising,27.6.2018
6. जग जाहिरातींचे नचिकेत प्रकाशन सुधाकर घोडेकर,16.6.2014.

*प्राध्यापक आणि विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, दयानंद कला महाविद्यालय,लातूर,
anjali.tembhurnikar@ gmail.com

***

समाजमाध्यमांच्या परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास

*प्रा.डॉ.एस.व्ही.भद्रशेटे

प्रस्तावना

समाजमाध्यमांनी वर्तमान काळात धुमाकूळ घातला आहे. जवळपास 10 ते 15 कोटी लोक समाजमाध्यमांशी जोडले गेले आहेत. रोज नवीनअप्स विकसित होत आहेत जसे whats app, let'sap Facebook Instagram Messager Telegram Twitter, Vlog, इ.यामाध्यममामुले व्यक्तीनं समाजात अभिव्यक्त होण्याची संधी सहज व सुलभ झाली आहे. मोठ्या प्रमाणात इन्टरनेट डाटा टॉकटाईम सोबत मोफत मिळत आहे. मोबाईल कंपन्यांनी सुरवातीला ग्राहक जमवण्यासाठी मोफत सिम व डाटा दिला (Jio) यामुळे लोकांना मोबाईल जास्त वेळ वापरण्याची सवय लागली. आता लोक सवयीच्या आधीन झाली आहेत. आभासी जगात लोकांचा खूप वेळ जात आहे. नव्हे त्याचे वेड लागले आहे.ओळखीच्या व अनोळखी व्यक्तीशी जोडली जात आहेत. त्याचे समाजावर चांगले वाईट परिणाम होत आहेत. नाण्याच्या दोन बाजू असतात तशाच समाजमाध्यमांच्या ही दोन बाजू आहेत म्हणून या परिणामाचे अध्ययन करण्यासाठी समाजमाध्यमांच्या जाळयात अडकलेल्या समाजाची वास्तविकता जाणून घेण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली

संशोधनाचे उद्देश -

* समाजमाध्यम संकल्पना समजावून घेणे
* सामाजिक जीवनावर झालेल्या परिणामाचा शोध घेणे
* कुटुंबावर झालेले परिणाम अभ्यासणे
* विवाह संस्धेवर झालेला परिणामाची चिकित्सा करणे
* शिक्षणावर झालेले परिणाम अभ्यासणे
* आरोग्याच्या समस्येचा अभ्यास करणे

संशोधनाची गृहीतकृत्ये -

1. समाज माध्यमांमुळे सामाजिक जीवन प्रभावित झाले आहे
2. कुटुंब संस्थेवर परिणाम झाला आहे
3. विवाह संस्थेवर परिणाम झाला आहे
4. नातेसंबंधावर परिणाम झाला आहे
5. शिक्षण क्षेत्र प्रभावित झाले आहे
6. आरोग्यावर परिणाम होत आहे

अशाप्रकारे संशोधनाची गृहीत कृत्य वरील प्रमाणे मांडण्यात आली आहेत

तथ्य संकलन -

प्रस्तुत विषयाच्या तथ्य संकलनाकरिता निरीक्षण अनुभव व गटचर्चा या प्राथमिक स्त्रोतातील अभ्यास तंत्राचा वापर करण्यात आला दुय्यम स्त्रोतातील वर्तमानपत्रे मासिके संदर्भ ग्रंथ इंटरनेट विविध समाज माध्यमे दूरदर्शनवरील बातम्या इत्यादीचा वापर करण्यात आला.

संशोधनाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडण्यात आले आहेत.

1. समाज माध्यमे म्हणजे व्हाट्सअप,लेट्ससी फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर व ब्लॉग इत्यादी यांनाच समाज माध्यम असे म्हटले जाते.

2. समाज माध्यमातून तरुणांमध्ये मैत्रि निर्माण होऊन त्यातून प्रेम संबंध विवाह अनैतिक संबंध विवाहबाह्य संबंध वादविवाद दोष फसवणूक घटस्फोट इत्यादी सारख्या वाईट घटना घडत आहेत.
3. बऱ्याच वेळेस काही वाईट अफवांचे प्रसारण होऊन समाजात गडबड गोंधळही होत असतो. अनुचित प्रकार घडतात जसे भीमा कोरेगाव प्रकरणानंतर परिस्थितीत बिघड बिघडण्यास समाज माध्यमे काम करतात .त्याचप्रमाणे कोरोना प्रादुर्भाव काळात त्या संदर्भातील मृत्यूची आकडेवारी वारंवार माध्यम मधून सांगितली जात होते त्यामुळे करुणा पिढीतील व्यक्ती घाबरून मृत्यूही अनेकांचे झालेले उदाहरणे आहेत. या काळात या रोगाच्या संदर्भात जी काळजी घ्यायची होती त्या संदर्भात खूप मोठी जाणीव जागृती होण्याचे हे महत्त्वाचे कार्य माध्यमातून झाले.
4. आजारपण वापघात इत्यादी अशा सर्व मी सांगून त्याचे फोटो त्याचे टेक्स्ट मेसेज व्हाट्सअप वर फिरवून संबंधित व्यक्तींची सहानुभूती मिळवणे व त्यानंतर त्यांच्याकडे पैशाची मागणी करणे असे फसवणुकीचे प्रकारही होत आहेत.
5. कधी तरुणीला भेटण्यासाठी बोलवून जुबाडणे तिच्यावर लैंगिक अत्याचार करून त्याचे छायाचित्रण करणे ते समाज मध्ये प्रस्तुत करणे किंवा तशी धमकी देणे विविध प्रकारे ब्लॅकमेल करणे असेही गंभीर प्रकार स्त्रियांच्या संदर्भात घडत आहेत
6. सध्याच्या काळात न्यायाधीशांना देखील या समाज माध्यमांना सामोरे जावे लागत आहे मंत्र्यांविरुद्ध फेसबुक ट्विटरवर आक्षेपार्ह नी बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध केला जातो कधी तो योग्य तर कधी तो अयोग्य असतो त्यामुळे त्याचेही समाजावर संबंधित व्यक्तीवर परिणाम होत असतो.
7. अन्याय अत्याचार व छळ याविषयीची जागृती ही सामाजिक माध्यमे करीत आहेत .
8. राजकारण समाजकारण अर्थकारण इतिहास भाषा इत्यादी क्षेत्रातील अद्यावत अज्ञानाची प्राप्ती होत आहेत अनेक पर्यटन स्थळांची माहिती होत आहे तसेच त्या संदर्भात मार्गदर्शनही होत आहे.
9. बऱ्याच काही कोर्सेस ची माहिती करिअरची संधी याविषयी माहिती समाज माध्यमातून मिळत असल्यामुळे त्याचाही फायदा मुलांना होत आहे.
10. कामानिमित्त व्हाट्सअप ग्रुप निर्माण होतात आणि कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींचीही मग देवाण-घेवाण होत असते फोटोंची देवाण-घेवाण होऊन त्याचा गैरफायदाही घेतला जात आहे हे फोटो अश्लील त्याच्या जवळ जातात हळूहळू पूर्ण व्हिडिओ फोटोही मग शेअर व्हायला सुरुवात होते नको त्या वयात लैंगिक संबंधांचे ज्ञान होऊन त्याचे वाईट परिणाम लहान मुलांवर होतात त्यांचे बालपण हिरावले जाते
11. एस एम एस द्वारे ब्लॅकमेल करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, बदनामीची भीती घालणे, फोनवर कोणत्याही कारणाने अनावश्यक संपर्क साधून त्रास देणे असे इत्यादी प्रकार घडत आहेत अप्रत्यक्ष संबंधाचे गैरफायदे घेतले जात आहेत.
12. कुटुंबातील संबंध दुरावत आहेत संवाद कमी होत आहे सर्व सदस्य मोबाईलवर व्यस्त राहत आहेत समाजाची निर्मिती व्यक्तींच्या प्रत्यक्ष अंतरक्रियेतून होते परंतु समाज माध्यमांमुळे अप्रत्यक्ष संबंधाची निर्मिती होत आहे प्रत्यक्ष संबंधावर त्याचे वाईट परिणाम होत आहेत म्हणजेच नातेसंबंधावर परिणाम झाला आहे . असे अनेक परिणाम समाज माध्यमांमुळे समाज जीवनावर होत असलेले दिसून येत आहेत.
13. विवाह संकेतस्थळावरून बरेच विवाह जोडले जात आहेत हा चांगला परिणाम आहे परंतु विवाह जोडीदार शोधण्यासाठी पैशाची मागणी दलालाद्वारे केली जाते आणि यात बऱ्याच वेळेस फसवणूकही होत आहे पैशाची मागणी केली जाते परंतु प्रत्यक्षात मात्र स्थळांची माहिती मागितली असता फोन उचलला जात नाही किंवा फोन ब्लॉक केला जातो अशा प्रकारची फसवणूक बऱ्याच लोकांची झाल्याचे समोर येत आहे त्यामुळे सावधान राहून व्यवहार पार पाडणे विवाह संकेतस्थळांची विश्वसनीयता तपासणे गरजेचे आहे.

14. समाज माध्यमांमुळे अप्रत्यक्ष संबंधांची निर्मिती होऊन आभासी जगात मुले वावरत आहेत एकलकोंडी होत आहेत यालाच वास्तविक जीवन ते समजत आहेत विविध प्रकारच्या गेमचे व्यसन लागून कित्येक मुले आत्महत्या करत असल्याचेही समोर येत आहे. घरातल्या घरातही कुटुंबाच्या सदस्यांमधले संवाद हे कमी होत चाललेले आहेत.
15. समाज माध्यमांचे व्यसन हा एक व्यसनाधीनतेचाच नवीन प्रकार झाला आहे अगदी दीड दोन वर्षाच्या बालकापासून ते वयोवृद्धांपर्यंत हे व्यसन लागत आहे. ही साधने उपलब्ध होत नसतील तर व्यक्तीची चिडचिड होत आहे त्याची अस्वस्थता वाढत आहे एकूणच काय तर सदस्यांच्या मानसिक आरोग्यावर त्याचे परिणाम होत आहेत .
16. इंटरनेटची उपलब्धता ही भुलभुलय्या आहे जादूची दुनिया मध्ये एकदा आपण शिरलो की बाहेर येण्याचे मग भानही राहत नाही इथे शिरल्यानंतर कुठला मार्ग निवडायचा काय शोधायचे काय बघायचे काय ऐकायचे हे कळत नाही मग वेळेचे भानही राहत नाही.
17. बऱ्याच शासकीय योजनांची माहिती ही या समाज माध्यमांमुळे सहज सुलभ पद्धतीने उपलब्ध होत आहे व व घरबसल्या सर्व कामे होत आहेत
18. शाळा महाविद्यालयातील प्रवेश फॉर्मची उपलब्धता ऑनलाईन होत असल्यामुळे बरीच सोय होत आहे.
19. प्रत्यक्ष शिक्षण प्रक्रियावर मात्र त्याचे खूप गंभीर परिणामही होत आहेत. हे तंकरता येत नाही शिक्षक विद्यार्थी प्रत्यक्ष संबंधातून शिक्षणाची प्रक्रिया जास्त परिणामकारक असते हे यातून विशेषत्वाने जाणवत आहे
20. विविध प्रकारच्या चळवळीही आता ऑनलाईन होत आहेत त्याचीही दखल घेतली जात आहे
21. जोडीदार निवडीसाठी अनेक पर्याय उपलब्ध होत आहेत त्यामुळे बऱ्याच पैसा आश्रम वेळ यांची बचत होत आहे प्रत्यक्ष घरी जाऊन पाहुण्यांना आमंत्रण देण्याची गरज राहिलेली नाही दोन्हीही पक्षाकडून पारस्पारिक सामंजसत्वाचे संबंध निर्माण होत आहेत
22. बऱ्याच वेळेस वैवाहिक संबंध निर्माण होऊन ब्रेकपही होत आहे.
23. वस्तूंच्या ऑनलाईन खरेदीसाठी ही ग्रुप तयार करून आकर्षक वस्तू कमी किमतीत दाखविल्या जातात ऑनलाइन प्रीपेड पैशांची मागणी केली जाते प्रत्यक्ष वस्तू घेतल्यानंतर ग्राहक फसण्याची शक्यता नाकारता येत नाही किंवा कधीकधी त्या वस्तू मिळतही नाहीत मग अशावेळी कॉलही रिसीव केला जात नाही छोट्या रकमेच्या तक्रारीसाठी पोलिसांची संपर्क साधने टाळले जाते कारण ती प्रक्रिया फार किचकट आहे आणि स्वतःच्या प्रतिष्ठेचाही प्रश्न निर्माण होतो अशी कोंडी ग्राहकाची होती होते तसेच वस्तूच्या गुणवत्ताही ऑनलाईन मध्ये तपासता येत नाही.
24. समाज माध्यमांच्या अतिरिक्त वापरामुळे निराशाचे प्रमाण समाजामध्ये वाढत आहे संकुचित प्रवृत्ती निर्माण होत आहे आयुष्याविषयीचे आभासी चित्र चुकीच्या पद्धतीने रंगविले जात आहे त्यामुळे द्वेष भाव वाढत आहे आभासी जगामुळे किशोरवयीन मुले स्वतःची निर्णय क्षमता हरवून बसतात किंवा डिसिजन पॅरॅलिसिसची शिकार ठरतात बरेचदा असंख्य पर्याय मिळाले की मेंदूला कशाला सामोरे जावे याविषयीची द्विधा निर्माण होते.
25. समाज माध्यमांमुळे प्रत्येकाला आपल्या आयुष्य महत्त्वपूर्ण वाटायला लागले आहे केवळ फोटो शेअर करून काहीजण थांबतात तर काही व्हिडिओ शेअर करतात स्वतःच्या आयुष्याचे चित्रण करून पर्यटन करून ते व्हिडिओ शेअर करून पैसेही कमवत आहेत
26. समाज माध्यमांमुळे पूर्वीपेक्षा आता लोकांपर्यंत बातम्या मग त्या खऱ्याअसच की खोटे असो लवकर पोहोचत आहेत त्यावर लोक अभिव्यक्तही होत आहेत.
27. समाज माध्यमांमुळे विशिष्ट प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये वाढ ही झालेले आहे जसे लैंगिक कृतीवर आधारित गुन्हे आणि आर्थिक गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली आहे सायबर गुन्हेगारी मध्ये वाढ झाली आहे.
28. अंधश्रद्धेचा पहिला वही मोठ्या प्रमाणात व्हाट्सअप सारख्या माध्यमातून होत आहे अमुक एक मेसेज दहा लोकांना पाठवा शंभर लोकांना पाठवा त्याचे चांगले फळ मिळेल यासारख्या मेसेज पाठवून अंधश्रद्धा निर्माण केली जात आहे विज्ञानाच्या युगामध्ये अंधश्रद्धाचा प्रभाव कमी होण्याऐवजी तो वाढतच असलेला दिसून येतो.
29. पर्यावरणाबाबत जाणीव जागृती कृतिकशील कार्यक्रमांची माहितीही होत आहे.

30. वर्तमानपत्रे मासिके पाक्षिकांचे वाचन सुलभतेने करता येणे समाज माध्यमांमुळे शक्य झाले आहे .
31. खेळाची मैदाने व बागबगीचे ओस पडत आहेत.
32. समाजमाध्यमांचा सर्वच स्तरांतील लोकांकडून होणारा वापर स्वागतार्ह आहे. संवाद वाढविण्यासाठी समाजमाध्यमांचा वापर वाढत आहे. मात्र कोणतीही खाजगी माहिती फोटो शेअर करताना काळजी घेणे आवश्यक आहे.
33. घरातील मुलामुलींची माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्याची बाब सर्वत्र दिसून येते. ही बाब घातक आहे. या साईटच्या माध्यमातून माहिती उपलब्ध झाल्याने अनेक ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांचे अपहरण झाल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत त्यामुळे लहान मुलांचे पिकनिक हॉटेलिंग शॉपिंग चे फोटो शेअर करू नये.

सारांश -

समाज माध्यमाच्या जगतात प्रवेश केल्यानंतर कुठला मार्ग शोधायचा काय बघायचं काय ऐकायचं काय टाळायचं काय शोधायचं हे सदसद विवेक बुद्धीने प्रत्येक व्यक्तीला ठरवता आलं पाहिजे किंवा त्याबद्दल इतरांकडून मार्गदर्शन घेतले गेले पाहिजे या आभासी दुनियेत फिरताना काय धोके असू शकतील ते समजावून घेणे गरजेचे आहे त्यांची विश्वसनीयता पडताळून पाहणे आवश्यक आहे समाज माध्यम ही आज समाजाच्या वेगवेगळया प्रकारच्या कर्जाची पूर्तता करत आहेत परंतु काही दुष्परिणाम ही त्याचे समाजावर होत आहेत त्यामुळे दुष्परिणामांची परिणाम होणार नाहीत याची काळजी घेतली गेली पाहिजे कारण या माध्यमांचा वापर करणे हळूहळू अनिवार्य झाले आहे ते टाळता येणार नाही समाज माध्यम माझे गुण चांगले किंवा वाईट हे व्यक्तींच्या वापरावरून ठरते सामाजिक जीवनाचे आज प्रत्येक क्षेत्र समाज माध्यमांनी प्रभावीत झालेली दिसून येते प्रत्येक क्षेत्रावर त्याचे चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम होत आहेत त्यामुळे या माध्यमांचे संभाव्य धोके लक्षात घेऊन समाज माध्यमांचा वापर करणे योग्य ठरते.

संदर्भ ग्रंथ-

1. दैनिक लोकसत्ता, 8 /8 /2017
2. दैनिक लोकसत्ता, 30 12 2018
3. दैनिक लोकमत, 4/1/ 2018
4. सैनिक यशवंत, 17 8 2019
5. यशवंत, 21/8/2019
6. सर्व इलेक्ट्रॉनिक समाज माध्यमे

*समाजशास्त्र विभाग (पदवी व पदव्युत्तर वर्ग), महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर,
संशोधन मार्गदर्शक, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड

***

पर्यावरण संवर्धनात प्रसार माध्यमांची भूमिका

*डॉ. गोपाल गांगर्डे

प्रस्तावना:-

पृथ्वीवरील जीवसृष्टी ज्या विशिष्ट अधिवासात व नैसर्गिक परिस्थितीत जगते, त्या सर्व पार्श्वभूमीला सर्वसाधारणपणे 'पर्यावरण' असे म्हटले जाते. 'पर्यावरण' हा शब्द 'Environner' या फ्रेंच शब्दापासून बनला आहे, ज्याचा अर्थ व्यापून टाकणे किंवा वेढणे असा होतो (Bhattacharyya & Jana, 2015). सर्व जैविक व अजैविक घटकांचा पर्यावरणात समावेश होतो. पर्यावरणाचा सजीवांवर परिणाम होत असतो आणि सजीवांचा पर्यावरणावर परिणाम होतो. पर्यावरणात सजीवांसाठी हवा, पाणी, अन्न, निवारा आणि प्रकाश या मूलभूत सुविधा उपलब्ध असतात. पर्यावरण हे कोणत्याही एका घटकाचे नाव नाही तर त्या सर्व परिस्थिती किंवा घटकांची बेरीज आहे, ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मनुष्याच्या जीवनावर आणि विकासावर परिणाम होत असतो. पर्यावरण म्हणजे जैविक समुदाय ज्या भौतिक परिस्थितींमध्ये राहतो त्यांची ही गोळा बेरीज असते. ही भौतिक परिस्थिती नेहमी बदलत असते आणि त्यांच्यामध्ये राहणारे सर्व जैविक घटक त्यांच्या उत्पत्ती, विकास आणि कार्यप्रणाली अंतर्गत या परिस्थितींमुळे प्रभावित होतात.

पर्यावरण हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग असून नैसर्गिक संसाधनांशिवाय मानवी जीवन केवळ अशक्य आहे. अलीकडील काळात विकासाच्या नावाखाली जे उपक्रम/योजना हाती घेतल्या त्यांच्या अंमलबजावणीमुळे नैसर्गिक संसाधनांचे शोषण झालेले दिसते. त्यामुळे जलप्रदूषण, हवा प्रदूषण, तापमान बदल, संसर्गजन्य आजार, मानवी जीवनाच्या गुणवत्तेचा होत असलेला ऱ्हास असे अनिष्ट परिणाम दिसून आलेले आहेत. पर्यावरण ऱ्हासाचा अखील सृष्टीच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे राहीले आहे. मानव हा निसर्गाचा एक भाग आहे मात्र स्वार्थी कारणांसाठी तो निसर्गाचे अधिकाधिक शोषण करत आहे. नैसर्गिक पर्यावरणातील हवा, पाणी, जमीन, वनस्पती आणि जीवजंतू एकमेकांशी संबंधित आणि एकमेकांवर अवलंबून आहेत. कोणत्याही एका घटकातील बिघाडाचा परिणाम उर्वरित चार घटकांवर होतो. भविष्यातील पिढ्यांसाठी पृथ्वी सुरक्षित ठेवायची असल्यास पर्यावरणाचे संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा स्वीकार आपणास करावा लागेल. शाश्वत विकासात पर्यावरणाचा समतोल राखून विकास साधने होय. The World Commission on Environment and Development (1987) यांनी माध्यमांचा शाश्वत विकासातील प्रमुख साधन मानले आहे.

समाज माध्यमांचा समाजातील व्यक्तींवर मोठा प्रभाव असतो. माध्यमांचा व्यक्तीवर्तनावर प्रभाव पडतो माध्यमांच्या भूमिकेमुळेच व्यक्तींच्या विचार आणि कार्यालाही दिशा मिळत असते. भूतकाळाचा आपण वेध घेतल्यास आपल्या लक्षात येईल की, एका विशिष्ट समस्येवर किंवा विषयावर जनमत तयार करण्यात प्रसार माध्यमांनी मोलाची भूमिका बजावली आहे. तसेच समस्या निर्मूलनासाठी तयार करण्यात आलेल्या धोरणांवर प्रभाव टाकला आहे. (Wilkins, 2003). समाज, संस्कृती व राजकारणाला आकार देण्यात माध्यमे महत्वाची भूमिका बजावतात तसेच एखाद्या विषयाबाबत जनमत करण्यातही माध्यमांची भूमिका अनन्यसाधारण आहे. त्यामुळेच आज जो पर्यावरणाचा गंभीर प्रश्न आपल्या समोर आहे त्याच्या संवर्धनात माध्यमांची काय भूमिका आहे याचे परिक्षण करण्याचा प्रयत्न सदर शोध निबंधातून करण्यात आलेला आहे.

संशोधनाचे उद्देश-

1. पर्यावरण ही संज्ञा समजून घेणे.

2. पर्यावरण समस्यांचा आढावा घेणे.
3. पर्यावरण संवर्धनात माध्यमांची भूमिका विशद करणे.

संशोधन पध्दती-

प्रस्तुत संशोधन हे पूर्णत: व्दितीयक तथ्यांवर आधारित असून माहिती संकलनासाठी संशोधकाने विविध संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, शासकीय निमशासकीय अहवाल, इंटरनेट यांचा स्त्रोत म्हणून उपयोग केला आहे. प्राप्त माहितीचे चिकित्सक परिक्षण करून प्रस्तूत शोध निबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे.

पर्यावरण म्हणजे काय?

पर्यावरण म्हणजे आपल्या भोवतीचा परिसर असे सामान्यपणे म्हणता येईल. यामध्ये आपल्या भोवताली असणारे सगळेच घटक येत असतात. आपल्या भोवतीचे वृक्ष, पक्षी प्राणी, माणूस, जमीन, पाणी, हवा, जंगल, डोंगर, या सर्वाचे एकत्रित असणे म्हणजे परिसर असतो. पर्यावरण या शब्दाच्या सर्वसामान्य व्याख्येनुसार सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात. वैज्ञानिक पारिभाषिक कोशानुसार पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमीन, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, उंची, तापमान, इत्यादी सर्वांचा समावेश होतो. मराठी विश्वकोशातील व्याख्येनुसार विशिष्ट वेळचे पर्यावरण म्हणजे शिलावरण, जलावरण, जीवावरण व वातावरण या मुख्य भूवैज्ञानिक घटकांतील सतत चालू असणाऱ्या प्रक्रिया व आंतरक्रिया यांचा परिणाम होय. (मराठी विश्वकोश) मराठी विश्वकोशानुसार सर्व सजीव व त्यांच्या भोवतीचे पर्यावरण एकात्मपणे परस्पराश्रयी असतात. सजीवांना त्यांच्या जीवनसंघर्षासाठी आणि उत्क्रांतीमध्ये सभोवालतच्या पर्यावरणाशी जुळवून घ्यावे लागते अथवा अनुकूल असे बदल करावे लागतात. जे सजीव आपल्यात बदल घडवून आणण्यात कमी पडतात किंवा काही कारणास्तव ते स्वतःमध्ये बदल घडवू शकत नाहीत ते नष्ट होतात. जो बदल स्वीकारतो तोच येथे तग धरून राहू शकतो. पर्यावरण आणि मानव यांचे परस्पर संबंध नेहमी बदलत असतात. पर्यावरणाचे रक्षण करणे सर्वांची जबाबदारी आहे.

पर्यावरणाच्या समस्या:-

पृथ्वीला हवामान बदलाचा सामना करावा लागत आहे कारण तापमान वाढत आहे. आणि हे मानवी क्रियाकलापांमुळे गतिमान झाले आहे, म्हणजेच आपण मानवांना चालविले आहे आणि हरितगृह वायू उत्सर्जन वाढवले आहे. पर्यावरणाच्या समस्यांमुळे मानवी जीवनाचे तसेच पृथ्वीच्या परिसंस्थेचे नुकसान होत आहे. पर्यावरण ऱ्हास ही समस्या केवळ पर्यावरणाशीच नाही तर पृथ्वीवर राहणाऱ्या प्रत्येक घटकाशी संबंधीत आहे. मानवाच्या क्रियाकलापांमुळे पर्यावरणाची गुणवत्ता सतत खालावते आहे ज्यामुळे शेवटी पृथ्वीच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. मानवाने निसर्गात असंतुलन निर्माण केले आहे, त्यामुळे निसर्गाचा कोप प्रदूषणाच्या रुपात दिसून येत आहे. आजच्या काळात माणसाला शुध्द अन्न, शुध्द पाणी आणि हवाही मिळत नाही. व्यक्तीला राहण्यासाठी शांत वातावरणही उपलब्ध नाही. पाणी, हवेत प्रदूषके मिसळल्याने निसर्गातील घटकही प्रदूषित झालेले आहे. झपाट्याने वाढलेल्या औद्योगिकरणामुळे समुद्र, नद्या, माती, जमीन, हवा, जलसाठे प्रदूषित झाले आहेत. पर्यावरणीय समस्येमुळे हवामान झपाट्याने बदलत असून धुके, आम्लपर्जन्य, विषारी पाऊस यासारख्या गोष्टी सामान्य होत आहेत. तसेच नैसर्गिक आपत्तींची संख्या वाढत आहे जवळजवळ दरवर्षी पूर, दुष्काळ, भूस्खलन, भूकंप आणि इतर अनेक संकटे वाढत आहेत.

पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करून प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकते. प्रदूषण रोखण्यासाठी सर्वच देशांना एकत्र यावे लागेल व कठोर नियम तयार करावे लागतील. शिवाय पर्यावरण समस्येविषयी

लोकांनाच जागृत करावे लागेल. पर्यावरण समस्यांविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण होण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका महत्वाची असणार आहे.

पर्यावरण संवर्धनात प्रसार माध्यमांची भूमिका:-

माहिती कमी वेळात जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रसार माध्यमे करतात. सोशल मिडिया हे इलेक्ट्रिनक प्रसार माध्यमाचा एक घटक असून सोशल मिडिया म्हणजेच सामाजिक माध्यमे, माध्यम म्हणजे संवाद साधण्यासाठी वापरण्यात येणारे साधन आणि सामाजिक माध्यम म्हणजे समाजातील अनेक घटक, व्यक्ती, संस्था, समुह हे एकमेकांशी संवाद साधण्यासाठी वापरत असलेले माध्यम म्हणजे सामाजिक माध्यम होय. फेसबुक, ट्विटर, लिंकड-इन, यु-ट्युब, गुगल, व्हॉटसप, तसेच नव्याने आलेले टीक टॉकही सामाजिक प्रसार माध्यमांची उदाहरणे सांगता येतात. स्वातंत्र्योत्तर भारतात प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून महत्व प्राप्त झालेले आहे. 1980 च्या दशकात तंत्रज्ञानात प्रगती होऊन इंटरनेटच्या वाढत्या वापराबरोबरच इलेक्ट्रिनक माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. 2009 मध्ये माहिती व तंत्रज्ञान कायद्याला राष्ट्रपतींची मंजूरी मिळाली. (सिंह, देवव्रत : 2011)

वर्तमान काळात ऑनलाइन संप्रेषण साधनाचा एक प्रकार म्हणून समाज माध्यमांचा (Social Media) वापर खूप वेगाने वाढला आहे. समाज माध्यमांवर व्यक्त होणाऱ्यांचे प्रमाण अलीकडील काळात खूपच वाढले आहे. समाज माध्यमांवर सामाईक केलेल्या व्हिडिओ, फोटो आणि पोस्ट्स, मेसेजेसवर वापरकर्ते टिप्पण्या करतात आपले मत व्यक्त करतात. आज ग्लोबल वार्मिंग, प्रदूषण आणि वन्यजीव संरक्षण यासारख्या पर्यावरणीय समस्या अनेक दशकांपासून जागतिक समुहासाठी चिंतेचा विषय आहेत. तथापि, अलीकडेच अशा समस्यांबद्दल लोकांमध्ये जागृती होत आहे. याचे प्रमुख श्रेय प्रसार माध्यमांना द्यावे लागेल. जगातील इतर महत्त्वाच्या घटनांबरोबरच माध्यमांनी पर्यावरणाच्या समस्यांचे चित्रण मोठ्या प्रमाणात केले आहे. पर्यावरणीय समस्यांमुळे जगभरातील लोकांची चिंता वाढली आहे. विशेषत: तरुण गटातील मुलांची पर्यावरणीय जागरूकता वाढविण्यामध्ये सामान्यत: माध्यमांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे कारण तरुण पिढीमध्ये माध्यमांवर सक्रीय असणाऱ्या लोकांचे प्रमाण खूपच अधिक आहे. याशिवाय सर्वसामान्य लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागृकता निर्माण होण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका अनन्यसाधारण महत्वाची आहे.

1) वृत्तपत्रे (News Paper) :-

वृत्तपत्रे हे अनेक काळापासून लोकांवर प्रभाव टाकण्यारे प्रमुख माध्यम असून पर्यावरणाचे संवर्धन करण्यात मोठी भूमिका बजावू शकते. अलीकडील काळात वृत्तपत्रांमध्ये पर्यावरणाच्या मुद्द्यांची चर्चा होत असली तरी, सातत्याने लोकांचे लक्ष केंद्रित पर्यावरण समस्यांवर केले जात नाही. वृत्तपत्रांमध्ये सनसनाटी गुन्हेगारी किंवा गरमागरम राजकारण असेच मुद्दे बहुतेक चर्चीले जातात. कारण असे वाचकांना आकर्षित अधिक करतात. पर्यावरण ही सर्व सजीवांची मूलभूत गरज आहे कारण त्यांची प्रत्येक गरज पर्यावरणावर अवलंबून असते. जोपर्यंत पर्यावरणाचे संरक्षण होत नाही, तोपर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीचे भवितव्य अंधारात आहे.

2) दूरदर्शन (Television) :-

दूरदर्शन हे दृश्य आणि श्रवणीय प्रसार माध्यम आहे. दूरदर्शनच्या दर्शकांना साक्षर असण्याची आवश्यकता नाही. आज दूरदर्शनच्या अनेक वाहिन्या सक्रिय आहेत ज्यावर अनेक कार्यक्रम सुरु असतात. दूरदर्शच्या माध्यमातून

प्रसारित केलेल्या कार्यक्रमांचे कोणत्याही सर्वसामान्य दर्शकालाही सहज आकलन होऊ शकते. दूरदर्शनवरील प्रसारित केलेल्या कार्यक्रमांवर लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी कथाकथन किंवा आकर्षक कथा वापरली जाते. लोकांच्या आवडी निवडीनुसार कार्यक्रम प्रसारित केले जातात व सर्वसामान्य किंवा निरक्षर दर्शकालाही त्या कार्यक्रमांचे आकलन शक्य असते त्यामुळे दूरदर्शन हे लोकांमध्ये जाणीव जागृतीसाठी प्रिंट मिडीयापेक्षा अधिक उपकारक आहे. Gerbner,च्या मते, टेलिव्हिजन ही "आपल्या समाजाची मध्यवर्ती सांस्कृतिक शाखा" बनली आहे. लोकांवर प्रभाव पाडण्यासाठी आणि त्यांचे मन वळवण्यासाठी दूरदर्शन हे संप्रेषणाचे सर्वात शक्तिशाली आणि प्रभावी माध्यम आहे. एक दूरदर्शन कार्यक्रम घरातील सर्वच सदस्यांना जोडतो आणि त्यांना एकत्र वेळ घालवायला भाग पाडतो. त्यामुळे लोकांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण होण्यासाठी दूरदर्शन अधिक प्रभावी ठरु शकते. परंतु वर्तमान काळात टेलिव्हिजन चॅनेल्सवर मोठ्या प्रमाणात मनोरंजनाशी संबंधित कार्यक्रम दाखविले जातात. दर्शकांची संख्या वाढविण्यासाठी दूरदर्शनवरही मसालेदार कार्यक्रम दाखविले जातात. दूरदर्शनचे पूर्णपणे व्यापारिकरण झाले असून त्यावर एकतर रिॲलिटी शो किंवा मेगा सीरिअल्स सुरू असतात ज्यांचा मूळ हेतू हा दर्शक वाढविणे, जाहिराती मिळवणे आणि त्यातून प्रचंड नफा मिळवणे हा असतो. दूरदर्शनवर प्रामुख्याने मनोरंजन, राजकारण आणि सेलिब्रिटींवरील बातम्यांना जास्त कव्हरेज दिले जाते. दूरदर्शनचे व्यापारीकरण हे केवळ जाहिरातींपुरते मर्यादित नाही तर ते कार्यक्रमाच्या आशयातही ठेवले जाते. दूरचित्रवाणी वाहिन्यांची त्यांनी प्रसारित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमातून आर्थिक नफा मिळवण्याची स्पर्धा सुरू असलेली दिसते. मात्र दूरदर्शनवरील वाहीन्यांनी ठरविल्यास आजच्या पर्यावरणासारख्या ज्वलंत समस्यांवर लोकांचे मत परिवर्तनात, जाणीव जागृतीत खूप योगदान देऊ शकते. पर्यावरणाचा दर्जा उंचावणासाठी, सामान्य माणसाला शिक्षित करण्यासाठी, पर्यावरण विषयक एक व्यापक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी दूरदर्शनवर पर्यावरणपूरक कार्यक्रम दाखविले जाणे ही काळाची गरज आहे.

3) रेडिओ (Radio) :-

रेडिओ हे सर्वांना परवडणारे आणि सहज उपलब्ध होणारे प्रसार माध्यम आहे. रेडिओचे सिग्नल जवळजवळ संपूर्ण देशात आढळतात. रेडिओवरील शासकीय वाहिन्या रेडिओवर मनोरंजनाने कार्यक्रम प्रसारित करण्यापेक्षा सामाजिक आणि पर्यावरणीय जागरूकता वाढविणारे अधिक चांगले कार्यक्रम प्रसारित करण्यावर भर देतात. मात्र अलीकडीला काळात FM स्टेशन्सच्या उदयानंतर रेडिओ हे माध्यम अधिक व्यावसायिक झाले आहे. FM स्टेशन्सच्या सेवा 24/7 काम करत असल्या तरी, बहुतेक वेळा FM स्टेशनवर चित्रपट गाणी आणि टॉक शो प्रसारित केले जातात. सामाजिक प्रश्नांवर क्वचितच कार्यक्रम प्रसारित केले जातात. FM चॅनेलने पर्यावरण संरक्षणावर प्रभावशाली कार्यक्रम प्रसारित करुन पर्यावरणाची स्थिती सुधारण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. भारतात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्यामुळे लोकांच्या मनात बदल घडवून आणण्यात इलेक्ट्रॉनिक माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. रेडिओ आणि टेलिव्हिजन हे दोन्ही मोठ्या प्रमाणात लोकमतावर अनुकूल तसेच प्रतिकूल परिणाम करणारे प्रसार माध्यमे म्हणून ओळखले जातात. रेडिओ पर्यावरण विषयक जागरूकता निर्माण करण्यात खूपच मागे असून मागील काही वर्षांमध्ये पर्यावरणावरील प्रसारणात कोणतीही वाढ झालेली नाही.

सारांश:

पर्यावरणाचा ऱ्हास हळूहळू जगभरातील देशांच्या चिंतेचा विषय बनला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वच देश आणि प्रमुख संस्थांनी पर्यावरणाविषयी जागरूकतेच्या विषयाला प्राधान्य दिलेले आहे. कारण सर्वच देशांना पर्यावरणीय संकटाचा सामना करावा लागतो आहे, त्यापैकी काही समस्या स्थानिक आहेत तर काही जागतिक आहेत, म्हणून या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी काम करणे गरजेचे आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पर्यावरण संवर्धनाचे शिक्षण लोकांना देणे हे दोन मार्ग आहेत. पर्यावरण संवर्धनात लोकसहभाग महत्वाचा आहे. जेव्हा लोक पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरूक असतील तेव्हाच ते पर्यावरणाच्या संवर्धनात सक्रीय सहभाग नोंदवतील. आपल्या पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे आपले स्वतःचेच नुकसान आहे या वस्तुस्थितीबद्दल जनतेचे प्रबोधन करावे लागेल. माध्यमे, आणि विशेषतः डिजिटल माध्यमांचा प्रभाव सर्वसामान्य लोकांवर अधिक असल्यामुळे पर्यावरण जागरूकता वाढविण्यात अधिक महत्त्वाची भूमिका बजावतात.

संदर्भ सूची-

1. Bhattacharyya, M., & Jana, M. (2015). *Trends in environment reporting of Indian print media: A content analysis of three English language newspapers*. Amity Communication Review, 2(1), 25-31.
2. Boykoff M. (2008). *The cultural politics of climate change discourse in UK tabloids*. Polit. Geogr. 27:549–69
3. Hansen, A. (2011). '*Communication, media and environment:Towards connecting research on the production, content and social implications of environmental communication*', International Communication Gazette, Vol 43, Nos. 1 & 2, pp.7-26.
4. Maxwell T Boykoff and Maria Mansfield. (2008). *'Ye Olde Hot Aire': reporting on human contributions to climate change in the UK tabloid press* Environ. Res. Lett. **3** 024002
5. McCombs M. (2005). *A look at agenda-setting: past, present and future*. Journalism Studies 6: 543-557.
6. McChesney RW. (1999). *Rich Media, Poor Democracy: Communication Politics in Dubious Times*. Urbana/Chicago: Univ. Ill. Press
7. Scholtz, B., C. Burger, and M. Zita. (2016). *A Social Media Environmental Awareness Campaign to Promote Sustainable Practices in Educational Environments* p. 355-36
8. Wilkins, K. G. (2003). *International Development Communication: Proposing a research agenda for a new era*. In B. Mody (Ed.), International and Development Communication: A 21st Century Perspective (pp. 261-278). Thousands Oaks, California: Sage.
9. The World Commission on Environment and Development. (1987). *Report of the World Commission on Environment and Development, the Secretary-General*, United Nation.
10. Scientific Encyclopedia- Environment - https://rb.gy/gmpfht
11. जाधव, रा. ग. *पर्यावरण*. मराठी विश्वकोश (ज्ञानमंडळ) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.
12. सिंह, देवव्रत. (2011). भारतीय इलेक्ट्रॉनिक मिडीया, दिल्ली: प्रभात प्रकाशन

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, विवेकानंद कला, स. द. वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

***

बदलती जीवनशैली आणि आरोग्य

*प्रा. डॉ. संभाजी शंकर कुरलीकर

I) प्रस्तावना

भारतीय संस्कृतीमध्ये फार प्राचीन काळापासून मुलांवर सुसंस्कार करताना त्यांना आरोग्य संपन्न जीवन जगण्यासाठी प्रेरीत करण्याचा प्रयत्न केला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' आहे. चांगले आरोग्य प्राप्त करणे ही जशी स्वत:ची जबाबदारी आहे. तशीच सर्वांना चांगले आरोग्य मिळवून देणे ही राष्ट्राची जबाबदारी आहे. आधुनिक काळात जगातील कोणत्याही देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासात तसेच संपूर्ण मानवी विकासासाठी 'आरोग्य' हा अतिशय महत्वाचा घटक आहे. आरोग्य ही व्यक्ती, कुटुंब व समाजाला अभिप्रेत असणारी अवस्था आहे. निरोगी शरीरामध्ये वैंयाक्तिक आरोग्याबरोबर कौटुंबिक, ग्रामीण, नागरी, सामाजिक, मानसिक व जागतिक आरोग्य या प्रकरणामध्ये पारंपारिक जीवनशैली, आधुनिक जीवनशैली आणि आरोग्यविषयक परिस्थिती आढावा घेणार आहोत. तसेच मानवाच्या आरोग्यविषयक समस्या, वरील उपाययोजनांचाही अभ्यास करणार आहोत.

II) उद्दिष्ट्ये

१. पारंपारिक जीवनशैली आणि आरोग्य समजावून घेणे.
२. आधुनिक जीवनशैली आणि आरोग्य यांचे आकलण करणे.
३. आरोग्याची समस्या समजावून घेणे.

III) माहितीचे संकलन

पारंपारिक जीवनशैली आणि आरोग्य - समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती आपल्या आरोग्याचे मूल्यमापन स्वतःच्या समजुती व संस्कृतीनुसार करत असते. यामध्ये चालीरिती, रूढी, प्रथा परंपरा, धर्म, वैयक्तिक अपेक्षा, शिक्षण, श्रध्दा, अंधश्रदद्या व आर्थिक स्थिती सर्वांचा समावेश होतो.एवढेच नव्हे तर शारिरीक, मानसिक स्थिती व जीवनावस्थेनुसार ती बदलत असते त्यानुसार आरोग्याची स्थिती ठरते. जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याची व्याख्या म्हणजे 'केवळ रोग नसणे किंवा दुर्बल असणे असे नसून आरोग्य ही शारिरीक, मानसिक, सामाजिक, आध्यात्मिक सदृढ अशी अवस्था आहे.' अशी केलेली असली तरी आरोग्य आजारपण व रोग यांच्या नेमक्या संकल्पनेबर अदयापही एकमत झालेले नाही. आरोग्य म्हणजे रोज व्यायाम करणारा तगड़ा जवान पाहिला की, एखादया व्यक्तीला तो आरोग्यदायी वाटतो तर वृदधामध्ये थोडीशी हालचाल मर्यादित किंवा अशक्तपणा वाटू लागला की त्यांना आपले आरोग्य ढासळत आहे असे वाटते. आरोग्याच्या या सर्व कल्पना तशा वैयक्तिक स्वरुपाच्या आढळतात.

१. आजारपण - रोजच्या सवयीतील बदल किंवा शारिरीक-मानसिक तक्रारीमुळे व्यक्तीच्या वर्तनातील बदलाचे निरीक्षण करुण आपण ती व्यक्ती आजारी आहे असे म्हणतो. त्यामुळे व्यक्तीला ही तशी लक्षणे जाणवू लागतात.

२. रोग - जंतूमुळे शरीरात होणारा रासायनिक बदल किंवा जैव वैदयकीय लक्षणांवरून व विविध तपासण्यावरून ओळखता येतो. आरोग्यविषयी विविध प्रकारच्या समजुती असतात. लहानपणापासून कुटुंब, शेजार, शाळा, प्रसारमाध्यमे, धर्मसंस्कार आणि शासनाकडून मिळणारे आरोग्यविषयक संदेश यातून आरोग्यविषयक समजुती दृढ होतात. या समजुती मात्र शास्त्रीय असतीलच असे सांगता येत नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती यानुसार प्रत्येकाचे आरोग्य वेगवेगळेच असू शकते. आरोग्याची अवस्था नेहमीच परिपूर्ण दिसते असे नव्हे तर आरोग्याची अवस्था ही सतत दोलायमान असते.

अ) एका बाजूला उत्तम चांगली प्रकृती आणि आजारापासून मुक्ती असणारी असते.

आ) दुसऱ्या बाजुला बाहयतः न दिसणारी आजारी प्रकृती, सौम्य आजार, गंभीर आजार व मृत्यू असतात.

या दोन्ही अवस्थामध्ये आरोग्याची अवस्था सतत हेलकावत असते. कारण आरोग्य ही कल्पनाच सापेक्ष आहे. एका व्यक्तीला जी अवस्था आजार वाटेल त्या अवस्थेत दुसऱ्या व्यक्ती मात्र कामे करीत असतात व त्यांना ती स्थिती

सुसहय असते. पारंपारिक जीवनशैलीमध्ये आरोग्यविषयक संकल्पना पाहण्यापूर्वी मानवाने आरोग्य कसे बिघडते किंवा त्याला रोग कोणत्या घटकांमुळे होतो हे पाहणे आवश्यक आहे. विशेषतः साथ् रोगशास्त्राच्या तिपाई सिध्दांतानुसार रोग होण्याची कारणे फक्त जंतू नसून वातावरण व रोगक्षम व्यक्ती किंवा यजमान हे ही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे व्यक्तीच्या शारिरीक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक स्थितीमध्ये बदल होतो. व्यक्तीच्या इंद्रियांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो व व्यक्तीला रोग होतो. हा रोग अचानक गंभीर होऊ शकतो किंवा दीर्घकाळ राहू शकतो. रोगकारक घटक अथवा पदार्थ सजीव किंवा निर्जीव अवस्थेत असू शकतात.

१. जैविक घटक - यामध्ये सजीव जंतूंचा समावेश होतो. उदा. विषाणू, जीवाणू, परोपजीवी व बुरशी - हे रोगकारक घटक रोगक्षम व्यक्तीच्या शरिरात शिरून तिथे त्यांची वाढ होतेच ते रोग निर्माण करू शकतात. हे विषाणू मानवी शरिरात पाणी, माती, अन्न, प्राणी व विष्ठा यामध्ये सापडतात.

२. आहारीय घटक - अन्नाचे प्रामुख्याने सहा मुख्य घटक आहेत. प्रथिने, शर्करायुक्त पदार्थ अथवा कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्वे, क्षार, पाण या आहारीय घटकांच्या कमतरतेमुळे अथवा अति सेवनाने रोग किंवा आजार होऊ शकतात. उदा. रक्तक्षय, लठठपणा, 'अ' जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे रातांधळेपणा इत्यादी.

३. पर्यावरणीय घटक

अ) भौतिक घटक - अति थंडी अथवा उष्णता, आर्द्रता, किरणोत्सर्ग, कर्णकर्कश ध्वनिप्रदूषण तसेच दूषित पाणी व अस्वच्छता इत्यादी गोष्टी आजारास कारणीभूत ठरतात.

ब) जैविक घटक - प्राणी, उंदिर, डास व माश्या इत्यादी

क) रासायनिक घटक -

१) व्यक्तीच्या शरीरातील अंतस्राव बदल, नलिकाविरहित ग्रंथीस्राव व प्रतिकारशक्तीची कमतरता इत्यादी उदा. थॉयराईड ग्रंथीच्या कमतरतेमुळे हायपोथायराईडिझम, इन्शुलिन कमतरतेमुळे कीटकनाशके व वायू इत्यादी शरिरात श्वासाबरोबर अन्नमार्गात अथवा इंजक्शनद्वारे गेल्यास. होणारा मधुमेह, आजारामुळे शरीरातील रससायनामध्ये बदल होणे उदा. कावीळ

२) शरिराबाहेर म्हणजे धूळ, किटकनाशाके व वायू इत्यादी शरीरात श्वासाबरोबर अन्नमार्गात अथवा इंजक्शनद्वारे गेल्यास.

ड) यांत्रिकी घटक - अपघातामुळे मुरगळणे, जखमा, इजा व अस्थिभंग इत्यादी.

ई) सामाजिक पर्यावरण - राहणीमानाचा दर्जा, अंधश्रध्दा, चालीरिती इत्यादी. वरील आरोग्यविषयक घटकांना अनुसरुन पारंपारिक किंवा ग्रामीण जीवनपध्दतीमध्ये आरोग्य कशा रितीने टिकून राहते किंवा बिघडते याबाबत स्पष्टीकरण विचारात घेता येईल.

पारंपारिक जीवनशैली आणि आरोग्य याचा अभ्यास करत असताना त्याचे दोन भागात स्पष्टीकरण पाहणे आवश्यक आहे. एक म्हणजे त्यांच्या जीवनशैलीतील आरोग्याच्या दृष्टीने हितकारक असलेल्या गोष्टी म्हणजे मानवाच्या आरोग्याला उपयुक्त असणाऱ्या आणि दुसरे म्हणजे मानवी आरोग्याला घातक किंवा हानिकारक असणाऱ्या अश्या दोन भागामध्ये अभ्यास करणे आवश्यक ठरते तसेच 'मानवी जीवन जगण्याची एकूण पद्धती' यालाच आपण समाजशास्त्रीय दृष्ट्या 'संस्कृती' ही संकल्पना वापरतो म्हणजेच या ठिकाणी मानवाच्या जीवनशैलीचा म्हणजेच संस्कृतीचा मानवाच्या आरोग्यावर होणाऱ्या चांगल्या आणि वाईट परिणामांचा अपेक्षित आहे.

IV आरोग्य सुव्यवस्थित राहण्यासाठी उपाययोजना

१. वैयक्तिक स्वच्छता

व्यक्तीच्या शरीराच्या प्रत्येक अवयवाची म्हणजे डोके, नाक, कान, दात, केस, नखे, त्वचा, हात व पाय यांची योग्य निगा राखल्यामुळे आरोग्य चांगले राखण्यास मदत होते. म्हून नेहमी अंघोळ करतान व व्यक्तीने वरील सांगितलेल्या अवयवांची स्वच्छता केली पाहिजे.

२. आहार

व्यक्तीने नेहमी पोषक आणि सात्विक आहार घेतला पाहिजे. नेहमीच्या जेवणामध्ये ज्वारी, बाजरी, कडधान्ये, भाजीपाला फळभाज्या तसेच जेवणामध्ये दूध, दही, ताक, लोणी यांचा समावेश असला पाहिजे. अंडी, मांसाहार देखील केला जातो. म्हणजेच आहार शास्त्राच्या दृष्टीने प्रथिने - दूध, दही, चीज, अंडी, मटण तसेच स्निग्ध पदार्थ - तेल, तूप, लोणी, ताक, साय इत्यादी पिष्टमय पदार्थ - सर्व प्रकारची धान्य, साखर, गूळ, मध, साबुदाणा इत्यादी शिवाय डाळी, कडधान्ये, बटाटा, सुरण, रताळी यासारखे कंदमुळे भरपूर प्रमाणात असतात. शरिराच्या सर्व क्रिया सुरळीत चालवून शरिरात रोगांपासून मुक्त ठेवण्यात जीवनसत्वाचा मोठा वाटा असते. जीवनसत्वे प्रामुख्याने अ, ब, क, ड, ई व के अशी असतात. ती दूध, अंडी, मांस, मटण, डाळ, भाज्या, फळे, धान्य, कडधान्ये व शेंगदाणे इत्यादी पदार्थातून मिळतात. खनिजे, हाडे, दात व रक्त यांच्या मजबुती करता आवश्यक असतात. पारंपारिक समाजव्यवस्थेत आहार हा चौरस व सात्विक असतो. अन्न बनविता देखील तेल कमी वापर असतो. मसाले कमी वापरले जातात. ज्याला आपण सॅलाड म्हणतो ते तर त्यांच्या रोजच्या जेवणात हमखास असते. त्यामध्ये गाजर, टोमॅटो, काकडी, कांदा, मुळा, बीट यांचा समावेश होतो.

३. वेळेचे महत्व

पारंपारिक जीवनपध्दतीमध्ये जेवणाची वेळ पाळली जाते. पहाटे लवकर उठणे, सूर्योदयापूर्वी अंघोळ करणे, शेतावर जाण्याआधी सकाळी न्याहारी केली जाते. दुपारी ऊन डोक्यावर आल्यावर म्हणजे बारा वाजता जेवणे घेणे, संध्याकाळी पुन्हा शेतातून घरी परत आल्यानंतर लवकर सात ते आठच्या दरम्यान रात्रीचे जेवण यामुळे व्यक्तीच्या शरिराची एक व्यवस्थित क्रिया सुरु राहते. त्यामुळे आजारी पडण्याचा प्रश्नच उदभवत नाही. पारंपारिक जीवनपध्दती मध्ये वेळेला फार महत्त्व दिले जाते.

४. आचार - विचार आणि सवयी

व्यक्तीचे बरेचसे वर्तन धर्माच्या किंवा संस्कृतीच्या आधारे निर्धारित केले जाते. व्यक्तीचे आचार-विचार, रुढी, परंपरा व सणसमारंभ यांचा आरोग्य जीवनांशी अप्रत्यक्ष संबंध असतो. तसेच व्यक्तीला लहानपणापासून चांगल्या सवयी लावल्या जातात. विशिष्ट नियमांचे पालन करण्याची सवय लावली जाते. जसे की, मोठयांचा आदर राखणे, खोटे बोलू नये, समाजोपयोगी कार्यात भाग घेणे सार्वजनिक उत्सव एकत्र साजरा करणे, आर्थिक परिस्थितीनुसार खर्चाचे नियोजन करणे, काटकसरीने वागणे, अनावश्यक खर्च टाळणे, शक्यतो कर्ज काढायला लागू नये व नियमित फेडणे विशेषतः माणूस या नात्याने सर्वांशी आदराने व आपुलकीने वागणे चांगल्या आचार- विचार आणि सवयीमुळे व्यक्तीच्या जीवनात ताणतणाव येत नाही.

५. विश्रांती, झोप आणि ताणताणाव

व्यक्तीला काम करुन थकल्यानंतर पुरेशी विश्रांती घेणे आवश्यक असते. आरोग्यासाठी झोपेला ठराविक वेळ दिला पाहिजे. झोपेमध्ये शरीर व मन पूर्णतः समाधानी अवस्थेत राहते. शारिरीक शमुळे आलेला थकवा नाहीसा होतो. पुन्हा व्यक्तीला जोमाने काम करण्याची ताकद येते. विश्रांतीमुळे शारिरीक कष्टाबरोबर ताणतणाव दूर होण्यास मदत होते. पारंपारिक जीवनशैलीमुळे पुरेशी विश्रांती व झोप घेतली जाते. त्यामुळे जीवनातील ताणतणाव दूर होतात. आरोग्याच्या दृष्टीने विश्रांती, झोप व ताणतणाव यांचा विचार केला पाहिजे.

६. खेळ, व्यायाम व करमणूक

पूर्वीच्या काळी खेळ व व्यायामातून स्वतःचे आरोग्य जपले जात असे पारंपारिक खेळ, आट्यापाट्या, खो-खो, व्यायाम करणे, योगासन करणे, चालणे यातून शरिराला चांगले वळण लागते. प्रत्येक गावामध्ये कुस्तीची मैदाने असत. त्यामुळे कुस्तीचा खेळ खेळणान्याच्या मध्ये चांगले आरोग्य राखले जाते. शरिराच्या विशिष्ट हालचालीमुळे मानवाचे आरोग्यही जपले जाते. पूर्वी करमणुकीची साधने फारशी नव्हती. गाणी, नृत्य, पोवाडा, भजन किर्तन यातून लोकांचे

मनोरंजन होत असे. व्यक्तीचे आरोग्य यामधून जपण्याचा प्रयत्न केला जातो. भजन, किर्तनातून समाजाचे प्रबोधनही केले जाते. त्यामुळे खेळ, व्यायाम व करमणुकीमुळे आरोग्य हितकारकी बनते.

७. कृषी व्यवसाय

पूर्वीपासून पारंपारिक व्यवसाय म्हणून शेतीकडे पाहिले जाते. त्यामुळे शेती करणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे. शेती व्यवसायामध्ये शारिरीक कष्टाची कामे खुप करावी लागतात. नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी यासारख्या कामामुळे आरोग्य चांगले राहू शकते.

V निष्कर्ष

१. पारंपारिक जीवनशैली आणि आरोग्य समजावून घेण्यात आले.

२. आधुनिक जीवनशैली आणि आरोग्य यांचे आकलन करण्यात आले.

३. आरोग्याची समस्या समजावून घेण्यात आली.

VI सारांश

मानवाच्या जीवनाचे खरे सार, सुखी जीवनाची गुरुकिल्ली म्हणजेच आरोग्य होय. जीवनाचे खरे सार्थक, सुख प्राप्ती व दुःखाचे निवारण हे मानवाच्या आरोग्यमय जीवनात असते. मानवाचे आरोग्य एकीकडे तर संसारातील हजारो सुखे एका बाजूला. विद्या, बुध्दी, धन, वैभव, किर्ती व सन्मान इत्यादी सर्व प्रकारची सुखसाधने ज्याला प्राप्त झाली आहेत. तो जर पूर्ण निरोगी नसेल तर त्याला हया साधनांचा काय उपयोग. निरोगी भिकारी हा रोगी व कोटयाधिशापेक्षा अधिक सुखी असतो. म्हणून माणसाने सर्व गोष्टींचा त्याग करुन शरीराचे रक्षण करावे. कारण शरीराचा नाश झाला तर सर्वगोष्टींचा नाश होतो. माणसाने कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असले तरी प्रथमतः शरिराविषयी, निसर्ग नियमाविषयी व आरोग्य रक्षणाविषयी जाणून घ्यावे व त्यानुसार आचरण करावे हाच सुखी व समृदध जीवनांचा सार आहे. आजच्या धकाधकीच्या घडयाळाच्या काटयावर पळणा-या गतिमान जीवनात, आज बदलत्या सामाजिक, औद्योगिक, आर्थिक परिस्थितीमुळे आपणा सर्वांच्या आरोग्याला रोज नवनवीन धोके पोहोचवतो आहोत. आज गतिमान इंटरनेट व फास्ट फूडसच्या युगात आराग्य सांभाळणे कठीण होऊन बसले आहे.

VII संदर्भ

१) काळदाते सुधा - (१९८१) वैद्यकीय समाजशास्त्र, नाथ प्रकाशन, औरंगापुरा.

२) प्रा. पुजारी कृष्णकुमार - (१९९६) वैद्यकीय समाजशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

३) गवांदे सुलोचना - (२०१९) कर्करोग : माहिती आणि अनुभव : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २०१९.

४) जावडेकर बा. गं. - (२०१७) मधुमेह : रोहन प्रकाशन पुणे.

५) प्रा. खंडागळे रघुनाथ चंद्रकांत - (२०२०) आरोग्याचे समाजशास्त्र, खंडागळे प्रकाशन, सांगली.

६) प्रा. डॉ. मारूलकर विजय आणि प्रा. डॉ. पाडळकर दयावती - (२०२०) 'आरोग्याचे समाजशास्त्र' फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७) Ogale S. L. - (1976) Health & Populataion, Sanjeev --------- Tilak Road Pune 1976.

८) पी. के. कुलकर्णी - (२००८) आरोग्य आणि समाज, डायमंड पब्लिकेशन्स.

९) ढवळे श्रीपाद : आहारातून आरोग्य कसे मिळवाल? विद्याभारती प्रकाशन, लातूर

१०) वोरा देवेन्द्र : आपले आरोग्य आपल्या हातात नवनीत पब्लिकेशन्स, मुंबई १९८२

*श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी – कोतोली, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर.

मो. नं : 9763771258 / 8623801258, ई-मेल : sambhajikamble2877@gmail.com

***

लोकनिधी (क्राउड फंडिंग) द्वारे पर्यायी कथेंची रचना : एक टीका

*डॉ.मेघा देशपांडे

क्राउड फंडिंग ही नवीन गोष्ट नाही. विद्वानांनी क्राउड फंडिंगचा १३ व्या शतकातील इतिहास शोधून काढला आहे. चांगला परतावा मिळविण्यासाठी व्यवसायात जोखीम घेण्यासाठी निधी एकत्र करणे, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत ही सामान्य घटना आहे. कला आणि साहित्याच्या क्षेत्रात, विशिष्ट कला शैलीला चालना देण्यासाठी वर्गणीदाराला काही विशेषाधिकार देऊन सदस्यता मॉडेल आधीपासूनच अस्तित्वात आहे. सुप्रसिद्ध संगीतकार वुल्फगँग ॲमेडियस मोझार्ट यांनीही आपल्या स्वहस्ताक्षरासकट वैयक्तिक आभाराच्या बदल्यात त्यांच्या संगीतासाठी निधी उभारला.

आज तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ही घटना नवीन डिजिटल अवतारात बदलते आहे. 2000 च्या अखेरीपासून क्राउड फंडिंग पुन्हा केंद्रस्थानी आहे. विशेषत: भारतात जेथे विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म क्राउड फंडिंगद्वारे विविध कारणांसाठी निधी आणि संसाधने एकत्र करतात. त्यांच्यात कला हे एक कारण आहे.

मार्क्सवादी परंपरेत कला आणि त्याचा समाजाबरोबर असलेला संबंध या विषयी वेगवेगळे चर्चाविश्व आहेत. क्राउडफंडिंग समजून घेण्यासाठी या संशोधनाकरिता 'कलेचा द्वंद्वात्मक संबंध' (डायलेक्टिक्स ऑफ आर्ट) हा दृष्टीकोन वापरला आहे. या संशोधनाचे उद्दिष्ट आहेत –

- क्राउडफंडिंग हा विविध प्रकारच्या कलांच्या माध्यमातून पर्यायी कथनांसाठी जागा निर्माण करण्याचा लोकशाही आधारित मार्ग असू शकतो का?
- क्राउडफंडिंग हा भांडवलशाहीचा नवीन अवतार आहे का?

संशोधन पद्धति – या संशोधनाकरिता गुणात्मक पद्धतिचा व दुय्यम संसाधनांचा वापर केला आहे.

कला एवम् समाजाचा संबंध, कलेच्या विविध प्रकारांचे समाजातील औचित्य, बदलती भांडवलशाही व्यवस्था आणि त्याचे कला क्षेत्रातील पडसाद, या विषयी मार्क्सवादी व नव मार्क्सवादी विचारवंतानी व्यवस्थित मांडणी केली आहे. प्रामुख्याने अडोर्नो यांनी भांडवलशाहीच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर 'संस्कृती उद्योगाची' संकल्पना मांडली. अडोर्नो यांनी कलेची स्वायत्तता आणि बाजार यातील संबंध यावरही भाष्य केले. (अडोर्नो थियोडोर:1991) फ्रेडरिक जेमसन यांनी असा युक्तिवाद केला की उत्तरआधुनिकता हे पारंपारिक विचारसरणीच्या समाप्तीचे युग आहे. पारंपारिक विचारसरणीचा अंत सौंदर्यनिर्मितीच्या नव्या लहरीतून दिसून येत आहे. (जेमसन फ्रेडरिक:1984)

एलविन टॉफलर यांच्या 'प्रोज्युमर्स' (जिथे व्यक्ति स्वत:निर्माता आणि उपभोग करणाराही आहे) संकल्पनेवर रिट्झर यांनी टीका केली आहे. त्यांच्या मते 'प्रोज्युमर्स भांडवलशाही' ही 'वस्तुकरण' प्रक्रियेची तीव्रता आणि त्यातील विरोधाभासाचा विस्तार वाढवत आहे, त्यामुळे वाढती बेरोजगारी, तीव्र शोषण, उन्माद आणि अति उपभोगामुळे उत्पन्न झालेली विलगता हे रोजच्या जीवनाचे भाग झाले आहे. (रिट्झर जॉर्ज 2015) तसेच ट्रोट्स्की कला आणि प्रेक्षक यांच्यातील सेंद्रीय संबंधांनवर भर देतात. (ट्रोट्स्की 2005) या वैचारिक मांडणीचा आधार घेउन क्राउड फंडिंग विषयी संशोधनाचे उल्लेखित उद्दिष्टांविषयी तर्क मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

1976 मध्ये गुजरात सहकारी दुग्ध महासंघाशी संबंधित 50000 शेतकऱ्यांच्या सहकार्याने 'मंथन' हा पहिला क्राऊडफंड च्या साहय्याने केलेला चित्रपट प्रत्यक्षात आला. त्यांच्या स्वप्नांच्या, व्यवस्थेमध्ये पुन्हा हक्क मिळवण्याच्या धडपडीचा भक्कम प्रतिमा असलेला हा चित्रपट. या परिवर्तनाच्या प्रयत्नात महिलांची भूमिका या चित्रपटात रेखांकित केली आहे. चित्रपटासाठी गुजरातमधील शेतकऱ्यांनी वैयक्तिकरित्या दोन रुपयांची मदत करून या चित्रपटाकरिता निधी उभारला. हा प्रयत्न भारतातला व्यवस्थितरीत्या केलेला पहिला प्रयत्न असे आपण म्हणू शकतो. परंतु हे संबंध आताच्या काळात बदलले आहे.

काम, विश्रांती, ज्ञान आणि सर्जनशीलता यांच्यातील आमचा संबंध डिजिटल कम्युनिकेशनने बदलां. सहयोगाचे हे नवीन प्रकार कला क्षेत्राला नवीन रूप देत आहे. अलीकडच्या काळात स्वतंत्र सिनेमाची (इंडी सिनेमा) एक नवीन लाट थेट प्रेक्षकांपर्यंत पोहोचून आणि या पर्यायी मार्गाचा वापर करून निधी उभारून अपारंपरिक विषयांवर सिनेमा बनवण्याच्या सीमा ओलांडत आहे. इतर प्रकारचे कला आणि कला समूह त्यांच्या प्रकल्पांना निधी देण्यासाठी या प्लॅटफॉर्मचा वापर करत आहेत.

2016 मध्ये अभय कुमारच्या 'प्लेसबो' डॉक्युमेंट्रीने अतिशय वेगळ्या स्वरूपात रिअल टाईम फुटेज आणि ॲनिमेशनचा वापर करून विद्यार्थ्याच्या आत्महत्येचा मुद्दा मांडला आणि या माध्यमातून समाज आणि व्यवस्थेच्या

भूमिकेविषयी विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनाला घेऊन टीका केली. विशिष्ट तंत्रज्ञान वापरून एक विचलित करणारा अनुभव अत्यंत संवेदनशीलतेने मांडण्याचा प्रयत्न या डॉक्युमेंट्रीमध्ये दिसतो.

उपमन्यु भट्टाचार्य दिग्दर्शित 'Wade' (खोल पाण्यातून, चिखलातून अवघडून मार्ग शोधण्याचा प्रयत्न). हा लघुपट बदलत्या हवामानाची परिस्थिती आणि आपल्या भव्य शहरांचे भविष्य यावर कथन आहे. या मूळकथे बरोबरच मनुष्याचा आणि जीव जगत यातील बदलत्या संबंधांचा उल्लेख आहे.

'कडक कलेक्टिव्ह' हे कॉमिक सीनमध्ये दक्षिण आशियाई प्रतिनिधित्वाची अनुपस्थिती दूर करण्याच्या उद्देशाने प्रयत्न करणारे सहयोगी कला मंच आहे. ह्यञ्चश् मध्ये त्यांनी क्राउडफंडिंगच्या मदतीने एक मोहीम सुरू केली, ज्याला 'बायस्टँडर्स' (प्रेक्षक) असे नाव दिले. या माध्यमातून त्यांनी दक्षिण आशियाई कलाकारांच्या सोबत स्त्रीवादी राजकारणाची सर्वसमावेशक भूमिका ठामपणे मांडणारे साहित्य प्रकाशित केले आहे. ही मोहीम अश्या अनेक उदाहरणांपैकी एक आहे जिथे 'द्विपर्यायी' समजुतीच्या मर्यादा ओलांडून 'सिमांतीकरणाच्या' प्रक्रीये विषयीच्या अनेक कथांची चर्चा आहे.

ही विविध कला प्रकारांची आणि कथनाच्या शैलीतील आणि कथांशी संबंधित काही उदाहरणे आहेत. या सगळ्या कथांना जोडणारा एक दुवा म्हणजे या सगळ्यांचे स्वरूप क्राउड फंडिंगच्या मदतीने अस्तित्वात आले. हे अगदी उघड आहे की या कथा कथनाच्या परंपरागत मुख्य प्रवाहाच्या स्वरूपाचे पालन करत नाहीत. या भिन्न कथांचे समर्थन करण्यास लोकांना प्रेरित आणि भाग पाडण्याची असंख्य कारणे आहेत. एक कारण असे असू शकते की एखादा व्यक्ति विषयाकडे भावनिकरित्या ओढला गेला आहे किंवा कदाचित नवीन विषय जाणून घेण्याची इच्छा आहे, जुन्या विषयांचे नवीन बदल जाणून घ्यायचे आहेत, किंवा फक्त स्वत:ला एखाद्या कथानका बरोबर किंवा कला स्वरूपाबरोबर जोडून घेणे आहे.

जर आपण ही घटना भांडवलशाहीच्या वर्तमान टप्प्यात शोधण्याचा प्रयत्न केला तर जिथे विषय आणि वस्तू या दोघांनी कलेच्या क्षेत्रात स्वायत्तता गमावली आहे. आजचे जग हे मानवीय अस्तित्वाला जोडलेल्या प्रत्येक घटकाला वस्तु स्वरूपात बदलून बाजाराने वेढलेले आहे. या परीस्थितीत हे मान्य करणे फार कठीण आहे की "कलेचे स्वरूप हे एका विशिष्ट आणि खूप मोठ्या प्रमाणात स्वतंत्र असते, परंतु हा प्रकार निर्माण करणारा कलाकार आणि त्याचा आनंद लुटणारा प्रेक्षक ही रिकामी यंत्रे नाहीत, एक जो कला रचतो आणि दुसरा फक्त त्याचे कौतुक करतो.''

'''क्राऊडसोर्सिंग' सारखी 'क्राऊडफंडिंग' ही कल्पना कॉर्पोरेट प्रायोजकांद्वारे त्यांचे काम 'क्राऊड' ला आउटसोर्सिंग केले आहे या विचाराचा संदर्भ देते.''(Lebraty and Lobre & Lebraty 2013). 'क्राउड' ही सामान्यीकृत संज्ञा त्या 'क्राउड' ला रचणाऱ्या व्यक्तींच्या समाजामधली संरचनात्मक आणि आर्थिक असमानतेच्या प्रश्नाला दुजोरा द्यायचा प्रयत्न, किंवा त्याला लपविण्याचा प्रयत्नही असू शकतो.

क्राउडफंडिंग प्लॅटफॉर्म सर्जनशीलता आणि सहयोगी अर्थव्यवस्थेबद्दल प्रश्न उपस्थित करतात. तंत्रज्ञान आणि विपणन यांचे मिश्रण, आणि 'समुदाय'चे व्यवस्थापन, सर्जनशील कल्पना' 'इनोव्हेशन' या संज्ञांचा वापर करून ते विविध प्रकल्प आणि निर्माते यांच्यातील स्पर्धा लपविण्याचा प्रयत्न करतात.

एकीकडे क्राउडफंडिंग कलेच्या व्यावसायिक संभावनांचा विस्तार करते. अनेक बाबतीत प्रतिकाराचे पर्यायी मार्ग कलेच्या माध्यमातून उपलब्ध करवून देते तर दुसरी कडे सामाजिक आणि सामुदायिक अर्थशास्त्राचे निव्वळ अर्थशास्त्रात विलीनीकरण करून कलेची रचना करणाऱ्याचे रुपांतर 'उद्योजकात' करत असते.

कला क्षेत्रात अश्या प्रकारे संसाधनांची जमवा जमव एकी कडे 'उत्पादन' आणि 'उपभोग' यातील रेषा पातळ करून प्रत्येकाला 'सर्जनशील अनुभवात' सहभागी होण्याचा अवसर उपलब्ध करून देते, परंतु या प्रक्रियेमुळे कलेच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होतो.

हे प्लॅटफॉर्म संभाव्य गुंतवणूकदारांसाठी प्रकल्प तयार करण्यापासून त्याची प्रसिद्धी करण्यासाठी मध्यस्थ म्हणून काम करतात. या प्रक्रियेत एक धोखा निर्माण होण्याची शक्यता आहे कि ''कलाकाराकरिता कलेचे निर्माण करण्यापेक्षा संभावित प्रेक्षकांन समोर जाणे आणि आपली उपस्थिती किंवा अस्तित्व नोंदवून देण्याचा प्रश्न जास्त मोठा झाला आहे.''(रोमेन पेखान, 2010)

'सर्जनशीलतेचे लोकशाहीकरण' या टेग लाईन (wishberry-in) सकट वास्तविकरीत्या "प्रत्येक व्यक्तिचा मुक्त सहभाग आणि भांडवलीचे लोकशाहीकरण या विचारला केंद्रस्थानी धरून श्रमाचे सर्व सामाजिक संदर्भ व्यासायिक देवाणघेवाण, त्यातील गुंतागुंत आणि संघर्ष या मुखवट्याच्या मागे पूर्णपणे नाहीसे होतात. "(मेथ्युज जे. आणि रूज व्ही. 2019)

हे क्राउडफंडिंग प्लॅटफॉर्म कलेविषयीचे जुन्या संदर्भांना आव्हान देणारे आहेत. याच बरोबर प्रिंट मिडिया, चर्चा मंच, सोशल नेटवर्क, व्यवस्थापन विशेषज्ञ, शिक्षण तज्ञ यांच्या माध्यमातून याचे एक चर्चा विश्व तय्यार केले जात आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रकल्प तय्यार करणारे विजेते म्हणून त्यांना प्रोत्साहन दिले जाते, या विशिष्ट अश्या प्रक्रियेत शामिल न होणारे अपयशी ठरविले जातात. सर्जनशीलता आणि कला क्षेत्रात 'सहयोगी अर्थव्यवस्थेची' ही भांडवलशाही आधारित प्रक्रिया, 'क्राउड फंडिंग' मॅच मेकर म्हणून येथे टिकून राहणारी दिसत आहे.

संदर्भ –

- Adorno Theodor W. (1991).The Culture Industry: selected assays on mass culture. Edited by M.Bernstein,Routledge,London
- Antonio, R. J. (2015). IS PROSUMER CAPITALISM ON THE RISE? *The Sociological Quarterly*, *56*(3), 472–483. http://www.jstor.org/stable/24581848
- Bovone, L. (2018). PROSUMPTION AND CONVIVIALITY: THE CREATIVITY BETWEEN CRISIS AND UTOPIA. *Studi Di Sociologia*, *56*(2), 103–122. https://www.jstor.org/stable/26538420
- Jameson, Fredric (July–August 1984). "Postmodernism, or The Cultural Logic of Late Capitalism". *New Left Review*. New Left Review. **I** (146).
- Lebraty, Jean-Fabrice, and Katia Lobre-Lebraty. 2013. Crowdsourcing: One Step Beyond . London: ISTE Editions, Wiley. http://www.iste.co.uk/book.php?id=612
- Matthews, J. and Rouzé, V. 2019. Participatory Cultural Platforms and Labour. In: Rouzé, V. (ed.) Cultural Crowdfunding: Platform Capitalism, Labour and Globalization. Pp. 59–78. London: University of Westminster Press. DOI: https://doi.org/10.16997/ book38.d. License: CC-BY-NC-ND 4.0
- Molyneux John (2020) : The dialectics of Art .Hypermarket books
- Ritzer, G. (2015). The "New" World of Prosumption: Evolution, "Return of the Same," or Revolution? *Sociological Forum*, *30*(1), 1–17. http://www.jstor.org/stable/43653968
- Ritzer, G. (2015). PROSUMER CAPITALISM. *The Sociological Quarterly*, *56*(3), 413–445. http://www.jstor.org/stable/24581845
- Trotsky Leon,(2005): *Literature and Revolution,* ed. William Keach.Chicago: Haymarket, Pg.144.
- https://www.indiatoday.in/movies/standpoint/story/abhay-kumar-placebo-netflix-student-suicides-india-aiims-documentary-339195-2016-09-05

*समाजशास्त्र विभाग, मॉडर्न कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे–१६

***

बदलती जीवनशैली आणि आरोग्य

*डॉ.आनंद मुसळे

प्रस्तावना :–

उत्तम स्वास्थ्य हे मानवी जीवनासाठी पायाभूत बाब आहे. व्यक्तीचा विकास आणि आरोग्य यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. व्यक्तीचे आरोग्य चांगले असेल तर ती आपले काम कार्यक्षमतेने पार पाडू शकते. उत्तम आरोग्य ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे आणि उत्तम आरोग्य राखण्यामध्ये जीवनशैलीचा सिंहाचा वाटा आहे. आपली जीवनशैली निरोगी असेल तर आरोग्य चांगले राहण्यास मदत मिळते. वर्तमानकाळात दिवसेंदिवस आरोग्याच्या तक्रारीमध्ये वाढ होत आहे. व्यक्तीला अनेक प्रकारचे रोग जडत आहेत. यासाठी अनेक घटक जबाबदार असले तरी यामध्ये बदलत्या जीवनशैलीचा फार मोठा वाटा आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रस्तुत शोधनिबंधात बदलती जीवनशैली आणि आरोग्य यामधील सहसंबंध तपासण्यात आला आहे. यासाठी प्राथमिक तथ्याबरोबरच द्वितीयक तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे. प्राथमिक तथ्यांमध्ये निरीक्षण तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :–

१) जीवनशैली आणि आरोग्य यामधील सहसंबंध तपासणे.

२) बदलत्या जीवनशैलीचा आरोग्यावरील परिणाम अभ्यासणे

३) निरोगी जीवनशैली आणि आरोग्यासाठी उपाययोजना सुचवणे.

जीवनशैली आणि आरोग्य :–

जीवनशैली आणि आरोग्य यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. कोणत्याही व्यक्तीचे आरोग्य हे बऱ्याच अंशी त्यांच्या जीवनशैलीवर अवलंबून आहे. म्हणून निरोगी जीवनशैली हे उत्तम आरोग्याचा आधार आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

एखादया विशिष्ट व्यक्तीची किंवा लोकांच्या गटाची जीवनशैली म्हणजे राहणीमान, वागणूक आणि सवयी ज्या त्यांच्या वैशिष्टयपूर्ण आहेत किंवा निवडल्या आहेत थोडक्यात जीवन जगण्याची पध्दत म्हणजे जीवनशैली होय. निरोगी जीवनशैली म्हणजे अशी दिनचर्या जी एखादया व्यक्तीला निरोगी ठेवण्यासाठी किंवा त्याचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक असते. निरोगी जीवनशैलीमध्ये शरीराच्या सर्व क्रियाकलापाचा समावेश होतो. जसे की, योग्य खाणे, व्यायाम करणे, वजन नियंत्रण, तणाव व्यवस्थापन इ.

जीवनशैलीशी संबंधित दुसरी संकल्पना आरोग्य ही अत्यंत व्यापक संकल्पना आहे. आरोग्य म्हणजे स्थूलमानाने शारीरिक, मानसिक व सामाजिक संतुलनाची स्थिती होय. थोडक्यात आनंदी जीवन शक्य व्हावे अशी शरीराची आणि मनाची अवस्था म्हणजे आरोग्य होय. आरोग्य ही कांही आपोआप सहजपणे मिळणारी बाब नाही. आरोग्य राखण्यासाठी प्रयत्नपूर्वक सातत्याने कष्ट करावे लागतात आणि त्यामध्ये जीवनशैलीचा महत्वाचा वाटा आहे म्हणून उत्तम आरोग्यासाठी जीवनशैलीकडे डोळेझाक करुन चालणार नाही. किंबहुना जीवनशैली ही आरोग्याचा आधार आहे.

बदलती जीवनशैली आणि आरोग्य :–

आरोग्य आणि जीवनशैली यांमधील सहसंबंध लक्षात घेता बदलत्या जीवनशैलीचा आरोग्यावर परिणाम झाल्यावाचून राहत नाही. पूर्वी सकाळी लवकर उठणे, व्यायाम करणे, योग्यवेळी संतुलित आहार घेणे , रात्री लवकर झोपणे या गोष्टींकडे व्यक्तीचे विशेष लक्ष असायचे. साचेबध्द जीवन जगण्याच्या पध्दतीमुळे व्यक्ती स्वस्थ होती. परंतु सध्याच्या धकाधकीच्या जीवनामुळे व्यक्तीच्या जीवनशैलीत फार मोठया प्रमाणावर बदल झालेला आहे आणि या बदलत्या जीवनशैलीचा मानवी आरोग्यावर अतिशय दूरगामी परिणाम झाला आहे.

बदलती जीवनशैली ही मानवाच्या मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासास घातक बनली आहे. Early to Sleep, Early to rise Makes Man happy, Health and wise या वाक्याची आता टर उडवून Early to Sleep, Early to rise takes your girl friend away असे म्हटले जावू लागले आहे. एकूणच जीवनशैलीतील बदलाने व्यक्तीचे आरोग्य धाक्यात आणले आहे. यामध्ये ज्या प्रमुख घटकांचा सहभाग राहिला आहे. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

जीवनशैली आणि आहार :–

पौष्टिक/ संतुलित आहार, व्यायाम, पुरेशी झोप आणि सकारात्मक विचार हे मानवी आरोग्याचे चार स्तंभ आहेत आणि तं जीवनशैलीशी संबंधित आहेत. यातील एकाही स्तंभाकडे दुर्लक्ष झाले तर मानवाचे स्वास्थ्य बिघडते. यापैकी पहिला

महत्वाचा घटक म्हणजे आहार आहे. एखादे वाहन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी जशी पेट्रोल/ डिझेलची आवश्यकता आहे तसे मानवाला आपले दैनंदिन कार्य करण्यासाठी आहाराची अत्यंत आवश्यकता आहे. किंबहुना शरीराचा आधार आहार आहे. म्हणून तर हिंदीमध्ये 'जैसा होगा अन तैसा होगा तन' असं म्हणतात.

शरीराचे पोषण करण्यासाठी अन्नाची गरज आहे हे जरी खर असल तरी ते अन्न कोणत्या प्रकारच असाव हेही फार महत्वाच आहे. आपण जे अन्न घेतो ते षड्रसपूर्ण असलं पाहिजे म्हणजे ते संतुलित असलं पाहिजे. ज्यामध्ये कार्बोहायड्रेट्स, प्रोटीन, फॅट्स, विटामिन, मिनरल, फायबर इ. पोषकतत्वांनी युक्त आहार असला पाहिजे. हा सुध्दा आहार ठराविक दिवशी घेऊन चालणार नाही तो सातत्याने घ्यावा लागतो तरच शरीराच पोषण योग्यप्रकारे होईल ही लाईफलॉग प्रोसेस आहे. जेवणाच्या वेळा पाळणे आवश्यक आहे. सोबतच रात्रीचा आहार हलका असला पाहिजे म्हणून तर हिंदीमध्ये 'दाल रोटी खाओ प्रभु के गुण गाओ' म्हणतात ते कांही चुकीच नाही.

आहाराच्या बाबतीत वर जे कांही सांगितलं गेलं आहे ते पूर्वीच्या काळी तंतोतंत पाळलं जायचं परंतु वर्तमान काळातील जीवनशैलीत फार मोठा बदल होत चाललेला आहे. साहजिकच त्याचा परिणाम आहारावर झालेला आहे. आज पौष्टिक आहाराकडे दुर्लक्ष झाले आहे. आज आहारात जंकफुडचा समावेश झाला आहे. ताज्या अन्नापेक्षा पॅकबंद आहार घेण्याकडे कल वाढत चालला आहे. फ्रीजमध्ये ठेवलेले अन्नपदार्थ मोठया प्रमाणावर खाल्ले जात आहेत. ही बाब एकीकडे पर्यावरणाला हानीकारक तर दुसरीकडे आरोग्याला घातक आहे. अन्नधान्य पिकवताना रसायनांचा मोठया प्रमाणावर वापर होत आहे ही बाबसुद्धा पर्यावरण आणि स्वास्थ्य या दोन्हींसाठी हानीकारक आहे. आहाराच्या वेळा पाळल्या जात नाहीत केंव्हाही, काहीही आणि कितीही खाल्ले जात आहे. कुपोषण हा पूर्वी श्शाप होता आता जास्त पोषण आणि चुकीचा आहार हा शाप झाला आहे. आहाराच्या चुकीच्या सवयी हे आजार उद्भवण्याचे प्रमुख कारण झाले आहे. थोडक्यात जो आहार श्शरीराच पोषण करण्याच काम करतो तोच आहार आज शारीरिक व्याधी निर्माण करण्याच काम करतो आहे ते केवळ बिघडलेल्या जीवनशैलीमुळे.

जीवनशैली आणि व्यायाम :–

शरीरस्वास्थ्यासाठी जशी आहाराची आवश्यकता आहे तशीच व्यायामाचीसुद्धा आवश्यकता आहे. व्यायामामुळे शरीर तंदुरुस्त राहण्यास मदत मिळते. पूर्वी सायकलिंग, पोहणे, वेगवेगळे खेळ, शेतीकाम, चालणे इ. विविध माध्यमातून शरीराचा व्यायाम होत होता. सद्यस्थितीत विविध प्रकारच्या यंत्रामुळे शरीराच्या हालचालीवर मर्यादा आल्या आहेत. एकीकडे आहारातील बदल आणि दुसरीकडे शरीराच्या हालचालीवरील मर्यादा यामुळे शारीरिक स्वास्थ्यावर विपरित परिणाम होत आहे.

बैठे कामात वाढ झाल्यामुळे शरीराच्या हालचाली मंदावल्या आहेत. अशावेळी वेळ काढून थोडा वेळ तरी श्शरीराकडे लक्ष देण्याची आवश्यकता असताना वेळेचे कारण पुढे करुन व्यायामाकडे दुर्लक्ष केले जात आहे. हा सर्व व्यस्त जीवनशैलीचा परिणाम आहे. जवळ जवळ बरेचसे आजार हे आहार आणि व्यायामासारख्या जीवनशैली कारकांशी प्रेरित आहेत. श्शारीरिक गतिविधीच्या अभावामुळे पोट सुटण्याचे प्रमाण, लठ्ठपणा वाढत आहे. शरीरप्रकृती राखण्यासाठी चालणे, पळणे, पोहणे, सायकलिंग इ. साधे आणि सोपे व्यायाम प्रकार उपलब्ध असताना तेवढे करायलाही व्यक्तीकडे वेळ उपलब्ध नाही.

आहार आणि व्यायाम यांचा जीवनशैलीशी कसा संबंध आहे आणि त्याचा आरोग्यावर कसा परिणाम होतो. हे वरील चर्चेवरुन लक्षात येईल. या दोन घटकांप्रमाणेच पुरेशी झोप आणि सकारात्मक विचार या दोन घटकांचाही मानवी आरोग्यावर मोठा परिणाम होतो. फार पूर्वीपासून आरोग्याची त्रिसुत्री म्हणून आहार, विहार आणि व्यायाम या तीन घटकांचा विचार केला जातो. मानव जसा विचार करतो तसा तो घडतो. विचारामध्ये फार मोठी ताकद आहे. हे जसे खरे आहे तसे चुकीच्या नकारात्मक विचारामुळे मानवी आरोग्यावर विपरित परिणाम होतो. हे देखील तितकेच खरे आहे. एकूणच विचार हा घटकही जीवनशैलीशी संबंधित असून जीवनशैलीचे आरोग्याशी नाते आहे.

बदलती जीवनशैली आणि आजार :–

पूर्वीच्या काळी कुपोषण, वैयक्तिक व सार्वजनिक अस्वच्छता, चुकीच्या रुढी, गैरसमजूती, अज्ञान व अंधश्रद्धा ही आजार उद्भवण्याची कांही प्रमुख कारणे होती. यामुळे कांही आजार उद्भवले यापैकी काहींचा वैद्यकीय शास्त्राने प्रतिबंध केला तरी आजही कांही आजाराच्या साथी अधून–मधून येतच असतात. दोन वर्षापूर्वी आलेली कोविड–१९ ही विषाणूजन्य साथच होती अशा कांही आजारांशी मानवाचा संघर्ष चालू असतानाच मनुष्याने कांही आजार हे स्वत:च्या चुकीच्या वागण्यामुळे निर्माण केले आहेत. आहार–विहाराच्या चुकीच्या सवयी म्हणजे मनुष्याची बदलती जीवनशैलीच आहे ज्या जीवनशैलीमुळे अनेक आजार उद्भवले आहेत. रक्तदाब, मधुमेह, लठ्ठपणा, हृदयरोग, पचनाच्या तक्रारी, संधीवात इ. आजार हे बदलत्या जीवनशैलीशी निगडीत आहेत. पौष्टिक आहाराऐवजी जंकफुडचा आहारात समावेश, व्यायामाकडे दुर्लक्ष यामुळे लठ्ठपणा वाढू

लागला आहे. यातील गंभीर बाब म्हणजे शाळकरी, छोटया मुलांमध्येही लठ्ठपणाचे प्रमाण वाढत आहे. वाढत्या वजनाच्या परिणामी सांधेदुखी व गुडघेदुखी या आजारालाही व्यक्ती बळी पडत आहेत. अनुवंशिकता नसतानाही अनेकांना मधुमेह हा आजार होत आहे याचं महत्वाच कारण म्हणजे व्यायामाचा अभाव, आहारात साखरयुक्त व स्निग्ध पदार्थाचं अधिक सेवन, वाढलेले तणाव म्हणजेच बदललेली जीवनशैली हे आहे. हृदयरोग, पोटाच्या तक्रारी व ताणतणाव हा सुद्धा बदलत्या जीवनशैलीचा परिणाम आहे. एकूणच बदलत्या जीवनशैलीच्या परिणामी व्यक्तीला अनेक आजाराने ग्रासले आहे.

आरोग्यदायी जीवनासाठीची उपाययोजना :–

बदलत्या जीवनशैलीमुळे शरीरावर होणारे दुष्परिणाम टाळायचे असतील तर काही पथ्य पाळणे आवश्यक आहे. मूलत: आपल्या जीवनशैलीत असा बदल केला पाहिजे की जेणेकरुन आपले शरीर स्वस्थ राहील. यामध्ये सर्वप्रथम आपण आपल्या चुकीच्या सवयी बदलत्या पाहिजेत जंकफुड, डबाबंद आहार टाळण्याबरोबरच पौष्टिक आहार घेतला पाहिजे ज्यामध्ये सर्व पोषणतत्वांचा समावेश असेल. अवेळी जेवण टाळले पाहिजे. सोबतच रात्री हलका आहार घेतला पाहिजे.

रोज चालणे शरीरासाठी फार आवश्यक आहे किमान अर्धा तास तरी दररोज व्यायाम केला पाहिजे. रात्रीच्या जेवणात आणि झोपण्यात किमान दोन तासाचे अंतर असावे. आहार, व्यायामाबरोबरच विचार सकारात्मक, सात्विक ठेवणे आवश्यक आहे. ताण–तणावाचे योग्य व्यवस्थापन केले पाहिजे. सोबतच पुरेशा प्रमाणात म्हणजे वयस्कर व्यक्तीने किमान सात तास झोप घेतली पाहिजे. व्यसनापासून दूर राहिल पाहिजे. थोडक्यात आहार, विहार, व्यायाम या त्रिसुत्रीवर विशेष लक्ष दिले आणि योग्य पथ्य पाळली तर आरोग्यदायी जीवन दूर नाही. यासंदर्भात संत रामदास स्वामी दासबोधात म्हणतात.

औषध ने घे असोनी वेथा ।
पथ्य न करी सर्वथा ।
न मिळे आलिया पदार्था ।
तो एक मूर्ख ।

याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आयुर्वेदात ऋतूनुसार दिनचर्या कशी असावी हे सांगितले आहे. नियमित दिनचर्या ही आपली वृत्तीच व्हायला हवी तरच स्वस्थपणे जीवन जगता येईल आणि त्यामुळे समाजस्वास्थ्य ही टिकून राहील.

सारांश :–

इंग्रजीत आरोग्याचे महत्व व्यक्त करण्यासाठी Health is Wealth असे म्हटले जाते तर हिंदीमध्ये 'सच्चा सुख निरोगी काया' असे वर्णन ज्यासाठी केले जाते ते आरोग्य ही कोणत्याही व्यक्तीच्या यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे आणि आरोग्य हे बऱ्याचअंशी जीवनशैलीशी निगडित आहे. जीवनशैलीमध्ये आहार, व्यायाम आणि विहार या त्रिसूत्रीला महत्वाचे स्थान आहे. मागच्या काही वर्षापासून जीवनशैलीमध्ये मोठया प्रमाणावर बदल झालेला आहे आणि या बदलत्या जीवनशैलीचा मानवी आरोग्यावर दूरगामी परिणाम झालेला आहे. परिणामी रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, संधीवात, पोटाच्या तक्रारी या आजारामध्ये वाढ होत आहे यावर वेळीच योग्य ती उपाययोजना केली पाहिजे. म्हणजेच आपल्या जीवनशैलीत योग्य तो बदल केला पाहिजे. तरच आपले आरोग्य आणि एकूणच समाज स्वास्थ्यही टिकून राहिल.

संदर्भ :–

१) दीक्षीत, जगन्नाथ (२०१९) विनासायास वेटलॉस, मनोविकास प्रकाशन.
२) देवधर, दिलीप (२०२०) बदलती जीवनशैली आणि आजार, चंद्रकला प्रकाशन.
३) सरदेसाई, ह. वि. (२००५) आरोग्य आणि जीवनशैली, उत्कर्ष प्रकाशन.

वेबसाईट्स :–

१) आरोग्य म्हणजे काय?, १८ मार्च, २०२३, Vikaspedia mr.vikaspedia.in
२) जीवनशैली (समाजविज्ञान), १८ मार्च, २०२३ विकीपीडिया https://hi.m.wikipedia.org
३) जीवनशैली किसे कहते है, १९ मार्च, २०२३ Brainly.in https://brainly; ms question
४) सुपे, अविनाश, बदलती जीवनशैली बदलते आजार, १९ मार्च, २०२३
५) महाराष्ट्र टाईम्स, maharashtratimes.com Youtube:-DDUTTARAKHAND. 4 January,2022 जीवनशैली–स्वास्थ्य एवं पौष्टिक आहार (Video)

*समाजशास्त्र विभाग, मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय, औराद शहाजानी.

***

नागरी समाजातील समस्या एक दृष्टिक्षेप

*प्रा.डॉ. गंगाधर बालू चव्हाण

प्रस्तावना :

नागरी समाजातील विकास हा मानवाच्या प्रगतीतील अतिशय महत्त्वाचा टप्पा मानला जातो.नागरी समाजातील विकासाला प्राचीन काळापासून चा इतिहास लाभलेला आहे. काळ जस-जसा बदलत जाईल तस -तसा नागरी समाज सुद्धा बदलतो . तसेच नागरी समाजाच्या विकासाबरोबर नागरी समाजातील समस्या देखील आपल्याला चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यासणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. साधारणपणे शहर ही संज्ञा मोठा आकार, जास्त लोकसंख्या, उंच उंच इमारती, लोकांची गर्दी, दळणवळणाची प्रगत साधने, उद्योगधंदे, बाजारपेठा, बिगर शेती व्यवसाय, शिक्षण व मनोरंजन इत्यादींची सहज होणारी उपलब्धता म्हणजेच शहर होय, आणि शहर म्हटलं की दुसरी बाजू देखील विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामध्ये पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, शहरी जीवनशैलीतील बिघडत चाललेले आरोग्य, ग्रामीण भागातून नागरी भागात होणाऱ्या स्थलांतरातून झोपडपट्टीतील निर्माण होणारे प्रश्न, औधोगिकीकरणाच्या माध्यमातून निर्माण झालेले प्रदूषण, गर्दी व दिवसेंदिवस वाढत जाणारे नगरीकरण. ह्या सगळ्यांचा ताण शहरातील सेवा आणि सुविधांवर पडत आहे. वाढत जाणारी बेसुमार लोकसंख्या ह्या समस्या वाढवण्यासाठी कारणीभूत असलेली दिसून येते. ग्रामीण भागाच्या लोकांच्या दृष्टिकोनातून शहराकडे पाहिल्यास शहर म्हणजे सगळं काही सुव्यवस्थित आणि . त्यांना शहरी जीवनाचे आकर्षण असते पण इथं आल्या नंतरची परिस्थिती यापेक्षा अगदी उलट असते हे शहरात आल्या नंतर लक्षात येते. आज नागरी जीवन जगत असताना मेडिकल इन्शुरन्स करणे , आरोग्याची काळजी घेणे, जॉब टिकवून ठेवणे, प्रदूषणापासून स्वतःला सुरक्षित राखणे ह्या बेसिक गोष्टी खूप गरजेच्या आहेत . शहरी जीवनाची काही खात्री देता येत नाही. शहरांमधील प्रदूषणामुळे मानवाचे आरोग्य अत्यंत विस्कळीत झालेले आहे. शहराचे मोठ्या नगरात, नगराचे महानगरात आणि महानगराचे अति विशाल नगरात किंवा नगर समूहात रूपांतर होते. अशा फार मोठ्या नागरी वस्तीचे व्यवस्थापन आणि प्रशासन करणे जिकीरीचे ठरते . याचा परिणाम म्हणून नागरी वस्त्या बाह्य क्षेत्रात वाढत जातात ,त्यातूनच उपनगरांची निर्मिती होते. या सगळ्यांचा परिणाम पाणीपुरवठा, वाहतूक , सांडपाणी विलेवाट, शिक्षणाच्या सोयी, वैद्यकीय सोयी , अशा नागरी सुविधांवर प्रचंड मोठ्या प्रमाणात ताण पडतो आहे . वाढत्या लोकसंख्येमुळे झोपडपट्ट्यांची अनियंत्रित वाढ होते, वाहतूक कोंडी होते, हवा आणि ध्वनी प्रदूषण होते, कारखान्यातून होणारे प्रदूषण, दूषित पाण्याची समस्या अश्या अनेक समस्या दिवसेंदिवस वाढत असलेल्या दिसून येतात.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) नागरी समाजाचे आकलन करून घेणे.

२) नागरी समाजातील समस्या समजून घेणे.

३) नागरी समाजातील होणाऱ्या परिवर्तनाची प्रक्रिया समजून घेणे.

४) नागरी समाजातील समस्यांवर उपाययोजना शोधणे.

गृहीतकृत्ये

१) नागरी समाजामुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे.

२) नागरी समाजामुळे प्रदूषणाची पातळी वाढली आहे

३) नागरी समाजामुळे विकासाला चालना मिळाली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

शहरी समाजाचे महत्त्व आपण सर्वजण जाणताच, पण शहरी समाजातील उद्भवलेल्या परिस्थितीमुळे आज अनेक प्रकारच्या सामाजिक समस्यांनी डोके वर काढलेले आहे. शहरी समाज हा मानवानेच निर्माण केला आहे. पण आज हाच समाज मानवाच्या अस्तित्वाला धक्का पोहोचवण्याचे काम करतो आहे, हे आपण कोरोनाच्या संसर्गजन्यसाथी मध्ये सर्वांनीच अनुभवले आहे. हा संसर्ग प्रामुख्याने मोठ्या शहरांमध्येच जास्त पसरला व अनेक लोकांना ह्या संसर्गामुळे जीवाला मुकावे लागले. अशा अनेक समस्या पुढील काळातही निर्माण होऊ शकतात . त्यामुळे सदरील विषयाचे महत्व अनन्य साधारण आहे. आपल्या शहरी समाजाला ह्यातून वाचवायचे असेल तर शहरी समस्यांचा अभ्यास करूनच त्यावरील उपाय शोधणे आणि त्या उपायांची अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

संशोधन पद्धती : सदरील संशोधन करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलन पद्धती व द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

नागरी समाजातील समस्यांचा आढावा:

नागरी समाजातील समस्या ह्या दिवसेंदिवस वाढत जाताना दिसून येत आहेत. नागरी समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, तांत्रिक, औद्योगिक, वैद्यकीय प्रगती झपाट्याने होत आहे. पण नागरी समाजातील समस्या काही केल्या कमी होण्याच्या मार्गावर नाहीत, त्यामध्ये दिवसेंदिवस भरच पडत असलेली आपल्याला दिसून येते. म्हणून नगरांचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यातूनच नागरी समाजशास्त्र नावाची नवीन शाखा अलीकडेच विकसित होताना व त्याची उपयोगीत वाढतांना दिसते. शहरांमध्ये कमीत कमी जागेमध्ये लाखो-करोडो लोक दाट वस्तीने घरे बांधून राहतात, अशा झोपड्यांच्या समूहास झोपडपट्टी असे म्हणतात. अशा वस्तीत कोणत्याही नागरी सुविधा नसतात. त्यामुळे ही वस्ती आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक असते . अशा वस्तीत अवैद्य कृती करणारे व निम्न आर्थिक स्थिती असणारे लोक हे बहुसंख्यांक असतात. त्यामुळे तेथे अवैध्य व अनैतिक कृत्य घडत असतात. गलिच्छ वस्ती ही नागरी जीवनातील गंभीर समस्या बनली आहे. त्याचबरोबर वेश्याव्यवसाय ही देखील नागरी समस्येतली गंभीर समस्या आहे. औद्योगिकीकरण व नागरीकरणाच्या प्रक्रियेत स्थलांतराची प्रक्रिया अधिक गतीमान झाली. त्यामुळे पुरुष नोकरी, व्यवसाय, शिक्षण, व्यापार, पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने दीर्घकाळ व अल्पकाळ एकटेच शहरात राहतात, व आपली लैंगिक भूक शमविण्यासाठी वेश्यागमन करतात. काही गरीब व निराधार स्त्रिया पोटासाठी तर काही चैनीसाठी वेश्याव्यवसाय पत्करतात. काही स्त्रियांना फसवून या व्यवसायात धकलले जाते . या व्यवसायामुळे एड्स सारखा गंभीर आजार समाजामध्ये पसरत आहे. तसेच आरोग्याच्या बाबतीतल्या इतर समस्या देखील दिवसेंदिवस शहरामध्ये वाढताना दिसून येत आहेत. त्यात विविध संसर्गजन्य आजार, मधुमेह, कर्करोग, ह्रदयविकार, अपचन, अशक्तपणा, मानसिक विकृती, निराशा अशा विविध असंख्य आजारांचा समावेश त्यात होईल. प्रदूषणाच्या समस्येमुळे तर शहरी जीवन अगदी नकोसे झालेले आहे त्यामध्ये हवाप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, भूप्रदूषण आणि जलप्रदूषण या सगळयांमुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. यावर वेळीच उपाय योजले तरच मानवी जीवन सुरक्षित राहील. वाढत्या पंढरपेशीय गुन्हेगारीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न बिकट बनला आहे. विविध जातीय व धार्मिक संघटना अस्तित्वात येताहेत, हे सामाजिक प्रगतीस अत्यंत मारक बाब आहे. समाजाच्या निकोप आरोग्याच्या दृष्टीने ही चांगली बाब नाही. शहरांमध्ये होणारी गर्दी, वाहतूक कोंडी, पार्किंग च्या अडचणी, वाढत जाणारे अपघात यामुळे दैनंदिन जीवनात व्यत्यय येत आहे. अशा अनेक समस्यांमुळे नागरी जीवन अधिक गुंतागुंतीचे बनलेले आहे.

उपाययोजना :

गृहीतकृत्यांची पडताळणी :

१) नागरी समाजामुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे.

सदरील गृहीतकृत्य हे नागरी समाजाला लागू होते. शहरातील मानवी आरोग्याची स्थिती ही म्हणावी तशी चांगली राहिलेली नाही. झोपडपट्टीमधील लोक असोत की शहरातील वृद्ध, अपंग, निराधार, स्त्रिया, बालके यांना काही प्रमाणात का होईना विविध आजारांनी ग्रासले आहे. धावपळीच्या जीवनशैलीमुळे व्यक्तींना आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही, त्यामुळे विविध आजार उद्भवतात हे आजच्या परिस्थितीत दिसून येते.

२) नागरी समाजामुळे प्रदूषणाची पातळी वाढली आहे.

सदरील विधान आजच्या परिस्थितीला जशास तसे लागू पडते. आज जलप्रदूषण, वायूप्रदूषण, ध्वनी प्रदूषण , भूमिप्रदूषण हे वाढतच जात आहे. औद्योगिकीकरणामुळे ह्या प्रदूषणामध्ये भर पडत आहे. माणूस ग्रहण करत असलेल्या अन्नामध्ये देखील रासायनिक खते आणि औषधांची मात्रा भरपूर मोठ्या प्रमाणात असते. शुद्ध पाणी पिण्यास मिळत नाही. शुद्ध ऑक्सिजन मिळणे अवघड बनले आहे. नागरीकरणाचा वेग झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होताना दिसून येते आहे. पावसाचे पाणी अडवले व जिरवले जात नाही. त्याचा परिणाम म्हणून आपल्या मानवी समाजाला रोगराई, दुष्काळ, अनारोग्य व प्रदूषण सारख्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

३) नागरी समाजामुळे विकासाला चालना मिळाली.

आज शहरी समाजामुळे शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, वैद्यकीय क्षेत्र, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक प्रगती झापाट्याने होत आहे. आज तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या माध्यमातून मानवाला सगळया गोष्टी सहज उपलब्ध होत आहेत. मानवाने प्रत्येक गोष्टीवर मात केलेली आहे. शहरांमध्ये रोजगाराला भरपूर वाव आहे. रोज नवनवीन संधी तयार होत आहेत. वाहतुकीची साधने उपलब्ध असल्यामुळे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी किंवा व्यापार करण्यासाठी सर्व काही सहज उपलब्ध होत आहे. म्हणून नागरी समाजामुळे मानवी विकासाला चालना मिळाली असे म्हणावे लागेल.

निष्कर्ष :

१) नागरी समस्या कमी करण्यासाठी समाजशास्त्रज्ञ व नगररचनाकारांची मदत घेणे आवश्यक आहे.

२) झोपडपट्ट्यांचे व्यवस्थित पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

३) असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्या प्राधान्याने सोडणे गरजेचे आहे.

४) विविध गोष्टींच्या माध्यमातून होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

५) वाहतूक व गर्दी कमी करण्यासाठी सर्वांनीच नियमांचे पालन करून सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय निवडणे योग्य होईल.

६) शहरांमधील वाढत जाणारी अस्वच्छता ही रोगराईला निमंत्रण देते त्यामुळे अस्वच्छतेचे निर्मूलन होणे गरजेचे आहे.

७) घरांची व रस्त्यांची रचना ही पर्यावरणास पूरक झाल्यास प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

८) शहरांमधील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी योग्य उपाययोजनांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

मूल्यमापन :

आधुनिक काळात वाढत्या लोकसंख्येमुळे नागरी समाज जीवन पूर्णपणे बदललेले दिसून येत आहे. ज्या पद्धतीने मानवी जीवन बदलत आहे, त्याच पद्धतीने मानवी जीवनात नवनवीन समस्यांची देखील भर पडत आहे. त्यातच नागरी समाजजीवनातील वाढत जाणाऱ्या समस्या हा अधिक चिंतनाचा विषय होऊ पाहत आहे. ह्या समस्यांची तीव्रता कमी झाली तरच शहरात राहणे शक्य होईल दिवसेंदिवस शहराचा आकार वाढत आहे. त्यामुळे नवनवीन समस्या निर्माण होण्यासाठी वातावरण अनुकूल होत आहे. ह्या सगळ्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी नागरी समाजशास्त्र नावाची शाखा उदयास येत आहे. त्या अनुषंगाने नागरी समाजशास्त्रात शहरांचे व समस्यांचे चिकित्सक अध्ययन केलं जातं.

संदर्भ सूची :

- Environmental Problems in urban Areas
- Essay on the growth of slums urban Areas of india
- Raymond vernon , The myth and reality of our urban problems
- Ronald Ferguson , William T Dickens , Urban problems and Community development
- Ranganathan Ramchandran , Urbanization and urban systems in india
- John Barry Cullingworth , Problems of an Urban Society: The social framework of planning
- धनागरे द. ना. , संकल्पनांचे विश्व आणि समाजिक वास्तव, पुणे 2005
- समजशास्त्र, 12 वी , महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे.

*समाजशास्त्र विभाग , कन्या महाविद्यालय मिरज, E-mail ID. chavangangadhar7@gmail.com

***

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

*प्रा.डॉ.सुनिल प्रल्हाद गायगोळ

प्रस्तावना –

भारत देश आज जागतिक महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. एकीकडे भारत देशाने अनेक क्षेत्रात अतुलनीय प्रगती केलेली आहे. परंतु त्याच वेळेस भारतातील काही क्षेत्र आणि घटक बहुतांश दुर्लक्षीतच असलेले आढळतात. या दुर्लक्षीत घटकांपैकी एक महत्वाचा घटक म्हणजे शेतकरी वर्ग होय. भारत हा शेतीप्रधान देश असून २०११ च्या जनगणनुसार भारतातील १२१ कोटी लोकसंख्येपैकी जवळपास ६८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहत असून त्यांचा प्रत्यक्ष वा अपत्यक्ष व्यवसाय शेती हाच आहे. त्यामुळेच भारताला गावांचा किंवा खेड्यांचा देश असे सुध्दा म्हणतात. राष्ट्रीय कृषी आयोग २००६ च्या अंतीम अहवाला नुसार, भारतात 'शेतकरी या शब्दा अंतर्गत भूमिहिन कृषी मजूर, बटाईदार, कास्तकार, अत्यल्प–अल्प–मध्यम–मोठे शेती करणारे, कुक्कुट पालन आणि पशुपालन करणारे, बगीचा कामगार आणि आदिवासी शेतकरी यांचा समावेश होतो. तसेच शेतीवर आधारित व्यवसाय करणारे जसे – मधमाशी पालन, कृमिपालन, रेशमपालन करणारे व्यक्ती सुध्दा शेतकरी वर्गात समाविष्ट करण्यात आले आहे. शेतकरी या शब्दात 'झुम' शेती करणारे आदिवासी व वनोत्पादनात कार्यरत असणारे व्यक्ती यांचा सुध्दा समावेश होतो.' थोडक्यात भारतात कृषी क्षेत्रावर अवलंबुन असणाऱ्या शेतकरी व शेतमजूरांची संख्या सर्वाधिक आहे. याठिकाणच्या उद्योगाला कच्चा माल व श्रमीक पूरविण्याचे कार्य ही प्रामुख्याने शेतीच करतांना दिसते. त्यामुळेच असे म्हटले जाते की, प्राचीन काळापासून गाव आणि शेतीने भारतीय अर्थव्यवस्थेला त्याचप्रमाणे सामाजिक व राजकीय व्यवस्थेला स्थिरत्व देण्याचे कार्य केलेले आहे.

भारतीय समाजव्यवस्थेचा व अर्थव्यवस्थेचा कणा शेती, शेतकरी आणि गाव असतांना देखील या तीनही घटकांना भारतात सुरुवातीपासून पाहिजे तेवढे महत्त्व दिले गेलेले नाही. परिणामत: आज ग्रामीण क्षेत्राशी संबंधित समस्या दिवसेंदिवस वाढत असतांना दिसतात. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात शेतकरी वर्गाला निरक्षरता, दैववाद, नापिकी, साथीचे रोग, अंधश्रध्दाळूपणा, परंपरागतता, कुळप्रथा, वेठबिगारी, जातीभेद इत्यादी समस्यांना तर देश स्वातंत्र्या झाल्यानंतर या समस्यांबरोबरच दारिद्र्य, सावकारी प्रथा, उपासमार, मालाला हमी भाव न मिळने, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, सिंचनाचा अभाव इत्यादी समस्यांना नेहमीच सामोरे जावे लागत असतांना दिसते. आधुनिक काळात आज देशाचा पोशिंदा म्हणजेच शेतकऱ्यांनी उपरोक्त विविध समस्यांना कंटाळुन यातुन नवीन मुक्तीचा मार्ग शोधला व तो म्हणजे, 'शेतकरी आत्महत्या'. आत्महत्ये संदर्भात सर्वात प्रथम अध्ययन करतांना ईमाईल दुर्खीम यांनी म्हटले की, 'आत्महत्येचे तात्पर्य अशा सर्व मृत्युशी आहे, जे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रुपात व्यक्तिच्या सकारात्मक किंवा नकारात्मक क्रियेचा परिणाम असतो आणि ज्या परिणामाच्या संदर्भात व्यक्तिला माहिती असते.' दुर्खीमच्या मते, आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे. अर्थात कोणत्याही आत्महत्येकरिता समाजातील विविध घटक ज्या पध्दतीने कारणीभूत असतात, त्याचप्रमाणे आत्महत्या केल्यानंतर त्याचे परिणाम संपूर्ण समाज व्यवस्थेवर होतांना दिसतात. त्यामुळे भारत देशाचा पोशिंदा जर आत्महत्या करत असेल तर त्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाचेही अस्तित्व धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. आज संपूर्ण भारतातच शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या समस्येची तिव्रता दिवसेंदिवस वाढत आहे आणि त्यामुळे आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या समस्यांचे प्रमाणही वाढत असतांना दिसते. आत्महत्या करणारा शेतकरी या जगातून निघुन जातो, तत्पश्चात त्यांच्या कुटुंबावर काय परिणाम होतात याचे वास्तविक व शास्त्रीय अध्ययन करण्याकरिताच प्रस्तुत शोध कार्य करण्यात आले आहे.

संशोधनाची उदिदष्ट्ये –

१. भारतातील शेती व शेतकरी वर्गाचे महत्व समजून घेणे
२. शेतकरी वर्गाच्या विविध समस्या अभ्यासणे
३. आत्महत्येचा अर्थ स्पष्ट करणे
४. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या आर्थिक व मानसिक स्थितीचा अभ्यास करणे
५. शेतकरी आत्महत्यांचे त्यांच्या कुटुंबावरील दुष्परिणाम अभ्यासणे
६. आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या समस्येवरील उपाय सुचविणे.

शोध पध्दतीशास्त्र – संशोधकाने 'आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयावर शास्त्रीयरित्या कार्य करतांना अध्ययनाचे कार्यक्षेत्र 'अकोला जिल्हा' व त्यातील सात तालुक्यांतील ३०० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची लॉटरी पध्दतीने नमुना म्हणून निवड केलेली आहे. शोध निबंधाशी संबंधित प्राथमिक तथ्य संकलन करण्याकरिता क्षेत्रकार्य अभ्यास पध्दतीचा वापर करुन मुलाखत–अनुसूची व्दारे आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या, सामाजिक, आर्थिक व मानसिक समस्यांची माहिती प्राप्त करण्यात आली आहे. शेतकरी आत्महत्येचा अर्थ, त्याची विविध कारणे, शेतकरी वर्गाच्या समस्या आणि आत्महत्येनंतर त्यांच्या कुटुंबाची समाजातील स्थिती इत्यादी घटकांचे अध्ययन करण्याकरिता शोध निबंधाशी संबंधित दुय्यम साहित्याचा आढावा घेण्याकरिता विविध संशोधन अहवाल, संदर्भीय पुस्तक, लेख, जर्नल्स व इंटरनेटचा वापर करण्यात आलेला आहे. प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनानंतर सांख्यिकीय पध्दतीव्दारे तथ्यांचे वर्गीकरण करुन विविध सारण्यांव्दारे शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या समस्यांचे वास्तविक विश्लेषण व निर्वचन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

तालिका क्र. १ : आत्महत्याग्रस्त कुटुंबावरील अन्याय व अत्याचाराची स्थिती

अ. क्र.	विवरण		वारंवारिता	प्रमाण
१	होय (५२ टक्के)	सावकार	४८	१६ टक्के
		प्रशासकीय कर्मचारी	१४	४.६७ टक्के
		व्यापारी	४४	१४.६७ टक्के
		राजकीय पुढारी	२२	७.३३ टक्के
		अन्य जातीचे व्यक्ती	२८	९.३३ टक्के
२	नाही (४८ टक्के)		१४४	४८ टक्के
एकूण			३००	१०० टक्के

उपरोक्त तालिका क्र. १ नुसार, ५२ टक्के उत्तरदाते मान्य करतात की, गावात त्यांच्यावर अन्याय–अत्याचार होतो. एकूण उत्तरदात्यांपैकी अशाप्रकारचे गैरकृत्य सर्वात जास्त सावकार १६ टक्के तर व्यापारी १४.६७ टक्के करीत असल्याचे स्पष्ट होते. शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबावर अन्याय–अत्याचार करणाऱ्यांमध्ये राजकीय पुढारी ७.३३ टक्के, प्रशासकीय कर्मचारी ४.६७ टक्के आणि अन्य जातितील व्यक्तिंचे प्रमाण ९.३३ टक्के आहे. अशाप्रकारे गावात शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबावर अन्याय–अत्याचार करणारा सर्वात महत्त्वाचा घटक आजही 'सावकार व व्यापारी' असल्याचे स्पष्ट होते. या दोन घटकांमूळेच शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण सुरु असून त्यातून अनेकवेळा शेतकरी आत्महत्या होतांना दिसतात. म्हणूनच अरुण शिंदे लिहितात, "शेतकऱ्यांच्या शोषणाचा सर्वात मोठा घटक म्हणजे सावकार. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सावकार हा कणा होता. अज्ञानी व दरिद्री शेतकरी हे त्यांचे गिऱ्हाईक."[१]

तालिका क्र. २ : आत्महत्याग्रस्त कुटुंबाची कर्जाची स्थिती

अ. क्र.	विवरण		वारंवारिता	प्रमाण
१	होय (९० टक्के)	बँक	३३	११ टक्के
		सावकार	२१३	७१ टक्के
		व्यापारी	७	२.३३ टक्के
		नातेवाईक	१२	४ टक्के
		अन्य	५	१.६७ टक्के
२	नाही (१० टक्के)		३०	१० टक्के
एकूण			३००	१०० टक्के

उपरोक्त तालिका क्र. २ वरुन स्पष्ट होते की, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील ९० टक्के व्यक्ती मानतात त्यांनी कर्ज घेतलेले आहे, केवळ १० टक्केच उत्तरदाते कर्ज काढत नाहीत. आत्महत्याग्रस्त कुटुंबानी जे ही कर्ज काढलेले आहे त्याचा

प्रमुख स्त्रोत प्रामुख्याने ७१ टक्के हा सावकारच आहे. उत्तरदात्यांपैकी ११ टक्के व्यक्ती बॅकेकडून, २.३३ टक्के व्यापाऱ्याकडून, ४ टक्के नातेवाईकाकडून तर अन्य स्त्रोतांव्दारे १.६७ टक्के कर्ज काढतांना दिसतात.

त्यामुळेच शिवनाथ बोरसे लिहितात, "कृषी पत पुरवठा धोरण शेतकऱ्यांना अनुकूल नाही. ग्रामीण विकासाला पूरक नाही हे आता सिध्द झाले आहे. खाजगी सावकारी शेतकऱ्यांच्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहचली आहेत."[२] याचाच अर्थ या क्षेत्रात शेतकरी वर्गात कर्ज काढण्याचे प्रमाण जास्त असून सावकार हाच त्यांचा कर्ज देणारा प्रमुख स्त्रोत आहे. सावकाराच्या व्याजाचा दर जास्त असल्याने जो शेतकरी एकदा सावकाराच्या जाळ्यात अडकतो तो कधीही याबाहेर निघु शकत नाही किंबहुना आत्महत्या करुनच या चक्रव्युव्हातून तो बाहेर निघण्याचा प्रयत्न करतो.

तालिका क्र. ३ : आत्महत्याग्रस्त कुटुंबाला पॅकेजचा लाभ दर्शक तालिका

अ. क्र.	विवरण		वारंवारिता	प्रमाण
१	होय (५२ टक्के)	रोख रक्कम मिळाली	७०	२३.३३ टक्के
		नवीन कर्ज प्राप्त झाले	१६	५.३३ टक्के
		कर्जमुक्ती मिळाली	४४	१४.६७ टक्के
		आवश्यक साहित्य मिळाले	२६	८.६७ टक्के
२	नाही (४८ टक्के)	शेती नावावर नसल्यामुळे	५५	१८.३३ टक्के
		कर्जबाजारी नसल्यामुळे	२०	६.६७ टक्के
		कर्ज खाजगी असल्यामुळे	६२	२०.६७ टक्के
		अन्य कारणांमुळे	०७	२.३३ टक्के
एकूण			**३००**	**१०० टक्के**

वरील तालिका क्र. ३ नुसार, नमुना म्हणून निवडलेल्या आत्महत्याग्रस्त कुटुंबापैकी ५२ टक्के कुटुंबांना आत्महत्याग्रस्त पॅकेजचा लाभ उपरोक्त विवरणाप्रमाणे मिळाला आहे. तर ४८ टक्के आत्महत्याग्रस्त कुटुंबाना या पॅकेजचा कोणताच लाभ मिळाला नसल्याचे विविध कारणांव्दारे स्पष्ट होते.

शेतकरी आत्महत्यांना रोखण्यासाठी आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबांची अडचण दुर करण्यासाठी केंद्र सरकारने ३७५० कोटींचे तसेच राज्य सरकारने १०७५ कोटींचे विशेष पॅकेज जाहिर केले होते. परंतु उपरोक्त विश्लेषणावरुन लक्षात येते की, अकोला जिल्ह्यात एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी अर्ध्याच आत्महत्या या पात्र ठरविण्यात आल्या आहेत. त्यामुळे अपात्र शेतकरी कुटुंबाची परिस्थिती आणखीन वाईट होऊन त्या कुटुंबात आणखीन शेतकरी आत्महत्यांची शक्यता वाढली आहे. म्हणूनच डॉ. श्रीनिवास खांदेवाले लिहितात की, "डिसेंबर २००५ मध्ये आत्महत्याग्रस्त क्षेत्रासाठी राज्याचे पॅकेज आणि जुलै २००६ मेध्ये पंतप्रधान– पॅकेज जाहीर झाले, तरीही आत्महत्यांचे सत्र थांबले नाही."[३]

तालिका क्र.४ : आत्महत्या करण्याचे कारण दर्शक तालिका

अ. क्र.	विवरण	वारंवारिता	शेकडा प्रमाण
१	कर्जामुळे	२२२	७४ टक्के
२	नापिकीमुळे	६४	२१.३३ टक्के
३	कर्ज व नापिकी दोन्हीमुळे	१४	४.६७ टक्के
४	हुंड्यामुळे	–	–
५	आजारामुळे	–	–
एकूण		**३००**	**१०० टक्के**

उपरोक्त तालिका क्र. ४ दर्शविते की, अकोला जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील आत्महत्यांना जबाबदार असणारा सर्वात महत्त्वाचा घटक 'कर्ज' ७४ टक्के हाच आहे. तर नापिकीमुळे आत्महत्या झाल्याचे २१.३३ टक्के आणि कर्ज व नापिकी दोन्हीमुळे ४.६७ टक्के आत्महत्या झाल्याचे मत उत्तरदात्यांनी मांडले आहे. अर्थात 'कर्जबाजारीपणा' हाच घटक अकोला जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येंकरिता जबाबदार आहे. त्यामुळेच डॉ. नरेंद्र जाधव म्हणतात, "शेती क्षेत्रात खर्च–जोखीम–उत्पन्न यांची स्थिती विपरीत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात कर्जबाजारीपणा वाढतो आहे. महाराष्ट्रात ५५ टक्के शेतकरी कर्जबाजारी आहेत."[४]

आंतरराष्ट्रीय संस्था सेन्टर फॉर ह्युमन राईट्स ॲन्ड ग्लोबल जस्टीस, न्युयार्क यांच्या अहवालानुसार, "कर्जबाजारीपणा भारतातील शेतकरी आत्महत्येचे एक महत्त्वाचे आणि निश्चित कारण असल्याचे जाणवते."[५] थोडक्यात आजही आत्महत्याग्रस्त कुटुंबावर कर्जाची टांगती तलवार असल्याने आणखीनही शेतकरी आत्महत्यंचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

तालिका क्र. ५ : आत्महत्येमुळे कुटुंबाच्या मानसिकतेवरील विपरित परिणाम दर्शक तालिका

अ. क्र.	विवरण	वारंवारिता	शेकडा प्रमाण
१	होय	२५३	८४.३३ टक्के
२	नाही	४७	१५.६७ टक्के
एकूण		**३००**	**१०० टक्के**

तालिका क्र. ५ ही आत्महत्येनंतर संबंधित कुटुंबांच्या मानसिक स्थितीवर झालेल्या विपरित परिणामांचे विश्लेषण दर्शविते. आत्महत्या ही सामाजिक घटना असल्याने त्याचे दुरगामी परिणाम होतांना दिसतात.याठिकाणी आत्महत्याग्रस्त कुटुंबापैकी ८४.३३ टक्के उत्तरदाते मान्य करतात की, आत्महत्येच्या घटनेनंतर त्यांच्या मानसिकतेवर फारच विपरित परिणाम झाला तर १५.६७ टक्के व्यक्ती सांगतात त्यांच्या मानसिकतेवर विपरित परिणाम झालेला नाही.

"सन १८८३ साली 'शेतकऱ्यांचा असूड' मध्ये महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या समस्या, व्यथा मांडल्या आहेत. त्यांच्या मते, शेतकरी त्यावेळीही आत्महत्येचा विचार करतांना दिसतात. परंतु आपण गेल्यानंतर आपली आई, पत्नी आणि लहान मुलांच कसं होईल? हा विचार त्यांना आत्महत्या करु देत नव्हता. आज मात्र शेतकरी हा विचार न करता या समस्यांमधून आपली सुटका करून घेऊन आपल्या कुटुंबाला समस्येच्या चक्रव्युहात ढकलून देतांना दिसतात. बरं त्यामुळे कुटुंबाच्या समस्या सुटतात असे नाही, तर त्या शंभर पटीन आणखी वाढतात."[६] थोडक्यात, आत्महत्येच्या या दुदैवी घटनेनंतर संबंधित कुटुंबाचे मानसिक खच्चीकरण होवून त्यातून निघण्यासाठी भरपूर वेळ लागतो आणि आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या समस्यांमध्ये वाढ झालेली दिसते. अर्थातच आत्महत्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नाही तर त्यातून आणखी समस्या वाढतांना दिसतात.

तालिका क्र. ६ : कुटुंबात आत्महत्येची पुनर्रावृत्ती होण्यासंदर्भात मत दर्शक तालिका

अ. क्र.	विवरण	वारंवारिता	शेकडा प्रमाण
१	होय	१९७	६५.६७ टक्के
२	नाही	१०३	३४.३३ टक्के
एकूण		**३००**	**१०० टक्के**

प्रस्तुत तालिका क्र. ६ नुसार, आत्महत्याग्रस्त कुटुंबात पुनश्च आत्महत्येची पुनरावृत्ती होण्यासंदर्भात मनोवृत्ती दर्शविण्यात आलेली आहे. आत्महत्यागस्त कुटुंबापैकी ६५.६७ टक्के उत्तरदारते मान्य करतात की, आमच्या घरात अशा प्रकारच्या आत्महत्या पुन्हा होवू शकतात. तर आत्महत्यांची पुनर्रावृत्ती होणार नाही असे केवळ ३४.३३ टक्के उत्तरदात्यांचे मत आहे. शेतकरी कुटुंबात ज्याही कारणांनी यापूर्वी आत्महत्या करण्यात आली आहे, त्याचे निराकरण होणे गरजेचे आहे. परंतु अकोला जिल्ह्यातील शेतकरी वर्गातील आर्थिक संकट, सावकारी दबाव व प्रभाव असाच राहिला तर पुन्हा आत्महत्या होण्याची शक्यता वाढत असतांना दिसते.

तालिका क्र. ७ : आत्महत्याग्रस्त कुटुंबाबरोबर गावकऱ्यांनी केलेल्या भेदभावाचे विश्लेषण

अ. क्र.	विवरण	वारंवारिता	शेकडा प्रमाण
१	होय	६७	२२.३३ टक्के
२	नाही	२३३	७७.६७ टक्के
एकूण		**३००**	**१०० टक्के**

तालिका क्र. ७ वरुन लक्षात येते की, आत्महत्या या दुदैवी घटनेनंतर आत्महत्याग्रस्त कुटुंबाबरोबर गावातील अन्य व्यक्ती भेदभाव करीत असल्याचे २२.३३ टक्के उत्तरदाते सांगतात, तर ७७.६७ टक्के उत्तरदात्यांच्या मते अशा प्रकारचा भेदभाव होत नाही. आत्महत्या ही घटना जरी निंदनीय असली तरी त्यामुळे आत्महत्या करणाऱ्या कुटुंबाला दोष देणे किंवा भेदभाव करणे योग्य नाही. परंतु तरीही अकोला जिल्ह्यात आत्महत्याग्रस्त कुटुंबाला अनेकदा गावकरी दुय्यम प्रकारची वागणूक, सामाजिक भेदभाव, सामाजिक बहिष्कार, वैवाहिक संबंध प्रस्थापित न करणे इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागतांना दिसते. अर्थात आत्महत्या झाल्यामुळे संबंधित कुटुंबाचा तिरस्कार करणे, भेदभाव करणे चुकीचे असले तरी अशाप्रकारचे कृत्य सर्रास होतांना दिसतात.

तालिका क्र. ८ : आत्महत्येमुळे कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा कमी झाल्याबाबत मत दर्शक तालिका

अ. क्र.	विवरण	वारंवारिता	शेकडा प्रमाण
१	होय	२२२	७४ टक्के
२	नाही	७८	२६ टक्के
एकूण		**३००**	**१०० टक्के**

वरील तालिका क्र. ८ नुसार शेतकरी आत्महत्यानंतर संबंधित कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा किंवा सामाजिक दर्जा कमी झाला का? याचे विश्लेषण करण्यात आले आहे. आत्महत्येच्या घटनेनंतर समाजातील प्रतिष्ठा कमी झाल्याचे ७४ टक्के आत्महत्याग्रस्त कुटुंब मान्य करतात तर २६ टक्के उत्तरदात्यांच्या मते सामाजिक प्रतिष्ठेत कोणताही फरक पडलेला नाही.

ना. धो. महानोर लिहितात की, "गेल्या वर्ष–दोन वर्षात महाराष्ट्रात सगळ्यात वाईट गोष्ट म्हणजे आत्महत्या करणारे शेतकरी आणि अगदी काळोखात जाणारं त्यांचच कुटुंब ही होय."[७] अर्थात शेतकरी आत्महत्यांचा परिणाम त्यांच्या कुटुंबियांना जास्त भोगावा लागतो.

पी. साईनाथ म्हणतात, "आपल्या समाजात आत्महत्या झालेल्या कुटुंबाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा अप्रतिष्ठेचा आहे. ज्या घरातील एखाद्याने जर आत्महत्या केली असेल तर ती सर्व कुटुंबालाच कलंक असल्यासारखी गोष्ट समजली जाते. अशा कुटुंबाशी कोणी नातेसंबंध लवकर जोडत नाही. अशा घरांमध्ये मुली देत नाहीत. समाजाची अशी धारणा असल्याने अनेक कुटुंबात आत्महत्येला अपघातचं स्वरुप दिले जाते. आत्महत्या ही अपघात आहे, असे दाखविण्यात येते."[८] अर्थात आत्महत्याग्रस्त कुटुंबाबरोबर समाजात भेदभाव होतांना दिसतात. शेतकरी आत्महत्या घडल्यानंतर समाजातील अन्य व्यक्तिंचा संबंधित कुटुंबाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत असल्याचे स्पष्ट होते.

उपाययोजना –

१. ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणाची समस्या दूर करण्याकरिता डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मांडलेली 'कर्ज–लवाद' संकल्पना उपयोगात आणने आवश्यक आहे.

२. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील पाल्यांना शिक्षणासाठी सरकारने विशेष आर्थिक तरतुदी व सुविधा तसेच सरकारी स्वस्त धान्य दुकानाव्दारे अन्नधान्याचा नियमित पूरवठा करणे गरजेचे आहे.

३. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना कर्जमाफी देत असतांना संपूर्ण कर्जमाफी देऊन तात्काळ नवीन दीर्घअवधीचे ऋण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

४. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सरकारी अनुदान, पॅकेजचा लाभ देतांना पात्र – अपात्र असा भेद न करता सर्वांना समान लाभ देण्यात यावा जेणेकरून आणखीन शेतकरी आत्महत्या होणार नाही.

५. शेतकऱ्यांसाठी कर्ज अग्रक्रमाने बॅकांनी उपलब्ध करून द्यावे. कर्जाचा व्याजदर अन्य देशांप्रमाणे ३ टक्के पेक्षा जास्त नसावा. जेणेकरून आवश्यक शेतकऱ्यांना कर्ज लवकर उपलब्ध होऊन ते सावकारी जाळ्यात अडकणार नाहीत.

६. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील व्यक्तिंनी एकत्रित येऊन स्वत:चा दबाव गट तयार करून आपल्या ऱ्हास्त मागण्या पूर्ण करण्याकरिता आपल्या क्षेत्रातील लोकप्रतिनिधींवर दबाव आणणे आवश्यक आहे.

७. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील एका सदस्याचा तसेच त्यांच्या पिकांचा विमा सरकारनेच काढणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्याची चिंता आत्महत्याग्रस्त कुटुंबाला राहणार नाही.

८. सावकारी प्रथेवर कडक प्रतिबंध लाऊन सावकारांच्या जाळ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या गहान ठेवलेल्या जमिनींना ताबडतोब मुक्त करणे आवश्यक आहे.

९. शेतकरी आत्महत्यांची समस्या निवारण्याकरिता तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबाना मानसिक स्थिरता आणि ध्येर्य प्रदान करण्याकरिता पथनाट्य, मार्गदर्शन कार्यशाळा, गटचर्चा, चर्चासत्र यांचा देखील उपयोग सरकार, प्रशासन व सामाजिक संस्थांनी प्रामुख्याने करणे आवश्यक आहे.

१०. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील एक तरी सदस्याला शासनाने पात्रतेनुसार नोकरीत समाविष्ट करून घ्यावे, जेणेकरून या कुटुंबाला निश्चित उत्पन्नाचा स्त्रोत प्राप्त होईल.

११. शेतकरी आत्महत्येची समस्या दूर करण्याकरिता इमाईल दुर्खीम यांच्या 'आत्महत्या' या सिध्दांताचा आधार घेऊन या समस्येची उत्पत्ती, कारणे आणि त्या अनुषंगाने उपाय करणे आवश्यक आहे. शेतकरी आत्महत्या ही एक मानसिक नव्हे तर सामाजिक समस्या होय त्यामुळे त्याचे उत्तर समाजातच, समाजाने शोधणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची –

१. शिंदे अरुण (२०१२). सत्यशोधकांचे शेतकरीविषयक विचार, पुणे: दर्या प्रकाशन. पृ. क्र. २२

२. बोरसे शिवनाथ (२००५). शेतकऱ्यांच्या समस्या : शोध आणि बोध, नाशिक : वसुधा प्रकाशन. पृ. क्र. २७

३. खांदेवाले डॉ. श्रीनिवास व पाटील डॉ. जे. एफ. (२०१०). महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती, कोल्हापूर : कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सवी समिती. पृ. क्र. ४१

४. लांजेवार नरेंद्र (२००७). शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, डोंबिवली : सुमेरु प्रकाशन. पृ. क्र. १९

५. एव्हरी थर्टी मिनिट्स फारमर सुसाईड्स, ह्युमन राईट्स, ॲन्ड द ॲग्रीयन क्रायसेस इन इंडिया (२०११).सेन्टर फॉर ह्युमन राईट्स ॲन्ड ग्लोबल जस्टीस, न्युयार्क : युनिर्व्हसिटी स्कुल ऑफ लॉ. पृ. क्र. १

६. खुपसे डॉ. मार्तंड (२००६). शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंता आणि चिंतन, कळंब : समीर प्रकाशन. पृ. क्र. ९

७. महानोर ना. धो. (२००७). शेती, आत्मनाश आणि नवसंजीवन, औरंगाबाद : साकेत प्रकाशन. पृ. क्र. १३

८. लांजेवार नरेंद्र (२००७). शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, डोंबिवली : सुमेरु प्रकाशन. पृ. क्र. ३६–३७

*सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग,
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

***

शेतात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन

*डॉ. सुनिता एस. धोपटे (पाडर)

प्रस्तावना :

आजच्या एकविसाव्या शतकात प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचा सक्रिय सहभाग आहे. शेतीमध्ये कामकरणाऱ्या घटकामध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. मानव आणि निसर्गातील अनेक जीव शेतीक्षेत्रातील उत्पादनांवर जिवंत आहेत. त्या क्षेत्राचे कार्य कसे होते त्यावरच जगातील शांतता व सौख्य अवलंबून राहणार आहे. औद्योगिक उत्पादन भलेही देशाचे आर्थिक स्थान निश्चित करो. शेतीक्षेत्राने चांगले कार्य केले तरच राष्ट्र स्वावलंबी राहू शकते. शेतीक्षेत्र हे ग्रामीण भागाच्या आणि देशाच्या आर्थिक विकासाचे मुख्य सूत्रधार आहे. ती किल्ली महिलांच्या हाती आहे. जागतिक पातळीवर ४३% टक्के महिला या कृषिक्षेत्रात कष्ट करताना दिसतात. त्यांचे जगणे त्या कामावर अवलंबून असते. काही देशांत ते प्रमाण 83% टक्क्यांपेक्षा जास्त आहे. आफ्रिका, भारत या देशांमध्ये सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त शेतीउत्पादन हे छोट्या शेतकऱ्यांकडून होते. त्यामध्ये महिलांचा वाटा हा मोठा आहे. भारतात ग्रामीण भागातील 84% टक्के महिलांचे जगणे शेतीवर अवलंबून आहे. त्यातील साधारण 47% टक्के महिला या कामगार म्हणून शेतात काम करतात, तर 33% टक्के महिला या स्वत:च्या निर्णयानुसार शेती करतात. उरलेल्या तीन-चार टक्के महिला या अन्य प्रकारे त्या क्षेत्राशी संबधित काम करतात जसे की कुटिरोद्योग किंवा पूरक उद्योग यांमध्ये कार्य करत असतात. मात्र इतक्या प्रमाणात महिला शेतीमध्ये काम करून पैसा कमवत असून सुद्धा त्यांना तो पैसा आपल्या इच्छेनुसार वापरता येत नाही. इतकी मेहनत करूनही त्यांना कुटुंबात अपमानास्पद वागणूक दिली जाते. त्याच बरोबर अपार कष्ट केल्यामुळे त्याचा त्यांच्या स्वास्थ्यावर विपरीत परिणाम झालेला आढळतो. या शोध निबंधामध्ये शेतात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या आर्थिक, कौटुंबिक तसेच स्वास्थविषयक समस्यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. या उद्देशाने या शीर्षकाची निवड करण्यात आली आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी :

भारतातील शेतीचा इतिहास हा अति प्राचीन आहे. शेतीचा उगम कसा व केव्हा झाला असेल या संदर्भात विचार करता असे लक्षात येते कि शेतीची सुरुवात ही नवाश्मयुगात झाली असे मानतात. त्याआधी मानव रानटी अवस्थेत होता. तेव्हाचे लोक गायी, बैल, घोडे वगैरे जनावरे पाळीत असे म्हणजेच पशुपालन करीत होते मात्र त्या नंतर मानव हळू हळू स्थायिक होऊन शेती करू लागला. मोहें-जो-दडो आणि हडप्पा येथील उत्खननांवरून सिंधू संस्कृती (इ.स.पू. ३२००–२७००) ही नागरी संस्कृती होती, हे स्पष्ट दिसते. त्या संस्कृतीतील लोकांचा व्यवसाय मुख्यतः शेती असून कापूस, जव, टरबुजे, खजूर, भाजीपाला, आणि फळे यांची ते लागवड करीत असावेत, असा निष्कर्ष काढण्यात येतो. गहू, जव, विविध शेंगा, तीळ यांचीही पिके त्याकाळी काढली जात असावीत. पशुपालन आणि शिकारी अवस्थेत पुरुष शिकारीसाठी बाहेर जात, त्या वेळी महिलांनी स्थानिक पर्यावरणातून बिया गोळा केल्या. त्या लावल्या आणि त्यांची वाढ करण्यास सुरुवात केली. त्यांनीच त्यामधून शेतीविज्ञान विकसित केले. म्हणून 'शेतीची सुरुवात मानवी संस्कृतीत महिलांनी केली असे स्पष्ट होते. सार्वजनिक चर्चा विश्वात शेती, शेतकरी, शेतीधोरण इ. बाबत जी काही थोडीठीडकी चर्चा होताना दिसते त्यातही चर्चा करताना मात्र स्त्रियांना सोयीस्कररित्या वगळण्यात येताना दिसते. वास्तविक शेती आणि स्त्रिया यांचा घनिष्ठ असा संबंध आहे. त्या शेतीच्या जननी आहेत. सिंधू नदीच्या खोऱ्यात राहणाऱ्या स्त्रियांना अपत्यनिर्मितीच्या काळात एके ठिकाणी वास्तव्य करताना नदी काठच्या गाळ जमिनीत धान्य उगवते हे लक्षात आले. टोळी करून भटकंती करणाऱ्या मानवी समुदायाला ' पेरल तर उगवत ' हे जगभर स्त्रियांनीच शिकवलं आहे. म्हणूनच त्या हुकमी धान्य देणाऱ्या शेतीच्या शोधकर्त्या ठरल्या असे इतिहास सांगतो. शेतीच्या शोधापासून स्त्रियांचा असा शेतीशी अतूट संबंध आहे.शेतीची सुरुवात महिलांनी केली असे जगभरही मानले जाते. कारण जगभर शेतात काम करणाऱ्यांमध्ये महिलांचा प्रामुख्याने समावेश आहे'... प्रसिद्ध शेतीतज्ज्ञ स्वामिनाथन यांनी ही मते ठामपणे व वेळोवेळी मांडली आहेत. चीनमध्ये त्यांच्या एका सणाला मुलीच्या डोक्यावर धान्य उगवलेली टोपली देऊन

तिची पूजा केली जाते. त्या विधीचे कारण हेच, की शेती महिलांनी सुरू केली. पुरुष घराबाहेर पडले, की. महिलांकडून घरातील कामे उरकून फावल्या वेळेचा सदुपयोग म्हणून शेती सुरू झाली. शेतीचा इतिहास हा बारा हजार वर्षांचा आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या अन्नधान्यांची भर पडत गेली. त्यामध्ये वेगवेगळ्या पिकांचा इतिहास हा वेगवेगळा आहे जसे कॉफीचा इतिहास दीड सहस्रकाचा आहे आणि सोयाबीन वनस्पतीचे महत्त्व तर दीडशे वर्षांपूर्वी कळून आले. शेतीसाठी शेतकरी हा पुरुषवाचक शब्द रूढ आहे, जणू शेती पुरुष करतात! वस्तुस्थिती मात्र उलट आहे. शेती महिला करतात आणि प्रत्येक गावात हनुमानाचे मंदिर गावाच्या बाहेर, वेशीजवळ आढळते. मंदिरात शेतात काम करणाऱ्या अनेक महिलांचे पतिराज असतात आणि त्यांच्या हातात पत्ते असतात! ही महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील स्थिती आहे. घरातील लक्ष्मी मात्र शेतात राबत लक्ष्मी घरात कशी येईल यासाठी प्रयत्नशील असते. अशी परिस्थिती केवळ महाराष्ट्रात नव्हे तर जगभर आहे.

प्रस्तुत लघु शोधनिबंधात शेतात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत शोध निबंधकानी **"शेतात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन" या शीर्षकाची निवड केली आहे.**

बीजसंज्ञा :- शेती, शेतीचे प्रकार, कष्टकरी महिला, आर्थिक समस्या, कौटुंबिक, स्वास्थ्यविषयक समस्या.

शेतीचा अर्थ:-

विकसित कृषिक्षेत्रामध्ये केवळ जमिनीवरील शेती समाविष्ट होत नाही. अन्न आणि कृषी संस्था या जागतिक संघटनेने त्या क्षेत्रात प्रत्यक्ष जमिनीवर केली जाणारी शेती, मत्स्यशेती, मधुमक्षिकापालन, रेशीमशेती, कुक्कुटपालन, पशुपालन अशा शेती आणि शेतीपूरक सर्व व्यवसायांचा त्या क्षेत्रात समावेश केला आहे. मात्र या ठिकाणी जमिनीवरील शेतीक्षेत्रात कामकरणाऱ्या महिलांचे प्रश्न या संदर्भात विश्लेषण करण्यात येणार आहे त्यामुळे त्या अनुषंगाने शेतीचा अर्थ खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आला आहे.

शेती या शब्दाचा अर्थ 'कृषी' हा शब्द संस्कृत मधील मूळ 'कृष' पासून आला आहे, ज्याचा अर्थ 'नांगरणे' किंवा 'खेचणे' असा होतो. त्याचा इंग्रजी प्रतिशब्द 'Agriculture' हा दोन लॅटिन शब्द 'Agree' म्हणजे जमीन किंवा फील्ड आणि 'Culture' म्हणजे काळजी किंवा Cultivation ज्याचा अर्थ 'जमीन शुद्ध करून पिके तयार करणे' या दोन लॅटिन शब्दांनी बनलेला आहे. 'कृषी' हा लॅटिन भाषेतील शब्द आहे, म्हणजेच ज्या शब्दांमध्ये 'संस्कृती' वापरली जाते त्या सर्व शब्दांना लॅटिन शब्द म्हणतात.

प्रो.चेंबरच्या ज्ञानकोशात, एस.जे. वॉटसन यांनी शेतीचा अर्थ "माती संस्कृती" शी जोडला आहे. तर Pro. E. W. Zimmermann (EW Zimmermann) म्हणजे जमिनीशी संबंधित सर्व मानवी क्रिया, जसे की – शेताचे बांधकाम, नांगरणी, पेरणी, पिके वाढवणे, सिंचन, पशुसंवर्धन, मत्स्यपालन, वृक्षारोपण आणि त्यांचा प्रचार इ. अन्न आणि कृषी संघटनेच्या (F.A.O.) अहवालानुसार, शेतीमध्ये पिकांचे क्षेत्र, झाडे, कायम गवताळ प्रदेश आणि इतर कुरणांचा समावेश होतो.

अग्रगण्य अभ्यासकांनी शेतीची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे–

१) प्रो. डी. व्हिटलसी यांच्या विधानानुसार –"वनस्पती आणि प्राणी उत्पत्तीची उत्पादने मिळविण्याच्या उद्देशाने केलेल्या मानवी प्रयत्नांना शेती म्हणतात."

२) हॅरोल्ड एच. मॅककार्टीच्या मते–"पिकांची आणि प्राण्यांची हेतुपूर्ण काळजी घेण्यास शेतीचे नाव दिले जाते."शेतकऱ्याने उदरनिर्वाहासाठी किंवा धंदा म्हणून स्वतःच्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी ढोबळमानाने **शेतीची** व्याख्या करता येईल.

शेतीचे प्रकार:- शेतामधून काढावयाच्या उत्पादनावरून **शेतीचे** ऊसमळा, भात **शेती**, पशुधनप्रधान **शेती**, मत्स्य **शेती** इ. निरनिराळे प्रकार अस्तित्वात आलेले आहेत. तसेच सिंचनाच्या उपलब्धतेनुसार बागायती शेती, जिराईत शेती असेही प्रकार पडतात. खतांच्या वापरानुसार सेंद्रिय शेती, रासायनिक शेती असे प्रकारसुद्धा अस्तित्वात आले आहेत. स्थूलमानाने नैसर्गिक आणि आर्थिक घटकांमुळे शेतीच्या प्रकारात बदल होतात.

शोध निबंधाची गरज:- शेतीत काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या सामाजिक, आर्थिक तसेच स्वास्थ्य विषयक समस्या जाणून घेणे त्याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. कारण स्त्रियांच्या या समस्या विकासात बाधा ठरत आहेत त्यामुळे अश्या समस्यांचे निराकरण करून त्यांची व पर्यायाने देशाची प्रगती साधने गरजेचे आहे.

प्रस्तुत शोध निबंधाचे महत्व :- शेती हा मुख्य व्यवसाय असून देशाची अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून त्यामध्ये प्रामुख्याने काम करणारी ही स्त्री आहे. तिच्या श्रमाच्या वाटा जास्त आहे. नव्हे तर ती शेतीची जननी आहे. म्हणून तिच्या समस्यांचा अभ्यास करून शेती व्यवसायाच्या प्रगतीच्या व विकासाच्या दृष्टीने अनेक योजना आखण्यास व धोरणे निश्चित करण्यास व त्यातील तृटी दुरकरण्यास मदत होईल.

उद्देश objectives :

१) संबंधित लघु शोध निबंधामुळे शेतीचा अर्थ स्पष्ट करता येईल.
२) शेतीच्या प्रकाराचे स्पष्टीकरण करणे.
३) शेतातील कष्टकरी महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा लक्षात घेणे.
४) एकूण शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांचे प्रमाण (सहभाग) स्पष्ट करणे.
५) शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या समस्या जाणून घेणे.
६) शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या समस्या निराकारणाचे उपाय सुचवता येईल.

कष्टकरी महिलांचा सामाजिक व आर्थिक दर्जा:मानव आणि निसर्गातील अनेक जीव शेतीक्षेत्रातील उत्पादनांवर जिवंत आहेत. त्या क्षेत्राचे कार्य कसे होते त्यावरच जगातील शांतता व सौख्य अवलंबून राहणार आहे. औद्योगिक उत्पादन भलेही देशाचे आर्थिक स्थान निश्चित करो. शेतीक्षेत्राने चांगले कार्य केले तरच राष्ट्र स्वावलंबी राहू शकते. शेतीक्षेत्र हे ग्रामीण भागाच्या आणि देशाच्या आर्थिक विकासाचे मुख्य सूत्रधार आहे. ती किल्ली महिलांच्या हाती आहे. जागतिक पातळीवर त्रेचाळीस टक्के महिला या कृषिक्षेत्रात कष्ट करताना दिसतात. त्यांचे जगणे त्या कामावर अवलंबून असते. काही देशांत ते प्रमाण 83% टक्क्यांपेक्षा जास्त आहे. आफ्रिका, भारत या प्रदेशांमध्ये सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त शेतीउत्पादन हे छोट्या शेतकऱ्यांकडून होते. त्यामध्ये महिलांचा वाटा हा मोठा आहे. भारतात ग्रामीण भागातील 84% टक्के महिलांचे जगणे शेतीवर अवलंबून आहे. त्यातील साधारण 47% टक्के महिला या कामगार म्हणून शेतात काम करतात, तर 33% टक्के महिला या स्वत:च्या निर्णयानुसार शेती करतात. उरलेल्या तीन-चार टक्के महिला या अन्य प्रकारे त्या क्षेत्राशी संबधित काम करतात जसे की कुटिरोद्योग किंवा पूरक उद्योग यांमध्ये कार्य करत असतात.

भारतात 2009 च्या पाहणीनुसार एकूण महिलांचा सहभाग अन्नधान्य उत्पादन क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये 94% टक्के इतका होता, तर 1.4 टक्के महिला भाजीपाला उत्पादनासाठी कष्ट घेत होत्या. एकूण महिलांपैकी 3.4 टक्के महिला फळे आणि कडधान्य शेतीत कार्यरत होत्या. चहा, कापूस, तेलबिया इत्यादींच्या शेतांमध्ये जागतिक पातळीवर काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण हे 45% टक्क्यांपेक्षा जास्त आहे. विकसनशील देशांमध्ये शेतकी रोजगारात महिलांचा तब्बल 43 टक्क्यांचा वाटा आहे. आणि तज्ज्ञांच्या मते मागच्या वीस वर्षांत शेती हा प्रांत महिलांनी पादाक्रांत केला आहे. 2016 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या शेती आणि अन्नविषयक संस्थेनं प्रसिद्ध केलेल्या अहवालातही हे निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. "शेतीत महिला मोठी भूमिका बजावताना दिसत आहेत. आणि शेतीतल्या रोजगारातही त्यांचा वाटा वाढत आहे," असं लिबर स्लोकाल यांनी म्हटलं आहे. ते अन्न व शेतीविषयक संस्थेच्या आर्थिक, सामाजिक विकास विभागाचे धोरण अधिकारी आहेत. साधारणत:, महिलांना शेतांमध्ये अकुशल कामगाराचे काम देण्यात येते. उदाहरणार्थ गवार, भेंडी, वांगी अशा भाज्यांची तोडणी ही पूर्णपणे महिलांकडून होते. तेथे पुरूषांचा हात कोठेही दिसत नाही. चहाची पाने

तोडणे, कॉफीच्या बिया गोळा करणे अशी कष्टाची कामे महिलाच करत असतात.ते काम मोठ्या कष्टाचे असते. शेती जरी पुरुषांकडे गेली तरी स्त्रियांनी शेतीशी नाते तोडले नाही. शेती त्या इमानेइतबारे कसत आल्या. घर काम आणि शेती कामात घरच्यांबरोबरच त्या राबत आल्या आहेत. महिला आणि पुरुषांच्या मोबदल्यामधली ही असमानता ठिकठिकाणी असमान आहे. ग्रामीण भागात हे प्रमाण कमी आहे, असं म्हटलं तरी 14 देशांची आकडेवारी गोळा केल्यावर महिलांना पुरुषांपेक्षा 28 टक्के कमी मोबदला मिळत असल्याचं स्पष्ट झालं. यातला आणखी एक मुद्दा आहे उत्पादनातील असमानतेचा. कारण विकसनशील देशात महिला शेतकरी पुरुषांपेक्षा कार्यक्षमतेत-उत्पादन क्षमतेत 20 ते 30 टक्क्यांनी मागे आहेत. याचं एक कारण कदाचित हे असावं की घरची सर्व कामं महिलांनाच करावी लागतात. बहुतांश देशात आणि समाजात घरातील सर्व कामं, मुलांचा सांभाळ ही महिलांचीच जबाबदारी आहे. अन्न आणि शेती संघटनेनं हे निरीक्षण नोंदवलेलं आहे. ग्रामीण भागात तर घरातील कामं म्हणजे लांबवर जाऊन पाणी भरणं आणि हलकी सलकी कामं करून आर्थिक भारही उचलणं याचाही समावेश होतो.

कष्टकरी महिलांच्या समस्या :

महिलांची शेतीक्षेत्रातील भूमिका ही कष्टकऱ्यांची आहे, कामगारांची आहे. महिलांना निर्णयप्रक्रियेत अपवादानेच स्थान मिळते. त्यांच्या विचारांची दखल घेतली जात नाही. त्यांची भूमिका ही घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापुरती मर्यादित असते. शेती व्यवसायात असणाऱ्या महिलांमधील सत्तर टक्के महिला अल्पशिक्षित किंवा अशिक्षित आहेत. त्यांना कमी शिक्षणामुळे कौशल्याधारित कामाच्या प्रांतात प्रवेश नाकारला जातो. त्याचा परिणाम महिला आणि पुरुष यांच्या वेतनदरावर पडतो. शासनाचे नियम महिला आणि पुरुष यांना समान वेतन द्यावे असे असले तरी ग्रामीण भागात महिला आणि पुरुष यांच्या दरांमध्ये तफावत आढळून येते. काही ठिकाणी, ते दर दुप्पट असतात. कामाच्या तासांत मात्र समानता असते किंवा अनेकदा महिलांचे कामाचे तास जास्त असतात. पुरुषांच्या तुलनेत महिलांना दिली जाणारी मजुरी सत्तर टक्के आहे. ते क्षेत्र असंघटित असल्याने महिलांच्या मजुरीच्या दराबाबत ग्रामीण भागात फरक पडलेला दिसून येत नाही. अकुशल कामे महिला करत असल्याने त्यांच्या वाट्याला शेती उत्पादन येते. पशुपालन व्यवसायात जनावरांना खुराक देणे, त्यांना पाणी पाजणे, त्यांची स्वच्छता करणे, दूध काढणे ही कामे महिलांकडून केली जातात. दूध संकलन केंद्रावर पोचवण्यात मात्र पुरुष पुढे असतात. त्यामुळे त्यापासून मिळणारे उत्पन्न पुरुषांच्या खिशात जाते! कष्ट करणाऱ्या महिलांकडे उत्पन्न अपवादानेच जाते. शेती क्षेत्र महिलांचे आहे, मात्र तेथे महिला उपेक्षित आहेत!

जगभरात, सर्वसाधारणपणे, लग्नानंतर महिला या घरी राहण्यास येतात. काही देशांमध्ये, त्यांना लग्नानंतर स्वतंत्र घरे करावी लागतात. पुरुषांची जी आर्थिक परिस्थिती आहे तिच्याशी महिलांना जुळवून घ्यावे लागते. शेती आणि घरे हे पुरुषांच्या नावावर असतात. त्यामुळे पुरुषी अहंकारातून त्यांना कौटुंबिक हिंसाचाराचाही सामना करावा लागतो. अशी, कोणतीही संपत्ती नावावर नसलेल्या महिलांपैकी चौऱ्याऐंशी टक्के महिलांना अपमानास्पद वागणूक मिळते, तर एकोणपन्नास टक्के महिलांच्याबाबत मारहाणीच्या घटना घडतात. तेच, ज्या महिलांच्या नावावर संपत्ती आहे त्यांतील चौदा टक्के महिलांना अपमानास्पद वागणूक मिळते आणि सात टक्के महिलांना घरगुती मारहाणीस सामोरे जावे लागते. एकंदरच शेतीमध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढत असले तरी जिथे सिंचित/ बागायती शेती आहे तिथे पुरुषांचे वर्चस्व आहे आणि कोरडवाहू शेती मात्र स्त्रियांची असेच चित्र दिसून येते. कोरडवाहू भागांमध्ये पुरुषांनी कामासाठी स्थलांतर केल्याने अनेकदा महिलांवर शेतीची जबाबदारी येते. सिंचनाची सोय उपलब्ध नसल्याने या भागात मजुरीदेखील पुरेशी मिळत नाही. पूर्वी वर्षातून दहा महिने काम मिळायचे. ते आता सहा महिन्यांवर आले आहे असा अनुभव शेतमजुरी करणाऱ्या महिला सांगतात. त्यामुळे अनेकदा महिलांनादेखील उपजीविकेच्या शोधात स्थलांतर करावे लागते.

निष्कर्ष:-

१) विकसनशील देशात महिला शेतकरी पुरुषांपेक्षा कार्यक्षमतेत-उत्पादन क्षमतेत 20 ते 30 टक्क्यांनी मागे आहेत.

२) भारतात ग्रामीण भागातील 84% टक्के महिलांचे जगणे शेतीवर अवलंबून आहे.

३) मिळणारे उत्पन्न पुरुषांच्या खिशात जाते! कष्ट करणाऱ्या महिलांकडे उत्पन्न अपवादानेच जाते.

४) शेती आणि घरे हे पुरुषांच्या नावावर असतात. त्यामुळे पुरुषी अहंकारातून त्यांना कौटुंबिक हिंसाचाराचाही सामना करावा लागतो.

५) कोणतीही संपत्ती नावावर नसल्यामुळे कष्टकरी महिलांना अपमानास्पद वागणूक दिली जाते.

६) ग्रामीण भागात महिला आणि पुरुष यांच्या मजुरीच्या दरांमध्ये तफावत आढळून येते.

७) शेतीच्या कामांमध्ये महिलांचं प्रमाण वाढलेलं स्पष्ट दिसत आहे. पण त्याचवेळी ग्रामीण भागात त्यांना मिळणारे इतर रोजगार कमी झाले आहेत.

८) अनेकदा महिलांनादेखील उपजीविकेच्या शोधात स्थलांतर करावे लागते.

उपाय : आंतरराष्ट्रीय संस्था, सेवाभावी संस्था आणि केंद्र सरकार, असे सगळेच स्त्री-पुरुष विषमता कमी करण्यासाठी आणि कष्टकरी महिलांच्या समस्या दूर करण्यासाठी काम करत आहेत. शेतीत तंत्रज्ञानाचा वापर तसंच महिलांसाठी कर्जाची सोय अशा काही योजनांमुळे ह्या समस्या कमी होऊ शकेल. सामाजिक सक्षमीकरणासाठी आवश्यक आहे जमिनीचे मालकी हक्क. बऱ्याचशा विकसनशील देशात महिलांना मालमत्ता हक्क पुरुषांच्या बरोबरीने मिळत नाहीत.आंतरराष्ट्रीय शेतकी संशोधन केंद्राच्या दिना नज्जर यांनी स्पष्ट करतात की मुळातच साधनांची असलेली कमतरता याला कारणीभूत आहे. जमीनच कमी असल्यामुळे तिच्या मालकीसाठी पुरुषांमध्येच वाद असतील तर महिलांना त्यांचा हक्क कसा आणि कधी मिळावा? शेतीची आणि शेतीपूरक व्यवसायाची मालकी सुद्धा महिलांकडे नाही. ती मालकी महिलांकडे राहवी यासाठी काही देशांनी त्यांच्या कायद्यात बदल केले आहेत. विशेषत: दक्षिण आफ्रिकी देशांनी तसे कायदे करून महिलांना शेती आणि व्यवसाय यांची मालकी देण्यासाठी सकारात्मक पावले उचलली आहेत. महिलांची शेतीक्षेत्रातील भूमिका ही कष्टकऱ्यांची आहे, कामगारांची आहे. महिलांना निर्णयप्रक्रियेत अपवादानेच स्थान मिळते. त्यांच्या विचारांची दखल घेतली जात नाही. त्यांची भूमिका ही घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापुरती मर्यादित असते. "जमिनीची मालकी आणि व्यवस्थापनाचा अधिकार यातूनच सक्षमीकरण साध्य होतं. त्यामुळे धोरणात्मक बदल ही सुरुवात असली तरी सामाजिक व्यवस्था बदलून महिलांच्या हाती जमिनीची मालकी, वारसा हक्क देण्याच्या दृष्टीने काम करणं गरजेचं आहे, मेहनतीच्या कामांबरोबरीने महिलांना विपणनाची कामे मिळाल्यास महिला व पुरुष यांच्यातील विषमता कमी होऊन या महिलांच्या समस्यांचे निराकरण होऊ शकते.

संदर्भ

१) https://www.agrowon.com

२) https://www.shaalaa.com

३) https://brainly.in

४) https://www.loksatta.com

५) https://rightangles.in

६) https://www.marathigyaan.com

७) https://mr.wikipedia.org

८) मैत्रीयी कृष्णराज, अरुणा कंची. "भारताच्या महिला शेतकरी" अनुवाद विजया सोळंके. bookwishwa.com

९) शरद जोशी 'चांदवडची शिदोरी' आक्टोबर २०१०

१०) डॉ. आर. एस. शर्मा "प्रारंभिक भारत का परिचय" पब्लीशर, ओरिएन्टल ब्लॉक सॉन २००२

११) डॉ. ए. एल. श्रीवास्तव "प्राचीन भारत कि सभ्यता और संस्कृती" २००५

१२) डॉ. नीता आनंद, वर्किंग वुमेन : इस्यू अँड प्रॉब्लेम २०२३

१३) डॉ. अशोक चौसाळकर "महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ" प्रकाशक लोकवाङ्मय, bookganga.com

१४) डॉ. एम. जे. गायकवाड "रोजगार हमी योजना आणि शेतमजूर स्त्रियांचे आर्थिक सबलीकरण" प्रशांत पब्लिकेशन, २०१४

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती.

***

भारतातील शेतकऱ्यांच्या समस्याचा अभ्यास

*प्रा.डॉ.श्रीराम खाडे

प्रस्तावना :—

भारत हा कृषिप्रधान देश असून येथील ७० टक्के लोकसंख्या शेतीमध्ये कार्यरत आहे. या देशाची जास्तीत जास्त लोकसंख्या शेतीमध्ये गुंतलेली असल्याने कृषी व्यवस्थेत शेतीचे महत्त्व सांगण्याची गरज नाही. भारतीय अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीप्रधान असल्याने, भारताच्या औद्योगिक आर्थिक विकासाचा मुख्य स्त्रोत कृषी आहे. औद्योगीकरण आणि आर्थिक विकासाच्या रथाची दोन्ही चाके शेतीच्या सहाय्याने रथाला जोडली गेली आहेत. हे कृषी जीवन आपल्या हातात धरणारे लोक ग्रामीण भागात आहेत. दुसऱ्या शब्दांत, भारत हा खेड्यांचा देश आहे. आणि शेती हा ग्रामीण व्यवसाय असल्याने भात प्रक्रिया उद्योग हा देखील ग्रामीण उद्योग आहे. शेतमजुरांची उपलब्धता, ग्रामीण वाहतूक सुविधा आणि अनुदानित पिकांची स्थानिक मागणी यामुळे ग्रामीण भागातील भात उत्पादनाला उद्योग म्हणून संबोधले जाते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. भारतीय शेतीचे अस्तित्व सिंधू संस्कृतीत सापडते. स्वातंत्र्योत्तर काळात व्यापार, रोजगार आणि उपजीविकेचे साधन म्हणून शेतीचे महत्त्व आजही कायम आहे. पूर्वी पारंपरिक पद्धतीने होणारी शेती आता आधुनिकतेकडे वळू लागली आहे. या आधुनिकीकरणाचा भारतीय दृष्टिकोनातून विचार केला तर १९६० नंतर देशात कृषी क्षेत्रात आलेली हरीतक्रांती हा मैलाचा दगड असल्याचे दिसून येते. यापुढे जाऊन असे दिसून येते की २००७ मध्ये देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात कृषी आणि संलग्न क्षेत्रांचा वाटा १६.६ टक्के होता. या काळात देशातील ५२ टक्के लोक पूर्णपणे शेतीत गुंतलेले होते. २०१८—१९ मध्ये देशाच्या २.७ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेच्या सुमारे १५.९ टक्के आणि देशाच्या रोजगाराच्या ४९ टक्के वाटा आहे. २०१८—१९ मध्ये देशाच्या $२.७ ट्रिलियन अर्थव्यवस्थेमध्ये हा वाटा सुमारे १५.९ टक्के आणि देशातील ४९ टक्के रोजगार आहे. देशाच्या सर्वांगीण विकासात कृषी क्षेत्राचे योगदान वर्षानुवर्षे कमी होत आहे. या शोधनिबंधाचा महत्त्वाचा उद्देश या देशातील कृषी धोरणांचा परिणाम आणि शेतकऱ्यांच्या दु:खाचा अभ्यास करणे हा आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट :—

१) भारतातील शेतकऱ्यांच्या समस्याचा अभ्यास करणे

२) भारतीय ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्यांचे अध्ययन करणे

संशोधन पध्दती (Research Methodology)

दुय्यम साधनांमध्ये संदर्भ पुस्तके, नियतकालिके, इंटरनेट, विषयाशी संबंधित पुस्तके इ. वापरले गेले आहे.

भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या:

१. **सातत्याने वाढणारी लोकसंख्या**: भारताची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. पूर्वीच्या तुलनेत आज लोकसंख्या वाढीचा दर कमी असला तरी लोकसंख्या वाढल्याने योग्य जमिनीचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना परंपरेने उपलब्ध असलेली जमीन त्यांच्या पुढच्या पिढीमध्ये विभागली गेली. शेतीचे अत्यंत तुकडे झाले. यामुळे लहान जमीनधारकांच्या संख्येत मोठी वाढ झाली आणि त्यांना वाटप करण्यात आलेल्या तुटपुंज्या शेतजमिनीतून कुटुंबाच्या गरजा भागवणे अशक्य झाले.

२. **नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा वाढलेला कल:** कमी श्रम आणि जास्त उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे शेतकऱ्यांनी अशी पिके घेण्यास अनुकूल परिस्थिती असलेल्या ठिकाणी सतत अशीच पिके घेण्यास सुरुवात केली. एकाच पिकाची सतत लागवड केल्यामुळे शेतीचे उत्पादन घटू लागले. ही घट काही प्रमाणात कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना दरवर्षी रासायनिक खते आणि तणनाशकांचा वापर वाढवावा लागेल. त्यामुळे शेतीची उत्पादकता घटत असून शेतजमिनीचा पोत बिघडत असून आरोग्य बिघडत आहे. शेतजमिनीचे वाळवंटीकरणाचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर येऊ लागला आहे.

३. **सिंचन सुविधांचा अभाव:** भारतीय शेतीमध्ये सिंचनाची सर्वात मोठी समस्या आहे आणि जलसंधारणासाठी योग्य शेतीसाठी योग्य शेतकरी, लहान धरणे आणि धरण बांधणी कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी गेल्या. त्यांना स्थलांतर करावे लागले पण असे छोटे—मोठे बंधारे, बंधारे बांधण्याचे काम नीट झाले नाही. त्यामुळे ज्यांनी सिंचन सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला, त्यांना योग्य प्रमाणात पाणी मिळू शकले नाही. दुसरीकडे अशी धरणे बांधण्यासाठी ज्यांना आपली जिरायती जमीन द्यावी लागली त्यांना विस्थापित व्हावे लागले. परिणामी, आजही अनेक शेतकरी पिके घेण्यासाठी आवश्यक सिंचन सुविधांपासून कोसो दूर आहेत.

४. **शेतीतून उत्पादित होणाऱ्या कृषी मालाच्या साठवणुकीतील अडथळे:** शेतीमध्ये वर्षभरात फार कमी प्रमाणात पडत असले, तरी जे प्राप्त होते, त्या शेतीमालाची साठवणूक किंवा त्यावर योग्य प्रक्रिया करण्याच्या सोयी सर्वांसाठी उपलब्ध नाहीत.

शेतकरी, म्हणून शेतकरी असा नाशवंत माल बाजारात पाठवतो. एकाचवेळी अतिरिक्त मालाची आवक होत असल्याने अशा सुविधा उपलब्ध असलेले व्यापारी व दलाल शेतकऱ्यांकडून अत्यंत कमी किमतीत माल खरेदी करतात व तोच माल योग्य वेळी बाजारात आणतात व जादा भाव नफा म्हणून घेतात. आपल्या मूलभूत गरजाही पूर्ण करू शकत नाही.

५. **शेतमालाच्या खरेदी–विक्रीतील गैरवर्तणूक आणि मध्यस्थांचा वर्ग:** शेतमालाची खरेदी–विक्री करताना तराजू आणि वजने पद्धतशीरपणे वापरली जात नाहीत. मालाची प्रतवारी करण्याचे काम व्यापारी स्वत: करतात आणि त्यांना योग्य वाटेल तशी किंमत आकारतात. आणि त्यांनी ठरवून दिलेल्या किमतीत शेतकऱ्यांकडून शेतीमाल खरेदी करतात. यासोबतच शासनाची बाजार समितीही शेतकऱ्यांकडून विविध कर वसूल करते. त्यांच्याकडून खरेदी केलेल्या शेतमालाची पावती दिली जात नाही. व्यापारीच शेतकऱ्याला बाजारपेठेतून विविध प्रकारे लुटतात.

६. **बाजारपेठेचे योग्य ज्ञान नसणे :** एखाद्या विशिष्ट वस्तूसाठी कोणती निश्चित बाजारपेठ उपलब्ध आहे. त्यांच्या अज्ञानामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव कुठे मिळेल हेच कळत नाही. विशिष्ट बाजारपेठा, सरकारी गोदामे, शेतमालाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किमतीबाबत शेतकरी अनभिज्ञ आहेत.

७. **शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून जीवनाच्या मूलभूत गरजाही पूर्ण करणे अशक्य**: पूर्वी शेतकऱ्यांच्या गरजा मर्यादित होत्या आणि त्या कशा पूर्ण करायच्या हे कळत नसल्याने शेतकरी आपले जीवन व्यतीत करत असे. आज शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता त्यांना शेतीतून जे मिळते ते पूर्ण करणे अशक्य झाले आहे. शेतीची अवजारे, उपकरणे, दळणवळणाच्या सुविधा, शिक्षण यावर भरमसाठ खर्च करण्याशिवाय त्याला पर्याय नाही.

सारांश :

भारतातील शेतकऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेताना एक गोष्ट आपल्या ध्यानात येते की, आजही सुमारे ६५ ते ७० टक्के लोक आपल्या उपजीविकेसाठी केवळ शेती आणि कृषी उत्पादनावर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतजमिनीचे मोठ्या प्रमाणात तुकडे झाले आहेत. हे इतके आहे की काही शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान किंवा अवजारे वापरून शेती करायची असली तरी त्यांना दिलेल्या जमिनीच्या तुकड्यात असे तंत्रज्ञान करता येत नाही. आजही शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत. सततच्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांना एकाच पिकावर अवलंबून राहावे लागत आहे. मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आल्याने अनेक वेळा उभी पिके पाण्याखाली गाडली जातात. जोरदार वादळ आणि जंगली श्वापदांमुळे शेतीचे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांकडे शेतमाल साठवण्यासाठी योग्य सुविधा नाहीत. परिणामी नाशवंत माल लवकरात लवकर बाजारात पाठवण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नाही. त्यांच्या अज्ञानाचा पुरेपूर फायदा बाजारातील व्यापारी आणि दलाल घेत आहेत. परिणामी, शेतीत कष्ट करताना लागणारे श्रम व पैसा यांचा पुरेसा व योग्य मोबदला मिळत नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे अशक्य होत आहे. येणारे दिवस चांगले जातील या अपेक्षेने कर्ज घेऊन शेतीत कष्ट करणारा शेतकरी दिवसेंदिवस गरीब होत चालला आहे. याचाच परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्येचे प्रमाण आपल्याला स्पष्टपणे जाणवत आहे. परिणामी, शेतकऱ्यांमध्ये पिढ्यानपिढ्या चालत आलेला गरिबीचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अव्याहतपणे हस्तांतरित होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या सगळ्याची जाणीव असलेला शेतकरी अनेक वर्षांपासून आपल्यावर होत असलेल्या अन्याय–अत्याचाराच्या प्रकरणी संघटित होऊन या परिस्थितीचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत अनेक समाजनेते, समाजसुधारक, शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांमध्ये योग्य ती जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेतकरी आंदोलने आणि शेतकऱ्यांची आंदोलने होत आहेत आणि आजही त्यात खंड पडलेला नाही. या प्रकरणाच्या पुढील भागात अशा आंदोलनांचा आणि आंदोलनांचा थोडक्यात आढावा घेऊ.

संदर्भ ग्रंथ :

१) भारतीय अर्थव्यवस्था, भालेराव आणि देसाई, निराली प्रकाशन

२) Bailt, S; calrelo Rios, M- & Masias L, Communication for development for latin America, a regional experience. 2016.

३) https://www.bighaat.com/blogs/news/42151041-biggest-problems-faced-by-farmers-in-india

४) CGIR Financial Report World Bank. Org Aug. 1996

५) विपणन आणि व्यवस्थापन डॉ. सदाशिव शिवगवे, प्रा. दीपक सुरवसे, सक्सेस प्रकाशन जून–२०१५

६) भारतातील सामाजिक चळवळी. डॉ. विजय मारूळकर व डॉ. दयावती पाडळकर (२०१९) फडके प्रकाशन कोल्हापूर

७) भारतातील सामाजिक चळवळी, देवगावकर, डुमरे श्री. साई प्रकाशन नागपूर.

*कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगांव, जि. यवतमाळ.

***

शेतकरी आत्महत्या एक समाजशास्त्रीय अध्ययन

*प्रा.डॉ. संजय जे. भगत,

भारत हा खेडयाचा देश आहे. शेती हा ग्रामीण समुदायाचा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीशी संबंधित असणारे दुग्धव्यवसाय शेळीपालन, कुक्कुटपालन इ. व्यवसाय ग्रामीण समुदायात आढळून येतात. शेती हा व्यवसाय निसर्गावर अवलंबून असतो. बऱ्याच ठिकाणी निसर्गाची अवकृपा होतांना दिसून येते. त्यामुळे शेती व्यवसाय हा बिन भरोवश्याचा झाला आहे. तरी देखील ग्रामीण लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावर शेती व्यवसायाचा प्रभाव दिसून येतो. शेती हा भारताचा मुलभूत व प्रमुख भारताती उद्योग असल्यामुळे भारतीय लोक आपल्या उपजिविकेसाठी शेती व शेतीशी निगडीत अशा धंदयावर अवलंबून असून शेतीवरील हा भार दिवसेंदिवस वाढत आहे. शेती हा भारताचा प्रमुख धंदा आहे. परंतु तो तत्त्वाप्रमाणे चालविण्यात आलेला दिसून येत नाही. बहूतांश शेतकरी अर्धपोटी राहत असून अत्यंत दारिद्रयाच्या स्थितीत जीवन जगत आहे. पुरेशे उत्पन्न शेतीतून मिळत नाही. भारतीय शेतीची उत्पादनक्षमता कमी असण्याचे कारण भारताच्या जमिनीची परिस्थिती हे तर आहेत. परंतु त्याचबरोबर शेतमालाच्या विक्रीबाबत व इतर बाहय अडचणीही कारणीभूत आहेत.

स्वातंत्र्यापूर्वी कुळांना पुरेशे संरक्षण् नव्हते त्यामुळे त्यांना शेतीतून जास्तीत जास्त पीक काढण्यासाठी उत्तेजन मिळत नसे. दरवर्षी कुळे बदलविण्याच्या पध्दतीमुळे शेत कसणारा जमिनीची कायम स्वरूपाची कोणतीही सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत नसे. स्वातंत्रयानंतर कुळांना संरक्षण व स्थैर्य देण्यासाठी विविध कायदे करण्यात आले असून कुळांना उत्पादन वाढविण्यासाठी उत्साह वाटेल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.

भारतातील शेतीची सरासरी आकडा साधारणत: ७.५ एकर असला तरीही काही भागात अर्ध्या एकरापेक्षा ही लहान शेत आढळून येतात. जमिनीचे विभाजन व अपखंडन मोठया प्रमाणात झालेल्या असल्यामुळे शेतीचा आकार लहान झाला आहे. त्यामुळे शेतीचा खर्च वाढुन उत्पादकता कमी झाली आहे.

अलिकडच्या काळात शेती व्यवसाय उत्पन्नाच्या दृष्टीने परवडणारा नाही. कारण शेतीच्या उत्पादनाला हमी भाव नाही. शेतीची लागवडीचा खर्च सुध्दा शेतकऱ्यांना शेतीच्या उत्पादनातून निघत नाही. ग्रामीण भागातील शेतकरी हा दिवसेंदिवस शेती व्यवसायामध्ये तोटयात येत आहे. शेतीसाठी लागवडीसाठी खर्च सुध्दा त्याच्याकडून होत नाही. त्यामुळे तो कर्ज वाढून शेती करीत आहे. कधीकधी सावकारांचे कर्ज काढून शेतीची पेरणी शेतकरी करतो. परंतु पुरेशे उत्पन्न मिळत नसल्यामुळे कर्जबाजारी होवून शेती विकण्याशिवाय किंवा आत्महत्या करण्याशिवाय त्याच्यापुढे दुसरा पर्याय नसतो. अपुऱ्या उत्पन्नामुळे अनेक महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आपण नेहमीच वर्तमानपत्रातुन वाचत असतो. आपल्या देशामुध्ये शेतकरी आत्महत्या करण्याचे अनेक कारणे आहेत. अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि वैयक्तिक समस्यांना कंटाळून आत्महत्या केली जाते. ही वस्तुस्थिती म्हणून भारतातील शेतीला माणसुनचा जुगार असे म्हटले जाते. याचा अर्थ महाराष्ट्रातील शेती निर्सगावर अवलंबून असते. त्यामुळे जेव्हा जेव्हा पाऊस पडतो तेव्हा तेव्हा पिकाचे नुकसान होते. कधी पेरणी कधी पेरणीच्या सुरवातीला पाऊस पडतो नंतर मात्र एक महिना पाऊस पडत नाही. त्यामुळे पिकाचे नुकसान होऊन अपुरे उत्पन्न मिळते. कधी कधी तर हाता तोंडाशी आलेले पिक अवकाळी पावसामुळे पुर्णपणे निस्तनाभूत होते. शेतकऱ्यांनी केलेल्या पेरणीचा खर्च सुध्दा त्यामधुन निघत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकारापासुन कर्ज काढल्यामुळे ते कर्ज परत करता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्या समोर आत्महत्या केल्याशिवाय पर्यायच उरत नाही. जेव्हा शेतकरी आत्महत्या करतो तेव्हा त्यांच्या कुटूंबाला नुकसान भरपाई दिली जाते मात्र जेव्हा जेव्हा शेतकरी कर्जबाजारी असतो तेव्हा मात्र शासन त्याला पुरेची मदत करत नाही. त्यामुळे त्यांच्या समोर नैराश्याची भावना निर्माण होवून आत्महत्या केल्याशिवाय त्याला पर्यायच उरत नाही.

संशोधनाचे उद्देश :–

- शेतकरी आत्महत्येच्या समस्यांचा अभ्यास करणे.
- शेतकऱ्याच्या आत्महत्येची कारणे शोधने.
- शेतकरी आत्महत्येच्या संदर्भात उपाय योजना सुचविणे.

संशोधन पध्दती :–

प्रस्तुत शोध निबंधाकरिता दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्याता आला असून तथ्य संकलन ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र, इंटरनेटच्या माध्यमाने केले आहे. व माहितीची मांडणी विश्लेषनात्मक केली आहे.

शेतकरी आत्महत्येती कारणे मीमांसा :–

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करण्याचा शोध घेत असतांना शेतकऱ्याच्या आत्महत्या हया केवळ शेतकऱ्याची अंतर्गत बाब नाही ही एक चिंतनीय बाब आहे. निराशा आणि वैफल्य ग्रस्त हे जरी आत्महत्येचे कारण असले तरी ऐवढया मोठया संख्येने शेतकरी आत्महत्या करतो ही चिंतनीय बाब आहे. नेमके कोणत्या कारणाने शेतकरी आत्महत्या करीत आहे याचे कारण अजुनही संशोधकाला कळले नाही. शेतकऱ्याचे आत्महत्येचे कोणतेही एक कारण नसुन अनेक कारणांचा तो परिणाम असतो. अनेक कारणे इतकी ऐकमेकात गुंतलेली असतात की त्यामुळे कोणतेही एका कारणाने आत्महत्या केली हे सांगणे कठीण जाते. कर्जबाजारी पणा हे शेतकऱ्याचे ऐकमेव कारण मानले तर असा प्रश्न निर्माण होतो की, कर्जबाजारी असणारे इतर शेतकरी आत्महत्या का करीत नाहीत. आत्महत्येची जी कारणे सांगितली जातात ती वेगळीच असतात.

शेतकरी आत्महत्येची कारणे :–

१) कर्जबाजारीपणा :– शेतकरी कर्जकाढून शेती करतो शेतकऱ्यांना आपल्या उत्पादन खर्च वसुल होईल ऐवढा भाव मिळत नाही. बाजार पेठे मध्ये त्याच्या मालाला हमीभाव मिळत नाही. ज्यावर्षी पिक, उत्पन्न झाले नाही तरी पुढील वर्षी आपल्याला शेतीतील पिकाला उत्पन्न होईल हमी भाव मिळेल या आशेने तो पुन्हा कर्ज काढतो परिणामी तो आनखीही कर्ज बाजारी होत जातो. पुढे त्याला निराशा वैफल्य ग्रस्थता येते त्यातुन तो आत्महत्येचा मार्ग निवडतो.

२) निर्सगावर आधारित शेती :– भारतातील शेती ही बहुतांश निर्सगावर अवलंबुन असते. पाऊस चांगल्या प्रमाणात पडला तर पिक चांगले होऊन चांगले उत्पन्न होईल. अन्यथा पिक होणार नाही. अशी परिस्थीती निर्माण होते. विर्दभात जुन, जुलै महिन्यामध्ये शेताची पेरणी केल्यानंतर थोडयाफार प्रमाणात पाऊस पडतो नंतर पंधरा दिवस एक एक महिना शेतकरी ढगाकडे पाणी येण्याची वाट बघत असतो. पावसाच्या लहरीपणा मुळे पाऊस वेळेवर येत नाही. शेतातील बी–बियाणे वाया जाते तेव्हा शेतकरी निराश होतो. आणि त्याच्या मनात आत्महत्या करण्याचे विचार येतात.

३) सिंचनाच्या अपुऱ्या सोयी :– कोरडवाहू शेतीमध्ये कमी पावसामध्ये येणारे पिक घ्यावे लागते. सिंचनाची सोय शेतकऱ्यांना नसल्यामुळे पाण्याअभावी अपुरे उत्पन्न मिळते. पाऊस नियमित येत नसल्यामुळे हाताशी आलेले पिक अपुरे होते. सिंचनाची सोय नसल्यामुळे शेतकरी निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते त्यामुळे त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण होऊन शेतकरी आत्महत्या ग्रस्त होतो.

४) अपुरे भांडवल :– शेतीमध्ये पेरणी करण्याकरीता मशागत करण्यापासून लागणारा खर्च बी–बियाणे, पेरणी आंतरमशागत, रासायनिक खतांचा खर्च, फवारणी, मळणीचा खर्च करावा लागतो म्हणजे पिक शेतातून घरात, घरातून बाजारात नेण्यापर्यंत येणारा खर्च व त्या पिकातून उभा राहिलेला पैसा यामध्ये खुप तफावत पडते. या पिकात नफा आता तर ठिक, पण जर यामध्ये तोटा आला तर त्या शेतकऱ्याजवळील भांडवल पूर्णपणे त्या पिकाला लागलेले असते. जवळचा सर्व पैसा निघून गेल्याने त्यात कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या खर्चाची भर पडल्याने शेतकरी आर्थिकदृष्टया हतबल होऊन जातो. अपुरे भांडवल असल्यामुळे शेतीकरीता जमेल त्या स्थितीत पेरणी करतो. त्यानंतर त्याला उत्पन्न कमी मिळते त्यातुन त्याला नैराश्याची स्थिती निर्माण होते.

५) व्यसनाधिनता :– शेतकऱ्याच्या आत्महत्येला जशी अनेक कारणे जवाबदार आहेत त्यापैकी व्यसनाधिनता हे एक प्रमुख कारण आहेत. या व्यसनामुळे शेतकऱ्यांचा उत्पन्नाचा बराचसा भाग व्यसनावर खर्च होतो त्यामुळे तो कर्जबाजारी होतो. व्यसनामुळे त्याची शारीरिक हाणी होते. तसेच त्याची कार्यकरण्याची क्षमता ही कमी होते. आणि कुटूंबामध्ये कलह निर्माण होवून कधी कधी कुटूंब विघटन ही होते.

६) सामाजिक धार्मिक प्रथा व परंपरा :– भारतीय शेतकरी सामाजिक, रूढी, प्रथा, परंपरा तसेच धार्मिक बंधनामध्ये अडकलेला दिसून येतो. इच्छा नसुन सुध्दा त्याला अनुत्पादक स्वरूपाचा अनावश्यक खर्च करावा लागतो. उदा. लग्नविवाह, मृत्यू इत्यादी प्रसंगी करण्यात येणारे खर्च. या खर्चामुळे त्याचे उत्पन्न कमी होवून कर्जबाजारीपणा येतो. कारण शेतीमधून जास्त उत्पन्न मिळून बचत होत नाही. घरखर्च आणि शेतीसाठी त्याला कर्ज घ्यावे लागते. परंतु हे कर्ज शेतकऱ्यांना परत करणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो.

शेतकऱ्याच्या आत्महत्येवरील उपाययोजना :–

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता त्यावर कोणती उपाययोजना करावी ? हा प्रश्न स्वभाविकपणे निर्माण होतो शेतकऱ्याच्या आत्महत्येचे गंभिर स्वरूप लक्षात घेवून खालील उपाय योजना आमलात आणल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यास मदत होऊ शकते.

१) शेती व शेतीशी पुरक व्यवसायाला प्राधान्य देणे
२) कोरड वाहू शेतीचे क्षेत्र हळूहळू बगायती शेतीमध्ये रूपांतर करून विशेष सिंचन कार्यक्रम राबविणे
३) शेतकऱ्यांना ज्या संस्थेव्दारे कर्ज पुरवठा होतो तो अतिअल्प व्याज दराने उपलब्ध करून देणे
४) शेतकऱ्यांना चांगल्या प्रतिचे बि–बियाणे उपलब्ध करून देणे.
५) अल्पभुधारक शेतकऱ्यांना सरकारी योजने व्दारे मोफत सिंचनाच्या सोई करून देणे.
६) पिक विमा योजनेच्या रक्कमेत वाढ करणे.
७) विवाह समारंभावर अनावश्यक खर्च टाळण्यासाठी सामूहिक विवाह सोहळयाचे आयोजन करून विवाहीत कुटूंबाला आर्थिक मदत करणे.
८) आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटूंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीची तरतुद करावी.
९) आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटूंबाला शिक्षणाच्या व आरोग्याच्या सोई उपलब्ध करून देणे.
१०) शेतकऱ्यांना सबसीडी योजनेमध्ये वाढ करावी या योजनेमध्ये खते, औषधी बी–बियाने यावर अनुदान देण्यात यावे.
११) शेतीचा दर्जा सुधारण्यासाठी मोहीम राबवणे.

निष्कर्ष :–

विरील अध्यायनामध्ये शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे शेतकरी आत्महत्येचे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी अल्पभुधारक शेतकऱ्याचे कर्ज माफ करणे आवश्यक आहे. भविष्यात कोणताही शेतकरी आत्महत्या करण्याचा मार्ग निवडणार नाही. शेतकऱ्याला तात्काळ मदत करण्याच्या दृष्टीने सरकारने नविन योजना आखाव्यात. शेतकरी हा आर्थिक संकटात सापडलेला आहे. या संकटातून शेतकऱ्यांना वेळीच सावरणे गरजेचे आहे. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे. यामधूनच शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारेल व शेतकरी आत्महत्या थांबवतिल आत्महत्या करणार नाही.

संदर्भ ग्रंथ :–

१. डॉ. कविमंडन विजय, आर्थिक विकास व नियोजन.
२. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २००६ दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे.
३. डॉ. साळुंके एस. आर, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था.
४. आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन नागपुर.
५. डॉ. नरेन्द्र जाधव, शेतकरी आत्महत्या आणि कृषी समोरील आव्हान प्रकाशन २७ जुलै २००८
६. वानखडे चंद्रकांत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या परिसर प्रकाशन अंबे जोगाई.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, पार्वती नगर अकोली रोड अमरावती.
E-mail : sanjayjbhagat76@gmail.com

***

शेतकरी कुटुंबाच्या समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी एक अध्ययन

*डॉ.बामणे मारोती

प्रस्तावना :

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतात ६५ ते ७० टक्के लोक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतीवर अवंलबून आहेत. मानवाच्या मुलभूत गरजांची पूर्तता करण्याची क्षमता शेतीतच आहे. ''जिथे जगातील एकूण जमिनीपैकी ५२ टक्के जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. त्या तुलनेत भारतातील एकूण जमिनीपैकी ५२ टक्के जमीन शेतीसाठी उपयुक्त आहे. तसेच जगात आढळणारे सर्वच १५ जलवायू भारतात सुद्धा उपलब्ध आहेत व जगात आढळणारी ६० प्रकारच्या मृदांपैकी जवळपास ४६ प्रकारची मृदा भारतात आहे.'' भारतात तीनही बाजूंनी असलेला विशाल समुद्र, हिमालयासारखे निसर्गदत्त पर्वत, गंगा, कावेरी, यमुना, गोदावरीसारख्या नद्या, मातीतून सोन्यासारखे पीक देणारी सुपीक जमीन, विशाल जंगले, निरनिराळ्या खनिज खाणी. जगाला जे मिळालेले नाही ते भारताला मिळाले ते मोसमी वातावरण, विविध प्रकारची फळे, प्रचंड वनऔषधीचे भांडार, विविध प्रकारच पाणी, समुद्राच्या रूपात उपलब्ध झालेली जलसंपत्ती, मनुष्य रूपात उपलब्ध असणारी श्रमशक्ती अशा स्वरूपाची साधन संपत्ती भारताला मिळालेली आहे. या संदर्भात जर्मन पंडित एफ मॅक्स म्यूलर म्हणतो, ''जिथे सर्व प्रकारच शक्ती, सत्ता आणि सौंदर्य अमाप स्वरूपात निसर्गाने बहाल केले आहे आणि ''पृथ्वीवरील नंदनवन म्हणता येईल अशी ईश्वरी देणगी लाभलेल्या देशाचा विचार करून जेव्हा मी जगावर दृष्टिक्षेप टाकतो तेव्हा माझ्या डोळ्यासमोर भारताचे नाव येते.'' अशा स्वरूपाची सुजलाम, सुफलाम, आणि सुबत्ता, शक्ती, सामर्थ्य असणाऱ्या नंदनवनात शेतकरी कुटुंबावर अरीष्ट का आले? चिलगव्हाण गावचे शेतकरी साहेबराव करपे पाटील यांच्यावर संपूर्ण कुटुंबासह आत्महत्या करण्याची वेळ का आली ? शेतकरी आत्महत्या करण्याचे प्रमाण सतत का वाढत आहे? शेतकरी कुटुंबाच्या समस्येंची ऐतिहासिक पार्श्वभूमी काय आहे? इत्यादी प्रश्नांची उकल करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडण्यात आलेला आहे.

संशोधनाचा उद्देश :

अ) शेतकरी कुटुंबाच्या समस्येचे अध्ययन करणे.

ब) शेतकरी कुटुंबाच्या समस्येंची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासने.

संशोधनातील गृहितकृत्ये :

अ) शेतकरी कुटुंब समस्याग्रस्त बनलेले आहे.

ब) शेतकरी कुटुंबाच्या समस्येला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयासाठी प्राथमिक व द्वितीय साधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. प्राथमिक साधनाअंतर्गत मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून समस्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे निरीक्षण करून तथ्यांचे संकलन करण्यात आलेले आहे. द्वितीय साधनाअंतर्गत विषयाशी संबंधित संदर्भग्रंथ, पुस्तक, विशेषांक, वर्तमानपत्र, सामाजिक माध्यमे इत्यादीच्या माध्यमांतून विषयाशी संबंधीत तथ्यांचे संकलन करण्यात आलेले आहे.

समस्याग्रस्त शेतकरी कुटुंब संकल्पना :

''जे कुटुंब आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, वैवाहिक समस्यांनी ग्रासलेले आहे, (विवंचनेत आहे) समस्येला कंटाळून आत्महत्या केलेली आहे किंवा आत्महत्येचा विचार करीत आहे याला समस्याग्रस्त शेतकरी कुटुंब म्हणता येईल.

तथ्याचे विश्लेषण अर्थनिर्वचन :

विषयांशी संबंधित प्राप्त तथ्यांचे वर्गीकरण विश्लेषण करून, अर्थनिर्वचन करण्यात आलेले आहे.

अ) प्राचिन काळातील शेतकऱ्यांची स्थिती :

मानवाच्या मुलभूत गरजांपैकी अन्नाची गरज महत्त्वाची असल्याुळे त्या काळात ही महत्त्वाची गरज पूर्ण करण्यासाठी त्या वेळेस शेतकऱ्यांची भूमिका सुद्धा महत्त्वाची होती. आर्थिक प्रक्रियेतील खाद्य संकलन वा पशुपालन, स्थलांतरित शेती या टप्प्यातसुद्धा शेतकऱ्यांचे महत्वाचे योगदार होते. यानंतर शेतीचा शोध लागल्यानंतर व शेतकऱ्यांच्या हाताला बैल लागल्यानंतर स्थिर शेती करण्याचा काळ सुरू झाला. या कालावधीतच शेतकरी शोषणाला सुरूवाता झाली. शेतकऱ्यांच्या हाताला जेव्हा बैल लागले व लुटारूंच्या हाताला घोडे लागले. शेतकरी शेतामध्ये बैलाच्या माध्यमातून रात्रंदिवस शेती करायचा व वर्षाअखेर

धान्याची रास तयार करायचा, याच वेळेस लुटारू घोड्यावर येऊन रास घेऊन जायचे. अशा पद्धतीने शेतकऱ्यांना लुटण्यास सुरूवात झाली. नंतर लुटारूमध्ये टोळीप्रमुख झाला. त्याने जास्तीत जास्त लुटारू जवळ बाळगायचा. हे वर्षभर आरामात बसून ऐतं खात राहायचे, शेतकऱ्यांच्या राशीच्या वेळेस जाऊन रास (धान्य) लुटून आणत होते. नंतर लुटारूमध्ये लढाई होऊन यांच्यात समझोता म्हणून लुटण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतीचा प्रदेश वाटून घेतले. या वेळेस शेतकऱ्यांचे गरजा मर्यादित असल्यामुळे या शोषणाचा परिणाम जीवन संपवण्यापर्यंत गेलेला नाही.

ब) मध्ययुगीन काळातील शेतकऱ्यांची स्थिती :

मध्ययुगीन काळातसुद्धा शेतकऱ्यांचे शोषण सुरू होते. या काळात राज्यशाही शासन पद्धती असल्यामुळे मोगलशाही, आदिलशाही, अशा स्वरूपाच्या राजेशाहीमध्ये जास्तीत जास्त शेतसारा वसूल करण्याची पद्धती किंवा वेळप्रसंगी शेतकऱ्यांचे धान्य, लुटत होते. या राजेशाहीपद्धतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची राज्यपद्धती अपवाद वगळून इतर सर्व राज्यपद्धतीमध्ये शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शोषण होत होते.

क) स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकऱ्यांची स्थिती :

इंग्रज भारतात व्यापार करण्याच्या उद्देशाने आले आणि राज्यकर्ते बनले. ''इंग्रजांच्या राजवटीत शेतकऱ्यांचे दुहेरी पद्धतीने शोषण होत होते. या ठिकाणी शेतकऱ्यांच्या कच्चा माल कमीत कमी भावात घ्यायचे, त्यांचे पक्क्या मालात रूपांतर करून जास्तीत जास्त किमतीत विकत होते. या संदर्भात महात्मा फुले म्हणतात, ''शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीचे मुळ नैसर्गिक आपत्तीपेक्षा राजकीय अर्थकारणात दडलेले आहे. हे अनेक उदाहरण देऊन महात्मा फुलेंनी स्पष्ट केले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रज सरकारचे राजकीय धोरण शेती आणि शेतकऱ्यांना मारक असल्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणात वाढ होऊन, शेतकरी विविध प्रकारे समस्याग्रस्त बनला असे आपणास निदर्शनास आणून दिले होते.

ड) स्वातंत्र्यानंतरची शेतकऱ्यांची स्थिती :

स्वातंत्र्यानंतर आपले सरकार आले, शोषणाच्या प्रक्रियेत बदल होईल अशी सर्वांना अपेक्षा होती, पण या काळातसुद्धा निराशा झालेली आहे. स्वातंत्र्यानंतर आखण्यात आलेल्या पंचवार्षिक योजनेमध्ये पहिली व दुसरी पंचवार्षिक योजना सोडले तर शेतीसाठी खर्च कमी, कमी करण्यात आला आणि उद्योगाला जास्त महत्त्व देण्यात आले. भारताचे माजी पंतप्रधान चरणसिंग यांनी म्हटले, ''भारताच्या भाग्यविधात्यांनी कृषी क्षेत्राकडे केलेले दुर्लक्ष हे मूलभूत पाप होय.'' तसेच भारताचे माजी कृषीमंत्री डॉ.अण्णासाहेब शिंदे यांनी ''भारतापुढील कृषीसमस्या व अन्न समस्या'' या ग्रंथात भारतीय शेतीचे सर्वात अधिक नुकसान भारतीय शेतीमालाच्या किंमती मंदीतच राहतील. अशा आर्थिक धोरणाचा अवलंब करूनच ब्रिटिशांनी केले. ब्रिटीश कारखानदारीला स्वस्त कच्चा माल सातत्याने मिळत राहील. अशा तऱ्हेने आर्थिक धोरणाची ब्रिटिशांनी दिशा ठेवली. ब्रिटिशांचे राज्य गेले तरी आजही या दुष्टचक्रातून भारतीय शेती बाहेर पडली असे म्हणता येणार नाही. म्हणजे आज ज्या शेती व शेतकऱ्यांवर संकट आलेले आहे ते सरकारच्या राजकीय, आर्थिक विकासाचे परिणाम आहे.

आज स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाले. आपण अमृतमहोत्सव साजरा करीत आहोत. पण आतापर्यंत देशातील ५ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, आज राज्यात दिवसाला दोन–तीन आणि देशात दिवसाला १२ शेतकरी आत्महत्या होताहेत. त्यात विदर्भ आणि मराठवाड्यत जास्तच २०२० या एका कॅलेंडर वर्षात नोंद झालेल्या महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या २९४२ म्हणजेच दिवसाला ८ शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तर याच वर्षात विदर्भात १३२२ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले आहे. २००१ ते २०२२ पर्यंत विदर्भात २१,०८४ शेतकऱ्यांनी आपले आयुष्य संपविले. २०१९ ते २०२२ या चार वर्षात मराठवाड्यातदेखील ३४४३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. अशी आताची शेतकऱ्यांच्या संदर्भात भयाणक परिस्थिती आहे. म्हणजे शेतकऱ्यांच्या आपल्या उत्पन्न खर्चानुसार योग्य पद्धतीने त्याच्या मालाला भाव मिळाला नसल्यामुळे उत्पादन खर्च, व इतर वस्तूवरील खर्च जास्तच वाढला आणि शेतकरी कुटुंब कर्जबाजारीपणा निर्माण होऊन या अनुषंगाने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, विवाहीत प्रश्न त्याच्या कुटुंबात निर्माण झाले.

निष्कर्ष :

अ) शेती व शेतकरी कुटुंबावर आलेलं आरिष्ट हे एका प्रदीर्घ राजकीय, आर्थिक, सामाजिक, विकासात्मक धोरणांचा परिपाक आहे.

ब) शेतकरी कुटुंबात कर्जबाजारीपणा निर्माण झाला.

क) कर्जबाजारीपणस सरकारी धोरण कारणीभूत आहे.

ड) त्यांच्या मालाला योग्य भाव न मिळणे हे कर्जबाजारीपणा निर्माण होण्यास कारणीभूत आहे.

इ) शेतकरी कुटुंबात आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

ई) शेतकरी कुटुंबात शिक्षणाची समस्या निर्माण झाली आहे.

उ) शेतकरी कुटुंबात विवाहाची व आरोग्याची समस्या निर्माण झालेली आहे.

उपाय:

अ) स्वामीनाथन आयोग लागू करणे.

ब) शेतीला उद्योगाचा दर्जा देणे आवश्यक आहे.

क) शेतकऱ्यांच्या उत्पादनाबरोबर त्यांचे उत्पन्न वाढेल याकडे लक्ष द्यावे.

ड) शेतकऱ्यांचे शोषण होणार नाही अशी व्यवस्था निर्माण करावी.

संदर्भग्रंथ :

१. आगलावे प्रदीप (२०१०) ''सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे'', साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२. मायी सुनिल, ''सामाजिक संशोधन पद्धती'' डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. देशमुख यळणे, ''योजना'' जागतिकीकरण कृषीक्षेत्रातील बदल व शेतकऱ्यांच्या आत्महत्या.

४. लाजेवार नरेंद्र, ''शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय'' सुमेरू प्रकाशन, डोंबिवली.

५. जोशी शरद, ''शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती'', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.

६. पोहरे प्रकाश, ''देशोन्नती'' वाचकीय रविवार, दि.१२ मार्च २०२३.

७. भास्कर विजय, ''वनराई विशेषांक, २०१३'', समृद्ध भारत.

*समाजशास्त्र विभागप्रमुख, वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर

***

शेतकरी चळवळी व वर्तमान कृषी व्यवस्था

{विशेष संदर्भ: महाराष्ट्रातील सन ९१८० ते १९९० दरम्यान प्रमुख आंदोलने}

*डॉ.एच.यु.पेटकर.

भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास करीत असताना भारत हा कृषीप्रधान देश आहे यासोबतच भारतीय समाजव्यवस्थेचा प्रमुख गाभा हा कृषी व्यवस्थेशी निगडीत आहे असे आपण अनेकदा भाषणात, वर्तमानपत्रात तसेच मासिकांमधून ऐकत, वाचत असतो. आजही ६० टक्क्यापेक्षा अधिक जनता ही ग्रामीण भागात राहते व शेती तसेच शेतीशी निगडीत व्यवसाय करतात. परंतु अजुनही त्यांच्या जीवनमानामध्ये परिवर्तन झालेले दिसून येत नाही. भौतिक घटकामध्ये थोडयाफार प्रमाणात बदल झालेले दिसून येतात परंतु आर्थिक व्यवस्था अजुनही बेताचीच असलेली दिसून येते. याकरिता वेगवेगळे घटक कारणीभूतआहेत सोबतच शासनाची धोरणे धोरणे सुद्धा कारणीभूत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कृषी व्यवस्थाविषयी आपली अभ्यासपूर्ण भूमिका विशद केली. त्यांच्या मते शेती व्यवसाय हा मानवी जीवनामध्ये सर्वात महत्त्वाचा व्यवसाय आहे. तो प्राथमिक व सर्वांत असा प्राचीन व्यवसाय आहे. मानवाला जीवंत राहण्याकरिता ज्या ज्या घटकाची गरज आहे त्या प्राथमिक गरजांची पूर्तता या व्यवसायामधून केली जाते. यासोबतच शेतीच्या व्यवसायाशी संबंधित पुरक व्यवसाय उदा. दुग्धपालन, मासेमारी, कुक्कुटपालन, शिकार खनिज प्राप्ती करुन मानव आपल्या भौतिक गरजांची पूर्तता करीत असतो. म्हणून हे ही घटक त्यांच्या जगण्याकरिता साधने ठरतात. मानवाला आवश्यक असणाऱ्या प्राथमिक गरजांची पुर्तता उदा. अन्नधान्याचे उत्पादन शेती व्यवसायामधून करण्यात येते. त्यामुळे शेती व्यवसाय हा सर्वांत महत्त्वाचा उद्योग असल्याचे मत 'स्माल होल्डी इन इंडिया' या निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले.

सामाजिक चळवळ म्हणजे काय? याबाबत सामाजिक विचारवंतामध्ये एकमत असलेले दिसून येत नाही. तरीदेखील १९ व्या शतकाच्या सुरुवातीला युरोपमध्ये 'सोशल मुव्हमेंट' हा शब्द फार मोठया प्रमाणात वापरण्यात आला. तो सामाजिक परिवर्तनाचा काळ होता. शोषीत वर्गाच्या उध्दारासाठी काम करणाऱ्या राजकीय व्यक्तींनी नवीन समाजव्यवस्था अस्तित्वात आणण्यासाठी व त्या अनुषंगाने ध्येय-धोरणे आणि आर्थिक संबंध बदलविण्यासाठी जे कार्य केले त्या संदर्भात हा शब्द वापरण्यात आला. इ.स. १९५०च्या सुरुवातीला काही विचारवंतांनी 'सामाजिक चळवळ' या शब्दाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. त्यात पॉल विलकिन्सन ह्यांचे नाव घ्यावे लागते. तसेच हा शब्द प्रथम वापरणाऱ्या रुडॉल्फ हेल्ड, बील स्मेल्सर आणि जॉन विल्सन ह्यांची नावे घ्यावी लागतील.

एखाद्या गटाचा समुहाचा किंवा विशिष्ट प्रसंगांना सरकारी दडपशाहीच्या विरोधात लोकांनी केलेल्या प्रतिकारांचाही सामाजिक चळवळ म्हणून उल्लेख केला जातो परंतु जोपर्यंत हाप्रतिकार एखाद्या व्यक्तीचा किंवा काही व्यक्तीचाच असतो तोपर्यंत त्या प्रतिकाराला 'सामाजिकचळवळ' म्हणता येणार नाही असे मत स्कॉट यांनी मांडले.

डेव्हीड बॅलीच्या मते, सामाजिकचळवळ हा 'बेकायदेशीर सामाजिक निषेध' आहे. मात्र ज्यांना समाजात बदल घडवून आणावयाचा आहे त्यांच्या दृष्टीने या कृती कायदेशीरच असतात.

हर्बर्ट ब्लूमर यांच्या मते, "सामाजिक चळवळ हा समूहाने केलेला असा प्रयत्न असतो की,ज्यामुळे जीवनाला एक नवीन दिशा प्राप्त होते"

लँग आणि लँग यांच्या मते, "सामाजिक चळवळ अशा एका व्यापक आधारावर असते की ज्याचा मुख्य उद्देश प्रस्थापीत सामाजिक व्यवस्थेतील मूलभूत स्वरुपावर प्रभाव टाकून त्यास नवीन स्वरुप प्रदान करणे"

टर्नर आणि विलयन यांच्या मते, "एखाद्या सामाजात किंवा मानवी समूहात लोक सामुहिकरित्या आणि सातत्याने अशी कृती करीत राहतात की,जी समाजात विरोध आणि परिवर्तन यांना चालना देते, तिला सामाजिक चळवळ म्हटले जाते"

वरील सर्व व्याख्यांवरुन आपल्या असे निदर्शनास येते की, प्रस्थापित व्यवस्थेचे जेव्हा समाजातील विशिष्ट समूहाच्या दृष्टिकोनातून अधिकांश दोष आढळून येते किंवा त्या समुहाच्या प्रगतिला मारक ठरते तेव्हा त्या व्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने केलेले सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ अशी सामान्यपणे आपण व्याख्या करु शकतो. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा इतिहास पाहत असताना त्यांची वैचारिक पार्श्वभूमी आपणास महात्मा

ज्योतिराव फुले यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकात दिसून येते. हे पुस्तक महात्मा फुल्यांनी १८८३ मध्ये लिहिले. या पुस्तकामध्ये महात्मा फुल्यांनी शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक / शोषण आणि सावकार, शासकीय धोरणे, सरंजामदार ह्यांच्याकडून होणारे अमानुष शोषण यांचे विस्तृत वर्णन केले आहे. महात्मा फुल्यांनी कर्जात जन्मणाऱ्या जगणाऱ्या आणि मरणाऱ्या शेतकऱ्याची परिस्थिती सुधारण्याकरिता वैज्ञानिक दृष्टिकोन देऊन त्याचा विकास साधण्याची कल्पना त्यांनी मांडली.

स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडामध्ये भारतात शेतकऱ्यांची अनेक आंदोलने झालेली दिसून येतात. अशा अनेक आंदोलनामध्ये प्रामुख्याने डाव्या पक्षाचा व साम्यवादी पक्षाचा मोठ्या प्रमाणात पुढाकार असलेला दिसून येतो. यामध्ये विशेषत्वाने बंगालमधील तेभाग आंदोलन, तेलंगणामधील शेतकरी उठाव आणि वारली आदिवासींचे आंदोलन यांचा उल्लेख येतो. नंतरच्या काळामध्ये जमिनदारी निर्मूलन, कमाल जमीन धारण कायदा, कसेल त्याची जमिन या तत्त्वावर कुळ कायदे हे एकामागून एक संमत झाले. महाराष्ट्रामध्ये सन १९८० ते ९० च्या दरम्यान अनेक आंदोलने झाली ही आंदोलने 'शेतकरी संघटना' यांनी केलीत. या आंदोलनांना बऱ्यापैकी यश देखील मिळाले. या आंदोलनाचा अभ्यास संशोधनकर्त्याने संशोधन पेपरमध्ये केला आहे. संशोधनकर्ताहा एका शेतकरी कार्यकर्त्याची मुलगा आहे. त्याने हे आंदोलने लहानपणापासूनच बघितले आहे. तसेच आज तो प्राध्यापक म्हणून मागील बावीस वर्षापासून कार्यरत आहे. आजही शेतकऱ्याची स्थिती व महाराष्ट्रामध्ये १९८० ते १९९० च्या दरम्यान झालेली आंदोलने यांचा अभ्यास करण्याकरिता त्याने 'महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी व आधुनिक कृषी व्यवस्था' या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाचे उद्देश

१) महाराष्ट्रामध्ये सन १९८० ते १९९० च्या दरम्यान झालेल्या आंदोलनाचे अध्ययनकरणे.
२) या आंदोलनाचे स्वरुप जाणून घेणे.
३) आंदोलनाची फलश्रुती जाणून घेणे.
४) वर्तमान कृषी व्यवस्थेविषयी माहिती जाणून घेणे.

गृहीतकृत्ये

१) महाराष्ट्रामध्ये १९८० ते १९९० च्या दरम्यान शेतकरी संघटनेने मोठ्या प्रमाणात आंदोलने केलीत.
२) या आंदोलनामुळे मुख्यतः नगदी पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांना फायदा झाला.
३) वर्तमान कृषी व्यवस्था व सरकारी कायदे शेतकऱ्यांवर आघात करणारे आहेत.

कांदा आंदोलन (मार्च १९८०)

चाकणच्या बाजारामध्ये कांद्याचे भाव एकदम गडगडले त्यामुळे शेतकरी संघटनेने १ मार्च १९८० ला रास्ता रोको आंदोलन केले. १० मार्चला शेतकऱ्यांनी आपआपल्या बैलबंडीद्वारे चाकण येथे पुणे-नाशिक महामार्ग बंद करण्याचा सत्याग्रह सुरु केला या आंदोलनामध्ये खूप मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.शेवटी १५ मार्च ला शासनाने नाफेड या सरकारी खरेदी विक्री संस्थेतर्फे कांदा खरेदी करणार अशी घोषणा केली.यासोबतच या आंदोलनातील बहुतांश मागण्या मान्य झाल्यामुळे शेतकरी संघटनेने आंदोलन मागे घेतले. परत एप्रिल महिन्यामध्ये शासनाने कांदा खरेदी बंद केल्यामुळे शेतकऱ्यांनी परत आंदोलन केले त्यामुळे शासनाने कांदा खरेदीची घोषणाकेलीत्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले.

ऊस आंदोलन (ऑगस्ट ते नोव्हेंबर १९८०)

ऊसाला ३०० रुपये प्रतिटन भाव मिळावा याकरिता नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील ऊस उत्पादकांनी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली आंदोलनाची तयारी केली. यामध्ये गळतीच्या हंगामात साखर कारखानदारांना ऊस न देण्याचा ठराव करण्यात आला. साखर कारखाना महासंघाचे माधवराव बोरले यांनी शेतकऱ्यांच्या या मागणीला पाठिंबा दर्शविला. पण इतर कारखान्यांनी मात्र सरकारच्या माध्यमातून दडपण आणण्याचा प्रयत्न सुरु केला. यामध्ये ऊसाच्या पिकासाठी आवश्यक पाणीपुरवठा व विजपुरवठा बंद केला तेव्हा १० नोव्हेंबरला नाशिक-धुळे- अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी 'रास्ता रोको' आंदोलन सुरु केले. तसेच खेरवाडी येथे 'रेल रोको' आंदोलन सुरु केले. ही आंदोलने अतिशय शांततामयमार्गाने चालू असतानाच पोलीसांनी १० नोव्हेंबरला शेतकऱ्यांवर लाठीमार व गोळीबार केला. यामध्ये दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. शेतकरी नेत्यासह अनेकांना अटक झाली. शेतकरी नेते शरद जोशी यांनी तुरुंगात आंदोलन सुरु केले. २० नोव्हेंबरला विदर्भातील शेतक-यांनी एक दिवस चक्का जाम आंदोलन करून ऊस उत्पादक शेतकन्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला यामध्ये हजारो शेतकऱ्यांनी अटक करवून

घेतली. शरद जोशींनी २४ नोव्हेंबरला उपोषण सोडले व २७ नोव्हेंबरला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ऊसाला ३०० रु. प्रति क्विंटल भाव देण्याची घोषणा केली.

दुध आंदोलन (जुन १९८२)

धुळयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी संघटनेच्या मेळाव्यामध्ये २२ एप्रिल १९८२ ला दूध आंदोलनाची घोषणा करण्यात आली. यासोबतच शेतकरी विरोधी असलेल्या शासकीय धोरणास हानून पाडण्याकरिता 'कर्जमुक्ती' व 'स्वदेशी' या चळवळी हाती घेण्याचे ठरविले. संघटनेच्या मागणीनुसार दुधाचे भाव वाढवून मिळणार नाही असे शासनाकडून उत्तर मिळताच २८ जुन १९८२ ला दुध आंदोलन सुरु करण्यात आले. मात्र नाशिक, पुणे, धुळे, सांगली, सातारा इत्यादी जिल्ह्यामध्ये थोडाफार प्रतिसाद वगळता इतरत्र मात्र या आंदोलनाला प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे हे आंदोलन फसले. शेतकरी संघटनेने हे मान्य करीत आंदोलन मागे घेतले व त्यानंतर धुळे जिल्ह्यामध्ये मे १९८२ मध्ये या आंदोलनाच्या दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झाली. दुधाच्या भावात वाढ न करण्याच्या शासनाच्या धोरणाचा निषेध करून शासनाचा विरोध असूनही धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर गाई गुरासह मोर्चा नेण्यात आला. पोलीसांनी या मोर्चावर जबर लाठीहल्ला करून ते आंदोलन उधळून लावले.

कापूस आंदोलन (नोव्हेंबर-डिसेंबर १९८६)

२३ नोव्हेंबर १९८६ रोजी शेतकरी संघटनेने कापूस उत्पादकांचे आंदोलन सुरु केले. यामध्ये विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा या जिल्ह्यात आणि मराठवाडयामध्ये परभणी व नांदेड या जिल्ह्यामध्ये शेतकरी संघटनेने 'रास्ता रोको' आंदोलन केले. या आंदोलनात खुप मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा सहभाग असताना देखील शांततेत पार पडले त्यापुढच्या टप्यात कृत्रीम धाग्याची वस्त्र घालणाऱ्या प्रवाशांना अडविणे व त्यांच्या कापडावर संघटनेचा शिक्का मारणे असा कार्यक्रम आखण्यात आला तसेच रेल रोकोचाही निर्णय घेण्यात आला. त्यामुळे ८ ते १० हजार शेतकऱ्यांना अटक देखील करण्यात आली. सरकारने हे आंदोलन संपविण्याचे आटोकाट प्रयत्न केले. कापूस उत्पादकांचा पुढचा टप्पा कृत्रीम धाग्याच्या वस्त्राची खरेदी विक्रीपासून परावृत्त करण्याकरिता दुकानांसमोर पिकेटिंग करणे हा होता. परंतु हे आंदोलन सुरु होण्यापूर्वीच शासनाने शेतकरी मागत असलेली कापसाची किंमत मान्य केली तसेच एकाधिकार कापूस खरेदी योजना व निर्यातवाढ यासंबंधिच्या संघटनेच्या मागण्या मान्य केल्या.

कर्जमुक्ती आंदोलन (१९८८-८९)

शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची लुट होते. अशा तुटीचा धंदा करण्यासाठी सरकार जे कर्ज देते त्याची परतफेड करणे शेतकऱ्यांना जवळपास अशक्य आहे म्हणून शेतकऱ्यांना या कर्जातून मुक्त करावे असा दृष्टिकोन कर्जमुक्ती आंदोलनामागे होता. हे आंदोलन रस्त्यावर उतरुन लढायचे नव्हते तर ते न्यायालयात लढायचे होते. शेतकरी संघटनेने गावोगावी शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे अर्ज वाटून ते भरुन घेऊन न्यायालयामध्ये दाखल केले व कर्जवसुलीवर स्थगिती आणली. ही न्यायालयीन लढाई बऱ्याच दीर्घकाळपर्यंत चालली दरम्यान केंद्र सरकारने व नंतर राज्य सरकारनी कर्जमाफीची योजना मंजुर केली.

महाराष्ट्रामध्ये १९८० ते १९९० च्या दरम्यान याव्यतिरिक्त तंबाखू आंदोलनाची देखील सुरुवात झाली तसेच शेतकरी संघटनेने अनेक मेळावे, परिषदांचे देखील आयोजन केलीत व यामधूनच वेगवेगळया आंदोलनांना दिशा मिळत गेली. वरील आंदोलनापैकी दुध आंदोलन वगळता सर्व आंदोलने ही यशस्वी झालीत याचे श्रेय खऱ्या अर्थाने शेतकरी संघटनेच्या एकजुटीला व एकात्मतेला जाते.

आधुनिक कृषी व्यवस्था :

सर्व राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांच्या भाषणामध्ये सातत्याने भारत हा कृषीप्रधान देश आहे असे शब्द आपल्या कानावर पडतात. परंतु याच राजकीय व्यवस्थेने आपल्या कृपीप्रधान देशातील कृषी व्यवस्थेकरिता काय केले याचा विचारही तेवढाच महत्त्वाचा आहे. जर कृषीप्रधान देशासाठी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती ही चांगली असावयास हवी होती. त्यांचे जीवनमान उंचावयास पाहिजे होते परंतु मात्र परिस्थिती फार वेगळी आहे. मागील २०-२५ वर्षात तर शेतकऱ्यांची स्थिती अतिशय खालावलेली असून मराठवाडा, विदर्भातील अनेक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आणि त्या आत्महत्यांमध्ये सतत वाढ होताना दिसून येत आहे.शेतीसंदर्भात शासकीय पातळीवर कोणतेही सरकार गंभीर असल्याचे दिसून येत नाही. जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, जागतिक व्यापार संघटना यांचेही भारतीय कृषी अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झाले.

१९९७ पासून जागतिक पातळीवर भारताची ओळख ही कापूस आयातदार देश म्हणून होऊ लागली. आपल्या देशातील पंचविस हजार कापूस उत्पादकांना दरवर्षी सरासरी ३ अब्ज डॉलरपेक्षा अधिक अनुदान देणाच्या अमेरिकेतून कापूस भारतात येणार असेल तर या विषम स्पर्धेत भारतीय कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा निभाव कसा लागणार व कापसात असलेली जागतिक मंदी मोठ्या प्रमाणात अनुदानीत कापूस आयात होणार अशा परिस्थितीत भारतीय शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही या कचाट्यामध्ये तो कसा तग धरणार ? साधारणतः १५ वर्षापूर्वी ५० ते ६० टन गव्हाची आयात केल्या गेली. गव्हावरचे आयात शुल्क हटविण्यात आले. गव्हाच्या आयातीचे मुक्त परवाने देण्यात आले. देशात दरवर्षी सरासरी ५० ते ६० लाख टन खाद्यतेलाची आयात होते त्याकरिता पंधरा हजार कोटी रुपयाचे परकीय चलन मोजल्या जाते. डाळीच्या आयातीतही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.. उलट मक्याचे भाव थोडेबहुत वाढल्याबरोबर मक्यावर निर्यातबंदी लादल्या जाते. कांदा महाग झाल्याबरोबर 'कांद्याने आणले डोळयात पाणी' म्हणून हाकाटी होते. चीन व पाकिस्तानमधून तात्काळ कांदा आयात केला जातो. परंतु कांदा जेव्हा स्वस्त होतो तेव्हा कोणाच्याच डोळयात पाणी येत नाही.

भारत हा कृषीप्रधान देश आहे असे आपण सगळेजण म्हणत असतो परंतु स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर कर्मचाऱ्यांकरिता सातवा वेतन आयोग येतो परंतु शेतकऱ्यांसाठी एकच राष्ट्रीय शेतकरी आयोग आणि त्यांच्याही शिफारशीला केराची टोपली दाखविली जाते.

आज भारतीय शेतीवर चारही दिशांनी मारा होताना दिसतो आहे तो थोपविण्याकरिता आम्ही प्रयत्न करीत नाही तर त्यावर वरपांगी मलमपट्टी करण्याचे काम करतो. आजही शेतकऱ्यांच्या जीवावर येईपर्यंत आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो व त्यानंतर उलट्या बोंबा मारणे चालू करतो. (उदा. व्यसनाधिनता, कर्जबाजारीपणा, मुलीचे लग्न, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी) यामुळे शेतकरी आत्महत्या करतो. परंतु अनेक वर्षापासून ठोस पावले उचलली नाहीत तर उलट नवनवीन कायदे करुन त्यांना फसविण्याचेच प्रयत्न करीत आहोत. आजची आमच्या शासनाची निती ही शेतकरी विरोधी असून भांडवलशाही धार्जिने असल्याचे दिसून येते. त्यामुळेच आज आमच्या शेती व्यवसायावर फार मोठी संकटे येत आहेत.

प्रमुख निष्कर्ष

१) महाराष्ट्रामध्ये १९८० ते १९९० च्या दरम्यान झालेले आंदोलन (दुध आंदोलन वगळता) यशस्वी झाली.
२) महाराष्ट्रातील आंदोलन यशस्वीतेकरिता शेतकरी संघटनेची महत्त्वाची भूमिका आहे.
३) महाराष्ट्रातील १९८० ते १९९० च्या दरम्यानातील आंदोलनामध्ये उत्फुर्तपणे शेतकऱ्यांच्या प्रतिसाद फार मोठ्या प्रमाणात मिळाला.
४) आधुनिक कृषी व्यवस्था व सरकारची धोरणे कृषी व्यवस्थेकरिता मारक असून भांडवलदारांना पुरक आहे.

संदर्भग्रंथ सूची

१) शहा, घनश्याम (२००८). भारतातील सामाजिक चळवळी. पुणे, डायमंड पब्लिकेशन.
२) देवगांवकर, एस. जी., देवगांवकर, शैलेजा आणि डुमरे, जयमाला (२००९). सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन. नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.
३) भोळे, भाष्कर (२००६). शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे समाजशास्त्र. संपादक परिवर्तनाचा वाटसरु अंक दिपावली.२०
४) कांबळे, सी. टी. आणि पबळे, टी. एस. (२०१०). भारतातील सामाजिक चळवळीची रुपरेषा. नांदेड, क्रिएटिव्ह पब्लिकेशन.
५) कच्छवे, मारोती (२०१३). भारतीय शेती व जागतिकीकरण. परभणी, न्यु मॅनपब्लिकेशन्स.
६) ढोबळे, विष्णू (२००९). शेतकऱ्यांच्या आत्महत्या जागतिकीकरणातील शोकांतिका. पुणे : सुगावा प्रकाशन.
७) देशमुख, सदानंद (२००२). बारोमास, पुणे कॉन्टीनेंटल प्रकाशन.

*कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदरा, जी.अमरावती. harishpetkar@gmail.com

***

"लिंब गावातील रासायनिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे व्यष्टी अध्ययन"

*डॉ.राज चव्हाण
**कु.वैष्णवी कमलेश सावंत
***कु.पूर्वा शंकर मापारी

घोषवारा

कृषीप्रधान देश म्हणून भारताला सर्व जगात ओळखले जाते देशातील 75 टक्के जनता शेती व्यवसायावर अवलंबून आहेत लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती असून भारतातील उद्योगधंदे त्यावर अवलंबून आहेत 1921 नंतर भारताची लोकसंख्या वाढत गेली उत्पादन कमी पडू लागली तेव्हा पारंपारिक पद्धतीने केली जाणारी शेती रासायनिक पद्धतीने केली जाऊ लागली पारंपारिक शेतीला सेंद्रिय शेती असे म्हणतात सर्वप्रथम अमेरिकेत हरित क्रांती झाली डॉक्टर बोरलॉग यांनी शेतीमध्ये रासायनिक खते कृत्रिम कीटकनाशके सुधारित बि-बियाणे यांचा वापर करून उत्पादन काढण्यास सुरुवात केली नंतर हरितक्रांतीचे वारे जगभर वाहू लागले इसवी सन 1960 चा दशकात शेती संशोधन विकास तंत्रज्ञानाच्या मदतीने भारतात कृषी उत्पादन वाढले हा काळ भारतातील हरितक्रांती म्हणून ओळखला जातो हरित क्रांतीमुळे कृषी उत्पादन लक्षणीय वाढ झाली अन्नधान्य उत्पादनात मोठी वाढ झाली हरित क्रांतीचा मोठा फायदा गव्हाच्या धान्याला झाला पूर्वी भारतात सेंद्रिय शेती पूरक परिस्थिती होती परंतु हरित क्रांतीनंतर भारतामध्ये रासायनिक शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा कस वाढला रासायनिक शेतीचा मानवाच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागला मानवाची रोगप्रतिकारक शक्ती कमी पडू लागली व लोक रोगांना बळी पडू लागले अधिक उत्पादन मिळावे यासाठी रासायनिक खतांचा कीटकनाशकांचा तणनाशकांचा अतिरेकी वापर झाला उत्पादन वाढले परंतु या गोष्टीचा फायदा बरोबरच मानवाला अनेक दुष्परिणाम ही भोगावे लागले.

मुख्य शब्द: मानवी विकास, पर्यावरण संवर्धन, रासायनिक खतांचा दुष्परिणाम

प्रस्तावना:

आज सर्व जगामध्ये भारताचे कृषिप्रधान देश म्हणून ख्याती पसरलेले आहे इतर देशातील तुलनेमध्ये भारताने कृषी तंत्रज्ञान आणि त्याचबरोबर कृषी संशोधन मोठ्या प्रमाणात प्रगती घडवून आणले आहे भारतातील बऱ्याच राज्यांमध्ये कृषी विद्यापीठ उभारण्यात आली आहे जेणेकरून त्यांची मदत ची मदत ही कृषी व्यवस्थापनाचा दर्जा सुधारण्यासाठी होईल भारत हा कृषी क्षेत्रामध्ये दिवसेंदिवस प्रगती करताना आपल्याला पाहायला मिळत आहे आणि हा एक चांगला मापदंड आहे.

प्राचीन काळाचा अभ्यास केला तर आपल्याला असे आढळून येतील की प्राचीन काळामध्ये भूमातेला मातेचे स्थान देण्यात आले आहे त्यामुळे आपण आपल्या जमिनीला भूमाता असे संभवतो जसे की प्राणी पक्षी मानव सारे सजीव आहेत स्वतःचे जीवन जगत आहेत त्याचप्रमाणे आपली भूमाता माती सुद्धा जिवंतच आहे तिच्यामध्ये कोट्यावधी सूक्ष्मजंतू वास्तव करून राहतात म्हणून आपण आपल्या भूमातेला सजीव आहे असे मानतो.

आजच्या 21 व्या शतकामध्ये मानव हा दिवसेंदिवस स्वार्थी होताना आपल्याला दिसत आहे तो स्वतःच्या स्वार्थापोटी शेत जमिनीकडे पर्यायाने आपल्या भूमातेकडे दुर्लक्ष करतो मोठ्या प्रमाणावर पिक काढून उत्पन्न मिळवण्यासाठी आज मानव मोठ्या प्रमाणावर रासायनिक शेतीच्या दिशेने आपली पावले टाकताना आपल्याला पाहायला मिळत आहे प्राचीन काळापासून चालत आलेल्या सेंद्रिय शेती पासून मानव आज दूर जाताना दिसत आहे सेंद्रिय शेतीचा अवलंब करून त्या शेतीतून उत्पन्न घेऊन त्याचा साऱ्या मानव जातीला पुरवठा करणे हे काम करणे हे आजच्या वाढत्या लोकसंख्येच्या जगामध्ये शक्य नाही हे खरे असले तरीही रासायनिक शेतीमुळे होणारे दुष्परिणाम देखील तेवढेच जास्त भयानक आहे.

रासायनिक शेती:

रासायनिक शेतीची व्याख्या: "रसायनाचा वापर करून केलेली शेती म्हणजे रासायनिक शेती होय"

रासायनिक शेती म्हणजे अजैविक साधनांचा वापर करून औषध खते तयार करणे व त्यांचा उपयोग शेतीसाठी करणे फक्त सेंद्रिय पदार्थांचा वापर करून मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढीला मर्यादा येतात कारण मातीतील अन्नद्रव्यांचा उपलब्धता हाच प्रमुख अडसर आहे यावर मात करण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करून अन्नद्रव्ये सहजपणे उपलब्ध करून दिली जातात आणि उत्पादन वाढविले जाते याचबरोबर रोग आणि किडींच्या नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशके आणि रोग नाशके वापरले जातात अशा प्रकारच्या रासायनिक शेती पद्धतीत काही काळ उत्पादन वाढलेले दिसते परंतु उत्पादित धान्याची गुणवत्ता कमी झालेला दिसून येते याशिवाय धान्यामधून मानवाच्या शरीरात जाणारी रासायनिक द्रव्ये शरीरावर घातक परिणाम करतात. वनस्पतींना आवश्यक असणारे अन्नद्रव्ये दोन प्रकारचे असतात १. मुख्य अन्नद्रव्ये आणि २. सूक्ष्म अन्नद्रव्ये शेणखत कंपोस्ट किंवा इतर भरत खते दिल्यास जमिनीचा पोत सुधारतो जलसंधारण क्षमता वाढते व काही प्रमाणात अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होते सेंद्रिय खतांमुळे मुख्य अन्नद्रव्ये उदाहरणात नत्र स्फुरद आणि पालाश यांची गरज पूर्णपणे भागत नसल्याने रासायनिक खतांचा वापर आवश्यक ठरतो. दुसरे महत्त्वाचे म्हणजे ज्यावेळी भर खते नसतील किंवा कमी प्रमाणात उपलब्ध असतील त्यावेळी सर्व अन्नद्रव्यांचा पुरवठा रासायनिक खतांमधून केला जाऊ शकतो.

संशोधन पद्धती व साधने: प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढीलप्रमाणे संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

अभ्यासविषय: लिंब गावातील रासायनिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे व्यष्टी अध्ययन या प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी सातारा जिल्ह्यातील सातारा तालुक्यातील लिंब गावाची अध्ययनक्षेत्र म्हणून निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) रासायनिक शेतीतील बदलांचा अभ्यास करणे.

२) रासायनिक खतांच्या वापरामुळे मानवी विकासावर होणाऱ्या दुष्परिणामांचा अभ्यास करणे.

३) रासायनिक शेतीच्या पर्यायी उपाययोजनांचा अभ्यास करणे.

संशोधन आराखडा : प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

संशोधनाची गृहीतके : रासायनिक शेतीमुळे मानवी विकासावर आणि पर्यावरणावर दुष्परिणाम झाल्याचे दिसून आले.

नमुना निवड: प्रस्तुत अभ्यासासाठी सातारा तालुक्यातील लिंब गावातील १५ शेतकऱ्यांचा सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे निवड करण्यात आली.

तथ्यसंकलन पद्धती: प्रस्तुत अभ्यासासाठी सातारा तालुक्यातील लिंब गावाचे संशोधन क्षेत्र म्हणून सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे निवड करण्यात आली.अभ्यासाची उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून प्राथमिक स्वरूपाची माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत अनुसूचीच्या साह्याने १५ उत्तरदात्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.तसेच प्रस्तुत संशोधन पेपरसाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला. त्यामध्ये ग्रंथसंपदा, शोधनिबंध, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, वेबसाईट इ. साधनांचा वापर करण्यात आला. उत्तरदात्यांची निवड संशोधनासाठी उपलब्ध कालावधी, श्रम आणि वेळ या सर्व बाबींचा विचार करून माहिती संकलित करण्यात आली.

अभ्यासाचे मुख्य निष्कर्ष:

१) **उत्तरदात्यांचे वय:** उत्तरदात्यांचे वयानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक १ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्रमांक १ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या नमुन्यात ४५ ते ६० वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण सर्वाधिक १२ असून २५ ते ४० वयोगटातील ३ उत्तरदाते आहेत.

२) **लिंग गुणोत्तर:** उत्तरदात्यांचे लिंगगुणोत्तरानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक २ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्रमांक २ वरून असे दिसून येते की निवडलेला उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ८ उत्तरदात्ते पुरुष असून उर्वरित ७ उत्तरदात्या महिला आहेत.

३) **वैवाहिक दर्जा:** उत्तरदात्यांचे त्यांच्या वैवाहिक दर्जा नुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ३ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्रमांक ३ असे दिसून येते की, निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक १२ उत्तरदाते हे विवाहित असून उर्वरित ३ उत्तरदात्या विधवा आहेत.

४) **शैक्षणिक दर्जा:** उत्तरदात्यांचे त्यांच्या शैक्षणिक दर्जा नुसार केलेले वर्गीकरण सारणी क्र. ४ मध्ये दिले आहे.

असे दिसून येते की ९ उत्तरदाते हे १० वी पर्यंत शिक्षण घेतले आहेत. उर्वरित ४ उत्तरदात्यांनी बारावी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे आणि २ उत्तरदाते पदवीधर असून यावरून महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे दिसून आले.

५) **प्रमुख व्यवसाय:** उत्तरदात्यांचे त्यांच्या प्रमुख व्यवसायानुसार केलेले वर्गीकरण सारणी क्रमांक ५ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र.५ वरून असे दिसून येते की ८ उत्तरदाते हे त्यांच्या दुग्ध व्यवसाय बरोबर शेती व्यवसाय करणारे आहेत ५ उत्तरदाते हे फक्त शेती व्यवसाय करणारे आहेत. उर्वरित उत्तरदात्यांमध्ये २ उत्तरदात्ते हे शेतीव्यवसाय बरोबर शेळीपालन व्यवसाय करणारे आहेत.

६) **कुटुंबाचा प्रकार:** उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाच्या प्रकारानुसार केलेली वर्गीकरण सारणी क्र.६ मध्ये दिलेले आहे.

सारणी क्र.६ वरून असे दिसून येते की, निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक ११ उत्तरदाते हे संयुक्त कुटुंबातील होते तर उर्वरित ४ उत्तर जाते हे विभक्त कुटुंबातील होते.

७) **कुटुंबाच्या मालकीची एकूण जमीन:** उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची एकूण जमिनीनुसार वर्गीकरण सारणी क्र.७ मध्ये दिलेले आहे. सारणी क्र. ७ वरून असे दिसून येते की, सर्वाधिक ७ उत्तरदात्यांकडे २ एक्कर स्वतःच्या मालकीची जमीन आहे. ४ उत्तरदात्यांकडे ३ एक्कर शेतजमीन आहे. उर्वरित ४ उत्तरदात्यांकडे ५ एकर जमीन स्वतःच्या मालकीची आहे.

८) **कुटुंबाचे सरासरी एकुण वार्षिक उत्पन्न:** उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्नानुसार केलेली वर्गीकरण सारणी क्र.८ मध्ये दिलेले आहे. सारणी क्रमांक ८ वरून असे दिसून येते की निवडलेल्या उत्तरदात्यांमध्ये बहुसंख्य ८ उत्तरदाते हे २ लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे आहेत. त्या खालोखाल तीन उत्तरदाते हे ४ लाख इतके वार्षिक उत्पन्न असणारे आहेत. ५ लाख वार्षिक उत्पन्न असणारे केवळ तीन उत्तरदाते आहेत.

७ उत्तरदाते हे शेतीमध्ये सोयाबीन, ऊस, गहू, भात, हरभरा ही पिके घेतात. त्या खालोखाल ५ उत्तरदाते हे शेतीमध्ये मका, ऊस, भात, भुईमूग, ज्वारी ही पिके घेतात. उर्वरित ३ उत्तरदाते हे शेतीमध्ये उडीद, चवळी, गहू, ऊस, भात, भुईमूग इ. पिके घेताना दिसून आले.

शेतीला जोड व्यवसाय म्हणून भाजीपाला या उत्पादनामध्ये ९ उत्तरदाते हे कोथंबीर, कारले, दोडका, बिनीस, मेथी हा भाजीपाला घेतात. त्या खालोखाल ५ उत्तरदाते हे घेवडा, पावटा, पालक, मिरची, कोथिंबीर, मेथी हा भाजीपाला घेतात. उर्वरित ४ उत्तरदाते हे दोडका, बिनीस मेथी, कोथिंबीर, टोमॅटो, बटाटा, कांदा इत्यादी भाजीपाला घेतात.

आठ उत्तरदाते हे व्यापारी पिकांमधील उसाचे उत्पादन घेतात. त्या खालोखाल ४ उत्तरदाते हे व्यापारी पिकांमधील सोयाबीनचे उत्पादन घेतात. उर्वरित ३ उत्तरदाते हे व्यापारी पिकांमधील हळदीचे उत्पादन घेतात.

९ उत्तरदाते हे पारंपारिक साधनांमध्ये शेतीच्या मशागतीसाठी बैल आणि पिकांच्या कापणी व मळणीसाठी मनुष्यबळ वापरतात. उर्वरित ६ उत्तरदाते आधुनिक साधनांमध्ये शेतीची मशागत, कापणी, मळणी यासाठी ट्रॅक्टर व ऊस तोडणी मशीनचा वापर करतात.

शेतीसाठी पाणीपुरवठ्याचे स्त्रोत म्हणून ६ उत्तरदाते बोरच्या पाण्याचा वापर करतात. त्या खालोखाल ५ उत्तरदाते विहिरीच्या पाण्याचा वापर करतात. उर्वरित ४ उत्तरदाते कॅनलच्या पाण्याचा वापर करतात.

सायनिक खतांचे प्रकार:

१. **नत्रयुक्त खते:** युरिया, अमोनियम सल्फेट

२. **स्फुरदयुक्त खते:** सुपर फॉस्फेट, डायकॅल्शियम फॉस्फेट

३. **पालाशयुक्त खते:** न्यूरेट ऑफ पोटॅश, सल्फेट ऑफ पोटॅश

४. **दुय्यम खते:** चुना, गंधक, मॅग्नेशियम

५. **सूक्ष्म अन्नद्रव्ये:** जस्त सल्फेट, मोरचूद, हिराकस, मॅग्नीज, सल्फेट झेरॉक्स अमोनियम, माऊली एडिट

रासायनिक खतांचे दुष्परिणाम:

१. शेत जमीन नापीक होणे:

कोणतेही रासायनिक खते जसेच्या तसे पिकाला लागत नाही सूक्ष्मजीवाण द्वारे अथवा इतर घटकांमुळे रासायनिक खतांचे विघटन होते आणि पिकाला घेता येईल अशा प्रकारात ते पिकाला मिळते सर्वच खत पिकाला लागत नाही काही खतांचे विघटन न झालेला भाग शेत जमिनीत तसाच राहतो आणि असा वापर न झालेल्या भाग जमिनीत असलेल्या इतर मूलद्रव्यांबरोबर संयोग होतो अशा प्रकारे शेतजमीनत क्षार तयार होतात आपण शेत जमिनीच्या वरच्या भागात किंवा पृष्ठभागावर पांढरा रंगाचा पट्टा दिसून येतो हा पट्टा क्षारांचा तयार झालेला असतो तितका शेत जमिनीचा भाग हा नापिक होत असतो पंजाब मध्ये फार मोठा शेत जमिनीचा भाग हा रासायनिक खतांचा वापरामुळे नापीक झालेला आहे.

२. जमिनीतील पाण्याचे जलप्रदूषण:

पिकाला खत दिल्यानंतर पाणी देण्याची पद्धत आहे बरीचशी खते पाण्यात विरघळतात पाण्याच्या जमिनीत निचरा होत असतो त्या पाण्याबरोबर खतांचाही निचरा होतो जास्त पाणी दिले गेले तर हळूहळू हे खत मिश्रित पाणी जमिनीच्या आतील जलसाठ्यात मिसळते अशा प्रकारे या पाण्याची प्रदूषण होते ही प्रक्रिया संतपणे सुरू असते काही वर्षानंतर ज्यावेळी दुष्परिणाम होतात त्यावेळी आपल्याला कोणताच कारण सापडत नाही पाण्याचा सामू वाढतो आणि असे पाणी शेतीसाठी उपयुक्त राहत नाही.

३. मानवी शरीरावरील परिणाम:

भारतात रासायनिक खतांचा आणि रासायनिक औषधांच्या कीटकनाशके जंतुनाशके इत्यादी वापरावर कोणतेही बंधन नाही आणि असले तरी ते कागदोपत्रीच आहे किती प्रमाणात तसेच किती वेळा रासायनिक औषध वापरायचे कोणतेही नियम भारतात नाही त्यामुळे बऱ्याच वेळा प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक वीस पिकावर फवारले जाते आणि नाही म्हणावे तरी या औषधांच्या अंश फळ किंवा भाजीपाला इत्यादी यात येतोच असे फळ किंवा भाजीपाला आपल्या शरीरात गेल्यावर त्याचा हळूहळू फरक आपल्यावर दिसून येतोच याला slow poisoning म्हणतात आणि काही वर्षात आपण अशा आजारांमध्ये सापडतो की तिथून ठीक होणे नाहीच कर्करोग, हृदयरोग इत्यादी यांची संख्या आज काल खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येते आहे कर्करोगाच्या बाबतीत तर भारत संपूर्ण जगात प्रथम क्रमांकावर आहे ही सगळ्यात धोकादायक बाब आहे.

४. शेतीचा उत्पादन व खर्चात झालेली वाढ:

पाच-दहा वर्षांपूर्वी एखादा शेतकरी जितके रासायनिक खतांचा वापर करत होता त्यामुळे जास्त त्याच शेतात वापर करतो आणि त्या मानाने उत्पादनात वाढ न होता काही वेळा तर कमी झालेले असते म्हणजेच पाच दहा वर्षापूर्वी पेक्षा आजचा उत्पादन खर्च वाढलेला आहे त्या पटीने शेतमालाचे भाव वाढलेले नाही कोणताही व्यवसाय फायद्यात आणण्यासाठी उत्पादन खर्च कमी केला जातो फक्त रासायनिक खते औषधांचा वापर केला तर उत्पादन खर्च कमी नव्हता तो वाढत जाणार आणि अशी शेती फायदा देणे जवळजवळ अशक्यच याशिवाय रासायनिक खते औषधांची किंमत ही खूप जास्त असते या उलट सेंद्रिय खते औषधांची किंमत ही स्वास्थ असते.

या सर्व कारणांमुळे रासायनिक खतांच्या आणि औषधांच्या वापराची शेती पद्धती आपणास बदलणे अपरिहार्य आहे कितीही दुष्परिणाम असले तरी कोणतेही सरकार नोटबंदी प्रमाणे रासायनिक खते औषधांवर बंदी आणू शकत नाही यासाठी एकच पर्याय राहतो तो म्हणजे सेंद्रिय शेती बद्दल जनजागृती करणे ही जनजागृती या घडीला बऱ्यापैकी झालेली आहे.

उपाययोजना:

१. रासायनिक शेतीमुळे मानवी विकासावर होणाऱ्या दुष्परिणाम टाळण्यासाठी सेंद्रिय शेती हा सर्वात महत्त्वपूर्ण उपाय आहे

२. रासायनिक शेतीतील अधिक उत्पादनाचा फायदा बघण्यापेक्षाही पारंपारिक सेंद्रिय शेती करून कमी उत्पादन व गुणवत्तादर्शक चांगले आरोग्य टिकविणे महत्त्वपूर्ण आहे.

३. रासायनिक शेतीसाठी अधिक पैसा खर्च करण्याऐवजी कमी खर्चात होणारी सेंद्रिय शेती करण्यावर भर दिला पाहिजे.

४. रासायनिक शेतीसाठी आधुनिक तंत्रे सर्वच शेतकऱ्यांना परवडणारी नाहीत त्यामुळे पारंपारिक तंत्राचा वापर करून सेंद्रिय शेतीकडे शेतकऱ्यांनी वळले पाहिजे.

५. रासायनिक खताचा शरीरावर होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी सेंद्रिय शेतीसाठी तयार केलेल्या खताचा वापर वाढविला पाहिजे.

६. रासायनिक शेतीमुळे होणाऱ्या रोगांना थोपविण्यासाठी सेंद्रिय शेतीतून आरोग्य व आयुर्मान उत्तम रहावे सेंद्रिय शेती महत्वपूर्ण मार्ग आहे.

७. रासायनिक शेतीमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्या टाळण्यासाठी सेंद्रिय शेती केली पाहिजे. पर्यावरणाचा समतोल आणि जैवविविधता सुरक्षित व विषमुक्त रहावी यासाठी सेंद्रिय शेती काळाची गरज बनली आहे.

८. जमिनीची सुपीकता व जिवाणूंची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक शेती ऐवजी सेंद्रिय शेती करण्यावर भर दिला पाहिजे

९. आपण आपल्या मानवी हिताचा विचार करून सेंद्रिय व जैविक शेती पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

१०. कमीत कमी खर्च करून जास्तीत जास्त उत्पन्न व जमिनीचा स्तर टिकवण्यासाठी जैविक शेती उत्तम पर्याय व वातावरण बदलण्याच्या संकटाशी मुकाबला करता येणारा घटक आहे.

११. विषमुक्त दर्जेदार अन्नोत्पादन घेण्यासाठी नैसर्गिक निर्विष्ठा तयार करण्यासाठी शेतीमुळे अनेकांना रोजगार मिळतो.

१२. शेतीसाठी नैसर्गिक संसाधने वापरल्यामुळे जमिनीचा पोत सुधारेल आणि मानव जातीला विषमुक्त अन्न मिळायला मदत होईल.

निष्कर्ष:

१. संकरित बियाणांमुळे जे आपले पारंपरिक बियाणे यांच्या जाती नष्ट होऊ लागले आहेत.

२. रासायनिक खतांच्या माऱ्यामुळे जमिनीची सुपीकता घसरली आहे. जमिनीतील खनिजे, अवश्य घटक नष्ट होऊ लागले आहेत. जमिनीतील शेतकऱ्यांचा मित्र गांडूळ नष्ट झालेले आहेत.

३. परागीकरणासाठी आवश्यक असलेल्या विविध कीटक पशुपक्षी व कीटकांचा कीटकांच्या जाती ही नामशेष होऊ लागले आहेत.

४. रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे प्रमुख खत उत्पादक कंपन्यांनी खतांच्याही किमती वाढवल्या आहेत.

५. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापराने भूजलाचे प्रदूषण ही वाढले आहे.

६. त्याचे दुष्परिणाम जाणवू लागले आहेत. कृषी नियोजनाचे खत आणि कीटकनाशकांच्या वापराविषयी स्पष्ट धोरणे नसल्याने शेतकरी मार्गदर्शनाअभावी दिशाही पद्धतीने रासायनिक खतांचा वापर करून शेती करू लागला आहे.

७. रासायनिक खतांच्या वापरामुळे पिकांना पाणीही मोठ्या प्रमाणात द्यावे लागते साहजिकच त्यामुळे जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढले आहे.

८. एकीकडे रासायनिक खतांचा अतिवापर तर दुसरीकडे पिकाला भाव मिळत नाही यामुळे भारतीय शेती उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.

९. अतिवापरामुळे बागायती जमणे खारघटून नापीक झालेले आहेत अधिक उत्पादनाच्या हव्यासापोटी संकरित वाहनांचा वापर वाढला आहे यामुळे रोगप्रतिकारक्षमता अतिशय कमी झाली आहे याचा आरोग्यावर देखील गंभीर परिणाम झाला असल्याचे दिसून येते.

१०. रासायनिक शेतीत रासायनिक खते आणि यंत्रसामग्रीचा वापर वाढवल्यामुळे जनावरांची संख्या घटत चालली आहे.

सारांश:

कृषीप्रधान असलेल्या भारतात हरितक्रांतीनंतर आज शेतजमिनी समोरील एक आव्हान म्हणजे क्षारपड जमीन तसेच शेतीवर होत असलेली रासायनिक खते व कीटकनाशकांचा भरमसाठ वापर. रासायनिक शेतीचा मानवाच्या

आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागला. मानवाची रोगप्रतिकारक शक्ती कमी पडू लागली व लोक रोगांना बळी पडू लागले. अधिक उत्पादन मिळावे यासाठी रासायनिक खतांचा कीटकनाशकांचा तणनाशकांचा अतिरेकी वापर झाला. उत्पादन वाढले परंतु या गोष्टीचा फायदा बरोबरच मानवाला अनेक दुष्परिणाम ही भोगावे लागले. या सर्व कारणांमुळे रासायनिक खतांच्या आणि औषधांच्या वापराची शेती पद्धती आपणास बदलणे अपरिहार्य आहे. कितीही दुष्परिणाम असले तरी कोणतेही सरकार नोटबंदी प्रमाणे रासायनिक खते औषधांवर बंदी आणू शकत नाही. यासाठी एकच पर्याय राहतो तो म्हणजे सेंद्रिय शेती बद्दल जनजागृती करणे. ही जनजागृती या घडीला बऱ्यापैकी झालेली आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होऊन नैसर्गिक निर्विष्ठान पीक निरोगी व उत्पादन भरपूर मिळेल. धान्य विक्री, भाजीपाला विक्री व फळ विक्री यासाठी यांच्यासाठी कृषी व्यवस्था टिकणे अत्यावश्यक आहे त्यामुळे जैविक शेती करणे ही काळाची गरज बनली आहे.

संदर्भ:

१.कराडे, जगन, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पुणे.,२००८.

२. धनागरे, द. ना, संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००५.

३.कोसंबी डी.डी, प्राचीन भारतीय संस्कृती आणि सभ्यता, डायमंड प्रकाशन पुणे, २००६.

४.पाटील मोहन, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.

५. घाटोळे रा ना, ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास मंगेश प्रकाशन, नागपूर, २०००.

www.shetkariguru.com

www.agriplaza.in

www.loksatta.com

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त) घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,सातारा मो. ९६५७८४०९४७ Email ID: rajsoniya114@gmail.com

**वर्ग : बी. ए.भाग १ ***वर्ग : बी. ए.भाग १

***

पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन काळाची गरज

*प्रा. डॉ. प्रतिभा रंगराव बिरादार

गोषवारा -

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये आर्थिक विकास, लोकसंख्या वाढ आणि पर्यावरण प्रदूषण यामुळे जगातील बहुतेक देशात नैसर्गिक साधन संपत्तीचा वेगाने ऱ्हास होत आहे. त्यामुळे विविध पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. भविष्यामध्ये अशीच परिस्थिती राहिल्यास मानवाला जीवन जगणे अवघड होईल. मानवावर पर्यावरणाचा जसा प्रभाव पडत असतो तसाच मानवी क्रियांचा प्रभाव पर्यावरणावर पडत असतो. आपल्या सभोवतालच्या पर्यावरणातील अयोग्य विघातक बदलामुळे सजीवांच्या कार्यक्षमतेत घट होत आहे.पर्यावरण रक्षणासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन पर्यावरणाचे रक्षण तसेच संवर्धन करणे ही काळाची गरज आहे कारण माणसाने स्वतः धोकादायक परिस्थिती निर्माण करून विनाशाकडे वाटचाल सुरू केली आहे दूषित हवा, अन्न यामुळे मानवाचे आरोग्य ढासळत चालला आहे.प्रदूषणाला आळा घालून पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे . पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करून वसुंधरा बचत हे आता लोक चळवळ उभी राहिली आहे. "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...."हा संदेश संतांनी रयतेला दिला आहे. वृक्ष ही वसुंधरेची फुफुसे असून याच फुफसांच्या माध्यमातून आपणाला जगण्यासाठी आजीवन प्राणवायू मिळत असतो. म्हणून "झाडे लावा झाडे जगवा" ही मोहीम तन-मन-धना ने राबवली जाणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर आज पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाच्या संदर्भात जनजागृती केले जात आहे. विविध योजनांच्या माध्यमातून, कायद्याच्या माध्यमातून, स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पर्यावरणवादी चळवळ आज पुढे येत आहे. वर्तमान व भविष्य काळातील पिढीसाठी पर्यावरण जतन करणे ही काळाची गरज ठरली आहे. भारतामधील चिपको, टेहरी व नर्मदा हे आंदोलन पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

मुख्य शब्द - पर्यावरण, प्रदूषण, संरक्षण, संवर्धन, चळवळ, कायदा, योजना.

प्रस्तावना -

वैदिक संस्कृतीमध्ये पर्यावरण विषयक जागरूकता असलेले दिसून येते. चरकसंहितेत पाण्याची शुद्धता राखण्यासाठी अनेक सूचना दिल्या आहेत, तसेच हडप्पा आणि मोहंजोदारो काळातील पुरातत्वीय पुराव्यावरून देखील त्या काळातील पर्यावरण व स्वच्छता आणि स्वच्छते बद्दलची जागरूकता दिसून येते. भारतामध्ये निरनिराळे सांस्कृतिक सण साजरे केले जातात यामध्ये कुठे ना कुठेतरी निसर्गाचा समावेश केलेला असतो निसर्गातील घटकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे हे सण आहेत सणामागचा उद्देश लक्षात ठेवून पर्यावरण संवर्धन व संरक्षण करावे. पर्यावरणातील प्रत्येक घटकाचे रक्षण करणे संवर्धन करणे हे मूल्य जोपासणे गरजेचे आहे.पर्यावरण जनजागरण हे जैन धर्माच्या शिकवणीतून दिसून येते. 24 वे तीर्थकार भगवान महावीर यांनी म्हटले होते की 'माणसाने माणसाची हत्या करणे ही हिंसा आहे आणि म्हणूनच ती करू नये तसेच वृक्षवेली यांना देखील इजा पोहोचू नका कारण ती ही एक हिंसाच असेल'.पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन हे मानव जातीला भगवान महावीराने एक प्रकारचा संदेश दिला आहे.एकविसाव्या शतकात ज्या अनेक संकटाला तोंड द्यावे लागत आहे त्यापैकी सर्वात मोठे संकट म्हणजे पर्यावरण प्रदूषण होय. पर्यावरणाचा असमतोल हा जागतीक समस्या बनली आहे. नैसर्गिक व मानवनिर्मित पर्यावरण समस्या सोडवण्यासाठी जगातील प्रत्येक देश वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करीत आहेत. वाढते शहरीकरण हे एक पर्यावरणाचे महत्त्वाचे कारण आहे. नागरिकरण हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जात असला तरी आज प्रत्यक्षात नागरिकरण्याच्या विस्ताराने अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहे.संरक्षण आणि संवर्धन या दोन्ही संकल्पना वेगळे असूनही परस्पर संबधितआहे. संरक्षण म्हणजे निसर्गाचा ठेवा जतन करणे, त्याचा विनाश नियंत्रित करणे, त्यासाठी वेगवेगळ्या योजना तयार करून त्या कारणीभूत करणे आणि संवर्धनाचा अर्थ पर्यावरणीय घटकांचे जतन करून त्यात वाढ करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे असा होतो.पर्यावरणाला प्रदूषण आणि शोषणापासून वाचविण्याच्या प्रक्रियेला पर्यावरण संवर्धन म्हटले जाते .

संशोधनाचा उद्देश

1. साहित्याचा आढावा घेणे.
२.पर्यावरणाची सद्यस्थिती स्पष्ट करणे.

३.पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणासाठी शासकीय तरतुदींचा आढावा घेणे.
४.पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी लोकसहभाग चळवळीचा आढावा घेणे.
५.मिळालेल्यातथ्यांच्या आधारे निष्कर्ष मांडणे व उपाय सुचविणे.

• तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधन पेपर तयार करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा आधार घेण्यात आला. यामध्ये पुस्तके, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, मासिके ,इंटरनेट इत्यादी .माध्यमातून तथ्य संकलित करण्यात आले

• गृहीतकृत्य

१. मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाची साखळी विस्कळीत होत आहे.
२. पर्यावरण संरक्षण व संवर्धन काळाची गरज आहे.
३. पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी लोकसहभाग हा महत्त्वाचा आहे.

पर्यावरणीय समस्या–

मानवाने आपल्या बुद्धी कौशल्याच्या जोरावर विज्ञान तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मोठमोठे कारखाने उद्योग व्यवसाय दळणवळणाची साधने निर्माण करत असताना पर्यावरणाचा समतोल बिघडून टाकला आहे. मानवाच्या वाढत्या लोकसंख्येमुळे नागरिकरणाचा वेग वाढून प्रादेशिक पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. औद्योगीकरण, बेसुमार जंगलतोड , कॉंक्रेट जंगलाची निर्मिती, यातून निर्माण होणारे घातक रसायने, विषारीवायू, सांडपाणी इत्यादी घटकामुळे परिसंस्थेचा समतोल बिघडत आहे.विषारीवायूमुळे पृथ्वीवरील सर्वसाधारण तापमानातील वाढ,ओझोनचाक्षय, यासारख्या गंभीर जागतिक प्रश्नाला सामोरे जाण्याची वेळआज मानवावर आली आहे. अविघटनकारी रासायनिक द्रव्याचा अन्नसाखळीतील प्रवेशामुळे पर्यावरणास हानी पोहोचत आहे. राष्ट्रा राष्ट्रातील सत्ता स्पर्धा यातून केला जाणाऱ्या अनुचाचण्या,अनुस्फोट पर्यावरणाच्या हानीस पोषक ठरत आहे.

१. ओझोनचा विरळ थर-

जमिनीपासून सुमारे 35 किलोमीटर अंतरावर असणाऱ्या तीन मिलिमीटर ऑक्सिजनचा दाट थर म्हणजे ओझोनचा थर होय. सूर्यापासून निघणारे अतिनील किरणे या ओझांच्या थरामुळे पृथ्वीवर पोहोचू शकत नाही. औद्योगीकरण, ग्लोबल वार्मिंग, वाळवंटामध्ये वाढ, ग्रीन हाऊस इफेक्ट, जंगलाचे कमी प्रमाण, जैवविविधता कमी, कचऱ्याची विल्हेवाट इत्यादी अनेक कारणामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे निर्माण होणाऱ्या फ्लोरोकार्बन (सीएफसी) च्या वाढत्या प्रभावामुळे ओझोनचा थरावर मोठा विपरीत परिणाम होत आहे.ओझोन वायूचा थर कमजोर होऊन मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे.

२. ग्लोबल वार्मिंग-

पृथ्वीच्या तापमान वाढीला ग्लोबल वार्मिंग असे म्हणतात. मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गचक्रात परिवर्तन होऊन पृथ्वीवरील तापमान वाढत चलले आहे याचा परिणाम म्हणून उत्तर व दक्षिण ध्रुवावरील लाखो किलोमीटर पसरलेले बर्फाचे थर वितळण्यास सुरुवात होऊन समुद्राच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. नद्यांना पूर येतात त्याचा फटका नद्या काठच्या गावांना होत आहे.

३. वाळवंटामध्ये वाढ-

पृथ्वीच्या 20% भाग हा जमिनीचा आहे. या पृष्ठभागातील दोनतृतीयांश भाग हा वाळवंट किंवा पर्वतांनी आच्छादलेला आहे. इ.स.1945 पासून तीन अब्ज एकर जमिनीची उत्पादन क्षमता जवळजवळ सर्व नष्ट झालेली आहे. दरवर्षी जवळजवळ 15 दशलक्ष एकर जमिनीची उत्पादकता नष्ट होऊन तिचे वाळवंटीकरण होते. या व्यतिरिक्त पन्नास दशलक्ष एकर जमिनीचा राज झालेले धान्य किंवा कुरणे उगवणे मुश्कील होते. बेसुमार जंगलतोड व पृथ्वीचे वाढते तापमान यामुळे जमिनीचे वाळवंटात रूपांतर होत आहे शेतीची गरज म्हणून लोक जंगल तोडतात व शेती करतात जगातील सुमारे 35 टक्के म्हणजे 6.1 दशकोटी हेक्टर जमिनीवर वाळवंटाचा प्रभाव वाढला आहे, याचा फटका हा 90 कोटी लोकांना बसला आहे.

४ . जंगलाचे घटते क्षेत्र-

शेती व वाढते शहरीकरण यामुळे जंगलाचे क्षेत्र हे कमी होत आहे. जगात सुमारे 30% असणारे जंगल क्षेत्र आता घटत आहे. ब्राझील, पश्चिम आफ्रिका, दक्षिण पूर्व आशिया खंड येथे घनदाट जंगले दिसून येतात. अमेरिका, ऑस्ट्रेलिया

सारख्या देशांमध्ये लाखो एकर जमिनीवर जंगले वनव्यामुळे बेचिराख झाले आहेत. ग्लोबल वॉर्मिंगमुळे अशा अनियंत्रित आग लागली जाते. भारतीय वन सर्वेक्षण संस्थेच्या नोंदीनुसार 2009 ते 2011 या कालावधीमध्ये देशात एकंदर 367 चौरस किलोमीटर जंगलांचा नाश झाला आहे. भारतातील नैसर्गिक जंगले ही दरवर्षी 1.5 ते 2.7 टक्के या वेगाने घटक चाली आहे.

५. जैवविविधतेत घट-

'जीव जीवस्य जीवनम्' या सुविचाराप्रमाणे एक मोठा जीव दुसऱ्या लहान जीवावर जगत असतो हे निसर्गाचे चक्र आहे. निसर्गाच्या नियमात मानवाने हस्तक्षेप केला आणि निसर्गाची साखळी तुटली. जंगलाची बेसुमार तोड होत गेल्यामुळे अनेक प्रकारच्या वनस्पती ,जीव, जंतू, कीटक हे नाश पावले जात आहे. काही प्रजाती पूर्णपणे नष्ट होताना दिसत आहे. पृथ्वीला समतोल राखणाऱ्या या जैवविविधतेचा ऱ्हास होत असल्यामुळे पर्यावरणाचा देखील मोठा ऱ्हास होत आहे.

६. कचऱ्याचा गंभीर प्रश्न-

प्रगत देशांमध्ये तर कचऱ्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचा आहे.अमेरिका व पाश्चात्त्य देशात मोटारी, दूरसंच,विमाने, बाटल्या, प्लास्टिक आवरणे, कागद थोड्याशा उपयोगानंतर बऱ्याचदा फेकून देतात. संयुक्त संस्थांनात एका पाहनीत दरवर्षी त्याज्ये पदार्थ म्हणून टाकण्यात येणाऱ्या पदार्थाची आकडे दिले आहेत. टिन डब्बे 6000 कोटी टन, काचेच्या बाटल्या 3000 कोटी टन, प्लास्टिक वस्तू 40 लक्षटन, लोहपोलाद वस्तू 1 कोटी टन, 80 लक्ष दूरचित्रवाणी संच, 70 लक्ष मोटारी, तीन कोटी टन कागदी वेस्टने, 228 कोटी टन वाजनाच्या शेतीतल्या त्याज्ये वस्तू, 11 टन औद्योगिक प्रकल्प, 2500 कोटी टन शहरातला कचरा यांची भर पडते. भारतात हे प्रमाण 300 टन आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये दरवर्षी टाकाऊ पदार्थाचे वजन 2 कोटी टन इतके प्रचंड आहेत. त्यामुळे या राष्ट्रात जमिनीच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर आहे. अविकसित व विकसनशील देशात तर कचरा प्रदूषणाचे मापन देखील पुरेसे झालेले नाही.आज कचऱ्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. कोट्यावधी टन कचऱ्याची रोज निर्मिती होत असून त्याची योग्य विल्हेवाट न लावता आल्यामुळे कचरा जमिनीत गाडला जातो व त्या कचऱ्याच्या अंतर्गत प्रक्रिया होऊन त्यातील दूषित घटक जमिनीत मुरत राहतात त्यामुळे भूमी प्रदूषण,जल प्रदूषण ,वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे.

❖ **पर्यावरण संवर्धना व संरक्षणासाठीच्या शासकीय तरतुदी -**

ब्रिटिश काळात भारतात अनेक कायदे केले होते. उदा. समुद्राच्या पाण्याच्या प्रदूषणाविरुद्ध 1853 मध्ये 'किनाराउपद्रव्य कायदा'. तेलामुळे जलप्रदूषण रोखण्यासाठी 1858 मध्ये'मर्चंट शिपिंग कायदा'.1897 मध्ये 'फिशरीज ॲक्ट'.1905 मध्ये 'बंगाल स्मोक उपद्रव्य कायदा' 1912 मध्ये 'बॉम्बे स्मोक उपद्रव कायदा' हे सर्व कायदे ब्रिटिश कालखंडात केले होते मात्र याची योग्य अंमलबजावणी झाले नाही.

पृथ्वीवरील मानव जातीचे अस्तित्वटिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षणव संवर्धन व्हावे या उद्देशाने पाचजून 1972 मध्ये स्वीडन मधील स्टॉक होम येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेमध्ये 130 देशांनी सहभाग घेतला होता. यातून पर्यावरण हा विषयशालेय जीवनापासून अभ्यासक्रमात सामील करण्यात आला. हे पर्यावरण संवर्धनासाठी टाकलेले पहिले पाऊल आहे. जागतिक पातळीवर पाच जून हा दिवस1974 सालापासून जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.तेव्हापासून पर्यावरण समस्येवर उपाय शोधले जाऊ लागले. या स्टॉक होम घोषणेनंतर भारत सरकार पर्यावरण संरक्षणाच्या व्यापक दृष्टिकोनाकडे वळले. भारतात विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागांमध्ये 1972 मध्ये राष्ट्रीय पर्यावरण धोरण आणि नियोजन परिषद स्थापन झाले.1985मध्ये पर्यावरण हेवनमंत्रालयात रूपांतर करण्यातआले.पर्यावरण रक्षण व संवर्धन करण्यासाठी "एंडप्लास्टिक पोल्युशन" हे घोषवाक्य घोषित करुन त्या अनुषंगाने शासकीय यंत्रणेमार्फत प्लास्टिक उत्पादनव वापरावर स्थायी स्वरूपाचे निर्बंध घालण्यात आले. पर्यावरण संरक्षणाच्या संदर्भात केलेले काही महत्वाचे कायदे केले-

१. भारतात वन्य जीवाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने वन्यजीव संरक्षण कायदा 1972 मध्ये हा कायदा करण्यात आला. 2003 मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली.

२. देशात पाण्याची शुद्धता राखण्यासाठी आणि पुनरसंचित करण्यासाठी 1974 मध्ये पाणी प्रदूषण प्रतिबंधक आणि नियंत्रण कायदा करण्यात आला. या कायद्यात 1978 मध्ये व पुन्हा 1988 मध्ये दुरुस्ती करण्यात आली, नंतर ह्या तरतुदी 1986 च्या पर्यावरण संरक्षण कायदा मधील तरतुदीशी सुसंगत झाला.

३. देशातील जंगलाचे संरक्षण करण्यासाठी वनसंवर्धन कायदा 1980 हा कायदा लागू करण्यात आला -

४. वायु (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम 1981 हा कायदा भारतातील वायु प्रदूषण नियंत्रित करण्यास मदत करतो.

५. पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करण्याच्या उद्देशानेपर्यावरण संरक्षण कायदा 1986मध्ये हा कायदा लागू करण्यात आला. हा कायदा भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 253 अंतर्गत लागू करण्यात आला.

६. ध्वनी प्रदूषणाचे हानिकारक परिणाम ओळखूनध्वनि प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम 2000हा कायदा पास करण्यात आला.

७. ओडिएस असलेल्या पदार्थाचे उत्पादन, व्यापार ,आयात आणि निर्यात नियंत्रित करण्यासाठी मुदत निश्चित करण्यासाठी ओझोन कमी करणारे पदार्थ (नियमन आणि नियंत्रण) नियम 2000 हा कायदा पास करण्यात आला.

८. ऊर्जा संवर्धन कायदा 2001 हा कायदा ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि अपव्यय कमी करण्याच्या दिशेने उचलेले एक पाऊल म्हणून लागू करण्यात आला आहे.

९. 1992 मध्ये संयुक्तराष्ट्राच्या 'सीबीडी' करारामध्ये अंतर्भूत केलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी भारतामध्ये जैविक विविधता कायदा 2002 हा कायदा निर्माण करण्यात आला.

१०. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण कायदा 2010

११. घातक कचरा व्यवस्थापन विनियम 2016

१२. कोस्टल रेग्युलेशन झोन अधिसूचना 2018

❖ **लोकसहभागातून झालेल्या पर्यावरण चळवळी –**

लोकसहभागातून पर्यावरण विषयक जगभरात अनेक चळवळी झाल्या त्यामध्ये भारतात चिपको आंदोलन हे सर्वात महत्त्वाचे आहे सुंदरलाल बहुगुणा यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन घडून आले होते. वाढत्या शहरीकरणामुळे जंगले नष्ट करणे याला विरोध म्हणून 1974 मध्ये झाडे तोडू नये म्हणून झाडाला मिठी मारून झाडाचे संरक्षण करणाऱ्या हजारो महिलांनी जगाचे लक्ष वेधून घेतले हे चिपको आंदोलन अत्यंत महत्त्वाचे आंदोलन होते. सुमारे चारशे लोक मृत्युमुखी पडले पण ही चळवळ बंद पडली नाही. राखी पौर्णिमेला झाडांना राख्या बांधून संकेतात्मक उत्सव केला.1981 मध्ये त्यांना पद्मश्री बहाल झाले.सुंदरलाल बहुगुणांकडून मिराबेनने घेतलेल्या प्रेरणातून टेहरी गढवाल प्रदेशात झालेले आंदोलन, पश्चिम घाट बचाव योजना ही एक सामाजिक चळवळ समजली जाते. पश्चिम महाराष्ट्रातील काही लोकांनी एकत्र येऊन सह्याद्रीच्या पश्चिम उताराकडच्या जंगलाचे संरक्षण व संवर्धन करण्याचे ठरविले. श्री. के.सी. श्रॉफ (रासायनिक परिषदेचे माजी अध्यक्ष) यांच्या महत्त्वपूर्ण प्रयोगातून कामटेक फाउंडेशन चे पहिले पारितोषिक लाभले. त्यांनी एक चळवळ म्हणून बडोद्याजवळ रसायन खता कारखान्याच्या जवळ असलेल्या विहिरींच्या सभोवताली विश्वमित्रा नदीतील गढूळ पाणी आणून झाडे वाढविले परिणामी त्यात आटलेल्या विहिरींना कालांतराने पाणी लाभले. महाराष्ट्र सरकारने सहकारी पातळीवर व व्यक्तिगत प्रोत्सनावर सामाजिक वनीकरणाची चळवळ राबवली आहे सरकारने प्रत्यक्षात वनीकरण करण्याऐवजी लोकांकडून ते करून घेतले व आवश्यक तेथे आर्थिक मदत केली. नाशिक जिल्ह्यातील श्री विनायकराव पाटीलयांच्यासारख्या किंवा अहमदनगर जिल्ह्यातील श्री विखेपाटील यांच्यासारख्या प्रगतशील शेतकऱ्यांच्या सहकार्याने ही चळवळ यशस्वी उभी राहिले.

धरण विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी वमोठ्या धरणामुळे नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाचा होणारा ऱ्हास टाळण्यासाठी आज अनेक वर्षश्रीमती मेधा पाटकर यांचे नर्मदा बचा आंदोलन.नर्मदा बचाव आंदोलन हेदेखील एक पर्यावरणीय आंदोलनच आहे. पुण्याचे सुप्रसिद्ध समाजसेवक मोहन धारिया यांनी वनराई संस्था स्थापन करून पर्यावरण संरक्षण महत्त्व पटवून दिले आहे. अहमदनगर हा दुष्काळ जिल्हा म्हणून महाराष्ट्रात ओळखलाजातो.राळेगणसिद्धीच्या अण्णा हजारे यांनी सुद्धा पर्यावरण समतोल राखण्याच्या दृष्टीने देखील अनेक उपक्रम राबवून श्रमदानाचे महत्त्व गावकर्यांना पटवून दिले.स्वतः वृक्षारोपण करून अगदी एक हरित क्रांती घडून आणले.श्री विलासराव साळुंखे (जिल्हा

पुणे) यांना पाणीपंचायतीचे प्रणेते असे म्हणतात. पुणे जिल्ह्यात पुरंदर तालुक्यात नायगाव भागात त्यांनी उपलब्ध पाण्याचा कमाल उपयोग करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे राबविला. त्यांचा स्वीडन देशातर्फे सन्मान करण्यात आला .प्रा.श्री. तुळशीराम जाधव हे नगर जिल्ह्यातील संगमनेरचे सामाजिक कार्यकर्ते असून त्यांनी पाणलोट क्षेत्र विकासाचे महत्त्व लोकांना कळविण्यासाठी जनजागर कार्यक्रम सातत्याने चालविलेला आहे. पथनाट्याच्या माध्यमातून ते जनजागृती करतात.श्री विश्वेश्वरय्या हे प्रसिद्ध स्थापत्य विशारदक होते व त्यांना त्यांच्या सामाजिक पर्यावरणास पूरक कार्याबद्दल भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. धरण बांधल्यानंतर लोक विस्थापित होऊन सामाजिक पर्यावरण बिघडते. श्री विश्वेश्वरय्या यांनी कर्नाटका धरणांच्या योजना राबवण्यापूर्वी धरणाच्या पाण्याखाली जाणाऱ्या वस्त्यांना प्रोत्साहन दिले. गंगा- कावेरी नदी जोडण्याची संकल्पना यांचीच आहे.संत गाडगे महाराज यांच्या प्रेरणेतून ग्राम स्वच्छता अभियान ही चळवळ सुरू झाली. अशाच महान व्यक्तींच्या विचारधारेतून अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ उभी राहिली. श्री.दातरंगे, दाभोळकरव त्यांचे सहकारी गावोगावी जाऊनभाषणे, प्रत्यक्ष प्रयोग व पथनाट्यद्वारे भोंदूगिरीवर आघात करुन, अंधश्रद्धा दूर करून निसर्गातील जैवविविधता टिकून ठेवण्याचा प्रयत्न अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून केला गेला..

❖ **निष्कर्ष व शिफारशी -**

१५ व्या शतकानंतर नवीनतंत्रज्ञानाचाशोध, औद्योगिक क्रांती, वैज्ञानिक क्रांती, आधुनिकीकरण यामुळे कृषी संस्कृतीतील मानवापेक्षा औद्योगिक संस्कृतीच्या मानवाची झेप वेगाने उंचावली. परिणामी मानव आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादाचे रूपांतर विसंवादात होऊ लागले. विकासाच्या वाटचालीत मानवाने निसर्ग पर्यावरण यांच्या मूलभूत नात्याचा विचार न करता नैसर्गिक घटकांचा अमर्याद वापर केला. मानवाच्या स्वार्थीपणा, लोभीप्रवृत्ती ,बेफिक्रे या दुर्गुणामुळे निसर्गाची अतोनात हानी झाली आहे. 19 व्या शतकाकडे वाटचाल करताना मागे वळून पाहिले तर गेल्या 50 वर्षात पर्यावरणाच्या अवमूल्यनास केवळ माणूसजबाबदार आहे हे सिद्ध होते.

1. मानवाचा पर्यावरणातील वाढता हस्तक्षेप तसेच त्याच्या अनिर्बंध स्वराचारी प्रक्रियेमुळे अनेक आपत्ती निर्माणहोतात. जंगलतोड, जमिनीची वाढती धूप, लोकसंख्या विस्फोट, अविघटनशील पदार्थांचा संचय, विषारी रसायनाची निर्मिती इत्यादी अनेक मानवनिर्मित आपत्तीचा अभ्यास, त्यांना नियंत्रित करण्यासाठी आपत्तीचे व्यवस्थापन या मार्फत अभ्यास केला जात आहे.

2. प्रदूषण ही संपूर्ण जगासमोरील गंभीर अशी समस्या बनली आहे. औद्योगीकरण, कचरा, सांडपाणी, रासायनिक द्रव्य, अनुस्फोट, वाहनांचा वाढता वापर इत्यादीच्या कारणाने हवा प्रदूषण, जल आणि भूमी व ध्वनी प्रदूषणाच्या प्रमाणात वाढ झाली आहे.साल 2000 पासून जगभरात प्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूमध्ये 300 टक्क्याने वाढ झालेली आहे. त्यापैकी 65 टक्के मृत्यू हा आशियात होत आहेत. जगातील आरोग्य संघटनेनुसार जगभरात दरवर्षी 3.2 दशलक्ष मृत्यू हे प्रदूषणाशी निगडित आजाराने होत आहे. मानवी आरोग्य नीट ठेवण्यासाठी पृथ्वीच्या आरोग्याची काळजी घेणे अपरिहार्य आहे.

3. पर्यावरणाच्या असमतोलनातून अनेक नवीन साथीचे आजार डोके वर काढत आहेत. मानव हा इतर सजीवापेक्षा बुद्धिमान असला तरी तो सुद्धा पर्यावरणाचा एक घटक आहे मानवाने पर्यावरणामध्ये उपलब्ध असलेल्या घटकांचा वापर आपल्याबरोबरच इतर सजीव घटकांचा विचार करून केल्यास पर्यावरणाचा समतोल बिघडणार नाही भविष्यातील पर्यावरण बिगडी चा धोकाही कमी होऊ शकेल.

4. जगभरातील अनेक देश आणि आंतरराष्ट्रीय संस्था हवामान बदलावर अंकुश ठेवण्यासाठी गेली तीन दशके प्रज्ञाशील आहेत या संदर्भात १९९२ सली आयोजित करण्यात आलेले 'रिओ कॉन्फरन्स' असो व अगदी अलीकडे 2016 मध्ये झालेली 'पॅरिस करार' हवामान बदल रोखण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. येत्या 2030 पर्यंत वातावरणातील हरितवायूंचा उत्सर्जनाचे प्रमाण 45 / आणून 2050 पर्यंत हे प्रमाण शून्यावर आणण्याचा संयुक्त राष्ट्रसंघाचा माणूस आहे. ही केवळ सरकारी जबाबदारी नाही पर्यावरण जागृतीच्या संदर्भातील आपल्या सर्वांचीच वैयक्तिक पातळीवर भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

5. 'झाडे जगवा झाडे वाचवा' या योजनेअंतर्गत सध्या काही उपायोजना उस्फूर्तपणे अमलात येत आहे. त्यात हिंदू धर्मीयात लाकडांच्या वापराऐवजी शेवधहनास विद्युत दहीनीचा वापर व डिझेल दहीनी चा वापर वाढतो आहे. दसऱ्याला आपट्याची पाने मोठ्या प्रमाणावर नष्ट केले जातात. ती आपटा वनस्पती औषधी असून तिच्या संरक्षणाची चळवळ उभारणे आवश्यक आहे.

6. मानवाने निसर्ग नियमातील मोठ्या प्रमाणात केलेल्या हस्तक्षेपामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. हवा, पाणी, माती, ध्वनी इत्यादी मध्ये झालेले प्रदूषण हे मानवनिर्मित आहे. मानवाच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम नैसर्गिक घटकावर होत आहे. वाढत्या प्रदूषणाचा वाईट परिणाम मानवी व सजीव सृष्टीवर होताना दिसत आहे. पर्यावरण नियंत्रणासाठी प्रदूषण का निर्माण झाले याचा शोध घेऊन ते दूर करणे आवश्यक आहे. विकसित देशांमध्ये विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासावर पर्यावरण नियंत्रणाचा प्रयत्न केला जात आहे.

❖ **संदर्भ ग्रंथ**

१. पर्यावरण आणि समाज- प्राध्यापक शिल्पा कुलकर्णी ,डायमंड पब्लिकेशन पुणे 2008.

२. विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र- प्रा. डी एस कदम निराळी प्रकाशन, पुणे 2005.

३. भारतातील सामाजिक चळवळी- घनश्याम शहा,अनु. प्राची चिकटे डायमंड पब्लिकेशन पुणे 2008.

४. पर्यावरण आणि समाज- प्रा. एस. एस. पेंडसे, डॉ. नारायण चौधरी, प्रा. नीता सानेयशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, मे २००३.

५. पर्यावरण शास्त्र परिचय डॉ. जयकुमार मगर, विद्या प्रकाशन नागपूर 2008.

६. http://maharashtratimes.com

7. http://mahamtb.com

8. https://www.dainikprabhat.com

*समाजशास्त्र विभाग, माऊली महाविद्यालय वडाळा, ता.उ. सोलापूर जिल्हा सोलापूर., मोबाईल नंबर 9011773670, Prb.mmw7@gmail.com

***

पश्चिम महाराष्ट्रातील कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास

*डॉ. संजय शामराव कांबळे

प्रस्तावना -

१९८० च्या दशकात भारतातील अनेक सामाजिक चळवळीनीया विकासात्मक आणि राजकीय सहभागाची आव्हानांना सामोरे जात असल्याची दिसतात. चळवळी लोक विकासाच्या संबधित आहेत परंतु या चळवळीचा बहुसंख्य लोक जीवनावरती परिणाम झाला असला तरी नवीन आधुनिक आणि विकासाच्या संबधित पर्यायी धोरणाची निर्मिती हि लोक सहभागी धोरणातून होताना दिसून येत आहे. या चळवळीने विकासाची संकल्पना हि विकासाचा प्रक्रियेचा भाग म्हणून विस्थापन, स्थलांतर आणि पुनर्वसनाचे प्रश्न निर्मिती होते, हे स्पष्ठ केले आहे.विकासाच्या प्रक्रियेतून स्थानिक जनवादी चळवळीची पर्यावरण, सरकारी धोरणे कायदे आणि स्थानिकांच्या पुनर्वसनबाबत भूमिका आणि कृती कार्यक्रम हा सामाजिक समता,सन्मान आणि न्याय या तत्वाच्या आधारे निर्माण केली आहेत. प्रस्तुत शोध निबंधात पश्चिम महाराष्ट्रातील कोयना धरनंग्रस्तानच्या पुनर्वसन चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात येणार आहे.या चळवळी पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख सांगली, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यातील धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठीच्या चळवळीचा समावेश करण्यात आला आहे . या चळवळी 'श्रमिक मुक्ती दलाची' विचारसरणी, नेतृत्व, संघटन, आणि सामुदाईक कृती आधारे उभारणात आली आहे. या संघटनेच्या माध्यमातून धरणग्रस्तानच्या पुनार्वासानासाठी लोक सहभागाच्या माध्यमातून धोरणात्मक सामुदाईक कृती आंदोलने उभारण्यात आली आहेत, या माध्यमातून विकासनशील पुनर्वसनाचीमागणी केली जात आहे या मध्यवर्ती सरकार आणि न्यायालीन कायदे विषयाची भूमिका आधारित अनेक आंदोलने उभारण्यात येत आहेत. त्याचे मुलभूत संरचनात्मक गतिशील आणि विकास आधारित सकारात्मक परिणाम पाहण्यास मिळत आहे.

संशोधनाचे उद्दिष्टे

१.कोयना धर्नाग्रस्ताच्या पुनर्वसन संबधित प्रश्नाचें अभ्यास करणे.

२.कोयना धरणग्रस्त पुनर्वसन संबंधित 'श्रमिक मुक्ती दलाची' भूमिका आणि चळवळ.

३. कोयना धरणग्रस्त पुनर्वसन संबंधित 'श्रमिक मुक्ती दलाची' भूमिका आणि चळवळीचा परिणाम.

४. सध्याकालीन कोयना धरणग्रस्त च्या पुनर्वसन संबंधित श्रमिक मुक्ती दलाची भूमिका आणि चळवळीचा परिणाम.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन निबंधात कोयना धरण ग्रस्तांच्या पुनर्वसन चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला आहे. या चळवळीचा अभ्यास करताना गुणात्मक पद्धती शास्त्राचा व वर्णनात्मक संधोधन पद्धतीचा वापर करून या चळवळीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. या चळवळीची पार्श्वभूमी, निर्मिती, संघटना, विचारसरणी, नेतृत्व आणि सामाजिक कृती व आंदोलने याचे परिणाम सविस्तर नोदवण्यात येणार आहेत. यासाठी प्राथमिक माहिती संकलनासाठी क्षेत्र कार्य पद्धती व निरीक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच दुय्यम माहिती संकलनासाठी पुस्तके, वृत्तपत्र, इंटरनेट साधनाचा वापर करून माहिती संकलित केली जाणार आहे. तसेच माहितीचे विश्लेषण सविस्तर वर्णनात्मक लेखन करण्यात येणार आहे.

सैद्धांतिक दृष्ट्रीकोन

प्रस्तुत संशोधन निबंधात कोयना धरण ग्रस्तांच्या पुनर्वसन चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्याताना समाजशास्त्र गेल ऑम्वेट यांनी मांडलेल्या नवीन सामाजिक चळवळीचादृष्टिकोन या विश्लेषणाचा समावेश केला आहे. डॉ.

गेल ऑम्वेट यांनी नवीन चळवळी या स्थानिक प्रश्नावर आपले मत/प्रश्न मांडणी करताना दिसतात, या चळवळी पर्यायी विकासाचे धोरण निर्माण करतात, या चळवळी प्रकल्पग्रस्तांच्या विकासाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करताना दिसतात.

पर्यायी विकासाचे धोरण निर्माण करणारी चळवळ म्हणून नवीन चळवळीचा दृष्ट्रीकोन मांडला आहे. हा दृष्ट्रीकोन कोयना धरणग्रस्तान पुनर्वसनाच चळवळीचा अभ्यास करण्यासाठी उपयोगात आणला आहे. त्या प्रमाणे ही चळवळी कार्य करत असताना दिसून येते.

पार्श्वभूमी

महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणून अर्थकारणातील महत्वपूर्ण धरण 'कोयना धरन' हे ओळखले जाते. या धरणाच्या माध्यमातून राज्याच्या सिंचनाचे पाणी, पिण्याचे पाणी सोबतच वीज निमिर्ती प्रकल्पामुळे राज्य आज सुजलाम-सुफलाम होत आहे. कोयना धरणाच्या पाण्यावर लाखो मेगावॉट वीज निर्मिती होते. यामुळे राज्याच्या उत्पनात करोडो रुपयांची भर पडत आहे, असे असले तरी या धरणाच्या निमिर्तीसाठी ज्यांनी आपल्या जमिनीचा वाट दिला. त्यांना केवळ सरकारने आश्वाशनावर ठेवले. या धरणास ६५ हून अधिक वर्षे होऊ गेली असली तरी आजही या भागातील धरणग्रस्तनाची तिसरी पिढी पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत वाट पहात राहिल्याची दिसते.

कोयना धरन निर्मिती प्रक्रिया

स्वतंत्र पूर्व काळात इ.स १९०८ ते ०९ दरम्यान मुंबई प्रांतात बाधकाम खात्यातील एका अधिकारी एच.एफ.बिल यांनी कोयनेसह ३२ योजनेचा अहवाल सरकारला सादर केला पण काही घडले नाही. त्या नंतर सह्याद्रीच्या उंच डोंगराचा वापर करून जल विधूत करणे व अन्य काही योजना ह्या जग प्रसिद्ध उधोजक टाटा यांनी सरकार कडे मांडला. पण दरम्यानच्या काळात मात्र जागतिक महामंदी आणि दोन्ही महायुद्ध यामुळे सर्व योजना बाजूला पडल्या. भारत स्वतंत्र झाल्यानंतर उधोजक, व्यापारी व शेतकारी यांनी कोयना-धरण निर्मितीची मागणी उचलून धरली. अखेर इ.स. १९५४ रोजी देशाचे पहिले पंतप्रधान मा.पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते'कोयना धरण' निर्मिती पाया भरणी करण्यात आली.

कोयना नदीवर कोयना नगर येथील देशमुखवाडी गावाजवळ कोयना धरणाची उभारणी करण्यात आली.यास शिवसागर जलाशाय म्हणून ओळखला जातो. येथून निर्माण होणारी वीज महाराष्ट्राला प्रकाशमान करते. या धरणाचे बांधकामाचे उध्दघटन भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते १६ जानेवारी १९५४ ला झाले. तेव्हा ते म्हणाले "त्याग कराव्या लागणार्या भूमी पुर्तांना स्वतंत्र भारत कधीच विसरणार नाही". याच धरणाच्या पूर्ततेचे उध्दघाटन १६ मे १९६२ ला दिवंगतमहाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणयांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी "प्रकल्प ग्रस्तांना काहीच कमी पडू देणार नाही त्यांच्या त्यागाला पर्याय असूच शकत नाही'. तरीही तसे काही धरणग्रस्तांचे पुनर्वसन झाले नाही. कोयना धरणाच्या जलाशयाचा विस्तार ६५ किलोमीटर इतका विस्तीर्ण आहे. या जलाशयाच्या अंतर्गत गोजेगाव, वाजेगाव, पुनावली, शिरशिंगे. डिचोली, बीजे गावडेवाडी अशा अनेक गावांचा समावेश झाला. मात्रयानंतर सरकारने काही अशांत अपुरे पुनर्वसन केल्याने या जनतेशी भावनिक खेळ सुरु केला. तेव्हा धरणग्रस्तांनीउपजीविकेसाठी आपल्या नातेवाईकांकडे जाऊन वास्तव केले. या धरणग्रस्तांना आजही सरकारने आज तुमचे पुनर्वसन करू या अपेक्षेत ठेवेले. तसेच धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कोणत्याही राजकीय पक्ष किंव्हा संघानेनी घेतला नाही हे स्पष्ट दिसून येते.

कोयना धरणग्रस्तांचे प्रश्न

कोयना धरणाने बाधित झालेल्या विस्थापितांना ६५ वर्षे झाले तरी न्याय मिळाला नाही. कोयना धरणाच्या निर्मिती मधून विस्तातापानाच्या समस्येत वाढ झाली आहे. यामध्ये विस्तापित झालेल्या मध्ये एकूण ९ हजार १७१ खातेदारा पैकी, १ हजार ६२ खातेदारांना अद्यापही जमीन वाटप झालेले नसून ते भूमिहीन आहेत. या धरणामुळे एकूण ९८ गावे विस्तापित झाली. यामध्ये पाटण तालुक्यातील २४ गावातील ४१ हेक्टर जमीन यामध्ये संपादित केली आहे.

यात नवजा, माणाईनगर, नवजावास्ती (डिचोली) हि तीन गावे बाधित असून १८१ खातेदारकांचा यात समावेश आहे. यामध्ये जावली तालुक्यातील ६८ गावे व महाबळेश्वर तालुक्यातील ६ गावांचा समावेश झाला आहे. या धरणासाठी २५ हजार, ९९ हेक्टर जमीन संपादित केली आहे.

कोयना धरन परिसरात इ.स. १९६७ सालच्या भूकंपाच्या धक्याने हादरून बरेच नुकसान झाले. इ.सं. १९८५ साली सरकारने याच ठिकाणी कोयना अभयारण्य म्हणून घोषित केले. व नंतर नवीन महाबळेश्वर प्रकल्प घोषित केला. तसेच व्याग्र प्रकल्प हि याच ठिकाणी लागू करण्यात आला. यातून आपणास एकाच धरणग्रस्तांचे बहु विस्थापन असणारी ओळख दिसून येते.

कोयना प्रकल्प टप्पा क्रमांक १ ते 2यामुळे ९ हजार १७१ खातेदार बाधित असून यापैकी बिगर खातेदार ९६८ तर पात्र खातेदार ८ हजार २०३ आहेत. यापैकी २ हजार ८५५ खातेदार २ हजार ३१५ हेक्टर क्षेत्र सातारा जिल्ह्यातील, ४३२ खातेदार ७१२ हेक्टर ठाणे जिल्ह्यात ६६० खातेदार, ३६४ हेक्टर सांगली जिल्ह्यात तर २ हजार ४४१ खातेदारना ३ हजार ६११ हेक्टर क्षेत्र सोलापूर जिल्ह्यात देण्यात आले आहे. चौथ्या टप्प्यात बाधित झालेल्या खातेदारांची संख्या १८१ असून यापैकी बिगर खातेदार १९ आहेत. ६६ खातेदारांना सोलापूर जिल्ह्यात ५७.४९ हेकात्र जमीन वाटप कार्यात आली आहे. चौथ्या टप्प्यात ६६ खातेदारण पर्यायी जमीन मंजूर करून उजनी प्रकल्प लाभशेत्रात देण्यात आली आहे. या बाबतचा प्रस्ताव सोलापूर जिल्हा-अधिकार्यांना जरी पाठवले असले तरी हे खातेदार सोलापूर जिल्ह्यातील जमीन स्वीकारण्यास तयार नाहीत. असी कोयना धरणग्रस्तांची पुनर्वसनाची स्थिती आहे.

पिढ्यान पिढ्यांची घरे, दारे आपल्या वाड-वडिलांच्या आठवणी, निसर्ग, देव, देवळे या सर्वावर देशाच्या विकासासाठी पाणी सोडून त्यांग केलेल्या विकास सैनिकांना विकासातील वाटा दिला पाहिजे. सरकारी बाबूंची मनमानी, कागदाचे प्रक्रियेत पुनर्वसन राखून ठेवायचे, मुलभूत सुविधा उदा. जमीन, पाणी, शाळा, वीज,रस्ते इ. सुविधासुद्धा देण्यासाठी गुऱ्हाळे घातली जात आहेत. अशा सुविधा व देणी बाकी असताना, त्याला चालना देणारे पुनर्वसन सोपे व सुलभ करणारे, दिलेल्या जमिनीला सिंचनाच्या सुविधा देऊन त्यांना विकसित कणारे शासन निर्णय करण्याऐवजी धरणग्रस्तांना देशोधडीला लावणारे शासन निर्णय काढले जात आहेत.

कोयना धरणग्रस्तांची संघटीत चळवळ

कोयना धरणाच्या निर्मिती नंतर विस्तापितांचे प्रश्न सरकारी प्रशासनाला सोडवण्यात यश आले नाही. त्यामुळे कोयना धरणग्रस्तांचे पुनर्वसन रखडत गेले. स्थानिक राजकारणी आणि शासन यांनी प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. तेव्हा या विस्तापितांचे संघटन निर्माण करणे व आपल्या न्याय मागणीसाठी चळवळ उभारण्यात आली. सुरवातीच्या काळात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या बरोबर स्वतंत्र सेनानी व्ही.एन.पाटील यांनी कोयना धरणग्रस्ताच्या प्रश्नावर्ती आवाज उठवला होता. या नंतर यामध्ये 'महाराष्ट्र राज्य धरण', 'धरणग्रस्त परिषद' व'श्रमिक मुक्ती दल' यांच्या माध्यमातून डॉ.भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली कोयना धरणग्रस्तांचे संघटन आणि लढा इ.स. १९८७ नंतर च्या काळात उभारणात आला. त्यांनी कोयनेच्या डोगर कपारीत प्रवास करून धरणग्रास्ताची माहिती संकलन केली. त्यासाठी वैश्विक लढा उभा केला. इ.स.१९८७सालीया चळवळीतून एक 'कोयना धरणग्रस्त संग्राम परिषद' स्थापन करण्यात आली. क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांनी या चळवळीसाठी 'हुतात्मा किसान अहिर सहकार साखर कारखाना' वाळवा जि.सांगली यांच्या माध्यमातून चळवळीसाठी मदत करण्यात आली. त्यामुळे या चळवळीला अधिक संघटीत लढा उभारण्यास शक्ती प्राप्त झाली. या चळवळीमध्ये सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव क्रांतिवीर नागानाथ अण्णा नायकवडी, कॉम्रेड दत्ता देशमुख, धैर्यशील पाटील, व नाना शेठे यांच्या कृतीशील नेतृत्वाच्या माध्यमातून विस्तापितांच्या न्याय मानण्यासाठी शासननिर्णय स्तरावर आंदोलने करण्यात आली.

विचारसरणी

गौतम बुद्ध, चार्वाक पासून महात्मा जोतीबा फुले, कार्ल मार्क्स व डॉ.बाबासाहेब आंबेडकर असा क्रांतीच्या विचारांचा वारसा घेऊन हि चळवळ उभारण्यात आली. प्रस्तापित व्यवस्थेला मानवमुक्ती समृद्ध, पर्यावरण संतुलन आणि शोषणमुक्त व्यवस्थेचा पर्याय देणारी नवी दिशा देणारी विचारसरणी आधारित हि चळवळ उभारण्यात आली.

धरणग्रस्तांची आंदोलने आणि सरकारशी निर्णायक वाटाघाट

कोयना धरणग्रस्तानच्या तीव्र आंदोलनानंतर व धरणास केलेल्या विरोधा-नंतर महाराष्ट्र शासनाने इ.स. १९७६ ला पुनर्वसन कायदा मंजूर केला. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. त्यानंतर धरणग्रस्त चळवळीतील जेष्ठ व अभ्यासू नेतृत्वच्या सहभागने सन१९८६ व सन १९९९ अशा पुनर्वसन कायद्यात वेळोवेळी दुरुस्ती व सुधारणा करून आज १९९९ चा १६ जून १९१५ पर्यंत सुधारणा केलेला पुनर्वसन अधिनियम धरणग्रस्तांना लागू करण्याचे यशस्वी वाटचाल केली आहे. कोयना धरणग्रस्ताच्या प्रमुख मागण्या पैकी आठ हजार घरबांधणी कर्ज रद्द करून दहा हजार अनुदान, आधी पुनर्वसन मग धरणशासन निर्णय, निर्वाह भत्ता, गोठा अनुदान, दुकान अनुदान, भावा बरोबर बहिणीस हि समान हक्क, नागरी सुविधात वाढ, ३५० लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायती इत्यांदी साठी जन आंदोलने करण्यात आली.

श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ.भारत पाटणकर यांच्या नेतृवाखाली कोयना धरणग्रस्तांचा संघटीत लढा उभारण्यात आला. या चवळीच्या माध्यमातून इ.स. १९९० साली कोयना धरणग्रस्तांच्या पुरार्वसन प्रश्ना-विषयी तीव्र आंदोलने सातारा जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर करण्यात आली. यातील बेमुदत ठिया आंदोलंत दहा हजाराहून अधिक धरणग्रस्त लोकांनी यामध्ये सहभागी घेतला. या पुढील काळात अनेक वेळा मोर्चे, निदर्शने, ठिया आंदोलने, जल समाधी तसेच शासनाला आपल्या मागण्याचे निवेदन देऊन आंदोलने करण्यात आली. या आंदोलनाचा परिणाम म्हणून शासनाने 'धरणग्रस्त पुनर्वसन कायदा१९९९' करण्यात आला.त्यानुसार जमीन वाटप व नागरी सुविधाचा प्रश्न सोडवण्यात आला.

सध्या कोयना धरणाचा सुवर्ण महोत्सवसाजरा करण्यात येत आहे. पण विस्तापित धरग्रास्तांचे पुनर्वसन अध्यापही पूर्ण झाले नाही. श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली हे जन आंदोलन उभारण्यात आले. त्यांच्या मते 'कोयना धरणाचा सुवर्ण महोत्सवहा भांडवलदरांचा असून कोयना पुत्रांचा हा मरणत्सवआहे." यामध्ये एकूण ९०६९ कुटुंबापैकी ६३९९ कुटुंबांचे पुनर्वसन केले. तर २७५३ कुटुंबाचे पुनर्वसन प्रतिक्षेत असल्याची कबुलीच कोयना प्रकल्पाने प्रकाशितकेलेल्या अहवालात नमूद करण्यात आली आहे. कोयना प्रकल्प ग्रास्तांचे ८५ टक्के पुनर्वसन झाले असे सरकारी आकडेवारीत सांगितली जाते मात्र प्रत्यक्ष तसे वास्तवात नाही. कोयना धरणग्रस्तांच्या १२४ अधिकृत वस्त्या असून १९ अनधिकृत वस्त्या आहेत. असी कोयना धरणग्रस्तांची सध्यस्थिती पाहण्यास मिळते.

कोयना धरणग्रस्तच्या पुनर्वसनासाठीची आंदोलने

कोयना धरण ग्रस्तांनाच्या पुनर्वसनासाठी 'कोयना धरणग्रस्त संग्राम संघटना' आणि 'श्रमिकमुक्तीदल' यांच्या नेतृत्वाखाली अनेक आंदोलने करण्यात आली. कोयना धरणाची निर्मिती होऊन पन्नास वर्ष झाली तरी धरणग्रस्तांचे अजूनही ४० टक्के पुनर्वसन बाकी आहे. यासाठी सरकारने तातडीने कोयना धरणग्रस्तांचे प्रश्न सोडवून त्यांचे विकसनशील पुनर्वसन नकेल्यास दि. ९ ऑगस्ट २०१३ रोजी क्रांतीदिनी कोयना शिवसागर जलाशयात 'करेंगे या मरेंगे'चा निर्धार व्यक्त केला. यावेळी जिल्हा अध्यक्ष डॉ.प्रशांत पन्हाळकर, जगन्नाथ विभूते, सीताराम, संजय लाड,अशोक पाटील, अर्जुन सकपाळ व धरणग्रस्त उपस्थिती होते (लोकसत्ता २० मे २०१३)

या आंदोलनानंतर माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१६ मध्ये कोयना धरणग्रस्तांच्या अडचणी संदर्भात जिल्हा अधिकारांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प कृती दल (टास्कफोर्स) स्थापन करण्यात आले. धरणग्रस्तांनचे

लवकरचपुनर्वसन करणे या फोर्स चे उद्धिष्ट होते. या टास्कफोर्स अंतर्गत विस्थापन समस्येसाठी वॉर रूमची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये प्रामुख्याने धरणग्रस्तांना पडीक जमिनी देण्याऐवजी सुपीक जमीन देणे, या लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे, पाणी, विजपुरवठा देणे व पर्यटनस्थळासाठी बोटी सुरु करूणे हे सरकारचे उधिष्ठ होते .परुंतु सर्व अंमलबजावणी होऊ पर्यंत भाजपचे सरकार गेले आणि हे प्रकरण पुन्हा थंड पडले (दै.दिव्या मराठी divyamarathi.baskar.com)

या आंदोलना नंतर सरकारशी बैठक घेण्यात आली. इ.स. २०१८ या वर्षी झालेल्या आंदोलन नंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पात्रखातेदाराची यादी तयार करावी असा आदेश देण्यात आले. परंतु त्याची प्रत्येक्ष अंमलबजावणी नकेल्याने पुन्हा आंदोलन करण्यात आले. त्यानुसार शासनाने कोयना धरणग्रस्ताच्या पुनर्वसनासाठी कोयना धरणासाठी पाटण, जावळी, महाबळेश्वर तालुक्यातील ९८ गावातील १८७ गावठाणासाठी ९८०० खातेदार आहेत, याची नोंद शासनाकडे केली आहे. अनेक पत्र खातेदार या पासून वंचित आहेत. त्यांना जमीन हस्तांतर करून देण्याची मागणी करण्यात आली.

पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कोयना धरणाच्या निर्मितीस साठ वर्षे झाली, तरीही धरणग्रस्तानच्या पुनर्वसनाच्या संदर्भातील प्रश्न अद्याप हि सुटला नाही.या धरणासाठी जमीन, गाव घरदार दिलेल्या विस्तापितांचे पुनर्वसन करावे या प्रमुख मागणी करिता दहा हजार कुटुंबातील दिडलाख धरणग्रस्तांनी दि. १४ जून २०२० पासून या आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात सर्व धरणग्रस्त करोनाच्या पार्श्वभूमीवर घरच्या दारात बसून आंदोलन करत होते. त्यानंतर एकवेळचे जेवण बंद करून ते दिवसभर दारात बसून रहिले. या आंदोलनातून दीड लाख धरणग्रस्तांच्या मागण्यासाठी सकारचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. (महाराष्ट्र टाइम्स १५ जून २०२०).

कोयना धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. २३.९.२०२१ च्या बैठीकी प्रमाणे जमीन वाटपास पत्र असलेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या व देय जमिनीचे क्षेत्र निश्चित करणे यासह भूसंकलांची माहिती घेणेयासाठी कालबद्ध ठराव करणे, शासनाच्या नोकरभरतीत धरणग्रस्तांचा समावेश करणे, निर्वाह भत्ता देणे, पिकाऊ जमीन देणे, सिंचन योजनेचे ४१ अब्ज घन फुट पाणी देणे, नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, कोयना धरणाची हद्द निश्चित करणे, पर्यटन केंद्र विकसित करणे, सांगली सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील जमीन उपलब्ध गट नंबर निश्चित करणे, जमीन वाटप करणे, महाराष्ट्र शासन १९९९ चा पुनर्वसन कायद्या प्रमाणे बहिनीचाही खातेदार मध्ये समावेश करणे, जमीन वर्ग करणे इत्यादीविषयावर धरणग्रस्त पुनर्वसन संदर्भात उपमुख्यमंत्री यांच्या दालनात चर्चा झाली. त्यानुसार कार्यवाहीचे आदेश जिल्हाधिकारी, वन अधिकारी व जलसंपदा विभागास देण्यात आले.

पुन्हा एकदा श्रमिक मुक्ती दलाचे प्रमुख डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सर्वात जास्त काळ टिकून राहणार धरनग्रस्ताच्या मागण्यासाठी तब्बल ४३ दिवस सातारा येथे शिवाजी महाराज क्रीडांगण येथे आंदोलन करण्यात आले. त्यानंतर मंत्रालायावर मोर्चा काढण्याचे निवेदन देण्यात आले. याचा परिणाम महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी जमिनी वाटपाचे आश्वासन दिले. या नंतर संघटनेने जमीन वाटपाची मूळ जमीन खाते दारांना जमीन मिळावी यासाठी आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या हस्ते १६ मे२०२२ रोजी कोयना धरणाच्या ६५ व्या वर्धापन दिनी २०००ते २५०० धरणग्रस्तांना जमीन वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले. (मॅक्स महाराष्ट्र रिपोर्ट)

सध्याकालीनपुनर्वसन कायद्याच्या तुरुस्तीचे आंदोलन

कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संघटनेच्या माध्यमातून अनेक लढे, आंदोलने, मोर्चे आणि त्यातून पुनर्वसन प्रक्रिया पुढे जाणार्या अमलबजावणी सरकार, विभागीय, जिल्हा पातळीवर अधिकार्याशी सवांद अशी एक सांगड चालू असताना धरणग्रस्तना पूर्ण देशोधडीला लावणार्या कायद्याचा निर्णय राज्यशासनाकडून केला जात आहे. हे धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा पहिला कायदा करणाऱ्या महाराष्ट्र राज्यात घडत आहे.

पहिला झटका "राज्यातील पाटबंधारे प्रकल्पात प्रकल्पग्रस्त या मथळयाखाली"दि. १४ जून २०१९ रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे बसला आहे. जो शासन निर्णय
धरणग्रस्तांच्या मागण्या प्रमाणे असला तरी त्यामध्ये समाविष्ठ नसणार्या गोष्टी पुढे करून जिल्हा पातळीवरील अधिकारी धरणग्रस्त आणि प्रकल्प ग्रस्तांना खाईत लोटण्याचे निर्णय घेत आहे. त्यामध्ये त्यांनी दिलेल्या जमीन वर्ग १ करताना त्यांच्याकडून कोणतीही रक्कम वसूल करायची नसताना, ती कब्जेहक्काची रक्कम वसूल करूनच जमीन वर्ग एक करायची अशी भूमिका जिल्हा पातळीवर अधिकारी घेताना दिसत आहेत.

दुसरा झटका हा "राज्यातील पाटबंधारे प्रकल्प अंतर्गत पात्र असलेल्या बाधित प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात येणारी पर्यायी जमिनीच्या कब्जे-हक्काच्या रकमेत परिगणना करण्याबाबत"या खाली दि. १४ ऑक्टोबर २०२१ रोजी काढलेल्या शासन निर्णयाने केला आहे. हा शासन निर्णय तर धरणग्रस्तांचे संसार पूर्ण उधवस्त होणारे व पूर्ण देशोधडीला लावणारा आहे. यामध्ये जी लाभक्षेत्रातील जमिनी धरणग्रस्तांना वाटप केली त्या जमिनीची मूळ किमत अधिक त्याच्या सिमंकानावर, समतलावर, संयुक्त मोजनीवर, सुधारणेवर, सीमा चिन्हे लावण्यावर जो खर्च झाला असेल त्यावर १२ टक्के प्रतिवर्षी व्याजाची आकारणी करून ती कब्जे-हक्काची रक्कम धरण्यात येऊन ती वसूल करण्यात येईल. प्रकल्पग्रस्तांना जाण्यासाठी दिलेल्या ६५ टक्के रक्कमेवरील व्याज व निर्वाह भत्ता यावर १२ टक्के व्याज आकारून ती रक्कम या हक्काच्या रक्कमेतून वजा करायची याचा अर्थ जमीन मिळेपर्यंत जाण्यासाठी देण्यात येणारी तुटपुंजी सुद्धा जमीन प्रकल्पग्रस्ताना मिळू द्यायची नाही असी व्यवस्था केली आहे.

तिसरा झटका हा १४ जून २०२२ ला "धरणग्रस्तांना वाटप करण्यात येणार्या जमिनीविषयी प्राधान्यक्रम/कार्य पद्धती ठरवण्याबाबत'या शाषण निर्णयामुळे बसला आहे. या शाषण निर्णयामुळे ज्यांच्या पुनर्वसाहतीच्या जवळ असणारी लाभ क्षेत्रातीलजमिनी सुद्धा खुल्या करून राज्यातील इतर प्रकल्पग्रस्तांना खुल्या करायची,व बाजारमांडायचा अशी सोय केली आहे. यामुळे खरे गोरगरीब प्रकल्पग्रस्त मागे राहून पैसेवाले एजंटवाढवण्यासाठी चालना देणारी व्यवस्था सरकारकडून निर्माण केली जात आहे.

या सर्वामुळे आत्तापर्यंत लढे करून जे प्रकल्प ग्रस्तानी मिळून घेतले आहे ते पूर्ण काढून घेण्याचा घात शासनाने घातला आहे. डॉ. भारत पाटकर यांच्या मते "हा शासनाचे निर्णय धरणग्रस्तांवर अन्याकारक पणे लादण्यात आला आहे. आपण संघर्ष करून हाशासननिर्णय बदलून लावण्यासाठी अधिक तीव्र आंदोलने पुढील काळात केले जातील. जोपर्यंत या शासनाच्या निर्णयात बदल होत नाही तो पर्यंत लढा अधिक तीव्र केला जाईल. आपण देशाला घडवणारी जनता आहोत, देशाला समृद्ध,जाती-विरीहीत,हिंसाचार-विरहित, प्रेमाच्या आधारवर एकसंघ बनवण्याची स्वप्ने पाहणारी जनता आहोत. असे अनेक हल्ले धरणग्रस्तांनी परतुनी लावले आहेत हा हल्ला सुद्धा धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त परतवून लावतील"असे त्यांनी आदोलनाची वैश्विक भूमिका व वाटचाल व्यक्त केली.

या धरणग्रस्तांच्या प्रश्नाविषयी श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली दि.२७ फेब्रुवारी२०२३पासून कोल्हापूर, कोयनानगर व बामणोली या ठिकाणी बेमुदत ठिय्या आंदोलनात मोठ्या संख्येने धरणग्रस्त सहभागी झाले. त्यांनी अन्याकारक शासन निर्णय परतून लाऊ अशी घोषणा केली. हेआंदोलन सलग पंधरा दिवसानंतर प्रकल्पग्रस्ताना उदार निर्वाह भत्ता, ६५टक्के रकमेवरील व्याज, शौचालय, गोठा अनुदानयांचे वाटप करण्यात येणार आहे अशी घोषणा करण्यात आली. यानंतर आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यात येणार आहे.

सारांश

कोयना धरणग्रस्त पुनर्वसन चळवळीने अतिशय तीव्र-पणे धरणाला केलेल्या विरोधाने इ.स. १९७६ ला पुनर्वसन कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले. त्यांतर प्रकल्प ग्रस्तांच्या चळवळीतील ज्येष्ठ अभ्यासू नेतृत्वाच्या सहभागाने इ.स. १९८६ व इ.स. १९९९ चा, १६ जून २०१५ पर्यंत सुधारणा केलेलें पुनर्वसन अधिनियम धरणग्रस्तांना लागू करण्यात येत आहे. त्या प्रमाणे धरणग्रस्तांचे पुनर्वसन चालू आहे. ज्या-ज्या वेळी धरणग्रस्तांवर शासन

व प्रशासन याच्याकडून घाला घातला जाईल त्या वेळी धरणग्रस्तांनी लढे करून नवीन शाषण निर्णय काढण्यास किंवा सुधारणा करण्यास सरकारला भाग पाडले. उदा. आठ हजार घरबांधणी कर्ज रद्द करून दहा हजार अनुदान, आधी पुनर्वसन मग धरणशासन निर्णय, निर्वाह भत्ता, गोठा अनुदान, दुकान अनुदान भाव बरोबर बहिणीस समान हक्क, नागरी सुविधात वाढ, ३५० लोकसंख्या असणाऱ्या ग्रामपंचायती इत्यांदी धरणग्रस्तांच्या प्रमुख मागण्या शासन स्तरावरती मान्य करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी धिम्या गतीने का होइना पुनर्वसन प्रक्रिया चालू आहे.

बाई मी धरन धरण बांधते
माझं मरण मरण काडते
कवी दया पवार

संदर्भ सूची-

- पाटणकर, भारत (२०१२), श्रमिक मुक्ती दलाचा मुलभूत भूमिकेचा जाहीरनामा कोल्हापूर, निर्मिती प्रकाशन
- भास्कर पाटील, मोहन (२००९) "कोयनेच्या १५६२ खातेदारांना जमीन वाटप नाही"लोकमत २५ एप्रिल २००९
- Omvedt Gail, 1998, Peasants, Dalits and Women: Democracy ad Indian"s New Social Movements, in Mohanty Manoranjan, Mukherji Partha Nath, with TouquistOlle, Peoples"s Rights Social Movements and the State in the Third World, New Delhi, Sage Publication.
- Omvedt Gail, 1993, *Reinventing Revolution New Social Movement and Socialistic Tradition in India,* New York, An East Gate Book
- दै. लोकसत्ता २० मे २०१३
- दै. दिव्या मराठी divyamarathi.baskar.com
- मॅक्स महाराष्ट्र रिपोर्ट
- दैनिकपुण्यनगरी१५. मार्च२०२३
- डॉ. भारत पाटणकर अध्यक्ष श्रमिक मुक्ती दल महाराष्ट्र राज्य यांच्याशी कोयना धरण ग्रस्तानच्या पुनर्वसन चळवळी संबधी मुलाखत चर्चा दि. २९फेब्रुवारी २०२३.
- मा. श्री. संतोष गोठल कार्यालयीन राज्य प्रमुख श्रमिक मुक्ती दल महाराष्ट्र राज्य यांच्याशी कोयना धरणग्रस्तानच्या पुनर्वसन चळवळी संबधी मुलाखत चर्चा दि.२९फेब्रुवारी २०२३

***सहायक प्राध्यापक , समाजशास्त्र विभाग, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविध्यालय मिरज.**

***

अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील पाणीपट्टयातील सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

*प्रा.डॉ. अमरिष एस. गावंडे

प्रस्तावना :

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था सर्वार्थाने कृषीवरच आधारलेली आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी जवळपास ७१ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करतांना आढळते. भारताच्या ग्रामीण भगा मध्ये राहणाऱ्या बहुतांश लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. म्हणूनच भारत हा कृषीप्रधान देश आहे, असे म्हटल्या जाते. पश्चिम विदर्भाचा विचार केल्यास या भागातील बहुतांश शेतकरी कोरडवाहू शेती करतात. अमरावती महसूल विभागातील पाच जिल्ह्यांपौकी अमरावती, अकोला व बुलडाणा या तीन जिल्ह्यामध्ये खारजमीन क्षेत्राचा समावेश होतो. गेल्या अनेक वर्षापासून खारजमीन क्षेत्रातील शेतकरी दुष्काळाची झळ सहन करीत असल्यामुळे दारिद्रय व सामाजिक समस्यांनी ग्रस्त झालेला आहे. अमरावती, अकोला व बुलडाणा जिल्ह्यामध्ये खार जमिनीचे क्षेत्र ४,६९,२२२ हेक्टर इतके आहे. यामध्ये एकूण १६ तालुके व ८९४ गावांचा समावेश होतो. याच क्षेत्रामध्ये शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण जास्त असल्यमुळे संशोधकाने संशोधन प्रकल्पाकरीता प्रस्तुत अध्ययन विषयाची निवडकेली आहे.

अमरावती विभागातील याच खारजमीन क्षेत्रालापूर्णा खोऱ्यातील खारे पाणी पट्टा असे देखील म्हटले जाते. खार पाणी पट्टयातील जमीन प्रचंड क्षारयुक्त आहे. या भागातील क्षारयुक्त आहे. या भागातील क्षारयुक्त जमीनीमुळे जमीनीत झीरपणारेपावसाचे पणी देखील क्षारयुक्त बनते. क्षारयुक्त जमीन आणि जमीनीतील पाणी तसेच या भागात जलसिंचनाकरीता कुठलाच मोठा प्रकल्प नसल्यामुळे जल सिंनाची सोय होवू शकत नाही. परिणामत: शेतकऱ्यांना कोरडवाहू शेतीकरावी लागते. विशेषत: याच भागात पावसाचे अत्यल्पप्रमाण असल्यामुळे शेतकऱ्यांना नेहमीच कोरडा दुष्काळाला सामोरे जावे लागते. या भागातील खारजमीन क्षेत्राचा शेतकऱ्यांच्या उत्पन्ना वर विपरित परिणाम होत असल्यामुळे शेतकरी स्थानांतरण करीत असल्याचे चित्र पहावयास मिळते. शेती क्षेत्राकरीता पाण्याचे दुर्मिक्ष असण्यासोबत या भागात पिण्याकरीता आवश्यक असणाऱ्या शुध्द जल पुरवठयाचा देखीलप्रचंड अभाव आहे. परिणामत: खारे पाणी पट्टयातील लोकांना क्षारयुक्त पाण्यानेच आपली तहान भागवावी लागत आहे. त्यामुळे या भागातील लोकांनामोठया प्रमाणावर किडनीचे आजार, काविळाचे आजार तसेच हगवण, कुपोषणासारखे आजारांची भिषणता देखील या ठिकाणी पहावयास मिळते. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येला त्यांच्या दारिद्र या बरोबरच त्यांच्या सामाजिक समस्या व त्यांची खालावलेली सामाजिक स्थिती सुध्दा जबाबदार आहे. या भागातील शेतकऱ्यांसमोर प्रामुख्याने खारजमीन, जमीनीतील खारे पाणी याच बरोबर अनारोग्य, सकस आहाराचा अभाव, दारिद्रय, कुपोषण, कर्जबाजारीपणा, शिक्षणाचा अभाव, विजेची समस्या, जलसिंचनाचा अभाव, तांत्रिक ज्ञानाचा अभाव इ. समस्या प्रमुख आहेत. पोषींद्या समोर अनेक सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. या सामाजिक, आर्थिक समस्यांची योग्य कारणे शोधून त्यांच्या सामाजिक स्थितीचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करुन त्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्याकरीता या शोध निबंधाचे सहकार्य होईल.

संशोधनाचे महत्त्व :

जल प्रकल्पामध्ये केलेला पाणीसाठा हा दुर्मिळ आणि अमुल्य आहे. हा साठाकरण्यासाठी समाजाचा पैसा खुप मोठया प्रमाणावर खर्ची पडलेला आहे. दर बारा कोसावर भाषा बदलते या प्रमाणे प्रत्येक ठिकाणी पाण्याची वेगवेगळी चव चाखायला मिळते. महाराष्ट्रातील एक विशिष्टभाग म्हणून विदर्भाचे नाव घेतल्या जाते. ऐतिहासिक पार्श्वभुमी लाभलेल्या या विदर्भात पूर्णा नदीच्या खोऱ्यात अमरावती, अकोला, बुलडाणा या तिन जिल्ह्यात अतिशय सुपिक परंतु क्षारयुक्त जमिनीचा विस्तृत मोठा भूप्रदेश आहे. या भागातील जमीन खोलवर निव्वळकाळी, भारी, गाळाची व उपजत सुपिक आहे. हा भूप्रदेश पूर्वपश्चिम १७० कि.मी. लांब व उत्तर दक्षिण सरासरी ५५ कि.मी. रुंदीचा आहे. विदर्भातील १६ तालुक्यांचा कमी अधिक भूभागपूर्णा खोऱ्यातील खारेपाणी पट्टाप्रदेशात समाविष्ट आहे. पूर्णा खोऱ्यातील सुपिक जमीन क्षारयुक्त व भूगर्भातील पाणी सुध्दा क्षारयुक्त दूषित व आरोग्य दृष्टय अपायकारक असल्यामुळे हा बहुमोल विभाग विविध समस्यांनी ग्रस्त तथा टंचाई ग्रस्त आहे. या खारेपाणीपट्टा प्रदेशात जीवनावश्यक पिण्याचे पाणी या प्रमुख समस्येला सतत तोंड द्यावे लागते. पिण्याचे पाणी अर्थात गोडे पाणी टंचाई निवारण, कृषी व इतर सर्वांगीण विकास साध्य व्हावा या साठी तसेच विभागातील शेतकरी विशेषत: अल्पभूधारक म्हणजे असे शेतकरी की ज्यांच्याजवळ ५ एकरा पेक्षा कमी जमीन आहे अशा शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा मागोवा घेण्याच्या अनुषंगाने तसेच पाण्यासंबंधीच्या विविध स्तरातल्या जनतेच्या गरजा, शेतकऱ्यांच्या समस्या व निसर्गाच्या स्वत:च्या मागण्या यांच्या संदर्भात जल सबंधीत समस्या विषयी शाश्वत स्वरूपाची उत्तरे शोधण्याकरिता अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील पाणीपट्टयातील सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधनपद्धती : कोणत्या ही सामाजिक संशोधनाचे काही निश्चित उद्देश असतात त्या उद्देशांची प्राप्ती करण्यासाठी संशोधकाला योजनाबध्द रुपात संशोधन कार्य करावे लागते. त्यासाठी संशोधकाला योग्य संशोधन आराखडा तयार करावा लागतो. कारण, संशोधन आराखड्याशिवाय वस्तुनिष्ठ संशोधन करणे अशक्य आहे. म्हणूनच सदर अध्ययनाचा विषय व संशोधनाची उद्दिष्टये लक्षात घेऊन संशोधनास उपयुक्त अशा वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन आराखडयाची संशोधकाने निवड केली. वर्णनात्मक संशोधन हे एखादी व्यक्ती, समूह, समाज किंवा घटना व त्यांची स्थिती यांच्या वौशिष्टयाचे यथायोग्य वर्णनकरण्याच्या हेतूने प्रेरित झालेले असते. तर निदानात्मक संशोधनामध्ये एखाद्या समस्येची वास्तविक कारण परंपरा समजून घेऊन ती समस्या सोडविण्याच्या दृष्टीने योग्य उपाय योजना सुचविल्या जातात. म्हणूनच प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांमध्ये वर्णनात्मक व निदानात्मक अशा दोन्ही आराखडयातील आग्रहस्थळे किंवा लक्षणे एकवटलेली आहेत.

संशोधन विषय निश्चित केल्यानंतर संशोधनाच्या विविध पध्दतीशास्त्रीय पायऱ्यांची चर्चा सदर प्रकरणात करण्यात आलेली आहे. सर्वसाधारणपणे संशोधानासाठी खालील प्रमुख पध्दती शास्त्रीय पायऱ्यांचा किंवा पौलूंच्या अनुषंगाने सदर संशोधनाचा कृती आराखडा प्रस्तुत केला आहे.

१.क्षेत्रकार्य अध्ययन पध्दती, २.नमुनानिवड योजना, ३. तथ्य संकलन योजना, ४. संख्याशास्त्रीय योजना.

शेतकऱ्यांच्या प्रमुख सामाजिक समस्या : समस्या म्हणजे असा प्रश्न किंवा अडचण की ज्या वर काही तरी उपाययोजना करणे गरजेचे असते प्रत्येक समाजात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, शौक्षणिक, राजकीय इत्यादी विविध प्रकारच्या समस्या आढळत असल्या तरी प्रत्येक समाजातील समस्येचे स्वरुप आणि त्यांची तीव्रता या मध्ये तफावत असते. भारतीय समाज हा प्रामुख्याने नागरी समाज, ग्रामीण समाज, आदिवासी समाज या तीन समुदायामध्ये विभागलेला असून या समुदायातील कृषी क्षेत्राशी निगडीत व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या ह्या अत्यंत बिकट स्वरुपाच्या आहेत.

खारजमीन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या समस्या : खारजमीन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करतांना तेथील शेतकऱ्यांना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता पुढील समस्या समोर आल्या आहेत या समस्यांचे वर्गीकरण तिन भागात करण्यात आले असून ते प्रामुख्याने जमीनीच्या समस्या, पाण्याच्या समस्या आणि शेतकऱ्यांना उद्‌भवणाऱ्या समस्या यांच्याशी संबंधीत आहे.

जमिनी बाबत समस्या–

१. या जमिनीतील मातीच्या कणात सोडीयम असल्यामुळे या जमिनीत अनेक घातक गुणधर्म निर्माण झालेले आहेत. जसे जमिनीच्या पोटातून पाणी निचरुन न जाणे, जमीन चिभडबनने, जमिनीत डेरे पडणे व वाळल्यावरती खुपटणक बनते.
२. या जमिनीतील जलवाहकता अत्यल्प आहे.
३. पावसाळ्यात जमिनी फुगणे, उन्हाळ्यात आकुंचनपावून खोल व रुंद भेगा (भुढया पडणे) या समस्या उद्‌भवतात.
४. या जमिनीचा सामु (पी.एच) वाजवी पेक्षा अधिक असल्यामुळे पीक पोषक अन्न द्रव्याच्या समतोल पणात बिघाड होवून त्याचा उत्पादक जिवाणूच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. परिणामी पिकाचे उत्पादन घटते.
५. अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील पाणी विम्लयुक्त असून ते ओलीतासाठी उपयुक्त नाही. या पाण्याने सतत ओलीत केल्यास जमिनीच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मात अधिकच बिघाड होऊन तिची उत्पादन क्षमता घटते, असा शेतकऱ्यांचा सुध्दा अनुभव आहे.

खार पाण्याबाबत समस्या–

१. अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील भूगर्भाचे पाणी हे खारे असून त्यामध्ये क्लोराईड व सोडीयम क्षार हे अधिक प्रमाणात आढळतात.
२. पाण्यातील क्षारतेच्या समस्येमुळे या भागातील जमिन ओलीतासाठी अयोग्य असलेली आढळून येते.
३. या पाण्याचा वापर ओलितासाठी केल्यास या जमिनी अधिक टणक बनतात व अशा जमिनीमध्ये पुढील पिके चांगली येत नाहीत.
४. पिण्याच्या पाण्यावर आरोग्य अवलंबून असल्याने या परिसरातील लोकांना पिण्याच्या पाण्यातून अनेक आजार जसे–किडनीस्टोन व पोटाचे विकार यांना सामोरे जावे लागते.

शेतकऱ्यांच्या समस्या–

१. दारिद्रय : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील सर्वेक्षित अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये जवळपास ७८.२५ टक्के शेतकरी हे दारिद्रय रेषेखाली आहेत. दारिद्रयरेषेखाली जीवन जगणारे हे शेतकरी स्वतरूच्या मूलभूत गरजा देखीलपूर्ण करु शकत नाहीत. त्यांच्या जवळील जमीनीचे आकारमान सुध्दा अतिशय कमी त्यामुळे त्यांना उत्पन्न मिळू शकत नाही व त्याच्यातील दारिद्रय ही समस्या वाढतच चालली आहे.

२. निसर्गाचा लहरीपणा : शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे. शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असते. अतिवृष्टी, अवर्षण, अनियमित वृष्टी या चक्रात भारतीय शेती असून महाराष्ट्रातील पर्यायाने अमरावती विभागातील शेती याला अपवाद नाही. विदर्भातील शेती ही निसर्गाच्या अवकृपेचा सतत सामना करीत असते शिवाय या विभागात सिंचनाच्या सुविधा सुध्दा कमी आहेत. त्यातल्या त्यात खारेपाणी पट्टयातील शेती ही निसर्गाच्या गोडपाण्यावर मोठया प्रमाणावर अवलंबून आहे. अशा वेळी अनियमित पावसाच्या प्रमाणाचा खराफटका येथील शेतकऱ्यांना बसतो आहे त्यामुळे त्यांची उत्पादकता कमी होत असून त्यांच्या आर्थिक, सामाजिक जिवनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. जेव्हा भरपूर पाऊस पडतो आणि ज्या भागात रब्बीसाठी भरपूर पाणी असते, अशा बहुतेक भागात धुके आणि दव पडते. यामुळे भुरी, करपा, डाऊनी असे रोग येतात. या रोगांमुळे सर्वच पिकांना फटका बसतो. नुकसान शेतकऱ्याचेच होते. निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि त्यामुळे होणाऱ्या शेणकिडीं मुळे होणाऱ्या खर्चातही वाढ होते आणि नुकसानात ही वाढ होते.

३. अल्पउत्पादन : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील अल्प उत्पादकता ही एक प्रमुख समस्या असून तेथील जमीन क्षारयुक्त असल्यामुळे तेथील जमीनीची उत्पादकता कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विशेषत: अल्पभूधारक शेतकऱ्यांना अतिशय हालाखिचे जीवन जगावे लागते. जमीनीचे अल्प उत्पादकतेमुळे त्यातून उत्पादित होणाऱ्या धान्यातून शेतकऱ्यांची अन्न धान्याची दैनंदीन गरज भागविली जात नाही.

४. क्षारयुक्त पाण्यामुळे होणारे आजार : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील शेतकऱ्यांना क्षारयुक्त पाण्याचा वापर शेतासाठी आणि पिण्यासाठी करावा लागतो. क्षारयुक्त पाणी हे जड असल्यामुळे या पासून अनेक शारीरिक व्याधी मध्ये वाढहोतांना आढळून येते. त्यामुळे शेतकऱ्यांचा बराच खर्च हा आरोग्या वर होतो.

५. पिण्यायोग्य पाण्याचा अभाव : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील पिण्याचे योग्य पाणी नाही. या करीता शासनाची कुठलीही नळ योजना नाही. मुलगामी व प्रतिगामी योजनेसाठी कुठलेही नियोजन नाही. त्यामुळे तीन जिल्ह्यातील जवळपास ५० लाखा वर नागरीकांना नाईलाजास्तव हे पाणी प्यावे लागते. त्यामुळे जीवनास मारक असणारे पाणी मारक ठरत आहे.

६. कर्जबाजारीपणा : शेतकऱ्यांना त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता होत नाही त्यामुळे शेतकरी कर्ज काढतात. शेतकऱ्यांना कर्ज देण्यामध्ये अधिकोष आणि सावकार या दोन स्त्रोतांचा समावेश होत असून अधिकोषांकडून जे कर्ज दिले जाते ते प्रामुख्याने बागायती शेतकऱ्यांना दिले जाते कोरडवाहू शेतकऱ्यांना मात्र अधिकोषांकडून कर्ज मिळत नसल्यामुळे हे शेतकरी सावकाराकडून कर्ज घेतात. परंतु शेतातून होणाऱ्या अल्पउत्पादनामुळे शेतकरी वेळेवर कर्जाची परतफेड करु शकत नाहीत व त्यांच्या वरील कर्जाचा बोझा वाढत जातो. महाराष्ट्रातील इतर भागापेक्षा अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील भूमीची उत्पादकता कमी दिसून येते. एकूण अन्न धान्य पिकाच्या बाबतीत अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्र हे पूर्णविदर्भ तसेच महाराष्ट्राच्या तुलनेत उत्पादकतेत कमी दिसून येते याचा सरळपरिणाम शेतकऱ्यांच्या कौटुंबिक उत्पादनावर होतो. आणि शेतकरी आपल्या दैनंदिन गरजापूर्ण करण्यासाठी शेतकरी विविध स्त्रोता कडून कर्ज घेतो.

७. निरक्षरता : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील बहुतांश शेतकरी अल्प साक्षर आहेत. त्यामुळे अल्प भूधारक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. सावकाराकडून होणारी आर्थिक पिळवणूक, शास्त्रोक्त पध्दतीने शेतीकरण्याचे ज्ञान त्यांना अवगत होत नाही. एकंदरीत अल्प साक्षरतेमुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

८. मार्गदर्शनाचा अभाव : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेती करण्याचे कुठलेही मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या उत्पादन क्षमतेवर प्रतिकुल परिणाम होतो.

९. पशुव्यवस्थापनाचा अभाव : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात जोडधंदा करण्यासाठी पशुंचे फार महत्त्व असलेले दिसून येते. परंतु या पशुंचे योग्य व्यवस्थापन व काळजी घेण्यासाठी योग्य व्यवस्था, जसे त्यांना गोठा, चारा इ. ते उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होतांना आढळते. पूर्णा खोऱ्यातील खारेपाणीपट्टयातील खाऱ्या पाण्याचा जनावरांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाला असून सदर क्षेत्रातचा राटंचाईमुळे पशुधन कमी झाले आहे. त्यामुळे शेतीला आवश्यक असलेले शेणखत, कंपोस्ट खते, सेंद्रीय खते, गांडूळ खत इत्यादीचा वापर शेतकरी करु शकत नाहीत व शेतीची गुणवत्ता घटत आहे.

१०. पाण्यामुळे होणारे जीवांचे नुकसान : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील क्षारयुक्तपाण्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्याच नव्हे तर शेतमजूर शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य व इतर लोकांच्याही जीवाचे नुकसान होत असून त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे.

११. आरोग्य विषयक सुविधांचा अभाव : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रात असणारी क्षारयुक्तपाण्याची समस्या आणि त्यातून उद्‌भवणारे आजार या पासून बचाव करण्यासाठी किंवा त्या आजाराचे प्रमाण वाढू नये म्हणून आवश्यक आरोग्य सुविधा खारेपाणीपट्टयातील बहुतांश गावात अजुनही उपलब्ध नाहीत. खारेपाणीपट्टयातील प्राथमिक आरोग्य क्रेंद्रात संबंधीत

आजारावर औषधे आणी तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक सुध्दा नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा बराच पैसा शहराच्या ठिकाणी जाऊन उपचार घेण्यावर खर्च होतो त्यामुळे आरोग्याचे आणि आर्थिक नुकसान त्यांना सहन करावे लागत आहे.

१२. भांडवलाची कमतरता : भारतीय शेतकरी कर्जामध्ये बुडालेला असल्याने त्याचे एकूण उत्पन्न वाढविण्याचा मार्ग हा शेतमालाच्या विपणनाशी संबंधित आहे. शेतीतून उत्पादित झालेल्या शेतमालास उचित मूल्य प्राप्त होण्यासाठी शेतमालाच्या विपणनाची व्यवस्था चांगली असली पाहिजे. प्रत्यक्षात मात्र गावातील सावकार, अडते, व्यापारी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनाच शेतकऱ्यांकडून शेतमालविक्री केला जात असल्यामुळे शेतमालास उचित मूल्य प्राप्त होत नाही. एकूण उत्पादनातून कौटुंबिक निर्वाह, बी–बियाणे आणि मजुरांना देण्यासाठी लागणारे धान्य इत्यादींची तरतूद केल्यानंतर विक्रि योग्य आधिक्य अतिशय कमी रहाते. त्यामुळे शेतकऱ्याचे एकूण उत्पन्न कमी रहाते. म्हणूनच शेतकरी शेतीयोग्य भांडवलाची उपलब्धता करु शकत नाही.

१३. शासकीय योजनांची प्रभावी अमंलबजावणी नाही : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्राच्या विकासासाठी अनेक योजना कागदोपत्री मंजुर केल्या जातात, शासकीय दरबारात मंजुर योजनांची अंमलबजावणी मात्र योग्य रितीने होत नाही परिणामत: शेतकरी वर्गाला त्याचालाभ मिळत नाही.

१४. अधिकारी वर्गाची उदासिनता : अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्राच्या विकासासाठी नेमण्यात आलेला अधिकारी वर्ग आपले कर्तव्य योग्य रितीने पार पाडत नाहीत. ते शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शनकरीत नाही तसेच ते शासकीय योजनांचा लाभ देण्यात देखील कसुर करतांना आढळतात.

१५. शेतकऱ्यांच्या आत्महत्या : आधुनिक काळात ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत. उदा रू–कर्जबाजारीपणा, बेकारी, दारिद्रय, नापीकी, इत्यादीमुळे या व्यवसायाप्रति दुरावा निर्माण होत आहे. ज्यामुळे गैर किसानीकरण होऊन ग्रामीण भागात उदर निर्वाहाचा प्रश्न निर्माण होताना आढळून येतो. परिणामत: भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील शेतकरी आत्महत्या करताना दिसून येतात. या समस्येकडे लवकरच लक्ष दिले नाही तर ही समस्या विक्राळ रुप धारण करुन देशाचा पोशिंदा वर्ग नष्ट करेल व त्याचे परिणाम सर्व देशालाच भोगावे लागतील.

शेतकऱ्यांच्या समस्या अत्यंत बिकट होत आहेत. पूर्वीनापिकी, साथीचे रोग, मालाला हमीभाव न मिळणे, शेतकऱ्यांचे आरोग्य, निवासाच्या समस्या, शेतकऱ्यांची निरक्षरता, अंधश्रध्दाळूपणा, परंपरागत उत्पादन पध्दतीचा वापर, अतिवर्षन–अवर्षणाची समस्या, कूळप्रथा, वेठबिगारी इत्यादी समस्या प्रमुख होत्या. त्यातील काही समस्या आजही कायम असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही समस्या नव्याने निर्माण होऊ पाहत आहे. खार पाणीपटयातील शेतकरी सुध्दा याला अपवाद नाही. उपरोक्त विविध समस्यांमुळे अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील शेतकरी पाणी आणि जमीन यांच्या दृष्टचक्रात अडकलेला दिसून येतो.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संषोधन पद्धती,पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिषर्स, महाल नागपूर ४४००३२
2) https//maharashtratimes.indiatimes.com/nagpur-vidarbha-news
३) पाटील वा. भ.,पंचायतीराज्य, विद्याप्रकाशन नागपूर,
४) आगलावे प्रदिप, ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन–१ भगवाघर कॉम्लेक्स धरमपेठ नागपूर.
५) हजारे अण्णा, माझे गाव माझे तिर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, राळेगण सिद्धी जि.अहमदनगर.
६) ठोंबरे सतिष, ग्राम प्रषासन, कैलाष पब्लिकेषन्स, औरंगाबाद
7) https://www.loksatta.com/lokprabha/pustkachepaan/marathi-book-review-22-1163923
8) https://maharashtratimes.com/editorial/column/time-to-time/shrirang-sharangpani-article-on-problem-of-farmers/ article show/ 79114293.cms

*प्रमुख, समाजशास्त्र विभाग, श्री.धाबेकर कला माविद्यालय, खडकी, अकोला

***

अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ : वैज्ञानिक दृष्टिकोन

*डॉ. संतोष गोविंद गांगुर्डे

प्रस्तावना :

आज सर्वच क्षेत्रांत विलक्षण वेगाने विज्ञानाची प्रगती होत अआहे. निसर्गाचे नियम माणसाला समजू शकतात व त्या ज्ञानाचा वापर तो स्वतःसाठी करू शकतो ही कल्पना ऐतिहासिक दृष्ट्या नवीन आहे. विज्ञानामुळे विशेषतः माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रांत अनेकविध शोध लागलेत्यामुळे जग जवळ आले व एक छोटे खेडे वाटू लागले.

एका बाजूला हे असे असले तरीही भारतात अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणाऱ्यांची कमी नाही. काळी-जादू, नरबळी, भूतप्रेताशी संबंधित कित्येक घटना दररोज पाहायला मिळतात. या अंधश्रद्धेविरूद्ध अनेक संघटना देखील कार्यरत आहेत, एवढचं नाही तर महाराष्ट्रात यासाठी कायदा देखील तयार करण्यात आलाय. पण तरीही लोकं या गोष्टींना बळी पडतात. सदर लेखात वैज्ञानिकदृष्टिकोन समाजात रुजविण्यासाठी अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीची आवश्यकता याविषयी मांडणी करण्यात आली आहे.हा लेख पुढील पैलूंवर भाष्य करणार आहे.

1. वैज्ञानिकदृष्टिकोन
2. वैज्ञानिक दृष्टीकोनाची काही वैशिष्टये
3. वैज्ञानिकदृष्टिकोन कसा विकसित होतो?
4. वैज्ञानिकदृष्टिकोन आणि अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ

वैज्ञानिक दृष्टिकोन :

आदिमावस्थेतील माणसे निसर्ग लीला आश्चर्यचकित होऊन पाहत होती. पाऊस कसा पडतो विज कशी लखाखते, जंगलच्या जंगले राख करत जाणारे वणवे कसे तयार होतात? वादळ कसे वाहते? हे त्या माणसाला माहीत नव्हते, हे सारे त्या मानवाच्या आकलनाच्या पलीकडे होते. या साऱ्या फार महान शक्ती आहेत आणि त्याच्या कृपाप्रसादावरच आपले आयुष्य अवलंबून आहे या जाणिवेतून या व्यक्तींना पंचमहाभूतांचे व पंचमहादेवतांचे स्थान मिळाले. या साऱ्या निसर्ग लीलांशी टक्कर देऊ इच्छिणाऱ्या माणूस हा एका अर्थाने पृथ्वीवरचा सर्वात दूरवर प्राणी होता. तो गुहेमध्येच राहत होता आणि कच्चे मांसच खात होता सर्व अर्थाने दुबळा असणारा माणूस जगाचा स्वामी बनला ही किमया कशाची होती?

ज्ञान हा माणसाचा खास विशेष आहे. इतर प्राण्यांनी पर्यावरणाची जुळवून घेतले. मानवाने स्वामित्व मिळवले. ही सारी प्रगती हजारो पिढ्यांची आहे. पकड घेता येईल, अशी रचना असलेल्या स्वतःच्या हाताने आणि निर्माण केलेल्या विविध हत्यारांनी आजूबाजूच्या निसर्गावर प्रक्रिया करता करता माणसाचा मेंदू विकसित झाला. माणसाने भाषा निर्माण केली, जोपासली, वाढवली, उत्क्रांत स्वरयंत्र व मुख पोकळी हे मानवाचे खास वेगळेपण. माणसाने ज्ञानार्जनच केवळ केले नाही तर भाषेच्या आधारे केलेले ज्ञान संक्रमण हे माणसाचे अभूतपूर्व वैशिष्ट्य मानावे लागेल. हाताचा हत्यारांचा वापर, भाषेची निर्मिती आणि तर्कबुद्धीचा विकास या आधारे गरुडझेपेसाठी माणसाची पूर्वतयारी झाली.

विज्ञान म्हणजे ज्ञानसाधना होय. ज्ञानाचा अखंड शोध होय. इंग्रजीमधील सायन्स या शब्दाला मराठी प्रतिशब्द विज्ञान असा आहे. सायन्स हा शब्द लॅटिन भाषेतील 'सायेन्सिया' या शब्दापासून तयार झाला आहे. सायन्स या या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञानाबद्दल अगदी शुद्ध स्वरूपात प्रेम हीच विज्ञानाची प्रेरक शक्ती होय. सृष्टीबद्दल कधीही न संपणाऱ्या कुतुलातून विज्ञानाचा जन्म झाला. विश्वातील नाना क्रिया, अनेक घटना, प्रकट होणाऱ्या अविष्कार अस्तित्वात असणाऱ्या विविध वस्तू या साऱ्यांबाबत माणसाच्या मनात अपार कुतूहल असते, होते. आकाशाचा आणि सागराचा रंग निळाच का? फुलपाखरांच्या अंगावर इतके रंग कुठून येतात? समुद्रावर लाटा का तयार होतात? भरतीआणि ओहोटी कशामुळे होते? नुसत्या डोळ्यांनी आकाशातील किती तारे मोजता येतील? सूर्योदयापूर्वी तांबडे का फुटते? एक ना दोन अक्षरशः अगणित प्रश्न नव्या ज्ञानाच्या शोधात माणसाच्या मनात सतत उभे राहत असतात. ही जिज्ञासा तृप्त होताच त्याला मनस्वी आनंदी होतो, समाधान लाभते. आनंद प्राप्तीसाठीची धडपड ही माणसाची एक सहज प्रवृत्ती आहे.

विज्ञानाचे मूळ ऐतिहासिक दृष्ट्या माणसाला लाभलेली लाभलेली बौद्धिक देणगी व मनुष्याच्या अंगातील पारंपारिक कारागिरी किंवा कौशल्य यामध्ये सहज स्पष्ट होते. व्यावहारिक अनुभव व व्यक्तीच्या अंगातील निसर्गदत्त कौशल्य याची साठवण एका पिढीतून दुसऱ्या पिढीत होत असते आणि त्याचा पिढ्यानपिढा विकासही होत आला आहे. माणसाचे अस्तित्व पृथ्वीवर सुरू झाल्यापासूनची काही लाख वर्षे माणसाची अवस्था पूर्णत: रानटीच होती. ढोलीत व गुहेत लपणे, फळे व शिकार रोजच्या रोज मिळवणे व खाणे, मृत जनावराची कातडी व झाडाच्या सालीने स्वतःची शरीर झाकणे असे त्या काळातील त्याचे जीवन होते.

माणसाने तर्क केले व अनेकदा ते चुकले देखील. कुतूहल व गरज यासाठी ज्ञान निर्मिती वाढत राहिली. शून्याचा शोध भारतात लागला. आर्यभट्ट व भास्कराचार्य यांच्या ग्रंथात गणिते व खगोलशास्त्र यावरील महत्त्वाचे सिद्धांत आढळतात.मात्र इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या अखेरीपासून भारतात गुरुवाक्य प्रमाणम ही प्रवृत्ती वाढली आणि ज्ञान मिळवण्याची प्रवृत्ती कमी झाली.

निरीक्षण, तर्कशुद्ध विचार व प्रयोग या आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर होण्यात दोन अडथळे प्रामुख्याने होते. त्यातील पहिली अडचण ही की, कुशल कारागीर असलेल्या व्यवहारी व कृतीशील व्यक्तीमध्ये विचार व त्यासाठीची सम्यक दृष्टी यांचा अभाव असे. दुसरी महत्वाची अडचण म्हणजे नैसर्गिक घटनांबद्दलच्या माणसाच्या कल्पना त्या काळात बहुधा अस्पष्ट व डळमळीत तरी असावयाच्या नाहीतर पूर्वग्रह दूषित तरी.विज्ञानाचा गाभा इंद्रियाद्वारे येणारी वस्तूनिष्ठ प्रचिती हा असतो. इसवी सनाच्या पंधराव्या शतकात व त्यापूर्वीच्या काळात युरोपात राजा व धर्म मत यांना संमत असणाऱ्या मतावर विज्ञान अवलंबून होते. त्यामुळे वैज्ञानिक प्रगती तर खुंटलीच पण निसर्गाबद्दल कित्येक चुकीच्या कल्पना समाजात रूढ झाल्या उदाहरणार्थ पृथ्वी ही विश्वाच्या मध्यभागी आहेत. देवाकडून मानवाची निर्मिती झाली इत्यादी. त्या काळातले विज्ञान हे श्रद्धाधिष्ठित होते.

हा काळ मागे पडून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रारंभ युरोपमध्ये सोळाव्या शतकाच्या दरम्यान झाला असे मानण्यात येते. परंतु तपासणीची विकसित यथायोग्य अचूक पद्धत हे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे केवळ एक रूप आहे ; त्याचा गाभा आहे. अनेक शास्त्रज्ञांनी प्रस्थापित मताला स्वतःच्या प्रज्ञेने निर्भयपणे आव्हान दिले आणि त्यासाठी मृत्युदंडा-पर्यंतच्या सोसाव्या लागणाऱ्या सर्व हालअपेष्टा हसतमुखाने स्वीकारल्या. जगातील देशांचा इतिहास हेच दाखवितो की स्वतंत्र चिंतन अवलोकन अनुभूती व त्या आधारे ज्ञान यांना ज्या प्रमाणात ज्या क्षेत्रात योग्य अवसर मिळतो त्या प्रमाणात त्या क्षेत्रात समाजाचा उत्कर्ष होतो. हे स्वतंत्र विचार, चिंतन, संशोधन थबकलेला काळ हा त्या देशाच्या संस्कृतीच्या ऱ्हासाचा काळ असतो.

ज्ञान आत्मसात करण्याची विज्ञानाची पद्धत म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन. धार्मिक श्रद्धा ही माणसातील एक मूलगामी व बळकट प्रेरणा आहे यात शंका नाही पण त्याच प्रमाणात चिकित्सक विचार करण्याची शक्तीही माणसाला आहे. व्यवहारातला निर्णय घेताना माणूस सतत हिचाच उपयोग करतो. साधक बाधक दृष्टीने शक्य तितक्या समग्रतेने विचार करून व्यवहार केला नाही तर तो फसतो. वैज्ञानिक विचारपद्धती म्हणजे हीच साधक बाधक विचारपद्धती. पण व्यावहारिक निर्णय घेताना हिचा वापर होत नाही. सत्य काय आहे, घटना कोणत्या नियमांना अनुसरून घडतात त्याचा शोध घेण्यासाठी तिचा वापर होतो. जेव्हा एखादा शास्त्रज्ञ असा शोध लावतो तेव्हा त्याची मांडणी ज्या पुराव्या आधारित होते तो पुरावा आणि त्यापासून तार्किक अनुभवाने काढलेले निष्कर्ष या स्वरूपात तो करतो. तो शोध अमान्य करायचा तर या पुराव्याला आव्हान द्यावे लागते किंवा अनुमानात दोष आहे हे दाखवावे लागते. नाहीतर तो शोध प्रमाण मानून स्वीकारावा लागतो. यामुळे वैज्ञानिक विज्ञान विचार पद्धतीचा अवलंब करून प्रस्थापित झालेल्या वैज्ञानिक सिद्धांताशी धार्मिक श्रद्धेला जुळवून घ्यावे लागते. वैज्ञानिक विचार पद्धतीवर आधारलेले ज्ञान जेव्हा युरोपियन समाजात स्थिर झाले तेव्हा धार्मिक श्रद्धा अस्थिर झाली असे नाही पण धार्मिक क्षेत्राचे क्षेत्र आणि वैज्ञानिक विचार पद्धतीचे क्षेत्र यांची परस्पर सुसंगत आखणी झाली. माणसाला ज्याचे निरीक्षण करता येते असे पदार्थ व घटना त्यांचा मिळून निसर्ग बनतो. या नैसर्गिक पदार्थाचे स्वरूप आणि नैसर्गिक घटनांचे नियम यांचा वैज्ञानिक पद्धतीला अनुसरून शोध घेणे हे विज्ञानाचे कार्यक्षेत्र आहे. तेथे धर्मश्रद्धेला वाव नाही.

माणसे अंधश्रद्धेला बळी पडतात कारण त्यांनी सतत तो आधार शोधावा असे सामाजिक वास्तव आहे. स्वतःच्या अगतीकतेतून, शोषणातून, अस्थिरतेतून मनाला दिलासा देण्यासाठी अंधश्रद्धेचा भ्रामक पण हवाहवासा आधार घेणारच. परिस्थिती बदलली, आधार शोधण्याची गरज संपली वा कमी झाली की आपोआप अंधश्रद्धा कमी होतील असे नाही. मानवाचा अमर्याद हव्यास हे देखील अंधश्रद्धावाढी मागील महत्वाचे कारण आहे. हे सर्व पूर्ण करण्यासाठी मानवी मन अंधश्रद्धांना कवटाळते. कार्यकारणभावाला पूर्णपणे बाजूला सारून उपाययोजना केल्या जातात, वैज्ञानिक जाणीव कधी निर्माण केली गेली नाही. या उलट 'असेल बाबा काही तरी आपल्याला न समजणारे' अशीच मानसिकता तयार केली जाते.

वैज्ञानिक दृष्टिकोनाची काही वैशिष्टये:

१. कोणत्याही अधिकारी व्यक्तीने सांगितले म्हणून व ग्रंथात लिहिले आहे म्हणून खरे मानणे चूक आहे. सत्याचा अंतिम निकट म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण व निरीक्षण.

२. विश्व विशिष्ट नियमांनीबद्ध आहे. ह्या नियमांचे ज्ञान प्रयोग, तर्क व पडताळा ह्या पद्धतीने मिळते.विज्ञानाचा विषय असणारे भौतीक जग माणसाच्या जाणिवेच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे, ते निश्चित अशा नियमबद्ध प्रक्रियेमधून बदलत असते.

३. वैज्ञानिक दृष्टिकोन हा अंतिम व श्रेष्ठ ज्ञान बुद्धीच्या सातत्याने प्राप्त होत नसून साक्षात्कार वा अतींद्रिय अनुभवांच्या द्वारा प्राप्त होतं, ही तत्त्वज्ञान धर्म विचारातील श्रद्धा साफ नाकारतो.

४. वैज्ञानिक दृष्टिकोनाची सिद्धता करण्यासाठी करावयाच्या प्रयोगात प्रयोगाच्या परिस्थितीवर पूर्ण ताबा असतो. वैज्ञानिक सत्याच्या बाबतीत काटेकोर तपासणीनंतर एक जरी अपवाद आढळला तरी विज्ञानाचा डोलारा कोसळून पडतो.

५. विज्ञान हे सार्वजनिक असते, वैज्ञानिक सत्य सर्वांसाठी खुले असते. वैज्ञानिक दृष्टीकोनाला माताभिनिवेश (dogmatism) मंजूर नसतो .

६. विज्ञान हे नेहमीच नम्र असते. मी सांगितलेला शब्द शेवटचा, माझा निष्कर्ष अंतिम असा दावा विज्ञान कधीही करत नाही. विज्ञानाचे मत, वस्तू, घटना तपासवयाच्या, न समजलेल्या घटनांचा शोध चालू ठेवायचा. व्यवहार मात्र सिद्ध झालेल्या सत्याच्या आधारेच करावयाचा असे असते.

शास्त्राचे प्रत्येक गृहीतक हे स्वतःला तपासून घेण्याच्या आणि त्यामध्ये कसाला उतरले नाही तर नष्ट होण्याच्या निर्भयतेने उभे असते. कितीही प्रगती झाली तरी सर्व काही समजले असा दावा विज्ञान कधीही करत नाही. नवे प्रश्न सदैव तयार असतात. नवी क्षितिजे खुणावत असतात.

वैज्ञानिकदृष्टिकोन कसा विकसित होतो ?

मनात प्रश्न तयार होणे यापासून सुरुवात होते. आजूबाजूला निसर्ग समाज मानवी कृती हे सारे नजरेस येताना माणसाच्या मनात असंख्य प्रश्न तयार होतात. माणूस नावाच्या प्राण्याची लक्षणे सांगता येईल एवढा हा विशेष महत्त्वाचा आहे. काय कसे केव्हा का हे प्रश्न या घटनांच्या बाबतीत माणूस स्वतःलाच सतत विचारत गेला आणि त्याची उत्तरे शोधत गेला. एका उत्तरानंतर आणखी अनेक प्रश्न निर्माण होत गेले आणि त्यातूनच विज्ञानाची आजची अफाट प्रगती निर्माण झाली.

निरीक्षणातून प्रश्न पडणे आणि त्याच्या उत्तरासाठी आणखी निरीक्षणे करणे हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पाया. निरीक्षणाने माहिती गोळा केल्यावर जमा झालेल्या गोष्टींची वर्गवारी व संगतवार मांडणी करावी लागते. प्रश्न उपस्थित केले जातात.अनेक निरीक्षणे नोंदवावी लागतात. नंतर पुरावा तयार होऊ लागतो, तो जास्तीत जास्त निर्दोष करण्याची गरज असते. पुरावा गृहीत धरून कधीही चालत नाही. अनेक पुरावे धर्मग्रंथ, धर्माचार्य यांच्या आधारावर गृहीत धरले जातात. उदाहरणार्थ स्वर्ग-नरक पातळ, पुनर्जन्म वगैरे या गोष्टी पडताळून घेण्याची सोय नाही आणि म्हणून पुरावा म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवणे श्रेयसकर नाही. असा कल्पित पुरावा जसा मानता येत नाही तसेच आत्मनिष्ठ पुरावा

देखील ग्राह्य धरता येत नाही. स्वतःचे विकार, भावना, पूर्वग्रह, इत्यादी बाबतचा आत्मनिष्ठ अनुभव व निरीक्षण याला पुरावा समजता येत नाही.

एखाद्या व्यक्तीला पडलेला प्रश्न तिच्या आजूबाजूला कोणाला व तिच्या आधीच्या काळातील व्यक्तींनाही पडला असणे शक्य आहे, त्या प्रश्नांशी संबंधित इतरांच्या व स्वतःच्याही निरीक्षणाचा विचार म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. इतरांचे पुरावे लक्षात घ्यावे लागतात त्यांचे सामर्थ्य व मर्यादा तपासावी लागते. सद्य प्रश्नांच्या वर्तमानाची या सर्व प्रयत्नांशी सांधेजोड करून वस्तुनिष्ठ दृष्टिकोन तयार होण्यास प्रारंभ होतो. या टप्प्यावर काही प्रश्नांची उत्तरे हाती लागतात तर काही प्रश्न जास्त आव्हानात्मक आहेत असे समजते. प्रश्न आव्हानात्मक असला की माणूस त्यात गुंतून राहतो विचारचक्रे स्वतःचा वेग घेतात व शक्य कोटीतील उत्तरांच्या काही दिशा त्यातून हाती येतात. संचित ज्ञानाच्या विरोधात एखादी उपपत्ती जात असेल तेव्हा त्या विसंगतीचे नेमके स्वरूप असे उपपत्ती मानणाऱ्यांना जोखावे लागते. तसेच उपपत्ती नेहमी खरे ठरेलच असे नाही म्हणूनच त्याचा पडताळा पाहणे आवश्यक असते एखाद्या घटनेचा उलगडा एकापेक्षा अधिक उपपत्ती मांडून होत असेल तर कोणते गृहीतक जास्त विश्वसनीय? यासाठी नवी माहिती मिळवावी लागते, नवे प्रयोग केले जातात, यातून विज्ञानाचा विकास होतो.

ज्ञान आत्मसात करण्याच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा शेवटचा टप्पा म्हणजे उपपत्ती ते सिद्धांत (Theory) हा प्रवास. अनेक उपपत्ती पैकी एखादी उपपत्ती सिद्धांताच्या पायरीवर पोचत असते. धार्मिक तत्व व वैज्ञानिक सिद्धांत यात मुख्य फरक असा की धार्मिक तत्त्वात एक चिरंतन आणि निर्विवादपणे निश्चित अशा सत्याचा समावेश असल्याचा दावा करण्यात येतो. याउलट विज्ञान हे नेहमीच तात्पुरत्या अशा स्वरूपाचे असते. परंतु प्रगत शास्त्रात सामान्यतः हे बदल थोडी अधिक अचूकता संपादन करण्यापुरतेच आवश्यक असतात. सामान्यपणे सुस्थिर झालेली उपपत्ती पूर्णपणे त्याज्य ठरत नाही. अधिक योग्य उपपत्तींमध्ये ती अंतर्भूत केली जाते आणि म्हणूनच वैज्ञानिक ज्ञानाची प्रगती होते.

हा प्रवास झाला की पडलेला प्रश्न व केलेले निरीक्षण इथपासून प्रारंभ झालेला प्रवास त्यासंदर्भात संपलेला असतो. एक सत्य हाती गवसलेले असते. ज्ञान अमर्याद असल्याने सद्यकालीन ज्ञानाच्या मर्यादेतच खरे असणारे हे सत्य असते. ते त्रिकालाबाधित वा अंतिम सत्य नसते. तरीही संपूर्ण मानवाच्या ज्ञानाची क्षितिजे त्यामुळे विस्तारली जातात. त्यातून पुन्हा नवे प्रश्न खुणावू लागतात आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे पुन्हा प्रवास पहिल्या पायरी पासून सुरू होतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ :

समाजातील प्रत्येक नागरिकाने जर निसर्गातील प्रत्येक घटनेमागील कार्यकारण भाव समजून घेतला तर समाजातील अंधश्रद्धांचा पगडा बर्यापैकी कमी होऊ शकेल. अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ ही एक व्यापक चळवळ व्हावयाची असेल तर आपल्या शिक्षण पद्धतीत आमुलाग्र बदल करावयास हवा. भारतीय संविधानात देखील वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. याचा अधिक प्रसार व प्रचार करणे हेच प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचा प्रमुख उद्देश देखील हाच आहे.

संदर्भ

- दाभोलकर नरेंद्र : विचार तर कराल, राजहंस प्रकाशन, पुणे, २००३
- कसबे रावसाहेब : मानव आणि धर्मचिंतन, सुगावा प्रकाशन, पुणे, २००८
- दाभोलकर नरेंद्र : तिमिरातून तेजाकडे: समग्र अंधश्रद्धा निर्मुलन व पुढे पुणे, २००३
- https://maharashtratimes.com/editorial/article/maharashtra-and-superstition-eradication-movement/ articleshow/ 78206639.cms

* समाजशास्त्र विभाग प्रमुख आणि सहयोगी प्राध्यापक, पाटकर-वर्दे महाविद्यालय, एस.व्ही .रोड;

गोरेगाव (प.) मुंबई- 400104, ईमेल- santoshggangurde@gmail.com, फोन - 9821560920

***

भारतीय नागरिकांची सामाजिक व राजकीय कर्तव्ये – एक समाजशास्त्रीय सिंहावलोकन

*डॉ.प्रदीप एच.गजभिये

सारांश:

देशाचे एक चांगले नागरिक या नात्याने समाज आणि देशाच्या कल्याणासाठी आपले हक्क आणि कर्तव्ये जाणून घेणे आवश्यक आहे. समाजाच्या चांगल्या-वाईट स्थितीला आपण प्रत्येकजण जबाबदार असतो हे समजून घ्यायला हवे. समाजात आणि देशात काही सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी आपण आपल्या विचारांचे कृतीत रूपांतर केले पाहिजे. जर वैयक्तिक कृतीतून जीवन बदलता येत असेल, तर समाजात केलेल्या सामूहिक प्रयत्नांचा देशावर आणि संपूर्ण समाजावर सकारात्मक परिणाम का होऊ शकत नाही. त्यामुळे समाजाच्या आणि एकूणच देशाच्या समृद्धीसाठी आणि शांततेसाठी नागरिकांच्या कर्तव्याला खूप महत्त्व आहे. प्रस्तुत शोधपत्रात भारतीय नागरिकांची सामाजिक कर्तव्ये यावर विचार व्यक्त करण्यात आले आहे.

सूचक-शब्द: नागरिकांची कर्तव्ये, भारतीय राज्यघटना, सार्वभौमत्व

प्रस्तावना:

आपण एक सामाजिक प्राणी आहोत, समाजात आणि देशात विकास, समृद्धी आणि शांतता आणण्यासाठी आपल्यावर अनेक जबाबदाऱ्या आहेत. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आपल्याला भारतीय राज्यघटनेने काही अधिकार दिलेले आहेत. वैयक्तिक विकास आणि सामाजिक जीवन सुधारण्यासाठी नागरिकांचे सक्षमीकरण अत्यंत आवश्यक आहे. देशाची लोकशाही व्यवस्था पूर्णपणे देशातील नागरिकांच्या स्वातंत्र्यावर आधारित आहे. जसे आपण सर्व जाणतो, अधिकार आणि कर्तव्ये हातात हात घालून जातात. कर्तव्यांशिवाय आपले हक्क निरर्थक आहेत, त्यामुळे दोन्ही प्रेरणादायी आहेत. देशाला प्रगतीपथावर सुरळीतपणे चालवण्याचे कर्तव्य आपण पार पाडले नाही तर आपल्याला आपल्या मूलभूत हक्कांचे लाभ मिळण्याचा अधिकार नाही. मानवी जीवनात समाजाला विशेष महत्त्व आहे. माणसाने समाज निर्माण केला आहे. समाजात राहून तो स्वत:चा विकास करतो, म्हणून त्याला सामाजिक प्राणी म्हटले जाते. समाजात राहून त्याच्या सर्व गरजा पूर्ण होतात. त्याचे चारित्र्य बांधले आहे. त्याचे सुख-दु:ख वाटून घेण्यासाठी त्याला कोणी ना कोणाची गरज असते आणि यात समाजाचा मोठा वाटा असतो. पशू-पक्ष्यांचाही स्वतःचा समाज असतो. त्यामुळे समाजाची किती गरज आहे हे आपण समजू शकतो. समाजात राहूनच त्याला सुसंस्कृत म्हणतात. समाज त्याच्यासाठी योग्य आणि चुकीच्या मर्यादा ठरवतो. त्याची चुकीची पावले थांबवतो आणि त्याला योग्य आणि चुकीची जाणीव करून देतो. अशी अनेक कार्ये आहेत, जी समाजाकडून केली जातात. समाज मानवाच्या विकासासाठी कार्य करतो. ही अशी संस्था आहे, जी माणसाने निर्माण केली आहे आणि माणूस हा तिचा भाग आहे. जर या पृथ्वीतलावर मानव जातीचा एकही भाग नसेल तर समाजही नसेल. दोघेही शतकानुशतके एकत्र काम करत आहेत. आज, जवळजवळ सर्व देशांच्या संविधानात नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचे वर्णन केले गेले आहे. अशा परिस्थितीत देशाच्या संविधानाने दिलेल्या कर्तव्याचे पालन करणे ही देशातील नागरिकांची जबाबदारी बनते. भारतीय राज्यघटनेबद्दल बोलायचे तर त्याचे लिखाण 9 डिसेंबर 1947 पासून सुरू झाले. संविधान सभेच्या सर्व 389 सदस्यांनी भारतीय राज्यघटना तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि 26 जानेवारी 1950 रोजी त्याची अंमलबजावणी करण्यात आली. नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना कायम राहावी, यासाठी १९७६ साली सरकारने स्थापन केलेल्या स्वरण सिंग समितीच्या शिफारशींवरून नागरिकांची मूलभूत कर्तव्ये भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आली. भारतीय राज्यघटनेतील ही 42 वी दुरुस्ती होती. पूर्वी मूलभूत कर्तव्यांची संख्या 10 होती. जे 2002 मध्ये 86 व्या दुरुस्तीदरम्यान 11 पर्यंत वाढवण्यात आले. भारतीय नागरिकाची मूलभूत कर्तव्ये सोव्हिएत युनियनच्या संविधानाने प्रेरित आहेत. सध्या, भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये राज्यघटनेच्या भाग IV (a) कलम 51A च्या स्वरूपात दिली आहेत.

समाजव्यवस्था संकल्पना:

हे लक्षात घेण्यासारखे आहे की भारत हा जगातील अशा काही देशांपैकी एक आहे जिथे लोकशाहीची गौरवशाली परंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. प्रसिद्ध इतिहासकार के. पी. जयस्वाल यांच्या मते, प्राचीन भारतातील प्रजासत्ताक ही संकल्पना रोमन किंवा ग्रीक प्रजासत्ताक व्यवस्थेपेक्षाही जुनी आहे. भारतीय लोकशाहीच्या सध्याच्या स्वरूपाची कथा या प्राचीन संकल्पनेत दडलेली असल्याचे इतिहासकारांचे मत आहे. प्राचीन काळापासून, भारतामध्ये कर्तव्य बजावण्याची परंपरा आहे आणि व्यक्तीच्या "कर्तव्यांवर" (कर्तव्य) भर देण्यात आला आहे. भगवद्गीता आणि रामायण देखील लोकांना त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी उपदेश देते, कारण गीतेमध्ये भगवान कृष्ण म्हणतात की "फळाची अपेक्षा न करता कर्तव्य पार पाडावे." गांधीजींचे असे मत होते की "आपल्या हक्कांचे खरे स्त्रोत ही आपली कर्तव्ये आहेत आणि जर आपण आपली कर्तव्ये नीट पार पाडली तर आपल्याला हक्क मागण्याची गरज भासणार नाही."

सामाजिक कर्तव्ये:

- भारतीय राज्यघटनेचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे ते नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांचा समतोल साधते.
- हे ज्ञात आहे की आणीबाणीच्या काळात, 42 व्या दुरुस्ती कायदा, 1976 द्वारे भारतीय राज्यघटनेच्या भाग IV-A मध्ये मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला होता.
- याआधी मूळ संविधानात मूलभूत हक्कांची संकल्पना ठेवण्यात आली होती, मात्र त्यात मूलभूत कर्तव्यांचा समावेश नव्हता.
- सध्या कलम 51(A) अंतर्गत 11 मूलभूत कर्तव्ये नमूद करण्यात आली आहेत, त्यापैकी 10 कर्तव्ये 42 व्या दुरुस्तीद्वारे जोडण्यात आली होती, तर 11 व्या मूलभूत कर्तव्यांचा समावेश 2002 मध्ये 86 व्या घटनादुरुस्तीद्वारे घटनेत करण्यात आला होता.
- भारतीय राज्यघटनेतील मूलभूत कर्तव्ये ही संकल्पना तत्कालीन यु.एस.एस.आर.च्या संविधानापासून प्रेरित आहे.

संविधानात अंतर्भूत मूलभूत कर्तव्ये:

सुरुवातीला मूलभूत कर्तव्यांची संख्या 10 होती, परंतु भारतीय राज्यघटनेच्या 86 मध्ये घटनादुरुस्ती करून त्यांची संख्या 10 वरून 11 करण्यात आली.

- संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श, संस्था, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
- आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणाऱ्या उदात्त आदर्शांचे पालन करणे.
- भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता टिकवून ठेवणे.
- देशाचे रक्षण करण्यासाठी आणि जेव्हा बोलावले जाते तेव्हा देशाची सेवा करणे.
- धर्म, भाषा आणि प्रदेश किंवा वर्गावर आधारित सर्व भेदभावांच्या पलीकडे जाऊन भारतातील लोकांमध्ये सामंजस्य आणि समान बंधुत्वाची भावना निर्माण करणे. महिलांच्या सन्मानाच्या विरोधात असलेल्या प्रथा त्याग करणे.
- आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मूल्य जतन करणे.
- जंगले, तलाव, नद्या आणि वन्यजीवांसह नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबद्दल सहानुभूती बाळगणे.
- मानवतावाद, वैज्ञानिक स्वभाव आणि शिकण्याची आणि सुधारण्याची भावना विकसित करणे.
- सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि हिंसाचारापासून दूर राहणे.
- वैयक्तिक आणि सामूहिक सर्व क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे जेणेकरुन राष्ट्र सतत उच्च पातळी गाठेल.
- 6 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. (86 व्या संविधानाने जोडलेले)

कर्तव्यांची वैशिष्ट्ये

मूलभूत कर्तव्यांतर्गत, नैतिक आणि नागरी दोन्ही कर्तव्ये समाविष्ट आहेत. उदाहरणार्थ, 'आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याला प्रेरणा देणाऱ्या उदात्त आदर्शांचे पालन करणे' हे नैतिक कर्तव्य आहे, तर 'संविधानाचे पालन करणे

आणि त्यातील आदर्श, संस्था, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे' हे नागरी कर्तव्य आहे. विशेष म्हणजे, काही मूलभूत अधिकार भारतीय नागरिकांना तसेच परदेशी नागरिकांनाही उपलब्ध आहेत, परंतु मूलभूत कर्तव्ये फक्त भारतीय नागरिकांनाच लागू आहेत. तसेच संविधानात नमूद केलेली मूलभूत कर्तव्येही भारतीय परंपरा, पौराणिक कथा, धर्म आणि प्रथा यांच्याशी संबंधित आहेत. भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्ये 1976 मध्ये 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे भारतीय संविधानात जोडण्यात आली. सर्व जबाबदाऱ्या देशहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आणि आवश्यक आहेत. देशातील नागरिकांना कायदेशीररित्या, कायद्याच्या न्यायालयाद्वारे देखील, नागरी कर्तव्ये किंवा नैतिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी सक्ती केली जाऊ शकत नाही. जर एखादी व्यक्ती मूलभूत कर्तव्ये पार पाडत नसेल, तर त्याला/तिला शिक्षा होऊ शकत नाही कारण, या कर्तव्यांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणताही कायदा नाही. मूलभूत हक्क (समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुद्धचा हक्क, धर्म स्वातंत्र्याचा अधिकार, संस्कृती आणि शिक्षणाचा अधिकार आणि घटनात्मक उपायांचा अधिकार) हे भारतीय संविधानाचे अविभाज्य भाग आहेत. देशाच्या प्रगती, शांतता आणि समृद्धीसाठी राज्यघटनेत अशा काही कर्तव्यांचा समावेश आहे. भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत काही मूलभूत कर्तव्ये; राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करून नागरिकांनी आपल्या देशाचे रक्षण केले पाहिजे, आवश्यक असेल तेव्हा राष्ट्रसेवेसाठी कटिबद्ध राहावे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करावे इ. देशाच्या राष्ट्रीय हितासाठी अशी मूलभूत कर्तव्ये अत्यंत महत्त्वाची आहेत, तथापि, लोकांना त्यांचे पालन करण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. अधिकारांचा पूर्ण उपभोग घेण्यासाठी, लोकांनी त्यांच्या देशाप्रती त्यांची कर्तव्ये योग्यरित्या पार पाडली पाहिजेत, कारण अधिकार आणि कर्तव्ये एकमेकांशी जोडलेली आहेत. अधिकार मिळताच वैयक्तिक आणि सामाजिक कल्याणाबाबत आपल्या जबाबदाऱ्याही वाढतात. दोघेही एकमेकांपासून वेगळे नाहीत आणि देशाच्या समृद्धीसाठी महत्त्वाचे आहेत. देशाचे एक चांगले नागरिक या नात्याने समाज आणि देशाच्या कल्याणासाठी आपले हक्क आणि कर्तव्ये जाणून घेणे आवश्यक आहे. समाजाच्या चांगल्या-वाईट स्थितीला आपण प्रत्येकजण जबाबदार असतो हे समजून घ्यायला हवे. समाजात आणि देशात काही सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी आपण आपल्या विचारांचे कृतीत रूपांतर केले पाहिजे. जर वैयक्तिक कृतीतून जीवन बदलता येत असेल तर समाजात केलेल्या सामूहिक प्रयत्नांचा देशावर आणि संपूर्ण समाजावर सकारात्मक परिणाम का होऊ शकत नाही. त्यामुळे समाजाच्या आणि एकूणच देशाच्या समृद्धीसाठी आणि शांततेसाठी नागरिकांच्या कर्तव्याला खूप महत्त्व आहे.

मूलभूत कर्तव्यांचे महत्त्व:

- **लोकशाही आचरणाची सतत आठवण:**
  मूलभूत कर्तव्यांचा उद्देश प्रत्येक नागरिकाला सतत स्मरण करून देणे हा आहे की संविधानाने त्यांना विशिष्ट मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत, परंतु नागरिकांनी लोकशाही आचार आणि लोकशाही वर्तनाच्या मूलभूत नियमांचे पालन करणे देखील आवश्यक आहे.
- **असामाजिक कृत्यांविरुद्ध इशारा:**
  मुलभूत कर्तव्ये राष्ट्राचा अनादर करणाऱ्या लोकांना असामाजिक कृतींविरूद्ध चेतावणी म्हणून काम करतात; जसे राष्ट्रध्वजाचा अपमान करणे, सार्वजनिक मालमत्तेचा नाश करणे किंवा सार्वजनिक शांतता भंग करणे इ.
- **शिस्त आणि वचनबद्धतेची भावना:**
  हे शिस्त आणि राष्ट्राप्रती वचनबद्धतेची भावना वाढविण्यात मदत करतात. हे केवळ प्रेक्षक न राहता नागरिकांच्या सक्रिय सहभागाने राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यात मदत करतात.

➢ **कायद्याची घटनात्मकता निश्चित करण्यात मदत करण्यासाठी:**

कायद्याची संवैधानिकता ठरवण्यासाठी ते न्यायालयाला मदत करते. उदाहरणार्थ, कायदेमंडळाने पारित केलेला कोणताही कायदा, जेव्हा तो घटनात्मक चाचणीसाठी न्यायालयात जातो आणि त्यात मूलभूत कर्तव्याचे घटक असतात, तेव्हा असा कायदा न्याय्य मानला जाईल.

निष्कर्ष:

- मूलभूत कर्तव्ये ही केवळ अध्यापनशास्त्रीय किंवा तांत्रिक उद्दिष्टे नाहीत. उलट त्यांचा समावेश सामाजिक बदलाची गुरुकिल्ली म्हणून करण्यात आला.
- समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी, नागरिकांना प्रथम संविधान आणि त्याचे भाग समजून घेणे आवश्यक आहे, ज्यासाठी "सार्वजनिक व्यवस्था आणि त्यातील बारकावे, शक्ती आणि मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे".
- म्हणूनच भारतामध्ये संविधानिक संस्कृतीचा प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे.
- प्रत्येक नागरिकाने भारतीय लोकशाहीचा अर्थपूर्ण भागधारक बनून घटनात्मक तत्त्वज्ञान खऱ्या अर्थाने आत्मसात करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.
- मूलभूत कर्तव्यांचे योग्य संवेदना, पूर्ण संचालन आणि अंमलबजावणीसाठी एकसमान धोरणाची गरज आहे जी जबाबदार नागरिक होण्यासाठी अत्यावश्यक आहे.

समारोप:

ज्या परिस्थितीत भारताला स्वातंत्र्य मिळाले तो सामाजिक, भौगोलिक आणि राजकीय दृष्टिकोनातून जगाच्या इतिहासातील एक चमत्कारिक प्रयोग होता. ब्रिटीश राजवटीला लक्ष्य करून स्वातंत्र्याची हाक जितकी स्पष्ट होती, तितकेच स्पष्ट होते संपूर्ण देशातील संस्थानांना नव्या रचनेत बांधणे आणि देशातील जनतेला त्यांच्या आकांक्षा लक्षात घेऊन एकाच धाग्यात जोडणे हे तितकेच गुंतागुंतीचे आव्हान होते. शासनाचा मुख्य आधार म्हणून आनंदाने स्वीकारला. संसदीय शासनप्रणाली अंतर्गत केलेल्या आणि स्वीकारल्या गेलेल्या तरतुदींनुसार, हे संविधान स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेच्या मूल्यांना स्पष्टपणे केंद्रीय महत्त्व देते. परंतु अशा मूल्यांना वर्तनाच्या दृष्टिकोनातून क्धीही निरपेक्ष म्हणता येणार नाही. त्यांना निरंकुश मानले तरच निरंकुश अराजकता निर्माण होईल.आज समाजात भ्रष्टाचार, जुलूम, व्यभिचार विविध रूपात फोफावत आहे. नागरीकांचे कर्तव्य पाळले जात असल्याचे सांगून कर्तव्य बजावत नसताना किंवा आडकाठी आणली जात असताना नाट्यमय परिस्थिती निर्माण झाली आहे. यासोबतच अशांततेतून देशाचे नुकसान होत आहे. ही परिस्थिती देशाच्या आणि समाजाच्या हिताची नाही. विवेकाशिवाय जगणे कोणाच्याही हिताचे होणार नाही. त्यामुळे आज देशात नागरिकांच्या कर्तव्याच्या म्हणजेच नागरिकत्वाच्या व्यावहारिक बाजूचे सर्वसमावेशक शिक्षण आवश्यक आहे, कारण नागरिकांनी आपले कर्तव्य पाळल्यास तरच समाजात्र, देशाचे आणि संविधानाचे रक्षण करणे शक्य आहे.

संदर्भ-सूची:

- एस.एस.आचार्य - नागरिक कर्तव्य पालें और समाज में स्वस्थ परम्परा ,मथुरा
- आर. अग्रवाल – भारतीय संविधान का विकास, एस.चांद प्रकाशन,दिल्ली.
- प्रदीप त्रिपाठी - भारतीय संविधान और मानवाधिकार राधा पब्लिकेशन दिल्ली
- Prof. Kailash rai- the Constitutional law of India. 8 th edition central Law publication
- https://www.newsnationtv.com/specials/explainer/kartavya

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, न.प. शिवाजी महाविद्यालय, मोवाड, तह-नरखेड इमेल–prof.p.gajbhiye@gmail.com

***

राष्ट्राच्या विकासाकरिता संविधानातील समतेच्या मूल्याची आवश्यकता

*डॉ. माधुरी झाडे

सारांश :

(भारताच्या संविधानाचा मुळ गाभा प्रास्ताविकेत दिलेला आहे. त्यामध्ये स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या प्रमुख मुल्यांचा उल्लेख दिसून येतो व या मुल्यावरच आपल्या देशाचे अस्तीत्व टिकून आहे. भारतीय संविधानाच्या प्रत्येक कलमांनध्ये समतेचा आशय लक्षात येतो. समतेशिवाय देश खऱ्या अर्थानी एकसंघ राहू शकत नाही, म्हणूनच घटनाकारांनी सारासार विचार करून या मुल्याचा समावेश आपल्या संविधानामध्ये केलेला आहे. समतेसोबतच स्वतंत्र, समता, बंधुता आणि न्याय याचे फार महत्वाचे योगदान आहे. कोणतेही राष्ट्र विकसित होण्याकरीता किंवा त्या राष्ट्राचा विकास साध्य करण्याकरिता स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या मुलभूत घटकांना महत्वपूर्ण स्थान आहे.)

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेमधूनच आपल्याला राष्ट्राच्या निर्मितीची व अखंडतेची एक झलक पाहावयास मिळते. भारतामध्ये अनेक धर्म, पंथ, राज्य, भाषा यांना एकसंघ बांधून ठेवण्याकरिता व राष्ट्राचे अखंडत्व टिकवून ठेवण्याकरिता भारतीय संविधानाचे महत्वपूर्ण योगदान असलेले दिसून येते.शासकीय स्तरावरून सर्व प्रकारचे भेदभाव मिटवून समतेचा अधिकार अनुच्छेद १४ ते १८ नुसार देण्यात आला. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली.

भारतीय समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी महत्त्वपूर्ण संस्थामध्ये सर्वांना संधिची समानता निर्माण करूण देण्यास भारतामध्ये अनेक जाती, धर्म, प्रान्त, भाषा व वर्ण असूनही भारताची एकात्मता कायम आहे.कोणतेही राष्ट्र निर्माण होण्याकरितासमतेचे मुल्य फार महत्वाचे आहे. ज्या राष्ट्रामध्ये समता मुल्य नसेल ते राष्ट्र अधिक काळपर्यन्तटिकून राहू शकत नाही. जगामध्ये प्रत्येक राष्ट्र निर्माण झाल्यानंतर त्यांनी स्वतःचे एक संविधान स्विकारले मग त्या संविधानाचे स्वरूप लिखितअसो की अलिखित, लवचिक असो वा ताठर, या संविधानाच्या आधारेच त्या त्या देशाचा कारभार चालत असतो स्वातंत्र्यानंतर भारताने सुध्दा एका संविधानाचा स्विकार केला आणि तो लिखित स्वरूपात असून जगातील सर्वात मोठया लोकशाही राष्ट्राचे ते संविधान आहे.

भारताच्या संविधानाचा मुळ गाभा प्रास्ताविकेत दिलेला आहे. त्यामध्ये स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या प्रमुख मुल्याचा उल्लेख दिसून येतो व या मुल्यावरच आपल्या देशाचे अस्तील टिकून आहे. भारतीय संविधानाच्या प्रत्येक कलमांमध्ये समतेचा आशय लक्षात येतो. समतेशिवाय देश खन्या अर्थानी एकसंघ राहू शकत नाही, म्हणूनच घटनाकारांनी सारासार विचार करून या मुल्यांचा समावेश आपल्या संविधानामध्ये केलेला आहे. समतेसोबतच स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय याचेही फार महत्वाचे योगदान आहे. कोणतेही राष्ट्र विकसित याकरीता किंवा त्या राष्ट्राना विकास साध्य करण्याकरिता स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या मुलभूत घटकांना महत्वपूर्ण स्थान आहे.

राष्ट्र या संकल्पनेचा विचार करीत असतांना राष्ट्र म्हणजे एका विशिष्ट भुप्रदेशावर कायमस्वरूपी वस्ती करून राहणान्या लोकांचा समुदाय जेव्हा स्वतः चे नियम तयार करून एक सार्वभौम स्वरूपाचे सरकार स्थापन करतो तेव्हा त्यास राष्ट्र असे म्हणतात. हॅरी जॉन्सन यानी राष्ट्राच्या निर्मातीकरिता चार घटकांचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये विशिष्ट भुप्रदेश, सर्वसमावेशक संस्कृती, प्रजनन/लोकसंख्या आणि सार्वभौम सत्ता या घटकांच्या आधारावर राष्ट्राची निर्मिती होत असते. राष्ट्रनिर्मितीकरिता त्या त्या देशातील सर्व नागरीकांना आपन सर्व समान आहोत अशी भावणा निर्माण होते ही भावना अधिक बळकट करण्याकरिता प्रत्येक नागरीकांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होणे आवश्यकअसते व त्या राष्ट्रचं अस्तित्व दिर्घकालापर्यंत टिकून रहाते. राष्ट्र म्हणजे काय हे जाणून घेण्याकरिता काही विचारवंतांच्या व्याख्यांचा आडवा घेणे गरजचे आहे.

लिकॉक यांच्या मते, वाशिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र असे म्हणतात."एम. हॅबर यांच्या मते, "समान भाषा किंवा वंश यामुळे नव्हे तर लोकांच्या एकत्रीत राहणाऱ्या इच्छेतून राष्ट्र निर्माण होते. हॅन्स कोहोन याच्या मते, "राष्ट्र म्हणजे निश्चीत अशा भुप्रदेशावर वास्तव्य करणारा लोकसमुदाय की जो स्वतःस स्वातंत्र्य, सार्वभौम सत्ताधारी राज्यात परावर्तीत करण्याची इच्छा बाळगतो, स्वातंत्र्यप्राप्ती पर्यन्त कार्य करतो आणि आपण सर्व एक आहोत अशा समान भावना बाळगतो. "

वरील सर्व व्याख्यांवरून आपणास असे दिसून येते की, एका विशिष्ट भुप्रदेशावर वास्तव्य करून कोणत्या ना कोणत्या तरी पटकाच्या आधारावर एकतेची भावना त्यांच्यामध्ये निर्माण झालेली असते. तसेच ते इतर समुदायापासून समूहापासून स्वतःचे स्वातंत्र्य अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात.भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकमधूनच आपल्याला राष्ट्रच्या निर्मितीची व अखंडतेची एक झलक पाहावयास मिळते. भारतामध्येअनेक धर्म, पंथ, राज्य, भाषा यांना एकसंध ठेवण्याकरिता व राष्ट्राचे अखंडत्व टिकवून ठेवण्याकरिता भारतीय संविधानाचे महत्वपूर्ण योगदान असलेले दिसून येते.

संशोधन पध्दती: संशोधनकर्ती ही मागिल चौदा वर्षापासून समाजशास्त्र या विषयाची प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. तसेच त्यांनी संविधानाचे वाचन केलेले आहे. त्यांनी राजश्री शाहू महाराज संविधान प्रशिक्षक संस्था राधानगरी, कोल्हापूर येथे संविधान संवादक म्हणून प्रशिक्षण पुर्ण केलेले आहे. हे करीत असताना या कालावधित सावधानावरती चर्चासत्रे, सेमीनार यामधुन संशोधनकरपला राष्ट्रउभारणीमध्ये समतेच्या मुल्याचे महत्व जाणून घेण्याची ओढ निर्माण झाली. अनेक तज्ञ व्यक्तिच्या मुलाखती संविधानाचे वाचन, संविधानावरील पुस्तकांचे वाचन तसेच समतेवर आधारीत पुस्तकांचे वाचन यामधून संशोधनकर्तीने 'राष्ट्रनिर्मितीमध्ये समतेच्या मुल्यांचे योगदान' या विषयाची निवड केली.

संशोधनाची उदिष्टे:

१. भारतीय समाजव्यवस्थेचे अध्ययन करणे.
२. भारतीय राज्यघटनेचे अध्ययन करणे.
३. मुलभूत अधिकारांचे अध्ययन करणे.
४. समतेच्या मुल्यांचे सविस्तर अध्ययन करणे.
५. राष्ट्रउभारणीत समतेच्या मुल्याचे महत्व जाणून येणे.

गृहितकृत्ये :

१. भारतीय राज्यघटनेमुळे देश एक आहे.
२. भारतीय राज्यघटनेतील समतेच्या मूल्यामुळे अनेक भेद संपुष्टात आले.
३. समतेच्या मुख्यामुळे समाजातील सर्व घटकाना विकासाची संधी प्राप्त झाली.
४. समतेच्या मुल्यामुळे समाजामध्ये शांततेचे वातावरण वाढीस लागते.

भारतीय संविधानाच्या भाग तीन मध्ये व्यक्तिच्या मुलभुत अधिकाराविषयी सविस्तर मांडणी करण्यात आली आहे. या मुलभूत अधिकारांची माहिती घेताना हे पहिल्यादा लक्षात घ्यावयास हवे की, भारतीय नागरीकत्व असलेल्या सर्व नागरीकांना लोग, जात, धर्म, प्रांत, पंथ, भाषा असा कोणताही भेदभाव न करता हे सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत. संविधानाच्या प्रारंभी एकून सात मुलभुत अधिकारदेण्यात आलेले होते.

१. समतेचा अधिकार (अनुच्छेद १४ ते १८)
२. स्वातंत्र्याचा अधिकार अनुच्छेद १९ ते २२)
३. शोषनाविरुद्धचा अधिकार (अनुच्छेद २३ ते २४)
४. धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (अनुच्छेद २५ ते २८)
५. सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (अनुच्छेद २९ ते ३०)

६. संपत्तीचा अधिकार (अनुच्छेद ३१)

७. संविधानिक उपाय योजनांचा अधिकार (अनुच्छेद ३२,३२ ते ३५)

यापैकी १९७५ ला झालेल्या ४४ व्या घटना दुरुस्तीनुसार संपत्तीच्या अधिकाराच्या यादितून वगळण्यात आहे व तो अनुच्छेद ३०० क नुसार कायदेशीर अधिकार म्हणून घोषीत करण्यात आले. त्यामुळे मुलभूत अधिकाराची संख्या सहा झाली.शासकीय स्तरावरून सर्व प्रकारचे भेदभाव मिटवून समतेचा अधिकार अनुच्छेद १४ से १८ नुसार देण्यात आला. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई करण्यात आली. राज्य कोणाला प्रतिकुल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करता येणार नाही. सर्व नागरीकांना समानतेचा अधिकार देण्याच्या दृष्टिने हा भाग अतिशय महत्वाचा आहे. आपल्या देशातच नव्हे तर जगभरात सामाजिक व्यवस्था ही विषमतेची राहिलेली आहे. आपल्या व्यवस्थेमध्ये 'जात' हा फार प्रभावी तसेच पातक आहे. आपल्याकडे जातीवरून त्या व्यक्तिचे मुल्यमापण केले जाते. धर्मानुसार होणारा भेदभाव देखील सर्वपरीचित आहे. स्वी पुरुष असमानता तर पदोपदी दिसून येत होती आणि म्हणूनच स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण करताना घटनाकारांनी देशातील सर्व नागरीकांना समान न्याय मिळण्याच्या दृष्टिने व कोणत्याही घटकांच्या आधारे भेदभाव होणार नाही याची आर्वजून काळजी घेवून तशी तरतूद केली आहे.केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणतीही नागरीक दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल, सार्वजनिक कामाची ठिकाणे प्रवेश किंवा पुर्णत: किंवा अंशतः राज्याच्या निधीतून वाचण्यात आलेल्या विहीरी, तलाव, स्नानघाट रस्ते आणि सार्वजनिक वापराच्या जागा याचा वापर करणे, याबाबत कोणतीही अट राहणार नाही.

भारतीय संविधानात अनुच्छेद १५ खंड (२) चे महत्व आणि आशय समजून घेण्याअगोदर आपल्याला स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय समाजव्यवस्थेचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. जातीवरून होणारा विरोध त्या ठिकानचे भंग होणारे पावित्र्य यावरून सातत्याने संघर्ष होत होता. सार्वजनिक ठिकाणी काही विशिष्ट जातीसमूहानां प्रवेश निषिद्ध ठरविण्यात आलेला होता, आणि त्यामुळे समाजातील ही असमानता सामाजिक असंतोषाचे कारण बनलेली होती. चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह. अमरावतीचा अंबा मंदिराचा सत्याग्रह असे अनेक असमानतेविरुध्दचे झालेले संघर्ष आहेत आणि म्हणूनच अनुच्छेद १५ खंड (२) मध्ये दोन उपखंडात घटनाकारांना सर्व सार्वजनिक ठिकानावर कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून दुकाने, सार्वजनिक हॉटेल, सिनेमा हॉल, विहीरी, तलाव, पोळा घाट रस्ते अथवा सार्वजनिक वापराच्या जागा इत्यादी ठिकाणी येण्यास वा हया स्थानाचा उपभोग घेण्यास रोखले जाणार नाही अशी तरतूद केली. अनुच्छेद खंड (३) मध्ये लिसाच्या आधारावर महिलांकरिता व बालकांकरिता विशेष व्यवस्था व उपाय योजना करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. पुरुषप्रधान समाजात उपेक्षीत राहिलेल्या महिलांकरिता तसेच बालकांकरिता सकारात्मक बाबी करण्यासंदर्भात राज्यला कोणताही प्रतिकार होणार नसल्याने खंड (३) मध्ये नमुद करण्यात आले आहे. मा अनुच्छेद १५ खंड (३) व्या अनुशंगाने घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ केंद्र सरकारने पारीत केलेला आहे. या कायदयाला सर्वोच्य न्यायालयाने डी पालराज विरुद्ध भारत सरकार" या केसचा निर्णय देतांना वैध ठरविले आहे. शासन महिला व बालकांच्या सक्षमिकरणाकरिता अन्य काही उपाययोजनाही राबवू शकते उदा. नौकरदार महिलांना सहा महिन्यापर्यन्त प्रसुती रजा, महिला आयोगाची स्थापणा १९९०), स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण तसेच करिता मोफत पोषण आहार व मोफत शिक्षण देण्याची तरतुद इत्यादी. खंड (४) या अनुछेदातील किंवा अनुच्छेद २९ या खंड (२) यातील कोणत्याही गोष्टिमुळे नागरीकांच्या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती, जमातीकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

घटनेत हे कलम आरक्षणाच्या दृष्टिने अत्यंत महत्वाचे आहे मुळ संविधानात खंड (४) नव्हता. पहिल्या घटनादुरुस्तीने १९५१ साली तो अनुच्छेद १५ जोडण्यात आला.

मद्रास राज्यातील काही शिक्षण संस्थांमध्ये काही विशिष्ट जातीसाठी काही जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या, त्याविरुद दखल झालेल्या चंपकम दोडाई राजन विरुद्ध मद्रास राज्य १९५१ या केसचा निकाल देतांना सुप्रिम कोटाने या प्रकरणात अनुच्छेद १५ च्या खंड (१) व खंड (२) चे उलंघन होत असल्याचे सांगून या शिक्षण संस्थांनी दिलेले आरक्षण रद्द ठरविले. सुप्रिम कोटांच्या या निर्णयाला रद्द करण्याकरिता व सामाजिक तथा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीसाठी तसेच अनुसूचित जाती व जमातींना आरक्षणाची तरतूद करण्यासाठी १९५१ मध्ये पहिल्या घटना दुरुस्तीने खंड (४) अनुच्छेद १५ च्या खंड (१) व खंड (२) चा दुसरा सकारात्मक अपवाद मानला जातो. त्यानंतर या तरतुदी विरोधात अनेक केसेस सुप्रिम कोर्टात दाखल झाल्या. त्यापैकी,

१. TMC फाउंडेशन विरुद्ध कर्णाटक राज्य २००२

२. इस्लामिक अकॅडमी विरुद्ध कर्नाटक राज्य २००३

३. पी. ए. इनामदार विरुद्ध कर्नाटक राज्य २००५

ही प्रमुख प्रकरणे आहेत. या प्रकरणाचा निर्णय देतांना सुप्रिम कोर्टाने स्पष्ट केले आहे की गैर अल्पसंख्यांक व्यावसायीक शिक्षण संस्थामध्ये तसेच सर्व प्रकारच्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थामध्ये एस. सी. एस. टी. वर्गातील रिक्त अन्य मागासवर्गिय जातिना आरक्षण देणे अनुप १५ या खंड (२) व खंड (२) उल्लंघन मानले जाईल. मग त्या संस्था शासकीय अनुदान प्राप्त असो अगर नसो. सर्वोच्यन्यायालयाबाबत दिलेल्या निर्णयाला बदलण्यासाठी २००६ मध्ये ९३ वी घटना दुरूस्ती खंड (५) अनुच्छेद ५ मध्ये जोडण्यात आला. या घटना दुरूस्ती विरोधात दाखल झालेल्या अशोक कुमार ठाकूर विरुद्ध भारत सरकार २००८ या केसेसचा निर्णय देतांना पाच न्यायाधिशाच्या खंडपिठाने या घटनादुरुस्तीला घोषित केले. अलिकडेच २०१९ मध्ये अनुच्छेद १५ मध्ये १०३ वी घटना दुरुस्ती करून खड(६) जोडण्यात आला आहे. खंड (६) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टिमुळे अनुच्छेद १९ खंड (१) उपखंड (६०) यातिल कोणत्याही गोष्टिमुळे किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टिमुळे राज्याला पुढिल तरतुदी करण्यास प्रतिबंध होणार नाही. (क) खंड (४) आणि खंड (५) मध्ये उल्लेखलेल्या वर्गाशिवाय नागरिकांपैकी आर्थिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता विशेष तरतूद करणे. (ख) खंड (४) आणि खंड (५) मध्ये उल्लेखलेल्या वर्गाशिवाय नागरिकांपैकी आर्थिकदृष्टया मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता त्यांच्या शैक्षणिक संस्थांमधिल प्रवेशाच्या संबंधाने राज्यद्वारा अनुदानित किंवा विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थामधिल प्रवेशामध्ये अनुछेद ३० खंड (१) मध्ये नमूद अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक संस्था वगळता, आरक्षणाच्या आधारे या अस्तीत्वात असलेल्या आरक्षणाशिवाय प्रत्येक श्रेणित एकूण जगाच्या जास्तीत जास्त दहा टक्के जागा आरक्षित करणे. खंड (६) वाचल्यानंतर आपल्या दात येते की, यात तरतुद केल्याप्रमाणे राज्य अर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकडे लक्ष देईल अनुच्छेद १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे. कायदयाने समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यात आली असून त्यासंबंधी कोणत्याही प्रकारचे आवरण निषिध्दव नवे तर शिक्षापात्र अपराध देखील ठरविण्यात आले आहे. भारतीय समाजात शेकडो जाती हया अस्पृश्य समजल्या जात होत्या. अस्पृश्यच राहते अशी परंपरावादी कल्पना आपल्या समाजात रूढ होती. भारतीय संविधान तयार करतेवेळी घटनाकारांच्याही गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली व त्याप्रमाणे संविधानाच्या अनुच्छेद १७ अन्वये अस्पृश्यता नष्ट केली असल्याचे व अस्पृश्यता पाळण्यास मनाई करण्यात आल्याचे घोषीत करण्यात आले.

निष्कर्ष: वरील सर्व विश्लेषणावरून आपल्या असे निदर्शनास येते को समाजवादी राज्यव्यवस्थेतिल सत्तेचे अतिकेंद्रिकरण आणि उदारमतवादी लोशाहीतिल अनिबंध व्यक्तिस्वाताय या दोन टोकांना सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न भारताच्या संविधानकरांनी केला. नागरीकत्वाची आधुनिक व समताधिष्ठ संकल्पना संविधानाने स्विकारली असून त्यानुसार व्यक्तिचे राज्यसंस्थेशी घनिष्ठ नाते जोडले आहे.त्यामुळे व्यक्तिविकासाला पुरक अशी समाजव्यवस्था उभी केली.

स्वातंत्र्य, समता, बंधुता या तिन मुल्यांचा समुचित मेळ घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या तिनही तत्वांना जीवनाची पायाभूत मानणारी सामाजिक लोकशाही येथे निर्माण व्हावी अशी अपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी व्यक्त

केली होती. त्यांच्या मते समवाचून स्वातंत्र्य स्विकारल्यास बहुसंख्येवर मुठभराचे अधिपत्य निर्माण होईल तर स्वातंत्र्यविरहीत समता व्यक्तिगत पुढाकराला मारक ठरेल. भारतीय समाजाचे प्रथम वैशिष्टे लक्षात घेतले तर जाती हे आहे. त्यामुळे यामध्ये आज परीवर्तन झाले असले तरी यातील बेटिबंदीकायम आहे. तसेच जातीव्यवस्थेमध्ये व्यक्तिच्या गुणांपेक्षा जातीला महत्व प्रदान करण्यात आले होते. परंतु संविधानकत्यांनी संविधानामध्येसर्वांना समान संधीची उपलब्धता करुण ठेवली आहे. अनेक विचारवंतांच्या मते सामाजिक विषमता से आर्थिक घटकांमुळे अधिक बळकट झाली. परंतु हे खरे नाही. आर्थिक विषमता ही सर्वच समाजात असते, परंतू जातीव्यवस्था ही भारतातच दिसून येते केवळ दिसून येत नाही तर खालच्या जातितील लोकांना अस्पृश्यता ही असहय लांच्छानास्पद न वाटता ती स्वाभावीक व न्याय वाटावी अशी मानसीकता व सामाजिक व्यवहार प्रचलित होते आणि म्हणून आपल्या असे निदर्शनास येते की, या विषमतेचा प्राथमिक आधार आर्थिक नसून सांस्कृतिक व सामाजिक आहे ज्याला भारतीय संविधानातील समतेच्या मुल्यांनी तडा दिला.

अशारितीने संविधानकर्त्यांनी संविधान निर्माण करीत असताना भारतीय समाजव्यवस्थेचा अतिशय सूक्ष्मरितीने अभ्यास करून प्रत्येक व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरीकाला अधिकार प्रधान केले ,समतेच्या तत्वाचा मोठया प्रमाणात पुरस्कार केला सोबत स्वातंत्र्य, बंधुता व न्यायाचाही आग्रह धरला त्यामुळे भारतीय समाजातील प्रत्येक नागरीकाचा राष्ट्रनिर्मितीमध्ये हातभार लागावा व एक नव समतेचे राष्ट्र उभे राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली. भारतीय समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी महत्त्वपूर्ण संस्थामध्ये सर्वांना संधिची समानता निर्माण करूण देण्यास भारतामध्ये अनेक जाती, धर्म, प्रान्त, भाषा व वर्ण असूनही भारताची एकात्मता कायम आहे.

संदर्भ ग्रंथसूची

1. खोब्रागडे इ. झेड. (२०१९) 'आपले संविधान संविधान फाउंडेशन नागपूर...
2. वारे सुभाष (२०१७) आपले भविष्य भारतीय संविधान' एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन, नवी पेठ पुणे..
3. गायकवाड जयदेव (२००८) संविधान समेत डॉ आंबेडकर' पद्मगंधा प्रकाशन, पाडुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे. भोले भास्कर लक्ष्मण, (२००४) विसावे शतक आणि भारतातील समताविचार' सुगावा प्रकाशन पुणे.
4. सुराणा पन्नालाल (१९९८) समतावादी विकासनिती' आंदोलन स्वातंत्र्यदिन विशेषांक.
5. सुराणा पन्नालाल (१९९९) लोकशाही समाजवादच का?" एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन, नवी पेठ पुणे.
6. प्रसाद अनिरुध्द (१९९१) आरक्षण, सामाजिक न्याय एवं राजनैतिक सन्तुलन' रावत पब्लिकेशन, जवाहर नगर, जयपूर
7. भारताचे संविधान, (२००२) महाराष्ट्र राज्याच्या भाषा संचालनायाद्वारे अनुवादित आणि संचालक, शासण मुद्रण, लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित.

*सहाय्यक प्राध्यापक, डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा,

मो. नं. 9403618375, इ-मेल .madhurizade@gmail.com

***

COVID-19 लॉकडाऊनचा भारतीय महिलाच्यावर झालेल्या सायबर हिंसाचाराचा समाजशास्त्रीय अभ्यास.

*प्रा. राजेंद्र पुंडलिक पवार

1.0.0: प्रस्तावना.

समाजशास्त्र हे एक तार्किक विज्ञान आहे, जे मानवी समाजाचा अभ्यास करते तसेच जागतिक समुदायातील नवीन प्रवाह आणि लहरी शोधते. लोकांचा समाजावर कसा परिणाम होतो आणि समाज लोकांवर कसा प्रभाव टाकतो याचा अभ्यास करण्यावर समाजशास्त्र लक्ष केंद्रित करते. २१ व्या शतकात संगणक आणि इंटरनेट तंत्रज्ञान मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. संगणक तंत्रज्ञानामुळे इंटरनेट संस्कृती उदयास आली आणि विकसित झाली. इंटरनेट संस्कृतीने जागतिक मानवी जीवनाच्या राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक-सांस्कृतिक सीमा ओलांडल्या आहेत. संगणक आणि इंटरनेट तंत्रज्ञानाने जगाला एका लहानशा जागतिक खेड्यात बदलले आहे. जगातील अनेक देश मार्च 2020 पासून लॉकडाऊनच्या स्थितीत आहेत आणि कोविड-19 या महामारीचा प्रसार रोखण्यासाठी कठोर नियमांचे पालन करत होते . साथीच्या रोगाचा आणि त्यानंतरच्या लॉकडाऊनचा राष्ट्र, वर्ग, जात, वंश, वंश, धर्म, वय आणि लिंग या सर्वांवर परिणाम झाला होता. WHO ने संसर्गापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणून 'घरी रहा, सुरक्षित रहा' हा मंत्र घोषित केला होता. परंतु कोविड-19 चा व्यक्तीच्या व्यक्तिगत आणि मानसिक व सामाजिक जीवनावर खूप गंभीर परिणाम झाले. विशेषतः स्त्रियांच्या कौटुंबिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक जीवनावर खूप गंभीर परिणाम झाले. कोविड-19 ने उन्माद चिंता, नैराश्य, तणाव, फोबिक वर्तन यासारख्या मनोसामाजिक समस्यांना जन्म दिला.(दुबे- 2020).[1] तथापि, जगभरातील स्त्रियांना त्यांच्या पार्श्वभूमीची पर्वा न करता प्रभावित झालेल्या समस्यांपैकी एक म्हणजे - सायबर हिंसाचार (CV)विशेषतः स्त्रियांच्या कौटुंबिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक जीवनावर लॉकडाऊनचा आणि आणि कोविड-19 चा खूप गंभीर परिणाम झाला, लॉकडाऊन मुळे पुरुष घरीच असल्याने गृहिणी स्त्रियांच्या शारीरिक आणि मानसिक अत्याचारात वाढ झाली. नोकरी करणारे स्त्रिया सतत ऑनलाईन राहिल्याने सायबर गुन्हेगारांच्या त्या भक्ष्य ठरल्या. ऑनलाइन शिक्षण प्रणालीमुळे कॉलेज तरुणी आणि मुली या मोठ्या प्रमाणात सायबर हिंसाचाराच्या बळी ठरल्या. खरं तर, कोविड-19 मध्ये भारत महिलांसाठी सर्वात धोकादायक देश ठरला आहे. या अभ्यासात जानेवारी 2018 ते मे 2020 या कालावधीत राष्ट्रीय महिला आयोग (NCW), राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभाग **(NCRB)** अहवाल कडून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे.

राष्ट्रीय महिला आयोग (NCW), राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (NCRB) अहवाल कडून प्राप्त झालेल्या अहवालातून सायबर समाजाचे एक अत्यंत भीषण वास्तव समोर आले आहे. लॉकडाऊनच्या काळात सायबर हिंसाचाराच्या (CV) घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. घरी राहणे हा कोविड-19 पासून स्वतःचे रक्षण करण्याचा सर्वोत्तम मार्ग मानला जातो परंतु बऱ्याच भारतीय महिलांसाठी हा मार्ग सायबर हिसाचारास कारणीभूत ठरला आहे. (नटराजन- 2020) [2] भारतात साथीच्या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने लॉकडाऊन घोषित केल्यामुळे, महिलां आणि मुलींना ना सायबर गुन्हेगारांमुळे त्यांना अधिक धोका निर्माण झाला आहे 6 एप्रिल 2020 रोजी, UN सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी ट्विट केले, COVID19 साठी लॉकडाऊन अंतर्गत असलेल्या अनेक महिलांना हिंसेचा सामना करावा लागतो आहे. फक्त समाजातच नव्हे तर त्यांच्या स्वतःच्या घरात त्या सायबर वा अन्य हिंसाचाराच्या

[1] Dubey, S. B. (2020). Psychosocial impact of COVID-19. Diabetes & metabolic syndrome, 14(5), 779-788.

[2] Natarajan, J. (2020, April 13). Women's safety during the lockdown. Retrieved from The Hindu: https://www.thehindu.com/opinion/op-ed/womens-safety-during- lockdown/article31324318.ece

बळी ठरल्या आहेत. मी सर्व सरकारांना विनंती करतो की त्यांनी महिलांच्या सुरक्षेला त्यांनी प्रथम प्राधान्य द्यावे. हा पेपर लॉकडाऊन कालावधीत होणारा सायबर हिंसाचार, त्याचा भारतातील महिलांवर होणारा मानसिक-सामाजिक परिणाम यांचा समावेश आहे आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून त्याचे निराकरण करण्यासाठी संभाव्य उपायांवर चर्चा करतो.

2.0.0: संशोधन उद्दिष्टे

1. कोविड-19-प्रेरित लॉकडाऊन दरम्यान महिलांच्या विरोधातील सायबर होण्याची स्वरूप आणि व्याप्ती समजून घेणे.
2. कोविड-19-प्रेरित लॉकडाऊन दरम्यान महिलांविरुद्ध सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढीचा समाजशास्त्रीय अभ्यास करणे.
3. हा लेख साथीच्या काळात सायबर हिंसाचाराच्या संदर्भात तरुण स्त्रियांच्या सद्य परिस्थितीचा थोडक्यात आढावा आणि या समस्येसाठी काही संभाव्य उपाय सूचित करणे.

3.0.0: संशोधन पद्धती.

हा पेपर लॉकडाऊन कालावधीत झालेला सायबर हिंसाचार, त्याचा भारतातील महिलांवर होणारा मानसिक-सामाजिक परिणाम यांचा समावेश आहे आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून त्याचे निराकरण करण्यासाठी संभाव्य उपायांवर चर्चा करतो. हा पेपर प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडिया डेटा, पूर्वीच्या संशोधनांचे अनुभव आणि राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभाग अहवाल यांच्या गुणात्मक विश्लेषणावर आधारित आहे. प्रस्तुत संशोधन हे दुय्यम स्तोत्रावर आधारित असून प्रस्तुत लेखात महिलांना, विशेषत: लॉकडाऊनच्या काळात सायबर हिंसाचाराशी संबंधित समस्या आणि आव्हाने याचा शोध घेण्यासाठी राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाचा प्रकाशित अहवाल, व सायबर हिंसाचारचे स्वरूप आणि महामारीच्या काळात त्याचा वाढलेला मनोसामाजिक प्रभाव समजून घेण्यासाठी संबंधित पुनर्प्राप्त लेख, बातम्यांचा अभ्यास केला आहे. हा शोधनिबंध लिहिण्यासाठी सायबर हिंसाचाराची कारणे, परिणाम आणि साथीच्या काळात झालेली वाढ यासंबंधी काही संशोधन अभ्यासांचे पुनरावलोकन पुनरावलोकन केले आहे. या कालावधीत भारतातील महिलांनी सायबर हिंसाचाराच्या एकूण 12,447 तक्रारी केल्या आहेत.(NCRB) त्याचा आढावा घेण्यात आला आहे.

4.0.0. महिलांवरील सायबर गुन्हे म्हणजे काय?

इंटरनेट गुन्हेगारी वर्तनासाठी काही अनोख्या संधी प्रदान करते. प्रथम, ते गुन्ह्यासाठी नवीन संधी प्रदान उपलब्ध करते, आणि दुसरे इंटरनेटने विद्यमान गुन्ह्यांना सुलभ करते . विचलित इंटरनेट वर्तणुकीचे परीक्षण करणाऱ्या वैज्ञानिक अभ्यासाच्या लँडस्केपमध्ये, तीन सामान्य श्रेणी उदयास येतात:

1. सायबर स्पेसमध्ये लैंगिक गुन्हा किंवा लैंगिक छळ (उदा. पोर्नोग्राफीचा वापर, ऑनलाइन पेडोफिलिया);
2. सामाजिक समर्थन गट जे नकारात्मक वर्तनांना प्रोत्साहन देतात (उदा. स्व-हानी वेबसाइट, जसे की स्वत: ची दुखापत आणि प्रो-एनोरेक्सिया वेब साइट्स); आणि,
3. सायबर स्पेसमध्ये द्वेष करणारे गट आणि द्वेषपूर्ण गुन्हे (उदा. धार्मिक किंवा पांढरे वर्चस्व गट).

महिलांवरील सायबर गुन्हयांमध्ये कॉम्पुटर, फोन वा अन्य डिजीटल साधनाद्वारे किंवा सोशल मीडियासारख्या डिजिटल स्पेसचा वापर करून महिला आणि मुलींना शारीरिक, मानसिक, आणि सामाजिक हिंसा केली जाते, त्यास सायबर हिंसाचार असे म्हणतात. याचा उल्लेख तंत्रज्ञान- सुविधायुक्त लिंग आधारित हिंसा असा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या विशेष अहवालात खालीलप्रमाणे मानवी हक्कांच्या दृष्टीकोनातून डिजिटल लैंगिक छळाची कारणे आणि परिणामांवर आधारित विचलित ऑनलाइन वर्तनाचे विविध प्रकार सूचीबद्ध केले आहेत

1. स्त्रियांच्या त्रासदायक प्रतिमा- (Disturbing images of women.)

I. संमतीशिवाय घेतलेल्या लैंगिक प्रतिमा/व्हिडिओ ('क्रीप शॉट्स' किंवा 'अपस्कर्टिंग')

II. संमतीने घेतलेले परंतु संमतीशिवाय शेअर केलेले लैंगिक प्रतिमा/व्हिडिओ('रिव्हेंज पॉर्न')

III. संमती नसलेली लैंगिक कृत्ये (उदा., बलात्कार) डिजिटल पद्धतीने रेकॉर्ड केलेली (आणि संभाव्य शेअर केलेली)

2. व्हॉय्युरिझम- (Voyeurism)

I. एखाद्या महिलेच्या किंवा मुलीच्या खाजगी क्षणाचे फोटो काढणे किंवा व्हिडिओ तयार करणे.

II. एखाद्या महिलेच्या किंवा मुलीच्या खाजगी क्षणाचे फोटो दुसऱ्याला पाठवणे.

III. महिला आणि मुलींच्या खाजगी क्षणांचे फोटो किंवा व्हिडिओ प्रकाशित करण.

3. अश्लील संदेश शेअर करणे. (Sharing obscene messages)

I. महिलांना स्वत: च्या लैंगिक प्रतिमा शेअर करण्यासाठी किंवा ऑनलाइन (किंवा ऑफलाइन) लैंगिक वर्तनात गुंतण्यासाठी ऑनलाइन त्रास देणे किंवा दबाव टाकणे.

II. महिलांना धमकावण्यासाठी, जबरदस्ती करण्यासाठी किंवा ब्लॅकमेल करण्यासाठी लैंगिक सामग्री (प्रतिमा, व्हिडिओ, अफवा) प्रकाशित करण्याची धमकी वापरणे ('सेक्स्टॉर्शन').

III. महिलांना विशेषतः राजकारणी, सामाजिक कार्यकर्त्या आणि पत्रकारांना ऑनलाइन लैंगिक धमक्या देणे (उदा., बलात्काराच्या धमक्या).

IV. इतरांना महिलांविरुद्ध ऑनलाइन लैंगिक हिंसा करण्यास प्रवृत्त करणे.

V. महिलांना लैंगिक वर्तनात भाग घेण्यासाठी प्रवृत्त करणे आणि नंतर त्याचे पुरावे सामायिक करणे.

4. अवांछित लैंगिकिकरण– (Unwanted Sexualization)

I. लैंगिक किंवा स्त्रियांना लाजवेल असे ऑनलाइन विनोद / लैंगिक टिप्पण्या लैंगिक किंवा स्त्रियांना लाजवेल असे ऑनलाइन विनोद करणे (उदा. फोटोंवर)

II. लैंगिक व्हायरल ऑनलाइन मोहिमा, जे महिलांवरील हिंसाचारात सहभागी होण्यासाठीलोकांवर दबाव टाकतात

III. महिलांना त्यांच्या संमतीशिवाय लैंगिक सामग्री (प्रतिमा, इमोजी, संदेश) पाठवणे

IV. महिलांना अवांछित लैंगिक अनुकूलतेसाठी विनंत्या पाठवणे

V. लैंगिक सामग्रीचे अश्लील व्हिडिओ बनवण्यासाठी महिलांच्या प्रतिमाचा वापर करणे (cyber morphing)

5. ऑनलाइन पाठलाग & सायबर गुंडगिरी- (Online stalking & Cyber bullying)

I. स्वतःच्या लैंगिक प्रतिमा शेअर करण्यासाठी किंवा ऑनलाइन (किंवा ऑफलाइन) लैंगिक वर्तनात गुंतण्यासाठी महिलांना ऑनलाइन त्रास देणे किंवा त्यांच्यावर दबाव आणणे.

II. स्त्रियांना धमकावणे, जबरदस्ती करणे किंवा ब्लॅकमेल करणे ('सेक्स्टॉर्शन') लैंगिक सामग्री (इमेज, व्हिडिओ, अफवा) प्रकाशित करण्याची धमकी देणे.

III. लैंगिक स्वरूपाच्या ऑनलाइन धमक्या (उदा., बलात्काराच्या धमक्या)

IV. ऑनलाइन लैंगिक हिंसा करण्यास प्रवृत्त करणे

V. महिलांना लैंगिक वर्तनात गुंतण्यासाठी प्रवृत्त करणे आणि नंतर त्याचे पुरावे शेअर करणे.

VI. महिलांची लैंगिकता किंवा लिंग ओळख त्यांच्या संमतीशिवाय प्रकाशित करणे.

सायबरस्पेस हा महिलांसाठी माहिती मिळवण्यापासून त्यांचे हक्क सुरक्षित करण्यापर्यंत मुक्तपणे आणि निनावीपणे व्यक्त होण्याचा एक शक्तिशाली मार्ग आहे. तथापि, सायबर क्राईम ही एक जागतिक घटना आहे आणि या नवीन प्रकारच्या गुन्ह्यांसाठी महिला हे सोपे लक्ष्य आहेत. महिलांविरुद्ध सायबर गुन्हे हा एक प्रकारचा असा गुन्हा आहे जो विशेषत: इंटरनेट आणि सोशल मीडियादवारे महिलांना लक्ष्य करतो. भारतात महिलांविरुद्धचे सायबर गुन्हे हे एक सामाजिक वास्तव बनले आहेत, जे क्वचितच नोंदवलेले जाते, तसेच महिलांविरुद्ध सायबर गुन्हे शोधणे आणि सिद्ध करणे कठीण आहे. इंटरनेट आणि सोशल मीडिया गुन्हेगारी वर्तनासाठी काही अनोख्या संधी सादर करतात, ज्यामुळे जगभरातील लाखो स्त्रिया आणि मुलींना त्यांच्या लिंगामुळे जाणीवपूर्वक हिंसाचाराचा सामना करावा लागतो. सायबर गुन्हेगार महिला आणि मुलींना लक्ष्य करण्यासाठी सोशल नेटवर्किंग साइट्सचा वापर करतात हे गुन्हे आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्रासपणे होत आहेत आणि या गुन्ह्यांना कोणतीही सीमा नाही. सोशल मीडिया हे महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांचे

नवीन केंद्र बनले आहे. महिला आणि मुलीं सायबर विश्वातील सर्वात असुरक्षित गट समजला जात आहेत. लिंग-आधारित हिंसा इलेक्ट्रॉनिक संप्रेषण आणि इंटरनेटद्वारे केली जाते. सायबर हिंसा ही 'वास्तविक जगातील' हिंसेपासून वेगळी घटना नाही, कारण ती बऱ्याचदा ऑफलाइन हिंसेप्रमाणेच असते. जरी सायबर हिंसाचार महिला आणि पुरुष दोघांनाही प्रभावित करणारा असला तरी महिला आणि मुलींना सायबर हिंसेचे वेगवेगळे आणि अधिक क्लेशकारक प्रकार अनुभवास येतात. स्त्रिया आणि मुलींवरील सायबर हिंसाचाराचे विविध प्रकार आहेत, ज्यात सायबरस्टॉकिंग, गैर-सहमतीपूर्ण पोर्नोग्राफी (किंवा 'रिव्हेंज पॉर्न'), पोर्नोग्राफी, 'सेक्स्टॉर्शन', बलात्काराच्या धमक्या आणि जीवे मारण्याच्या धमक्या, इलेक्ट्रॉनिकरित्या सुलभ तस्करी,लिंग-आधारित अपशब्द, द्वेषयुक्त भाषण आणि छळ, 'स्लट-शेमिंग' यांचा समावेश आहे.

5.0. 0: महिला वरील सायबर हिंसाचाराचे भीषण वास्तव - COVID-19- लॉकडाऊन.

यूएन वुमन (2020) च्या अलीकडील अहवालानुसार, गेल्या 12 महिन्यांत जगभरातील 15-49 वयोगटातील 243 दशलक्ष महिला आणि मुलींना जिवलग जोडीदाराकडून सायबर लैंगिक आणि/किंवा शारीरिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले आहे. या 'लपलेल्या महामारी'ला आता कोविड 19 चा 'शॅडो पॅन्डेमिक' (म्लाम्बो-एनगकुका, २०२०)[3] असेही संबोधले जात आहे, ज्याने भारतासह जगातील अनेक देशांना वेठीस धरले आहे. भारतात, लॉकडाऊनच्या काही दिवसांतच, राष्ट्रीय महिला आयोगाने (NCW) ईमेलद्वारे प्राप्त झालेल्या सायबर हिंसाचाराच्या तक्रारींमध्ये वाढ नोंदवली. लॉकडाऊनच्या कालावधीत राष्ट्रीय महिला आयोगाने केलेले अभ्यास आणि मिळालेल्या पुराव्यांवरून देशभरातील सायबर हिंसाचारात दुपटीने वाढ झाल्याचे दिसून येते. 2014-2015 ते 2021 या वर्षात NCW ला प्राप्त झालेल्या महिलांवरील सायबर हिसाचाराच्या प्राप्त झालेल्या तक्रारी खालील सारणीत दर्शविल्या आहे

स्रोत: राष्ट्रीय महिला आयोग. परिशिष्ट-III, IV आणि V, 2011-12 ते 2020- 21 चे वार्षिक अहवाल, वर्ष: 2020 (152.57.97.173 द्वारे 09/10/2021 11:36:45 रोजी तयार केलेला अहवाल) परिशिष्ट-III, IV आणि V

[3] Mlambo-Ngcuka, P. (2020, March 08). Statement for International Women's Day. Retrieved August 12, 2020, from UN Women:\ https://www.unwomen.org/en/news/stories/2020/2/statement-ed-phumzile-international-women-day

युनायटेड नेशन्सच्या म्हणण्यानुसार, कोविड-19 दरम्यान, तरुण महिलांवरील हिंसाचार वेगवेगळ्या स्वरूपात प्रकट होतो, ज्यात आर्थिक, आरोग्य, विनावेतन काळजीचे काम आणि लिंग-आधारित हिंसा यांचा समावेश आहे. स्टॅटिस्टा 2021 च्या अहवालानुसार नुसार, 2019 मध्ये संपूर्ण भारतात लैंगिक छळ किंवा शोषणाशी संबंधित सायबर गुन्ह्यांची 2.2 हजारांहून अधिक प्रकरणे नोंदवली गेली होती. 2016 आणि 2017 च्या तुलनेत देशातील अशा सायबर गुन्ह्यांच्या संख्येत ही मोठी उडी होती. जरी गुन्हे 2018 आणि 2019 मध्ये देशात दर खरोखरच वाढला होता. 2019 मध्ये, भारतातील इतर भागांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात महिला आणि मुलांविरुद्ध सायबर स्टालिंग आणि गुंडगिरीच्या सर्वाधिक घटना घडल्या. हिंदुस्तान टाईम्सनुसार, (19 जानेवारी 2020 रोजी 11:30 PM IST रोजी प्रकाशित) 2019 मध्ये, ईमेल, मेसेजिंग ॲप्स आणि सोशल मीडियाद्वारे पाठविलेले अश्लील संदेश आणि मॉर्फ केलेल्या प्रतिमांची प्रकरणे वाढली आहेत.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) ने दिलेल्या आकडेवारीनुसार, 2019 च्या तुलनेत 2020 मध्ये राजधानीत महिलांवरील गुन्ह्यांमध्ये 24% ने घट झाली आहे. 2020 मध्ये नोंदवलेल्या महिलांवरील एकूण गुन्ह्यांची संख्या 9,782 होती, जी 2019 मध्ये 12,902 वरून खाली आली आहे. 2020 मध्ये, 2019 मध्ये 1,088 च्या तुलनेत 2019 मध्ये महिलांवरील अत्याचाराच्या 938 आणि लैंगिक छळाच्या 862 प्रकरणे नोंदवण्यात आली, 2019 मध्ये 644 प्रकरणे होती. 2020 मध्ये, 2020 मध्ये 967 बलात्काराचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, या तुलनेत 2019 मध्ये 1,231 गुन्हे दाखल झाले आहेत. 21% च्या. मागील वर्षी 388 च्या तुलनेत 235 घटनांसह, 2020 मध्ये स्टॅकिंगच्या घटनांमध्ये 40% ने घट झाली आहे.

वर्ष	पुणे सायबर पोलिस ठाण्यात महिलांविरुद्ध सायबर बदनामी झाल्याच्या COVID-19- लॉकडाऊन काळातील तक्रारी-					
	सोशल साइट्सबाबत एकूण तक्रारी	फेसबुक/ इन्स्टाग्रामवरील तक्रारी	लैंगिक शोषणाद्वारे बदनामी	बनावट प्रोफाइल/ बदनामीकारक मजकूर	फेसबुक प्रोफाइल, फोटो हॅक करून मजकूर पोस्ट	व्हॉट्सॲप वर बदनामीकारक मजकूर पोस्ट
2019	1513	1182	530	378	190	92
2020	1792	1452	930	492	228	169

स्रोत: पुणे सायबर सेल करून प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित

कोविड - १९ कालावधीत पुणे सायबर सेल कडे महिलांविरुद्ध सायबर बदनामी झाल्याच्या ३३०५ तक्रारी दाखल झाल्या आहेत. आक्षेपार्ह मजकूर आणि फोटो टाकून बदनामी केल्याच्या २५०० हुन अधिक तक्रारी दाखल झाल्या आहेत. सोशल मीडियावर बदनामी, सुरुवातीच्या प्रेमसंबंधानंतर ब्रेकअप झाल्यानंतर मुलीचे आक्षेपार्ह फोटो, फेसबुक आणि इंस्टाग्राम प्रोफाइल हॅक करणे, बनावट फेसबुक-इन्स्टाग्राम अकाउंट, आक्षेपार्ह फोटो शेअर करणे, मजकूर, व्हिडिओ कॉलवर असताना नग्न फोटो शेअर करणे, ब्लॅकमेलिंग यांसारखी प्रकरणे फोटो आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग दिवसेंदिवस वाढत आहे.प्रत्येक व्यक्तीकडे स्मार्टफोन आणि इंटरनेट असणे ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे सोशल मीडिया वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सोशल मीडिया वापरण्याचे धोके अनेकांना माहीत नाहीत. त्यामुळे सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती प्रसिद्ध करून त्रास देण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. गेल्या चार महिन्यांत फेसबुक आणि इन्स्टाग्रामच्या माध्यमातून बदनामीच्या २६३४ तक्रारी आल्या आहेत. यात लैंगिक शोषणाच्या 1460 तक्रारी आहेत. यानंतर बनावट प्रोफाइल तयार करून आक्षेपार्ह मजकूर तयार केल्याच्या 870 तक्रारी आहेत. फेसबुक प्रोफाइल हॅक करून आक्षेपार्ह मजकूर पोस्ट केल्याच्या 418 तक्रारी. फेसबुकच्या माध्यमातून खरेदी-विक्रीचे आमिष दाखवून फसवणुकीच्या 71 तक्रारी आल्या आहेत. सोशल मीडियावर मजकूर, फोटो आणि व्हिडिओ टाकून बदनामी केल्याप्रकरणी गेल्या वर्षी सायबर पोलिस ठाण्यात 4357 तक्रारी दाखल झाल्या होत्या. फेसबुक/

इन्स्टाग्रामबाबत ३,००० तक्रारी आल्या. इतर सोशल साइट्सबाबत 1,323 तक्रारी होत्या. यापैकी 1,204 जणांची अद्याप चौकशी सुरू आहे. कोविड-१९ कालावधीत चार महिन्यांत 1,513 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

6.0.0: संशोधन विश्लेषण

जगाला सायबर स्पेसमधील गुन्हेगारी कारवायांच्या एका नव्या युगाचा सामना करावा लागत आहे, ज्या भौगोलिक सीमांचा विचार न करता जगभर केल्या जात आहेत. स्त्रियांच्यावर हिंसाचार का होतो याच्याशी संबंधित अनेक कारणे असली तरी, भारतात त्याची कारणे पुरुषप्रधान आणि सांस्कृतिक नियमांमध्ये खोलवर रुजलेली आहेत, ज्यात स्त्रियांना सॉफ्ट टार्गेट म्हणून पाहिले जाते. प्रस्तुत लेखाचा निष्कर्ष असा आहे की, कोविड-१९ च्या साथीच्या आजारामुळे आणि लादलेल्या लॉकडाऊनमुळे अधिकाधिक लोक इंटरनेटवर अधिकाधिक विसंबून राहून घरातच बंदिस्त झाले आहेत. भारतीय महिला या सायबर गुन्हेगारांचे सॉफ्ट टार्गेट असून covid-19 ची लोकडाऊन ची परिस्थिती महिलावर होणाऱ्या सायबर हिंसाचारास मोठ्या प्रमाणात जबाबदार ठरली लॉकडाऊन कालावधीत, रुपांतरित 'घरातून काम' व्यवस्थेचा एक भाग म्हणून, नोकरी करणाऱ्या भारतीय महिलांना केवळ घरीच काम नाही तर घरूनही काम करावे लागले. ऑनलाईन शिक्षण ऑनलाईन नोकरी यामुळे बहुतांशी स्त्रिया सायबर गुन्हेगारसाठी इंटरनेटवर सहज उपलब्ध होत्या. सायबर स्पेस मधील अनामिकता महिला वरील सायबर हिंसाचारास कारणीभूत ठरली. स्टॅटिस्टा च्या अहवालानुसार कोरोना महामारीच्या काळात बहुतांशी पुरुष घरीच राहून काम करत असल्याने या कालखंडात पोर्नोग्राफी पाहण्याचे व्यसन लागले व याचा परिणाम घरातील पत्नीवर अ-नैसर्गिक व लैंगिक अत्याचार झाले. घरून काम केल्याने घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. (शर्मा आणि बोराह, २०२०)[4] साथीच्या रोगाचा लॉकडाऊन कालावधी पुरुषांबरोबरच महिलांसाठीही कसोटीचा काळ होता. महिलांशी व्हिज्युअल संपर्क टाळण्याव्यतिरिक्त, आभासी जागा त्रास देणाऱ्यांसाठी अनेक बंधने दूर करतात, ज्यात वेळेची मर्यादा, जागेची समस्या, लाजाळूपणा, भीती आणि त्यांना ज्या स्त्रियांना त्रास द्यायचा आहे त्यांची संख्या आणि विविधता यांचा समावेश होतो. पुरुषांच्या बाबतीत बेरोजगारी, पगारात कपात आणि अधिक कामाचा बोजा या मुद्द्यांचा गौरव केला जात असला तरी, त्यांच्या महिला सहकाऱ्यांवर याचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित आहे. डेमोग्राफी मॅगझिनमध्ये प्रकाशित झालेल्या इंटिमेट पार्टनर वायलेन्स इन ग्रेट रिसेशनवरील अभ्यासात असे आढळून आले आहे की मोठ्या मंदीच्या काळात बेरोजगारीच्या दरात झपाट्याने वाढ झाल्याने 'रोमँटिक भागीदारांबद्दल पुरुषांचे नियंत्रण वर्तन वाढले' (श्नायडर, हार्कनेट आणि मॅक्लानाहान, 2016)[5] हिंसक किंवा हाताळणी करणाऱ्या व्यक्तींसह घरात अडकल्याने धमक्यांचे प्रमाण आणि तीव्रता, शारीरिक, लैंगिक आणि मानसिक शोषण, अपमान, धमकावणे आणि वर्तन नियंत्रित होऊ शकते. घरून काम केल्याने घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली. भारतातील अनेक नोकरदार महिलांसाठी, घराबाहेर काम करण्यासाठी जाणे हा एक अतिशय सशक्त अनुभव असतो. घराच्या चार भिंती आणि कौटुंबिक तणावापासून दूर राहणे, मित्र बनवणे, नवीन लोकांना भेटणे, नेटवर्क आणि रिचार्ज आणि स्वतःला रीबूट करण्याची वेळ ही त्यांची वैयक्तिक वेळ आहे (मेहता, 2020).[6] लॉकडाऊनमुळे महिलांसाठी विशेषत: त्यांचे मानसिक आरोग्य अधिक बिघडले कारण त्यांनी हे आउटलेट गमावले आणि त्यांना त्यांच्या जीवनातील अडचणींचा सामना करण्यास मदत केली. लिंग समस्या सामाजिक

[4] [4] Sharma, A., & Borah, S. B. (2020). COVID-19 and Domestic Violence: An Indirect Path to Social and Economic Crises. Journal of Family Violence. Retrieved from https://doi.org/10.1007/s10896-020-00188-8

[5] Schneider, D., Hartnett, K., & McClenaghan, S. (2016). Intimate Partner Violence in the Great Recession. Demography, 53(2), 471-505

[6] Mehta, B. (2020, August). Work From Home (WFH): Good New Normal for Working Women? HR Acumen, pp. 6-7
https://atlasvpn.com/blog/google-registers-a-350-increase-in-phishing-websites-amid-quarantine/

संस्कृतीच्या जडणघडणीत इतकी चांगली गुंफलेली आहे की ती सोडवणे म्हणजे विद्यमान स्थितीला अडथळा आणण्याचे अप्रिय कार्य करणे होय. कोविड-19 साथीच्या रोगामुळे व्यक्ती आणि समाज सर्वच बाबतीत अत्यंत असुरक्षित आहेत. सायबर-गुन्ह्यांचे धोके अनेक वर्षांपासून आहेत, परंतु इंटरनेटशी जोडलेल्या लोकसंख्येच्या टक्केवारीत झालेली वाढ, ऑनलाइन घालवलेला वेळ, बंदिवासाची भावना आणि लॉकडाऊनमुळे निर्माण होणारी चिंता आणि भीती या सर्व गोष्टी महिलावरील सायबर हिसाचारास कारणीभूत आहेत. कोविड-19-प्रेरित लॉकडाऊन दरम्यान महिलांविरुद्ध सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, हे एक समाजशास्त्रीय तथ्य आहे.

7.0.0. संशोधनाचे निष्कर्ष आणि उपायोजना:

COVID-19 दरम्यान भारतात सायबर हिंसाचारात महिलांवरील सायबर गुन्ह्यामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली. प्रस्तुत लेखाचा निष्कर्ष असा आहे की

1. भारतीय महिला या सायबर गुन्हेगारांचे सॉफ्ट टार्गेट असून covid- 19 ची लोकडाऊन ची परिस्थिती महिलावर होणाऱ्या सायबर हिंसाचारास मोठ्या प्रमाणात जबाबदार ठरली.
2. Covid19 **च्या** उद्रेकाच्या संदर्भात लॉकडाऊनमुळे सायबर हिंसाचाराचा महिलाच्यावर झालेल्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक गंभीर परिणामानी भारतातील महिलांमध्ये चिंता आणि भीती वाढली आहे.
3. भारतात, साथीच्या रोगाच्या सायबर हिंसाचार सायबर स्टॉकिंग, सायबर बुलिंग, चाइल्ड पोर्नोग्राफी, रिवेंज पॉर्नोग्राफी, ऑनलाइन ब्लॅकमेल, द्वेषयुक्त भाषण आणि छळ, 'स्लट-शेमिंग', सेक्सटॉर्शन, इ. वाढ झाली आहे.
4. Covid19 **च्या** लॉकडाऊनमुळे महिलांसाठी विशेषत: त्यांचे मानसिक आरोग्य अधिक बिघडले कारण त्यांनी घराबाहेर व्यस्त राहण्याचे आउटलेट गमावले आहे.
5. लॉकडाऊनमुळे महिलांच्यावर घरेलू हिंसाचार आणि जोडीदाराकडून लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे.
6. साथीच्या रोगाचा आणि त्याच्या आर्थिक परिणामाचा लैंगिक समानतेवर प्रतिगामी परिणाम झाला. लॉकडाऊनमुळे पुरुषांच्या नोकऱ्यांपेक्षा महिलांच्या नोकऱ्या अधिक असुरक्षित झाल्या आहेत. विद्यमान लैंगिक असमानतेमुळे स्त्रिया COVID-19-संबंधित आर्थिक प्रभावांना बळी पडल्या. आर्थिक आव्हाने तरुण महिलांच्या कामासाठी आणि व्यावसायिक क्रियाकलापांना गंभीर धोका निर्माण करतात आणि त्यांचे शोषण आणि गैरवर्तन होण्याचा धोका वाढवतात.
7. Covid19 रोगाचा प्रादुर्भाव मुलींच्या आणि तरुण स्त्रियांच्या वृद्ध आणि आजारी कुटुंबातील सदस्यांची तसेच शाळाबाह्य भावंडांची काळजी घेण्याच्या कर्तव्यात वाढ करतो. परिणामी स्त्रियांच्या वैयक्तिक आरोग्याकडे दुर्लक्ष होऊन त्यांच्या आरोग्याची हेळसांड व समस्या निर्माण झाल्या आहेत.

ऑनलाइन छळवणुकीबद्दल महिलांची जागरूकता वाढवण्याचा आणि त्यावरील उपायांची माहिती देण्याचा प्रयत्न करणाऱ्या मोहिमा, ऑनलाइन समुदाय आणि संशोधन केंद्रांची संख्या वाढत असली तरी, बहुसंख्य तरुणींना अजूनही ऑनलाइनच्या संदर्भात ज्ञानाचा अभाव आहे. छळ, आणि संभाव्य उपाय जे त्यांना संबंधित ऑनलाइन हिंसा टाळण्यास मदत करू शकतात. सध्या सुरू असलेल्या ऑनलाइन छळवणुकीला समाप्त करण्यासाठी तसेच दळणवळण सुधारण्यासाठी आणि विद्यमान सेवांचा वापर ऑप्टिमाइझ करण्यासाठी अधिक योग्य चॅनेलचा वापर करण्यासाठी अधिक उपयुक्त सेवा प्रदान करणे आवश्यक आहे. तरुण महिलांना ऑनलाइन छळवणुकीची व्याख्या आणि त्या सर्वाधिक वापरत असलेल्या चॅनेलद्वारे सायबर गैरवर्तनाची उदाहरणे जाणून घेणे आवश्यक आहे. सरकारांनी त्यांना उपलब्ध प्रोटोकॉल, ऑनलाइन छळवणूक आणि हिंसाचाराची प्रकरणे कोठे नोंदवायची आणि COVID-19 दरम्यान आवश्यक ऑनलाइन सेवा कशा मिळवायच्या याबद्दल माहिती दिली पाहिजे. कोविड-19 दरम्यान ऑनलाइन छळाची माहिती मिळवण्यासाठी तरुणींसाठी सोशल मीडिया हे एक उत्तम माध्यम असू शकते. ही माहिती ऑनलाइन छळवणूक कशी ओळखायची, दस्तऐवज आणि तक्रार कशी करायची आणि त्यांना त्यांच्या अधिकारांबद्दल माहिती देण्यासाठी टिपा, साधने आणि संसाधने प्रदान करू शकते. हे त्यांना संबंधित संस्थांशी आणि ऑनलाइन समुदायांच्या लिंक्सशी ओळख करून देऊ शकते जे अनुभव, कार्यशाळा आणि माहिती शेअर करतात जे तरुण स्त्रियांसाठी खूप उपयुक्त ठरू शकतात.

युवतींना माहिती हस्तांतरित करण्यासाठी इतर योग्य चॅनेल शाळा, विद्यापीठे आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म काम करतात कारण आजकाल स्त्रिया या महामारीच्या काळात अनेक तास काम किंवा ऑनलाइन अभ्यास करत आहेत. शिवाय, इंटरनेट मध्यस्थ जसे की सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, मीटिंग ॲप्लिकेशन्स इत्यादी, संबंधित गोपनीयता आणि डिजिटल सुरक्षा समस्यांबाबत तसेच महिलांवरील ऑनलाइन हिंसाचाराशी संबंधित तक्रारी प्रक्रियांबाबत स्पष्ट माहिती सामायिक करताना ऑनलाइन छळ कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. कोविड - १९ च्या आणीबाणीच्या स्थितीनंतरही इंटरनेट वापरणाऱ्या तरुणींच्या संख्येत वाढ झाल्यामुळे सायबर हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, नागरी समाज संस्था आणि इंटरनेट मध्यस्थांनी ऑनलाइन छळाचा अनुभव घेणाऱ्या तरुणींसाठी सुलभ माहिती आणि सर्वसमावेशक प्रशिक्षण सत्रे उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

References:

1. Abdallah, H. O. , Zhao, C. , Kaufman, E. , Hatchimonji, J. , Swendiman, R. A. , Kaplan, L. J. , Seamon, M. , Schwab, C. W. , & Pascual, J. L. (2021). Increased firearm injury during the COVID-19 pandemic: A hidden urban burden. Journal of the American College of Surgeons, 232(2), 159–168. 10.1016/j.jamcollsurg.2020.09.028 [PMC free article]
2. Abrams, D. S. (2021). COVID and crime: An early empirical look. Journal of Public Economics, 194, 104344. 10.1016/j.jpubeco.2020.104344 [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
3. Balmori de la Miyar, J. R. , Hoehn-Velasco, L. , & Silverio-Murillo, A. (2021b). The U-shaped crime recovery during COVID-19: Evidence from national crime rates in Mexico. Crime Science, 10, 1–23. 10.1186/s40163-021-00147-8 [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
4. Bullinger, L. R. , Carr, J. B. , & Packham, A. (2021). COVID-19 and crime: Effects of stay-at-home orders on domestic violence. American Journal of Health Economics, 7(3), 249–280. 10.1086/713787 [CrossRef] [Google Scholar
5. Campbell, A. M. (2020). An increasing risk of family violence during the COVID-19 pandemic: Strengthening community collaborations to save lives. Forensic Science International: Reports, 2, 100089. 10.1016/j.fsir.2020.100089 [CrossRef] [Google Scholar]
6. Cheng, C. , Chau, M. C. L. , & Chan, M. L. (2018). A social psychological analysis of the phenomenon of underreporting cybercrimes and the concomitant underlying factors: Three real local case studies. Official guide to ICT industry in Hong Kong. Communications Association of Hong Kong. [Google Scholar]
7. Everytown Research & Policy . (2021). Gun violence and COVID-19 in 2020. Everytown Research & Policy. Retrieved from https://everytownresearch.org/report/gun-violence-and-covid-19-in-2020-a-year-of-colliding-crises/ [Google Scholar]
8. Fontanilla, M. V. (2020). Cybercrime pandemic. EU bios Journal of Asian and International Bioethics, 30(4), 161–165. [Google Scholar]
9. Govern, A. R. , Harper, S. B. , & Langton, L. (2020). Anti-Asian hate crime during the COVID-19 pandemic: Exploring the reproduction of inequality. American Journal of Criminal Justice, 45(4), 647–667. 10.1007/s12103-020-09545-1 [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
10. Hyder, A. A. , Werbick, M. , Scannelli, L. , & Paichadze, N. (2021). The COVID-19 pandemic exposes another commercial determinant of health: The global firearm industry. Global Health: Science and Practice, 9(2), 264–267. 10.9745/GHSP-D-20-00628 [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
11. Kawohl, W. , & Nordt, C. (2020). COVID-19, unemployment, and suicide. The Lancet Psychiatry, 7(5), 389–390. 10.1016/S2215-0366(20)30141-3 [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]

12. Lang, C. , & Cachero, P. (2021). How a long history of intertwined racism and misogyny leaves Asian women in America vulnerable to violence. TIME. Retrieved from https://time.com/5952819/history-anti-asian-racism-misogyny/ [Google Scholar]
13. Monteith, S. , Bauer, M. , Alda, M. , Geddes, J. , Whybrow, P. C. , & Glenn, T. (2021). Increasing cybercrime since the pandemic: Concerns for psychiatry. Current Psychiatry Reports, 23(4), 18. 10.1007/s11920-021-01228-w [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
14. Payne, J. L. , Morgan, A. , & Piquero, A. R. (2020). COVID-19 and social distancing measures in Queensland, Australia, are associated with short-term decreases in recorded violent crime. Journal of Experimental Criminology, 18, 89–113. 10.1007/s11292-020-09441-y [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
15. Sampson, A. S. , & Ojen, I. M. (2021). Perception analysis of COVID-19 pandemic, cybercrime and well-being of online fraud victims in Calabar, Nigeria. International Journal of Public Administration and Management Research, 6(4), 29–35. [Google Scholar]
16. Sutherland, M. , McKenney, M. , & Elkbuli, A. (2021). Gun violence during COVID-19 pandemic: Paradoxical trends in New York City, Chicago, Los Angeles and Baltimore. The American Journal of Emergency Medicine, 39, 225–226. 10.1016/j.ajem.2020.05.006 [PMC free article] [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
17. Taub, A. (2020). A new COVID-19 crisis: Domestic abuse rises worldwide. The New York Times. Retrieved from https://www.nytimes.com/2020/04/06/world/coronavirus-domestic-violence.html [Google Scholar]
18. Weil, A. R. (2021). COVID-19, equity, and more. Health Affairs, 40(6), 863. 10.1377/hlthaff.2021.00810 [PubMed] [CrossRef] [Google Scholar]
19. World Health Organization . (2020). WHO Director-General's opening remarks at the media briefing on COVID-19. Retrieved from https://www.who.int/director-general/speeches/detail/who-director-general-s-opening-remarks-at-the-media-briefing-on-covid-19---11-march-2020

***समाजशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज कराड** rajendrapawar03523@gmail.com

***

पर्यटन निगडीत असलेल्या अपराधांचा अभ्यास

*डॉ . शिल्पा प्रकाश जाधव

प्रस्तावना:

पर्यटन हे एक वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन प्रकार आहे .ज्यामुळे संगीत, मनोरंजन क्षेत्रांच्या तुलनेने पर्यटनासाठी जास्त पर्यटकांची संख्या असते. पर्यटन एक आकर्षक मंदिर, गुरुखाना, मठ, विहार व इतर स्थानांना शामिल करतो ज्यांमध्ये पर्यटक वातावरण आणि प्राकृतिक वातावरणाच्या निर्वाहासाठी संलग्न राहतात. पर्यटनाचा प्रभाव हा अभ्यास पर्यटनाच्या प्रभावावर, पर्यावरणाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावांवर विचार करतो.

पर्यटन म्हणजे प्रामुख्याने करमणूक आणि हेतूंसाठी प्रवास करणे आहे .पर्यटन हे अनेक प्रकारचे असू शकते. च्या देशात वेगवेगळया :घरगुती पर्यटनामध्ये त्याच देशातील रहिवासी त्यांच्या स्वतठिकाणी प्रवास करतातजेव्हा . दुसऱ्या देशातील रहिवासी आपल्या देशात येतात त्याला अंतर्देशीय किंवा इन बाउंड पर्यटन म्हटले जाते . परदेशी पर्यटन जेव्हा आपल्या देशातील रहिवासी दुसऱ्या देशात जातात तेव्हाते परदेशी पर्यटन किंवा आऊट बाउंड . पर्यटन म्हटले जाते.

पर्यटन हा फक्त एक विरंगुळा आणि मनोरंजनात्मक क्रियाकलापच नाही तर एक व्यवसाय देखील आहे.जे पर्यटकांना आपल्या कडे आकर्षित करते .करमणूक करते,आणि आपल्या देशाला उत्पन्न मिळवून देते. पर्यटनामुळे आपल्याला नवीन संस्कृती शिकायची ,नवीन लोकांना भेटायची , वेगवेगळया ठिकाणी मज्जा करण्याची आणि साहसी कार्य करण्याची संधी मिळते.

पर्यटनाचे महत्त्व-

1. **आर्थिक प्रगती -** पर्यटन उद्योगमुळे परकीय मुद्रेचा साठा करण्यात मदत मिळते.त्यामुळे आपल्या देशाला परकीय चलन उत्पन्न करण्यास मदत मिळते.दरवर्षी मोठ्या संख्येने पर्यटक भारत आणि इतर ठिकाणांना भेट देतात.ते वेगवेगळया ठिकाणी जातात तेथे राहतात आणि तिथल्या दुकानात खरेदी करतात.या सर्व गोष्टी परदेशी मुद्रेसाठी किंवा चलनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देते.वैश्विक मंदी असून देखील पर्यटनामध्ये टक्केवारी वाढ झाली आहे.

2. उत्पन्नाचा स्त्रोत - पर्यटन हे सार्वजनिक आणि खाजगी उत्पन्नाचे निरंतर स्त्रोत आहे. सरकारने विविध प्रकारचे कर लावले आहे याला सरकारी महसूल म्हणतात या करांद्वारे मिळविलेले उत्पन्न हे सार्वजनिक उत्पन्न आहे.जे विक्रेता स्थानिक वस्तुंनी नफा मिळवतो त्याला वैयक्तिक उत्पन्न म्हणतात.पर्यटन रोजगार निर्मित मध्ये देखील मदत करतो. यामुळे हॉटेल उद्योग,आतिथ्य उद्योग,सेवा क्षेत्र ,करमणूक,आणि परिवहन उद्योगात रोजगाराची संधी मिळाली.

3. इंफ्रास्ट्रक्चर चा विकास - आपण कधी या कडे लक्ष दिले आहे का की,एखाद्या ठिकाणाला जेव्हा पर्यटन स्थळ घोषित केले जाते तेव्हा त्या ठिकाणचे लक्षणीय परिवर्तन होते.पर्यटन हे धरणं,रस्ते, कनेक्टिव्हिटी, विमानतळ सुधारणे आणि पर्यटकांना एखाद्या ठिकाणी चांगल्या प्रकारे भेट देण्यास मदत करते .या मुळे पर्यटनाचा इन्फ्रास्ट्रक्चर चा विकास होण्यास मदत मिळते.

4. सामाजिक प्रगती - सांस्कृतिक देवाणघेवाण करण्यासाठी पर्यटन हा एक उत्तम मार्ग आहे. हे नवीन प्रगतीपथावर भेट देताना पर्यटक एकमेकांना आदर, सहिष्णुता आणि प्रेम दर्शविणे शिकवते त्यामुळे हे सामाजिक प्रगतीस प्रोत्साहित करते.

5. सांस्कृतिक वारसा- पर्यटन आपल्या देशातील सौंदर्य, कला, इतिहास आणि संस्कृती दर्शविण्यास मदत करते.कोणत्याही देशातून येणारे वेगवेगळे लोक त्यांच्या सह सुंदर आणि सांस्कृतिक संकल्पना घेऊन येतात.आणि त्या संकल्पना वेगवेगळया ठिकाणी पसरवतात.अशा प्रकारे स्थानिक कौशल्याला,भाषा आणि कलेला पर्यटनामुळे वाव मिळतो.आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो.

संशोधनाची उदिष्ट :

1. एखाद्या पर्यटन ठिकाणी गेल्यावर गुन्हे होण्याची शक्यता असते. जसे कि, चोरी, लूटपाट, यासारखे गुन्हे.

2. पर्यटन व त्याच्याशी निगडीत अपराध ही न चुकणारी समस्या आहे. यातील असणार संबंध

संशोधन पद्धत : दुय्यम स्त्रोत ही संशोधन पद्धत वापरली आहे. पद्धतींचे दुय्यम स्त्रोत हे विद्यमान साहित्य, संशोधन किंवा इतर संसाधनांचा संदर्भ देतात जे समान अभ्यासांमध्ये वापरल्या जाणाऱ्या किंवा संशोधन प्रश्नाशी संबंधित असलेल्या पद्धतींबद्दल माहिती देतात. हे दुय्यम स्रोत तुमच्या अभ्यासासाठी वापरण्याच्या सर्वोत्तम पद्धतींवर मौल्यवान अंतर्दृष्टी आणि मार्गदर्शन देऊ शकतात. पद्धतींच्या दुय्यम स्त्रोतांच्या काही उदाहरणांमध्ये हे समाविष्ट आहे:

संशोधन लेख, पाठ्यपुस्तके, सरकारी अहवाल, ऑनलाइन संसाधने: अने संसाधने आहेत जी संशोधन पद्धतींवर मार्गदर्शन करतात, याचा वापर केला आहे.

पर्यटन व अपराध :

मानवांनी पर्यटन केल्यापासून अनेक गुन्हे होतात. या संशोधन पेपरमध्ये, त्या गुन्ह्यांची माहिती दिली गेली आहे. पर्यटन हा एक महत्त्वाचा व्यवसाय आहे ज्यामुळे देशांची आर्थिक प्रगती होते. परंतु त्यामध्ये काही अपराध घडतात ज्यामुळे पर्यटकांचे जीवन धोक्यात येते. पर्यटन अपराधांमध्ये मुख्यतः हॉटेल आणि रेस्टोरंट संबंधी अपराध, चोरी, लूट, धोकाधडी आणि व्यभिचार यांची समस्या आहेत. त्यांच्या जास्तीत जास्त अपराधांमध्ये लूट, चोरी, आणि धोकाधडी या अपराधांची समस्या आहेत. होटलमध्ये नोकरी करणाऱ्यांनी पर्यटकांच्या बाहेर जाण्याच्या उद्देशाने त्यांची सामग्री चोरी करतात आणि अपराधांचे कारण अनेक असतात जसे की आतंकवाद, चोरी, लूट, हत्या, गुन्हेगारी, जालसाजी, दुष्कर्म आणि अन्य समस्या. याचे कारण मानसिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय व संस्कृती असणारे तात्पर्य होतो..

पर्यटन स्थळांवर होणारे गुन्हे विविध प्रकारचे असतात जे निम्नप्रमाणे आहेत

१. पर्यटन स्थळांवर प्रदूषण करणे: विविध इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा बर्बाद करणे, प्लास्टिक रद्द करणे यासारखे उत्पादन प्रक्रिया पर्यटकांनी अनेक ठिकाणी केल्या आहेत.

२. पर्यटन उद्योग आणि अपराधांचे संबंध आहे . पर्यटन स्थळांवर अतिरेकी पिवळी शराब विक्री करणे, गुटखा विक्री करणे, मांसाची विक्री करणे, तसेच महिलांच्या अपमानाच्या घटनांमध्ये वाढ होणे अशा प्रकारचे अपराध घडतात.

३. अतिरिक्तपणे, पर्यटक आत्महत्या व त्यांच्या अपहरणांची माहिती जाणून घेतात, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो आणि त्यांचे जीवनावर परिणाम होतो .या प्रकाराच्या घटनांमुळे पर्यटन उद्योगाच्या विकासाच्या असंख्य समस्या उत्पन्न होतात.

४. इतर समस्यांमध्ये आपोआप होणारे वाहन चोरी, विविध प्रकारच्या अपमानाच्या घटना

५. व निर्माण व विकसित केलेल्या पर्यटन स्थळांवर आत्महत्या यासारखे मानसिक समस्यांची वाढ याची समस्या देखील आहे.

६. चोरी : पर्यटन स्थळांवर चोरी असे अपराध होतात ज्यामुळे पर्यटक जागृत असतात .

७. अवैध विक्री: पर्यटन स्थळांवर अवैध विक्री करणारे असतात, ज्यामुळे लोकांना अनुचित आहार आणि पेय मिळते.

८. वाहन चोरी सारखे प्रकार होतात.

९. दुसरे अपराध आहेत, पर्यटन स्थलांवर चित्र घेणे,

निष्कर्ष:

पर्यटन स्थळांवर होणारे अपराध एक मोठी समस्या असतात. पर्यटन उद्योगाने पर्यटन क्षेत्रातील गुन्ह्यांचे निराकरण करण्यासाठी पावले उचलली पाहिजेत, जसे की पोलिसांची उपस्थिती वाढवणे आणि सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करणे. त्याचबरोबर पर्यटकांनी सुद्धा फिरताना गुन्हेगारीपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे, त्यासाठी अपराधांना कमी करण्यासाठी, पोलीस आणि पर्यटन उद्योजकांनी एकत्र काम करावे

लागते. पर्यटकांना अपराधांच्या बारेमध्ये शिक्षित करणे, त्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे आणि आत्मसंरक्षण उपकरणे प्रदान केली जातात. विविध प्रकारच्या अपराधांना रोखण्यासाठी, संबंधित अधिकारी आणि पोलिस तंत्र विविध प्रकारच्या चौकशी प्रणाली वापरू शकतो. तसेच पर्यटनाच्या विकासाच्या असंख्य समस्या निराकरण्यासाठी दक्ष योजना आणि संबंधित अधिकारींची अधिक तंत्रे देखील आवश्यक आहेत. ज्यामुळे पर्यटन स्थळांवरील अपराधांची संख्या कमी करण्यास संभव आहे. पर्यटन स्थळांवर आपोआप होणारे चोरी, हल्ला-गुंडे आणि इतर अपराधांना रोखण्यासाठी चौकशी प्रणाली वापरली जाते. तसेच, पर्यटन स्थळांची वेगळी-वेगळी आवश्यकता असल्यानुसार सुरक्षा प्रणाली निर्माण केली जाते. गुन्हे रोकथाम करण्यासाठी संबंधित अधिकारी आणि पोलिस तंत्र निरं.तर काम करीत आहेत.शेवटी, गुन्हेगारी आणि पर्यटन या दोन परस्परसंबंधित घटना आहेत ज्यांचा एकमेकांवर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो.

संदर्भ सूची

१. जाधव, वासंत. "पर्यटन अपराधांच्या समस्या." समाज आणि समस्या २००८: २३-२६.

२. परब, मुकुंद. "पर्यटन आणि त्यावरील अपराध." अर्थविज्ञान विषयक शोधमाला २००५: २३७-२४२.

३. गोगावले, प्रदीप एवढे, आणि गुंडेशेठ, रवींद्र. "पर्यटन आणि अपराध: एक अभ्यास." शोध संचार ३: ११४-१२२.

४. कुलकर्णी, शिवाजी. "पर्यटन अपराध: एक समीक्षा." युवतीमान २०१३: १७२-१७७.

५. शिंदे, निलेश, आणि अंबेडकर, अंकुश. "पर्यटन आणि अपराध: अभ्यासाचे उत्तर." अर्थशास्त्राचे स्पर्श २०१६: ३८-४४.

६. देव, शंकर. "पर्यटन आणि अपराधांच्या समस्या." मुंबई विद्यापीठ च्या मासिक "वाणिज्य विद्यार्थी" २०१०: १०५-१०८.

*सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, समाज शास्त्र विभाग, एन जी आचार्य आणि डी के मराठे कॉलेज ,
चेंबुर मुंबई -71

***

महाराष्ट्रातील स्त्री गुन्हेगारी

*प्रा.डॉ.अन्सारी एस जी,

गुन्हेगारी हा समाजाचा अविभाज्य भाग आहे समाज कितीही प्रगत झाला तरी त्याची गुन्हेगारी पासून संपूर्णपणे मुक्तता होईल ही शक्यता कमी आहे यासंदर्भात समाजशास्त्रीय विचारवंत एमिल दुर्खिम असे म्हटले आहे की" मानवी समाजात गुन्हेगारीची समस्या अटळ आहे "प्रत्येक समाजात मूल्य, नितीसहिता, आदर्श आणि वर्तनाचे प्रकार पद्धती वेगवेगळया आहेत. गुन्हेगारी वर्तनाचा संबंध हा या बाबीशी असतो अठराव्या शतकामध्ये युरोपमधील समाजशास्त्रज्ञ आणि विविध अभ्यासकांनी गुन्हेगारी समस्येचा अभ्यास केला. हा अभ्यास जिवशास्त्रीय, मानसशास्त्रीय, शाररिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने करण्यात आला. यात लोब्रोसो, चार्ल्स गोरिंग, एडविन सदरलँड, विल्यम बोझर इत्यादी. कैसर लोब्रोसो यांना आधुनिक गुन्हेगारीचे अभ्यासक शिल्पकार म्हटले जाते. डॉ .जी एस घुर्ये , पेरीन केरावाल, प्रा.एस.आर श्रीनिवास, पेट्रिक गेडिस, सुधा काळ दाते यांचा समावेश होतो. गुन्हेगारीचा अभ्यास हा गुंतागुंतीचा आणि बहुआयामी स्वरूपाचा आहे. अपराध शास्त्रामध्ये गुन्हेगारीचा अनेक अंगाने अभ्यास केला जात असला तरी स्त्री गुन्हेगारीचा संशोधन क्षेत्राकडे समाज शास्त्रज्ञाच दुर्लक्ष झाले आहे. स्त्री व पुरुष हे समाजाचे विभाज्य घटक आहेत पुरुषाप्रमाणे स्त्रियांची गुन्हेगारी हे जागतिक पातळी वर संशोधनाचे स्वतंत्र क्षेत्र बनले आहे. महिला अपराधशास्त्रज्ञ डॉ . मॅरिस एलिसन यांनी आपल्या "वूमेन क्राईम अँड क्रिमिनल जस्टिस"

या ग्रंथात स्त्री गुन्हेगारासंबंधी विचार मांडले आहेत.

संशोधन पद्धती : प्रस्तुशाह संशोधन दुय्यम तथ्य संकलनाच्या आधारे करण्यात आले. यासाठी इंटरनेट, पुस्तके, साप्ताहिके यांचा वापर करण्यात आला.

उद्देश: महाराष्ट्रातील स्त्री गुन्हेगारीच्या मागील स्थिती तपासणी

गृहीतकृत्ये : या संशोधनासाठी प्रस्तुत संशोधनिकेने खालील गृहित कृत्ये मांडलेली आहेत .

1) महाराष्ट्रातील स्त्री गुन्हेगारचे पुरुष गुन्हेगारापेक्षा वेगळे पण दिसून येते .

2) सामाजिक आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या स्त्रियांमध्ये स्त्री गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आहे .

भारतीय स्त्री गुन्हेगारीचे प्रमाण हे पुरुषाच्या गुन्हेगारीच्या प्रमाणात कमी आहे. 1971 ते 1980 च्या दशकातील भारतीय स्त्री गुन्हेगारीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की भारतातील स्त्रि गुन्हेगारीचे प्रमाण 1.7% ते 2.5% आहे भारतात स्त्री गुन्हेगारीत वाढ होत आहे. स्त्रियांची विकसित होत असलेली भूमिका ,व्यवसाय, स्त्री मुक्तीची कल्पना, स्वातंत्र्य यामुळे महिला विविध क्षेत्रात सहभागी होत आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करत आहेत. महिलांनी केलेल्या गुन्हायाचे स्वरूप केवळ किरकोळ नाही तर अनेक अपारंपारिक आणि गंभीर गुन्हा देखील त्यात सामील आहे. बदलत्या काळात महिलांमधील गुन्हाया मधे वाढ झाली आहे . परंतु कायदा जुना काळात जसा होता तसाच आहे .

तक्ता क्र 1

भारतातील विविध राज्यातील स्त्री गुन्हेगार

अक्र	राज्य	संख्या
1	आंध्र प्रदेश	57406
2	मध्य प्रदेश.	49333
3	तामिळनाडू.	49066
4	गुजरात	41872
5	महाराष्ट्र.	26921

स्रोत :नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्योरो . 2010 ते 2012

महिला गुन्हेगारी कारणीभूत घटक :-

भारतीय समाजात महिला गुन्हेगारीस अनेक आर्थिक, राजकीय, जैविक, मानसिक घटक परिणाम करतात. जैविक घटक : स्त्रि गुन्हेगार होण्यास जैविक घटक काही प्रमाणात कारणीभूत ठरतात. काही अभ्यासकांच्या मते "हार्मोनल असंतुलन सारख्या जैविक घटकाचा स्त्रियांच्या गुन्हेगारी वर परिणाम होतो. "गर्भधारणा आणि रजोनिवृत्तीच्या अवस्थेत मानसिक भावनिक बदल होतो व जैविक मानसिक घटक गुन्हेगारीस कारणीभूत ठरतात. औद्योगीकरण आणि आधुनिकीकरण : औद्योगीकरण आणि आधुनिकीकरणामुळे कुटुंबावर वृद्धांचे नियंत्रण शितिल झाले आहे तसेच आधुनिकीकरणामुळे जलद परिवर्तन होत आहे. पूर्वीच्या परंपरा व नवकल्पना यात स्वतःचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्त्रिया आक्रमक होत आहेत त्यामुळे वाद निर्माण होत आहे व गुन्हेगारी वाढत आहे.

दारिद्र्य :

दारिद्र्य हा घटक भारतातील महिला गुन्हेगारीसाठी कारणीभूत ठरला आहे .दारिद्र्यामुळे कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्त्रिया या गुन्हेगारीकडे वळतात मारागाथम आणि श्रीरंगी विरुद्ध मद्रास राज्य यासारख्या काही न्यायिक निर्णयाद्वारे महिला गुन्हेगारीचा संबध दारिद्र्याशी आहे हे स्पष्ट होते.

मानसिक घटक :

मानसशास्त्रज्ञ गुन्हेगारांनी वेगवेगळया व्यक्तीशी केलेल्या कराराच्या वेळी शिकलेले वर्तन मानतात. अस्वस्थ करणारी परिस्थिती, विसंगत वैवाहिक संबंध , पत्नी आणि आई-वडील यांच्याशी कलह कलह प्रवृत्तीचा सहवास आणि परस्परांमधील गैरप्रकार कुटुंबातील नातेसंबंध हे महिला गुन्हेगारीसाठी जबाबदार आहेत.

सामाजिक घटक :

भारतातील महिला गुन्हेगारीला प्रोत्साहन देणाऱ्या अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षणाचा अभाव, कलह, सामाजिक विकार ,वैवाहिक परिवर्तन, चुकीचे पालकत्व ज्यामुळे स्त्रियांमध्ये गुन्हेगारी वाढत आहे

बालकामगार :

भारतीय समाजात दारिद्र्यामुळे अनेक मुली कमी वयात रोजगारासाठी जातात . कामाच्या ठिकाणी त्यांचे शोषण होते व अनेक वेळेस त्यांना ब्राऊन शुगर ड्रग्स अशा अवैध कामासाठी त्यांचा वापर केला जातो . यामुळे मुली गुन्हेगारीच्या दलदल मध्ये ओढल्या जातात .महिला मुक्ती : पूर्वीच्या काळात स्त्रियांना पुरुषाप्रमाणे संसाधने उपलब्ध नव्हती . आज मात्र स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने सर्व अधिकार संसाधने उपलब्ध आहेत .त्यामुळे त्याचा परिणाम म्हणून सोशल नेटवर्कमध्ये तिचा सहभाग वाढला आहे यात तिला पूर्वी परवानगी नव्हती एखाद्या पुरुषाप्रमाणे गुन्हेगारीस करण्याची संधी तिला आज प्राप्त झाली आहे .

तक्ता क्र.2 : महाराष्ट्रातील स्त्री गुन्हेगारी

अ.क्र.	जिल्हे	संख्या
1	मुंबई	7264
2	जळगाव	5384
3	नाशिक	5235
4	अहमदनगर	4986
5	पुणे	4052

स्तोत : नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो 2010

महिलांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप :

पूर्वी भारतीय महिलांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप हे किरकोळ गुन्ह्यापुरते मर्यादित होते जसे दुकानात चोरी करणे, शेतीत चोरी करणे इत्यादी परंतु आजच्या काळात महिला सर्व प्रकारच्या गुन्हा मध्ये गुंतलेल्या आहेत ब्लॅकमेलिंग, अमली पदार्थाची तस्करी , खोटारडेपणा, अपहरण, वैवाहिक गुन्हे, खून, पॉकेट मार, दहशतवाद, नक्षलवाद, चोरी इत्यादी .अलीकडच्या काळात महिलांनी केलेल्या गुन्हायाची ही काही उदाहरणे आहेत. तस्करी, व्हाईट

कॉलर गुन्ह्यांमध्ये आणि दहशतवादातही त्याचा सहभाग वाढला आहे. महिलां गुन्हेगारी रोखण्यासाठी काही नवीन दृष्टिकोनाची गरज आहे . महाराष्ट्राचा विचार करायचा झाला तर सर्वाधिक प्रकरणे ही पती आणि नातेवाईकांशी केले जाणारे क्रुरुवर्तन याबाबीशी संलग्न आहेत. यामुळे गेल्या तीन वर्षात 20000 हजारहून अधिक स्त्रियांना या प्रकरणात अटक झाली आहे .शिवाय पूर्वी अभावाने ज्या गुन्ह्यामध्ये स्त्रियांची नावे असत अशा हत्या आणि अप हरण सारख्या गुन्ह्यांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढू लागला आहे असे अहवालातील निरीक्षण आहे .महाराष्ट्रात सर्वाधिक गुन्हेगारी मुंबई त्यानंतर जळगाव, नाशिक अहमदनगर, पुणे अशा क्रमाने दिसते. महिला गुन्हेगारीचा विचार करताना असे दिसते की आर्थिक दृष्ट्या निम्नपातळीवर असणाऱ्या स्त्रियांमध्ये गुन्हेगारी जास्त दिसते. आर्थिक गरजा भागविणे या उद्दिष्टाने भुरट्या चोऱ्या, दागिन्यांची लूट असे गुन्हे स्त्रियांच्या हातून घडताना दिसतात. परंतु सद्यस्थितीत यात बदल झाल्याचे दिसते. आज सुशिक्षित आणि मध्यमवर्गीय अशा वर्गातील स्त्रिया गुन्हेगारीकडे वळताना दिसत आहेत .यात गुन्ह्याचे स्वरूपही बदलले आहे .पूर्वी चोरी दागिन्यांची लूट अशा प्रकारा बरोबर सायबर किंवा वेब गुन्हे अपहरण, हत्या, खून छळवणूक , फसवणूक अशा गुन्हाया मध्ये ही स्त्रियांचा सहभाग वाढल्याचे दिसून येते . गुन्हेगार असलेल्या अनेक स्त्रिया पदवीपर्यंत शिकलेल्या आहेत .काही ठिकाणी तर बनावट कागदपत्रे दाखवून केली जाणारी फसवणूक, परस्पर घर विकणे, आर्थिक अफरातफर अशा गुन्हा मध्ये ही स्त्रियांचे नाव पुढे आले आहे आणि त्यांना शिक्षाही झाली आहे. आज स्त्रिया "करिअर ओरिएटेड" होताना दिसतात . एकीकडे बदलणारी कुटुंब व्यवस्था आणि त्यातच घरांच्या तसेच व्यवसायिक पातळीवर वाढणाऱ्या जबाबदाऱ्या वाढत्या अपेक्षा त्यांचा वाढणारा ताण स्त्रियांवर पडू लागला आहे. स्त्रियां मधील गुन्हेगारी वाढण्यामध्ये आज ची चंगळवादी मानसिकता ही जबाबदार आहे . उच्च जीवनमान जगण्याच्या अपेक्षा हे सर्व मिळवण्यासाठी स्त्रिया वाईट मार्गांचाही अवलंब करत आहेत .स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे तेव्हा स्त्रियांवर वारंवार होणारे अन्याय अत्याचार याला सूळ बुद्धीने उत्तर दिले जात आहे . सामाजिक विषमता असाह्य झाल्याने स्त्रियांच्या हातून गुन्हे घडत आहेत .कौटुंबिक हिंसाचारात स्त्रियांकडून स्त्रियांवर अत्याचार केले जातात अशा घटना वाढताना दिसतात .यामुळेही स्त्री गुन्हेगारी मध्ये वाढ होत आहे.

गुन्ह्याचे प्रकार - गुन्हेगारीचे अनेक प्रकार पडतात समाजशास्त्रां मध्ये अनेक उपशाखा आस्तित्वात आल्या आहेत . त्यातच सामाजिक अपराधशास्त्र याविषयीची नवीन शाखा अस्तित्वात आलेली आहे .या अपराधशास्त्रात गुन्हेगारीचे वर्गीकरण विविध शास्त्रज्ञांनी केले .त्यात

1) सदरलँड :यांनी गुन्ह्याच्या स्वरूपावरून गुन्ह्याचे वर्गीकरण केले. त्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे, साधारण गुन्हे, पांढरपेशी गुन्हे , असे वर्गीकरण केले .

2) बोगर : यांनी आर्थिक गुन्हे , यौवन विषयक गुन्हे, राजनैतिक गुन्हे असे वर्गीकरण केले. भांडवलशाहीमुळे गुन्हेगारी अस्तित्वात असे म्हटले. बालकामगार, कामगारांवर अन्याय , व्यसनाधीनता झोपडपट्ट्या, अज्ञान , गरिबी इत्यादी गोष्टी समाजात निर्माण होतात .

3) हेम : या गुन्ह्या शास्त्रज्ञाने गुन्हेगाराचा गुन्हा करण्याचा उद्देश कोणता यावर गुन्हेगारीचे वर्गीकरण केले आहे. समाजातील एखाद्या गटाला प्रचलित व्यवस्था मान्य नसेल तर सर्व सामान्य लोक व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करतात असा प्रयत्न करीत असताना बऱ्याचदा ते हिंसाचार व इतर मार्गांचाही अवलंब करतात. यामध्ये सरंजामशाही आणि भांडवलशाहीच्या विरुद्ध होणारे गुन्हे याचा समावेश होतो. यात संपत्ती विरुद्ध होणारे गुन्हे व व्यक्ति विरुद्ध होणारे गुन्हे असे वर्गीकरण केले आहे .

4) लोंब्रोसो : या फ्रेंच मानसशास्त्रज्ञाने गुन्हेगारीचे वर्गीकरण केले यात भावनाप्रधान गुन्हेगार, मनोविकृत, अकस्मितगुन्हेगार असे वर्गीकरण केले लोब्रोसोच्या मते व्यक्ती जन्मजात गुन्हेगार नसतो परिस्थितीच्या आहारी जाऊन

भावनेच्या आहारी जाऊन गुन्हा करतो. जे गुन्हेगार मनोविकृत असतात ते कोणताही विचार न करता गुन्हे करतात. अचानक परिस्थिती समोर हार मानून गुन्हा केला जातो.

निष्कर्ष : भारतात गुन्हेगारी आणि गुन्हेगार फार पूर्वीपासून अस्तित्वात आहेत . पारंपरिक समाजात स्त्री गुन्हेगारी ही किरकोळ स्वरूपात अस्तित्वात होती परंतु आधुनिक काळात या स्वरूपात परिवर्तन झाले आहे . स्त्री गुन्हेगारी मध्ये वाढ झालेली आहे .स्त्री गुन्हेगारीचा परिणाम कुटुंब समाज ,मुलांवर होताना दिसतो .स्त्री गुन्हेगारीस सामाजिक आर्थिक स्थिती जबाबदार आहे .त्यामुळे या विषयावर अधिक संशोधन होणे गरजेचे आहे . गुन्हेगारी ही समस्या भारतापूर्वी मर्यादित नसून ती जागतिक समस्या आहे .वर्तमान काळात गुन्हेगाराकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहिले जात असल्याचे आढळते .वाढत्या गुन्हेगारी वर आळा घालण्यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना करावी .

उपाय :

महिला गुन्हेगारी रोखण्यासाठी कायद्या सुधारणा घडून आणणे . कुटुंब शाळा आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक भेदभावावर नियंत्रण ठेवाणे .महिला गुन्हेगार आणि पुनर्वसनासाठी फौजदारी न्याय प्रणालीत सुधारणा करावी . लैगिक शिक्षण, महिला गुन्हेगाराचा विचार आणि उपचार आणि पुनर्वसन करण्यासाठी प्रभावी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. महिला मानवतेसाठी देशाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचा वाटा महत्त्वाचा आहे . गुन्हा करणाऱ्या स्त्रियांमध्ये एकदा गुन्हा करणाऱ्या स्त्रिया व वारंवार गुन्हा करणारे स्त्रिया असे प्रकार दिसतात .प्रसिद्धी झालेल्या बातमीनुसार वारंवार गुन्हे करणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे यात अनेक स्त्रिया या अशा व्यवसायात गुरफटलेल्या आहेत त्याची इच्छा असूनही त्या यातून बाहेर पडू शकत नाही .राज्य शासन या अशा अनेक गुन्हेगारी अडकलेल्या असल्याचे पुनर्वसन करण्यासाठी "टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स या संस्थेच्या मदतीने प्रयत्न करत आहे . यात त्याच्या पुनर्वसनासाठी त्यांचे समुपदेशन केले जाते. शिवणकामात हस्तकला, विणकाम, भरतकाम या बाबी शिकवल्या जातात. स्त्रिया या नवीन आव्हानाला समोर जाताना एकाच वेळी शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थात्मक पातळीवरील प्रयत्न. योग्य समुपदेशन, सामाजिक आर्थिक आणि भावनिक बदलांना सामोरे जाता येईल असे कौटुंबिक वातावरण, समान संधी व समान दर्जा देणे गरजेचे आहे . गुन्हेगाराचा सुप्त गुणांचा विकास करणे त्यांना साक्षर बनवणे त्यांच्या पुनर्वसनासाठी लघुउद्योग सुरू करण्यास मदत करणे समाजात त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ

1) संगवे विलास (संपा), 1979, भारतातील सामाजिक समस्या . मुंबई पॉप्युलर प्रकाश न .

2) पाटे सुमन . 1991, भारतीय सामाजिक समस्या, नागपूर, विद्या .प्रकाशन .

3) आगलावे प्रदीप ,2003, भारतीय समाज संरचना आणि समस्या .नागपूर, साईनाथ .

4) मायी सुनील ,2009 , भारतीय समाज प्रश्न आणि समस्या . पुणे डायमंड प्रकाशन .

5) कऱ्हाळे बी एम, 2009 ,भारतीय समाज प्रश्न आणि समस्या. ,नागपूर , पिंपळापुरे अँण्ड कंपनी पब्लिशर्स

6) गोटे शुभांगी, 2004, महिला सबलीकरण : स्वरूप व समस्या .औरंगाबाद ,वरद पब्लिकेशन .

8) गोटे शुभांगी, 1992, फिमेल क्रिमिनॅलिटी अण्ड सोशॉलॉजिकल अनालीसिस, पीएच डि प्रबंध . औरगाबाद बा आ . मराठवाडा विद्यापीठ .

9) http://wwwupkarmarthi.com

10) https://mr.eferrrit.com

*Ram Ahuja ,1970 'Female of fenders in India 'Meenakshi Prakashan, Nagpur.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर

***

जंगलतोड आणि अति औद्योगीकरणामुळे होणारी पर्यावरणीय हिंसा: एक सामाजिक अध्ययन

*डॉ.सुरेंद्र गोपीनाथ रोटे

प्रस्तावना

इंग्रजी मधील 'Environment' म्हणजे पर्यावरण या शब्दाची उत्पत्ती 'इंविरोंस'(environs) या शब्दापासून झाली. environs म्हणजे 'भोवताली असणे' होय. मराठी शब्दबंधातील पर्यावरण या शब्दाच्या व्याख्येनुसार सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात. वैज्ञानिक पारिभाषिक कोशानुसार पर्यावरण या संज्ञेत वनस्पती अथवा प्राणी ज्या नैसर्गिक परिसरात जगतात, वाढतात तेथील हवा, जमीन, पाणी, इतर सजीव, पर्जन्यमान, उंची, तापमान, इत्यादी सर्वांचा समावेश होतो. वेब्स्टर शब्दाकोशानुसार पर्यावरणाची व्याख्या अशा प्रकारे होते, ''

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची प्रत्येक गोष्ट, ज्यामध्ये माती, पाणी, प्राणी आणि वनस्पती यासारख्या सजीव आणि निर्जीव दोन्ही गोष्टींचा समावेश होतो, जे त्यांच्या सभोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेतात . ही निसर्गाची देणगी आहे जी पृथ्वीवरील जीवनाचे पोषण करण्यास मदत करते.पर्यावरण शास्त्र हे सर्वसमावेशक असलेले माहितीची विद्याशाखा आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर आपण सगळे ज्या वातावरणात जगतो व आपल्याला जगण्यासाठी लागणारी प्रत्येक गोष्ट ज्या नैसर्गिक उगम स्त्रोतातून मिळते त्याला आपण पर्यावरण असे म्हणतो. सजीवांची राहण्याची जागा म्हणजे सजीव वातावरण. यात जैविक आणि अजैविक घटक आहेत. हे भौतिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, जैविक आणि भौतिक क्षेत्र आहे ज्यामध्ये सर्व सजीव प्राणी त्यांचे महत्त्वपूर्ण क्रियाकलाप चालूठेवतात आणि एकमेकांशी संवाद साधतात. पर्यावरणीय जीवांचे अस्तित्व जेपृथ्वीवर राहत आहेत त्या काळापासून अस्तित्वात आहेत.

पर्यावाराणाशिवाय कुठलाही जीव, जंतू , सजीव प्राणी विशेषतः मानव प्राणी जगू शकत नाही. कारण प्रत्येक सजीव हा त्याला अनुकूल असलेल्या पर्यावरणात किंबहुना वातावरनातच जगू शकतो. जंगलात राहणारे प्राणी सुद्धा पर्यावरणावर अवलंबून असतात. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन करणे ही प्रत्येक काळाची गरज आहे.

तथापि, मानवी इतिहास लक्षात घेता असे निदर्शनास येते की माणसांनी स्वतः च्या स्वार्थाकरिता तसेच अति उपभोगाकरिता पर्यावरणाचे सातत्याने शोषण केले आहे. आजच्या या आधुनिक काळात जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धनासाठी हजारो उपाय योजना अमंलात आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. जसे की जंगल वाचवा,जंगलावर अवलंबून असणारा आदिवासी समाज वाचवा, वन्य पशु वाचवा कारण वाघांची संख्या झपाट्याने कमी होत चाललेली आपल्याला दिसून येते. जंगलतोडीमुळे पक्ष्यांच्या आणि प्राण्यांच्या तसेच समुद्रातील सजीवांच्या अनेक प्रजाती नष्ट होत आहेत. या सर्व समस्यांना कारणीभूत असणारे आधुनिक उपक्रम म्हणजे अति औदोगीकरण होय.

या सर्व संदर्भात प्रस्तुत संशोधनात्मक लेख या गोष्टीचा आढावा घेण्याचा किंबहुना औद्योगीकरण तसेच जंगलतोड यामुळे पर्यावरणावर होणारी हिंसा याचे टीकात्मक मूल्य मापन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

संशोधनाची उद्धिष्टे

प्रस्तुत संधोधानाचे उद्धिष्ट आहे की आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये निसर्गाचा परिणामतः पर्यावरणाचा कशा प्रकारे ऱ्हास होत चालला आहे. हे समजून घेणे. तसेच पर्यावरण आणि मानव जातीचे कसे अतूट नाते आहे. हे अधोरेखित करणे.

संशोधनाची गृहीतके

प्रस्तुत संशोधनात एकंदरीत असे गृहीत धरण्यात आले की निसर्गाने तयार केलेले पर्यावरण आणि मानव निर्मित पर्यावरण यात फार मोठी तफावत आहे. नैसर्गिक पर्यावरण हे मानवी जीवनाला निरोगी आणि जिवंत राहण्यासाठी प्रभावशाली आहे. तर मानव निर्मित पर्यावरण हे नैसर्गिक पर्यावरणाला हानी पोहचवते ज्याचा विपरीत परिणाम हा मानवी जीवनावरच होतो. यात संतुलन साधण्याची शक्यता आहे का हे या शोध निबंधात शोधण्याचे काम केले आहे.

संशोधन पद्धतीशास्त्र

संशोधन पद्धती हा प्रत्येक सामाजिक संशोधनाचा अपरिहार्य भाग आहे. संशोधन पद्धती म्हणजे आपण आपले संशोधन कसे करतो. कूपर आणि एमोरी यांनी संशोधनाची व्याख्या, 'समस्या सोडवण्यासाठी माहिती प्रदान करण्याच्या उद्देशाने पद्धतशीर चौकशी. मेथडॉलॉजी ही एक विशिष्ट शिस्तीने अनुसरण केलेली पद्धत आहे.

संशोधन अभ्यासाची रचना एखाद्या विषयाच्या निवडीपासून आणि त्याच्या संशोधनाच्या नमुनासह सुरू होते. हे संशोधन अभ्यासाच्या नियोजनाच्या सुरुवातीपासून ते प्रकरणांच्या अंतिमीकरणापर्यंतच्या विषयाशी संबंधित आहे. प्रस्तुत संशोधनाचा प्रकार लक्षात घेता संपूर्ण स्त्रोत हा दुय्यम माहितीवर आधारलेले आहे. म्हणजेच पुस्तके, वर्तमान पत्र, इंटरनेटवरील माहिती तसेच काही प्राध्यापकांच्या चर्चेतून आलेल्या मुद्द्यावरून प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यात आला आहे.

हिंसेचा अर्थ : विकिपीडियाच्या व्याखेनुसार,

'हिंसेची व्याख्या, जागतिकआरोग्यसंघटनेच्या मते, शारीरिक शक्ती किंवा शक्तीचा हेतुपुरस्सर वापर करून धमकीकिंवा वास्तवात, स्वतःच्या, दुसऱ्या व्यक्तीच्या, किंवा समूह किंवासमुदायाच्या विरुद्ध, परिभाषित केलेली क्रिया, ज्यामुळे परिणामी किंवापरिणामी त्याची जास्त शक्यता आहे, मृत्यू, मनोवैज्ञानिक हानी आणि विकृतीहोण्याची. या व्याख्येमध्ये मुद्दाम केलेल्या क्रियेचा समावेश आहे, त्याच्या परीणामांचा विचार केला किंवा नाही केला तरीही. तथापि, सामान्यत:हानीकारक किंवा हानिकारक मार्गाने उत्साहित असलेली कोणतीही गोष्ट हिंसात्मकनसली तरीही हिंसाम्हटले जाऊ शकते.'[१]

मेरीअम वेब्स्टर शब्दकोषानुसार हिंसा म्हणजे,

१: दुखापत, गैरवर्तन, नुकसान किंवा नष्ट करण्यासाठी शारीरिक शक्तीचा वापर

२ : हिंसक उपचार किंवा प्रक्रियेचे उदाहरण

३: विकृती, उल्लंघन किंवा अपवित्र द्वारे किंवा जणू दुखापत : आक्रोश

४: तीव्र, अशांत, किंवा संतप्त आणि अनेकदा विध्वंसक क्रिया[२]

वरील हिंसाचाराच्या सामाजिक व्याख्या जर आपण लक्ष्यात घेतल्या असे दिसून येते की हिंसा ही विध्वंसक, नुकसान करणारी, हानिकारक आणि बळाचा वापर करून अस्तित्वात असलेल्या गोष्टी नष्ट करणारी वा विकृत करणारी बाब आहे.

जंगलतोड आणि औद्योगिकीकरण : भारतीय सरकारच्या वन सर्वेक्षण अहवाल 2021 नुसार[३]

देशाचे एकूण जंगल आणि वृक्षाच्छादित क्षेत्र 80.9 दशलक्ष हेक्टर आहे जे देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या 24.62 टक्के आहे. 2019 च्या मूल्यांकनाच्या तुलनेत, देशातील एकूण जंगल आणि वृक्षाच्छादित क्षेत्रामध्ये 2,261 चौरस किलोमीटरची वाढ झाली आहे. त्यापैकी १,५४० चौरस किमी व वृक्षाच्छादनात ७२१ चौरस किमी इतकी वाढ दिसून आली आहे.

खुल्या जंगलात व त्यापाठोपाठ अतिशय घनदाट जंगलात जंगलाच्या आच्छादनात वाढ दिसून आली आहे. आंध्र प्रदेश (६४७ चौ. किमी) व त्यानंतर तेलंगणा (६३२ चौ. किमी) आणि ओडिशा (५३७ चौ. किमी) ही वनक्षेत्रात वाढ दर्शवणारी मुख्य तीन राज्ये आहेत.

क्षेत्रफळानुसार मध्य प्रदेशात देशातील सर्वात जास्त जंगल आहे, त्यानंतर अरुणाचल प्रदेश, छत्तीसगढ, ओडिशा आणि महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या टक्केवारीनुसार वनाच्छादनाच्या बाबतीत, मिझोराम (84.53%), अरुणाचल प्रदेश (79.33%), मेघालय (76.00%), मणिपूर (74.34%) आणि नागालँड (73.90%) ही शीर्ष पाच राज्ये आहेत.

17 राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये 33 टक्क्यांहून अधिक भौगोलिक क्षेत्र जंगलाखाली आहे. या राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपैकी, लक्षद्वीप, मिझोराम, अंदमान आणि निकोबार बेटे, अरुणाचल प्रदेश आणि मेघालय या पाच राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये 75 टक्क्यांहून अधिक वनाच्छादित आहेत, तर 12 राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये मणिपूर, नागालँड, त्रिपुरा, गोवा, केरळ, सिक्कीम, उत्तराखंड, छत्तीसगड, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव, आसाम, ओडिशा या राज्यांमध्ये 33 ते 75 टक्के वनक्षेत्र आहे.

देशाच्या जंगलात एकूण कार्बन साठा 7,204 दशलक्ष टन असल्याचा अंदाज आहे आणि 2019 च्या शेवटच्या मूल्यांकनाच्या तुलनेत देशातील कार्बन साठ्यात 79.4 दशलक्ष टनांची वाढ झाली आहे. कार्बन साठ्यात वार्षिक वाढ 39.7 दशलक्ष टन आहे.

अशा प्रकारे आपला देश जंगल समृद्ध जरी असला तरी सुद्धा आपण आज विकासाच्या वेगवेगळ्या प्रकल्पासाठी जंगलतोड करण्याचे प्रकार पाहतो. उदाहरणार्थ मुंबईतील मेट्रोसाठी आरे कॉलनीतील प्रकल्प. जंगलतोड म्हणजे ज्याला आपण इंग्रजी मध्ये 'deforestation' असे म्हणतो. जंगल ही निसर्गाची देणगी आहे. ती मानव निर्मित नाही. किंबहुना 'मानव' प्राणी हा सुद्धा निसर्गाची निर्मिती आहे. उपरोक्त निर्देशित केल्या प्रमाणे जंगल, नद्या, डोंगर, जमीन पशु-पक्षी आणि वन्य जीव निसर्गाची निर्मिती आहे. हवा, उन, वारा पाऊस या पासून पर्यावरण तयार होते. परंतु समाज नेहमी एका अवस्थेतून दुसऱ्या सामाजिक अवस्थेमध्ये जात राहिल्या कारणाने मानवी समाजाची गरज ही त्या सोबत बदलत गेली. शेतीचा शोध लागला आणि जमीन ही नैसर्गिक न राहता ती कुणाची तरी मालमत्ता झाली. त्यातूनच जमीनदार वर्ग तयार झाला. जे दुबळे सामाजिक घटक होते ते भूमिहीन राहिले आणि जे स्वार्थी होते त्यांनी जमिनीचा ताबा स्वतः कडे घेतला. या प्रक्रियेतून समाज वर्ग निर्माण होऊ लागले. शेतीसाठी जंगलातली झाडे तोडण्यास सुरुवात झाली. उदरनिर्वाहासाठी वापरण्यात येणारी जंगलातली फळे, मध आणि आयुर्वेदिक वनस्पती तसेच खनिज संपत्ती यांचा व्यापार सुरु झाला. या सगळ्या प्रक्रियेत सगळ्यात जास्त हिंसा किंवा अत्याचार झाले ते जंगलावर. नको असलेली झाडे तोडण्यात येऊ लागली. वन्य पशूंची शिकार होऊ लागली. त्यामुळे आज देखील आपल्याला चित्र पाहायला मिळत आहे की बरेचशे वन्यजीव नामशेष झाले आहेत. प्रचंड वृक्षतोडी मुळे पक्षांची घरटी नष्ट झाली. त्यामुळे पक्षी बघणे आज दुर्मिळ झाले आहे. मुंबई सारख्या शहरांमध्ये फार पूर्वी चिमणी नावाच्या नाजुकश्या पक्षाच्या किलकिलाटाने सकाळ व्हायची. परंतु आज चिमणी हा पक्षी पाहणे दुर्मिळ झाले आहे. शहरातील सकाळ आता घडीतल्या अलार्मने तरी होते किंवा रस्त्यांवरील गाड्यांच्या आवाजाने आणि कर्कश होर्नने होते. समाजशास्त्रीय दृष्टीकोन हे सांगतो की हे सर्व परिणाम आधुनिकीकरण, औद्योगीकीकरण तसेच भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे आहेत.

जंगल तोडीचे कारणे

1.औद्योगिकीकरण

औद्योगिकीकरण हे जगभरातील जंगलतोडी मागचे मुख्यकारणांमध्ये एक आहे.जेव्हा पासून मानवाचे पृथ्वीवर अस्तित्व निर्माण झाले आहे तेव्हापासून तेआजपर्यंत माणसांनी खूप मोठा विकास केला आहे. विकासासाठी जेव्हा जमिनीचेगरज पडते तेव्हा जंगलाचा भाग तोडून त्या जमिनीवर इमारती उभारणे/ घर बांधणे/उद्योग उभा करणे अशा वेगवेगळ्या कारणासाठी वापर केला जातो. औद्योगिकीकरणामुळे आर्थिक सुबत्ता आली; या व्यतिरिक्त याचा परिणाम अधिक लोकसंख्या, शहरीकरण, मूलभूत जीवन प्रणालींवर झाला. औद्योगिक वाढ दिवसेंदिवस होत असल्याकारणाने त्याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. हवेचे प्रदुर्षण हा त्यातील सगळ्यात मोठा घटक आहे. प्रदुर्षानामुळे मानवी जीवनावर परिणाम होत आहे.

2.इंधन

जेव्हा लोकांना जंगलात इंधन असल्याचे समजते तेव्हा तेपूर्ण जंगलाला तोडून टाकून त्या ठिकाणी इंधन शोधतात. जेव्हा लोकांनालाकडांची गरज पडते त्यामध्ये स्वयंपाक करण्यासाठी लाकडांची गरज पडते तेव्हा जंगलाची तोडकरतात.

3. मूल्यवान वस्तू शोधणे.

जेव्हा लोकांना समजते, जंगलाच्या ठिकाणी मूल्यवान वस्तू आहे उदाहरणार्थहिरा तेव्हा जंगलाची तोड करून त्या ठिकाणी मूल्यवान वस्तू शोधल्या जातात.अशी घटना मध्यप्रदेश येथे झाली आहे.

सागवान लाकडाला आंतरराष्ट्रीय बाजारात फार किंमत आहे. त्यामुळे सागवानाची झाडे तोडून त्याचा व्यापार केला जातो. मानव जंगलाची तोड करून, त्या जमिनीचा वापर वेगवेगळ्या कारणासाठी करतो. जंगलातील लाकडाचा वापर इंधनासाठी करतो. परंतु अशाप्रकारे जंगल तोडीमुळे पर्यावरणावर परिणाम होतो.

जंगल तोडीचे परिणाम

1. पावसाचे प्रमाण कमी होणे.

ज्या भागामध्ये सर्वात जास्त झाडांची/वृक्षांची संख्या असते त्या ठिकाणीभरपूर पाऊस पडतो. आणि ज्या ठिकाणी सर्वात कमी जंगलाचा भाग आहे त्या ठिकाणीकमी पाऊस पडतो. आणि म्हणून ज्या भागातील जंगल तोडले जात आहे त्या भागात पाऊस कमी होण्याचा धोका आहे.

2. वन्यप्राण्यांची वस्ती नष्ट होणे.

जिथे जंगल आहे तिथे वन्यप्राणी त्यामध्ये पक्षी असो किंवा जमिनीवरीलप्राणी, जमिनीच्या आत राहणारे प्राणी अशा वेगवेगळ्यावन्यप्राण्यांची वस्ती / वन्यप्राण्यांचा राहण्याचे ठिकाण जंगल तोडल्यामुळेनष्ट होऊन जाते.

शाश्वत विकास ध्येय-१५ (SDG-15)

शाश्वत विकास लक्ष्य 15 (SDG 15 किंवा ग्लोबल गोल 15) हे "जमिनीवरील जीवना"बद्दल आहे. युनायटेड नेशन्सने २०१५ मध्ये स्थापित केलेल्या 17 शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी हा एक, अधिकृत शब्द आहे: "स्थिरीय परिसंस्थेचे संरक्षण, पुनर्संचयित आणि शाश्वत वापरास प्रोत्साहन देणे, जंगलांचे शाश्वत व्यवस्थापन करणे, वाळवंटीकरणाचा सामना करणे आणि जमिनीचा ऱ्हास थांबवणे आणि जैवविविधतेचे नुकसान थांबवणे"SDG -15, २०३० पर्यंत साध्य करण्यासाठी 12 उद्दिष्टे आहेत. लक्ष्यांच्या दिशेने प्रगती 14 निर्देशकांद्वारे मोजली जाते.

आपल्या पर्यावरणावर (Sustainable Development Goal-15)SDG 15 इतका प्रभावशाली असण्याचे कारण म्हणजे ते संरक्षण, तसेच जैवविविधतेला शाश्वतपणे प्रोत्साहन देते. हे दोन पैलू इकोसिस्टमच्या आरोग्यास समर्थन देतात, जे अन्न, पाणी, तसेच हवामान नियमन आणि मनोरंजन यांसारख्या पर्यावरणीय सेवा प्रदान करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. या इकोसिस्टम सेवा जैवविविधतेशी जवळून संबंधित आहेत आणि ग्रामीण आणि स्थानिक समुदायांसारख्या उपेक्षित गटांच्या उपजीविकेसाठी आणि कल्याणासाठी आवश्यक आहेत. जगातील सुमारे 1.6 अब्ज लोकसंख्या त्यांच्या उपजीविकेसाठी जंगलांवर अवलंबून आहे, ज्यामध्ये 70 दशलक्षाहून अधिक स्थानिक लोकांचा समावेश आहे.[4]

SDG 15 चा शाश्वत विकासावरही मोठा प्रभाव पडतो, जो जमीन/वन परिसंस्थेच्या समृद्धीवर अवलंबून असतो. पृथ्वीच्या पृष्ठभागाचा 30% भाग जंगलांनी व्यापलेला आहे, हे सर्व एकत्रितपणे जगातील प्राणी आणि वनस्पतींच्या 80% पेक्षा जास्त प्रजातींचे निवासस्थान आहे. तथापि, मेरीलँड विद्यापीठाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, 2020 मध्ये या ग्रहाने युनायटेड किंगडमपेक्षा मोठे वृक्षाच्छादित क्षेत्र गमावले आहे, ज्यामध्ये प्राथमिक उष्णकटिबंधीय जंगलांच्या 4.2 दशलक्ष हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राचा समावेश आहे.

प्रमुख निष्कर्ष

प्राचीन काळापासून माणूस हा आदिम अवस्थेत जगत आला आहे. आज जग आधुनिकदृष्ट्या प्रगत होत चालले असले तरी ही जगाच्या पाठीवर असे असंख्य समुदाय आहेत जे जंगलात राहतात. ज्यांना आपण आदिवासी म्हणून संबोधितो. आज संपूर्ण आदिवासी समाज आधुनिकीकरण आणि औद्योगीकीकरणाच्या प्रक्रीयेमध्ये असहाय्य झालेला दिसून येत आहे. आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरण या भौतिक गोष्टी स्पष्ट आहेत. परंतु या गोष्टी पर्यावरणाच्या

दृष्टीकोनातून फसव्या आणि गोंधळात टाकणाऱ्या आहेत. एकीकडे अत्याधुनिक उपकरणांच्या शोधामुळे मानवी जीवन आरामदायक होत आहे तर टोलेजंग इमारती, स्वयंचलित यंत्र, कर्कश आवाज आणि कार्बनडाय ऑक्साईड निर्माण करणारे कारखाने, केमिकालच्या सांडपाण्यामुळे शेत जमीन आणि शेती उत्पादनावर होणारा परिणाम त्यामुळे मानवी आरोग्याचा स्तर खालावलेला आहे. पर्यावरणावर होणारी हिंसेमुळे मानवी जीवनाला आवश्यक असलेला ऑक्सिजन वातावरणातून कमी होत आहे. त्यामुळे खूप कमी वयात लोकांना वेग वेगळ्या जीवघेण्या आजारातून जावे लागत आहे. अगदी कमी वयात सुद्धा तरुणांना हृदय विकाराच्या झटक्यातून तसेच शारीरिक व्याधिनां सामोरे जावे लागत आहे. हा सर्व परिणाम पर्यावरणाची काळजी न घेतल्या मुळे होत आहे.

तथापि, पर्यावरण बचाव आंदोलनाच्या चळवळीमुळे आज मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत आहे. अध्ययन क्षेत्रामध्ये इको-फेमिनिस्म म्हणजे पर्यावरण स्त्रीवाद, स्त्रीवादी पर्यावरणवाद आणि शाश्वत विकास(sustainable development) या संकल्पनाचा जगभर अभ्यास होत आहे. ज्यामुळे पर्यावरणाच्या बाबतीत मानवी वर्तणुकीला एक सकारात्मक दिशा देण्याचे काम होत आहे. परिवर्तनवादी चळवळीची ठळक उदाहरणे द्यायची ठरली तर प्रामुख्याने आपण चिपको आंदोलनाचा उल्लेख करता येईल ज्यामध्ये जंगलातील झाडे तोडू नये म्हणून स्त्रियांनी झाडांना दोन्ही हाताने घट्ट पकडले होते. या अनन्य साधारण कृतीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले होते. तसेच भागीरथी वाचवा आणि तेहरी धरण प्रकल्प थांबवा(उत्तर प्रदेश), नर्मदा बचावो आंदोलन(मध्य प्रदेश आणि गुजरात), त्रिपुरातील घुमती धरण प्रकल्पाला विरोध, कर्नाटकातील कैगा न्यूक्लीअर पावर प्लांटला विरोध या सर्व पर्यावरणवादी चळवळी तर आहेच तसेच त्या मानवतावादी चळवळी सुद्धा आहेत. कारण त्या येणाऱ्या पुढच्या पिढीचा विचार सुद्धा करतात. जेणेकरून त्यांना सुद्धा निसर्गाच्या सानिध्यात जगता येईल व नैसर्गिक साधन संपतीचा वापर त्यांना देखील करता येईल.

टीपा:

१. https://mr.wikipedia.org/wiki/हिंसा

२. https://www.merriam-webster.com/dictionary/violence#dictionary-entry-1

३. https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1789635

४. https://en.wikipedia.org/wiki/Sustainable_Development_Goal_15

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख, सिद्धार्थ महाविद्यालय कला,वाणिज्य आणि शास्त्र, फोर्ट, मुंबई-०१

मो.नं.:८१०४३७६०६९

***

पर्यावरण सरंक्षण आणि संवर्धन चळवळी संबंधी एक अध्ययन

*प्रा.डॉ.लालचंद किसन रामटेके

सारांश :

जागतिक पातळीवर ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून साजरा केला जातो. जमीन, जंगल, पाणी, हवा यांचे संरक्षण व संवर्धन करीत प्रदूषणाला रोखणे व पर्यावरणविषयक जनजागृती करणे हा त्यामागे प्रधान हेतू राहिला आहे.

पर्यावरण जनजागरण जैन धर्माच्या शिकवणीतून दिसून येते. २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांनी म्हटले होते की, ''माणसाने माणसाची हत्या करणे ही हिंसा आहे आणि म्हणूनच ती करू नये. तसेच वृक्ष, वेली यांना देखील इजा पोहोचवू नका. कारण तीही एक हिंसाच असेल. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही मानवजातीला उपकारक दृष्टीच भगवान महावीरांनी दिली होती. या विचारांचे पालन जैन धर्मीयांमध्ये आजही कसोशीने होताना दिसते.

पर्यावरणविषयक जगभर अनेक चळवळी झाल्या. त्यामध्ये भारतातील ''चिपको' आंदोलन सर्वात महत्त्वाचे आहे. वाढत्या शहरीकरणामुळे जंगले नष्ट करणे यास विरोध म्हणून १९७४ पासून तेव्हाच्या उत्तर प्रदेश आणि आताच्या उत्तराखंड राज्याचा भाग असणाऱ्या अनेक जिल्ह्यांमध्ये झाडांची कत्तल होऊ नये यासाठी या झाडांनाच मिठी मारून झाडांचे संरक्षण करणाऱ्या हजारो महिलांनी जगाचे लक्ष वेधून घेतले. विशेष म्हणजे या साऱ्याचे नेतृत्व स्थानिक महिलांनीच केले. या चळवळीचे मार्गदर्शक भट्ट आणि सुंदरलाल बहुगुणा यांनी हे आंदोलन अनेक राज्यांमध्ये नेले.

सध्याच्या युगात पर्यावरणविषयक जागृती करणे ही अनिवार्य बाब ठरली आहे. मानवी जीवनावर पर्यावरणविषयक बदलांमुळे मोठा परिणाम होत आहे. ऋतुचक्र बदलले गेले आहे. खूप पाऊस, खूप उकाडा अथवा खूप थंडी असे अनुभवास येत आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होऊन सिमेंट क्रॉंकिटची जंगले बनलेली शहरे व त्यातील इमारतींमधून चिमण्या दिसेनाशा झाल्या आहेत. हे सारे आपण अनुभवत असताना कोविड–१९ या विषाणूमुळे देशात लागू झालेल्या लॉकडाऊनमुळे पर्यावरणविषयी अनेक चांगले बदल साऱ्या देशाने अनुभवले. वाहनांच्या धुरामुळे अनिष्ट परिणाम झालेली हवा शुद्ध झाल्याचे अनुभवास आले. हॉर्नचे गोंगाट कमी होऊन ध्वनिप्रदूषण कमी झाले.

या पृथ्वीवर राहणारे सर्व सजीव पर्यावरणाच्या अंतर्गत येतात. ते जमिनीवर राहतात किंवा पाण्यावर ते पर्यावरणाचा भाग आहेत. वातावरणात हवा, पाणी, सूर्यप्रकाश, वनस्पती, प्राणी इत्यादींचाही समावेश होतो.

शिवाय, पृथ्वी हा विश्वातील एकमेव ग्रह मानला जातो जो जीवनाला आधार देतो. पर्यावरण हे एक आवरण आहे जे सर्व सजीवांना जीवन देते.

संक्षिप्त सार—पर्यावरण, महत्व, फायदे, नुकसान, काळजी, संवर्धन चळवळी, पर्यावरण व्यवस्थापन उदीष्टे, पर्यावरण व्यवस्थापन वैशिष्टे.

प्रस्तावना :

पर्यावरणामुळे आपल्याला असे असंख्य फायदे मिळतात ज्यांची आपण आयुष्यभर परतफेड करू शकत नाही. ते जंगल, झाडे, प्राणी, पाणी आणि हवा यांच्याशी जोडलेले आहेत. झाडे पाणी शुद्ध करतात, पुराची शक्यता कमी करतात नैसर्गिक संतुलन राखतात. निसर्गाने स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण कसे ठेवता येईल हे आपल्यावर सोपवले होते. पण माणसाने आपल्या लोभी स्वभावाच्या आणि विकासाच्या नावाखाली ते संकटात टाकले आहे. विज्ञानाच्या वाढत्या निसर्गाने एकीकडे आपल्यासाठी सुख–सुविधा वाढवल्या आहेत तर दुसरीकडे पर्यावरण प्रदूषित करून मानवाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. कारखाने बंद राहिल्याने गंगा नदीसह सर्वच नद्यांच्या पाण्यातील प्रदूषण थांबले. केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर शहरांमध्येदेखील पहाटे पक्ष्यांची किलबिलाट ऐकू येऊ लागली. पर्यावरणाच्या दृष्टीने ही चांगली अनुभूतीच आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत राहिला तर साथीचे अनेक रोग पसरायला मदत होते. सार्स, इबोला, निपा, चिकनगुनिया, मलेरिया, स्वाइन फ्लू आणि आता करोना हे सारे साथीचे रोग पर्यावरणाचे संरक्षण करता न आल्यामुळेच जगभर पसरले व वाढले. हे लक्षात घेता पर्यावरणाचे महत्त्व किती आहे हे कळून येते. यामुळेच पर्यावरणाची हानी कशामुळे होते हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

ढासळत्या पर्यावरणाबद्दल विचार करताना ओझोनचा विरळ होत चाललेला थर, ग्रीनहाउस इफेक्ट, ग्लोबल वॉर्मिंग, वाळवंटामध्ये वाढ, जंगलाचे प्रमाण कमी, जैववैविध्यता कमी, कचऱ्याची विल्हेवाट आदी अनेक प्रश्नांची चर्चा होणे महत्त्वाचे असते.

पर्यावरण म्हणजे काय

पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे वातावरण. पर्यावरण आणि मानव यांचे नाते खूप जवळचे आहे. माणसाच्या भौतिक गरजा पर्यावरणामुळे भागतात. आपल्याला पाणी, हवा इत्यादी घटक पर्यावरणातून मिळतात. शिवाय, पर्यावरण त्याच्या कार्यप्रणालीवर बारकाईने नियंत्रण ठेवते, ते इकोसिस्टमसाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण प्रणालींचे नियमन करते. याशिवाय, ते पृथ्वीवरील सजीव आणि जीवनाची गुणवत्ता राखते. पर्यावरण दररोज घडणाऱ्या विविध नैसर्गिक चक्रांचे नियमन करते. ही चक्रे सजीव आणि पर्यावरण यांच्यातील नैसर्गिक संतुलन राखण्यात मदत करतात. या गोष्टीमध्ये काही गडबड झाल्यास शेवटी मानव आणि इतर सजीवांच्या जीवनचक्रावर परिणाम करू शकतो.

१. हर्सकोव्हिटस एम जे. : या अमेरीकन तज्ञाने त्यांच्या "Man and his works" या ग्रंथात इ. स. १९४८ मध्ये पर्यावरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे–''पर्यावरण म्हणजे सर्व बाहय परिस्थितीचे आणि प्रभावांचे एकत्रिकरण आहे जे पृथ्वीच्या पृष्ठभागावर सजीवांच्या विकास चक्राला प्रभावित करीत असते.''

२. मॅकइव्हर आर. एम. या विचारवंताची त्याच्या "Society" या ग्रंथात पर्यावरणाची व्याख्या –

''पृथ्वीचा पृष्ठभाग आणि तिची सर्व प्राकृतिक परिस्थिती, प्राकृतिक साधनसंपत्ती, भूमी, जल, पर्वत, खनिज पदार्थ, वनस्पती, पाणी व संपूर्ण प्राकृतिक शक्ती पृथ्वीवर प्रगट होवुन मानवी जीवन प्रभावित करतात त्यास पर्यावरण म्हणतात.''

पर्यावरण सरंक्षण आणि संवर्धन चळवळी संबंधीचे गृहितके पुढीलप्रमाणे

१. पर्यावरणासंबंधी अध्यन करणे.

२. पर्यावरण आणि पर्यावरण सरंक्षण चळवळी विषयी शोध घेणे .

३. पर्यावरण आणि मानवी संतुलन कसे साधता येईल या संबंधी शोध घेणे.

वरील गृहित कृत्याच्या आधारे संशोधनाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले आहे. संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर केला गेला असुन परिस्थितीकी पध्दत आणि वर्तणूक पध्दत यांचाही वापर केला आहे.

पर्यावरणाचे महत्त्व

आपण पर्यावरणापासून आलो आहोत, प्रत्येकाच्या जीवनासाठी पर्यावरण हे खूप महत्त्वाचे आहे. कारण पृथ्वीवर जीवन पर्यावरणातूनच शक्य आहे. सर्व मानव प्राणी, नैसर्गिक, वनस्पती, झाडे, वनस्पती, हवामान, हवामान हे सर्व पर्यावरणामध्ये सामावलेले आहे. पर्यावरण केवळ हवामानाचा समतोल राखण्यासाठीच नाही तर जीवनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी देखील प्रदान करते.

लोकांना पर्यावरणाचे महत्त्व समजावे आणि त्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी ह्व जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. पहिला पर्यावरण दिन ह्व जून घ्श्र्त्ा रोजी साजरा करण्यात आला. पर्यावरणाने आपल्याला आणि इतर सजीवांना हजारो वर्षांपासून वाढण्यास आणि वाढण्यास मदत केली आहे, पर्यावरण आपल्याला सुपीक जमीन, पाणी, हवा, पशुधन आणि जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी पुरवते.

पर्यावरणाचे फायदे

आपल्याला पर्यावरणातून शुद्ध हवा मिळते. पर्यावरण हा आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.. पर्यावरणामध्ये सेंद्रिय, अजैविक, नैसर्गिक आणि मानवनिर्मित गोष्टींचा समावेश होतो. नैसर्गिक वातावरणात झाडे, झुडपे, नद्या, पाणी, सूर्यप्रकाश, प्राणी, हवा इत्यादींचा समावेश होतो. आपण प्रत्येक क्षणी श्वास घेत असलेली हवा, पाणी सोडून जे आपण जगू शकत नाही आणि जे आपण आपल्या दैनंदिन जीवनात वापरतो. या सर्व नैसर्गिक गोष्टी आहेत ज्यामुळे पृथ्वीवर जीवन शक्य होते. ते वातावरणातच येतात. झाडे–वनस्पतीची हिरवळ सुद्धा मनाला एक वेगळीच शांती देते. अनेक प्रकारचे आजारही वातावरणातूनच दूर होतात.

पर्यावरण मानव, प्राणी आणि इतर सजीवांना वाढण्यास आणि विकसित होण्यास मदत करते. मानव हा देखील पर्यावरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. पर्यावरणाचा घटक असल्याने आपणही पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे. आपले हे जीवन पर्यावरणावर टिकवण्यासाठी आपल्याला पर्यावरणाचे वास्तव जपावे लागेल.

पर्यावरणाचे नुकसान होण्याची कारणे

आजच्या युगात पर्यावरण प्रदूषण झपाटयाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणाचा ह्रास होत आहे. जिथे जिथे दाट झाडे आहेत, तिथे ती तोडून मोठमोठ्या इमारती उभारल्या जात आहेत. मोटारींचा धूर, कारखान्यातील मशिनचा आवाज, या सर्वांमुळे खराब रसायनयुक्त पाणी, वायू प्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, माती प्रदूषण होत आहे. ही चिंतेची बाब बनली आहे, ती अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळे आपल्याला अनेक प्रकारच्या आजारांना सामोरे जावे लागते आणि आपले शरीर नेहमीच खराब होत असते. आज जिथे विज्ञान क्षेत्रात तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आहे आणि जगात खूप विकास झाला आहे, तर दुसरीकडे पर्यावरण प्रदूषण वाढण्यासही ते कारणीभूत आहे. आधुनिकीकरण, तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे.

मानव स्वतच्या स्वार्थापोटी झाडे–झाडे तोडत आहे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीशी खेळत आहे, त्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे, एवढेच नाही तर काही मानवनिर्मित कारणांमुळे पृथ्वीवरील वातावरण, जलमंडल इत्यादींवर परिणाम होत आहे. तापमान वाढत आहे आणि ग्लोबल वार्मिंगची समस्या निर्माण होत आहे, जी मानवी आरोग्यासाठी अत्यंत घातक आहे.

पर्यावरणाची काळजी घेण्याची गरज

पर्यावरण हे आपल्यासाठी एक प्रकारची देणगी आहे. या वातावरणाला चांगले ठेवणे हे खूप महत्वाचे आहे. पर्यावरणाची काळजी घेणे आणि त्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी आपण स्वच्छतेचीही खूप काळजी घेतली पाहिजे. झाडांचे महत्त्व समजून जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. घनदाट झाडे वातावरण शुद्ध ठेवतात आणि सावली देतात. घनदाट झाडे हे प्राणी आणि पक्ष्यांचे अधिवासही आहेत. म्हणूनच जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. पर्यावरण आणि माणूस एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत, म्हणजेच माणूस पूर्णपणे पर्यावरणावर अवलंबून आहे. आज विज्ञानाने खूप प्रगती केली असली तरीही पर्यावरणाशिवाय माणूस आपल्या जीवनाची कल्पनाही करू शकत नाही. पण निसर्गाने आपल्याला जे उपलब्ध करून दिले आहे त्याची तुलना नाही. म्हणूनच मानवाने भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी निसर्गाचे शोषण टाळले पाहिजे. विज्ञानाच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे माणसाचे जीवन खूप सोपे झाले आहे, यात शंका नाही, तर त्यामुळे वेळेची बचत तर झालीच पण माणसाने खूप प्रगतीही केली आहे. परंतु विज्ञानाने असे अनेक शोध लावले आहेत, ज्याचा परिणाम आपल्या पर्यावरणावर होत आहे आणि ज्याचा मानवी आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

पर्यावरणाची काळजी कशी घ्यावी

उद्योगातील दूषित पदार्थ आणि सांडपाणी यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली पाहिजे. पर्यावरणाचे सौंदर्य वाढवण्यासाठी आपण स्वच्छतेचीही खूप काळजी घेतली पाहिजे. झाडांचे महत्त्व समजून जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. घनदाट झाडे वातावरण शुद्ध ठेवतात आणि सावली देतात. घनदाट झाडे हे प्राणी आणि पक्ष्यांचे अधिवासही आहेत. म्हणूनच जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. बेसुमार वृक्षतोड थांबली पाहिजे. अत्यंत गरजेच्या वेळीच वाहनांचा वापर करावा. दूषित आणि विषारी पदार्थांच्या विल्हेवाटीसाठी कठोर कायदे केले पाहिजेत. पर्यावरणाचे महत्त्व समजण्यासाठी लोकांनी जनजागृती केली पाहिजे.

आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान सुरू केले. पर्यावरण संतुलनासाठी तयार केलेला हा उपक्रम आहे. अशा प्रकारे आपण आपले पर्यावरण वाचवले पाहिजे. लोकांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. शांत आणि निरोगी जीवन जगण्यासाठी स्वच्छ वातावरण अत्यंत आवश्यक आहे.

पर्यावरणासाठी चालवल्या गेलेल्या संवर्धन चळवळी

दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिकीकरणाचा वेग वाढला आणि त्याच वेगाने पर्यावरणाचे मुद्देही समोर येण्यास सुरुवात झाली. पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा थेट फटका मानवी समाजावर बसत असल्यामुळे, या मुद्द्यांना सामाजिक आणि राजकीय आयाम आले. यातून, १९६०–७० च्या दशकामध्ये 'ग्रीनपीस,' 'ग्रीन नेटवर्क', 'फ्रेंड्स ऑफ अर्थ' या संघटना आकाराला आल्या.

नव्याने उदयाला आलेल्या पर्यावरणवाद्यांचा रेटा वाढत गेला, तशी आंतरराष्ट्रीय व्यासपीठालाही त्याची दखल घ्यावी लागली. यातूनच, १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रांची पहिली मानव–पर्यावरण परिषद झाली. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे, याच व्यासपीठावरून पहिल्यांदा विरळ होणाऱ्या ओझोनच्या थराचे वास्तव मान्य करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरूनच बळ मिळाल्यामुळे सर्वच देशांमध्ये कमी–अधिक प्रमाणामध्ये पर्यावरण चळवळी वाढण्यास सुरुवात झाली. पाश्चिमात्य देशांमध्ये १९८० च्या दशकामध्ये 'ग्रीन पॉलिटिक्स', 'इको ग्रीन्स', 'ग्रीन मूव्हमेंट' यांसारख्या चळवळी आकाराला आल्या. यातही, १९८० या दशकामध्ये घडलेल्या भोपाळमधील वायूगळती, चेर्नोबिलच्या अणुभट्टीतील स्फोट, अलास्कामध्ये झालेली तेलगळती आणि आखाती युद्धात पेटविण्यात आलेल्या तेलविहिरी या घटना पर्यावरण चळवळींना आक्रमक होण्यासाठी कारणीभूत ठरल्या. यातूनच, १९८९ मध्ये झालेल्या युरोपीय निवडणुकीमध्ये पहिल्यांदा पर्यावरणाचा मुद्दा सर्वांत प्रामुख्याने उचलण्यात आला. त्या निवडणुकीत वेगवेगळ्या देशांमध्ये विखुरलेल्या ग्रीन पक्षांनी एकत्रितपणे प्रचार केला होता. तेव्हापासून आजपर्यंत युरोपातील निवडणुकींमध्ये या चळवळी व त्यांचे मुद्दे निर्णायक ठरत आहेत. आजही, जी–७ किंवा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये पर्यावरणाचा मुद्दा गांभीर्याने चर्चिला जावा, यासाठी युरोपमध्ये सातत्याने आंदोलन होत असते. कार्बन वायूंचे उत्सर्जन टाळण्यासाठी १९८७ मध्ये झालेला क्योटो करार किंवा अलिकडेच झालेला पॅरिस करार होण्यासाठी पर्यावरणवाद्यांचा दबाव होता, हे निश्चित.

भारतामध्ये पर्यावरण चळवळींचा विचार करताना, ४०० वर्षांपूर्वीच्या बिष्णोई समाजाने दिलेल्या बलिदानाची निश्चित आठवण सांगितली जाते. हिमालयातील ऱ्हास थांबविण्यासाठी सुरू झालेली चिपको चळवळ, नर्मदा बचाव आंदोलनापासून टेहरी धरणाला विरोध करण्यासाठी झालेले आंदोलन अशी अनेक उदाहरणे भारतात पाहायला मिळतात. पर्यावरणाच्या मुद्द्यांना सद्यस्थितीतील प्रश्नांशी जोडण्यामध्येही या चळवळींना यश आले आहे. त्यामध्ये राजेंद्रसिंहांनी केलेले जलसंधारणाचे काम, गंगा बचाव चळवळ यांपासून सध्या राबविण्यात येत असलेली 'कावेरी कॉलिंग' ही अशी अनेक उदाहरणे आहेत. रासायनिक खतांमुळे पिकांबरोबरच जमिनीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्रातही 'झिरो बजेट शेती'सारखे प्रयोग होत असून, त्यांची व्याप्ती कमी असली, तरीही त्यांचे महत्त्व नाकारता येणार नाही.

पर्यावरण व्यवस्थापनाची उद्दिष्टे

- पर्यावरणातील निरनिराळ्या घटकांचे संशोधन करणे.
- पर्यावरणाच्या नियोजनाची रूपरेषा तयार करणे.
- पर्यावरणाच्या विविध घटकांना प्रदूषणमुक्त ठेवणे.
- मानवाला प्रदूषणाच्या परिणामांपासून वाचविणे.
- अवक्षय होत असलेल्या सजीवांना संरक्षण देणे.
- पर्यावरणाचा दर्जा राखला जावा म्हणून विशिष्ट नियमावली वा तत्त्वे ठरविणे. प्रदूषण नियंत्रणाद्वारे पर्यावरणाच्या गुणवत्तेचे रक्षण करणे.
- व्यवस्थापनासाठी उपायांचे समीक्षण करणे व त्यात सुधारणा करणे.
- व्यवस्थापनासाठी नियोजित केलेल्या उपायांच्या परिणामांची तपासणी करणे.
- पर्यावरण व्यवस्थापनासाठी साहित्यसंग्रह करणे.
- पर्यावरण शिक्षण देण्याची व्यवस्था करणे आणि समाजात जाणीव व जागृती निर्माण करणे.
- संसाधनांचा बहुउद्देशीय वापर करून पारिस्थितिकीय संतुलन राखण्याचा प्रयत्न करणे.
- जैवविविधतेचे परिरक्षण करणे.
- स्वच्छ तंत्रज्ञान उत्पादन संकल्पना स्वीकारणे.
- पर्यावरण संधारणासाठी नियम व कायदे करून त्यांची अंमलबजावणी करणे.

पर्यावरणीय व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये:

- मानवांनी प्रभावित जगाशी संबंधित आहेत हे टिकाऊ विकासास समर्थन देतेय
- बहु–अनुशासनात्मक दृष्टिकोनाची मागणी करते. यासाठी विविध विकास दृष्टिकोन समाकलित करणे आवश्यक आहे
- अल्प–मुदतीच्या आणि दीर्घ–मुदतीच्या नियोजनाबरोबरच स्थानिक ते जागतिक स्तरापर्यंतची ही चिंता आहेय आणि

- नैसर्गिक आणि सामाजिक विज्ञान, धोरण बनविणे आणि नियोजन एकत्रित करण्याचा प्रयत्न करते.
- संपूर्ण जगात, विशेषत: विकसनशील देशांमध्ये, एकूण वातावरणाच्या व्यवस्थापनाची ही तातडीची आवश्यकता आहे
- पर्यावरणातील घटकांचे ज्ञान देणे.
- पर्यावरण संरक्षणाची जाणीव करून देणे.
- सामाजिक संसाधनांमधील सामर्थ्याची जाणीव करून देणे.
- नैसर्गिक संसाधनांचे ज्ञान देणे.

निष्कर्ष :—

मानवी विकासाकरीता पर्यावरणाचे संवर्धन करणे हे काळाची गरज आहे. आपण सर्वांनी पर्यावरणाबाबत जागरुक असणे आवश्यक आहे. त्याशिवाय पर्यावरणाचे संतुलन राहु शकत नाही त्यासाठी वृक्षतोडीवर शासनाने कठोर कायदे केले पाहिजेत. यासोबतच पर्यावरण स्वच्छ ठेवणे हे आपले कर्तव्य मानले पाहिजे कारण स्वच्छ वातावरणात राहूनच मानवाचे आरोग्य निर्माण आणि विकास होऊ शकतो. आपल्या ग्रहाला वाचवण्यासाठी पर्यावरण प्रदूषण ही एक मोठी चिंता बनली आहे. पर्यावरणाचे प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यापैकी काहींमध्ये झाडे लावणे, अपारंपरिक संसाधनांचा वापर कमी करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे इ. मानवाच्या सामाजिक व आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाची गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न यातून केला जातो. पर्यावरण व्यवस्थापन ही मानव आणि निसर्ग यांच्यात समन्वय साधणारी प्रक्रिया आहे. त्याद्वारे पर्यावरणाचे संतुलन बिघडू न देता व प्रदूषणविरहित पर्यावरण राखून मानवाचे हित साधण्याचा प्रयत्न केले पाहिजे कारण पर्यावरण आणि मानव यांचा जवळचा सहसंबंध आहे.

संदर्भग्रथ :—

१. कऱ्हाडे बी. एम. (२०११). सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र. पिपळापूरे ॲन्ड पब्लिशर्स.पृ. क्र. ३९८ ते ४०१
२. आगलावे प्रदीप, आगलावे सरोज (२०१८). भारतीय समाज सरचनात्मक प्रश्न आणि समस्या. श्री. साई नाथ प्रकाशन नागपूर पृ. क्र. १६४
३. शहा घनश्याम, अनुवाद चिकटे प्राची (२००१). भारतातील सामाजिक चळवळी. डायमंड पब्लिकेशन पुणे. पृ. क्र.२०१ ते २०६
४. घारपूरे विठ्ठल (२००६). पर्यावरण शास्त्र. पिपडपूरे ॲन्ड कं पब्लिकेशन नागपूर, दुसरी आवृत्ती. पृ. क्र. ३,४,११
५. पंडित बापट (२०१०). पर्यावरणशास्त्र. साईनाथ प्रकाशन, नागपुर पृ. क्र. १०
६. उमाठे रमेश, ठाकरे रेखा (२०१६).पर्यावरणशास्त्र. विसा बुक्स नागपूर पृ. क्र. २५१.
७. लोटे रा. ज.(२००९).भारतीय समाज आव्हान आणि समस्या. पिंपळापुरे ॲन्ड कं पब्लिशर्स नागपूर. पृ. क्र. १५८

*अशोक मोहरकर कला वाणिज्य कॉलेज, अडयाळ, भंडारा, EMAIL ID :- lalchanraramteke@gmail.com,MOB. NO. 9421808949

***

वनहक्क कायद्याचे समाजशास्त्रीय अध्ययन

*डॉ. रविंद्र विठोबा विखार

गोषवारा :—

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळाल्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजिविकेकरीता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क, निस्तार सारखे हक्क, गावाच्या सिमांतर्गत किंवा सिमेबाहेर पारंपारिकरित्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क, पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे त्यासाठी सामूहिक वन हक्क ग्रामसभांना प्राप्त झाल्यामुळे त्यांना मिळालेल्या जमिनिचा निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिक संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोतांचे संरक्षण पुननिर्माण संवर्धन व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

बीजशब्द :— वनहक्क, वनग्राम, ग्रामसभा, अनुसूचित क्षेत्रे, इ.

प्रस्तावना :—

वन अधिकार कायदा २००६ हा कायदा अधिकृतरित्या 'अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता)' कायदा २००६ या नावाने ओळखला जातो. हा कायदा १८ डिसेंबर २००६ रोजी पास झाला व ३१ डिसेंबर २००७ पासून तो लागू झाला. वन अधिकार अधिनियम हा भारतातील पर्यावरणाचे शाश्वत व्यवस्थापन व स्थानिक लोकसमुहाचे नैसर्गिक साधन संपत्तीवर अधिकार विषयक कायद्यापैकी एक आहे. ५ टक्के पेक्षा जास्त भूभाग जिथे जंगलाने व्याप्त आहे व १५ ते २० टक्के इतक्या अत्यल्प भूभागावर मागास पध्दतीने केली जाणारी शेती आहे अशा जिल्हयांतील लोकांची उपजिविका परंपरेने व यापुढेही वनावरच अवलंबून असणार आहे. अशा वननिवासी समाजात अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम २००६ अंतर्गत सामूहिक वनहक्कांच्या माध्यमातून वनाचे व्यक्तिगत व सामुहिक अधिकार दिले गेले आहेत. परंपरागत वनांचे रक्षण करण्याचा हक्क हा या कायद्यातील हक्कांपैकी महत्वाचा हक्क आहे. (कलम २(१) व कलम ५) या कायद्यामुळे समूहाला कोणत्याही सामूहिक वन संसाधनाचे रक्षण, पुनर्निर्माण किंवा संवर्ध किंवा व्यवस्थापन करता येऊ शकेल. तसेच कोणत्याही जंगलातील झाडे, जैवविविधता, वन्यजीव, पाण्याचे स्रोत इ. चे रक्षण करण्याचे पूर्ण अधिकार त्यात आहेत. समूह त्यांच्या वहिवाटीच्या जंगलाचे तसेच सांस्कृतिक व नैसर्गिक वारसाचे (जसे देवराया, धार्मिक स्थळे इ.) विनाशापासून रक्षण करू शकते. विषमतेवर आधारित व्यवस्थेचा एक भक्कम आधार व्यक्तीगत मालकिची संकल्पना व तिच्या जनमानसाने केलेल्या स्वीकार हा आहे. हा विचार अनेक विचारधारातून आता मान्यता पावला आहे. राष्ट्र राज्यांची मालकी हा व्यक्तीगत मालकीला पर्याय होऊ शकत नाही. हे सुद्धा अनुभवातून आता स्पष्ट झाले आहे. नैसर्गिक संसाधने ही उत्पादनाची प्राथमिक साधने म्हणून गाव किंवा मोहल्ला समाजाची मालकीची असावित व ज्या कुणाला जगण्यासाठी आवश्यक असतील त्यांना सामाजिक लिंग, धर्म, जात, वर्ण, भाषा इत्यादी आधारावर भेदभाव न करता समता व न्याय आधारे प्राथमिकतेने हक्क म्हणून मिळतील अशी व्यवस्था असावी हे सुद्धा आता वैचारिक पातळीवर सर्व मानवी परिवर्तनावादी मानतात पण त्याच वेळेला शेतजमिन या महत्वाचा उत्पादन साधानाच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या ग्रामदानाचा विचार व महाराष्ट्र ग्रामदान अभियान १९६४ कडे सोईस्कररित्या दूर्लक्ष सुद्धा करतात हे विदारक वास्तव आहे.

वनजमिन जगण्याचा आधार असलेले दुसरे महत्वाचे नैसर्गिक संसाधन आहे. सरकारी वनविभागाकडेच् त्याचे व्यवस्थापन व नियंत्रण संपूर्णपणे सोपविण्यात मोठी चुक झाली आहे. गाव समाजाचा व त्यावर स्वामित्व अधिकार व नियंत्रण असेल अशी व्यवस्था असावी. असेही बोलेले जात होते. प्रत्यक्षात मात्र जमिनीवरील अनेक वर्षापासून जगण्यासाठी शेती करण्याच्या व्यक्तीगत मालकी हक्काचे पट्टे मिळाले या मागणीचाच मोठा राजकीय दबाव होता. "अनुसूचित व इतर परंपरागत वननिवासी ध्वनहक्क मान्यता अधिनियम २००६ संसदेने मंजूर केला. भारत का राजपत्र मध्येही ३१ डिसेंबर २००७ रोजी हा कायदा छापून लागू करण्यात आला. त्यांच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, " इंग्रजी वसाहतीच्या काळात किंवा त्यानंतर स्वतंत्र भारतातही वन बंदोबस्त करत असतांना अनुसूचित जमाती व पारंपारिक वननिवासींचे त्यांच्या परंपरागत जमिनी व वास्तव्य असलेल्या भूप्रदेशावरील वनहक्क यांना योग्य प्रकारे मान्यता देण्यात आली नव्हती वन परिसंस्थेचे जिवंत राहणे व टिकून राहणे ज्या अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी त्यांच्यासोबत अविभाज्यपणे जोडले गेले आहेत. त्यांच्यावर त्यामुळे ऐतिहासिक अन्याय झाला आहे. अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वननिवासी यांची वसाहतपूर्व व वसाहत प्रारंभ काळात

जी परंपरागत अवस्था होती. व्यक्तीगत मालकीच्या पट्टयाची व्यवस्था नव्हती. कायद्याच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे वनहक्क संदर्भात झालेला ऐतिहासिक अभ्यास दूर करण्याकरीता या कायद्यात प्रामुख्याने सामुहिक वनहक्कांना मान्यता देण्यासंबंधी तरतूद केली आहे. व्यक्तीगत मालकी मान्यतेची तरतूदी असली तरी तिचे स्थान कायद्याच्या दृष्टीने दुय्यम दिसते. अंमलबजावणीमध्ये मात्र उलटे झाले. सर्व जण व्यक्तीगत हक्काच्या मान्यतेकरीता तुटून पडले व सामुहिक वनहक्काची बाब दुर्लक्षित व अवाच्छनियच राहीली.

व्याख्या :—

वनहक्क :— वनहक्क कायद्यातील कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले वनहक्क. स्वत:च्या उपजिविकेकरीता शेती करण्याचा हक्क, वस्ती करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा निस्तार सारखे हक्क पारंपारिक वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क पाण्यामध्ये मत्स्य व अन्य उत्पादनावरील हक्क, चराई करणे प्रस्तापित व तात्पुरती अशा दोन्ही स्वरूपाची आदिम जमाती समुह आणि कृषिपूर्व समाज यांच्या निवासाचे व निवासस्थानाचे हक्क तसेच सामाजिक धारणा अधिकार विवादस्पद जमीनीवरील किंवा त्या संबंधी हक्क.

वनग्राम :— वनग्राम याचा अर्थ वनीकरणाच्या कामासाठी कोणताही राज्य शासनाच्या वनविभागाद्वारे वनामध्ये स्थापन केलेल्या किंवा आरक्षण प्रक्रियाद्वारे वन ग्राममध्ये रूपांतरीत केलेल्या वसाहती असा आहे आणि त्यामध्ये वनवसाहत, ग्राम निश्चित मागणीच्या धारण जमीनी लागवटीसाठी आणि शासनाने परवानगी दिलेल्या इतर वापरासांठी असलेल्या जमिनीच्या अंतर्भाव असलेल्या ग्रामांसाठी ठेवण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या योग्य वसाहती मग त्या कोणत्याही नावाने ओळखली जात याचा समावेश होतो.

ग्रामसभा :— ग्रामसभा याचा अर्थ गावातील सर्व प्रौढ सदस्याची मिळून बनलेली ग्रामसभा आणि पंचायती नसलेल्या राज्यांच्या बाबतीत पाडे, टोले व अन्य पारंपारिक ग्रामसंस्था आणि महिलांच्या पूर्ण अर्निबंध सहभाग असलेल्या निर्वाचित ग्राम समिती असा आहे.

अनुसूचित क्षेत्रे :— याचा अर्थ संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेली अनुसूचित क्षेत्रे, असा आहे.

पूर्वसंशोधनाचा आढावा :— प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने संशोधकाने यापूर्वी संबंधित विषयावर काही संशोधने, पुस्तके शोधण्याचा प्रयत्न केला असता खालीलप्रमाणे साहित्य मिळाले त्याचा थोडक्यात आढावा या ठिकाणी घेतलेला आहे.

१. **आगलावे प्रदिप, आगलावे सरोज,** भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर या पुस्तकातील वनअधिकार कायदा २००६, वनअधिकार कायद्यातील अधिकार इत्यादिंचा आढावा घेण्यात आलेला आहे.

२. **विखार रविंद्र,** आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, हर्षवर्धन पब्लिकेशन, बिड प्रस्तुत पुस्तकात वनहक्क कायदा २००६ या कायद्यातील महत्वाच्या व्याख्या, उद्देश, प्रकार, वनहक्क समितीची कामे, वनहक्क निश्चित करण्यासाठी पुरावा, वनहक्क मान्य करण्याची प्रक्रिया, वनहक्क धारकांची कर्तव्य, सामूहिक वनहक्क, व्यवस्थापन समितीचे कार्य इत्यादींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दीष्ट्ये :—

१. वनकायद्याची माहिती जाणून घेणे.
२. वनकायद्याची उपयुक्तता समजून घेणे.
३. वनकायदा व आदिवासी विकास यांच्यातील संबंधाची माहिती घेणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :—

१. आदिवासींच्या विकासात वनकायद्याचे योगदान फार मोठे आहे.
२. वनकायद्यामुळे आदिवासींची प्रगती झालेली दिसते.

अध्ययन पद्धती :— प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनांचा आधार घेतला आहे. यात पुस्तके, संपादीत लेख, वर्तमानपत्रे इत्यादींचा आधार घेतलेला आहे.

संशोधनाचे महत्व :—

वनकायदा हा अशा वननिवासी अनुसूचित जमाती व पारंपारिक वननिवासींकरीता केला आहे. ज्यांचे वास्तव्य पिढ्यनपिढ्य जंगलात असूनही त्यांच्या हक्कांची कोणत्याही प्रकारची नोंद घेतली गेली नाही आणि अधिकारांना मान्यता दिली गेली नाही. असे वनहक्क न्यायपणे नोंदवून त्याचे अभिलेख तयार करण्याची रचना निर्माण करून त्यासाठी आवश्यक अशा विविध पुराव्यांचे स्वरूप सुनिश्चित करण्याची हमी हा कायदा देत आहे. वनहक्कांमध्ये संसाधनाचे शाश्वत वापरासाठीचे अधिकार व जबाबदारी यांचा समावेश होतो. तसेच वापराच्या क्षेत्रातील जैवविविधतेचे संरक्षण व पर्यावरणाचे संतुलन

राखण्याच्या दृष्टिने संवर्धन करण्याचे अधिकार गाव समाजाला देऊन वन क्षेत्राची विकास प्रक्रिया मजबूत केली आहे. त्याचवेळी त्यात सहभागी असलेल्या स्थानिक जनतेची उपजिविका व अन्न सुरक्षा यांची खात्री हा कायदा देत आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासींचे त्यांच्या परंपरागत जमिनी व वास्तव्य असलेल्या भूप्रदेशावरील वनहक्क व ब्रिटीश वसाहत काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळातही झालेले बंदोबस्त व इतर धोरणात योग्य प्रकारे मान्य केल्यामुळे या वननिवासीवर ऐतिहासिक अन्याय झाला आहे. कारण वननिवासींचे जीवनच मुळी 'वन' या पर्यावरणीय परिसंस्थेच्या अस्तित्वाशी व त्यांच्या टीकावू विकासाशी एकत्र झालेले आहे. केवळ लोकांचा व शासनयंत्रणेचा सर्व भर हा फक्त वैयक्तिक जमिनीच्या (पट्टा) दाव्यावर आहे. पण हे केवळ त्यापुरतेच मर्यादित आहे.

जे पिढ्यानपिढ्या वनांमध्ये राहतात परंतु ज्यांच्या हक्काची नोंद होऊ शकली नाही असा वनवासी अनुसूचित जनजाती आणि इतर पारंपारिक वनवासी यांच्या वनहक्कांना व जमिनीवरील त्यांच्या भोगवट्यास मान्यता देण्यासाठी आणि असे वनहक्क व भोगवटा त्यांच्याकडे विहित करण्यासाठी अशा प्रकारे विहित केलेल्या वनहक्कांची नोंद करण्यासाठी मुलभूत कार्यपद्धतीच्या आणि वनसमिती संदर्भातील अशा वनहक्कांच्या मान्यतेसाठी त्यांची निहिती करणासाठी आवश्यक असलेल्या पुराव्याचे स्वरूप या करीता तरतूद करण्यासाठी हा अधिनियम आहे. समूदायास कायदेशीररित्या संरक्षणाचा कोणताच अधिकार नव्हता. ३१ डिसेंबर २००७ पासून या कायद्याच्या कलम ५ अन्वये समूहांना हे हक्क प्राप्त झाले ग्रामसभा सामूहिक वनसंसाधनाचे वन्यजीवन, वने व जैवविविधता वापरासाठी मुभा व रक्षण व वापरासंबंधीचे नियम करू शकते आणि या नियमांचे पालन होत नसल्यास, ग्रामसभेला योग्य ती पावले उचलण्याचे अधिकारही आहेत (कलम ५ (ड), म्हणूनच जर वन विभागालादेखील गुरेचारण जमीन किंवा सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड करायची असेल तर, या सामूहिक वनसंसाधनावर असलेले अधिकार समूहाचे आहेत असे म्हणून ग्रामसभा हे काम थांबवू शकतात जंगल जर खाण किंवा इतर याचा अर्थ वनविभाग किंवा सरकार किंवा जंगल लुटारूंनी काहीही ठरवले तरी गाव समूह त्याला विरोध करून गाव समूहाचे निर्णय अमलात आणू शकतात आणि त्याच्या जंगलाचे रक्षण करू शकतात.

तथ्याचे विश्लेषण :—

प्रस्तुत तथ्यांचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, वनहक्क कायद्यामुळे आदिवासींना वनकायद्यासंदर्भातील नवे हक्क प्राप्त झाले. मूळनिवासी म्हणून मानले जाणारे आदिवासीच या वनहक्कांपासून वंचित होत होते मात्र या वनहक्क कायद्यामुळेच आदिवासींना वनहक्क व अधिकार मिळालेत हे या कायद्याची महत्वाची उपलब्धी आहे.

वन अधिकार कायद्यांमध्ये सेक्शन ३ (१) अंतर्गत आदिवासींना पुढील अधिकार देण्यात आले आहेत.

i) निवासाकरीता व्यक्तिगत किंवा सामान्य व्यवसायाच्या निमित्ताने वनभूमीत राहणे किंवा राहण्याचा अधिकार एक सदस्य किंवा वनात निवास करणाऱ्या अनसुचित जमाती किंवा अन्य पारंपारिक वननिवासी सदस्यांद्वारे उदरनिर्वाहाकरीता शेती करणाऱ्यांना अधिकार मिळालेला आहे.

ii) जमिनदार, रियासतदार किंवा असे मध्यस्थ जे पूर्वी शासनामध्ये उपयोगात आणले जात होते. तेथे सामुदायिक अधिकार या कायद्यामुळे राहणार नाहीत.

iii) वनातील लोकांना गौण वनोत्पादन गोळा करणे, उपयोग करणे किंवा त्या निकालात काढणे, ज्यास परंपरागत रूपात गावाच्या सीमाच्या आत किंवा बाहेरून एकत्र करण्यात आलेय या सर्वांचा मालकी हक्क प्रदान करण्यात आलेला आहे. यामध्ये झाडांच्या उत्पत्तीचे सर्व गैर लाकूड उत्पादनाचा समावेश केलेला आहे.

iv) मासोळी, जलनिकासाचे अन्य उत्पादन, कुरण आणि पारंपारिक हंगामी संसाधनांचा उपयोग इत्यादींचे सामुदायिक अधिकार अधिकृत करण्यात आले आहे.

v) आदिवासी जमाती समूह आणि पूर्व कृषी समुदायांवर निवास आणि आवासाचे सामुदायिक कार्यकाळासहित अधिकार बहाल करण्यात आलेले आहे.

vi) कोणत्याही राज्यात कोणत्याही नावाच्या अंतर्गत विवादित जमीन जेथे विवाद केला जातो. त्या संबंधीचे अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहेत.

vii) कोणत्याही स्थानिय परिषद किंवा कोणत्याही राज्याद्वावरा दिलेल्या वनजमिनीच्या संदर्भात दिलेला पट्टा, लीज यात परिवर्तन करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

viii) जी गावे महसूल गावात अंतर्भूत अधिसूचित असो अगर नसो जंगलातील सर्व वन ग्राम, जुने आवास, असुरक्षित गाव आणि अन्य गावांचा निपटारा आणि रूपांतराचा अधिकार देण्यात आला.

ix) जे गावे वन संसाधनाचा सतत उपयोगात परंपरागत रूपात रक्षा आणि संरक्षण करीत आहेत. वन संसाधनास संरक्षित, पुनर्जिवित किंवा व्यवस्थापन करण्याचा अधिकार समुदायास देण्यात आला.

x) अधिकार, जो कोणत्याही राज्याच्या कायदा किंवा कोणत्या स्वायत्त जिल्ह्याच्या कायद्याअंतर्गत मान्यताप्राप्त आहे. परिषद किंवा स्वायत्त क्षेत्रीय परिषद किंवा ज्यास कोणत्याही राज्याच्या संबंधित जमातीच्या पारंपारिक किंवा पारंपारिक कायद्याच्या अंतर्गत आदिवासी जमातीच्या अधिकाराच्या रूपात स्वीकार केले जातात.,

xi) जैव विविधता आणि बौद्धिक संपदाचे सामुदायिक अधिकार आणि जैव विविधता आणि सांस्कृतिक विविधतेशी संबंधित पारंपारिक ज्ञानापर्यंत पोहोचविण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

xii) जंगलातील निवास अनुसूचित जमाती किंवा अन्य पारंपारिक वननिवासीद्वार पारंपारिक रूपात उपभोग घेतल्या जाणारा अधिकार ज्याचा उल्लेख कलम घ ते घघ मध्ये नाही. परंतु त्या अधिकारांमधून शिकारीचा अधिकार, वन्य प्राण्यांच्या कोणत्याही प्रजातींच्या शरीराचा भाग काढण्याचा अधिकार वगळण्यात आला.

निष्कर्ष :–

अलिकडे पर्यावरणवादी ज्यांना वने आणि वनसंसाधने हे आदिवासींपासून वेगळे हवे आहे आणि सहकार जगतातील औद्योगिक घराणे, ज्यांचे लक्ष्य खनिज संपत्ती व वनातील इतर लोकांवर आहे. या दोघांनिही वनाधिकार्यांशी संगणमत केले त्यामुळे आदिवासी लोकांचे शोषण, त्यांचे दु:ख आणि त्यांना जबरदस्तीने जंगलातून निष्कासित करणे या घटनामध्ये प्रचंड वाढ झाली. तर दुसरीकडे लाकूड माफियांनी वनाधिकार्यांशी संगनमत करून प्रचंड प्रमाणात लाकूडतोड केली. परिणामत: जंगले उजाड झाली. या सर्व परिस्थितीमुळे आदिवासींचे प्रचंड शोषण झाले. त्यांच्या उपजिविकेचे परंपरागत साधन नष्ट झाले. नक्षलवाद्यांनी जंगलात राहणार्या आदिवासींच्या शोषणाचा मुद्दा समोर करून आदिवासी लोकामध्ये आपली चळवळ वाढविली. या सर्व गोष्टींचा विचार करून भारत शासनाने आदिवासी लोकांना कायदेशीर संरक्षण प्राप्त करून देण्यासाठी वन अधिकार कायदा, २००६ पास केला. या कायद्यामुळे आदिवासींना वनहक्क प्राप्त होऊन वनहक्काची माहिती व उपयुक्तता कळू लागली. तसेच या कायद्यामुळे आदिवासींच्या विकासात महत्वाचे पाऊल उचलले गेले. हे या कायद्याची उपलब्धी आहे असे म्हणावेसे वाटते.

शिफारशी :–

१) ग्रामसभेला वनहक्कांच्या संदर्भात अधिकार देणे गरजेचे वाटते.

२) वनहक्कांच्या संदर्भात आदिवासींना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे.

३) वनहक्कांची कायद्यासंदर्भात आदिवासींना माहिती द्यावी.

४) पर्यावरण बचाव संदर्भात आदिवासींना माहिती द्यावी

५) वनातून मिळणारे विविध वस्तुंचे पक्क्या भावात रूपांतर करून त्या वनातील वस्तूंचा फायदा आदिवासींना व्हावा. उदा. मध गोळा करून विकणे, मोहाचे बिस्कीटे, चॉकलेट तयार करण्याकरीता देणे.

संदर्भ :–

- आगलावे, प्र., सरोज, आगलावे. (२००८). *'भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न आणि सामाजिक समस्या'*, नागपूर. श्री साईनाथ प्रकाशन.
- विखार, र. (२०२०). *सामान्य संशोधन पद्धती भाग –२*, बीड. हर्षवर्धन पब्लिकेशन.
- कर्हाडे, बी. (२०११). *शास्त्रीय संशोधन पद्धती*, नागपूर. पिंपळापूरे ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स.
- उपविभागीय कार्यालय,(२०१८). *वनहक्क व पेसा कायदा माहिती पुस्तीका*, राळेगांव.
- महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग १७ फेब्रुवारी २०११.
- मधुकर आणि इतर (२०१०), *कहाणी यशस्वी सामूहिक वनहक्क दाव्याची*, पुणे. आदिवासी संशोधन केंद्र, एनकॅस.
- विधी व न्यायमंत्रालय (२०१६). अनुसूचित जनजाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम २००६. संचालक मुद्रण व लेखन सामुग्री, महाराष्ट्र शासन.
- www-vikaspedia-

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा जि. गडचिरोली (महाराष्ट्र)

ई–मेल : ravindravikhar11@gmail.com,मो. नं. 9420304261

***

वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास

*प्रा. डॉ. प्रदीप दाजीबा पाटील

गोषवारा :

'वृद्धांचे विज्ञान' (जेरेन्टाॅलाॅजी) हे अलीकडील काळात वृद्धांच्या जीवनाचा चिकित्सक अभ्यास करणारे शास्त्र म्हणून पुढे आले आहे. समाजातील वृद्ध, म्हातारी व्यक्ती, सेवानिवृत्त, ज्येष्ठ नागरिक, वृद्धापकाळाने जर्जर झालेल्या व्यक्ती या सर्व प्रकारच्या व्यक्तींचा "वृद्ध" या संकल्पनेत समावेश होतो. खऱ्या अर्थाने जीवशास्त्र, मानसशास्त्र, शरीरशास्त्र आणि समाजशास्त्र या चार शास्त्रांचा वृद्धांच्या जीवनाशी घनिष्ठ संबंध येतो. वृद्धांचे इतरांशी असणारे संबंध व त्यातून निर्माण होणारे ताण-तणाव आणि त्यांचे आरोग्य यांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. 'वृद्धांचे आरोग्य' ही एक संवेदनशील बाब ठरते. वाढत्या वयाबरोबरच वृद्धांच्या शरीरात होणारे बदल नैसर्गिक रोग, अपंगत्व व शारीरिक व्याधीचे प्रमाण वाढलेले असते. वैज्ञानिक व यांत्रिक प्रगतीमुळे घरातील व घराबाहेरील कामे यंत्राच्या साह्याने केली जाऊ लागल्याने वृद्धांची मदत घेतली जात नाही. त्यामुळे वृद्ध एकाकी पडलेले दिसतात. एक 'दुर्लक्षित घटक' म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यातूनच वृद्धांमध्ये नैराश्य, न्युनगंड, ताण-तणाव वाढत जातात. परिणामी, वृद्धांच्या शारीरिक,व मानसिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. परावलंबी जीवन वाट्याला आल्याने वृद्धांच्या आरोग्याची समस्या गंभीर बनते. केवळ वृद्धाश्रम स्थापन करून वृद्धांच्या समस्या सुटणार नाहीत, तर लहानपणापासून सर्वांचेच योग्य सामाजीकरण होणे गरजेचे आहे.

प्रस्तावना :

'वृद्धत्व' ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील एक अटळ बाब आहे. परंतु अलीकडे कौटुंबिक विघटनातून वृद्धांच्या समस्येत वाढ झाली आहे. जगभरातील विविध देशांमध्ये वृद्धांच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक व आरोग्य विषयक समस्या गंभीर स्वरूपाच्या बनल्या आहेत. आधुनिक काळात वैद्यकशास्त्रातील लक्षणीय प्रगती आणि अद्ययावत औषधोपचाराची सहज व त्वरित उपलब्धता, यामुळे मृत्यू- दरात घट आणि सर्वसामान्य आयुर्मानात वाढ झाल्याने वृद्धांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे . 1999 च्या जनगणनेनुसार भारतात सरासरी आयुर्मान 58 वर्ष होते. त्यामुळे इ.सन.2000 साली 60 ते 74 या वयोगटातील स्त्री पुरुषांची संख्या एकूण लोकसंख्येच्या 5.6 % होती. आज कौटुंबिक विघटन व चंगळवादी संस्कृतीच्या प्रभावामुळेही वृद्धांच्या समस्या बिकट होत आहेत. विशेषतः आर्थिक दृष्ट्या दुर्बल व परावलंबी असलेल्या वृद्धांचे पालनपोषण, उदरनिर्वाह, वैद्यकीय खर्च हे प्रश्न गंभीर बनत आहेत. सेवानिवृत्तीनंतरची बदललेली जीवनशैली व आर्थिक उत्पन्नातील घट, याचा परिणाम वृद्धांच्या मानसिक आरोग्यावर होऊ लागला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे व नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण व ज्ञान झपाट्याने आकलन करणे वृद्धांना कठीण जात असल्याने अनेक क्षेत्रात वृद्धांच्या वाट्याला दुर्लक्ष व उपेक्षाच येते. त्यातून निराशा, वैफल्यग्रस्तता बळावत जाते. पूर्वीचे **"कुटुंबप्रमुख"** म्हणून असलेले स्थानही आज डळमळीत झाल्याने मानसिक दुरावा, विसंवाद वाढत जाऊन भावनिक ताण- तणाव वाढत चालले आहेत. त्यामुळे वाढत्या वयाबरोबरच वृद्धांच्या शारीरिक, मानसिक व्याधी व आरोग्यविषयक समस्यांत लक्षणीय वाढ झाली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

शोध निबंधाची उद्दिष्टे:

1. वृद्धावस्था ही संकल्पना स्पष्ट करणे.
2. वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्यांचे विश्लेषण करणे.
3. वृद्धांच्या समस्येवरील उपाय सुचविणे.

शोध निबंधाची गृहीतकृत्ये:

1. वृद्धांच्या समस्येचे मूळ हे समाज मूल्यांतील बदलत आहे.
2. कौटुंबिक विघटनातूनच वृद्धांचे शारीरिक- मानसिक आरोग्य बिघडते.
3. 'पाश्चात्यांचे अंधानूकरण' हे वृद्धांच्या समस्येला कारणीभूत ठरते.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला असून त्यासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. विविध संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे व संकेतस्थळांवरील उपलब्ध माहितीचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन:

"वृद्धावस्था" - एक संकल्पना:

जैविकदृष्ट्या 'वृद्धावस्था' ही एक प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील अपरिहार्य व अटळ अशी अवस्था आहे. 'समाजकार्य विश्वकोशा'मध्ये व्यक्तीच्या जीवनातील अंतिम कालखंड म्हणजे वृद्धावस्था होय. असे म्हटले आहे. तसेच हिंदू जीवन पद्धतीमध्ये व्यक्ती जीवनातील शेवटचा कालखंड म्हणजे वृद्धावस्था होय, असे म्हटले जाते. प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते. वृद्धावस्थेमध्ये व्यक्ती शारीरिक, मानसिक व बौद्धिकदृष्ट्या कमकुवत होत जाते. म्हणून जेव्हा एखाद्या व्यक्तीची शारीरिक, मानसिक व बौद्धिक क्षमता सतत कमी होत जाते तेव्हा त्या व्यक्तीला 'वृद्ध' असे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे वयाच्या साठ वर्षानंतर व्यक्तीला 'वृद्ध' असे म्हटले जाते.

'एलिझाबेथ हरलाॅक'च्या मते - 'वृद्धावस्था' हा मानवी जीवनातील शेवटचा चरण आहे. तर **'हेन्सी आणि क्युमिंग'** यांच्या मते - 'जीवनातील उपयोगी आणि अभिलाषा असणाऱ्या आरंभीच्या अवस्थेपासून दूर जाण्याच्या प्रक्रियेला वृद्धावस्था असे म्हणतात.' म्हणजे 'प्रौढ व्यक्तीच्या जीवनातील अंतिम कालखंड' असाच त्याचा अर्थ व्यक्त होतो. व्यक्तीचे आयुर्मान, राहणीमानाचा दर्जा, आरोग्य, हवामान, कार्यक्षमता इत्यादी बाबत सर्व देशातील स्थिती समान नाही. म्हणून प्रत्येक देशांत वृद्धावस्थेचा प्रारंभ वयाच्या कोणत्या वर्षी होतो, याबाबत विचारवंतांमध्ये मत भिन्नता असल्याचे आढळून येते. विशेषत: भारतामध्येही व्यक्तीच्या सेवानिवृत्तीच्या वयामध्ये असमान स्थिती असल्याचे दिसते. त्यामुळे वृद्धावस्थेचा प्रारंभ नेमका कोणत्या वर्षी होतो, हे निश्चित करणे कठीण काम आहे असे म्हणता येईल.

औद्योगिक समाजात विविध क्षेत्रांमध्ये पदावर कार्य करणाऱ्या व्यक्तीसाठी सेवानिवृत्ती ही सक्तीची असते. सेवानिवृत्तीमुळे व्यक्तीच्या कौटुंबिक, शारीरिक, मानसिक व सामाजिक जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून येतात. अर्थार्जन नसल्यामुळे किंवा अल्प प्रमाणात मिळणाऱ्या निवृत्ती वेतनामुळे वृद्धांचे जीवन हलाकीचे बनते. वाढत्या वयामुळे उद्भवणाऱ्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या प्रश्नांसाठी दुसऱ्यांच्या हाताकडे पहावे लागते. परावलंबित्वामुळे कुटुंबात ताण - तणाव वाढतात. परिणामी वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. कुटुंब विघटन, समाज मूल्यांतील बदल, वाढते औद्योगीकरण व नागरिकरण, दोन पिढ्यांतील संघर्ष हे सर्व घटक वृद्धांच्या समस्येला कारणीभूत ठरत असलेले दिसून येतात.

वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्या:

जगभरातील विविध देशातील वृद्धांच्या समस्येत तफावत आढळते. वृद्धावस्थेत शारीरिक कमजोरी व वैयक्तिक अस्वस्थता वाढत जाते. त्यामुळे वृद्धांना वेगवेगळ्या शारीरिक व मानसिक समस्यांना तोंड द्यावे लागते खरे तर वृद्धत्व ही व्याधी नसून फक्त शरीरातील अवयवांची कार्यक्षमता कमी झालेली असते. हे समजून घेतले पाहिजे. वृद्धावस्थेत व्यक्तीला कमी ऐकू येणे, दात पडणे, हातापायांना कंप सुटणे, शरीरावर सुरकुत्या पडणे, पचनक्रिया बिघडणे, मलमूत्र विसर्जनाचा त्रास होणे, एकाकीपणाची भावना वाढणे, नवीन गोष्टी शिकण्याची इच्छा कमी होणे, विस्मरण होणे, 'कुटुंबाला आपला कोणताच फायदा नाही' असे वाटणे, 'आपल्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.' असे वाटणे. 'आपला सल्ला घेतला जात नाही' असे वाटणे, न्यूनगंड, वैफल्यग्रस्तता अशा शारीरिक व मानसिक समस्या निर्माण होत असतात. परिणामी वृद्धांमध्ये चिडखोरपणा, क्रोध, वाढीस लागतो. कौटुंबिक संबंधात ताण तणाव निर्माण होतात व त्यातून वृद्धांचे आरोग्य बिघडत जाते. कॅन्सर, हृदयविकार, मधुमेह, दमा,अस्थमा, आतड्यांचे आजार, मूत्रपिंडांचे विकार, मोतीबिंदू व इतर नेत्र विकार, किडनीचे विकार इत्यादी आजारामुळे वृद्ध व्यक्ती अंथरुणावर खिळून पडलेले असतात. त्यातील काही जण मृत्युमुखी देखील पडतात. भारतीय समाजात स्त्रियांपेक्षा पुरुषांतील मृत्यूचे प्रमाण अधिक आढळते. काहींच्या वैयक्तिक जबाबदाऱ्या पूर्ण झालेल्या नसतात. त्यांना वृद्धापकाळ अतिशय क्लेशदायक ठरतो. त्यातून त्यांचे आरोग्यांचे प्रश्न निर्माण होतात.

याशिवाय वृद्धांची संवेदनशक्ती, स्मरणशक्ती कमी होते. वृद्धापकाळांमुळे त्यांच्या आकलनशक्तीवरही परिणाम होतो. 'आता काय करायचे आहे, समजून घेऊन' अशी त्यांची वृत्ती बनते. आपल्या जुन्या मतांना ते चिकटून राहतात. तार्किक विश्लेषण न करता असंबंध बडबडतात. हट्टीपणा, आग्रही भूमिका, आतातायीपणा हेकेखोरपणा वाढत जातो. त्यामुळे त्यांचा कौटुंबिक जीवनावर विपरीत परिणाम होतो. जुनी पिढी व नवी पिढी यांच्यातील संघर्षामुळे अनेक शारीरिक, मानसिक व आरोग्य विषयक समस्या निर्माण होतात. वृद्ध लोकांच्या आरोग्यातील काही फरक अनुवंशिक असले तरी बहुतेक लोकांच्या शारीरिक आणि सामाजिक वातावरणामुळे त्यांचे आरोग्य बिघडलेले दिसून येते. वृद्धावस्थेमध्ये व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक शक्तीचा ऱ्हास होत असतो. आर्थिकदृष्ट्या ते परावलंबी बनतात. वृद्धावस्थेत वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक पाठबळ गरजेचे असते परंतु आर्थिक परावलंबनामुळे मानसिक ताण वाढत जातो. तुटपुंज्या निवृत्तीवेतनामुळे तर वृद्धांची अवस्था फारच दयनीय होत असते. अपुऱ्या वैद्यकीय सुविधेमुळे वृद्धांचे आरोग्य खालावलेले असते. त्यामुळे असंख्य अशा आरोग्यविषयक समस्यांना वृद्धांना तोंड द्यावे लागत असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष:

1. कुटुंब विघटन टाळणे हा वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्येवर प्रभावी उपाय ठरू शकतो.
2. वृद्धांनी आपले शारीरिक व मानसिक संतुलन राखून कुटुंबीयांशी जुळवून घेतल्यास समस्या निर्माण होणार नाहीत.
3. भारतात वृद्धांच्या समस्यांवर अध्ययन व संशोधने सतत सुरू ठेवल्यास वृद्धांचे कल्याण साधता येईल.

वृद्धांच्या समस्येवरील उपाय / शिफारसी:

वृद्धांच्या आरोग्यविषयक व इतर समस्या दूर करण्यासाठी पुढील काही उपाय किंवा शिफारसी सुचविता येतील.

1. वृद्धांना निवृत्तीवेतन मिळवून देणे.
2. वृद्ध कल्याण कार्यक्रमाची व्यापकता वाढविणे.

3. वृद्धांना मेडिकेअर योजनेखाली औषधोपचार, वैद्यकीय सेवा सुविधा व वैद्यकीय विमा संरक्षण मिळवून देणे.

4. सक्षम वृद्धांना समाज उपयोगी कामे वेतनासह देण्यात यावीत.

5. वृद्ध व्यक्तीसाठी आरोग्य सेवा कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना शासनाच्या केंद्रीय समाज कल्याण मंडळाकडून व राज्य शासनाकडून अर्थसाह्य व अनुदान दिले जावे.

समारोप:

अशा प्रकारे आधुनिक काळामध्ये भारतीय समाजात वृद्धांच्या विविध समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून शासनाने त्याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. केवळ वृद्धाश्रमाची निर्मिती करून वृद्धांचे प्रश्न व समस्या सुटणार नाहीत तर त्यासाठी शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत. समाजात योग्य सामाजिकरणाची प्रक्रिया गतिमान करणे, नैतिक मूल्यांची जोपासना करणे, वृद्धांना अर्थसाह्य करणे, वैद्यकीय सेवा सुविधा पुरविणे, इत्यादीकडे लक्ष दिल्यास वृद्धांच्या समस्या निर्माण होणार नाहीत असे म्हणता येईल.

संदर्भ ग्रंथ सूची:

- काळदाते, सु. (1998). *भारतातील सामाजिक समस्या.* नागपूर, पिंपळापुरे पब्लिशर्स.
- खैरनार, दि. (2015). *वृद्धांच्या समस्या: चिंता आणि चिंतन.* औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन.
- लोटे, रा. (2019). *सामाजिक समस्या.* नागपूर, पिंपळापुरे पब्लिशर्स.
- पाटे, सु. (2002). *सामाजिक समस्या.* नागपूर, विद्या प्रकाशन.
- खडसे, भा. (2001). *भारतीय सामाजिक समस्या.* नागपूर, विद्या प्रकाशन.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा. धाराशिव, Mo. 9421374284

***

विकासनिर्मित सीमांतीकरण व विस्थापनाची समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास

*डॉ.अनिल म्हाळाप्पा गाडेकर

गोषवारा :

विकास आणि विस्थापन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत भारतात स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच विस्थापितांचे विविध प्रश्न निर्माण झाल्याचे दिसून येतात- म्हैसूर आणि आंध्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमानाने उभ्या राहिलेल्या तुंगभद्रा सिंचन प्रकल्पासाठी 63 खेड्यातील जवळपास चार हजार लोकांना विस्थापित व्हावे लागले तर, पश्चिम बंगालमधील दामोदर खोरे योजनेमुळे 32 खेड्यातील जवळपास 4500 कुटुंबातील 93 हजार लोक विस्थापित झाले आहेत. ओरिसातील रुरकेला पोलाद प्रकल्पासाठी 32 गावातील पहजार 15590 लोकांना विस्थापित व्हावे लागले- रांची येथील यंत्र निर्मितीच्या विकासात्मक प्रकल्पासाठी 25 गावातील लोकांना विस्थापित व्हावी लागले- स्वातंत्र कालखंडात भारताच्या कोळसा व युरेनियम खाणीद्वारे उत्खनन सुरू झाले. झारखंड राज्यात 226 कोळसा खाणी आहेत तज्ञाच्या मते, ओपन कास्ट माईन्स मध्ये मोठ्या प्रमाणात जमिनी जातात त्यामुळे तेथील लोक विस्थापित होतात- नागपूर जवळ उमरेड, पिंपळा खापरखेडा व सावनेर इत्यादी ठिकाणी कोळसा, मॅगनीच्या खाणीमुळे हजारो लोक विस्थापित झाले आहेत- बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात 350 विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करून विकासात्मक प्रकल्पाच्या नावाखाली हजारो एकर जमिनी ताब्यात घेतल्या आणि लाखो लोकांना विस्थापित व्हावी लागले त्यातूनच विकास निर्मित वंचित व उपशिक्षित समूहाची निर्मिती होऊन सीमांती करण्याची प्रक्रिया गतिशील होऊ लागली आहे- त्यामुळेच आज विकासनिर्मित सीमांतिकारक व विस्थापन या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे कमी प्राप्त ठरते-*

मुख्य शब्द (keywords)- विकास, सीमांतिक समूह, सीमांतीकरण, विस्थापन, प्रकल्प, पुनर्वसन, जमीन अधिग्रहण, स्थलांतर, भरपाई, मोबदला, विशेष आर्थिक क्षेत्र, दुर्बल घटक, उद्योगाच्या समस्या इत्यादी-

प्रस्तावना

ग्रामीण जीवनाशी संबंधित अनेक समस्यांपैकी आज सीमांतिकरणाच्या प्रक्रियेस चालना देणाऱ्या विकासात्मक प्रकल्पा मुळे निर्माण झालेली विस्थापन आणि पुनर्वसनाची समस्या उग्ररूप धारण करत आहे- विकासात्मक प्रकल्प आणि विस्थापनतून निर्माण झालेल्या पुनर्वसनाच्या समस्या मुळे ग्रामीण भागात सीमांतिकरणाची प्रक्रिया निरंतर चालू आहे. ग्रामीण समाजातील दुर्बल व वंचित घटकांच्या सद्यस्थितीत ही समस्या मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आज विविध विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून खेड्यातील सर्व दुर्बल घटकांची स्थिती सुधारली पाहिजे असा अशी रास्त अपेक्षा व्यक्त केली जाते- तर दुसरीकडे अनेक विकासात्मक प्रकल्पाच्या नावाखाली ग्रामीण भागातील सीमांतिक समूहाचे जीवन व संसार उघड्यावर येत आहे. ग्रामीण समाजातील वंचित व सीमांतिक समूहाचे दारिद्रय़, विकास कार्यक्रमातील दोष, प्रभावी व बलशाली गटांच्या गुंडगिरी वागणुकीमुळे वंचित व उपेक्षित लोकांची जी परिस्थिती निर्माण होत आहे, त्यालाच सर्वसाधारण शब्दात आपण सीमांतीकरण म्हटले जाते. वंचित व उपेक्षित ग्रामीण समूहाचे सीमांतीकरण हे खऱ्या अर्थाने परावलंबन व शोषणाचा एक प्रकार आहे, ज्यामध्ये दुर्बल समाजाला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या दूर ढकलले जाते- त्यातून तो अधिक दृष्ट्या दुर्बल व सामाजिक दृष्ट्या उपेक्षित बनतो. ज्याला

समजत नाही की कोणत्या दिशेने पुढे गेल्याने तो आपल्या इच्छित स्थानावर पोहोचू शकतो. बहुतांश समाजशास्त्रज्ञांचे असे मत आहे की, सध्याच्या युगातील ग्रामीण जीवनाशी निगडीत उपेक्षितपणाची ही स्थिती प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या विकासाच्या प्रक्रियेचा परिणाम आहे. खरे म्हणजे जेव्हा ग्रामीण विकासाशी संबंधित विविध प्रयत्न केले जातात, तेव्हा काही गटाला किंवा समूहाला त्याचा फायदा होतो, तर इतर अनेक समूहांना स्वावलंबनापासून वंचित ठेवून आश्वासनाच्या आधारावर जीवन जगण्यास भाग पाडले जाते, म्हणून सीमांतीकरण ही विकासातून निर्माण झालेली समस्या आहे असे म्हणता येईल-

आज ग्रामीण विकासाचे प्रश्न जसजसे वाढत आहेत, तसतसे ग्रामीण जीवनातील विस्थापनाची समस्याही गंभीर स्वरूप धारण करत आहे, म्हणून हा सर्व सुविधांपासून वंचित समाज सीमांतिकरणाकडे वाटचाल करत आहे ही विडंबना आहे असे म्हणावे लागेल. सामान्य लोकांचे जीवनमान उंचावणे आणि लोकांना अशा सुविधा उपलब्ध करून देणे हा विकासाचा उद्देश असावा- ज्याच्या मदतीने ते सामाजिक-आर्थिक क्षेत्रात पुढे जाऊ शकतील. सध्याच्या युगात वैज्ञानिक प्रगती आणि तंत्रज्ञानाच्या विकासाच्या जोरावर कृषी उत्पादन, वाहतूक, दळणवळण, सिंचन आणि दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न सुरू झाले आहेत. त्यामुळे कृषी उत्पादन आणि दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे. परंतु ग्रामीण भागातील लोकसंख्येचा मोठा हिस्सा हा आपल्या मूळ कुटुंब आणि शेत जमिनीपासून वंचित होऊ लागला आहे. नियोजन कर्त्याचा हा विचार आहे की आपल्या शेतजमिनी पासून वंचित होणारे लोक आर्थिक मोबदला व नुकसान भरपाई मिळाल्यामुळे ते ताबडतोब स्वतःसाठी उपजीविकेचे साधन व निवाराचे व्यवस्था प्राप्त करून घेतील- विस्थापित लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी ही शासनाद्वारे अनेक योजना निर्माण केल्या आहेत- एवढे असूनही विकास कार्यामुळे विस्थापित होणाऱ्यांची संख्या व त्यातून निर्माण होणारी बेरोजगारी यामुळे नागरी भागाकडे होणारे स्थलांतर व गलिच्छ वस्तीमध्ये होणारी वाढ ही विकासनिर्मित सीमांतिकारणच्या समस्येचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मूल्यांकन होणे आवश्यक आहे- विकासात्मक सीमांतिकरण व विस्थापनाची समस्या समजून घेण्यासाठी त्याच्याशी संबंधित कारणे व परिणामांचा अभ्यास करणे गरजेचे आहे-

उद्दिष्टे:

1. सीमांतीकरण व विस्थापन संकल्पना समजून घेणे-
2. सीमांतीकरण व विस्थापनाच्या समस्येच्या अभ्यास करणे-
3. सीमांतीकरण व विस्थापनाच्या समस्येवरील उपाय सुचविणे-

गृहीतके:

1. विकासात्मक प्रकल्प निर्मित सीमांतीकरण व विस्थापनाच्या समस्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे-
2. सीमांतीकरण व विस्थापनाच्या समस्येचा समाजशास्त्र दृष्टिकोनातून अभ्यास करणे गरजेचे आहे-
3. सीमांतीकरण व विस्थापन समस्येचे तीव्रता कमी करणे आवश्यक आहे-

संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा आधार घेण्यात आला आहे- त्यात दुर्मिळ संदर्भ ग्रंथ क्रमिक पुस्तके मासिके वर्तमानपत्रे व इंटरनेट वरील माहितीचा समावेश आहे- सदर माहितीच्या आधारे प्रस्तुत शोधनिबंधाचे वर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे-

सिमांतीकरण व विस्थापन संकल्पनेचा अर्थ:

सीमांतीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, जी काही विशिष्ट परिस्थितींच्या प्रभावामुळे हळूहळू विकसित होत असून ती विकास आणि परिवर्तनाचh नकारात्मक बाजू आहे. याचा अर्थ असा की जेव्हा विकासाचे प्रयत्न करूनही धोरणे सदोष असतात किंवा दुर्बल समूहाच्या स्वतःच्या असमर्थतेमुळे प्रत्यक्ष विकासाच्या लाभापासून वंचित होऊन अभावग्रस्त व तिरस्कारयुक्त जीवन जगण्याच्या प्रक्रियेस सीमांतीकरण असे म्हटले जाते-

सीमांतिकरणाची संकल्पना समजून घेण्यासाठी ^सीमांत व्यक्ती* चा अर्थ समजून घेतल्यास सुलभता जाऊ शकते- सीमांत व्यक्तीच्या संदर्भात रॉबर्ट पार्क ने समाजशास्त्रात सर्वप्रथम विचार मांडले आहे- **रॉबर्ट पार्क** च्या मते, ßद्विधा मनस्थितीमुळे स्वतःबद्दल निर्णय घेऊ न शकणाऱ्या व्यक्तीला सीमांतिक किंवा उपेक्षित व्यक्ती असे म्हणतात-Þ तर **एम.शेरीफ** यांनी सीमांतिक व्यक्तीच्या संदर्भात म्हणतात की -^एक सीमांत व्यक्ती अशी आहे जी आपल्या समूहाच्या मूल्यांनुसार जीवन जगत असताना, विविध प्रकारच्या वंचिततेमुळे, इतर गटांची मूल्ये स्वीकारण्यास सुरुवात करते, जरी तो त्यांना पूर्णपणे आत्मसात करण्यास अक्षम पक्ष असला तरी सुद्धा- द्वंद्ववाची हीच स्थिती सीमांतिकरणाची संकल्पना स्पष्ट करते-* सीमांतिकरण ही संकल्पना विषमतेच्या प्रक्रियेशी संबंधित आहे- ज्यामुळे परावलंबित्व वाढते आणि अनेक नवीन समस्या निर्माण होऊ लागतात.

विस्थापन: 'सर्वसाधारपणे एखाद्या मोठ्या प्रकल्पामुळे किंवा मोठ्या उद्योगामुळे एखाद्या गावातील किंवा काही गावातील लोकांना आपले घर जमीन आणि स्थावर मालमत्ता तसेच आपले गाव सोडून इतरत्र कायमची जावे लागणे म्हणजे विस्थापन होय*-

सीमांतिकीकरणए विस्थापनाची कारणे व परिणाम: वंचित, उपेक्षित म्हणजे सीमांतिक व्यक्ती होय- ग्रामीण समाजातील भटक्या, विमुक्त जाती, जमाती आदिवासी, कारागीर, श्रमिक, भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक, लहान शेतकरी इत्यादींचा समावेश सीमांतिक समूहात होतो- कारण अशा समूहातील व्यक्तींना शासनाच्या विविध योजना मिळण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न केले जात असले तरी त्या योजना त्यांना खूप कमी प्रमाणात मिळतात- तर काही योजना त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाहीत म्हणून त्या समूहात सीमांतिकरणाचे प्रमाण वाढत चाललेले आहे-

बहुतांश गावामध्ये ग्रामपंचायतीवर जे सदस्य निवडून येतात ते सदस्य उच्च व प्रभावी गटातील असतात त्यांचं वर्चस्व संपूर्ण ग्रामपंचायतhवर असते- तेव्हा या शासनाच्या योजना अल्प प्रमाणात पोहोचवून खोटे व चुकीचे लाभार्थी दाखवून त्या योजना हडप करण्याचे काम केले जाते- गावातील गटबंदी व स्व समूह श्रेष्ठता वादामुळे उपेक्षित व कमकुवत वर्गावर मोठ्या प्रमाणात अन्याय होत असताना दिसून आलेला आहे- त्याचबरोबर सीमांतिक समूहात अज्ञान अंधश्रद्धा दैववाद इत्यादीमुळे नशिबाला दोष देऊन शहानिशा न करता आहे त्या गोष्टीत समाधान मानतात व अलिप्त जीवन जगण्याचा प्रयत्न करतात त्यातूनच त्या समूहाचे सीमांतीकरण होते-

१. विकासाचे राजकारण: व्यवहारिक दृष्टीने विचार करता सीमांतीकरणाची समस्या ही अनेक अंतर्गत परिस्थितींचा परिणाम आहे. काही प्रमुख कारणांचा उल्लेख केला तर त्यातील सर्वात महत्त्वाची कारण कारणविकासाच्या राजकारण आहे.. भारताय लोकशाही ढांच्या संसदीय आणि संघराज्य प्रणालीवर आधारित आहे. ज्यामध्ये सर्व निर्णय जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी बनलेले सरकार घेतात. आपल्या देशात तत्त्वहीन राजकारणामुळे उमेदवारांची निवड आणि मंत्रिमंडळाच्या वाटपाचा आधार जात, धर्म, प्रदेश आणि वैयक्तिक निष्ठा यावर आला आहे. परिणामी ज्या समाजाचा प्रभाव अधिक आहे, त्यांच्या इच्छेनुसार वेगवेगळे कार्यक्रम ठरवले जातात. बहुसंख्य लोकप्रतिनिधींचे

मतपेढीच्या दृष्टिकोनातून दुर्बल समाजाबद्दल उदासीन राहणे स्वाभाविक आहे. सर्व काही माहीत असतानाही सरकार आणि प्रशासन अशा वर्गांच्या समस्यांकडे फारसे लक्ष देत नाही, त्यामुळे त्यांच्या मतांच्या राजकारणाचा परिणाम कोणत्याही नेत्यावर होत नाही म्हणून सीमांतिकरणाचीं प्रक्रिया गतिशील होत चालली आहे.

2. भ्रष्टाचार :- विकास कार्यक्रमांवर होणारा बहुतांश खर्च हा भ्रष्टाचारामुळे समाजात कोणताही विधायक बदल घडवून आणत नाही, हे अनेक सर्वेक्षणांतून स्पष्ट झाले आहे. ज्या देशात स्वातंत्र्याच्या जवळपास 75 वर्षांनंतरही देशाची 30 % पेक्षा जास्त लोकसंख्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहे. आणि अजूनही दारिद्र्याच्या अवस्थेत येण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशा देशात विकास कार्यक्रमांच्या पूर्ण अंमलबजावणीचे मूल्यमापन प्रभावीपणे केले जाऊ शकते. केंद्र आणि राज्य पातळीवरील बहुतांश सरकारला सरकारी रेकॉर्डशी संबंधित जे आहे तेच कळते.आणि तेच सांगत असतात. वाईट पाहू नका, वाईट ऐकू नका आणि वाईट बोलू नका, या तत्त्वावर महात्मा गांधींनी आपल्या तीन माकडांना आदर्श मानले होते. आज या आदर्शाचे अनुकरण होताना दिसत आहे. काही बघायचे नाही, काही ऐकायचे नाही आणि जे काही चालले आहे त्यावर काहीही बोलायचे नाही अशी अवस्था समाजात दिसत असल्याने सीमांतिकरणाची प्रक्रिया दिवसेंदिवस वाढत आहे.

3. विकासाचे अव्यवहारिक कार्यक्रम :- विकासचे अव्यवहारिक व अवास्तविक कार्यक्रम सीमांतिकरणाचे आणखी एक प्रमुख कारण आहे. दुर्बल घटकांची स्थिती सुधारण्यासाठी, दीर्घकालीन कार्यक्रम अशा धोरणांवर आधारित असले पाहिजेत, ज्याच्या मदतीने त्यांच्या वास्तविक परिणामांचे योग्य मूल्यांकन केले जाऊ शकते. सध्या एकाच विकास कार्यक्रमाशी संबंधित विविध योजना परस्परविरोधी आणि अनेक विभागांशी संबंधित आहेत, परिणामी त्यांच्या अंमलबजावणीसाठी कोणत्याही एका विभागाला जबाबदार धरता येत नाही, त्यामुळे विकासाचा लाभ दुर्बल आणि गरीबांपर्यंत पोहोचत नाही. विस्थापनाच्या माध्यमातून अनेक लोक बेघर झालेले आहेत त्यांना अजूनही विकासाच्या योजना पूर्णपणे पोचू शकले नाहीत त्यामुळे ते सीमांतिक समूह बनवून जगत आहेत. या समूहाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढल्यामुळे सीमांतिकरणाची प्रक्रिया गतिशील होत आहे.

4.अनियोजित औद्योगीकरण:- अनियोजित औद्यगिकीकरणामुळे काही विभागात उपेक्षित व सीमंतिक समूह वाढला आहे, तर अनेक भागात विशिष्ट उद्योगाशी संबंधित कुशल व्यक्ती उपलब्ध नाहीत. अनियोजित औद्योगिकीकरणाचा परिणाम म्हणून विस्थापनाची समस्याही वाढू लागते. आज अनेक गोरगरीब लोक विकासात्मक प्रकल्प साठी आपल्या वडिलोपार्जित जमिनी दिले आहेत. पण त्यांच्यासमोर आजही उदनिर्वासाठी भयंकर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांच्या मुलाचे शिक्षणाची समस्या, मुलांच्या विवाहाची समस्या त्याचबरोबर येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी ते आजही संघर्ष करत आहेत. याचे कारण म्हणजेच अनयोजित औद्योगीकरण म्हणावे लागेल. अशा निर्बल व उपेक्षित आणि दुर्लक्षित लोकसंख्येची आकडेवारी वाढल्याने सीमांतिकारण घडून आहे.

5. अज्ञान व निरक्षरता :- भारतीय समाजाच्या ग्रामीण भागातील वर्ग जितका उपेक्षित आहे, तितकाच त्यात शिक्षणाचा आणि साक्षरतेचा अभाव आहे. त्यांच्या अज्ञानामुळे उपेक्षित घटकांना ना विकास योजनांचा लाभ मिळतो ना त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव असते. या स्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना विकासाच्या लाभापासून वंचित ठेवणे अत्यंत सोपे जाते. आज ग्रामीण भागातील बहुतांश शेतकऱ्यांच्या जमिनी विकासाच्या नावाखाली रस्त्यामध्ये व तलावामध्ये गेलेले आहेत. त्यांना धरणग्रस्ताचे प्रमाणपत्र ही दिले आहे. पण त्या जमिनीचा मोबदला अत्यल्प असल्याने त्या मोबदल्यात इतर ठिकाणी चालू भावाने जमिन मिळत नाही. परिणामी ते हातबल व अस्तित्व शून्य जीवन आहेत. म्हणून सीमांतीकरण्याची प्रक्रिया तीव्र रूप धारण करत आहे.

6. अंधश्रद्धा व दैववाद :- आजही आपलां समाज अंधश्रद्धा, दैववाद, मागच्या जन्माचे पाप या संबंधित समजुतींच्या आधारावर जीवन जगत आहे. बहुसंख्य गावकरी आपल्या समस्यांचे कारण स्वतःचे नशीब किंवा मागील जन्मी केलेल्या कर्माचे फळ मानत आहेत. परिणामी, त्यांच्या क्षमता आणि कौशल्ये वाढवण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळत नाही. शासन दरबारी न्याय मागण्यासाठी ते स्वतः जात नाहीत आणि त्यांना इतर प्रतिष्ठित लोक मदत करत नाहीत उलट त्यांच्या मजबुरीचा फायदा घेऊन त्यांचे शोषण करण्याचा प्रयत्न केला जातो. परिणामी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सीमांतिकरणाची प्रक्रिया सुरू होत असते.

7. धरणे आणि जलाशयांमधून होणारे विस्थापन:- आज देशाच्या आर्थिक विकासासाठी वीज आणि सिंचन सुविधांचे उत्पादन वाढवणे ही सर्वात मोठी गरज आहे. त्यासाठी देशाच्या विविध भागात मोठमोठी धरणे आणि जलाशयांची उभारणी सुरू झाली. गंमत अशी आहे की ज्या ठिकाणी बांध आणि जलाशय बांधले गेले आहेत किंवा ते बांधण्याच्या प्रक्रियेत आहेत, तेथील मोठ्या क्षेत्राची संस्कृती आणि सभ्यता पाण्यात बुडाली. लाखो हेक्टर शेतजमीन आणि जंगले नष्ट झाली. या विकास प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या लोकांची संख्या सर्वात मोठ्या नैसर्गिक आपत्तीमुळे विस्थापित झालेल्या लोकांपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. उदाहरणार्थ, पंजाबमध्ये जेव्हा पहिला भाक्रा नांगल प्रकल्प पूर्ण झाला तेव्हा मोठा ग्रामीण भाग पाण्याखाली गेला आणि तेथील रहिवाशांना उपजीविकेसाठी इतर ठिकाणी जावे लागले. जवळपासच्या गावातील लोकांचे अजूनही पूर्ण पुनर्वसन झालेले नाही. उत्तरांचलमध्येच शारदा आणि नानक सागरच्या बांधकामासाठी प्रचंड जमीन संपादित केल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोक विस्थापित झाले.

8. औद्योगिक विकास आणि विस्थापन:- औद्योगिक विकासासाठी स्वातंत्र्यानंतर जे शेकडो मोठे कारखाने उभारले गेले, परिणामी विस्थापनामुळे ग्रामीण समाजासमोरही गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. ओरिसातील संबलपूर जिल्ह्यातील पदकमल भागात भारत ॲल्युमिनियम कंपनीने एक मोठा कारखाना स्थापन केला, तेव्हा विस्तीर्ण भागातील ग्रामीण लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी आणि राहण्यासाठी तळमळत होती. हा परिसर म्हणजे गंधमादन पर्वताच्या आजूबाजूचा परिसर, जो जीवनदायी वनौषधींसाठी प्रसिद्ध होता आणि येथील वनौषधी हे गावकऱ्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन होते. शासनाकडून गावकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम निश्चितच देण्यात आली, मात्र त्यांच्यासाठी रोजगाराची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. हे फक्त एक उदाहरण आहे. छत्तीसगडमधील भिलाई नगर, जमशेदपूरमधील टाटा नगर आणि सिंद्री येथील खत कारखान्यामुळे विस्थापनाची गंभीर समस्या निर्माण झाली.

9. रस्त्यांच्या बांधकामामुळे होणारे विस्थापन:- विकासामुळे होणारे विस्थापनाचे एक प्रकार नवीन रस्त्यांच्या बांधकामाशी संबंधित आहे. भारतात स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय महामार्ग बांधण्यासाठी आणि गावे आणि शहरे एकमेकांशी जोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपमार्ग बांधण्यात आले. सध्या देशातील रस्त्यांची एकूण लांबी 33 लाख किलोमीटरहून अधिक आहे, जी स्वातंत्र्याच्या वेळी 10 लाख किलोमीटरपेक्षा कमी होती. राष्ट्रीय समृद्धी मार्गाचे काम चालू आहे. या मार्गासाठी हजारो हेक्टर जमीन अधिकची अधिग्रहण केली आहे व अनेकांचे उपजीविकेचे साधन हिरावून घेतल्यामुळे त्यांना शासनाच्या आश्रयावरती जीवन जगावे लागत आहे. परिणामी प्रपक प्रकल्पग्रस्त लोकांमध्ये सीमांतीकरण दिसून येत आहे.

➢ **निष्कर्ष व उपायोजना/ शिफारशी**

1. विस्थापनामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्येचे स्थलांतर शहरी भागाकडे होत आहे त्यामुळे शेळी भागातही अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत.

2. विकासात्मक प्रकल्पामुळे विस्थापन करणे भाग पडते, त्यामुळे विस्थापित ग्रस्त व्यक्तींना अर्थार्जनासाठी कोणतीही साधने उपलब्ध नसल्याने त्यांच्यावर भूकमारीची वेळ येऊन सीमांतिकरणाची प्रक्रिया घडून येण्यास मदत होत असल्याचे दिसून आले आहे.

3. विकासाच्या नावाखाली अनेक जमिनी व गावे अधिग्रहण केले जाते. त्याच्या मोबदल्यात विस्थापितांना काही प्रमाणात आर्थिक मदतही दिली जाते. असे असले तरी त्या आर्थिक मदतीचा अनावश्यक वापर करून दुरुपयोग झालेला दिसून आलेला आहे.

5. विस्थापनामुळे आंदोलन व मोर्चे अशा क्रियाविधी दिवसेंदिवस उग्र रूप धारण करत असून राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होत असताना सुद्धा दिसून आले आहे.

6. विस्थापनातून सीमांतीकरण होऊन दुर्बल व उपेक्षित समूहावर वाईट परिणाम होताना दिसून आलेला आहे. म्हणजेच आधुनिक अस्पृश्यता, भेदभाव व स्त्रियांवरती अत्याचार करण्याचे प्रमाण वाढले आहे.

7. अनेक भटके जीवन जगणारे भटक्या जमाती जसे पशुपालक, मेंढपाळ व वन संपत्तीवर अवलंबून असणारे लोक यांना त्यांचे उदरनिर्वाह करण्याची व्यवस्था केली नसल्याने त्यांचा पारंपारिक व्यवसाय नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

8. विस्थापित व सीमांतिक समूहाचे शिक्षण, आरोग्य विषयक समस्या निर्माण होऊन ते समूह विकासाच्या प्रवाहापासून दुर्लक्षित होत असताना दिसून येत आहे.

➢ **शिफारशी (उपाय योजना)**

स्वातंत्र्यानंतर भारतात विकास कार्यक्रमांमुळे निर्माण झालेल्यासीमांतीकरण व विस्थापनाच्या समस्येमुळे देशासमोर एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे की, ग्रामीण भागातील विस्थापनाची समस्या कशी सोडवायची? एकीकडे विकास कार्यक्रमांमुळे विस्थापनाची स्थिती आवश्यक ठरते, तर दुसरीकडे ती योग्य पद्धतीने सोडवली गेली नाही, तर विकासाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जाऊन सीमांतीकरणची समस्या निर्माण होते. म्हणून ते टाळण्यासाठी काही उपाय करणे आवश्यक आहे ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. विशेषतज्ञाद्वारे क्षेत्रीय अध्ययन :- सर्व प्रथम हे आवश्यक आहे की, विविध विकास कार्यक्रम राबवण्यापूर्वी स्थानीय परिस्थितीचा क्षेत्रीय अभ्यास केला पाहिजे, जेणेकरून कमीतकमी लोकांना त्यांच्या मूळ ठिकाणापासून दूर करावे लागेल. यामुळे कृती योजनांना व्यावहारिकता मिळते.आणि हे केवळ योजनांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करूनच होऊ शकते.

2. विस्थापन पूर्व पुनर्वसनाची व्यवस्था :- सीमांतीकरण व विस्थापनाची समस्या रोखण्यासाठी विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी पद्धतशीर योजना करणे आवश्यक आहे. आपल्या जमिनीतून विस्थापित झालेल्या लोकांसाठी रोजगाराची योग्य व्यवस्था करून त्यांचे विस्थापनापूर्व पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

3. . जमिनीच्या बदल्यात जमीन देणे :- धरणे बांधणे, रस्ते बांधणे, कारखाने उभारणे यासाठी जमिनीपासून वंचित राहिलेल्यांना जमिनीचा मोबदला रोख स्वरूपात देणे अत्यंत अव्यवहार्य असल्याचे अनुभवावरून दिसून आले आहे. अशा पैशाचा सहसा गैरवापर होतो. नुकसानभरपाईऐवजी विस्थापितांसाठी घर आणि जमिनीच्या बदल्यात जमीन देण्याची व्यवस्था केली तर विस्थापितांची कुटुंबे सहज जगू शकतील.

4. पडीक व निरोपयोगी जमिनीचा वापर :- नवीन कारखाने बांधण्यासाठी अशी जागा निवडणे आवश्यक आहे, जेथे जमीन नापीक किंवा निरुपयोगी आहे. त्यामुळे कृषी उत्पादनावर होणारा विपरीत परिणाम टाळता येईल. त्याचबरोबर

पडीक व निरुपयोगी जमीन वापरात आल्याने स्थानिक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होऊन सीमांतीकरण होण्यास प्रतिबंध होईल.

5. आपत्ती व्यवस्थापनाची विशेष व्यवस्था :- बंधारे किंवा धरण फुटणे आणि कारखान्यांमधून होणाऱ्या विषारी वायूंच्या गळतीमुळे ज्या कुटुंबांना आपले मूळ क्षेत्र सोडावे लागले आहे, अशा कुटुंबांची समस्या सोडवण्यासाठी सरकारने आपत्ती व्यवस्थापनासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशा अपघाती घटनांमुळे बाधित कुटुंबांना वैद्यकीय सुविधा देण्याबरोबरच आर्थिक मदतीचीही व्यवस्था करणे आवश्यक आहे. काही वर्षांपूर्वी भोपाळमधील गॅस दुर्घटनेची पुनरावृत्ती कोणत्याही क्षेत्रासाठी भयावह ठरू शकते.

6. औद्योगिकीकरणासाठी संतुलित धोरण :- आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण आवश्यक आहे, परंतु औद्योगिकीकरणासाठी संतुलित धोरण ग्रामीण विस्थापनाची व सीमांतिकरणाची समस्या कमी करू शकते. त्यासाठी कोणत्याही एका क्षेत्रात उद्योग केंद्रीत होऊ नयेत हेही आवश्यक आहे. उद्योगांचे विकेंद्रीकरण करून विस्थापित कुटुंबांना रोजगाराच्या संधी अधिक सहज मिळू शकतात. त्यामुळे सीमांतिकरणाचा प्रश्न काही प्रमाणात कमी करता येऊ शकतो.-

संदर्भसुची:

1. गोरे, अ. (2014). ग्रामीण *व नागरी समाजशास्त्र*, औरंगाबाद. विद्या बुक्स पब्लिशर्स-
2. अग्रवाल, गो. व शील पाण्डेय- (2020)- ग्रामीण *समाजशास्त्र* - एस बी पी डी पब्लिशिंग हाऊस-
3. बोरकर, न. (2020). पुनर्वसन *एक सामाजिक समस्या* - शोध निबंध नॉलेज रिसोनस-
4. Borma, F. (2020). *Globalization, marginalization and conflict*. Switzerland,springer nature AG.
5. Madan, G. (2003). *Sociology of Development*. Allied Publishers.
6. Schuurman, Frans J. : Globalization and Development Studies - Vistaar Publications, New Delhi. 2001
7. https://marathivishwakosh.org/49229/

*सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुखए समाजशास्त्र विभाग, भारत शिक्षण संस्थेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, माकणी ता- लोहारा जि- उस्मानाबाद. ई-मेल: anilgadekar111@gmail.com Mo. 9545439048

***

आंध आदिवासी महिलांचे शैक्षणिक जीवन

***डॉ.फोले कविता भाऊराव**

****डॉ.रामचंद्र भिसे**

गोषवारा : *आदिम जमातीमध्ये परंपरागत पद्धतीने जीवन शिक्षण देण्यात येते. कुटुंब, नातेवाईकांचा गट, आणि शयनगृहाची भूमिका त्यात महत्त्वाची ठरते. गरजा भागविण्यासाठी खाद्य संकलन, उत्पादन करणे, चिज वस्तू बनविणे, तसेच कलाक्षेत्रातील निर्मितीत महिलांचा सहभाग असतो. परंतु अद्यापही आधुनिक अर्थाने आदिम जमातीत औपचारिक शिक्षणाचे महत्व कळलेले नाही. आंध आदिवासी जमात ही मागासलेली असल्याने व शिक्षणाविषयी आस्था नसल्याने शिक्षणावर एकूण उत्पन्नाच्या 0.04 टक्के खर्च होते. कोणत्याही समाजाची सुधारणा व्हायची असेल, तर त्यासाठी प्रथम शिक्षणचा प्रसार झाला पाहिजे, हा अगदी सामान्य सिद्धांत आहे. तसेच पुरूषांबरोबर कुटुंबातील स्त्री सुद्धा साक्षर पाहिजे. हे आता मान्य केले आहे. आंध आदिवासी जमातीत याबाबतीत अगदी भिन्न परिस्थिती आहे. शासनाने आदिवासी जमातीवर अधिक खर्च करण्याचे धोरण आहे. पण शिक्षणावर होणारा खर्च कितपत सार्थकी लागतो हे अंतर्मुख होऊन तपासले पाहिजे.*

प्रस्तावना :

पैनगंगा / पैनगंगा ही नदी महाराष्ट्राच्या नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्याच्या जंगलातून वाहाते. या नदीच्या दोन्ही तिरावर 'आंध' नावाची एक प्रमुख आदिवासी जमात पुरातन काळापासून वास्तव्य करून आहे.[1] अखंड महाराष्ट्रात एकूण 47 आदिवासी जमातींपैकी 'आंध' ही जमात तिच्या एंदर वेगळया जीवनशैलीमुळे ठळकपणे उठून दिसते. सर्वसामान्य गावातील लोकांप्रमाणेच यांची दिनचर्या चालू असते. आंध आदिवासींना स्वत:ची मालकी जमीन नसल्यामुळे किरकोळ शेती वगळता त्यांचं संपूर्ण जीवन जंगलात मिळणाऱ्या नैसर्गिक संपत्तीवर अवलंबून असते. ही संपदा मुख्यत: स्त्रिया आणि मुले गोळा करतात. मोहाच्या झाडापासून मिळणारी उत्तेजक फूलं, स्त्री-पुरूष गोळा करतात. मोहाच्या झाडापासून मिळणाऱ्या ह्या फुलांना वाळवल्यानंतर त्यांच्यापासून आदिवासी पुरूष मंडळी त्यांच्या पारंपरिक पद्धतीने नशा आणणारं उत्तेजक पेय तयार करतात. हे पेय आडरानात सुरक्षित ठिकाणी तयार करण्याचं भानही ते ठेवतात. या पेयाचा आस्वाद घेतल्यानंतर गावातील पुरूष मंडळी समुहाने शिकारीसाठी जंगलात शिरतात. कोणतेही कार्य समुहाने केल्याने गावाचा एकोपा व मैत्रिचे अतुट बंधन निर्माण होते, हे त्यांना पुरातन काळापासूनच ठाऊक आहे. किंबहुना हा वसाच त्यांनी जतन करून ठेवला आहे. छोट्या प्राण्यांची आणि पक्ष्यांची शिकार करण्यासाठी काही विशिष्ट धाग्यांचे जाळे आणि सापळे त्यांनी विकसित केले आहेत. समुहाने केलेल्या शिकारीमुळे वन्यजिवांची अनिर्बंध हत्या टाळण्यासाठी मदत होते.

स्त्रिया आणि पुरूष मिळून काही ठिकाणी तुरळक प्रमाणात शेती करतांना दिसून येतात. गाई-गुरांना ते सांभाळू शकत नसल्यामुळे त्यांचा नांगर बैलाच्या किंवा रेड्याच्या ठिकाणी पुरूषच ओढतात. तशी त्या नांगराची रचना केलेली असते. सद्यस्थितीत मात्र हे चित्र बदलतांना दिसते. आजची आंध जमात मात्र बैल किंवा आधुनिक यंत्रतंत्रांचा वापर करताना दिसून येते. नागरी वस्तीतील स्त्रियांप्रमाणेच या आंध जमातीतील स्त्रियाही त्यांची पारंपरिक लोकगीतं गाऊन जात्यावर दळण दळत असतात. सणासुदीला पुरणपोळीसारखे गोड पदार्थ करून आपला आनंद द्विगुणित करतात.

सर्व आंध आदिवासी प्रामुख्याने धार्मिक स्वभावाचे आढळतात. आंध जमातीच्या पूर्वापार रूढीनुसार त्यांनी निर्माण केलेल्या देवतांना त्यांच्या जीवनात अनन्य साधारण महत्व आहे. 'मसाई' ही ग्रामदेवता जागृत देवता म्हणून ओळखली जाते. पूर्वी ह्या देवतेला रेड्याचा बळी दिला जात असे. मग त्याचे रक्त गावच्या चारही दिशांना शिंपडून गावावर येणाऱ्या विघ्नांपासून संरक्षणाचे साकडे देवीला घातले जात असे आणि रेड्याचे मांस प्रसाद म्हणून गावकऱ्यांना वाटले जात असे.

आंध जमातीचे पूर्वज हे नागाचे वंशज होते. म्हणूनच तेथे नागपंचमी घरोघरी आनंदाने साजरी होते. त्यासाठी मातीचे नाग तयार करून त्यांना रंगवून, ओवाळून त्यांची पूजा केली जाते.

अन्य जाती-जमाती प्रमाणेच आंध जमातीतही लग्नासारखे पवित्र कार्य त्यांच्या पारंपरिक चालीरीतीनुसार टिकून आहेत. या कार्याचा पहिला टप्पा हा हळद काढण्याचा असतो. त्यासाठी स्त्रिया हळद दळून त्याची पूड तयार करतात. काही स्त्रिया-मुली अंगणात रांगोळी काढतात. नवरदेवाच्या घरच्या अंगणात प्रथेप्रमाणे मुहुर्तमेढ रोवली जाते. नंतर मांडव उभारला जातो. सर्व लहान-थोर या मंगल कार्यासाठी मांडव सजवण्यापासून इतर कामेही आनंदी वातावरणात उत्साहाने करतात. काही जमातींपेक्षा आंध जमातीची प्रथा थोडी वेगळी आहे. तिथे नवरी मुलगी सजून-धजून, वाजत-गाजत नवऱ्या मुलाच्या मांडवात येते. त्याच मांडवात गावातील सर्व सुवासिनी नवऱ्या मुलाला आणि मुलीला नख-शिखांत हळद लावतात. अशा प्रकारे हा पहिला टप्पा ओलांडला जातो.

सर्व आदिवासी जमातींमध्ये प्रत्येक गावात किंवा पाड्यात त्यांची स्वत:ची अशी एक स्वतंत्र न्यायव्यवस्था असते. तशी ह्या जमातीमध्येही आहे. तिला 'पंचायत' असं संबोधलं जातं. जर पंचायतीचे उभय पक्षांनी ऐकले नाही, तर अखंड गाव त्यांच्यावर बहिष्कार घालतो. सण उत्साहाने साजरा करतात. होळीसारख्या सणांमध्ये रात्री काही करमणुकीच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांमध्ये स्थानिक कलावंतांचा सहभाग असतो. लोककलांच्या या प्रकारात स्त्रियांच्या वेशात पुरूषच भूमिका वठवतांना दिसतात. पारंपरिक वाद्याच्या साहाय्याने जेव्हा हे कलाप्रकार सादर केले जातात, तेव्हा अबालवृद्ध त्यांचा भान हरवून आस्वाद घेतात आणि बघता बघता जेव्हा पहाट होते, तेव्हाच सर्व भानावर येतात.

एकंदरीत आंध जमातीच्या लोकांचे जीवन अत्यंत खडतर आणि कष्टाळू आहे. पण तरीही हे निसर्गपुत्र गरीब असुनही, सणांच्या योगाने येणारे आनंदाचे क्षण होळीच्या रंगासारखे मनमुराद लुटतात. आणि तात्पुरते का असेना आपल्या असंख्य भेडसावणाऱ्या विवंचनांना विसरून जातात.

आंध आदिवासींच्या ह्या निरागस जीवनशैलीचा विचार करता, त्यांच्या वेगवेगळ्या समस्यांचा उहापोह घेणे गरजेचे आहे. आज जगाच्या विकासाचा परीघ पाहता मानवी विकासात शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे आणि म्हणूनच प्रथमत: दऱ्याखोऱ्यात मनमुराद जीवनाचा आस्वाद घेत, विकासाच्या वाऱ्यांपासून कोसोदूर असणाऱ्या ह्या आंध आदिवासी महिलांच्या शिक्षणाच्या काय समस्या आहेत? हे जाणून घेणे देखील गरजेचे आहे.

समस्या अध्ययनाचे महत्व:

आंध आदिवासी ही दऱ्याखोऱ्यात डोंगरात राहणारी जमात आहे. किनवट तालुक्यासारख्या अतिदुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आंध आदिवासी महिला ह्या अत्यंत दारिद्र्यात जीवन जगतात. अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसाच्या

मूलभूत गरजा, आणि ह्या भागविण्यासाठी सुद्धा आजही त्याची यातायात होतांना दिसते. परंपरेने, स्वभावाने आणि संस्कृतीने शांत, मुक्त, निर्भय व आनंदी असणाऱ्या आंध आदिवासी महिलांची परिस्थिती मात्र अतिशय दयनिय आहे. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामुळे या महिलांचे शोषण निरनिराळ्या कारणांनी व निरनिराळ्या प्रकारे आजही होत आहे. आर्थिक दौर्बल्यामुळे ह्या महिलांना त्यांचा स्वत:चा आणि आपल्या पाल्यांचा शैक्षणिक खर्च पेलवत नाही. शिवाय काही खेड्यांतुन अजुनही पर्याप्त शालेय इमारती आकाराला आलेल्या नाहीत, आणि काही ठिकाणी इमारत आहे पण विद्यार्थी संख्याच कमी असल्यामुळे अशा बऱ्याच शाळा बंद पडल्या आहेत व याचा खरा फटका ह्या आंध आदिवासी महिलांना बसलेला जाणवतो. परिणामी ह्या महिला शिक्षणापासून वंचित होतांना जाणवतात आणि म्हणूनच अशा अतिदुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आंध आदिवासी महिलेला शिक्षणाच्या प्रवाहात कसे आणता येईल ? त्यांनी शिक्षण न घेण्यामागची नेमकी पार्श्वभूमी काय आहे? त्यांच्या शैक्षणिक अडचणी कोणत्या आहेत? हे जाणून घेवून त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने कोणते उपाय करता येतील ? या सर्व बाबींचा अनेकविध अंगाने अभ्यास करणे हाच या अध्ययनाचा प्रमुख उद्देश आहे.

आंध आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास व त्यातून येणारे संभाव्य निष्कर्ष यातून संपूर्ण आंध आदिवासी महिलांच्या शैक्षणिक जीवनाचे विविध पैलू समजून घेण्यास मदत होते.

अशा प्रकारे प्रस्तुत अध्ययनातून येणारे निष्कर्ष व त्यावर केली जावू शकेल अशी उपाययोजना सुचविता यावी यासाठी हे अध्ययन नक्कीच उपयुक्त ठरेल, यात शंका नाही.

अध्ययनाची उद्दिष्ट्ये:

1. आंध आदिवासी महिलांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे.
2. आंध आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्या स्पष्ट करणे व त्याबाबत उपाययोजना सुचविणे.

गृहितके:

1. आंध आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. याचे कारण म्हणजे दैनंदिन घरकाम व शिक्षणाबाबत जनजागृतीचा अभाव आढळून येतो.
2. आंध आदिवासी महिलांना अनेक शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामध्ये पालकांचे अज्ञान, दारिद्र्य, गावात उच्च शिक्षणाची सोय नसणे, आश्रम शाळेचा निकृष्ट दर्जा, अपुरी शिष्यवृत्ती, घरकाम, लहान भावंडांचा सांभाळ, स्त्रिशिक्षणासंदर्भातील उदासिनता, मुली शाळेत गेल्याच तर शिक्षक नाही, पोषणयुक्त अन्न नाही, शिक्षकांकडून कर्मचाऱ्यांकडून लैंगिक अत्याचार इ.

'आंध' आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती:

भारतासारख्या जास्त लोकसंख्या, विविध जाती-जमाती असलेल्या विकसनशील राष्ट्रांपुढे ज्या अनेक समस्या उभ्या आहेत, त्यापैकी आर्थिक मागासलेपण, गरीबी, बेकारी व दारिद्र्य या समस्या विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ व शासन यांच्यासमोर एक ज्वलंत प्रश्न म्हणून उभ्या आहेत.

अविकसितपणा व आर्थिक मागासलेपणाचे व्यक्ती व समाजावर अनेक आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम घडून येतांना दिसतात. आर्थिक मागासलेपणा व बेकारीमुळे व्यक्तींचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक दर्जा सुधारत नाही.

त्यामुळे ते अन्न, वस्त्र व निवारा ह्या मुलभूत गरजाही भागवू शकत नाहीत. म्हणून त्यांच्या वाट्याला ही गरीबीची समस्या ही समस्याच राहून जाते.

आदिम जमातीमध्ये परंपरागत पद्धतीने जीवन शिक्षण देण्यात येते. कुटुंब, नातेवाईकांचा गट, आणि शयनगृहाची भूमिका त्यात महत्त्वाची ठरते. गरजा भागविण्यासाठी खाद्य संकलन, उत्पादन करणे, चिज वस्तू बनविणे, तसेच कलाक्षेत्रातील निर्मितीत महिलांचा सहभाग असतो. परंतु अद्यापही आधुनिक अर्थाने आदिम जमातीत औपचारिक शिक्षणाचे महत्व कळलेले नाही. आंध आदिवासी जमात ही मागासलेली असल्याने व शिक्षणाविषयी आस्था नसल्याने शिक्षणावर एकूण उत्पन्नाच्या 0.04 टक्के खर्च होते. कोणत्याही समाजाची सुधारणा व्हायची असेल, तर त्यासाठी प्रथम शिक्षणचा प्रसार झाला पाहिजे, हा अगदी सामान्य सिद्धांत आहे. तसेच पुरूषांबरोबर कुटुंबातील स्त्री सुद्धा साक्षर पाहिजे. हे आता मान्य केले आहे. आंध आदिवासी जमातीत याबाबतीत अगदी भिन्न परिस्थिती आहे. शासनाने आदिवासी जमातीवर अधिक खर्च करण्याचे धोरण आहे. पण शिक्षणावर होणारा खर्च कितपत सार्थकी लागतो हे अंतर्मुख होऊन तपासले पाहिजे.

भारतीय महिला आज अंतराळात झेप घेत असतांनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण आदिवासी, तळागाळातल्या स्त्रिया या वाटचालीत कुठे आहेत? त्यांचे नेमके स्थान कुठे आहे?

आंध आदिवासी संस्कृतीने स्त्रियांना बरोबरीचा दर्जा व मानाचे स्थान जरी दिले, तरी चालू जगाच्या घडामोडीत येथील स्त्रिया खूप पिछाडीला आहेत. अजूनही आंध आदिवासी महिलेला स्वातंत्र्य मिळाले म्हणजे काय? याचा अर्थ ठाऊक नाही.

2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींचा सामान्य साक्षरता दर 59 टक्के, तर स्त्रियांचा साक्षरता दर 40.66 टक्के आहे.[2] शासन अहवालानुसार 2011 पर्यंत यात 28 टक्क्यांनी वाढ झाली. तरीही ग्रामीण भागातील एकूण 60 टक्के स्त्रियांच्या लोकसंख्येला अजूनही शिक्षणाचा गंध नाही. हे ही तितकेच सत्य आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास ग्रामीण आदिवासी भागातील शिक्षणाचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन व स्वयंसेची संस्थांद्वारे प्रयत्न होतात. परिणामस्वरून 6 ते 14 वयोगटातील 85 टक्के मुले शाळेत जातात. परंतु पुढे गळतीमुळे शंभरपैकी 60 मुले चौथ्या वर्गात, 40 मुले नवव्या वर्गात तर 20 मुले अकराव्या वर्गात दाखल होतात. उच्च शिक्षणाचे प्रमाण तर विचारायलाच नको. त्यात मुलींचे प्रमाण तर नगण्यच! आमच्या आंध आदिवासी मुलींसाठी शिक्षण मोफत असले तरी आई-वडील शेतावर जातात. घरकाम, लहान भावंडांचा सांभाळ आदी कारणांसाठी मुलींना शाळेत टाकले जात नाही. गेल्याच तर शिक्षक नाही, पोषणयुक्त अन्न नाही. शिक्षकांकडून, कर्मचाऱ्यांकडून लैंगिक अत्याचार शोषणानेही शाळा सोडावी लागते.

'स्त्री असणे' हाच आंध आदिवासी महिलांच्या प्रगतीतील अडथळा ठरू पाहत आहे. शेतातील कामे, मुलांचा जन्म व सांभाळ, घरकाम, बाजारहाट, आर्दिमुळे तिला शारीरिक व मानसिक ताणाला सामोरे जावे लागते. शारीरिक अशक्तपणा, कुपोषण, ॲनिमिया, प्रसुती यांनी तिचे शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडते. याचा इलाज अंधश्रद्धेच्या (पुजारी) मार्गाने केला जातो. नवऱ्याच्या व्यसनाधिनतेमुळे त्रस्त झालेल्या काही स्त्रिया आता कुटुंबाला सावरण्यासाठी स्वत: दारू गाळणे व विकणे हा व्यवसाय करतात. अर्धवट शिकलेल्या मुली समाजविघातक कृत्यात सामिल होतात, हेही समाजाला धोकादायक आहे.

आंध आदिवासी स्त्रिया सामाजिक रूढी, परंपरा, प्रथा, अंधश्रद्धा, निरक्षरता, अप्रगत शेती, दुष्काळ, अनारोग्य, कुपोषण व व्यसनाधिनतेच्या विळख्यातून मुक्त होऊ पाहात आहेत. येथील स्त्रियांना प्रथम सर्वांगीण विकासाचे शिक्षण देणे गरजेचे आहे. स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार करता फक्त आकडेवारी वाढ किंवा सही करता येणे यापुरते ते मर्यादित न ठेवता, नवीन बदल, घडामोंडींचे ज्ञान, वैज्ञानिक दृष्टीकोनातून विचार करण्याची सवय लावणे हे महत्त्वाचे आहे. यात या समाजातील शिकलेल्या स्त्रियांची जबाबदारी व भूमिका महत्वाची आहे. संस्कारित कुटुंब व समाजाच्या विकास कार्यात शिक्षणशक्ती डोळसपणे वापरावी लागेल. अंगभूत उपजत कौशल्यविकास आदिंचा समावेश करावा लागेल. येथील मुली काटक-सहनशील असतात. खेळामध्ये पुढे असतात. या गुणांचा विकास करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न व्हायला हवेत.

आजही आदिवासी भागात गेल्यास शिक्षकांच्या आळशीपणाचे, व्यसनाधिनतेचे, संस्काररहित कार्यक्षमतेचे नमुने बघायला मिळतात. खुद्द शिक्षण सचिवांनीच कालपरवा शिक्षक परिषदेच्या अधिवेशनात शिक्षकांनाच वाचता येत नाही, भागाकार येत नाही. हे सत्य विशद केले. याचे दु:ख कुणाला? शिक्षण देणारी संपूर्ण व्यवस्थाच अशिक्षित असेल तर आम्ही अशिक्षित आदिवासींनी कुणाकडे बघावे? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे, एखादा समाज किती सुशिक्षित आहे, हे त्या समाजातील स्त्री शिक्षणाच्या प्रमाणावर अवलंबून असते. तेव्हा स्त्रियांचे शिक्षण हे पुरूषांच्या शिक्षणापेक्षा अधिक महत्त्वाचे ठरते. कारण ते संपूर्ण कुटुंबाचे, पर्यायाने समाजाचे शिक्षण असते. यासाठी या समाजाच्या मानसिकतेत बदल करून स्त्री शिक्षणावर तसेच बाह्यबदलांपेक्षा आंतरिक सुधारणांवर भर द्यावा लागेल आणि ह्याच उद्देशाने प्रस्तुत अध्ययन हाती घेण्यात आलेले आहे.

आंध आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्या:

आंध आदिवासी महिलांची सध्याची शैक्षणिक स्थिती पाहता, शिक्षणास अल्प प्रमाणात सुरूवात झाली असल्याचे जाणवते. शिक्षणाविषयीची जागरूकता लोकांमध्ये झाल्याचे दिसून येते. परंतु आजही आंध आदिवासी महिलेला शिक्षण क्षेत्रात म्हणावा तसा प्रभाव पाडता येत नाही. याला कारणही तसेच आहे. त्यामध्ये

1) **पालकांचे अज्ञान:** पालकांचे अज्ञान हा आंध आदिवासी महिलांच्या शिक्षणातील प्रमुख अडसर आहे. कारण शिक्षणाचे महत्व न समजल्यामुळे किंवा शैक्षणिक अज्ञानापायी हे लोक आपल्या मुलींना शाळेत पाठवत नाहीत.
2) **दुर्गम भागातील वास्तव्य:** आंध आदिवासी जमातीचे वास्तव्य हे अतिदुर्गम भागात आहे. हे लोक डोंगर, दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करून राहतात. परिणामी विकासाचे वारे त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही.
3) **पालकांचे दारिद्र्य व विस्थापन:** आठराविश्वे दारिद्र्य हे तर आंध आदिवासींच्या पाचविलाच पुजलेले आहे. परिणामी ते आपल्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च पेलू शकत नाहीत. शिवाय पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना सतत स्थलांतर करावे लागते. परिणामी मुलींना कायम शिक्षण प्रवाहात टिकून राहता येत नाही व यातूनच गळतीचे प्रमाण वाढते.
4) **शैक्षणिक उदासिनता:** शैक्षणिक अज्ञानामुळे आंध आदिवासी महिलांचा शिक्षण घेण्याकडे फार कमी कल दिसून येतो. 'शिकून कुठं नोकरी मिळणार आहे?' ही भावना त्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्यास परिणामी ठरते. याचाच परिणाम म्हणून त्यांच्यामध्ये शैक्षणिक उदासिनता दिसून येते.

5) **आंध आदिवासी महिलांच्या शिक्षणाची व्यवस्था:** आंध आदिवासी महिलांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेच्या बाबतीत थोडक्यात सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, "आंध आदिवासी महिलांच्या शिक्षणाची व्यवस्था ही पक्षाघात झालेल्या व्यक्तीसारखी आहे." त्यांना केवळ प्राथमिक स्तरावर पोट भरण्यासाठी सरकारी आश्रम शाळेतून शिक्षण दिले जाते. विशेष म्हणजे शाळेतील शिक्षक बिगर आदिवासी असल्याने त्यांना विद्यार्थ्यांप्रती आत्मिक आस्था नाही. परिणामी प्राथमिक स्तरापर्यंत मुली शिक्षण घेतात. उच्च शिक्षण आणि पदवी व इंजिनिअरिंग वैद्यकीय क्षेत्रात शिक्षणाचे प्रमाण 1 टक्केपेक्षाही कमी आहे.

6) **आश्रम शाळेत मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न:** सद्यस्थितीचा विचार करता, मुलींच्या बाबतीत सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे, आश्रम शाळेत मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. जोपर्यंत आदिवासी विद्यार्थीनी व पालक यांच्या मनामध्ये सुरक्षेची भावना निर्माण होत नाही, तोपर्यंत शिक्षणाचा दिवा आंध आदिवासींच्या झोपडीत पेटणार नाही. त्यांना अज्ञान, दारिद्र्य व हलाखीच्या अंधारातच आपले जीवन घालवावे लागणार आहे.

7) **शिक्षकांद्वारेच हिन वागणूक:** कधी कधी शाळेतील शिक्षकही विद्यार्थ्यांस समजावून सांगण्याचा प्रत्न करीत नाहीत. विशेषत: बिगर आदिवासी शिक्षक विद्यार्थ्यांना हिन वागणूक देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. यासंदर्भात सुधीर शुक्ला यांनी 14 मार्च 1993 च्या 'हिंदू' मध्ये लिहिले की3, ते मध्य प्रदेशातील दुर्गम भागात व शाळेत गेले होते. तेथे वर्गात सहा वर्षांचा बिशन मित्राला म्हणाला, 'इकडे ये', परंतु त्याचवेळी शिक्षकाने ते ऐकले व म्हणाले, "चूप बैठ जानवर कहीं का" (चूप बैस जानवर कुठला). लहान बिशनला आपण कोणती चूक केली हे समजले नाही, व त्याने काही महिन्यातच शाळा सोडली. असे कित्येक बिशन देशभर आहेत. याला किनवटही अपवाद नाही.

8) **दुर्गम भागात जाण्याबाबत शिक्षकांची उदासिनता:** आंध आदिवासींचे वास्तव्य हे अतिदुर्गम भागात असल्याने तिथे कुणीही शिक्षक जाण्यास तयार नसतो आणि चुकून गेलाच तर तिथे काम करण्याची त्यांची मानसिकता नसते. व याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो व ते प्रवाहापासून दूर जातात.

9) **भाषेची अडचण:** आंध मुलींच्या बाबतीत भाषेची अडचण प्रामुख्याने जाणवते. अनेक अपभ्रंश शब्द त्यांच्या बोलीभाषेत आढळतात. शाळेत मराठी माध्यम तथा प्रमाण भाषेचा वापर असतो. सर्वांना प्रमाण भाषा समजते असे गृहीत धरून शिक्षणक्रम आखलेला असतो. पण या मुलींना सुरूवातीला शिक्षक काय म्हणतात हेच कळत नाही, आणि शाळेत नुसते बसून राहणे त्यांना जमत नाही, परिणामी त्यांच्या गळतीचे प्रमाण वाढते.

10) **मुलींना घरकाम करावे लागते:** कुटुंबाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे मुलींना शाळा सोडून घरकाम करावे लागते. किंवा लहान भांवंडांना सांभाळावे लागते.4 परिणामी ती शिक्षणापासून वंचित राहते.

11) **लहान भावंडांचा सांभाळ:** आई-वडील दोघेही शेतावर जात असल्यामुळे लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी ही याच मुलींवर असते. व परिणामी त्यांना शाळा सोडून घरीच बसावे लागते.

12) **प्रशिक्षित शिक्षक समस्या:** आजही आपण पाहतो की, बऱ्याचशा शिक्षकांचीच गुणवत्ता निकृष्ट दर्जाची असलेली दिसून येते. प्रशासनाद्वारे वारंवार प्रशिक्षणे देवूनही त्यात फारसा बदल होतांना दिसत नाही, कारण इथे प्रशासकीय यंत्रणाच दोषपूर्ण असल्याचे जाणवते. कारण इथे प्रत्यक्ष गुणवत्तेपेक्षा कागदी घोड्यांनाच जास्त महत्व दिले जाते.

13) **गळती व स्थगिती:** ही सर्वात मोठी समस्या आंध आदिवासी महिलांच्या संदर्भात जाणवते. उदा.6 ते 14 वयोगटातील 85 टक्के मुले शाळेत जातात. परंतु पुढे गळतीमुळे शंभर पैकी 60 मुले चौथ्या वर्गात, 40 मुले नवव्या वर्गात तर 20 मुले अकराव्या वर्गात दाखल होतात. उच्च शिक्षणाचे प्रमाण तर विचारायलाच नको. त्यात मुलींचे प्रमाण तर नगण्यच!

14) **विवाह बंधन:** बऱ्याच मुलींना विवाह झाल्यामुळे देखील शिक्षण अर्धवट सोडावे लागते.

अशा प्रकारे वरील अनेक कारणांमुळे आंध आदिवासी महिला ह्या शिक्षणापासून वंचित राहताना दिसून येतात. आज जरी शिक्षणाचे महत्व त्यांना समजले असले तरीही अजूनही त्यांना शिक्षण क्षेत्रात म्हणावी तशी प्रगती साधता आली नाही. परिणामी गोंड आदिवासी महिला आजही शैक्षणिकदृष्ट्या मागासलेली दिसून येते.

उपाय योजना:

1. आदिवासी भागातील शैक्षणिक सुविधांचा दर्जा सुधारणे.
2. शिक्षणविषयक जागृती व प्रचार करणे.
3. विद्यार्थीनी व पालकांच्या मनात सुरक्षेविषयी विश्वास निर्माण करणे.
4. मुलींसाठी उच्चशिक्षण व वस्तीगृहांची व्यवस्था करणे.
5. आश्रमशाळांचा दर्जा सुधारणे.

निष्कर्ष:

1. आंध आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असून त्याचे कारण दैनंदिन घरकाम व शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा हे आहे.
2. आंध आदिवासी महिलांना अनेक शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागते, त्यामध्ये पालकांचे अज्ञान, दारिद्र्य, गावात उच्च शिक्षणाची सोय नसणे, आश्रम शाळेचा निकृष्ट दर्जा, अपुरी शिष्यवृत्ती, दोषपूर्ण प्रशासकीय व्यवस्था, वस्तीगृहांचा अभाव, विवाह बंधन इ.

संदर्भसूची:

- धुमाळे, वि. (2016), *'आंध आदिवासी जमात, इतिहास व सांस्कृतिक वारसा'*, पुणे. सुवर्ण प्रकाशन.
- Census-2011
- Shukla, S. (1993), *Aliens in the own Home*, The Hindu.
- साळुंके, सं. (2002), *'गोंड'*, औरंगाबाद.संवेदन प्रकाशन.

*जि.प.कें.प्रा.शाळा, शिवनी

**संशोधक मार्गदर्शक, दिगंबरराव बिंदू महाविदयालय भोकर

***

भारतीय समाजातील दिव्यांगांचे प्रश्न : एक सामाजिक अध्ययन.

*डॉ.प्रभाकर गायकवाड

१.१ गोषवारा :

भारतात-महाराष्ट्रात अचूक अशी दिव्यांग व्यक्तींची गणना आढळून येत नाही. त्यामुळे अपंगत्वानुसार, वयोमानानुसार, गरजेनुसार, वार्षिक उत्पन्नानुसार दिव्यांग कल्याणकारी योजनांचे नियोजन करून कायमस्वरूपी पुनर्वसनाचे कार्यक्रम राबवणे शक्य झालेले नाही. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायजेशन (NSSO)च्या २०२१ मधील (स्वातंत्र्यानंतर ५२ वर्षांनंतर. तोपर्यंत अपंगांची दखल घेतली नव्हती.) जनगणनेनुसार, भारतात फक्त २.१९ कोटी अपंग व्यक्ती होत्या. म्हणजे एकूण लोकसंख्येच्या २.१३ टक्के. महाराष्ट्रात २९,५९,३९२, म्हणजे एकूण लोकसंखेच्या २.६३ टक्के इतकी अपंगांची लोकसंख्या आहे. यात ५१ टक्के हालचालीत अपंगत्व असलेले आहेत; त्यामुळे या शोध निबंधात भारतीय समाजातील दिव्यांग व्यक्तीच्या प्रश्नांवर भर देण्यात आलेला आहे. इतर प्रकारच्या दिव्यांगांना लोकशाही व्यवस्थेतील समान संधी व संपूर्ण सहभाग याबाबतची माहिती तत्संबंधी कार्य करणाऱ्या संस्थांकडून मिळवणे जरुरीचे आहे. प्रत्यक्षात या योजनांची माहिती ग्रामीण भागात योग्य रीतीने पोहोचलेली नाही. जे लाभ घेतात, त्यातील अनेकांचे अपंगत्वाचे दाखले चुकीचे असतात. अपंगत्वाचे दाखले देण्याच्या पद्धतीत अनेक त्रुटी आहेत. थोडक्यात, या योजना कागदोपत्री असून, ग्रामीण भागातील ७५ टक्के दिव्यांग या योजनांचा लाभ मिळत नाही. ज्यांना लाभ मिळतो, त्यांना बऱ्याच वेळा त्याची किंमत देणे भाग पडते. सामान्य अपंगापर्यंत हा कायदा आजही पोहोचलेला नाही. तसेच, त्यातील कलमाची अंमलबजावणी किती झाली, किती होणे बाकी आहे, याचे अहवालही सादर झालेले नाहीत. अंदाजपत्रकात अपंगांसाठी केलेली तरतूद पुरेशी आहे का? तरतुदीप्रमाणे खर्च झाला का? न झाल्यास त्याची कारणे शोधणे व उपाययोजना करणे तसेच या कामी दिव्यांग व्यक्तींना सहभागी करून घेणे, या गोष्टी अभावानेच झालेल्या दिसतात. अपंग कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली असती, त्यासाठी सुसूत्र अशी योजना करून त्याची अंमलबजावणी अपंगांचा सहभाग घेऊन केली असती, तर भारतीय दिव्यांग आजच्या हलाखीच्या अवस्थेत नसते. प्रत्यक्षात स्वातंत्र्याच्या पाऊणशे वर्षानंतरही भारतातील बहुसंख्य दिव्यांग व्यक्तींची स्थिती जगण्यापेक्षा मरण बरे, अशी आहे. परिणामस्वरूप दिव्यांग व्यक्तींची प्रतिकूल स्थितीची कारणे शोधण्याची गरज आहे.

महत्वाचे शब्द :

वयोमान, अस्थिव्यंग, कल्याणकारी, पुनर्वसन, लोकशाही व्यवस्था, ग्रामीण भाग, अंदाजपत्रक इत्यादी.

१.२ प्रस्तावना :

राजकीय पक्षांतर्फे अपंगांसाठी कार्य करीत असल्याचे दर्शवले जात आहे. पण त्यासाठी एकतर फक्त स्वत:च्याच पक्षातील व्यक्तीपुरते ते मर्यादित असते किंवा तो फक्त प्रसिद्धीसाठी स्टंट तरी केला जातो. आज महापालिकेतर्फे अपंगांसाठी असलेला ३ टक्के निधी या अपंगांना मिळत नाही. याची कारणे शोधली पाहिजेत. त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्रात असलेल्या पुनर्वसनाचा प्रश्न कशा प्रकारे सोडवण्याचे प्रयत्न झाले तेही अच्छे दिन आणण्याचे स्वप्न रंगवणा-या शासनातर्फे जाहीर झाले पाहिजे. अपंग व्यक्तींच्या साहाय्यासाठी स्वतंत्र कायदा आहे. या कायद्याची शासनातर्फे किती अंमलबजावणी झाली? महापालिका क्षेत्रात अशा व्यक्तींचा शोध घेऊन किती साहाय्य देण्यात आले? शिवाय ज्या राष्ट्रीय अपंग विकास महासंघात आघाडीचे कार्यकर्ते वावरतात, अपंगांसाठी ते खरोखर काय काम करतात, याचीही चौकशी होणे महत्त्वाचे आहे.

दरवर्षी अपंगांना वाटप होणारे धान्य कुठून आणले हेही जाहीर झाले पाहिजे. एकूणच अपंगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. अपंगांसाठी राज्य अपंग वित्त विकास मंडळ, राष्ट्रीय विकलांग वित्त विकास महामंडळ यांच्यामार्फत अनेक योजना कार्यान्वित आहेत. अपंग व्यक्तीच्या स्वयंरोजगारासाठी अपंग कल्याण आयुक्तामार्फत २५

हजारांपर्यंत बीज भांडवल देण्याची योजना आहे. त्यातून कल्याणातील किती अपंगांना साहाय्य मिळाले? अपंगत्वाचे अनेक प्रकार आहेत. त्यात पूर्वी पोलिओमुळे मोठ्या प्रमाणावर शारीरिक व्यंग निर्माण होत असते. अलीकडे पोलिओचे उच्चाटन करण्यात यश आले आहे. अर्धांगवायूमुळेही अपंगत्व येते. अलीकडच्या काळात अपघातांमुळे अपंगांची सख्या वाढत आहे. अशा व्यक्ती कुटुंबाला बोजा वाटू लागतात. शासनाच्या योजनांमुळे त्यांचे पुनर्वसन होऊ शकते, पण या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचूच शकत नाहीत. याचे कारण शासन यंत्रणेतील अधिका-यांचा या अपंगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन. तो प्रथम बदलणे गरजेचे आहे, हे कल्याण महापालिकेच्या अनुभवातून स्पष्ट होते. अपंगांना साह्य करण्यासाठी शासनाच्या आदेशान्वये महापालिकेच्या अर्थसंकल्पात दरवर्षी ३ टक्के निधीची तरतूद केली जाते. मात्र तो निधी खर्च केला जात नाही. अपंगांसाठी विविध कार्यक्रम केले जातात, पण तो देखावाच ठरतो.

सत्तारूढ पक्षाला पुन्हा सत्तेत येण्यासाठी आपण काही भव्यदिव्य करावे, एखादे मोठे काम घेऊन मतदारांसमोर जावे, अशी स्वप्ने पडू लागली आहेत. स्मार्ट सिटी हे त्यातलेच एक स्वप्न आहे. त्यासाठी पूर्व तयारी म्हणून अतिक्रमणे, रस्त्यातील अडथळे, स्टेशन परिसरातील टप-या उचलण्याचे काम केले. त्यात ज्याप्रमाणे फेरीवाल्यांना हटवण्याचा फार्स केला, त्याचप्रमाणे महापालिकेने अपंगांना दिलेल्या टप-याही हटवण्यात आल्या. त्यामुळे आज अनेक अपंगांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. सुमारे एक हजार अपंगांनी आपणास स्टॉल मिळावे म्हणून अर्ज केले आहेत. काही वर्षापूर्वी महापालिकेने अपंगांसाठी स्टेशन परिसर तसेच शहरातही अन्य भागात स्टॉल्स बांधून दिले होते. स्मार्ट सिटीच्या नावाखाली ते काढण्यात आले. शिवाय या अपंगांच्या आज अनेक समस्या आहेत. रामनाथ सोनावणे महापालिकेत आयुक्त असताना आपंगांचे राज्यस्तरीय अधिवेशन अपंग विकास महासंघाने आयोजित केले होते, तेव्हापासून कल्याणातील अपंगांच्या समस्यांचा पाठपुरावा केला जात असला तरी प्रशासनाकडून त्याची दखल घेतली जात नाही. याला महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी यांची निष्क्रियता म्हणायची की त्यांना अपंगांबद्दल काही आत्मीयता वाटत नाही असे म्हणायचे! या आठवडय़ातच याचा निषेध म्हणून महापालिकेत अपंगांनी ठिय्या आंदोलन केले. दिव्यांगाबद्दल केवळ सहानुभूती न दाखवता त्यांना मार्गदर्शन, उत्तेजन देऊन साहाय्य केले तर ते दुस-यावर बोजा न होता स्वत:च्या हिमतीवर कर्तृत्व दाखवू शकतात, हे भरतनाटय़म् या नृत्याने कला क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण करणा-या अभिनेत्री सुधा चंद्रन यांच्यासह अनेकांनी सिद्ध केले आहे.

१.३ संशोधनाचा उद्देश :

१. दिव्यांग व्यक्तींच्या शारीरिक स्थितीचे अध्ययन करणे.
२. दिव्यांग व्यक्तींच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.

१.४ संशोधनाचे महत्व :

प्रस्तुत संशोधनात भारतातील दिव्यांग व्यक्ती समोरील असणारी आव्हाने व समस्या यांचे अध्ययन करण्यात आले आहे.

१.५ संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात विविध संदर्भ ग्रंथ, अहवाल व वर्तमानपत्रे यांचा माहितीचा स्रोत म्हणून वापर करण्यात आला असून संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक या संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आला आहे.

१.6 दिव्यांग व्यक्तिंसमोरील समस्या व आव्हाने :

२००१ च्या जनगणनेनुसार, भारतात २.१९ कोटी अपंग व्यक्ती आहेत म्हणजे एकूण लोकसंख्येच्या २.१३ टक्के. ह्यामध्ये अंध, बहिरे, मुके, मर्यादित हालचाली करू शकणारे (लोकोमोटर) आणि मानसिक समस्या असलेले लोक समाविष्ट आहेत. अशा अपंग व्यक्तींपैकी ७५ टक्के ग्रामीण भागात राहतात. ४९ टक्के साक्षर आहेत तर ३४टक्क्यांकडे रोजगार आहे. आतापर्यंत अशा व्यक्तींचे वैद्यकीय दृष्टीने पुनर्वसन करण्याचा विचार केला जात असे मात्र आता

सामाजिक पुनर्वसनावर जास्त भर देण्यात येत आहे. भारताच्या राज्यघटनेनुसार सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य, न्याय आणि प्रतिष्ठेचे आश्वासन देण्यात आले आहे व ह्यामध्ये अपंग नागरिकांचाही अर्थातच निर्विवाद समावेश आहे. तसेच घटनेनुसार अपंगांच्या सक्षमीकरणाची थेट जबाबदारी राज्य सरकारांवर सोपवण्यात आली आहे. घटनेच्या २५३ व्या कलमातल्या संघराज्य सूचीतील १३ क्रमांकाच्या मुद्दयामध्ये अधिनियमित केले आहे की "अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांची सुरक्षा आणि संपूर्ण सहभाग) कायदा, १९९५" नुसार अपंगांना समान संधी मिळेल तसेच राष्ट्र-उभारणीच्या कार्यात त्यांचा संपूर्ण सहभाग राहील. जम्मू-काश्मीर वगळता हा कायदा भारतभर लागू आहे. जम्मू-काश्मीरमध्ये अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांची सुरक्षा आणि संपूर्ण सहभाग) कायदा, १९९८" अधिनियमित केला आहे.विविधांगी सहकार्यात्मक विचाराने, सर्व संबंधित सरकारी विभागांना म्हणजे केंद्र सरकारमधील मंत्री, राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय व राज्यीय महामंडळे, स्थानिक व अन्य उचित प्राधिकरणे ह्यांना सामील करून ह्या कायद्यातील विविध तरतुदींच्या कार्यान्वयनाच्या दृष्टीने पावले टाकण्यात येत आहेत.

अपंग व्यक्तींना त्यांच्या शारीरिक दुर्बलतेमुळे त्यांचे दैनंदिन व्यवहार करण्यात, नित्यकर्मे करण्यात अनेक अडचणी येतात. रोजच्या जगण्यात त्यांना अनेक तडजोडी कराव्या लागतात. एखादी गोष्ट करण्यासाठी सामान्य व्यक्तीपेक्षा अपंग व्यक्तीला अधिक परिश्रम घ्यावे लागतात, अधिक ऊर्जा खर्च करावी लागते. एके काळी असे मानले जात हेते, की वैद्यकीय शास्त्राच्या प्रगतीबरोबर जगातील रोगराई आणि अपंगता नष्ट होईल. परंतु आज तरी अशी स्थिती आहे, की मृत्युमान कमी झाले असले, तरी अपंगता त्या प्रमाणात कमी झालेली नाही. इथेच असमर्थता आणि अपंगता यांच्यातील फरक लक्षात घ्यायला हवा. असमर्थता ही प्राथमिक स्वरूपाची असते आणि तिच्यामधून अपंगता निर्माण होते. डोळे नसल्यामुळे योणारी असमर्थता फक्त डोळयांच्या जगातच अपंगता ठरते. एखादा अंध मुलगा सभोवतालच्या वातावरणात कुतूहलाचा आणि दयेचा विषय होतो.परंतु अंधशाळेमध्ये त्या मुलाविषयी कोणालाच कृत्रिम सहानुभूती अथवा दया नसते. त्यामुळे अंधशाळेमध्ये हा मुलगा मनाने सुरक्षित असतो. अर्थातच त्याचे हे समाधान खोटे आणि कृत्रिम असते. या अंध मुलाला केव्हा ना केंव्हा तरी डोळसांच्या समाजात परत जावयाचे आहे, हीच दृष्टी योग्य आणि शास्त्रीय आहे. सारांश, अपंगता आणि अपंगांचे पुनर्वसन हे प्रश्न सामाजिक आहेत. अपंगतेच्या विविध प्रकारांमुळे अपंगांना शिकविणाऱ्या शिक्षकांच्या, शैक्षणिक प्रशासकांच्या आणि नियोजकां- च्या पुढे नवे नवे प्रश्न उभे राहत आहेत. अपंगतेमुळे व शाळेच्या वातावरणाशी समरस न झाल्यामुळे मुलाच्या शारीरिक आणि मानसिक गरजांनुसार शिक्षणाचेच वळण बदलावे लागते; काही वेळा मुलाची अपंगता तीव्र असल्यामुळे त्याला शाळेत येता येत नाही, अशा वेळी त्यास घरीच शिकवावे लागते. काही मुलांना त्यांच्या दुर्बलतेनुसार विशेष वैद्यकीय आणि शैक्षणिक उपचार करावे लागतात. काही अपंग मुले सामान्य शाळेच्या चौकटीत बसत नाहीत, म्हणून त्यांच्याकरिता वेगळया शाळा काढव्या लागतात. अंपंगांच्या शिक्षणाचे हे सारे प्रश्न अभ्यासून त्यांच्या शैक्षणिक प्रमेयांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न अलीकडे होत आहे. शिक्षकांची श्रेणी, शालेय व्यवस्था आणि शैक्षणिक नियोजन अशा साकल्यात्मक दृष्टिकोनातून अपंगांचे शिक्षण वा पुनर्शिक्षण यांचा विचार करावयास हवा, अशी जाणीव निर्माण होऊ लागली आहे.

अपंगतेचा प्रकार कोणताही असो, शिक्षणाचे तंत्र वा साधन कोणतेही असो, अपंगाचे शिक्षण हा एक स्वतंत्र शिक्षणसंप्रदाय आहे. जेथे शक्य असेल तेथे वैद्यकीय उपचार, शिक्षण व पुनर्वसन ह्यांच्या द्वारा अपंग अवयवांची अथवा इंद्रियांची शक्ती पुन्हा वाढीला लावली पाहिजे. ते शक्य नसेल, तर त्या शक्तीची जागा भरून काढण्यासाठी व्यवस्था केली पाहिजे. हे शिक्षण मुलांच्या गरजेनुसार आणि अशा मानसशास्त्रीय पद्धतीने दिले गेले पाहिजे, की मुलाच्या

मनातील सारे गंड आणि विकृती निघून जाव्यात. मुलाला समाजात पुन्हा अर्थार्जन करणारा स्वावलंबी घटक म्हणून परत जाता यावे, ह्यासाठी शैक्षणिक दृष्ट्या करण्यात आलेले प्रयत्न जरी संख्येने थोडे असले, तरी सामाजिक प्रतीक म्हणून त्यांना महत्त्व आहे. प्रत्येक अपंग मुलाची रोगमुक्त, स्वावलंबी आणि स्वतंत्र होण्याची इच्छा असते. अपंग मुलांची हळुवार देखरेख, शारीरिक स्वास्थ, मनोरंजन, सुंदर वातावरण सारे एकत्र केले, तरी अशा मानसिक स्वातंत्र्याची सर त्यांना येणार नाही. अपंगतेमुळे येणारे वैफल्य, निराशा, आलस्य ह्यांच्या जखडबंदीतून अपंग मुलांची मुक्तता करण्याचे कार्य शिक्षकाला करावे लागते. अनुभव हा एक शिक्षक असतोच, तथापि मुलाची अनुभव घेण्याची तयारी आणि त्यासाठी शिक्षकाने उपलब्ध करून दिलेली संधी ह्यांचा मेळ बसावा लागतो. शिक्षक मुलासाठी अनुभवांचे प्रचंड विश्व उभे करू शकतो. हे विश्व उभे करण्यासाठी वेगवेगळे मनोरंजक, आकर्षक आणि कल्पक खेळ, शिक्षणसाधने, नाट्य, हस्तकला, वनविहार इत्यादींचा उपयोग शिक्षक करतो. ह्या छोट्याछोट्या अनुभवांतून मुलाच्या मनातील पारतंत्र्य आणि परावलंबन नाहीसे होते आणि मूल स्वतंत्र- पणे व आत्मविश्वासाने जीवन जगू शकते. सर्वमान्य अशी अंधत्वाची व्याख्या अजूनही निश्चित नसल्यामुळे अंधांची नक्की संख्या किती ह्याचा अंदाज करणे कठीण आहे. संपूर्ण अंध व्यक्ती व सर्वसाधारण दृष्टीच्या एकदंशांश इतकीच दृष्टी असलेल्या व्यक्ती यांची अंध व्यक्तींत गणना करण्यात येते. डोळयात फूल पडणे, तसेच डोळयातील तंत्रिका, कनीनिका या भागांच्या विकारांमुळे अंधत्व आलेल्या व्यक्तींची संख्या विकसित देशांत अधिक आढळते. अविकसित देशांत मुख्यतः देवी, खुपऱ्या व स्वच्छमंडलाची मृदुता या विकारांमुळे अंधत्व प्राप्त झालेल्यांची संख्या अधिक आहे. समकालीन जीवनातील विविध प्रवाहांत अंध मुलांना सहभागी करणे, हे अंधांच्या शिक्षणातील महत्त्वाचे तत्त्व समजले जाते. कारण ह्या प्रवाहात मिसळण्याच्या सौख्याला अंध मुले पारखी झालेली असतात. डोळस मुलांचे शिक्षण व अंध मुलांचे शिक्षण ह्यांत फारसे भिन्नत्व नाही. परंतु शिक्षणात वापरण्यात येणारी साधने व पद्धती ह्यांत स्पष्टपणे भिन्नत्व दिसून येते.

डोळस मुले जेव्हा प्रथम शाळेत दाखल होतात, त्यावेळी आपणाबरोबर एक मोठे अनुभवाचे विश्व ती घेऊन येतात. डोळस मूल आणि शिक्षक यांच्यामध्ये समान अनुभवाचे फार मोठे भांडवल असल्यामुळे शिक्षक व मुले यांच्यामध्ये मन- मोकळा संबंध प्रस्थापित होऊ शकतो. डोळस मुलाला आपल्या भोवतालच्या अनेक वस्तूंचे अनुभव नकळत येत असतात. त्यामुळे प्रत्येक सामान्यनाम उच्चारताच त्यापाठीमागच्या साऱ्या आठवणी आणि अनुभव जागे होऊन मुलाच्या मनश्चक्षूंपुढे एक प्रतीक उभे राहते. घर म्हटल्याबरोबरच केवळ घराचे जड रूप नव्हे; तर त्यामागील सारे संबंध, सारी माया, सारे भावविश्व मुलाच्या मनात तरारून फुलते. ही प्रतिके, हे अनुभव आणि हे हाच भावविश्व मुलाच्या मनाचा गाभा आहे. आंधळया मुलांच्या बाबतीत ही प्रतीके पुष्कळदा अस्तित्वातच नसतात. असलीच तर ती धूसर आणि गढूळ असतात. अंधांच्या शिक्षणाची ही मोठीच समस्या असते. त्यामुळे अंध मुलांना त्यांच्या मर्यादित शक्तीच्या द्वारा का होईना, पण भोवताल- च्या जगाशी जास्तीत जास्त परिचय करण्याची संधी आणि नवीन नवीन अनुभव मिळण्याची शक्यता उपलब्ध करून दिली पाहिजे. त्या मुलांच्या अनुभव-विश्वाचा विस्तार जितका करिता येईल, तितका केला पाहिजे. बहुतेक अनुभवामागे भावना असतात आणि या भावनांच्या स्वरूपावर व तीव्रतेवर त्या त्या अनुभवाला स्मृतीत जागा मिळेल की नाही हे ठरते. प्रत्येक मुलाला भावजीवनाच्या काही प्रवृत्ती व प्रेरणा जन्मजात आलेल्या असतात. शिक्षण आणि संस्कार यांच्या द्वारा ह्या प्रवृत्तींना आकार येत असतो. अंधपणाचा भावजीवनावर काय परिणाम होतो, हे निश्चितपणे अजून मोजता येत नाही. तथापि सर्वसाधारण मुलांमध्ये दिसणारे सर्व भावनाविष्कार अंध मुलांतही दिसतात. अंध मुलांच्या शाळा वेगवेगळया असल्यामुळे तेथील शिक्षकांवर मोठीच जबाबदारी येऊन पडते. भोवतालच्या समाजाचे प्रतिनिधी म्हणून डोळस शिक्षकांना भोवतालच्या जगातील विचार, अनुभव, आणि भावना अंध

मुलांच्यापर्यंत पोहोचवाव्या लागतात. विशेषत: अंध मुले वाढू लागली व कुमारवयात आली म्हणजे हा प्रश्न अधिकच तीव्र होत जातो.

मूक–बहिऱ्या मुलांचे प्रश्न मुख्यत: श्रवणहीनता आणि वाचाहीनता ह्यांतून निर्माण झालेले असतात. मूक-बहिऱ्या मुलांना समोर एखादी वस्तू दिसत असते, परंतु त्या वस्तूला काय म्हणावयाचे, तिचे वर्णन कसे करावयाचे आणि तिच्यासंबंधी ज्ञान कसे प्राप्त करावयाचे, हा त्यांच्या समोरील मोठा अवघड प्रश्न असतो. मूक-बहिऱ्या मुलांच्या मानसिक प्रतिक्रिया होत असाव्यात, परंतु त्यांना शब्दांचा आकार देता येत नसावा. बहिरेपणामुळे वाचा जाणे हीच काही मूक–बहिऱ्या मुलांच्या बाबतीत येणारी सर्वांत मोठी अपंगता नव्हे, त्याहून मोठी अपंगता त्यांच्या शिक्षणात आणि जीवनविकासात निर्माण होत असते. मुलाच्या वयाच्या पहिल्या सहा वर्षांपर्यंतचे शिक्षण मुख्यत:श्रवणेंद्रियाद्वाराच होत असते. चांगले ऐकू शकणारे मूल वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत सुमारे दोन हजार शब्द समजू शकते. त्यांचा अर्थ त्याला चांगला कळतो आणि त्यांतील पुष्कळसे शब्द मूल वापरूही शकते. ह्या शिक्षणाला आणि विकासाला बहिरे मूल पारखे असते. निरनिराळ्या वस्तूंचे नावे बहिऱ्या मुलाला माहीत नसतात, इतकेच नव्हे, तर वस्तूंना नावे असू शकतात, हीच जाणीव त्याच्या मनात जागृत झालेली नसते. फक्त आपल्या शारीरिक गरजांपुरत्या खुणा, आविर्भाव अगर हावभाव ही मुले करू शकतात. भोवतालच्या समाजाशी संबंध प्रस्थापित करण्याचा त्यांचा तो एक अत्यंत तोकडा प्रयत्न असतो. वस्तुबोधापेक्षा खरी अडचण उभी राहते, ती कल्पना आणि भावना यांच्या प्रकटीकरणाची आहे.

सुलभ सुट्टयांचे विशेषज्ञ एनेबल ट्रॅव्हल यांनी मुंबई व दिल्ली येथे केलेल्या सर्वेक्षणात अपंगत्व असलेल्या ९० व्यक्तींची मुलाखत घेतली. त्यात, व्हीलचेअर वापरणा-या ३० व्यक्ती, ३० कर्णबधिर व्यक्ती आणि ३० अंध व्यक्ती होत्या. या मुलाखतीमधून प्रामुख्याने दिसून आले की, इतर सर्व लोकांप्रमाणेच, अपंगत्व असलेल्या व्यक्तींमध्येही प्रवास करायची तीव्र इच्छा असते. तथापि, त्यांच्याही काही विशिष्ट गरजा आहेत, याकडे निराळ्या दृष्टिकोनातून पाहिले जावे, असे या पर्यटकांना वाटते. एनेबल ट्रॅव्हलच्या सर्वेक्षणात, प्रवासाची इच्छा, निर्णय घेण्याची प्रक्रिया आणि अपंगत्व असलेल्या व्यक्तींसमोर येणारे प्रश्न यांचाही अंदाज घेण्यात आला आणि त्याचवेळी, पर्यटनक्षेत्रांचे घटक असलेले – विमानतळ, रेस्टॉरंट्स, ट्रान्सपोर्ट कंपन्या, टूर लीडर्स, गाईड्स, पर्यटन आकर्षणे आणि सांस्कृतिक संस्था या सर्वांना, प्रवासाबाबत अपंग व्यक्तींची आवड विचारात घेऊन, त्यांनाही पर्यटन सोहळ्यामध्ये समाविष्ट करण्याबाबत एक अंतरदृष्टीही देण्यात आली आहे.

एनेबल ट्रॅव्हलचे प्रमुख देबोलिन सेन म्हणाले, 'अपंगत्व असलेल्या लोकांच्या प्रवासाविषयक गरजा जाणून घेण्याकडे बहुतांशी दुर्लक्षच झाले आहे. या क्षेत्रामधील लोकांची पसंती आणि आशा-आकांक्षा यांच्याकडे दुर्लक्ष करणे, आपण एक समाज म्हणून विचार करण्याची वेळ आता आली आहे. अशा व्यक्तींसमोर येणा-या निरनिराळ्या, शारीरिक, सामाजिक व पूर्वग्रह यांपासून त्यांना मुक्त करण्यासाठी मदत केली पाहिजे. हे सर्वेक्षण काही प्रमाणात, अशा प्रवाशांच्या आशा आकांक्षा व दृष्टिकोन अधोरेखित तर करतेच, पण त्याचबरोबर एका केंद्रीकृत दृष्टिकोनातून, अशा प्रवाशांना प्रवास करताना येणा-या निरनिराळ्या अडचणीही अधोरेखित करते. या सर्वेक्षणात, मागील एका वर्षामध्ये किमान दोन ट्रिप्स केलेल्या व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि त्यामधून, निरनिराळ्या प्रकारची अपंगत्वे असलेल्या लोकांच्या गरजाही ठळकपणे दिसून आल्या. अपंगत्व असलेल्या लोकांना प्रवास करण्याची खूप इच्छा असते, पण त्याबाबतच्या माहितीचा अभाव हीच त्यातली एक मोठी अडचण आहे, असा एक अहवाल सांगतो. अधू दृष्टी असलेल्या प्रवाशांपैकी ९०% प्रवासी पूर्वनियोजित सहल पसंत करतात. व्हीलचेअरलाच खिळलेल्या प्रवाशांपैकी ९०% प्रवासी, जिने असलेल्या रेस्टॉरंट्सना पसंती देत नाहीत. कर्णबधिर असलेले १०० % प्रवासी त्यांना आवश्यक असलेले व्हिज्युअल ॲलर्ट्स असलेली हॉटेल्सच पसंत करतात.

दिव्यांगांच्या भावाबहिणींना या अपंगत्वाची झळ आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सोसावीच लागते. लहानपणी हे शारीरिक विकलांगत्व समजून घेणे, आपल्या विकल भाऊ अथवा बहिणीसोबत त्यांच्या मनोदशा व शारीरिक क्षमतेचा समतोल साधत संवाद साधावा लागतो, त्यांच्यासोबत खेळावे लागते. त्यांच्याही मनात अनेक अनुत्तरित प्रश्न असतातच. त्यांचे मित्रही या विकलांगतेबद्दल त्यांना बोलतात. पण या वयात जिज्ञासेमुळे ते बोलत असतात. वेळीच त्यांना सत्य परिस्थिती सांगितली तर दिव्यांग मुलांना ते खूपच चांगल्या पद्धतीने समजून घेऊ शकतात. आणि त्यांच्या सकारात्मक सहवासाने दिव्यांगांतही लक्षणीय सुधारणा दिसून येते. पाश्चिमात्य देशात सामान्य-असामान्य, स्वावलंबी-परावलंबी, विकलांग-दिव्यांग असे वर्गीकरणच नाही. फक्त त्यांच्या शारीरिक क्षमतेच्या कमतरतेमुळे त्यांना जास्तीत जास्त सुविधा देऊन त्यांचे जीवन सामान्य करण्याकडे तेथील सरकारचा कल असतो. तेथे जन्माला आलेला प्रत्येक जीव म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असून तो देशाचा सन्माननीय नागरिक आहे आणि त्याला त्याचे सर्व अधिकार मिळायला हवेत, हे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे विकलांग-दिव्यांगांना अथवा त्यांच्या पालक व भावाबहिणींना तेथे सहजसोपे जगता येते. या उलट आपल्याकडे परिस्थिती आहे. विकलांगांबद्दल सहानुभूती वाटणे, त्यांना मदत करणे हा सामाजिक सेवेचा एक राजमान्य मार्ग आहे. निखळ सत्य फार विपरीत आहे. आज ज्या काही संस्था, व्यक्ती अशा दिव्यांगांकरता काम करत आहेत, त्यांच्या घरात असे दिव्यांग आहेत म्हणूनच. अन्यथा या प्रश्नाकडे मुद्दाम किंवा निखळ समाजसेवेच्या भावनेने कुणीच वळत नाहीत. विवाहप्रसंगी तर दोन घराणी जोडली जाणार असतात. ज्या घरात दिव्यांग व्यक्ती आहे तेथील सुशिक्षित, संपन्न विवाहोत्सुकांशी संबंध प्रस्थापित करायला शक्यतो कोणी तयार होत नाही. (याला काही अपवाद आहेत.) विकलांग मूल घरात असेल व त्याच्या भावाच्या विवाहाचे वेध घराला लागलेले असतील व भावाची नोकरी, शिक्षण, मिळकत, सर्व चांगले असूनही मुलीकडचे लोक व स्वत: मुलगी हा विवाह ठरवताना अनावश्यक अटी घालतात. त्यात लग्नानंतर विभक्त राहणे, विकलांगास हॉस्टेलमध्ये ठेवणे, भविष्यात त्याच्यासह आईवडिलांशी संबंध न ठेवणे याचा विशेषत्वाने आग्रह असतो. क्वचित एखादी मुलगी अटी न घालता विवाह करून अशा घरात आलीच तर ती अपंग व्यक्तीची जबाबदारी स्वीकारत नाही. घरात समरस न होता अलिप्त राहून परावलंबी व्यक्तीवरून घरातल्या सर्वांनाच मन:स्ताप होईल, असे बोलते. आपल्या अपंग मुलामुळे ही समस्या निर्माण झाली, ही जाणीव पालकांना अस्वस्थ करते. सामान्य, निर्व्यंग मुलाच्या संसारात या कारणाने रोजच्या कटकटी नको, म्हणून पालक आपल्या अपंग मुलाला घेऊन वेगळे राहण्याचा निर्णय घेतात. पर्यायाने लहानपणापासून आपल्या निष्पाप व परावलंबी भावाबद्दल वाटणारे प्रेम हृदयाच्या कप्प्यात बंदिस्त करून निर्व्यंग विवाहित भावाला आपला संसार सांभाळण्यास प्राधान्य द्यावे लागते. परिस्थितीमुळे आपल्या अपंग भावाचा व आईवडिलांचा सांभाळ त्याला करता येत नाही. विकलांग मुलांच्या बाबतीतले हे अनुभवच जीवघेणे वाटत असले तरी ते काहीसे सुसह्यच म्हणावे लागतील, कारण घरात जर दिव्यांग मुलगी असेल तर परिस्थिती फारच बिकट व कष्टप्रद असते. महत्त्वाचे म्हणजे, आजकाल लग्नानंतर शक्यतो कोणीच एकत्र कुटुंबात राहात नाहीत. सणवार, मंगलकार्य अशा काही कारणाने काही काळ एकत्र येतात. मात्र दिव्यांग व त्याच्या कुटुंबाचा यातही संपूर्ण सहभाग नसतो. त्यामुळे ते समाज, स्नेही, आप्तस्वकीयांपासून तसेही दुरावतातच. दिव्यांगांसह त्यांचे पालक व इतर भावंडे एका अतूट बंधनाने एकमेकांशी दृढ नाते टिकवून असतात. ही भावनिक नाळही भावाबहिणीच्या विवाहानंतर तुटते. समाजाच्या मनातले ग्रहच दिव्यांग व त्याच्या कुटुंबाच्या आयुष्यातल्या सुखाचे कारक असतात. दिव्यांग असलेल्या घरात नवीन नातेसंबंध जोडायचे की नाही? घरातल्या उपवर मुलामुलींच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक योग्यतेचा विचार स्वतंत्र करायचा की, दिव्यांगांशी त्याची सांगड घालायची, हे फक्त समाजमनाच्या ग्रहांवर अवलंबून असते. हे सर्व अनुभव ज्या घरात दिव्यांग व उपवर मुलेमुली आहेत, तेच खऱ्या अर्थाने जाणू शकतात. जे अपवादाचे धनी ठरले व ज्यांना आयुष्यात माणुसकी व सहिष्णू असलेले लोक प्रत्येक वळणावर भेटले, ते भाग्यवान. अन्यथा शारीरिक दिव्यांगांसोबत तहहयात असे मानसिक दिव्यांगत्व आणि त्याच्याशी संघर्ष हेच वास्तव असते.

आज भारतात तीन करोड दिव्यांग आहेत, असे सरकारी जनगणनेच्या नोंदींवरून सांगण्यात येते. याशिवाय ज्यांची शिक्षण, व्यवसाय यात सहभाग नसल्यामुळे कुठेच नोंद नाही, असे अजून किती तरी दिव्यांग येथे आहेत. मात्र इतक्या प्रचंड संख्येने असलेल्या या विकलांगांच्या समस्या व प्रश्न शासन दरबारी अजूनही लाल फितीत अडकलेले आहेत. हळूहळू यात आता सुधारणा होताना दिसते. हा बदल निश्चितच आशादायक व स्वागतार्ह आहे. मात्र कुठल्याही प्रकारचे दिव्यांग मूल ज्या घरात असते त्यांना प्रत्येक दिवशी वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावर नव्या आव्हानांना सामोरे जावे लागते. दिव्यांग मूल असलेल्या पालकांना प्रश्नांना सामोरं जावंच लागतं, पण असं भावंडं असलेल्या त्या कुटुंबातल्या सामान्य मुलांच्याही काही समस्या भेडसावतात. याचं स्वरूप बालपणीच्या भावनिक स्तरापासून ते विवाह आणि विवाहउपरांत आयुष्य असं व्यापक पातळीपर्यंत दिसून येतं.

१.७ निष्कर्ष :

१. दिव्यांग व्यक्तींना विविध प्रकारच्या शारीरिक कमतरतेमुळे जीवन जगत असताना अनेक प्रकारचे शारीरिक अडथळेयेत असल्याचे दिसतात.

२. दिव्यांग व्यक्तींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन नकारात्मक स्वरूपाचा असल्याचे दिसते.

३. सामाजिक जीवनात दिव्यांग व्यक्तींना आत्मसन्मान व प्रतिष्ठा यांचा काही प्रमाणात अभाव असल्याचे दिसते.

४. दिव्यांग व्यक्तींसाठी शासनाने राबविलेल्या योजना व कार्यक्रम यांच्यात अनेक प्रकारच्या उणिवा असल्याचे दिसते.

५. अनेक दिव्यांग व्यक्तींना आर्थिक बाबतीत दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने त्यांच्यात काही प्रमाणातमानसिक नैराश्य आल्याचे दिसते.

१.८ उपाययोजना :

1) दिव्यांग व्यक्तींना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास व आत्मसन्मानाची भावना निर्माण करणे आवश्यक आहे.

2) दिव्यांग व्यक्तींच्या बाबतीत समाजाचा नकारात्मक स्वरूपाचा दृष्टिकोन सकारात्मक स्वरूपात बदलणे आवश्यकआहे.

3) दिव्यांग व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी विविध स्वरूपाचे आर्थिक कार्यक्रम व योजना राबविणे आवश्यक आहे.

4) शासकीय योजना १०० टक्के मूळ दिव्यांग लाभार्थी पर्यंत पोहचणे आवश्यक असून त्यात कोणत्याही प्रकारचा भ्रष्ट कारभार होता कामा नये.

१.९ संदर्भ :

- Rumi, A. (2020). *Rights of Person with Disability in India.*
- परमानंद,सं.(२०१८). विकलांगता का समाजशास्त्रीय अध्ययन.
- गौतम, पा.(२०२०). दिव्यांगता अभिशाप नही.
- मटानिया,आ.(२०१९). दिव्यांगता का परिचय.
- दैनिक लोकसत्ता वर्तमानपत्र, २०२०.
- सामाजिक न्याय मंत्रालय, (२०२१)महाराष्ट्र शासन अहवाल.

*सहाय्यक प्राध्यापक, शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य कॉलेज, लोहारा तालुका :लोहारा. जिल्हा : उस्मानाबाद. पिन कोड : ४१३६०८. ई-मेल आयडी : prabhakargaikwad111@gmail.com मो.७७०९२७७६५५.

***

भारतीय आदिवासी समुदायाचे बदलते सामाजिक जीवन आणि पर्यावरणाची समस्या

*प्रा.डॉ. वाल्मिक धुडकु इंदासे

गोषवारा:

मानवी समाजाची संरचना स्पष्ट करतांना या संरचनेतील एक महत्वाचा समुदाय म्हणुन आदिवासी समुदायाचा उल्लेख केला जातो. अज्ञानाच्या अंधकारात, अन्याय अत्याचाराच्या गर्तेत गटांगळया खाणा–या व प्रस्थापित व्यवस्थेकडून वंचित ठेवण्यात आलेल्या, घटनात्मक अधिकारांपासुन अजूनही ब–याच अंतरावर असणा–या भारतातील आदिवासी समुदायाच्या घटनात्मक अधिकारांवर व त्यांच्या समोर उभ्या असणा–या जीवनमरणाच्या प्रश्नांवर आज देखील विविध संशोधनाच्या पातळीवर विचार मांडले जात आहेत. स्थानिक पातळीपासुन आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत आदिवासी समुदायांच्या प्रश्नांवर, त्यांच्या विकास धोरणांवर संशोधन, चर्चासत्र, कार्यशाळांच्या माध्यमातुन चर्चा केली जात आहे.

भारतातील या आदिवासी समुदायाचा अभ्यास करता त्यांचे वास्तव्य प्राचिन काळापासुन आजतागायत दुर्गम, जंगलमय, पर्वतमय भागातच असल्याचे दिसुन येते. त्यांमुळे त्यांच्या सामाजिक–सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रावर जंगल व वनक्षेत्रांचा प्रभाव हा मोठया प्रमाणात दिसुन येतो. या अनुषंगानेच सदर संशोधन पेपर मधुन **'भारतातील आदिवासी समुदायाचे बदलते सामाजिक जीवन व पर्यावरणाची समस्या'** या विषयाच्या माध्यमातुन आदिवासी समुदायाच्या सामाजिक जीवनतील पर्यावरण आणि निर्वणीकरणाची समस्या, परिवर्तन व सर्वांगिण विकासावर चर्चा करण्यात आलेली आहे.

मुख्य संज्ञा : पर्यावरण, निर्वणीकरण, पर्यावरण संरक्षण व संवर्धन, विकास, आदिवासी विकास व पुनर्वसन.

प्रस्तावना

मानव आणि सजीवांच्या सभोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास, त्याची निरिक्षणे ही फार पूर्वीपासुन आजतागायत सुरू आहेत. या अभ्यासातुन आणि निरिक्षणातूनच पुढे पर्यावरण आणि मानव यांच्या सहसंबंधाचा अभ्यास हा विविध शास्त्रांसोबतच समाजशास्त्रातही मोठया प्रमाणात केला जात आहे.

एका बाजुला पर्यावरण हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे, ज्याच्या संरक्षणाशिवाय, संवर्धनाशिवाय मानवी अस्तित्व सुरक्षित नाही. तर दुस–या बाजुला भौतिक विकास हा देखील मानवाच्या अस्त्विासाठी, विकासासाठी गरजेचा आहे. परंतु खेदाची बाब अशी आहे की, वसाहतवादी ते जागतिकीकरणाच्या प्रवासात महत्वाची भूमिका बजावणा–या विज्ञान–तंत्रज्ञानाच्या युगाने औद्योगिकीकरणाच्या नावाखाली शाश्वत विकासाच्या गोंडस नावाखाली मोठया प्रमाणात जंगलतोड किंवा जंगल मालकीहक्क केंद्रित करत गेल्यामुळे निसर्ग व मानवी अस्तित्वाला भयंकर धोका निर्माण झालेला दिसुन येत आहे. विकासाची आधुनिक संकल्पना मांडण्यासाठी परंतु साम्राज्यवादाच्या बळावर निर्माण झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर मानव व त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणावर विचार करण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात सुरू झाले. मोठमोठे कारखाने, शेती विकासाची कारणे दाखवित मोठमोठी धरणे बांधण्यासाठी मोठया प्रमाणात जंगलतोड करण्यात आली. यातुन पर्यावरणातील समतोलपणा, मानवी आरोग्य व सामाजिक विकास यांसारख्या संकल्पना निर्माण होवून त्यांचा शास्त्रीय पध्दतीच्या आधारे समाजशास्त्र व इतर सामाजिक शास्त्रांमध्ये संशोधनात्मक स्तरावर अध्ययन केले जात आहे.

अभ्यासविषयाचे उद्दिष्ट : नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्याचा संदर्भ घेऊन–

१. पर्यावरण संरक्षण व संवर्धनात आदिवासी समुदायाचे योगदान समजुन घेणे.
२. शाश्वत विकासात आदिवासी समुदायाचे स्थान व भवितव्याची मांडणी करणे
३. निर्वणीकरणाच्या प्रक्रियेतुन आदिवासी समुदायाच्या सामाजिक जीवनातील परिवर्तनाचा व विकासाचा अभ्यास करणे.
४. आदिवासी समुदायाच्या पुनर्वसनाची समस्या समजुन घेणे

अभ्यासविषयाचे गृहितके : वन, जमीन व जंगल यांच्या हक्कांचे केंद्रिकरण व निर्वणीकरणाच्या प्रक्रियेतुन आदिवासी समुदायाचे सामाजिक जीवन खालावलेले दिसुन येते.

अभ्यासपध्दती : सदर शोधनिबंधातून निर्वणीकरणाच्या प्रक्रियेतून आदिवासी समुदायाच्या सामाजिक जीवनातील परिवर्तनाचा व त्यांच्या विकासाच्या स्थितीवर चर्चा करण्यात आलेली आहे. यासाठी क्षेत्रीय अभ्यास करण्यासाठी सहेतुक नमुना पध्दतीचा वापर

करून इगतपुरी तालुक्यातील भरवज, निरपण, दरेवाडी, सारूतेवाडी व नागोसलि या आदिवासी गावांना प्रत्यक्ष भेटी देवुन मुलाखत अनुसूचिच्या माध्यमातून माहिती मिळविण्यात आलेली आहे.

आदिवासी समुदाय व वनक्षेत्र

आदिवासी समुदाय व जंगल किंवा वनक्षेत्र यांचे घनिष्ट, अतूट असे संबंध आहे. किंबहुना, ते जंगलाचे राजे म्हणुन देखील ओळखले जातात. अगदि प्राचीन काळापासुन ते आजतागायतच्या आदिवासी समुदायाचा अभ्यास करता असे दिसुन येते की त्यांचे वास्तव्य हे आजही जंगलमय, पर्वतक्षेत्र अशा दुर्गम भागातच असल्याचे दिसुन येते. त्यांचे हे वास्तव्य एका बाजुला त्यांच्या मागासलेपणाचे मुख्य कारण मानले जाते तर दुस–या बाजुला स्वत:ची वेगळी जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठीही कारणीभूत मानले जाते.

नाशिक जिल्हयातील इगतपुरी, पेठ, सुरगाणा व त्र्यंबकेश्वर या तालुक्यातील आदिवासी समुदायाचे वास्तव्य असलेला भाग हा घनदाट जंगल, मोठमोठे डोंगर, द–यांनी व्यापलेला दिसुन येतो. या भागात राहणा–या आदिवासी समुदायाचे जीवनमान आजही त्या भागातील वनक्षेत्रावरच आधारित असल्याचे दिसुन येते. आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आजही या भागातील बहुतांश आदिवासी तेथील वनक्षेत्रावरच अवलंबुन असल्याचे दिसुन येते.

आदिवासी समुदायाच्या जीवनात जल, जंगल आणि जमीन यांना अनन्यसाधारण महत्व आहे. प्राचीन काळापासुन तर आजतागायत आदिवासी समुदायाचे वास्तव्य हे जंगल, दुर्गम भागात असल्यामुळे वनसंरक्षण व संवर्धनाची प्रबळ प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण झालेली दिसुन येते. आदिवासी समुदाय हा जंगलातुन वनौषधी, फळे–फुले, रातमेवा गोळा करून बाजारात जाऊन विकतात आणि आपली उपजिविका भागवत असतात. त्याबदल्यात ते प्रांजळपणे वनसंरक्षण व संवर्धन करत असतात.

निर्वणीकरणाची समस्या व आदिवासी समुदाय

भारताला स्वातंत्र्य मिळुन आज जवळपास ७५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. परंतु आजही आदिवासी समुदायाला जीवन जगण्याच्या मूलभुत सोयी–सुविधा मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. अजूनही उपासमार, दारिद्रय, निरक्षरता, मूलभुत शिक्षण, आरोग्य, कुपोषण, सावकारशाही, शोषण यांसारख्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे. या समस्यांपैकी जंगलविषयकची समस्या ही देखील तितकीच महत्वाची व भयंकर आहे. या जंगलविषयकच्या समस्येत वनहक्क संपुष्टात येणे, वनविभागाची मालकी व त्यांची दादागिरी, औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण होणारी जंगलतोड, विकासाच्या नावाखाली होणा–या धरणप्रकल्पातून निर्माण होणारी जंगलतोड, पर्यायाने औषधी वनस्पतींचे संवर्धन व विक्री, मध विक्री, सरपण विक्री, कंदमुळे गोळा करून ते विकणे यांसारख्या पारंपारिक व्यवसायांवर लावलेले प्रतिबंध व त्यातुन निर्माण होणारे दारिद्रय यांसारख्या विविध समस्यांचा अंतर्भाव होत असतो.

भारतीय समाजात सध्या निर्वणीकरणाची प्रक्रिया मोठया प्रमाणात वाढलेली दिसुन येत आहे. आदिवासी समुदायाच्या सामाजिक–आर्थिक क्षेत्रावर दुरगामी परिणाम करणा–या या निर्वणीकरणाच्या प्रक्रियेची सुरूवात प्रामुख्याने औद्योगिकरणाच्या प्रक्रियेतून झालेली दिसुन येते.

आदिवासी समुदायाचे वनहक्क काढुन घेण्याचे घातक काम हे ब्रिटिश कालखंडातच म्हणजेच वसाहत काळात सुरू झाले होते. १८६५ मध्ये ब्रिटिशांनी पहिले जंगलविषयक धोरण जाहिर केले. या धोरणानुसार जंगलाचा उपयोग हा महसुल व निर्यातीसाठी निश्चित करण्यात आला. त्यानुसार जंगलातील साधन संपत्ती ही शासनाची मालमत्ता निश्चित करण्यात आली. यानंतरच्या १९२७ च्या कायदयान्वये व्यक्तिगत, खाजगी मालकीची वने सोडून इतर सर्व वने शासकीय मालकीची करण्यात आली. तर दुस–या बाजुला याच काळात विकासाचे नवे साधन म्हणुन औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला मोठया प्रमाणात जगभर मान्यता देण्यात आलेली होती. ही औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरळीत व्हावी, तिची व्याप्ती वाढावी यांसाठी मोठया प्रमाणात जंगलतोड हाती घेण्यात आली. आणि हळुहळु निर्वणीकरणाची प्रक्रिया ही मोठया प्रमाणात वाढत गेली.

काही पर्यावरणवादयांनी या निर्वणीकरणाच्या प्रक्रियेला विरोध दर्शविण्यासाठी विविध आंदोलने करण्यास सुरूवात केली. मात्र हे आंदोलन करतांना त्यांनी निर्वणीकरणामुळे मातीची किंवा जमिनीची धूप वाढते, पर्जन्याचे प्रमाण कमी होते, भूजलची पातळी कमी होते यांसारख्या परिणामांवर लक्ष केंद्रित केले. परंतु याच जंगलांवर आपले जीवन जगणारे, जीवन जगण्यासाठी मूलभूत गरजा भागविणा–या आदिवासी समुदायासमोर कोणत्या अडचणी उभ्या राहिल्या यावर मात्र सुरूवातीच्या कालखंडात दुर्लक्षच करण्यात आले होते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने विकासप्रक्रियेची कक्षा वाढविण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांना यश मिळावे म्हणुन पंचवार्षिक योजना आखण्यात आली. या योजनेतून नदी जोड प्रकल्प, धरणे बांधणे, मोठमोठी औद्योगिक प्रकल्प उभारणे यांसारख्या घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. परंतु धरणाची जागा निश्चित करतांना आदिवासी समुदायाची गावेच्या गावे उध्वंस्त करण्यात आली. धरणग्रस्त म्हणुन त्यांना कागदावर तरी नोक–या, रोजगाराची संधी उपलब्ध करण्यात आली. परंतु राहतं घर उध्वंस्त झाल्यावर, जंगलतोड झाल्यामुळे परंपरागत व्यवसायावर झालेला आघात तसेच मुलभुत शिक्षण व तांत्रिक शिक्षणाचा अभाव यांमुळे आधुनिक आर्थिक व्यवस्थेत रोजगाराची संधी उपलब्ध होत नसल्यामुळे जीवन–मरणाचा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहतो अशा वेळी त्यांना फक्त पोटाची भूक जाणवते आणि मग ही पोटाची भूक बुध्दिच्या भुकेवर सहजपणे प्रभुत्व गाजविते आणि त्यांची गरिबीची पातळी विकास योजना असूनही आहे त्यापेक्षा अजून खालावते. ही परिस्थिती आजही अनेक आदिवासी कुटुंबांमध्ये जाणवत असते. याची प्रचिती पेठ तालुक्यातील नार–पार धरण प्रकल्प तसेच इगतपुरी तालुक्यातील भाम धरण प्रकल्पातून जाणवत असते. आदिवासी समुदायाच्या जीवनमानावर प्रभाव करणा–या या निर्वणीकरणावर बंधने आणण्यासाठी १९९६ चा पंचायत (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार) कायदा, २००६ चा वन अधिकार कायदा तसेच २०१३ चा भूसंपादन, पुनर्वसन कायदयाने काही प्रमाणात दिलासा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

निष्कर्ष

विकासप्रक्रियेच्या नावाखाली करण्यात येत असलेल्या या निर्वणीकरणाच्या माध्यमातून एकप्रकारे आदिवासी समुदायाचे समूळ उच्चाटन केले जात आहे. वनखात्याचा मनमानी कारभार व अनेक देशी–विदेशी कंपन्यांच्या जागतिकीकरणाच्या माध्यमातून झालेला प्रवेश यांमुळे आदिवासी समुदायाचे वास्तव्य असलेल्या भूभागाचे निर्वणीकरण करणे व त्या जागी मोठमोठे प्रकल्प उभारणे, राखीव आर्थिक व वनक्षेत्र उभारण्याचे काम शासकीय पातळीवर करण्यात येत आहे. परंतु या विकास गंगोत्रीत मात्र आदिवासी समुदायासमोर उदरनिर्वाह, रोजगार, पुनवर्सन, आरोग्य असे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झालेले दिसुन येत आहेत. जल, जंगल व जमीन पर्यायाने पर्यावरणाचे रक्षक, संवर्धक म्हणुन अदिवासी समुदायाचे योगदान हे उल्लेखनीय आहे. परंतु वसाहतवाद ते जागतिकीकरण पर्यतंच्या विकासाचा मागोवा अभ्यासल्यास असे निदर्शनास येते की, विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास आणि शासन संस्थेचे पालनहार म्हणुन उदयास आलेले कॉर्पोरेट क्षेत्र आणि भांडवलशाहीमुळे शाश्वत व मुलभुत विकासाच्या नियोजनता जल, जंगल व जमीन या तिनही क्षेत्रात उद्योगपतिंचा हस्तक्षेप वाढु लागला. संविधानाने निर्माण केलेल्या कायदयांची पायमल्ली होत गेली, मानवी तस्करी, बंधनकारा मजुरांसह कथित नक्षलवादाच्या आरोपाखाली आदिवासी समुदायाला जल, जंगल व जमिन पासुन निर्वासित केले जात आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासोबतच आदिवासी समुदायाचे संरक्षण व संवर्धन होणे हे देखील काळाची गरज ठरू लागली आहे.

खरं तर पर्यावरणाचा एक भाग म्हणुन जेव्हा जंगलांचा अभ्यास केला जातो. तेव्हा त्या अभ्यासात झाडे, वृक्ष, वेली, वन्यजीव यांसोबतच त्या जंगलाच्या विस्तिर्ण प्रदेशात कुठे तरी छोटया छोटया पाडयाच्या रूपात वास्तव्य करणा–या आदिवासी समुदायाच्या संरक्षण व संवर्धनाचा देखील विचार होणे गरजेचे आहे.

संदर्भ :

- Surve, N. (1992).*Panchaytraj Institution,* Dy. Secretary, Rural Development, Mumbai.Dept. For Govt. of Maharashtra.
- शिरोळे, धै. (२०१२). *आदिवासी कथा व व्यथा*, पुणे. स्नेहवर्धन प्रकाशन.
- सबनिस, नि.(२००५). *अनुसूचित जाती व जमाति*, ठाणे. मुकुंद प्रकाशन.
- Govt. of Maharashtra, (2016 – 17). *The administration of scheduled areas in Maharashtra State,* Annual Report.
- गारे, गो. (१९७४). *आदिवासी प्रश्न व परिवर्तन*, औरंगाबाद. अमृत प्रकाशन.
- वाघमारे, एम. (२०११). *पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ आणि आदिवासींचा विकास*, पुणे. प्रकाशक सौ.वैशाली वाघमारे.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक, क्रां. व्हि. एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय कॅनडा कॉर्नर, नाशिक– ४२२२००२ मो. ९८८१२३०६२९ E-mail: valmikindase@gmail.com
आजीवन सदस्य क्रं.९०१

***

वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्याचे समाजशास्त्रीय अध्ययन.

*प्रा.डॉ.जयसिंग ज्ञानदेव साळुंके,

गोषवारा :– *वार्धक्यकी ही मानवी जीवनातील एक अटळ अशी व्यवस्था आहे. प्रत्येक व्यक्तीस आयुष्याच्या उत्तरार्धात वार्धक्य हे येतच असते. परंतु वार्धक्य हे मानवी जीवनात असंख्य प्रश्न घेउन येत असते. एकत्र कुटूंब पध्दतीमध्ये लहान मुले आणि घरातील वृध्द यांना सामावून घेण्याची प्रक्रिया सहजपणे होत. असेल किंबहुना लहान मुलांसाठी वृध्दांची गरज असे परंतु बदलत्या काळाबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या. वाढते शहरीकरण, औदयोगिकरण यामुळे आर्थिक ताणतणावात मुख्यत: निर्माण होत आहेत. शिवाय ग्रामीण पालक आणि शिकलेली पुढची पिढी यातही तणाव निर्माण होत आहेत. असे असंख्य ताणतणाव वृध्दांच्या जीवनात निर्माण झालेले आहेत. परंतु मुख्य प्रश्न मानसिकच असतो. निवृत्त झाल्यामुळे काय करावे हे कळत नाही. जीवनात एक पोकळी निर्माण होते. हे सारे शहरी वृध्दाबददल,ग्रामीण वृध्दाच्या जीवनात आर्थिक समस्या अधिक तीव्र असतात. शरीर थकलेले असते. अशा अवस्थेत आण दुर्लक्षीत आहोत. नकोसे झाले आहोत. असा भाव निर्माण होउन मानसिक विकलांगता आलेले असते. एकंदरीत हे की वृध्दांच्या जीवनात असंख्य समस्या निर्माण झालेल्या असतात. अशा समस्यावर गंभीरपणे विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. भारतात ६५ वर्षावरील वृध्दांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. वृध्दावस्था हा माणसाच्या आयुष्याचा साधारणत: ६५ च्या वर्षापासून मृत्यूपर्यंतचा कालखंड असतो. या अवस्थेत लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शरीरातील अनेक अवयव कमजोर झालेले असतात. त्याचबरोबर कुटूंबातील व्यक्ती ही साथ देत नाहीत. भारतातील वृध्दांच्या समस्याकडे स्वतंत्र प्राप्तीनंतर लगेचच अभ्यासकांचे लक्ष वेधलेले दिसते. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून विविध कल्याणात्मक कार्यक्रम वृध्दांसाठी आखण्यात आले. दहाव्या पंचवार्षिक योजनेत वृध्दांसाठी एकात्मिक कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला असून त्यामध्ये वृध्दाश्रमासाठी ९०टक्के अर्थसहाय, वृध्दांसाठी दिन केंद्रे, फिरते आरोग्य केंद्र चालवण्यासाठी आर्थिक मदतीची तरतुद केली आहे. आज समाजशास्त्राच्या अभ्यासकांचे लक्ष शहरी, ग्रामीण, मध्यमवर्गीय, आर्थिकदृष्टया बहुतांश प्रमाणात स्थिर, असलेल्या वृध्दांच्या समस्याकडे वेदले आहे. यातूनच वृध्दांच्या सामाजिक, आर्थिक, मानसिक समस्यांच्या अभ्यासास सुरुवात झाली. सदरील शोधनिबंधात वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्यांचा उहापोह करण्यात आलेला आहे.*

प्रास्ताविक :

भारतात समाज व्यवस्थेत कुटूंब संस्थेच्या विघटनातून वृध्दांच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. पारंपारिक समाज व्यवस्थेत संयुक्त कुटूंबाचे प्रचलन होते. आज संयुक्त कुटूंबाचे विघटन होउन विभक्त कुटूंब निर्माण झाले आहेत. संयुक्त कुटुंब पध्दतीमध्ये वृध्दाला मानाचे स्थान होते. महत्वाची काम याविषयक सल्ले वृध्दांना विचारुन घेतली जात. त्यामुळे वृध्दांना आपण कुटूंबापासून दुरावलो आहोत अशी जाणीव होत नसे. पण विभक्त कुटूंबाचे प्रचलन जसं जसं वाढत गेलं तसं कुटूंबातील वृध्दांचे स्थान निम्न होत गेले. वृध्दांच्या सल्ल्यांना विनाकामाचे सल्ले समजण्यात येउ लागले. यामुळे वृध्द व्यक्ती दुखावत गेल्या आणि आपलं कुटुंबात कोणी ऐकत नाही याचं फार वाईट वाटतं आणि यातूनच त्यांच्यात मानसिक समस्या निर्माण होतात. त्याचबरोबर वृध्दांमध्ये उतारत्या वयोमानाप्रमाणे अनेक शारीरिक व्याधी निर्माण होतात. त्यात गुडघेदुखी, दृष्टीदोष, निद्रा दोष, एकलकोंडेपणा अशा अनेक समस्या वृध्दांना घेरतात. याच संदर्भामध्ये सदरील शोध निबंध सादर करण्यात येत आहे.

पुर्व साहित्याचा आढावा :

भारतात वृध्दांच्या समस्येवर संशोधन कार्य अल्प प्रमाणात झाले आहे. आधुनिक काळामध्ये वृध्दातील सामाजिक, आर्थिक, आरोग्य विषयक समस्या मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. या संदर्भात विविध विचारवंतांनी केलेल्या अध्ययनात आढावा खालीलप्रमाणे पाहता येईल.

१.राणी वंदना – वृध्दों की पारिवारिक स्थिती १९९९–६७ :

कुटूंबाची सत्ता वृध्दांच्या हातातून सुटून युवकाच्या हातात गेल्याने औषधासाठीही नवीन युवा पिढीवर अवलंबून राहावे लागते.

२.राजुरीया सीमा – वृध्द जनो की स्वास्थ्य समस्याये १९९८:

९०.५ टक्के वृध्द महिलांची तब्येत वय जसजसं वाढत आहे त्यामुळे अनेक आजार तसेच रोगांना बळी पडतात. त्यामध्ये क्षयरोग, दमा, दृष्टीहीनता, कमरेत वाकणं, त्वचारोग, हाडांमध्ये दुखणे, अर्धांगवायु, शुगर, ब्लड प्रेशर अति होणे व कमी होणे इत्यादी समस्या दिसून येतात. आजारी पडल्यावर पथ्य पाणी पाळीत नाहीत कारण त्या म्हणतात आता आम्हाला जगून काय उपयोग.

३.शर्मा रतन – वरिष्ठ जन यो समाज २०११ :

वृध्दांवस्थेमध्ये कौटुंबिक समायोजन आणि तणाव निवारण अत्यंत महत्वाचा आहे. वृध्दांवस्थेमध्ये मानसिक पिडा मोठा प्रमाणात दिसून येते. वरील शिफारशीच्या संदर्भात एक मुददा सर्वसाधारणपणे दिसून येतो की वृध्दांमध्ये मोठया प्रमाणात आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते.

संशोधनाचे उददेश :

१. वृध्दांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास करणे.

२. वृध्दांच्या आरोग्य विषयक समस्यांची तिव्रता जाणून घेणे.

३. वृध्दांच्या कौटुंबिक दर्जा आणि आरोग्यविषयक समस्या यांचा सहसंबंध पाहणे.

संशोधनाची गृहितके :

१. वृध्दांचा कुटूंबातील दर्जा कमी झालेला आहे.

२. वृध्दांना आरोग्य विषयक समस्यांना तोंड दयावे लागते.

३. बदलत्या परिस्थितीनुसार वृध्दाने आपल्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये संपादित ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इत्यादींचा आधार घेतला आहे.

तथ्य विश्लेषण :

वृध्दांच्या आरोग्य विषयक समस्या :

वृध्दांच्या आरोग्य विषयक समस्येत स्थळ, काळ, सामाजिक परिस्थिती परत्वे फरक असू शकतो. प्रौढावस्थेचा शेवटचा कालावधी साधारणत: ६५ व्या वर्षापासून मृत्यूपर्यंतचा असतो. शरीराच्या इतर अवयवाप्रमाणे वृध्दांवस्थेची सुरुवात होत असते. या काळात त्वचेवर सुरकुत्या पडतात. शरीरातील पचन संस्था व इतर संस्था नीट काम करु शकत नाहीत. संपूर्ण शरीर रोग व आजार यांना बळी पडण्याची अधिक शक्यता असते कारण प्रतिकारशक्ती कमी झालेली असते. वृध्दां अवस्थेत लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शरीरातील अनेक अवयव कमजोर झालेले असतात त्याचबरोबर कुटूंबातील अनेक व्यक्तीची बोलणी खावी लागतात. अंधत्व दात पडणे ऐकू कमी येणे व्यक्ती ओळखता न येणे अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

शारीरिक समस्या :

१. दृष्टी दोष: वृध्दांवस्थेच्या कालखंडात दृष्टी संबंधीच्या समस्या मोठया प्रमाणामध्ये उदभवतात .दृष्टीदोष निर्माण होतो काहींना जवळचे दिसत नाही तर काहींना दूर अंतरावरचे दिसत नाही तर काही वृध्दांना दुरचे आणि जवळचे कमी दिसते यामुळे स्वत:च्या वस्तू सांभाळणे इतरांना ओळखणे अवघड बनते. काही वृध्दांना तर रस्त्याने व्यवस्थित चालता ही येत नाही. त्यामुळे दृष्टीदोष ही एक वर्धातील अत्यंम महत्वाची समस्या आहे.

२. डोळे कोरडे पडणे: बहुतांश वृध्दांचे डोळे कोरडे असल्यासारखे वाटतात कारण अश्रुपिंडाचे काम वरचेवर कमी होते त्यामुळे डोळयात अश्रु तयार होण्याचे कमी होते नेत्र पटलावरील रक्तवाहिन्या फुटल्यामुळे डोळयाच्या कार्यात फरक पडतो प्रतिमा ठुसर व अस्पष्ठ दिसू लागते.

३. मोतीबिंदू: काचबिंदूवर ढगाळल्यासारखे दिसते यालाच मोतीबिंदू म्हणतात ६५ वर्षानंतर वृध्दांमध्ये मोतीबिंदूमुळे अंधत्व येण्याचे प्रमाण बरेच जास्त असते.

४. त्वचेतील कोलाजींची लांबी वाढणे: त्वचेतील कोलाजींची लांबी वाढणे आणि त्यामुळे त्वचेची लवचिकता कमी होणे त्वचेला मउपणा कमी होउन ती खरबडीत लागते. तिच्यावरील सुरकत्या दिसून येतात, वनज कमी होणे हे पण सुरकत्या पडण्याचे एक कारण आहे.

२. केस: म्हातारपणाची एक खूण म्हणजे केस पांढरे होणे इतकेच नाही तर ते विरळ होतात त्यामुळे टक्कल पडणे यामागे संप्रेरकातील बदल कारणीभूत असतो.

३. दात: दात खराब होणे दात पडणे, दात किडणे व हिरडयाचे आजार होणे हे वृध्दांवस्थेमध्ये चालूच असते नैसर्गिक दात पडून त्याठिकाणी कत्रिम पध्दतीची दातांची कवळी बसवावी लागते दात पडल्याने त्यांच्या स्वप्रतिमेवर मोठा परिणाम होतो तोंडातील दाताची कवळी काढली तर तोंडाचे बोडके झाल्यामुळे त्यांचे बोलणे बरेच वेळा स्पष्ट ऐकता येत नाही.

४. निद्रा/झोप: वृध्दांवस्थेमध्ये झोपेच्या तक्रारी सुरु होतात. ज्यामध्ये झोप न लागणे, गाढझोप न येणे, झोपेतून अचानक जाग येणे, त्यांच्यानंतर परत झोप न लागणे अशा तक्रारी चालू होतात. मेंदूमध्ये असणारे झोप नियंत्रक केंद्रातील रचनेत होणाऱ्या बदलामुळे आणि संप्रेरकातील बदलामुळे अशा आरोग्यविषयक समस्या वृध्दांवस्थेत जाणवतात.

५. शरीराची हालचाल: वृध्द व्यक्तीची शरीराची हालचाल दिवसेंदिवस कमी होत जाते. चालण्यात बदल जाणवतो. पुर्वीसारखं सफाईदार पध्दतीने चालता येत नाही. अटकळत चालल्यासारखे वाटते कधी कधी चालत चालतच तोल जातो आणि जमिनीवर शरीर कोलमडते. एकुणच शरीरावर बाक येतो. पुर्ण शरीर समोर झुकले जाते. आपला तोल जाउ नये म्हणून वृध्द भारतातमध्ये काठी वापरतात. ही एक प्रकारची आरोग्यविषयक समस्या वृध्द व्यक्तीत जाणवते.

मानसिक समस्या :

वृध्द व्यक्तीमध्ये वयाच्या एका विशिष्ट टप्प्यानंतर काही आजार उदभवू शकतात त्यात ह्रदयाशी संबंधित आजार शुगर, थायरॉईड सारख्या समस्या असतात. या आजारामध्ये आढळणारी काही लक्षणे आणि मानसिक तणावामुळे निर्माण होणाऱ्या समस्या मधली लक्षणे समान असतात. डॉ.चांडक यांनी वृध्दांमध्ये मानसिक शारिरिक समस्याची काही लक्षणे सांगितले आहेत. १.चिडचिडेपणा वाढतो छोटया छोटया गोष्टींचा राग येउ लागतो. २.रुटीनमध्ये मन रमत नाही. ३.अवास्तव गोष्टीवर विचार. ४.झोप वाढते किंवा झोप कमी होते. ५.भविष्यातील अनिश्चितता वाढते. ६.छातीत धडधड होणे. ७.अचानक घाम येणे.

अशाप्रकारे डॉ.प्रीतम चांडक यांनी घरातील वृध्द व्यक्तीमध्ये अशा स्वरुपाची लक्षणे आढळतात हे सांगितले. वयोमानाप्रमाणे येणारे ब्लडप्रेशर, डायबिटीस सारखे आजार त्यांना असल्यामुळे पत्नी, मुलं, सुनाकडून जास्त काळजी घेतली पाहिजे. बाहेर पडणे बंदच करायला हवं पण वृध्दांचे घरात बसून उलट,सुलट विचार सुरु होतात. आता मी शारिरिकदृष्टया सक्रिय नाही. मग अशात तब्येतीने त्रास उदभवले तर हार्ट अटॅक आला म्हणजे? माझी शेती बडीच काय होणार, माझा घरचं काय होणार असे एक ना अनेक विचार ते खोलीतच एकटे बसून करायला लागतात. यामुळे मानसिक ताण तणाव वाढतो आणि प्रकती खालावयाला लागते. आणि वृध्दांमध्ये यातूनच मानसिक आजार जडला जात.

निष्कर्ष :

१. कुटूंबातील व्यक्तींनी वृध्दांना समजून घेतल्यास व वृध्दांनेही नवीन पिढी यांचे विचार जुळवून घेतल्यास त्यांच्यात मानसिक समस्येतून निर्माणहोणाऱ्या आरोग्य विषयक समस्या कमी होण्यास मदत होईल.
२. समाजातील सर्व वृध्दांना कौटुंबिक, मानसिक, भावनिक आधार मिळाल्यास वृध्दांचे मानसिकतेतून निर्माण होणारे इतर आजार व शारिरिक व्याधींची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.
३. वृध्दांनी स्वत:ला वृध्दत्व ही एक नैसर्गिक घटना आहे. प्रत्येक व्यक्तीला यातून जावेच लागते. ही जाणीव झाली तर आरोग्यविषयक समस्यांची तिव्रता कमी होण्यास मदत होईल.

शिफारशी :

१. आधुनिक काळात वृध्द व्यक्तीचे कुटूंबात दुयम स्थान मानले जाते व त्यांना कुटुंबावर अवलंबून रहावे लागते त्यातूनही तणाव निर्माण होतो व वृध्द व्यक्ती आजाराला बळी पडतात. यासंदर्भात शासनानेच पुढाकार घेउन त्यांना भरीव आर्थिक मदत करण्याची गरज आहे.
२. वृध्द व्यक्ती सतत आजारी पडत असल्यामुळे कुटूंबातून आणि समाजातून चांगली वागणूक दिली जावी या संदर्भात कठोर कायदा करण्याची गरज आहे.
३. वृध्दांचे जुनाट आजार याच्यासाठी शासनाने मोफत चाचण्या आणि औषध उपचार पुरविले पाहिजेत.
४. वृध्दांचे मानसिक आरोग्य चांगले राहील याच्यासाठी ग्रामीण भागतही वृध्दासाठी विरंगुळा केंद्र बनविणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ :

- राजुरीया, सी.(१९९८). *वृध्द जनो की स्वास्थ्य समस्याये*, आग्रा. दयाल बाग प्रकाशन.
- राणी, वंदना.(१९९९). *वृध्दों की पारिवारिक स्थिती*, चांदपूर. समाजविज्ञान विकास संस्था, उत्तरप्रदेश.
- शर्मा, रतन.(२०११). *वरिष्ठजन का समाजशास्त्र*, न्यु दिल्ली. विश्वभारती पब्लिकेशन.
- टारा, स.(१९९५). *ओल्ड इज दि लास्ट रिसॉर्ट होम्स*, रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट जर्नल.
- दिलीप, टी. *केरल मे वृध्दावस्था मे स्वास्थ्य का बोझ*, निकलन रिसर्च ॲन्ड जर्नल पत्रिका हेल्पेज इंडिया.

*समाजशास्त्र विभाग, आझाद महाविदयालय, औसा. जि.लातूर.(महाराष्ट्र)

***

वृध्दांच्या आरोग्य विषयक समस्या

*प्रा.डॉ. वीरभद्रेश्वर सामलिंग स्वामी

१.१ गोषवारा : *वाद्य ही मानवी जीवनातील एक अटळ अशी व्यवस्था आहे. प्रत्येक व्यक्तीस आयुष्याच्या उत्तरार्धात वार्धक्य हे येतच असते परंतु हे वार्धक्य मानवी जीवनात असंख्य प्रश्न घेऊन येत असते एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये लहान मुले आणि घरातील वृद्ध यांना सामावून घेण्याची प्रक्रिया सहजपणे होत असते किंबहुना लहान मुलांसाठी वृद्धांची गरज असे परंतु बदलत्या काळाबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या वाढते शहरीकरण औद्योगीकरण यामुळे आर्थिक ताणतणाव मुख्यता निर्माण होत आहेत शिवाय ग्रामीण पालक आणि शिकलेली पुढची पिढी यातही तणाव निर्माण होत आहे ग्रामीण वृद्धांच्या जीवनात आर्थिक सामाजिक आरोग्य विषयक समस्या अधिक तीव्रपणे जाणवत आहेत शरीर थकलेले असते अशा अवस्थेत आपण दुर्लक्षित आहोत नकोसे झाले आहोत असा भाव निर्माण होऊन मानसिक विकलता आलेली असते एकंदरीत की काय वृद्धांच्या जीवनात असंख्य समस्या निर्माण झालेल्या असतात. आपणा सर्वांच्याच कुटुंबामध्ये काही वृद्ध सदस्य असतात. कदाचित आपल्यापैकी काहींना त्यांची शुश्रुषा करताना येणाऱ्या समस्यांचा अनुभवही असेल. त्यांच्या गरजा वेगळ्या असतात आणि त्या गरजांकडे पुरेसे लक्ष देणे आवश्यक असते. तुम्ही बातम्यांमध्येवृद्ध पालकांना टाकून देणारे किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करणारे अशा लोकांबद्दल ऐकले असेलच. वृद्धांची संपत्ती आपल्याला मिळावी या हव्यासापायी त्यांच्याबाबतीत घडणाऱ्या गुन्हेगारी कृत्यांबद्दलही तुम्ही वाचले असेलच. वृद्धत्व येणे म्हणजे काय? वृद्धत्व येणे ही एक नैसर्गिक आणि अपरिहार्य घटना आहे. थोडक्यात सांगायचे तर वृद्धत्व म्हणजे व्यक्तीमध्ये होत जाणारे शारीरिक आणि मानसिक बदल. या बदलांचा परिणाम व्यक्तीचे सामाजिक जीवन आणि वैयक्तिक जीवनपद्धती आरोग्यांवर होत असतो.*

महत्त्वाचे शब्द: आरोग्य, वृध्दत्व, आर्थिक, मानसिक, वैद्यकीय, विस्मृती.

१.२ प्रस्तावना

भारतासारख्या प्राचीन सांस्कृतिक परंपरा असणाऱ्या देशात श्रावण बाळ होऊन गेला तिथे वृद्धांच्या समस्या वाढत आहेत असे म्हणतात. लहान मुलांची काळजी, प्रेम ही तर सहज भावना आहे, तर वृद्धांची काळजी प्रेम ही संस्कार भावना आहे तर ही संस्कार भावना लहान मुलात रुजवण्यात, वाढवण्यात आपण कमी तर पडत नाहीत ना असा विचार मनात येतो.

जीवनातील मावळता कालखंड म्हणजे वृध्दावस्था. साधारणतः वृध्द म्हटले की चेहऱ्यावर आणि त्वचेवर सुरकुत्या, अंगात कुर्ता धोतर, डोक्यावर पांढरे टोपी, हातात काठी, कपाळावर टिळा, मुखात सतत देवाचे नामस्मरण अशी व्यक्ती डोळ्यासमोर येते. त्याला आपण वृध्द म्हणतो. आपल्या देशात वृद्धांच्या जीवनातील समस्या दिवसेंदिवस भेडसावत आहेत. वर्तमान काळातील कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाला भेडसावणाऱ्या ज्या समस्या आहेत व ज्यांनी दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करून नैतिक मानवता, कौटुंबिक प्रेमभाव, जिव्हाळा, कर्तज्ञ जबाबदारीचे तत्व या बाबींना सुरुंग लावला आहे या समस्येमुळे वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्या ही एक गंभीर समस्या सर्वांना जाणावयास लागली आहे. आजच्या कौटुंबिक सामाजिक परिस्थितीत सर्वांना भेडसावणाऱ्या चिंता करायला लावणारा आत्मकेंद्री व बदलणाऱ्या वर्तमान सामाजिक परिस्थितीचे चिंतन करायला लावणारा असा हा विषय आहे वैद्यकीय क्षेत्रातील प प्रगतीमुळे आपले आयुर्मान वाढत आहे ही वस्तुस्थिती असली तरी वृद्धत्व ही टाळताना येणारी गोष्ट आहे वृद्धांची व्याख्याच अशी केली जाते की वृद्धत्व ही सारखी वाढत जाणारी, माणसाचा जोमघटविणारी आणि शेवटी मरणाच्या दारात घेऊन जाणारी एक शरीरांतर्गत प्रतिकूल बदलाची स्थिती आहे. वर्धक्याने शरीरांतर्गत झालेल्या बदलामुळे वृद्ध व्यक्ती हळूहळू परावलंबी होऊ लागते त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

आपण जर राष्ट्रीय आकडेवारी पाहिली तर लक्षात येते की, साधारण एकूण लोकसंख्या पैकी ५.४ ते ६.१ व्यक्ती वृद्ध आहेत. वृद्धांची संख्या वाढते सुधारलेल्या वैद्यकीय सोयीमुळे आयुष्य मर्यादा वाढत आहे या वाढीव वृद्ध संख्येच्या सामाजिक समस्या आहेतच शिवाय आरोग्य विषयक समस्या आहेत त्यासाठी वेगळी ओळख आधुनिक आरोग्य शास्त्रात आहे यालाच वृध्दअवस्था म्हणतात. भारतीय आयु मर्यादेनुसार वयाच्या ६० वर्षाच्या पुढील अवस्थेत वृध्दावस्था म्हणतात. वयाच्या ६० ते ७५ वर्षापर्यंत प्रारंभिक वृद्धावस्था म्हणतात तर ७५ वर्षापुढे उत्तर वृद्धावस्था म्हणतात.

निसर्ग नियमानुसार परिवर्तन निरंतर सुरू असते. या नैसर्गिक नियमानुसारच मनुष्य शरीरामध्ये वृद्धी व क्षय या प्रक्रिया सतत सुरू असतात बाल्यावस्था ते युवा अवस्थेपर्यंत वृध्दीजन्य प्रक्रिया तर युवावस्थेपासून ते वृध्दावस्थेपर्यंत

-हाससजन्य प्रक्रिया गतिमान असतात. फक्त काळे केस पांढरे झाले त्वचेवर सुरकुत्या पडल्या म्हणजे वृध्दावस्था आली असे नाही तर बाह्य दर्शनी अवस्था आहे तर शरीरातील प्रत्येक अवयवाच्या पेशीमध्ये ऱ्हासजन्य प्रक्रिया होत असते.

वृद्धावस्थेत लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शरीरातील अनेक अवयव कमजोर झाले असतात, त्याचबरोबर कुटुंबातील अनेक व्यक्तीची बोलणी खावी लागतात अंधत्व, दात पडणे, ऐकू कमी येणे व्यक्ती ओळखता न येणे अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते

१.३.संशोधनाची उद्दिष्टे:

१. वृध्दांच्या मानसिक समस्या जाणून घेणे.

२. वृध्दांच्या आरोग्य विषयक समस्या चा अभ्यास करणे

१.४. संशोधनाची गृहीतके:

१. शारीरिक संरचनेतील बदलाप्रमाणेच मानसिक संरचनेत बदल होतात.

२. बहुतेक वृध्दव्यक्तीना आरोग्यविषयक अज्ञान असल्याने अनेक रोगांना सामोरे जावे लागते.

१.५. संशोधन पद्धती : प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर करून विश्लेषणात्मक आणि अन्वेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

१.६. नमुना निवड : प्रस्तुत संशोधनात नमुना निवडीसाठी द्वितीय तत्त्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये वर्तमानपत्रे नियतकालिके संशोधन लेख पुस्तके व सहकारी अहवाल याचा आधार घेण्यात आला आहे.

१.७. तथ्याचे विश्लेषण व निर्वचन:

वार्धक्य ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे तसेच व्यक्तीच्या आयुष्यातील तो एक अंतिम टप्पा असतो जन्मापासून ते तारुण्यापर्यंतचा सतत शारीरिक वाढीचा टप्पा त्यानंतरची प्रौढावस्था म्हणजे शारीरिक क्षमतांच्या पूर्ण वापराचा कालखंड आणि त्यानंतर येणारे वार्धक्य म्हणजे शारीरिक शक्ती हळूहळू कमकुवत होण्याचा कालखंड मांडला जातो. शासनाच्या माध्यमातून वृद्धांसाठी वृद्धापकाळ आरोग्य सुश्रुश कार्यक्रम राबविण्यात येतो, यामध्ये वृद्धांना प्राथमिक उपचाराच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक निवारणात्मक उपचारांची सुविधा देणे वृद्धांच्या आरोग्याच्या समस्या ओळखून त्याचे निरासन करणे वयोवृद्धांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी कुटुंबातील व्यक्तींना सक्षम बनवणे ही या योजनेचे वैशिष्ट्य आहे.

हेस यांच्या मते "जीवनातील एक अपरिहार्य आणि अपरिवर्तनीय अवस्था". बायरेन आणि रेनर : "वृद्धत्वाचा संबंध समान वातावरणीय परिस्थितीमधील, समान जनुकीय घडण असणाऱ्या उत्क्रांत सजीवांमध्ये त्यांच्या शारीरिक वयानुसार घडून येणाऱ्या बदलांशी आहे" स्ट्रेहलर याने वृद्धत्वाची चार वैशिष्ट्ये सांगितली आहेत. वृद्धत्व हे वैश्विक आहे. रोग काहींना होतात, मात्र वृद्ध त्व प्रत्येकाला येते.वृद्धत्व हळूहळू आणि अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. वृद्धत्व हा सजीवांच्या जीवनप्रवासाचा अंगभूत भाग आहे. वृद्धत्व झीज होण्याच्या प्रक्रियेचा परिणाम आहे.

एखाद्या व्यक्तीच्या वृद्धत्वाचे निर्देश त्याच्या शारीरिक वयाच्या आधारे करणे, ही सर्वसामान्य पद्धती आहे. ती व्यक्ती जन्माच्या दिवसापासून वर्तमान दिवसापर्यंत किती वर्षे जगली हा शारीरिक वय ठरवण्याचा निकष असतो. हा एक निश्चित आणि मोजता येण्याजोगा निकष आहे. भारतामध्ये वयोमानाची ६० वर्षे ही किमान मर्यादा व्यक्तीचा जनगणनेच्या वेळी 'वृद्ध' या श्रेणी त समावेश होण्यासाठी मान्य केलेली आहे. भारतामध्ये वृद्धांची लोकसंख्या वाढते आहे. वाढलेले आयुष्यमान आणि घटलेला मृत्यूदर ही वृद्धांची लोकसंख्या वाढण्यामागील कारणे आहेत.

१.८. वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्या :

कोरोना संक्रमणातून वृद्धांची काळजी हा आणखीन एक धडा आपल्या सर्वांनाच घ्यावा लागणार आहे आरोग्यदायी वर्धापकाळ दशक या संकल्पनेवर आत्ताच कृतिशील पावले उचलली तर भविष्यात वृद्धांच्या मानसिक

आरोग्याच्या प्रश्नांची गुंतागुंत कमी होण्यास मदत होईल वर्धापकाळात माणसे जेव्हा निष्क्रिय दुर्लक्षित होतात तेव्हा त्यांच्यातील एकटेपणा अधिक वाढीस लागतो अशा वृद्ध व्यक्ती 'विस्मृती' आजाराच्या प्राधान्याने बळी ठरतात आज आपल्याकडे अशा रुग्णांचे प्रमाण हे 40 लाखांच्या जवळपास आहे वृद्धांच्या समायोजनाची धोरणात्मक आणि सामाजिक पातळी दखल न घेतली गेल्यास 2030 पर्यंत विस्मृती चे प्रमाण दुप्पट होण्याची भीती आहे यासाठी वृद्धांच्या सामाजिक समायोजनाच्या प्रारूपाचे जाळे विणले जाणे गरजेचे आहे भारतीय कुटुंब आणि समाज रचना हा खरे तर अशा प्रारूपासाठी आदर्श वस्तू पाठवले आरोग्यदायी वृद्धापकाळसाठी सर्वप्रथम वृद्ध व्यक्तींच्या अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता होणे गरजेचे आहे आपल्याकडे विभक्त कुटुंब पद्धती वाढीस लागली आहे तरीही जे व्यक्तींना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे प्रमाण समाधानकारक आहे त्यांच्या स्वाभिमान आणि आत्मसन्मानाची त्यामुळे दखल घेतली जाते

शारीरिक हालचालीवरील निर्बंध ही वर्धापकाळातील एक मोठी समस्या आहे अधिक तर ती चुकीच्या जीवनशैलीमुळे कमी वयात सुरु होते जे व्यक्तींनी नियमित व्यायाम आणि शारीरिक हालचाल ठेवल्यास त्यांची तीव्रता आणि गोळयांचा भडीमार कमी करता येऊ शकतो आपल्याकडे दर महिन्याचे सणवार हे सामाजिकरणाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे याशिवाय लग्नकार्य उंच बारसे गृहप्रवेश यासारख्या समारंभ नात्यांना बळकटी देण्यासोबतच जगण्याला नवीन ऊर्जा देत असतात अशा कार्यक्रमातून वृद्धांच्या सर्वांशी गाठीभेटी होत असतात त्यामुळे त्यांचे भावनिक मानसिक आरोग्य चांगले राहण्यास मदत होत असते खेड्यापाड्यातील महिला सामूहिक रित्या वळवण करणे,पंगतीचे जेवण बनवणे, सप्ताहात वारकऱ्यांना जीव घ**** आधी सामाजिक कार्यात समरूप सहभागी होतात. नवीन तंत्रज्ञान शिकून घेणे ही वर्धापकाळाची गरज ठरली आहे सध्या टेलिव्हिजनवर झळकणारी व्हाट्सअप ची जाहिरात 'अपणासा लगता हैं अपनों के बीच' ही जाहिरात त्याचे बोलके उदाहरण आहे. यासोबतच आपले छंद जोपासत कौशल्य विकसित करत आपल्या अनुभवाची ज्ञानाची शिदोरी सर्वांसाठी खुली करत वृद्धापकाळ अधिक आनंदी समाधानी होऊ शकतो.

भावनिक स्वास्थ्य म्हणजे आरोग्य. वाढत्या वृद्ध त्वा बरोबर शरीराच्या विविध अवयवांची झीज होण्यास सुरुवात होते. त्यामुळे निर्माण होणाऱ्या शारीरिक अशक्तपणाच्या आणि आरोग्याच्या समस्यांचा संबंध दात, हाडे, पोट, हृदय, ऐकू येणे, दृष्टी इत्यादींसंबंधीच्या तक्रारींशी असतो. या शारीरिक तक्रारींच्या बरोबरीने मानसिक समस्याही उद्भवू शकतात. त्यामध्ये कुटुंबातील इतरांपासून तुटल्याची जाणीव, त्यांच्याबरोबर संघर्ष, असमाधानाची जाणीव, वैफल्याच्या भावनेतून आलेले नैराश्य, अस्वस्थता, एकटेपणा इत्यादींचा समावेश असतो. आरोग्यासाठी भावनिक स्वास्थ्यही महत्त्वाचे असते. साधारणता वयाच्या ३० वर्षी अवयवांच्या क्रिया प्रक्रिया अगदी १०० टक्के पूर्ण कार्यरत असतात. त्यानंतर मात्र प्रत्येक अवयवांची कार्यक्षमता हळूहळू कमी होण्यास सुरुवात होते. छातीच्या स्नायूची क्षमता कमी होते, म्हणून श्वसन, हालचाली कमी पडतात, सोबत फुफुसाची हवा भरून घेण्याची लवचिकता कमी होते म्हणून प्राणवायू कमी प्रमाणात शोषला जातो. हृदयाची स्पंदनक्षमता कमी होते. हृदय पंप पूर्ण क्षमतेने रक्ताभिसरण अकार्यक्षम होते. लिव्हर अर्थात यकृत, मूत्रपिंड क्षमता साधारण ३० टक्के कमी होते. पचनशक्ती ऱ्हास होतो, जठराग्नी मंदावतो, बुद्धकोष्टता वारंवार होते अपचन होते याशिवाय हाडांची झीज सांध्यांची झीज व सांधेवात होतो कॅल्शियम घटक द्रव्य कमी होते इत्यादी नैसर्गिक बदल होत असतात.

भारतात केलेल्या पाहणीत असे आढळून येते की, वृद्धावस्थेत अतिरक्तदाब, हृदयविकार समस्या साधारण ६० ते ६२ टक्के इतक्या प्रमाणात आहे. जगात याबाबत भारताचा दुसरा क्रमांक लागतो. पचनसंस्थेच्या विकाराचे ३० ते ३५ टक्के रुग्ण असतात. उर्वरित समस्यांमध्ये मेंदूचे आजार ज्यामध्ये पक्षाघात, कंपवात प्रामुख्याने आढळतात. श्वसनसंस्था, मूत्रपिंड आजारात क्रॉनिक ब्रॉकायटीस, मूत्रमार्गात अडथळे, उतारवयात पुरुषात आढळणारा प्रोटेस्ट ग्रंथी आजार, स्त्रियांमध्ये रजोनिवृत्ती व तत्संबंधीचे आजार, याशिवाय मानेचे मणके, कमरेचे मणके याची झीज, त्यामुळे स्पॉडिलाइटीस आजार, वारंवार आढळणारा आजार गुडघेदुखी ऑष्टीओऑथ्रायटिस तसेच वृध्दावस्थेत डोळे व कान या ज्ञानेंद्र्याच्या आजारांत डोळयात मोतीबिंदू, कानांची श्रवण क्षमता कमी झाल्याने वृध्दांना हे आजार असहाय बनवतात.

वरील आजार वैयक्तिक स्वरूप आणि वृद्धास त्रासदायक ठरतात पण सगळयात मोठी समस्या म्हणजे वृद्धांचे मानसिक आजार. वृद्धांचे निवृत्ती जीवन एकटेपणा सहचारी मृत्यूमुळे साथ सोडून गेलेला असल्यास जास्तच जाणवतो. मुले-मुली आपल्या कामात मग्न असतात. विभक्त कुटुंब पद्धती रुजली वाढली असल्यामुळे मानसिक आजाराचे प्रमाण वाढले आहे. वार्धक्यजन्य बुद्धिनाश, उदासीनता सेनाईलडिमेनशिया सेनाईल सायकोसिस आजारांचे प्रमाण वाढत आहे. वृध्दांवस्था येऊ न देणे किंवा थांबवणे शक्य नाही, परंतु वृध्दांवस्था लवकर येऊ नये व निरोगी अवस्था जास्त टिकावी हे मात्र शक्य आहे. त्यासाठी आपण आपली दिनचर्या, ऋतुचर्या-रात्रीचर्येचे नैसर्गिक पालन करावे. रोज व्यायामासाठी वेळ जरूर काढावा, नियमितपणा ठेवावा. धूम्रपान, मदिरापान, तंबाखूजन्य पदार्थ इत्यादी व्यसने टाळावीत किंवा असल्यास सोडावीत. अतिस्निग्ध पदार्थ सेवन टाळावे, मर्यादित आहार असावा. अतिरक्तदाब असल्यास नियमित उपचार करावा. रक्तदाब नियंत्रित ठेवावा म्हणजे हृदयविकार व पक्षाघात अर्धांग वायू टाळता येईल. हे दोन्ही आजार त्या व्यक्तीच्या कुटुंबाच्या व समाजाच्या आर्थिक क्षमतेवर फार मोठे आघात करतात, म्हणून वृद्धांनी याबाबत सजग होऊन इतरांना देखील नियमितपणा व नियंत्रण ठेवण्यास उद्युक्त करावे. याशिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःची मानसिक अवस्था आनंददायी चिंतामुक्त ठेवावी त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. प्रत्येक गोष्टीत सहभाग असावा, छंद लावून घ्यावा, जोपासावा त्यामुळे प्रत्येक गोष्टीत सकारात्मक दृष्टी होते आणि त्यामुळे आलेली वृद्धावस्था स्वीकारण्याची मानसिक तयारी होते. यासोबतच प्रत्येकाचे आपल्या वाढदिवशी मौज मजेला फाटा देऊन संपूर्ण शारीरिक तपासण्या करून घ्याव्यात, म्हणजे कोणताही बदल आढळल्यास वेळीच दखल घेऊन आजार टाळता येतो किंवा आटोक्यात ठेवता येतो. आपण जसे आपल्या वाहनाची सर्विसिंग करून घेतो तशीच आपली प्रकृती तपासून घेतली म्हणजे निरोगी समाज जीवनाचे चित्र पाहता येईल.

2050 पर्यंत जगातील दर पाच व्यक्तीमागील एक व्यक्ती ही साठ वर्षापुढील असणार आहे जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने वृद्धांच्या भावनिक मानसिक आरोग्य जपवणुकांचा संकल्प आरोग्यदायी वर्धापकाळ वाटचाल सुकर करण्यास निश्चित सहाय्यभूत ठरेल.

१.९.निष्कर्ष:

१. वेळीच आरोग्य तपासणी केल्यास निरोगी वृध्दांवस्थेचे चित्र दिसेल

२. वृध्दांपकाळात दिनचर्या व ऋतुचर्योनुसार आहार घ्यावा.

३. वृद्धावस्थेतील व्यक्तींनी आपल्या शारीरिक तपासण्या वर्षातून किमान दोन वेळेस करून घेतल्या तर शरीरांतर्गत झालेल्या बदलाची वेळीच दखल घेऊन आजार टाळता येतो.

४. शारीरिक मानसिक आरोग्य संवर्धन करण्यासाठी आहार विहार व्यायाम प्राणायाम करून जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास बऱ्याच समस्या उद्भवणार नाही.

१.१०. संदर्भ ग्रंथ:

- खैरनार, दिलीप.(२००७). *वृद्धांच्या समस्या चिंता आणि चिंतन*, औरंगाबाद. चिन्मय प्रकाशन.
- लोटे, रा. (२०१२). *भारतातील सामाजिक समस्या*, नागपूर. साईनाथ प्रकाशन.
- मसलेकर, दि.(२०१७). *वृद्धांच्या आरोग्यविषयक समस्या*, औरंगाबाद.चिन्मय प्रकाशन.
- आगलावे, प्र.(२०१६). *सामाजीक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे*, नागपूर. श्री साईनाथ प्रकाशन.
- दैनिक लोकसत्ता, २०२१.

*जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर. ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद Swamiveer99@gmail.com

***

अपंगाचे कल्याण - एक सामाजिक दायित्व

*प्रा.डॉ.शिवाजी धोंडीबा दहिकांबळे

प्रस्तावना :

२०११ च्या जनगणनेनुसार भारतातील सर्व अपंग व्यक्ती, नोकरीतील व प्राथमिक व माध्यमिक शाळांत शिकणाऱ्या विशेष अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यानुषंगाने सर्व समावेशक असे शैक्षणिक धोरण राबवण्याच्या कामी भारताला अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. कारण देशातील अपंगाच्या सद्यस्थितीबाबत सरकारी यंत्रणेकडे अपंगाच्या लोकसंख्येची व तत्संबंधी विविध बाबींची फारच थोडी माहिती जमा होऊ शकली आहे. यामध्ये मागील दहा वर्षाच्या काळात जनगणणेनुसार २.६८ कोटी अपंग व्यक्ती असल्याची नोंद आहे. यामध्ये १.५ कोटी अपंग पुरूष तर १.१८ कोटी अपंग महिलांचा समावेश आहे. अपंग व्यक्तीच्या लोकसंख्येच्या वाढीचा दर हा शहरी भागात जास्त असून त्यातही अपंग महिलांची संख्या तुलनेने अधिक आहे. २०११ च्या जनगणनेनुसार दशकात शहरी भागात ४८.२ टक्के अपंग व्यक्तींमध्ये महिलांची संख्या ५५ टक्के व अनुसुचित जातींतील अपंग व्यक्तींची संख्या २.४५ टक्के एवढी आहे. या सर्व घडामोडीमुळे महिलांची भारतीय इतिहासात पहिल्यांदाच अपंग व्यक्तीच्या सुलभ सार्वजनिक वावराच्या मुद्यावर आवश्यक तितका भर दिला जात आहे. आणि म्हणूनच संपूर्ण देशाने खुल्या दिलाने मनापासून यांच्या विकासाचे स्वागत केले आहे. यासाठी शासकीय निमशासकीय स्तरावर विविध मोहिमा, योजनांची आखणी करण्यात आली असून विविध योजना राबविण्यात येत आहेत. मनुष्याच्या शरीराचा एखादा अवयव नसणे, विकत असणे, कमकुवत असणे किंवा मानसिकदृष्टया व्यक्ती असक्षम (मतिमंद) असणे तसेच अन्य कारणाने व्यक्ती अपंग असणे ही त्या व्यक्तीच्या जीवनातील अत्यंत वाईट बाब आहे. अंपगत्व हे नैसर्गिकदृष्टया किंवा अपघाताने आलेले अशा अपंगाचे कल्याण हे समाजीपूढील मोठे आव्हाण व सामाजिक दायीत्व असल्याने जागतिक पातळीपासून ते कुटूंब पातळीपर्यंतच्या सर्वांनी यामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.

शोधनिबंधाचे उद्देश :

१. अपंगाची संकल्पना समजून घेणे.
२. अपंगाच्या ससस्याचे गांभीर्य जाणून घेणे.
३. अपंग कल्याणाचा सामाजिक दायीत्व व आव्हांनाचा विचार करणे

शोधनिबंधाचे गृहितके :

१. अपंगाच्या कल्याणामध्ये शिक्षण व रोजगार मिळवून देणे मोठे आव्हान आहे.अपंगाच्या समस्याचे गांभीर्य जाणून घेणे.
२. अपंगाच्या कल्याणासाठी पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्थांना प्रशिक्षण देणे कठीण कार्य आहे.
३. अपंग कल्याणाबाबत सामाजिक दायीत्व/जबाबदारीची भावना कमी आहे.

अपंगत्व/अपंगाची संकल्पना:

अपंग किंवा अपंग व्यक्ती म्हणून पूढील वर्गात मोडणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो.

- अंध – एक किंवा दोन्ही डोळयाने न दिसणानी व्यक्ती.
- अल्पदृष्टी –ज्या व्यक्तीला सर्वसामान्य व्यक्तीपेक्षा कमी / अल्प दिसते अशी व्यक्ती.
- मुकबधीर – ज्या व्यक्तीला तोंडाने बोलता येत नाही अशी व्यक्ती.
- कर्णबधीर – कानाने ऐकू न येणानी व्यक्ती.
- मतीमंद – ज्या व्यक्तीची बुध्दी मंद आहे अशी व्यक्ती.
- शारीरिक अपंगत्व – हात, पाय नसणे किंवा शारीरिकदृष्टया काम करण्यास अक्षम असेलेली व्यक्ती.

थोडक्यात अपंगामध्ये शारीरिक अपंगत्व व मानसिक अपंगत्वाचा समावेश होतो. पंरतु विशेष म्हणजे मानसिक आजाराचा अपंगत्व किंवा अपंगामध्ये समावेश होत नाही.

अपंग कल्याणाचे कार्ये:

१. शिक्षण सुविधा : अपंग व्यक्तीला शिक्षण उपलब्ध करून देणे मोठे आव्हान आहे. अपंग व्यक्तींना सर्वसाधारण शाळापेक्षा वेगळया शाळा निर्माण करावया लागतात. त्यामध्ये अंधासाठी वेगळी, कर्णबधीरासाठी वेगळी व मतीमंदसाठी वेगळी अशा

वेगवेगळया विशेष शाळा, तसेच शिकविण्याचे कौशल्य वेगळे, त्यासाठी विशेष प्रशिक्षित शिक्षक निर्माण करावे लागतात त्याबरोबर पालाकांनासुध्दा प्रशिक्षण देउन त्यांचात कौशल्य निमार्ण करावे लागते.

२. कृत्रिम अवयव व उपयोगी उपकरणे उपलब्ध करून देणे : अपंग व्यक्तीना उपयोगी व आवश्यक असलेली टिकाउ व आधुनिक दर्जाची कृत्रिम अवयव तसेच उपयोगी उपकरणे/ साधन सामूग्री निर्माण करून ती अपंग व्यक्तींना उपलब्ध करणे गरजेचे आहे. उदा. तीन चाकी सायकल/मोटरसायकल लोकांच्या खुर्ची, बूट, हात, पाय, श्रवणयंत्र इत्यादी.

आरोग्य उपचार पध्दती:

सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणेच अपंग व्यंक्तीना आरोग्याच्या सुविधा मिळणे आवश्यक आहेत. यामध्ये अंपगत्वाप्रमाणे विशेष उपचार उपलब्ध करणे गरजेचे असते त्याकरिता व इतर आरोग्य कर्मचारी यांना विशेष प्रशिक्षण द्यावे लागते.

व्यावसायिक प्रशिक्षण :

अपंग व्यक्तींना रोजगारांभिंमूख व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून देणे हे अत्यंत आव्हानात्मक कार्य करावे लागते. कारण व्यावसायिक प्रशिक्षणाशिवाय रोजगार मिळणार नाही व रोजगाराशिवाय अपंगाना स्वावलंबी होता येणार नाही.

रोजगार व रोजगार नियुक्ती :

अपंगाना त्यांच्या क्षमतेप्रमाणे रोजगार उपलब्ध करून देणे. तसेच शासकीय कार्यालयामध्ये अपंगाना आरक्षणाच्या माघ्यमातून रोजगार मिळवून देणे हे अपंगाच्या कल्याणामध्ये महत्वाचे आहे.

तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन :

अपंग व्यक्तीचे संगोपन व काळजी घेण्यासाठी करावायाच्या पध्दती/कार्याची माहिती कुंटूबातील व्यक्तींना तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, विशेष ग्रामीण भागासह शहारातील स्थानिक पातळीवर सरकारच्या उपाययोजना, कार्यक्रम व कार्यरत संस्थांची माहिती उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

इमारत बांधणी व वापराबाबत अपंग व्यक्तींसाठी विशेष सोयी करणे :

सार्वजनिक इमारती व सरकारी कार्यालयामध्ये अपंग व्यक्तींना ये–जा करण्यासाठी रोप बांधणे, अपंग व्यक्तीसाठी वेगळे व उपयोगी शौचालये बांधणे तसेच त्यांना बसण्यासाठी विशेष आसनव्यवस्था करणे आवश्यक आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये खास व्यवस्था करणे :

सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या सरकारी रेल्वे,बस मध्ये चढणे–उतरणे यासाठी अपंग व्यक्तीसाठी खास व्यवस्था करणे, विशेष आसनव्यवस्था व आसन आरक्षित ठेवणे. शासकीय नियोजन व अर्थसंकल्पात अपंग कल्याणाकरिता निधीची तरतूद करणे संयुक्त राष्टाने इ.स.१९७५ मध्ये अपंगाच्या हक्कासाठी पारीत केलेल्या जाहीरनाम्यात आर्थिक अधिकार आहे असे म्हटले आहे त्यामूळे शासकिय नियोजन व अर्थसंकल्पामध्ये अपंग कल्याणासाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

मदत व पुनर्वसन :

अपंग कल्याणामध्ये अपंगांना सर्व पातळीवर आणि सव प्रकारची मदत करणे /सहाय्य करणे व त्यांचे पुनर्वसन करावे लागते विशेषत: त्यांना समान संधी देणे महत्वाचे आहे. इतरांप्रमाणे ते सुध्दा समाजाचे घटक आहेत हे इतरांनी मानणे व त्यांचा अंगिकार करणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे अपंगाना सहानुभूती किंवा भीक नको तर त्यांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळाले पाहिजेत किंवा मिळवून देणे आवश्यक आहे.

भारतातील अपंगासाठीच्या राष्ट्रीय यंत्रणा व संस्था :

जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटना, युनिसेफ,हया संघटना अपंग कल्याणाचे कार्य करतात तर भारतात राष्ट्रीय स्तरावरी शासन व राज्य स्तरावर राज्य सरकार तसेच लायन्स क्लब व इतर स्वयंसेवी संघटना अपंग कल्याणाचे व पुनर्वसनाचे कार्य करीत असतात त्यामध्ये पुढील संस्था प्रमूख आहेत.

- सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, नवी दिल्ली.
- अस्थिव्यंग अपंगासाठी श्यामा प्रसाद मुखर्जी राष्ट्रीय संस्था कोलकता.
- अंध–अपंगासाठी राष्ट्रीय संस्था डेहराडून.
- मतीमंद अपंगासाठी राष्ट्रीय संस्था सिकंदराबाद.
- कर्ण बधीर अपंगासाठी अलियावर जंग राष्ट्रीय संस्था, मुंबई.

- कृत्रिम अवयव कारखाना कानपूर.
- राष्ट्रीय अपंग आर्थिक व विकास महामंडळ, नवी दिल्ली.
- अपंगत्व आणि पुनर्वसन राष्ट्रीय माहिती केंद्र, नवी दिल्ली.
- राज्यस्तरीय सामाजिक न्याय विभाग/अपंग कल्याण विभाग.
- राज्यस्तरीय अपंग आयूक्त/अपंग आयुक्तालय.

निष्कर्ष:

आपल्या भारत देशात व राज्य सरकार अपंगाच्या कल्याणासाठी अनेक योजना राबवते तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय संस्था व यंत्रणेच्या माध्यमातून त्यांच्या विकासासाठी अनेक कार्ये करते, त्याचबरोबर ३ डिसंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अपंग दिवस म्हणून साजरा करते, अपंगाच्या स्वतंत्र क्रीडा स्पर्धा घेते, अपंगांना शिष्यवृत्ती, नोकरीत आरक्षण, अपंगांना व्यवसायासाठी अनुदान व कर्ज उपलब्ध करून देते. आपल्या भारत देशात केंद्र व राज्य सरकार अपंगाच्या कल्याणासाठी अनेक योजना राबवते तसेच राष्ट्रीय व राज्य स्तरीय संस्था यांच्या माध्यमातून अपंगाच्या विकासासाठी अनेक कार्यकरते, त्याचबरोबर ३ डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून साजरा केला जातो. परंतु भारतातील अपंगाची संख्या विचारात घेता केंद्र व राज्यशासनाबरोबरच स्वंयसेवी संस्थांनी मोठया प्रमाणावर अपंग कल्याणाचे कार्य करणे अभिप्रेत आहे. थोडक्यात शासन, स्वयंसेवी संस्था आणि प्रत्येक नागरिकांनी अपंगाचे कल्याण हे कार्य सामाजिक दायित्व आणि आव्हान म्हणून स्वीकारल्यास अपंगाचे कल्याण करणे शक्य आहे.

संदर्भ :

- अग्रवाल, दि. (२०११). *समाज कार्य एवं जनकल्यान,* जयपूर. प्रिज्म बुक्स इंडिया.
- श्रीवास्तव, ए. (१९८०). *भारत की सामाजिक समस्याएँ,* इलाहाबाद. किताब महल.
- फडके, वा. आणि सत्यवती राऊत.(२०१०). *भारतातील समाजकल्याण व समाजकल्याण प्रशासन,* औरंगाबाद. के. सागर पब्लिकेशन.
- कोत्तापल्ले, ल. (२०१४). *भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य,* औरंगाबाद. विद्या बुक्त पब्लिशर्स.
- भारत सरकार, (२००९–२०१०). *सामाजिक न्याय और अधिकारीता मंत्रालय,* रिपोर्ट.

*सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, कै. बाबासाहेब देशमूख गोरठेकर, महाविद्यालय, उमरी, ता.उमरी जि. नांदेड
Email-shivjidahikamble92@gmail.com, Mob. 9890716765

***

भारतीय समाजातील दिव्यांगाचे प्रश्न

*डॉ. डी.जी. म्हशाखेत्री

गोषवारा

भारतात १९६२ मध्ये मुंबईच्या प्रसिध्द सामाजीक कार्यकर्त्या कै. कमलाबाई निंबकर यांनी सर्व प्रथम जागतीक अपंग दिन साजरा केला. यानंतर भारतात अपंग दिन साजरा होऊ लागला. १९७५ च्या सुमारास संयुक्त राष्ट्रसंघाने अपंगांच्या समस्यांकडे/प्रश्नाकडे लक्ष वेधले. सयुक्त राष्ट्रसंघाने १९८१ हे वर्ष 'जागतीक अपंग वर्ष' म्हणून साजरे करावे असे सदस्य राष्ट्रांना कळविले. अपंगाना सवलती देण्याबाबत नौकरीत आरक्षण देण्याबाबत विचार पुढे येऊ लागले. इ.स १९९२, १९९५, १९९७, १९९९ या वर्षात अपंग पुनर्वसनासंबंधीचे कायदे भारतात अस्तित्वात आले त्यामुळे अपंगाना बऱ्याच प्रमाणात दिलासा मिळाला. १९८५ मध्ये दिव्यांगाच्या अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधिश श्री बेहरूल इस्लाम यांच्या अध्यक्षेतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार महत्वाचे कायदे अस्तित्वात आले. दिव्यांगांच्या बाबतीत देशात अनेक अध्ययन आढळुन येतात. भारतामध्ये दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ नुसार दिव्यांगाचे एकुण २१ प्रकारात वर्गीकरण केले आहे. या कायद्यात दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी विविध योजना स्पष्ट केल्या आहेत. दिव्यांगाच्या विविध प्रकारानुसार त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न वेगवेगळे आढळुन येतात. सेलेब्रल पॉलसी असणारे दिव्यांग यांचे प्रश्न वेगळे आहेत तर मतिमंद, अंध या प्रकारातील दिव्यांगाचे प्रश्न वेगळे आहेत. या सर्व प्रकारच्या दिव्यांगाकडे सर्व सामान्य व्यक्तीनी, समाजाने सकारात्मक व मानवीय दृष्टीने पाहणे गरजेचे आहे.

बिजसंज्ञा — दिव्यांग, अपंग, मंदबुध्दी, अंध, प्रश्न

प्रस्तावना :—

प्राचिन काळात अनेक देशामध्ये अपंगांना पंचासक्षम मारण्यात येत होते. पुढील आयुष्यात किंवा वृध्दापकाळी अपंग व्यक्ती किंवा दिव्यांग व्यक्ती हे समाजावरील ओझं म्हणून त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोण होता. दिव्यांगांच्या बाबतीत पार्श्वभूमी तपासतांना एका घटनेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. बेल्जीयम मध्ये इ.स. १९५८ साली एका दगडी कोळशाच्या खाणीत स्फोट झाला. या स्फोटात बरेच कामगार गाडले गेले. कित्येकांचे हात पाय तुटले, काहींचा स्मृतीभंश झाला. तर काही कर्णबधिर झाले. या स्फोटामध्ये मरण पावलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले व त्यात अपंग झालेल्या कामगारांच्या समस्या समाजापुढे मांडाव्यात असा ठराव पारित झाला. १९७५ च्या सुमारास संयुक्त राष्ट्र संघाने अपंगाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले, संयुक्त राष्ट्रसंघाने १९८१ हे वर्ष 'जागतिक अपंग वर्ष' म्हणून साजरे करावे असे सदस्य राष्ट्रांना कळविले. भारतात १९६२ मध्ये मुंबईच्या प्रसिध्द समाजिक कार्यकर्त्या कै. कमलबाई निंबकर यांनी सर्वप्रथम जागतिक अपंग दिन साजरा केला. यानंतर भारतात अपंग दिन साजरा होऊ लागला. याचवेळी रोटरी इंटरनॅशनल या संस्थेतर्फे भारतात पोलिओ निर्मुलनाची मोहीम सुरू करण्यात आली. याच कालावधित अपंगांना सवलती देण्याबाबत, नोकरीत आरक्षण देण्याबाबत विचार पुढे येऊ लागले. इ.स. १९९२, १९९५, १९९७, १९९९ या वर्षात अपंग पुनर्वसनासंबंधीचे कायदे भारतात अस्तित्वात आले त्यामुळे अपंगांना बऱ्याच प्रमाणात दिलासा मिळाला.

१९८५ मध्ये दिव्यांगांच्या अनेक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी सेवानिवृत्त न्यायाधिश श्री बेहरुल इस्लाम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीत अनेक तज्ञ प्रतिनिधींचा समावेश होता. या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार महत्वाचे कायदे अस्तित्वात आले. त्यात १. अपंग पुनर्वसन परिषद १९९२

२. अपंग व्यक्तीचा कायदा १९९५

३. राष्ट्रीय अपंग आर्थिक विकास महामंडळ १९९७

४. दिव्यांगांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय विश्वस्त निधी कायदा १९९९

यानंतर अपंगाच्या हक्काविषयीचा कायदा २०१६ अस्तित्वात आला.

पुर्व साहित्याचा थोडक्यात आढावा

१. दिव्यांगाच्या बाबतीत अनेक पुर्व साहित्य आढळुन येतात. त्यात मार्क इटार्ड यांना फ्रांसमध्ये एका जंगलात ११ वर्षाचा बालक मिळाला जो बोलु शकत नव्हता. इतरांना तो जखमी करत होता व त्याच्याही शरीरावार जखमा होत्या. त्या बालकाला पॅरिसमध्ये आणण्यात आले. त्याला कपडे, जेवण, पाणी तसेच अक्षरओळख करून देण्यात आले. त्याला शिक्षण देण्यात विशेष फायदा झाला नाही परंतू ज्यांना श्रवण रोष, दृष्टिदोष, मानसिक आजार अशा दिव्यांग बालकांना शिक्षण दिल्यास निश्चितच सहारात्मक दृष्टीकोन निर्माण होईल असा विश्वास निर्माण झाला.

२. इ.स. १७८४ मध्ये विलिन टाईनिलिंग यांनी पॅरीस मध्ये दृष्टीदोष असणाऱ्या दिव्यांगासाठी प्रथम शाळा सुरू केली. याच वेळेस ग्रीस व रोम मध्ये दिव्यांग मुलांना मारून टाकले जायचे कारण दिव्यांग मुले युध्द करू शकत नव्हते.

३. होहान ग्रबीन यांनी इ.स. १८१६–१८६३ मध्ये दिव्यांगांना राहण्यासाठी व्यवस्था केली. यांनतर डेरोथियाडिम्स, सैम्पुल ओबी व हैनरी विलवर यांच्या प्रयत्नातून मंदबुध्दी असलेल्या दिव्यांगांचे वैज्ञानिक अभ्यास करून American Association of Mental Retardation (AAMR) ची स्थापना केली.

४. दृष्टीदोष असणाऱ्यासाठी ग्रामीण भागात Tata Agriculture Rubie Training Centre या नावाने प्रशिक्षण केंद्राची स्थापना १९६० मध्ये करण्यात आली. सद्यास्थितीत हे सेंटर भुवनेश्वरमध्ये स्थापन झालेले आहे.

अध्ययनाची उद्दीष्ट्ये –

१. दिव्यांगांची संकल्पना समजून घेणे.

२. भारतातील दिव्यांगांच्या समस्या किंवा प्रश्न अभ्यासणे

३. भारतातील दिव्यांगांबाबत उपाय सुचविणे

अध्ययन पध्दती : प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला असुन यासाठी विविध संदर्भग्रंथ, लेख व क्रमिक पुस्तकांचा आधार घेण्यात आला.

दिव्यांगाचा अर्थ – दिव्यांग (अपंग) शब्द ऐकला की, आपल्या नजरेसमोर हाताने, पायाने, अधु असलेली व्यक्ती येते. परंतु हाताने किंवा पायाने अंधु असलेली व्यक्ती म्हणजे एक अस्थिव्यंगाचा प्रकार होय. याप्रमाणे शरिरीक, बौध्दीक, मानसिक दृष्टया दिव्यांगाचे अनेक प्रकार आढळुन येतात.'साधारणपणे दिव्यांग किंवा अपंग, विकलांग असे शब्द ऐकल्यानंतर आपण हातापायाने अपंग, चालता न येणे लुळा, पांगळा, आंधळा असे चित्र येते. परंतू आता अपंग, विकलांग अशी ओळख न ठेवता त्यांना 'दिव्यांग' हा शब्द आला आहे. दिव्यांग म्हणजे काय? हे समजून घेण्यासाठी प्रथम Impairment (दोष विकार) Disability (अक्षमता) आणि Handicap (अपंगत्व) हे शब्द समजून घेणे महत्वाचे आहे.

१. **Impairment बिघाड (दोष, विकार):** Impairment म्हणजे शरीर रचना आणि शरीराच्या अवयवांचे कार्य बाधित असणे होय. आजारपण, जखम इत्यादी मुळे शरीरात दोष, विकार निर्माण होतात.

२. **Disability (अक्षमता):** जेव्हा एखादी व्यक्ती जन्मता असलेल्या क्षतीमुळे किंवा नंतर निर्माण झालेल्या क्षतीमुळे स्वत:चे काम सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे करू शकत नाही तेव्हा त्या स्थितीला त्या व्यक्तीची अक्षमता म्हणतात. क्षतीग्रस्ततेमुळे काम करण्याच्या क्षमतेवर मर्यादा येतात व त्यातुनच अक्षमता उत्पन्न होते. अक्षमता ही जन्मता किंवा जन्मानंतर, निर्माण होऊ शकते तसेच अक्षमता ही तात्पुरती किंवा कायमस्वरूपाची असू शकते.

३. **Handicap (अपंगत्व):** जेव्हा एखादया व्यक्तीची अक्षमता इतकी तिव्र स्वरूपाची असते की, त्या व्यक्तीला सर्व कामे करण्यासाठी इतरांवर अवलंबुन राहावे लागते तेव्हा त्या व्यक्तीच्या त्या स्थितीला 'अपंगत्व' असे म्हणतात.

वरील विवेचनावरून दिव्यांग (अपंगत्व) असणारी व्यक्ती म्हणजे दिर्घकालीन ज्या व्यक्तीमध्ये शारीरिक, बौध्दीक, मानसिक, पेशी व रक्तासंबंधी दोष असतात, ज्यांचे प्रमाणिकरण केले असता ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व /अपंगत्वाचे प्रमाण असते ती व्यक्ती 'दिव्यांग' किंवा 'अपंग' म्हणून ओळखली जाते.

दिव्यांग/अपंगत्वाचे वर्गीकरण : दिव्यांगाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

१. शारिरीक (Physical Disability) २. बौध्दीक (Intellectual Disability) ३. मानसिक (Mental Behaviour)

४. पेशी व रक्तसंबंधी (Neurological & Blood Disorder)

परंतू दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ नुसार २१ प्रकार सांगण्यात आले आहेत. ते खालील प्रमाणे.

१. पुर्णत: अंध (Blindness) २. अंशत: अंध (Low vision) ३. कर्णबधिर (Hearing Impaired) ४. वाचादोष (Speech and Language Disability) ५. अस्थिव्यंग (Locomotor Disability) ६. मानसिक आजार (Mental Illness) ७. अध्ययन अक्षमता (Learning Disability) ८. मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) ९. स्वमग्न (Autism Spectrum Disorder) १०. बहुविकलांग (Multiple Disability with deaf blindness) ११. कुष्ठरोग (Leprosy Cured Person) १२. बुटकेपण (Dwarfism) १३. मतीमंद (Intellectual Disability) १४. अविकसित मासपेशी (Muscular Dystrophy) १५. मज्जासंस्थेचे तिव्र आजार (Chronic Neurological Conditions) १६. मेंदुतील चेतासंस्था संबंधिचा आजार (multiple sclerosis) १७. रक्तसंबंधी कॅन्सर (Thalassemia) १८. रक्तवाहिन्या संबंधी आजार (Hemophillia) १९. रक्तसंबंधी रक्ताचे प्रमाण कमी असणे (Sickle cell Disease) २०. हल्ला ग्रस्त पिडीत (Acid Attack victims) २१. कंपवात रोग (Parkinson's Disease)

वरील सर्व दिव्यांग प्रकारातील मुले/व्यक्ती म्हणून ओळखले जातात.

दिव्यांगाचे प्रश्न /समस्या : दिव्यांगांच्या प्रश्नाबाबत किवां समस्याबाबत चर्चा करतांना दिव्यांगांच्या वर्गीकरणानुसार वेगळवेगळे प्रश्न/ समस्या आढळुन येतात. सर्वसाधारणपणे खालील प्रश्न दिव्यांगाच्या बाबतीत आढळुन येंतात.

१. वर्तन समस्या

वर्तन समस्या असणाऱ्या दिव्यांग बालक किंवा व्यक्तींमध्ये जेवतांना जेवण कसे करावे? याबाबत सुसूत्रता अजिबात नसते, एखादया बाबीचा हट्ट धरणे, अंध मुलांना स्वत:च्या हाताने, न सांगता जेवण करणे कठीण असते. सेरेब्रल पॉलसी म्हणजे मेंदुचा पक्षाघात असणारे मूल किंवा व्यक्ती हे पुर्णपणे झोपुनच असतात, त्यांचा शरीरावर कोणत्याही प्रकारे नियंत्रण नसल्याने त्याना स्वत: जेवण करता येत नाही. वर्तन समस्या असणाऱ्या बालकामध्ये विविध समस्या उद्‌भवतात. ते स्वतांबरोबर इतरांना सुध्दा इजा करू शकतात. मतिमंद मूले, अंध मूले शिक्षणात व दैनंदिन कौशल्य प्राप्त करण्यास असमर्थ असतात. तसेच मतिमंद मुलांचा मेंदुवर नियंत्रण नसल्याने त्यांचे स्वत:वर नियंत्रण नसते. वर्तन समस्या असणाऱ्या मुलांमध्ये वेगवेगळे शारीरिक हावभाव करणे, लज्जा उत्पन्न होईल असे वागणे, एखादी गोष्ट बरेचदा सांगूनही लक्षात न ठेवणे इत्यादी वर्तन आढळुन येतात.

२. शैक्षणिक समस्या

अध्ययन अक्षमता असणाऱ्या दिव्यांग मुलांमध्ये शिक्षण शिकण्यात दोष असतात, म्हणजेच सर्व सामन्य मूलांमध्ये विविध कौशल्य प्राप्त करण्याचा व शिकण्याचा जो वेग असतो त्यापेक्षा अशी दिव्यांग मूले मागे पडतात. वेगवेगळया शारिरीक व्यंग असणाऱ्या मुलांना शाळेत जाण्यसाठी प्रचंड अडथळे येतात. म्हणजेच दिव्यांग मुलांना विविध शैक्षणीक समस्यांना सामोरे जावे लागते. उदा. अभ्यास करणे, लिहणे, वाचणे, एकाठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे, शाळेत जाणे इत्यादी दिव्यांग मुलांना बरेचदा भाषेची सुध्दा समस्या उदभवते. ऐकण्याची सुध्दा समस्या निर्माण होते, दिव्यांगांना शिक्षणाच्या माध्यमातून भाषेचा ज्ञान अवगत करणे फारच कठिण असते. भाषेच्या माध्यमातून आपले विचार एकाकडुन दुसऱ्याकडे पोहचविले जातात, अंध बालकांपेक्षा मंदबुध्दी बालक अधिक आढळुन येतात. अशा मंदबुध्दी बालकांना वाचन, लेखन या गोष्टी प्राप्त करतांना फारच अडचणी निर्माण होतात. यांना बरेचदा ब्रेल लिपीचा वापर करून शिक्षण दयावे लागते.

भाषा शिकतांना ऐकू न येणाऱ्या दिव्यांगांना फारच समस्या निर्णाण होतात. लहान बालक जे ऐकतो ते तो बोलण्याचा प्रयत्न करतो. बालकांचे सुरवातीचे चार वर्ष बोलण्यासाठी व भाषेचे ज्ञान अवगत करण्यासाठी अत्यंत महत्वाचे मानले गेले आहे. भाषेच्या बाबतीत दिव्यांग बालकामध्ये तिन प्रकारच्या उणीवा आढळतात. १. मर्यादीत शब्दसाठा २. स्वर किंवा उच्च्यारणातील निरसता ३. भाषा व्यक्त करतानाचे हावभाव व त्यातील गती अवरोध इ.

३. समाजीक व कौटुंबीक समस्या

स्वमग्न (Autism) सारख्या अपंगत्व प्रवर्गातील मूले किंवा व्यक्ती विशेषत: स्वत:च्या विश्वातच रममान झालेले असतात. त्यांना आपल्या सभोवती काय घडत आहे याचे भान नसते. त्यांना भुक लागली तरी कळत नाही. त्यांचेकडे सतत कोणीतरी लक्ष ठेवावे लागते. त्यांना त्यांच्या आवडी निवडी कळत नाही तसेच एखादया बाबीवर स्वत:चे मत व्यक्त करता येत नाही. त्यांना एखादया विषयावर विचारले तर ते दुसऱ्याच विषयावर बोलतात. म्हणजेच बोलण्यात ताळमेळ नसतो. अशाप्रकारचे दिव्यांग मूले शाळेत प्रवेश घेतल्यानंतर वर्गात अडथळे निर्माण करतात. कारण त्यांचे राहणे, बोलणे, वागणे इ. कार्य हे सर्वसामन्य विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे असतात.

बऱ्याच दिव्यांग बालकांना जन्मापासूनच विविध समस्यांचा प्रारंभ होतो. काही कुटूंबामध्ये अशा दिव्यांग बालकांना विशेष सुविधा पुरविल्या जातात तर काही कुटूंबात त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. दिव्यांग बालकांच्या कुटूंबातील आई वडील हे निश्चितच प्रचड चिंतेने ग्रासलेले असतात, त्यांच्यात नैराश्यतेची भावना उत्पन्न झालेली असते. ग्रामीण भागातील दिव्यांगाच्या बाबतीत बरेचदा उपेक्षेचे जीवन त्यांच्या वाटयाला आले असते. कारण दिव्यांगासाठीच्या सर्व सोई सुविधा या शहरातच आढळून येतात ग्रामीण भागातील लोकांना याची माहिती व कल्पना सुध्दा नसते.

४. सामाजिकीकरण प्रक्रियेचा अभाव

दिव्यांगाच्या बाबतीत सामाजीकीरणाची प्रक्रिया योग्य प्रकारे झालेली आढळुन येत नाही. सामाजीकिकरणाची प्रक्रिया पूर्णत्वास जाण्यासाठी बालकांना इतर लोकांमध्ये वावरल्यानंतरच आत्मसात करू शकतात. समाजातील विविध मूल्ये, परंपरा, रितीरीवाज यापासून दिव्यांग बालक अलिप्त असतात. लहान बालक आपल्या आई वडीलांच्या प्रत्येक कृतीतुन सामाजीकिकरणाची प्रक्रिया आत्मसात करीत असते. मात्र दिव्यांग बालक या सामाजीकिकरणाच्या प्रक्रियेपासून वंचीत राहत असल्याचे आढळून येते.

५. वैयक्तीक समस्या

कोणालाही दिव्यांग बालकाला वास्तविक जीवनातील उपयुक्त अनुभव मिळत नाही त्यामुळे त्याला उपलब्ध वातावरणात स्वत:ला समायोजीत करतांना विविध समस्यांना त्यास सामोरे जावे लागते. ज्याप्रमाणे सर्व सामान्य बालक वातावरणात फिरून, वावरून वेगवेगळे अनुभव प्राप्त करू शकतो. त्याप्रकारे दिव्यांग बालक अनुभव प्राप्त करू शकत नाही. उदा. अंध बालकाच्या जीवनात अनेक प्रकारच्या समस्या उद्‌भवतात. त्याला हालचाल करण्यास, एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास, संचार करण्यास अशक्य असते. लोवेनफैल्ड यांच्या अध्ययनानुसार अशा दिव्यांग बालकांच्या जीवनात प्रत्यक्ष अनुभवातील विविधता व त्याची सिमा यावर बंधने येतात. त्याची योग्यता जी आहे त्यावर विपरित प्रभाव पडतो. तसेच वातावरणासोबत पारस्पारीक क्रिया करतांना अनेक अडचणी येतात.

६. दिव्यांगांच्या जीवनातील गरीबीची समस्या

दिव्यांग बालकांच्या बाबतीतील एक आकडेवारी असे स्पष्ट करते की, दिव्यांगता व गरीबी यांचा परस्पर संबंध असून बहुतांश दिव्यांग बालक किंवा व्यक्ती यांचा जन्म गरीब कुटुंबामध्ये झालेला आहे. कारण गरीब कुटुबातील गर्भवती स्त्रियांचे योग्य देखभाल होत नाही, अनेक आवश्यक बाबींची पुर्तता होऊ शकत नाही, कुपोषीत मातांमुळे किंवा वेळेवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे दिव्यांग बालकांचा जन्म होतो ही वस्तुस्थिती आहे इ.स. २०११ च्या जनगननेनुसार देशातील एकुण दिव्यांगाच्या ६९% दिव्यांग हे ग्रामीण भागातील आहेत. त्यामुळे दिव्यांग व गरीबी यांचा निश्चितच परस्परसंबंध असल्याचे आढळून येते.

७. मनोवैज्ञानिक समस्या

बहुतांश दिव्यांग बालक आपल्या वाटयाला आलेली दिव्यांगाची अवस्था ही आपल्या भाग्यानुसार मिळाली म्हणून स्विकृत करतात. परंतू काही दिव्यांग बालक स्वत:ला सामान्य जीवन जगण्यासाठी प्रयत्न करतात परंतू ते त्यात अपयशी होतात. अशा वेळेस ते दुसऱ्या सामान्य बालकासोबत स्वत:ची तुलना करतात व त्यांचा द्वेश करतात. परिणामी त्यांच्यातील आत्मविश्वास (Self Confidence) कमी होतो या हीन भावनेचे (Inferiority Complex) शिकार होतात, यातुनच त्यांना मानसिक आजार जडतात.

उपरोक्त विवेचनावरून भारतीय समाजातील दिव्यांगाचे प्रश्न, समस्या आढळून येतात.

उपाययोजना : दिव्यांग बालकांचे/व्यक्तीचे वेगवेगळया प्रकारात वर्गिकरण केल्यानंतर जवळपास २१ दिव्यांग प्रकार, दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनीयम २०१६ मध्ये सांगितले आहे. दिव्यांगाच्या पुनर्वसन योजना, आरोग्य, रोजगार, सहाय्यकारी विविध योजना, आर्थिक तरतुद इ. बाबत २०१६ च्या दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियमात सविस्तरपणे स्पष्ट केलेल्या आहेत. या कायद्यातील तरतुदींचा प्रचार व प्रसार होणे गरजेचे आहे. तसेच सर्वसामान्य व्यक्तींनी दिव्यांगांकडे पाहण्याचा दृष्टीकोण मदतीचा व सकारात्मक ठेवणे गरजेचे आहे.

निष्कर्ष : भारतातील दिव्यांगाचे प्रश्न/समस्या याबाबत वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, अजुनही दिव्यांग बालक/व्यक्ती अनेक समस्याग्रस्त आहेत. वेगवेगळया दिव्यांग प्रकारातील दिव्यांगाचे प्रश्न वेगवेगळे आढळुन येतात. या दिव्यांगांना समाजातून, कुटूंबाकडून प्रेमाच्या, जिव्हाळयाच्या भावनेतून त्यांच्याशी वर्तन केल्यास व शासकीय धोरणाची मदत घेतल्यास दिव्यांगांचे अनेक प्रश्न सोडविण्यास निश्चितच मदत होईल.

संदर्भ :

- तुंगार, वा. (२०१६). *अपंगाच्या हक्काविषयीचा कायदा,* पुणे. मायमिरर पब्लीशींग हाउस, प्रा.ली.
- मटानिया, अ.(२०२१). *दिव्यांगता का परीचय,* नई दिल्ली. कनिष्क पब्लीशर्स, डिस्ट्रीब्युटर्स.
- भनोट, सु. (२०२१). *श्रवण, क्षतीयुक्त बालक, कारण पहचान एवं उपचार,* नई दिल्ली. कनिष्क पब्लीशर्स, डिस्ट्रीब्युटर्स.
- मिश्र, प्रि.एवं दया राणी.(२०२१). *बहु दिव्यांगता, प्रायोगीक दृष्टीकोण* , नई दिल्ली. कनिष्क पब्लीशर्स.
- दुबे, सु. (२०२१). *दृष्टीबाधीत विद्यार्थीयोंकी समस्याएँ और उनके लिए सुझाव,* दिल्ली. कनिष्क पब्लीशर्स, डिस्ट्रीब्युटर्स.

*प्राचार्य तथा समाजशास्त्र विभागप्रमुख, कर्मवीर दादासाहेब देवतळे, महाविद्यालय, चामोर्शी, जि. गडचिरोली.

***

ठाणे जिल्ह्यातील मोरोशी गावातील आदिवासी मजूर महिलांची कार्यसंस्कृती

*भाग्यश्री गुलाब पवार

गोषवारा : *ठाणे हा नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध असलेला असा महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे निसर्गाने या जिल्ह्याला फार काही दिले आहे. हा ठाणे जिल्हा जसा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो तशीच या जिल्ह्यात आपल्याला सह्याद्रीची रांग देखील दिसून येते. इतिहासाची ओळख करून देणारे अनेक गड किल्ले ही येथे त्याच्या अस्तित्वाची ओळख करून देतात. येथील डोंगर माथ्यावर असणारी वेगवेगळे वनौषधी कित्येकांना आयुष्य देतात. अति दुर्गम भाग ते औद्योगिक वसाहती असा प्रवास या ठाण्याने केला आहे. म्हणूनच काय तर भारतातील पहिला पहिली रेल्वे धावली तीही मुंबई ते ठाणे. याच ठाणे जिल्हयाने आपल्याला अनेक दिगवंत नेते, अभिनेते, समाज सुधारक, कवी, लेखक, इत्यादी दिले आहेत. प्रत्येक क्षेत्रात ठाण्याने आपले अस्तित्व देशाला दाखवून दिले आहेत, पण आजही या ठाण्यातील आदिवासी बांधवांची हवी तशी प्रगती झालेली दिसून येत नाही आणि जेव्हा आपण या आदिवासी भागातील महिलांच्या कामाचा आढावा घेतो तेव्हा त्यांच्या खडतर आयुष्याची आपल्याला ओळख होते. मुंबईच्या जवळ असणारा हा जिल्हा म्हटलं तर औद्योगिक दृष्ट्या फार सदन आहे. जवळजवळ संपूर्ण जिल्ह्यात मुंबईची रक्तवाहिनी लोकल रेल्वे धावते आहे. एक मुरबाड तालुका या लोकल रेल्वे पासून वंचित होता पण त्या ठिकाणी देखील या रक्तवाहिनीस परवानगी मिळाली आहे आणि या रेल्वेमुळेच सर्व सुविधा ह्या हाकेच्या अंतरावर आल्या आहेत. वेगवेगळ्या आदिवासी पाड्यातील महिलांना आपल्या वस्तू विकण्यासाठी या गोष्टींचा फायदा होत आहे, पण अजूनही या लोकांचा हवा तसा विकास झालेला नाही. या मुरबाड तालुक्यात आदिवासी पाडे हे जास्त प्रमाणात आहेत, हे आदिवासी लोक आपला उदरनिर्वाह हा अजूनही पारंपारिक पद्धतीनेच करताना आपणास दिसतात. यांना असणारे निसर्गाचे ज्ञान व मागील पिढीचे अनुभव या आधारावर हे आपले उदरनिर्वाहाचे मार्ग शोधतात. शिक्षणाकडे असणाऱ्या यांच्या दुर्लक्षामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, यातीलच रोजगार ही देखील समस्या आहे.*

ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक ठिकाणांपैकी एक महत्त्वपूर्ण ठिकाण म्हणजे 'भैरवगड'. या भैरव गडाच्या पायथ्याशी निसर्गाच्या कुशीत वसलेले एक सुंदर गाव म्हणजे मोरोशी. या गावात जवळजवळ सर्व लोक हे आदिवासीच आहेत. त्यांची जमात ते (म) ठाकूर अशी लावतात. या गावातील महिलांच्या कार्य संस्कृतीचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न या संशोधनात केला आहे. मुरबाड तालुका तसा कल्याण स्टेशन पासून सुमारे ३१ किलोमीटर अंतरावर आहे आणि तो ९२२ चौरस किलोमीटर पसरलेला आहे. तालुक्याच्या ठिकाणापासून दूरवर असणाऱ्या गावात आजही रेल्वे सोडा तर साधी लालपरी देखील पोहोचलेली नाही. सरकारने महिलांसाठी लाल परिचे तिकीट ५० टक्के कमी केले आहे, पण या आदिवासी महिलांच्या गावांपर्यंत ही लाल परी अजून जातच नाही, तर या महिला शासनाच्या या योजनांचा फायदा घेणार तरी कशा? कामानिमित्त या महिलांना आजही डोक्यावर ओझे घेऊन मैलोन मैल पायी प्रवास करावा लागतो व मिळणाऱ्या तुटपुंज्या मिळकती मधून आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे जेवण, औषध पाणी व इतर सर्व पहावे लागते. या समाजातील महिलांपर्यंत अजून शिक्षणाची गंगा हवी तशी पोहोचली नसल्या कारणाने त्यांना मोलमजुरी सारखी कामे करावी लागतात. जंगलातून मिळणाऱ्या वस्तू रानीवनी भटकून जमा करणे, पायपीट करत नॅशनल हायवेवर जाऊन विकणे, पावसाळ्यात दुसऱ्याच्या शेतीत राबणे व उन्हाळ्यात कामाच्या शोधात दुसऱ्या जिल्ह्यात जाऊन, तुटपुंज्या मिळकतीवर काबाड कष्ट यांना करावे लागतात अति प्रमाणातले कष्ट यांच्या पाट्यालाच पुजलेले आहेत असे या महिलांचे म्हणणे आहे. सकाळी घरातील जेवण, कपडे, भांडी, झाडू इत्यादी सर्व कामे करून या महिला बाहेरही कामे करतात. ज्यात त्यांना मुख्यत्वे शारीरिक कष्ट करावे लागतात. या सगळ्यात या महिला स्वत:चे अस्तित्व किंवा स्वत:लाच विसरत चाललेल्या आहेत असे वाटते.

प्रस्तावना:

भारत हा विविधतेत एकता असणारा देश आहे. अनेक जाती, धर्म, पंथ आपल्याला भारतात दिसून येतात. भारताची संस्कृती ही विविधतेने व समृद्धतेने नटलेली आहे. भारताचे क्षेत्रफळ बत्तीस लाख अठ्ठयाहत्तर हजार दोनशे त्रेसष्ठ चौरस किलोमीटर असून, क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगात सातवा क्रमांक आहे. भारत हा जैविक वन्यजीव साधन संपत्ती तसेच सागरी जैविक व खनिज संपत्तीने समृद्ध आहे. भारतात आजच्या मितीस एकोणतीस घटक राज्य व सात केंद्रशासित प्रदेश आहेत.

महाराष्ट्र हा एकूण छत्तीस जिल्ह्यांमध्ये विभागला आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक दृष्ट्या प्रगत जिल्ह्यांपैकी ठाणे हा कोकण विभागातील उत्तरेकडचा जिल्हा आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण सात तालुके आहेत. यात शहापूर तालुका हा सर्वात मोठा

असून, त्याचे क्षेत्रफळ एक हजार सहाशे एकोणतीस चौरस किलोमीटर आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण सहा महानगरपालिका, दोन नगरपरिषदा, पाच पंचायत समित्या, चारशे तीस ग्रामपंचायती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसारजिल्ह्यात एक हजार एकशे सतरा हजार लोकसंख्या ग्रामीण भागात तर सहा हजार नऊशे त्रेपन्न हजार लोकसंख्या नागरी भागात तसेच सहाशे त्रेचाळीस हजार लोकसंख्या अनुसूचित जातींची असून चारशे चोवीस हजार लोकसंख्या अनुसूचित जमातींची असलेली दिसून येते.

ठाणे जिल्ह्यात कल्याण ठाणे, भिवंडी, मुरबाड, अंबरनाथ, उल्हासनगर, शहापूर या सात तालुक्यांचा समावेश होतो. शहापूर हा ठाणे जिल्ह्यातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा तालुका आहे. या तालुक्यात आदिवासींची संख्या जास्त असल्याने हा आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात ठाकूर, वारली, कोकणा, काथोडी, कातकरी, महादेव कोळी या जमाती दिसून येतात. ठाणे जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील आदिवासी लोकांच्या जीवनावर तेथील वातावरणाचा प्रभाव असलेला दिसून येतो.

कल्याण, अंबरनाथ तालुक्यातील औद्योगीकरणाचा तेथील आदिवासींच्या जीवनमानावर परिणाम झाल्याचे दिसून येते. त्या मानाने मुरबाड तालुक्यातील आदिवासी हे आजही पूर्वापार चालत आलेलं जीवन जगताना दिसून येतात. मुरबाड तालुक्यातील आदिवासी हे पिढ्यानपिढ्या चालत आलेली कामे करीत आहेत. तर आदिवासी महिला देखील आपल्याला पुरुषांच्या बरोबरीनेच काम करत असल्याचे दिसून येते. ठाणे जिल्ह्यात सर्वात जास्त पाऊस पडत असला तरी आदिवासी पाडयातील महिलांना पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागते.

मुरबाड तालुका शहरीकरणाच्या एकदम अलिप्त असा नैसर्गिक वातावरणात विकसनशील असा ठाणे जिल्ह्यातील महत्वाचा तालुका म्हणून ओळखला जातो. कल्याण' पासून 'थीतबी' गावापर्यंत हा तालुका पसरलेला असून हा तालुका जवळपास ९२२ चौ.किमी पसरलेला आहे. यात जवळपास २०९ गावांचा समावेश आहे व ही गावे अहमदनगर – मुंबई महामार्गावर पसरलेली आहेत. तालुक्यात प्रामुख्याने कुणबी, आगरी, आदिवासी व ठाकुर समाजाची वस्ती आहे. मुरबाड तालुक्यात अनेक ऐतिहासिक ठिकाणे तसेच पुराणात नोंद घेण्यात आलेली ठीकाणे आहेत. १) नाणेघाट २) गोरखगड ३) मच्छीन्द्रगड ४) सिद्धगड ५) श्रुंगकृषी समाधी ६) श्री क्षेत्र संगमेश्वर (काळू डोईफोडी नदीचा संगम) ७) खांबलिंगेश्वर म्हसा ८) गणेश लेणी सोनावळे. पर्यटकप्रिय असलेला 'माळशेज घाट' याच तालुक्यामध्ये येतो. मुंबई व जवळपासच्या ठिकाणांहून छोट्या सहलींसाठी बरेच पर्यटक या परिसरात येतात. मुरबाड तालुक्यातील बहुतेक गावे डोंगर भागात वसलेली दिसून येत असून यातील बहुतांश गावात आदिवासी समाज हा पाहायला मिळतो. हा समाज अनेक पाड्या–पाड्यांमध्ये विखुरलेला दिसून येतो. बहुतेक पाड्यांचा विकास हा पर्यटन स्थळांच्या आसपास वसल्यामुळे व यातून मिळालेल्या रोजगारातून होताना दिसत असला तरी या पर्यटना सोबतच त्यांना निसर्गतातून अवगत झालेल्या कलांचा जोड व्यवसाय म्हणून उपयोग करून व यातून तयार केलल्या विविध वस्तू व त्यांची विक्री याद्वारे सुद्धा होताना दिसूत येते. अस असलं तरीबदलत्या ऋतू प्रमाणे पर्यटनावर पण परिणाम होतो. पावसाळ्यात असणारी पर्यटकांची गर्दी उन्हाळ्यात फार कमी होऊन जाते, त्यामुळे येथील समाजाचा पावसाळ्यात मिळणारा रोजगार उन्हाळयात कमी झालेला दिसून येतो. मग पुन्हा पोटाची भूक भागवण्यासाठी त्यांच्या नशिबी आलेली पायपीठ पुन्हा सुरु करावी लागते. पावसाळ्याच्या दिवसात आदिवासी महिला इतरांच्या शेतात शेतमजूर म्हणून राबताना दिसतात, तसेच पावसाळ्यानंतर बेकार म्हणून असणारा हा समूह समिधा गोळा करणे, भाजीपाला लावला असेल त्याच्या शेतात काम करणे, श्रावण महिन्यात केळीची पाने विकणे, लाकडांच्या मोळ्या बनवून विकणे, चैत्रात विडी बनवण्यासाठी उपयोगात येणारी टेंभुर्णी ची पाने गोळा करणे, पत्रावळी द्रोण बनवण्यासाठी पळसाची पाने जमा करणे, पावसाळी रानभाज्या विकणे इत्यादी कामे करून आपल्या संसाराला हातभार लावताना दिसतात. 'माणसाचा पीठ असेल तर बाईचा मिठ तरी पाहिजे' ही मानसिकता या महिलांमध्ये असलेली दिसून येते. उदरनिर्वाहासाठी वर्षानुवर्ष या महिला वेगवेगळ्या कामांमध्ये गुंतलेल्या दिसून येत आहेत. पण काही आदिवासी महिला या सातत्याने जंगलावर आधारित कामे जसे समिधा (त्यांच्या दृष्टीने काड्या) जंगलातून आणणे, त्या तोडणे आणि विकणे हे करीत आहेत, वेगवेगळी पाने आणून विकणे, काही औषधे आणून विकणे या पद्धतीची कामे या महिला करताना दिसतात.

मुरबाड तालुक्यात मोरोशी हे गाव भैरव गडाच्या पायथ्याशी वसलेले आहे. मोरोशी गावाच्या उत्तरेस शहापूर तालुका पश्चिमेस अंबरनाथ तालुका आहे. मुरबाड तालुक्यातील या मोरोशी गावातील आदिवासी महिलांची जी कार्यसंस्कृती आहे तिचे स्वरूप समजून घेण्याचे काम या संशोधनातून केले आहे.

साहित्य समीक्षा:

१. **एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका** वोल्युम पाच, १९७० पान क्रमांक ८३१ मध्ये कार्यसंस्कृती संदर्भात असे म्हटले आहे की, कार्य नैतिकतेमध्ये दृष्टिकोण आणि मूल्य प्रणालींचा समावेश असतो ज्यामुळे प्रणालीची उद्दिष्टे साध्य होतात. औद्योगिक संघटना, संस्कृती इत्यादींमध्ये वर्तनाचे सर्व प्रकार समाविष्ट असलेले दिसतात. एखादी संस्था ही समूहाची बनलेली असते तर समूह वेगवेगळ्या व्यक्तींनी बनलेला असतो.

२. *डॉ. अलका हिवाळे* यांच्या आदिवासी लोकगीतांतील स्त्री–जीवन, कैलास पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००२ या पुस्तकात आदिवासी महिलांच्या जीवनाच्या विविध अंगांची छटा दिसून येते, त्यात त्यांनी आदिवासी महिलां वेगवेगळ्या सणा–समारंभांना ,धार्मिक कार्यक्रमांना, घरातील काम करताना, तसेच शेतात –जंगलात कामे करताना आपल्या भावना गाण्यातून कशा व्यक्त करतात ते मांडले आहे.

३. **मिनिस्ट्री ऑफ ट्रायबल अफेअर्स** ,मुंबई २४ मे २०२० च्या लेखात असे दिसून आले आहे की, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आदिवासींनी लॉकडाऊन च्या काळात आपले समिधा गोळा करण्याचे काम सुनिल पवार यांच्या मदतीने सुरूच ठेवले होते. कोरोना काळात रोगप्रतिकारशक्ति वाढविण्यासाठी गुळवेल (गिलोय) या वनस्पतीची मोठ्य प्रमाणात मागणी वाढली होती. ही औषधी या आदिवासींकडून इतर लोकांपर्यंत पोहोचत होती. नेहमीप्रमाणेच जंगलातून समिधा गोळा करणे व वनौषधी गोळा करणे हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे काम लॉकडाऊनच्या काळातही चालूच होते.

४. **तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी**, मराठी विश्वकोश खंड क्रमांक एक प्रथमावृत्ती १९८८ या पुस्तकात असे म्हंटले आहे की, आदिवासी अर्थव्यवस्थेत गटवार श्रमविभाजनाचा वा धंदेवार भिन्न सामाजिक गटांचा अभाव असतो. सर्व लोक सर्व प्रकारची कामे करतात. याशिवाय आदिवासी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात. पाटावरवंटा, सापळे, जाळी, आकडे, गळ, दोऱ्या, टोकदार व धारदार दांडकी, हातोडा, कोयता ह्यांसारखी प्राथमिक अवजारेच वापरात असतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादन–वितरण–सेवन या तीन टप्प्यांपैकी वितरण म्हणजे मालाची वा उत्पन्नाची सार्वत्रिक देवघेव, हा टप्पा आदिवासी अर्थव्यवस्थेत नसतो. उत्पादन कमी असल्यामुळे बाजारपेठाही नसतात. जो तो आपापल्या उत्पादनाचा उपभोग घेतो. त्यांची अर्थव्यवस्था बहुधा नाणे इ. चलनावाचून चालणारी व वस्तुविनिमयाधिष्ठित असते. वस्तुविनिमय म्हणजे उपयुक्त वस्तूंची देवघेवाण होय.

५. **डायमंड समाजशास्त्र शब्दकोश**,(इंग्रजी–मराठी), प्रथम आवृत्ती, २०१२. या पुस्तकात संपादकीय लेखक प्रा. पि. के. कुलकर्णी यांनी (Labour)श्रम या संदर्भात असे म्हटले आहे की कोणताही विशिष्ट प्रकारचा हेतू साध्य करण्यासाठी मानवी शक्तीचा जाणीवपूर्वक वापर करणे म्हणजेच श्रम होय. त्यांनी शारीरिक श्रम व बौद्धिक श्रम असे श्रमाचे प्रकार सांगितलेले दिसून येतात. ज्यात कष्टाची कामे शारीरिक श्रमात मोडताता तर डोक्याशी (बुद्धीशी) संबंधित कामे बौद्धिक श्रमात मोडताना दिसतात.

संशोधनाचा उद्देश:

मोरोशी गावातील आदिवासी मजूर महिलांच्या कार्य संस्कृतीचे स्वरूप समजून घेणे.

संशोधन पद्धतीशास्त्र:

- **सैद्धांतिक दृष्टिकोन:**

  सदरील संशोधनासाठी संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टिकोनाचा वापर करण्यात आला आहे.

- **संशोधन आराखडा:**

  सदरील संशोधनासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

- **संशोधन पद्धती:**

  सदरील संशोधनात मिश्र पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

- **नमुना आराखडा:**

संशोधन क्षेत्र:

सदरील संशोधनासाठी मोरोशी हा आदिवासी गाव निवडण्यात आला होता.

तथ्य संकलनाचे स्त्रोत:

सदरील संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताद्वारे माहिती जमा करण्यात आली आहे.

नमुना आकार:

सदरील संशोधनासाठी मोरोशी गावातील वीस आदिवासी महिलांची उत्तरदाते म्हणून निवड करण्यात आली होती .

नमुना निवड तंत्र पद्धती:

सदरील संशोधनात संभाव्यता नमुना तंत्र वापरण्यात आले आहे.

नमुना एकक:

मोरोशी गावातील आदिवासी महिलांची नमुना एकक म्हणून निवड करण्यात आली आहे.

तथ्य संकलनाची पद्धती:

सदरील संशोधनात मुख्यता सहभागी निरीक्षण आणि सर्वेक्षण व मुलाखत या पद्धतींचा तथ्य संकलनासाठी वापर करण्यात आला आहे.

तथ्याचे विश्लेषण :

९९ टक्के आदिवासी असणाऱ्या या मोरोशी गावात पुरुषांच्या तुलनेत महिला जास्त मजुरी करत असल्याचे निदर्शनास आले. भैरव गडाच्या पायथ्याशी निसर्गाच्या कुशीत असणाऱ्या या गावातील महिलांना वेगवेगळ्या सीजनमध्ये कामासाठी वणवण करावी लागत असल्याचे दिसून आले. पावसाळ्याच्या दिवसात या महिला स्वत:च्या शेतात काम करतात तर ज्यांना स्वत:ची शेती नाही किंवा शेती कमी आहे अशा व्यक्ती ज्यांच्या जवळ जास्त शेती आहे अशा व्यक्तीची शेती अर्धलीने घेतात व ती शेती कसतात. हा अर्धलीचा प्रकार म्हणजे जो शेतीचा मालक असेल तो कसणाऱ्याला फक्त एक पोते बियाणे व एक पोते खत देऊ करेल या व्यतिरिक्त येणारा सर्व खर्च हा अर्धलीने शेती घेणाऱ्या मजुरालाच करावा लागतो व शेतीत जरी पीक आले नाही तरीही शेती मालकाला भरणा देणे अनिवार्य असते, तसेच करवंद, जांभूळ या रानमेव्याच्या सीझनमध्ये या गावातील लोक हे फळे, भाज्या रानातून आणून विकण्याचे काम करतात. हे काम करताना ते वेगवेगळ्या गटांच्या माध्यमातून करतात. त्यात काही वेळा नवरा बायको, बायका बायका, कुटुंब कुटुंब अशा प्रकारचे गट करून कामे केल्याचे निदर्शनास आले. एक दिवस जंगलात जाऊन करवंद खुडण्याचे काम हे लोक करतात व दुसऱ्या दिवशी पुरुष गट हे शहरात नेऊन विकतात. पूर्ण सीजन हे गट एकत्रितरित्या हे काम करतात व सीजन संपल्यानंतर त्यातून मिळालेल्या मिळकतीची, पैशाची ते वाटणी करून घेतात. करवंदांसोबतच पावसाळ्यामध्ये येणाऱ्या विविध रानभाज्या देखील जंगलातून आणून गावालगत असणाऱ्या नॅशनल हायवेच्या लगत उभे राहून विकतात. या भाज्या विकण्याचे काम या महिला करतात शेतातून कोणी काय आणावे किंवा आणू नये अशा कोणत्याही प्रकारचे निर्बंध कोणावरही लाभलेले नाहीत. प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणे काम करण्याची किंवा जंगलातील वस्तू आणण्याची मुभा आहे. उन्हाळ्याच्या सिझनमध्ये या महिलांना हाताला काम नसते, त्या काळात या महिला कामाच्या शोधात घाटाच्या वर म्हणजेच पुणे जिल्ह्याकडे धाव घेतात. जुन्नर तालुक्यात या काळात शेतात होणाऱ्या कामांसाठी या महिला मजूर म्हणून जातात. कांदे लागवड, शेतातील अनावश्यक तण काढणे, मिरची तोडणे इत्यादी कामांसाठी या महिला जात असतात. या काळात त्या महिला सकाळी तीन वाजता उठून घरातील सर्व कामे उरकून, जेवण बनवून या महिला भेटेल त्या गाडीने जात असतात. या कामांसाठी जाताना त्या काही वेळेस पती – पत्नी काही वेळेस बायका बायकांचा गट तयार करून जातात. या कामाचे त्यांना एका दिवसाची तीनशे रुपये मजुरी मिळते. कामावरून परत आल्यावर जेवण व इतर कामे उरकून त्यांना झोपण्यास रात्रीचे बारा वाजता. या काळात घाटावर कामाला जाणाऱ्या लोकांचे दोन प्रकार दिसून येतात, एक म्हणजे दहा – बारा जणांचा गट करून तिथेच वास्तव्यास राहणारे व दुसरा म्हणजे दहा – बारा जणांचा गट करून कामासाठी रोज येजा करणारे. रोज येजा करणाऱ्या गटाला काही वेळा काम न मिळाल्यास रिकामी हाती देखील परत यावे लागते. या ठिकाणी कामासाठी जाण्यासाठी त्यांना सुमारे दीडशे रुपये खर्च येतो म्हणजे काम जरी मिळाले तरीसुद्धा त्यांना पूर्ण दिवसाचा मोबदला म्हणून फक्त दीडशे रुपये मिळतात. त्यासाठी महिलांना सकाळी तीन ते रात्री बारा इतका वेळ काम करावे लागते, म्हणजे रात्रीत फक्त तीन तासाची झोप या महिलांच्या नशिबी असते. सीजननुसार करत असलेली कामे ही वर्षानुवर्ष चालत आलेली दिसून येतात. मागच्या पिढ्या देखील हेच काम करत होत्या व आजची पिढी देखील हेच काम करत आहे.

निष्कर्ष :

मोरोशी गावातील आदिवासी हे आजही पूर्वापार चालत आलेले जीवन जगताना दिसून येतात. पिढ्यानपिढ्या चालत आलेली कामे हे आदिवासी आजही करत आहेत, तर आदिवासी महिला देखील पुरुषांच्या बरोबरीनेच काम करताना दिसतात. पावसाळ्यात या महिलांना शेतात मजूर म्हणून राबावे लागते, तसेच पावसाळ्यानंतर बेकार म्हणून असणारा हा समूह समिधा गोळा करणे, भाजीपाला लावला असेल त्याच्या शेतात काम करणे, श्रावण महिन्यात केळीची पाने विकणे, लाकडाच्या मोळ्या बनवून विकणे, चैत्रात विडी बनवण्यासाठी उपयोगात येणारी टेंभुर्णीची पानेगोळा करणे, पत्रावळी द्रोण बनवण्यासाठी पळसाची पाने जमा करणे, पावसाळी रानभाज्या विकणे ही कामे या महिला करतात. जंगलात जाऊन करवंद`— भाज्या आणण्याचे काम या गावातील महिला गटाने करतात. त्यात नवरा — बायको, बायका — बायका, कुटुंब — कुटुंब असे गट दिसून येतात. या कामातून मिळणारा मोबदला हा पूर्ण सीजन संपल्यावर वाटून घेतला जातो. तसेच आसपासच्या ठिकाणी काम उपलब्ध नसल्यास, त्या महिला ठाणे जिल्ह्यातून जुन्नर — पुणे या ठिकाणी जातात. या ठिकाणी जातानाही ते गटाने जातात. या प्रत्येकाला रोजच्या रोज मजुरीच्या स्वरूपात मोबदला मिळतो. अशा वेगवेगळ्या स्वरूपाच्या कामातून या महिला आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण करून आपापल्या कुटुंबाला हातभार लावत असतात. यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या मिळकतीवर त्या आपला उदरनिर्वाह चालवतात. या आदिवासी महिलांचा अभ्यास करताना असे दिसून आले की हा समुदाय फार कष्टाळू आहे आपल्या कुटुंबासाठी ते फार झटत असतात, त्यांच्या अंगी पारंपरिक कलागुण देखील आहेत परंतु त्यांना पोषक वातावरण मिळत नाही. आजही या महिलांना वेगवेगळ्या वनऔषधींबद्दल बरेच ज्ञान असल्याचे दिसून आले पण ते ज्ञान त्यांना सर्वांपर्यंत पोहोचवणे शक्य नाही. तसेच 'माणसाचा पीठ असेल तर बाईचा मीठ तरी पाहिजे' या त्यांच्या भावनेतूनच त्यांच्या अशिक्षित पणातूनही विचारांची प्रगल्भता दिसून आली. जर शिक्षणाची गंगा यांच्यापर्यंत पोहोचली तर नक्कीच यांचा परिपूर्ण विकास घडून येईल आज शासनामार्फत महिलांच्या विकासासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. या योजना या आदिवासी महिलांपर्यंत पोहोचवणे ही काळाची खरी गरज आहे. बचत गट सारख्या माध्यमातून व स्किल डेव्हलपमेंट सारख्या योजनांमधून या महिलांना त्यांच्या वातावरणाला साजेशे ज्ञान देऊन घरबसल्या वेगवेगळे उद्योग दिले जाऊ शकतात. त्यांच्याजवळ असणाऱ्या विविध कलांना (जसे बांबूपासून वेगवेगळ्या वस्तूंची निर्मिती— शोपीस, टोपल्या, सूप, इत्यादी) विकसित करून त्यांना मार्केट उपलब्ध करून दिल्यास त्यांना दुसऱ्या जिल्ह्यात कामासाठी जावे लागणार नाही व महिलांना एक स्थिर जीवन मिळू शकेल. त्यामुळे घरातील मुला बाळांना सांभाळण्यासाठी व घरात लक्ष देण्यासाठी त्यांच्या मुलींना शाळा सोडण्याची वेळ येणार नाही व कदाचित हे पर्याय दिल्यामुळे येणाऱ्या पुढच्या पिढीतील महिला ह्या शिक्षित असतील व शिक्षणामुळे त्यांची कौटुंबिक परिस्थिती सुधारित असेल.

संदर्भसूची:

- हिवाळे, अ. (२००२). *'आदिवासी लोकगीतांतील स्त्री जीवन'*,औरंगाबाद. कैलास पब्लिकेशन.
- निर्गुण, सु. (२००२). *'श्रम आणि व्यवसायाचे समाजशास्त्र'*,मुंबई. प्राची प्रकाशन.
- आगलावे, प्र. (२००४). *'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'*,नागपूर. श्री साईनाथ प्रकाशन.
- कुलकर्णी, पी. (२०१२). *'डायमंड समाजशास्त्र शब्दकोश'(इंग्रजी—मराठी),* पूणे. डायमंड पब्लिकेशन.
- जोशी, ल.(१९८०). *'मराठी विश्वकोश खंड', क्रमांक एक,*मुंबई.
- https%@@www-loksatta.com@thane@employement&guarantee&scheme&fall&in&virar&1164473@
- https%@@pib-gor-in@pressrealesepage-aspÛ\PRID¾1626550

***संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग, औरंगाबाद, विद्यापीठ. PRN No.२०१५३८६३३ मो.नं.९९२१७९८९१८**

***

आंध जमातीच्या समकालीन समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

*प्रा.डॉ.विठ्ठल चव्हाण

गोषवारा –

'आंध' ही एक महाराष्ट्र राज्यातील प्रमूख आदिवासी जमात आहे. ही जमात प्रामूख्याने यवतमाळ, बुलठाणा, अकोला, वाशिम, परभणी, आणि नांदेड जिल्हयात मोठया प्रमाणात आढळून येते. आंधप्रदेश व आजूबाजूच्या क्षेत्रामधून येणाऱ्या तेलगु भाषिक लोकांचा आंध जमातीवर मोठया प्रमाणावर प्रभाव दिसून येतो. आंध ही आर्येत्तर जमात असल्याचे दिसते व त्यानुसार हे आंध नाव पडले असावे. २००१च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात आंध जमातीची लोकसंख्या ३७२८७५ ऐवढी होतीं. महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने गोंड, कोलाम, कोरकू, भिल्ल, कोळी, कातकरी, वारली, बंजारा, कोथाडी, बारेला, ठाकूर, आंध अषा ४७ जमाती वस्ती करून राहतात. विषेषत: विदर्भ व मराठवाडयातील काही भागात आंध जमातीचे वास्तव्य आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपासून आजपर्यंतचा आढावा घेतल्यास असे दिसून येईल की, सभ्य समाजाषी आलेला संपर्कामुळे व शासनाच्या विविध योजनामुळे या जमातीचा विकासात्मक बदल होत आहे. तरीपण पारंपारिक सांस्कृतिक जीवन आणि निरक्षतामुळे या जमातीचा विकास मंदावलेला दिसून येतो. म्हणून पुसद तालुक्यातील आंध जमातीचा संषोधनात्मक अध्ययन करतांना या विषयाचे महत्व संशोधनाच्या दृष्टीने आवष्यक वाटतात. आजचा युग ज्ञान, तंत्रज्ञान व विज्ञानाचा आहे. त्यामुळे जग प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. सर्वानाच प्रगतीची आस लागलेली आहे. या आधुनिक युगात आंध जमातीचे कोणते स्थान आहे. या समाजाचे मुलभूत अधिकार कोणते, याविषयी जनजागृती आहे किंवा नाही त्या जमातीच्या लोकांना शासकीय, निमशासकीय क्षेत्रात विकासाची संधी, आरक्षण, भाषा, बोलीभाषा, संस्कृतीची जपवणूक इत्यादी बाबत भारतीय संविधानात तरतूद करण्यात आलेली आहे. याची जाणिव या जमातीच्या लोकांना होतांना दिसत नाही त्यामुहे अशा मागासलेल्या जमातीचे अध्ययन होणे आवश्यक आहे.

प्रस्तावना:–

भारतीय समाजाचे प्रामुख्याने तीन भागात वर्गीकरण करण्यात आले आहे. उदा. :– नागरी समाज, ग्रामीण समाज आणि आदिवासी समाज होय. त्यामधील आपले अस्तीत्व टिकवून ठेवणारा आदिवासी समाज हा वेगवेगळया जमातींनी मिळून बनलेला आहे. अतिदुर्गम भागात, डोंगराळ प्रदेषात आणि घनदाट जंगलात निवास करणारा आदिवासी समाज भारतीय समाजाचे मुळचे निवासी असला तरी विकासापासून कोसो दुर आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद ३४२(१) नुसार त्यांचा समावेष अनुसूचित जमातीच्या यादीत करण्यात आलेला आहे. भारतीय संस्कृती कोषात आर्य व द्रविड हे भारतातील मोठे मानवी समाज सोडून त्यांच्याही पूर्वी भारतीय समाजात राहणारा जल, जमीन आणि जंगल यांच्या आश्रयाने राहणारा स्थानिक समूह म्हणजे आदिवासी होय. याबाबत आदिवासींच्या संदर्भात व्याख्या करतांना गिलीन आणि गिलीन म्हणतात, आदिवासी समाज हा एका भूप्रदेषावर वास्तव्य करणारा, एक समान बोली भाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरांची ओळख नसलेल्या स्थानीय गटांचे एकत्रीकरण होय.

आदिवासींच्या लोकसंख्येच्या बाबतीत जागतिक स्तरावर अध्ययन करण्यात आले तर आफ्रिका हा पहिल्या क्रमांकाचा राष्ट्र आहे. त्यानंतर भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा देष म्हणून ओळखला जातो. आदिवासी समाज हा षांतता प्रिय समाज म्हणून सर्वत्र ओळखला जाते. आदिवासी हा फार पुर्वीपासूनच अतिदुर्गम भागात जंगलानी वेढलेल्या प्रदेषात निवास करून आपली संस्कृतीचे जतन केलेला आहे. पुर्वी त्यांच्या गरजा मर्यादित होत्या. जंगलात उपलब्ध असलेल्या फळे, मुळे, रानभाज्या, शिकार व मासेमारी करून आपल्या दैनदिन गरजा पूर्ण करून समाधानी जीवन जगत असे. निरागसता, प्रामाणिकपणा व निसर्गप्रेम व त्यातून निसर्गपुजा ही त्यांची वैशिष्टये होय.

'आंध' ही एक महाराष्ट्र राज्यातील प्रमूख आदिवासी जमात आहे. ही जमात प्रामूख्याने यवतमाळ, बुलठाणा, अकोला, वाषिम, परभणी, आणि नांदेड जिल्हयात मोठया प्रमाणात आढळून येते. आंधप्रदेष व आजूबाजूच्या क्षेत्रामधून येणाऱ्या तेलगु भाषिक लोकांचा आंध जमातीवर मोठया प्रमाणावर प्रभाव दिसून येतो. आंध ही आर्येत्तर जमात असल्याचे दिसते व त्यानुसार हे आंध नाव पडले असावे. २००१च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात आंध जमातीची लोकसंख्या ३७२८७५ ऐवढी होती.

आंध जमातीचे लोक षेती व्यवसाय या सोबत षिकार करणारे असून ते डोंगराळ भागातील गावात राहतात. ते काळवीट, ससे, रानडुक्कर यांची षिकार करून आपला उदरनिर्वाह करतात. त्याची घरे निटनिटके असतात. जनावरांचे षेणापासून

सडासारवन करून घर व गुराढोराचे गोटे स्वच्छ ठेवतात. घरांची भिंत चिखलमातीने लिपलेली असते. त्यांची घरे मजबूत असते. आंध जमातीचे लोक स्वत:ला हिंदू धर्माचे मानतात. मारूती, मरीआई, माता, भीमसेन, वाघामाई, खंडोबा, कान्होबा यासारख्या देवदेवतांची पुजा करतात. जमात प्रमूखाला 'मुखिया' म्हणतात. मुखिया हा पद वंशपरंपरेने चालत नाही.

आजही आदिम समाज ग्रामीण व शहरी समाज जीवनापासून सांस्कृतिक दृष्टया वेगळा आहे. या समाजात गरीबी, उपासमारी, दारिद्र, कर्जबाजारीपणा, कुपोषण, अंधश्रध्दा अशा वेगवेगळया समस्यांनी ग्रासलेला आहे. आदिवासी हा भुमीपुत्र असूनही त्यांच्याकडे शेतजमीनी फार कमी प्रमाणात आहे. आदिवासी लोक पारंपारीक पध्दतीने षेती करतात. त्यामुळे शेतीमधून मिळणारा उत्पादन फार कमी असते. त्यामधून त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण होत नाही. आज भारत देषाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पुर्ण झालेला आहे. त्यामुळे आज सर्वत्र देषात अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्यात येत आहे. असे असले तरी अजून पर्यंत आदिवासींचे मुळ प्रश्न सुटलेले नाही. त्यांच्या जीवनमानात फारसा बदल झालेला दिसत नाही.जवळपास ११० वर्षापुर्वी म्हणजे १९१४ साली ए. व्ही. ठक्करबाप्पा यांनी स्वत:ला आदिवासी लोकांसाठी वाहून घेतले होते. भारतीय आदिवासी सेवक संघ या संघटनेची स्थापना केली. १९२२ मध्ये गुजरातमध्ये भिल्ल सेवा संघाची स्थापना करण्यात आली. अषा अनेक संस्थेची निर्मिती करून आदिवासींना परिवर्तनाच्या उंबरठयावर घेवून जाण्यासाठी प्रयत्न होत आहे. अषा प्रकारे आदिवासी लोकांना प्रगतीच्या वाटेवर आणण्याचा प्रयत्न होत आहे.

महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने गोंड, कोलाम, कोरकू, भिल्ल, कोळी, कातकरी, वारली, बंजारा, कोथाडी, बारेला, ठाकूर, आंध अशा ४७ जमाती वस्ती करून राहतात. विशेषत: विदर्भ व मराठवाडयातील काही भागात आंध जमातीचे वास्तव्य आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपासून आजपर्यंतचा आढावा घेतल्यास असे दिसून येईल की, सभ्य समाजाषी आलेला संपर्कामुळे व शासनाच्या विविध योजनामुळे या जमातीचा विकासात्मक बदल होत आहे. तरीपण पारंपारिक सांस्कृतिक जीवन आणि निरक्षतामुळे या जमातीचा विकास मंदावलेला दिसून येतो. म्हणून पुसद तालुक्यातील आंध जमातीचा संषोधनात्मक अध्ययन करतांना या विषयाचे महत्व संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक वाटतात.

पूर्व साहित्याचा आढावा :–

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने संशोधकांनी यापूर्वी संबंधित विषयांवर काही संशोधन पुस्तके किंवा ग्रंथाचा षोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे संबंधित विषयाच्या साहित्याचा आढावा पुढील प्रमाणे आहे.

१. डॉ.एस. जी. देवगांवकर यांनी महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती या ग्रंथाचा श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर यांनी 'आंध' अदिवासी जमातीवर मांडणी केलेली आहे.

२. डॉ.जयश्री महाजन व प्रा. सागर बडगे यांनी 'आदिवासी समाज प्रश्न आणि आव्हाने, अथर्व प्रकाषन, धुळे या ग्रंथात आदिवासी समाजातील आंध जमातीवर संषोधन पेपरच्या माध्यमातून प्रकाश टाकलेला आहे.

३. डॉ.गोविंद गारे यांनी 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे या ग्रंथात आंध जमातीचा अभ्यास केलेला आहे.

संशोधनाचे महत्व :–

प्रस्तुत संशोधनाचे महत्व हे आदिवासी हे आदिवासी समाजातील आंध जमातीच्या विशेष संदर्भात आहे. आजचा युग ज्ञान, तंत्रज्ञान व विज्ञानाचा आहे. त्यामुळे जग प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. सर्वानाच प्रगतीची आस लागलेली आहे. या आधुनिक युगात आंध जमातीचे कोणते स्थान आहे. या समाजाचे मुलभूत अधिकार कोणते, याविषयी जनजागृती आहे किंवा नाही त्या जमातीच्या लोकांना शासकीय, निमशासकीय क्षेत्रात विकासाची संधी, आरक्षण, भाषा, बोलीभाषा, संस्कृतीची जपवणूक इत्यादी बाबत भारतीय संविधानात तरतूद करण्यात आलेली आहे. याची जाणिव या जमातीच्या लोकांना होतांना दिसत नाही त्यामुहे अषा मागासलेल्या जमातीचे अध्ययन होणे आवष्यक आहे.

संषोधनाचे उद्देष :–

- आदिवासी जमातीचे विष्लेषण करणे.
- आंध जमातीची स्थिती स्पष्ट करणे.
- आंध जमातीच्या समकालीन समस्यांचे अध्ययन करणे.
- आंध जमातीचा विकासात्मक पैलू स्पष्ट करणे.

- आंध जमात आणि इतर जाती जमातीमधील आंतरक्रियाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :–

- आंध जमात आजही विकासापासून दुर आहे.
- विदर्भात राहणाऱ्या आदिम जमातीचा उदरनिर्वाह मोठया प्रमाणात पारंपारिक शेत व्यवसायावर चालतो.
- आंध जमीच्या अज्ञानतेमुळे अनेक समस्या निर्माण झालेली आहे.
- शासकीय योजना लाभ काही लोकांपर्यत पोहचलेल्या नाही.

संशोधन पध्दती :–

ज्ञानासाठी शोध या अर्थाने संशोधन हा शब्द सुपरिचित आहे. किंवा सर्व सामान्य व्यवहारात प्रच्लीत आहे. विविध क्षेत्रातील समस्यांचे उत्तरे शोधणे हा संशोधनाचा मुख्य उद्देष असतो. प्रस्थाचित ज्ञानात भर टाकणे. किंवा अंधारातून प्रकाषाकडे जाणे, किंवा अज्ञात ज्ञानाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे. त्याचबरोबर जुन्या तथ्याचे परिक्षण करून त्याची नव्याने मांडणी करणे. हा शोध निबंधाचा मुख्य उद्देष आहे. यासाठी संषोधनाच्या विविध पध्दती आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोत, प्रकाषित ग्रंथ, प्रकाशित लेख, अहवाल, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी बाबींचा आधार घेण्यात आलेला आहे.

आंध जमातीच्या समस्या :– अंतर्गत व बाहय समाजाच्या हस्तक्षेपामुळे या जमातीमध्ये संरचनात्मक समसया निर्माण झालेल्या आहे. त्यासाठी केवळ सरकारला दोष देवून चालत नाही. सामूदायिक जीवन पध्दती, सामुहिक निर्णय, आवष्यक तेवढे उत्पादन, जगंलाचे रक्षण अषा अनेक गोष्टी आदिवासी लोकांकडून षिकण्या सारख्या आहेत. तरीपण आजचा आदिवासी समाज चुकीच्या व अपुऱ्या विकास नियोजनाच्या अभावामुळे ग्रासलेला आहे.

आदिम समाजात येणाऱ्या आंध जमातीचा अजूनही म्हणावा तसा विकास झालेला दिसून येत नाही. अनेक वर्षापासून त्यांच्या समस्या कायम आहेत. आज सभ्य समाजाच्या संपर्कात किंवा ग्रामीण समाजाच्या सानिध्यात आल्यानंतरही फारसा विकास झालेला नाही या आदिम जमाती विकासापासून कोसो दुर वसलेल्या आहे. आज देषाला स्वातंत्र प्राप्त होवून ७५वर्ष होत आहे. त्यामुळे सर्वत्र अमृत वर्षानिमित्य वेगवेगळे कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहेत. परंतू आंध या जमातीमध्ये अज्ञानता, व्यसनाधिनता, बेकारी, गरीबी, कुपोषण, यासारख्या अनेक समस्यांनी हा समाज ग्रासलेला आहे. या जमातीच्या वेगवेगळया समस्या पुढील प्रमाणे सांगता येईल.

आंध जमातीत दारिद्रयांची समस्या :– आदिवासी समाजातील आंध जमातीमध्ये दारिद्रयाची समसया भेडसावत आहे. आजही बहुसंख्य लोक दारिद्रजन्य स्थितीत जीवन जगत आहे. दारिद्रय केवळ आर्थिक प्रष्न नाही तर सामाजिक प्रष्न आहे. आंध जमातीत आर्थिक प्रष्न ही एक प्रमूख समस्या होय. आज ही आंध जमातीचे बरेच लोक पारंपारिक पध्दतीने षेती व्यवसाय करतात. पण षेती व्यवसायातून फारसे उत्पन्न होत नाही. त्यामधून त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण होत नाही. त्यामुळे बरेच लोक दारिद्रजन्य स्थितीत जीवन जगत आहे. दारिद्रयजन्य परिस्थितीत जीवन जगतांना त्यांचा जीवनस्तर खालावत आहे. त्यामुळे त्या लोकांना सकस आहार मिळत नाही. सकस आहाराच्या अभावामुळे आदिम समाजात कुपोषणांची समस्या निर्माण झालेली आहे. त्यामुळे काही लोक गावातील हंगाम संपल्यानंतर वेगवेगळया ठिकाणी उसतोड कामगार म्हणून कामे करून आपले उदरनिर्वाह करतात.

रूढी परंपरा व अंधश्रध्देची समस्या :– आंध या आदिवासी जमातीच्या लोकांवर रूढी परंपरेचा प्रभाव आहे. त्यामुळे त्यांच्यात विविध प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहे. या समस्यांच्या गुलामगिरीतून बाहेर काढणे गरजेचे आहे. कारण त्याषिवाय या जमातीचा विकास होणे षक्य नाही. प्रत्येक जमातीची स्वत:ची जीवन जगण्याची एक वेगळी पध्दती असते. या वेगळया पध्दतीला संस्कृती असे म्हटले जाते. आंध जमातीची स्वत:ची जीवन जगण्याची पध्दत आहे. त्यांचे सण, समारंभ, नृत्य, गायन, वादन हे इतर समाजापेक्षा वेगळे आहेत.

सिंचनाच्या सोयी सुविधांचा अभाव :– यवतमाळ जिल्हयातील समाजाचा आढावा घेतल्यास हा जिल्हा डोंगरदऱ्यानी व्यापलेल्या भुभागावर वसलेला जिल्हा आहे. त्यामुळे या जिल्हयात वेगवेगळया जाती, जमाती वास्तव्य करतांना दिसून येतात. या भागातील बरेच षेतजमीनी डोंगरांच्या उतारावर असल्याने त्या भागात सिंचनाची सोयी उपलब्ध नाही. त्याचबरोबर या जमातीच्या लोकांकडे फारसी षेतजमीन उपलब्ध नाही. अषी लोक षेत मंजुरीची कामे करून आपला उदरनिर्वाह करतात. त्यामुळे ते आर्थिकदृष्या मागासलेले आहे.

आरोग्यविषयक समस्या :– आंध जमातीत मोठया प्रमाणात मद्यपान, बिडी, तंबाखू, खर्रा, गुटकाचे व्यसन आणि सकस आहाराचा अभाव यामुळे या जमातीतील लोकांचे आरोग्य खालावलेले आहे. तसेच कुपोषण सारख्या प्रष्नांनी विळखा घातलेल्या आदिवासींच्या आरोग्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विद्यमान योजना अपुऱ्या किंवा निरूपयोगी इरत आहे. त्यामुळे आदिवासींची जीवनपध्दती, आरोग्य आणि राहणीमान यांना अनुकूल आरोग्य सेवा अधिक समक्ष करणे गरजेचे आहे.

शैक्षणिक समस्या:– आंध जमात शैक्षणिकदृष्टया प्रगत असली तरी मागासलेली आहे. त्यांच्यात साक्षरतेचा प्रमाण १८.८५ एवढा होता. आज ही या साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी अतर समाजाच्या तुलनेत कमीच म्हणावा लागेल. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य यासोबत शिक्षण हा सुध्दा मुलभूत अधिकार बनलेला आहे. २००९ मध्ये शिक्षणाचा अधिकारासंबंधी कायदा पारित झाला असला तरी या समुदायात शिक्षणासंबंधी शैक्षणिक पोषक वातावरण दिसत नाही. आदिवासींची मुले शाळेत दाखल झाले असले तरी गळतीचे प्रमाण अधिक आहे. आदिवासी भागात स्त्री शिक्षणाचे प्रमाण फार कमी आहे. आदिवासींचा विकास आणि शैक्षणिक प्रगती हे एकमेकांशी निगडीत आहे. देषाला स्वातंत्र्य प्राप्तीनंतर षासनांनी आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक सवलती दिलेल्या आहेत.

आदिवासी मुलांसाठी आश्रम शाळा, वस्तीगृहे, भारत सरकारची शिष्यवृत्ती स्थापन करण्यात आलेल्या आहेत. स्वंयसेवी संस्थाच्या माध्यमातून या समूहाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न होत आहे. तरी देखील शैक्षणिक प्रगती झालेली दिसून येत नाही.

निष्कर्ष :–

१. आंध जमात ही दऱ्याखोऱ्यात पारंपारिक पध्दतीने षेती करून आपला उदरनिर्वाह करतात. त्यांची षेती ही कोरडवाहू आहे. सिंचनाची व्यवस्था नसल्यामुळे उत्पन्नाचा प्रमाण अल्प असते.
२. या जमातीचे लोक शेती व्यवसायासोबत कुक्कूटपालन, शेळीपालन व जंगलातील मोहफुल गोळा करणे यासारखे जोड व्यवसाय करतांना आढळून येतात.
३. या जमातीत शासकीय योजनांचा फायदा मोठया प्रमाणात झालेला नाही.
४. शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये या जमातीच्या लोकांचे प्रमाण कमी आहे.
५. रोजगार मिळविण्यासाठी या जमातीचे लोक मोठया प्रमाणात मुबंई, पुणे, औरंगाबाद व उसतोड कामगारासाठी स्थांलातरीत होतात.
६. या जमातीत मद्यपान, कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण अधिक आहे.
७. या जमातीचे दरडोई उत्पन्न व वार्षिक उत्पन्न अत्यल्प आहे.

उपाय योजना:–

- आंध जमातीमध्ये आरोग्य, षिक्षण, व स्वच्छता याबाबत जनजागृती करणे.
- गाव, तांडा, वस्ती, वाडी अषा ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देणे.
- जोड व्यवसायाला चालना देण्यासाठी शंभर टक्के अनुदान देवून मागासलेल्या जाती जमातीच्या लोकांना प्रोत्साहन देणे.
- आदिवासी भागात जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे.
- कृषी विकासासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्षन करणे.
- कृषी उत्पादीत शेतमालांना योग्य भाव देणे.
- शेती अवजारे मोफत वाटणे. सिंचनाची व्यवस्था करून देणे.

संदर्भ ग्रंथ

- कऱ्हाडे, बी. (२०१२). *आदिवासी समाजाचे समाजशास्त्र*, नागपूर. पिंपळापुरे प्रकाशन.
- देवगावकर, एस.(२००१). *महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती*, नागपूर. श्री साईनाथ प्रकाशन.
- आगलावे, प्र. (२०१०). *सामाजिक संषोधन पध्दती व तंत्रे*, नागपूर. श्री साईनाथ प्रकाशन.
- गारे, गो.(१९९८). *महाराष्ट्रातील आदिवासी जमाती*, पुणे. कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
- आगलावे, प्र.(२०१७). *आदिवासी समाजाचे समाजषास्त्र,* नागपूर. श्री साईनाथ प्रकाशन.
- कराळे, गं.(१९९६). *ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टीकोन*, नागपूर. श्री मंगेष प्रकाशन.
- मायी, सु.(२०१०). *सामाजिक संशोधन पध्दती*, पुणे. डायमंड पब्लिकेशन्स.

***समाजशास्त्र विभाग प्रमूख, आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज(वडसा) जि.गडचिरोली.**

***

तलावातील मत्स्यव्यवसायीकांचा शासकीय योजनेतून होणारा परिवर्तन व घडणारा प्रभाव

*संशोधक – कौस्तुभ मधुकर चुटे

प्रस्तावना :

तलाव : तलाव एक कृत्रिम किंवा नैसर्गिक जलाशय आहे ज्याच्या पृष्ठभागाचे मोजमाप १ चौरस मीटर व २ हेक्टरच्या दरम्यान असावे. आणि जे वर्षातील किमान चार महिने पाण्याने भरलेले असावे. सामान्यत: जमिनीच्या खोलगट भागात नैसर्गिक वा कृत्रिम रीत्या झालेल्या जलसंचयास काठ, पाळ, शिल्पे इत्यादींच्या बांधकामाने वास्तुदृष्ट्या जे आकर्षक स्वरूप दिले जाते, त्यास तलाव म्हणतात. तलाव हे आकारमानाने सामान्यत: सरोवरापेक्षा लहान असते.

मत्स्य व्यवसायिक :

तलाव, नदी, डबके किंवा समुद्रात मासे पकडून त्यांची विक्री करणाऱ्याला मत्स्यव्यवसायिक म्हटल्या जाते. महाराष्ट्राला ७२० किमी लांबीची किनारपट्टी लाभली आहे व त्याच बरोबर तलावांची संख्या जास्त आहे. किनारपट्टी, नदी, डबके व तलाव या सर्व जलस्त्रोतात मासेमारी करणारे लोक मत्स्यव्यवसाय करून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यात प्रामुख्याने पाहिल्यावर प्रत्येक जलस्त्रोतांच्या ठिकाणी मासेमारी करणाऱ्यांची जात वेगवेगळ्या नावानी ओळखल्या जाते.

मत्स्यपालन करण्यामागचा उद्देश :

मासेमारी का केली जाते? मत्स्यपालन करण्या मागचा उद्देश काय ? साध्यास स्थितीत आपण फक्त पैसे कमवण्यासाठी आणि रोजगार मिळवण्यासाठी मत्स्यपालन करतो हेच माहित आहे. सरकारने मत्स्यशेतीला स्वयंरोजगार असे संबोधले आहे. त्यामुळे खेड्यतील बेरोजगारी दूर करण्यासाठी शासनाने मत्स्यशेतीला चालना देण्यासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. मत्स्यपालनासाठी सरकार अल्प व्याजदरात कर्जही देते आणि मत्स्य पालनासाठी सरकारी विभागाकडून प्रशिक्षण दिले जाते. ग्रामीण भागातील बेरोजगार युवक स्वावलंबी होऊन त्यांचा आर्थिक स्थर उंचावता यावा यासाठी शासन ग्रामीण भागात स्वयंरोजगार वाढविण्यासाठी या योजना राबवीत आहे.

मत्स्यशेतीला चांगला वाव का आहे :

मत्स्यपालनाची व्याप्ती इतकी चांगली का मानली जाते कारण असा अंदाज आहे कि भारतातील अर्ध्याहून अधिक लोकांना मासे खायला आवडतात. अशीही अनेक शहरे आहेत जिथे बरेच लोक मासळीचा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करतात. भारतातील जवळपास सर्वच नद्यांमध्ये मासे आढळतात. या नद्यांच्या काठावर राहणारे बहुतांश लोक मासळीचा व्यवसाय करतात. याशिवाय समुद्रातुनही मासे आणले जातात. समुद्रकिनाऱ्याला लागून असलेल्या भागात मोठ्या प्रमाणात मच्छीमार मासळीचा व्यवसाय करतात. मात्र नद्या आणि समुद्रातून मासे पकडणे आणि विक्री करणे या व्यवसायाशिवाय आता तलाव आणि नद्या नसलेल्या ठिकाणीही मत्स्यशेती करता येते. त्यासाठी कृत्रिम तलाव आणि टाक्या बनवून माशांचे संगोपन केले जाते.

शासकीय योजना– केंद्र व राज्य सरकारने मत्स्यव्यवसायिकांचा आर्थिक व सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा पातळीवर मत्स्य आस्थापना विभागाची स्थापना केली आहे. या विभागाद्वारे जिल्ह्यातील प्रत्येक मत्स्य पालन संस्थाना जोडण्यात आलेले आहे. मत्स्य पालन संस्थे मध्ये नोंदणीकृत असलेल्या सदस्यांना शासकीय योजना पुरविल्या जातात. ते फक्त औपचारिकते साठी. आणि त्याचीच दुसरी बाजू म्हणजे एकदा पुरविल्या गेलेल्या योजनेची अंमलबजावणी होत नाही. यासाठी शासन नाही तर शासकीय कर्मचारी जबाबदार आहेत. मत्स्यव्यवसायिकांसाठी बऱ्याचशा शासकीय योजना शासनाने दिल्या आहेत, त्यापैकी काहींची यादी पुढीलप्रमाणे आहे;

१) मच्छिमार युवकांना ६ महिन्याचा प्रशिक्षण, २) अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन, ३) मच्छिमार सहकारी संस्थांना बर्फ कारखाने व शितगृहांचे विज देय्यकामध्ये सवलत, ४) नौका किनाऱ्यावर घेण्यासाठी रॅम्प, ५) मासळी सुकविण्याचे ओटे, ६) उघडा निवारा (शेड), ७) जोड रस्ता, ८) पिण्याच्या पाण्याची सुविधा, ९) शौचालय, १०) मार्गदर्शक दिप, ११) नौका जाण्यायेण्याच्या मार्गातील खडक फोडून अडथळा दूर करणे, १२) मासेमारी साधनांचे खरेदीवर अर्थसहाय्य, १३) मासळीचे सुरक्षण, वाहतूक व पणन, १४) निमखारे पाण्यांतील मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणांची स्थापना, १५) मच्छिमारांना कर्ज सहाय्य योजना, १६) मच्छिमारांचे विकासाकरिता डिझेल तेलावर सवलत, १७) मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण व नौकांमध्ये सुधारणा इत्यादी, या सर्व केंद्र व राज्य सरकारच्या योजना मत्स्यव्यवसायिकांसाठी असले तरी त्यांची परिपूर्ति होत नाही. सदर

संशोधनात याच बाबींवर विशेष लक्ष दिले आहे. कि, शासकीय योजना जरी असल्या तरी त्यांचा लाभ हा लाभार्थ्यांना पूर्णपणे मिळत नाही.

योजनेतून होणारा परिवर्तन

शासकीय योजनेतून मच्छिमारांना ६ महिन्याचा प्रशिक्षण दिल्या जाते, त्याद्वारे मच्छिमार युवकांना त्यांचा मत्स्यव्यवसाय वाढविण्यास मदत होते. याप्रकारच्या बऱ्याच योजना मच्छिमार समाजाला पुरवून शासकीय हस्तक्षेपामुळे देशातील दुर्बल घटकांचा विकास होतो. जर मत्स्यव्यवसायिकाला पारंपारिक पद्धतीने मत्स्यशेती करण्यास सोडून दिले तर तो फक्त मासे पकडणे आणि विकणे या दोनच गोष्टीवर आपले जीवन व्यर्थ करेल. म्हणजे त्याला फक्त त्याच्या केलेल्या कामाचा पैसा मिळेल. पण त्यामागे तो व त्याचा संपूर्ण कुटुंब हा समाजातल्या इतर घटकांपासून दुर्बलच होत जाईल. म्हणून शासकीय योजनेचा शाश्वत लाभ मत्स्यव्यवसायिकाला मिळत गेला तर तो व त्याचा कुटुंब चांगले जीवन जगण्याचा मार्गावर राहू शकतो.

शासकीय योजनेचा घडणारा प्रभाव

केंद्र व राज्य सरकारचा मत्स्य विभागाला मिळत असलेल्या योजना शासकीय घटकांद्वारे मत्स्यव्यवसायिकांपर्यंत पोहचतात. त्याचा लाभ मत्स्यव्यवसायिकाला मिळतो. त्या मिळालेल्या लाभांमुळे मत्स्यव्यवसायिकाला त्याच्या मत्स्य व्यवसाय करण्यास पूर्णपणे मदत होते. व त्याद्वारे त्याचा कुटुंब सुखी–संपन्न होण्याच्या मार्गावर येतो. पण शासकीय योजना ह्या जरी पूर्ण काळासाठी असल्या तरी त्या शाश्वत नसल्याने त्या मच्छिमार, त्यांचा समूह व कुटुंबाचा फक्त अर्धवेळ परिवर्तन टिकून राहतो. मग शासनाने दिलेल्या त्या योजनांचा अर्थच काय कि जे फक्त तोंडापर्यंत घास पुरवतात पण पूर्णपणे समाधान करत नाही.

संदर्भ साहित्य परिशीलन

अग्रोवन. (२०११). मत्स्यशेती करताना विकासपीडिया या संकेतस्थळावरून मत्स्यशेती करताना या लेखात मत्स्य शेती करतेवेळी काय व कोणती प्रक्रिया असते याबद्दलची संपूर्ण माहिती सादर केली आहे. त्याचबरोबर बाजारपेठ, मार्केटिंग व्यवस्था व तंत्रज्ञान, धोरणे व योजना, मत्स्यव्यवसाय, शेततळ्यातील मत्स्यशेतीतून वाढवा आर्थिक नफा, मच्छिमार युवकांना प्रशिक्षण, गोड्य पाण्यातील मोत्यांची शेती, तलाव ठेका धोरण, गोड्य पाण्यातील कोळंबी संवर्धन, मत्स्यपालनासाठी तलाव, मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणांची स्थापना, मत्स्यपालनाच्या पद्धती, मत्स्यबीज केंद्रांची स्थापना, मत्स्य संशोधन संस्था, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ, मत्स्यव्यवसाय विभाग– विस्तार, शेततळ्यातील मत्स्यशेती इत्यादी घटकांची विस्तृत माहिती सदर लेखात दिली आहे.

fisheries.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर मत्स्यव्यवसायिकांच्या आर्थिक विकासाकरिता महाराष्ट्र राज्य सरकारने केंद्र शासन अंतर्गत येणाऱ्या मत्स्यव्यवसाय योजनांची सविस्तरपणे माहिती दिलेली आहे.

गिरीअप्पा, एस. (१९९४). ग्रामीण विकासात मत्स्यपालनाची भूमिका. या पुस्तकामध्ये लेखकाने ग्रामीण भागातील लोकांची समस्या बघून त्याना त्यांच्या पारंपारिक किंवा सोयीस्कर असलेल्या मत्स्यव्यवसायाबद्दलची भूमिका स्पष्ट केलेली आहे. ग्रामीण भागात सुरु असलेल्या उपजिविकेच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी मत्स्यपालन व त्यावर जोड़ धंद्याची सुरवात करुन उपजीविकेचा प्रश्न सोडविन्याचा मार्ग सांगितला आहे.

उ, भौमिक.,आणि एस,के.(१९९८). मत्स्य संवर्धन चळवळीत जनजागृती आणि लोकसहभाग निर्माण करण्यात विस्ताराची भूमिका. यांच्या या लेख मध्ये मत्स्य संवर्धन चळवळीतील विस्तार, जनजागृती आणि लोकसहभागाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला आहे. मानववंशीय हस्तक्षेपामुळे भारताच्या अंतर्देशीय पाण्यातील मत्स्यजीवांमध्ये तीव्र घट झाली आहे, ज्यामुळे लक्ष्य गटाच्या सदस्यांना मत्स्य जर्मप्लाझम संवर्धनाची गरज आहे. यापुढे जर्मप्लाझामचा संवर्धन कार्यक्रम हा एकून क्रीयाकलापातील एक आवश्यक इनपुट म्हणून मानले जाईल. मत्स्य जर्मप्लाझम संवर्धनाच्या उपक्रमांमध्ये चांगला सहभाग प्रस्थापित करण्यात गावातील प्रेरक महत्वाची भूमिका बजावतात. अशाप्रकारे, मत्स्यसंवर्धन चळवळीमध्ये वैयक्तिक आणि सामुहिक कृती यांचा समावेश होतो.

उद्दिष्ट :

१) तलावातील मत्स्यव्यवसायिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देणे.
२) मत्स्यव्यवसायीकांचा शासकीय योजनेतून झालेला परिवर्तन अभ्यासाणे.
३) शासकीय योजनेतून मत्स्यव्यवसायीकांवर घडलेला प्रभाव जाणून घेणे.

गृहितके :

१) तलावातील मत्स्यव्यवसायिकांना शासकीय योजनेचा पूर्णपणे लाभ मिळत नाही.

२) मत्स्यव्यवसायिकांचा शासकीय योजनेतून परिपूर्ण परिवर्तन होत नाही.

३) शासकीय योजनेतून मत्स्यव्यवसायिकांवर प्रभाव होतो.

महत्व :

सदर संशोधन तलावातील मत्स्य व्यवसायिकांच्या शासकीय योजनेतून होर्णाया परिवर्तन आणि प्रभावावर विचार करत आहे. ज्याप्रमाणे शासन, कामगार मंडळातून कामगार वर्गाला हक्क व लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करतो त्याप्रमाणे शासनाच्या आखलेल्या आलेखाप्रमाणे कामगार वर्गाला त्याचा परिपूर्ण लाभ मिळत नाही. तलावातील मत्स्य व्यवसायिक हा शासनाच्या कामगार मंडळात येतो. शासनाने मत्स्य व्यवसायिकांचा परिवर्तन व विकास करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मत्स्य आस्थापना विभागाची स्थापना केली आहे. तरी जिल्ह्यातील प्रत्येक मत्स्यव्यवसायिकापर्यंत शासनाची योजना पोहचत नाही. यासाठी शासन नाही तर शासनाचे कर्मचारी जबाबदार आहेत. कारण शासनाने काढलेल्या योजना लाभार्थ्यापर्यंत पोहचत नाही व पोहचल्या तरी त्याची अंमलबजावणी होत नाही. सदर संशोधनात संशोधक जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायिकांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील समाज कार्यकर्त्यांचा एक समूह तयार करून त्यांना शासनकालीन घटकामध्ये हस्तक्षेप करावे लागेल. कि, समाज कार्यकर्त्यांनी शासनाच्या कर्मचाऱ्यांचा दर मासिक आढावा घेतल्या पाहिजे. समाज कार्यकर्त्यांनी तालुक्यातील प्रत्येक मत्स्य पालन संस्थेतर्फे सदस्यांना योजना व योजनांच्या लाभ याचे महत्व पटवून दिल्या पाहिजेत. व वेळोवेळी शासन, मत्स्य आस्थापना विभाग, मत्स्य पालन संस्था व सदस्य यांचा आढावा घेतल्या पाहिजे. या प्रमाणे एका सक्रीय चळवळी मधून जिल्ह्यातील प्रत्येक मत्स्य व्यवसायीकांचा शासनाच्या योजनेतून परिपूर्ण परिवर्तन होण्यास उशीर होणार नाही.

संशोधन पद्धती

सदर संशोधन करण्यासाठी संशोधक संशोधन क्षेत्र म्हणून गोंदिया जिल्हा निवडणार आहे व संशोधन विश्व म्हणून जिल्ह्यातील कार्यरत ८२९१ सभासदांपैकी स्याम्पल साईज कॅल्कुलेटर प्रमाणे ४०६ उत्तरदात्यांची निवड करणार आहे. निवड झालेल्या उत्तरदात्यांकडून तथ्य संकलित केल्यानंतर संशोधक जिल्ह्यातील समाज कार्यकर्त्यांचा समूह तयार करून शासनाच्या योजनांना मत्स्य आस्थापना विभाग, मत्स्य पालन संस्था यामार्फत सदस्यांपर्यंत पोहचवणार आहे. व आस्थापना विभाग, संस्था व सदस्य यांच्याकडून दर मासिक आढावा घेण्यात येईल. तथ्य संकलन करण्याकरिता संशोधक निदानात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करून संभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करणार आहे.

प्रमुख निष्कर्ष :

मत्स्यव्यवसाय हा प्राचीन काळापासून मानवी आहाराचा प्रमुख स्त्रोत असून या व्यवसायात गुंतलेल्यांना रोजगार आणि आर्थिक फायदा मिळवून देत आलेला आहे. जलचर साधनसंपत्ती हि निसर्गाची अमर्याद देणगी समजली जात होती. तथापि दुर्सया महायुद्धानंतर मत्स्यव्यवसायाचे वाढलेले ज्ञान आणि मत्स्यव्यवसायाचा झालेला जलद विकास यामुळे जलचर साधन संपत्ती हि निसर्गाची अमर्याद देणगी आहे, या समजाऐवजी हे वास्तव समोर आले आहे कि, जलजीव स्त्रोतांचे नुतनीकरण होत असले तरी ते अमर्याद नाहीत. त्यामुळे वाढत्या जागतिक लोकसंखेचे पोषण, सांपत्तिक आणि सामाजिक सौख्य यातील जलजीव स्त्रोतांच्या चिरकाल टिकाऊ सहाय्याकरिता त्यांचे योग्य व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

तलावातील मत्स्यव्यवसायिकांना शासकीय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर त्यांचात परिवर्तन होतो. पण परिवर्तन झाल्यानंतर शासकीय योजना ह्या लुप्त पावल्या जातात. त्यामागचा कारण म्हणजे शासन निर्मित योजना किंवा आलेख यांची पूर्तता करणारे घटक म्हणजे शासकीय कर्मचारी यांचा दुर्बल घटकांसाठी असलेला कल हा पूर्णत: कमीच असतो. फक्त औपचारिकते खातीर ते समोर येऊन सुरवात करण्याचा प्रयत्न तर करतात पण हाती घेतलेल्या कामासाठी ते समर्पित नसतात. मग याचा दुष्परिणाम म्हणजे शासनाने दिलेल्या योजना व त्याचा लाभ हा योग्य त्या लाभार्थ्यापर्यंत पोहचत नाही. व तो लाभार्थी दुर्बलचा दुर्बलच होत जातो. समाजामध्ये असे काही घटक आहेत कि त्यांचा विकास होणे गरजेचे असते कारण त्यांचा वाटा हा समाजातल्या प्रत्येक व्यक्तीशी कुठ तरी संबंधित असते. म्हणूनच सदर संशोधनात संशोधकाने शासन, संस्था, विभाग व समाजकार्यकर्ते यांच्यात सहसंबंध प्रस्थापित केल्या नंतर तलावातील मत्स्यव्यवसायिकाचा शासकीय योजनेतून परिपूर्ण विकास व परिवर्तन घडून येईल.

***

हवामान बदलाचा महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकऱ्यावर होणारे परिणाम आणि उपाय योजना

*रमेश बंडू पवार

गोषवारा :

हवामान बदल सध्याच्या काळातील जगासमोर एक मोठे आव्हान म्हणून उभे आहे. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहायाने जगात औद्योगिकीकरण घडवून आणले खरे पण त्याची परिणीती पुढे पर्यावरणाच्या हानीत झाली. त्यामुळे जागतिक तापमान वाढ होवून हवामानात अनिश्चित बदल होवू लागले. या हवामान बदलाचा परिणाम प्रत्येक क्षेत्रात होवू लागला पण कृषी क्षेत्र सर्वाधिक प्रभावित झाले. हवामान बदलामुळे कधी अवर्षन, कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ, गारपीठ, चक्रीवादळे, पावसाची अनियमीतता या सारख्या घटनामध्ये वाढ होवू लागली. यामुळे नेहमीच अभावात जिवन जगणाऱ्या, विकासाच्या परिघाबाहेर असणाऱ्या '' नाहीरे वर्गातील'' अल्पभुधारक शेतकरीना अधिक झळ बसली. महाराष्ट्रात अल्पभुधारक शेतकरीची संख्या ७९ टक्के आहे. त्यामुळे येथील ६० टक्के लोकसंख्या प्रत्यक्षपणे प्रामुख्याने शेतीवर उपजिवीका करते.

प्रस्तुत शोध निबंधाचे मुख्य उदिष्टय हे महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकरींना हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या समस्या व त्यावरील उपयोजना शोधणे हे आहे. हा निबंध संपुर्णत: दुय्यम प्रकारच्या तथ्यावर आधारित आहे. सदर शोध निबंधाकरीता वर्णनात्मक आणि विश्लेषनात्मक संशोधन पध्दती वापरण्यात आली आहे.

महत्वाचे शब्द : हवामान बदल, अल्पभुधारक शेतकरी, महाराष्ट्र, अल निनो, शेती, पर्जन्यमान, अवकाळी, किटकनाशक, उपजिवीका, पाण्याची कमतरता, पीक उत्पादन,

प्रस्तावना :

हवामान आणि सजिव सृष्टी यांचा अनोन्य संबंध आहे. इतर सजिवासह मानवप्राणिला पण जिवंत राहण्यासाठी पोषक हवामानाची गरज लागते. मनुष्य हा समाजशिल प्राणी सोबतच तो पर्यावरणशील प्राणी पण आहे. आदिम समाजापासून ते उत्तर आधूनिक समाजापर्यन्तचा त्याचा प्रवास हा अवतीभोवतीच्या पर्यावनणाशी अनुकूलतेमुळेच टिकून राहीला आहे.

जिव उत्कार्तीपुर्वी पासूनच हवामानातील बदल तिच्या नैसर्गीक गतीने होत आलेले आहेत. मात्र अलीकडील अनुभवा वरुन असे दिसते की, हवामान बदल हा केवळ नैसर्गीक घटकांचा परिनाम नसून, तो मोठया प्रमाणात मानवाच्या निसर्गातील हस्तक्षेपामुळे घडून येत आहे. इंग्लंड मध्ये औदयोगीक क्रांती झाली आणि पुढे संपुर्ण युरोपभर पसरली. कालांतराने तिने तिसऱ्या जगात आपले पाय रोवले व ते आणखी घट्टच होत चालले आहे. या मानवनिर्मीत घडामोडीमुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साईड, नायट्रोजन, मिथेन इत्यादी सारख्या हरीतवायुंचे प्रमाण नैसर्गीक प्रमाणापेक्षा अधिक वाढल्यामुळे पृथ्वीच्या तापमानात १८८० पासून ०.८ अंश सेल्शीअश वाढ होत गेली. एकविसाव्या शतकात भारताच्या तापमानात ०२ ते ०६ अंश सेल्शीअश पर्यन्त वाढ होईल असा अंदाज आहे. त्यामुळे हवामान बदल सध्याच्या घडीला खुप मोठया प्रमाणात होत आहे.

'' युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लॉयमेट चेंज'' च्या 'कलम १' नुसार, 'ज्याचेमुळ मानव कृतीत आहे, असा जागतीक वातावरणाच्या संरचनेत झालेला आणि नैसर्गीक परिवर्तनशिलतेबरोबरच प्रदिर्घ काळासाठी अनुभवास येणारा हवामानातील बदल' म्हणजे हवामान बदल होय. त्याचे गंभीर परिणाम काही दिवसापासून आपण अनुभवत आहोत. कृषी उत्पादनातील बदलापैकी ८० टक्के बदल हवामान स्थितीतील बदलामुळे घडून येतात. त्याचा फटका बाकी क्षेत्रापेक्षा कृषी व्यवसायाला अधिक बसत आहे. त्यामध्ये प्रगतीपासून नेहमीच परिघाबाहेर असलेला '' नाहीरे वर्गातील'' गरीब अल्प भुधारक शेतकरीला याची छळ तिव्र प्रमाणात सोसावी लागत आहे.

भारत हा बहूसंख्येने अल्पभुधारक शेतकरी असलेला कृषीप्रधान देश आहे. महाराष्ट्रात पण सुमारे ७९.६८ टक्के शेतकऱ्यांकडे दोन हेक्टर पेक्षा कमी जमीन आहे. आजही महाराष्ट्रातील ८० टक्के शेती सिचनासाठी मान्सुच्या पावसावर अवलंबुन आहे. बदलत्या हवामानाच्या परिणामाचा सामाना करण्यासाठी मर्यादित संशाधनामुळे अल्पभुधारक शेतकरी अनेक समस्यांना तोंड देत आहे. महाराष्ट्र याच्या मोठी लोकसंख्या आणि प्रामुख्याने कृषी अर्थव्यवस्था या हवामान बदलामुळे प्रभावित झाली असून मोठया अरिष्ठाकडे प्रवास करीत आहे. महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकरी जे देशाच्या लोकसंख्येचा महत्वपुर्ण भाग आहे, त्यांना विशेष धोका आहे. या शोधनिबंधाचे उदिष्ट कृषी विशेष लक्ष केंद्रीत करुन महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकऱ्यांवर हवामान बदलाचे परिणाम समजुन घेवून त्यावर उपाययोजना शोधणे हा आहे.

पुर्व साहीत्याचा आढावा :

अनेक अभ्यासकाने महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकऱ्यावर हवामान बदलाचे परिणाम अधोरेखीत केलेले आहे. या परिणामाध्ये पिक उत्पादनात घट, किड आणि रोगांचा वाढता प्रार्दूभाव, पाण्याची टंचाई आणि उपजिवीकेचे नुकसान यांचा समावेश होतो. जागतिक तापमान वाढीमुळे हवामानात झालेले बदल याचा परिणाम मोठया प्रमाणावर नोंदवला गेला आहे. याचा प्रमुख प्रभाव पिक उत्पादकतेवर होतो. उदा. इंटरनॅशनल फूड पॉलीशी रिर्चश इन्स्टिटयुटच्या अभ्यासानुसार,भारतातील

शेतीवर ग्लोबल वार्मींगच्या प्रभावातुन निर्माण होणाऱ्या हवामान बदलामुळे २०५० पर्यन्त पिक उत्पादनात ३० टक्के घट होवू शकते. भारतीय कृषी संशोधन परिषदेने केलेल्या आणखी एका अभ्यासात असे आढळून आले आहे की, हवामान बदलामुळे भारतातील दोन मुख्य पीके गहू आणि तांदूळ यांच्या उत्पादकतेत घट होवू शकते. तापमानात ०१ डीग्री सेन्सीअशच्या वाढीमुळे गवाच्या उत्पादकतेत ०६ टक्के आणि तांदूळ उत्पादकतेत ४.५ टक्के घट होवू शकते असे अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.

''हवामान बदलाचा महाराष्ट्रातील कृषी उत्पादकतेवर परिणाम'' या अहवालात इन्सटींटयुट फार सस्टेनेबल कम्युनिटीज (आय.एस.सी.) या संस्थेने राज्यातील विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश या विभागातील आठ जिल्हयातील पर्जन्यमान आणि तापमान यांच्या आकडेवारीची आठवडा निहाय ३० वर्षांचे ऐतिहासीक (१९८९–२०१८) आणि पुर्वानुमान (२०२१–२०५०) परिक्षण केले आहे. तसेच शेतकऱ्यांना सध्या स्थितीत आणि भविष्यात येणाऱ्या धोक्याविषयी माहीती दिली आहे. १. या अभ्यासामध्ये खरीप हंगामातील कापूस आणि सोयाबिन तसेच रब्बी हंगामातील गहू आणि हरभरा या पिंकाचा समावेश आहे. या अहवालात सादर केलेल्या विश्लेषनामध्ये, क्लायमेंट मॉडेलिंग आणि पुर्वानुमान (ऐतीहासीक आणि भविष्यातील) पिक फेनोलॉजी (प्रत्येक वाढीच्या टप्यावर पीकासाठी इष्टतम परिस्थिती) यावर मत व्यत करण्यात आले आहे. २. या परिक्षणामध्ये समुदायावर आधारीत सहभाग मुल्यांकणाचा (शेतकऱ्याकडून पडताळणी) समावेश आहे. या शिवाय प्रत्येक पिकावर आणि शेतकऱ्यावर हवामान बदलांचा संभाव्य परिणाम चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी हे मुल्यांकण साप्ताहीक आकडेवारी नुसार केले आहे.

इंडियन इन्स्टींटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्ली च्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, ग्लोबल वार्मींगमुळे पिंकावर विशेषत: तांदूळ आणि मक्यावरील किटकांच्या प्रार्दुभाव वाढला आहे. या अभ्यासात असे दिसून आले की, किटकांच्या फिनॉलॉजी मध्ये बदल होत आहेत, ज्यामुळे प्रार्दुभाव वाढतो आणि पीकांचे नुकसान होते.

ऑस्ट्रेलियाच्या हवामान शास्त्र ब्युरो, युनायटेड किंगडम आणि युनायटेड स्टेट ऑफ अमेरीकाच्या हवामान शास्त्रतंज्ञानी भारतावर २०२३ च्या मान्सुनवर अल निनो चा प्रभाव असेल अशा ईशारा दिला आहे. हवामान शास्त्रतंज्ञाच्या मते, अल निनो हा एक प्रभाव आहे, ज्यामुळे प्रशांत महासागराच्या काही भागामध्ये समुद्राचे तापमान वाढते, याचा अर्थ यंदा नेहमीपेक्षा जास्त उन्हाळा आणि भारतात सरासरी पेक्षा कमी पाउस होण्याची शक्यता वर्तविली आहे. परिणामी, २०२३ मध्ये कृषी उत्पादनावर परिणाम होवू शकतो, आणि पाण्याची कमतरता देखील होवू शकते. महाराष्ट्राने २०१८ मध्ये अल निनो च्या प्रभावामुळे दुष्काळाचा अनुभव घेतला आहे. २०१९ पासून गेल्या ०३ वर्षात आपण भारत आणि महाराष्ट्रात चांगला पाउस अनुभवला आहे, पण २०२३ या वर्षासाठी अल निनो मुळे महाराष्ट्रातील पर्जन्य विषयक अंदाज चिंताजनक आहे. दुष्काळ सदृश्य परिस्थिती राहणार हे अदयाप निश्चित झाले नसले तरी, आपण सर्तक राहणे आणि मागील वर्षाच्या तुलनेत कमी पावसासाठी तयार असणे आवश्यक आहे.

शोध निबंधाचे उद्देश :

१. या शोध निबंधाचा उद्देश महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकऱ्यावर काय परिणाम होतात हे तपासणे.
२. हवामान बदल, पर्जन्यमानाचे स्वरुप आणि इतर पर्यावरणीय चलांमध्ये बदल होत आहे, ज्यामुळे महाराष्ट्रातील कृषी उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामाचे विश्लेषन करणे.

अध्ययन पध्दत्ती :

प्रस्तुत शोध निबध महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकऱ्यावर हवामान बदलाच्या परिणाम व उपयायोजनेसाठी विद्यमान अभ्यासाच्या साहीत्य पुनरावलोकणावर आधारीत आहे. या संशोधनासाठी प्राथमिक तथ्यांचा वापर करण्यात आला नाही. तथ्यांचे संकलन करतांना क्रमीक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, त्रैमासिके, प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, आंतरजाल इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्रामुख्याने हया शोध निबंधासाठी वर्णणात्मक व विश्लेषनात्मक संशोधन पध्दत्ती वापरण्यात आली आहे.

महत्व :

हा अभ्यास महत्वाचे आहे. कारण तो हवामान बदलामुळे महाराष्ट्रातील अल्पभुधारक शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या आव्हानावर प्रकाश टाकतो. हा अभ्यास अल्पभुधारक शेतकऱ्यावर हवामान बदलाच्या परिणामांबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतो व त्यावरील उपाययोजना सुचवितो.

महाराष्ट्रातील शेती :

महाराष्ट्र हे भारतातील एक आघाडीचे औद्योगीक राज्य असले तरी शेती हा महाराष्ट्रातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. ज्यात महाराष्ट्रातील कृषी मान्सुनव्दारा नियंत्रीत केली जाते. कोणत्याही उतार चढाव, त्रासामुळे संपुर्ण अर्थव्यवस्थेवर

प्रतिकुल परिणाम होतो. राज्याच्या सकल राज्यांतर्गत उत्पादनात (जी.एस.डी.पी.) शेती आणि शेतीशी निगडीत क्रियांचा वाटा १३ टक्के आहे. महाराष्ट्रात अल्पभुधारक शेतकऱ्यांची संख्या ७९.६८ टक्के ऐवढी आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने शेतीचे खरीप (पावसाळा) आणि रब्बी (हिवाळा) हे दोन हंगाम आहे. राज्यात ज्वारी, भात, गहू, कडधान्ये, गळीत धान्ये ही मुख्या खादय पीके घेतली जातात, सोबतच कापुस, उस, तंबाखु, हळद आणि सोयाबीन नगदी पीके घेतली जातात. महाराष्ट्रातील जवळ जवळ ८० ते ८५ टक्के शेती मोसमी पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे. एकूण लागवडी खालील क्षेत्रापैकी केवळ १७.५ टक्के क्षेत्र हे सिंचनाखाली आहे. राजाच्या एक तृतीयांस भाग पर्जन्य छायेच्या प्रदेशात येतो. या भागामध्ये पाउस अपूरा आणि अनियमित पडतो त्यामुळे बराच मोठा भाग दुष्काळी प्रकारातला आहे. राज्याचे ७५ टक्के क्षेत्र तिन पटयांमध्ये विभागलेले आहे. १)निम –शुष्क आणि दुष्काळी प्रदेश २)खात्रीच्या पर्जन्यवृष्टीचा प्रदेश आणि ३) ४८५ मिलीमीटर ते ९५० मिलीमिटर दरम्यान पाउस पडणार मध्यम पर्जन्यवृष्टीचा प्रदेश जलसिंचनाचे मुख्य स्त्रोत कालवे, तळी, सरोवर, पाझर तलाव, विहीरी याव्दारे उपसा सिंचन, तुषार सिंचन, ठिबक सिंचन, कुपनलीका असे प्रकार पडतात.

हवामान बदलाचे अल्पभुधारक शेतकऱ्यांवर होणारे परिणाम :

१) अवर्षण :

हवामान बदलाचा परिणाम महाराष्ट्रातील मान्सुनवर पडतो. परिणामी पर्जन्यमानात घट होते. त्यामुळे कोरडा दुष्काळाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. अल्पभुधारक शेतकरी जो, उपजिवीकेसाठी पिकवितो त्यांची उपासमार होते. जनावरांना पाणी आणी चाऱ्याचे दुर्भीक्षाचे अनुभव राज्याने या पुर्वी अनुभवले आहे. त्यामुळे जनावरे दगावतात, व मोठा आर्थीक नुकसान गरीब अल्पभुधारक शेतकऱ्यांना सोसावे लागते.

२) अवकाळी पाउस :

पाउस येतो पण तो योग्य वेळी येत नाही आणि शेतात पिक काढणीच्या वेळेस गारपीट, वादळी पाउसामुळे खुप नुकसान करुन जातो. महाराष्ट्रात मागील काही वर्षापासून मराठवाडा, विदर्भात अवकाळी पाउस पडण्याचे प्रमाण वाढल्याच आपण पाहत आहोत पण, यामागचे कारण काय याचे उत्तर हवामान तज्ञ प्रा.किरणकुमार जोहरे यांनी बीबीसी मराठी या वृत्तवाहीनीला दिलेल्या मुलाखतीलमध्ये खालील प्रमाणे सांगीतले आहे. ''मान्सुनच्या पार्टनमध्ये लक्षणिय बदल झाला आहे. वाढलेले तापमान आणि त्यामुळे झालेले हवामानातील बदल यामुळे शेतजमीनीमध्ये पीकांना टिकविण्यासाठी अधिक रासायनिक खतांचा वापर शेतकऱ्यांना करावे लागते, परिणामी बाष्पीभवनाच्या स्तरांमध्ये मोठया प्रमाणात बदल होवून वातावरणामध्ये भोवरे तयार होतात आणि त्या भोवऱ्यामध्ये बाष्प अडकतात. वेगवेगळया ठिकाणाचे कमी जास्त तापमान आणि वायुदाब यामुळे वारे वाहू लागतात. बाष्पीभवनाचा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अदलाबदल झाल्यामुळे उर्ध्व दिशेने, पाणी धारण करणारा, तसच पाणी धारण करणारा पण मसाला डोसा सारखा पसरट अशापध्दतीने ढग तयार होवून पाउस पडतो.''

महाराष्ट्रात आपण साधारणत: ७ जुन ते ३० सप्टेंबर असे चार महीणे नियमित पावसाळा धरायचो पण मान्सुन पॅर्टन बदलामुळे चक्रीवादळे, गारपीट, ढगफुटी यांच्याही अनियमित बदलामुळे महाराष्ट्र हा ढगफुटिचा प्रदेश बनला की काय ? अशी शंका येते.

३) दुष्काळ आणि नैसर्गीक आपत्ती :

राज्यातील कृषी क्षेत्र वारंवार गारपीट, चक्रीवादळे, पावसाची अनियमीतता यांच्या फेऱ्यात असते. सन २०२० ते २०२१ दरम्यान जवळपास ३१ जिल्हयातील ०.९१ लक्ष हेक्टर जमीनीवरील पीक या नैसर्गीक आपत्तीमध्ये सापडले होते. मे २०२१ मध्ये 'तौक्ते' चक्रीवादळामुळे १७ जिल्हयातील ०.१७ लक्ष हेक्टर शेती प्रभावित झाली होती. सन २०२१ च्या ऑगस्ट ते सप्टेबर दरम्यान अधिक पाउस आणि पुरामुळे २८ जिल्हयातील ४८.३८ लक्ष हेक्टर पीकाचे नुकसान झाले होते. डोळयादेखत सोयाबिनची गंजी पुराची पाण्यात वाहत जात होती. हवामान बदलामुळे इत्यादी नैसर्गीक आपत्तींना अल्पभुधारक शेतकरी मागील काही वर्षापासून समोरे जात आहे.

४) पिक उत्पादनात घट :

हवामान बदलामुळे पावसाच्या स्वरुपात निरंतर परिवर्तन येत आहे. यामुळे पीक उत्पादनात मागील काही वर्षापासून घट होत आहे. आपल्या उदरनिर्वाहासाठी पीकांवर अवलंबून असलेला शेतकरीला याचे घातक परिणाम सहन करावे लागत आहे.

५) किड आणि रोगांचा वाढलेला प्रार्दुभाव :

बदलत्या हवामानामुळे देखील किड आणि रोगांचा प्रार्दुभाव वाढतो. यावर उपाय म्हणून अधिक किटकनाशकाचा वापर शेतकऱ्यांना करावा लागतो, व त्याच्या उत्पादन खर्चात वाढ होते. पश्चिम विदर्भात विशेष करुन यवतमाळ जिल्हयात २०१७ च्या खरीप या हंगामात शेती पीकांना रोगापासून वाचविण्यासाठी किटकनाशकांची फवारणी (मोनोक्रोटोफॉस जो इतर

किटकनाशकापेक्षा स्वत आणि खुप विषारी असतो) करतांना विषबाधा होवून १४ शेतकरी आणि ०७ शेतमजुरांना आपले प्राण गमवावे लागले. तर १०७५ लोकांना जबर विषबाधा होवून डोळयांना ईजा, त्वचेवर पुरळ व मेंदूतंत्रात बिघाडाची समस्या निर्माण झाली होती. जर हवामान बदलाची तिव्रता कमी असती, तर या शेतकऱ्यांचे प्राण गेले नसते.

६) जनावर आणि पक्षी यांचेवर होणारे परिणाम :

हवामान बदलामुळे शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांना पाणी आणी चाऱ्याचे दुर्भीक्षाचे अनुभव राज्याने या पुर्वी अनुभवले आहे. महाराष्ट्रात काही भागात ४५ अंश शेल्शीअश पेक्षा जास्त तापमान वाढल्याने गाभण जनावरांनचा गर्भपात झाल्याचे दिसून येते. तसेच हृदयाचे ठोके वाढणे, श्वासोच्छावासाचा वेग वाढणे, भुक मंदावणे, उन्हाळयात हगवणीचे प्रमाण वाढणे यामुळे प्रजोत्पादना २० ते २५ टक्के घट होते. कोबंडयाचा मृत्युदर वाढतो. त्यामुळे जनावरे दगावतात, व मोठा आर्थीक नुकसान गरीब अल्पभुधारक शेतकऱ्यांना सोसावे लागते.

७) पाण्याची टंचाई :

हवामान बदलामुळे सरासरी पर्जन्यमानात मागील काही वर्षात विशेष घट दिसून येत आहे. उन्हयाळयात अधिक तापमाणामुळे जलसरोवरांचे बाष्पीभवन होवून ति लवकर कोरडी होत आहे. सिंचनाची अपुरी व्यवस्था असल्यामुळे अल्पभुधारक शेतकरी भिषण पाणी टंचाईस समोरे जातो.

८) उपजिवीवेकेच नुकसान :

कमी झालेले पीक उत्पादन, पाण्याची टंचाई आणि हवामान संबंधीत परिणामामुळे अल्पभुधारक शेतकरीची उपजिवीकाच नष्ट होत आहे. त्याच्याकडे उत्पन्नाचे स्त्रोत खुप मर्यादित आहे. राज्यातील अल्पभुधारकांची संख्या अधिक असल्यामुळे एक गंभीर समस्या म्हणून याकडे पाहता येईल.

९) स्त्रीयांना अधिक झळ :

राज्यांच्या ५० टक्के लोकसंख्येचा भाग असलेल्या स्त्रींयाना हवामान बदलाचा फटका अधिक बसतो. पर्यावरण आणि शेतीच्या जेष्ठ अभ्यासिका वंदना शिवा यांनी स्त्रिया आणि पर्यावरण यात अतूट नाते व तेवढेच गंभीर परिणाम याचे समिकरण मांडले आहे.

उपाययोजना :

हवामान बदलाचे दुरगामी परिणाम पुर्वी झालेले आहे, आणि भविष्यात त्याची तिव्रता अधिक असेल, तरीही काही सांघीक व संरचनात्मक बदल करुन अल्पभुधारक शेतकऱ्यांना येणाऱ्या भिषण समस्येपासून वाचविता येईल, त्यासाठीची उपाययोजना पुढिल प्रमाणे.

१. शेतकऱ्यांना गावपातळीवरील हवामान व पिकावरील रोगराही, तसेच वातावरणाच्या अनियमिततेमुळे जोखीम व्यवस्थापणा संबंधात अचूक माहीती/सल्ला कृषी विभागव्दारे थेट पुरविण्याची यंत्रणा विकसीत करणे.
२. बदलत्या वातावरणास अनुरुप बदलणारी पीकपध्दती, तंत्रज्ञानाबाबत कृषी विज्ञान केंद्रातर्फे माहीती देणे.
३. बदलत्या वातावरणात वाढू शकतील अश्या पीकांच्या व फळयांच्या प्रजातींचे कृषी विद्यापीठाव्दारे संशोधन करुन त्या वाहनांच्या लागवडीस शेतकऱ्यांना प्रोत्साहान देणे.
४. तापमान आणि पावसाच्या प्रमाणातील बदल यासंबंधीत अद्यावत माहीती हवामान शास्त्रविभागाकडून शेतकऱ्यापर्यन्त भ्रमणध्वनिव्दारा तात्काळ पुरविणे.
५. जलसिंचनासाठी शासनाने कालवे, बंधारे, इत्यादिंची अधिका निर्मीती करण्यावर भर देणे, जलव्यवस्थापन समितीव्दारा शेतकरीस सुक्ष्म जल सिंचनास प्रोत्साहन देणे.
६. अवर्षण, दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाउस,चक्रीवादळे व वातावरण बदलामुळे पीकाचे जे नुकसान होते, त्याकरीता पिकविमा अधिक प्रमाणात काढण्यासाठी शेतकऱ्यांना उद्युक्त करणे. शासनाने पिक विमा देण्याऱ्या कंपणीस शेतकऱ्यांना वेळेवर विमा मिळावा यासाठीची सोय करणे. तसेच शासनाकडून जि नुकसान भरपाई दिली जाते त्याची व्यापकता आणि गती वाढविली पाहीजे.
७. सेंद्रीय शेतकऱ्यांना शेती क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीकडून प्रशिक्षण, मार्गदर्शन देणे आणि शासकीय अनुदान मुबलक प्रमाणात उपलब्ध करण्याची सोय शासनाने करावी.
८. नानाची देशमुख कृषी संजीवन प्रकल्पाच्या विविध योजना योग्य प्रकारे राबविण्यात याव्यात.
९. समाजशास्त्रज्ञानी अल्पभुधारक शेतकऱ्यांच्या विविध समस्येला अनुसरुन अद्यावत, वस्तुनिष्ठ संशोधन करुन सुचना व शिफारशी शासनाला कराव्यात.

निष्कर्ष :

हवामान बदल अटळ आहेत. हवामानातील वाढत्या अनियमितेचा थेट परिणाम अन्न सुरक्षेवर होईल हवामान बदलाच्या अल्पभुधारक शेतकऱ्यावर व शेतीवर होणाऱ्या परिणामातुन भविष्यात अन्न सुरक्षेचा प्रश्न अधिक तिव्र बनण्याची शक्यता आहे. परंतु बिकट हवामानाचा प्रतिकार करु शकतील अश्या शेती पध्दती विकसीत करणे शक्य आहे, त्यासाठी हवामान बदलाची तिव्रता कमी करण्यासाठी आणि त्याच्याशी जूळवून घेण्यासाठी योग्य घोरणे आखावी लागतील. कृषीक्षेत्र सबल करण्यासाठी शेतीशी निगडीत सर्व घटकांनी एकत्र काम करणे गरजेचे आहे. शेतीशी संबंधीत आधूनिक विषयामध्ये तरुणांना सहभागी घेंवून त्यांचा उत्साह वाढविण्याची गरज आहे. महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने शेतीचे यांत्रीकीकरण, हवामान सुचनेच्या तत्पर यंत्रणा आणि अल्पभुधारक व सिमांत शेतकऱ्यांना सुक्ष्म पतपुरवठयाच्या सोई हे काही महत्वाचे उपाय ठरतील.

संदर्भग्रथ सुची :

१) Hannigam,John.(2020) *Environmental Sociology* Routledge publication London.

२) Chatterjee,Biswajit., Karmakar, Asim.(2012) *Food Security in India*,Regal Publication New Delhi.

३) Rawal, Vikas. (2008) *Ownership Holding of land in rural India:Putting the record straight,* EPW. Vol. 43, issue no.

४) Rao, P. (2007). "*Himalayas- Retreat of the Glaciers*", in The Hindu Survey of the Environment, The Hindu, Special Issue, New Delhi.

५) https://agcensus.dacnet.nic.in/SL/StateT1table1.aspx

६) http://www.fao.org/climatechange/31751-0e19c0e689b61199624d2dfe9599.doc.

७) https://www.sudharak.in/2022/07/8753/

८) https://www.loksatta.com/explained/explained-challenges-of-climate-change-for-maharashtra-exp-0122-sgy-87-2773974/

९) https://www.agrowon.com/agroguide/global-climate-change-and-agriculture-in-maharashtra

१०) एस.आय.टी.रिपोर्ट २०१७.

११) किरदक, बी.एच., खडके, सुधा., पांडे, दया.(२०१८) *भारतीय समाजिक समस्या,* प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव.

१२) कवीमंडन, विजय. (२०१२) *कृषी व ग्रमीण अर्थशास्त्र,* श्री.मंगेश प्रकाशन २३, नवि रामदासपेठ, नागपूर.

१३) सांगळे, शैलजा., ताटके, निलम. (२०११) *पर्यावरण आणि समाज ,* डायमंड पब्लीकेशन्स, पूणे.

१४) भरुचा, एरक {मराठी अनु.सिध्दीविनायक बर्वे}.(२०१३) *पर्यावरण शास्त्र,* ओरिऐंन्ट ब्लॅक स्वॉन प्रा.लिमीटेड, मुंबई.

१५) खांदेवाले, श्रीनिवास. (२०१५) *महाराष्ट्राची आर्थीक पाहणी... पर्यायी दृष्टीक्षेप,* सपांदक कॉ.गोविंद पानसरे : श्रमीक प्रतिष्ठाण कोल्हापूर,कोल्हापूर.

*संशोधक विदयार्थी, पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती., मो.न.९०११६६००१५.

***

शेतकरी आत्महत्या कारणे व उपाय

*प्रा.आनंद गो. मनवर

प्रस्तावना :

भारत हा कृषीप्रधान देश मानला जातो. या देशातील ७० टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहे. देशाची अन्नधान्याची गरज पुर्ण करण्याची जबाबदारी शेतकऱ्यावर येते, शेतीतून मशागत करुन देशाची भुक भागवणारा शेतकरी वर्तमान काळामध्ये आत्महत्या करु लागलेला आहे. साधारणत: १९९० च्या दशकानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रश्न अधिकच गंभीर स्वरुपाचा होतांना दिसतो. १९९० मध्ये हिंदु या इंग्रजी वृत्तपत्रात ग्रामीण बाबीचे पत्रकार साईनाथ यांनी शेतकऱ्यांच्या नियमित आत्महत्येची कारणे दिले. सुरवातीला महाराष्ट्रात अशा बातम्या येवू लागल्या. महाराष्ट्रात प्रामुख्याने विदर्भातून अशा बातम्या येवू लागल्या. १९ मार्च १९८६ रोजी यवतमाळ जिल्हयातील चिखलगव्हाण या गावचे शेतकरी साहेबराव करपे यांनी पवनार येथे जावून सहकुटुंब आत्महत्या केली. ही पहली नोंदलेली आत्महत्या मानली जाते. आत्महत्या देशातील पंजाब, आंधप्रदेश, मध्यप्रदेश, अशा सारख्या विविध राज्यामध्ये शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण कमी अधिक प्रमाणात आढळते वेगवेगळया राज्याच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास महाराष्ट्रातच सर्वात वरचा क्रमांक लागतांना दिसता. मागील १२ वर्षामधील महाराष्ट्राततील शेतकरी आत्महत्येची संख्या जास्त आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनामध्ये २०१९ ते २०२१ ची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. संपूर्ण भारतात ५९५७ आत्महत्या २०१९ मध्ये झाल्या त्यापैकी २६८० आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या. २०२० मध्ये ५५७९ संपूर्ण भारतभर २५६७ महाराष्ट्रात झाल्या आणि २०२१ मध्ये ५३१८ भारतात तर २६४० एकटया महाराष्ट्रात आत्महत्या झाल्याची स्थिती आहे. २०११ ते २०२२ पर्यंत महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येची आकडेवारी राष्ट्रीय अन्वेशन शाखा महाराष्ट्र सरकार नुसार पुढीलप्रमाणे आहे.

वर्ष	शेतकरी आत्महत्या
२०११	३३३७
२०१२	३७८९
२०१३	३१४६
२०१४	१९८१
२०१५	३२२८
२०१६	३०३०
२०१७	३०६३
२०१८	२७६१
२०१९	२६८०
२०२०	२५६७
२०२१	२६४०
२०२२	१०२३

संज्ञाचा अर्थ : शेतकरी ही विस्तुत संज्ञा असुन त्यामध्ये कृषी योग्य जमिनीवर शासकीय नियमानुसार मालकी असणाऱ्या सर्व व्यक्तीचा समावेश होतो. तसेच दुसऱ्याची जमीन भाडे तत्वावर करण्याकरीता केली असेल तर त्याची शासकीय कार्यालयामध्ये नोंद असणे आवश्यक आहे त्याशिवाय शेतकरी म्हणता येणार नाही.

आत्महत्या : आत्महत्या शब्दो का प्रयोग मृत्यू की उन सभी घटनाओं के लिये जाता है। जो मृतक की खुद मृतक के किसी सकारात्मक अथवा नकारात्मक कार्य का प्रत्यय रुप से परिणाम है और वह व्यक्ती इस बात को जानता है कि, उसके इस कार्य का परिणाम मृत्यू होगी। — **एमील दुर्खीम**

उद्दिष्ट :— १. शेतकरी आत्महत्येच्या कारणांचा शोध घेणे. २. शेतकरी आत्महत्येवर उपाय योजना सुचविणे.

गृहीत कृत्य :—

१. शेतकरी आत्महत्येच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

अध्ययन पध्दती : शोध निबंधाकरीता दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या समस्यांची कारणे :

१. शेतमालाला मुलभूत हमीभाव नसणे :— शेतमालाला कधीही हमीभाव नसतो. उत्पादनावर शेतमालाचा भाव ठरवला जातो, जर शेती माल सरासरी पेक्षा जास्त झाला तर भाव कमी होतो व उत्पादन कमी झाले तर स्थिर राहतो.

२. **दर्जेदार बी बियाणे खते यांचा अभाव :—** बि—बियाणे व खते हे मुबलक प्रमाणात असले तरी व्यापारी आपल्या भल्याकरीता कुत्रिम टंचाई निर्माण करतो व दामदुप्पट भावात विकतो त्यामुळे शेतकऱ्याला वेळेवर घेणे शक्य होत नाही.

३. **पावसाची अनियमितता :—** शेती ही पुर्णत: नैसर्गिक पावसावर अवलंबून आहे. पावसामध्ये अनियमितता असल्यामुळे एकतर पेरणीच्या वेळेस पाउस पडत नाही पडला तर प्रमाणाच्या बाहेर पडून संपूर्ण नुकसान झाल्याचे आपणास दिसते किंवा पीक काढणीच्या वेळेस भरपूर आल्याने तोंडा हाताशी आलेले संपूर्ण पिक उध्दवस्त होतांना आपणाला दिसून येते.

४. **शेतीपुरक व्यवसायाचा अभाव :—** शेत व शेतीपूरक व्यवसाय करण्याकरीता लागणारे भांडवल व साधनांची उपलब्धता नसल्याने पुरक व्यवसाय याचा अभाव दिसतो.

५. **शेतकऱ्यांची व्यसनाधिनता :—** शेतकरी हा व्यवसनाच्या आहारी गेल्यामुळे तो शेतीच्या उत्पन्नातून मिळणारा पैसा हा व्यसनामध्ये खर्च करतो पर्यायाने त्याचे व त्याच्या कुटुंबाचे संतुतन बिघडते.

६. **उत्पादन कमी व खर्च जास्त :—** आजच्या काळात शेती ही नैसर्गिकतेच्या अनियमिततेमुळे उदा. वेळेवर पाउस न येणे, व पिक कापण्याची वेळी पाउस येणे यामुळे शेतकऱ्यांचा शेतीवर लावलेला खर्च हा जास्त व उत्पादन कमी अशी परिस्थिती निर्माण होते.

७. **रुढी परंपरा :—** अनेक भागामध्ये आजच्या आधुनिक काळामध्ये रुढी परंपरांचा पगडा असलेला दिसतो. कुटूंबातील मुलींचे लग्न करतांना शेतकरी कर्ज काढून जमीन विकतो व ज्यांच्याकडे हुंडा किंवा लग्न करण्यासाठी पैसा नसतो असे शेतकरी आत्महत्या करतांना दिसतात.

८. **आर्थिक साक्षरतेचा अभाव :—** शेतकऱ्यांना आर्थिक साक्षतेमुळे अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. आर्थिक साक्षरता निर्माण होणे काळाची गरज आहे. आजच्या काळामध्ये शेतकरी जेव्हा पिक घेतो त्यामागील खर्च उत्पादन उत्पन्न यांचा विचार करुन निश्चित अशाप्रकारचे धोरण आखुन पिक घेतले पाहिजे.

९. **शासकीय पातळीवरील उदासिनता :—** सरकारने शेतकऱ्यांकरीता राबविलेलया अनेक योजना असलेलया आपण पाहतो. परंतु त्या योजनांचा लाभ घेतांना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते आणि यामधुन मिळणारी मदत सुध्दा अल्पशी आहे.

उपाययोजना :—

१. शेतीचे निसर्गावरील असलेले अवलंबन कमी करुन पाणी व्यवस्थापन पध्दतीचा वापर करणे.
२. सरकारी योजनांचा लाभ वेळेवर देण्यात यावा. उदा. खते, किटकनाशके कर्ज सुविधा.
३. शेतकऱ्यांनी उत्पादनाच्या पर्यायी साधनांचा वापर केला पाहिजे.
४. सामुहीक विवाह समारंभाचे आयोजन करणे काळाची गरज आहे.
५. सेंद्रीय शेतीला प्राधान्य देणे.

सारांश :— भारतातील जवळपास ७० टक्के पेक्षा जास्त लोक शेती हा व्यवसाय करतांना दिसतात. परंतु शेती मधून ज्या प्रमाणात धान्याचे उत्पादन व्हायला पाहिजे. त्या प्रमाणात होत नाही. ते पावसाच्या अनियमितता व वेळेवर लागणारे चांगले बि—बियाणे व खते यांच्या अभावामुळे शेती व्यवसाय धोक्यात आलेला आहे. त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतांना दिसतात. त्याचाच परिणाम म्हणून शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ :—

१. डॉ. सुरेन्द्र सोनकुवर, भारतीय समाज संरचनात्मक प्रश्न.
२. National crime records to bureau Report
३. Govt. of Maharashtra
४. www.schoolington.com
५. दैनिक लोकसत्ता
६. रा. ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती.
७. महाजन शर्मा महाजन, प्रमुख समाजशास्त्रीय विचारक,

*समाजशास्त्र विभाग, युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती.

***

झोपडपट्टीवासियांचे आर्थिक पर्यावरण

*डॉ. विनोद काळू निरभवणे

सारांश - रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण शहरांमध्ये अधिक आहे म्हणून तेवढ्या प्रमाणात झोपडपट्ट्या वाढतात व असंघटीत व्यवसाय, उद्योगात काम करतात. रोजगारवाढीमुळे आर्थिक वाढ होते व उत्पन्न वाढते. कौटुंबिक स्थितीवर रोजगाराच्या दर्जाचा प्रभाव होत असतो. जास्त लोक हे बिगर कौशल्य असणाऱ्या व्यवसायात असतात. रोजगार नसणाऱ्या लोकांची संख्या अधिक असते. यात स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण अधिक असते. साहजिकच रोजगार नसल्यामुळे या लोकांच्या उत्पन्नात कपात होते. उत्पन्नाचा परिणाम कुटुंबाच्या प्रत्यक्ष जीवन जगण्याच्या गुणवत्तेवर होतो. दरमहा येणारे उत्पन्न हे कुटुंबाचे जीवनमान ठरवत असते. यामुळे दारिद्र्याचे प्रमाण अधिक दिसते. म्हणजेच आर्थिक घटकाचा परिणाम कुटुंबाच्या जीवन जगण्याच्या स्थितीवर होतो. आर्थिक घटकामुळे कुटुंबाचा जीवन जगण्याचा दर्जा सुधारतो. शिधा पत्रिका ही येथील लोकांसाठी महत्त्वाची असते. गरीब असण्याचा हा एक महत्त्वाचा पुरावा आहे. झोपडपट्टीतील सार्वजनिक सेवा तसेच येथील वातावरण ह्या कारणांबरोबर येथील सामाजिक व आर्थिक कारणांमुळे दारिद्र्य आहे. कारण रोजगारातून पुरेशा प्रमाणात व ठराविक उत्पन्न मिळत नाही. प्रत्येक कुटुंबाची राहणीमानाची पातळी ही त्याला मिळालेल्या रोजगारावर अवलंबून असते. समाजातील दर्जा, प्रतिष्ठा, मुलांचे शिक्षण, आवडी- निवडी, राहण्याचे ठिकाण या सर्वच प्रकारच्या गरजा भागवणे हे रोजगारावर अवलंबून असते. म्हणून शहरांमध्ये झोपडपट्टीवासियांना मिळेल त्या रोजगारावर जीवन जगावे लागते. यातून स्वत:ची परिस्थिती व जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने कष्ट करण्याची तयारी असते. शहरात स्थलांतराचा उद्देश म्हणजे रोजगार व चांगले जीवन जगण्यास मिळणे हा असतो. कमी शिक्षण असलेल्या लोकांना रोजगार मिळतो. पण त्यातून अतिशय कमी पैसे मिळत असल्यामुळे शहरातील महागाई, घरभाडे व इतर गरजा भागवणे शक्य होत नाही. तरी देखील आहे तो रोजगार टिकवून ठेवण्याकडे या लोकांचा कल असतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात त्याचा रोजगार व मिळणारे उत्पन्न हे अतिशय महत्त्वाचे असते. नाशिक शहरातील झोपड्पट्टीवासीयांच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करून सदर संशोधन हे संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपात मांडले आहे. यामध्ये झोपडपट्टीवासियांचा शहरी समुदायाशी संबंध, प्रत्येक झोपडपट्टीची स्वत:ची वेगळी ओळख, कामधंदा, किरकोळ स्वरूपाचे व्यवसाय, स्त्रियांच्या कामाचे प्रकार, मुलांचा सांभाळ, घरांचे स्वरूप, जागेची उपलब्धता, दोन घरांमधील अंतर, कर्ज घेण्याचे प्रमाण, कुटुंबाच्या गरजा पूर्ण न होण्याची कारणे, भाड्याने राहणारी कुटुंबे, शौचालयाची व्यवस्था व मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च हे घटक संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपात मांडले आहेत.

झोपडपट्टीवासियांचा शहरी समुदायाशी संबंध - झोपडपट्टीवासियांचा आर्थिक बाजूने शहरी समुदायाशी अनौपचारिक व घनिष्ठ संबंध येत असतो. बाजारात सेवा पुरवण्याचे काम झोपडपट्टीवासीय करतात. तसेच काही उद्योग, औपचारिक आर्थिक संस्था यांचा यात महत्त्वपूर्ण सहभाग असतो. सेवा पुरविण्याबरोबर स्वतः उपभोक्ता वर्ग म्हणूनही झोपडपट्टीवासिय महत्त्वाचा घटक आहेत. येथील गरीब लोक अनौपचारिक क्षेत्रातील आर्थिक घडामोडीत सहभागी असतात व शहरातील आर्थिक व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका पार पाडतात. भाजीपाला विकणे, फळे विकणे तसेच संपूर्ण शहरात स्वच्छता राखणे यात महानगरपालिका स्वच्छता विभागाअंतर्गत व कंत्राटी पद्धतीने कामे करतात. रिक्षा चालविणे, कपडे धुणे, इस्तरी करणे, दूध व्यवसायात काम करणे, घरोघर भांडी, कपडे विकणे, विवाह समारंभामध्ये संगीत, वाद्य वाजवणे, धान्यांच्या गाड्या भरण्याचे व उतरविण्याचे काम करतात. काही लोक कापड उद्योग, रेल्वे स्टेशनमधील गुदामांमध्ये काम करतात. अशा अनेक सेवा येथील लोक शहरी समुदायाला पुरवितात व एका विस्तृत

समाजाचे सदस्य म्हणून त्यात सहभागी होतात. विविध सेवांच्या माध्यमातून उच्च जातीतील लोकांबरोबरचे संबंध तयार होतात. झोपडपट्टीतील लोक कौटुंबिक व खाजगी सेवा पुरवितात.

प्रत्येक झोपडपट्टीची स्वत:ची वेगळी ओळख असते - कंपनी कामगार, विविध वस्तू बनविणे, गृहउद्योग चालविणे इ. महिलांचाही अशा कामांमध्ये मोठा सहभाग असतो. सहकारी पतसंस्था आणि बँका आपल्या सेवा येथे पुरवितात. त्यात गरीब असणाऱ्या तसेच छोटे व्यवसाय करणारे, रिक्षाचालक यांना कर्जपुरवठा करतात व झोपडपट्टीवासियांना आपले जीवन बदलण्याची संधी निर्माण करुन देतात. अनेक सामाजिक आर्थिक व राजकीय संघटना झोपडपट्टीवासियांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करतात. पण त्याचा फायदा घेण्यासाठी येथील लोक पूरेसे सक्षम नसतात.

कामधंदा किंवा व्यवसाय - नाशिक शहरातील ३५ झोपडपट्ट्यांमधून ६०० कुटुंबाचा अभ्यास केला असता स्वयंरोजगार स्वरुपाचे व्यवसाय करणारे २६.१६% लोक आहेत. यात रिक्षा चालकांची संख्या सर्वाधिक ४५ आहे. तर भाजीपाला विकणाऱ्या २५ व फळविक्री करणाऱ्या २४ व्यक्ती आहेत. भांडी विकणे, जुने कपडे विकणे, बांगड्या, खेळणी विकणे हे व्यवसाय शहरात दारोदार जाऊन केले जातात. तसेच जवळच्या खेड्यांवर आठवडे बाजारात दुकान लावले जाते. मोबाईल दुरुस्ती, हॉटेल, चहाची टपरी, मच्छी विकणे, शिलाई काम, मंडप, बेकरी, इलेक्ट्रॉनिक्स दुकान, गोळी - बिस्किट विकणे, खारी विकणे हे व्यवसाय स्थानिक परिसरातच केले जातात.

नाशिक महानगरपालिकेत सफाई कामगार व कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. सातपूर व अंबड येथे कंपनी कामगार राहतात. करार तत्वावर कंपनीत १२ तास काम करणारे कामगार आहेत. साधारणपणे १० ते १२ हजार रुपये दरमहा किंवा त्यापेक्षा कमी वेतनावर या कामगारांना काम करावे लागते. झोपडपट्टीच्या जवळच्या परिसरात असणारे दवाखाने, हॉस्पिटल्स येथे काम करणारे कामगार आहेत. त्यांना दरमहा पाच ते सात हजार रुपये वेतन दिले जाते. वर्षानुवर्षे काही कामगार एकाच मालकाकडे काम करणारे आहेत. एकाच कुटुंबातील दोन किंवा तीन व्यक्ती काम करत असल्यास कुटुंबाला प्राथमिक गरजा भागवता येऊन इतर गरजांकडेही लक्ष देता येते. शहरातील विविध दुकानांमध्ये काम करणारे कामगार आहेत. यात घरोघरी सिलेंडर पोहचवणे, केबल दुकान, रेशन, मोबाईल, शोरुम, हार्डवेअर, ऑफिस, कॉफिशॉप येथे काम करतात. वॉचमन म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती आहेत तर ड्रायव्हर म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती आहेत तसेच गवंडी, फिटर, प्लंबर, आचारी, पेंटर, सेंट्रींग, वेल्डींग, सुतार, सलून ही कामे करणाऱ्या व्यक्ती आहेत. या प्रकारे रोजंदारी व मासिक वेतनावर काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. घंटागाडीवर काम करणारे, बांधकाम क्षेत्रात बिगारी म्हणून, हॉटेलात वेटर म्हणून व हमाली काम काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. खडीकाम, हातगाडी, कुरीयर, शेतमजूर, बाहेरील स्वयंपाक महिला करतात. बाहेरील स्वयंपाक करणे, भंगार वेचणे, शेतमजुरी यात महिला व मुलींचा सहभाग आहे.

नोकरीतील २५ लोक वगळता ५७५ लोक अनौपचारीक क्षेत्रात काम करतात. जेथे कामाची सुरक्षितता व हमी नाही रोजगाराचा हक्क, सुट्ट्या, रजा, पीएफ यांसारख्या सवलती नाहीत. कायद्याचे संरक्षण नाही अशा असुरक्षित वातावरणात काम करावे लागते. यासाठी या लोकांच्या संघटना मजबूत नाहीत. शासनाचा व राजकीय पक्षांचा पाठिंबा, संरक्षण मिळत नाही.

किरकोळ स्वरूपाचे व्यवसाय - आहे तो व्यवसाय कधीही अतिक्रमणामध्ये उठवला जात असतो. कधीही व्यवसायावर अतिक्रमण विभागाची कारवाई होत असते. तसेच महापालिका अधिकारी, पोलिस, बाजार समिती यांना दररोज हफ्ता किंवा पावती द्यावी लागते. एवढे करुन व्यवसायात होणारे नुकसान भरुन निघत नाही. किरकोळ स्वरुपात माल भरण्यासाठी पैसा उभा करणे म्हणजे स्थानिक सावकारांकडून व्याजाने पैसे घेणे व दामदुप्पट व्याज भरत राहणे हे प्रकार

कायमस्वरुपी चालत असतात. यातनूच वैफल्य, चिंताग्रस्तता, अवैध व्यवसाय करणे हे प्रकार होतात. रोजंदारी व दरमहा कामे करणाऱ्या लोकांना मालकाकडून मजुरी किंवा दरमहा वेतन मिळेलच याची खात्री नसते. कित्येकदा मालकाकडून काम जास्त करुन घेण्याबरोबर अतिरिक्त कामाचा मोबदला मिळत नाही. कंपनी कामगारांना कायमस्वरुपी काम मिळत नाही. दुकानातील कामगार, वॉचमन, ड्रायव्हर, कारागिर, मजुरी करणारे असे साधारणतः ३९१ व्यक्ती आहेत. म्हणजे ६५.१६% व्यक्तींचा यात समावेश होतो व स्वयंरोजगारित १५७ व्यक्ती म्हणजे २६.१६% व्यक्ती यात येतात. एकूण ९१.३२% लोक हे अनौपचारिक क्षेत्रात वरील प्रकारची कामे करतात.

स्त्रियांच्या कामाचे प्रकार - बाहेरील धुणीभांडी व साफसफाई करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण २७.१७% आहे. भाजीपाला विकणे, कंपनीतील कामे, टपरी चालवणे व भंगार वेचणे या प्रकारची कामे करणाऱ्या १६.१७% स्त्रिया आहेत. तसेच घरकामामध्ये असणाऱ्या २६३ स्त्रिया आहेत. हे प्रमाण ४३.८३% आहे. यातील निम्म्यापेक्षा जास्त स्त्रियांना कुटुंबाच्या गरजांसाठी बाहेरील कामे कधीतरी करावीच लागतात. तसेच कंपनीतील विविध वस्तू घरी आणून त्या स्वच्छ करुन देणे, कपड्यांवरील नक्षीकाम, विवाह समारंभ, शाळा, महाविद्यालये व कंपनीतील कार्यक्रमांमध्ये स्वयंपाक बनवणे इत्यादी कामे ही रोजंदारी स्वरुपात केली जातात. यात स्त्रिया, पुरुष व लहान मुले यांचा समावेश असतो. लग्न समारंभ व इतर कार्यक्रमात वाद्य वाजवण्याचे काम येथील लोक करतात. शिवजयंती, आंबेडकर जयंती, पुढाऱ्यांचे वाढदिवस, देवी-देवतांचे सणउत्सव यात वाद्य वाजवणे, गाणी म्हणणे ही कामे करतात. या स्त्रियांवर कुटुंब अवलंबून असते. मुले-मुली लहान असतानाच विधवा होणे. घटस्फोट होणे, नवऱ्याने टाकून देणे, आईवडील म्हातारे असणे, बहीण भावांच्या पालनपोषणाची जबाबदारी, नवरा व्यसनी असणे, आजारी असणे इ. कारणांमुळे स्त्रियांना मिळेल ते काम शोधावे लागते व मिळेल त्या रोजंदारीवर काम करावे लागते. स्त्रियांना धुणी-भांडी व बाहेरील स्वयंपाक यासाठी महिना ६०० ते ८०० रु. एका घरातील कामाचा मोबदला दिला जातो. अशी तीन-चार कामे केली तर महिन्याला २००० ते ३००० रुपये मिळतात. सतत पाण्यात असल्यामुळे सांध्याचे आजार जडतात. म्हणजेच झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या महिलांना आर्थिक शोषणाला बळी पडावे लागते. भंगार वेचणाऱ्या स्त्रियांच्या समस्या पूर्णपणे दुर्लक्षित आहेत व या महिलांना जास्त विवंचनेत जगावे लागते.

मुलांचा सांभाळ - आईवडील कामावर गेल्यानंतर कुटुंबांमध्ये मुलांचा सांभाळ करण्यासाठी कोणीच नाही. अशी मुले इतरत्र परिसरात फिरणे, मिळेल तेथे खाण्याचे पदार्थ शोधणे, इतर अवैध व्यवसायातील व्यक्तींच्या संपर्कात येणे, वयाने मोठ्या असणाऱ्या मुलांबरोबर खेळणे, फिरणे यामुळे मुलांच्या वर्तनात बिघाड होतो. मुले शाळेत न जाणे, अभ्यास न करणे यातून मुलांचा इतर आकर्षक गोष्टींकडे कल वाढत जातो. सिनेमा पाहणे, मोबाईलचा वापर यातून मोठी मुले लहान मुलांचा दुरुपयोग करतात.

जागेची उपलब्धता - शासनाने किंवा महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन दिल्यास तेथे घर बांधण्याची तयारी ५१३ म्हणजेच ८५.५% व्यक्तींनी दाखवली आहे. याची कारणे म्हणजे स्वतःचे घर, राहण्यासाठी जास्त जागा, सोयी-सुविधांमध्ये वाढ व राहणीमानाच्या दर्जात सुधारणा ही आहेत. ज्या व्यक्तींनी झोपडपट्टीत पक्की घरे बांधली आहेत स्वतःचा व्यवसाय व कामधंदा आहे अशी कुटुंबे येथून जायला तयार नाहीत.

घरांचे स्वरूप - सर्वात जास्त घरे ही सिमेंट, विटा व पत्रे असणारी आहेत. माती, विटा व पत्रे असणारी घरे व लाकडी फळ्या व प्लास्टिक कागद असणारी घरे आहेत. यावरून स्लॅबच्या झोपड्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. कारण घराची जागा ही स्लॅब टाकण्यासाठी अतिशय कमी असते व पक्के घर बांधण्यासाठी जागेची शासन मान्यता आवश्यक असते. लाईट बील, पाणी बील व घरपट्टी या कागदपत्रांची आवश्यकता असते. झोपडी नावावर करण्यासाठी

महानगरपालिकेची परवानगी या प्राथमिक गोष्टींची पूर्तता केल्यानंतर परवानगी दिली जाते. तसेच पक्के घर बांधण्यासाठी येणारा खर्च परवडणारा नसतो व बँक किंवा पतसंस्था यांच्याकडून मिळणारी कर्जाची रक्कम अतिशय अल्प असते. झोपडी मालकाचे कायमस्वरुपी असणारे उत्पन्न पाहूनच बँक कर्ज देते. म्हणून येथील लोकांना पक्की घरे बांधता येत नाहीत. सिमेंट, विटा व पत्रे असणारी घरे सुद्धा बऱ्याच वर्षांची झालेली आहेत. पत्रे दीर्घ कालावधीनंतर खराब होतात व त्यावरुन प्लॅस्टिकचे कागद टाकावे लागतात. पावसाळयात अशी घरे गळतात व त्यामुळे भिंती देखील दिर्घकाळ टिकत नाहीत. म्हणून सातत्याने घरासाठीचा किरकोळ खर्च डागडुजी करत रहावी लागते. मातीची घरे असण्याचे प्रमाणही जास्त आहे. माती, विटा व पत्रे असणारी घरे कच्च्या स्वरुपाची आहेत. अशी घरे पडण्याची शक्यता जास्त असते. लाकडी, फळया व प्लॅस्टिक कागद असणारी घरे म्हणजे तात्पुरत्या स्वरुपाच्या झोपड्या आहेत. अशा कुटुंबांना आपली झोपडी चांगल्या स्थितीत बांधण्याएवढे उत्पन्न नसते. जास्त दारिद्र्याचे प्रमाण या कुटुंबांमध्ये दिसून आले. अतिशय कमी जागेत अशा झोपड्या उभारलेल्या आहेत. दोन घरांमधील कमी अंतरामुळे घरात सूर्यप्रकाश येत नाही. त्यामुळे घरात कोंदट वातावरण तयार होते व घरात मोकळी खेळती हवा राहत नाही. यामुळे घरातील वस्तुंचा व भिंतीचा कुबट वास येतो. याचा परिणाम येथील कुटुंबांच्या आरोग्यावर होतो. पंचशील नगर, गंजमाळ येथील झोपड्यांमधील अंतर पाच फुटांपेक्षा कमी आहे. येथील घरांमध्ये प्रवेश करणे व घरात बसणे अशक्य आहे कारण येथील पर्यावरण व घरांची परिस्थिती मानवी आरोग्यास मोठ्या प्रमाणात हानीकारक आहे.

कर्ज घेण्याचे प्रमाण - कर्ज घेतलेल्या व्यक्तींचे एकत्रित प्रमाण २५१ आहे. कर्ज घेण्याच्या कारणांमध्ये मुला-मुलींच्या विवाहासाठी १९, घरबांधणी ७३, कामधंद्यासाठी ७७, मुलांचे शिक्षण ५२ व मोटर सायकल घेण्यासाठी ३१ व्यक्तींनी कर्ज घेतले आहे. कर्ज अतिशय कमी लोकांनी घेतले असले तरी सावकाराकडून ८४ व्यक्तींनी कर्ज घेतले आहे. तर बँक व पतपेढीकडून १६१ व्यक्तींनी व सोसायटीकडून १० लोकांनी कर्ज घेतले आहे. यावरुन असे दिसते की, झोपडपट्टीतील लोकांना बँका, पतसंस्था सोसायटी यांच्याकडून पूरेशा प्रमाणात कर्ज मिळत नसल्याचे या आकडेवारीवरुन दिसते. असंघटीत क्षेत्रातील रोजगार असल्यामुळे व कर्जाची गॅरंटी नसल्यामुळे बँका येथील लोकांना कर्ज देत नाहीत.

कुटुंबाच्या गरजा पूर्ण न होण्याची कारणे - मिळवत असलेल्या उत्पन्नात कुटुंबाच्या गरजा पूर्ण न होण्याच्या कारणांमध्ये कुटुंबातील व्यक्तींची जास्त संख्या, महागाई व पूरेसा पगार किंवा रोजगार मिळत नसल्यामुळे कुटुंबाच्या गरजा पूर्ण होत नाहीत तर कायमस्वरुपी नोकरी नाही व रोजगार उपलब्ध होत नाही. असे प्रमाण म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक लोकांना कायमस्वरुपी रोजगारच उपलब्ध होत नाही. अशावेळी महिलांना धुणी-भांडी किंवा इतर कामे करावी लागतात. पुरुषांपेक्षा महिलांना काम मिळते पण महिलांना पुरुषांच्या तुलनेत अतिशय कमी पैसे मिळतात. कारण अशिक्षित महिलांना पारंपरिक स्वरुपाचीच कामे करावी लागतात. इतर कौशल्य किंवा व्यवसायाचे कौशल्य नसल्यामुळे मजुरीची कामे करावी लागतात.

भाड्याने राहणारी कुटुंबे - दरमहा कौटुंबिक बाबींवर होणाऱ्या खर्चामध्ये ५०० ते १००० रुपये भाड्याने राहणारी ५३ कुटुंबे आहेत. तर १००१ ते २००० रुपये भाड्याने राहणारी १५४ कुटुंबे आहेत. व २००१ ते ३००० रुपये भाड्याने राहणारी ३० कुटुंबे आहेत, अशी एकूण २३७ कुटुंबे भाड्याने राहतात. मिळणारी मजुरी व द्यावे लागणारे घराचे भाडे जास्त असते. ५०० ते २००० रुपयांपर्यंत भाड्याने राहणारी २०७ कुटुंबे आहेत. त्यापेक्षा अधिक भाडे देणारी ३० कुटुंबे आहेत. म्हणजेच भाड्याने मिळणाऱ्या झोपड्या ह्या विटा, माती तसेच प्लॅस्टिक कागद, लाकडाच्या फळया व पत्रे असणारी आहेत. कोणत्याही प्रकारचे फर्निचर अथवा इतर सुविधा नसतात. पाण्याची सुविधा स्वत:ची नसते. तर सार्वजनिक नळावरुन पाणी आणावे लागते.

शौचालयाची व्यवस्थाही सार्वजनिक असते. काही झोपड्यांना लाईट इतर ठिकाणाहून भाड्याने घ्यावी लागते. तर काही कुटुंबांना लाईट मिळत नाही. गॅससाठी होणारा खर्च जास्त आहे. गॅस नसल्यामुळे स्वयंपाकासाठी रॉकेल वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण ७७ म्हणजे १२.८३% आहे. अशा कुटुंबांना गॅस मिळत नसल्यामुळे नाईलाजास्तव जास्त दराने रॉकेल विकत घ्यावे लागते. तसेच गॅसचे कनेक्शन आहे, पण गॅस भरण्यासाठी पैसे नसल्यामुळे देखील रॉकेल विकत घ्यावे लागते. अशावेळी दुकानदाराकडून इतर किराणा माल जास्त दराने विकत घ्यावा लागतो. या लोकांकडून दुकानदार इतर लोकांपेक्षा जास्त पैसे घेतात व एक किंवा दोन लिटर रॉकेल देतात. रेशन कार्डवरील रॉकेल इतरत्र वापरासाठी म्हणजे काळ्या बाजारात विकले जात होते. गरिबांना मिळणाऱ्या रॉकेलमध्ये भ्रष्टाचार केला जात होता.

मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च - मुलांच्या शिक्षणावर होणारा खर्च ३३२ म्हणजे ५५.३३% कुटुंबाचा आहे. ५०० ते १००० रुपयांपर्यंत ७५, १००१ ते २००० रुपयांपर्यंत १९१ कुटुंबांचा खर्च होतो व त्यापुढील खर्च ६६ कुटुंबांचा आहे. म्हणजेच जी मुले मराठी माध्यम व महानगरपालिका शाळेत जातात. त्यांचा खर्च अतिशय कमी आहे. इंग्रजी माध्यमात जाणाऱ्या मुलांची संख्या ही फक्त २५ एवढीच आहे.

सर्वाधिक खर्च येथील कुटुंबांचा रेशन व दवाखाना यासाठी होत असल्याचे दिसते. इतर खर्चाचे प्रमाण हे तुलनेने कमी आहे. कुटुंब प्रमुखांच्या शिक्षणात जवळपास २०% व्यक्ती अशिक्षित आहेत. तर प्राथमिक शिक्षण असणाऱ्या व्यक्ती २५% आहेत. म्हणजेच साक्षरतेचे प्रमाण लिहिता वाचता येण्यापुरतेच असल्याचे दिसते. त्यातून नोकरी, व्यवसाय व इतर कौशल्य मिळवण्यासाठी लागणारे शिक्षण कुटुंब प्रमुखांकडे नाही. यावरुन कौशल्यपूर्ण शिक्षण नसल्यामुळे चांगल्या रोजगाराची संधी येथील लोकांना मिळत नाही.

अमर्त्य सेन यांच्या मते अनेक विकसनशील देशात मुक्त अर्थव्यवस्थेत कामगाराला औद्योगिक उत्पादनातील भागिदारीपासून दूर ठेवण्यात आले. त्याबरोबर छोटे-मोठे शेतकरी व परंपरागत व्यवसाय करणारे लोकही औद्योगिक उत्पादनाच्या भागिदारीपासून दूर राहिले. आर्थिक व्यवहारातील भागिदारीचा सामाजिक जीवनात निश्चित उपयोग होतो. बाजारकेंद्रीत अर्थव्यवस्थेच्या बाहेर राहिलेल्या इतर मागास वर्गातील लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा प्रक्रियेत शासनाचा हस्तक्षेप महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मानवी जीवन समृद्धच होत असते. सामाजिक किंवा राजकीय स्वातंत्र्याच्या अभावामुळे आर्थिक स्वातंत्र्याला संकुचित केले जाते. आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावामुळे सामाजिक समस्यांचा जन्म होतो असे म्हटले आहे.

विश्लेषण - २००१ पासून शहरातील अधिकृत व अनधिकृत अशा सर्वच झोपडपट्ट्यांची जनगणना करण्यात आली. भारतात तोपर्यंत प्रत्येक शहरामध्ये, तालुक्याच्या ठिकाणी अशा झोपडपट्ट्या मोठ्या प्रमाणात तयार झालेल्या होत्या. या एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या प्राथमिक गरजांकडे, त्यांच्या राहण्याच्या सुविधेकडे शासनाला लक्ष देणे भाग पडले. या झोपडपट्टीतील मतदारांमुळे लोकप्रतिनिधी निवडण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव पडला आहे. मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई अशा महानगरांमध्ये एकच झोपडपट्टी काही किलोमीटरपर्यंत पसरलेली दिसते. यात रेल्वेच्या कडेला सरकारी जागांवर, नदी किनारी, खासगी जागांवर झोपड्या उभारण्यात आल्यात. कारण स्थलांतरित रोजगारांसाठी शहरात आलेल्या मजुरांना झोपडपट्ट्यांतूनच आश्रय मिळाला आहे, म्हणून अशा झोपडपट्ट्यांवर शासकीय कारवाई न करता त्यांची मोजदाद करणे व त्यांच्यासाठी घरे व आवश्यक प्राथमिक सोयीसुविधा पुरविणे आवश्यक आहे. धान्य उपलब्ध करून देणे, कायमस्वरूपी रोजगार देणे, किमान वेतन देणे, काम मिळत नाही तोपर्यंत शासकीय पातळीवरून त्या कुटुंबाच्या सर्व गरजा भागतील एवढी रक्कम देणे आवश्यक होते. पण त्याकडे पूर्णपणे गरीब व्यक्ती म्हणून, गरीब झोपडपट्टीतील समूह म्हणून दुर्लक्ष करण्यात आले, कारण हे मजूर सामाजिक, आर्थिक दृष्टीने मागासलेले, विविध जाती-

उपजातीत, विविध धर्मात विभागलेले असल्यामुळे त्यांची सामूहिक शक्ती निर्माण झाली नाही. भारतातील भयानक अशी जातीप्रथा ही या गरीब लोकांचे कायम शोषण करणारी व्यवस्था ठरली आहे. दलित, अनुसूचित जाती, भटक्या विमुक्त जाती, इतर मागासवर्ग, अतिमागास वर्ग या जातीतील लोकांनी रोजगारांसाठी स्वत:ची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शहरात स्थलांतर केले, पण त्याच्या वाट्याला झोपडपट्टीतील अस्वच्छता, दुर्गंधी, साथीचे आजार, बेरोजगारी, कायमचे शारीरिक कष्ट, राहण्याची जागा म्हणजे झोपडी असे जीवन वाट्याला आले. शासकीय दृष्टीने या जाती समूहांकडे दुर्लक्षित, उपेक्षित, मागासवर्गातील म्हणून बघितले गेले. जातीय श्रेष्ठ कनिष्ठतेचा आधार दिल्यामुळे स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून स्वतंत्र योजना राबविल्या गेल्या नाहीत. १९५६ चा झोपडपट्टी पुनर्वसन व सुधारणा कायदा करण्यात आला, पण राज्यांनुसार तो तेवढा सक्षमपणे राबविला नाही, यात केंद्र सरकारने झोपडपट्टी निर्मूलनासाठी भरीव निधी दिला नाही. शहरी गरिबांसाठी जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान योजना २००५ मध्ये सुरू केली. ग्रामीण भागासाठी इंदिरा आवास योजना, राजीव गांधी आवास योजना राबविण्यात आल्यात, पण शहरातील झोपडपट्ट्यांतील गरिबांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसते.

संदर्भ -

1. A. R. Desai, & S. Devdas Pillai (1970) Slums and Urbanisation edited by Popular Prakashan, Bombay.
2. R. M. Thakur, M. S. Dhadave, Slum and Social System, Archeves Pub. New Delhi - 55.
3. Henna Tabussum (2011), Slum in India, ABP Pub. Jaipur.
4. D. Sai (2022), Urban Slums and Poverty, Dph. New Delhi.
5. गो. ना. माडगावकर (२०२०), मुंबईचे वर्णन, वरदा प्रकाशन, पुणे
6. ग्रामीण नगरीय समाजशास्त्र, ओरियंट ब्लॅकस्वॉन, हैद्राबाद - २०१४ हैद्राबाद-२०१४
7. युनिक फिचर्स (सन २००१), अर्धी मुंबई, मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई - ४
8. अमर्त्य सेन - आर्थिक विकास और स्वातंत्र्य (१९९९) हिंदी अनुवाद राजपाल ॲन्ड 9. सन्स, काश्मिरी गेट, दिल्ली संस्करण २०१०.
9. नाशिक महानगर पालिका झोपडपट्टी सुधारणा विभाग, सर्वेक्षण २००८

*सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिक रोड, नाशिक, Email- v.nirbhavne@gmail.com मो.९९७५९१४७४३

***

आजरा तालुक्यातील सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांचे व्यष्टी अध्ययनएक समाजशास्त्रीय अभ्यास

*प्रा.सोनिया चव्हाण

घोषवारा

महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील सेंद्रिय शेतीकरणाऱ्या महिलांचा अभ्यास करत असताना मानवी आरोग्याला सेंद्रिय शेती ही काळाची गरज आहे हे दिसून आले.भारतात उदयासआलेली स्वयंपूर्ण खेडी ही शेतीवरच आधारित होती. त्यानंतरच्या काळात म्हणजेच एकूण १७१८ मध्ये इंग्लंड देशात औद्योगिक क्रांती घडून आली. याचा दुरगामी परिणाम जागतिक अर्थकारणावर व खेड्यांच्या जीवनशैलीवर घडून आला. भारताचा मुख्य व्यवसाय शेती असून ग्रामीण भागात 70 ते 80 टक्के लोकसंख्या ही शेतीवर उपजीविका करतात. त्यामध्ये रासायनिक शेती करण्यावर लोकांचा जास्त कल आहे.पहिल्या हरितक्रांतीनंतर उत्पादन वाढीसाठी रासायनिक खतांचा आधार घेतला गेला. त्यानंतर अधिक उत्पादन मिळावे या हव्यासापोटी रासायनिक खतांचा जास्तीत जास्त वापर, कीटकनाशकांचा तणावनाशकांचा अतिरेक वापर होऊ लागला. त्यामुळे उत्पादनात वाढ होऊ लागली.सेंद्रिय शेतीत महिला या पेरणी, लावणी, तन कापणी, मळणी, बियाणे संरक्षणाकरिता बियाणे स्वच्छ करणे अशी अनेक कामे करतात. ही सर्व कामे त्या प्रशंसनीय, संयमाने आणि बांधिलकीने करत असतात. सेंद्रिय शेतीत महिला या मुख्य भागीदार असतात. सेंद्रिय शेतीचा अवलंब केल्यामुळे पारंपरिक शेतीच्या तुलनेत कामगारांच्या गरजेत लक्षणीय वाढ झाली आहे. सेंद्रिय शेतीसाठी मनुष्यबळ जास्त लागते. जर लिंग गुणोत्तरानुसार मनुष्यत्वाचा अभ्यास केला तर लक्षात येईल की पुरुषांपेक्षा स्त्रियांची योगदान अधिक असते म्हणजे स्त्रिया या पुरुषांपेक्षा जादाचे श्रम आपल्या खांद्यावर घेतात.महिलांना अन्नसुरक्षा बरोबर कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेची काळजी वाटते. यासाठी शेतीला जोड म्हणून कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मधमाशी पालन,फलोत्पादन इत्यादी व्यवसाय करताना दिसतात.या व्यवसायात त्या उत्पन्न आणि पौष्टिक आहाराचे स्त्रोत म्हणून काम करतात. त्यामुळे त्यांचे कुटुंब आर्थिक दृष्ट्या सक्षम, मजबूत आणि आनंदी दिसते. महिलांकडे श्रम, संयम आणि सहनशीलता असते म्हणूनच त्या कृषी कार्यात गुंतलेल्या असतात.

प्रस्तावना :

गोमूत्र शेण आणि पारंपारिक बियाण्यांचा वापर करून परंपरागत पद्धतीने केली जाणारी शेती म्हणजे सेंद्रिय शेती होय. पर्यावरणीय रचना आणि जीवन चक्र समजून घेऊन शेतीमध्ये रसायनांचा वापर टाळून केलेली एकात्मक पद्धती म्हणजे सेंद्रिय शेती होय. बियाणांवर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता वापरल्यामुळे पिकांची गुणवत्ता वाढते शेती टिकवण्यासाठी सेंद्रिय पद्धतीचा वापर करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे.

१९२१ मध्ये अल्बर्ट हावर्ड आणि त्यांची पत्नी गॅब्रिएल हावर्ड या कुशल वनस्पती शास्त्रज्ञांनी भारतातील पारंपरिक शेती पद्धती सुधारण्यासाठी वनस्पतीशी संबंधित उद्योगांची स्थापना केली. त्यांनी आपल्या वैज्ञानिक प्रशिक्षणातून सुधारित उपकरणे आणि पशुपालन पद्धती यामध्ये सुधारणा केल्या. त्यानंतर स्थानिक पारंपरिक पद्धतीचे पैलू एकत्रित करून पिके फिरवण्याची यंत्र विकसित केले. यामुळेच पिकांवरील कीड रोखण्याचे तंत्र आणि वनस्पती कंपोस्ट व प्राण्यांच्या खताचा योग्य उपयोग करण्यात आला. एरेनफ्राइड फेफेर आणि वॉटर जेम्सच्या निमंत्रणावरून हावर्ड 1939 मध्ये ब्रिटन झाले. त्यावेळी केंटमधील नॉर्थबॉर्नच्या शेतात बायोडायनामिक शेतीवर एक परिषद आयोजित केली होती. या परिषदेत सेंद्रिय शेतीवरील विविध दृष्टिकोन मांडणाऱ्यांना एकत्रित येऊन मोठ्या प्रमाणात चळवळी सहकार्य करावे हेच या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यानंतर जवळपास एक वर्षानंतर नॉर्थबॉर्नने **"सेंद्रिय शेती"** हा शब्द सर्वप्रथम १९४० मध्ये लुक टू लँड या त्यांच्या पुस्तकात मांडला होता. नॉर्थबॉर्न यांनी सेंद्रिय शेतीची केलेली व्याख्या "सेंद्रिय शेती म्हणजे जैवविविधता, जैविक चक्र आणि माती जैविक क्रियाकलापांना प्रोत्साहन आणि वाढवणारी एक पर्यावरणीय उत्पादन व्यवस्थापन प्रणाली होय." १९४० मध्ये हावर्डने ॲग्रीकल्चर नावाचे टेस्टामेंट नावाचे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात त्यांनी नॉर्थबॉर्नची सेंद्रिय शेती ही संकल्पना स्वीकारली. वैज्ञानिक ज्ञान

असलेल्या विविध पारंपारिक आणि नैसर्गिक पद्धतीच्या शेतीवर व्यापक स्वरूपाचे कार्य केले होते. यावरूनच त्यांना सेंद्रिय शेतीचा जनक म्हणून ओळखले जाऊ लागले.

"सेंद्रिय शेती म्हणजे अशी एक वैविध्यपूर्ण शेती पद्धती ज्यामध्ये पीक व पशुधन यांचे व्यवस्थापन शेतीवरील व स्थानिक रित्या उपलब्ध स्त्रोतांमधून एकात्मिक पद्धतीने केले जाते".

भारतीय कृषी संशोधन परिषद ICAR Indian council agriculture research institute

"सेंद्रिय शेती म्हणजे रसायनांचा वापर टाळून केलेली एकात्मिक शेती पद्धती होय. ज्यात पशुधन पद्धतीचा अवलंब करून शेतीवरील व स्थानिक रित्या उपलब्ध स्त्रोतांचा वापर केला जातो".

आयफॉम IFOAM International Federation of Organic Agriculture Movement

सेंद्रिय शेतीची संकल्पना:

सेंद्रिय शेती ही एक उत्पादन प्रणाली आहे जी मातीचे पर्यावरणाचे आणि लोकांचे आरोग्य सांभाळते. पर्यावरणीय प्रक्रिया, जैवविविधता आणि प्रतिकूल प्रभावसह उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करण्याऐवजी स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेणारे चक्र यावर अवलंबून असते. सेंद्रिय शेती परंपरांना नाविन्य आणि विज्ञान यांना एकत्र करते सामायिक वातावरणाचा लाभ घेण्यासाठी आणि चांगल्या गुंतवणुकीला प्रोत्साहित करण्यासाठी आणि सामील असलेल्या सर्वांसाठी चांगली गुणवत्ता आहे.

संशोधन पद्धती व साधने : प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुढीलप्रमाणे संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

अभ्यासविषय : आजरा तालुक्यातील सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांचे व्यष्टी अध्ययनएक समाजशास्त्रीय अभ्यासया प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी आजरा तालुक्याचे अध्ययनक्षेत्र म्हणून निवड केली आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे:

१) आजरा तालुक्यातील सेंद्रिय शेती करणाऱ्यां महिलांची सद्यस्थिती जाणून घेणे.

२) आजरा तालुक्यातील सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांसमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

३) आजरा तालुक्यातील सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांना सेंद्रिय शेती पद्धती वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

संशोधन आराखडा: प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधनव अन्वेषणात्मक आराखडा वापरण्यात आला आहे.

संशोधनाची गृहीतके : सेंद्रिय शेतीमुळे मानवी जीवनाचे आरोग्य आणि पर्यावरणयांचा समतोल राखल्याचे दिसून आले.

नमुना निवड : प्रस्तुत अभ्यासासाठी आजरा तालुक्यातील वेगवेगळया पाच गावातील सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांची सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे निवड करण्यात आली.

तथ्य संकलन पद्धती : प्रस्तुत अभ्यासासाठी आजरा तालुक्याचे संशोधन क्षेत्र म्हणून सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे निवड करण्यात आली.अभ्यासाची उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून प्राथमिक स्वरूपाची माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत अनुसूचीच्या साह्याने वेगवेगळया गावातील ५ उत्तरदात्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.तसेच प्रस्तुत संशोधन पेपरसाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला. त्यामध्ये ग्रंथसंपदा, शोधनिबंध, सेंद्रिय कृषी अहवाल, न्यूजपेपर, अग्रोवनमासिक, इंटरनेट, वेबसाईट इ. साधनांचा वापर करण्यात आला. उत्तरदात्यांची निवड संशोधनासाठी उपलब्ध कालावधी, श्रम आणि वेळ या सर्व बाबींचा विचार करून माहिती संकलित करण्यात आली.

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांसमोरील आव्हाने

१) तंत्रशुद्ध माहितीचा अभाव

रासायनिक शेतीमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो मातीची सुपीकता दिवसेंदिवस कमी होत जाते हेच फक्त महिला शेतकऱ्यांना माहीत असते. सेंद्रिय शेतीसाठी निर्विष्ठा वापरणे, मातीची सुपीकता तपासणे, पिकांच्या वाढीशी असणारे तंत्र महिला शेतकऱ्यांना माहीत होत नाही.

२) शेतीचे अल्प क्षेत्र

अल्पभूधारक महिला शेतकऱ्यांकडे उत्पादनासाठी इतर कोणतेही साधन उपलब्ध नसल्यामुळे उत्पन्न कमी मिळते. याचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर बोजा पडतो.

३) स्थानिक बाजारपेठेत सेंद्रिय मालाला योग्य मोबदला न मिळणे

सेंद्रिय शेतीतील माल स्थानिक बाजारपेठेत विकण्यासाठी जातात. स्थानिक स्तरावर सेंद्रिय मालाला जो मोबदला मिळायला हवा तो मिळत नाहीअसे सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला उत्तरदात्यांनी सांगितले.

४) योग्य कृषी धोरणांचा अभाव

केंद्र व राज्य सरकारच्या सेंद्रिय शेती धोरणांचा विचार केला तर आत्तापर्यंत खूप कमी सेंद्रिय शेतीच्या योजना राज्यामध्ये राबविल्या गेलेल्या आहेत. अनेक योजना कागदोपत्री असल्यामुळे सर्वसामान्य महिला शेतकऱ्यांपर्यंत त्या पोहोचत नाहीत. या अभावामुळेच महिला सेंद्रिय शेती विषयी नाराज आहेत.

५) आर्थिक सहाय्याचा अभाव

सेंद्रिय शेती करण्यासाठी आवश्यक असे आर्थिक सहाय्य केंद्र व राज्य सरकारकडून मिळत नसल्याने सेंद्रिय शेतीतून परिणामकारक बदल दिसून येत नाहीत.

६) कमी उत्पादकता

सेंद्रिय शेतीचे उत्पादन येण्यासाठी तीन ते चार वर्षाचा कालावधी लागतो. या कालावधीत अपेक्षेपेक्षाही कमी उत्पादन मिळते. उत्पादित मालाला स्थानिक पातळीवर जास्तीचा दरही मिळत नाही.

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांचा सेंद्रिय शेती पाठीमागील मुख्य उद्देश

१) सेंद्रिय शेती ही पुरेशा प्रमाणात उच्च पौष्टिक दर्जा असलेले खाद्य उत्पन्न करते.

२) सेंद्रिय शेतीमुळे सूक्ष्मजीव वनस्पती व प्राणी जात यांच्या जीवन चक्राची वाढ होण्यास मदत होते.

३) सेंद्रिय शेतीमुळे जमिनीची धूप कमी होऊन जमिनीची सुपीकता वाढली जाते.

४) सेंद्रिय शेतीतून निर्माण होणाऱ्या कच्च्या मालाचा पुनर्वापर करता येतो.

५) देशी बी बियाणे, धन धान्यांच्या जाती व प्राण्यांच्या जाती यांची जोपासना व वाढ सेंद्रिय शेतीमुळे करता येते.

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला शेतकऱ्यांचे आद्यदैवत

जमीन ही अन्नपूर्णा होती कारण सेंद्रिय शेती पद्धतीने तिची सुपीकता जोपासली जाऊ लागली. सेंद्रिय शेतीचा मूळ पाया भारतीय देशी गायींनी घातला आहे. म्हणून सेंद्रिय शेती करण्यासाठी देशी गायीची आवश्यकता आहे. या देशी गाईमुळे दहा ते पंधरा एकर शेती सेंद्रिय पद्धतीने करता येते. कारण इतर कोणत्याही प्राण्यांपेक्षा देशी गायीच्या शेणात जीवाणूंची संख्या ही दुप्पट आढळते.आम्ही स्वतः देशी गाईच्या शेणाचा आणि गोमूत्राचा वापर करून आमची शेतजमीन जिवंत ठेवली आहे. यामुळे जमिनीची सुपीकता वाढली आहे. उत्पादनात प्रचंड वाढ झाली असून सकस आहार तयार करणे शक्य झाले आहे.

गोमूत्र व शेणाचा उपयोग

१) गायीचे गोमूत्र पीक संरक्षणासाठी प्रभावी कीटकनाशक आणि दुष्परिणाम विरहित जैविक रसायन म्हणून वापरतो.

२) गायीच्या शेणामध्ये मिथेल वायूचे प्रमाण सर्वाधिक असल्यामुळे हा वायू ऊर्जेचा स्त्रोत म्हणून वापरला जातो.

३) गाईच्या शेणापासून कंपोस्ट खत, गांडूळ खत, न्यॅडेप खत,गोमूत्रापासून जीवामृत, अमृतपाणी, दशपर्णी अर्क बनवतो.

४) गाईचे शेण हे समशीतोष्ण असल्यामुळे शेण व गोमुत्राचा वापर स्लरी तयार करून आम्ही चार वेळा त्या पिकास देतो.

माती परीक्षण

संशोधन अहवालानुसार प्रस्तुत पाचही उत्तरदात्या महिलांनी आपल्या शेतीतील मातीचे प्रथमत: परीक्षण करून घेतले आहे. त्यांच्या मते मातीच्या परीक्षणामुळे जमिनीची सुपीकता कायम टिकविण्यास व तिची उत्पादन क्षमता वाढविण्यास मदत होते असे त्यांनी सांगितले.

सापळा पिके

सापळा पिके शेतात लावून मित्र किडीची संख्या वाढविली जाते. मग उडीद, चवळी, सोयाबीन, मका, झेंडू, अंबाडी, सूर्यफूल इत्यादी पिकांचा अंतर्भाव केल्यामुळे शेतात मित्र किडी व पक्षांची जोपासना होते असे महिला शेतकऱ्यांनी अनुभवावरून सांगितले आहे.

तणांचे व्यवस्थापन:

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला पिकांच्या दोन ओळीत तणांचा पट्टा तयार करून तो मोठ्या प्रमाणात वाढविण्यावर भर देतात. त्यामुळे त्यांची मुळे जमिनीत खोलवर वाढतात. पाऊस पडल्यानंतर तणांची वाढ रोखण्यासाठी ती कापून टाकतात. त्यावर बैलाचे अवजार फिरवून ती भुईसुपाट करून घेतात. तणांचे जमिनीवरील भागावर आच्छादन झाल्याने जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवनाने नुकसान होत नाही. पीक संपल्यावर या तणांचे यथावकाश कुजून खत तयार होते यासाठी पावसाळयात तणाच्या पट्ट्यात पीक व पिकाच्या पट्ट्यात तणांचा पट्टा असा फेरपालट करून सर्व जमिनीला सेंद्रिय खत मुबलक प्रमाणात उपलब्ध करतात. कोरडवाहू क्षेत्रात जमिनीला भरपूर सेंद्रिय खत मिळते.

आच्छादन:

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला भुमातेला सेंद्रिय पदार्थाचे आच्छादन देतात. शेतीतील पिके ही केवळ सूक्ष्म जीवाणूंच्या अस्तित्वामुळे वाढतात. त्यामुळे शेतात उपलब्ध असणारा सर्व काडीकचरा, पालापाचोळा, पिकांचे अवशेष, धसकटे, तण, वाळलेली पाने, केळीचे फांदाडे, उसाचे पाचट, बायोमासचे अच्छादन पिकांच्या ओळीत फळझाडांच्या अळयात संपूर्णपणे अंथरतो. यामुळे जमीन मोकळी राहत नाही. पिकांचे उरलेले अवशेष व कचरा न जाळता आम्ही तो पिकांच्या ओळीत बुडाला पसरून टाकतो.

- सेंद्रिय पदार्थाची आच्छादन केले तर सूर्यकिरणांपासून जिवाणूंचे संरक्षण होते.
- आच्छादनासाठी वापरलेल्या सेंद्रिय पदार्थाची विघटन झाल्यामुळे सेंद्रिय खत म्हणून ते वापरले जाते. त्यांना मर्यादित सूर्यप्रकाश मिळाल्यामुळे प्रमाणापेक्षा जास्त उगवत नाही.
- आच्छादनामुळे जमिनीवरील पाण्याची बाष्पीभवन कमी झाल्यामुळे पाणी कमी लागते. आच्छादनामुळे सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढते.
- आच्छादनामुळे जमिनीवरील तापमान व आद्रतेचे प्रमाण सूक्ष्मजीवांना अत्यंत पोषक प्रमाणात राहते.
- सेंद्रिय पदार्थाचे आच्छादन असल्यामुळे जमिनीची हवेतील बाष्प शोषून घेण्याची क्षमता वाढते यामुळे पिकांना पाणी कमी लागते.

सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक खते

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला शेतात कंपोस्ट खत, गांडूळ खत, मेंढीचे खत, हिरवे खत, कुक्कुट खत, बायो खत, जीवामृत, अमृतपाणी, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क इत्यादी खते वापरतात.

१) शेणखत

शेण व गोमूत्र गोठ्यातील पालापाचोळा इत्यादी घटकांपासून शेणखत तयार करून ते पिकांच्या वाढीसाठी पोषक अन्नद्रव्य म्हणून वापरले जाते.

२) कंपोस्ट खत

शेतीमध्ये उपलब्ध असलेल्या टाकाऊस्वरूपाचा काडीकचरा, शेतातील गवत, कापणी नंतर उरलेले पिकांचे अवशेष, उसाची पाचट, कापसाची धसकटे, पाळीव शेण व गोमूत्र इत्यादी पदार्थ कुजवून कंपोस्ट खत तयार करून ते शेतात पसरवतो.

- कंपोस्ट खत शेतीसाठी वापरल्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता व सुपीकता वाढते.

- कंपोस्ट खताची निर्मिती आर्थिक दृष्ट्या सर्वसामान्य शेतकऱ्यांना परवडणारे आहे ही निर्मिती खर्चिक नसून टाकाऊ पदार्थाच्या पुनर्वापर करून केली जाते.
- कंपोस्ट खतामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण वाढल्यामुळे जमिनीची धूप कमी होते.
- कंपोस्ट खतामुळे जमिनीतील सेंद्रिय पदार्थाचे प्रमाण वाढते आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते. यातूनच सूक्ष्मजीवांची संख्या वाढते.

३) लेंडी खत

शेणखतापेक्षाही लेंडी खत सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक आहे. लेंडी खतांमध्ये अन्नद्रव्याची उत्पादकता जास्त प्रमाणात आढळून येते. म्हणून शेतात उन्हाळयात शेतात शेळया बसवल्या जातात. त्यानंतर त्या लेंड्यांवर ट्रॅक्टर फिरवून त्याचा चुरा करून लेंडी खत शेतात पसरवले जाते.

४) हिरवळीचे खत

हिरवळीचे खत तयार करण्यासाठी ताग, मूग, चवळी, मका अशी अंतर्गत पिके घेऊन त्या पिकांच्या झाडांचा पाला कोवळयाव फांद्या शेतात नांगरून मातीत एकजीव करून घेतो. यामुळे जमिनीतील कर्बाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढते. मातीत पाणी व अन्नद्रव्ये धरून ठेवण्याची क्षमता तसेच सूक्ष्म जिवाणूंची निर्मिती होते. हिरवळीच्या खतांच्या आच्छादनामुळे जमिनीची धूप पूर्णत: थांबते.

५) गांडूळ खत

मातीचे शेतातील काडीकचरा यांचे मिश्रण गांडूळ खताचा वापर करून त्यात टाकले जाते व त्यात गांडूळ कल्चर सोडले जाते. त्यावर सतत पाणी मारले जाते. गांडुळांची प्रजनन शक्ती अधिक असल्यामुळे त्यांची संख्या अधिक वेगाने वाढते. तयार केलेले मिश्रण गांडूळ खातात आणि विष्टेद्वारे परत बाहेर टाकतात. ही विष्टा जमिनीसाठी खूपच पोषक असते. गांडूळ मुळे जमिनीत सेंद्रिय पदार्थाचे विघटन व वितरण होऊन जिवाणूंची कार्यक्षमता वाढते. जमिनीची जलधारणा वाढवून पाण्याचा निचरा चांगला होतो. गांडूळांच्या बिळांमुळे झाडांच्या मुळया खोलवर वाढतात. पाणी लवकर मुरते व जमीनीत हवा खेळती राहते.

६) जीवामृत

२०० लिटरच्या बॅरेल मध्ये १७० लिटर पाण्यात दहा किलो शेण, १० लिटर गोमूत्र, २ किलो सेंद्रिय गूळ, चण्याच्या डाळीचे पीठ आणि बांधावरील माती हे सर्व साहित्य एकत्रित करून७ दिवस दिवसातून दोन ते तीन वेळा ढवळून घेऊन जमिनीत ओलावा असताना पिकांच्या ओळीत जमिनीवर शिंपडतो. हे जीवामृत मगाच्या सहाय्याने धार करून पाण्यासोबत सरीतून देतात. त्यामुळे त्यांच्या शेतातील सूक्ष्म जीवाणूंची संख्या खूपच वाढली असूनपिकांच्याउत्पादनातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

७) दशपर्णी अर्क

२०० लिटर पाण्यात २ किलो सीताफळ पाला, ५ किलो कडूलिंब पाला, २ किलो पपई पाला, दोन किलो निरगुडी पाला, २ किलो रुचकीन पाला, २ किलो घाणेरी पाला, २ किलो करंज पाला, २ किलो गुळवेल पाला, २ किलो कनीर पाला, २ किलो एरंड पाला, २ किलो देशी गाईचे शेण, ५ लिटर गोमूत्र हे सर्व मिश्रण सावलीत ३० दिवस दररोज दोन ते तीन वेळा ढवळून पूर्णत: आंबवल्यावर गाळून घेऊन अडीच लिटर द्रावण २०० मीटर पाण्यात मिसळून प्रति एकर क्षेत्रावर फवारणी करतात.

८) अमृतपाणी

प्लास्टिकच्या बॅरल मध्ये २०० लिटर पाण्यात १० किलो ताजे शेण, १० लिटर जुने साठवलेले गोमूत्र, एक किलो सेंद्रिय गूळ, एक किलो चण्याचे डाळीचे पीठ, एक किलो ताजे चांगले लागलेले दही यांचे मिश्रण दररोज २० मिनिटे ढवळून सात दिवस आंबवत ठेवतो. नंतर हे मिश्रण जमिनीत ओलावा असताना कडुलिंबाच्या डहाळयाने पिकांवर ओळीने शिंपडतो. त्यामुळे जमीन भुसभुशीत होऊन जिवाणूंच्या संख्येत वाढ होते. पिकांची रोगप्रतिकारक क्षमता ही वाढते.

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांची शेतीविषयक माहिती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी निवडलेल्या पाच महिला उत्तरदात्यांमध्ये एक महिला वडिलोपार्जित, तीन महिला १० ते १२ वर्षे आणि एक महिला ५ वर्षापासून १००% सेंद्रिय शेती करताना आढळल्या. या सर्व महिला ठिबक सिंचनाचा वापर करून शेत जमीन करतात. त्या शेतात मुख्यत: भुईमूग, भात, नाचणा ही मुख्य पिके घेतात.याबरोबर भाजीपाला यामध्ये मिरची, दोडका, कारले, बिनीस, श्रावण, घेवडा, कोथंबीर, मेथी, टोमॅटो, भेंडी, गवार इत्यादी भाजीपाला घेतात. ३ महिला भाजीपाला स्वतःपुरत्या घेतात. उर्वरित दोन महिला स्वतःसाठी वापरून उरलेला भाजीपाला गावात फिरून विकतात. तसेच फळबागांमध्येआंबा, फणस, केळी, चिकू, शेवगा, नारळ, काजू इत्यादी फळबागा आहेत. कडधान्यांमध्ये चवळी, मूग, मका, ज्वारी, ताग, सोयाबीन इत्यादी कडधान्य घेतात. याबरोबरचएक महिला बांबूची लागवड शेती करतानाही आढळली. ३ महिला नदीचे आणि २ महिला बोरवेलचे पाणी शेतीसाठी वापरतात. पाचही महिलांकडे सेंद्रिय शेतीचे प्रमाणपत्र आहे. एक महिला वडिलोपार्जित शेती आणि उर्वरित ४ महिला कनेरी मठावरील व्याख्यान ऐकुण सेंद्रिय शेतीकडे वळलेल्या आहेत.

पाचही सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला उत्तरदात्यांच्या मते:

१) सेंद्रिय शेतीमुळे मातीचा ऱ्हास कमी झाला आहे.

२) सेंद्रिय शेतीमुळे पर्यावरणाचे प्रदूषण कमी झाले आहे.

३) सेंद्रिय शेतीत कमी उत्पादन येते पण खात्रीशीर येते.

४) सेंद्रिय शेतीसाठी लागणाऱ्या लागवडीचा खर्च कमी असून सेंद्रिय खते कमी खर्चात करता येतात.

५) या शेतीमुळे मानवी आरोग्याची चिंता करावी लागत नाही.

६)सेंद्रिय शेतीच्या खत निर्मितीसाठी व बैल नांगराणी शेतीची मशागत करण्यासाठी मनुष्यबळाचा अवलंब करावा लागतो. यामुळे रोजगारात वाढ झाली आहे.

७) सेंद्रिय शेतीमुळे अन्नाची गुणवत्ता वाढते आणि अन्नाची चव सुद्धा सुधारते.

८) वेगवेगळ्या सुधारित उत्पादनामध्ये वाढ होत जाते.

९) सेंद्रिय शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनाला जास्त किंमत मिळते. यातून कौटुंबिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांची शेतीची प्रक्रिया

सेंद्रिय शेती करण्यासाठी मानसिकता, पूर्वमशागत, पिकांचा प्रकार, बी बियाणे, लागवड, खते, रोपातील अंतर, अच्छादन, पाणी व्यवस्थापन, अंतर्गत मशागत, जीवाणू, पिकांची दिशा ठरवून आम्ही सेंद्रिय शेती करून उत्पादन घेतो असे सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांनी सांगितले.पाचही सेंद्रिय शेती महिला उत्तरदात्या पिकांवरील कीटक आणि रोग व्यवस्थापनासाठी कडुलिंबाच्या तेलाची, गोमूत्र व औषध वनस्पतीच्या तेलाची फवारणी करतात. आंबवलेले लोणी, दूध व ताक यांची फवारणी करतात. फेरोमोन सापळे व प्रकाश सापळे वापरून किडीचे नियंत्रण करतात. याबरोबर सापळा पिकांचा वापर करतात. पण व्यवस्थापनासाठी उसाचे पाचट, तागव मूग यांचे मल्चिंग करतात. अंतर लागवडीसाठी भाताची लागण करून त्यात ताग पेरून कुजवून घेतात. पूर्ण शेतीची मशागत बैलाच्या साह्याने करतात. पाचही महिला उत्तरदात्यांपैकी एका महिलेच्या पतीचे सेंद्रिय खताचे दुकान घातले आहे. एका महिलेचा पती घरी सेंद्रिय खते तयार करून विक्री करतो. एका महिलेच्या पतीने पोल्ट्री फार्म सुरू केले आहे. त्यातूनते कोंबडी खत तयार करून विक्री करतो. पाचही महिला दरवर्षी उन्हाळ्यात शेतात मेंढी बसून घेतात त्यातून मेंढी खत शेताला दिले जाते.

उपाययोजना:

१) जैवविविधता जोपासून जमिनीचे आरोग्य सुधारणे आणि विविध माध्यमातून होणारे जमीन, पाणी व हवा यांचे होणारे प्रदूषण नियंत्रित करणे.

२) सकस रसायनमुक्त आणि मूल्यवर्धित सेंद्रिय शेती उत्पादन उपलब्ध करणे.

३) ग्रामीण स्तरावर सुशिक्षित नवयुवकांना सेंद्रिय शेती उद्योगातून स्वयंरोजगार संधी उपलब्ध करणे.

४) भारतीय जनतेला सुरक्षितव विषमुक्त अन्न मिळवण्याच्या दृष्टीने नियमन करणे.

५) सेंद्रिय शेती हा परवडणारा व्यवसाय म्हणून विकसित करण्यासाठी आर्थिक मदत करणे.

६) सेंद्रिय शेती उत्पादनांना देशांतर्गत बाजारपेठ विकसित करणे.

७) सेंद्रिय शेतीमधून तयार होणारे पीक अवशेष आणि टिकाऊ वनस्पतीजन्य पदार्थाचा पुनर्वापर करण्यासाठी यंत्र, अवजारे, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ विकास यांचेसाठी प्रोत्साहन देणे.

८) सेंद्रिय उत्पादन प्रक्रिया उद्योगास चालना देणे.

९) स्वयंपोषी, स्वावलंबी, कमी खर्चाची शाश्वत शेती विकसित करणे.

१०) सेंद्रिय शेतीचे पीकनिहाय तंत्रज्ञान विकसित करणे.

११) राज्यांमध्ये सर्वदूर "स्वावलंबी सेंद्रिय शेती ग्राम प्रकल्प राबविणे".

निष्कर्ष:

- महिलाशेतीची पूर्वतयारीमध्ये पिकांची देठ आणि हट्टी काढून त्यात मल्चिंग करून शेतातील मातीत मिसळून घेतात.
- महिला सेंद्रिय बियाणे निवड, स्वच्छता व संरक्षण करतात.
- महिला बीजामृत, अमृतपाणी,जीवामृत, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क, गांडूळ खत, कंपोस्ट खत, हिरवळीचे खत तयार करण्याचे काम करतात.
- महिला पेरणी, नर्सरी वाढविणे, भात लावणे, तण काढणे, मल्चिंग करण्याचे काम करतात.
- पिकांवर जीवामृत, अमृतपाणी, कडुलिंबाच्या तेलाची फवारणी करण्याची कामही महिला करतात.
- पिकांना आच्छादन करण्याचे काम महिला करतात.
- पिकांची कापणी, मळणी, धान्य स्वच्छ करणे व धान्य साठवण्याचे काम महिला करतात.
- पाच ही महिला १००% सेंद्रिय शेती करत असल्याचे दिसून आले.

सारांश:

सेंद्रिय शेती ही एक उत्पादन प्रणाली आहे जी मातीचे पर्यावरणाचे आणि लोकांचे आरोग्य सांभाळते. पर्यावरणीय प्रक्रिया, जैवविविधता आणि प्रतिकूल प्रभावसह उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करण्याऐवजी स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेणारे चक्र यावर अवलंबून असते. सेंद्रिय शेती करण्यासाठी मानसिकता, पूर्वमशागत, पिकांचा प्रकार, बी बियाणे, लागवड, खते, रोपातील अंतर, अच्छादन, पाणी व्यवस्थापन, अंतर्गत मशागत, जीवाणू, पिकांची दिशा ठरवून आम्ही सेंद्रिय शेती करून उत्पादन घेतो असे सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांनी सांगितले. सेंद्रिय शेती करणाऱ्या महिला भुमातेला सेंद्रिय पदार्थाचे आच्छादन देतात शेतीतील पिके ही केवळ सूक्ष्म जीवाणूंच्या अस्तित्वामुळे वाढतात. सेंद्रिय शेतीत महिला या मुख्य भागीदार असतात. सेंद्रिय शेतीचा अवलंब केल्यामुळे पारंपरिक शेतीच्या तुलनेत कामगारांच्या गरजेत लक्षणीय वाढ झाली आहे. सेंद्रिय शेतीसाठी मनुष्यबळ जास्त लागते.

संदर्भ:

१) जगन्नाथ शिंदे, (२०१९) कमी खर्चाची सेंद्रिय शेती, गोदावरी पब्लिकेशन नाशिक.

२) जगन्नाथ शिंदे,(२०१९)सेंद्रिय शेती गांडूळ शेती शाश्वत शेती, गोदावरी पब्लिकेशन नाशिक.

३) प्रशांत नाईकवाडी,(२०१८)तांत्रिक दृष्टिकोनातून सेंद्रिय शेती, सकाळ प्रकाशन, पुणे.

४) S. C. Panda,(2011)Organic farming for Sustainable agricultural, Kalyani Publication.

५) https://en.wikipedia.org/wiki/Organic_farming

***सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त)**

घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.

मो. नं. ९५५२७९३३६४ मेल आयडी: soniyachavan527@gmail.com

***

बदलते पर्यावरण आणि शेतीच्या समस्या

*ज्योती प्रकाश गावंडे

प्रस्तावना :

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारताने आज आर्थिक विकासाचा मोठा टप्पा गाठला असला तरी आजही 70 टक्के लोक हे प्रामुख्याने शेती व्यवसाय करतात. मानवाच्या मूलभूत गरजांपैकी अन्न, वस्त्र, निवारा या प्रमुख गरजा शेतीवर अवलंबून आहेत व त्यामुळे शेती ही मानवाच्या जगण्याचे साधन आहे असे म्हटले जाते. शेतीवरच अवलंबून इतर व्यवसाय व उद्योगधंदे आहेत. एकूणच आर्थिक विकासाचा पाया हा शेती असेल तर त्यात निर्माण होणाऱ्या समस्या सोडवणे हे प्रमुख लक्ष असले पाहिजे, परंतु दुर्दैवाने असे होत नाही. कारण शेती समस्या ही फक्त शेतकऱ्यांचीच संबंधित असते असा सर्वसामान्यपणे समज आहे. त्यामुळे शेतकरी व शेती समस्या यात इतर जनतेची काहीच जबाबदारी व कर्तव्य नाही असे दिसून येते. भारतातील विविध राज्यातील शेतीच्या समस्या या जरी काही प्रमाणात भिन्न भिन्न असल्या तरी त्याला कारण तिथला भौगोलिक प्रदेश, हवामान, जमिनीचा पोत व शेतीचा प्रकार हे प्रामुख्याने दिसते. काही ठिकाणी सुपिक जमीन, तर काही ठिकाणी मध्यम व कोरडवाहू प्रकारची शेतजमीन आढळते त्यामुळे वेगवेगळ्या भागात त्याप्रमाणे पिके घेण्यात येतात. शेतकऱ्यांच्या समस्येला बदलते पर्यावरण हाही एक घटक मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे प्रदूषण वाढले व निसर्गातील असमतोलामुळे कधी अवकाळी पाऊस, अति पर्जन्यमान तर कधी दुष्काळ अशी स्थिती निर्माण होते. यामुळे पिकांचे नुकसान होऊन त्याचा परिणाम आर्थिक स्थितीवर व एकूणच विकासावर होतो. शेतीच्या समस्या व पर्यावरणातील बदल यामुळे शेतकऱ्यांना निर्माण होणाऱ्या समस्या या अलिकडील काळात वाढत आहेत. त्याचाच अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केला आहे.

उद्दिष्टे :

1. शेतीच्या प्रमुख समस्यांचा अभ्यास करणे.
2. पर्यावरणातील बदलाच्या कारणांचा आढावा घेणे.

गृहीतक :

1. सद्यस्थितीत शेतीच्या संबंधित अनेक समस्या दिसून येतात.
2. पर्यावरणातील बदलामुळे शेतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होताना दिसतो.

संशोधन पद्धती :

या शोधनिबंधामध्ये दुय्यम स्त्रोतांच्या आधारे माहिती घेतली जाणार आहे. ज्यामध्ये विविध संदर्भ साहित्य, शासकीय रिपोर्ट, मासिके, प्रकाशित, अप्रकाशित प्रबंध, विविध संकेत स्थळांवरील उपयोगी माहिती, वृत्तपत्र, शोधनिबंध याचा वापर करण्यात येईल.

महत्व :

शेतीच्या व पर्यावरणाच्या वाढत्या समस्या बघता या विषयाचे महत्व अधिक असल्याने संशोधनासाठीच्या लेखाचा भाग म्हणून हा विषय निवडण्यात आला आहे. जेणेकरून या विषयाबद्दल अधिक जागरूकता निर्माण होईल व समाजात त्याबद्दल जाणीव जागृती ही याद्वारे करता येईल.

शेतीच्या प्रमुख समस्या :

भारतीय शेतकऱ्यांच्या समस्या या आजच्या परिस्थितीत अत्यंत वाईट अवस्थेत आहे. शेती व शेतकरी यांचे नैसर्गिक व मानवी या दोन्ही पद्धतीने पतन होताना दिसत आहे. नैसर्गिक आपत्ती, कोरडवाहू शेती किंवा ओला दुष्काळ, कमी उत्पन्न, कर्जबाजारीपणा, मालाला योग्य हवी भाव न मिळणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कृषी तंत्रज्ञान वापरण्याचे अज्ञान, अल्पभूधारक शेतीमुळे गरीबीचे प्रमाण अधिक, विभक्त कुटुंबातून झालेले जमिनीचे विभक्तीकरण या व इतर अनेक कारणांमुळे शेतकरी हा आज अडचणीत आहे.

महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. 1995 पासून क्राईम ब्यूरोने शेतकऱ्यांच्या आत्महत्येची राज्यागणिक आकडेवारी प्रसिद्ध करायला सुरूवात केली तेव्हापासून ते आजपर्यंत ही आकडेवारी वाढतच आहे. 2014-15, आणि 2015-16 च्या दोन वर्षाच्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे हेक्टरी उत्पन्न हे मोठ्या प्रमाणात कमी झाले. पर्यावरणाच्या बदलामुळे व औद्योगिकरणाच्या परिणामुळेही शेतीवर विपरीत परिणाम होतो आहे. अन्नधान्याची गुणवत्ता कमी होऊन जमिनीचा पोतही बिघडत आहे. पर्यावरणातील बदलांमुळे ओला दुष्काळ, दुष्काळ आणि अवकाळी पाऊस या समस्या निर्माण झाल्या आहेत तर औद्योगिकरण व तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीवर परिणाम होतो. तसेच रासायनिक खते, बि-बियाणे, कीटकनाशके, खते यामुळे अन्नधान्यातील नैसर्गिक घटक कमी होऊन त्यातील पोषक तत्व कमी होत आहे. त्याचा परिणाम हा मानवाच्या आरोग्यावर होत आहे. एकूणच एका घटकातील बदल हा संपूर्ण समाजावर होतो असे यावरून दिसते.

शेती समोरील आव्हाने :

भारतीय शेतीसमोरील आव्हाने पुढील प्रमाणे सांगता येतील. शेतजमिनीचे वाढते विभाजन व तुकडीकरण ही फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. भारतातील शेतीची उत्पादकता घटत जाऊन अत्याधिक जलउपस्यामुळे कोरड्या जमिनीचे प्रमाण वाढत आहे. मर्यादित विजेचा वापर, विजटंचाई, निसर्गाचा लहरीपणा, उत्पन्नातील बाजारपेठेत दलालांचा वाढता हस्तक्षेप, विपनणाच्या क्षेत्रात मध्यस्थांची भूमिका, नदीचे पाणी व पुराचे पाणी याचे अयोग्य व्यवस्थापन, तसेच शासनाचे शेती विषयक उदासीनतेचे धोरण यामुळे शेतकरी हा आज अत्यंत गरीब, दारिद्र्य अवस्थेत जीवन जगत असताना दिसतो. ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने शेतीचे उत्पादन केले जाते. कारण तंत्राद्वारे शेतीचे ज्ञान व पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे शेती क्षेत्रात विकासाच्या अडचणी आहेत. कर्जबाजारीपणा हे सर्वात महत्वाचे व शेतकऱ्यांच्या आत्महत्येला मोठ्या प्रमाणात जबाबदार असणारे कारण आहे. या आव्हानांपुढे शेतीला विकसित होण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.

पर्यावरणीय बदलाचा शेतीवरील परिणाम :

पर्यावरणातील बदलांमुळे शेतीवर सर्वात मोठा परिणाम होतो. पर्जन्यमानाचे असंतुलन, हवामानातील बदल, जमिनीची सुपिकता यावर प्रामुख्याने बदल होताना दिसतो. वाढत्या लोकसंख्येमुळे नागरीकरणाचे, शहरांचे प्रमाण वाढले, औद्योगिक क्रांतीने उद्योगदंधे, व्यवसाय व मोठमोठे कारखान्यांची निर्मिती झाली. जागतिकीकरणाच्या धोरणामुळे जग जवळ आले व मानवनिर्मित गोष्टी मशीन निर्मित घटकात रूपांतरीत झाल्या. त्यामुळे मानवाचे काम मशीन करू लागली व पर्यायाने या मशीन व कारखान्यांसाठी शहराबाहेरील शेती, जंगले हस्तगत करून जमिनी मिळवल्या गेल्या. दळणवळणासाठी रस्त्यांची निर्मिती झाली, गाड्यांचे प्रमाण वाढले व मोठ्या प्रमाणात प्रदूषणही वाढले. कळत-नकळत या सर्वांचा परिणाम पर्यावरण व शेतीवर झाला. कारखान्यातील रासायनिक धूर व पाणी हे हवेत व नदी-नाल्यांमध्ये सोडण्यात आले. त्यामुळे हवामानातील प्रदूषण वाढले, ओझोनचा थर कमी हे परिणाम झाले. तसेच पाण्यात कारखान्यातील प्रदूषित पाणी, कचरा सोडण्यात आल्याने नदीचे पाणीही दूषित झाले. निसर्गातील जंगलाची, झाडांची मोठ्या प्रमाणात कटाई होऊन जमिनवरील हरीत पट्टा हा कारखान्यांनी काबीज केला. वाढत्या लोकसंख्येमुळेही छोट्या शहरांचे मोठ्या नगरात रूपांतर झाले व शहरे ही आजूबाजूला वाढू लागली. अंतर वाढल्याने दळणवळणाची साधने वाढली, डिझेल, पेट्रोल, गॅस व आता इलेक्ट्रीकवर चालणाऱ्या अनेकविध गाड्यांचे प्रमाण माणसागणिक झाले. त्याचा परिणाम शहरातील प्रदूषणात वाढ यामध्ये झाला. एकूणच या संपूर्ण साखळीचा मुख्य भाग हा औद्योगिकरण हा आहे. या सर्व घटकांचा मोठा परिणाम पर्यावरण व शेती व्यवसायावर झालेला स्पष्टपणे दिसून येतो. ओझोनचा थर कमी झाल्याने उष्णता वाढली. पर्यावरणातील वाढता मानवी हस्तक्षेप यामुळे निसर्गाची अतोनात हानी झाल्याने मानवाचे आरोग्य धोक्यात आले व विविध आजारांचे प्रमाण वाढले. या सर्व समस्या सोडवण्यासाठी नैसर्गिक शेती व पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक असून प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजना करणे महत्वाचे आहे. 'झाडे लावा झाडे जगवा' या ब्रीद वाक्याप्रमाणे शहरात व ग्रामीण भागात सर्वत्र झाडांचे संवर्धन करणे व शाश्वत विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी पाण्याचे योग्य व्यवस्थापन करून नदीजोड प्रकल्पाद्वारे दुष्काळी भागातही पाण्याच्या सोई निर्माण करणे हिताचे ठरेल. जेणेकरून सर्वच क्षेत्रातील शेतकरी शेतीच्या समस्येपासून दूर होऊन योग्य प्रकारे शेती करतील त्यामुळे उत्पादन वाढून विकास होण्यास मदत होईल.

शेती व पर्यावरणातील समस्यांना सोडवण्याच्या उपाययोजना :

1. शेतीसमस्या सोडवण्यासाठी प्रथमत: कर्जबाजारीपणातून शेतकऱ्यांची मुक्तता करून सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी करावी.
2. कमी व्याजदराने कर्ज देऊन उत्पन्नानुसार त्याची वसूली करण्यात यावी.
3. तांत्रिक शेतीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण शेतकऱ्यांना विविध शिबीरांमधून देण्यात यावे व त्यासोबतच लागणारी तंत्रे ही कमी दरात उपलब्ध करून द्यावीत.
4. नैसर्गिक खतांना प्राधान्य देऊन नैसर्गिक पद्धीनेच शेती करण्याचे प्रशिक्षण देऊन कीटकनाशके व खते कमीत कमी वापरण्यात यावीत याकडे शासनाने योजना अखाव्यात.

5. शेतमालाला थेट बाजारपेठ उपलब्ध करून देऊन मालाला योग्य हमीभाव देण्यात यावा.
6. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी जलसिंचनाच्या सोई निर्माण कराव्यात जसे शेततळे, विहिरी, तलाव इ.
7. निसर्गाच्या, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात शेताच्या आजूबाजूने विविध मोठ मोठी झाडे लावावीत व उद्योगधंद्याचे कारखान्यातील रसायनयुक्त पाणी नदीत सोडण्यास प्रतिबंध करावा.
8. हेक्टरी उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने शेतीच्या विविध प्रकारानुसार, प्रादेशिकतेनुसार पिकांची लागवड करावी जेणेकरून मिळणारे उत्पन्न हे अधिक असेल.

निष्कर्ष :

पर्यावरणातील बदल आणि शेतीच्या समस्या या परस्पर संबंधित असून सद्यस्थितीत शेतीची उत्पादकता वाढवून निसर्गाचा समतोल साधने हे महत्वाचे आहे. शाश्वत विकास करताना पर्यावरणाचा विचार करूनच काही ध्येय निश्चित करण्यात आली आहेत. त्याचबरोबर शासनानेही पंचवार्षिक योजनामध्ये शेतीसाठी विविध ध्येय-धोरणे ठरवली असली तरी वास्तवत: शेतकऱ्यांना याचा फायदा पूर्णत: मिळत नाही म्हणून शेतीच्या समस्या व शेतकरी आत्महत्या याचे प्रमाण वाढत आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी मुक्त बाजारपेठ व उत्पादित मालाला योग्य हमीभाव मिळवून देणे हे महत्वाचे आहे. तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या योजना प्रत्यक्षात राबवून त्यांना त्याबद्दल प्रशिक्षण देऊन योग्य पद्धतीने शेती करण्याचे तंत्र अवगत करावे. बि-बियाणांची उपलब्धता वाढवन त्याचे दर हे अत्यल्प असावे जणेकरून शेतकऱ्यांना ते सहज घेता येईल. या सर्व प्रयत्नातून शेतकरी हा समृद्ध होईल व पर्यावरणाचेही संरक्षण होईल.

संदर्भ सूची :

1. सोधी जे. एस., 'प्रॉब्लेम्स ऑफ मार्जिनल, ॲण्ड लँडलेस ॲग्रिकल्चरल लेबर्स', ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स रिसर्च सेंटर, दिल्ली युनिवर्सिटी, 1970
2. भांडारकर पु. ल., 'संशोधन पद्धतीशास्त्र', पॉप्युलर प्रकाशन, नागपूर, 1996
3. कविमंडन विजय, 'कृषी अर्थशास्त्र', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2006
4. दातीर आर. के., 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या शोध आणि उपाययोजना, 2007
5. Gulati. A., 'Indian Agriculture in a Globlizingworld', American Journal of Agricultureal Economics. vol 84, No. 3
6. जाधव सुधाकर, 'शेतीची दशा आणि दिशा', मुक्तरंग प्रकाशन, 2017
7. महात्मा जोतिबा फुले, 'शेतकऱ्यांचा आसूड', साकेत प्रकाशन 2020 (मु. आ. 1873)
8. गायकवाड मुकुंद, 'शेतकऱ्यांच्या समस्या व उपाय', उत्कर्ष प्रकाशन, सोलापूर, 2011

*पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

***

जनमत तयार करण्यात ऑनलाइन न्यूज पोर्टलची भूमिका : सामाजिक पर्यावरणाचे समाजशास्त्रीय अध्ययन

*पूजा यादव

प्रस्तावना

ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या उदयाने लोक बातम्या आणि माहिती कसे वाचतात व ग्रहण करतात या पद्धतीत क्रांती घडवून आणली आहे. बातम्यांचा प्राथमिक स्रोत म्हणून अधिकाधिक लोक इंटरनेटकडे वळत असल्याने, जनमत तयार करण्यात ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या असणाऱ्या भूमिकेबद्दल प्रश्नही निर्माण झाले आहेत. या शोधनिबंधाचा उद्देश ऑनलाइन न्यूज पोर्टलचा जनमतावर होणारा परिणाम शोधणे आणि यासंबंधांवर प्रभाव टाकणारा घटकांना जाणून घेणे हा आहे. सदर शोधनिबंध उपलब्ध साहित्याचे व्यापक पुनरावलोकन करतो आणि माहिती गोळा करण्यासाठी व तिचे विश्लेषण करण्यासाठी द्वितीय पद्धतिचा संशोधन आराखडाचं वापर करण्याचा प्रयत्न करतो. शोधनिबंधाचे परिणाम दर्शवितात की ऑनलाइन न्यूज पोर्टलचा जनमतावर, विशेषत: तरुण आणि अधिक सुशिक्षित श्रोत्यावर लक्षणीय प्रभाव पडतो. शिवाय, अभ्यासात असे दिसून आले आहे की बातम्यांच्या स्रोताची विश्वासार्हता, न्यूज़ पोर्टलचा राजकीय कल आणि बातम्यांची अल्गोरिदमिक निवड हे सर्व घटक ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या जनमतावर होणाऱ्या परिणामावर प्रभाव टाकतात. या निष्कर्षांच्या परिणामांवर या शोधनिबंधात चर्चा करण्यात आली आहे आणि ऑनलाइन न्यूज पोर्टल्सची पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यात सुधारणा होण्यासाठी शिफारसीही करण्यात आल्या आहेत. हा शोधनिबंध ऑनलाइन न्यूज पोर्टल आणि लोकमत यांच्यातील गुंतागुंतीच्या संबंधांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास हातभार लावतो आणि या क्षेत्रात पुढील संशोधनाची गरज अधोरेखित करतो.

ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या उदयाचा माध्यम उद्योगावर लक्षणीय परिणाम झाला आहे, ज्यामुळे बातम्यांची निर्मिती, वितरण आणि वापर करण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. जनमत तयार करण्यात ऑनलाइन न्यूज पोर्टल्सची भूमिका तपासणे आणि यासंबंधांवर प्रभाव टाकणारे घटक ओळखणे हे या पेपरचे उद्दिष्ट आहे.

उद्दिष्टे:

१) लोकांच्या मतावर ऑनलाइन न्यूज पोर्टल्सच्या प्रभावाची तपासणी करणे आहेत, ज्यात न्यूज़ पोर्टल्समुळे सार्वजनिक दृष्टिकोन आणि विश्वास याना दिल्या जाणाऱ्या आकारच्या व्याप्तीचाही समावेश आहे.

२) बातम्यांच्या स्रोतांची विश्वासार्हता, ऑनलाइन पोर्टल्सचा राजकीय कल आणि बातम्यांची अल्गोरिदमिक निवड यासारख्या जनमतांवर ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या परिणामावर प्रभाव टाकणारे घटक ओळखणे हे या शोधनिबंधाचे लक्ष्य आहे.

३) यासोबतच, ऑनलाइन न्यूज पोर्टलसद्वारे त्यांच्या श्रोत्यांना अचूक आणि नि:पक्षपाती माहिती खात्रीपूर्वकपणे मिळावी यासाठी न्यूज़ पोर्टल्सची पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यात सुधारणा सुचविणाऱ्या शिफारसी विकसित करण्याचे उद्दिष्टही या शोधनिबंधात अनुस्यूत आहे.

संशोधन पद्धती :

या शोधनिबंधासाठीचा डेटा दुय्यम स्रोतांद्वारे गोळा करण्यात आला आहे. यात विविध माध्यमामध्ये प्रकाशित लेख, पुस्तके, अहवाल आणि जनमते तयार करण्यात ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या भूमिकेशी संबंधित इतर सामग्रीचा वापर केलेला आहे .

साहित्याचे पुनरावलोकन :

सदर शोधनिबंधामधे साहित्याचे पुनरावलोकन करण्यासाठी विविध शोधनिबंधांचा आणि बातम्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे एकूण चारचा आढावा घेण्यात आलेला आहे

पहिल्या लेख कोविड–१९ महामारीच्या काळात जनमत तयार करण्यात माध्यमांची भूमिका आणि त्याचा न्यायव्यवस्थेवर पडणारा प्रभाव याविषयी चर्चा करण्यात आली आहे. हे लोकांच्या न्यायव्यवस्थेवरील विश्वासावर माध्यमांचा होणारा परिणाम आणि भारतीय न्यायव्यवस्थेपुढील आव्हाने यावर हा लेख प्रकाश टाकतो. अचूक वृत्तांकनाला चालना देण्यासाठी जबाबदार वृत्तांकन आणि नि:पक्षपाती माध्यमांची गरज यावर लेखकाने भर दिला आहे. दुसऱ्या एका लेखात नैसर्गिक आपत्ती, राजकीय अस्थिरता आणि साथीच्या रोगांसारख्या संकटाच्यावेळी जनमत तयार करण्यात स्वतंत्र मीडिया पोर्टल्सच्या भूमिकेचा अभ्यासाविषयी विश्लेषण करण्यात आले आहे. सदर अभ्यासात असे आढळून आले आहे की स्वतंत्र मीडिया पोर्टल्स अचूक आणि विश्वासार्ह माहिती प्रदान करून, भिन्न दृष्टिकोन मांडून आणि सार्वजनिक चर्चेसाठीचे एक व्यासपीठ म्हणून काम करून जनमत तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. सार्वजनिक चर्चेची द्वारे खुली करण्यासाठी विश्वासार्ह आणि स्वतंत्र पत्रकारितेचे महत्त्व या अभ्यासात अधोरेखित करण्यात आले आहे. यापुढील लेख हा लीगल सर्व्हिस इंडिया या संकेतस्थळावर प्रकाशित झालं असून, जनमत तयार करण्यात माध्यमांच्या भूमिकेचा साहित्यिक आढावा घेतो.

बातम्यांचे वृत्तांकन, संपादकीय आणि जाहिरातींसह विविध मार्गांनी माध्यमे जनमत कशी तयार करतात याची चर्चा यात केल्याचे दिसते. माध्यमांनी जनमतास आकार देण्याचा नैतिक जबाबदाऱ्याची ही चर्चा सदर लेख करतो आणि अचूक व निपक्षपाती वृतांकन करणे माध्यमांचे कर्तव्य असल्याचा युक्तिवाद करतो.

अखेरच्या अर्धात चौथा लेख जनमत घडविण्यात समजमाध्यमांची भूमिका व परिणाम याविषयी रोचक दृष्टीकोन प्रदान करतो. जे आपला आवाज उठवू शकतात व निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकू शकतात अश्या समविचारी लोकांच्या नव्या 'नेटवर्क'चा उभारणीत हातभार लावू शकणारी समाज माध्यमाची क्षमताही हा लेख अधोरेखित करतो. तथापि, लेखात हेदेखील मान्य केले आहे की समाजमाध्यमाचा वापर चुकीची माहिती पसरवण्यासाठी, जनमतामध्ये फेरफार करण्यासाठी तसेच निवडक स्वरूपाचीच झापडबंद माहिती व्यवस्था (ऐको चेंबर्स) तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो.

मर्यादा आणि भविष्यातील संशोधन :

भविष्यातील संशोधन विविध प्रकारच्या माध्यमांचा, जसे की पारंपारिक वृत्त आउटलेट आणि समाज मध्यम, लोकांच्या मतावर होणारे परिणाम शोधू शकतात. याव्यतिरिक्त, माध्यम साक्षरतेची भूमिका आणि जनमत तयार करण्यासाठी चिकीसात्मक विचार आणि सामान्य लोकांमध्ये या कौशल्यांचा प्रचार कसा करता येईल यावर अधिक संशोधन केले जाऊ शकते. शिवाय, मीडिया रिपोर्टिंग सुधारण्यासाठी आणि मीडिया कव्हरेजमधील पूर्वाग्रह कमी करण्याच्या उद्देशाने केलेल्या परिणामकारकतेची तपासणी देखील संशोधन करू शकते.

विश्लेषण :

ऑनलाइन न्यूज पोर्टल काय आहे?

ऑनलाइन न्यूज पोर्टल हे डिजिटल व्यासपीठ (प्लॅटफॉर्म) आहेत, जे इंटरनेटद्वारे श्रोत्यांना (वाचक, प्रेक्षक) बातम्या आणि माहिती प्रदान करतात. ते गेल्या दशकात अधिकाधिक लोकप्रिय झाले आहेत, कारण अधिकाधिक लोक त्यांचा बातम्यांचा प्राथमिक स्रोत म्हणून इंटरनेटकडे वळतात. चालू घडामोडी, राजकिय विषय, आणि सामाजिक कल यागोष्टींकडे लोक कसे पाहतात आणि समजून घेतात यावर प्रभाव टाकून जनमतास आकार देण्याची क्षमता या प्लॅटफॉर्ममध्ये आहे.

अल्गोरिदम – आधारित निवड काय आहे?

अल्गोरिदमिक बातम्या निवड ही एक प्रक्रिया आहे जी विविध बातम्यांच्या स्त्रोतांमधून बातम्या निवडण्यासाठी अल्गोरिदम वापरते. हा अल्गोरिदम विशेष निष्कर्षावर आधारित तुमच्या इंटरनेट दृष्टिकोनासाठी आणि शोध इतिहासासाठी संबंधित बातम्या शोधतो. हे विविध पारंपारिक माध्यम स्त्रोत आणि सोशल मीडियासारख्या साइटवरून बातम्या निवडते.

लोकांचे मत तयार करण्यात ऑनलाइन न्यूज पोर्टलची भूमिका :

आधुनिक लोकशाही राष्ट्रांमध्ये लोकमत हे महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, कारण ते राजकीय निर्णयप्रक्रिया, धोरण विकास आणि सामाजिक दृष्टिकोन यानवर प्रभाव टाकत असते. लोकांचे सार्वजनिक दृष्टिकोन आणि विश्वास यांच्या निर्मितीवर पडणारा संभाव्य प्रभाव अनेक अभ्यासांतून अधोरेखित झालं आहे. ऑनलाइन न्यूज पोर्टल एका विशिष्ट प्रकारे बातम्या सादर करून, ठराविक चौकटीत समस्या मांडून आणि कोणत्या बातम्या दाखवायच्या हे निवडून जनमताला आकार देऊ शकतात. तथापि, ऑनलाइन न्यूज पोर्टल्सची विश्र्वासार्हता, पक्षपातीपणा आणि उत्तरदायित्व यामुळे जनमतावर होणार्या त्यांच्या परिणामाबद्दल चिंता निर्माण झाली आहे.

जनमतांवर ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या परिणामावर प्रभाव करणारे घटक :

ऑनलाइन न्यूज पोर्टलच्या जनमतावरील परिणामावर अनेक घटक प्रभाव टाकू शकतात. यामध्ये बातम्यांच्या स्रोतांची विश्वासार्हता, न्यूज पोर्टल्सचा राजकीय कल आणि बातम्यांची अल्गोरिदमिक निवड यांचा समावेश होतो. श्रोत्यांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी विश्वासार्हता आवश्यक आहे आणि कोणताही पक्षपात किंवा हेराफेरीमुळे विश्वासार्हता नष्ट होऊ शकते. न्यूज पोर्टल्सचा राजकीय कल जनमतावर देखील प्रभाव टाकू शकतो, कारण श्रोते त्यांच्या राजकीय मतांशी व विश्वासाशी जुळणारे वृत्तस्त्रोत शोधू शकतात. बातम्यांच्या अल्गोरिदमिक निवडीमुळे एखाद्या व्यक्तीच्या विद्यमान विश्वासाची पुष्टी करणाऱ्या बातम्यांचे फिल्टरिंग होऊ शकते, ज्यामुळे लोकमताचे संभाव्य ध्रुवीकरण होऊ शकते.

विषयाशी संबंधित सैद्धांतिक संरचना आणि संकल्पना

'अजेंडा सेटिंग' सिद्धांत: ठराविक मुद्यांकडे इतर मुद्यांपेक्षा अधिक लक्ष वेधून लोकांचा मनातील विविध विषय व मुद्यांवर प्रभाव टाकण्याची माध्यमांमध्ये क्षमता आहे असे हा सिद्धांत मानतो. सदर शोधनिबंधात अभ्यासलेले लेख सुचित करतात की, माध्यमानी केलेले न्यायव्यवस्थेचे कव्हरेज तसेच आणीबाणीचा परिस्थितील कव्हरेज हे लोकांची मते व धारणा याना आकार देऊ शकतात.

'फ्रेमिंग' सिद्धांत: लोक विविध घटनाना कसे समजून घेतात आणि त्यांचे अर्थ कसे लावतात याला एका विशिष्ट चौकटित मांडून माध्यमे आकार देऊ शकतात असे हा सिद्धांत सुचित करतो. सदर शोधनिबंधात अभ्यासलेले लेख सुचित करतात की आणीबाणीच्या परिस्थितींची माध्यमांनी केलेली विशिष्ट चौकटबद्ध मांडणी (फ्रेमिंग) आणि न्यायव्यवस्थेचे माध्यमांनी केलेले कव्हरेज हे या मुद्यांविषयीची लोकांची समज आणि आकलन यास आकार देऊ शकते.

निष्कर्ष आणि शिफारसी :

वरील चार अभ्यासांच्या संश्लेषणातून असे दिसून येते की, पारंपारिक आणि डिजिटल अश्या दोन्हीही स्वरूपांतील माध्यमे जनमत तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. हे अभ्यास जबाबदार आणि नि:पक्षपाती वृतांकनाचे महत्त्व, माध्यमांच्या नैतिक जबाबदाऱ्या आणि जनमत तयार करण्यात समाजमाध्यमांचे संभाव्य फायदे आणि तोटे यावर प्रकाश टाकतात. सदर अभ्यासातून असे दिसून येते की, एखादा मजकूर, त्याचा आशय आणि मांडणी याबाबतीत ऑनलाइन न्यूज पोर्टल्समध्ये असणारी भिन्नता ठळकपणे दिसून येते. काही पोर्टल्स अचूक वसंतुलित कव्हरेज करताना दिसतात, तर काही मात्र सनसनाटी, पक्षपाती प्रचार की कव्हरेजमध्ये गुंतलेली दिसतात. पुरवेलेल्या माहितीची अचुकता आणि विश्वासार्हता, श्रोत्यांचे पूर्वग्रह आणि मूल्ये तसेच बातमीचा आशयाशी जोडली जाण्याची पातळी अश्या विविध घटकांचा प्रभाव ऑनलाइन न्यूज़ पोर्टल्स आणि त्यातुन निर्माण होणाऱ्या जनमतावर पाडतो.

तथापि, चुकीची माहिती आणि प्रचारकी माहितीचा प्रसार करू शकण्याच्या समाज माध्यमाच्या क्षमतेविषयी खबरदारीचा ईशाराही या अभ्यासातून मिळतो. तसेच समाजमाध्यमाचे 'अल्गोरिदम', जे असे 'इकोचेंबर' निर्माण करतात ज्यातून आधीच अस्तित्वात असणार्या पक्षपाती गोष्टी अधिक घट्ट होतात आणि पर्यायी दृष्टिकोनाची द्वारे खुली करण्यात मर्यादा आणतात. अश्या इकोचेंबर विषयीही खबरदारीचा ईशारा मिळतो. हा अभ्यास समाजमाध्यमावरील जटिल माहितीच्या साठ्याचे योग्य आकलन व्यावे यासाठी माध्यम साक्षरतेची गरजही अधोरेखित करतो. मीडिया आणि जनमत यांच्यातील संबंध समजून घेणे हे समाजासाठी महत्त्वपूर्ण परिणामांसह संशोधनाचे निरंतर क्षेत्र आहे. सदर अभ्यास हा जनमत तयार करण्याच्या माध्यमांच्या नैतिक जबाबदाऱ्यांवर आणि अचूक व निष्पक्ष वृतांकनावर भर देतो.

अभ्यास असे सुचवितो की, विश्र्वासार्ह माहिती पुरवून आणि भिन्नभिन्न दृष्टिकोन पुढे आणून जनमत तयार करण्यात स्वतंत्र मीडिया पोर्टल उत्प्रेरक म्हणून काम करू शकतात. धोरणात्मक निर्णय आणि त्याचा समाजावर होणार्या परिणामांबद्दल जनतेला माहिती देऊन अशी पोर्टल्स नागरिक आणि धोरणकर्ते यांच्यातील दरी कमी करण्यास मदत करू शकतात.

ऑनलाइन न्यूज पोर्टल्स आणि लोकांच्या मतासाठी या निष्कर्षांचे महत्त्वपूर्ण परिणाम आहेत. ऑनलाइन न्यूज पोर्टल्सनी जबाबदार आणि नि:पक्षपाती वृत्तांकनासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि लोकांना विश्र्वासार्ह माहिती आणि भिन्न दृष्टिकोन प्रदान केले पाहिजेत, असे अभ्यास सुचवतात. अशी पोर्टल्स नागरिकांसाठी त्यांची मते आणि त्यांचा दृष्टीने महत्वाचे मुद्दे मांडण्यासाठी आणि धोरणकर्त्यांना लोकांशी संलग्न राहण्यासाठी आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून देखील काम करू शकतात.

संदर्भ साहित्य :

1. https://astanatimes.com/2013/02/social-media-shaping-the-way-we-see-the-world-or-shaping-the-new-world-itself/
2. https://www.researchgate.net/publication/325479970_Public_Opinion_Formation_The_Role_Of_Independent_Media_Portal_During_Crisis
3. https://www.legalserviceindia.com/legal/article-3258-public-opinion-and-role-of-media.html
4. https://shodhganga.inflibnet.ac.in:8443/jspui/handle/10603/10720
5. https://www.thehindu.com/news/cities/kozhikode/media-has-capitulated-to-power-sashi-kumar/article22839693.ece
6. https://maharashtratimes.com/editorial/article/challenge-of-social-media/articleshow/68499614.cms
7. Manufacturing Consent: The Political Economy of the Mass Media" by Edward S. Herman and Noam Chomsky.
8. The News Gap: When the Information Preferences of the Media and the Public Diverge" by Pablo J. Boczkowski and Eugenia Mitchelstein.

*सहाय्यक प्राध्यापक, मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे pooja9201@gmail.com 8796980106

***

'तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील ग्राम–आरोग्य आणि श्रम–संपत्ती विषयक विचारांचा समाजशास्त्रीय अभ्यास'

*शुभांगी विजयराज मोहोड

गोषवारा :

प्रस्तुत शोध निबंधामध्ये तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेमध्ये ग्राम आरोग्य आणि श्रम–संपत्ती विषयक मांडलेल्या विचारांचा आढावा घेण्यात आलेला आहे. शोध निबंध लिहीण्यासाठी द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. वैश्विक ऐक्याचे स्वप्न पाहणारे तुकडोजी महाराज हे कायम विश्वाचा जो मूलघटक आहे ते म्हणजे 'गाव' आणि तेथली माणसे यांचा प्राधान्याने विचार करतात. म्हणूनच ग्रामसंघटन, शक्ती संघटन आणि ग्रामोन्नती व्हावी अशी त्यांची इच्छा होती. संपूर्ण समाज सत्वगुणसंपन्न, सुसंस्कारी आणि आरोग्यवान व्हावा, पवित्र विचारांचा असावा अशी त्यांची आस होती म्हणून त्यांनी 'ग्रामगीता' हे माध्यम समाजासमोर ठेवले. समाजाला पचेल, रुचेल, भावेल अशा पद्धतीने महाराजांनी समाज जीवनाचे तत्त्वज्ञान ग्रामगीतेमध्ये सांगितले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये तुकडोजी महाराज यांनी मांडलेल्या ग्राम–आरोग्य आणि श्रमसंपत्ती विषयक मांडलेल्या समाज परिवर्तनकारी विचारांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.

सूचनक शब्द – श्रमसंपत्ती, आरोग्य

प्रस्तावना :

तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील महत्त्वाचे समाजसुधारक तसेच ग्रामसंस्कृतीचा आणि कृषी व्यवस्थेचा सुक्ष्मपणे अभ्यास करणारे एक थोर विचारवंत होते. आपल्या मानवतावादी चिंतन व कृतीद्वारे समाजात परिवर्तनाची व नवनिर्माणाची चेतना जागविणारे संतकवी व महान जननायक होते. तत्कालिन समाजात अज्ञान, अंधश्रद्धा, भोंदूगिरीचे प्रस्थ होते. ईश्वर प्राप्ती करण्यास निघालेल्या तुकडोजी महाराजांना 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' असा साक्षात्कार झाला व त्यातूनच त्यांना समाजकार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

'ग्राम हा विश्वाचा नकाशा। गावावरून देशाची परीक्षा।।
गावचि भंगता अवदशा। येईल देशा।।'

हा दृष्टिकोन पुढे ठेवून त्यांनी देश विकास साधायचा असेल तर त्याची सुरुवात प्रथम ग्राम विकासातून करायला हवी असे त्यांनी सांगितले. त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपली खंजिरी भजने आणि साहित्याद्वारे तसे प्रयत्नही केले. लोकांना समजेल, रुचेल अशीच भाषा त्यांनी वापरली. सनातन धर्मतत्त्वाला आधुनिक विचारांची आणि विज्ञान निष्ठेची जोड देऊन व्यक्तिने आत्मोन्नती करीत असतानाच आपल्या गावाचा विकास कसा करावा याचे मार्गदर्शन करणारी ग्रामगीता लिहीली. ग्रामीण जनतेच्या रोजच्या आयुष्याचे बारकाईने निरीक्षण करून त्यांचे जिवन सुधारण्याचा उपाय महाराजांनी सांगितला. या उपायांमध्ये स्वानुभव आणि शास्त्र यांचा समन्वय त्यांनी साधला. ग्रामगीतेतील महाराजांनी सांगितलेले उपाय आचरणात आणले तर व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या सर्वांचे उन्नयन होण्याबरोबरच कल्याण साधण्याच्या दृष्टिने आपला भारत देश महत्त्वाची भूमिका बजावेल. या दृष्टिकोनातून महाराजांनी ग्रामगीतेमध्ये दिलेल्या अनेक महत्त्वपूर्ण विचारांपैकी ग्रामआरोग्य आणि श्रम संपत्ती ह्या समाजपरिवर्तनवादी विचारांचा सखोल अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात येत आहे.

उद्दिष्ट्ये :

१. तुकडोजी महाराज यांच्या श्रम–प्रतिष्ठे संदर्भातील विचारांचा आढावा घेणे.
२. तुकडोजी महाराज यांनी दिलेल्या आरोग्य विषयक विचारांना अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम स्रोतांचा अवलंब करण्यात आला असून यामध्ये या विषयाशी संबंधीत प्रकाशित, अप्रकाशित लिखाण, ग्रामगीता, संदर्भ ग्रंथे, लेख, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, इंटरनेट इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

विषय प्रतिपादन :

तुकडोजी महाराज हे एक युगद्रष्टे महापुरुष होते. भारतीय समाजाची नाडी त्यांनी अचूक ओळखली होती. भारत देश हा विविध धर्म, पंथ, जाती व संप्रदायामध्ये विभागला आहे. या बहुजिनसी मानसिकतेला एका सूत्रात बांधून त्यातून सामाजिक ऐक्य राखणे सोपे नाही, पण ते कायदा वा प्रशासनाच्या पातळीवरही साध्ये होण्यासारखे नाही. समाज परिवर्तनाच्या अखंडित व प्रभावशाली चळवळीतूनच हे साकार होऊ शकते. याच पार्श्वभूमीवर महाराजांनी सर्वसामान्य भारतीय समाजाला देवभक्तीकडून

राष्ट्रभक्तीकडे नेले. भारतीय लोकमानस मुळातच देवभोळे आहे. या जनतेच्या भावनांना जपून राष्ट्रसंतांनी मोठ्या कौशल्याने त्यांना समाजकार्यासाठी प्रवृत्त केले. आधुनिक युगाकडे वाटचाल करणाऱ्या युगास असा नवा–धर्म शिकवावा त्यायोगे ग्रामे सुधारावीत, राष्ट्राची उन्नती व्हावी ह्या हेतूने प्रेरीत होऊन महाराजांनी 'ग्रामगीता' हा ग्रंथ लिहीला.

तुकडोजी महाराजांना समाजकार्याची प्रेरणा ग्रामिण जीवनातून मिळाली म्हणूनच ग्रामजिवनाचा सुक्ष्म अभ्यास करून त्यांनी ग्रामगीतेमध्ये बलिनिदान बंदी, यात्राशुद्धी, मंदिरोद्घाटन, देशसेवा म्हणजे देवपूजा इत्यादी संबंधीचे समाजनिष्ठ विचार ग्रामीगीतेत मांडले आणि हे विचार समाजात रुजविण्याचे कार्य केले. ग्रामिण जीवनाच्या बळावरच आपला देश उभा असल्यामुळे ग्रामविकासाला त्यांनी प्राथमिकता दिली. तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून रुढी निर्दालन, धर्म, देव, आश्रम, विवाह, अंत्यविधी, महिला उन्नती, शिक्षण पद्धती, शेती, अंधश्रद्धा, श्रमसंपत्ती, आरोग्य, प्रयत्नप्रभाव, प्रारब्धवाद, आदर्श–ग्रामराज्य इत्यादी संबंधीचे पुरोगामी व व्यहार निपुण विचार मांडून समाजपरिवर्तनाला चालना दिली. 'ग्रामआरोग्य' या १४ व्या अध्यायामध्ये राष्ट्रसंतांनी ग्रामआरोग्याच्या संदर्भातील मूलभूत चिंतन मांडलेले आहे. गावाचे आरोग्य बिघडण्याची कारणे त्यांनी विज्ञानदृष्टितून मांडलेली आहेत. मानवाच्या दिनचर्येत विस्कळीतपणा निर्माण झाल्यामुळे मनुष्य रोगराईला बळी पडतो. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सात्त्विक आहार, विहार, पहाटे उठणे, व्यायाम, ध्यान, प्रार्थना, आरोग्यदायी आहार इत्यादींचा आग्रह बाळगला आहे.

'नियमी बांधला एकेक दिन। त्यानेच सुधरे जीवन संपूर्ण।
गावही होय आरोग्य संपन्न। सारे प्रसन्न देवी–देव।।२४।।'

तुकडोजी महाराज म्हणतात, निरोगी, सुंदर गाव होण्याकरीता गावातील प्रत्येकाची दिनचर्या सात्विक असावी. नियम पालनाचा निर्धार दृढ असावा यावरच ऐहीक व पारमार्थिक भरभराटी अवलंबून आहे. माणसाने एखादा नियम पाळला तर सर्व जिवन हे सुरळीत चालण्यास मदत मिळते. परंतु एखाद्या दिवशीही नियम चुकला तर मग ती चूक अंगवळणीच पडू शकते आणि मग ती पुन्हा सुधारण्यास त्रास पडतो. म्हणूनच नियम हे निश्चयाने पाळावे. प्रत्येकाने सकाळी रोज पहाटे उठावे. काही ठिकाणी असा समज आहे कि ते उशिरा उठतात किंवा श्रीमंत आहेत म्हणजेच ते भाग्यवान आहेत. अशा प्रकारच्या गैरसमजुतीने ती व्यक्ती आळशी झाली आहे तर ती भाग्यवान कसली? एखादा रोगी अशक्तपणाने झोपून राहतो तर तो भाग्यवान असतो का? असा सवाल महाराजांनी केला आहे. अशा अवस्थेत घरदार पर्यायाने गाव पवित्र कसे राहील. प्रात:काळी जनावरांचे दूध काढल्याने रक्त शुद्ध होऊन प्रतिकारशक्ती वाढते. सकाळी शौचमुखमार्जन केल्याने उत्साह शक्ती निर्माण होते. उष:पान घेतल्याने शरीराच्या आतील अवयव थंड होतात. थंड शुद्ध पाण्याने आंघोळ केल्याने चित्त शांत व प्रसन्न राहते. यामूळे मेंदूचा भाग थंड होऊन बुद्धीचा विकास होतो. हे सर्व झाल्यावर सामुदायिक प्रार्थना करून वृत्तीस्थिरता साधावी. यातूनच सुंदर आयुष्य साधता येते. पुढे तुकडोजी महाराज सांगतात की, घर, दार, गोठे, रस्ते सर्वकाही आरश्यासारखे स्वच्छ करावे. यासाठी सर्व लहान मोठ्यांनी मिळून श्रमदान करवो. असे ज्या गावात घडते त्या गावात आरोग्य नांदू लागते. प्रत्येकाच्या मनावर संस्कार व्हावेत यासाठी सकाळ संध्याकाळ प्रार्थना करावी. भोजन समयी वातावरण स्वच्छ असावे. त्याचवेळी सुविचार, शुभचिंतन केल्याने अन्नासोबत निर्मळ गुणांचा प्रवेश शरीरात होऊन शुद्ध मनाची घडण होते. आपण जे अन्न ग्रहण करीत आहोत त्यात शेतकऱ्यांच्या श्रमाचा वाटा आहे अशा सद्भावाने व आदराने अन्न सेवन करावे. सहज मिळणारे जे अन्न असते ते सात्त्विक अन्न जे श्रमाने शेतात पिकवल्या जाते. जे सुर्यकिरणात कंद, मुळे, भाज्या, फळे तयार होतात हेच सात्त्विक अन्न ग्रहण करावे. जेवढे गरजेचे आहे तेवढेच खावे. अतिरीक्त खावू नये. यावर महाराज म्हणतात,

'आत वाढत जाता विकृती। धन्वंतरीही काय करिती?।
नष्ट करोनि औषधे संपत्ती। मुखी माती पडतसे।। १२४।।'

म्हणून भोजनात नियमीतपणा असावा. ताज्या, उत्तम पालेभाज्या, दूध, दही, तूप, ताक हे भोजनासाठी अमृत समजावे. यालाच कत्याकल्प म्हणतात. यामुळे दिर्घकाळ निरोगी आयुष्य लाभून गावात समृद्धी नांदेल. असे तुकडोजी महाराज म्हणतात. या विचारांद्वारे एक आरोग्यकारक दृष्टिने सुदृढ समाज निर्मितीची महाराजांना अपेक्षा आहे.

'मजुर सकाळी पाहिजे उठला। नित्यविधी कर्मातून निपटला।
घरकाम करोनि निघाला। पाहीजे तात्काळ कामासी।।'

वरील ओवातून तुकडोजी महाराजांनी मनुष्याने कष्ट, श्रम करून आरोग्य धनसंपदा मिळवावी असे सांगितले आहे. आदर्शग्राम निर्माणासाठी श्रम हीच संपत्ती मानुन कष्ट करावेत. सर्व गावकऱ्यांनी लाज न बाळगता श्रम केले पाहिजे, हा त्यांनी मौलिक विचार सांगितला आहे. श्रमनिष्ठा हाच मानवी विकासाचा–पर्यायाने ग्रामविकासाचा मूलमंत्र असल्याचे ते सांगतात. ग्रामगीतेच्या अठराव्या अध्यायात महाराजांनी 'श्रम–संपत्तीचे' महत्त्व विशद केले आहे.

'तैसेचि पोरासाठी करणे काम। हे नव्हेत पुण्यपरिश्रम।
उरल्या वेळी सेवाकर्म। त्यासि धर्म बोलती।। १२।।'

तुकडोजी महाराज म्हणतात, जे इतरांसाठी केलेले श्रम किंवा कार्य आहे तेच माणूसकीचे कर्म होय. अयोग्य, इच्छा धरून केलेले कर्म, अहंकार व ममत्व यांचा त्याग करून संपूर्ण जगासाठी ईश्वरार्पण बुद्धीने श्रम करावेत. काहीही न करता केवळ मौखिक व्याख्याने केल्याने काही होत नाही तर त्यापेक्षा श्रमदान करून कोणतेही मदत कार्य करणे हे केंव्हाही श्रेष्ठ कार्य आहे. श्रम करणाऱ्यांना ज्यामुळे अन्न मिळते ते एखादा यज्ञ केल्याहुनही श्रेष्ठ कर्म होय. जनतेच्या उपजिविकेचे कार्य जर खोळंबून राहीले तर सर्वांचे जिवन जगणे कठीण होऊन जाईल. म्हणून गरीब असो वा श्रीमंत प्रत्येकाने झटून कामे करावेत आणि गावाचे धन–वैभव वाढवावे. असे तुकडोजी महाराज त्यांच्या ग्रामगीतेत सांगतात. पुढे महाराज म्हणतात की, श्रमाविषयी आळशीपणा व शिथिलता वृत्तीचा त्याग करावा. जे काम ज्याला व्यवस्थित जुळत असेल ते काम सेवा म्हणून त्याने साधावे त्यामुळे सर्वांचे वैयक्तिक कल्याण तर होईलच त्याचबरोबर गावाचेही उत्पादन वाढेल. श्रमाविषयी सर्व जनतेत दृढ श्रद्धा प्रचाराने निर्माण करावी. सर्वांना श्रमाविषयी पूरेपूर आपुलकी वाटेल त्यासाठी प्रत्यक्ष आपल्या गावाचे उत्पादन वाढविण्याची सुंदर व्यवस्था करावी. कामगार जे श्रम करतात त्यानंतर त्यांची जी श्रमशक्ती वाचते तिला सहाय्यक म्हणून दुसऱ्या कामाची जोड दिली तर गावाचा कायापलट निश्चितच होण्यास मदत मिळेल. जो उद्योगधंदा गावात नसेल त्याला सर्वांच्या श्रमाने सुरु करावे. त्यात काही नवे आले असेल ते बाहेरून शिकुन यावे व गावात वस्तूंची निर्मिती करून गावातील संपत्ती ही गावातच राहू द्यावी. शहरांकडे खेडूतांचा जो ओघ चालला आहे तो थांबविण्यासाठी त्या सर्वांचा गावातच जिवन–निर्वाह हमखासपणे होईल अशी योजना करावी. हे सर्व श्रमानेच साध्य आहे. खेडे हेच शहराचे निर्माते आहे. खेडे उत्पादन करणारे आहेत. त्याचा उपयोग घेणारे मात्र शहर आहे. त्यामुळे शहराला खेड्याभोवती फिरावे लागते. म्हणूनच सर्वांनी श्रमाने ग्रामोद्योगाने गावाचे सर्वतोपरी कल्याण करावे. ग्रामसेवा हेच परमेश्वराचे आवडते कर्म असल्याचे तुकडोजी महाराजांनी सांगितले आहे.

सारांश :

संपूर्ण गावाचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी तुकडोजी महाराजांनी विज्ञानवादी दृष्टिकोनातून उपाय सुचविले आहेत. मानवी दिनचर्येत विस्कळीतपणा निर्माण झाल्यामुळे मनुष्य रोगराईला बळी पडत असल्याचे महाराज म्हणतात त्यासाठीच तुकडोजी महाराजांनी सात्त्विक आहार, विहार, पहाटे उठणे, व्यायाम, ध्यान, प्रार्थना, आरोग्यदायी आहार इत्यादींचा उपाय सांगितला आहे. रोग आल्यावर उपाय करण्यापेक्षा ते येऊच नयेत यासाठी काळजी घ्यावी असे ते सांगतात. संपूर्ण गावाचे आरोग्य निकोप ठेवण्यासाठी घर व परिसर स्वच्छता ठेवण्याचाही त्यांनी सल्ला दिला आहे. यामुळे गाव–आनंदी व सुखी होईल. आदर्श दिनचर्या पाळली गेली तर सर्वांकडे आरोग्य नांदेल व औषधांची गरज पडणार नाही. तुकडोजी महाराजांनी आदर्शग्राम निर्मितीसाठी श्रमनिष्ठा हा महत्त्वाचा घटक मानला. सर्व गावकऱ्यांनी लाज न बाळगता श्रम करावे. श्रमनिष्ठा हाच मानवी विकासाचा पर्यायाने ग्रामविकासाचा मूलमंत्र असल्याचे महाराज सांगतात. कोणावरही अवलंबून राहु नका. सर्वच कामे आपआपल्या परिने श्रेष्ठ आहेत. सर्व गावकऱ्यांनी कामाचा आदर केला पाहिजे. जोपर्यंत मनुष्य श्रमाचा आदर करणार नाही तोपर्यंत गावाचा, पर्यायाने देशाचा विकास होणार नाही. म्हणूनच प्रत्येकाने आळशी वृत्तीचा त्याग करून श्रमनिष्ठा जोपासावी. यानेच गावाचे उत्पादनही वाढण्यास मदत मिळेल असे तुकडोजी महाराजांनी सूचविले आहे.

संदर्भ ग्रंथसूची :

१. तुकडोजी महाराज, २०१३, 'ग्रामगीता', श्रीगुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान, २५ वी आवृत्ती, अमरावती.
२. तुकारामदादा गिताचार्य, २०१४, 'सार्थ ग्रामगीता', भू–वैकुंठ आत्मानुसंधान टेकडी, चंद्रपूर.
३. पिंजरकर योगिता, 'ग्रामगीतेची निर्मिती प्रक्रीया', मराठी जनसाहित्य परिषद, प्रथम आवृत्ती, अमरावती.
४. कामत अशोक, 'ग्रामगीता सुबोध निरुपण', गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे.
५. तुकारामदादा गिताचार्य, 'गद्य ग्रामगीता', श्री गुरुदेव आत्मानुसंधान प्रकाशन मंडळ, चंद्रपूर.

*पीएच.डी. संशोधक विद्यार्थिनी, समाजशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
मो.नं.७७२०८५५८२५ shubhangimohod1@gmail.com

***

पर्यावरण आणि स्त्री आरोग्य

*कांबळे रावसाहेब हरिबा
**डॉ.जे.पी.कोकणे

प्रस्तावना

पर्यावरण हे निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे.म्हणून मानव हा पर्यावरणाचा घटक मानला जातो. प्राण्यापेक्षा तो वेगळा आहे. मानवाने आपल्या बौध्दिक, काल्पनीक व वाचाकशक्ती व तंत्र कौशल्य या जोरावर मानवाने निसर्गाच्या संदर्भात खूप मोठे मोठे बदल घडवून आणले आहेत. याद्वारे मानवी जीवन सुखी समृध्द आणि प्रगत परिवर्तणवादी बनण्यासाठी सत्यात्याने प्रयत्न केलेले दिसतात. यातूनच मानवाला जीवन जगण्याचा व प्रगती करण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. अशा प्रकारच्या जाणीवा व्यक्तीमध्ये जागृत होणे आवश्यक आहे. यातूनच पर्यावरण शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. पर्यावरण, निसर्ग वा प्रकृती हे स्वंय आदर्श शिक्षक आहे. याद्वारे आपल्याला बरेच काही शिक्षण मिळू शकले हे मानवाने सिध्द केलेले दिसते.

निसर्गाने मानवाला अनेक नैसर्गिक संसाधने दिली आहे. जे. के. ऊन, वारा, पाऊस, जमीन, सुर्यप्रकाश इ. साधनाच्या साह्याने अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजांची पूर्तता निसर्गाकडून पूर्ण होत आहेत. हे पहावयास मिळाले. सजीवाच्या उत्पत्तीनंतर मानवप्राण्याना मेंदू या इंद्रियांचा वापर केला. स्वत:ची बुध्दिमता वैज्ञानिक ज्ञानाच्या आधारावर नैसर्गिक संसाधनांच्या ज्ञानाच्या आधारावर नैसर्गिक संसाधनाच्या सहसंबंधाकडे मुळीचे लक्ष दिले नाही. प्रथम अवस्थेत नैसर्गिक संसाधनांची विपूलता जनसंख्यावाढीस योग्य ढरली. पण आधुनिक काळात वाढत्या लोकसंख्येने अनेक प्राथमिक प्रश्न उपस्थित केले. या प्रश्नांची उकल करण्यासाठी मानवाने निसर्गावर हल्ला चढविला, नैसर्गिक संसाधनाचा अतिवापर करून त्याने स्वत:चे जीवन सुखदायी बनविले आहे.

मानवांनी विकासाच्या वाटचालीत नैतिक सत्यांना अधिक प्रमाणावर दूर ठेवल्याचे जाणवू लागले आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर सर्वत्र पर्यावरणाची पर्वणी उत्तरोक्तर धार्मिक होत आहे. स्वच्छ हवा, पाणी, अन्न, शांतता, यांच्या गुणात्मक र्‍हासामुळे जीवन निकोप राहिले नाही. विकसित राष्ट्रात उच्च राहणीमान असले तरी आतिविकासामूळे जीवन मूल्ये, कुटूंबसंस्था ठासळत आहे. परिणामी लोकसंख्यावाढ मंद असूनही मानवी स्वास्थ्य दुराणास्ता होऊ लागले आहे सांस्कृतिक पर्यावरणाची ही घसरण नैसर्गिक पर्यावरणाला ही घातक आहे. प्रंचड प्रमाणात जंगलांचा विनाश होत आहे. लोकसंख्या व उद्योगधंदे यांची भयानक वाढ होत आहे. जगात आग्रणी स्थानाकरिता प्रगत देशात चुरस निर्माण झाली आहे. या करिता औद्योगीकीरणामूळे उत्पादन वाढविणे व विघातक अशी शस्त्रे बनविणे हा मार्ग त्यानी अंवलबिला आहे. वाढत्या औद्योगीकरणाद्वारे व लोकसंख्येमूळे शहरांची संख्या व विस्तार वाढत आहे त्याच बरोबर वाहनांची संख्या वाढत आहे अशा क्रियाप्रकियामूळे प्रदुषण घडू लागलेले दिसून येते. २० व्या शतकात कारखनदारी, अधिक वाढल्यामुळे प्रदुषण वाढले उदा. कार्बनडायऑक्सईड, सल्पफरडाय. ऑक्साईड, नायट्रोजन. डायऑक्साईड, इत्यादी विषारी वायू, ॲटिमनी, आसोमिक कोबाल्ट, निकेल, पारा, शिसे यासारखी विषारी अपद्रव्ये वातावरणात विखुरली जात आहेत. दूषितके मानव प्राणी व वनस्पतीच्या विविध शारिरिक अवयवाना घातक सिध्द झाली आहेत.

संशोधनाचा उद्दिष्ट्ये –

1. भारतामध्ये झालेल्या पर्यावरण चळवळी जाणून घेणे
2. जगतिक पातळीवर पर्यावरण संवर्धनासाठी झालेले प्रयत्न जानूण घेणे
3. पर्यावरण संवर्धनासाठी केलेले कायदे जानूण घेणे
4. पर्यावरणाची गुणवत्ता राखण्यास मदत करणे
5. पर्यावरण प्रदुषण नियंत्रणाविषयी जागृती करणे.
6. पर्यावरण विषयी व्यवस्थापन,संशोधन साहित्य इत्यादी बद्दल समाज प्रबोधन करणे

संशोधन पध्दती ;—

प्रस्तुत संशोधन हे पूर्णात — व्दितीय सामग्रीवर आधारित आहे हे संशोधन पूर्ण करण्यासाठी विविध सदंर्भ ग्रंथ, मासिके हे संशोधन लेख, संकेतस्थळे इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे. हे संशोधन करण्यासाठी सामाजाकि संशोधनाच्या वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

१९६० या वर्षी लोकसंख्या वाढीमुळे अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला. जागेचा प्रश्न, बेरोजगारी हे प्रश्न गंभिर बनले. त्यावर मात करण्यासाठी शहरीकरण, औद्योगिकीकरण झपाट्याने वाढले. यातूनच हरित क्रांतीची सुरूवात झाली व्यक्तीच्या प्रगतीमुळे पर्यावरणाची फार हानी झाली. तसेच शहरीकरण व औद्योगिकीकरणासाठी जागेची उपलब्धता व्हावी या करीता खूप मोठ्या प्रमाणावर जंगलातोड करावी लागली. तसेच शेतीच्या उत्पादन वाढीसाठी मानवाने रासायनिक खते, किटक नाशके याचा गरजेपेक्षा आधिक वापर सुरू केला म्हणून हि प्रगती म्हणजे असुरक्षित प्रगती होय.

पर्यावरणीय समस्या.

वृक्षतोड, प्रदूषण, शहरीकरण, औद्योगिककिरण, वाळवंटीकरण, ऊर्जा समस्या, नैसर्गिक आपत्ती, पाणी पुरवठ्याची समस्या, वाहतूक समस्या, जल प्रदुषण, ध्वनी प्रदुषण, सार्वजनिक सुविधाची अडचण.

स्त्री आरोग्य

आरोग्य बाबतीत काही उदा. काढले जातात जसे की, 'शुभम करोती कल्याणम आरोग्यम धनसंपदा' हे मानवी जीवनाचे महत्वपुर्ण अंग आहे शारिरिक व मानसिक स्वास्थ्य शिवाय मानवी जीवनाची कल्पना करू शकत नाही तसेच मानावच्या आरोग्यास पोषण आहार आवश्यक आहेत जेव्हा व्यक्तीला शरिराच्या गरजेनुसार सर्व आवश्यक घटक मिळतात त्या स्थितीस उत्तम पोषण म्हणावे लागेल. जसे की, भरपूर अन्न, वस्त्र, निवारा यामुळे लोकांचे आयुर्मान वाढले आहे. हे जरी सत्य अमले तरी हे सुद्ढ कार्यक्षम राहण्यासाठी तसेच बालमृत्यू अकली मृत्यू टाळण्यासाठी आरोग्य विषयक सोयी, सुविधा मिळवूण देणे हे महिलांच्या गुणवत्तेच्या वाढीसाठी आवश्यक घटक आहे. आरोग्य चांगले असेले तर महिलांचे आयुर्मान गुणात्मक राहील. प्राचीन काळापासून समाजात महिला पुरूषांसोबत आपले योगदान देत आहेत. कुटूंब आणि राष्ट्राची प्रगती साधन्या मागे स्त्री आणि पुरूष याचा दर्जा सर्वतोपरी समान असावा हे अपेक्षित आहे.

स्त्रीयाचे आरोग्य आणि त्याचा दर्जा याचा विचार करताना प्रामुख्याने WHO ने १९४८ साली आरोग्याची केलेली व्याख्या समजावून घेणे गरजेची आहे ''केवळ आजार किंवा अपगंत्व यांचा अभाव येवढेच नसून शारीरिक, सामाजिक, मानसिक सुस्थिती म्हणजे आरोग्य होय'' आरोग्य ही बाब अशी आहे की, जी स्वत:ला कमवावी लागते त्यासाठी महिलांनी योग्य दिशेने आरोग्यासाठी जागरूक राहून प्रयत्न करणे महत्वाचे ठरते.

जगाची अर्धी लोकसंख्या हि स्त्रियांची मानली जाते त्याच्या आरोग्यावर भविष्यातील पिढी अवलंबून आहे 'शुध्द बीजा पोटी फळे रसाळ गोमटी' बालाकांच्या आरोग्यचा दर्जा चांगला राहण्यासाठी मातेचे आरोग्य सुस्थितीत असणे महत्वाचे आहे. ग्रामीण समाजात आज्ञान, अस्वच्छाता, अंधश्रध्दा, आरोग्य आरोग्य आहार पध्दती आणि सवयी, लिंग भेदभाव, स्त्रीचे दुय्यम स्थान या गोष्टीचा स्त्री आरोग्यावर परिणाम होतो, ग्रामीण व शहरी या दोन्ही भागात आरोग्य विषयक जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. भारतात कृपोषण, मधुमेह, बालमधुमेह, उच्चरक्तदाब, हायपरटेन्शन इ.आजार गंभीरपणे जावणतात.

महत्व

महिलांच्या आरोग्याकडे जाणीव पूर्वक लक्ष देण्याकरीता ग्रामिण समाजात ६०,००० लोकसंखेकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रत्येक आरोग्य केंद्राला संलग्न ३ ते ६ उपकेंद्र स्थापन करण्यावर भर देण्यात आला भारत व इतर प्रगत राष्ट्रात तुलना केल्यास भारतामध्ये डॉक्टरांची संख्या

फार कमी आहे. म्हणजेच भारतातील सामुदायिक आरोग्य केंद्रे जेवढी कार्यक्षम असायला पाहिजेत तेवढी नाहीत.

भारत सरकारने सर्वांना सर्वसामान्याला परवडतील अशा आरोग्य विषयक सेवा देण्या करिता अनेक योजना कार्यान्वीत केल्या आहेत त्या म्हणजेच राष्ट्रीय ग्रामीण, आरोग्य मिशन (NRHM) नॅशनल प्रोग्राम फॉर हेल्थ केअर ऑफ एलडरली (NPHCE) राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम (NMHP) प्रधानमंत्री, स्वास्थ्य सुरक्षा योजना (PMSSY) या समित्या राष्ट्रीय ग्रामिण आरोग्यात या योजनेद्वारे महिलांच्या आरोग्य सुधारणा झाल्याचे आढळून येते. माता मृत्यूदर हा २००३ साली १,००,००० करत ३०१ होता. तोच २००९ मध्ये २१२ झाला बालमृत्यूदर २००९ मध्ये प्रत्येक १००० करत ५० एवढा होता महिलांच्या आरोग्य बाबत काहि गोष्टी जसे की व्यवसायास योग्य असे आरोग्य मानसिक आरोग्य,लैगिंक शोषन, कौटुंबिक हिंसा त्यांचा आरोग्यावर होणारा दुष्टपरिणाम याकडे फारसे लक्ष दिले जात नाही अन्नधान्याची अपलब्धता व त्याचा नियमानुसार पुरवटा याकडे दूलक्षित केले जाते. आरोग्य वाढविण्यामध्ये कुटुंब नियोजनाला जास्त महत्व दिले जात उदा. दोन मुले व त्यातील एक मुलगा व एक मुलगी या सरकारी धोरणामुळे मुलीचे प्रमाण कमी होत आहे.

महाराष्ट सरकारने २००१ साली महिला विषयक धोरणे जाहिर केले आहेत.

1. दवाखान्यात प्रस्तुती करण्याकरीता गंभीर अवस्थेतील मुलांच्या उपचाराकरता रूग्णवाहिकेची सोय लागू केली आहे.
2. मुलीकरीता वैद्यकीय तपासणी व उपचारांचे आयोजन करणे.
3. आरोग्यविषयक महिला डॉक्टरांच्या मार्फत स्त्रियांची आरोग्य विषयक तपासणी करणे.
4. आहार शिक्षण, परसबाग व घराच्या मोकळ्या जागेत शेती करणे यावर आधिक भर देणे
5. एच.आय.व्ही ग्रस्त महिलांकरीता विशेष आरोग्य विषयक सेवा देणे.

निष्कर्ष

आज महाराष्ट राज्यात आरोग्य ९३७७ उपकेंद्रे आहेत १६८०५ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. २९२ सामुदायिक आरोग्य केंद्रे आहे. १५१ प्राथमिक आरोग्य गट व ५१ फिरते आरोग्य गट आहेत आज आरोग्य विषयक सुविधा कमी पडत असल्यामुळे खाजगी आरोग्य सेवा आधिक प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. पण कमी उत्पन्न असलेले कुंटुब जसेकी महिलांच्या आरोग्यावरच्या खर्च्या मध्ये कपात केली जात असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे.

आरोग्य विषयक सुविधा लोकांना विशेषत : महिलांना आरोग्य शिक्षण देउन त्यांच्यात जागृती निर्माण करणे. ग्रामीण व दुर्गम भागातील राहणार्‍या महिला आदिवासी लोक निरक्षर व अंधश्रध्दाळू लोकांना आरोग्य शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे.

संदर्भ सूची

1. पर्यावरण शास्त्र आणि सामाजिक समस्या — डॉ.कुलकर्णी
2. पर्यावरण भूगोल — डॉ.वराट / बोरूडे
3. Environment biology . P.S. Uerma
4. पर्यावरणाची ओळख — श्रीपाद देशमुख
5. समुदायिक विकास — डॉ.उज्वला बैरागडे
6. अतनुरकर किशोर २०१४ — मनोविकास पब्लिकेशन पुणे.
7. केतकर, सिधू स्त्रायाचे आरोग्य, प्रा.लि.पुणे.

*मो.९८५०८६७०८२

***

स्त्रियांचे प्रजननक्षम आरोग्य प्रश्न: एक समाजशास्त्रीय अभ्यास

***श्रीमती. मीना अनिल जाधव- सावंत**

गोषवारा :

स्त्री आरोग्य व लिंगभावावर आधारित आरोग्य विषमता त्यातून उद्भवणारे पुनरुत्पादक आरोग्याचे प्रश्न याकडे आजही उपयुक्ततावादी दृष्टीने पाहिले जाते. इतर आजारावरील उपचारांची गरज स्त्रिया व पुरुष यांना सारख्याच प्रमाणात असते परंतु स्त्रियांच्या प्रजनन आरोग्याच्या गरजा ह्या पुरुषांपेक्षा जास्त असतात. गरोदरपण, गर्भपात, बाळंतपण यासंबंधी येणाऱ्या अडचणी, प्रजनन अवयवांशी संबंधित आजार यामुळे स्त्रियांसाठी विशेष धोरण आखणे, आर्थिक तरतूद करणे गरजेचे ठरते. परंतु आपल्या देशात आरोग्य सुस्थितीत राखण्यासाठी ज्या घटकांची आवश्यकता असते त्याबाबत मोठ्या प्रमाणात विषमता आहे. विकसनशील देशांमध्ये व्यक्ती व जोडप्यांना माहितीचा अभाव व आरोग्य सेवांच्या कमतरतेमुळे प्रजनन क्षमतेचे नियमन आणि नियंत्रण करणे अशक्य होते. याचा प्रतिकूल परिणाम त्या समाजावर, देशावर होतो. म्हणूनच स्त्रियांच्या पुनरुत्पादक गरजांकडे समाज, शासन व आरोग्य यंत्रणा यांनी संवेदनशील पणे पाहिले पाहिजे.

प्रस्तावना :

पुनरुत्पादक आरोग्य आणि अधिकारांचे व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्यावर दूरगामी परिणाम होतात. आरोग्य व कल्याण हे लोकांच्या गर्भधारणेचे आणि जन्माचे नियोजन करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. गर्भधारणे दरम्यान व नंतर उच्च दर्जाची काळजी घेणे आवश्यक असते. वैयक्तिक आरोग्य व व्यापक विकासाचा विचार करता पुनरुत्पादक आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांमधील संबंध ओळखूनच गेल्या दशकात जागतिक उपक्रमांनी सुधारित आरोग्य, शिक्षण, आणि लैंगिक समानता यामध्ये बदल घडवून आणणे हे उद्दिष्ट ठेवले. विकसनशील देशांमध्ये व्यक्ती व जोडप्यांना माहितीचा अभाव व सेवांच्या कमतरतेमुळे प्रजनन क्षमतेचे नियमन आणि नियंत्रण करणे अशक्य होते. त्याचा परिणाम त्या व्यक्ती वा कुटुंबाच्या आरोग्यावर नाही तर संपूर्ण समाजावर व देशावर होतो. निसर्गाने मानववंश वाढीची स्त्रियांवर सोपविलेली जबाबदारी तिच्यावर पुनरुत्पादक आजारांचे ओझे वाढवते. 15 ते 44 वयोगटातील स्त्रियांमध्ये रोगांच्या दहा कारणांपैकी तीन कारणे पुनरुत्पादक आरोग्याशी निगडित असतात. तर विकसनशील देशांमध्ये दहा प्रमुख कारणांपैकी पाच कारणे पुनरुत्पादक परिस्थितीशी निगडित आहेत. ज्यामध्ये असुरक्षित गर्भपात हे महत्त्वाचे कारण आहे. स्त्रियांच्या पुनरुत्पादक आरोग्य प्रश्नांची व्याप्ती मोठी आहे. परंतु आपण इथे स्त्रियांच्या पुनरुत्पादक प्रश्नांची निगडित काही घटकांचा अभ्यास करणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. भारतातील स्त्रियांच्या प्रजननक्षम आरोग्याशी निगडित प्रश्नांचे विश्लेषण करणे.

२. स्त्रियांच्या प्रजननक्षम आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठीच्या तरतुदी, शासकीय धोरणे व योजना अभ्यासणे.

३. स्त्रियांच्या प्रजननक्षम आरोग्याशी निगडित प्रश्न सोडवण्यासाठी उपाय सुचवणे.

संशोधन पद्धती : प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी अवलंबलेली पद्धती स्पष्टीकरणात्मक व विश्लेषणात्मक आहे. माहिती संकलनाकरिता विविध प्रकाशने, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट या दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे.

स्त्रियांचे पुनरुत्पादक आरोग्य संक्षिप्त आढावा:

भारतातील स्त्रियांच्या पुनरुत्पादक क्षमतेवर अनेक घटकांचा परिणाम होत असतो. कारण या पुनरुत्पत्तीच्या प्रक्रियेवर रूढी-परंपरा, सामाजिक नियमने, सांस्कृतिक पैलू, यांचा प्रभाव असतो. पुनरुत्पादनाचे प्रश्न हे स्त्रियांचे आरोग्य,तिचा सामाजिक-आर्थिक स्तर, प्रजनन कालावधीत सहज उपलब्ध सुविधा, बाळंतपणांची संख्या, गरोदरपणात

आवश्यक विश्रांती व पोषक आहार, संतती नियमन साधनांचा वापर आणि अनपेक्षित गर्भधारणा व त्यातून होणारे गर्भपात यावर अवलंबून असते.

लोकसंख्या धोरणाचे लोकसंख्या नियंत्रण हा हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.पाचव्या कुटुंब आरोग्य सर्वेक्षणामध्ये (2019 ते 2021) एकूण प्रजनन दर २.१% इतका घटलेला दिसतो. कुटुंब नियोजन पद्धतीचा वाढलेला वापर व मर्यादित कुटुंबाचे महत्त्व याचे हे निदर्शक आहे. परंतु भारतात अजूनही लिंग गुणोत्तर 1000 मुलीं मागे 952 मुली असल्याचे दिसते. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, राजस्थान, बिहार, दिल्ली, झारखंड, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, ओडिशा, महाराष्ट्र या सर्व राज्यांमध्ये लिंग गुणोत्तर घसरल्याचे दिसते. मुलगा हवाच या मानसिकतेतून स्त्रियांवर वारंवार गर्भपात लादले जातात हेच यातून स्पष्ट होते.

टेबल क्र.1.स्त्रियांचे विवाहाचे वय व प्रजनन दर (%)

अ. क्र.	निर्देशक घटक	शहरी	ग्रामीण	एकूण
1	18 वर्ष वयाच्या आतील विवाहित स्त्रिया	14.7	27.0	23.3
2	15 ते 19 वयोगटातील माता व गरोदर स्त्रिया	3.8	7.9	6.8
3	1000 स्त्रियांमध्ये किशोरवयीन माता	27	49	43

National Family Health Survey (NFHS-5)2019-21

वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की भारतात अजूनही अठरा वर्षे वयाच्या आत विवाह झालेल्या स्त्रियांचे एकूण प्रमाण 23.3% असल्याचे दिसते. भारतातील पारंपारिक विचारसरणी, अज्ञान, शिक्षणाचा अभाव, गरीबी हे घटक अल्पवयीन विवाहास चालना देतात. 15 ते 19 वयोगटातील शारीरिक दृष्ट्या अपरिपक्व असलेल्या 6.8% स्त्रिया अल्पवयीन माता बनतात. अशा किशोरवयीन मातांची संख्या एक हजार स्त्रियांमध्ये 43 असल्याचे दिसते. अल्पवयीन गर्भवतींना बाळंतपणात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अपुऱ्या दिवसात बाळंतपण, अर्भक मृत्यूचा धोका तर काही वेळेला माता मृत्यूही होऊ शकतो.

टेबल 2. अर्भक व बालमृत्युदर(1000 जन्म घेतलेल्या बालकांमागे)

अ क्र.	निर्देशक घटक	शहरी	ग्रामीण	एकूण
1	नवजात बालक मृत्यू दर	18.0	27.5	24.9
2	बालमृत्युदर	26.6	38.4	35.2
3	पाच वर्षाखालील बालक मृत्यू दर	31.5	45.7	41.9

National Family Health Survey (NFHS-5)2019-21

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट दिसते की ग्रामीण भागात अर्भक मृत्यू दर 1000 जन्म घेतलेल्या बालकांमध्ये २७.७ असून हा शहरी व एकूण मृत्यू दरापेक्षा जास्त असल्याचे दिसून येतो. ग्रामीण भागात असणारा शिक्षणाचा अभाव, अज्ञान, अल्पवयातील मातृत्व यामुळे अर्भक मृत्युदर जास्त असल्याचे दिसते. त्याहीपेक्षा एक वर्ष वयोगटातील 1000 जन्मलेल्या बालकांमध्ये ग्रामीण भागातील मृत्यू दर 38.4 असल्याचे दिसते हे प्रमाण एकूण (35.2) बालमृत्यूपेक्षा जास्त असल्याचे दिसते. जन्मणाऱ्या बालकाचे अपुरे वजन, कुपोषण, श्वसनाचे आजार, जुलाब अशा आजारांना ही बालके बळी पडतात एक वर्षाखालील 60 टक्के मृत्यू या कारणांमुळे होतात. बालमृत्यूचे प्रमाण जेवढे जास्त तेव्हा तेवढ्या प्रमाणात

स्त्रियांना पुन्हा गर्भधारणेस सामोरे जावे लागते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणा नुसार एकूण प्रजनन दर 2.1 असला तरी 1000 जन्मा मागे पाच वर्षाखालील बालकांचा एकूण मृत्युदर 41 असून ग्रामीण भागातील मृत्युदर 45.7 एवढा आहे. 0 ते 6 वयोगटातील लिंग गुणोत्तर सातत्याने घटताना दिसते. यामागे पुत्र आसक्ती सारखे सांस्कृतिक कारण प्रकर्षाने दिसून येते. कुपोषण, आरोग्य गरजांकडे दुर्लक्ष, आरोग्याची हेळसांड यामुळे बालमृत्युदर आटोक्यात आणणे शक्य झालेले नाही.

टेबल-4 कुटुंब नियोजन पद्धती (15 ते 49 वयाच्या विवाहित स्त्रिया)

अ. क्र.	निर्देशक घटक	शहरी	ग्रामीण	एकूण
1	इतर पद्धती	69.3	65.6	66.7
2	आधुनिक पद्धती	58.5	55.5	56.5
3	स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया	36.3	38.7	37.9
4	पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया	36.3	38.7	37.9
5	IVD/PPUD	2.7	1.8	2.1
6	गोळ्या	4.4	5.4	5.1
7	निरोध	13.6	7.6	9.5
8	Injeectebl	0.4	0.6	0.6

National Family Health Survey (NFHS-5)2019-21

वरील कोष्टक द्वारे असे निदर्शनास येते की मागील पाच वर्षांमध्ये संतती नियमनासाठी वापरलेल्या पद्धतींचा राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या पाचव्या फेरीच्या आधारे स्पष्ट होते. ज्या समुदायांमध्ये अथवा क्षेत्रांमध्ये आर्थिक, सामाजिक प्रगती झाली आहे तिथे गर्भनिरोधकांचा वापर वाढला आहे. भारतीय समाजात पुनरुत्पादन नियंत्रणाची जबाबदारी स्त्रियांचीच असल्याचे गृहीत धरले जाते.तांबी, गोळ्या, इंजेक्टेबल, व इतर गर्भनिरोधक साधनांचाही काही प्रमाणात वापर होताना दिसतो. या कोष्टकात ठळकपणे दिसणारी बाब म्हणजे आपत्तीप्राप्तीनंतर कायमस्वरूपी करून घ्यावयाच्या नसबंदी शस्त्रक्रियांमध्ये पुरुषांचे प्रमाण अत्यंत अल्प 0.3% असल्याचे दिसते. पुरुषांसाठी ही शस्त्रक्रिया सोपी व सुलभ असूनही अशा शस्त्रक्रियेसाठी स्त्रियांनाच शासन स्तरावरून लक्ष्य केले जाते. त्यामुळे नसबंदीची शस्त्रक्रिया करण्यामध्ये शहरी स्त्रियांचे प्रमाण 36.3% व ग्रामीण भागात 38.1% असल्याचे दिसून येते.

याशिवाय राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणातून संतती नियमनाची गरज अपूर्ण राहिलेल्या स्त्रियांची संख्या ही निदर्शनास येते. 15 ते 49 वयोगटातील पुनरुत्पादक वयाच्या शहरी भागातील 8.4% ग्रामीण भागातील 9.9% तर एकूण 9.4% स्त्रियांना गर्भनिरोधकांची आवश्यकता असतानाही ही गरज अपूरी राहिल्याचे दिसते. याशिवाय मुलांमध्ये अंतर ठेवण्याची इच्छा असूनही काही स्त्रियांना गर्भनिरोधनाच्या साधनांचा वापर करता आलेला नाही अशा स्त्रियांचे एकूण प्रमाण 4.0% तर ग्रामीण भागात 4.3% असल्याचे दिसते. यातून हे स्पष्ट होते की संतती नियमनाची गरज अपुरी राहिलेल्या स्त्रियांना अनैच्छिक गर्भधारणेला सामोरे जावे लागते, बाळंतपणाला तोंड द्यावे लागते अथवा गर्भपात करून घ्यावा लागतो. याचा विपरीत परिणाम मुलांच्या पोषणावर, विकासावर, स्त्रियांच्या कार्यक्षमतेवर व शरीरावर होतो.

टेबल क्र-5 कुटुंब नियोजन सेवांचा दर्जा

अ क्र.	निर्देशक घटक	शहर	ग्रामीण	एकूण
1	आरोग्य सेवकांनी कुटुंब नियोजना संदर्भात कधीही माहिती दिली नाही अशा स्त्रियांची संख्या	23.0%	24.3%	23.9%
2	सध्या वापरल्या जात असलेल्या कुटुंब नियोजन साधनाच्या दुष्परिणाम विषयी कधीही माहिती दिली नाही	64.7%	61.5%	62.4%

National Family Health Survey (NFHS-5)2019-21

आरोग्य व कल्याण याचा समन्वय कुटुंब नियोजन सेवांच्या दर्जातून निदर्शनास येतो. आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून आरोग्य सेवा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचली पाहिजे यासाठी राज्यसंस्था प्रयत्न करते. असे असले तरी वरील आकडेवारी हे दर्शवते की एकूण 23.9% कुटुंबांपर्यंत व ग्रामीण भागात 24.3% लोकांपर्यंत कुटुंब नियोजनाची माहिती पोहोचली नसल्याचे दिसून येते. दुर्गम भागात मोजकीच आरोग्य केंद्र, आरोग्य सेवकांच्या कामातील हलगर्जीपणा निदर्शनास येतो. 60% पेक्षा जास्त वापरकर्त्यांना कुटुंब नियोजनाच्या साधनांच्या दुष्परिणाम बद्दल आरोग्य कर्मचारी सजग करत नाहीत. केवळ कुटुंब नियोजनाचे टारगेट पूर्ण करणे एवढीच त्यांची भूमिका असल्याचे दिसून येते. ही अत्यंत गंभीर बाब आहे.

स्त्रियांच्या पुनरुत्पादक आरोग्याच्या समस्या

मासिक पाळी: निसर्गाने स्त्रियांच्या शरीराची रचना मानववंश वाढीसाठी केली आहे. मुलीच्या जन्मापासूनच तिच्या शरीरात अंडाशय व गर्भाशय असते. साधारणता बाराव्या वर्षानंतर अंडाशयातील विविध स्त्रावांमुळे रक्तपुरवठा वाढतो. स्त्रीचे शरीर नव्या अंकुराची तयारी करते त्याचा उपयोग झाला नाही की स्त्रावाद्वारे बाहेर फेकून दिले जाते व तिच्या मासिक पाळीच्या चक्रास प्रारंभ होतो. या काळात मुली क्षय, स्कॉलिऑसिस सारख्या रोगांना जास्त बळी पडतात. स्त्रीची शरीररचना पुनरुत्पादनाला केंद्रस्थानी धरून घडलेली असते. मासिक पाळीत स्त्रीचे संपूर्ण शरीर वेठीस धरले जाते. अंडाशयातील अनेक स्त्रावांचा एकमेकांवर व स्त्रीच्या मज्जासंस्थेवर परिणाम होऊन असंतुलन निर्माण होते. परिणामी डोकेदुखी, चक्कर येणे, याबरोबरच स्त्रियांमध्ये चिडचिड वाढणे, मूड बदलणे, उदासी वाटणे व यापेक्षा गंभीर मानसिक परिणाम होतात. काहीना पाळीच्या सुरुवातीस रक्तदाब वाढतो किंवा खाली येतो, नाडी जलद लागते, कधी तापही येतो, पोटात दुखणे ही तक्रार सर्व स्त्रियांना अनुभवास येते. काहींना बद्धकोष्ठता व पाठोपाठ अतिसाराचा त्रास सुरू होतो. काही स्त्रियांमध्ये घशाला सूज येणे, कमी ऐकू येणे, दृष्टी त्या काळापूर्ती अधू होणे, अतिरिक्त घाम येणे हे त्रास आढळतात. सर्व स्त्रियांच्या रक्तातील लाल पेशी कमी होतात कॅल्शियमचे क्षार मासिक स्त्रावातून बाहेर फेकले जातात.

गर्भधारणा: गर्भधारणेची क्रिया नैसर्गिक आहे.परंतु सामाजिकदृष्ट्या आवश्यक आहे. गर्भधारणेमुळे स्त्रीला दीर्घकालीन शारीरिक त्रास सहन करावे लागतात. गर्भवती स्त्रीच्या शरीरातून अनेक पौष्टिक घटक गर्भाकडे शोषले जातात. ही तूट भरून काढण्यास फार वेळ लागतो. अशा काळात तिला सकस व पौष्टिक आहार मिळणे गरजेचे असते. रक्तातील लोहाचे प्रमाण खाली जाऊन तिला अशक्तपणा येतो. तिच्यामध्ये ॲनिमियाची लक्षणे दिसू लागतात. गर्भवती स्त्रीच्या शरीरात रासायनिक घडामोडी घडत असतात त्याचा परिणाम तिच्या मज्जासंस्थेवर होऊन तिचे मानसिक संतुलन बिघडते.

प्रजनन: प्रत्यक्ष बाळंतपण ही सुद्धा स्त्रीसाठी अत्यंत कष्टप्रद व काही वेळा धोकादायक प्रक्रिया असते. क्वचित प्रसंगी यात मूल, माता किंवा दोघांचाही मृत्यू होऊ शकतो. गर्भवती स्त्री किशोरवयीनमाता,कुपोषित, रक्त पांढरी असल्यास तिचे

गरोदरपण धोकादायक असते. अनेक स्त्रिया बाळंतपणानंतर शरीराने कमकुवत होतात. या काळात पोषक आहार, विश्रांती गरजेची असते. अनेक स्त्रियांना पाठ दुखी, कंबर दुखी यासारख्या व्याधी कायमच्या चिकटतात. मुलाला अंगावर पाजण्याने आईला थकवा येतो. कारण स्तनपानातून ती स्वतःच्या शरीरातील पोषक द्रव्येच मुलाला देत असते. अनेक स्त्रियांना स्तनपानाच्या काळात ताप येतो. मानववंशवृद्धीसाठी स्त्री कायमची दुबळी बनते.

गर्भनिरोधक: वयाच्या बाराव्या वर्षापासून साधारणता 49 व्या वर्षापर्यंत स्त्रीचे शरीर पुनरुत्पादनक्षम असते. सुरक्षित लैंगिक संबंध, दोन मुलांमध्ये अंतर, आपत्य प्राप्तीनंतर स्त्रियांना कायमच्या गर्भनिरोधक साधनांची गरज असते. राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाद्वारे मर्यादित कुटुंबाचे महत्त्व सार्वजनिक आरोग्य सेवांच्या माध्यमातून पोहोचवले जाते. पुरुषसत्ताक समाजात प्रजनन नियंत्रणाची जबाबदारी सर्वस्वी स्त्रीची मानून त्यासाठी स्त्रियांनाच लक्ष्य केले जाते. लैंगिक शिक्षणाचा अभाव, अज्ञान, गैरसमजुती यामुळे काही वेळा गर्भनिरोधकांचा वापर केला जात नाही. अलीकडच्या काळात अंगात टोचून घ्यावयाच्या व तोंडावाटे घ्यावयाच्या गोळयांचा वापर वाढला आहे. कारण स्त्रियांना स्वतःच्या पुनरुत्पादक क्षमतेवर अधिकार मिळवण्यात अधिक रस आहे. त्यामुळे बाजारात सोपे सुटसुटीत गर्भनिरोधक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्याचा वापरही वाढलेला आहे परंतु त्यांच्या दुष्परिणामांची जाण नसल्याने त्याचे गंभीर परिणाम स्त्रियांना भोगावे लागतात.

ओनियोजित गर्भधारणा व गर्भपात : दीर्घकाळ गर्भधारणेस सक्रिय असणारे स्त्रीचे शरीर तिच्यासाठी संकटच ठरते. अजान वयात होणारी फसवणूक, जबरी संभोग यामुळे होणारी गर्भधारणा हा भारतीय समाजात मोठा सामाजिक-नैतिक गुन्हा ठरतो. अशावेळी स्त्रिया घाबरून आत्महत्या करतात किंवा वाटेल त्या मार्गाने अघोरी उपायांनी गर्भपातासाठी प्रयत्न करतात. यातून मोठी शारीरिक हानी होते किंवा जीवास धोका पोहोचू शकतो. अनपेक्षित अथवा अनियोजित गर्भधारणा झाल्यास गर्भपात याशिवाय पर्याय राहत नाही.कमजोर आरोग्य, ॲनिमिया असणाऱ्या स्त्रियांवर अशी वारंवार गर्भपाताची वेळ आल्यास ते तिच्या आरोग्यास धोकादायक ठरू शकते. मुलगाच हवा या मानसिकतेपोटीही स्त्रियांना वारंवार गर्भपात करावा लागतो. याचे अत्यंत गंभीर परिणाम स्त्रियांच्या शरीरावर व मनावर होतात. बेकायदेशीर व अप्रशिक्षित व्यक्तींनी केलेले गर्भपात हे माता मृत्यू दर वाढवतात. काही वेळा बंदी असलेल्या गर्भपाताच्या गोळया डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतल्यास स्त्रियांच्या जीवावर बेतू शकते.

लैंगिक संक्रमित रोग: लैंगिक संक्रमित रोग हे संसर्ग झालेल्या व्यक्तीशी असुरक्षित लैंगिक संबंधामुळे होतात. लहान वयात मुलींचे होणारे लग्न, अज्ञान, स्त्रियांचे स्वतःच्या शरीरावर नियंत्रण नसणे, लैंगिक शिक्षणाचा अभाव यामुळे एड्स/ एच आय. व्ही., एस टी आय असे लैंगिक संक्रमित रोग होण्याची शक्यता असते. लैंगिकतेच्या भोवती असणाऱ्या शरमेच्या,लाजेच्या कारणास्तव वैद्यकीय सल्ला घेणे टाळले जाते. अशा रोगांमुळे काही वेळा वंध्यत्व येऊ शकते. प्रजनन मार्गांच्या आजाराचे प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये अडीच पट अधिक आढळते. परंतु याबाबतचे उपचार पुरुष अधिक घेतात. कारण आजारावर उघड बोलणे, उपचार करून घेणे स्त्रियांना अडचणीचे ठरते.

रजोनिवृत्ती: स्त्रीची वयाच्या 45 ते 50 दरम्यान पुनरुत्पत्तीच्या चक्रातून सुटका होते. पण हेही सहज घडत नाही. अनेक जणींना नैराश्याचा झटका येतो. काहींमध्ये अति उत्तेजित अवस्था दिसून येते. रक्तदाब वाढणे, डोळयासमोर अंधारी येणे, अचानक अंगामध्ये गरम वाफा येणे, असुरक्षित वाटणे, शरीरावर मेद वाढून वजन वाढणे तर काही वेळा पुरुषाचे शरीर धर्म दिसू लागतात. रजोनिवृत्ती मुळे होणाऱ्या शारीरिक असमतोलाशी जुळवून घेणे स्त्रीला कठीण जाते.

स्त्रियांच्या पुनरुत्पादक आरोग्यावर परिणाम करणारे घटक:

"प्रत्येक व्यक्तीला पुरेसे पोषक अन्न, स्वच्छ निवारा- परिसर, स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशा चांगल्या दर्जाच्या आरोग्यसेवा, रोजगार, शिक्षण या सुविधांची उपलब्धता म्हणजे आरोग्य होय".परंतु पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणात वरील घटकांपासून वंचित राहतात अथवा त्यांना भेदभावास सामोरे जावे लागते.

कुपोषण: भारतात समाजाच्या सर्वच स्तरात मुलीच्या जन्माचे स्वागत अभावानेच होते. मुलगी झाली तरी तिच्या आरोग्याची हेळसांड केली जाते. लहानपणापासून मुलींच्या आहार व आजाराकडे दुर्लक्ष केल्याने 0 ते 6 वयोगटातील लिंग गुणोत्तर सातत्याने कमी असल्याचे दिसून येते. पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत ताजे व सकस अन्न मुलींना अभावानेच मिळते. निम्न आर्थिक स्तरातील किशोरवयीन मुलींमध्ये ॲनिमिया मोठ्या प्रमाणात आढळतो. कुपोषित स्त्रियांमधील गरोदरपण, गर्भपात, बाळंतपण हे धोकादायक ठरते. म्हणूनच माता मृत्यू व बालमृत्यू दर वाढताना दिसतो.

शिक्षणाचा अभाव: भारतीय समाजात मुलींच्या शिक्षणापेक्षा तिच्या घर कामाला अधिक महत्त्व दिले जाते. ग्रामीण,दलित, आदिवासी, कनिष्ठ आर्थिक स्तरांमध्ये लहान भावंडांना सांभाळण्यापासून पाणी आणणे, सरपण गोळा करणे अशा कामांसाठी मुलींना शाळेत पाठवली जात नाही. श्रमिक, कष्टकरी वर्गामध्ये आर्थिक मोबदल्यासाठी मुलींना घराबाहेरच्या कामांमध्ये गुंतवले जाते. शिक्षणाअभावी स्त्रिया विकासापासून वंचित राहतात. स्त्रीचा शिक्षणाचा हक्क नाकारल्याने दुय्यम दर्जाचे जीवन त्यांच्या वाट्याला येते.

स्त्रियांवरील कामाचा बोजा: स्त्रियांच्या घर कामाला उत्पादक कामाचा दर्जा नसल्याने दिवसातले अकरा- बारा तास घरकाम करूनही तिच्या कामाला दुय्यम लेखले जाते. ग्रामीण स्त्री घरकाम, शेतातील काम व गृह उद्योगांमध्येही काम करते. कष्टकरी, कामगार वर्गातील स्त्रिया घरात व घराबाहेरही रोजगारासाठी राबतात. याशिवाय निम्न आर्थिक स्तरातील स्त्रियांना पाणी आणणे, सरपण गोळा करणे यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागते. अशा अतिरिक्त कामाच्या बोजामुळे तिचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. याशिवाय पुनरुत्पादक जबाबदारी पार पाडताना ती शारीरिक दृष्ट्या कायमची कमकुवत बनते.

आरोग्य धोरण व आरोग्य सुविधा: स्त्रियांच्या आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन व शासनाची आरोग्य धोरणे ही स्त्री केंद्री नाहीत. "बाई शिकली की कुटुंब शिकते"प्रसार व प्रचार म्हणजे स्त्रियांना शिक्षण देणे हा तिचा हक्क आहे हे अमान्य करणे होय. पुनरुत्पादक घटक म्हणूनच किशोरवयीन मुलींच्या आहार व आरोग्याकडे लक्ष केंद्रित केले जाते. स्त्रियांना पहिल्या दोन बाळंतपणासाठी अनुदान दिले जाते. पण तिसरे बाळंतपण हे सामाजिक सांस्कृतिक दबावामुळे होत असेल, पुरुषसत्ताक व्यवस्थित तिचे कशावरही नियंत्रण नसते ही बाब दुर्लक्षित केली जाते. असंवेदनशील शासकीय धोरणे स्त्रियांना न्याय देऊ शकत नाहीत.

स्त्री-पुरुष समानतेच्या संदर्भातील भारतातील संविधानिक तरतुदी

या तरतुदी स्त्रियांना आपले आरोग्य, प्रजनन आरोग्य याबाबत भेदभाव विरहित जगण्याची हमी देते

कलम 14-नुसार पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही राजकीय आर्थिक व सामाजिक क्षेत्रात समान हक्क व संधीची हमी दिली आहे

कलम 15 -नुसार धर्म, वंश, जात, जन्मस्थळ इत्यादीप्रमाणेच लिंगाच्या आधारेही राज्य नागरिकांमध्ये भेदभाव करणार नाही.

कलम 39- नुसार पुरुषांप्रमाणेच स्त्रिया नाही निर्वाहाची पुरेशी साधने मिळणे, त्यांना समान कामात समान वेतन मिळणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणे इत्यादीचा अधिकार दिला आहे.

कलम- 42 नुसार राज्याने कामधंद्याच्या बाबतीत न्याय व माणुसकीचे वातावरण निर्माण करावे. तसेच बाळंतपणासाठी स्त्रियांना मदत देण्याची व्यवस्था करावी अशी तरतूद केलेली आहे.

स्त्री प्रजनन आरोग्य संदर्भातील शासकीय योजना:

1. एकात्मिक बाल विकास योजना: या योजनेतील लाभार्थी शून्य ते सहा वयोगटातील बालक, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, 11 ते 18 वयोगटातील किशोरी मुली, 15 ते 45 वयोगटातील महिला, यांच्यासाठी पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, बालमृत्यू रोखणे, लसीकरण व अनौपचारिक पूर्व शालेय शिक्षण या उद्दिष्टांसाठी ही योजना कार्यरत आहे.

2. जननी सुरक्षा योजना: गरीब गर्भवती स्त्रियांना संस्थात्मक प्रसूती साठी प्रोत्साहन तसेच मातृ व नवजात मृत्यू दर कमी करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली. लाभार्थी शहरी स्त्रियांना 1000 रु. तर ग्रामीण स्त्रियांना 1400 रु. आर्थिक साह्य दिले जाते.

3.**प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना:** या योजनेअंतर्गत केंद्र सरकार महिलांना 6000 रु. प्रसूतीनंतरच्या काळजीसाठी महिलांच्या खात्यात जमा केले जातात.

स्त्रियांच्या पुनरुत्पादक आरोग्य प्रश्नांचे निराकरण करणारे उपाय

1. स्वतःच्या प्रजनन क्षमतेवर नियंत्रण ठेवण्याच्या स्त्रियांच्या हक्काबद्दल जागृती करून त्या हक्कांचे संरक्षण करणे.
2. प्रभावी, सुरक्षित, तात्पुरते संतती नियमन करता येणारी गर्भनिरोधके हा स्त्रियांचा हक्क आहे. त्यासाठी शासन पातळीवर प्रभावी उपाययोजना आवश्यक.
3. लैंगिक शिक्षणाच्या माध्यमातून प्रजनन आरोग्य सेवांच्याद्वारे किशोरवयीन मुलींना गर्भनिरोधके, गर्भपात आणि लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या रोगांची माहिती मिळणे आवश्यक
4. समाजातील प्रत्येक स्तरातील स्त्रीपर्यंत प्रसुती पूर्व सेवा, सुरक्षित बाळंतपणाच्या सेवा आणि प्रसुतीपश्चात आरोग्य सेवा मिळायला हव्यात
5. सर्व स्तरातील काम करणाऱ्या महिलांसाठी मातृत्वाच्या संदर्भातील फायदे, गर्भपात आणि नसबंदीच्या संदर्भातील रजा, तसेच कामाच्या ठिकाणी पाळणाघरांची सोय आणि स्तनपानासाठी जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे.
6. जबरदस्तीने गर्भनिरोध, नसबंदी, गर्भपात करायला लावणे तसेच मनाविरुद्ध लग्न, गरोदरपण किंवा पालकत्व यापासून स्त्रियांना संरक्षण मिळावे
7. स्त्री विवाहित असो किंवा नसो सुरक्षित प्रभावी आणि पुरुषांचा सहभाग वाढवणारी गर्भनिरोधके सहज उपलब्ध व्हावी.
8. स्त्रियांना रजोनिवृत्तीच्या काळात त्यांचे होऊ शकणारे परिणाम, नैसर्गिक असमतोलाशी जुळवून घेण्याविषयी माहिती समुपदेशनाद्वारे दिली पाहिजे.
9. स्त्रियांच्या प्रजनन आरोग्याच्या विशेष स्तनांचा व गर्भाशयाचा कर्करोग, अंग बाहेर येणे यांची तपासणी निदान व उपचारासाठी विशेष कार्यक्रम राबवले पाहिजेत.
10. लोहाच्या गोळया व रक्त पांढरी संबंधी आरोग्य शिक्षण स्त्रियांना दिले पाहिजे.

निष्कर्ष भारतीय समाजात स्त्रियांच्या आरोग्य गरजांकडे पुनरुत्पादक मातृत्वाच्या भूमिकेतूनच पाहिले जाते. वस्तुतः समाजातील स्त्रीचे स्थान, दुय्यम दर्जा यामुळे तिला आयुष्यभर अनेक प्रकारच्या भेदभावाला सामोरे जावे लागते. कुटुंबात पोषण व आरोग्य सेवांच्या वाटपात केली जाणारी विषम विभागणी स्त्रियांच्या सर्वच गरजांची हेळसांड करणारी आहे. बालपणातील कुपोषण, किशोर वयातील ॲनिमिया यामुळे आधीच कमजोर असणारे स्त्री शरीर गर्भावस्था,

बाळंतपण, स्तनपान या पुनरुत्पादक कामामुळे अनेक प्रकारच्या व्याधींना बळी पडते. अजूनही समाजातील काही घटकांना प्रजननक्षम आरोग्य सेवांपासून वंचित राहावे लागते. वंशवृद्धीसाठी आपले शारीरिक, मानसिक अस्तित्व पणाला लावणाऱ्या स्त्रियांच्या पुनरुत्पादक गरजांकडे समाज व राज्य संस्था यांत्रिकदृष्टीने पाहते.

संदर्भ:

1. कुंटे माधवी "स्त्री सूक्त"(2009) डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
2. गोखले करुणा "बाई माणूस" (2010) राजहंस प्रकाशन, पुणे
3. सिमोन द बोव्हआर "द सेकंड सेक्स"(अनु- करुणा गोखले)(2010) पद्मगंधा प्रकाशन, पुणे
4. https://www.betterhealth.vic.gov.au/campaigns/womens-sexual-and-reproductive-health
5. https://www.un.org/womenwatch/daw/csw/issues.htm
6. https://embrywomenshealth.com/common-reproductive-health-concerns-every-women-should-be-aware-of/
7. https://mr.vikaspedia.in/health

***सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी**

Email-meenasawant60@gmail.com

***

खेळ विश्वातील लिंगभाव असमानता

*प्रा.आर्या किरण पाटील

गोषवारा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. असे भारतीय नागरिकांच्या मुखामुखात जरी वाक्य नेहमी असले तरीदेखील भारतामध्ये आज स्त्री आणि पुरूष यांच्या बाबतीतील लिंगभाव असमानता कायम आहे.

खेळ विश्वातील लिंगभाव असमानता समजून घेण्यासाठी या शोधनिबंधामध्ये चित्रपटांच्या माध्यमातून भारतीय महिला खेळाडूंनी जो खडतर प्रवास केलेला आहे. जी अपार मेहनत केलेली आहे, जो पुरूषसत्ताक मानसिकतेला फाटा दिलेला आहे, तो या चित्रपटांमधून प्रकर्षाने जाणवतो.

सूचक शब्दावली : खेळ, लिंगभाव, असमानता.

प्रस्तावना :

भारत देशात विविधता आणि एकता अस्तित्वात असली तरीदेखील आजही सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, क्रिडा क्षेत्रात भेदभाव कायम आहे. विविधतेने तुडुंब भरलेल्या या देशात आजही क्रिडाक्षेत्रात प्रत्येक स्त्रीला खडतर प्रवास करावा लागतो आणि मग पुढे ध्येयापर्यंत पोहोचता येते ते पण सहजासहजी नाही. भारतीय समाज पितृसत्ताक असल्यामुळे आज एकविसाव्या शतकामध्ये देखील इतर क्षेत्रांबरोबरच क्रिडाक्षेत्रामध्ये देखील लिंगभाव असमानता असल्याचे जाणवते.

या पुरूषसत्ताक व्यवस्थेचा परिणाम असा झाला आहे की, प्रत्येक गोष्ट मिळवण्यासाठी स्त्रियांना नेहमीच संघर्ष करावा लागतो. आज 'स्त्री म्हणजे केवळ संघर्ष असे जणू समीकरणच बनले आहे.' असेच म्हणावे लागेल.

प्रस्तुत शोधनिबंध हा खेळ विश्वामध्ये लिंगभाव असमानता अभ्यासण्यासाठी महत्वाचा आहे. त्यासाठी क्रिडा क्षेत्रामध्ये येण्यासाठी किंबहुना खेळ खेळण्यासाठी जो त्याग करावा लागतो, अपार मेहनत घ्यावी लागते, ती ज्या चित्रपटांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवली आहे अशा चित्रपटांचा संदर्भ या ठिकाणी घेतलेला आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे. यामध्ये भारतातील महिला खेळाडूंची आत्मचरित्रे, चरित्रे, हिंदी चित्रपटांचा अभ्यास करून शोधनिबंध केलेला आहे.

उद्दिष्टये :

१. खेळाची संकल्पना अभ्यासणे.

२. खेळ विश्वातील लिंगभाव असमानता अभ्यासणे.

विषय विवेचन :

व्यक्तीचे जैविक प्राण्यातून सामाजिक प्राण्यामध्ये रूपांतर करण्यासाठी जसे कुटुंब, सवंगडी, शाळा, शेजारील समूह महत्वाचे असतात. त्याच पध्दतीने व्यक्तींचे समाजीकरण घडून येण्यासाठी खेळांची भूमिका देखील अतिशय महत्वाची आहे. एकंदरीत खेळामुळे मनुष्याचा सामाजिक, मानसिक, शैक्षणिक, व्यक्तिमत्व विषयक दर्जा सुधारण्यास मदत होते. एकंदरीत खेळ हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासाचेच नव्हे तर समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन देखील आहेत. भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून खेळाची संकल्पना मानवाला व भारतीय संस्कृतीला ज्ञात होती.

प्राचीन कालखंड, वैदिक कालखंड, मराठा काळ, पेशवेकाळ, मोगल काळ, ब्रिटीश कालखंड, स्वातंत्र्योत्तर कालखंड इ. अनेक कालखंडामध्ये खेळाचे स्वरूप बदलत गेले. पारंपरिक खेळांची जागा ब्रिटीश कालखंडामध्ये पाश्चात्य खेळांनी घेतली. उदा.टेनिस, फुटबॉल, क्रिकेट, हॉकी, रायफल शुटींग इ. अनेक. अशा पध्दतीने खेळांमध्ये देखील विविधता असलेल्या या देशात मेजर ध्यानचंद, नॉर्मन प्रिचर्ड, खाशाबा जाधव, अभिनव बिंद्रा, धोनी, तेंडूलकर, गगन नारंग इ. अनेक भारतीय खेळाडूंनी जी उल्लेखनीय कामगिरी केली त्या कामगिरीला खांद्याला खांदा देत किंबहुना त्यांच्याहून एक पाऊल पुढे भारतीय महिला खेळाडूंनी देखील कामगिरी केली आहे. ज्यात, करनाम मल्लेश्वरी, मेरी कोम, पी.टी.उषा, गीताकुमारी फोगाट, सानिया मिर्झा, मिराबाई चाणू, सायना नेहवाल, पी.व्ही.सिंधू इ. अनेक खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये खेळ विश्वातील लिंगभाव असमानता जाणून घेण्यासाठी तसेच ती ज्या चित्रपटांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचली आहे. अशा चित्रपटांचा संदर्भ या ठिकाणी घेतलेला आहे.

भारताची कुस्तीपट्टू गीताकुमारी फोगाट यांच्या जीवनावर आधारीत २०१६ मध्ये दंगल चित्रपट प्रदर्शित झाला आणि त्याचाच आधार घेत नेताजी गायकवाड यांनी 'नारीशक्ती' कुस्तीगीर फोगाट भगिनींची यशोगाथा असे एका चरित्र्याचे लेखन केले.

हरियाणा राज्यातील बल्लाली या छोटयाशा गावात राहणाऱ्या फोगाट कुटुंबाची जीवनगाथा या चित्रपट व चरित्र्यामध्ये दाखवलेली आहे. सामाजिक सुधारकांचे जग म्हणून आपण २१ व्या शतकाकडे बघत असलो तरी आजही अनेक भागामध्ये जसे हरियाणा मुलगा–मुलगी असा भेद कायम आहे. महावीर सिंग फोगाट यांना सर्व कन्यारत्नच झाल्यामुळे त्यांनी मुलींनाच कुस्तीचे धडे देण्याचे ठरवले. तेंव्हा गावातल्या लोकांनी तीव्र विरोध केला. मुली कधी असले लांडे कपडे घालतात का? मुली कधी शड्डू ठोकून आखाड्यात उतरतात का? त्यांचे लग्न कसे होणार? अशा अनेक प्रश्नांनी त्यांना गोंधळून टाकले. या सर्व प्रश्नांवरून असे लक्षात येते की हरियाणा सारख्या राज्यात आजही लिंगभाव जोपासला जातो.

भारताची बॉक्सींगपट्टू मेरी कोम यांच्या जीवनकथेवर आधारीत मेरी कोम हा चित्रपट २०१४ मध्ये प्रदर्शित झाला. तसेच मेरी कोम यांचे 'अनब्रेकेबल' नावाचे आत्मचरित्र देखील प्रसिध्द आहे. या दोन्ही गोष्टी आपण जेव्हा पडताळतो तेव्हा मेरी कोमच्या बाबतीत बॉक्सिंग क्षेत्रातही लिंगभाव विषमतेची दृश्ये लक्षात येतात. सुरूवातीला तिच्या घरामध्येच वडिलांचा विरोध होता. कारण बॉक्सिंग खेळल्याने अवयवांना दुखापत होईल, शरीर दुबळे होईल अशा अवस्थेत विवाह कोण करेल? अशी भीती असल्यामुळे त्यांनी सुरूवातीला विरोध केला. परंतु नंतर त्यांनी परवानगी दिली. चित्रपटामध्ये मेरीने भावनादेखील व्यक्त केली आहे ती म्हणजे, 'भारतामध्ये खेळात मुली मागे आहेत कारण इथे असलेल्या सोयी–सुविधा, साधनांची आणि पौष्टीक आहाराची कमतरता.

प्रकाशी तोमर आणि चंद्रो तोमर या उत्तर प्रदेशातील शार्पशूटर होत्या. त्यांच्या जीवनावर आधारित साँड की आँख हा चित्रपट २०१९ मध्ये प्रदर्शित झाला. एकंदरीत या चित्रपटाकडे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून बघितले तर तोमर कुटुंब हे पुरूषसत्ताक व्यवस्था असलेले आहे. कुटुंबप्रमुखाचा प्रचंड पगडा कुटुंबावर आहे. कुटुंब नियोजन नसल्यामुळे मुलांचे जन्मण्याचे प्रमाण देखील अधिक आहे. घरातील स्त्रियांना बंधनामध्येच रहावे लागते जसे पडदा पध्दत. घरातील हक्कांपासून आणि अधिकारांपासून वंचित अशा तोमर कुटुंबातील स्त्रिया होत्या. पुरूषप्रधान व्यवस्थेमुळे बंदूक मुलींच्या हातात शोभत नाही. चूल आणि मूल एवढेच त्यांनी करायचे असे बंधन तोमर कुटुंबामध्ये होते. पण एवढ्या सर्व बंधनातून चंद्रो तोमर मोठ्या धाडसाने निर्णय घेतात तो म्हणजे रायफल शुटींग खेळण्याचा. मुलींच्या हाताला बंदूक शोभत नाही या वाक्याला फाटा देत त्यांनी सराव सुरू केला.

इंडियन हॉकी गोलकिपर आणि महिला हॉकी संघाचे प्रशिक्षक रंजन नेगी यांचे २००२ मध्ये कॉमनवेल्थ गेम्समध्ये महिला हॉकी संघाला दिलेल्या योगदानावर आधारित चक दे इंडिया हा चित्रपट २००७ मध्ये प्रदर्शित झाला. महिला हॉकी संघाला स्पर्धेत सहभागी होण्यापासून ते स्पर्धेला सामोरे जाण्यापर्यंत जो खडतर प्रवास करावा लागला, जी लिंगभाव असमानतेची वागणूक मिळाली ती या चित्रपटातून दाखवण्यात आलेली आहे.

भारताचा राष्ट्रीय खेळ हॉकी असून देखील त्या खेळाकडे तेवढ्या आकर्षिकतेने बघितले जात नाही. जेवढे क्रिकेटकडे बघितले जाते. चित्रपटामध्ये देखील इंडियन हॉकी असोसिएशनच्या अधिकाऱ्यांनी लिंगभाव जोपासलेला आपणांस दिसून येतो. महिला संघाच्या निवड चाचणीवेळी त्यांनी 'त्या मुली आहेत, त्या काय खेळणार, शेवटपर्यंत कुठे टिकणार आहेत, त्यांच्याकडून आपल्याला काय फायदा' असे भाष्य केलेले आहे. खरे पाहता एका देशातील खेळाचे अधिकारी जर असा लिंगभाव करायला लागले तर भारत खेळामध्ये प्रगती करू शकणार नाही त्यामुळे मुली व मुले यांना योग्य आणि समानतेचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

निष्कर्ष :

भारतीय समाज पुरूषसत्ताक असल्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रवेश करताना स्त्रियांना खडतर प्रवास करावा लागला आहे. क्रिडा क्षेत्राचा विचार करता दुर्गम भागातून आलेल्या अनेक महिला खेळाडूंना समाजरचनेशी संघर्ष करावा लागला आहे.

चित्रपट एक दृकश्राव्य माध्यम आहे. ज्याच्या माध्यमातून समाजावर सकारात्मक बदल देखील घडून येत असतात. अशा क्रिडापट्टूंच्या जीवनगाथांवर प्रकाश टाकत चित्रपटांची निर्मिती केल्यामुळे खऱ्या अर्थाने क्रिडाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिला खेळाडूंचा खडतर प्रवास समाजासमोर येऊन समाजरचनेत निश्चितच लिंगभाव समतेची जाणीव होते हे नक्कीच.

संदर्भ ग्रंथ :

१. जर्दे श्रीपाल, शारीरिक शिक्षणाचा इतिहास, अंबा प्रकाशन, कोल्हापूर (फेब्रुवारी १९८८).
२. बच्चेवार दीपक, शारीरिक शिक्षणाचा पाया व इतिहास, संकेत प्रकाशन, नांदेड – (ऑक्टोबर, २००२).
३. कोम मेरी, अनब्रेकेबल – एक आत्मचरित्र, मंजुल पब्लिशिंग हाऊस, (२०१४).
४. गायकवाड नेताजी, नारीशक्ती कुस्तीगीर फोगट भगिनींची यशोगाथा, वरदा बुक्स पुणे – डिसेंबर २०१५.

चित्रपट :

१. अमीन शिमित, चक दे इंडिया, (२००७).
२. कुमार ओमुंग, मेरी कोम, संजय लिला भन्साळी प्रॉडक्शन, सप्टेंबर २०१४.
३. तिवारी निलेश, दंगल, अमिर खान प्रॉडक्शन, (२०१६).
४. हिरानंदिनी तुषार, साँड की आँख, ऑक्टोबर २०१९.

*समाजशास्त्र विभाग, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

***

महिला आरोग्य हक्क चळवळ

*संगीता राजापूरकर चौगुले

प्रस्तावना –

भारतीय समाजामध्ये स्त्री-पुरुषाशिवाय समाजाची कल्पनाच करता येता येत नाही म्हणजे संसाररुपी रथाची स्त्री व पुरुष ही अविभाज्य चाके आहेत. समाजकारण, राजकारण, नितीशास्त्र, अर्थकारण, धर्मकारण, संस्कृती साहित्य आणि विज्ञान या मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महिलाचे योगदान पुरुषाप्रमाणे दिसून येत असले तरीही महिलाना कमी लेखले जाते. पुरुषी समाजाच्या विचाराने महिलाना अनेक वर्षे दुय्यम समजले गेले तिला न्याय देण्याऐवजी तिच्यावर अनेक अन्याय केले की, तिचे स्वातंत्र्य, अस्तित्व आरोग्य धोक्यात आले.

समाजाकडून होणारा अन्याय, अत्याचार, दु:ख, यांच्या विरोधात महिला मनातल्या मनात विचार करत होती. हा विचार प्रत्यक्षात उतरविण्यासाठी काही महिला चळवळी व समाजसुधारकांनी प्रयत्न केले, समान अधिकार, आर्थिक स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, मतांचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार यासारख्या मागण्यासाठी महिलांनी हक्क चळवळ उभी केली यासाठी 19 व्या शतकात Women liberation ही महत्वपूर्ण चळवळ मानली गेली. या चळवळीचे नेतृत्व केवळ महिलांनीच केले नाही तर अनेक पुरुषांनी या चळवळीचे नेतृत्व केले.

उद्देश –

1) महिला आरोग्य संकल्पना समजून घेणे.
2) महिलांच्या आरोग्य समस्यांचा आढावा घेणे.
3) महिलांची हक्क चळवळ जाणून घेणे.

गृहितकृते –

1) महिलांना हक्क व अधिकार आहेत.
2) महिलांच्या दुर्लक्षामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

तथ्यसंकलन – प्रस्तुत शोध निंबधासाठी व्दितीय स्त्रोताचा वापर करणेत आलेला आहे.

संकल्पनात्मक मांडणी –

1) आरोग्य – "शारीरिक, मानसिक, सामाजिक दृष्टीने व्यवस्थित आणि रोगमुक्त असण्याची अवस्था म्हणजे आरोग्य होय "
2) हक्क - "हक्क म्हणजे सामाजिक जीवनातील अशी परिस्थिती की जिच्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वत:चे जीवन उत्तम प्रकारे जगू शकणार नाही. "
3) चळवळ - " चळवळ ही एक सामुहिक कृती असते, त्यात अनेक लोकांचा सक्रीय सहभाग अपेक्षीत असतो "

आशय विश्लेषण –

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा , शिक्षण, आरोग्य या मुलभूत गरजा असूनही या गरजांकडे महिलांचा कानाडोळा झालेला दिसून येतो. काही वेळेस स्वत:हून तर काही वेळेस पुरुषी विचारामुळे महिलांच्या या गरजांकडे

दुर्लक्ष होते. याकडे दुर्लक्ष होवू नये म्हणून मानवी जीवनामध्ये हक्काला अतिशय महत्व आहे. हक्काशिवाय कोणालाही आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करता येत नाही. हे हक्क नैसगिक, सामाजिक असतात. त्यामुळे महिलांनी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या गरजा पूर्ण करणेसाठी हक्काची जोपासना करणे गरजेचे असते परंतु महिला हक्काकडे दुर्लक्ष करुन कामाला जास्त महत्व देतात काम करत असताना महिलांना दुहेरी भूमिका पार पाडावी लागते. एक म्हणजे की, ती ज्या ठिकाणी ज्या क्षेत्रात काम करते तेथील जबाबदारी पार पाडावी लागते. आणि दुसरी म्हणजे कुटूंबातील जबाबदारी होय. जी की तिला फक्त जन्माने स्त्री आहे म्हणून पार पाडावी लागते. महिलांच्या वाट्याला आलेली ही भूमीकेची देण त्यांना अनेक प्रकारे त्रास दायक ठरते. या दोन्ही भूमिकांमुळे तिच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. यातून काही केल्या तिची सुटका होत नाही. मुलांचे संगोपन शाळा,आजार, घरातील इतर व्यक्तीच्या आवडीनिवडी यासारख्या अनेक जबाबदाऱ्या तिच्यावरच असतात. शिवाय काही संयुक्त कुटूंबात वृध्द व्यक्तींची देखभाल करणे हे महिलांचे कर्तव्य आहे, अशी पितृसत्ताक व्यवस्थेने बांधणी केलेली आहे शिवाय पतिच्या शारीरिक गरजा त्याच्या ईच्छेनुसार पूर्ण करणे हे तर तिचे आदय कर्तव्य धर्म संस्थेने आणि धार्मिक ग्रंथांना ठरवून दिले आहे. या सर्वाचा नकारात्मक परिणाम तिच्या शरीरावर, मनावर होतो कुटूंबातील विविध जाबाबदाऱ्या घरातील सर्व सदस्यांचे आरोग्य निटपणे संभाळणारी स्त्री स्वत:च्या आरोग्याकडे मात्र फारसे लक्ष देत नाही. किंबहुना त्यासाठी तिला वेळच मिळत नाही कामाचा अतिरिक्त ताण, कुटूंबाकडे दुर्लक्ष त्यामुळे मनाची होणारी घालमेल, मनाची होणारी मानसिक कुचंबना, पर्यायाने शरिरावर होणारे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे दुरगामी दुष्परिणाम, त्यातून वाढत्यावयानुसार रक्तदाब, मधुमेह, चिडचिडेपणा यामुळे असमाधानी जीवन प्रणाली वाढत जाते. त्याचबरोबर काही स्त्रियांचा कामाच्या निमित्ताने इतर पुरुषांची संबंध येतो तर काही वेळा कामानिमित्त जास्त वेळ जातो अशावेळी चारित्र्याविषयी काही पुरुष संशय घेतात. त्यामुळे अशा महिलांचे वैवाहिक जीवन दु:खी व असमाधानी बनते त्यातून त्यांच्या जीवनामध्ये नैराश्य निर्माण होते या नैराश्येपोटी संघर्ष समज गैरसमज वाढत जातो तर काही वेळा त्यांचे रुपांतर घटस्फोटात होते. यामुळे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक समस्या निर्माण होतात.

घटस्फोटीत कुंटूबातील महिलांच्या जीवनात कौटूंबीक ताणतणाव वाढत जातो अशा महिलांच्या जीवनात एकटे पणाच्या समस्या वाढतात बदलत्या वैवाहिक जीवनामुळे मानवाचे जगणे अधिक गुंतागुंतीचे बनत आहे. परिणामी जीवनाची अस्थिर अवस्था निर्माण होत आहे. साहजिकच त्यामुळे महिलांचे आरोग्य बिघडत जात आहे. 1975 साली डॉक्टर व त्यांना सहकार्य करणाऱ्या घटकांचा एकात्मिक विचार करणेसाठी नियुक्त केलेल्या समितीने आरोग्य शिक्षणात व्यक्ती आणि समाज या दोन्ही पातळयावर लोकांची सामाजिक पार्श्वभूमी, नैसगिक परिसर, राहणीमान या घटकांचा विचार करुन सर्वांना आरोग्य शिक्षण देणे हा मूलगामी विचार मांडला. विशेषत: महिलांच्या आरोग्याकडे शासनाने जास्त लक्ष्य देणे, महिला संदर्भात असणारे हक्क त्यांच्या आरोग्याच्या रक्षणार्थ फार महत्वाचे आहे. आरोग्य रक्षणासंदर्भात "सार्थ योग रत्नाकर" मध्ये दर्शन सपर्श प्रश्ने : परीक्षेतच रोगिणम ॥ रोग निदान प्रागुप लक्षणोपशयातिमि । असे म्हटले जाते रोगनिदान करणेसाठी जागतिक आरोग्य संघटनेने 1848 मध्ये महिलांचा जन्मदात अधिकार असा गौरोल्लेख करुन 'राईट्स टू पेशंटस जाहिर केला. तर 1986 च्या भारतीय ग्राहक संरक्षण कायद्याअंतर्गत महिलांच्या न्याय अधिकाराचा

विचार करण्यात आला. भारतीय घटनेने अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षणाबरोबरच आरोग्य हा मुलभूत अधिकार बहाल केला आहे. त्यानुसार डॉक्टरकडून भेदभाव विरहित आरोग्य सेवा उपलब्ध होणे, समाधानकारक माहिती मिळणे, निदानाची संभाव्य दिशेची माहिती उपलब्ध करुन देणे, आरोग्य सेवेची नेमकी शुल्क आकारणी पावती देणे, डॉक्टरांची व्यावसायीक पात्रता जाणून घेणे, तातडीच्या क्षणी प्रथमोपचार न मिळाल्यास न्यायालयात दाद मागता येणे असे न्याय हक्क महिला रुग्णांना मिळालेले आहेत. मानवी हक्काचे जागतिक स्वरुप असून ते नैसगिक व सामाजिक स्वरुपानुसार समाजात कर्तव्याशी निगडीत समानता निर्माण करणेसाठी असतात. ही समानता निर्माण करणेसाठीच महिला चळवळी सक्षमपणे कार्य करीत असतात. मानवी हक्क हे वैश्विक स्वरुपाचे आहेत. माणूस म्हणून संपूर्ण जगातील व्यक्तीचा विचार यामध्ये केला जातो कोणत्याही जाती धर्माचा, वंशाचा भेदभाव न करता जगातील सर्व नागरिकांना समान अधिकार मिळाले पाहिजेत हे मानवी हक्क प्रत्येक व्यक्तीला मिळाले पाहिजेत. कारण हे नैसगिक स्वरुपाचे असतात. मानवी हक्कामुळे व्यक्तीचा विकास होतो. विकास करण्यासाठी मानवी हक्क आणि मानवी कर्तव्य एकत्रितपणे कार्यरत असावी लागतात. हक्कापासून महिला दुरावल्यामुळे त्यांच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामध्ये दुहेरी भूमिकेची समस्या अर्थिक शोषणाची समस्या, असमाधानी वैवाहिक जीवन, कौटूबिंक ताणतणाव, काम किंवा घर या ठिकाणी अन्याय, अत्याचार, एकटेपणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, महिलांच्या जीवनामध्ये निर्माण झालेल्या दिसून येतात. परंतु यासाठी शासनाने योग्य निर्णय घेणे व महिलांच्या पारडयात योग्य न्याय देणे गरजेचे आहे. पण बहुतांश वेळा महिला या न्यायापासून दूर राहतात. यासाठी समाज व पुरुषीप्रवृत्ती कारणीभूत ठरते सुपर वुमन म्हणून काम करणाऱ्या महिला वयानुसार थकतात व आजारी पाडतात अशा वेळी त्यांच्या निर्णयांचा विचार केला जात नाही त्यावेळी त्या ताणतणावामध्ये असतात ताणतणावामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येते. कुटूंबातील विविध जबाबदाऱ्या संभाळणारी स्त्री स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करते ती कुटूंबासाठी फार हानीकारक बाब ठरते.

महिला आपल्या आरोग्य हक्काबाबत जागरुक व्हावी त्याचबरोबर महिलांच्या आरोग्याबाबत समाजात संवेदना निर्माण होणे गरजेचे आहे. कुटूंबातील पुरुष सदस्यांनी महिलांच्या समस्येकडे लक्ष देणे आवश्यक आहे. चांगला पौष्टिक आहार, व्यायाम, चांगल्या सवयी मानसिक ताणतणावातून मुक्तता आणि वेळेवर आरोग्याची तपासणी व त्यानुसार वैद्यकीय सल्ल्यांची अमंलबजावणी यावरच महिलांचे सुदृढ आरोग्य अवलंबून असते आधुनिक काळात महिलांच्या आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

कामाचा अतिव्याप, कुटूंबाची जबाबदारी, चुकीचा आहार विहार, वेळेअभावी व्यायामाचा अभाव, समाजातील चुकीच्या रुढी-परंपरा, अंधश्रध्दा, वैद्यकीय सुविधांचा अभाव व महत्वाचे म्हणजे स्वत:च्या वैयक्तिक आरोग्याकडे दुर्लक्ष इत्यादी कारणामुळे महिलांचे अनेकविध आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, गर्भाशयाचे विविध आजार, पित्ताशयातील खडे, संधीवात, मुत्राशयाचे रोग इ. आजाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे पोषण विरहित आहार, हिरव्या पालेभाज्याचां कमी वापर, अधिक तेलकट पदार्थाचे अतिसेवन, शारीरिक श्रमाचा अभाव, बैठी जीवन पध्दती, तसेच सौंदर्यांसंबधी चुकीच्या संकल्पना, उशीरा होणारा विवाह, मानसिक ताणतणाव इ.गोष्टीमुळे सर्वच महिलांचे विविध प्रश्न आहेत.

निष्कर्ष –

1) महिला हक्कापासून वंचित असलेमुळे चळवळीची आवश्यकता आहे.
2) महिलांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत.
3) महिलांच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत अधिकाधिक जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.
4) आहाराविषयक जागृती, मानसिक ताणतणाव, कुटूंब व काम याबाबतीत समतोल सांभाळणेसाठी समर्थन प्रणाली निर्माण करणे आवश्यक आहे.

संदर्भसूची–

1) बोरकर दत्तो बल्लाळ - सार्थ योग रत्नाकर
2) जोशी लक्ष्मण शास्त्री - मराठी विश्वकोश
3) मांजरे रामकिशन / गायकवाड श्रीकांत - भारतातील सामाजिक चळवळी
4) काळदाते सुधा - वैद्यकीय समाजशास्त्र
5) शाह घनश्याम - भारतातील सामाजिक चळवळी
6) वाघमारे सुरेश - वैद्यकीय समाजशास्त्र
7) शिंदे ज.रा. - समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या

***संशोधक, विद्यार्थी समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. जि. कोल्हापुर.**

***

असंघटीत क्षेत्रातील महिलांच्या वेतनातील लिंग असमानतेचा सामाजिक–आर्थिक अभ्यास

*मधुरा जयंत कुलकर्णी

❖ प्रस्तावना:

भारतीय समाजव्यवस्थेचे पारंपारिक लक्षण म्हणजे पितृसत्ता. पितृसत्तेतूनच भारतीय अर्थव्यवस्थेत लिंग असमानता रुजली. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये, धर्मसंस्थेमुळे, राजनैतिक व्यवस्थेमुळे, तसेच अर्थव्यवस्थेमुळे पुरुषांना स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ मानले गेले. स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, धार्मिक, भावनिक व मानसिक, अशा सर्वच पातळ्यांवर दुय्यम मानले गेले. त्यातून स्त्रीचे सर्वच पातळ्यांवर शोषण झाले. आज, एकविसाव्या शतकातील स्त्री काही मर्यादित पातळ्यांवर स्वावलंबी आणि शोषणापासून मुक्त होताना दिसत असली, तरी अद्याप बहुतांश पातळ्यांवर, मुखत्वे सीमांत स्त्रियांचे, शोषण थांबलेले नाही. अनेक क्षेत्रांत या शोषणाची तीव्रता गंभीर आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात असंघटीत क्षेत्रातील महिलांच्या वेतनासंदर्भातील लिंग असमानतेचा सामाजिक–आर्थिक अभ्यास करण्यात आलेला आहे. पितृसत्तेमुळे होणारे सामाजिक, भावनिक व मानसिक शोषण आणि भांडवलशाही व सावकारीमुळे होणारे आर्थिक शोषण, कायद्याचे पुरेसे संरक्षण नसल्यामुळे सहन करावी लागणारी अनिश्चितता, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याकरिता आवश्यक ज्ञानाची कमतरता, अशा बहुस्तरीय शोषणाचा सामना या स्त्रियांना करावा लागतो. निव्वळ लिंगभावामुळे स्त्रियांना समान वेतन नाकारणे ही स्त्रियांच्या मानवी हक्कांचा भंग करणारी बाब आहे. अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना, समाजाची प्रगती होत असताना स्त्रियांना लिंगभावामुळे आर्थिक व सामाजिक शोषणाचा सामना करावा लागणे ही बाब अधोगामी आहे. संघटीत क्षेत्रातील महिलांना कायद्याचे पुरेसे संरक्षण असल्यामुळे संघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या बाबतीत, लिंगभावामुळे निर्माण झालेली वेतनातील दरी आढळत नाही. मात्र असंघटीत क्षेत्रातील महिलांच्या बाबतीत ही समस्या प्रकर्षाने दिसून येते. या शोधनिबंधामध्ये शेती क्षेत्रातील मजूर स्त्रियांना लिंगभावामुळे पुरुषांच्या तुलनेत दिले जाणारे कमी वेतन यावर लक्ष केंद्रित केले असून, त्याची सद्यपरिस्थिती, संभाव्य कारणे, यांची चर्चा करण्यात आली आहे. तसेच या समस्येवर उपाययोजना सुचवून वेतन समानता कशाप्रकारे प्रत्यक्षात आणता येईल याविषयी विवेचन केले आहे.

❖ उद्दिष्टे:

- असंघटीत क्षेत्रातील महिलांच्या सामाजिक–आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
- असंघटीत क्षेत्रातील महिलांच्या वेतनासंदर्भातील लिंग असमानतेचा अभ्यास करणे.

❖ गृहीतके:

- असंघटीत क्षेत्रात वेतनदरासंदर्भात तीव्र लिंग असमानता आहे.
- असंघटीत क्षेत्रातील स्त्रियांना सामाजिक व आर्थिक अशा बहुस्तरीय शोषणास सामोरे जावे लागते.

❖ संदर्भसाहित्याचा आढावा:

- अमित कुंडू व संगीता दास यांनी त्यांच्या शोधनिबंधात भारतातील प्रमुख राज्यांमधील आकडेवारीचा अभ्यास करून असा निष्कर्ष मांडला की पुरुषप्रधान समाज संरच ने मुळे ही अशी धारणा निर्माण होते की पुरुष श्रमिक महिला श्रमिकांपेक्षा अधिक कार्यक्षम असतात, त्यामुळे त्यांना स्त्रियांपेक्षा अधिक वेतन दिले जाते. यावर उपाययोजना म्हणजे ग्रामीण श्रमिक स्त्रियांचे शिक्षण, कौशल्य विकास, बचत गट विकास, तसेच लघु वित्त सहाय्य होय.
- नरसिंहम व भैरव मूर्ती यांनी त्यांच्या शोधनिबंधात असा निष्कर्ष मांडला की किमान वेतन दर निश्चित करून देखील स्त्री पुरुष लिंगाधारित वेतन दरी कमी झाली नाही. ग्रामीण भागातील बहुतांश श्रमिक अकुशल असून, अकुशल मजुरांना रोजगार मिळवण्यात अडचण येते, त्यामुळे त्यांना शेतीवर अवलंबून राहावे लागते. महिला व बालक यांसाठी असलेल्या कायदेशीर तरतुदींची कठोर अंमलबजावणी, कामाच्या तासांचे नियंत्रण, स्वस्त वित्त पुरवठा, कौशल्य विकास, इ. उपायोजनाद्वारे स्त्री–पुरुष वेतन असमानता दूर करता येऊ शकेल.
- डॉ. नीलम पटेल व डॉ. तनु सेठी यांच्या शोधनिबंधातील निष्कर्षानुसार प्रधानमंत्री कौशल विकास योजना, प्रधान मंत्री मातृ वंदना योजना, इ. अशा योजनांमुळे ग्रामीण महिलांची सामाजिक–आर्थिक परिस्थिती उंचावण्यास मदत झाली आहे. ग्रामीण

महिलांच्या क्षमता ओळखणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, संसाधने व तंत्रज्ञानाशी ओळख सुनिश्चित करून, शिक्षण, आरोग्य सुविधा, कौशल्य विकास अशा प्रयत्नांमुळे शेती उत्पादकता सुधारेल आणि राष्ट्र सक्षम बनविण्यात मदत होईल.

❖ **संशोधनाचे महत्त्व:**

कोणत्याही अर्थव्यवस्थेत संघटीत व असंघटीत क्षेत्राचे सहअस्तित्व पाहायला मिळते. भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत असंघटीत क्षेत्राचा हिस्सा तुलनेने मोठा पाहायला मिळतो. भारताच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार भारतातील एकूण श्रमशक्तीपैकी सुमारे ९३ टक्के लोकसंख्या ही असंघटीत क्षेत्रात गुंतलेली आहे.

संघटीत व असंघटीत श्रमशक्तीसमोरील समस्यांचे स्वरूप भिन्न आहे. असंघटीत क्षेत्रातील समस्या या अधिक जटील व गुंतागुंतीच्या आहेत. शेती क्षेत्रातील मजूर व कामगार हे असंघटीत क्षेत्रात मोडत असून त्यांच्यासमोरील प्रश्न गंभीर आहेत.

भारतीय अर्थव्यवस्था स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेतीप्रधान राहिलेली आहे. उत्पादक लोकसंख्येतील ४५.६ टक्के हिस्सा हा शेती क्षेत्रामध्ये गुंतलेला आहे. यामध्ये पुरुषांबरोबरच महिलांचा सहभाग देखील लक्षणीय आहे. 'फाओ' (Food and Agriculture Organization of United Nations) या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या २०११ मधील अहवालानुसार, शेतीमध्ये महिला–केंद्रित सुधारणा, कौशल्य विकास, रोजगार व संसाधने यांच्या संदर्भातील समान संधी निर्माण झाल्यास, विकसनशील राष्ट्रांचे शेती उत्पन्न अडीच ते चार टक्क्याने वाढू शकेल.

शेतीमध्ये महिला व पुरुष कामगारांच्या कामाचे स्वरूप समान आहे. महिला मजूर शेतीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. परंतु, महिला मजुरांना पुरुषांच्या बरोबरीने समान वेतन दिले जात नाही. स्त्री मजुरांना दिले जाणारे वेतन हे पुरुष मजुरांना दिल्या जाणाऱ्या वेतनापेक्षा लक्षणीयरित्या अल्प आहे.

संदर्भासाहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे निदर्शनास येते की, शेती क्षेत्रातील, किंबहुना असंघटीत क्षेत्रातील, महिला मजुरांच्या वेतनासंदर्भातील असमानतेचे प्रमुख कारण म्हणजे समाजाची धारणा व पुरुषप्रधान मानसिकता होय. समाजाची पुरुषप्रधान संरचना ही या वेतन असमानतेस व लिंगभावास कारणीभूत आहे.

या शोधनिबंधाद्वारे शेती क्षेत्रातील महिला मजुरांचे होणारे शोषण, सद्यपरिस्थिती, त्याची कारणे यावर विवेचन करण्यात आले आहे. या स्त्रियांचे एक स्त्री म्हणून होणारे शोषण व एक मजूर म्हणून होणारे शोषण यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीकोनातून या शोधनिबंधातील संशोधन महत्त्वाचे आहे. तसेच सामाजिक संरचना आणि समाजाची मानसिकता यांमध्ये बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने यामध्ये महत्त्वाच्या उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंध महत्त्वाचा ठरतो.

❖ **संशोधन पद्धती व स्रोत:**प्रस्तुत शोधनिबंध हा वर्णनात्मक स्वरूपाचा आहे.

यासाठी दुय्यम माहितीस्रोतांचा आधार घेण्यात आलेला आहे. यासाठी प्रामुख्याने विविध पुस्तके, संदर्भग्रंथ, प्रकाशित शोधनिबंध, सरकारी व आंतरराष्ट्रीय संस्थाचे अहवाल व प्रकाशने, इ. संदर्भसाहित्याचा आधार घेण्यात आला आहे.

❖ **संशोधनाच्या मर्यादा:**

प्रस्तुत शोधनिबंधातील संशोधनास विविध पातळ्यांवर मर्यादित आहे. यासाठी वापरलेली पद्धत ही वर्णनात्मक आहे. त्यामुळे गृहितके पडताळून पाहण्यासाठी सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आलेला नाही. दुय्यम माहितीस्रोतांवर हा शोधनिबंध आधारित असल्यामुळे भौगोलिक क्षेत्र व कालावधी निवडीवर मर्यादा आलेल्या आहेत.

शोधनिबंधातील विश्लेषण हे असंघटीत क्षेत्राशी संबंधित आहे. परंतु असंघटीत क्षेत्राची व्याप्ती मोठी असल्याने त्यातील फक्त शेती क्षेत्राची प्राधान्याने अभ्यासासाठी निवड केलेली आहे. यामधील विश्लेषण हे वर्णनात्मक स्वरूपाचे असून या शोधनिबंधात केवळ शेती क्षेत्रातील लिंगाधारित वेतन असमानतेची सद्यपरिस्थिती, त्याची संभाव्य करणे व त्यावरील उपाययोजना याच घटकांची चर्चा येथे करण्यात आलेली आहे.

❖ **असंघटीत क्षेत्र:**

नॅशनल कमिशन फॉर एन्टरप्रायजेस इन द अनऑर्गनाइज्ड सेक्टर, (२००४) नुसार असंघटीत क्षेत्र म्हणजे कामाची अशी क्षेत्रे जी रोजगाराचे प्रासंगिक स्वरूप, अज्ञान व निरक्षरता, आस्थापनांचा लहान आकार व कमी भांडवल गुंतवणूक,

अनियमित रोजगार व सामाजिक सुरक्षिततेचा अभाव, इ. मर्यादांमुळे संघटित होण्यास सक्षम नाहीत. यामध्ये अनिश्चितता, अनियंत्रित व असुरक्षित अशा प्रकारचे रोजगाराचे स्वरूप असते. यामध्ये लघुउद्योग, शेती क्षेत्राशी निगडित कामे, स्वयंरोजगार यांचा समावेश होतो. सन ह्यऊघश च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार ९३ टक्के भारतीय लोकसंख्या असंघटीत क्षेत्रात गुंतलेली आहे. सन २०१७–१८ च्या पिरिओडिक लेबर फोर्स सर्व्हे नुसार:

- ७१.१ टक्के लोकसंख्येस लिखित स्वरूपात कंत्राटी काम नाही.
- ५४.२ टक्के लोकसंख्या कोणत्याही पगारी रजेच्या कक्षेत नाही.
- ४९.९ टक्के लोकसंख्या सामाजिक सुरक्षेच्या लाभास पात्र नाही.

वरील आकडेवारीवरून असे निदर्शनास येते, की असंघटीत क्षेत्रातील श्रमशक्तीस तीव्र स्वरूपाच्या अनिश्चिततेस व असुरक्षिततेस सामोरे जावे लागते. संघटीत क्षेत्राच्या तुलनेत असंघटीत क्षेत्रातील कामगारांची आर्थिक व त्यामुळे सामाजिक परिस्थिती गंभीर असल्याचे पाहायला मिळते. अनिश्चित कामाचे तास, रोजगाराचे हंगामी स्वरूप, वेतनासंदर्भातील अनिश्चितता, सामाजिक सुरक्षेच्या योजनांचा अभाव, कामाच्या तुलनेत मिळणारे कमी वेतन, अशा सर्व घटकांमुळे असंघटीत क्षेत्रातील श्रमशक्तीची पिळवणूक व शोषण होते.

प्रस्तुत शोधनिबंधात असंघटीत क्षेत्रातील मजूर स्त्रियांचे आर्थिक शोषण याविषयी चर्चा करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शेती क्षेत्रास प्राधान्य देण्यात आले आहे. असंघटीत क्षेत्रातील महिलांना दुय्यम वागणूक दिली जाते, व त्यामुळे त्यांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. संघटीत क्षेत्रात ही बाब प्रकर्षाने आढळत नाही, मात्र असंघटीत क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आढळून येते.

पुढील आकृतीमध्ये भारतातील महिला व पुरुष शेती कामगारांचा सन २०१५–१६ पासून २०१९–२० पर्यंतचा सरासरी वेतनदर दर्शवला आहे. याचे विश्लेषण केल्यास असे लक्षत येते कि पुरुष व महिला शेतमजुरांच्या वेतनदरात वाढ झाली आहे, परंतु त्या दोन्हीमधील तफावत मोठी आहे. यावरून दिसून येते कि महिला शेतमजुरांचे आर्थिक शोषण होते.

भारतातील महिला व पुरुष शेती कामगारांचा वर्षनिहाय सरासरी वार्षिक वेतनदर

स्रोत: भारत में कृषि मजदुरी: २०१९–२०(भारत सरकार)

❖ **पितृसत्ताक समाजव्यवस्था:**

पितृसत्ताक समाजव्यवस्था म्हणजे अशी सामाजिक संरचना की ज्यामध्ये वडील किंवा सर्वात वयस्कर पुरुष हा कुटुंबाचा प्रमुख मानला जातो. पितृसत्ताक समाजात वंश, परंपरा, व खाजगी मालमत्ता पुरुषांच्या माध्यमातून निश्चित केली जाते. अशा समाजात पुरुष हा प्रभावशाली ठरतो. त्यास प्रतिष्ठा मिळते. याविरुध्द, स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते.

या समाज संरचनेत स्त्रियांना सामाजिक. धार्मिक, आर्थिक, इ. स्थानांनुसार लिंगाधारित विषमतेस व शोषणास सामोरे जावे लागते.

प्रस्तुत शोधनिबंधात पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत मजूर स्त्रियांचे आर्थिक शोषण याविषयी चर्चा करण्यात आली आहे. पितृसत्ताक संस्कृतीचा प्रभाव अर्थव्यवस्थेवर व आर्थिक संरचनेवर पडलेला दिसून येतो. भांडवलदार, सावकार, हे प्रामुख्याने पुरुष असतात. वेतनासंदर्भातील सर्व निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना पितृसत्ताक समाज संरचनेने दिलेला असतो. याचा परिणाम म्हणून महिला शेतमजुरांना दुय्यम स्थान दिले जाते. स्त्रियांना 'स्वस्त श्रमशक्ती' म्हणून गणले जाते. त्याचाच परिणाम म्हणून, त्यांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. शेतीमध्ये जरी त्यांनी काम पुरुषांइतकेच केले असले तरी त्यांना दिले जाणारे वेतन हे पुरुषांच्या तुलनेत कमी असते.

❖ **मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत व स्त्रीवाद:**

उपरोक्त चर्चिलेल्या समस्यांचे सैद्धांतिक विश्लेषण हे कार्ल मार्क्स यांच्या वर्गसंघर्ष सिद्धांत व स्त्रीवाद यामध्ये सापडते. कार्ल मार्क्स यांचा वर्ग संघर्ष सिद्धांत हा समाजाच्या आर्थिक रचनेशी निगडित आहे. आर्थिक रचनेतील उत्पादन प्रक्रियेमुळे समाजात दोन वर्ग निर्माण होतात. यांमधील एका वर्गाकडे उत्पादन साधनांची पूर्ण मालकी असते. हा वर्ग आर्थिक भूमिकेतून मालक, राजनैतिकदृष्ट्या शासक, व सामाजिक भूमिकेतून शोषण करता असतो. मार्क्सच्या या सिद्धांतानुसार पहिला वर्ग (शोषक) हा नेहमी दुसऱ्या (शोषित) वर्गाचे आर्थिक, सामाजिक, राजनैतिक व मानसिक शोषण करतो. यामुळेच या दोन वर्गांमध्ये संघर्ष निर्माण होतो.

मार्क्सचा स्त्रीवाद प्रामुख्याने वेतनासंदर्भातील लिंग असमानतेवर भाष्य करतो. हा सिद्धांत पुरुष व स्त्रिया या दोघांना समान वेतन मिळवून देण्यावर लक्ष केंद्रित करतो. भांडवलशाही व सावकारी व्यवस्थेत स्त्रिया कामगार अथवा मजूर म्हणून काम करतात, मात्र पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या कामाचा आर्थिक मोबदला अत्यंत कमी असतो. केवळ आर्थिक मोबदलाच नाही, तर सामाजिक व भावनिक कामाचा मोबदलादेखील महिलांना अत्यल्प देण्यात येतो, असे मार्क्सचा स्त्रीवाद सांगतो.

❖ **विश्लेषण:**

वरील सर्व सांख्यिकी, संकल्पना व सिद्धांतांचा अभ्यास केल्यानंतर असे निदर्शन येते की असंघटीत क्षेत्रातील महिलांचे आर्थिक व सामाजिक असे बहुस्तरीय शोषण होते. याला मुख्य कारण म्हणजे पितृसत्ता. पितृसत्तेतूनच पुरुषास आपण श्रेष्ठ असल्याची भावना निर्माण झाली. स्त्री ही कनिष्ठ असल्याची भावना समाजाच्या मनात रुजली. स्त्री व पुरुषांमधील असलेला जीवशास्त्रीय फरक हा निसर्गाने निर्माण केला. हा फरक कोणास श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मनात नाही, तर सर्वांना समान मानतो. मात्र त्या फरकामुळे, स्त्री ही पुरुषाइतकी, त्याच्या बरोबरीने कार्यक्षम नाही, व्यवसायातील किंवा अंगमेहनतीतील तिचे योगदान हे पुरुषाच्या बरोबरीचे नसून त्यापेक्षा कमी आहे, अशी समाजाची धारणा निर्माण झालेली आहे. शेतीचा शोध हा स्त्रीने लावला असे मानले जाते. स्त्री ही सर्जनशील आहे. तिच्यात नवीन जीव निर्माण करण्याची, त्याचे संगोपन व पालनपोषण करण्याची क्षमता आहे, जी पुरुषामध्ये नाही. मात्र, पुरुषप्रधान संस्कृतीने निसर्गाने निर्माण केलेल्या भेदाच्या आधारावर पुरुषास वरचढ मानले आणि स्त्रीस कनिष्ठ स्थान दिले, मग ते समाजात असेल, राजकारणात असेल, किंवा अर्थकारणात. याचाच परिणाम म्हणून स्त्री शेतमजुरांचे उपरोक्त विशद केलेल्या पद्धतीने शोषण होते. हे शोषण बहुस्तरीय आहे. त्यास अनेक पदर आहेत.

असंघटीत क्षेत्रातील महिला मजुरांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी देशात विविध कायदे आहेत. योजना आहेत. मात्र असंघटीत क्षेत्राच्या विखुरलेल्या व अनिश्चित स्वरूपामुळे या कायद्यांची व योजनांची अंमलबजावणी म्हणावी तशी झालेली नाही, हे आकडेवारीवरून सिद्ध होते.

मार्क्सने आपल्या वर्गसंघर्ष सिद्धांत व स्त्रीवाद यांमध्ये हीच बाब मांडलेली आहे. स्त्री (शोषित) चे समाज संरचनेने, अर्थव्यवस्थेने, आणि कायद्याने शोषण केले. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास स्त्री ही स्त्री आहे, म्हणून तिचे शोषण होते. अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिल्यास ती एक मजूर आहे म्हणून तिचे शोषण होते. कायद्याने स्त्रीस संरक्षण दिले, तरी अंमलबजावणीच्या अभावामुळे ते तिच्यापर्यंत पोहोचलेले नाही. स्वातंत्र्यानंतर पंच्याहत्तर वर्षे उलटून गेली तरी सुद्धा आपला समाज, अर्थव्यवस्था व कायदा हा स्त्रीस समान स्थान मिळवून देऊ शकला नाही, ही बाब दुर्दैवी व निराशाजनक आहे.

❖ **उपाययोजना:**

असंघटीत क्षेत्रातील, महिला शेतमजुरांचे बहुस्तरीय शोषण थांबवण्यासाठी या शोधनिबंधात काही उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे:

- स्त्रिया व पुरुष असमान, पुरुष श्रेष्ठ– स्त्रिया कनिष्ठ, अशी समाजाची धारणा आहे, ती प्रथमत: बदलली पाहिजे. समाजाच्या मानासिकतेत बदल झाला, तरच समाजाच्या संरचनेत बदल होऊ शकेल.
- असंघटीत क्षेत्रातील स्त्री व पुरुष मजुरांना समान वेतन मिळवून देण्यासाठी कठोर कायद्यांची निर्मिती व अंमलबजावणी झाली पाहिजे.
- महिलांनी अशा शोषणाचा सामना करण्याऐवजी स्वत:स कुशल बनवून, शिक्षण घेऊन, ज्ञान मिळवून स्वयंरोजगार निर्माण करावा, यासाठी, अकुशल महिला मजुरांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम निर्माण झाले पाहिजेत. तसेच ते ग्रामीण व सीमांत महिलांपर्यंत पोहोचले पाहिजेत.
- महिलांनी स्वयंरोजगार निर्माण करून स्वावलंबी व्हावे, यासाठी बचत गटांचा विकास व विस्तार होणे आवश्यक आहे.
- महिलांना स्वत:वर होणाऱ्या शोषणाची व स्वत:च्या हक्कांची जाणीव निर्माण करून देण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामीण व सीमांत महिलांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.

❖ **सारांश:**

उपरोक्त विश्लेषणावरून असे समजते की, भारतामध्ये असंघटीत व संघटीत क्षेत्रातील श्रमशक्तीची परिस्थिती भिन्न आहे. असंघटीत क्षेत्रातील महिला शेतमजुरांना आर्थिक, सामाजिक, राजनैतिक मानसिक व भावनिक, अशा बहुस्तरीय शोषणास सामोरे जावे लागते. याची कारणे वरकरणी आर्थिक किंवा राजकीय दिसत असली, तरी मूळ कारण पितृसत्ताक समाज संरचना हेच आहे. कायदा, शिक्षण, आर्थिक संरचना, इ. विविध पातळ्यांवर ही लिंगाधारित असमानता दूर करण्यासाठी प्रयत्न झाले, तरीही, जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत समाज संरचनेत बदल होणार नाही. म्हणून, समाजाची पितृसत्ताक मानसिकता बदलणे हेच या समस्यांवरचा उपाय आहे.

❖ **संदर्भग्रंथ सूची:**

- Narasimham, S., & Bhairavmurthy. (2014). *Discrimination Of Gender in Agriculture Sector In Andhra Pradesh*. Economic Affairs, New Delhi Publishers.
- Kundu, A., & Das, S., (2019), *Gender Gap in The Agricultural Labour Market In India: An Empirical Analysis*. MPRA
- Patel, N., & Sethi, T., (2021) *Rural Women: Key to New India's Agrarian Revolution*. Kurukshetra. https://www.niti.gov.in/sites/default/files/2022-03/Rural_Women_Neelam_Tanu_article_03032022.pdf
- National Commission for Enterprises in The Unorganised Sector, *Report on Conditions of Work and Promotion of Livelihoods in the Unorganised Sector* (2007), Government of India, New Delhi. https://msme.gov.in/sites/default/files/Condition_of_workers_sep_2007.pdf
- Chand, R., & Singh, J., (2022). *Work Force Changes and Employment: Some Findings from PLFS Data Series*. NITI Aayog, Government of India, New Delhi. https://www.niti.gov.in/sites/default/files/2022-04/Discussion_Paper_on_Workforce_05042022.pdf
- Directorate of Economics and Statistics, Ministry of Agriculture and Farmers Welfare. (2021) *Agriculture Wages in India 2019-20*, Government of India, New Delhi.
- मोहिते संपतराव लक्ष्मण, (२००९). *समाजशास्त्रीय विचारवंत*, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. घटक क्र तीन.

***सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर मोबाईल: ९०६७७४१४७९**

ई–मेल: madhura.jk.15@gmail.com

***

लिंगभेद आणि साहित्य

*डॉ.मनीषा आझाद नायकवडी

प्रस्तावना :

निसर्गत:च स्त्री आणि पुरूष या दोघांचेही स्थान हे समान पातळीवर तितकेच महत्त्वाचे आहे; पण सामाजिक अवस्थेमध्ये जीवन जगत असताना लिंगभेदाचा वापर करून स्त्रियांना विषमतेची वागणूक देण्यात आली. स्त्रीची शारीरिक रचना, मानसिक जडणघडण यांस अनुसरून अनेक अविवेकी, पक्षपाती कायदे, अनिष्ट रूढी–प्रथा, संकेत, रीतिरिवाज रूढ झाले. लिंगभेदामुळे स्त्रियांना सर्व पातळ्यांवर पुरूषांप्रमाणे दर्जा, समान आदर प्राप्त झाला नाही. अधिकार व स्वातंत्र्य डावलण्यात आले आणि म्हणूनच स्त्रीवादी विचारसरणीमध्ये स्त्री ही एक व्यक्ती आहे, व्यक्ती म्हणून तिला पहिले स्थान, सन्मान, आदर मिळायला हवा. ज्यावेळी स्त्री–पुरूषांना समान पातळीवर पाहिले जाईल, त्यावेळीच असे घडू शकते असे मत स्त्रीवादी व्यक्त करताना दिसतात. जे.एस.मिल यांच्या मते, 'स्त्रियांच्या बुद्धिमत्तेचा स्वीकार केल्यास स्त्री–पुरूष समानता प्रस्थापित होईल.' जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत स्त्रीला पुरूषांप्रमाणे समान संधी, स्वातंत्र्य उपभोगता आले पाहिजे. तसेच अशी समाजव्यवस्था निर्माण होण्याच्या दृष्टीने स्त्रीवादी आग्रही भूमिका मांडताना दिसतात. स्त्रीवादी विचारांचा जन्म हाच मुळात स्त्री ही एक व्यक्ती आहे, तिला तिचा विकास करण्यासाठी स्वातंत्र्य, समानता, सर्व अधिकार प्राप्त असणे क्रमप्राप्त आहे या विचारसरणीतून झाला. स्त्रीला आणि पुरूषाला स्वत:चे व्यक्तिमत्व असते ज्याचा एक भाग जैविक असतो – अनुवंश इ. आणि दुसरा भाग सामाजिक असतो – जात, वर्ग, वर्ण इ. या दोन्हींच्या मिश्रणांतून स्त्री व पुरूष स्वत:ला घडवू पाहतात. या स्वतंत्रपणे घडणाऱ्या प्रक्रियेला काही अवकाश असावा लागतो. हे घडणे जैविक प्रेरणेइतकेच समूहात राहण्याची, परस्परावलंबनाची सामाजिक गरज म्हणून आपण बघितले तर या परस्परावलंबनाच्या नीतीची चर्चाही जैविक आणि सामाजिक सिद्धान्तनांबरोबर घडावी लागेल. या अर्थाने स्त्रीवाद हा एक पायाभूत विचार आहे. व्यक्तिस्वातंत्र्य आणि परस्परावलंबन हे परस्परांच्या स्वातंत्र्याचा आदर करत, न्याय व समता या मूल्यांवर आधारित असले पाहिजे. यातली ओढाताण, संघर्ष, मैत्री आणि करूणा यांचा विचार जेव्हा स्त्री–पुरूष नातेसंबंधाच्या माध्यमातून झालेला दिसतो, तेव्हा त्याला 'स्त्रीवादी साहित्य' म्हणता येईल, जे समाजातील लिंगभेदावर भाष्य करते.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. समाजातील साहित्यातील स्त्रीवादी दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

२. समाजातील लिंगभेद साहित्यातून कसे उमटतात याचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुतचा शोधनिबंध वर्णनात्मक पध्दतीचा वापर करून तयार करण्यात आला आहे.

संशोधनाचे स्त्रोत :

प्रस्तुतचा शोधनिबंध करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असून यासाठी विविध पुस्तके, लेख, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, इंटरनेटचा वापर करण्यात आला आहे.

आशय विश्लेषण :

साहित्य आणि समाज यांचा विचार करीत असताना साहित्य हा समाजशास्त्राचा केवळ दस्तऐवज आहे असे म्हणण्यातून साहित्यावर अन्याय होतो आणि मानवी सभ्यतेच्या वाटचालीतील काही तथ्ये निसटून जातात. साहित्याचा आणि साहित्यिक समीक्षेचा स्त्रीवादी दृष्टीतून विचार करावयाचा झाला तर केवळ स्त्रियांनी लिहिलेले साहित्य आणि स्त्रियांनी केलेली समीक्षा इतके मर्यादित अर्थाने बघून चालणार नाही. कोणतेही साहित्य जे स्त्री–पुरूष नातेसंबंधाचा नव्याने विचार करते, स्त्री–पुरूष नात्याचा इतिहास समजून घेण्याचा, त्यातील न्याय–अन्याय यांचा विचार करण्याचा आणि त्यातील अन्यायावर मार्ग काढण्याचा प्रयत्न करते, ते 'स्त्रीवादी साहित्य' असे म्हणता येईल. आपल्याला असे लक्षात येईल की, स्त्रियांचा आवाज जेव्हा आत्मकथनांमधून समोर येऊ लागला, तेव्हा स्त्रीवादी दृष्टीची जाणीव वाचक म्हणून आपल्याला होऊ लागली. त्याआधीही स्त्री लेखन होत असे. स्त्रियांच्या ओव्या, अभंग इ. रचना ह्या आज स्त्रियांच्या आत्मभानाची वाटचाल तपासताना महत्त्वाची ऐतिहासिक साधने म्हणून आपण वापरतो, पण ह्यांना स्त्रीवादी म्हणता येणार नाही. स्त्रीवादी दृष्टी ही संस्कारित दृष्टी आहे.

आधुनिकतेच्या अवकाशात निर्माण झालेल्या जाणिवा यात गृहित आहेत. यासाठी काही उदाहरणे देता येतील.

१९८५ साली प्रसिध्द झालेल्या 'तरीही' या काव्यसंग्रहात कवयित्री अनुराधा पाटील या लिहितात,

'माझ्यापेक्षा वेगळी नसते
पायांना पानं बांधून वाट तुडवणारी
तिथली कोणतीही आई...'

२००९ साली प्रसिध्द झालेल्या 'आरपार लयीत प्राणांतिक' या काव्यसंग्रहात प्रज्ञा दया पवार लिहितात,

'मला लिहू द्या आता
रोमांचक, दुखरा न सतेज दृष्टांत
बाईच्या नावानं
दलित बाईच्या नावानं....'

जगण्याशी साहित्याचे जैविक नाते असते, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे साहित्याला प्रयोजन असते. आपण प्रयोजनाचा शोध घेतो, कारण आपल्याला आपल्या अनुभवांशी ते ताडून पहायचे असते. त्यातून संवाद निर्माण होतो का ते पहावयाचे असते. तसा संवाद निर्माण होतो, तेव्हा साहित्याचे प्रयोजन सफल होते. जिथे संवाद होत नाही, तिथे अनुभवाचा जोडलेपणा कमी पडतो. स्त्री आणि पुरूषांमध्ये केवळ उतरंडीचे वर्चस्ववादी नाते असेल तर तिथे संवाद होणार नाही. नाते प्रवाही नसेल किंवा वर्षानुवर्षे बुरसटलेल्या प्रतिमांनाच कवटाळत असेल तर तिथे संवाद घडत नाही. म्हणून स्त्री–पुरूष नात्याकडे बघणारी दृष्टी काय आहे यावर ते स्त्रीवादी साहित्य आहे की नाही हे ठरते. उदा. उर्मिला पवार यांची 'सीतामायची चोळी' ही कथा वाचल्यानंतर आपल्याला दिसून येते की, स्त्रियांचे शरीर सार्वजनिक अवकाशात ज्याप्रकारे सार्वजनिक मालमत्ता म्हणून बघितले किंवा वापरले जाते, तो अनुभव कोणत्याही जातिवर्गातील अथवा वर्ण–राष्ट्रातील स्त्रीला आपला अनुभव वाटू शकतो. स्त्री लेखनाविषयीचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, स्त्रियांचा स्वत:चा म्हणून जो अनुभव होता तो फुटकळ प्रमाणात का होईना, पण साहित्यात उमटत होताच. महदाईसानेही धवळे रचले होते, मात्र स्त्रियांनी जेव्हा पुरूषांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेला प्रश्न केला, तेव्हा स्त्रियांचा व्यक्तिगत अनुभव साहित्यात उमटणे ही प्रक्रिया क्रांतिकारी ठरली. हे प्रश्न फुले – आगरकरांसारख्या पुरूषांनीही केले हे इथे नमूद करायला हवे. स्त्रियांनी स्वत:च्या अनुभवांना जाणीवपूर्वक मांडण्याची प्रक्रिया सुरू व्हायला मराठी साहित्यात १९ वे शतक उजाडले.

लिंग समभावाचा चिकित्सकपणे विचार करताना असे प्रकर्षाने जाणवते की, बहुसंख्य जनता ज्या सांस्कृतिक मानसिकतेत अडकली, ती हिंदू धर्मातील देवता आणि त्या अनुषंगाने वारंवार मांडल्या जाणाऱ्या मातृसंकल्पनेतच ! प्रत्यक्ष स्त्रियांची अवस्था कितीही हीन, दडपलेली, बंधनात गुदमरलेली, अन्यायाची बळी ठरणारी असो, देव्हाऱ्यात तिचे पूजन करण्याचे संकेत आणि चिन्हव्यवस्था यातून व्यवस्थात्मक अन्याय दुर्लक्षित राहिला. ताराबाई शिंदे यांची विलक्षण प्रतिभावान विद्रोही प्रतिमा, पंडिता रमाबाईसारखी व्यासंगी आणि कमालीची आत्मनिष्ठ कणखरता सांभाळणारी स्त्री–प्रतिमा, सानेगुरूजींच्या 'श्यामची आई', 'तीन मुले' यांसारख्या कादंबऱ्यांमधून सामाजिक न्यायाचे संस्कार करणारी स्त्री–प्रतिमा, 'स्मृतिचित्रे' मधल्या लक्ष्मीबाई टिळक किंवा डॉ.आंबेडकरांनी उभी केलेली यशोधरा ही प्रारूपे भारतीय संस्कृतीतील स्त्रीची आदिरूपे म्हणून पुढे विकसित झालेली दिसत नाहीत, उलट हिंदू धर्मातील देवतांच्या आक्रमक प्रतिमा मात्र एकंदरीत पुरूषसत्ताकतेचा भाग होण्यास पूरक असल्यामुळे आणि क्रांतिकारक स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान या प्रतिमांशी जोडले गेले असल्यामुळे त्याच आक्रमक प्रतिमा उचलल्या जाताना दिसतात. त्या मग एक प्रकारचा धर्मनिरपेक्ष मूलगामी विद्रोह मांडणाऱ्या कमल देसाईसारख्या लेखिकांच्या साहित्यात उमटताना दिसतात आणि वाखाणल्या गेल्या तरी रोमँटिक आदर्शवादाची कास धरून केवळ आगळीवेगळी साहित्यिक निर्मिती म्हणून बाजूला पडताना दिसतात किंवा मग लहान सामाजिक परिघातील गुंतागुंतीचे मनोव्यापार मांडू पाहणाऱ्या आशा बगे, मोनिका गजेंद्रगडकर यांच्या साहित्यात उमटणाऱ्या परंपरानिष्ठ हिंदू स्त्री–व्यक्तिरेखांच्या स्वरूपात दिसतात. दुसऱ्या बाजूला मार्क्सवाद, पाश्चात्य स्त्रीवादाचे संस्कार आपल्या भूमीतील अनुभवांशी जोडून वेगळ्या धारणा निर्माण करू पाहणाऱ्या शांता गोखले, प्रतिमा जोशी, यांच्यासारख्या लेखिका स्वतंत्रपणे उठून दिसतात. मात्र आंबेडकरांच्या विचारांना प्रभावित होऊन निर्माण झालेले साहित्य क्रांतिकारी जीवनदृष्टी मांडत व्यापकही होताना दिसते.

वंदना बोकील–कुलकर्णी यांनी १९७५ नंतरच्या स्त्री–निर्मित कथासाहित्यातून समोर येणारी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे नोंदवली आहेत –

१. लिंगभेदामुळे निर्माण झालेल्या व्यापक विषमतेला आव्हान देणे.

२. लग्न संस्था, कुटुंब संस्था, यांमध्ये आपले स्थान काय आहे व काय असायला हवे याचा शोध घेणे.

३. स्त्री म्हणून होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे.

४. सामाजिक निर्णय प्रक्रियेत स्त्रीच्या समान सहभागाची मागणी करणे.

५. आत्मनिर्भर असणे, आत्मसन्मानाची जपणूक करणे.

६. स्त्री–पुरूषांतील समताधिष्ठित नात्याचा आग्रह धरणे व त्यादृष्टीने परिवर्तनवादी विचारांची मांडणी करणे.

स्त्रीवादी काव्याचा विचार करताना नीलिमा गुंडी यांनीही स्त्रीवादी जाणिवांची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे.

अ. पारंपरिक मूल्यांना विरोध.

ब. मिथकांचे पुनर्वाचन.

क. जातीय वर्गीय भान.

ड. आत्मशोध. (संदर्भासहित स्त्रीवाद : स्त्रीवादाचे समकालीन चर्चाविश्व)

स्त्रीवादी मूल्यभानाचा विचार करीत असताना प्रस्थापित व्यवस्थेत आपल्या तुटपुंज्या साधनांनिशी विशिष्ट शरीरानिशी आणि त्यांच्याशी जोडलेल्या प्रस्थापित दृष्टीनिशी संघर्ष करणारी आणि अन्याय, सामाजिक वास्तव बदलू पाहणारी, मानवी करूणेतून त्याचा आवाका घेणारी साहित्यकृती आपल्या परंपरेचा भाग आहे, असे स्त्रीवाद मनापासून सांगतो.

महात्मा फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्मवादी स्त्री–पुरूषांच्या विवाहात म्हणण्याची मंगलाष्टके रचली.' पारंपरिक आकृतिबंधात महात्मा फुले यांनी भरलेला आशय कसा वेगळा आहे ते तुलना करून समजू शकते.

वधू : मानिशी जरी त्वां दिलें अनुदिनी कर्त्या समाधानसे ।।
आम्हां सर्व स्त्रिया असे बहु पिडा, हे नेणशी तू कसे ।।
स्वातंत्र्यानुभवाचि ओळख आम्हां, झाली नसे मानशी ।।
यासाठी अधिकार देखिल स्त्रिया, घे आण त्याची अशी ।।
शुभमंगल सावधान ।।

वर : स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा ।।
खर्चाया न मनी मी भी किमपिही, सर्वस्व माझे कदा ।।
मानीतो सकला स्त्रियांस बहिणी तू, एकली मत्प्रिया ।।
कर्त्याचे भय मी मनांत तुजला, ठेविन पोसावया ।।
शुभमंगल सावधान ।।

(संपादन : य. दि. फडके, 'समग्र फुले वाङ्मय', महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९६९)

ज्या काळात विवाहाला 'शरीरसंबंध' म्हटले जात होते, त्या काळात 'सत्यशोधकी विवाहपद्धती' निर्माण करून जोतिबा फुले यांनी विवाहामागचा विचार क्रांतिकारकरित्या बदलला. तो निव्वळ शरीरसंबंध न राहता, त्याला व्यापक सामाजिक भान आले आणि स्त्री–पुरूष नात्यातील जबाबदारीची जाणीव ह्यद्वारे वदवली गेली, पण आजही आपल्याला दिसून येते की, शरीरसंबंधाचा विचार स्त्री–पुरूष नात्याला बांधणारा विचार आहे. तेव्हा स्त्री–वादाला मूल्यविचार आणि शरीर यांच्यातील लिंगभावी जोड आहे. स्त्रीचे शरीर व त्याबाबतीत पुरूषसत्ताक सिद्धान्तने यांतून स्त्री–पुरूष संबंधांच्या धारणा कशा बनत गेल्या आणि त्या बदलायच्या असतील तर त्यासाठी काय करावे लागेल याचा विचार अपरिहार्यपणे प्रथम शरीराभोवती फिरतो. पुढे स्त्री–पुरूष नातेसंबंधांच्या संदर्भात शरीर मोकळेपणाने व्यक्त करणारे लेखन गौरी देशपांडे, मेघना पेठे, प्रज्ञा दया पवार या लेखिकांनी केले. शिवाय पुरूषसत्ताक व्यवस्थेत, स्त्री–शरीर हे अन्याय लादण्याचे क्षेत्रही आहे, हे देखील या लेखिकांनी लेखनाद्वारे समोर आणले. आ. ह. साळुंखे यांनी, 'धर्मशास्त्रे आणि स्त्रियांचे स्थान' यावर लिहिलेल्या पुस्तकांतून भारतातील स्त्री संस्कृतीच्या इतिहासाची वाटचाल समोर येते. अभ्यासाअंती असे लक्षात येते की, स्त्रियांना शेती, उत्पादन व्यवस्था म्हणजेच पर्यायाने शरीर सांभाळण्याचे अधिकार मातृसत्ताक जीवन पद्धतीत होते. पुरूषसत्ताक जीवनपद्धतीतून हिंसा,

आक्रमणे, उत्पादनावरचे मालकी हक्क, संपत्ती (लुबाडणे) व तिचा साठा करून वर्चस्वाचे क्षेत्र वाढविणे या जीवनपद्धतीचा प्रसार झाला, तेव्हा स्त्रियांच्या हातात फक्त त्यांचे शरीर राहिले व त्यावर पुरूषाची सत्ता प्रस्थापित झाली. जमीन व उत्पादने यांचे न्याय्य व समान अधिकार स्त्रियांना नाकारण्यात आल्यामुळे स्त्री–शरीर व पृथ्वीचे शरीर दोन्हीही निव्वळ दोहनाच्या पिळवणुकीच्या गोष्टी बनल्या.

थोडक्यात, बायकांनी मर्यादशील रहायचे, संस्कृतिरक्षण करायचे तर त्यांची भाषाही मर्यादित असणारीच हवी या अपेक्षेतून स्त्रियांच्या व्यक्त होण्यावर मर्यादा आल्या. त्या मर्यादा ओलांडणारी बाई ही सामाजिक अधिक्षेप करणारी आणि म्हणून शिक्षेस पात्र बाई, असे समजले जाऊ लागले. तेव्हा स्त्रियांच्या विचारस्वातंत्र्यावरही बंधन आले. एका पठडीतला, चाकोरीतला, देऊ केलेल्या भूमिकेला साजेससाच विचार आणि पर्यायाने तशीच भाषा वापरणे हे त्यांच्यावर बंधनकारक झाले. जोवर स्वतंत्रपणे विचार करून तो विचार स्वत:च्या स्वतंत्र भाषेत स्त्री मांडत नाही, तोवर नव्या मूल्यांची निर्मिती होणे शक्य नाही असे स्त्रीवाद्यांनी मांडले. मग स्त्रिया जशा घराबाहेर पडल्या आणि जगाच्या अनुभवांनी समृद्ध होऊ लागल्या, तेव्हा त्यांची भाषा, स्वत:चे सौष्ठव घेऊन आली. मराठी साहित्यातील स्त्रियांच्या लेखनाचा प्रवास बघितला तर हे सुस्पष्टपणे जाणवते. ताराबाई शिंदे, लक्ष्मीबाई टिळक, विभावरी शिरूरकर, कमल देसाई, गौरी देशपांडे, अंबिका सरकार, शांता गोखले, मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर, कविता महाजन, प्रतिमा जोशी, नीरजा, प्रज्ञा दया पवार, अनुराधा पाटील, शिल्पा कांबळे इ. लेखिकांची भाषा अत्यंत स्पष्ट, धारदार आणि रेखीव आहे. त्यांची शैली, प्रतिमा, सृष्टी यांत केवळ भावनिक उत्कटता आहे असे नाही तर कमालीची बुद्धिमत्ता, विलक्षण मर्मदृष्टीही आहे.

निष्कर्ष :

१. पुरूषसत्ताक व्यवस्थेत बायकांच्या व्यक्त होण्यावर मर्यादा होत्या असे स्पष्टपणे दिसून येते.
२. हिंदू विधी आणि व्यवहाराच्या माध्यमातून स्त्री नावाची लिंगभावयुक्त व्यक्ती रचली जाते.
३. पुरूषसत्ताक व्यवहार आणि ह्या व्यवहारांचे प्रतीकात्मक रूप यांमधून स्त्रियांच्या घडणीमध्ये काही निश्चित मर्यादा निर्माण केल्या जातात.
४. ताराबाई शिंदे यांनी १८८२ मध्ये 'स्त्री–पुरूष तुलना' या निबंधामध्ये स्त्री–पुरूष संबंधांवर खुलेपणाने परखड भाष्य केल्याचे दिसते.
५. आधुनिक काळातील लेखिकांनी आपल्या लेखनातून सडेतोडपणे स्त्री जीवनाचे विश्लेषण, चिंतन केले आहे, व्यवस्थेला बिनधोक प्रश्न विचारले आहेत.

संदर्भ :

१. खोले विलास (संपादन), (१९९७), ताराबाई शिंदे, 'स्त्री–पुरूष तुलना', प्रतिमा प्रकाशन, पुणे.
२. गीताली वि.मं., (२००९), 'स्त्री–प्रश्न सोडवताना ...', दिलीपराज प्रकाशन, पुणे.
३. ढेरे रा.चिं., (१९७८), 'लज्जागौरी', श्री विद्या प्रकाशन.
४. धर्माधिकारी दादा, (२००८), 'स्त्री–पुरूष सहजीवन', परमधाम प्रकाशन.
५. बाळ विद्या, गीताली वि.मं., भागवत वंदना (संपादन), (२००८), 'कथा गौरीची', मौज प्रकाशन, पुणे.
६. भागवत विद्युत, (२००४), 'स्त्री प्रश्नाची वाटचाल : परिवर्तनाच्या दिशेने', प्रतिमा प्रकाशन.
७. भागवत वंदना, सपकाळ अनिल, गीताली वि.मं. (संपादन), (२०१४), 'संदर्भासहित स्त्रीवाद', शब्द पब्लिकेशन्स.
८. रेगे शर्मिला, (२०१०), 'स्त्रीवाद : जागतिक आणि स्थानिक दैवतापलीकडे', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री–अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.
९. Bhasin Kamala, (2009), "Understanding Gender, Kali for Women".

***मराठी विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर. भ्रमणध्वनी : ९६८९८३७०८५,**
ई–मेल : nayakawadimanisha030@gmail.com

***

शिक्षणाच्या माध्यमातुन महिलांचे सक्षमीकरण

*प्रा.डॉ.सविता माधवराव गिरे.

जग बदलण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे प्रभावी शस्त्र नाही

— नेल्सन मंडेला

हे प्रसिद्ध वाक्य शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी पुरेसे आहे आणि आपल्या देशाचा विचार करता त्याची यथार्थता आणखीनच स्पष्ट होते. एका तरुण लोकशाहीच्या रुपात आपला देश शैक्षणिक आघाडीवर घोडदौड करीत आहे. देशाच्या शिल्पकारांनी मोठी दूरदृष्टी ठेऊन शैक्षणिक प्रगतीला कायम महत्व दिले . त्याची फळे एक देश म्हणून आज आपणास चाखायला मिळू लागली आहेत पूर्वीपासूनच भारतात शिक्षणाला महत्वाचे स्थान राहिलेले आहे. प्राचीन भारतात ऋषी मुनी ज्ञानप्राप्तीसाठी शिक्षण घेत तर क्षत्रिय आणि वैश्य राज्यकारभार युद्धकला किंवा व्यापार उदीम चालवने आदि विशिष्ट कारणांसाठी शिक्षण घेत प्राचीन शिक्षण पद्धती ही चरितार्थ चालवणे अथवा जगण्याच्या उद्दिष्टाशी निगडीत होती .. प्राचीन काळी शिक्षणाच्या बाबतीत भारताची ख्याती जगभर होती. अनेक देशातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी भारताला प्राधान्य देत. नालंदा हे सर्वात मोठे शैक्षणिक केंद्र त्याकाळी नावारुपास आले होते. त्याठिकाणी जवळपास सर्व विद्याशाखांचे शिक्षण मिळत असे आणि एकाचवेळी दहा हजार विद्यार्थ्यांना अध्ययन करण्याची सुविधा त्याठिकाणी उपलब्ध होती आधुनिक भारताबाबत बोलायचे झाल्यास ब्रिटिश काळात विशिष्ट उच्चभ्रू वर्गासाठी शिक्षणाच्या संधीउपलब्ध होत्या

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र आपल्या धोरणकर्त्यांनी ही शिक्षणपद्धती बदलण्यासाठी मोठी मेहनत घेतली. समता आणि सामाजिक न्याय या तत्वावर आधारित सर्वांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. २००९ साली शिक्षण हक्क कायद्यान्वये शिक्षण हा मूलभूत हक्क ठरवण्यात आला आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाचीही घोषणा करण्यात आली याचबरोबर सर्वशिक्षा अभियान आणि माध्यान्ह भोजन या सारख्या उपक्रमांद्वारे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे प्रयत्न आपल्या धोरणकर्त्यांनी सुरु केले. आज भारताची ओळख जशी वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून आहे तशीच ती शिक्षित आणि अनुरूप मनुष्यबळाचाविशाल स्त्रोत अशीही बनली आहे. उच्च शिक्षित तंत्रकुशल आणि शास्त्रीयदृष्टया प्रशिक्षित भारतीय नागरिक जगाच्या काना कोर्‍यात विविध प्रकारची कामे करून देशाचे नाव उंचावत आहेत. मोठ्य प्रमाणात वाढलेली साक्षरता हे मागील काही काळात मिळालेले उल्लेखनीय यश म्हणता येईल.

संशोधनाचे उद्देश — शिक्षणाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास करणे

संशोधनाची पध्दती — प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुयम साधनांचा तथ्य संकलनासाठी वापर केला आहे

स्वातंत्र्यप्राप्तिवेळी केवळ १२ टक्के इतके असलेले साक्षरतेचे प्रमाण आता टक्क्यांपर्यंत वाढले आहे. ७४ टक्क्यांहून अधिक साक्षरता प्रमाण गाठलेली केरळ आणि मिझोरमसारखी राज्ये देशातील इतर राज्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरत आहेत अर्थात, या वाटचालीत काही अडथळेही आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेकांसाठी शिक्षणहे अद्यापही एक स्वप्नच आहे. अनेक ठिकाणी प्रतिकूल हवामान हे त्यासाठी कारणीभूत ठरते. आदिवासी, भूमिहीन आणि अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून त्यांना राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेत सामील करून घेण्याची चिंता अद्यापही धोरणकर्त्यांना भेडसावत आहे दुसर्‍या बाजुला अभ्यासाचा भडीमार आणि अधिकाधिक गुण मिळवण्याची वाढती आकांक्षा यामुळे विद्यार्थ्यांना प्रचंड तणावाचा सामना करावा लागत आहे. मुलांना यांत्रिक शिक्षण पद्धतीतील उत्पादन वृत्तीमुळे त्यांची वैयक्तिक वाढ आणि जीवन कौशल्य विकास याकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाचा अंतर्भाव शालेय अभ्यासक्रमात करण्याची गरज आहे जेणे करून आपली शिक्षण व्यवस्था समाजसमोरील समाजसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मुलांना सक्षम बनवू शकेल. त्यादृष्टीने सुरुवात करीत सीबीएसई ने जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम २०१२ पासून सुरु केला आहे. सर्वशिक्षा अभियानही त्यादृष्टीने महत्वाचे ठरत आहे. अशारितीने सरकारच्या सुरु असलेल्या अथक प्रयत्नांमुळे स्वतरू वर विश्वास असणारी आणि शिक्षणाचा खरा हेतू म्हणजेच राष्ट्रउभारणी आणि भावी पिढया घडविणार्‍या व्यक्ती निर्माण करण्यास आपला देश निश्चितच यशस्वी ठरेल. भारतातील शिक्षण व्यवस्थेत लिंगभाव समानता भाल आणण्यासाठी मुलींना मूलभूत शिक्षण देणे गरजेचे आहे. त्यात शिक्षणाची व्यवस्था, आशय व शिक्षण प्रक्रिया हे तीन मूलभूत घटक एकमेकांशी अंतर्गत जोडले गेलेले असतात अर्थव्यवस्था, समाज व संस्कृती हे या चौकटीत येतात. या विषयांचा आता पुनरूच्चार करण्याची गरज नाही कारण त्यातील बर्‍याचशा बाबी या मुख्य प्रवाहाच्या विश्लेषणाचा एकात्मिक भाग झालेल्या

आहेत लिंगभाव हा प्रवर्ग स्वीकारताना आपल्याला त्याचा विचार सामाजिक, प्रादेशिक व स्थानिक परिप्रेक्ष्यातून करावा लागेल भारत हा विविधतेने नटलेला देश आहे पण त्यात अनेक असमानताही आहेत सामाजिक व आर्थिक असमानता व लिंगभाव असमानता यामुळे एक गुंतागुंतीचे जाळे तयार होते व त्यामुळे मुलींना शिक्षण मिळवण्यात अडचणी येतात. जेव्हा आर्थिक असमानता व सामाजिक असमानता प्रबळ होतात तेव्हा सांस्कृतिक व प्रादेशिक घटक व सांस्कृतिक रूढी– परंपरा मोठी भूमिका पार पाडतात असा संशोधकांचा दावा आहे. भारतात दारिद्रय, सामाजिक असमानता व लिंगभाव संबंध यांची असमानता आहे व ती समजून घेणे कठीण आहे. देशाच्या विविध प्रदेशात त्यांनी एकमेकांना छेद दिलेला आहे, एकाने दुसऱ्यावर कुरघोडी केली आहे. एकाने दुसऱ्यावर मातही केली आहे. आजच्या काळातील हे आव्हान नीट लक्षात घ्यायचे म्हटले तर खालील गोष्टी मान्य करणे आवश्यक आहे. १. शहरी व ग्रामीण भागात पटावरील नोंदणी, हजेरी, शिक्षणाची पूर्तता यात मुले व मुली यांच्यात फरक दिसून येतो. २. मागास व पुढारलेले भाग व प्रादेशिक फरक हे लिंगभाव व सामाजिक गटातील फरकापेक्षा जास्त आहेत. ३. गरीब कुटुंबे (दारिद्रिरेषेखालील कुटुंबे) व वरच्या स्तरातील फरक हा लिंगभाव, सामाजिक व प्रादेशिक भेदांपेक्षा जास्त आहे. ४. आदिवासी समुदाय, मुस्लिम व अनुसूचित जाती जमातीतील उपगट यांतील भेद व प्रगत जाती ख्रिश्चन व इतर धर्मियांपेक्षा जास्त आहेत. ५. आंतर सामुदायिक भेद हे एकाच जमातीमध्ये असलेल्या भेदांइतकेच आहेत उदा. साधरता प्रमाण आदिवासींमध्ये इतरांपेक्षा जास्त आहे. काही दलित गटात इतर गटांपेक्षा जास्त आहे. १९९० मध्ये लिंगभाव असमानतेचे शिक्षणावर आधारित मूल्यमापन सुरू झाले व त्यात शाळांची व्यवस्था व कुटुंबांची मुलांना शाळेत पाठवण्याची तयारी विशेषत रू मुलींना शिक्षणासाठी शाळेत पाठवण्याची तयारी यांचा अभ्यास करण्यात आला. असे असले तरी गेल्या काही वर्षात शिक्षणात मागणी व पुरवठा यात समानता असावी लागते. जेथे शाळा नियमित आहेत तिथे मागणी वाढली आहे. उलट जेथे शाळा काम करीत नाहीत, जिथे शिकवले जात नाही व जेथे समाजात शाळा मुलींना सुरक्षित असल्याचे मानले त नाही तेथे शिक्षणाची पर्यायाने शाळांची मागणी घटली आहे. काम करणाऱ्या शाळा हा सगळ्यात महत्वाचा घटक असून तो कुटुंबांच्या निर्णयावर प्रभाव टाकतो (रामचंद्रन स्नेकस अँड लॅडर्स २००४ सुब्रम्हणियन २००२ प्रोब १९९९) शाळांमध्ये नेमके काय घडते यावर संशोधन व शिक्षकांचा दृष्टिकोन व प्रगत सामाजिक गटातील मुलांचा दृष्टिकोन यावर सामाजिक वंचित गटांचा सहभाग अवलंबून असतो. (रॉबर्ट जेनकिन्स ह्मज्ज्ह्व, गीता नंम्बीसन १९९६, २०००, २००१ विमला रामचंद्रन व तारामणी नावरेम २०१३) एमव्ही फाउंडेशनसारख्या स्वायत्त संस्थांचा अनुभव हा यात महत्त्वाचा आहे व शाळेतील शिष्टाचार, शिक्षक प्रशासनाचा दृष्टिकोन व पूर्वग्रह, अभ्यासक्रमातून दिसणारा सामाजिक भेदभाव, सापत्नभावाचे शिष्टाचार, लिंगभावाचे साचेबंद रूप हे घटक त्यातून प्रामुख्याने सामोरे आले एनसीएफ पोझिशन पेपर ३.२ एनसीइआरटी २००५, विमला रामचंद्रन, २००४) १९९० नंतर ह्म वर्षांनी थायलंडमधील इएफए परिषदेत असे मान्य करण्यात आले की, शिक्षण कामगिरीतील लिंगभाव दरी महत्वाची आहे.

आज भारताच्या शिक्षण क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत ती जाणून घेणे गरजेचे आहे १ भारतातील राज्यामध्ये शैक्षणिक विकासात असमतोल दिसून येतो. केरळ, महाराष्ट्र व कर्नाटक ही राज्ये आघाडीवर तर राजस्थान बिहार ४ उत्तरप्रदेश या राज्यात वाईट परिस्थिती दिसून येते. (२) आघाडीवर असलेल्या राज्यातही मुली आणि सामाजिक आर्थिक दुर्बल घटकातील लोकांच्या शिक्षणाची आबाळ थांबलेली नाही. ३) प्राथमिक शाळांतील गळतीचा प्रश्न आपण सोडवू शकलला नाही त्यामुळे पटनोंदणी कमी असल्याने जगातील सर्वाधिक निरक्षर राष्ट्र म्हणून आपली गणना होत आहे . ४) शहरी भागात उच्च दर्जाचे शिक्षण मिळते तर ग्रामीण भागात मागासलेपणा दिसून येतो. ५) अपंग, वेश्यावस्त्यातील मुले, बालमजूर यांच्या शिक्षणाच्या बाबतीत म्हणावा तसा विचार केला जात नाही. ६) शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण अल्प आहे. जगात शिक्षणावर सर्वात कमी खर्च करणारा देश म्हणून भारत ओळखला जातो. काळात ७) स्वातंत्र्योत्तर व्यावसायिक शिक्षणाकडे आपण पुरसे लक्ष देऊ शकलेलो नाही. ८) निरक्षर व साक्षर लोकांची बेरोजगारी, दारिद्य हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान आहे . याशिवाय भारताच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत काही आव्हाने सांगता येतील ती पुढिल प्रमाणे १) ग्रामीण भागातील निरक्षरतेचे प्रमाण मोठे असल्यामुळे मुलामुलींना उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयात व शहरात पाठविण्याची पालकांची मनोभूमिका तयार होत नाही २) प्राथमिक शिक्षणाच्या किमान गरजांचा अभाव असल्यामुळे उच्च शिक्षणाला संधी प्राप्त होत नाही ३) शाळा व महाविद्यालयातून शिकवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमावर शहरी वातावरणाचा प्रभाव अधिक असतो ग्रामीण जीवनाच्या गरजाशी व दैनंदिन व्यवहाराशी प्रचलित अभ्यासक्रमाचा संबंध कमी येतो.) विनाअनुदानित शिक्षण संस्थातून द्यावे लागणारे शिक्षण शुल्क

सतत वाढत असल्याने सर्वसामान्य दुर्बल घटकातील विद्यार्थी या शिक्षणापासून वंचित राहतो ह्व) विनाअनुदान महाविद्यालयाचा व संस्थाचा वेतन व प्रशासनावरील खर्च सतत वाढत असल्याने उच्च शिक्षण हे दिवसेंदिवस अधिक खर्चीक बनले आहे.) ग्रामीण भागात उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाची आर्थिक स्थिती मजबूत असण्याची गरज आहे. अशाप्रकारे अशा अनेक बाबी आपणास सांगता येतील. भारताच्या शिक्षण क्षेत्रासमोरील वरील आव्हाने व प्रश्न सोडवण्याच्या दृष्टिने स्वातंत्र्योत्तर काळात प्रयत्न केले गेले असले तरी त्याबाबतीत मिळालेले यश समाधानकारक नाही ह्व व्या शतकातील अशा विविध आव्हानांना सामोरे जावून भारताला आर्थिक विकासात अग्रेसर बनविण्यासाठी रोजगाराभिमुख शिक्षण, प्रौढ शिक्षण, मुल्यशिक्षण, नैतिक शिक्षण स्वयंरोजगार या मुलभूत उद्दिष्टांची पूर्तता करणे आवश्यवक आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत समाजघटकांना स्वतरू चे स्थान निर्माण करण्यासाठी व वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी पारंपारिक शिक्षणाचा मुलभूत पाया बदलून नव्या गुणात्मक व स्पर्धात्मक पायावर उभी राहणारी शिक्षण व्यवस्था निर्माण केली पाहिजे त्यासाठी सर्व क्षेत्रातील तज्ञांनी एकत्र येवून योगदान देणे गरजेचे आहे. तरच या बदलत्या प्रवाहाला सामोरे जाण्यासाठी क्षमता असलेला युवावर्ग तयार होईल. थोडक्यात आपल्या मानवी संसाधन शक्तीचा पुरेपूर लाभ घेवून आपल्या शैक्षणिक संरचनेच्या पायाकडे लक्ष देण्याची हीच वेळ आहे. तरच आपला भारत देश जगाचे आर्थिक नेतृत्व करण्यास समर्थ राहिल.

निष्कर्ष :

शिक्षणातील भेदभाव मग तो जातींवर आधारित असो लिंगावर आधारित असो त्याबाबतचे अनेक प्रश्न सांगता येतील त्याची मोठी यादीच होईल त्यातही विषेश करून महिला व मुलींच्या शिक्षणातील सहभागाबाबतचे प्रश्न सोडवण्याची गरज आहे. गेल्या पन्नास वर्षात अनेक आयोग, समित्या नेमस्या गेल्या त्यांनी अनेक प्रश्न व समस्यांची जंत्रीच तयार आहे त्यावर अनेक धोरणेही सांगण्यात आली. त्यांची अंमलबजावणी का करण्यात आली नाही याची काही कारणे व अडचणी असू शकतीलही पण त्यामुळे इतर भलत्याच बाबींना महत्त्व येऊ शकते. शिक्षणात भेदभाव नसावा, लिंगभेदाला थारा नसावा शिक्षणाच्या समान व अर्थपूर्ण संधी असाव्यात त्यामुळे आपण लिंगभाव समानता व सामाजिक न्यायाकडे वाटचाल करू शकू.

संदर्भसूची :

१) मौरीनियान कार. मार्था चेन, रेनाना दावराला (संपा.). पोकिंग आउट इकॉनामिक एम्पावरमेंट ऑफ विमेन ने साउथ एशिया. नई दिल्ली. रोज पब्लिकेशन. १९९६

२) कॉपिया, एस. डूमेन एण्ड पंचायत राज, नई दिल्ली. हारानंद पलिवेपन १९९५.

३) जेन्सन, जे स्ट्रगलिंग फॉर आइडेंटिटी दी दूमेनस मूमेन्ट एण्ड दी स्टेट इन वेस्टर्न यूरोप इन एस. बापेचकिन (सं.१. लंडन. वूमेन एण्ड पोलिटिक्स इन वेस्टर्न यूरोप, फ्रँक कास एण्ड कंपनी लि., १९८५

४) वाजपेयी, ए. (संपा.) वूमेस राइट्स एट द वर्क प्लेस, टीआईएसएस, मुंबई.

५) गवर्नमेंट ऑफ इंडिया नेशनल पर्सपेक्टिव प्लान फॉर वूमेन्स डेवलपमेंट १९८८ २००१. नई दिल्ली. गवर्नमेंट ऑफ इंडिया, १९८८.

६) अध्यात रहि और राव, बी. बी. एल. एन. जेंडर इश्युज: ए रोटमीप टू एम्पॉवरमेंट. दिल्ली. शिप्रा. ह्मञ्ञ.

७) राव, डी. पी. एण्ड राव, डी. पी. इंटरनॅशनल एनसाइक्लोपीडिया ऑफ वूमेन घ. द स्टेटस ऑफ वर्ल्ड वूमेन डिस्कवरी पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली. १९९९

८) रे, भारती एण्ड अपर्ण वसु (संपा.). फ्रॉम इंडीपेन्डेन्स टुवर्डस क्रोटम, इंडियन वूमैन सिन्स इंडीपेन्डेन्स, नई दिल्ली. ऑक्सफोर्ड यूनिवर्सिटी प्रेस १९९९

***दा. जो. गो. आर्टस् कॉमर्स सायन्स कॉलेज वडूज, सातारा**

***

''लिंगभाव आणि आरोग्य विषमता: आदिवासी जमातीतील कुरमा प्रथेचे अध्ययन.''

*प्रतिक जमनादास झाडे

प्रस्तावना –

समाजातील स्त्रियांच्या दर्जावरून किंवा स्त्रियांना दिलेल्या वागणुकीवरून कोणत्याही समाजाच्या विकासाचे स्वरूप निश्चित करता येते. पुरुषप्रधान भारतीय समाजात महिलांना आपल्या मानवी अधिकारा पासून वंचित करण्यात आले होते. महिलांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीमुळे समाजात स्त्री–पुरुष विषमता निर्माण झाली आहे. मध्ययुगीन काळात महिलांवर अनेक निर्बंध लादल्यामुळे स्त्रीचे समाजातील स्थान आणखी घसरले आदिवासी घसरले. आदिवासी समाजात मात्र महिलांचे स्थान उच्च होते. आदिवासी समाजात कुटुंबाचा व समूहाच्या धार्मिक कार्यात स्त्रियांना निश्चित स्थान आहे. मात्र आदिवासी देवतांच्या विशेष पूजा अरचेत त्यांना स्थान देण्यात आले नाही. आदिवासी जमातीचा सभ्य समाजाशी लैंगविषमतेचे अनुकरण करून महिलांना दुय्यम वागणूक दिली आहे. आदिवासी स्त्रियांचे आरोग्य विषय विचार केला तर आदिवासी संस्कृतीनुसार आधी काळा पासूनच तिला अनेक प्रकारची कष्टाची कामे करावी लागतात. गरोदरपणी तसेच बाळतापणा नंतरही ती अनेक अवजड व अवघड कामे करते. परिणामी अश्यकतापणा आणि इतर शारीरिक दुर्बलता याचे ती भक्ष्य बनते. तसेच त्या काळात आदिवासी समाजात वापरल्या जाणाऱ्या अनेक जडीबुटीचा देखील तिच्या आरोग्यावर दूषपरिणाम होतो. आदिवासी समाजा मध्ये असा समज आहे की, महिलाना स्वयंपाक करणे आणि मुले सांभाळणे या व्यतिरिक्त तिला दुसरी कामेच नसतात. मुलगी कितीही शिकली तरी 'चूल आणि मूल' सांभाळावेच लागते. या समजणीच आदिवासी महिलांचे निरक्षरतेचे प्रमाण जास्त दिसून येते. आदिवासी समाजातील स्त्रिया अंधश्रद्धेला बळी पडत असतात. आदिवासींची अशी श्रद्धा आहे की, स्त्री बाहेरची व्हायला लागली की ती अशुद्ध आणि अपवित्र बनते तिच्या मध्ये जादू टोणा करण्याची शक्ति येऊन कोणत्याही चांगल्या गोष्टीला तिची नजर लागते. या समजुती मुले समाजात काही विपरीत घाले तर स्त्रियांनाच जबाबदार धरून तिला अतिशय आमनुष्य वागणूक दिली जाते. तसेच आदिवासी समाजामध्ये श्रद्धा–अंधश्रद्धेचा भाग म्हणून मासिक पाळीसाठी कुरमा नावाची प्रथा अस्तित्वात आहे. समाजाच्या दृष्टीने ही प्रथा पूर्वजा पासून चालत आलेली असली तरी मात्र स्त्रियांच्या सर्वांगीनं विकसमध्ये ही प्रथा मोठा अडथळा निर्माण करते. या प्रथेमुळे तिहि स्वतरूला मासिक पाळी दरम्यान अपवित्र समजायला लागते. आणि तिचे मानसिक खचिकरण होते.

मासिक पाळीतील रक्तस्त्रावाला विविध प्रकारच्या पारंपरिक व सांस्कृतिक कारणाने आदिवासी समाजात निषिद्धतेचे स्वरूप आहे. कुरमा घराचे विधी निषेध पाहता ही निषिद्धता 'विटाळा'च्या व्याप्तीपेक्षाही जास्त असल्याचे दिसते. मासिक पाळीच्या काळात संबधित स्त्री किंवा मुलीच्या घरातील कोणत्याही वस्तूला, कपड्यांना, भांड्यकुंड्यना, पूजा स्थानाला व उत्पादन वस्तूंना स्पर्श करणे नको असतो कारण त्या काळात तिला विटाळ असतो. इतर समाजात देखील मासिक पाळीमध्ये स्त्री वर अशी बंधने थोड्य फार फरकाने अनेक समुदायात आजही आढळतात, मात्र ती या कालावधीसाठी कुटुंबातच नको, तिने या संपूर्ण कालावधीत घराबाहेर राहावे यासाठी वस्तीच्या टोकावर एक झोपडीवजा तात्पुरती निवास व्यवस्था केली असते या झोपडीलाच 'कुरमाघर' म्हटले जाते. कोर, गावकोर, खोपडी असे अन्य पर्यायी शब्द देखील या झोपडीला दर्शवण्यासाठी वापरले जातात. प्रजोत्पादन प्रक्रियेचा एक भाग असलेली मासिक पाळी स्त्रियांच्या दैनंदिन जीवनातील अतिशय कष्टप्रद कालावधी असतो, या कालावधीत स्त्रियांची विशेष काळजी घेण्याची गरज असते विशेषत: किशोरवयीन मुलीकडे या काळात जाणीवपूर्वक लक्ष पुरवण्याची गरज आहे. परंतु अशा अवघड वेळीच किशोरवयीन मुली आणि स्त्रियांना गोवकोरात घराबाहेर एकट्यने राहावे लागत असेल तर याहून भयंकर कोणतीच परिस्थिती असू शकते?

कुरमा घरात राहण्याऱ्या स्त्रियांना जेवणाचा डबा उशीरा येणे, भुकेने जीव कासावीस झाला तरी गावात जायची मुभा नसणे, पिण्याच्या पाण्यासाठी छोटासा माठ नाहीतर छोटी चरवी, अपुरी झोपण्याची व्यवस्था, त्यात सरपडणारे कीटक किंवा प्राणी याची सतत भीती व असुरक्षितता असे कुरमा घराचे सध्याचे स्वरूप आहे.

कुरमा घरातील प्रौढ स्त्रियांपेक्षा किशोरवयीन मुलींना अधिक अडचणी आहेत, मासिक पाळीच्या काळात मुलींना अधिक त्रास होतात. त्यावेळी त्यांच्याकडे कुणीही लक्ष देत नाही, त्यांना समुदायामध्ये मोकळेपणाने फिरता येत नाही कारण तिचा स्पर्श कुणाला झाला तर अद्याप तो विटाळ मानला जातो. या काळात गावातील रहदारीच्या रस्त्यावरून त्यांना जाता येत नाही त्यांच्यासाठी गावाबाहेरील रस्त्याचा अवलंब करावा लागतो, या काळात गावकोरात राहण्याची इच्छा नसल्यास त्यांना जातपंचायती समोर जावे लागते. कुरमा घराचे स्वरूप पाहता उन्हापावसापासून, थंडीपासून संरक्षण होणे सुद्धा कठीण असते. अनेक वेळेस एकाच कुरमा घरात बऱ्याच स्त्रियांना एका वेळेला राहावे लागते, आशा वेळेस मोठ्य प्रमाणात जागेची अडचण तसेच इतर प्रकारच्या अडचणी निर्माण होतात ज्यावर कोणत्याच उपाय योजना नसतात. जागा अपुरी असल्यामुळे तेथिल

स्त्रियांना पाळी पाळी ने झोपावं लागत. काही स्त्रिया झोपल्या की बाकीच्याना जागी राहाव लागत नंतर त्याना उठून आपण झोपायचं नंतर त्या जाग्या राहतील. आरोग्याच्या दृष्टीने मासिक पाळीच्या वेळेस स्त्रियांना पुरेपूर झोप असावी लागते परंतु त्यांना ते सुद्धा जागेच्या अभावी घेता येत नाही. इतकी गंभीर परथिति निर्माण झालेली असते. एकूणच ही परिस्थिती आदिवासी स्त्रियांना व किशोरवयीन मुलींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणारी असूनदेखील आरोग्य विभागाला त्यावर उपाय योजना करण्यास असमर्थ ठरत आहे. ही किती आश्चर्यकारक बाब आहे?

कुरमाघराच्या निर्माणामागे असलेली भूमिका या समाजातील अनेक जाणकार व्यक्तींशी बोलल्या नंतर मला समजला तो म्हणजे असा की, या समुदायातील स्त्रिया आणि किशोरवयीन मुली घरी असतील तर त्या काही ना काही काम करतीलच त्यामुळे त्यांच्यासाठी असलेली निषिद्धता भंग होते शिवाय त्यांना विश्रांती देखील मिळत नाही. त्यामुळे त्यांना सक्तीची विश्रांती घेता यावी यासाठी घराबाहेर एका स्वतंत्र झोपडी निर्माण करून त्यांच्या निवासाची तेथेच व्यवस्था करण्यात आली, मासिक पाळीच्या काळात त्यांनी कोणतेही काम करू नये व त्यांनी केवळ विश्राम करावा. या मिळालेल्या माहिती नुसार कुरमा घराच्या मागील या सिध्दांतचे कौतुकच करावेसे वाटले परंतु वास्तविकता याहून वेगळी आहे सध्या स्थितीतल्या कुरमा घरांची दयनीय दुरवस्था पाहिली की, कुरमा घरात वास्तव्यास असणाऱ्या स्त्रियांना कोणकोणत्या अग्निदिव्यातून जावे लागत असेल याची कल्पना येते.

संदर्भ साहित्य परिशीलन –

नागोटी लालूस (२०१९) यांनी दैनिक दिव्य मराठी वृत्तपत्रा मध्ये कुरमा नावाची कु–प्रथा या बद्दल माहिती सांगितली आहे. कुरमा प्रथा ही आदिवासी महिला साठी बनलेली आहे. आदिवासी समाजामध्ये असा समज आहे की, मासिक पाळी ही अपवित्र आहे. आदिवासी महिलांना जेव्हा मासिक पाळी येते तेव्हा त्या महिलेला कुरमा घरामध्ये मासिक पाळीच्या काळा मध्ये राहावे लागते. आधीच्या काळात आदिवासी लोक आपल्या पूर्वजांना आपल्या घराच्या अंगणात पूरवीत होते आणि त्या जागेला पवित्र माणून त्या जागेची पूजा–अर्जना करीत होते. अशा पवित्र ठिकाणी अपवित्र गोष्टीची सावली पडू नये म्हणून महिलांना कुरमा घरामध्ये ठेवल्या जायचे. अशा प्रकारे नागोटी लालूस यांनी आपल्या लेखामध्ये कुरमा घरचा इतिहास सांगणाचा प्रयत्न केला.

ताजणे मनोज लोकमत प्रतिनिधि (२०१८), यांनी गडचिरोली जिल्हयातील गोंड जमातीमध्ये असलेली कुरमा प्रथाचे निर्मूलन करण्यासाठी उडान नावाचा कार्यक्रमा विषयी वृत्तपत्रा मध्ये माहिती प्रसिद्ध केली आहे. सद्यस्थितीत गावागावात असलेल्या कुरमा घरांना विरोध न करता पुढील पिढीत या प्रतहेबादळ प्रबोधनच्या उदेशने उडान नावाचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. कुरमा घरात अस्वच्छते मुळे स्त्रीला लैंगिक आजारांचा सामाना करावा लागतो गर्भाशयाचा कर्करोग, क्षयरोग किंवा आजीवन बंधत्व यासारखे आजार होतात. अशा आजारां विषयी जागृत करून पुढील पिढीचे मतपरिवर्तन करण्यासाठी उडान कार्यक्रम राबविला जातो.

म.टा. प्रतिनिधि, नागपूर (२०१९), गडचिरोली जिल्हयातील गोंड जमातीतिल असलेल्या प्रथा व मासिक पाळी आणि त्या काळातले आरोग्य या विषयातील बातमी प्रसिद्ध केली ज्या मध्ये 'ती' ला शहाणी करण्यासाठी 'ती' चे प्रयत्न या कार्यातून मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी व आरोग्याच्या संदर्भातील वापरायचा 'पॅड' याविषयाचे सविस्तर माहितीचे विवेचन केले आहे.

सोनवणे वाहरू (२००६), यांच्या 'शिक्षण आणि समाज' या लेखातून आदिवासींची संस्कृति आणि विकासाची संकल्पना मांडली. त्यामध्ये आदिवासींच्या संस्कृति विषयी, आदिवासी आणि निसर्ग यातील एकात्मता, स्त्री–पुरुष समानता आणि आदिवासी समृद्ध संस्कृति व व्याप्ती या बद्दल विवेचन केले आहे.

प्रदीप आगलावे (२०१०), 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' या पुस्तकातून त्यांनी स्त्रियांना मिळणारी प्रत्यक्ष वागणूक, स्त्रियांचा कायदेशीर दर्जा, सार्वजनिक कामाची मिळणारी संधि, कामाचे स्वरूप आणि व्याप्ती याबद्दल सविस्तर माहिती मांडली आहे. आदिवासी जमातीमध्ये अलौकिक शक्तीवर विश्वास ठेवतात. तसेक आदिवासी समाजमधील राजकीय संघटना, शासन, कायदा, न्याय याबद्दल माहिती दिली आहे.

डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदा आमटे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा इथल्या गोंड आदिवासी महिलांच्या आरोग्य आणि शैक्षणिक सुविधा सुधाराव्यात म्हणून त्यांनी ' लोक बिरादरी' हा प्रकल्प सुरू केला

उद्दिष्टये –

१) गोंड जमातीतील स्त्रियांच्या मासिक पाळी संदर्भातील (कुरमा) प्रथा जाणून घेणे.

२) कुरमा प्रथेच्या सामाजिक– सांस्कृतिक पार्श्वभूमीची चर्चा करणे.

३) चिकित्सक परीक्षण करणे आणि विद्यमान रुढीवादी दृष्टिकोण आणि पक्षपाताशी संबंधित प्रश्न विचारणे.

गृहितकृत्ये –

१) लिंगभेदामुळे कुरमा प्रथा अजुनही अस्तित्वात आहे.

२) पारंपारिक प्रथेमुळे आदिवासी महिलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो.

३) दुर्गमभागात राहत असल्यामुळे आणि शासकिय योजनांच्या अभावामुळे आदिवासी स्त्रियांना आजही कुरमा प्रथा पाळीवी लागत आहे.

महत्व –

२१ व्या शतकात जगत असतांनाही गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागामध्ये मासिक पाळी या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण अजूनही मागासलेला आहे. आजही मासिक पाळी मध्ये सॅनिटरी पॅड आणि कापडाच्या योग्य वापर पध्दती किंवा त्या विषयी ज्ञान नसल्यामुळे महिलांची शारीरिक स्वच्छता व आरोग्य या बाबी दुर्लक्षित केल्या जातात. त्याचप्रमाणे महिलांच्या मासिक पाळीला घेऊन रुढी, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा या गोष्टींचा महिलांच्या मानसिकतेवर मोठा प्रभाव पडलेला दिसतो.

अध्ययनामध्ये गडचिरोली जिल्हयातील अतीदुर्गम भागातील आदिवासी महिलांना मासिक पाळी दरम्यान कुरमा घरात ठेवल्या जाते. कुरमा घराची दैनिय अवस्था आणि कोणत्याच सोय–सुविधा नसल्यामुळे महिलांच्या आरोग्याची गैरसोय होते, आणि त्यांच्या जीवाला सुद्धा धोका असतो. या परिस्थितीमध्ये आदिवासी महिलांना मासिक पाळी मध्ये आरोग्यदाई कुरमा घराची सोय स्थानिक पातळीवर करावी. शारीरिक व मानसिक आरोग्याच्या संदर्भात जागरूकता निर्माण व्हावी म्हणून हे अध्ययन महत्वाचे आहे.

संशोधन पद्धती –

प्रस्तुत अध्ययना करीत गैरसंभाव्यात नमूना निवड पद्धतीमधील सहेतुक नमऊण निवड या पध्दतीचा वापर करून गडचिरोली जिल्हयातील निवडलेल्या प्रत्येक तालुक्यातील ४० महिला याप्रमाणे ४० × १२ या प्रमाणे निवड करून एकूण ४८० आदिवासी महिलांचा उत्तरदाता म्हणून अध्ययनात समावेश करण्यात येईल.

तथ्य संकलन करण्याकरिता संशोधक वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करून गैसंभाव्यता नमुना निवड पद्धतीमधील सहेतुक किंवा उदेशपूर्ण नमुना निवड पद्धतीचा वापर करणार आहे.

आशय विश्लेषण

मासिक पाळीचे सामाजिक आणि नैसर्गिक धार्मिक पैलू –

मासिक पाळीला जसे एकीकडे नैसर्गिक शरीरधर्म म्हणून पहिले जाते तर दुसरीकडे त्याला धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक संदर्भही जोडलेली आहेत. भारताच्या संदर्भात मासिक पाळी या विषयाला सहज संवाद साधणे अवघड आहे, उलट तिला मंदिर प्रवेश करण्यास नाकारले जाते, स्वयंपाक करण्यास टाळाटाळ केली जाते, घरातील देवाची पूजा करण्यास सक्त मनाई असते, घरातील लोकांना स्पर्श करणे चालत नाही हे केवळ भारतीय किंवा हिंदू धर्मिक परंपरेमध्येच मासिक पाळीविषयी मूल्याधिष्ठित दृष्टीकोन आहे असे नाही. जगातील आधुनिक समजल्या जाणाऱ्या समाजातील चालीरीती देखील स्त्रियांना कनिष्ठतेचे माप देणाऱ्या आहेत या गोष्टीचे अरुणा देशपांडे यांनी आपल्या पुस्तकात वर्णन केलेले आहे. एकूणच विश्वामध्ये मानवाने स्वत:कडे आणि त्यांच्या वाट्यला आलेल्या मानवी आयुष्याकडे कोणत्या दृष्टीकोनातून पाहायचे याचा विज्ञाननिष्ठ विचार होणे आवश्यक आहे. एकूणच उतरंड ही संकल्पना मुलभूत आणि मध्यवर्ती मानून प्रस्थापित झालेल्या समाज रचनेमध्ये स्त्रीला कनिष्ठ स्थान मिळाले आहे. ही गोष्ट अन्यायकारक आणि निसर्गाविरुद्ध जाणारी आहे.

मासिक पाळीची सुरुवात हा प्रत्येक मुलीच्या आयुष्यातला एक नैसर्गिक व महत्त्वपूर्ण अनुभव आहे. परंतु या अनुभवाभोवती व घटनेभोवती अनेक रूढी–परंपरा, बंधने, अंधश्रद्धा, गैरसमजुती जोडल्या गेलेल्या आहेत. शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या रूढी–परंपरांचा, निषेधनियमांचा आणि धर्मबंधनांचा शास्त्रीय दृष्टीकोनातून विचार झालेला नाही, तसेच या विषयाची सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक बाजू या संबंधीही फारसे लिखाण झालेले नाही. पिढ्यनपिढ्य स्त्रियांकडून विनातक्रार पाळण्यात येणाऱ्या धार्मिक बंधनांचा उगम आणि कारणे शोधण्याचाही फारसा प्रयत्न झालेला नाही. परंतु वयात येणाऱ्या मुलींच्या पाळीबद्दल संशोधन होणे गरजेचे आहे. मासिक पाळीच्या चक्रामध्ये काही मुलींना मासिक पाळी सुरू होण्याच्या काळात तर काही स्त्रियांना पाळी बंद होण्याच्या काळात अनेक शारीरिक बदलाव व मानसिक तणावांना तोंड द्यावे लागते. कौटुंबिक स्थान आणि मानसिक अवस्था अशा दोन्ही बाजूद्वारे तयार होणारी असुरक्षितता व त्यांमुळे उद्भवनारे शारीरिक विकार या सर्वांची कारणे शोधणे गरजेचे आहे. कारण स्त्रीचे कुटुंबामध्ये, समाजामध्ये दुय्यम स्थान असणे आणि ते तसे

स्वीकारले जाणे यामध्ये सामाजिक रूढी व प्रस्थापित समाजव्यवस्था यांचा फार मोठा वाटा आहे. परंतु त्याच बरोबर स्त्रीचे स्वत:च्या शरीराबद्दल असलेले अज्ञान, यामुळे टिकून राहिलेल्या अंधश्रद्धा, रूढी, बंधने यांनाही निश्चित असे स्थान आहे. मासिक पाळीच्या अनुभवा संबंधीचे सामाजिक वास्तव काय आहे व आजच्या स्त्रीची या विषयासंबंधीची वैचारिक मानसिकता काय आहे हे जाणून घेणे महत्वाचे आहे. पाळीला सुरुवात होतांना किंवा होण्याअगोदर बऱ्याच मुलींना त्याबद्दल फारशी माहिती नसते, आणि शास्त्रीय माहिती बऱ्याचदा आईलाही नसते तर मुलीला कशी मिळणार? शाळेतून मासिक पाळी आणि लैंगिक शिक्षण याबद्दल शास्त्रीय माहिती मिळाली तर अधिक चांगले होईल, कारण त्यामुळे लहान मुलींचा गैरफायदा घेणार्यांविरोधात मुकाबला करण्याची मुलींची मानसिक तयारी होईल. शास्त्रीय माहितीने धोके टाळता येतील आणि त्याच बरोबर मुलींची स्वत:वरची जबाबदारी वाढेल.

मासिक पाळीचा उल्लेख करतांना गावाकडे पर्यायी शब्द वापरतात उदाहरणरू— कावळा शिवला, अडचण आली, बाहेरची झाली, विटाळ सुरू झाला. या सर्व पर्यायी शब्दांचा अर्थ पाहिला तर सर्व वाक्यप्रचारामागे शब्दांमागे सूक्ष्म असा नकार व तिरस्कार आहे असे जाणवते. मासिक पाळीत सर्वात जास्त वापरला जाणारा शब्द म्हणजे 'विटाळ'. या शब्दाचा उगम व्यत्पत्ती कोशाप्रमाणे विष्ठा या शब्दापासून झालेला आहे. हा अर्थ लक्षात घेतला तर सांस्कृतिक परंपरेने 'पाळी आलेली स्त्री' ही विष्ठे इतकीच तिरस्करणीय मानली होती, असे दृष्टीस येते. तसेच प्राचीन वैद्यकीय शास्त्राच्या मासिक पाळी संबंधीच्या दृष्टिकोनावर धर्म रूढी, धर्मवचने आणि त्या काळातील सामाजिक रीतीरिवाजांचा पगडा होता असे दिसते. म्हणूनच रजस्वलेने पालन करण्याचे आयुर्वेद प्रणालीत नियम आणि धर्मसिंधु याज्ञवल्क्य स्मृती या धार्मिक ग्रंथातील नियम यामध्ये काही साम्य आढळते. त्या काळात धर्मशास्त्राचे प्रवर्तकच बऱ्याच वेळा वैद्यकीय व्यवसायही करीत बहुधा यामुळे धर्मशास्त्रांचा आणि धार्मिक बंधनांचा प्रभाव तत्कालीन वैद्यक शास्त्रावर पडला असावा. मासिक पाळी सुरू असलेल्या स्त्रीने धार्मिक बंधने न पाळल्यास "तिचे" व तिच्या घरातील "पुरुषाचे" अशुभ होईल असा धाक धर्मशास्त्राचा होता. आयुर्वेदानुसार सांगितलेली बंधने मासिक पाळीच्या काळात न पाळल्यास स्त्रीचे स्वत:चे आणि होणाऱ्या मुलाचे आयुष्य धोक्यात येईल असा धाक आयुर्वेद शास्त्रकार घालतांना दिसतात.

मासिक पाळीच्या काळात स्त्रीच्या अंगात ''अतिमानवी शक्ती'' असतात त्या चौतन्य नष्ट करतात, निरनिराळ्या आपत्तींना कारणीभूत ठरतात, ही कल्पना समाजात सर्वमान्य असलेली दिसून येते. म्हणून एखाद्या मुलीच्या प्रथम मासिक पाळीला सुरवात होणे म्हणजे त्या मुलीच्या आणि समाजाच्या दृष्टीने फार मोठी आपत्तीच मानली जात असे. अशा मुलीच्या अंगात असलेल्या भयानक दैवी शक्तीचा सर्वात जास्त परिणाम निसर्गाच्या सृजन शक्तीवर आणि सृजन क्षमतेवर होतो, असे मानले जात असे. म्हणून प्रथम मासिक पाळीला सुरुवात झालेल्या मुलीपासून निसर्गाच्या सृजन शक्तीचे (सूर्य, पाणी, जमीन, वनस्पती) यांचे रक्षण करणे त्या काळी मानवाला आवश्यक वाटत असे. त्या दृष्टीने शक्य तेवढी बंधने अशा मुलीवर घालून काळजी घेतली जात असे. वेगवेगळ्या समाजात वेगवेगळ्या पद्धतीने नुकतीच पाळी आलेल्या मुलींना इतरापासून वेगळे ठेवण्याची पद्धत होती.

बहुतेक सर्व प्राचीन संस्कृती ह्या पुरुषप्रधान आहेत. या सर्वांमध्ये एक गोष्ट आवर्जून सांगण्यात आली आहे. मासिक पाळी सुरू असलेल्या स्त्रीच्या संपर्कात आल्यास पुरुषाचे शौर्य, धैर्य आणि शक्ती नष्ट होते. उलट पाळीसंबंधीची सर्व बंधने आणि निषेध नियम पाळल्यास (म्हणजे अशा स्त्रीपासून दूर राहिल्यास) त्यांचे धैर्य आणि शक्ती दीर्घकाळ टिकून राहते. पुनर्जन्मावर विश्वास असलेल्या आपल्या भारतीय संस्कृतीत तर मासिक पाळी आलेल्या स्त्रीच्या संहारकशक्ती तिच्या मरणानंतरही नष्ट होत नाहीत, असे मानले जाते. पाळी चालू असतांना एखादी स्त्री मृत्युमुखी पडली तर, ती मरणानंतर भूत होते. अशी चूडैल अत्यंत सुंदर स्त्रीचे रूप धारण करून रात्रीच्या वेळेस फिरते. देखण्या तरुण पुरुषाला आकर्षित करते. तिच्या आकर्षणात सापडलेल्या तरुणाचे तारुण्य आणि सौदर्य नष्ट करून त्याला शक्तिहीन आणि म्हातारे करून सोडते. ही चूडैल तिच्या कुटुंबातील लोकांनाच जास्त धोकादायक असते, अशी समजूत प्रचलित होती.

कुरमा प्रथेमुळे स्त्रियांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक जीवनावर परिणाम —

कुरमा घरामुळे आदिवासी स्त्रीयांच्या एकंदरीत आयुष्यावर खूप परिणाम होतो. मासिक पाळी दरम्यान कुरमा घराच्या दिशेने जाण्याऱ्या स्त्रिया रस्त्यावरील लोकांसाठी चर्चेचा विषय बनतात शिवाय त्या कुरमा घरातून परत गावात जातांना माहिती असूनदेखील त्यांना विचारल्या जाते की कुठे गेली होती गावात दिसत नाही, अशा प्रकारच्या बोलण्यामुळे आणि घरापासून एवढ्या दिवस वेगळे राहण्याच्या त्रासाने स्त्रियाना चिडचिड होते. सर्वच स्त्रिया या त्रासातून जात असल्यातरी त्याविरोधात बोलण्याचा हक्क किंवा मुभा त्यांना नसते. प्रत्येक स्त्री तिच्या त्रासाने ग्रस्त असते. काही स्त्री आनंदी पण असतात की त्यांना इथे आराम मिळतो पण त्यांचे वयोगट आता पाळी संपेल अशा असतात. किशोरवयीन मुलींना आणि तरुण स्त्रियांना ही प्रथा

नकोच असते. बहुतेक आदिवासी स्त्रियांना सॅनेटरी नॅपकीन बद्दल माहितीच नाही आहे. त्यामुळे वारंवार वापरत येणाऱ्या अशुद्ध कापडामुळे काही स्त्रियांना त्वचेचे रोग होत असतात शिवाय त्यांच्या शरीरावर मोठा प्रभाव पडत असतो. मोठ्या गावाच्या संपर्कात आल्यामुळे काही स्त्रियांनी सॅनेटरी नॅपकीनचा वापर करण्यास सुरुवात तर केली, परंतु पैसे देऊन विकत घेतल्यामुळे एकाच सॅनेटरी नॅपकीनला वारंवार उपयोगात आणल्या जाते जे आरोग्य दृष्टीने त्यांच्या शरीरासाठी धोकादायक आहे.

लैंगिकता आणि मासिक पाळी –

लैंगिकतेच्या दृष्टीने विचार केला तर मासिक पाळी हा एक महत्त्वाचा आणि गंभीर मुद्दा आहे. मुले–मुली किशोरवयीन होण्याअगोदर त्यांच्यावर कोणतीही बंधने नसतात परंतु ते वयात येण्यास सुरुवात झाल्यानंतर त्यांचे सोबत खेळणे, फिरणे, बसणे हे बंधनकारक आहे असे ठरवले जाते. त्यांना सोबत बसायला, बाहेर खेळायला, फिरायला जायला, एकांतात जायला बंधने घातली जातात. मुलींना मासिक पाळीची सुरुवात झाली की मग ही बंधने आणखीनच वाढत जाऊन लिंगभेदाच रूप देतात. मासिक पाळी आलेल्या स्त्रियांचा पुरुषाला स्पर्श झाला किंव्हा कुठलाही संपर्क आला की त्या पुरुषाला पाप लागतो शिवाय त्याच्या जीवाला धोका असतो अशा प्रकारच्या विचारांमुळे स्त्री आणि पुरुष यांमधील लिंगभेद आणखीनच वाढत जातो.

पुरुषांचा सहभाग आणि कुरमा प्रथेवर पडणारा परिणाम –

कुरमा प्रथेमध्ये पुरुषाने स्त्रीजवळ जाणे आणि तिला हात लावणे म्हणजे खूप मोठे पाप करण्यासारखे आहे की ज्यामुळे पुरुष हा अशुद्ध होतो. आणि त्याला गावातील सर्वच लोक त्याला खूप मोठे पाप केल्याप्रमाणे बघतात. आणि या सगळ्या स्थितीमुळे कोणताही पुरुष हा त्या कुरमा घराच्या जवळ सुद्धा जात नाही. आणि घरातील स्त्रीला पाळी आली की लगेच त्यांना घराच्या बाहेर जावे लागते त्यांना ही भीती असते की, घरातील पुरुषाने त्यांना हात लागले तर त्यालाही समुदाय काय म्हणेल, आणि भ्रामक संकल्पनामुळे मासिक पाळीच्या वेळेस पुरुष स्त्रियांच्या दूर असतात त्याच प्रमाणे एखाद्या वेळेस स्त्रियांची प्रकृती अजिबात ठीक नसेल आणि अशा वेळेस तिला पाळी आली तर तिला तरी सुद्धा कुरमा घरात जावे लागते आणि त्यांचा परिणाम म्हणजे त्यांना स्वत:चा जीव गमवावा लागतो. आणि एखाद्या वेळेस स्त्री कुरमा घरात असेल आणि तिचे अचानक आरोग्य बिघडले तेव्हा काही स्त्रियांनी गावातील लोकांना आरडाओरडा करून बोलाव्या वर सुद्धा तिला हात लावायला कोणताही पुरुष तयार नसतो, त्यामध्ये तिचा पतीसुद्धा काही मदत करत नाही. आणि अशा स्थितीत जर तिचे आरोग्य आणखी बिघडले तर तिची मदत खूप विचार करून आणि स्वत:ची जबाबदारी घेऊन केली जाते. म्हणजे यामध्ये विचार करण्याची बाब आहे की, जर एखाद्या स्त्रीचे जीवन धोक्यात आहे आणि आपण रूढी–परंपरा यांचा विचार करतो आहे म्हणजे कुठे असते त्या वेळेस माणुसकी? स्त्रियांना मासिक पाळी येते म्हणून ती अशुद्ध होते का? असे अनेक प्रश्न त्या स्त्रियांनी विचारले काही स्त्रिया या प्रथेमुळे एवढ्या त्रासलेल्या आहेत त्यांचे म्हणणे होते की आम्ही आमच्या मुलींना ही प्रथा पाळू देणार नाही. कारण या प्रथेमध्ये पुरुषांचा सहभाग हा नाहीच्या बरोबर असतो.

कुरमा प्रथेचा आदिवासी समाजावर असलेला प्रभाव आणि त्याबद्दल स्त्रियांचे मत –

आदिवासी समाजात कुरमा प्रथा ही संस्कृतीतील अविभाज्य घटक म्हणून मानल्या जाते शिवाय पूर्वजांपासून चालत आलेली प्रथा असल्यामुळे आजही या प्रथेला खूप महत्व देऊन पाळल्या जाते. संस्कृतीशी निगळीत असल्यामुळे या प्रथेशी समाजातील प्रतेक घटकांच्या भावना जुळल्या आहेत. कुरमा प्रथेची अवहेलना झाली किंव्हा ती कुठल्याही कारणाने पाळण्यात आली नाही तर मोठा अनर्थ होईल व पाप लागेल अशी धारणा आदिवासी समाजात असल्यामुळे स्त्रियांना ती पाळावीच लागेल असे सामाजिक बंधनच आहे. परंतु स्त्रियांचे मत हे या उलट आहे, जसे संस्कृति व परांपरेच्या दृष्टीने ही प्रथा त्यांना महत्वाची वाटत असली तरी जेव्हा त्या सामाजिक दर्जा, आरोग्य व मानसिकता या विषयी विचार करतात तेव्हा त्यांना ही प्रथा नकोशी वाटते. या व्यतिरिक्त इत्तर समाजातील स्त्रियांकडे बघितल्या नंतर त्यांना आपण मागासलेले असल्याची जाणीव होऊन मानसिक खच्चीकरण होते असे त्यांचे मत आहे.

निष्कर्ष –

या विषयाचे संशोधन करतांना कुरमा प्रथेमुळे आदिवासी समाजातील समज आणि या परंपरेमुळे पाळत आलेल्या त्यांच्या रूढी–परंपरा यांचा मोठा पगडा तेथील स्त्रियांच्या जीवनावर पडलेला दिसून येतो. ही प्रथा त्यांच्या आयुष्यात कितपत योग्य आहे किंवा यामुळे त्यांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक या घटकांवर जे परिणाम होतात व त्यामुळे त्यांचे जीवन कशा प्रकारे घडले जाते यावर विचार करण्यासारखी बाब आहे. स्त्रियांना अशा प्रकारे बहिष्कृत करून त्यांच्या आरोग्याचा विचार आम्ही करतो म्हणून त्यांना मासिक पाळीच्या वेळेस गावाच्या बाहेर आरामासाठी पाठवले जाते असे म्हटले जाते. परंतु या प्रथेचा वास्तविक विचार करण्याची वेळ आली आहे. त्या झोपडीत त्यांना खरेच आराम मिळतो का? त्यांना कोण–कोणत्या समस्येला सामोरे जावे लागते? त्यांच्या आरोग्याची काळजी कशी घेतल्या जाते? यांमुळे मानसिक स्थिति वर काय परिणाम

पडतात? असे अनेक प्रश्न उद्‌भवतात. त्याचप्रमाणे त्यांना मासिक पाळीत होणाऱ्या रक्तस्त्रावाला वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बघितले जाते. यामध्ये लैंगिकता तेवढीच महत्त्वाची बाब आहे कारण स्त्रियांना अशुद्ध मानायचे आणि पुरुष शुद्ध असतो हे दाखवले जाते. सर्वच प्रथा परंपरा स्त्रियांनीच का पाळाव्यात याचेही प्रतिबिंब कुरमा प्रथेतून दिसून येते. या प्रथेच्या माध्यमातून स्त्रिया अशुद्ध आणि दुय्यम असल्याचे दाखवले जाते. त्यांना ज्या प्रकारे गावाच्या मुख्य रस्त्यावरून जाण्यास निर्बंध, घरातील वस्तूंना हात लावण्यास मनाई, गावाच्या वेशीत येण्यास मनाई केल्या जाते त्यावरून असे लक्षात येत आहे की, ह्मघ व्या शतकामध्ये स्त्रियांना अशी परिस्थिती सोसावी लागत आहे हि दुर्दैवाची बाब आहे.

आपण डिजिटल इंडियाचे स्वप्न बघत आहोत पण त्याच वेळी देशातील बहुतेक राज्यातील आदिवासी भागामध्ये मासिक पाळीविषयी वेगवेगळ्या भ्रामक परंपरा असल्याचे दिसून येतात. स्त्रियांना आराम करण्यास सांगून बहिष्कृताचे जीवन जगण्यास भाग पाडले जाते. त्यांना समाजाच्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. कुपोषण आणि रक्ताक्षय सारख्या आजारांमुळे स्त्रियांच्या आरोग्यावर फारच वाईट परिणाम होतात, तरी सुद्धा या प्रथेच्या विरोधात कुणी बोलायला तयार नाही किंवा कोणते कार्यक्रम त्यांच्यासाठी ठेवले तर फक्त बघून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. शाळा शिकणाऱ्या मुलींनी यांविषयी प्रश्न केले तर त्यांचे शिक्षण बंद केले जाते आणि लग्न लावून दिले जाते ज्यामुळे जात पंचायती समोर बोलायची कुणी हिम्मत करत नाहीत. अशा परिस्थितित आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याचे प्रश्न कधी, कसे आणि कोण सोडविणार हा आपल्या समोर पडलेला गंभीर प्रश्न आहे.

संदर्भग्रंथ सूची –

१. आगलावे प्रदीप; २००१, '*समाजशास्त्र*', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. कऱ्हाडे, बी. एस.; २००७ए *'शास्त्रीय संशोधन पद्धती'*, पिंपळापुरे आणि कंपनी पब्लिकेशन, नागपूर.
३. कुलकर्णी पी. के.;२००८, '*सामाजिक विचार प्रवाह*', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
४. खैरनार दिलीप; २००८, '*समाजशास्त्र परिचय*', डायमंड पब्लिकेशन, पुणे.
५. घाटोळे रा. न.; १९८५, '*ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास',* मंगेश प्रकाशन, नागपूर.
६. पाटे सुमन; १९९१, 'सामाजिक मानवशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर.
७. बोधनकर सुधीर; १९९९, '*सामाजिक संशोधन पद्धती*', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
८. भांडारकर, पु. ल.; १९८१, '*सामाजिक संशोधन पद्धती*', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर,
९. माने माणिक व गढवाल ए.ए.; २०१२, '*आदिवासींचे समाजशास्त्र*', विद्या प्रकाशन, नागपूर.
१०. संगवे विलास;१९७२, '*समाजशास्त्र*', पाप्युलर प्रकाशन, मुंबई.
११. साळीवकर संजय; २०१४, '*भारतीय आदिवासी जीवन आणि संस्कृती*', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

*संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर pratikzade9049@gmail.com, Mob. No. 9049676487

***

"महिला सबलीकरण: अपशिंगे (मि.) गावाचे व्यष्टी अध्ययन"

*वेदक्ती संजीव शिवदास
**दिपरंजन दिलीप भोसले

घोषवारा

ग्रामिण भागात महिलांचा आर्थिकदृष्ट्या विकास झाला नाही. यासाठी महाराष्ट्र शासन अनेक योजना राबवित आहे. त्यातून महिला अनेक योजनांचा लाभ घेत आहेत. शिक्षित आणि अल्पशिक्षित महिलांना बचत गटाच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवून त्याचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी बचतगट चळवळ सुरू झाली. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्याबरोबरच रोजगार निर्मिती करून इतर महिलांचे सक्षमीकरण करण्यास जिल्ह्यातील बचतगट पूरक ठरले आहेत. यासाठी महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान या योजनेचे योगदान महत्वाचे आहे. महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान या योजनेची सुरवात२०११साली करण्यात आली. याची अंमलबजावणी माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान या संस्थेची स्थापना व नोंदणी अधिनियम १८६०अन्वये करण्यात आली आहे. हे अभियान महाराष्ट्रातील ३४जिल्ह्यात व ३५१तालुक्यात राबविले जात आहे. यास 'उमेद'- क्षितिज नवे, विश्वास नवा... असे घोषवाक्य देण्यात आले आहे. या योजने अंतर्गत अनेक गावामध्ये शासकीय बचतगटांची निर्मिती करून महिला नवनवीन लघुउद्योग करीत आहेत. बचतगटातील महिलांचा विश्वास संपादन करून महिलांना संघटीत करणे आणि लघुउद्योग सुरू करण्यासाठी त्यांना बचतगटामार्फत कर्ज देणे आवश्यक आहे. अपशिंगे (मि.) या गावात अनेक बचत गट आहेत. गावातील बचतगट प्रेरिका यांनी महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियानाची माहिती घेऊन गावात 'उमेद' ही योजना राबवली आहे. या योजने अंतर्गत गावातील सर्व बचत गट शासकीय बचत गट मध्ये रूपांतरित करून काही नवीन बचत गटांची स्थापना केली आहे. बचत गटातील ज्या महिला स्वतः आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न करीत आहे त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम बचतगटाद्वारे केले जाते. या बचतगटाद्वारे कुकुटपालन, शेळीपालन, घरगुती मसाले, पापड उद्योग, पशुपालन, इत्यादी प्रकारचे लघुउद्योग सुरू केले आहेत. अनेक महिलांनी एकत्र येऊन केलेल्या लघुउद्योगांमुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारली व अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. अनेक महिलांनी बचतगटातून मिळालेल्या लाभातून आपल्या मुलांना शिक्षण दिले आहे. अनेक लोकांनी अपशिंगे (मि.) गावाचा असाच आदर्श घ्यावा आणि स्वतःची प्रगती करावी.

प्रस्तावना

आर्थिक सक्षमीकरण ही बचतगटामागील संकल्पना आहे. बचतगटांनी ग्रामीण भागातील महिलांचाआर्थिक व सामाजिक दर्जा सुधारला आहे. बचतगटांची चळवळ गेल्या दोन दशकांत भारतात, विशेषतः ग्रामीण भागात सुरु झाली आहे. महिला कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी प्रयत्न करत होत्या. बचतगटांनी अशा महिलांना योग्य तो मार्ग दाखविला. बचतगटांचे कार्य आणि त्याचे परिणाम बँका, पतपेढ्या, सोसायट्या यांच्यापेक्षा वेगळे आहेत. दहा-बारा महिलांनी एकत्र येऊन गट सुरू करायचा, प्रत्येकीने महिन्याला ठरावीक रक्कम भरायची आणि गटातील एखाद्या मंहिलेला कर्ज हवे असेल तर ते बचत केलेल्या पैशांतून द्यायचे. त्यावर गटाने ठरवलेले कमी व्याज आकारायचे व्याजस्वरूपात मिळणारा तो पैसा बचतगटाचा म्हणजेच बचतगटातील सर्व महिलांचा फायदा. बचतगटामुळे ग्रामीण महिलांच्या जीवनात परिवर्तन घडून आले आहे. २०११ मध्ये महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भगातील गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण अभियानाची सुरुवात केली. या अभियानाची अमलबजावणी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागात झाली.महाराष्ट्र राज्य जीवानोन्नती अभियानाची स्थापना व नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यात आली आहे. हे अभियान महाराष्ट्रातील ३४ जिल्हयात व ३५१ तालुक्यात राबविले जाते.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवानोन्नती अभियानास 'उमेद- क्षितिज नवे, विश्वास नवा...' असे घोषवाक्य देण्यात आले. या योजने अंतर्गत गावागावात महिला बचत गट सुरू करण्यात आले. त्यातून महिला आर्थिक मदत ही कर्ज

स्वरुपात घेत असून त्यातून नवनवीन लघु उद्योग करित आहेत. त्यातून गावाचा व स्वतःचा विकास करीत आहेत. त्यातून अनेक व्यवसाय करूनस्वतःच्या पायावर आत्मनिर्भर पणे उभ्या आहेत. अशाचा एका गावचा अभ्यास आपण केला आहे. सातारा तालुक्यातील अपशिंग (मि.) या गावात गेली काही वर्षे ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा फायदा अनेक कुटुंबान झाला आहे. कुटुंबाच्या सुधारणेमध्ये अनेक महिलांनीआपले कुटुंबे सुशोभित केले व मुलांना शिक्षण दिले आहे. स्वताची आर्थिक परस्थिती सुधारल्यामुळेअनेक महिलांच्या कुटुंबांची प्रगती झाली व त्यांचे जीवनमान सुधारले.

संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती

संशोधन समस्या : "महिला सबलीकरण: अपशिंगे (मि.) गावाचे व्यष्टी अध्ययन"

अभ्यास विषय : अपशिंगे (मि.) गावात महिलांचा सबलीकरणासाठी झालेली शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि त्यामुळे महिलांच्या आयुष्यात झालेल्या सामाजिक व आर्थिक बदलांचा शोध घेणे ही प्रस्तुत अभ्यासासाठीची समस्या आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :

१ अपशिंगे (मि.) गावात बचतगटामुळे झालेल्या महिलांच्या सामाजिक बदलाचा अभ्यास करणे.

२. अपशिंगे (मि.) गावातील महिलांच्या बचतगटामुळे झालेल्या आर्थिक बदलांचाअभ्यास करणे.

३. अपशिंगे (मि.) गावातील महिलांचा सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

संशोधन आराखडा :- प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

गृहीतके:- बचतगटामुळे महिलांचा सामाजिक दर्जा व आर्थिक दर्जा सुधारला आहे.

नमुना निवड :- प्रस्तुत अभ्यासासाठी सातारा तालुक्यातील अपशिंगे (मि.) गावातील महिला बचतगटांची सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे निवड करण्यात आली.

तथ्य संकलन पध्दती :- अभ्यासाची उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन प्राथमिक स्वरुपाची माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत अनुसूची तयार केली तिची पूर्व तयारी करून त्या दुरुस्ती केली याच मुलाखत अनुसूचीचा वापर करून १५ महिला उत्तर दात्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. तथ्य संकलनासाठी व्यक्तिगत निरीक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला. प्राथमिक माहितीस्त्रोत स्वत: या गावाला भेट देऊन केलेली निरीक्षणे, मुलाखती अनुसूचीच्या सहाय्याने मिळालेली माहिती तसेच छायाचित्राद्वारे मिळालेली माहिती इत्यादी वदुय्यम माहिती स्त्रोतांमध्येप्रकल्प अहवाल, पुस्तिका, इंटरनेट, ग्रामसंघ, बचतगट प्रेरीका इत्यादीसाधनांचा वापर करण्यात आला.

महिला सबलीकरण:

महिलांच्या जीवनातील सामाजिक बदल : अपशिंगे(मि.) गावातील महिला या अनेक सामाजिक उपक्रम राबवीले आहे. त्यामध्ये ग्रामसंघाच्या मार्फत निरक्षर महिलांना शिक्षण देणे, महिलांना संगणकीय प्रशिक्षण देणे, महिलांच्या करमणुकीसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे, मार्गदर्शन पर व्याख्याने, वाहन चालनाचे प्रशिक्षण देणे, आरोग्य शिबीर इत्यादी उपक्रम त्या ग्रामसंघामार्फत राबवू लागल्या. तसेच गावात दारूबंदी,स्वच्छता मोहिम यासारखे उपक्रम ग्रामपंचायती सोबत एकत्रित येऊन करू लागल्या.

महिलांच्या जीवनातील आर्थिक बदल : भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली आहेत.स्वातंत्र्य नंतर सात दशकाहून अधिक कालावधीतील या प्रवासात देशातील महिलांचे जीवनमान खूप बदले आहे त्यांचा स्थितीत सुधारणा झाली आहे. अपशिंगे (मि.) गावातील महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून कर्ज घेऊन अनेक लघुद्योग सुरु केले आहेत. लघुउद्योगातून मिळलेल्या आर्थिक लाभातून त्यांनी आपला व आपल्या कुटुंबाचा विकास केला. लघुउद्योगातून मिळालेल्या नफ्यातून अनेक स्त्रियांनी मुलांना शिक्षण देत आहेत. तसेच अनेक स्त्रियांनी आपल्या घराचे सुशोभीकरण केले. महिला आपले खर्च स्वतःच्या कमाईतून करू लागल्या. त्या आत्मनिर्भर होऊ लागल्या आहेत. अशा प्रकारे अपशिंगे मि गावात महिलांचे आर्थिक सबलीकरण दिसून आले.

स्त्री सक्षमीकरण म्हणजे काय?

कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांचा बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून घेणे,विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे' आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.

महिला आर्थिक सबलीकरण : भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरातील कामे करण्यात व्यस्त असतात. कमी दर्जाची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांनीच करावीत म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला ह्या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, दुग्ध व्यवसाय इत्यादी कामे करत असतात, परंतु त्या कामाचे मोजमाप कधीच केले जात नाही. त्यामुळे त्यांना बचतगटाची गरज भासू लागली.

बचतगटाची गरज : अपशिंगे (मि.)गावातील अनेक महिला आपल्या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, दुग्धव्यवसाय इत्यादी कामे करीत असत परंतु त्यांना या कामातून मिळालेल्या पैशाची बचत होत नव्हती. म्हणून बचत गटाची स्थापना करण्याचे ठरविले.

स्त्री-सक्षमिकरणाच्या योजना: महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणामध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांचा आर्थिक दर्जात सुधारणा,प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थाचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वयंसहाय्यता बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीययंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३०% आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५०% आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास मंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.

महिलांचे संघटन: बचतगटाच्या स्थापनेसाठी महिलांचे संघटन ही समस्या होती. त्यासाठी महिलांचा एकमेकांवर विश्वास असणे गरजेचे होते. अपशिंगे (मि.) गावात हे काम केले त्या व्यक्ती म्हणजे उमेद अभियानाच्या प्रेरिका यांनीगावातील महिलांचा विश्वास संपादन करून त्यांना पहिला बचतगट स्थापित केला व त्यास सावित्रीबाई फुले स्वयंसहाय्यता असे नाव दिले.

बचतगटाचे नियम:

१) बचतगटातील सदस्य संख्या ही २० किंवा त्यापेक्षा कमी हवी.
२) गटातील प्रत्येक सदस्य ठरलेल्या कालावधीने एकत्र येऊन बचत म्हणून ठराविक रक्कम गटात जमा करतात.
३) ही जमा केलेली रक्कम बचत गटातील सदस्यांनाच कर्ज म्हणून मिळते.
४) सभासदानेघेतलेले कर्ज हप्त्या – हप्त्याने बचत गटाला परत करणे अपेक्षित असते.
५) बचत गटाच्या व्यवहारासाठी बचत गटाचे सदस्य कर्ज द्यायचे का, द्यायचे ठरल्यास किती दराने द्यायचे, परतफेडी विषयी नियम वैगरे ठरतात.
६) बचत गट ही लोकशाही तत्वावर आधारित रचना आहे. त्यामुळे गटातील प्रत्येक सभासदाला समान अधिकार असतो.
७) बचतगटाने वरील सर्व सूत्रांचा नियम अमलात किंवा कटाक्षाने पाळला पाहिजे.

वैशिष्टे

१) बचतगटाच्या सदस्यांच्या ठरावाने त्या गटाचे बँकेत खाते काढता येते.
२) बचतगटांना बँकेकडून कर्ज मिळावे यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात आर्थिक तरतुदी करण्यात आली आहे.
३) बचत गट काढताना कसल्याच प्रकारचा खर्च येत नाही. ही मोफत सेवा आहे.
४) अशा गटांना राज्य व केंद्र सरकार अल्प व्याजदरावर अर्थ सहाय्य पुरवते. त्या कर्जाची सुलभ दरावर परतफेड करावी लागते.
५) राज्य सरकारने बचतगटासाठी विविध विकास योजना आखल्या आहेत जसे की मुद्रांक शुल्क माफ करणे.
६) महिला बचतगटा मार्फत सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जामुळे सभासद सामाजिक व आर्थिक परिणाम होऊन महिला सक्षम बनल्या आहेत.

बचत गटाद्वारे निर्माण झालेली उद्योजकता:

अपशिंगे (मि.) गावात बचत गटाद्वारे अनेक महिला कर्ज घेऊन लघुउद्योग करीत आहेत. त्यातून त्या समाजाच्या प्रगतीला हातभार लावत आहेत. यातून अनेक लघुद्योग जन्माला आले त्यापैकी काही पुढीलप्रमाणे:-

शिवणकाम, खाद्यपदार्थ बनविणे, लोणची पापड बनविणे, हॉटेल व्यवसाय, ब्युटीपार्लर, आणि इतर व्यवसाय आहेत.

१.१ लघुउद्योग करणाऱ्या व बचत करणाऱ्या महिलांचे वर्गीकरण :-

आपण निवडलेल्या नुसार अपशिंगे (मि.) गावाचे सर्वेक्षण करून लघुउद्योग करणाऱ्या महिलांची आकडेवारी व पैशांची बचत करणाऱ्या महिलांची आकडेवारी काढण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे-

अ. क्र.	बचतगटाचे नाव	एकूण संख्या	लघुद्योग करणाऱ्या महिलांची संख्या	पैशाची बचत करणाऱ्या महिला	लघुउद्योग करणाऱ्या महिला टक्केवारी	पैशाची बचत करणाऱ्या महिलांची टक्केवारी	एकूण
१.	मैत्री	१३	४	९	३०.७६%	६९.२४%	१००%
२.	भैरवी	१२	३	९	२५%	७५%	१००%
३.	मातोश्री	१२	४	८	३३.३३%	७७.७७%	१००%
४.	नवदुर्गा	१२	२	१०	१६.६६%	८३.३४%	१००%
५.	स्वामिनी	१२	२	१०	१६.६६%	८३.३४%	१००%
	एकूण	६१	१५	४६	२४.५९%	७५.४१%	१००%

सारणी क्रमांक १.१ नुसार दिसून येते की निवडलेल्या नमुन्यात बचतगटातील लघुउद्योग करणाऱ्या महिलांचा सर्वेक्षणात मातोश्री बचतगटामध्ये सर्वाधिक जास्त महिला लघुउद्योग करताना दिसून येतात. त्या खालोखाल मैत्री बचतगटातील महिला लघुउद्योग करताना दिसतात. मैत्री बचतगटानंतर भैरवी बचतगटातिला महिला लघुउद्योग करताना दिसतात. सर्वाधिक कमी लघुउद्योग करणाऱ्या महिला ह्या स्वामिनी बचतगट व नवदुर्गा बचतगटमध्ये असल्याचे दिसून आले.

पाच बचतगटातील एकूण ६१ महिला असूनत्यापैकी १५ महिला लघुउद्योग करतात व उर्वरित ४६ महिला पैशाची बचत करताना दिसून आल्या. त्यामध्ये सर्वाधिक जास्त लघुउद्योग करणाऱ्या मातोश्री बचतगटामध्ये ३३.३३% महिला लघुउद्योग करतात व त्या खालोखाल सर्वात कमी लघुउद्योग करणारे बचतगट हे नवदुर्गा बचतगट व स्वामिनी बचतगट आहेत व त्या दोन्ही बचतगटाची टक्केवारी समान असून त्यांची टक्केवारी १६.६६% आहे.निवडलेल्या नमुन्या नुसार सर्व लघुउद्योग करणाऱ्या महिलांची टक्केवारी २४.५९% अशी दिसून येते.७५.४१%महिला पैशाची बचत करत असून त्यांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत.

१.२ लघुव्यवसायाचे केलेले वर्गीकरण :-

निवडलेल्या नमुन्यनुसार अपशिंगे(मि.) गावातील सर्वेक्षण करून कोणते व किती उद्योग आहेत याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे

अ.क्र.	लघुउद्योगाचे नाव	वारंवारिता	टक्केवारी
१.	शिवणकाम	६	४०%
२.	हॉटेल व्यवसाय	१	६.६७%
३.	खाद्य पदार्थ	४	२६.६६%
४.	ब्युटी पार्लर	१	६.६७%
५.	इतर व्यवसाय	३	२०%
	एकूण	१५	१००%

सारणी क्रमांक १.२ नुसार दिसून येते की निवडलेल्या नमुन्यात ६(४०%) महिलाकरतात. त्या खालोखाल ४ (२६.६६%) महिला खाद्यपदार्थाचा व्यवसाय करीत आहेत. ३ (२०%) महिला इतर व्यवसाय करतात. १ (६.६७%) महिला हॉटेल व्यवसाय व १ (६.६७%) महिला ब्युटी पार्लर हा व्यवसाय करताना दिसून आल्या.

१.३ लघुउद्योग करणाऱ्या महिलांचे मासिक उत्पन्न

लघुउद्योग करणाऱ्या महिलांचे लघुउद्योगातून मिळणारे सरासरी मासिक उत्पन्न किती आहे त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे

अ.क्र.	लघुउद्योगाचे मासिक उत्पन्न	वारंवारिता	टक्केवारी
१.	२०००० ते २५०००	१	६.६५%
२.	१५००० ते २००००	२	१३.३३%
३.	१०००० ते १५०००	३	२०%
४.	५००० ते १००००	७	४६.६५%
५.	० ते ५०००	२	१३.६५%
	एकूण	१५	१००%

सारणी क्रमांक १.३ नुसार असे दिसून येते की ७(४६.६५%) महिलांचे ५००० ते १०००० मासिक उत्पन्न आहे. त्या खालोखाल लघु व्यवसाय करणाऱ्या ३(२०%) महिलांचे १०००० ते १५००० असे मासिक उत्पन्न आहे.२(१३.६५%) ० ते ५००० मासिक उत्पन्न असल्याचे दिसून आले. आणि १५००० ते २०००० उत्पन्न असलेल्या महिला सुद्धा २ आहेत. २०००० ते २५००० मासिक उत्पन्न कमवणारी महिला १ आहे.

स्त्री शिक्षण

स्त्री शिक्षण हेमहिला सबलीकरणासाठी गरजेचे आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण लागणारे महत्वाचे साधन म्हणजे स्त्री शिक्षण होय. स्त्री शिक्षण हा कोणत्याही समाजजीवनाच्यासमृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे.

१.४ बचत गटातील साक्षर व निरक्षर :-

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्या नुसार अपशिंगे(मि.) सर्वेक्षण करूनगावातील महिलांचे साक्षर निरक्षर प्रमाणाचे वर्गीकरण केले आहे ते पुढीलप्रमाणे

अ.क्र.	बचतगटाचे नाव	बचतगटातील महिलांची एकूण संख्या	साक्षर/निरक्षर	टक्केवारी	एकूण
१.	मैत्री	३	साक्षर –२ निरक्षर-१	६६.६७% ३३.३३%	१००%
२.	भैरवी	४	साक्षर- ३ निरक्षर- १	७५% २५%	१००%
३.	मातोश्री	३	साक्षर-२ निरक्षर-१	६६.६७% ३३.३३%	१००%
४.	नवदुर्गा	२	साक्षर-१ निरक्षर-१	५०% ५०%	१००%
५.	स्वामिनी	३	साक्षर-३ निरक्षर-०	१००% ०%	१००%
	एकूण	१५	साक्षर-११ निरक्षर-४	७३.३३% २६.६७%	१००%
			एकूण-१५	१००%	

सारणी क्रमांक १.४ नुसार दिसून येते की निवडलेल्या नमुन्यात बचत गटातील महिलांच्या साक्षरतेची संख्येतील उत्तरदात्यांमध्ये स्वामिनी बचतगटामध्ये असलेल्या एकूण ३(१००%) साक्षर महिला आहेत. त्या खालोखाल भैरवी बचत गटात ३(७५%) महिला साक्षर व १(२५%) महिला निरीक्षर असल्याचे दिसूनयेते. मैत्री व मातोश्री बचत गटात प्रत्येकी साक्षर २(६६.६७%) महिला वनिरीक्षर१(३३.३३%) महिला दिसून आले.यातून निदर्शनात येते की स्वामिनी बचतगटातील सर्व महिला साक्षर आहेत. एकूण १५ महिलांपैकी ११(७३.३३%) साक्षर व ४(२६.६७%) निरक्षर असल्याचे दिसून आले. साक्षरतेचे प्रमाण चांगले दिसून येते.

निष्कर्ष:

१) अपशिंगे (मि.) गावात राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली .

२) गावातील महिलांचा एकमेकांवर विश्वासाने एकमेकांशी वागू लागले.

३) अनेक कुटुंबाना आर्थिक मदत झाली.

४) अनेक महिला एकत्रित काम करू लागल्याने त्यांचा त्यांच्यातील संवाद वाढला.

५) अनेक महिला मनमोकळे पणाने जीवन जगू लागल्या.

६) अनेक महिलांना लघुउध्योगातून फायदा झाला.

७) या अभियानामुळे अनेक कुटुंबांची प्रगती झाली.

८) बचतगटातील महिला आत्मनिर्भर झालेल्या दिसून आल्या.

९) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानामुळे गावात महिला सबलीकरण तसेच सामाजिक जीवनातही महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत.

१०) अनेक लोकांनी अपशिंगे (मि.) गावाचा असाचआदर्श घ्यावा आणि स्वतःची प्रगती करावी.

सारांश:

अपशिंगे (मि.) गावात राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली.गावातील महिलांचा एकमेकांवर विश्वास वाढला. बचतगटाच्या माध्यमातून कर्ज घेऊन अनेक लघुउद्योग केले.अनेक कुटुंबाना आर्थिक मदत झाली.अनेक महिला एकत्रित काम करू लागल्याने त्यांचा त्यांच्यातील संवाद वाढला.अनेक महिला मनमोकळे पणाने जीवन जगू लागल्या. अनेक महिलांना लघुउद्योगातून फायदा झाला.या अभियानामुळे अनेक कुटुंबांची प्रगती झाली. बचतगटातील महिला आत्मनिर्भर झालेल्या दिसून आल्या. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानामुळे गावात महिला सबलीकरण तसेच सामाजिक जीवनातही महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत.

संदर्भसूची:

१) २०१८ चा अपशिंगे (मि.) ग्रामसंघ कार्यालयातून उपलब्ध झालेला महाराष्ट्र राज्य जीवानोंन्नती अभियान अंमलबजावणी संबंधीचा अहवाल.

२) ग्रामीण विकास आणि पंचायत राज विभाग, महाराष्ट्र सरकार

३) 'उमेद'- महाराष्ट्र राज्यजीवानोंन्नती https://www.umed.in

*Email-vedaktishivdas@gmail.com मो.नं.- ८४५९२२४५६७

**Email- dipbhosale09@gmail.com मो.नं.-८३०८२२७१७७

B.A.III, समाजशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज (स्वायत्त) सातारा.

घटक महाविद्यालय, के. बी. पी.विद्यापीठ, सातारा.

***

लिंगभाव आणि आरोग्य विषमता

***भावसार तन्मय प्रभाकर**
****डॉ.कावळे बंडु नानाभाऊ**

गोषवारा :-

संपूर्ण राष्ट्रीय आरोग्याचा विचार करता महिलांचे आरोग्य या घटकाला त्यामध्ये अनन्य साधारण महत्व आहे. हे नाकारुन चालणार नाही. या देशातील महिलांचे आरोग्य चांगले राहिले तर त्याचा परिणाम निश्चितपणे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी होऊ शकेल. आज आपल्या भारत देशातील महिलांचे आरोग्य ही चिंतेची आणि चिंतनाची बाब बनली आहे. या महिलांचा विकास लहानपणापासूनच व्हायला हवा. तिच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची जपवणूक होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने येणा-या प्रश्नांचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

महत्वपूर्ण शब्द :- लिंगभाव, आरोग्य,विकास,विषमता.

प्रस्तावना :-

आरोग्य हे स्त्रियांच्या विकास आणि प्रगतीचे निर्देशक आणि साधनही आहे.म्हणून स्त्रियांच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे आणि त्यांची उत्पादन क्षमता सुधारण्याच्या दृष्टिने आरोग्यविषयक बाबींवर गुंतवणुक करणे महत्वपूर्ण ठरते.या संदर्भात,लोकसंख्या आणि विकासावरील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये (आयसीपीडी)स्त्रियांच्या आरोग्यविषयक दर्जा सुधारण्यास प्राधान्य देण्यात आले.आयसीपीडीमध्ये नमूद केल्याप्रमाणे, स्त्रियांचे आरोग्य सुधारल्यास त्यांचे सक्षमीकरण होणे शक्य होईल. तथापि दारिद्रय, अपु-या शैक्षणिक आणि आर्थिक संधी, लिंगभाव आधारित पक्षपात आणि भेदभाव, अन्यायी कायद, आणि शासन व्यवस्थेमध्ये उत्तरदायित्वाचा अभाव अशा काही कारणांमुळे जगभरात स्त्रियांचे आरोग्यविषयक प्रश्न अधिकच गंभीर स्वरुप धारण करतात. आरोग्याचा अधिकार नसल्याने स्त्रियांच्या आरोग्याचा दर्जाही सुधारलेला नाही. असे आपल्या लक्षात येईल.

आरोग्य म्हणजे केवळ रोग अथवा दुर्बलतेचा अभाव नसून व्यक्तीची सर्वांगीणशारीरिक, मानसिक आणि सुस्थिती होय, अशी जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्याची व्याख्या केलेली आहे. व्यक्तीचे आरोग्य किंवा क्षमता विकसनात येणा-या अडथळयांना प्रतिबंध म्हणजे देखील आयुरारोग्य होय. उत्तम आरोग्य ही आयुष्यमानाचा दर्जा सुधारण्याची आणि आयुमार्नाची सुसंधी आहे,असे म्हणता येईल. म्हणूनच आरोग्यविषयक सुविधा किफायतशीर, सर्वांसाठी परिणामकारक , कार्यक्षम आणि स्त्रियांसह सर्वांसाठी सुलभ असाव्या. उत्तम आरोग्य काही मुलभूत बाबींवर अवलंबून असते. अन्नधान्य, स्वच्छ पाणी, निवास व्यवस्था, शिक्षण, उत्पादनक्षम रोजगार, प्रदूषणापासून सरंक्षण आणि सामाजिक दुरावलेपणास प्रतिबंध. वंश, धर्म आणि राजकीय श्रध्दा, आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती या आधारे कोणतेही शोषण होऊ न देणे उत्तम आरोग्यासाठी आवश्यक असते.तथापि, बहुतांश स्त्रियांच्या बाबतीत उत्तम आरोग्याच्या या सर्व मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत.त्यामुळे स्त्रियांच्या उत्तम आरोग्याची हमी हे कायमच एक आव्हान असते.1.

संशोधन पध्दतीशास्त्र :-

1) शोधनिबंधाची उदिदष्टये:-

१. लिंगभाव आणि आरोग्य विषमता या संकल्पनेचे अध्ययन करणे.

२. आरोग्ययंत्रणेचा स्त्रियांच्या आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन व स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नाचे अध्ययन करणे.

३. सध्याच्या सामाजिक परिस्थितीमध्ये स्त्रियांसाठी संवेदनशील आरोग्य यंत्रणा असायला हवी.

४. स्त्री आरोग्यविषयक धोरणाचे अध्ययन करणे.

2) गृहीत्यकृत्य :-

१. स्त्री आरोग्य व लिंगभावावर आधारित आरोग्य विषमता म्हणजे काय याबाबतचा

२. दृष्टिकोन विकसित होईल.

३. स्त्रियांकडे केवळ मुल जन्माला घालण्याचे यंत्र म्हणून न पाहता स्त्रियांना चांगल्या आरोग्यसेवेची कशी गरज असते.याचे भान येईल.

3) तथ्य संकलन :-

प्रस्तुत शोधनिबंध हा पूर्णपणे द्वीतीयक स्त्रोतांवर आधारित आहे, यामध्ये प्रामुख्याने प्रस्तुत विषयाशी संबंधित पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, जर्नल्स, विविध शासकीय अहवाल, शासकीय संकेतस्थळे, लेख इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

4) संशोधन आराखडा:-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.

5) शोधनिबंधाची मर्यादा:-

संशोधनकर्त्याच्या मते अध्ययनाच्या काही मर्यादा आहेत.प्रस्तुत शोधनिबंध द्वितीय सामुग्रीवर आधारीत असून यात योग्य व विश्वसनीय आकडेवारीचा अभाव, विविध पध्दतीने जमा केलेली आकडेवारी, शासकीय गोपनीयता व अपुर्ण माहितीमुळे सामुग्री व संग्रहणावर मर्यादा पडतात. माहितीचा अपुरेपणा ही या संबंधी मर्यादा आहे.

लिंगभाव आणि आरोग्य विषमता म्हणजे काय.

आरोग्यामधील लिंगभाव आधारित समता म्हणजे स्त्रियांच्या विशिष्ट अशा आरोग्य गरजांचा विचार करून त्याप्रमाणे धोरण आखणे व आर्थिक तरतूद करणे होय. सरकारी आरोग्य सेवकांना स्त्रियांच्या आरोग्य विषयक गरजांविषयी संवेदनशील करणे हे देखील समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.**2.**

आरोग्य विषमतेची व्याख्या:-

मार्गरिट व्हाईटह (Margaret White hard)-

''आरोग्य विषमता म्हणजे दोन सामाजिक गटांच्या आरोग्याची स्थिती व आरोग्यसेवांची उपलब्धता यामधील अन्यायकारक व दूर करता येण्याजोगे फरक होय.''

पाउलो ब्रॅवमेन (Paula Brave man)-

"आरोग्य विषमता म्हणजे, कोणत्याही समाज गटांमधील कोणताही फरक नव्हे तर जात, धर्म, लिंग आणि आर्थिक वर्गनिहाय सामाजिक फरक होय."**3.**

आरोग्य विषमता ही संकल्पना केवळ आरोग्यसेवांच्या असमान वाटपाशीच संबंधित नसून सामाजिक न्याय्य तत्त्वांशी निगडित आहे. जात, सामाजिक, आर्थिक, वर्ग, लिंग यावर आधारित समाज घटकांमधील विषमता आरोग्य स्थितीमधील अन्याय्यकारक फरकांना जबाबदार असते. विषमतेच्या संकल्पनेचा आणखी खोलात जाऊन विचार केला असता आरोग्य विषमता आरोग्यावर परिणाम करणाऱ्या सामाजिक, आर्थिक, भौगोलिक घटकांमधील फरकांवर अवलंबून असल्याचे दिसून येते. हे फरक समाज व्यवस्थेत रुजलेले आहेत. समाज व्यवस्थेचा भाग आहेत. भारतात प्रामुख्याने जात व लिंग यावर आधारित सामाजिक स्तर आढळून येतात. हे सामाजिक स्तर तसेच समाजातील विविध आर्थिक वर्गांमधील विषमताही आरोग्य स्थितीतील विषमतेस कारणीभूत आहे.

आरोग्याची व्याख्या

"प्रत्येक व्यक्तीला पुरेसे, पोषक अन्न, स्वच्छ निवारा, स्वच्छ परिसर, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य शिक्षण, पुरेशा आणि चागल्या दर्जाच्या आरोग्यसेवा, रोजगार, शिक्षण या सुविधांची उपलब्धता म्हणजे आरोग्य होय."**4.**

परंतु या पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रिया या मोठया प्रमाणात वरील बऱ्याच घटकांपासून वंचित राहतात आणि त्याचे परिणाम आरोग्यावर होतात. पुढील मुद्यांवरून आपल्याला याची जास्त स्पष्टता येऊ शकेल.

भारतातील स्त्रियांचे आरोग्य :-

1) लहान मुलांमधील कुपोषण चिंतेची बाब

राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस-5) च्या अहवालानुसार यामध्ये कुपोषणाबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशात बालकांमधील कुपोषणात वाढ झाल्याचे अहवालातून स्पष्ट होते. महाराष्ट्रात पाच

वर्षाखालील बालकांमधील कुपोषणातील वाढ कायम आहे.तर दुसरीकडे अतिस्थूलतेचे प्रमाण एक टक्क्यावरुन 4 टक्क्यांपर्यंत वाढल्याचे राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या पाचव्या अहवालातून स्पष्ट होते.5.

राज्यनिहाय वाढलेली टक्केवारी.

राज्य	(2019-20) टक्केवारी	(2015-16) टक्केवारी
आसाम	21.7	17
बिहार	22.90	20.8
हिमाचल प्रदेश	17.40	13.7
केरला	15.8	15.7
मिझोराम	9.8	6.1
नागालँड	19.10	11.30
तेलंगाणा	21.7	18.1
त्रिपुरा	18.2	16.8
जम्मु काश्मीर	19	12.2
लडाख	17.5	9.3
लक्षदवीप.	17.4	13.7

संदर्भ:-6(National Family Health Survey,(NFHS-5-2019-2021), Ministry of Health and Family Welfare Fact sheets, Key Indicators 22 States/UTS from Phase-1,P.N.27,51,56,63,81,93.)

5 वर्षाखालील शारीरिक विकास खुंटलेले मुल.

राज्य	(2019-20) टक्केवारी	(2015-16) टक्केवारी
हिमाचल प्रदेश	30.8	26.3
पश्चिम बंगाल	33.8	32.5
मेघालय	46.5	43.8
महाराष्ट्र	35.2	34.4
गुजरात	39	38.5
गोवा	25.8	20.1
केरल	23.4	19.7
मिझोराम	28.9	28.1
नागालँड	32.7	28.6
तेलंगाणा	33.1	28
त्रिपुरा	32.3	24.3
लक्षदवीप.	32	26.8

संदर्भ:-7 (National Family Health Survey,(NFHS-5-2019-2021), Ministry of Health and Family Welfare Fact sheets, Key Indicators 22 States/UTS from Phase-1,P.N.27,51,56,63,81,93.)

2) माता आरोग्य व बालमृत्युदर यांचा संबंध:-

अपु-या दिवसांचे बाळंतपण, नवजात बालकामधील रोग व जुलाब ही एक वर्षाखालील बालमृत्युची मुख्य कारणे आहेत. 60 टक्के मृत्युदर हया कारणांमुळे होतात. हया सर्व कारणांचा मातेच्या आरोग्याशी थेट संबंध आहे. कारण आईचे आरोग्य चांगले असल्यास बाळाचेही आरोग्य चांगले राहण्याची शक्यता जास्त असते. त्या विपरीत बाळाच्या जीविताचा प्रश्न निर्माण होतो असे आढळून आले आहे.

3) माहितीचा अभाव व सामाजिक परिस्थिती :-

नैसर्गिकरित्या स्त्रियांना प्रजनन मार्गाशी संबंधित आजार होण्याची शक्यता पुरुषांपेक्षा जास्त असते. त्यातच आरोग्याशी संबंधित निर्णय घेण्याचे स्वातंत्र नसल्यामुळे व समाजातील दुय्यम स्थानामुळे स्त्रियांच्याअनारोग्यात भरच पडते. योग्य माहितीच्या अभावामुळे स्त्रिया वेळेवर आरोग्यसेवांचा लाभ घेऊ शकत नाहीत.

4) हिंसा-स्त्रियांमधील आजाराचे एक प्रमुख कारण :-

हिंसेचे आरोग्यावर होणारे परिणाम फार गंभीर आहेत. हिंसेमुळे होणा-या शारीरिक इजा (जखमा, कापणे, हाड मोडणे) यासारख्या दुखापतींचे स्त्रियांच्या आरोग्यावर खोलवर परिणाम होत असतात.

5) मानसिक आरोग्य- दुर्लक्षित विषय:-

जागतिक आरोग्य सर्वेक्षणानुसार पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया हया जास्त प्रमाणात मानसिक आजारांनी ग्रस्त असतात असे दिसून आले आहे. या सर्वेक्षणात अधिकतर स्त्रिया हया ग्रामीण, कमी शिक्षित व कमी उत्पन्न असलेल्या होत्या. एकूणच आपली दूषित समाजव्यवस्था स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक आरोग्यावर विपरीत परिणाम करते.

6) बाळंतपणासाठी उपलब्ध सेवांमधील विषमता:-

केवळ स्त्री आहे म्हणून (उदा. दलित, आदिवासी, आर्थिकदृष्ट्या निम्न वर्ग या गटांचा एक घटक म्हणूनही) स्त्रियांना बहुसंख्य विषमतांना तोंड द्यावे लागते. स्त्रियांसाठी असणाऱ्या अपुऱ्या आरोग्यसेवेच्या उपलब्धतेमुळेत्यांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम ठळकपणे दिसून येतो. स्त्रियांवर मातृत्वाची जबाबदारी असल्यामुळे त्यांच्या आरोग्यविषयक गरजा ह्या पुरुषांपेक्षा निश्चितच जास्त असतात. मात्र आरोग्यसेवा घेतलेल्या लोकांमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी आढळते तसेच त्यांच्या आरोग्यावर होणारा खर्चही कमी आढळतो.8.

7) पोषण आहार, स्त्रियांमधील मृत्युदर :-

आपल्या खाण्यापिण्याच्या निवडीवरुन आपल्या वर्तमान आणि भविष्यातील आरोग्यावर परिणाम होत असतो. स्त्रीच्या पोषणविषयक गरजा भिन्न आहेत. गर्भधारणा आणि रजोनिवृत्तीच्या वेळी स्त्रीला काही विशिष्ट जीवनसत्वांची आवश्यकता असते.

कॅलरी:- साधारणपणे व्यक्तीला कमीत कमी 2200-2400 कॅलरीची आवश्यकता असते. गर्भवती स्त्री व धात्री स्त्री (दुग्धसर्जन काळातील माता) यांना अधिक उष्मांकांची गरज असते. सध्या 1990 उष्मांक दरडोई मिळतात. ही बाब लक्षात घेतल्यास ब-याच भारतीयांना आहरातून आवश्यकते एवढया कॅलरीज/उष्मांक मिळत नाहीत.यामुळे आदिवासी व ग्रामीण भागात कुपोषणाची समस्या गंभीर स्वरुपाची आहे.9.

जीवनसत्वे आणि खनिजे :- स्त्रियांना विशेषत: कॅल्शियम, लोह आणि फॉलिक ॲसीडची आवश्यकता असते.

आरोग्यपुर्ण प्रजनन:- आयुष्याच्या वेगवेळया टप्प्यात स्त्रीच्या पोषणाच्या वेगवेगळया गरजा असतात. गर्भधारणा, स्तनपान, रजोनिवृत्ती या काही प्रमुख अवस्था नमूद करता येतील.

आरोग्य विषयक समस्या :-

स्त्रियांच्या पोषणासंबंधी काही आरोग्यविषयक तक्रारी असणे शक्य आहे.लहान आतडयाचाविकार, दुग्धजन्य पदार्थ न पचणे,जीवनसत्वे आणि खनिजांची कमतरता,रक्तक्षय या काही समस्या होत.

चयापचय:-

स्त्रीच्या शरीरात काही पदार्थाचे पचन होण्याची प्रक्रिया भिन्न असते.निद्रावस्थेत किंवा व्यायाम करतांना पुरुषांपेक्षा कॅलरी जळण्याचे प्रमाण स्त्रियांमध्ये जास्त असते.10.

स्त्री आरोग्य विषयक धोरणे:- स्त्रियांच्या आरोग्याबाबत शासनाचे धोरण बहुतांशी अनास्थेचेच असल्याचे आढळून येते.

स्त्रियांच्या आरोग्याबाबत स्त्रीकेंद्री धोरण असलेले आढळत नाही.:-

याबाबतची सरकारी धोरणं, कार्यक्रम आखताना स्त्रियांचे सामाजिक स्थान लक्षात घेतले जात नाही. ही धोरणे व कार्यक्रम उपयुक्ततावादी असल्याचे दिसते. व्यक्ती जितकी उपयुक्त तितके तिच्यासाठी कार्यक्रम. उदा. स्त्री ही माणूस आहे आणि तिला शिक्षणाचा हक्क आहे म्हणून शिक्षण मिळाले पाहिजे. मात्र बाई शिकली की कुटुंब शिकते म्हणून तिला शिक्षण द्या, असे म्हणून कुटुंबाच्या शिक्षणाचे माध्यम म्हणून तिच्याकडे पाहणे हा उपयुक्ततावादी दृष्टिकोन झाला. स्त्री आरोग्याबाबतही हाच दृष्टिकोन दिसतो उदा. केवळ किशोरवयीन मुली उद्याच्या माता होणार म्हणून त्यांना आहार शिक्षण दिले जाते.

लहान मुली, 45 पेक्षा अधिक वय असलेल्या स्त्रिया यांना तसेच स्त्रियांच्या प्रजननसंस्थेच्या आजारांना सरकारी आरोग्यसेवांमध्ये पुरेसे स्थान नाही.:-

15 ते 45 वयोगटातील 40 ते 45 टक्के स्त्रिया क्षय, मलेरिया वगैरेंसारख्या संसर्गजन्य आजारांनी मृत्यू पावतात. मात्र स्त्रियांच्या मातामृत्यूवरच जास्त चर्चा होते. अशी चर्चा होणे महत्त्वाचे आहेच. पण त्यापलीकडेही स्त्रियांच्या असलेल्या आरोग्याच्या समस्यांकडे मात्र डोळेझाक होते. शिवाय मातामृत्यूवर लक्ष केंद्रित केले जात असूनही अवघड बाळंतपणं, ॲनिमिया, मातेचे वय, खूप लवकर बाळंतपण होणे व दोन बाळंतपणांतील अंतर कमी असणे अशा गोष्टींमुळे मातामृत्यूचे प्रमाण बरेच आहे. सुखरूप बाळंतपण करण्यासाठी सोयी - सुविधाही पुरेशा प्रमाणात सर्व ठिकाणी उपलब्ध नाहीत.

गर्भनिरोधक साधने/नसबंदीचे टार्गेट:-

एकीकडे प्रचंड वेगाने तंत्रज्ञानाचा विकास होत असताना या पुरुषप्रधान व्यवस्थेत आजही बाजारात आवर्जून संशोधन केलेली व बाजारात विक्रीला आलेली 985 गर्भनिरोधके ही स्त्रियांसाठी आहेत. ज्याचा परिणाम हा स्त्रियांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होत असला तरी. पुरुषत्व, मर्दानगी याची जपणूक करणाऱ्या पुरुषांसाठी निरोध हे खूप साधं, सोपं, कुठल्याही प्रकारचा परिणाम न करणारं एकच गर्भनिरोधक पुरुषांसाठी असूनसुद्धा त्याचा वापर अत्यंत कमी प्रमाणात केला जातो. शिवाय पाळणा थांबवण्यासाठी स्त्री-नसबंदी पेक्षा पुरुष नसबंदी खूपच सोपी, कमी त्रासाची असल्याने तीच करावी यासाठी जोरदार प्रयत्न आजपर्यंत झाले नाहीत. मोठ्या प्रमाणात स्त्री-नसबंदी शस्त्रक्रिया शिबिरांमध्ये स्त्रियांना जनावरांप्रमाणे वागवले जाते. कुठल्याही प्रकारच्या सुविधा, स्वच्छता, काळजी त्या शिबिरांमध्ये घेतली जात नाहीत. केवळ 'टार्गेट' म्हणून स्त्रियांच्या शरीराकडे पाहण्याचा आरोग्य यंत्रणेचा दृष्टिकोन आपण गेल्या अनेक वर्षांपासून पाहत आहोत.11.

निष्कर्ष:-

१. आरोग्यामधील लिंगभाव आधारित समता म्हणजे स्त्रियांच्या विशिष्ट अशा आरोग्य गरजांचा विचार करून त्याप्रमाणे धोरण आखणे व आर्थिक तरतूद करणे होय.
२. प्रत्येक व्यक्तीला पुरेसे, पोषक अन्न, स्वच्छ निवारा, स्वच्छ परिसर, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य शिक्षण, पुरेशा आणि चागल्या दर्जाच्या आरोग्यसेवा, रोजगार, शिक्षण या सुविधांची उपलब्धता म्हणजे आरोग्य होय.
३. लहान वयापासूनच स्त्रिया ह्या पुरुषांच्या तुलनेत जास्त प्रमाणात आजारी पडतात.
४. योग्य माहितीच्या अभावामुळे स्त्रिया वेळेवर आरोग्यसेवांचा लाभ घेऊ शकत नाहीत.
५. स्त्रियांवरील कामाचा तिहेरी बोजा हे या जास्तीच्या आजारांचे एक प्रमुख कारण आहे.
६. हिंसेचे आरोग्यावर होणारे परिणाम फार गंभीर आहेत.हिंसेशी संबंधीत कारणांमुळे होणा-या मृत्युचे प्रमाणही धक्कादायक आहे.
७. जागतिक आरोग्य सर्वेक्षणानुसार पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया ह्या जास्त प्रमाणात मानसिक आजारांनी ग्रस्त असतात असे दिसून आले.
८. स्त्रियांवर मातृत्वाची जबाबदारी असल्यामुळे त्यांच्या आरोग्यविषयक गरजा ह्या पुरुषांपेक्षानिश्चितच जास्त असतात.

समारोप:-

आरोग्यविषयक विविध घटकांचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की,भारतीय स्त्रियांचा दर्जा हा जगातील सर्वसाधारण स्त्रियांच्या दर्जापेक्षा व आशियाई देशांमधील स्त्रियांपेक्षा कनिष्ठ आहे व विकसित किंवा प्रगत राष्ट्रांतील महिलांपेक्षा फारच कमी आहे.त्यामुळे भारतामधील महिलांचा आरोग्याचा दर्जा सुधारण्याची गरज आहे हे

स्पष्ट होते.यासाठी मोफत दर्जेदार आरोग्य सुविधा ग्रामपातळीपर्यंत पोहोचविण्याकरिता ज्या योजना व कार्यक्रम आहेत त्यांचा लाभ अधिकाधिक महिलांना मिळण्याकरिता अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

संदर्भसूची-

1) वहानवाले,फाल्गुनी., आणि भोसले,एस.(2020). स्त्रिया आणि त्यांचे आरोग्य. सेंटर फॉर डिस्टंट एज्युकेशन, एस.एन.डी.टी. महिला विदयापीठ,मुंबई, पृ.क्रं.14.
2) www.vikaspedia.in/health या वेबसाईटवरील लिंगभाव आणि आरोग्य विषमता, साथी (Support for Advocacy and Training to Health Initiative, Action Research Centre of Anusandhan Trust) संस्था,पुणे यांचा लेख, पृ.क्रं.01
3) www.vikaspedia.in/healthया वेबसाईटवरील आरोग्य अधिकार व आरोग्यसेवांचा अधिकार समता-समानता दृष्टिकोन, साथी (Support for Advocacy and Training to Health Initiative, Action Research Centre of Anusandhan Trust) संस्था,पुणे यांचा लेख,(दिनांक 30/01/2020) पृ.क्रं.02,03.
4) निर्मळ,मुंजा., आणि आकात ,धनंजय.(2015). मानव संसाधन विकास,रिलायबल पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ.क्रं.137.
5) National Family Health Survey,(NFHS-5-2019-2021), Ministry of Health and Family Welfare, Introduction. P.N.-02.
6) National Family Health Survey,(NFHS-5-2019-2021), Ministry of Health and Family Welfare Fact sheets, Key Indicators 22 States/UTS from Phase-1,P.N.27,51,56,63,81,93.
7) National Family Health Survey,(NFHS-5-2019-2021), Ministry of Health and Family Welfare Fact sheets, Key Indicators 22 States/UTS from Phase-1,P.N.27,51,56,63,81,93.
8) घोरपडे, योगेंद्र., आणि जाधव, नितीन व इतर.,लिंगभाव आणि आरोग्य,साथी प्रकाशन, पुणे, पृ.क्रं.01.
9) वैरागडे, उज्वला., आणि मुळे, विदयुलता.(2012). सामुदायिक विकास,विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण, विदया बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.पृ.क्रं.370,371.
10) वहानवाले,फाल्गुनी., आणि भोसले,एस.(2020). स्त्रिया आणि त्यांचे आरोग्य. सेंटर फॉर डिस्टंट एज्युकेशन, एस.एन.डी.टी. महिला विदयापीठ,मुंबई, पृ.क्रं.18.
11) www.vikaspedia.in/health या वेबसाईटवरील लिंगभाव आणि आरोग्य विषमता,साथी (Support for Advocacy and Training to Health Initiative, Action Research Centre of Anusandhan Trust) संस्था,पुणे यांचा लेख, पृ.क्रं.02.

***संशोधक विद्यार्थी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.**

ई मेल आयडी :tanmaybhavsar9@gmail.com, मो.नं.:-8329883309

****संशोधक मार्गदर्शक प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख, इंद्रराज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, (नॅक बी + दर्जा) ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद.ई मेल आयडी:-bnk6262@gmail.com, मो.नं.:-9423155260.**

***

नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रियांच्या जमीन हक्क मागणीला पितृसत्ताकतेची प्रतिकूलता

*प्रा. दिपक हरिभाऊ शिंदे

प्रस्तावना:

महिलांची जमीन मालिकेतील विषमता ही संपूर्ण जगातील समस्या आहे. जमीन विषयक लिंगभाव आधारित विषमता ही ठळकपणे कोणी मांडली? याकडे कोणी लक्ष वेधले तर प्रामुख्याने स्त्रीवादी विचारवंतांनी वेधले आहे. या महिलांच्या जमीन मालकी समस्येकडे लक्ष वेधणारी भूमिका आणि अभ्यास केला पाहिजे अशी भूमिका स्त्रीवादी विचारवंतांची आहे.आपण आपल्या पृथ्वीला आई, माता,पृथ्वी असे म्हणून स्त्रिवादी बनविले आहे. स्त्रीवादी लोक जमिनीचा प्रश्न यापेक्षा व्यापकतेने पाहतात. जगातले सर्वच गरीब हे जमिनीवर उपजीविकेसाठी अवलंबून आहेत. जमिनीमुळे अन्न मिळते, आसरा मिळतो जमिनीमुळे स्व ओळख निर्माण होते. (अग्रवाल, बी. १९९४:८.). जमिनीबद्दलचे अधिकार मात्र स्त्रियांना मिळत नाही हा एक विरोधाभास आहे. तो विरोधाभास दूर करण्यासाठी म्हणून जमिनीचा हक्क महत्त्वाचा आहे अशी चर्चा स्त्रीवाद्यांनी केलेली आहे.

स्त्रीवादी विचारवंत म्हणतात की, स्त्रियांना जमिनी कशासाठी मिळाला पाहिजे?

१. स्त्रिया जगात संख्येने निम्म्या आहेत आणि दोन डॉलर पेक्षा प्रतिदिन त्यांना कमी उत्पन्न आहे अशा गरीब स्त्रियांचे प्रमाण खूपच जास्त आहे म्हणून स्त्रियांना जमिनीचे हक्क मिळायला हवेत.
२. स्त्रियांच्या हक्क अधिकारांमध्ये सामाजिक प्रमाणके, कायदे अडथळा निर्माण करतात. जगातील निम्म्या लोकसंख्येला हे पारंपारिक कायदे आणि अधिकार प्रभावित करतात म्हणून जमिनीचे हक्क स्त्रियांना मिळायला हवेत.
३. शेती क्षेत्रात 70 टक्के स्त्रिया गुंतलेल्या आहेत. त्या स्वतः अन्नधान्याचे उत्पादन करणारे आहेत. मात्र त्या स्वतः कुपोषित आहेत. आरोग्याच्या मुद्द्यापासून त्या दूर आहेत म्हणून स्त्रियांना जमीन मालकीत अधिकार मिळाला हवेत. (Tahili moor:landesa, 2017).

महिला जमीन हा तिसऱ्या जगातील अतिशय ठळक व लक्षणीय मुद्दा आहे. स्त्रियांच्या संदर्भात केली गेलेली कृतीच्या संदर्भात मालकी हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सर्व स्तरावर,आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्री मुक्ती आणि स्त्रियांच्या सबलीकरणाची चर्चा जिथे जिथे होते तिथे तिथे स्त्रियांच्या संपत्तीला/मालमत्ता विषयक संपत्तीला, जमिनीचे अधिकारांना महत्त्व दिले जाते.

सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोलच्या (SDS) पाचव्या मुद्द्यांमध्ये असे म्हटले आहे की, जमिनीवर महिलांना समान हक्क करावा. त्यामुळे महिलांच्या जमिनीच्या बाबतीतील लिंगभाव विषमता हा कळीचा मुद्दा आहे.

ज्या महिलांच्या मालकीची जमीन आहे त्यांना घरातील निर्णयांमध्ये अंतिम निर्णय घेण्याची शक्यता जास्त असते. (Allendorf K.: 2007: 35). जेव्हा स्त्रियांकडे घरातील शेतजमिनीचा मोठा वाटा असतो, तेव्हा कुटुंबे त्यांच्या घरातील बजेटचा मोठा हिस्सा अन्नासाठी देतात. जेव्हा घरातील महिलांना जमिनीचा अधिकार असतो, जर आईच्या मालकीची जमीन असेल तर मुलाचे वजन खूपच कमी असण्याची शक्यता निम्म्याने कमी होते. (Doss C.: 2006, 15(1): 149-180). जर आईच्या मालकीची जमीन असेल तर मुलांची शैक्षणिक क्षमता उच्च असते (Katz, supra note 6, at 14-15).

भारतात 1956 साली डॉ. आंबेडकरांनी या जमीन मालकीचा अभ्यास केला होता आणि त्यांनी हिंदू कोड बिलाची मांडणी केली होती अशा अनेक मांडणी केली होती स्त्रियांच्या बाबतीत अनेक प्रकारच्या मांडण्या केलेल्या दिसून येतात त्यात हक्क आधारापेक्षा कल्याणकारी उपक्रम हा महत्त्वाचा मानला गेला स्त्रियांच्या जमीन मालकीच्या संदर्भातील प्रश्न किंवा त्याची चर्चा कमी दिसून येते या संदर्भातील भान फारसे निर्माण झालेली दिसून येत नव्हते. स्त्रियांच्या जमीन मालकीच्या संदर्भातील भान निर्माण करून देण्याचे स्त्रीवादी विचारवंतांनी केलेले दिसून येते. स्त्रियांच्या जमीन मालकीच्या विषमतेला अनेक राजकीय,समाजशास्त्रीय आयम व संदर्भ आहेत. अभ्यासाच्या अंगाने त्याकडे इतिहासाचे लक्ष वेधले गेले नाही. स्त्रीवादी अभ्यासकांनी प्रामुख्याने हे चर्चा विश्व निर्माण केले आहे व एक महत्त्वाची भूमिका मांडली आहे. त्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

जगभरात स्त्रीवादी जमिनीच्या प्रश्नांकडे कधी पाहायला सुरुवात केली?

सिमोन द बूव्हा यांचे मते स्त्रीचे अवमूल्यन ही एक मानवी जीवनातील इतिहासातील आवश्यक पायरी किंवा टप्पा आहे. आदीम कृषी समुदायाच्या उत्तर काळामध्ये पुरुषसत्ता व्यवस्था स्थिर आल्यानंतर स्त्रियांचे अवमूल्यन पूर्ण झाले. अश्मयुगापासून ब्रांच युगापर्यंत झालेल्या विकासामुळे माणसाला आपल्या श्रमातून जमीन किंवा भूमीवर स्वामित्व प्राप्त करता आले. त्याचप्रमाणे तो स्वतःही भूमीचा मालक झाला. शेतीही आता एखादी वस्तू राहिली नाही तर माणसाच्या सर्जनशील श्रमातून ते निर्माण होते हे त्याला समजले यानंतर त्याने आपल्या अपत्यांवर दावा सांगितला. याच वेळी तो आपण उत्पादित केलेल्या धान्यावरही हक्क सांगू लागला. मातृवंशीय संरचना ऐवजी पितृवंशी संरचना निर्माण झाली. (सिमोन दि बूव्हा 1981 पृष्ठ 111, भागवत 2008 पृष्ठ 111,112) बुव्हा यांच्या मते पितृसत्ताक सत्तेच्या उदयानंतर स्त्रियांचे संपत्ती ग्रहण करण्याचे आणि वाटपाचे हक्क हस्तांतरित झाले. अशारीतीने स्त्रियांचा इतिहास हा बहुतांशी स्वरूपात पितृप्रधानतेशी गुंतवलेला आहे. खाजगी संपत्तीवरील अधिकार संपल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम होऊन स्त्रीच्या व्यक्ति म्हणून असणाऱ्या प्रतिष्ठेला धक्का बसला आहे.(सिमोन दि बूव्हा 1981 पृष्ठ 111, भागवत 2008 पृष्ठ. 112)

शीला रो बॉथम यांचे मते सर्वसाधारणपणे मार्क्सवादी असे गृहीत धरतात की, भांडवलशाही समाज एकदा उलथवून टाकला की, उत्पादनाचे नियंत्रण संघटन यामध्ये मूलभूत परिवर्तन अपरिहार्यपणे होईल आणि भांडवली उत्पादन पद्धतीतून असलेले सामाजिक संबंधही अपरिहार्यपणे बदलतील.

रोबोथम असे म्हणतात की, क्रांतिकारी चळवळीत स्त्रिया फक्त पाठिंबा देणाऱ्या किंवा हजर राहणाऱ्या व्यक्ती नसून, समान पातळीवरील सहकारी व्हायला पाहिजे तर उत्पादन या संकल्पनेचा अवकाश व्यापक स्वरूपात निर्माण होईल. जर कष्टकरीस वर्गातील स्त्रियांची चळवळ उभी राहिली आणि त्यांनी जाणीवपूर्वक भांडवलशाही आणि पुरुषसत्ता या दोघांना प्रतिशत देण्याचा प्रयत्न केला तसेच काळ्या, पिवळ्या, तपकिरी अशा सर्व स्त्रिया एकत्र येऊन वंशवाद आणि साम्राज्यवाद यांना शह देऊ शकल्या तरच मार्क्सवाद आणि स्त्रिवाद यांचे मिश्रण चैतन्यशाली आणि खऱ्या स्वरूपात अस्तित्वात येईल. (रोबोथम: 1972 पृष्ठ 244 -247,भागवत, 2008, पृष्ठ 393).

एंजल्सने कुटुंब खाजगी संपत्ती आणि शासन संस्था यांचा उगम या लेखनाचा सखोल अभ्यास केलेले विचारवंत लुई हेन्री मॉर्गन यांच्या मते स्त्री स्वातंत्र्य संदर्भात सहानुभूतीची भूमिका घेतली जाते. मॉर्गन यांच्या मते मातृत्वाच्या हक्कापासून पितृत्वाच्या हक्कापर्यंतचे जे संक्रमण झाले त्या संक्रमणाचे कळीचे महत्त्व आधारित होते. त्याच्यामध्ये खाजगी संपत्तीच्या वारसा हक्काच्या संदर्भात स्त्रियांना फार मोठा तडाका पितृवंशाकडे संक्रमण झाले त्या काळात बसला.(भागवत 2008,47). वरील ऐतिहासिक विवेचनाच्या आधारे आपणास असे लक्षात येते की, स्त्री ही सत्ता, संपत्ती, व अधिकारच्या बाबतीत वंचित घटकात मोडणारी आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाच्या नंतरही ही महिलांची वर्जीतता जमिनी सारख्या अति महत्वाच्या मालकी बाबतही संपूर्ण जगात दिसून येते याला नाशिक जिल्हाही अपवाद नाही.

प्रस्तुत संशोधात नाशिक जिल्हा हे कार्य क्षेत्र असून, नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आजही सरंजामशाहीचे वर्चस्व अदृश्य स्वरूपात दिसून येत आहे. घराण्याची जमीन विभाजित होऊ नये घराण्याचे नाव व प्रतिष्ठा टिकून राहावी म्हणून जमिनीच्या बदल्यात सोने किंवा दागिना दिला जातो. जमीन ही केवळ मालमत्ता नाही तर जमीन म्हणजे सत्ता, अधिकार, सरंजामशाहीचा थाट आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जमीन मागणी करणाऱ्या स्त्रियांना जमिनीचा हक्क सोडावा यासाठी सोन्याचे दागिने दिले आहे. जमीन ही सोन्यापेक्षा मौल्यवान आहे. हे सिद्ध होते आहे. स्त्रीला जमिनीचा हक्क केवळ कौटुंबिक संबंध टिकून राहावे. माहेरपण टिकून राहावे. यासाठी हा हक्कसोडपत्रची तडजोड दिसून येते. यातून पुरुषी वर्चस्व यशस्वी होताना दिसून येते. नाशिक जिल्हयातील ग्रामीण स्त्रियांच्या जमीनीच्या हक्क मागणीला पितृसत्ताकतेची (वडील, भाऊ) यांची प्रतीकुलता- कशी आहे. याचे विश्लेषण करण्याचा मुख्य हेतूने प्रस्तुत संशोधनाचा विषय मांडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) ग्रामीण भागात जमिनीच्या मालकीवर पितृसत्ताकतेचा पगडा कसा आहे त्याचा अभ्यास करणे.

२) नाशिक जिल्ह्यातील ग्रामिण महिलांच्या जमीनधारणांचा अभ्यास करणे. नाशिक जिल्ह्यातील स्त्री व पुरुष यांच्या जमीनधारणांचे लिंगभाव आधारित विषमतेचे स्वरुप स्पष्ट करणे.

३) जमीनविषयक मालकी महिलांना प्राप्त होण्यातील पितृसत्ताकतेची प्रतिकूलता अभ्यासणे.

४) जमीनविषयक मालकी महिलांना प्राप्त होण्यासाठी कायदेशीर उपाय योजना सुचविणे.

गृहीतकृत्य :

१) पितृसत्ताकता , सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक परंपरा इ. घटकामुळे ग्रामिण स्त्रियांकडे जमीन मालकी अत्यल्प आहे.

२) नाशिक जिल्ह्यात पितृसत्ताक कुटुंब पध्दतीमुळे ग्रामीण स्त्रियांच्या जमीनीच्या हक्क मागणीला पितृसत्ताकतेची (वडील, भाऊ) प्रतीकुलता आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत अध्ययनाचा मुख्य हेतू नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या जमीनविषयक मालकीतील लिंगभाव असमानता अभ्यासणे असा आहे. हा अभ्यास क्षेत्रिय (empirical) स्वरुपाचा असून त्यामध्ये नाशिक जिल्यातील ग्रामीण महिलांच्या मालमत्ता विषयक समाजस्थितीचा व कायदेशीर परिवर्तनाचा अभ्यास तृणमूल पातळीवर होणार आहे. या अभ्यासात संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही अभ्यास पद्धतींचा वापर केला आहे.

संशोधनाची तंत्रे :

अनुसूची (Interview schedule) अनौपचारिक मुलाखती (Informal Interview) व्यष्टी अध्ययन (Case Study)

संकल्पनात्मक चौकट

स्त्रियांचे प्राचीन काळापासून पितृसत्ताकतेच्या चौकटीमुळे संपत्तीच्या अधिकारापासून कसे वर्जन होत गेले. त्यांना संपत्तीचे अधिकारापासून कसे वगळले जात आहे. Social Exclusion या सिद्धांत चौकटीतून प्रस्तुत संशोधनाची मांडणी केली आहे हे स्त्रियांचे होणारे वर्जन जागतिकीकरण उदारीकरण व नवउदारीकरण व खाजगीकरण यातून निर्माण होत असून पितृसत्ताकतेची नवी रूपे या संदर्भात ही संकल्पनात्मक बांधणी या चौकटीत केली आहे.

स्त्रियांच्या मालमत्तेबाबतचे स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचा कायदा

१) वारसाहक्क कायदा १९५६:

भारतीय राज्यघटनेने स्त्री - पुरुषांना समान अधिकार दिले असले तरी प्रत्यक्षात महिलांना हे अधिकार मिळतात का असा प्रश्न आहे? १९९४ साली महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य होते की जेथे १९५६ च्या हिंदू वारसा हक्क कायद्यात सुधारणा करण्यात आली २२ जून १९७४ नंतर मुलीला मुलाप्रमाणे जन्मता मालमत्ता विषयक अधिकार मिळाला आहे या कायद्यातील एक अपवाद म्हणजे २२ जून पूर्वी झालेल्या वाटण्यांना ही तरतूद लागू नाही या सुधारित कायद्यातील तरतुदी पुढीलप्रमाणेः

1. सदर कायद्यानुसार जोपर्यंत संयुक्त कुटुंबाची सामायिक मालकी आहे तोपर्यंत मुलगी किंवा स्त्री वाटा मागू शकते.
2. मुलगी किंवा स्त्री स्वतंत्रपणे कुठल्याही भागाचा ताबा घेऊ शकत नाही.
3. सामायिक मालकी असल्याने उत्पन्नही सामायिक असेल आणि त्यातूनच खर्चही होणार आहे.

मालमत्तेतून मिळालेल्या फायद्या इतकीच कर्जाची किंवा तोट्याची जबाबदारी महिलांना किंवा स्त्रियांना घ्यावी लागेल. प्रस्तुत कायद्यानुसार महिला व मुलीना वडिलांच्या व पतीच्या स्थावर मालमत्तेत अधिकार प्राप्त होतो.

१) हिंदू उत्तराधिकारी (सुधारणा) कायदा, २००५ (HSAA 2005.)

हिंदू उत्तराधिकार कायदा, 1956 मधील लिंगभेदभावाधारित तरतुदी दूर करण्यासाठी लागू करण्यात आला होता. या दुरुस्तीनुसार, कुटुंबाच्या सामुहिक मालमत्तेत मुलीला जन्मतःच अधिकार असेल. मुलाप्रमाणेच कन्येला आता पुत्राप्रमाणेच सामुहिक मालमत्तेत (हिंदू अविभक्त कुटुंबाची वडिलोपार्जित मालमत्ता) समान हक्क असतील. ही सुधारणा हिंदू उत्तराधिकारी कायद्याचे कलम 23 देखील रद्द करते.

वरील कायदे स्त्रियांसाठी असले तरी नाशिक जिल्ह्यातील स्त्रियांची जमीनमालकीतील लिंगभाव असमानता पुढील प्रमाणे दिसून येते.

नाशिक जिल्ह्यातील स्त्रियांची जमीन मालकीच्यासंदर्भात सध्याची स्थिती:

कृषीगणनेच्या आकडेवारीनुसार नाशिक जिल्हयातील जमीन मालकीच्यासंदर्भात असे दिसून येते की, १५.०३% स्त्रीयांच्या नावावर जमिनी आहेत व त्यांच्याकडे १३.०८% जमिनीचे क्षेत्र दिसून येते.

नाशिक जिल्हयातील नावावर जमिनीची आकडेवारी पुढील प्रमाणे:

अ.न.	नाशिक जिल्ह्यातील तालुके	स्त्रियांची सरासरी जमीन मालकी%
१	दिंडोरी	१२.२५
२	इगतपुरी	१७.९६
३	नाशिक	१६.४०
४	निफाड	११.३९
५	सिन्नर	१६.९४
६	त्र्यंबकेश्वर	१७.०७
७	मालेगाव	२२.६४
८	नांदगाव	२३.६१
९	देवळा	२२.८६
१०	बागलाण	२१.९१
११	चांदवड	१६.२२
१२	कळवण	१९.४७
१३	पेठ	२३.३१
१४	सुरगाणा	१६.१४
१५	येवला	२०.६८

संदर्भ: AGRICULTURALCENSUS2010-**11** Dated : 11/12/2018

नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक कमी स्त्रियांची जमीन मालकी असणारा तालुका निफाड हा असून येथे ११.३९ % स्त्रीयांच्या नावावर जमिनीची मालकी दिसून येते.तर मालेगाव तालुक्यात २२.६४ % सर्वाधिक स्त्रियांची जमीन मालकी असणारा तालुका दिसून येतो.

ग्रामीण भागात आजही सरंजामशाहीचे वर्चस्व अदृश्य स्वरूपात दिसून येत आहे. घराण्याची जमीन विभाजित होऊ नये घराण्याचे नाव व प्रतिष्ठा टिकून राहावी म्हणून जमिनीच्या बदल्यात सोने किंवा दागिना दिला जातो. जमीन ही केवळ मालमत्ता नाही तर जमीन म्हणजे सत्ता, अधिकार, सरंजामशाहीचा थाट आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जमीन मागणी करणाऱ्या स्त्रियांना जमिनीचा हक्क सोडावा यासाठी सोन्याचे दागिने दिले आहे. जमीन ही सोन्यापेक्षा मौल्यवान आहे. हे सिद्ध होते आहे. स्त्रीला जमिनीचा हक्क केवळ कौटुंबिक संबंध टिकून राहावे. माहेरपण टिकून राहावे. यासाठी हा हक्कसोडपत्रची तडजोड दिसून येते. या केसमध्ये पुरुषी वर्चस्व यशस्वी होताना दिसून येते. बळजबरीने जमिनीच्या बदल्यात सोने अशा प्रकारचा निर्णय कौटुंबिक दबावाने घेण्यास भाग पाडले जाते.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील सहा तालुक्यांशी (नाशिक,निफाड दिंडोरी,चांदवड,त्र्यंबकेश्वर, इगतपुरी) निगडीत आहे.या सहा तालुक्यांची सहेतुक संशोधन पद्धतीने निवड करण्यात येणार आली.या तालुक्यातील निवडक ३० (५ टक्के नमुना निवड) ग्रामपंचायती आणि तलाठी तसेच गावांमधील निवडक ३०० महिला ग्रामस्थांकडून प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची भरून घेतली आहे.

महिला शेतकऱ्यांच्या सामाजिक अध्ययनासाठी नमुना म्हणून निवडलेल्या ३०० नमुना महिला शेतकऱ्यांची जमीनीचा हक्क मागितला तेव्हा वडील, भाऊ यांचे प्रतीकुलता व अनुभव याबाबत वर्गीकरण विषयक माहिती पुढील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे आहे.

जमीनीचा हक्क मागणीला वडील, भाऊ यांची प्रतीकुलता

अ क्र	तपशिल	वारंवारिता	शेकडा प्रमाण
१	भाऊ व भाऊजायांनी मला लोभी, हलकट समजून माझी मानहानी केली	६९	२३.००
२	माहेरच्या सर्व सदस्यांनी जमीन देण्यास पूर्ण विरोध दर्शविला	४८	१६.००
३	प्रेमाने जमीन देण्यास नकार दर्शविला	८१	२७.००
४	वडीलांचा पूर्ण विरोध दिसला	९३	३१.००
५	तटस्थतेचे धोरण अवलंबविले	९	३.००
	एकूण	३००	१००.००

आलेख

जमीनीचा हक्क मागणीला वडील, भाऊ यांची प्रतीकुलता

वरील तक्त्यात नमुना निवड केलेल्या नाशिक जिल्हयातील सहा निवडक तालुक्यातील ग्रामीण शेतकरी महिलांचे जमीनीचा हक्क मागितला तेव्हा वडील, भाऊ यांचे प्रतीकुलता व अनुभव याबाबत वर्गीकरण केलेले आहे. या तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की नमुना निवड केलेल्या ३०० महिला पैकी भाऊ व भाऊजायांनी मला लोभी, हलकट समजून माझी मानहानी केलेल्या महिलांची संख्या ६९ (२३.०० टक्के) आहेत, माहेरच्या सर्व सदस्यांनी जमीन देण्यास पूर्ण विरोध दर्शविलेल्या महिलांची संख्या ४८ (१६.०० टक्के) आहेत, प्रेमाने जमीन देण्यास नकार दर्शविलेल्या महिलांची संख्या ८१ (२७.०० टक्के) आहेत, वडीलांचा पूर्ण विरोध केलेल्या महिलांची संख्या ९३ (३१.०० टक्के) आहेत, तटस्थतेचे धोरण अवलंबविलेल्या महिलांची संख्या ९ (३.०० टक्के) यावरुन असे निदर्शनास येते की वडीलांचा पूर्ण विरोध दिसलेल्या महिलांची संख्या सर्वाधिक ९३ (३१.०० टक्के) आहे. आणि तटस्थतेचे धोरण अवलंबविलेल्या महिलांची संख्या सर्वात कमी ९ (३.०० टक्के) आहेत या तक्त्यावरुन असे स्पष्ट होते. की वडीलांचा पूर्ण विरोध दिसलेल्या महिलांची संख्या सर्वाधिक आहे.

निष्कर्ष:

- वडिलोपार्जित जमिनीत हक्क अधिकार मागतांना कसे अनुभव आले यासंदर्भात अनौपचारिक मुलाखती घेतल्या असता असे दिसून आले की, भाऊ आणि वडील हे दोघेही पितृसत्ताकतेचे प्रतिनिधी आहे. या दोघांमध्ये जमीन मागणीच्या संदर्भात आलेल्या प्रतिक्रिया वेगळ्या दिसतात. पितृसत्ताकता सर्वच पातळ्यांवर समान काम करत

नाही. हे भेद, जात, वर्ग, लिंगभाव व दोन पिढ्यांमध्ये असणारा फरक यामुळे जाणवत आहे. जमीन मालकीच्या संदर्भात असणारी आंतरछेदकता ही महत्वाची असून भाऊ कुठल्या वर्ग, धर्म, पंथ वर्गाचे होते की मोठे होते, विरोध करणारे होते की नाही. बऱ्याचदा वडील पाठिंबा देतात भाऊ विरोध करतात. कारण वडीलांचे मुलीवर प्रेम जास्त असते वडीलांमध्ये समन्वयाची भूमिका दिसून येते.

- भाऊ हा प्रत्यक्ष जमिनिचा लाभधारक आहे. जर जमीन बहिणीने मागीतली तर त्याचा वाटा कमी होतो. वडीलांना मालमत्तेत फारशी झळ पोहोचणार नसते. त्यामुळे ते मुलीने जमीन मागणी केल्याचा विचार फारसा करत नाही. मात्र जमिनिशी भावाचे हितसंबंध गुंतलेले असतात. तो यावर जास्त विचार करतो वडील आणि भाऊ यांच्या दोन पिढ्यांतील अंतर जास्त आहे.
- वडील आणि भाऊ त्यांच्यातील तुलना केली असता वडील तटस्थ भूमिकेत दिसतात तर भाऊ जमीनमालकीला विरोध करतो. भाऊ हा जमिनीचा प्रत्यक्ष लाभार्थी असल्याने त्याला जमिनीत बहिणीला वाटा दिल्याने जास्त झळ पोहचणार असल्याने तो जास्त विरोध करताना दिसून येतो.
- जमिनीत हक्क अधिकार मागणाऱ्या स्त्रियांना भाऊजायांनी व जवळच्या नातेवाईक यांनी लोभी, हलकट समजून माझी मानहानी केली.असे अनौपचारिक मुलाखती व कथनामधून दिसून आले.

९. शिफारसी

१) महिलांना जमीन मालमत्ता मिळविण्यात कायदेशीर अडचणी येऊ नये त्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी करावी .

२) शिक्षणाद्वारे लिंगभाव समानता निर्माण करण्याचा प्रयत्न व्हावा. पितृसत्ताकतेची चौकट मोडणारे शिक्षण द्यावे .

३) जमीन मालकी असणाऱ्या महिलांना कृषी मंत्रालया मार्फत असणाऱ्या योजनांचा जास्तीतजास्त लाभ करून द्यावा.

४) विवाह बरोबरच महिलांच्या नावे घर व जमीन मालमत्ता करण्यात यावी.

संदर्भ सूची:

1. Agarwal, B. 1994. A field of one's own: Gender and land rights in South Asia. Cambridge: Cambridge University Press. : p-8
2. Rao N. 2011, Women Access to land, An Asian perspective, FAO, 2011. P-12.
3. Tahili moor:landesa Report: 2017
4. C. Doss, 2006., The Effects of Intrahousehold Property Ownership on Expenditure Patterns in Ghana, J. AFR. ECON 15(1): 149-180, at 171.
5. K. Allendorf, 1975-1988, 1980, 1985 (2007).Do Women's Land Rights Promote Empowerment and Child Health in Nepal?, WORLD DEVELOPMENT 35 (11)
6. K. Allendorf, Do Women's Land Rights Promote Empowerment and Child Health in Nepal?, WORLD DEVELOPMENT 35 (11): p. 1975-1988, 1980, 1985 (2007).
7. Rakesh K. 2011, Women's Rights to Property Under Hindu Law A Socio Legal Study, Ph.D Thesis Rohatak University Haryana. Page 1-7.
8. भागवत विद्युत, २०११, समकालीन भारत, प्रकाशक, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ, पुणे पृष्ठ-८६
9. मुकुंद,१९९९, साळुंखे विजया,२०१३, भारताच्या महिला शेतकरी, प्रकाशक, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, पृष्ठ -३४
10. जॉन डब्ल्यू क्रेसवेल-२०१७, गुणात्मक व संख्यात्मक आणि मिश्र पध्दतीचा दृष्टीकोन : (सेज पब्लिकेशन नवी दिल्ली, भारत) क्रेसवेल व ब्राऊन १९९२) पृष्ठ १८५,१८६.

*सहाय्यक प्राध्यापक समाजशास्त्र विभाग, के.टी,एच.एम. कॉलेज नाशिक

(पीएच. डी. संशोधक विद्यार्थी सा.फुले पुणे विद्यापीठ, पुणे)

***

लिंगभाव आणि श्रम विभागणीतील असमानता

*प्रा. डॉ. रजनी अरुण कारदगे

प्रस्तावना

भारतीय पारंपारिक समाज व्यवस्थेत स्त्री-पुरुष कार्याचे विभाजन हे लिंगाधारीत आहे. यानुसार स्त्री-पुरुष कामाचे स्वरूप निश्चित असल्याचे दिसून येते. जसे की, प्रगैतिहासिक काल खंडात प्राण्यांची शिकार करणे, युद्ध करणे, अर्थाजन करणे यासारखी अंगमहिमतीची कामे पुरुषांनीच करायची आणि कुटुंबात स्त्रियांनी अपत्यजन्म, अपत्य संगोपन, घरकाम, स्वयंपाक करणे, कपडे धुणे, भांडी घासणे, वृद्धांची सेवा करणे, यासारखी कामे ज्या कामांचे स्वरूप नैसर्गिक समजले जात असुन या कामांसाठी आर्थिक मोबदला दिला जात नाही. अशी कामे स्त्रियांनीच करायची या आधारावर समाजातील स्त्री-पुरुष श्रम विभागणी झाली असल्याचे दिसून येते. स्त्री पुरुष शारीरिक भिन्नता ही जैविक बाब आहे. या भिन्नतेला अनुसरून स्त्री-पुरुष करत असलेल्या कामात भिन्नता आहे परंतु या भिन्नतेला, वेगळेपणाला अनुसरून स्त्री-पुरुषांमधील समानता नाकारणे आणि स्त्रिया करीत असलेल्या कामांना आणि एकूणच स्त्री वर्गाला दुय्यम लेखणे किंवा पुरुष श्रेष्ठ आणि स्त्रिया कनिष्ठ असा भेदभाव करणे या बाबी मानवी हक्काची पायमल्ली करणारी आहे. लैंगिक भिन्नतेला आधार म्हणून स्त्री-पुरुष समता नाकारणे, समान संधी, समान हक्क नाकारणे हे प्रगत समाजाचे लक्षण असूच शकत नाही. समाजात मानवाने निर्माण केलेल्या लिंगभावामुळे आजच्या आधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या समाजात देखील स्त्रिया करत असलेली कामे ही दुय्यमच मानली जातात असे खेदाने म्हणावेसे वाटते. मानवनिर्मित लिंगभावामुळे स्त्रियांच्या सामाजिक स्थितीस दुय्यमत्व येऊन स्त्रियांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण आजही होताना दिसत आहे. स्त्री-पुरुषांमधील श्रमविभागणीला कारणीभूत असलेले प्रमुख कारण म्हणजे लिंगभाव होय. लिंगभावाच्या आधारे स्त्री पुरुष शरीरातील जैविक भिन्नतेमुळे स्त्रिया करीत असलेली कामे ही पुरुष करीत असलेल्या कामापेक्षा दुय्यम समजण्या विषयीची सामाजिक मानसिकता व त्यानुसार करण्यात येणारा भेदभाव या दृष्टीने 'लिंगभाव आणि स्त्री-पुरुष श्रमविभागणी मधील असमानता' या विषयाचा उहापोह प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

परिभाषिक शब्द : लिंगभाव, श्रमविभागणी, स्त्री-पुरुष विषमता, पुरुषप्रधान मानसिकता

संदर्भीय साहित्य परिशिलन

1) शनिवार दि. 11 मार्च, 2023 रोजीच्या दैनिक 'लोकमत वृत्तपत्रांमधील **'दृष्टिक्षेप' या सदरामध्ये "तो आणि ती:** दिवसभर काय करतात?" या शिर्षकीय लेखात केंद्रीय सांख्यिकी मंत्रालय आणि स्टॅटिस्टाच्या वतीने करण्यात आलेल्या सर्वेक्षणात भारतीय स्त्री आणि पुरुष दिवसभर कशातकशात सहभागी होतात याबाबतच्या टक्केवारीचे विश्लेषण करण्यात आले होते. आणि निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडण्यात आले- 91.4% भारतीय पुरुष धार्मिक कार्यात सहभागी होत असून 91.3% भारतीय स्त्रिया सांस्कृतीक,कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी होतात. तर खेळ, मनोरंजन, विश्रांती यामध्ये सहभागी होणाऱ्या पुरुषांचे प्रमाण 88.5% आणि 85.3% एवढ्या प्रमाणात महिला सहभागी होतात. संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाची आकडेवारी, नोकरी उद्योगातील पुरुषांचे प्रमाण 57.3% इतके आढळून आले तर नोकरी उद्योगातील महिलांचा सहभाग केवळ 18.4% इतकाच आढळून आला. याबरोबरच घर कामातील पुरुष सहभाग केवळ 26.1% आणि घरकामातील महिलांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच 81.2% इतके आढळून आले. घरातील मुलांची, वृद्धांची काळजी घेण्याच्या कामातील पुरुष सहभाग 14.0% तर महिला सहभाग 27.6% असा आढळला. शिक्षणामध्ये पुरुषांचा सहभाग 23.9% आणि महिला सहभाग 19.8% इतका दिसून आला. केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाच्या प्रसिद्ध

आकडेवारीनुसार असे दिसुन येते की, आजदेखील समाजात पुरुषाने पैसे कमवायला बाहेर जाणे आणि स्त्रीने घरकाम, मुले, वृद्ध यांची काळजी घेत घरीच असणे ही कामाची विभागणी अजूनही फारशी बदललेली नाही.

2) 53 वा आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव'

यामधे 'हिंदी चित्रपट सृष्टीतील लिंगभाव सहभाग' या विषयावरील मास्टर क्लासचे अलिकडेच आयोजन दि. 24 नोव्हेंबर, 2022 रोजी गोवा (पणजी) इथल्या टाटा समाज विज्ञान संस्थेच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या प्रसंगी 'रुपेरी पडद्याच्या चौकटी भेदणं, लिंगभाव आणि हिंदी सिनेजगतातील काम' (ब्रेकिंग द स्क्रीन सिलिंग जेंडर एंड वर्क इन हिंदी सिनेमा) या विषयावरील सादरीकरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत 35 चित्रपटातील एकूण 1930 पात्रांचे पडद्यावरील लिंगभाव प्रतिनिधित्व करणाऱ्या भूमिका, अशा भूमिकांचे प्रकार तसेच व्यवसाय याबाबत विश्लेषण करण्यात आले.या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आलेल्या तज्ञांमध्ये टाटा समाज विज्ञान संस्थेच्या संशोधन पथकातील प्रा. लक्ष्मी लिंगम, प्रा.शिल्पा फडके, कु.रश्मी लांबा, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या, चित्रपट समीक्षक कु. मिनाक्षी शेड्डे आणि प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माते पुशन कृपलानी यांचा सहभाग होता. या सर्व तज्ञांनी 'हिंदी चित्रपटसृष्टीतील लिंगभाव सहभाग' या विषयावरील आपले अनुभव, मते आणि निरीक्षणे यासह संशोधनानंतर हाती आलेले निष्कर्ष उपस्थितांसमोर मांडले. हिंदी सिनेसृष्टीत स्त्री - पुरुष अशा वेगळेपणाच्या बाबतीत जाणवणारी कमतरता कशाप्रकारे दूर करता येऊ शकेल याविषयी, तसेच सिनेमा निर्मिती बाबतच्या सर्व प्रक्रियांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढावा याबाबतच्या कृतीवरही विचार करण्याच्या बाबींचा समावेश होता. 'माध्यमे आणि सांस्कृतिक अभ्यास' या अभ्यासक्रमाच्या अधिष्ठाता प्रा.लक्ष्मी लिंगम यांनी चित्रपट निर्मितीमधील स्त्री-पुरुष कामांमधील भेदभाव स्पष्ट केला. त्यांच्या मतानुसार, पुरुष आणि महिलांचे व्यवसाय रूढीपरंपरेनुसारच आजही आहेत असे त्यांनी स्पष्ट केले.

3) स्त्रीवादी कार्यकर्त्या आणि विचारवंत मारिया मिस- "The Social Origins of Sexual Division of Labour" 'लैंगिक श्रमविभागणीचे सामाजिक मूळ' (जानेवारी, 1981)

प्रस्तुत पुस्तकांमध्ये लेखिकेने श्रमविभागणीचे मूळ याविषयीचे वास्तव वर्णन केले आहे. लेखिकेच्या मते, स्त्री-पुरुषांमधील दिसणाऱ्या विषमतेचे कारण ही नैसर्गिक, जैविक, जात, वंश आणि वर्गातील विषमतेप्रमाणे स्त्री-पुरुषातील विषमता सुद्धा मानवनिर्मित आहे. विशिष्ट कालखंडात या विषमतेची निर्मिती केली गेली आहे. या विषमतेला विरोध करण्यासाठी, विषमते विरुद्ध बंड करता येऊ शकते व संघर्ष करून ती बदलली जाऊ शकते. केवळ जैविक भेदांच्या आधारे स्त्री-पुरुष पक्षपात करून स्त्रियांना कमी लेखणे हे योग्य नाही. समाजातील स्त्री-पुरुषांना विकासाच्या संधी उपलब्ध करत असताना त्या भेदभाव विरहीत असल्या पाहिजेत असे अंतिमतः त्यांनी मत व्यक्त केले.

4) अप्रकाशित संशोधन

डॉ.रजनी कारदगे 'ग्रामीण भागातील स्त्रियांच्या कार्याचे स्वरूप' (सप्टेंबर, 2022) या शिर्षकाच्या विषयाबाबत शोधनिबंधासाठी संशोधनासाठी करवीर तालुक्यातील कोल्हापूर शहरानजिक असलेल्या उजळाईवाडी या गावातील शंभर कुटुंबांची निवड केली. या संशोधनामध्ये हाती आलेल्या निष्कर्षानुसार, निवड करण्यात आलेल्या उत्तरदात्यांपैकी 72% महिला या केवळ घरकाम (स्वयंपाक, कपडे धूणे, भांडी घासणे, म्हैशी पालन, शेळीपालन, कुकुटपालन, भाजी विक्री, शेती आणि शिवणकाम) करत असल्याचे आढळून आले.तर केवळ 25% महिला या घरकाम आणि खाजगी नोकरी करताना आढळल्या तर सर्वात कमी 3% महिला या केवळ नोकरी करत असल्याचे संशोधनात आढळून आले. निष्कर्षनुसार, संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या महिलांच्या कुटुंबातील कामाची विभागणी ही

पारंपरिक स्वरूपाची, लिंगभेदावर आधारित असल्याचे दिसून आले. घरकाम करणाऱ्या स्त्रियांच्या कामाची स्वरूप पाहता ही कामे करण्यासाठी स्त्रियांना उच्च कोटीच्या चिकाटीची आवश्यकता असते. तसेच ही कामे सातत्यपूर्ण आणि काळजीने करण्याचीही गरज असते. तरीदेखील या सर्व कामांचा उल्लेख घरकाम असाच केला जातो.

सिमोन **द** बोव्हुआर **- "द सेकंड सेक्स" (1949) मराठी अनुवाद- करुणा गोखले**

प्रस्तुत पुस्तकाच्या लेखिका सिमोन द बोव्हुआर यांनी हे पुस्तक फ्रेंच भाषेत लिहिले. या पुस्तकाचा मराठी अनुवाद करूणा गोखले यांनी केला आहे. स्त्रीवादावर प्रकाश स्त्रोत टाकणाऱ्या या पुस्तकात स्त्रीत्वाच्या दुय्यमत्वाची अनेक आयामातून चर्चा करण्यात आली आहे.लेखिकेच्या मते, पृथ्वीवरील प्राणी जगतामधील नर-मादी हा जीवशास्त्रीय फरक हळूहळू एका मर्यादेत नंतर कमी होत जातो. मानवी समाजातील नर आणि मादी या दोन वर्गातील भेदाचा उहापोह त्यांनी शारीरिक, सामाजिक,मानसिक, राजकीय आणि सांस्कृतिक या परीपेक्षातून केला आहे. या पुस्तकाच्या वाचनामधून वाचकांमध्ये एक विशिष्ट प्रकारचा दृष्टिकोन निर्माण होऊन अशा दृष्टिकोनाच्या माध्यमातून ती व्यक्ती स्त्री-पुरुष भेद कमी होण्यासाठी स्वतः प्रयत्नशील बनते.

संशोधनाची उद्दिष्टे

1) लिंगभाव ही संकल्पना समजून घेणे

2) लिंगभावाला अनुसरून सामाजिक श्रमविभागणी मधील असमानतेचे स्वरूप जाणून घेणे

संशोधनाची गृहीतके

1) पारंपारिक समाजातील स्त्री-पुरुष श्रम विभागणी ही लिंग आधारित होती

2) अलिकडील आधुनिक काळात देखील स्त्री पुरुष श्रमविभागणी ही लिंगाधारित घटकावरच आधारित आहे

संशोधनाचे महत्त्व

कोणत्याही सामाजिक व्यवस्थेतील स्त्री-पुरुष हे प्रमुख घटक आहेत.तसेच ते परस्परपूरक आहेत तरीही प्राचीन काळापासून स्त्री-पुरुष विषमता प्रकर्षाने जाणवते. समाज व्यवस्थेमधील संतुलनासाठी या दोन्ही घटकांना समान संधी, समान न्याय मिळणे आवश्यक आहे परंतु असे होताना दिसत नाही. साधारणपणे स्त्रिया या अपत्यजन्म, अपत्यसंगोपण, घरकाम करतात तर पुरुष अंगमेहनतीची, अर्थार्जनाची कामे करतात. व्यवहारिक दृष्टिकोनातून पाहतात स्त्रिया करत असलेली कामे ही पूर्ण वेळ करावी लागतात तसेच ती अत्यंत चिकाटीने व सातत्यपूर्ण करणे गरजेचे असते.असे असूनही स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे तिच्या कामांना दुय्यमत्व दिले जाते. वास्तविक पाहता स्त्री-पुरुष हे आपल्या शरीर रचने प्रमाणे भिन्नभिन्न कार्य करीत असतात. केवळ या शारीरिक भिन्नतेच्या अधारावर समाजात स्त्री-पुरुष विषमता निर्माण होते व समाजातील घटकांना समान संधी, समान हक्क दिले जात नाहीत. स्त्री-पुरुषातील या सामाजिक भेदास प्रमुख आणि महत्त्वपूर्ण घटक मानुन स्त्री-पुरुष कामातील विभाजन हे भेदभावपूर्ण बनले आहे. स्त्री-पुरुषातील हा लिंगभाव समाजनिर्मित असून मानवाने निर्माण केलेल्या विषमतेबाबत असे प्रश्न विचारले जाऊ शकतात. तसेच या विषमतेला आव्हान दिले जाऊ शकते. याबरोबरच विषमते विरोधी असलेली मानसिकता बदलली जाऊ शकते. स्त्रियांना अपत्यजन्म, अपत्यसंगोपन या अनुषंगाने करावी लागणारे घरकाम हे दुय्यम असूच शकत नाही, तर मानवनिर्मित लिंगभावामुळे स्त्रिया करत असलेल्या कामाला आणि एकूणच स्त्रियांच्या सामाजिक स्थितीस दिले जाणारे दुय्यमत्व व त्यांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण हे अगदी शिकारी अवस्थेतील समाजापासून ते आधुनिक समाजापर्यंत होत आहे.मानवी समाज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करताना देशाची प्रगती इतर देशांच्या

बरोबरीने होण्यासाठी स्त्रीवर्ग हा 'दुय्यम' न समजता 'सहयोगी' समजला तर कुटुंब, गाव, राष्ट्र आणि देशाची उल्लेखनीय प्रगती होण्यास मदत होईल. प्रस्तुत शोधनिबंधांमधून स्त्री-पुरुष कामाचे स्वरूप आणि समाजातील लिंगभावाला अनुसरून सामाजिक श्रमविभागणी मधील असमानतेचे स्वरूप समजून घेण्यास मदत होणार आहे व स्त्री पुरुष विषमता कमी करण्याबाबतच्या विचारांचा उहापोह करता येणार आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, अप्रकाशित शोधनिबंध इ. यासारख्या दुय्यम माहिती स्त्रोत्रांचा आधार घेण्यात आला आहे तसेच व्यक्तिगत पातळीवरील चर्चा, निरीक्षणे या माहितीस्तोत्राचा आधार घेण्यात आला आहे.

संकल्पना

*** लिंगभाव**

मूलतः नैसर्गिकरित्या स्त्री-पुरुषांमध्ये शारीरिक-जैविक भेद दिसून येतात. लिंग (sex) ही संकल्पना शारीरिक आहे. या संकल्पनेद्वारे स्त्री पुरुष जैविक भिन्नता दर्शविली जाते. आणि लिंग या संकल्पनेवर आधारित स्त्री पुरुष सामाजिक व्यवहार ठरवले जातात. तर लिंगभाव (gender) हा समाजात घडविला जातो. लिंगभाव या संकल्पनेत स्त्रियांनी आणि पुरुषांनी समाजात कसे वागावे याबाबतचे नियम शिकवले जातात. लिंगभाव ही सामाजिक संकल्पना आहे यामध्ये स्त्रीत्वाच्या आणि पुरुषत्त्वाच्या संकल्पना रूढ आहेत, ज्या स्त्री-पुरुषांना साचेबंद करून एकमेका विरुद्ध उभे करतात. लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक संरचनेतून घडवला जातो. तसेच तो संस्कृती सापेक्ष देखील आहे. थोडक्यात लिंगभाव म्हणजे एखाद्या समाजातील स्त्रिया आणि पुरुषांची सापेक्ष सामाजिक स्थिती होय.

*** जागतिक आरोग्य संघटना**

जागतिक आरोग्य संघटनेनी केलेल्या व्याख्येच्या आधारे असे स्पष्ट होते की, स्त्री आणि पुरुषांना परिभाषित करणारे जैविक वैशिष्ट्ये म्हणजे लिंग होय तर एखाद्या समाजाने स्त्री किंवा पुरुष यांच्यासाठी योग्य मानलेल्या तसेच समाजाने निर्माण केलेल्या भूमिका, वर्तनप्रकार, क्रिया आणि वैशिष्ट्ये म्हणजे लिंगभाव होय.लिंगभाव या संज्ञेचा प्रथम वापर इ. स.1955 मध्ये जॉन मनी या लिंगशास्त्रज्ञाने सर्वप्रथम केला. लिंगभाव विषयक भूमिका ही संज्ञा सायंटिफिक ट्रेड जनरल मध्ये प्रकाशित केलेल्या त्याच्या शोधनिबंधात वापरली.

श्रमविभागणी

श्रमविभागणी म्हणजे श्रमांची विभागणी किंवा कामाच्या प्रक्रियेचे अनेक कार्यामध्ये विभाजन करणे होय. प्रत्येक कार्य स्वतंत्र व्यक्ती किंवा व्यक्तीच्या गटाद्वारे केले जाणे होय श्रमविभागणीमुळे व्यक्ती विशिष्ट कार्यामध्ये तज्ञ बनण्यास मदत होते. तसेच व्यक्ती अधिक कार्यक्षम बनण्यास देखील मदत होते. परिणामी व्यक्तीकडून केले जाणारे काम जलद आणि व्यवस्थितरित्या पूर्ण होते.

स्त्रियांच्या कामाचे स्वरूप आणि पुरुषप्रधान मानसिकता

आधुनिक समाजातील स्त्रियांचे काम अलिकडे जरी प्रत्यक्षरूपी दिसू लागले असले तरी स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून स्त्री कार्याचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, समाजातील स्त्रियांनी करावयाची कामे ही अप्रत्यक्ष स्वरूपाची असतात तर पुरुषांनी करावयाची कामे ही प्रत्यक्ष स्वरूपाची, अर्थार्जन करून देणारी असतात.प्राचीन कालखंडापासून स्त्रियांच्या कामाचे स्वरूप हे अप्रत्यक्ष असल्यामुळे तिचा सामाजिक दर्जा दुय्यम

स्वरूपाचा असलेला दिसून येतो स्वातंत्र्यपूर्व कालखंडात पारंपारिक समाजात बलुतेदारी प्रथा रूढ होती. तेव्हा समाज गृहउद्योग प्रधान होता. घरोघरी चालवल्या जाणाऱ्या उद्योगांमध्ये स्त्रियांचा अप्रत्यक्षरीत्या सहभाग असे. मानववंशशास्त्रज्ञांच्या मतानुसार, धान्य, शेती, वस्त्र, सूत, कपडे, हस्तकला, विविध साधने इ.ची निर्मिती स्त्रियांनी केली. असे असले तरीही परंपरागत व्यवसाय आणि शेतीपूरक व्यवसायामधील स्त्री श्रमाचा वाटा तत्कालीन समाजापासून ते आजतागायत दुय्यम आणि उपेक्षितच राहिला. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात जेव्हा गावागावात पाण्याचे दुर्भक्षीकरण असे तेव्हा महिला दुष्काळी, ओसाड, दुर्गम भागात अंगमेहनतीची, चिकाटीची समजली जाणारी कामे म्हणजेच पाणी वाहकाची कामे, शेतीच्या स्वच्छतेची कामे, पीक काढणीनंतर मळणी, साठवणे, धान्य स्वच्छतेची कामे यामध्ये स्त्रियांचे योगदान असे. परंतु स्त्रियांना या कामाचा मोबदला मिळत नसे. या कामांना पुरुष उत्पादनाबरोबर जोडकाम-जोड़धंदा-हंगामीधंदा या स्वरूपात पाहिले जात असे. कारण या धंद्यांमधून मिळणाऱ्या अपुऱ्या पैशांमधून गृहखर्च भागवला जात नसल्याने अशी कामे दुय्यमस ठरवली जातात व परिणामी स्त्रिया करीत असलेल्या कामांना दुय्यमत्व प्राप्त होते. कुटुंब आणि शेती आधारित ही कामे नैसर्गिकच आहेत असे मानून स्त्रियांकडून ही कामे करून घेतली जात असत.

औद्योगीकरणाच्या प्रक्रियेला स्वातंत्रोत्तर कालखंडात ज्यावेळी चालना मिळू लागली तेव्हा पारंपारिक समाज उद्योगप्रधान बनु लागला. आणि कृषक समाजाचे रूपांतर औद्योगिक समाजात होऊ लागले या अनुषंगाने समाजात संरचनात्मक परिवर्तन घडवून येऊ लागले आणि स्त्री पुरुष कामाचे नवे स्वरूप उदयास येऊ लागले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात संविधानाच्या माध्यमातून स्त्री स्वतंत्र होऊ लागली. औद्योगिक समाजात जी क्षेत्रे फक्त पुरुषांसाठीच आहेत अशा क्षेत्रात देखील आज स्त्रिया काम करताना दिसत आहेत. परंतु तरीदेखील कुटुंबात स्त्रियांनी करावयाच्या कामात बदल झालेला दिसून येत नाही. प्रत्येक स्त्रियांना अप्रत्यक्षरीत्या पार पाडावी लागणारी कौटुंबिक जबाबदारी अपत्यजन्म अपत्य संगोपन इ.कार्यातील स्त्री सहभाग दुर्लक्षित केला जातो. पारंपारिक भारतीय समाजात पुरुषांनी आर्थिक क्रिया करणे तर स्त्रियांनी गृहकार्य करणे हे धर्ममान्य होते. एखाद्या वेळेस गृहकार्यात हातभार लावणाऱ्या पुरुषाला स्त्री विश्लेषण, टिंगल टवाळी सहन करावी लागत.

स्त्रियांना काही अप्रत्यक्षपणे करावी लागणारी कामे

या कामांमध्ये विवाहितेला पती म्हणून स्वीकारलेल्या पुरुषाच्या शारीरिक गरजांचे पूर्तता करणे, अपत्यजन्म, अपत्यसंगोपन, स्तनपान, संस्कार करणे पतीला परमेश्वर म्हणून त्याच्या दीर्घायुष्यासाठी, सौख्यासाठी, समृद्धीसाठी, वृत्तवैकल्य करणे की ज्याची कुठेही मोजदात केली जात नाही. समाजातील पुरुषप्रधान मानसिकतेमध्ये स्त्रियांनी करावयाची ही कामे कामेच असत नाहीत याची नोंद घेणे हे प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक आहे. वास्तविक पाहता समाजाच्या संरचनेतील स्थिरततेमध्ये कुटुंबांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. कुटुंबाला घरपण देण्यात स्त्रियांचा दिवसातील आणि एकूणच संपूर्ण जीवनातील बहुतांशी वेळ द्यावा लागतो. परंतु या कार्याची दखल पुरुषप्रधान मानसिकता असणारा समाज घेत नाही.

स्त्रियांना विवाहानंतरची कौटुंबिक जबाबदारी, कुटुंबासाठी करावे लागणारे अर्थाजन अशी दुहेरी कार्य पारंपारिक काळापासून स्त्रियांना करावी लागत असलीतरी आर्थिक बाबींसाठी स्त्रीला पुरुषांवर अवलंबून राहावे लागते हे वास्तव नाकारता येत नाही. भारतीय समाजव्यवस्था ही विषमतापूर्ण मूल्य असलेली समाजव्यवस्था आहे कारण ही व्यवस्था एका वर्गाला (पुरुषाला) स्वावलंबी बनवते तर दुसऱ्या वर्गाला (स्त्रियांना) परवलंबी बनवण्याचे पक्षपाती कार्य

करते. या आणि अशा सर्वच घटकांना समाजाने निर्माण केलेल्या भूमिका, वर्तनप्रकार, क्रिया अर्थात लिंगभाव कारणीभूत आहे.सिमोन द बोव्हियर यांनी 1949 साली लिहिलेल्या 'द सेकंड सेक्स' या फ्रेंच भाषीय पुस्तकांमध्ये त्या असा उल्लेख करतात की," स्त्री ही जन्माला येत नसून ती जन्माला आल्यावर घडवली जाते.' त्यांच्या मतानुसार स्त्रिया या पुरुषांपेक्षा कमी दर्जाच्या नाहीत तर त्या वेगळया क्षेत्रात चांगल्या दर्जाची कामगिरी करू शकतात.स्त्रियांमधील काम करण्याची चिकाटी, सातत्य यासारख्या गुणांमुळे त्या दीर्घकाळ काम करू शकतात स्त्री-पुरुषातील स्नायू मधील भेदामुळे त्यांच्यामध्ये सामाजिक भेदभाव करणे अयोग्यच आहे. संशोधिकेच्या निरीक्षणा नुसार स्त्री-पुरुषांमध्ये या जैविक भेदाला पारंपारिक विवाहव्यवस्था अधिकच खतपाणी घालते विवाहव्यवस्थेने स्त्री-पुरुषांनी कोणती काम करावयाची हे अधिकच अधोरेखित केले आहे त्यामुळे कुटुंबातील स्त्री-पुरुष कामाचे विभाजन हे साचेबंद असल्याचे दिसून येते.

निष्कर्ष

स्त्री आणि पुरुष हे समाजाचे मूलभूत घटक आहेत शिवाय ते परस्पर पूरक आहेत परंतु शिकारी अवस्थेच्या कालखंडापासून ते आजच्या आधुनिक कालखंडापर्यंत पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्थेमुळे स्त्रिया दुय्यम बनल्या व असमान स्त्री-पुरुष जीवन जगण्याच्या पद्धती बाबत काही समाज सुधारक विचारवंत यांनी स्त्री ही व्यक्ती असून ती पुरुषाप्रमाणे समान पातळीवर आपले जीवन जगू शकते. ही विचारधारा विकसित करण्याचा प्रयत्न सुरू केला.या अनुषंगाने स्त्री प्रश्नांची जाणीव राष्ट्रपतळी पासून ते गावपातळीपर्यंत सुरू झाली. यासाठी लिंगभाव न्याय संकल्पना शासकीय पातळीवर राबवण्याची गरज आज महत्त्वपूर्ण ठरते.

लिंगभाव न्याय (Gender Justice)

समाजातील वातावरण शांततापूर्ण राहण्यासाठी न्याय ही संकल्पना महत्त्वाचे आहे. लिंगभाव न्याय म्हणजे सामाजिक जीवन जगत असताना समाजातील प्रत्येक घटकाचे अधिकार, हक्क सुरक्षित ठेवणे. समाजातील जर एखादा घटक दुसऱ्या एखाद्या घटकावर अन्याय अत्याचार करीत असेल तर अशावेळी न्यायाच्या आधारे कायद्याद्वारे अन्यायाचे निराकरण करणे म्हणजेच लिंगभाव न्याय होय.समाजात शांतता, समता प्रस्थापित करणे यासाठी लिंगभावन्याय यासारख्या उपायांचा अवलंब केला गेला पाहिजे

प्रमुख निष्कर्ष

1) कौटुंबिक मानसिकता बदलणे आवश्यक

कौटुंबिक पातळीवर पालकांनी मुलगा मुलगी असा भेदभाव करता कामा नये मुलांबरोबरच मुलीचे आरोग्य, शिक्षण संधी आवडीनिवडी, छंद या गोष्टीकडे लक्ष दिले गेले पाहिजे.अशा कुटुंबाच्या भूमिकांमुळे तरुणांची पुरुषप्रधान मानसिकता बदलण्यास मदत होईल.

2) **शिक्षण व्यवस्थित लिंगभाव समानता आणने आवश्यक**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. शैक्षणिक वातावरणात स्त्री पुरुष समानतेची तत्वे विद्यार्थ्यांमध्ये रुजवली गेली पाहिजेत. याबरोबरच शालेय शैक्षणिक अभ्यासक्रमात लिंगभावाचे शिक्षण, लैंगिक शिक्षण याबाबत निरपेक्षपणे तसेच मोकळया मनाने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण दिले पाहिजे

3) **कायद्याची साक्षरता आवश्यक**

जनमानसात स्त्री-पुरुष समानतेबाबत स्त्री संरक्षण, स्त्री विकास याबाबत प्रचलित असणाऱ्या कायद्यांबाबत माहिती असणे गरजेचे आहे. त्यामुळे सामाजिक जागरूकता वाढण्यास मदत होईल.

4) **स्त्रियाच्या बाबतीतील अनिष्ठ रूढ़ी- परंपरा बदलण्याची गरज**

स्त्रियाच्या बाबतीतील अनिष्ठ रूढ़ी- परंपरा बदलण्याची गरज आवश्यक आहे. यामुळे स्त्रियांबरोबर पुरुषांचेही प्रबोधन होण्यास मदत होईल.

5) भारतीय समाज व्यवस्थेत स्त्री पुरुष कामात भेद केला जातो. स्त्रिया करीत असलेल्या कामाला तिची नैसर्गिक जबाबदारी म्हणून पाहिले जाते व अशा कार्याला विचारात घेतले जात नाही. अपत्यजन्म, अपत्यसंगोपन या अनुषंगाने येणारी गृहकार्याची जबाबदारी ही तिची नैसर्गिक जबाबदारी म्हणून ग्राह्य मानले जाते तर याबाबतचा सामाजिक दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. ही अवस्था जरी शिकारी अवस्थेच्या कालखंडापासून होत असले तरी शिकारी अवस्थेतील कालखंडात कुटुंब व्यवस्था निर्माण झालेली नव्हती तसेच समाज नावाची संकल्पनाच अस्तित्वात नव्हती अशावेळी जरी या कार्याचे स्वरूप नैसर्गिक असले तरी अलीकडच्या आधुनिक काळात कुटुंब व्यवस्था ही सामाजिक असल्याने कुटुंबाची कार्य ही नैसर्गिक जबाबदारी ठरते असे गृहीत धरणे चुकीचे व एककली ठरते.

6) स्त्रियांची श्रमशक्ती ही श्रमबाजारात सामाजिक उत्पादनात व आर्थिक क्रियात आणली पाहिजे. गृहकार्यातील स्त्रियांचा सहभाग म्हणून स्त्रियांचे श्रम उत्पादक मानले गेले पाहिजे कुटुंबातील चूल आणि मूल व सेवा, क्रिया या आर्थिक स्वरूपाच्या मानल्या गेल्या पाहिजेत. अशा प्रकारे स्त्री पुरुष लिंगभाव या संकल्पनेबाबत युवकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करून स्त्री पुरुष लिंगभाव आणि श्रम विभागणीतील असमानता कमी करता येईल

संदर्भसूची:

1) https://pib.gov.in/press Release page .aspx?PRID1878771
2) दैनिक लोकमत, शनिवार दि.11 मार्च 2023 मधील 'दृष्टीक्षेप' सदरामधील लेख, शीर्षक- 'तो आणि ती: दिवसभर काय करतात'
3) मारिया मिस "The Social Origins of Sexual Division of Labour" (जानेवारी 1981) "लैंगिक श्रमविभागणीचे सामाजिक मूळ" publication- padmgandha
4) डॉ.रजनी कारदगे "ग्रामीण भागातील स्त्रियांच्या कामाचे स्वरूप" (सप्टेंबर 2022) अप्रकाशित शोधनिबंध
5) सिमोन दि बोव्हिआर (1949) The Second Sex मराठी अनुवाद, करुणा गोखले पब्लिकेशन ISS Occasional papers, Institute of Social Studies The Hage- The Netherlands

***समाजशास्त्र विभाग, शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज.**

मो. नं.7875144367, ईमेल rajanikaradage80@gmail.com

***

विसापूर - पुणदी उपसा सिंचन योजना तासगाव तालुक्यातील दुष्काळी भागाची जीवनदायनी

*विलास साळुंखे,
**डॉ.अरुण चव्हाण

प्रस्तावना -

महाराष्ट्रातील सांगली, सातारासोलापूर या जिल्ह्यातील काही भाग कायम दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या दुष्काळी भागाला कायमस्वरूपी लागलेला दुष्काळी हा कलंक पुसून टाकण्यासाठी अनेक योजना तयार करण्यात आल्या. यापैकी एक योजना म्हणजे टेंभू उपसा सिंचन योजना होय. आशिया खंडातील सर्वात मोठी उपसा योजना म्हणून ओळखली जाते.

1995 - 1996 मध्ये महाराष्ट्रात कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना झाली व त्यानंतर 1996 मध्ये टेंभू उपसा सिंचन योजनेला राज्य सरकारने मंजुरी दिली. त्यानुसार सांगली जिल्ह्यातील कडेगाव ,तासगाव, खानापूर, कवठेमंकाळ, सातारा जिल्ह्यातील कराड आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या सात तालुक्यातील 1,11856 हेक्टर क्षेत्राला पाणी देण्यासाठी टेंभूच्या प्रकल्प अहवाला मंजुरी मिळाली.यासाठी 1416 कोटी रू. मंजूर केले.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील टेंभू या गावात कृष्णा नदीवर बराज टाकून पाणी अडवण्यात आले आहे. ते पाणी पुढील टप्प्यात तीनशे मीटर उंचीवर पंपाद्वारे उचलून उर्ध्वगामी नलिकांद्वारे वितरण हौदात टाकण्यात आले आहे.योजनेच्या वेगवेगळया टप्प्यावर 2 लाख एच.पी.चे पंप बसवून योजनेच्या कार्यक्षेत्रातील 450 कि.मी. लांबीच्या कॅनॉल मधून पाणी वितरित करण्यात आले आहे.

टेंभू प्रकल्पात तासगाव तालुक्यातील 7700 हेक्टर क्षेत्र व 2.13 टी.एम.सी पाण्याचा वापर अंतर्भूत आहे. या क्षेत्राला टेंभूच्या टप्पा क्र. तीन (ब) मधून निघणाऱ्या 106 कि.मी. लांब तासगाव खानापूर कालव्याद्वारे पारंपारिक प्रवाही पद्धतीने पाणी देण्याचे पूर्वी नियोजन होते. त्या ऐवजी टप्पा क्र. एक (ब) मधून आरफळ कालव्यात पाणी सोडून विसापूर आणि पुणदी येथून दोन स्वतंत्र उपसायोजना करून बंदिस्त पाईपद्वारे सिंचनास पाणी देण्याची मागणी होती.

समस्या विधान- विसापूर - पुणदी उपसा सिंचन योजना तयार झाल्यापासून आजपर्यंत या योजनांचा फारसा अभ्यास झाला नाही.या योजनांचा अभ्यास व कार्यक्षेत्रातील दुष्काळ निर्मूलनासाठी झालेला परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडला आहे. "विसापूर-पुणदी उपसा सिंचन योजना तासगाव तालुक्यातील दुष्काळी भागाची जीवनदायनी"

उद्दिष्टे -

1) विसापूर - पुणदी उपसा सिंचन योजना तासगाव तालुक्यात कार्यक्षेत्रात दुष्काळ निवारण्यासाठी जीवनदायनी ठरल्या आहेत त्याचा अभ्यास करणे.
2) विसापूर पुणदी योजनांचा विस्तृत अभ्यास करणे
3) निष्कर्ष आणि उपाययोजना सुचविणे

संशोधन पद्धती-

प्रस्तुत शोधनिबंध आणि शोध प्रबंधसाठी माहिती संकलन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. यासाठी संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, योजनांचे सरकारी अहवाल, मासिके, प्रबंध इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे.

विषय मर्यादा - प्रस्तुत शोधनिबंधासाठी या योजनांच्या तासगाव तालुक्यातील 26 गावांमधील कार्यक्षेत्राचा विचार करण्यात आला आहे.

विसापूर - पुणदी उपसा सिंचन योजना तासगाव तालुक्यातील दुष्काळी भागाची जीवनदायनी -

टेंभू उपसा योजनेच्या तासगाव खानापूर कालव्याद्वारे तासगाव तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतीच्या सिंचनासाठी पाणी येण्यामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले.तालुक्यातील शेतीला पाणी देण्यासाठी 2011 मध्ये या योजनेला मंजुरी मिळाली. त्यानुसार खर्चासाठी 3450 कोटी रू.ला मान्यता देण्यात आली. तर जून 2012 मध्ये या योजनांना अंतिम मान्यता मिळाली.त्यानुसार तासगाव तालुक्यातील 7700 हेक्टर क्षेत्रास बंदिस्त पाईपद्वारे पाणी देण्याचे नियोजन आहे. यामध्ये खालील तीन भागात ही योजना करण्यात आली आहे.

1) टेंभू टप्पा क्र.एक (ब)ते आरफळं कालवा - टेंभू योजनेसाठी तयार करण्यात आलेल्या टप्पा क्रमांक एक (ब) मधून उर्ध्वगामी नलिकेद्वारे 2.13 टी.एम.सी. पाणी उचलून आरफळ कालवा 85 मी. मध्ये टाकण्यात आले आहे.या योजनेची उंची 19.50 मी. आहे.त्यासाठी टेंभूच्या टप्पा क्र. एक (ब) येथील पंपगृहात 561 एच.पी चे तीन पंप बसविले आहेत. यासाठी 36 कोटी मंजूर केले आहेत.

2) विसापूर उपसा सिंचन योजना- तालुक्यातील आरफळ कालवा 149 कि.मी. मधून 1.219 टी.एम.सी पाणी उचलण्यात येते.ते दोन टप्प्यात 4408 हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी वापरले जाते. विसापूर टप्पा एक-(आरफळ कालवा ते भालेखडा) येथे तयार करण्यात आलेल्या पंपगृहातून दोन उर्ध्वगामी पाईपलाईन तयार करण्यात आल्या आहेत. पैकी एका पाईपलाईन द्वारे विसापूर ते गोटेवाडी या भागातील 588 हेक्टर क्षेत्र सिंचनासाठी बंदिस्त पाईपलाईनने सिंचनास पाणी वितरित केले आहे. यासाठी 135 एच.पी चे दोन पंप बसवले आहेत. तर विसापूर ते भालेखडा या भागातील 3820 हेक्टर क्षेत्रास बंदिस्त पाईपलाईनने सिंचनासाठी पाणी वितरित केले आहे. यासाठी 1076 एच.पी चे तीन पंप बसवण्यात आले आहेत.

विसापूर टप्पा क्र. दोन -(पेड फिडर) - येथून उर्ध्वगामी नलिकेद्वारे पेड तलावात 0.310 टी.एम.सी. पाणी सोडण्याची व्यवस्था आहे. त्यासाठी 437 एच.पी. चे दोन पंप बसविले आहेत. विसापूर योजनेच्या स्थापत्य,विद्युत व यांत्रिकी कामासाठी 134 कोटी रू.खर्च झाला आहे.

3) पुणदी उपसा सिंचन योजना - आरफळ कालवा 166 कि. मी. मधून 0.91 टी.एम.सी. पाणी उचलून पुढील तीन टप्प्यात 3292 हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी देण्याची व्यवस्था आहे.

पुणदी उपसा टप्पा क्र. एक -(आरफळ कालवा ते आरवडे)

पुणदी गावाशेजारील आरफळ कालव्यातून 0.911 टी.एम.सी. पाणी उचलण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पुणदी येथे बांधण्यात आलेल्या पंपगगृहात पाणी घेऊन तेथील 448 एच.पी.च्या तीन पंपाद्वारे आरवडे येथील वितरण हौदामध्ये पाणी सोडले आहे.

पुणदी टप्पा दोन-(आरवडे ते फुटका घाना) - आरवडे येथील पंपगृहात 285 एच.पी. चे दोन पंप बसवून सावर्डे-मणेराजुरी परिसरात पाणी देण्याची सोय केली आहे. मणेराजुरी गावाजवळ फुटका घाना येथे असलेल्या वितरण हौदात पाणी सोडले आहे. येथून या भागातील 2291 हेक्टर क्षेत्राला बंद पाईपलाईन द्वारे पाणी दिले आहे.

पुणदी टप्पा क्र. दोन (ब)-(आरवडे ते बलगवडे) - आरवडे येथील पंपगृहात यासाठी 435 एच.पी चे दोन पंप बसवून पाणी उचलले आहे. व ते बलगवडे गावाजवळील वितरण हौदात सोडले आहे. येथून 1001 हेक्टर क्षेत्रात बंद पाईपलाईन द्वारे पाणी दिले आहे.

पुणदी टप्पा क्र-तीन-(बलगवडे ते सिद्धेवाडी तलाव) - बलगवडे येथे तयार केलेल्या पंपगृहातून 415 एच.पी.च्या दोन पंपाद्वारे सिद्धेवाडी प्रकल्पात पाणी सोडले जाते. सिद्धेवाडी प्रकल्पात 0.231 टी.एम.सी. पाणी सोडण्याची व्यवस्था आहे.

पुणदी योजनेच्या स्थापत्य, विद्युत व यांत्रिक कामांची एकूण किंमत 144 कोटी रुपये आहे.

विसापूर - पुणदी योजनेच्या कार्यक्षेत्रातील गावे व सिंचनाखाली येणारे क्षेत्र(हेक्टर)

विसापूर उपसा योजना-

अ.क्र.	गावाचे नाव	सिंचन क्षेत्र (हेक्टर मध्ये)	अ.क्र	गावाचे नाव	सिंचन क्षेत्र (हेक्टर मध्ये)
1	पाडळी	158	8	मांजर्डे	472
2	धामणी	167	9	विसापूर	432
3	हातनोली	606	10	गोटेवाडी	486
4	हातनूर	1014	11	ढवळी	07
5	आरवडे	615	12	वंजारवाडी	25
6	पेड	248	13	गौरगाव	152
7	बोरगाव	26		**एकूण**	**4408**

पुणदी उपसा योजना-

अ.क्र.	गावाचे नाव	सिंचन क्षेत्र(हेक्टर)		सिंचन क्षेत्र(हेक्टर)	सिंचन क्षेत्र(हेक्टर)
1	मणेराजुरी	559	8	सावर्डे	610
2	बलगवडे	362	9	योगेवाडी	103
3	बस्तवडे	389	10	पुणदी	489
4	खुजगाव	205	11	चिंचणी	26
5	डोर्ली	187	12	भैरववाडी	73
6	वाघापूर	152	13	लोढे	212
7	कौलगे	116		**एकूण**	**3292**

विसापूर-पुणदी योजनेची वैशिष्ट्ये-

1. टेंभू उपसा सिंचन योजनेअंतर्गत 2.13 टी.एम.सी पाणी उचलून तासगाव तालुक्यातील 26 गावातील 7700 हेक्टर क्षेत्रातील सिंचनासाठी पाणी मिळाले आहे.
2. बंदिस्त पाईपलाईन द्वारे पाणी आणल्यामुळे पाण्याची गळती थांबून 0.541 टीएमसी पाण्याची बचत होणार आहे.
3. बचत होणाऱ्या पाण्याचा वापर बिगर सिंचनाच्या माध्यमातून पेड व सिद्धेवाडी तलावात पाणी सोडले आहे.
4. या योजनांमुळे लाभक्षेत्रात मागणीनुसार व पाण्याच्या उपलब्धतेनुसार कार्यक्षेत्रातील पाझर तलाव,लघु पाटबंधारे तलाव भरण्याची सोय आहे.

5. टेंभू योजनेच्या मूळ प्रस्तावात बदल केल्यामुळे या योजनेमुळे 10012 रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे प्रतिवर्षी विज बिल बचत होणार आहे.
6. बंदिस्त पाईपलाईन जमिनीतून असल्याने 150 हेक्टर जमिनीचे भूसंपादन टाळणे शक्य झाले आहे.यामुळे आर्थिक बचत झाली आहे.
7. लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणीपट्टी भरून पाणी घेण्याची सोय आहे.
8. पाणी वितरणासाठी पाणी वाटप संस्था तयार करण्यात आल्या आहेत.
9. कार्यक्षेत्रातील दुष्काळाचे उच्चाटन करण्यात आले असून व काही गावांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करण्यात आली आहे.

पाणी योजना चे फायदे - विसापूर पुणदी उपसा सिंचन योजनांमुळे लाभ क्षेत्रात मोठ्या प्रमाणात फायदे झाले आहेत.

1. शेतीसाठी पाणी- विसापूर- पुणदी उपसा सिंचन योजनांमुळे तासगाव तालुक्यातील पूर्व भागातील दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावांना शेतीला पाणी मिळाले.यानुसार एकूण 26 गावांमधील 7700 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले असून या भागातील दुष्काळ नाहीसा झाला आहे.

2. दुष्काळाचे उच्चाटन- तालुक्यातील पूर्व भागची कायम दुष्काळ अशी ओळख निर्माण झाली होती.मात्र या योजनांच्या माध्यमातून सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यामुळे योजनांच्या कार्यक्षेत्रातील दुष्काळाचे उच्चाटन झाले आहे.

3. नगदी पिके घेण्यास सुरवात- या भागात निसर्गावर आणि पाऊसाचा पाण्यावर आधारित शेती मोठ्या प्रमाणात केली जात असे.खरीप आणि रब्बी हंगामात पिके घेतली जात होती.योजनांच्या माध्यमातून आलेल्या पाण्यामुळे कार्यक्षेत्रात ऊस, द्राक्ष, डाळिंब, भाजीपाला यासह खरीप व रब्बी पिके घेतली जात आहेत.

4. पिण्यासाठी पाणी - टंचाईच्या काळात या भागातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करावे लागत होते. सिंचन योजनांचे पाणी लोढे,पेड,सिद्धेवाडी तलावात सोडले आहे.या तलावातून अनेक गावांना पिण्याच्या पाण्याची योजना तयार केल्या आहेत.त्या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला.

5. आर्थिक स्तर उंचावला - सिंचन योजनेच्या पाण्यामुळे शेतीला पाणी मिळाले.शेतकरी नगदी पिके पिकवू लागला.यामुळे त्यांच्या पिकांना योग्य मोबदला मिळू लागला. शेतकऱ्यांना पाणी मिळाल्यामुळे त्यांचा आर्थिक स्तर उंचावला.

6. भूसंपादनासाठी जमीनी वाचल्या- सिंचनासाठी तयार करण्यात आलेल्या योजनांना मोठ्या प्रमाणात भूसंपादन करण्याची आवश्यकता असते.मात्र विसापूर पुणदी योजनांचे पाणी जमिनीतून बंदिस्त पाइपलाइन मधून देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात जमिनींचे भूसंपादन वाचले.

7. पाणीपट्टी भरून शेतीला पाणी- या योजनांच्या माध्यमातून शेतीला पाणीपुरवठा करणे सोपे झाले.शेतकऱ्यांना आवश्यक वेळी पाणीपट्टी भरून पाणी मिळणे सुलभ झाले.

8. पाणीवाटप संस्थांची निर्मिती - योजनेच्या कार्यक्षेत्रात पाणी वितरण करणे,पाणी नियोजन करणे,पाणीपट्टी जमा करणे,प्रशासनाशी समन्वय साधने यासाठी पाणी पुरवठा संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.यामुळे शेतकऱ्यांच्यात एकी निर्माण झाली.

9. कृषी पूरक उद्योगांना चालना - योजनांच्या कार्यक्षेत्रात पाणी मिळाल्यामुळे शेतीबरोबर अन्य कृषी पूरक उद्योग सुरू झाले आहेत.दूध उत्पादन वाढ,दूध प्रकल्प,द्राक्षापासून बेदाणा निर्मिती,गूळ प्रक्रिया उद्योग यासह अन्य उद्योग निर्माण झाले आहेत.

निष्कर्ष -

तासगाव तालुक्याच्या पूर्व भागातील 26 गावामध्ये 7700 हेक्टर क्षेत्राला विसापूर पुणदी उपसा सिंचन योजनांचे पाणी शेतीला देण्यात आले आहे.यामुळे या भागातील शेतीचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.हा भागात सुजलाम सुफलाम झाला आहे.या योजनांच्या पाण्यामुळे शेतीबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुद्धा सुटला आहे.या भागातील दुष्काळ निर्मूलन करण्यात यश आले आहे.दुष्काळ निर्मूलनासाठी या योजना जीवनदायनी ठरल्या आहेत.

उपाय योजना - या पाणी उपसा योजनांचा अभ्यास करताना पुढील उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

1. शेतीतील पिकांना पाणी देण्यासाठी सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर करावा. पाण्याचा वापर काटकसरीने करावा.
2. योजना सुरळीतपणे चालवण्यासाठी वेळेवर पाणीपट्टी भरावी.
3. योजनेच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाणी चोरी सुरू आहे ती थांबवावी.
4. पाण्याच्या आवर्तनात सुधारणा करून वर्षभर पाणी मिळेल याची व्यवस्था करावी.
5. कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांबाबत लोक जागृती करावी.
6. आधुनिक पद्धतीने शेती करणेस प्रोत्साहन द्यावे.
7. पाणीवाटप संस्थांचा कारभार सुधारणे आवश्यक आहे.
8. पाण्यासाठी होणारे वाद शमविण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था निर्माण करावी.

संदर्भसूची-

1. डॉ. सुधीर भोंगळे ,जलसिंचन, सुज्ञान प्रकाशन, पुणे- नोव्हेबर 2007.
2. डॉ वसंत जुगळे, कृष्णा खोऱ्यातील पाण्याचे व्यवस्थापन, सेंटर फॉर सोशल स्टडीज अँड रिसर्च, सांगली- 2000
3. प्रमोद नलवडे, दुष्काळाचे आव्हान पेलताना, लोकराज्य अंक -
4. मुकुंद धाराशिवकर, पाणी; उद्याची दिशा, मनोविकास प्रकाशन पुणे- 2013
5. संजय ठिगळे, दुष्काळग्रस्तांची जीवनरेषा टेंभू योजना, शिवार्थ प्रकाशन, कोल्हापूर- 2019
6. विसापूर पुणदी उपसा सिंचन योजना संक्षिप्त टिप्पणी, पाटबंधारे विभाग, सांगली
7. दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक लोकमत, दैनिक तरुण भारत

*राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
**राज्यशास्त्र विभाग, भोगावती महाविद्यालय, कुरुकली(कोल्हापूर)

***

जागतिकीकरणाचा सामाजिक, सांस्कृतिक प्रभाव

***डॉ. सुनिल व्यंकटेश सामग**

प्रस्तावना: जागतिकीकरण ही बहुआयामी प्रक्रिया आहे मूलतः ही आर्थिक प्रक्रिया असली तरी त्यामुळे संपूर्ण समाजजीवन प्रभावित झाले आहे. केवळ आर्थिक क्षेत्राशी मर्यादित न राहता जागतिकीकरणाने सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्रावर प्रभाव पाडला आहे. जलद दळणवळणाच्या सोयी व माहिती आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग जवळ येण्यासोबतच त्यांच्यातील स्थळ आणि वेळेचे अंतर कमी होऊन सीमांची बंधनेही शिथिल होऊ लागली. परिणामी विविध समाज संस्कृतींनी परस्परांना प्रभावित केले. त्याचप्रमाणे जगातील कोणतीही वस्तू वा सेवा उत्पादन करणे व त्यांची विक्री करणे सहज शक्य झाले आहे. जागतिकीकरणाचा सामाजिक-सांस्कृतिक दृष्टिकोनातून अंथनी गिडेन्स, रोबर्सस्टन व मेलकॅप यांनी अर्थ स्पष्ट केला आहे. गिडेन्स म्हणतो की, "विश्वव्यापी घनिष्ठ सामाजिक संबंधांचा आधार म्हणजे जागतिकीकरण होय." ही प्रक्रिया सामाजिक आंतरक्रियांना उत्तेजन देते ज्यामुळे मानवी विश्वात अमुलाग्र परिवर्तन, नवयुग अवतरण, सांस्कृतिक विस्तार व आविष्कार घडून जग एक समाज व्यवस्थेचे (विश्व समाजव्यवस्था) रूप धारण करते आहे. जागतिकीकरणाची विशेषता अशी की, या प्रक्रियेने स्थानीयता व सार्वभौमिकता या घटकांना एकाच वेळी स्पर्श केला आहे.

सामाजिक प्रभाव: समाजकारण, राजकारण आणि अर्थकारण या तिन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून असल्या तरी समाजावर त्यातील एखाद्या घटकांचा विशेष प्रभाव पडतो. स्वातंत्र्यपूर्व काळात राजकारणाला महत्त्व होते कारण परकीय सत्तेपासून स्वातंत्र्य मिळवणे हे भारताचे ध्येय होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अर्थकारणाला महत्त्व प्राप्त झाले. समाजाचा व देशाचा विकास साधावयाचा झाल्यास आर्थिक सुबत्ता असणे आवश्यक असल्यामुळे भारताने त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. मूलभूत आर्थिक सुधारणा पायाभूत मानून निरनिराळी विकासाची कामे हाती घेण्यात आली. त्याच वेळी बाहेरील जगात मोठी आर्थिक क्रांती सुरू होती. विकसित व अविकसित असे जगाचे दोन भाग पडले. साधारणपणे आफ्रिका व आशिया खंडातील भाग अविकसित राहिले, तर पश्चिमेकडील देश विकसित झाले.१९९५ पासून जागतिक व्यापार संघटना करार व इतर म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक या संस्थांच्या रुपाने 'भांडवलशाही' जागतिक स्तरावर पोहोचली.

भारतात खुले आर्थिक धोरण जुलै १९९१ मध्ये जाहीर झाले. यावेळी सार्वजनिक उद्योगधंद्याचे महत्व कमी करतांना खाजगीकरणाचे वारे वाहू लागले. भारतीय उद्योग विश्वाचे चित्रच पालटून गेले. कोकाकोला, पेप्सी, सॅमसंग, देवू, होंडाई, मॅकडोनाल्ड, ए.सी.निल्सन यासारख्या अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर आक्रमण केले. तसेच अमेरिकन, जपानी व कोरियन कंपन्यांनी आपल्या देशात जबरदस्त मुसंडी मारली. या सर्व घटकांचा परिणाम सहाजिकच भारतीय समाजावर झाला. आज जगात जी बाजार व्यवस्था आहे, त्या व्यवस्थेचे मूळ एका विषम रचनेत आहे. नवीन आर्थिक व्यवस्था निर्माण होताना समाज आणि संस्कृती देखील अटळपणे बदलते. नव्या व्यवस्थेच्या गरजा वेगळ्या असतात. त्यात नव्या हेतूंची, नव्या कौशल्यांची, नव्या सामाजिक संबंधाची एक नवी घडण होत असते. जुन्या संरचना निरुपयोगी होऊन त्याची जागा नवीन संरचना घेते व त्यामुळे नवीन सामाजिक संबंध प्रस्थापित होतात. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेने जगातील वेगवेगळ्या देशात असणाऱ्या सामाजिक विषमतेशिवाय वर्गभेद, वर्णभेद, जातीभेद यांचा प्रभाव कमी होण्यासोबतच वर्गसंघर्ष व जातीसंघर्षाची तीव्रताही घटली. एकंदरीत सर्वसमावेशक मूल्यव्यवस्था आकार घेऊन सामाजिक संबंध विश्वव्यापी बनले.

सांस्कृतिक प्रभाव: प्रत्येक देशातील सामाजिक संस्कृती वेगवेगळी असून त्यामध्ये विविध घटक अंतर्भूत असतात. ही संस्कृती विचारप्रणाली, जीवनप्रणाली आणि उपासनाप्रणाली यांनी मिळून बनते. संस्कृती मध्ये असणाऱ्या या घटकांची देवाण-घेवाण होण्यास जागतिकीकरणामुळे सुरुवात झाली. सांस्कृतिक मूल्य आणि जीवन पद्धती यांना संमिश्र स्वरूप प्राप्त झाले व विश्वसंस्कृती निर्माण होऊ लागली. जागतिकीकरणाच्या माध्यमातून वैश्विक संस्कृतीचा अविष्कार झाला.

रोबर्सस्टन म्हणतो की, 'जागतिकीकरणात स्थळ आणि काळ एकत्र सम्मिलित झाले आहेत.' जगातील व्यक्तीला जाणीव होत आहे की, ते या विश्वाचे एक घटक आहेत.

इंटरनेटच्या सहाय्याने जगातील विविध देशाच्या कला, संगीत, साहित्य, क्रीडा, चित्रपट, लिखाण इत्यादींचा आस्वाद घरबसल्या घेता येतो व त्याचा परिणाम म्हणून जागतिकीकरणाच्या प्रभावाने इतर देशाबद्दलच्या वास्तव जाणिवा प्रत्येकाला होत आहेत. प्रत्येक देशाच्या संस्कृतीबद्दल, त्यांच्या साहित्याबद्दल विविध माध्यमांमुळे सध्या अत्यंत वेगाने होणाऱ्या सांस्कृतिक संक्रमणाने जगभर एकाच संस्कृतीचा वरचष्मा निर्माण होऊन सांस्कृतिक-जागतिकीकरण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया : फायदे-तोटे (भारतीय समाज व सांस्कृतिक क्षेत्रासंदर्भात)

जागतिकीकरण प्रथमतः जगातील विविध राष्ट्रांना आर्थिक स्तरावर एकत्रित करण्यावर भर देते. असे असले तरी व्यापक दृष्ट्या या प्रक्रियेत सांस्कृतिक विस्तार व वैश्विक संस्कृतीचा अविष्कार यांचा समावेश असतो. ही वैश्विक संस्कृती उदारमतवादी, नवे विचार, नव्या सवई , नव्या संवेदना, नवीन वर्तन प्रकार, नव्या अभिवृत्तींची असते. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत देशादेशातील सीमा कमी करणे, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्तरावर जवळीक निर्माण करणाऱ्या आंतरक्रीयाना उत्तेजन देण्याच्या क्रियेवर भर देण्यात येतो. जागतिक स्तरावर विविध राष्ट्रातील ज्ञान व श्रमाच्या बळावर विकास होण्याससोबतच व्यक्तींचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात

फायदे:

१ आर्थिक विकासास संधी
२ जीवनमानात वाढ
३ सामाजिक विषमता निर्मूलनास सुरुवात
4. उत्पादनात वाढ
5. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ
6. वैश्विक संस्कृतीचा अविष्कार

तोटे:

१ बेकारी, बेघरांची वाढती संख्या
२ असाध्य रोगाचे वाढते प्रमाण
३ बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी
४ वांशिक दंगे व सैनिकी संघर्ष
5. निसर्गाचा ऱ्हास,वाढते प्रदूषण
6. वाढती असुरक्षितता
7. शेती व्यवसायावर परिणाम

सारांश : जागतिकीकरणाचा भारतीय समाज व सांस्कृतिक क्षेत्रावर सकारात्मक व नकारात्मक परिणाम दिसून येतो. या प्रक्रियेत सर्व अर्थकारण मुक्त असते याचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, औद्योगिक, शेती, व्यवसाय, आरोग्य व इतर क्षेत्रावर मोठा परिणाम होतो. जागतिकीकरणामुळे विशेषतः विकसनशील व अविकसित राष्ट्रावर मोठा दबाव येऊन त्याचे आर्थिक स्वातंत्र्य नष्ट होऊ शकते. त्यातच भारतीय समाज व संस्कृतीचा विचार केल्यास जगामध्ये भारतीय सांस्कृतिक विचाराचे जे वेगळेपण आहे त्याची दिशा कशी असेल हे सांगणे कठीण आहे. माध्यमांच्या अतिक्रमणाने आज सांस्कृतिक आणि नैतिक स्वैराचार फैलावण्याचा धोका आहे. व्यापाराचे जागतिकीकरण होत असताना माणूस एकाकी पडला आहे. जागतिकीकरण आणि त्यातून निर्माण होणारी स्पर्धा ही अपरिहार्य असली तरी या आव्हानाला भारत कसे सामोरे जाणार हा प्रश्न आहे.

संदर्भ:

१ उच्चतर समाजशास्त्र विश्वकोश, हरिकृष्ण रावत, रावत पब्लिकेशन, जयपूर एवम् दिल्ली.
२ समाजशास्त्र, इयत्ता बारावी, प्रा.ए. वाय. कोंडेकर, फडके पब्लिकेशन, कोल्हापूर.
३ सामान्य अध्ययन, पेपर १ व २, डॉ. आनंद पाटील,स्टडी सर्कल पब्लिकेशन, मुंबई.
४ आधुनिकता-उत्तरआधुनिकता एवम नवसमाजशास्त्रीय सिद्धांत,एस.एल. दोषी, रावत पब्लिकेशन,जयपुर एवम दिल्ली.
५ साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण, भालचंद्र नेमाडे, लोकवांगमय गृह प्रकाशन,मुंबई .
६ जागतिकीकरण आणि देशीवाद, रंगनाथ पठारे, लोकवांगमय गृह प्रकाशन, मुंबई.

*समाजशास्त्र विभागप्रमुख, संत रामदास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना. (४३१२०९) Mo. No.: 7038953882 E-Mail ID: svsamag@gmail.com

***

भारतात झोपडपट्टीचा विस्तार आणि सामाजिक पर्यावरण प्रदूषण एक नागरी समस्या

*डॉ.विनायक आर.साखरकर

सारांश :

भारतातील झपाट्याने वाढते शहरीकरण हे एक अपरिहार्य आव्हान बनले आहे. सेवा क्षेत्राच्या वाढीसोबत शहरांवरील लोकसंख्येचा दबाव अधिकाधिक वाढत आहे. झोपडपट्टी हा एक उच्च लोकसंख्या असलेला शहरी निवासी क्षेत्र आहे ज्यामध्ये कमकुवत निर्माण गुणवत्तेची दाट गृहनिर्माण समूहे असतात आणि ही बहुतेकदा गरिबीशी संबंधित असतात. झोपडपट्ट्यांमधील पायाभूत सुविधा अनेकदा खराब किंवा अपूर्ण असतात आणि त्यामध्ये प्रामुख्याने गरीब लोक राहतात. झोपडपट्ट्या सहसा शहरी भागात वसलेल्या असल्या, तरी काही देशांमध्ये त्या उपनगरी भागात असू शकतात जेथे घरांची गुणवत्ता कमी असते आणि राहणीमान खराब असते. भारतात दिल्ली हे जगातील सहाव्या क्रमांकाचे मोठे महानगर आहे, तरीही येथील एक तृतीयांश घरे झोपडपट्ट्यांचा भाग आहेत, ज्यांना कोणतीही मूलभूत संसाधने उपलब्ध नाहीत. झोपडपट्टी म्हणजे सार्वजनिक जमिनीवरील बेकायदेशीर नागरी वसाहती आणि सामान्यतः ठराविक कालावधीत सतत ज्या अनियमित पद्धतीने विकसित होतात. झोपडपट्टी भाग हा शहरीकरणाचा अविभाज्य भाग मानला जातो आणि शहरी भागातील एकूण सामाजिक-आर्थिक धोरणे आणि योजनांची अभिव्यक्ती म्हणून त्याकडे पाहिले जाते. 'झोपडपट्टी क्षेत्र' चे वर्णन अनेकदा 'अवघडपणे अधिग्रहित, अव्यवस्थितपणे विकसित आणि सामान्यतः दुर्लक्षित क्षेत्र जेथे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या राहते' असे केले जाऊ शकते. झोपडपट्टी क्षेत्रा'चे अस्तित्व आणि जलद वाढ ही एक सामान्य शहरी घटना म्हणून पाहिली जाते, परंतु पर्यावरण प्रदूषणासाठी ही तेवढीच जबाबदार आहे. या संशोधन पत्रात भारतात झोपडपट्टीचा विस्तार आणि सामाजिक पर्यावरण प्रदूषण या नागरी समस्येचे अध्ययन करण्यात आले आहे.

मुख्य शब्द : झोपडपट्टी, शहरीकरण, लोकसंख्या, मूलभूत संसाधने, बेकायदेशीर नागरी वसाहती, पर्यावरण प्रदूषण, नागरी समस्या.

परिचय :

देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये अनेक वेगवेगळ्या कारणांमुळे झोपडपट्ट्या तयार होत आहेत आणि वाढत आहेत. झोपडपट्टीच्या विस्ताराच्या कारणांमध्ये जलद ग्रामीण-ते-शहरी स्थलांतर, आर्थिक स्थैर्य आणि नैराश्य, उच्च बेरोजगारी, गरिबी, अनौपचारिक अर्थव्यवस्था, खराब नियोजन, राजकारण, नैसर्गिक आपत्ती आणि सामाजिक संघर्ष यांचा समावेश होतो. देशांतील झोपडपट्ट्या कमी करण्याचा आणि परिवर्तन करण्याचा प्रयत्न केलेल्या धोरणांमध्ये वेगवेगळ्या प्रमाणात यश आले आहे, त्यामध्ये झोपडपट्टी हटवणे, झोपडपट्ट्यांचे स्थलांतरण, झोपडपट्ट्यांचे उन्नयन, शहरव्यापी पायाभूत सुविधांच्या विकासासह शहरी नियोजन आणि सार्वजनिक गृहनिर्माण यांचा समावेश आहे.

झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती (Slums) या शब्दावरून आपल्याला त्याबाबतची कल्पना येते. शहरामध्ये येत जाणारा सारखा गरीब लोकांचा ओघ त्यामुळे अशा निर्धन लोकांची एक वस्ती बनत जाते. इंग्रजीत Slumns हा शब्द Slumber या शब्दापासून आला असावा. त्याचा अर्थ अनोळखी, काळेकुट्ट अंधारी रस्ते, निर्मनुष्य रस्ते किंवा गल्ल्या असा

केला जाई. पुढे त्याचा अर्थ बदलून Slum म्हणजे शहराजवळील गलिच्छ वस्त्या किंवा हिंडिस वस्ती असा त्याचा अर्थ रूढ झाला. शब्दकोषामध्ये Slum ह्या शब्दाचा अर्थ जेथे अत्यंत निकृष्ट प्रतिच्या राहण्याच्या सोयी उपलब्ध असतात असा दाट व ओंगळ वस्ती असलेला शहराचा भाग व रस्ता म्हणजे गलिच्छ वस्ती किंवा घाणेरडी वस्ती होय. असा आढळतो. गलिच्छ वस्तीचे वर्णन शहराचा व्रण (cancer) असे केले जाते. Gray Area म्हणजे ज्या भागावर जुनाट कळा येत आहे अशी वस्ती गलिच्छ वस्ती व घाणेरडी वसती तीन प्रकारे अस्तित्वात येते. पहिल्या प्रकारामध्ये समाजाने बहिष्कृत केलेले किंवा तुरूंगातून आलेले लोक ह्या लोकांना समाजाकडून कोणतीही मदत मिळत नाही. ते समाजाच्या सहानुभूतीस पारखे झालेले वा वंचीत झालेले असतात. ह्या वस्त्यांना Slums of Despair किंवा नैराश्याची वस्ती असे म्हटले जाते. दुसऱ्या प्रकारास शहारातील खेड (Urban Village) असे संबोधले जाते. तेथे खेड्यातून शहरात येवून राहिलेले लोक राहतात. तिसऱ्या प्रकारामध्ये जास्त भाडे देवू शकणाऱ्या व्यक्ती शहरातील कमी भाड्याच्या वस्तीत घरे घेवून राहतात वरील दोन प्रकारापेक्षा येथील वातावरण बरेच चांगले असते व परिस्थिती बदलताच येथील लोक चांगल्या घरात राहावयास जातात. अशा वस्तीस (Slum of Hopes) किंवा आशादायी वस्ती असे संबोधले जाते.

शहरीकरण म्हणजे ग्रामीण भागातून शहरी भागात लोकसंख्येचे स्थलांतर होय. ग्रामीण भागातील लोक कामाच्या शोधात किंवा कामाच्या निमित्याने शहराकडे जावून राहू लागलेले आहे. शहरामध्ये कमी उत्पन्न व जागेच्या प्रचंड किंमती यामुळे सर्वसामान्य माणसांना शहरात चांगल्या ठिकाणी जागा खरेदी करून हे लोक राहू शकत नाही आणि ह्यामुळे शहरामध्ये जेथे खाली जागा मिळेल त्या ठिकाणी हे लोक अतिक्रमण करतात व दाटीवाटीने आपली लहान लहान घरे बांधून निवास करतात व त्यातून झोपडपट्टीचा प्रश्न निर्माण होतो. शहरांना बऱ्याचदा जलद शहरीकरणाच्या प्रतिकूल परिणामांचा सामना करावा लागतो. ज्यात जास्त लोकसंख्या, घरे आणि पायाभूत सुविधांचा अभाव, पर्यावरणीय प्रदूषण, बेरोजगारी आणि सामाजिक अशांतता यांचा समावेश होतो. विकसित शहर बनवण्याच्या या मॉडेलमध्ये अनियोजित विकासाचाही समावेश आहे, जे श्रीमंत आणि गरीब समुदायांमधील द्विभाजनाला बळकटी देते. शिवाय, कोविड-19 सारख्या साथीच्या आजाराने शहरांमध्ये विविध क्षेत्रात काम करणाऱ्या किंवा झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या शहरी गरिबांसाठी समस्या आणखी वाढवली आहे. गलिच्छ वस्त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न आणि या प्रश्नाचा समाजावर गंभीर परिणाम होतांना दिसत आहे. त्यामुळे देशातील वेगवेगळ्या शहरामध्ये गलीच्छवस्त्या सुधारणा किंवा उच्चाटन करण्याचा वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न होतांना दिसून येत आहे. भारताचा विचार करता भारतामध्ये १९५६ पासून झोपडपट्टी निर्मूलनाचा प्रयत्न सुरू आहे.

शहरामध्ये मोठ्या प्रमाणात झोपडपट्टीचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो. अशा झोपडपट्टीचा अर्थ लक्षात घेतांना १९५६ च्या भारत सरकारच्या गलिच्छ वस्ती (सुधारणा व निर्मूलन) कायदयाने झोपडपट्टीची व्याख्या देतांना ती अशी केलेली आहे. 'जेथील घरे झीजलेली, माणसांची दाटी, चूकीच्या पद्धतीची रचना, वायुवीजनाचा प्रकाशाचा अभाव किंवा यातील वेगवेगळ्या गोष्टीचे एकत्रिकरण यामुळे शारीरिक अथवा नैतिक संरक्षणास धोकादायक ठरतात अशी कोणतीही वस्ती होय.' एस. के. गुप्ता यांनी 'मानवी निवासास अयोग्य अशा घरांची गर्दी असलेली वस्ती म्हणजे गलिच्छ वस्ती होय' असे म्हटले आहे. अंतर एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका मध्ये झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्तीची

व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. "निकृष्ट दर्जाची, अनारोग्यदायक व कोंदट शहरी किंवा निमशहरी वस्ती म्हणजे झोपडपट्टी होय. "

फोर्ड यांनी गलिच्छ वस्तीच्या संदर्भात चर्चा करतांना असे म्हटले आहे की, "ज्या परिसरातील घरे राहण्यास निकृष्ट, अपूरी आरोग्यास घातक असतात. सुरक्षिततेच्या, नैतिकतेच्या आणि तेथील निवासी लोकांच्या दृष्टीने हानीकारक असतात अशा वस्तीला गलिच्छ वस्ती असे म्हणतात." झोपडपट्ट्या प्रत्येक शहराच्या आतचा अविभाज्य भाग बनलेला आहे. मात्र प्रत्येक शहरात असलेल्या झोपडपट्ट्यांना वेगवेगळया नावाने संबोधले जाते. जसे दिल्लीमध्ये 'वस्ती', झुग्गी झोपडीया म्हणतात. चेन्नई, 'चेरी', कलकत्ता 'बस्ती', कानपूर 'अहाते' मुंबईत 'चाळ', बंगलोर आंध्रमध्ये 'पेट्स' असे म्हणतात. महाराष्ट्रात झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती असे म्हणतात.

भारतात झोपडपट्टीचा विस्तार आणि पर्यावरण प्रदूषण एक नागरी समस्या:

भारतातील झोपडपट्ट्यांचे अनेक क्षेत्र हे संक्रमण क्षेत्र आहे. यामध्ये ग्रामीण भागातील दुरगामी सामाजिक प्रथा, तणाव आणि संघर्ष हे घटक आहेत. शहरी वातावरणातील समायोजन ही या भागाची मुख्य समस्या आहे. ही समाजकंटकांची क्षेत्रे आहेत आणि जुगार, दारू, वेश्याव्यवसाय, बाल-गुन्हेगारी इ. झोपडपट्ट्यांचा समाज असंघटित आहेत. जातीय संघर्ष, तणाव, दहशत इत्यादी समस्या झोपडपट्ट्यांच्या सामान्य समस्या आहेत. झोपडपट्ट्यांमध्ये पुरुषांची संख्या अधिक आणि महिलांची संख्या कमी आहे. त्यामुळे या भागात व्यभिचार आणि वेश्याव्यवसायही फोफावतो. हे विविध विकाराचे क्षेत्र आहेत. भारतात झोपडपट्टीतील मुलांच्या अनेक शैक्षणिक समस्या आहेत. झोपडपट्ट्यांमध्ये गरिबीचे अधिक प्रमाण आहे. मुलांच्या शिक्षणाचा खर्च ते करू शकत नाहीत. गरिबीमुळे ते आपल्या मुलांना लहानपणापासून कामात गुंतवून घेतात. त्यामुळे मुलांना शिक्षण घेता येत नाही. झोपडपट्ट्यांमध्ये शिक्षणाचे वातावरण नाही, त्यामुळे मुले शिक्षण घेण्यास प्रवृत्त किंवा उत्साही नाहीत. झोपडपट्ट्यांमध्ये जागरुकतेचा अभाव आढळतो. यामुळे शिष्यवृत्ती व मोफत पुस्तके व इतर शासकीय सुविधांचा लाभ मुलांना घेता येत नाही. ज्ञानाअभावी मुले लिहू व वाचू शकत नाहीत. झोपडपट्ट्यांमध्ये शाळेचे प्रमाण कमी आहे. मुलांना घरापासून दूर शाळेत जाता येत नाही.

भारतातील सुमारे 81 टक्के लोकसंख्या अनौपचारिक क्षेत्रात काम करते. संपूर्ण कोविड लॉकडाऊन अचानक लागू झाल्यामुळे झोपडपट्टीतील रहिवाशांच्या जीवनमानावर गंभीर परिणाम झाला आहे. प्री-लॉकडाऊन नंतर दिल्लीत मोठ्या प्रमाणात 'रिव्हर्स मायग्रेशन' पाहायला मिळाले, जेव्हा हजारो स्थलांतरित कामगार त्यांच्या गावी परतले. यावेळी सुमारे ७०% झोपडपट्टीतील रहिवासी बेरोजगार झाले; 10% वेतन कपात आणि 8% इतर परिणाम पाहिले. सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) द्वारे उपलब्ध अन्नधान्यांमुळे ग्रामीण भागातील रहिवाशांचा एक मोठा वर्ग महामारीमुळे उद्भवलेल्या आर्थिक विघटनाचा सामना करू शकला असला तरी, शहरी गरिबांना अशा रेशनवर किमान प्रवेश होता. शहरी गरिबांच्या तुलनेत ग्रामीण भागातील गरिबांना सामाजिक सुरक्षा योजनांचे कव्हरेजही चांगले होते. शहरी भागातील बहुतांश कुटुंबांकडे रेशनकार्ड नाहीत. कोविड-19 साथीच्या आजाराने झोपडपट्ट्या आणि झोपडपट्टी भागातील आव्हाने अधिक तीव्रतेने उघड केली आहेत. या भागात हात धुणे आणि शारीरिक अंतर यासारख्या नियमांचे

पालन करणे अशक्य होते. दिल्लीतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणारी सुमारे 21.8% कुटुंबे सार्वजनिक नळांसारख्या सामायिक पाण्याच्या स्रोतांवर अवलंबून आहेत. पोषणाची गुणवत्ता आणि प्रमाणातील घसरण शहरी रहिवाशांच्या बाबतीत अधिक दिसून आली आणि बहुतेक लोकांना अन्न विकत घेण्यासाठी पैसे उधार घ्यावे लागले. भूक आणि अन्न असुरक्षिततेची एकूण पातळी उच्च राहिली, परिस्थिती सुधारण्याची फारशी आशा नाही आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासह अन्न सहाय्य प्रदान करण्यासाठी उपाययोजनांचा अभाव आहे.

झोपडपट्टी भागात राहणारे लोक टायफॉइड आणि कॉलरा यांसारख्या जलजन्य आजारांना तसेच कर्करोग आणि एचआयव्ही/एड्स सारख्या अधिक घातक आजारांना बळी पडतात. अशा झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या स्त्रिया आणि मुलांना वेश्याव्यवसाय, भीक मागणे आणि मुलांची तस्करी यांसारख्या सामाजिक वाईट गोष्टींचा सामना करावा लागतो. याशिवाय अशा वस्त्यांमध्ये राहणाऱ्या पुरुषांनाही या समाजकंटकांचा सामना करावा लागतो. गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असलेले ठिकाण म्हणून झोपडपट्टी भागाकडे पाहिले जाते. हे झोपडपट्टी भागातील शिक्षण, कायदा आणि सुव्यवस्था आणि सरकारी सेवांकडे सरकारी दुर्लक्षामुळे होते. विकसनशील देशातील बहुतेक झोपडपट्टीतील रहिवासी अनौपचारिक क्षेत्रातून आपली उपजीविका करतात जे त्यांना आर्थिक सुरक्षा किंवा चांगले जीवन जगण्यासाठी पुरेसे उत्पन्न देत नाही आणि त्यांना गरिबीच्या दुष्टचक्रात अडकवले जाते. सरकारचे बहुतेक मदत निधी आणि लाभ झोपडपट्टीवासीयांपर्यंत पोहोचत नाहीत, मुख्यत: या वसाहतींना सरकारची अधिकृत मान्यता नाही. भारतामध्ये योग्य सामाजिक अंतराच्या उपायांचा अभाव दिसून आला आहे आणि याचा विषाणूशी लढण्याच्या आमच्या क्षमतेवर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे शहरी नियोजन आणि प्रभावी प्रशासनासाठी नवा दृष्टिकोन ही काळाची गरज आहे. शाश्वत, मजबूत आणि सर्वसमावेशक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक ती कृती केली पाहिजे. शहरी गरिबांना भेडसावणाऱ्या अनोख्या आव्हानांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आपल्याला 'टॉप-डाउन दृष्टिकोन' स्वीकारण्याची गरज आहे.

गेल्या दशकात झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या दुपटीने वाढली आहे. भारत सरकारच्या सर्वेक्षण २०११ नुसार, मुंबई, कोलकाता, चेन्नई आणि दिल्ली येथे अनुक्रमे ४१ टक्के, २९ टक्के, २८ टक्के आणि १५ टक्के शहरी लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. या झोपडपट्ट्यांमध्ये एका खोलीत सरासरी ५ लोक राहतात. दिल्ली सरकारच्या आकडेवारीनुसार सातशे एकरमध्ये झोपडपट्ट्या असून त्यामध्ये सुमारे दहा लाख लोक राहतात. दिल्लीतील सुमारे ९० टक्के झोपडपट्ट्या या सरकारी जमिनीवर अनियमित वसाहतींच्या स्वरूपात आहेत. युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) च्या मानव विकास अहवाल २०१४ नुसार, ६३२ दशलक्ष लोकांसह, बहुआयामी दारिद्र्यात जगणारी जगातील सर्वात मोठी लोकसंख्या भारत आहे. भारतात सर्वात जास्त झोपडपट्ट्या महाराष्ट्रात आहेत. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या २००१ मध्ये ५२ दशलक्ष वरून २०११ मध्ये ६५.५ दशलक्ष झाली आहे.

परवडणाऱ्या शहरी घरांची वाढती मागणी आणि अपुरा पुरवठा यांच्यातील तफावत यामुळे झोपडपट्ट्यांच्या निर्मितीला प्रोत्साहन मिळाले आहे. जेव्हा जेव्हा शहरी घरांची मागणी वाढते तेव्हा औपचारिक क्षेत्रांकडून ती पूर्ण होत नाही. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला झोपडपट्टीत राहावे लागत आहे. झोपडपट्टीतील रहिवासी सहसा डंपिंग ग्राउंडसारख्या किरकोळ ठिकाणी राहतात. हे सर्वज्ञात आहे की झोपडपट्टीतील रहिवाशांची क्रयशक्ती इतरांच्या तुलनेत खूपच कमी आहे ज्यामुळे ते शहरांमध्ये घरे खरेदी करू शकत नाहीत आणि त्यांना झोपडपट्टीत राहावे लागते. याशिवाय

त्यांच्याकडे उत्पन्नाचे स्रोतही तुलनेने कमी किंवा नगण्य आहेत, त्यामुळे त्यांच्याकडे आर्थिक स्रोत उपलब्ध नाहीत. शहरांमधील झोपडपट्ट्यांच्या विस्ताराचे मुख्य कारण म्हणजे खेड्यातून शहरांकडे लोकांचे स्थलांतर. शहर अतिरिक्त लोकसंख्येला मूलभूत सुविधा पुरवण्यास सक्षम नाही ज्यामुळे शेवटी घरांची कमतरता, बेरोजगारी आणि झोपडपट्ट्यांचा विकास यासारख्या अनेक समस्या निर्माण होतात. झोपडपट्ट्यांमधील एक प्रमुख घटक म्हणजे कालबाह्य शहरी नियोजन नियम, ज्याचा वापर झोपडपट्टीतील रहिवासी त्यांच्या घरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी करतात. शहरी गरीब झोपडपट्टीवासीयांना शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांमध्ये समाविष्ट करण्यात सरकार अपयशी ठरले आहे. यामुळे त्यांच्या राहणीमानात कोणतीही सुधारणा झाली नाही आणि ते अजूनही झोपडपट्टीत राहत आहेत. झोपडपट्ट्यांना स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव आणि सुरक्षित पाण्याच्या स्त्रोतांचा अभाव, कचरा संकलन प्रणालीचा अभाव, वीज पुरवठा आणि ड्रेनेज सिस्टमचा अभाव यासारख्या मूलभूत समस्यांचा सामना करावा लागतो. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील झोपडपट्ट्यांच्या मध्यभागी राहणाऱ्या ५८ टक्के लोकांसाठी ड्रेनेज व्यवस्था नाही, ४३ टक्के लोकांना पिण्याचे पाणी झोपडपट्टीतून आणावे लागते, ३४ टक्के लोकांकडे शौचालयाची सुविधा नाही, ३० टक्के लोकांकडे चरितार्थ चालवण्यासाठी कोणतेही काम नाही. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या घरांची अवस्था अतिशय वाईट आहे, त्यांची घरे साधारणपणे मातीची किंवा विटांची असतात आणि त्यांचा दर्जा खूपच कमी असतो. प्रति व्यक्ती राहण्याची जागा फारच कमी आहे. झोपडपट्ट्या बहुतेक अशा ठिकाणी असतात. जिथे औद्योगिक कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. याशिवाय उघडी गटारे, रस्त्यांचा अभाव, कचऱ्याचे अनियंत्रित डंपिंग आणि प्रदूषित वातावरण ही झोपडपट्ट्यांच्या दुरवस्थेची कारणे आहेत.

झोपडपट्ट्यांच्या अतिशय प्रदूषित वातावरणामुळे, धोकादायक लहान कण (जसे की PM २.५, PM १० इ.) लोकांच्या शरीरात प्रवेश करतात, ज्यामुळे लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. कधी कधी लोकांना जीव देऊन याची किंमत मोजावी लागते. असे अनेक विषारी कण देखील असतात ज्यामुळे कर्करोगाचा धोका देखील असतो. कमी उत्पन्न आणि गरिबी या दोन्हींमुळे बहुतेक झोपडपट्ट्या किंवा झुग्गी झोपडी उगवल्या आहेत. या लोकांकडे झोपडपट्ट्याबाहेर घरे घेण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत. झोपडपट्ट्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांनाही खूप कमी वेतन मिळते, त्यांना उच्च दर्जाचे अन्न मिळत नाही, ज्यामुळे पोषणाची तीव्र कमतरता होते, त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळत नाही. झोपडपट्ट्या आणि झोपडपट्ट्या हे भारतातील बहुतेक लोक सामाजिक बहिष्काराचे क्षेत्र मानतात. या भागात गुन्हेगारीचे प्रमाण खूप जास्त आहे. झोपडपट्ट्यांमध्ये लिंगभेद, हिंसा आणि स्त्रिया आणि मुलांवर अंमली पदार्थांचे सेवन यासारख्या घटना सर्रास घडत आहेत. या वस्त्यांशी संबंधित बहुतेक लोक मानवी तस्करी, बलात्कार, अंमली पदार्थांची तस्करी इत्यादी गुन्ह्यांमध्ये गुंतलेले आढळतात.

निष्कर्ष : विविध प्रकारचे गुन्हे हे सामाजिक प्रदूषणाचा भाग आहेत. झोपडपट्टी भागात गुन्हेगारीचे प्रमाण अधिक आहे. झोपडपट्टी भागातील वातावरण निराशाजनक आहे. त्यांच्या शेजारीच कसाई, दारूची दुकाने, स्मशानभूमी, अस्वच्छता आहे. गुरेढोरे आणि डुकरे ते आणखी गोंधळात टाकतात. कौटुंबिक कलह, अल्पवयीन गुन्हेगारी, मद्यपान, जुगार हे या भागात खोल्यांच्या गर्दीमुळे सामान्य गुन्हे आहेत. झोपडपट्टी सुधार कार्यक्रमात गृहनिर्माण समस्या सोडवणे ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. झोपडपट्ट्यांचा विकास ही एक गुंतागुंतीची समस्या आहे. या अंतर्गत झोपडपट्ट्यांचा प्रसार रोखणे, संरक्षण आणि पुनर्वसन यांचा समावेश आहे. शहरातील पुरातन भागातील घरे पाडून सोयीस्कर घरे बनवणे, सार्वजनिक सुविधा, रस्ते, गटारे, दिवाबत्ती, करमणूक आदींची व्यवस्था करणे यांचा समावेश आहे. काही झोपडपट्ट्यांमध्ये कमी उत्पन्न गटातील घरे बांधणे, प्रकाश व्यवस्था सुधारणे, रस्ते रुंद करणे आणि बंधारे बांधणे

आवश्यक आहे. शहरी विकासाच्या सरकारी योजनांची अंबलबजावणी करताना झोपडपट्ट्यांना केंद्रस्थानी ठेवून योजनांची अंबलबजावणी करणे आवश्यक आहे.

संदर्भ :

- *Kapur, Radhika. (2018). Social Environment, Health and Economic Problems of Individuals in Slum Areas.*
- *Moosavi, M. (2011). An Introduction to Environmental Challenges of Life in Slum Settlements of Tabriz. International Conference on Humanities, Historical and Social Sciences, 17. Retrieved December 25, 2017 fromhttp://www.ipedr.com/vol17/19-CHHSS%202011-H00063.pdf*
- *Okafor, B.N., & Onuoha, D.C. (2016). The Effect of Slum on Property Values in AsabaMetropolis Delta. British Journal of Environmental Sciences, 4(3), 17-33. Retrieved December 25, 2017 from http://www.eajournals.org/wp-content/uploads/The-Effect-of-Slum-on-Property-Values-in-Asaba-Metropolis-of-Delta-State.pdf*
- *Sufaira, C. (2013). Socio Economic Conditions of Urban Slum Dwellers in Kannur Municipality. IOSR Journal of Humanities and Social Sciences, 10(5), 12-24. Retrieved December 25, 2017 from http://www.iosrjournals.org/iosr-jhss/papers/Vol10-issue5/C01051224.pdf?id=*
- *Singh, Arun. (2013). Slums and Urban Environmental Challenges in India: An Appraisal of Planning and Policy Issues.*
- *Anderson, Nels.1959.The Urban Community: A World Perspective. Henry Hall and Company, New York:190-93*
- *Chandrashekhara, S. 2005.Growth of Slums, Availability of Infrastructures and Demographic Outcomes in Slums: Evidences from India, unpublished paper presented in Annual Meeting of the Population Association of America, Philadelphia, Pennsylvania, March31-April 2,2005 (Available on www.iussp.org.)*
- *Govt. of India, Ministry of Housing and Urban Poverty Alleviation.2001.Draft National Slum Policy:2001. Nirman Bhawan,New Delhi.*
- *Mookherjee, D.1986.A Profile of Slums in a Third World City. P.D.Mahadev (ed) Contributions to Indian Geography.Vol.7Heritage Publishers, New Delhi:34-42*
- *Risbud,Neelima.2003.Understanding Slums, the Case of Mumbai . United Nations Global Report on Human Settlement,UN-Habitat available at www.archdev.org.*
- *https://euroasiapub.org/wp-content/uploads/IJRESS60April19AnjAka.pdf*
- *https://mohua.gov.in/upload/uploadfiles/files/9Slum_Report_NBO(2).pdf*
- *https://egyankosh.ac.in/bitstream/123456789/27704/1/Unit-24.pdf*
- *https://ijpsl.in/wp-content/uploads/2020/12/Effects-of-Climate-Change-on-Slums-with-a-Special-Focus-on-Mumbai-India_Anjali-Mishra-Aindrila-Saha.pdf*
- *http://www.diva-portal.org/smash/get/diva2:640967/FULLTEXT01.pdf*
- *https://ijcrt.org/papers/IJCRT2102198.pdf*
- *https://hindrise.org/resources/slum-dwellers-in-india/*
- *http://ijrar.com/upload_issue/ijrar_issue_20542703.pdf*

*कार्यकारी प्राचार्य, कुंभलकर समाजकार्य संध्याकाळ महाविद्यालय, गणेशपेठ, नागपूर

ईमेल : *Vinayak_sakharkar@yahoo.com,* मो. 9730020280

***

जागतिकीकरणाच समाजावर ल प रणाम एक समाजशास्त्र य अभ्यास

*कु. संयागिता प्रभाकर पावार
**डॉ. अरुण विठ्ठल पौडमल

प्र□ना□ना :

जागतिकीकरण नव न आथिक धारणाचा एक मूलभूत पैलू आह. या नव न आथिक धारणामध्य उदार करण, खाजग करण या क्षत्रांचा विस्तार करून सरकारचा आथिक क्षत्रात ल सहभाग कम करण्याचा मुख्य हतू दिसून यता. जागतिकीकरणाच्या या प्रक्रियतून सव राष्ट्रांचा सवागिण विकास करण्यावर भर दण्यात आला आह. म्हणूनच जगात ल विकसित आणि अविकसित अशा सवच राष्ट्रांन जागतिकीकरणाच्या या प्रक्रियमध्य सहभाग हाऊन आपला विकास साधण्याचा प्रयत्न कला आह. जगव्याप्त अशा या नव्या जागतिक धारणाच समाजावर नमक काणत प रणाम झाल आहत, याचा शाध घण्याच्या दृष्ट कानातून जागतिकीकरणाच प रणाम एक समाजशास्त्र य अभ्यास ' हा शाध निबंधाचा विषय निश्चित करण्यात आला आह.

□□□पना :

१९ ० नंतर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रलिया इत्याद राष्ट्रांमध्य आथिक पुनरचनच प्रक्रिया सुरू झाल . यातूनच जागतिकीकरणाच संकल्पना उदयाला आल . संपूण जगाच एक बाजारपठ निमाण करणार जागतिक अथव्यवस्थच ह एक व्यापक प्रक्रिया आह. या प्रक्रियमध्य उदार करण, खाजग करण या धारणांचा अंग कार करण्यात आला आह. आथिक घटकांबराबरच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि पयावरणात्मक क्षत्रांना व्यापणार अश ह प्रक्रिया आह. जागतिकीकरणाच संकल्पना आंतरराष्ट्र य क्षत्रात ल व्यापार, भांडवल व तंत्रज्ञान यांच्यात ल बंधन दूर करून मुक्त अभिसरण स्पष्ट करत. □□□□ □□□□ यांच्या मत, जगात ल वगवगळ्या प्रदशात ल लाकांमध्य वाढत जाणार आथिक, सामाजिक, औद्यागिक, व्यापार व सांस्कृतिक संबंध दाखविणार व्यापक प्रक्रिया म्हणज जागतिकीकरण हाय.''

□□□ष्ट□ :

सदर शाध निबंधाच्या अभ्यासाच उ द्दष्ट खाल लप्रमाण –

१. जागतिकीकरणाच्या आथिक प रणामाचा अभ्यास करण.

२. जागतिकीकरणाच्या सामाजिक प रणामाचा अभ्यास करण.

□□□न प□□□:

प्रस्तुत शाध निबंधाच्या उद्दिष्टांनुसार दुय्यम स्त्रातां ार संकलित तथ्यांच स्पष्ट करणात्मक व तुलनात्मक पध्दत न ताकिक मांडण करून जागतिकीकरणाच्या प रणामांचा शाध घण्याचा प्रयत्न करण्यात आला आह. दुय्यम स्त्रातांमध्य संदभ पुस्तक, मासिक यांचा आधार घण्यात आला आह. मुख्यत १९९१ च्या नव न जागतिक आथिक धारणांतगत जागतिकीकरण, उदार करण आणि खाजग करण या प्रकियांचा समाज ज वनावर काणत प रणाम झाल आहत याचा शाध घण्याचा मुख्यत प्रयत्न करण्यात आला आह.

□□□□□□□□षण :

शाध निबंधाच्या उद्दिष्टांनुसार दुय्यम स्त्रातां ार संकलित कलल्या माहित च स्पष्ट करणात्मक पद्धत न खाल लप्रमाण विश्लषण करण्यात आल आह.

□ाग□□□□रणा□□□□ परिणा□:

जागतिकीकरणाच आथिक प रणाम यामध्य आथिक विषमता, बकार , कल्याणकार धारणांचा त्याग आणि सामाजिक मूल्यांचा ऱ्हास या घटकांच विश्लषण कल आह.

जागतिकीकरणाच्या नव न आथिक धारणामुळ उद्याग, व्यापार, दळणवळण, माहित –तंत्रज्ञान ह उत्पादनाच क्षत्र भांडवलदाराच्या अधिपत्याखाल आलल आहत. त्यातून त्यांन वस्तूंच प्रचंड उत्पादन करून नफा मिळवलला आह.

जागतिकीकरणाच प्रक्रिया भांडवलशाह च विकासाला अधिक पाषक ठरल आह. या प्रक्रियतून भांडवलावर मालकी असणारा भांडवलदार आणि भांडवलावर मालकी नसलला श्रमिक अस दान वग अधिकच बळकट हात गल आहत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियत उद्यागधंद्यांच संख्या माठ्या प्रमाणात वाढविण्यात आल आह. त्यामध्य काम करण्यासाठ कुशल कामगार वगाचा आवश्यकता आह. त्याप्रमाण श्र मंतांच्या मुलांन महागड उच्च व्यावसायिक शिक्षण घऊन वगवगळ्या उद्यागधंद्यामध्य नाकर पटकावल आह. तथापि, शिक्षण संस्थांच फी आणि दणग्या न दऊ शकलल्या गर ब मुलांना व्यावसायिक शिक्षण घता न आल्यामुळ त्यांना उद्यागधंद्यामध्य नाकर मिळण कठ ण झाल आह. त्यामुळ त्यांना गर ब च्या प रस्थित ला सामार जाव लागत आह. अशा या प रस्थित तून श्र मंत अधिक श्र मंत तर गर ब अधिक गर ब बनत चालल आहत. ह आथिक विषमतच प रस्थित दशाच अथव्यवस्था अस्थिर करणार आणि गर ब-श्र मंत यांच्यात ल सामाजिक अंतर वाढविणार आह.

बहुराष्ट्र य कंपन्यांन वगवगळ्या उद्यागधंद्यांमधून आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि यंत्रांचा माठ्या प्रमाणावर वापर करून मयादित श्रमिकांच्या आधार अधिक उत्पादन घण्यावर भर दिला आह. त्याचा प रणाम म्हणून छाट उद्याग बंद पडून त्यात ल कामगारांवर बकार च वळ आल आह. माठ्या कंपन्यांन जाहिरात च्या माध्यमांतून आपल्या उत्पाद त वस्तूंना जागतिक बाजारपठ मिळवून दिल आह. याउलट छाट्या उद्यागधंद्यातून उत्पाद त हाणाऱ्या वस्तूंना याग्य बाजारपठ न मिळाल्यामुळ अस छाट उद्याग बंद पडून त्यात ल कामगारांवर बकार च वळ आल आह. जागतिकीकरणाच्या प्रक्रियत उत्पादन खच कम करून अधिक नफा मिळविण ह कारखानदारांच लक्ष्य असल्यामुळ त्यांन माठ्या प्रमाणात श्रमिकांच कपात करून यंत्रा ार वस्तूंच प्रचंड उत्पादन घण्यावर भर दिला आह. त्यामुळ बकार च प्रमाण वाढतच आह.

दुसर महत्त्वाच बाब अश भरमसाठ लाकसंख्या वाढल्यामुळ पाट भरण्यासाठ राजगाराच्या दृष्टिन विविध प्रकारच कौशल्यपूण शिक्षण घतलला माठा काराग र वग निमाण झाला आह. कारखानदारांच्या मागण पक्षा अधिक कुशल श्रमिक वग आणि भरमसाठ लाकसंख्या ह भांडवल विकासाच मुख्य कारण हात. याच कारण अस आह की, भांडवलदारांच स्वस्त कौशल्यपूण मयादित श्रमिकांच गरज पूण हात. आणि त्या श्रमिकां ार भरमसाठ लाकसंख्यच्या मागण प्रमाण वस्तूंच प्रचंड उत्पादन घता यत. काल माक्स म्हणतात त्याप्रमाण भांडवलदारांच्या मागण पक्षा कामगारांचा पुरवठा अधिक असल तर अश प रस्थित कामगारांच्या शाषणाला पाषक ठरत. भांडवलदार अशा कामगारांकडून कम माबदल्यात अधिक श्रम करून घतात आणि अधिक नफा मिळवतात. त्यामुळ श्रमिकांच्या शाषणातून भांडवलशाह अधिक बळकट हात गल आह.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित जवाहरलाल नहरू यांन मानवतावाद दृष्टिकानातून समाजवाद व मिश्र अथव्यवस्थच्या धारणाचा स्व कार कला. त्यातून बहुसंख्य बहुजन समाजाचा सवागिण विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातून भारताचा आथिक आणि भांडवल विकास फारशा प्रमाणात झाला नसला तर दुबलांना सबल बनविण्याच उदात्त काय पूण हाऊ शकल आह. १९९१ च्या जागतिक आथिक धारणामध्य दुबलांचा विकास साधणाऱ्या समाजवाद धारणांचा त्याग करण्यात आला आह. याउलट पैसा व भांडवल असलल्या कारखानदार लाकांना उदार करण, खाजग करणातून अधिक सवासंध दवून त्यांचाच विकास करण्याचा प्रयत्न कला जात आह. त्यामुळ 'कल्याण या उदात मूल्याच अवमूल्यन हाऊन प्रचंड भांडवल असलल्या भांडवलदारांच कल्याण साधणाऱ्या या नव्या आथिक धारणाचा स्व कार करण्यात आला आह. त तारक की मारक याकड उघड्या डाळ्यांन पाहण आवश्यक आह. जागतिकीकरणातून राजगाराच्या संध च प्रचंड उपलब्धता करून दा रद्रय हटवण्याचा कवळ उदघाष फाल ठरत चालला आह. याच मुख्य कारण अस की, संपूण जगाला आणि भारताला भडसावणारा व विचार करायला लावणारा बकार चा प्रश्न हा हाय. काणत्याह दशाच आणि जगाच अथव्यवस्था लाकांना जगण्याच अधिकार आणि हक्क प्राप्त करून दत नसल तर त्या दशामध्य आणि जगामध्य आराजकता अटळ आह ह नाकारता यणार नाह .

जागतिकीकरणाच्या धारणामुळ सावजनिक उद्यागधंद्याच खाजग करण कल जात आह. कंत्राट पध्दत न कमचाऱ्यांच नमणूक, कामगार कपात, पन्शन, विमा इत्याद सुविधांवर ल बंद , लाकांना कम किंमत मध्य वस्तू आणि सवा पुरवणाऱ्या उद्यागांच्या अनुदानात ल कपात, सरकार स्वस्त धान्य दुकान, स्वयंपाक गॅस, डिझल, पट्राल, खत, ब -बियाण, कृष , आराग्य, शिक्षण, पाण पुरवठा, व जपुरवठा इत्याद वर ल अनुदानात ल कपात यामुळ बहुसंख्य गर बांच्या विकासाला ख ळ

बसल आह. त्याचबराबर जागतिकीकरणाच्या प्रभावातून सहकाय, मानवता, सदाचार, सहिष्णुता, त्याग, नैतिकता, चा रत्र्य, संयम, दया-क्षमा-शांत इत्याद उदात्त सामाजिक-सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास हावू लागला आह. या सव मूल्यांवरच भारत य समाजाच इमारत अभद, अखंड निरंतरपण टकून राहिल हात . प्राच न काळापासून या मूल्यांच अनक संत-महंतांन संरक्षण व संवधन करून समाजाच एकता टिकवून ठवल पण सद्या जागतिकीकरणातून व्यक्तीमध्य व्यक्तीवाद , उपयुक्ततावाद , भागवाद व चंगळवाद वृत्त वाढत चालल आह.

□ाग□त□□□रणा□□□□□□ परिणा□ :

जागतिकीकरणाच सामाजिक प रणाम यामध्य स्त्र या, दलित आणि आदिवास समाज या घटकांच विश्लषण कल आह त खाल लप्रमाण आह.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियत सवा क्षत्रांचा माठा विस्तार हाऊन त्यामध्य स्त्रियांना विशषत उच्च शिक्षित तरूण ना राजगाराच्या माठ्या संध निमाण झाल्या आहत. तथापि, या क्षत्रात तरूण च शाषण कल जात आह. त्यांना राजगार दताना त सुंदर असण, त न विशिष्ट प्रकारचा पाषाख प रधान करण यासाठ सक्ती कल जात. अनक ठिकाण पुरूष अधिकार व सहकार कमचार तरूण आणि सुंदर स्त्रियांचा लैंगिक छळ करतात. नाकर टिकाव म्हणून अनक तरूण ह सव अत्याचार निमूटपण सहन करतात. NCRB या संस्थच्या अहवालानुसार १९९६ त २००० या कालावध त स्त्रियांविरूध्दच्या गुन्ह्यामध्य २४.२ टक्क एवढ वाढ झालल दिसून यत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियत स्त्रियांच वस्तूकरण हात चालल आह. स्त्र दह प्रदशन य मानून त्यांच्या माध्यमातून विविध उत्पादन बाजारपठत खपवल जात आहत. मिस वल्ड, मिस युनिव्हस, मिस एशिया, मिस इंडिया अशा सौंदय स्पधा आयाजित करून त्यात ल विजत्या तरूण ला ब्रँड ॲम्बसडर म्हणून प्रयाजक कंपन्यांच्या उत्पादनाच जाहिरात कराव लागत. म्हणजच तरूण च सौंदय व तारूण्य ह बाजारपठा काब ज करण्याच माध्यम बनविल जात आह. जागतिकीकरणात मनारंजन, पयटन, हॉटलिंग, मॉडलिंग, डान्सबार अशा व्यवसायांचा विस्तार हात असून त्यामध्य विशषत सुंदर तरूण ना राजगार उपलब्ध हात आह. या व्यवसायात स्त्रियांना बाजारूवृत्त न आपल्या दहाच प्रदशन कराव लागत आह. नियतकालिकांच मुखपृष्ठ, विविध उत्पादनाच्या जाहिरात , चित्रपट, दूरदशन मालिका, व्हिडिआ, अल्बम, डान्सबार, डिस्का क्लब इत्याद ार स्त्र दहाच उत्तान व शृंगा रक स्वरूपात प्रदशन कल जात आह. पैसा व ग्लॅमर यांच्या हव्यासापाट काह स्त्र याह आपल्या दहाच भडक प्रदशन करून उच्च प्रतिचा सन्मान मिळाल्याचा मानसिक आनंद मिळवत आहत. त्यातून स्त्र ह एक भागवस्तू आह किंवा कामूकतच प्रतिक आह, असा ह न दृष्टिकान बळावत चालला आह. याचाच प रणाम म्हणून स्त्रियांवर लैंगिक अत्याचाराच्या प्रमाणात वाढ झाल आह. म्हणून जागतिकीकरण ह स्त्र अत्याचाराच किंवा शाषणाच व्यवस्था म्हणाव काय? असा प्रश्न निमाण हाता.

राज्य घटनन दलितांना नाकऱ्यांमध्य आरक्षण ठवून त्यांचा विकास करण्यावर भर दिलला आह. परंतु, १९९१ च्या जागतिकीकरणाच्या नव न आथिक धारणान दलितांच नाकऱ्यांत ल आरक्षण धाक्यात आल आह. जागतिकीकरणामध्य खाजग करणाचा पुरस्कार कला आह. त्यामुळ सावजनिक क्षत्रात ल उद्यागधंद्यांच व इतर सवाक्षत्रांच हस्तांतरण खाजग क्षत्रांकड हाऊ लागल आह. दलितांसाठ च्या राख व जागा कवळ सावजनिक क्षत्रातच असाव्यात अस घटनत काठह नमूद कलल नसतानाह त्या राख व जागा सावजनिक क्षत्रापुरत्याच मयादित ठवल्या असल्याच संदिग्धता निमाण कल जात आह. त्यातच खाजग उद्याग आणि इतर सवाक्षत्र ह उच्च वगात ल भांडवलदार लाकांकडच हस्तांतर त झाल्यामुळ गर ब दलितांना नाकर त ल सवासंध दण्यामध्य त्यांच्याकडून उदासिनता दाखवल जाण्याच शक्यता नाकारता यत नाह . दुसर महत्त्वाच गाष्ट म्हणज सावजनिक आणि खाजग क्षत्रात ल उद्याग आणि सवाक्षत्रांमध्य यंत्रांचा माठ्या प्रमाणात वापर कला जात आह. त्यामुळ स्वच्छा सवानिवृत्त व कामगार कपात च धारण माठ्या प्रमाणावर अवलंबिल जात आह. प रणाम राख व जागांतगत नाकऱ्यांच संख्या कम हात असून दलित सुशिक्षित बकारांच प्रमाण वाढत आह. मूळातच भूमिह न, अल्पभूधारक आणि

पारंपा रक व्यावसायिकतचा काणताह वारसा नसलल्या दलितांना आरक्षणाच्या संध मिळाल्या नाह त, तर त्यांच्या जगण्याच यक्ष प्रश्न निमाण हात ल.

राज्यघटनत ल आरक्षणाच्या धारणाच याग्य अंमलबजावण न करणार मानसिकता असलल काह व्यवस्था दलितांच नाकर त ल त्यांच आरक्षणाच हक्क डावलून त्याठिकाण इतर उच्च वगात ल व्यक्तींच्या नमणूका कल्या जात असतातच. जागतिकीकरण ह पात्रतप्रमाण सवाना समान प्रमाणात राजगाराच संध उपलब्ध करून दणार प्रक्रिया दलितांच्या निराधाराच व्यवस्था ठरत आह काय? असा प्रश्न निमाण झाल्याशिवाय राहात नाह . खाजग उद्याग व इतर सवा क्षत्रात ल आरक्षण धारणाचा संकाच म्हणज दलितांच्या आथिक विकासाला ख ळ बसविण हाय. अशा प्रकार ह प्रक्रिया सुरू राहिल तर दलितांना असहाय्यतच्या, अग तकतच्या विषम पारंपा रक व्यवस्थच्या खाइत शकडा वष माग ढकलण्यासारख हाइल, याच दखल घण्याच वळ आल आह. कारण खाजग उद्याग आणि बहुराष्ट्र य कंपन्या दलितांना नाकऱ्या दत लच याच खात्र दता यत नाह . राख व जागा भरण ह कायद्यान बंधनकारक असूनह काह ठिकाण दलितांना हतुपुरस्कर डावलल जात आह.

भारत स्वतंत्र हावून ६० वषाचा प्रद घ कालखंड उलटून गला तर आदिवास च दा रद्रय, कजबाजार पणा, शाषण, वठबिगार , अज्ञान संपलल नाह . त्यामुळ सरकार, जम नदार, सावकार, व्यापार , उद्यागपत त्यांच्या विराधात आदिवास विभागात असंताष खदखदत आह. या असंताषाचा फायदा घवून आदिवास क्षत्रात नक्षलवाद्यांन सशस्त्र संघष सुरू ठवला आह. त्यातच जागतिकीकरणाच्या नव्या आथिक धारणामुळ एतद्दश य तसच बहुराष्ट्र य कंपन्यांन आदिवास क्षत्रात ल खनिज संपत्त च अक्षरश लुट सुरू कल आह. बिहार, झारखंड, आ रसा, छत्त सगड या राज्यात ल जंगलमय प्रदशात खाण उद्याग माठ्या प्रमाणावर वाढला आह. त्याचा प रणाम म्हणून जंगलात ल उत्पादनावर निवाह करणाऱ्या आदिवास च ज वन उद्धवस्त हात आह. जंगलात ल फळ, कंदमुळ, लाख, डिंक, मध, सरपण, गुरांचा चारा, शिकार, पशुपालन, शत ह त्यांच्या जगण्याच व अस्तित्वाच स्त्रात हिरावून घतल जात आहत. त्यामुळ त्यांच्यापुढ ज वन, मरणाचा प्रश्न निमाण झाला आह.

खाजग करणाच्या धारणातून आदिवास च्या क्षत्रात माठ उद्यागधंद उभारल जात आहत. सावकार व उद्यागपत ह शक्य हाइल तवढ्या प्रमाणात आदिवास च शाषण कर त आहत. आ रसा राज्यात ल कालाहंड जिल्ह्यात ल नियामगिर प रसराच्या जंगलात ल तदूच पान आदिवास गाळा करतात. बाजारपठत या पानांच किंमत प्रत टन रूपय १६ हजार इतकी आह. यापैकी रूपय १२ हजार सरकार कर म्हणून घत व कवळ ४ हजार रूपय आदिवास च्या पदरात पडतात. सरकारच्या या धारणामुळ आदिवास च्या आथिक स्थित त सुधारणा झाल नाह . याउलट नियामगिर पसिरात ल बॉक्साइट खाण तून हजारा रूपय किंमत च बॉक्साइट काढल जात. यावर सरकार कवळ प्रतिटन रू.३०/- एवढ रॉयल्ट घत. त्यामुळ खाणमालक प्रचंड फायदा कमवतात. अशाप्रकार खाजग करणाच धारण ह उद्यागपत च्या फायद्याच तर आदिवास च्या शाषणाच कारण ठरत आह, ह निविवाद सत्य आह.

निष्कर्ष :

जागतिकीकरणाच समाजावर ल प रणाम एक समाजशास्त्र य अभ्यास या विषयाच्या संदभात संकलित माहित च स्पष्ट करणात्मक विश्लषणानंतर प्राप्त निष्कष खाल लप्रमाण -

- राजगाराच्या अपक्षन कौशलपूण श्र मक वगात झालल वाढ आणि लाकसंख्यत ल भरमसाठ वाढ, भांडवलशाह च्या हताच तर श्रमिकांच्या शाषणाच ठरल आह.
- नव न आथिक धारणामध्य दुबल घटकांच कल्याण' या उदात्त मूल्याच अवमूल्यन हाऊन भांडवलदारांच कल्याण हात आह.
- पन्शन व विमा कंपन्यांच्या सवासंध माडित निघाल्यामुळ सवानिवृत्त वृध्दांच्या जास्त काळ जगण्याच्या आशा मावळल्या आहत.
- सहकाय, सहिष्णुता, त्याग, मानवता, नैतिकता व चा रत्र्य या पारंपा रक उदात्त सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास हावून सामाजिक विघटनात वाढ झाल आह.

- वगवगळ्या कंपन्यांच्या उत्पादित वस्तूंच जा हरात तरूण स्त्रियां ार प्रदशित कल जात असून, तरूण च तारूण्य आणि सौंदय ह जागतिक बाजारपठा काब ज करणार माध्यम ठरल आह. त्यामुळ स्त्रियांच वस्तूकरण हात आह.
- जागतिकीकरणाच्या या नव्या आथिक धारणात तरूण सुंदर स्त्रियांना राजगाराच्या संध मिळत असल्या तर त्या ठिकाण त्यांच लैंगिक शाषण, अत्याचार यात वाढ हावून त्यांच्या सामाजिक दजाच आणि चा रत्र्याच हनन हात आह.
- विविध उद्याग व इतर सवा क्षत्रात ल यांत्रिक उत्पादन पध्दत मुळ करण्यात आलल कामगार कपात आणि राज्यघटनत ल दलितांच्या आरक्षण धारणाच अयाग्य अंमलबजावण यामुळ दलित बकारांच प्रमाण वाढून त्यांना दा रद्रयाच्या खाइत लाटल जात आह.
- जागतिकीकरणाच्या नव्या आथिक धारणामध्य उद्यागधंद्यासाठ लागणाऱ्या व्यावसायिक शिक्षणाला विशष महत्त्व प्राप्त झाल आह. अस शिक्षण कवळ उच्च वगात ल मुल वगवगळ्या व्यावसायिक शिक्षण संस्थांना भरमसाठ फी व डानशन दवून घत आहत. त्यामुळ त्यांना राजगाराच्या संध उपलब्ध झाल्या आहत. याउलट गर ब मुलांना अस शिक्षण घण परवडत नसल्यामुळ त बकार राहिल आहत. प रणाम श्र मंत अधिक श्र मंत तर गर ब अधिक गर ब बनत आहत.
- जागतिकीकरणाच्या आथिक धारणामध्य व्यापार , दलाल, कंत्राटदार ह आदिवास च्या उत्पाद त वस्तूंना याग्य भाव दत नसल्यामुळ त्यांच आथिक शाषण हात आह.

□□□ग्रं□:

१. डॉ.घाटग, लालासाहब नारायणराव, भारत य अथव्यवस्था, निराल प्रकाशन, डॉ.वावर, अनिकुमार कृष्णराव जून-२०१०, पृष्ठ १०.१.

२. प्रा.कराड, जगन (संपादक) जागतिकीकरण भारतासमार ल आव्हान, डायमंड पब्लिकशन, पुण, जानवार -२०० , पृष्ठ ५५.

३. धनागर, द.ना. उच्च शिक्षण ध्ययवादाकडून बाजार पठकड, लाक वाडमय गृह, मुंबइ, नाव्हबर-२०१०, पृष्ठ १६७.

४. स्टड सकल कद्र सामान्य अध्ययन, स्टड सकल पब्लिकशन, मुंबइ, नाव्हबर-२०१०, पृष्ठ १६७.

*संशाधक विद्याथ न , समाजशास्त्र अधिविभाग, शिवाज विद्याप ठ, काल्हापूर

**प्रभार प्राचाय, यशवंतराव चव्हाण (क.एम.स .) कॉलज, काल्हापूर

***

शाश्वत विकास परिषद - ध्येय व पर्यावरण विकास

***प्रा. डॉ. पी. आर. मुठ्ठे**
****प्रा. बी. पी. पवार**

प्रस्तावना : मुष्याने [illegible] जु[illegible]म तर [illegible] [illegible]न [illegible] [illegible]लेला [illegible]म येतो. [illegible]ज मुष्याने [illegible]आ [illegible] [illegible]पर्या[illegible] [illegible]लेला [illegible]म येतो. [illegible]पले ज[illegible] [illegible] [illegible]म [illegible]मुष्याने पर्या[illegible]ये [illegible]तुलन [illegible]ले [illegible] ज्या[illegible] [illegible] [illegible]म येतात. त्या[illegible] पर्या[illegible] [illegible]तुलन [illegible] [illegible]आ [illegible]प्र[illegible]आ [illegible]तून [illegible], [illegible] या [illegible] [illegible] [illegible]आ [illegible]ज[illegible]पर्या[illegible] प्र[illegible] जाग[illegible] [illegible] [illegible]तुलत [illegible], [illegible] या [illegible]तर्गत [illegible]जन [illegible]ले गेलेले [illegible] [illegible]ज[illegible]आ [illegible]म पर्या[illegible] [illegible]या [illegible]या प्र[illegible]त [illegible]ल्या[illegible] त्या[illegible] [illegible]न [illegible]ध्यात[illegible] [illegible] प[illegible]ताना [illegible]म येतो. त्या[illegible] जाग[illegible] [illegible], [illegible], [illegible], [illegible] [illegible]ताना तो [illegible] [illegible] [illegible] या [illegible]ने प्रयत्न [illegible]ले जात [illegible]म. [illegible] [illegible]जे [illegible]रास[illegible] प[illegible]र्तन [illegible]य. [illegible]न प[illegible]म[illegible]ये [illegible] [illegible]र [illegible] ज्या[illegible] पर्या[illegible] जतन [illegible]म. [illegible] [illegible]नरंतर [illegible]र प्र[illegible]या [illegible] [illegible]ज [illegible] त[illegible] प्र[illegible]रे [illegible]र [illegible]तो. [illegible]तुलत [illegible], [illegible] [illegible] [illegible]श्र[illegible] [illegible], [illegible]श्र[illegible] [illegible] [illegible]पर्या[illegible] [illegible]ल्पना [illegible] [illegible]श्र[illegible] [illegible]जे [illegible], पर्या[illegible] [illegible]तुलन [illegible]म [illegible]लेला [illegible]य. या [illegible]ल्पनेत [illegible]आ [illegible] त्या[illegible] पर्या[illegible] [illegible]न्या प[illegible] [illegible]र त्या[illegible]म [illegible]यां[illegible]नियोजन [illegible]ंत[illegible]म [illegible]

संशोधनाची उद्दिष्टये :

[illegible] [illegible]श्र[illegible] [illegible]ल्पना [illegible].
२. [illegible]श्र[illegible] [illegible]म [illegible].
३. [illegible]श्र[illegible]आ [illegible]पूर्ततेत [illegible]रताने [illegible]लेले प्रयत्न [illegible].

संशोधन पद्धती : प्र[illegible]त [illegible] [illegible] [illegible]म या[illegible]प्र[illegible]त ग्रं[illegible], [illegible], [illegible]नपत्रा[illegible]म ले[illegible] [illegible]ने[illegible]म [illegible] [illegible]र [illegible]आत [illegible]ला [illegible]

शाश्वत विकास : [illegible]श्र[illegible] [illegible] [illegible]४[illegible]ल[illegible]म राष्[illegible] [illegible]तर्गत जाग[illegible] पर्या[illegible] [illegible]योगा[illegible]ये [illegible]पर[illegible]आत [illegible]ला. "[illegible]श्र[illegible] [illegible]जे जो [illegible]लू [illegible]आ गरजा पु[illegible]म [illegible]आ गरजा [illegible]आत न [illegible]ता पू[illegible] [illegible]रतो." [illegible].[illegible].[illegible].[illegible] [illegible]आ [illegible] [illegible]ल [illegible]नु[illegible]र, "[illegible]श्र[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]जो [illegible]रोग्य, [illegible], [illegible] [illegible]ज[illegible]ल्या[illegible] यांना श्रेय[illegible]र [illegible]तो [illegible]या[illegible]ये पु[illegible]ष, [illegible]ला [illegible]ल[illegible]न [illegible]लां[illegible]आ [illegible]ला [illegible]जले जाते."

शाश्वत विकास परिषद आणि ध्येय : २५ [illegible]र २[illegible]५ रोज[illegible]न्युयॉ[illegible]ये [illegible]श्र[illegible] [illegible] प[illegible]र[illegible] [illegible]योजन [illegible]र[illegible]आत [illegible]ले. [illegible] प[illegible]र[illegible] २५ ते २[illegible]र [illegible]यान [illegible]आत [illegible]ल[illegible] या [illegible] प[illegible]र[illegible]म [illegible]श्र[illegible] [illegible] [illegible]य (illegible) [illegible]षत [illegible]ले. [illegible]म राष्[illegible]आ [illegible] [illegible]म [illegible] [illegible]म [illegible]रा २[illegible]३[illegible] [illegible]श्र[illegible] [illegible] [illegible]रला. [illegible] [illegible]म [illegible] त्या[illegible]तर्गत [illegible]र [illegible] [illegible]ये [illegible]३ [illegible]या राष्[illegible]न २[illegible] ते २[illegible]या [illegible]ल[illegible] [illegible]य [illegible]राय[illegible]म. त्या[illegible] [illegible] पु[illegible]म[illegible] [illegible]आत [illegible]ला [illegible]

१. दारिद्रय निर्मुलन : या [illegible]यानु[illegible]र [illegible]म २[illegible]३[illegible]र जाग[illegible] पात[illegible]म [illegible]२५ [illegible]लरपे[illegible] [illegible]पन्न [illegible]न्या गर[illegible] प्र[illegible] [illegible]न्य[illegible] [illegible], त[illegible] [illegible]र [illegible]म रेषे[illegible]ल[illegible]म ले[illegible] प्र[illegible] [illegible]र [illegible]. [illegible] गर[illegible] [illegible]जे [illegible]ता[illegible] [illegible]आ योजना रा[illegible]म त्यांना [illegible], [illegible], [illegible] [illegible]पर्या[illegible] [illegible]ना तें[illegible]म येम [illegible]ता प्राप्त [illegible]न [illegible].

२) उपासमार निर्मूलन : या [illegible]यानु[illegible]र २[illegible]३[illegible]र [illegible]र [illegible]म [illegible]न्या ले[illegible] प्र[illegible] [illegible]न्य [illegible], न[illegible]जात [illegible], गर[illegible] [illegible] गर[illegible]ला [illegible]र [illegible]म पोष[illegible] [illegible] पुरे[illegible] [illegible]न्न पुर[illegible] त[illegible] प्र[illegible] [illegible]पोष[illegible] [illegible], [illegible]पन्न [illegible], [illegible]श्र[illegible] [illegible]पन्न [illegible]आ[illegible] [illegible]म [illegible] त[illegible] २[illegible]३[illegible]पर्यंत [illegible], [illegible]त प्रजात[illegible] प[illegible]प्रजात[illegible]जै[illegible] [illegible]म [illegible] [illegible]या [illegible]ये [illegible]आत [illegible]ल[illegible]

३) चांगले आरोग्य : [illegible]रोग[illegible]म[illegible]त्र[illegible]न [illegible]ये [illegible]न्या [illegible]म [illegible] [illegible]र [illegible]ये [illegible]आत [illegible]ले. [illegible]म २[illegible]३[illegible]र जाग[illegible] [illegible]र[illegible]म [illegible]तमृ[illegible]यू प्र[illegible] [illegible]पे[illegible] [illegible]ल[illegible] [illegible], [illegible]आ [illegible]जारां[illegible] प्र[illegible] [illegible], [illegible] [illegible]जारां[illegible] [illegible]रास[illegible] [illegible] प्र[illegible]त[illegible]स[illegible] [illegible]य योजने, [illegible]पा[illegible]त मृ[illegible]यू[illegible] प्र[illegible] [illegible]र, राष्[illegible] [illegible]र [illegible] [illegible]नियोजन[illegible]ये प्रजनन [illegible]रोग्या[illegible] [illegible] [illegible]र, [illegible] [illegible]ष[illegible] [illegible]ल[illegible]पूर[illegible] त[illegible] प्र[illegible] [illegible]न्या [illegible]जारां[illegible] [illegible]तमृ[illegible]आ प्र[illegible]त ल[illegible] [illegible] [illegible].

४) दर्जेदार शिक्षण : [illegible] [illegible]न्याय [illegible] [illegible]र [illegible]न [illegible]ना [illegible]युष्य[illegible] [illegible] [illegible]ता ये[illegible] [illegible] [illegible] [illegible]र [illegible] [illegible]ये [illegible]आत [illegible]ले गेले. य[illegible]ये [illegible]ले [illegible]ल[illegible] [illegible]त प्र[illegible] [illegible] [illegible]न [illegible]. त[illegible] त[illegible], य[illegible] [illegible] [illegible] [illegible]आ [illegible]य पुर[illegible], प्रौ[illegible]तेत [illegible]र [illegible] [illegible] २[illegible]३[illegible]पर्यंत [illegible]ना [illegible]श्र[illegible] [illegible] ज्ञान [illegible]ल्य पुर[illegible] [illegible]ये [illegible]आत [illegible]ले.

५) लैंगिक समानता : लैंग[illegible] [illegible]नता प्राप्त [illegible]र[illegible] [illegible]ला [illegible] [illegible] [illegible]र [illegible]र[illegible] [illegible] [illegible]आत [illegible]ले. [illegible]ला [illegible] [illegible]म [illegible] प्र[illegible]आ [illegible] [illegible]प्त [illegible], राज[illegible], [illegible] [illegible] [illegible]म [illegible]ला[illegible] [illegible] त्यांना [illegible] प्राप्त [illegible]न [illegible] त[illegible] त्यांना प्रजनन [illegible] [illegible]म [illegible]र[illegible]योग्य प्रयत्न [illegible] [illegible]ये [illegible]आत [illegible]ले.

६) शुध्द पाणी व आरोग्यदायक स्वच्छता : २□३□पर्यंत [illegible] पर्यावरणाचा प□रा□ [illegible] नियोजन [illegible] [illegible] तसेच [illegible] पुरविणे, [illegible] नियोजन व पुनर्वापर करणे [illegible] जैवविविधता, पशु, [illegible], नद्या, तळे यांचे [illegible] व पुनर्निर्माण करणाची [illegible] आहे.

७) स्वस्त व शाश्वत ऊर्जा : □म २□३□पर्यंत [illegible], [illegible] व [illegible] [illegible] [illegible] जागरूक □र्जा [illegible] पुनर्[illegible] [illegible] ऊर्जा [illegible] [illegible] [illegible] [illegible] आहे.

८) चांगल्या नौकऱ्या आणि अर्थशास्त्र : निरंतर, [illegible] व शाश्वत [illegible] [illegible] प्रोत्साहन [illegible] रोजगार व [illegible] पुरविणे [illegible] येथे निर्माण करणे आहे. [illegible] उपन्नात निरंतर [illegible] करणे व [illegible] [illegible] [illegible] [illegible]

जागतिकीकरणाच्या प्रभावातील प्रमाण भाषा आणि वारली व कोकणी बोलीचे अस्तित्व

*चंद्रकांत पांडुरंग काईट

प्रस्तावना :

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले असले तरी भारतातील अनेक छोट्या-छोट्या प्रदेशावर पोर्तुगीजांची राजसत्ता होती. यात दादरा आणि नगर हवेली ह्या आदिवासीबहुल प्रदेशाचा समावेश होता. १९६१ साली पोर्तुगीज वसाहतवादी राजसत्तेपासून दादरा आणि नगर हवेली हा प्रदेश स्वातंत्र्य भारतात केंद्रशासीत प्रदेश म्हणून समाविष्ट करण्यात आला. दादरा आणि नगर हवेली हा महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेलगत असलेला आदिवासीबहुल प्रदेश आहे. येथे प्रामुख्याने वारली, धोडिया, कोकणा, धोर कोळी, दुबळा, काथोडी इत्यादि आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. या प्रदेशात दैनंदिन जीवन व्यवहारासाठी प्रामुख्याने वारली व कोकणा बोलीभाषा वापरली जाते. परंतु इतर राज्याप्रमाणे प्रशासकीय आणि शैक्षणिक कामकाजासाठी स्थानिक बोलीभाषेला महत्व किंवा मान्यता मिळाली नाही. शेजारी असलेल्या गुजराती आणि मराठी व राजभाषा म्हणून हिंदी आणि इंग्रजी इत्यादि भाषांना महत्व/मान्यता मिळाल्यामुळे स्थानिक बोलीभाषा दुर्लक्षित झाली आहे. प्रशासकीय व राजकीय दुर्लक्षिततेमुळे आणि वाढत्या जागतिक तंत्रज्ञानामुळे स्थानिक बोलीभाषा बोलणाऱ्यांची व संक्रमणाची प्रक्रिया कमी होत चालली आहे.

भाषा हा मानवी समूहातील महत्वाचा आणि विशिष्ठ घटक म्हणून बघितले जाते. कारण भाषा केवळ सज्ञापणाचे माध्यम नसून, भाषेतून संस्कृती, सत्ता-संबंध, सामाजिक जीवन, नातेसंबंध घडत असतात. इरावती कर्वे (२०१६) असे मत मांडतात की, भाषा ही संस्कृती जन्माला घालते आणि संस्कृती समाजाची निर्मिती करत असते. यावरून संस्कृतीच्या आणि मानवी समाजाच्या संदर्भातील भाषेचे महत्व अधोरेखित होते. तसेच भाषा ही संस्कृतीची वाहक असते, असे मत अनेक अभ्यासक-संशोधकांनी मांडले आहे. परंतु भाषेच्या संदर्भात विचार केल्यास दादरा आणि नगर हवेली येथील परिस्थिती निराळी असल्याचे दिसून येते. दादरा आणि नगर हवेली येथे स्थानिक भाषा वारली व कोकणा आहे परंतु; शिक्षण आणि शासकीय कामकाजासाठी गुजराती, मराठी आणि हिंदी, इंग्रजी इत्यादि प्रमाण लिपी असलेल्या भाषा वापरल्या जातात. यातून बोलीभाषेतील रचनात्मक, सामाजिक व संस्कृतिक बदल कशा आणि कोणत्या स्वरुपात होत आहेत? वारली भाषेला महत्व नाही असे स्थानिक वारली व कोकणा समुदायला वाटते का? शिक्षण, व्यवसाय, प्रशासकीय कामकाजात इतर भाषेच्या वापरामुळे वारली भाषेला अस्तित्व नाही अशी भावना तयार झाली आहे का? या भावणेमुळे वारली बोलीभाषा बोलणाऱ्यांची संख्या कमी होत आहे का? वारली भाषिक आपल्या भाषेच्या अस्तित्वाबद्दल उदासीन होत आहेत का ? वारली भाषा दुसऱ्या भाषेमध्ये रूपांतरित होत आहे का ? वारली बोलीभाषा बोलणाऱ्याची संख्या कमी होत असल्याने वारली संस्कृती लोप पावत आहे का? वारली भाषा व मौखिक परंपरा संवर्धन करण्यासाठी कोणत्या स्वरुपात प्रयत्न केले जात आहेत? मौखिक भाषा जागतिक प्रमाण लिपी असलेल्या भाषेला कशा प्रकारे शह देऊ शकतील? आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मौखिक पाठांतरची परंपरा टिकून राहील का? भाषा आणि सामाजिक-सांस्कृतिक संरचनेचा सह-संबंध कशा स्वरुपात असतो? अशा अनेक प्रश्नांचा शोध व विश्लेषण करण्याचा प्रयत्न सदर शोधंनिबंदाद्वारे करण्याचा पआला आहे.

साहित्याचे पुनरावलोकन

जागतिकीकरणाच्या प्रवाहात सर्वच क्षेत्रात आमुलाग्रह बदल आणि परिवर्तन होत असल्याचे दिसून येते. परिवर्तन आणि बदल या संदर्भात अनेक संशोधक-अभ्यासकांनी विविधांगी अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहात इंग्रजी भाषेला अधिक महत्व मिळत असल्यामुळे अनेक स्थानिक भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. इंग्रजी हीच एक व्यवहारभाषा म्हणून संपूर्ण जगाकडून स्वीकारली जाईल असेच वातावरण सर्वत्र दिसून येत आहे. अशा परिस्थितिमध्ये स्थानिक प्रमाण भाषांच्या अस्तित्वाचा प्रश्न उपस्थित राहतो. ज्या भाषांना स्थानिक राजकीय व प्रशासकीय मान्यता असून लिपी आहे अशा भाषांनांही इंग्रजी भाषेसोबत स्पर्धा आहे. ज्या भाषांना राजकीय व प्रशासकीय पाठबळ असूनदेखील अशा भाषांच्या अस्तित्वाचा प्रश्न उपस्थित होणार असेल तर आदिवासी समुदायाच्या

मौखिक परंपरेने चालत आलेल्या बोलीभाषेच्या संदर्भात काय परिस्थिति असेल? हा प्रश्न अधिक गंभीरपणे लक्षात घेणे आवश्यक आहे. काही अपवाद वगळता भारतीय समाजशास्त्र परिप्रेक्षात आदिम समुदायाच्या भाषा किंवा मौखिक परंपरेकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंध जागतिकीकरण आणि आदिवासी समुदायातील कोकणी व वारली मौखिक परंपरेवर लक्ष केंद्रीत करतो. या अनुषंगाने उपलब्ध संदर्भ साहित्य अभ्यासून मांडणी केली आहे. संदर्भ साहित्याचा आढावा घेऊन त्याचे परिशीलन व राहून गेलेल्या मुद्यांचे विश्लेषण प्रस्तुत शोधनिबंधात केले आहे.

भाषा हे एक संस्कृतीचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. इरावती कर्वे (२०१६) असे प्रतिपादन करतात की, भाषा ही संस्कृती जन्माला घालते आणि संस्कृती समाजाची निर्मिती करत असते. भाषेचे मानवी जीवनातील स्थान आणि उपयोजन याविषयी जगभर विविधांगी संशोधन-अभ्यास झाले आहेत; सुरू आहेत. नोम चॉम्स्की (१९८६) या भाषाशास्त्रज्ञाच्या मते, माणसाला जन्मत:च भाषेचे इंद्रिय प्राप्त झालेले असते. त्याच्या मेंदूच्या संरचनेत ते अंतर्भूत असते. Aaron V. Cicourel (१९८२) यांनी चॉम्स्कीच्या 'जनकसूत्री रचनांतरणावादाच्या सिद्धांताचा संदर्भ देऊन असे मत मांडले आहे की, जनकसूत्री रचनांतरणावादाच्या सिद्धांतंनुसार प्रत्येक भाषिक व्यवहारमागे एक अमूर्त नियव्यवस्था असते. चॉम्स्कीच्या भाषाशास्त्रीय सिद्धांतानुसार प्रत्येक भाषा ही एक स्वतंत्र सामाजिक व्यवहार निर्मिती करत असते. त्यामुळे मानवी जीवनात आपल्या गृह भाषेला अधिक महत्व देणे आवश्यक आहे. डॅनीयल एवेरेट्ट (२०१२) यांनी जंगलात व दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांच्या विविध भाषांचा अभ्यास केला आहे. या अभ्यासातून असा निष्कर्ष काढला की, भाषा ही उपजत प्राप्त होणाऱ्या इंद्रियाची निर्मिती नसून ती मानसाच्या बौद्धिक क्षमतातून विकास पावणारी सामाजिक प्रक्रिया आहे. डॅनीयल एवेरेट्ट यांच्या अभ्यासातून लक्षात येते की, भाषा ही त्या-त्या समाजाची उत्पती असते. म्हणूनच भाषा ही केवळ जैविक देणगी नसून त्या-त्या संस्कृतीची निर्मिती असते. त्यामुळे जैव-विविधतेइतकीच जगभर भाषिक विविधता आपल्याला आढळून येते.

भारतातील भाषिक विविवधता आणि विविधतेच्या अस्तित्वा संदर्भात गणेश देवी (२०१८) असे दाखवून देतात की, भारत हा भाषा बहुल देश आहे भारतात आजच्या घडीस .सूमारे ८८० भाषा बोलल्या जातात पैकी ७८० नोंदणीकृत आहेत१९६१ सन .प्रत्येक जनगणनेत वा भाषा सर्वेक्षणात भाषांची संख्या घटताना दिसते . पासून झालेल्या सर्वेक्षणाची आकडेवारी पाहिली तर गेल्या पन्नास वर्षात २२० भाषा लुप्त झाल्या आहेत. गणेश देवी यांच्या अभ्यासाचा विचार केला तर दादरा आणि नगर हवेलीमधील लोकसंख्येच्या प्रमाणात भाषिक विविधता खूप मोठ्या प्रमाणात आहे . इतर राज्यांच्या लोकसंख्या आणि भाषेच्या विविधतेच्या तुलनेत दादरा आणि नगर हवेलीमधील बोलीभाषेची विविधता अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येते (२०१८) गणेश देवी .डॅनियल अब्राम या संशोधकअभ्यासकचा संदर्भ देत स्पष्ट - करतात की, भविष्यात कोणत्या भाषा जिवंत राहतील व कोणत्या भाषांचे अस्तित्व टिकू शकणार नाही याचे गणितशास्त्राच्या आधारे एक सूत्र बनविले आहेत्यांच्या मते जी भाषा ., ती बोलणाऱ्या समाजास शिक्षण व व्यवसाय देऊ शकत नाही, ती तो भाषिक समाज सोडून देण्याचा खटाटोपास लागतो. गणेश देवी यांच्या अभ्यासाचा व संदर्भाचा विचार केला तर दादरा आणि नगर हवेलीमधील लोकसंख्येच्या प्रमाणात भाषिक विविधता खूप मोठ्याप्रमाणात आहे. इतर राज्यांच्या लोकसंख्या आणि भाषेच्या विविधतेच्या तुलनेत दादरा आणि नगर हवेलीमधील बोलीभाषेचे प्रमाण अधिक आहे. परंतु जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे दादरा आणि नगर हवेलीमधील भाषेच्या अस्तिवा संदर्भात अधिक गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. भुजंग मेश्राम (२०१४) स्वातंत्र्योत्तर भारताने भाषिक तत्वावर प्रांतरचना केली तेंव्हा आदिवासी बोली भाषेला कुठेही स्थान दिले नाही. तसेच बोलीभाषेवर निष्ठा म्हणजे लोकजीवणार निष्ठा. परंतु जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये प्रमाण भाषेपेक्षा बोलीभाषेचे अस्तित्व अधिक धोक्याच्या पातळीवर आहे. आदिवासींच्या बोलीभाषेसंदर्भात गणेश देवी अनेक वर्षापासून संशोधन आणि कृतीकार्यक्रम करत आहेत. त्यांच्या मते, एक भाषा नष्ट होते म्हणजे कधी न भरून येणारी गोष्ट संपते. मातृभाषा व बोलीभाषेचे महत्व लक्षात घेऊन नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेत देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीचा अवलंब आदिवासी बोलीभाषेच्या संदर्भात कशा पद्धतीने करावयाचा आहे याचा विचार झाल्याचे दिसून येत नाही.

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे आज सगळीकडे शिक्षणासाठी इंग्रजी भाषेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. यातच दादरा आणि नगर हवेलीसारख्या आदिवासी संघ प्रदेशमध्ये सामाजिक व्यवहारासाठी वापरली जाणारी वारली व

कोकणी भाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. अवनीता अबी (२०१२) यांनी आपल्या संशोधनपर अभ्यासात असे म्हटले आहे की, कोणत्याही समूहाची सांस्कृतिक धारणा, मूल्य, ज्ञान आणि वर्तणूक यांचा सहसंबंध भाषेशी असतो. परंतु साक्षरतेच्या नावाखाली आदिवासींवर मुख्य प्रवाही भाषेची सक्ती केली जाते त्यामुळे त्यांच्या बोलीभाषा व मौखिक परंपरेतील साहित्य नष्ट होण्याच्या मार्गावर असते. यावरून आपल्या लक्षात येते की, जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे स्थानिक भाषा मुख्यत्वेकरून आदिवासींच्या मौखिक परंपरेच्या अस्तित्वाचा प्रश्न एरणीवर आहे. त्यामुळेच प्रस्तुत संशोधन प्रकल्प दादरा आणि नगर हवेलीमधील वारली व कोकणी भाषेतील मौखिक परंपरेवर लक्ष केंद्रीत करतो.

शोधंनिबंधाची उद्दिष्टे :

१) जागातिकीकरणाच्या प्रभावामुळे व प्रमाण भाषेच्या वाढत्या वापरामुळे दादरा आणि नगर हवेलीमधील वारली व कोकणी समुदायाच्या मौखिक परंमपरेसमोरील संधी आणि आव्हानांचा आढावा घेणे.

२) प्रमाण भाषेतील शिक्षण व्यवस्था आणि वारली मौखिक परंपरेतिल सामाजिक-संस्कृतिक व्यवहारांचा सह-संबंध जाणून घेणे.

शोधनिबंधाचे महत्व :

२ ऑगस्ट १९६१ रोजी पोर्तुगीज वसाहतवादी राजसत्तेपासून दादरा आणि नगर हवेली हा प्रदेश स्वातंत्र्य भारतात केंद्रशासीत प्रदेश म्हणून समाविष्ट करण्यात आला. इतर राज्याप्रमाणे शिक्षण आणि प्रशासकीय कामकाजासाठी स्थानिक वारली व कोकणी बोलीभाषेला महत्व मिळाले नाही. शेजारी असलेल्या गुजराती आणि मराठी व राजभाषा म्हणून हिंदी आणि इंग्रजी इत्यादि भाषांना महत्व मिळूनस्थानिक भाषेकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे इतर प्रमाण भाषा महत्वाच्या ठरू लागल्या. या दुर्लक्षिततेमुळे व प्रमाण भाषेच्या प्रभावामुळे बोलीभाषेतील मौखिक परंपरा संक्रमित होण्यास कोणत्या अडचणी येत आहेत? मानवी समूहातील महत्वाचा आणि विशिष्ठ घटक म्हणून भाषेकडे पहिले जाते. यावरून संस्कृतीच्या आणि मानवी समाजाच्या संदर्भातील भाषेचे महत्व अधोरेखित होते.परंतु दादरा आणि नगर हवेली येथे स्थानिक भाषा वारली व कोकणी परंतु शिक्षण आणि शासकीय कामकाजासाठी गुजराती, मराठी आणि हिंदी, इंग्रजी इत्यादि भाषा वापरल्या जातात. यातून बोलीभाषेतील रचनात्मक, सामाजिक व संस्कृतिक बदल कशा आणि कोणत्या स्वरुपात होत आहेत? वारली व कोकणी भाषेला महत्व नाही असे स्थानिक वारली समुदायला वाटते का? शिक्षण, व्यवसाय, प्रशासकीय कामकाजात इतर भाषेच्या वापरामुळे वारली व कोकणी भाषेला अस्तित्व नाही अशी भावना तयार झाली आहे का? या भावणेमुळे वारली व कोकणी बोलीभाषा बोलणाऱ्यांची संख्या कमी होत आहे का? वारली व कोकणी भाषिक आपल्या भाषेच्या अस्तित्वाबद्दल उदासीन होत आहेत का ? वारली व कोकणी भाषा दुसऱ्या भाषेमध्ये रूपांतरित होत आहेत का ? वारली व कोकणी बोलीभाषा बोलणाऱ्याची संख्या कमी होत असल्याने वारली संस्कृती लोप पावत आहेत का? जागतिकीकरणाचा आदिवासी बोलीभाषेतील मौखिक परंपरेवर काय परिणाम होत आहे? वारली भाषा व कोकणी भाषा यातील मौखिक परंपरा संवर्धन करण्यासाठी कोणत्या स्वरुपात प्रयत्न केले जात आहेत? वारली म्हटले की आपल्यासमोर वारली पेंटिंग येते. परंतु वारली पेंटिग कशाच्या आधारवर आधारावरून तयार केली जाते? वारली चित्रकलेच्या मागची कहाण्या काय आहेत? मौखिक परंपरा व चित्रकलेतून अभिव्यक्त होणारा समुदाय जागतिक लिखित भाषेच्या स्पर्धेत टिकेल का? पाठांतर व मौखिक संस्कृतीच्या परिसरात आधुनिक तंत्रज्ञामुळे कोणते प्रश्न उपस्थित होत आहेत? अशा अनेक प्रकारच्या प्रश्नांचा शोध व विश्लेषण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन प्रकल्प महत्वाचा ठरतो.

संशोधन पद्धती

सदर संशोधन प्रकल्प पूर्तीसाठी आवश्यक तथ्य संकलन करण्यासाठी महाराष्ट्र आणि गुजरात सीमेलगत दादरा आणि नगर हवेली ह्या केंद्र शासीत प्रदेशाची निवड केली आहे. या प्रदेशातील प्रामुख्याने वारली व कोकणी बोलीभाषेतील मौखीक परंपरा केंद्रस्थानी ठेण्यात आली आहे. प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ ४९१ चौ .मीटर इतके आहे .की . संपूर्ण दादरा आणि नगर हवेलीमध्ये एकूण २० ग्रामपंचायती आहेतगावे असून अनेक ७२ ग्रामपंचायती अंतर्गत २० या . पाडे आहेतप्रस्तुत संशोधन विषयासाठी खानवेल . व मांदोनी या दोन गावातील चार पाड्यांची निवड तथ्य संकलनासाठी करण्यात आली होती. सदर तथ्य संकलनासाठी जी दोन गावातील चार पाड्यांची निवड ही असंभाव्यता -

) नमुना निवडSnowball Sampling(पद्धतीने केली आहे तर या .दोन गावातील चार पाड्यांची आणि व्यष्टींची निवड सोईस्कर नमूना पद्धतीने निवड केली आहे. मौखिक परंपरेतील अनुभव कथनांच्या माध्यमातून तथ्य संकलन व विश्लेषण करण्यासाठी गुणात्मक पद्धतीशास्त्राचा अवलंब केला जाणार आहेगुणात्मक संशोधन पद्धती ही सर्व अंगाने . अनुभव घेण्यास मुक्त आहेतसेच संमिश्र व्यवस्था म्हणून एका .त्यामुळे वास्तव जगाच्या स्थितीचा अभ्यास केला जातो . गुणात्मक संशोधनात सांख्यिकीय .भागाचा अभ्यास न करता सर्व घटनेला आकलन करण्याचा प्रयत्न केला जातो माहीतीपेक्षा शाब्दिक विश्लेषणाला अधिक महत्व असते. वारली व कोकणी समुदायातील सांस्कृतिक समारंभातील परांपरिक गाणी व कथा तथ्य विश्लेषनासाठी घेतली आहेत. यात विवाह, मृत्यू, शेतीच्या कामाच्या वेळी गायली जाणारी गाणी तसेच स्त्रीयांनी नातेसंबंधाची गायलेली गाणे इत्यादीमधून वारली व कोकणी समाजाचे प्रतिबिंब कशा पद्धतीने उमटते या संदर्भात विश्लेषण प्रस्तुत शोधांनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोतांमध्ये वारली व कोकणी बोलीभाषा बोलणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या असंरचित मुलाखती, गटचर्चा व सामूहिक संस्कृतिक कार्यक्रमाचे सहभागी निरीक्षण इत्यादींचा समावेश केला आहे. दुय्यम स्त्रोतांमध्ये वारली बोलीभाषेसंदर्भातील प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्याचा आधार घेणार घेतला आहे.

प्रमुख निष्कर्ष :

दादरा आणि नगर हवेलीमधील बोलीभाषा व मौखिक परंपरा येथील सामाजिक जीवनासाठी अधिक महत्वाची आहे. मौखिक परंपरेच्या माध्यमातून आपल्या सामाजिक जीवनाचा अर्थ व्यक्त केला जातो. मौखिक परंपरेच्या माध्यमातून स्वीकार, नकार, प्रेरणा, विद्रोह सामाजिक व नैसर्गिक जाणीव व्यक्त होत असतात. परंतु बदलत्या सामाजिक व्यवस्थेमुळे आणि जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे मौखिक परंपरा विरळ होत चालली आहे. त्यामुळे वारली व कोकणी समुदायाला आकलन करून घ्यायचे असेल तर प्रामुख्याने या समुदायाच्या मौखिक परंपरेतील विपुल साहित्याचे आशय विश्लेषण करणे क्रमप्राप्त ठरते. सदर शोधंनिबंधाचे उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून प्रत्यक्ष तथ्य संकलन करून काही प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

१. दादरा आणि नगर हवेलीमध्ये वारली व कोकणी ह्या दोन आदिवासी जमाती प्रामुख्याने अधिक लोकसंख्या असणाऱ्या आहेत. त्यामुळे या परदेशात सामाजिक व संस्कृतिक व्यवहारासाठी वारली व कोकणी बोलीभाषेचा वापर होतो. वारली आणि कोकणी भाषेत मौखिक परंपरेतील विपुल साहित्य आहे. ह्यात गाणी, म्हणी, कथा, वाक्याप्रचार इत्यादिचा समावेश आहे. परंतु वारली व कोकणी भाषेला लिपी नसल्यामुळे ह्या भाषा बोलणारांची संख्या कमी होत आहे. कारण पाठांतरची प्रक्रिया एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत नसल्याचे दिसून येते. याला महत्वाचे कारण म्हणजे जागतिकीकरणाच्या प्रवाहात बदलत जाणारी सामाजिक-सांस्कृतिक प्रतिष्ठा व आपल्या बोलीभाषे संदर्भात असलेली भाषिक मर्यादा. वारली व कोकणी जे शहरातील औद्योगिक क्षेत्रात कामासाठी जातात त्यांना आपल्या भाषेसंदर्भात कमतरतेची जाणीव होत असल्याचे लक्षात येते.

२. १९४७ साली भारत ब्रिटिश वसाहतवादी राजसत्तेपासून स्वतंत्र झाला. तेंव्हा अनेक छोटे-छोटे प्रदेश पोर्तिगीज वसाहतवादी राजसत्तेच्या नियंत्रणाखाली होते. यामध्ये मराठवाडा, गोवा, दमन, दिव, दादरा आणि नगर हवेली, जन्मू आणि कश्मीर इत्यादि. स्वातंत्र्य संग्रामातील जमुनी रामजी बरटा या जेष्ठ महिलेने स्व अनुभावातून दादरा नगर हवेलीच्या स्वतंत्रलढ्याचा इतिहास मांडताना संगितले की, गोवा मुक्तिसंग्राम झाल्यानंतर त्यातीलच काही कार्यकर्ते दादरा आणि नगर हवेली मुक्तिसंग्रामात सामील झाले. आणि २ ऑगस्ट १९६१ रोजी दादरा आणि नगर हवेली हा प्रदेश स्वतंत्र भारतात समाविष्ट करण्यात आला. तेंव्हा स्वातंत्र्य संग्रामातील कार्यकर्त्यांनी माहाराष्ट्र शासनाकडे विनंती केली की येथे माहाराष्ट्र राज्याची शासकीय व्यवस्था राबवावी परंतु तत्कालीन शासनाने कोणत्याही प्रकारे समंती दर्शवली नाही. त्यामुळे तत्कालीन गुजरात सरकारने ह्या प्रदेशमध्ये आपली प्रशासकीय व्यवस्था सुरू करण्यास तयारी दर्शविली. हा प्रदेश आदिवासी बहुल असल्यामुळे काही महिन्यांनंतर तत्कालीन भारत सरकारने दादरा आणि नगर हवेली हा प्रदेश एक स्वतंत्र केंद्रासाशीत प्रदेश म्हणून जाहीर केला. हा आदिवासी बहुल प्रदेश महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेलगत असून येथे प्रामुख्याने वारली, कोकणी, धोडिया, दुबळा, धोर कोळी इत्यादि आदिवासी समुदाय वास्तव्यास आहेत. तलासरी आणि जव्हार ह्या दोन तालुक्यातील आदिवासी समुद्याची संस्कृती आणि दादरा नगर हवेलीमद्धी संस्कृती पुर्णपणे भिन्न असलेली दिसून येते. गोविंद गारे (२०००) असे प्रतिपादन करतात की, आदिवासी म्हटले की सर्वच आदिवासी समुदाय एकाच चौकटीत बघणे चुकीचे आहे.

कारण जितक्या आदिवासी जमाती तितक्या बोलीभाषा व संस्कृती वेगळी. दादरा आणि नगर हवेलीमधील विवाह, मृत्यू, माहेर, सासर, निसर्ग. शेती, डोंगर, पाऊस, नातेसंबंध इत्यादि संदर्भात अनेक म्हणी, गाण्यांची रचना बघायला मिळते. या प्रदेशमध्ये सामाजिक-संस्कृतिक व्यवहारासाठी वारली व कोकणी बोलीभाषेचा वापर केला जातो. वारली व कोकणी बोलीभाषेत विपुल साहित्य मौखिक परंपरेने जतन करण्यात येते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक साहित्य पाठांतरच्या माध्यमातून हस्तांतरित केले जाते. हस्तांतरणाच्या प्रक्रिया विविध सामाजिक-सांस्कृतिक विधी, कार्यक्रमाच्या माध्यमातून होत असतात.

३. दादरा आणि नगर हवेलीमधील बोलीभाषेला लिपी नसल्यामुळे ह्या प्रदेशामध्ये प्रशासकीय कामकाजासाठी गुजराती व हिन्दी आणि पर्यायाने इंग्रजी या प्रमाण भाषांचा वापर सुरू करण्यात आला. प्रमाण भाषेच्या वापरामुळे परंपरेने चालत आलेली वारली व कोकणी भाषेतील मौखिक परंपरा विसरण्यास सुरुवात झाली. त्यामुळे येथील सामाजिक व सांस्कृतिक बदल झपाट्याने होण्यास सुरुवात झाली. एखादा समाज आपली भाषा सोडून देत असेल किंवा विसरून जात असेल तर त्या समाजाची संस्कृती संपते अशा आशयाची मांडणी अनेक अभ्यासकांनी केली आहे. वारली समुदायाच्या मौखिक परंपरेत वारली संस्कृतीचे दर्शन होते. कमळी नाकरे यांनी वारली मधील गाण्यांचे महत्व संगितले आहे. त्यांच्या मते, आम्ही बाया आमचे भाव गाण्यातून मांडत असतो. आमच मन मोकळं करण्यासाठी गाण उपयोगी पडत. *इकडून डोंगर मन तो तिकडून डोंगर मन तो विजलत जाय, डोंगर पेटला मन तो विजलत जाय विजल बत्ती, सासू मिळल तुला आईस सारखी मन विजलत जाय, सासरा मिळल तुला मन वीजलत जाय*... अशा स्वरुपाच्या गाण्यातून नवविवाहित मुलगी आपल्या आई-वडिलांना सासू सासऱ्याच्या स्वरुपात बघत असते. आपल्या आई-वडिलांची आठवण येत असेल तर आपल्या सासू-सासऱ्याच्या मायेच्या सावलीत तिने आपले मन मोकळे करावेत कारण माहेर दूर डोंगराच्या पलीकडे आहे अशा आशयाचे अनेक गाणे मौखिक परंपरेने एका पिढीने दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित केले आहेत. परंतु भ्रमणध्वनीच्या वाढत्या वापरामुळे परांपरिक गाणी पाठांतर करून जपली जात नसल्याचे अनेक स्त्रीयांनी संगितले आहे.

४. भुजंग मेश्राम (२०१४) युक्तिवाद करतात की, आदिवासींच्या प्रत्येक बोलीभाषेला स्वतंत्र व्याकरण आहे, ध्वनिशास्त्र आहे, शब्दभंडार आहे, फक्त प्रमाण भाषेसारखी मान्यता मिळत नाही. जगभरात आदिवासींच्या सृजन कथा, गाणी ज्या मौखिक परंपरेने कथन व पाठांतर करून आजवर जतन केल्या त्याचा आता विसर पडत चालला आहे. या युक्तिवादाचा विचार केल्या दादरा आणि नगर हवेलीमधील वारली व कोकणी भाषेची हीच आवस्था असल्याचे दिसून येते. याला महत्वाचे कारण म्हणजे जागतिकीकरणाचा प्रभाव आणि शिक्षण व्यवस्था. येथे डॅनियल अब्राम यांच्या भाषा संदर्भातील संशोधन-अभ्यासाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरतो. त्यांच्या मते, जी भाषा ती बोलणाऱ्या समाजास शिक्षण व व्यवसाय देऊ शकत नाही, तो समाज ती भाषा सोडून देण्याचा खटाटोप करू लागतो. या अभ्यासाचा विचार केल्यास दादरा आणि नगर हवेलीमधील सद्य परिस्थिति हीच आहे. येथील समाज आपली बोलीभाषा सोडून देण्याचा मार्गावर आहे. कारण येथील शिक्षण गुजराती, मराठी, हिन्दी आणि इंग्रजी माध्यमातून सुरू आहे. अर्थातच संपूर्ण अभ्यासक्रम हा महाराष्ट्र आणि गुजरातच्या सामाजिक सांस्कृतिक दृष्टीकोणातून तयार झालेला आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी आपल्या जीवनाला आणि शालेय अभ्यासक्रमाला जोडून घेण्यास तयार होत नाहीत. कुटुंबात एक भाषा आणि शाळेत दुसरी भाषा अशा आवस्थेत विद्यार्थी भाषेसंदर्भात गोंधळाच्या आवस्थेत सापडतो. अशा परिस्थिमध्ये शिक्षण व्यवस्थेने गृह भाषा म्हणून वारली आणि कोकणी भाषेतील जे मौखिक परंपरेने जपले आहे त्याचा समावेश अभ्यासक्रमात करणे आवश्यक आहे. कारण नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राथमिक शिक्षण मातृभाषेत दिले जावे असे संगितले आहे. परंतु जेथे वारली आणि कोकणी साहित्य लिखित स्वरुपात आणण्यासंदर्भातच नकारात्मकता असेल तर फक्त धोरणामध्ये सुधारणा करून चालणार नाही तर प्रत्यक्ष कृती होणे आवश्यक आहे, ज्यासाठी प्रशासकीय व राजकीय इच्छाशक्ती महत्वाची ठरते.

एकूणच वारली आणि कोकणी बोलीभाषेची मौखिक परंपरेतील साहित्य विपुल प्रमाणात आहे. परंतु जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे वाढते इंग्रजीचे व इतर प्रमाण भाषेचे महत्व त्यामुळे आदिवासी बोलीभाषा संपण्याच्या वाटेवर आहेत. इंटरनेट आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे पाठांतरची परंपरा जवळपास संपूष्ठात आली आहे. गणेश देवी असे प्रतिपादन करतात की, "जेंव्हा एखादी भाषा मरते तेंव्हा न भरता येणारी गोष्ट मरते." त्यामुळे

एखादी भाषा संपून जाने म्हणजे त्या समाजातील संस्कृती संपून जाने असा अर्थ निघतो. दादरा आणि नगर हवेलीमध्ये वारली आणि कोकणी भाषा नामशेष होत आहे. बोलीभाषा संवर्धन करणे हे आदिवासीच्या सामाजिक सांस्कृतिक जीवनासाठी महत्वाचे आहे. यासाठी अनेक पातल्यावर कृतीकार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. यात प्रामुख्याने ज्या लोकांकडे मौखिक परंपरेचे विपुल साहित्य आहे. अशा लोकांकडे असलेले साहित्य संगृहीत करून जतन करणे व शिक्षण व्यवस्थेच्या माध्यमातून येणाऱ्या पिढीकडे सुपूर्द करणे आवश्यक आहे.

संदर्भसूची

१. Abbi, Anvita. (2012). 'Declining Adivasi Knowledge Systems and Killing of Linguistic Diversity', in Nathan. Dev and Xaxa, V. (eds.): *Social Exclusion and Adverse Inclusion Development and Deprivation of Adivasis in India*. (Pp 188-199). New Delhi: OXFORD University Press.

२. Devy, G. (2016). '*The Languages of Gujarat, Diu & Daman and Dadra & nagar Haveli.*' In The People's Linguistic Survey of India, Vol. 9, Part Three, Hindi Version. Orient Blackswan.

३. Perks, R. and Thomsan, A. (eds). (2006). *The Oral History Reader.* London: Routledge.

४. Everett D. L. and Other (2012). *Linguistic Fieldwork: A Student Guide.* Cambridge: Cambridge University Press.

५. Finnegan, R. How Oral Is Oral Literature? *Bulletin of the School of Oriental and African Studies.* University of London, 1974, Vol. 37, No. 1, In Memory of W. H. Whiteley (1974), pp. 52-64 (Accessed 02/05/2021) https://www.jstor.org/stable/614104

६. Cicourel, A. V. (1982) Review: Constructivism versus Innatism in Theories of Language and Learning. American Sociological Association, 1982, Vol. 11, No. 5 (Sep. 1982) PP. 526-528 (Accessed 10/03/2023) https://www.jstor.org/stable/2068396

७. कर्वे, इ. (२०१६). *आमची संस्कृती*, पुणे, देशमुख आणि कंपनी (पब्लिशर्स)

८. गारे, गो. 2000. *आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ*, पुणे, सुगावा प्रकाशन,

९. देवी, ग. (२०१९). *आदिवासी बोलीभाषेचे अस्तित्व आणि आव्हाने.* आपले वाङ्मय वृत्त, अंक तिसरा, एप्रिल-मे २०१९.

१०. देवी, ग. (2018). *त्रिज्या*, पुणे, पद्मगंधा प्रकाशन.

११. देवी, ग. (अनू.- किरण शाह) (२०२०). *संवाद*, पुणे, पद्मगंधा प्रकाशन.

१२. शिलेदार प्र. (संपा) भुजंग मेश्राम (२०१४). आदिवासी साहित्य आणि अस्मितावेध. लोक लोकवाङ्मय गृह, मुंबई.

१३. वरखडे र. (संपा) २०१४. भाषावार प्रांतरचना आणि मराठी काही परिप्रेक्ष्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

***मोब. नं. ९७३०५८६२१४**

***

बदलती खाद्यसंस्कृती, आरोग्य आणि पर्यावरण

***प्रा. निकम स्वप्नाली मोहन**
****प्रा. कांबळे दिपाली बाळकृष्ण**

घोषवारा

आपण जो आहार घेतो त्याचा थेट परिणाम आपल्या शरिरावर होत असतो. जो आहार आपण घेतो त्या आहारामुळे आपला शारीरिक व बौद्धिक विकास होत असतो. आपला स्वभाव हा देखील आपल्या आहारावर अवलंबून असतो. आहार जर योग्य नसेल तर आपले शरीर व्याधीग्रस्त व्हायला वेळ लागत नाही. आणि ही व्याधी एका रात्रीत होत नसून त्याला आपला आहार कारणीभूत असतो. असं म्हटलं जातं की महाराष्ट्रातील आहार हा सर्वार्थाने परिपूर्ण आहार आहे. भाजी, पोळी, दूध, अंडी इत्यादी पदार्थ परिपूर्ण आहार म्हणून समजले जातात. परंतु आज या पदार्थांची जागा वेस्टर्न फुडणे घेतली आहे. आजची तरुण पिढी पूर्णतः या वेस्टर्न फुडच्या आहारी गेलेली आहे. त्याचे दुरगामी परिणाम या तरुण पिढीच्या शरीरावर होत असतात. चायनीज, इटालियन फूड असे पदार्थ सर्रासपणे आपल्याला मार्केटमध्ये मिळत असतात. आपला पारंपारिक आहार घेण्याऐवजी कॉलेज तरुण-तरुणी, शालेय विद्यार्थी हे पदार्थ सर्रासपणे खात असतात. पण त्याचे होणारे परिणाम लगेच लक्षात येत नाहीत. चायनीज मध्ये असणाऱ्या अजिनोमोटोचे शरीरावर फार भयंकर परिणाम होत असतात. अजिनोमोटो म्हणजेच मोनोसोडियम ग्लुटामेट होय. अजिनोमोटोच्या अतिसेवनामुळे स्मरणशक्ती व आकलन शक्तीवर परिणाम होतो.त्याचप्रमाणे त्याने अटॅक येणे, गरगरणे यांसारख्या समस्या निर्माण होतात. ही जी बदलती खाद्य संस्कृती आहे जिला आपण फास्ट फूड म्हणतो त्यामुळे आजची तरुण पिढी व्याधीग्रस्त होताना दिसते. लहान वयात हार्ट अटॅक येणे, मधुमेह, बीपी, स्थूलत्व येणे अशा महाभयंकर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शिवाय ही बदलती खाद्य संस्कृती पर्यावरणासही हानिकारक आहे. हे फास्ट फूड खाण्यासाठी प्लास्टिक बाउल, प्लास्टिक ग्लासेस, प्लास्टिक चमचे यांचा वापर केला जातो. प्लास्टिक बंदी असतानाही प्लास्टिकचा राजरोसपणे वापर केला जातो. त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावली जात नाही. हे वेस्ट मटेरियल रस्त्याच्याकडेने कचराकुंडीत जसेच्या तसे टाकले जाते. त्यामुळे प्लास्टिक कचऱ्यामध्ये वाढ होत आहे. प्लास्टिकचे विघटन होत नसल्यामुळे हे प्लास्टिक मुके जनावरे खातात. त्यामुळे त्या बिचाऱ्या मुक्या प्राण्यांच्या जीवालाही धोका निर्माण होत आहे. अस्वच्छतेमुळे रोगराईला आयतेच निमंत्रण मिळत असून पर्यायाने पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. थोडक्यात काय तर बदलती खाद्य संस्कृती आजच्या तरुण पिढीला धोकादायकच ठरत आहे.

प्रस्तावना

गेल्या दहा पंधरा वर्षापासून आपले खाद्यसंस्कृतीमध्ये बराच बदल घडवून आला आहे. बऱ्याचशा खाद्यपदार्थांनी बाहेरच्या देशातून, राज्यातून आपल्या देशात प्रवेश केला आहे. आणि आपली पारंपारिक खाद्यसंस्कृती पूर्णतः बदलून गेली आहे. आपल्या पारंपारिक खाद्य संस्कृतीचा चेहरा मोहरा पारच बदलून गेला आहे. वेगवेगळे हॉटेल्स, ढाबे पूर्ण भारतभर पसरले आहेत. उत्तर भारताची ढाबा संस्कृती पूर्ण देशभर पसरली आहे. फास्ट फूडचे चलन मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे. त्यामध्ये चायनीज, पिझ्झा, बर्गर, इटालियन फूड यांसारख्या पदार्थाचा समावेश होतो. छोट्या छोट्या गाड्यांवर हे पदार्थ सहजपणे उपलब्ध होतात. अगदी कमीत कमी किमतीमध्ये हे फास्ट फूड उपलब्ध होतात. मॅगीसारखे दोन मिनिटांमध्ये तयार होणारे नूडल्स अगदी लहान मुलांपासून तरुणांपर्यंत परिचित आहेत. तसेच बटाट्याचे वेफर्स, केळीचे वेफर्स सहजपणे बाजारात उपलब्ध होत आहेत. ब्रेड, पाव यांसारखे सँडविचरूप आपल्याला पाहायला मिळत आहे. भारतातील घराघरात हे पदार्थ तयार होऊ लागले आहेत. गूगल, युट्युब यांसारख्या संपर्कमाध्यमांद्वारे घरातील स्त्रिया हे पाश्चिमात्य पदार्थ बनवायला शिकल्या आहेत. हे पटकन बनणारे पदार्थ या स्त्रिया आपल्या मुलांना खाऊ घालत आहेत. केवळ कष्ट पडायला नकोत म्हणून मॅगी, सँडविच यांसारखे पदार्थ या स्त्रिया आपल्या मुलांच्या टिफिनमध्ये देत आहेत.

बऱ्याच स्त्रिया या नोकरदार वर्गातील आहेत. नोकरीसाठी त्यांना धावाधाव करावे लागते. साहजिकच त्यामुळे त्यांना स्वयंपाकासाठी फार कमी वेळ मिळतो. त्यामुळे कदाचित त्या स्त्रिया शॉर्टकटमध्ये आपल्या मुलांसाठी पदार्थ बनविताना दिसतात. यामध्ये चायनीज, नूडल्स, ब्रेड बटर, भेळ, सँडविच यांचा समावेश असतो. त्यामुळे पुढे जाऊन हिच

मुले फास्ट फूडच्या जास्त आहारी जातात. भारतातील पारंपारिक आहार त्यांना नकोसा वाटतो. त्यामुळे पाश्चिमात्य पदार्थ खाणे ते जास्त पसंत करतात. हे पदार्थ खाऊन आपण काहीतरी वेगळे करत आहोत हि भावना त्यांच्यामध्ये दाटून येते. पुढे हीच त्यांची संस्कृती बनते.

हल्ली आपण पाहत आहोत की आजची तरुण पिढी असे पदार्थ खाऊन त्यांचे फोटो फेसबुक, व्हाट्सअप यांसारख्या संपर्कमाध्यमांवर टाकतात. त्यातून त्यांना वेगळाच आनंद मिळतो. हि त्यांना फॅशन वाटत असते. परंतु या सगळ्यांचा त्यांच्या आरोग्यावर काय परिणाम होत असेल याचा कोणी जास्त विचार करीत नाही. हे पाश्चिमात्य पदार्थ शरीरासाठी किती हानिकारक आहेत त्याचा जरासाही विचार न करता त्यांचे सेवन चालू आहे. फास्ट फूडचा मानवी आरोग्यावर आणि त्याचप्रमाणे पर्यावरणावर काय परिणाम होतो हे शोधणे हाच या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे

१) बदलत्या खाद्य संस्कृतीमुळे मनुष्याच्या शरीरावर होणाऱ्या दुष्परिणामांचा अभ्यास करणे.

२) युवा पिढीतील पारंपरिक आणि पाश्चिमात्य आहाराचा अभ्यास करणे

३) घन कचऱ्याचे विघटन आणि योग्य विल्हेवाट लावण्यासाठी उपाययोजनांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती आणि संशोधन समस्या

संशोधन पद्धती :- प्रस्तुत अभ्यासासाठी अन्वेषणात्मक संशोधन पद्धतीद्वारे या संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे. संशोधनासाठी लागणारा कालावधी, श्रम व वेळ या सर्व बाबींचा विचार करून या गैरसंभाव्यता पद्धतीचा अवलंब केला आहे.अभ्यासाची उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून मुलाखत अनुसुचीच्या सहाय्याने प्राथमिक स्वरूपाची माहिती संकलित करण्यात आली आहे.

संशोधन समस्या :- बदलती खाद्य संस्कृती आरोग्य आणि पर्यावरण हे या प्रकल्पाचे शीर्षक आहे.

समस्या सूत्रण :- भारतातील बदलती खाद्यसंस्कृती, त्यामुळे मानवी आरोग्यावर होणारा परिणाम, त्याचप्रमाणे पर्यावरणावर होणारा परिणाम इत्यादींचा शोध घेणे हे प्रस्तुत अभ्यासासाठी समस्या आहे.

अवलंबलेली संशोधन पद्धती:-

संशोधन क्षेत्र प्रस्तुत अभ्यासासाठी सातारा मधील काही कॉलेजची निवड करण्यात आली आहे. नमुना निवड पद्धतीप्रमाणे या कॉलेजची हेतूत: निवड केली.या पद्धतीद्वारे १५ विद्यार्थी विद्यार्थिनींची मुलाखत घेतली गेली.त्यांना त्यांच्या आहाराच्या आवडी-निवडीविषयी प्रश्न विचारण्यात आले. उत्तरदात्यांची निवड, संशोधनासाठी उपलब्ध श्रम आणि वेळ या सर्व बाबींचा विचार करून अपघाती नमुना निवड या तंत्राचा वापर करून केली आहे.

माहिती संकलनाची तंत्रे :-

मुलाखत अनुसूची अभ्यासाची उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून प्राथमिक स्वरूपाची माहिती संकलित करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार केली. याच मुलाखत अनुसूचीचा वापर करून 15 उत्तरदात्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या त्याचप्रमाणे गुगल, यूट्यूब पिनटरेस्ट यांसारख्या दुय्यम स्त्रोतामधून देखील माहिती संकलित करण्यात आली.

तथ्य संकलन :- तथ्य संकलनासाठी व्यक्तिगत निरीक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

अनौपचारिक मुलाखती :- कॉलेजमधील युवा तरुण-तरुणी, शाळेतील विद्यार्थी इ. उत्तरदात्यांच्या अनौपचारिक पद्धतीने मुलाखाती घेतल्या .

माहितीचे उगम स्त्रोत

प्राथमिक माहिती स्त्रोत:- स्वतः कॉलेजमधील तरुण-तरुणी, विद्यार्थ्यांना भेटून निरीक्षणे, मुलाखत, अनुसुचीच्या सहाय्याने मिळवलेली माहिती तसेच छायाचित्राद्वारे मिळवलेली माहिती इ .

दुय्यम स्त्रोत:- मासिके, पुस्तिका, नियतकालिके, इंटरनेट इ.

भारतीय पारंपरिक आहार

असं म्हणतात की भारतीय आहार हा सर्वांगाने परिपूर्ण आहार आहे. भाजी, पोळी दूध, अंडी, भात हा आपला परिपूर्ण आहार आहे. भारतामध्ये विविधता आढळून येते, ती विविधता खाद्यपदार्थांमध्ये दिसून येते. भारतीय पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या सर्व क्षेत्रांमध्ये आहार हा एकमेकांपासून फार वेगळा आहे. आणि हेच भारतीय आहाराला एक वेगळे रूप देत आहे. भारतीय भोजनाची एक वेगळीच विशिष्टता आहे. भारतीय आहार सर्व देशांमध्ये लोकप्रिय आहार आहे. वेगवेगळ्या देशांमध्ये भारतीय आहाराचे निरनिराळे हॉटेल्स दिसून येतात. त्यातील त्यात महाराष्ट्रीयन आहार सर्व दूर प्रसिद्ध आहे. चपाती, भाकरी, कालवण, भात, कडधान्य, मांसाहारी पदार्थ इत्यादींपासून युक्त असा महाराष्ट्रीयन आहार आहे. हा आहार आपल्या शरीराला परिपूर्ण असा आहे. भारतीय आमटीला तर 5000 वर्षाचा इतिहास आहे. त्याचप्रमाणे पुरणपोळी हा पदार्थ महाराष्ट्राची शान आहे. गुळ, हरभऱ्याची डाळ, गव्हाचे कणीक इत्यादींपासून पुरणपोळी बनवली जाते. प्रत्येक सणासुदीला ही पुरणपोळी प्रचंड आनंदाने व आवडीने घरोघरी बनवली जाते. पुरणपोळी तसेच इतर सर्व पदार्थ आपल्या शरीरास पोषक आहेत. आपण जो आहार खातो. त्याचा परिणाम थेट आपल्या शरीरावर होत असतो. दक्षिण भारतात मासे, भात, रस्सा, सांबर इडली, डोसा यांसारखे पदार्थ खातात. हे पदार्थ देखील शरीराला पोषक तत्वे पुरवत असतात. आपला भारतीय आहार आपल्या शरीराला आवश्यक असणारे प्रथिने, कर्बोदके, स्निग्ध पदार्थ इ.घटक पुरवत असतात. त्यामुळे मानवी शरीराचे स्वास्थ्य टिकून राहते. महाराष्ट्राचा आहार चवदार आणि चौरस आहार आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. ज्या ठिकाणी सगळ्या प्रकारची फळे, धान्ये, कडधान्ये, तेलबिया यांचे उत्पादन घेतले जाते. त्यामुळे महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती समृद्ध झालेली आहे.वेगवेगळ्या प्रकारची लोणची, मतकुटे, भाजणीचे पदार्थ इत्यादी युक्त असा महाराष्ट्रीयन आहार चविष्ट असा झाला आहे. महाराष्ट्रमध्ये भातापेक्षा भाकरी खाण्याचे प्रमाण जास्त आहे. ज्वारीच्या, नाचणीच्या, तांदळाच्या भाकरी इथे खाल्ल्या जातात. अगदी आवडीने खाल्ल्या जातात. महाराष्ट्रमध्ये साधेपणाने बनविलेले पदार्थ खाल्ले जातात. महाराष्ट्रियन लोक अन्न हे पूर्णब्रह्म हे तत्व अगदी मनापासून पाळताना दिसून येतात. येथे अन्नाला ब्रह्मदेवा समान मानले जाते.

त्यामुळे जागतिक खाद्य संस्कृतीत भारताच सर्वात मोठे योगदान दिसून येत. एकूणच काय तर भारतीय पारंपरिक आहार हा एका परिपूर्ण वैज्ञानिक आणि पोषक अशा प्राचीन खाद्य संस्कृतीचा संवादक आहे. आणि याचा मला अभिमान वाटतो. ही आपली भारतीय खाद्यसंस्कृती जगासमोर आणणे मला आवश्यक वाटते.

बदलत्या खाद्य संस्कृतीचा आरोग्यावर होणारा परिणाम :

आरोग्य हा सामाजिक प्रगतीचा एक महत्त्वपूर्ण घटक मानला जातो. चांगल्या आरोग्याशिवाय मानवाची पर्यायाने समाजाची प्रगतीच होऊ शकत नाही. मानवाला जर प्रगतीच्या शिखरावर जायचे असेल, तर निकोप आरोग्याशिवाय पर्याय नाही. आरोग्य संपन्न समाज हवा असेल तर समाजातील प्रत्येक नागरिक हा सुदृढ असला पाहिजे. परंतु आता दैनंदिन खाण्यापिण्याच्या सवयी बदलत चालल्या आहेत. आपल्या पारंपारिक आहाराची जागा जंक फुडणे घेतलेली आहे.

आम्ही जेव्हा १५ उत्तरदात्यांची मुलाखत घेतली तेव्हा असे दिसून आले, की पंधरापैकी ८ पुरुष म्हणजेच ५३.३४% पुरुष हे जंक फुडचे सेवन करतात. एकूणच स्त्रियांपेक्षा पुरुष हे फास्ट फुडचे सेवन जास्त करताना दिसून येतात. सुमारे १०० ते ७०० रुपये महिना इतकी रक्कम हे तरुण बाहेरील पदार्थांवर खर्च करतात असे दिसून आले. आई-वडील जो पॉकेटमनी मुलांना देतात त्यातील सर्वात जास्त रक्कम हि मुले जंक फुड वर खर्च करतात.

या जंक फूड मुळे तरुण पिढीच्या शरीरावर भयावह परिणाम होतात. त्यामुळे शरीराच्या तक्रारी वाढत आहेत. आजच्या पुढारलेल्या युगात जंक फूड हि अपरिहार्य संस्कृतीत बनली आहे. युवा पिढी वाजवीपेक्षा जास्त महत्व फास्ट फूडला देत आहे. त्यामुळे असे स्पष्ट होते की युवापिढी शरीराला बिलकुल महत्त्व देत नाही. अती जंकफुडच्या सेवनामुळे युवा पिढीमध्ये स्थूलत्व, हृदयासंबंधीच्या तक्रारी, पोटदुखी, आतड्यांचे रोग, यांसारखे रोग उभारी घेऊ लागले आहेत. कधी-कधी या जंक फूड मुळे शरीरात मोठ्या प्रमाणात बिघाड होतो. जास्त प्रमाणात पित्ताचे प्रमाण वाढते. पित्तामुळे छातीमध्ये धडधड होणे, चक्कर येणे, उलट्या होणे, सर्वच शरीर दुखायला लागणे इत्यादी लक्षणे दिसून येतात. शेवटी नाहक त्या व्यक्तीला दवाखान्यात न्यायला लागते.

अन्नपदार्थाची गुणवत्ता पाहून आजच्या युवा पिढीने त्याचे सेवन केले पाहिजे. आहार आणि आरोग्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे निरोगी शरीरासाठी चांगला आहार घेणे अत्यावश्यक आहे. समतोल आहारामध्ये तृणधान्य, डाळी, हिरव्या पालेभाज्या, कंदमुळे, फळे, दूध, तेल, तूप, मासे, अंडे, गुळ इत्यादी परिपूर्ण पौष्टिक अन्नपदार्थाचा समावेश केला पाहिजे. पूर्वीच्या काळी लोक शारीरिक कष्टाचे काम करत होते त्यामुळे त्यांना जास्त आजार होत नव्हते. पण तरुण पिढी शारीरिक कष्टाची कामे कमी करते. त्यामुळे वेगवेगळ्या आजारांना बळी पडते. त्यामध्ये मधुमेह, लठ्ठपणा, हृदयविकार, मुळव्याध. बद्धकोष्ठता इत्यादींचा समावेश होतो. याला कारणीभूत बदलती खाद्यसंस्कृती आणि बदलती जीवनशैली आहे. आजचे लोक कोल्ड्रिंक्स व कॉफी जास्त पितात परंतु पाणी कमी पितात. शरीराला पाण्याची जास्त आवश्यकता असते. पाणी कमी पिल्यामुळे बद्धकौष्ठ्तेचा आजार जाणवतो.

अशा पद्धतीने बदलती खाद्यसंस्कृती ही तरुण पिढीच्या शरीरावर घातक परिणाम करीत आहे. तरुण पिढीने एकच गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ते म्हणजे "Health Is Wealth" म्हणजेच "आरोग्य हीच खरी संपत्ती".

बदलत्या खाद्य संस्कृतीचा पर्यावरणावर होणारा परिणाम :

बदलत्या खाद्यसंस्कृतीमुळे जसा मानवी पर्यावरणावर परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे पर्यावरणावरही परिणाम होत आहे. असे दिसून येते की, हॉटेलमध्ये किंवा फास्ट फूडच्या गाड्यांवर प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. तेव्हा तरुण-तरुणी जेव्हा हॉटेलमध्ये जेवणासाठी किंवा फास्ट फूडच्या गाड्यांवर खाण्यासाठी जातात तेव्हा त्यांना प्लास्टिकच्या बाऊलमध्ये किंवा डिशमध्ये खाण्यासाठी खाद्यपदार्थ दिले जातात. किंवा वेफर्स, शेंगदाणे, फुटाणे यांची प्लास्टिकबंद पाकीटे विकली जातात. त्याचप्रमाणे हॉटेलमधून जेव्हा घरी खाद्यपदार्थ पार्सल म्हणून दिले जातात, ते देखील प्लास्टिक मधून दिले जातात. हे प्लास्टिक व्यवस्थित विल्हेवाट न लावता तसेच पर्यावरणामध्ये फेकून दिले जाते. त्या प्लास्टिकचा पर्यावरणावर अत्यंत गंभीर परिणाम होत आहे. प्लास्टिकचे विघटन होत नाही त्यामुळे हे प्लास्टिक जसेच्या तसे वर्षानुवर्ष शिल्लक राहते. त्याचप्रमाणे हे प्लास्टिक मुकी जाणावरे खातात. त्याचा त्रास या बिचाऱ्या मुक्या प्राण्यांना भोगावा लागतो. भटकी कुत्री, गाईगुरे हे प्लास्टिक खातात त्यांचा अत्यंत धोकादायक परिणाम त्यांच्या शरीरावर होतो. परिणामी त्यांचा मृत्यूही होतो.

प्लॅस्टिक हे पर्यावरण प्रदूषणाचे मुख्य कारण आहे. प्लास्टिक बंदी असली तरी त्याचा वापर अजूनही थांबला नाही. प्लॅस्टिक हे गंभीर पर्यावरणीय कारण बनले आहे. हे प्लॅस्टिक विघटित होत नसल्यामुळे मातीत रुजून राहतात व मातेची सुपीकता कमी करतात. त्याचा कृषी उत्पन्नावर परिणाम होतो. कचराकुंडीमध्ये टाकल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकमुळे सार्वजनिक आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हे प्लॅस्टिक ड्रेनेजमध्ये जाऊन अडकते त्यामुळे ड्रेनेज ब्लॉकिंगचा मोठा प्रश्न उद्भवतो. आपण प्लास्टिकचे अस्तित्व मिटवू शकत नाही. प्लॅस्टिकचे विघटन होण्यासाठी ४००ते ५०० वर्षाचा कालावधी लागतो.

एक जबाबदार नागरिक म्हणून आपण प्लॅस्टिकचे दुष्परिणाम वेळीच जाणले पाहिजेत व प्लॅस्टिकला पर्यायी साधन शोधले पाहिजे, तरच प्लॅस्टिक मुक्त पर्यावरण होईल.

उपाययोजना :

आजच्या तरुण पिढीने आपली जीवनशैली बदलली पाहिजे. पारंपारिक आहाराचे महत्व जाणून त्याचे सेवन केले पाहिजे. वेस्टर्न पुढचे परिणाम जाणून घेतले पाहिजेत. त्यामुळे जे रोग होतात त्या परिणामांचा शरीरावर जो परिणाम होतो त्याची गांभीर्याने नोंद घेतली पाहिजे. आपला पारंपारिक सकस परिपूर्ण आहार त्याचे सेवन केले पाहिजे. जेवणामध्ये हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये, तृणधान्य, दूध, अंडी फळे, मांस, मासे, इ. चा समावेश केला पाहिजे, तर आणि तरच तंदुरुस्त युवा पिढी निर्माण होईल.

प्लॅस्टिकचा पर्यावरणावर दुष्परिणाम होतो म्हणून प्लॅस्टिकचा वापर टाळला पाहिजे. जेवढा प्लॅस्टिकचा पुनर्वापर होईल तेवढा करावा. प्लॅस्टिकला पर्यायी साधन शोधले पाहिजे. प्लॅस्टिक बॅग ऐवजी कापडी पिशव्या वापरण्यात याव्या, तरच पर्यावरण प्लॅस्टिक मुक्त होईल.

निष्कर्ष :

१. एकूणच असे दिसून आले की बदलत्या खाद्यसंस्कृतीचा युवा पिढीवर अधिक प्रभाव आहे.

२. आजची युवा पिढी ही पारंपारिक आहारापेक्षा वेस्टर्न किंवा म्हणजेच पाश्चिमात्य आहाराला अधिक महत्त्व देत आहे.

३. बदलत्या खाद्य संस्कृतीमुळे तरुण पिढीला कमी वयातच वेगवेगळ्या आजाराने ग्रासले आहे.

४. मधुमेह, स्थूलत्व, बद्धकोष्ठता, हृदयविकार, पोटाचे रोग इत्यादी रोगाने युवा पिढीला ग्रासले आहे.

५. प्लॅस्टिकबंदी असली तरी प्लॅस्टिकचा वापर राजरोसपणे चालूच आहे.

६. वाढत्या प्लॅस्टिकच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता नष्ट होऊन कृषी उत्पन्न कमी झाले आहे.

७. वाढत्या प्लॅस्टिकच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता नष्ट होऊन कृषी उत्पन्न कमी झाले आहे.

सारांश :

आहार जर योग्य नसेल तर आपले शरीर व्याधीग्रस्त व्हायला वेळ लागत नाही. भाजी, पोळी, दूध, अंडी इत्यादी पदार्थ परिपूर्ण आहार म्हणून समजले जातात. परंतु आज या पदार्थांची जागा वेस्टर्न फुडणे घेतली आहे. त्याचे दुरगामी परिणाम या तरुण पिढीच्या शरीरावर होत असतात. आपला पारंपारिक आहार घेण्याऐवजी कॉलेज तरुण-तरुणी, शालेय विद्यार्थी चायनीज, पिझ्झा, बर्गर, इटालियन फूड हे पदार्थ सर्रासपणे खात असतात. त्यामुळे असे स्पष्ट होते की युवापिढी शरीराला बिलकुल महत्त्व देत नाही. अती जंकफुडच्या सेवनामुळे युवा पिढीमध्ये स्थूलत्व, हृदयासंबंधीच्या तक्रारी, पोटदुखी, आतड्यांचे रोग, यांसारखे रोग उभारी घेऊ लागले आहेत. बदलत्या खाद्यसंस्कृतीमुळे जसा मानवी पर्यावरणावर परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे पर्यावरणावरही परिणाम होत आहे. असे दिसून येते की, हॉटेलमध्ये किंवा फास्ट फूडच्या गाड्यांवर प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचप्रमाणे हे प्लास्टिक मुकी जाणावरे खातात. त्याचा त्रास या बिचाऱ्या मुक्या प्राण्यांना भोगावा लागतो. भटकी कुत्री, गाईगुरे हे प्लास्टिक खातात त्यांचा अत्यंत धोकादायक परिणाम त्यांच्या शरीरावर होतो. परिणामी त्यांचा मृत्यूही होतो. एक जबाबदार नागरिक म्हणून आपण प्लॅस्टिकचे दुष्परिणाम वेळीच जाणले पाहिजेत व प्लॅस्टिकला पर्यायी साधन शोधले पाहिजे, तरच प्लॅस्टिक मुक्त पर्यावरण होईल.

संदर्भग्रंथ :

१) योजना मासिक (अंक ऑक्टोबर २०१२)

२) maharashtratimes.com

३) ncert.nic.in

4) आरोग्याचे समाजशास्त्र-(प्रा. डॉ.विजय मारूळकर, प्रा. डॉ. दयावती पाडळकर)

***सहाय्यक प्राध्यापक, मो. नं. ८८३०१०२६७०, मेल आयडी : nswapnali10@gmail.com**

****सहाय्यक प्राध्यापक, मो. नं. ९६०४०१४४८५, मेल आयडी : kambledipali455@gmail.com**

समाजशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (स्वायत्त) घटक महाविद्यालय,

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा.

***

जागतिकीकरण आणि भारतीय कुटूंबसंस्थेची दशा आणि दिशा

*दिलीप दामु कुमरे

प्रस्तावना

मानवाच्या सर्वच सामाजिक संस्थांमध्ये कुटूंबसंस्था ही एक आधारभूत व सर्वव्यापी सामाजिक संस्था आहे. सर्वच सामाजिक समुहात एक मूलभूत व प्राथमिक स्वरुपाचा कुटूंब हा एक सामाजिक समूह आहे. मानवी विकासाच्या सर्वच अवस्थांमध्ये कुटूंबाचे अस्तितव दिसून येते. मानवी समाजाच्या विकासाच्या टप्प्यातील पहिली अवस्था म्हणजे कुटूंब होय. मानवी समाजाचा इतिहास म्हणजेच कुटूंबाचा इतिहास होय. मानवी समाजाच्या अनेक स्थित्यंतरानंतरही तो अद्यापही टिकुन राहिला आहे. कुटूंबसंस्थेच्या निर्मितीमुळे समाजातील स्थैर्य व सातत्य टिकुन राहिले आहे. म्हणूनच कुटुंबाला सर्वच प्रकारच्या समाजात महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

संस्कृतीच्या सर्वच स्तरात मग ती प्रगत असो अथवा मागास, कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कुटुंब संघटन दिसुन येते. शारिरीक गरजा अथवा कामवासनांची पुर्तता या गरजांनी कुटुंबसंस्थेला जन्म दिला. कुटुंब हेच लैंगिक संबंध आणि अपत्य प्राप्तीचे नियमन करुन त्यांना सामाजिक मान्यता प्रदान करते. गर्भवती मातांची व नवजात अपत्यांची देखभाल करते. भावनात्मक घनिष्ठतेच्या वातावरणाची निर्मिती करुन मुलांचे पालन पोषण, सामाजिकरण आणि शिक्षणासाठी योगदान देतो. एवढेच नव्हे तर आपल्या कुटुंब सदस्यांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय गरजांच्या पूर्ततेसाठी योगदान देते. कुटूंब हे मानव जातीचे आत्मसंरक्षण, वा संवर्धन आणि जातीय जीवनाची निरंतरता कायम ठेवण्याचे प्रमुख साधन आहे. जन्म आणि मृत्यू हया दोन विरोधी टोकांच्या अवस्थांचे समन्वय कुटूंबातच झाले आहे. मनुष्याचा जन्म, विकास व सामाजिकरणाची सुरुवात कुटूंबातच होते. कुटुंबाचे विकसित स्वरुप म्हणजे संपूर्ण मानवजात असे आपण म्हणतो.

आप्तसंबंध हा कुटूंबाचा एकमेव आधार आहे. त्यामुळे माता–पिता व त्यांची अपत्य यांच्यामध्ये रक्ताचे नाते असल्यामुळे या सर्वांचा मिळून जो समूह होतो त्यालाच कुटूंब असे म्हणतात. डॉ.डी.एन.मुजूमदार यांच्या मते, एका निवासात राहणाऱ्या आणि परस्पर नाते संबंधानी बध्द असलेल्या व पारंस्पारिक कर्तव्यपूर्ती, हितसंबंध तसेच स्थानियता या आधारावरुन आम्ही सर्व एक आहोत अशी सजायतेची भावना निर्माण होणाऱ्या सदृष्य समुहाला कुटूंब असे म्हणतात.

वरील विवेचनावरुन कुटूंबाचा अर्थ विषद होतो. कुटूंब तयार होण्यासाठी स्त्री–पुरुष या दोघांचीही आवश्यकता असते. समाजाच्या नियमानुसार विवाह करुन त्यांनी एकत्र राहणे अभिप्रेत असते. ते दोघेही स्वत:चे कुटूंब तयार करतात. कालांतराने या दोघांच्या शारिरीक संबंधामुळे त्यांना मुले होतात. पाश्चिमात्य समाजात केवळ पती–पत्नी एकत्र राहतात. परंतु भारतीय समाजात पती–पत्नी, मुले व विशेषत: पती स्वत:च्या वृध्द आई–वडीलांची देखील देखभाल करतात. जुने जोडपे नवीन जोडप्यासोबत एकत्रपणे राहत असतात. ग्रामीण कुटूंब आजतागायत संयुक्त स्वरुपाचेच होते. डॉ.इरावती कर्वे यांच्या मते, एक संयुक्त कुटूंब अशा व्यक्तींचा समुह आहे की, जे एकाच घरात राहतात. एकाच चुलीवर शिजलेले अन्न ग्रहण करतात जे सामान्य संपत्तीचे अधिकारी असतात. जे सामान्य पुजेत भाग घेतात तथा ते परस्पर एक दुसऱ्यांशी विशिष्ट नात्यांनी संबंधीत असतात. त्री.ना.अत्रे यांच्या मते, ग्रामव्यवस्थेचा वरवर विचार केला तर एकत्र कुटूंब व्यवस्थेची आठवण झाल्यावाचून राहत नाही. एकत्र कुटूंबातील बायका, मुले व बहुतेक माणसेसुध्दा जर अंग मोडून काम करणारी, आजे–दुजे न पाहणारी, एक दिलाची शहाणी व दक्ष असली तर एकत्र कुटूंब व्यवस्थेसारखी व्यक्तीचे. त्यांनी बनविलेल्या कुटूंबाचे व एकंदर समाजाचे हित साधणारी दुसरी संस्था क्वचितच दाखविता येईल.

हिंदूच्या सामाजिक संरचनेच्या परिपोषणाकरीता स्वयंपूर्ण ग्रामीण समुदाय, जातीव्यवस्था तसेच संयुक्त कुटूंबासारख्या सामाजिक संस्था आधारभूत आहेत. भारतामध्ये कुटूंब व्यवस्थेच्या बाबतीत अशी एक सामान्य धारणा आहे की, भारतीय कुटूंब आज सुध्दा तिन पिढ्यांचे सहनिवासी सदस्यावर आधारित संयुक्त व्यवस्था आहे.

भारतीय कुटूंब व्यवस्था एकत्र किंवा संयुक्त प्रकारची होती व ती प्राचीन काळापासून अगदी अलिकडच्या काळापर्यंत संयुक्त स्वरुपाची राहिली आहे असे म्हणता येईल. परंतु २० व्या शतकात जागतिकीकरण व औद्योगीक प्रगती, शहरांची वाढ, दहणवळण व शिक्षण यांच्या सोयींची उपलबधता राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याची जाणिव यामुळे जीवनाचे संदर्भ बदलले. कौटूंबिक व्यवसाय मागे पडले. मालमत्तेच्या विभाजनामुळे जमिनीचे पिढ्यानपिढ्या वाटप होत राहिले व अगदी अपुऱ्या जमीनीवर शेती करणे अवघड होवू लागले. जागतिकीकरणाच्या रेटयामुळे तर त्यात अधिकच भर पडली व संयुक्त कुटूंबाची जागा आता विभक्त कुटूंबाने घेतली आहे.

संशोधनाचा उद्देश:—

१) कुटूंबसंस्था व जागतिकीकरण हया संकल्पना स्पष्ट करणे.

२) जागतिकीकरणाचा भारतीय कुटूंब संस्थेवर पडलेला प्रभाव स्पष्ट करणे.

३) कुटूंबसंस्थेवर जागतिकीकरण व प्रभाव टाकणाऱ्या इतर घटकांचा आढावा घेणे.

४) जागतिकीकरणाचा ग्रामीण व नागरी कुटूंबावर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.

५) जागतिकीकरणाचा भारतीय कुटूंब संस्थेवर पडलेल्या प्रभावाची दशा व दिशा ठरविणे.

संशोधनाची गृहितके:

१) जागतिकीकरणाचा भारतीय परंपरागत कुटूंब संस्थेवर प्रभाव पडत आहे.

२) जागतिकीकरण संयुक्त व केंद्र कुटूंबावर विपरीत परिणाम करीत आहे.

३) भारतीय समाजाच्या परंपरागत जीवन पध्दतीला जागतिकीकरणामुळे तडा जात आहे.

४) जागतिकीकरणाच्या प्रभावाने नागरी व ग्रामीण समुदायातील जीवनमानातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे.

५) जागतिकीकरणाचा भारतीय जाती व्यवस्था व धर्म व्यवस्थेवर प्रभाव पडत आहे.

जागतिकीकरणाची संकल्पना:

जागतिकीकरण ही संकल्पना आज केवळ आर्थिक घडामोडी पुरतीच मर्यादित राहिली नाही तर संपूर्ण जग एकच विशाल बाजारपेठ गृहित धरुन राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, कौटूंबिक, जीवशास्त्रीय, तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात वैचारिक देवाण घेवाण असे स्वरुप प्राप्त झाले आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया आता भारतात आधुनिक युगात सुरु झालेल्या आर्थिक प्रगतीचा एक अविभाज्य अंग बनला आहे. विशेषत: बाहेरील देशाची प्रामुख्याने अमेरिका व युरोपातील मोठमोठ्या औद्योगिक प्रतिष्ठानांची कामे करुन घेण्यास भारतातील तज्ञांचा, भारतीय कंपन्यांकडून फार मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. याचे मुख्य कारण म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, भारतीय तज्ञांचे इंग्रजीवरील प्रभुत्व व सर्वात महत्वाचे म्हणजे आधुनिक तुलनेत कमी पैशात काम करणे होय. त्यामुळेच अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या भारताकडे आकर्षित होत आहेत. इ.स.१६०० मध्ये स्थापन झालेल्या ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचे वर्णन काहींनी पहीले बहुराष्ट्रीय निगम असे केले. आंतरराष्ट्रीय व्यापारात फार मोठी जोखीम असल्याने तसेच मोठ्या प्रमाणात गुंतवणूकीची व आर्थिक मदतीची गरज असल्याने ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने भांडवल उभारणी केली. जागतिकीकरणाच्या दृष्टीने पुढे टाकलेले ते एक पाऊल होते. बघता बघता १९व्या शतकात ही कंपनी जागतिक आर्थिक महासत्ता बनली.

सन १९४४ मध्ये अमेरिकेत झालेल्या बैठकीत ४४ देश उपस्थित होते. त्यातूनच संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बॅंक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी इत्यादी विविध संस्थांचा उदय झाला. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने आय.टी.ओ. ही संघटना स्थापन करण्याची संकल्पना समोर आली व त्यातूनच गॅट चा जन्म झाला. जागतिक नैसर्गिक साधन संपत्तीचा सर्व मानवजातीला उपयोग व्हावा आणि सर्वांना समान न्याय व मुक्त व्यापाराची संधी मिळावी हे गॅट कराराचे उद्दिष्ट होते. सन १९४७ मध्ये या करारावर २३ देशांनी स्वाक्षऱ्या केल्या. त्यामध्ये भारताचाही समावेश होता. सन १९९४ दरम्यान डकेल ने तयार केलेल्या कराराचा मसुदा विचारार्थ घेण्यात आला. यातूनच आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनांचा जन्म झाला. १ जानेवारी १९९५ रोजी भारतासह १२८ देशांनी या संघटनेला मान्यता दिली. गॅट करारामध्ये जी अपूर्णता होती ज्या उणिवा होत्या त्या आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेमध्ये भरुन काढण्यात आल्या. हया करारामुळे भारतातील तंत्रज्ञांनाला विश्वव्यापी क्षेत्र मिळून येथील बेकारी बऱ्याच प्रमाणात कमी होईल असे अनेकांचे मत असले तरी या करारामुळे भारताचा फायदा कितपत होईल हा वादाचाच मुद्दा आहे. अमर्त्य सेन यांच्या मते, जागतिकीकरण भारताला लाभदायक ठरु ाकते. जागतिकीकरणामुळेच भारतीय शेतकऱ्याला कार्यक्षम अवजारे मिळतील. दिर्घकाळ टिकणारी यंत्रसामुगी कमी किंमतीत उपलब्ध होवू शकेल आणि त्यातून त्याची क्षमता वाढून तो बरेच काही कमावू शकेल.

तज्ञांच्या मते गरीबीचा आणि व्यापार पध्दतीचा निश्चितपणे संबंध आहे. जेथे व्यापारवृध्दी झाली तेथे झपाट्याने आर्थिक प्रगती झाली व गरिबी हटली, दरडोई उत्पन्न वाढले अर्थात हे सर्व मुक्त अर्थव्यवस्थेमुळे शक्य आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कुटूंबसंस्थेचे बदलते स्वरुप:—

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कुटूंब संस्थेचे बदलते स्वरुप पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. व्यक्तीवाद: आधुनिक नागरी कुटूंबात व्यक्तीवादाची भावना विशेष प्रभावित झालेली असते. कुटूंबाच्या इतर सभासदांच्या तुलनेत केवळ स्वत:च्या हिताला महत्व देण्याच्या मनोवृत्तीलाच व्यक्तीवाद असे म्हणतात. नागरी कुटूंबातील व्यक्ती पूर्णपणे व्यक्तीवादी असते तो स्वत:च आपल्या इच्छेचा मालक असतो. इच्छेप्रमाणेच स्वच्छंदी असतो. तो आपला स्वार्थ, इच्छा आणि महत्वकांक्षांना पूर्ण करण्यासाठी कोणत्याही माध्यमाचा उपयोग करण्यास तयार असतो. त्याच्यावर कोणाचेही अंकुश, दबाव व नियंत्रण चालत नाही त्यामुळे तो स्वत: निर्माण केलेल्या परिघामध्येच जगतो व मरतो सुध्दा.

२. मर्यादित आकार: जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून कुटूंबाचा आकार मर्यादित स्वरुपाचा व सिमीत झाला आहे. साधारणत: पती–पत्नी व त्यांची अविवाहीत मुले एवढेच सदस्य साधारणत: या कुटूंबात असतात. म्हणूनच अशा नागरी कुटूंबाला विभक्त कुटूंब किंवा केंद्र कुटूंब म्हणून ओळखले जाते. आधुनिक काळातील जागेची टंचाई व व्यक्तीवादी दृष्टीकोन यामुळे कुटूंबप्रमुख व्यक्ती आपल्या म्हाताऱ्या आई–वडीलांना किंवा अविवाहीत बहीण भावांना सोबत ठेवायला तयार नसतो. त्यामुळेच वृध्दाश्रमासारख्या दुय्यम संस्थांची निर्मिती आधुनिक समाजात दिसुन येते. पती–पत्नी व अविवाहीत मुले यांनाच केंद्रकुटूंब संबोधण्यात येते. यामुळेच मर्यादित आकार हेच आधुनिक काळातील कुटूंबाचे स्वरुप दिसुन येते.

३. कुटूंबाला मर्यादित महत्व: जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून कुटूंबातील महत्वाची कार्ये मर्यादित झाली आहेत. परंपरेने कुटूंबाची मानली जाणारी बरीच कौटूंबिक कार्ये कुटूंबबाहय संस्थाकडे हस्तांतरीत झालेली आहे जसे मुलांचे संगोपन करणे हे कुटूंब संस्थेचे कार्य आहे परंतु आजच्या धावपळीच्या जीवनात पती–पत्नी दोघेही आर्थाजनासाठी घराबाहेर पडत असलयामुळे पाळणाघर, शिशुसंस्कार केंद्र, बालक मंदीर या सारख्या दुय्यम संस्था बालकांचे संगोपन करण्याच्या कामात कुटूंबाला मदत करीत आहेत. शिक्षण, धार्मिक कार्य, मनोरंजनात्मक कार्य, पुर्वी कुटूंबच करीत असत परंतु आज कुटूंबाची ही कार्य दुय्यम संस्थाकडे हस्तांतरीत झाली आहेत. नागरी समुदायातील क्लब, सिनेमागृहे विविध मनोरंजनाची केंद्रे कुटूंबाच्या कार्यात सहाय्यक ठरत आहेत. उपहारगृहे, भोजनालय, कुटूंबाच्या कार्याचा भार कमी करीत आहेत. वृध्दाश्रमासारख्या संस्था केंद्र कुटूंबाचा भार कमी करीत आहेत. आधुनिक काळात कुटूंबातील अनेक कार्य कुटूंबबाह्य संस्थांकडे हस्तांतरीत झाल्यामुळे कुटूंबाचे महत्वच कमी झाल्याचे दिसुन येत आहे.

४. व्यवसायातील भिन्नता: व्यवसायीक भिन्नता हे आधुनिक कुटूंबाचे महत्वाचे वैशिष्टय आहे. ग्रामीण समुदायातील प्रत्येक कुटूंबाचा एक विशिष्ट व्यवसाय होता. कुटूंबातील सर्व सदस्य आपल्या परंपरागत व्यवसायात सहभागी होत असत. परंतु अशा विशिष्ट एकाच व्यवसायात आधुनिक कुटूंब दिसत नाहीत तर एकाच कुटूंबातील अनेक सदस्य वेगवेगळे व्यवसाय करतात. एकाच कुटूंबातील एक भाऊ शासकीय सेवेत असेल तर दुसरा भाऊ स्वतंत्र व्यवसाय करतो. वडील डॉक्टर असतील तर आई एखाद्या शाळेत शिक्षिका असेल. एकाच कुटूंबातील अनेक सदस्य वेगवेगळया व्यवसायात गुंतलेली असल्यामुळे त्यांची मानसिकता ही व्यवसायानुसार बनत असते. त्यामुळे व्यवसायिक भिन्नतेसोबतच मानसिक भिन्नतासुध्दा दिसुन येते. त्यामुळेच कुटूंबहिताच्या कोणत्याही मुद्यांवर एकमत होण्यास कठीण जाते.

५. स्त्री पुरुषांचा समान दर्जा: पारंपारिक समाजात जीवनाच्या विविध क्षेत्रात पुरुषी वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्यामुळेच पितृसत्ताक कुटूंब पध्दती सर्वत्र दिसुन येत होती परंतु आधुनिक काळात कुटूंबातील स्त्री आणि पुरुषांचा दर्जा समान दिसतो. आज स्त्रियांसुध्दा शिकल्या आहेत. चूल आणि मूल असे परंपरागत मर्यादित कार्यक्षेत्र तिचे राहिले नाही. पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात ती आपले आर्थिक योगदान देत आहे. स्त्रीयांसुध्दा नोकरी करतात. त्यामुळे त्यांना बरोबरीचा दर्जा प्राप्त झाला आहे. रोजगारांच्या संधीमुळे अनेक स्त्रिया आत्मनिर्भर झाल्या. कुटूंबाच्या निर्णय प्रक्रियेत तिच्या विचारांना महत्व प्राप्त झाले आहे. आतापर्यंत दुय्यम समजल्या जाणाऱ्या स्त्रीला आता समानतेचा दर्जा प्राप्त झाला आहे असे अनुभवास येते. पुर्वी संयुक्त कुटूंबात स्त्री ही पुरुषांची दासी होती ती आज तसी राहिली नाही. कुटूंबाच्या विविध विषयांवर आणि समस्यांवर आपले स्वतंत्र विचार आज ती मांडू शकते. एंडरसन यांच्या मते, नागरी कुटूंबातील स्त्रियांच्या संदर्भात पुढील गोष्टी विकसित झाल्या. १) मुली आपल्या आईवडीलांना सोडून त्यांचे बाहेर राहणे कोणतेही संकट निर्माण करीत नाही. २) पूर्वी सारखा विवाह हा कुटूंबाचा कार्य राहिला नसून ते वैयक्तिक बनले आहे. म्हणजेच मुलामुलींना आपले जीवनसाथी निवडण्याचे बरेच स्वातंत्र्य मिळाले आहे. मुलामुलींना आपले शिक्षण व व्यवसाय निवडण्याच्या संदर्भात निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे.

६. परंपरागत व्यवसायाचा ऱ्हास: परंपरागत संयुक्त कुटूंबात प्रत्येक कुटूंबाचा एक विशिष्ट व्यवसाय होता. या व्यवसायाचे प्रशिक्षण कुटूंबातील सदस्याला कुटूंबातूनच मिळत होते परंतु आज कुटूंबात परंपरागत विषयाचे शिक्षण दिले जात नाही. उलट

मुलांनी परंपरागत व्यवसायात गुंतून न राहता नवीन व्यवसायाकडे वळावे अशी आई–वडीलांची इच्छा असते. आजच्या स्पर्धेच्या जगात स्वत:चे अस्तित्व कायम टिकविण्यासाठी मुलांनी आधुनिक विशेषीत अशा व्यवसायात प्राविण्य मिळवावे, शिकुन उच्च दर्जाची नोकरी प्राप्त करावी असे प्रत्येक आई–वडीलांना वाटत असते व त्या दिशेने प्रयत्नही केले जातात. परंपरागत व्यवसायाचा कोणाकडूनही आग्रह धरला जात नाही.

७. कौटूंबिक संबंधात असंतुलन: कुटूंबाच्या सौख्यासाठी कुटूंब सभासदातील संबंध संतुलित असणे अतिशय गरजेचे असते. परंतु जागतिकीकरणाच्या प्रभावाने कुटूंबातील सर्व सदस्य कमी अधिक प्रमाणात व्यक्तीवादाने प्रभावित झाले आहे. प्रत्येकाचे व्यक्तीमत्व वेगळे आहेत. त्यांच्या आवडीनिवडी व जीवनविषयक दृष्टीकोन वेगवेगळे बनले आहे. त्यांच्यावर कुटूंब प्रमुखाचे पाहिजे त्या प्रमाणात नियंत्रण राहिले नाही. कुटूंबातील पती–पत्नी व मुले सर्व आपल्या इच्छेनुसार कार्य करु लागले. सर्व सदस्यांच्या स्वतंत्र विचाराच्या दृष्टीकोनामुळे व स्वतंत्र वर्तन व्यवहारामुळे कुटूंबातील सौख्याचे वातावरण संपुष्टात येत आहे म्हणूनच कौटूंबिक संबंध आज असंतुलन निर्माण झाले आहे.

८. कुटुंब सदस्यांच्या दिनचर्येतील भिन्नता: आधुनिक काळात कुटूंबातील प्रत्येक सदस्यांच्या दिनचर्येत भिन्नता निर्माण झाली आहे. प्रत्येकाच्या आपल्या कामाच्या वेळा वेगवेगळया आहेत. त्यानुसार त्यांच्या सवयी निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक सदस्य आपल्या वेळेनुसार जेवण व विश्रांती घेत असतो. संयुक्त कुटूंबासारखे सायंकाळचे जेवण एकत्र पंगतीने बसून करणे हे आज प्रत्येक कुटूंबात दिसून येत नाही. निदान जेवणाच्यावेळी तरी सर्व सदस्य एकत्र येतील असे आज सांगता येत नाही त्यामुळे कुटूंब हे केवळ उपभोग व विश्रांतीस्थान असे स्वरुप प्राप्त झाले आहे त्यांच्या दैनंदिन जीवनात बरेच अंतर निर्माण झाले आहे.

९. नातेवाईकांचे कमी महत्व: आधुनिक काळातील नागरी कुटूंबात नातेवाईकांचे महत्व दिवसेंदिवस कमी होतांना दिसते. आधुनिक पर्यावरणातील कुटूंब सदस्य सतत आपल्या कामात व्यस्त असतात तसेच घरातील जागेची कमतरता त्यामुळे घरी आलेल्या पाहूण्यांचा मान सन्मान त्यांच्या अपेक्षेप्रमाणे करता येणेही शक्य नाही. कामाच्या सततच्या व्यस्ततेमुळे त्यांच्याजवळ आदर सत्कारासाठी जास्तीचा वेळही नसतो तसेच नगरात उच्च प्रतीचे जीवन जगणाऱ्या व्यक्तीला गावातील साधेभोळे नातेवाईक घरी आल्यास आपली समाजातील प्रतिष्ठा कमकुवत होईल याचीही भिती असते त्यामुळे नातेवाईकांचे महत्व दिवसेंदिवस कमी होतांना दिसत आहे.

१०. मुलांच्या व्यक्तीमत्व विकासास महत्व: आधुनिक कुटूंबातील व्यक्ती फार जागृत आहेत त्यांना आपले अधिकार, कर्तव्य आणि उत्तरदायीत्वाची जाणिव आहे. त्यामुळे कुटूंबात मुलांची संख्या कमी होत आहे ते आपल्या कुटूंबातील अपत्य संख्या कमी करुन मुलांना योग्य नागरिक बनविण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. मुलांविषयी आई–वडीलांना विशेष प्रेम आहे. मुलांचे शिक्षण, स्वास्थ्य, सवयी, विकास, मनोरंजन इत्यादीबाबत विशेष लक्ष देत आहेत. मुलांचे व्यक्तीमत्व विकसित होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

११. सत्तेचे विकेंद्रीकरण: ग्रामीण संयुक्त कुटूंबात कुटूंब प्रमुखाकडे सत्तेचे केंद्रीकरण झालेले होते. कुटूंब प्रमुखाच्या आज्ञेचे पालन करणे सर्व सदस्यांना अनिवार्य होते तोच कुटूंबाचा सत्ताधीश होता. परंतु आधुनिक कुटूंबात अगदी वेगळी परिस्थिती निर्माण झाली आहे. कुटूंब प्रमुखांची अनिर्बध सत्ता आज राहिली नाही. प्रत्येक सदस्याला कुटूंबाच्या निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याचा अधिकार आहे. स्वत:च्या व कुटूंबाच्या संदर्भात अनेक निर्णय आज सदस्य घेतात. सर्व सदस्यांशी विचार विनीमय करुनच कुटूंब प्रमुख सर्वांच्या सल्ल्याने निर्णय घेत असतो. त्यामुळेच कुटूंबातील सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्याचे आज पहावयास मिळते.

१२. घटस्फोटाचे वाढते प्रमाण: आधुनिक कुटूंबात घटस्फोटाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते कारण आधुनिक काळात कुटूंबातील स्त्रिया सुशिक्षित, कर्तबगार व आर्थिकदृष्टया स्वावलंबी आहेत. त्यांच्या आवडीनिवडी, जीवन जगण्याच्या पध्दती इत्यादी स्वतंत्र स्वरुपाच्या आहेत. व्यक्तीवादाने प्रेरीत झालेल्या व आर्थिक दृष्टीने आत्मनिर्भर असणाऱ्या स्त्रिया पतीचे अत्याचार सहन करु शकत नाही. त्यांना पतीचे अत्याचार सहन करण्यापेक्षा घटस्फोट घेणे सोयीचे वाटू लागले आहे. आता आपण पुर्वीसारखी पतीची दासी राहिलो नाही ह्याची जाणिव तीला होत आहे. सोबतच कुटूंबात समाधानी नसलेल्या विवाहीत स्त्रियांना समुपदेशनाच्या माध्यमातून घटस्फोटासंबंधी सहज सल्ला मिळत आहे. या सर्व कारणामुळे नागरी कुटूंबात घटस्फोटाचे प्रमाण अधिक आहे.

१३. औपचारिक नातेसंबंध: आधुनिक कुटूंबातील सर्व सदस्य व्यक्तीवादाने प्रभावित झालेला आहे त्यामुळे ते विशेष भावनाप्रधान नाही. कामापुरता मामा या म्हणीप्रमाणे त्यांचे वर्तन असते. त्यांच्या वागण्या बोलण्यात कृत्रिमता दिसून येते. परंपरागत ग्रामीण कुटूंबात एकमेकांप्रती सेवा, त्याग, परोपकार ह्या गोष्टी दिसतात त्या आधुनिक नागरी कुटूंबात दिसून येत नाही. अनौपचारिक संबंधानी त्या बांधल्या नसतात. त्यामुळे त्यांच्या व्यवहारात दिखावूपणा व औपचारिक नातेसंबंध असतात.

१४. गतिशीलता: समाजाच्या एका स्थानावरुन दुसऱ्या स्थानावर जाण्याच्या प्रक्रियेला सामाजिक मतीशिलता असे म्हणतात. आधुनिक कुटूंबातील व्यक्ती भौतिकवादाने प्रेरित झालेले आहेत. त्यांच्या आर्थिक प्रेरणा फार तीव्र आहेत नवीन परिवर्तनाशी समायोजन करणे आणि नवीन आव्हानांना सामोरे जाणे या दृष्टीने आधुनिक नागरी व्यक्ती सहज तयार होतात. उच्चशिक्षण, तांत्रिक शिक्षण मिळविणे, नोकरीच्या संधी शोधणे, घरापासून दूर जायचे असले तरी आपले कुटूंब सोडून दूर जाण्याची त्यांची तयारी असते जी परंपरागत ग्रामीण कुटूंबात दिसून येत नाही त्यामुळे गतीशीलता हे एक आधुनिक कुटूंबाचे वैशिष्टय मानले जाते.

उपसंहार/निष्कर्ष:—

पती—पत्नी आणि त्यांची अविवाहीत मुले एवढेच सदस्य संख्या असणाऱ्या कुटूंबाला विभक्त किंवा केंद्र कुटूंब मानले जाते. विभक्त कुटूंबातील स्त्रियांसुध्दा आथर्जनासाठी घराबाहेर पडतात त्यामुळे कौटूंबिक निर्णय प्रक्रियेत मानाचे स्थान असते. या कुटूंबात कुटूंब प्रमुख आपली इच्छा आकांक्षा कुटुंब सभासदावर लादत नाहीत तर सभासदांच्या इच्छा आकांक्षाची कदर केली जाते.

समाजशास्त्रीय अध्ययनात विभक्त कुटूंब किंवा केंद्र कुटूंब ही संकल्पना पाश्चात्य देशातील कुटूंबाच्या अध्ययनातून विकसित झाली आहे व जागतिकीकरणाचा प्रभाव म्हणून भारतीय ग्रामापर्यंत पोहोचली आहे. लोकसंख्येची घनता, अनेक प्रकारचे व्यवसाय अणि व्यापार, विशेषीकरण, औद्योगिक उत्पादन, यांत्रिक सभ्यता व संस्कृती अवैयक्तिक संबंध, महतवकांक्षी व्यक्ती, असंख्य नागरी समस्या इत्यादी गोष्टी नागरी जीवनाच्या प्रतिक मानले आहे व त्यापासून आता ग्रामीण समाजसुध्दा अलिप्त राहू शकत नाही हे जरी खरे असले तरी कुटूंब या गटातील सर्व व्यक्ती परस्परांची काळजी घेतात. परस्परांना मदत करतात, परस्परांवर प्रेम करतात व एकमेकांविषयी आपुलकी दर्शवितात. आई—वडील मुलांचे संगोपन करतात त्यांना शिक्षण देतात. त्यांच्या आयुष्याला चांगली दिशा देण्याचा प्रयत्न करतात. मुलांचे लग्न झाले की तो पत्नीसह वेगळा राहतो. एका कुटूंबातून दुसरे कुटूंब निर्माण होते. नवीन जोडप्यांच्या प्रेमातून, शारिरीक, संबंधातून त्यांच्या कुटूंबाचा आकार वाढत जातो. याप्रमाणे जागतीकीकरणाचा प्रभाव कुटूंब व्यवस्थेवर झाल्याचे प्रत्ययास येते.

संदर्भग्रंथ सूची:

१) अत्रे, त्रि.ना. (१९६५), गावगाडा, वरदा बुक्स पुणे.
२) भांडारकर, पु.ल., वैद्य नि.स.(१९७९), भारतातील सामाजिक समस्या, पॉपुलर प्रकाशन मुंबई.
३) शरयू, अनंतराम, वडसे उमा (१९८७), भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉपुलर प्रकाशन मुंबई.
४) गोऱ्हे, निलम (२००१), समाज आणि महिला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
५) देसाई, ए.आर. (२००४), भारतीय ग्रामीण समाजशास्त्र, रावत पब्लीकेशन जयपूर.
६) कऱ्हाडे, डॉ.बी.एम. (२००५), ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड कं.पब्लिशर्स, महाल नागपूर.
७) खिवंसरा, मंगला (२००५), स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्राचा सहभाग, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.
८) आपटे, ज.शं. व रोडे, पुष्पा (२००८), भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
९) कऱ्हाडे, डॉ.बी.एम.(२०१२), समाजशास्त्र परिचय भाग—१, पिंपळापुरे ॲन्ड कं.पब्लिशर्स, महाल नागपूर.
१०) शर्मा, कविता (२०१२), स्त्री विकास की ऐतिहासिक रुपरेखा, रजत प्रकाशन, नई दिल्ली.
११) धर्माधिकारी, डॉ.ना.शे. — उच्चशिक्षण व मनुष्यबळ विकास, स्मरणिका, प्राचार्य महासंघाचे २८वे अधिवेशन, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर.

*सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर समाजास्त्र विभाग, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.

***

जागतिकीकरण आणि विकास

*डॉ.दामोदर दुधे

प्रस्ताविक :—

आज जागतिकीकरणाला झपाटयाने सुरूवात झालेली आहे. उदारीकरणाच्या दृष्टीने जे आर्थिक जागतिकीकरण येऊ घातले आहे किंवा आले आहे ते वेगळे आहे. जागतिकीकरणात राष्ट्रांना स्वावलंबी राहता येणार नाही. त्यांच्या सार्वभौमत्वाला कात्री लागणार. आयात निर्यात व्यापारावर राष्ट्रांची सरकारे आता बंधने घालू शकणार नाहीत. सर्व आंतरराष्ट्रीय व्यापार आता मुक्त बाजार पध्दतीने मागणी व पुरवठा या तत्वानुसार चालेल. भांडवल, वस्तूचे उत्पादन, तंत्रज्ञान सेवा सुविधा यामध्ये देशी व परदेशी असा भेदभाव केला जाणार नाही.

भांडवल कोणत्याही देशातून कोणत्याही देशात जाईल—येईल. कोठेही तयार झालेल्या वस्तू कोठेही विकल्या जातील. स्वादेशी ही संकल्पनाच कालबाहय ठरेल. डॉ. राम मनोहर लोहिया या थोर समाजवादयांचे स्वप्न होते की, जगात कोणत्याही माणसाला कोठेही मुक्तपणे फिरता यावे. नव्या जागतिकीकरणात हे स्वप्न साकार होणार नाही. भांडवल वस्तू सेवा तंत्रज्ञान यांना मुक्त प्रवेश दयावा लागेल. पण ऑस्ट्रेलियात लोकसंख्या कमी आहे. तेथे भारतीयांना येऊन राहू दया असे म्हटले तर मात्र चालणार नाही. जागतिकीकरणाची घोषणा करित असतांनाच अमेरीका, इंग्लंड, जपान, जर्मनी, फ्रान्स वगैरे विकसीत देशांनी त्यांचे व्हिसा देण्याचे धोरण खूप कडक केले आहे.

म्हणजे माणसाचे जागतिकीकरणात नको आहे सर्व मानव एक ही भावना नाही. तर पैसा जागतिक व्हावा हा आग्रह आहे. अमेरिकेतून अनिर्बंध भांडवल भारतात यावे, त्यांनी नफा कमवावा व तो अमेरिकेला अडचण न येता सहजपणे जावा म्हणजे जागतिकीकरण, पेट्रोलवाल्या देशांनी खळखळ न करता सर्व जगाला पेट्रोल दयावे, कच्चा माल असलेल्या देशांनी कच्चा माल दयावा. विकसीत देशांनी तयार केलेल्या वस्तू सर्व जगात, कोणताही अडथळा न आणता, विकता आल्या पाहिजेच म्हणजे जागतिकीकरण असा जागतिकीकरणाचा नवा अर्थ आहे.

जागतिकीकरणाचा अर्थ —

जागतिकीकरणाचा अर्थ असा आहे की, पुर्ण विश्वास एक केंद्रीय आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करणे, यात प्रामुख्याने सर्व राज्यातून आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करणे, यात प्रामुख्याने सर्व राज्यातुन आर्थिक क्षेत्राचे जागतिक स्वरूप निर्माण व्हावे असा प्रयत्न केला जातो हे एकीकरण मुखत्वे व्यापारी व आर्थिक प्रवाहाच्या माध्यमाने साध्य करायचे असते. एखादया राज्यात ज्या बाजार शक्ती कार्य करीत असतात त्यांनी आपल्या राष्ट्रीय सिमांचे उल्लंघन करून मुक्तपणे जागतिक क्षेत्रात प्रवेश करण्याची प्रक्रीया अभिप्रेत असते. जागतिक बाजार अर्थव्यवस्थेतील प्रतिस्पर्धा आणि श्रमविभाजनाच्या माध्यमाने कार्यकुशलतेला प्रोत्साहन करण्याचा प्रयत्न केला आहे.

विश्व व्यापाराचा अर्थ असा की, अधिक भांडवल, औद्योगिकरण व आयात, निर्यातीमध्ये सुलभतेने प्रवेश करता येईल अशी स्थिती निर्माण करणे. जागतिक राजकारणात श्रीमंत देश व आर्थिक उलाढाली करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संख्याविकसनशील देशात तेथील विदेश व्यापारावर घातलेले प्रतिबंध समाप्त करून त्यांना जागतिक बाजारपेढेचा हिस्सा बनविण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणतात जागतिकीकरणात संपूर्ण जगाला एक ग्लोबल व्हीलेज या दृष्टीने पाहिले जाते.

१) जागतिकीकरण पाण्याचा प्रश्न व ग्रामीण विकास :— स्वातंत्र्यानंतर दुष्काळी भागातील प्राथमिक शिक्षकांनी आपल्या फावल्या वेळात शेतीला वाहून घेतले. शेतीला ऊर्जितावस्था आणण्याचे अत्यंत महत्वाचे योगदान त्यांनी केल्याचे मी पाहिलेले आहे आणि अनुभवलेले आहे. गुंडेगावचे उदाहरण दिले तरी पुष्कळ आहे. काही दिवसापूर्वी या गावातील भापकर गुरूजींनी दहा किलोमिटर रस्ता श्रमदानाने करून गुंडेगाव—श्रीगोंदा हा एस.टी. मार्ग मोकळा करून दिला याच्या बातम्या वर्तमानपत्रात झळकल्या. या माणसाने कुठल्याही सरकारी मदतीचा आधार न घेता हे काम स्वत:च्या हिमतीवर पुर्ण केले आहे. या गावी अनेक प्राथमिक शिक्षकांनी अशाच अनेक उपक्रमांना वाहून घेतलेले आहे. परंतु प्रसिध्दीअभावी हे उपक्रम लोकांच्या पुढे आलेले नाहीत.

विनायकराव हराळ, त्यांचे तीन प्राथमिक शिक्षक बंधू आणि तीन शेतकरी बंधू यांनी पन्नास वर्षापूर्वी एकत्र आले ज्यावेळेला पाझर तलावाचे संकल्पनाही कुणाला माहित नव्हती. त्यावेळी स्वत:च्या हिंमतीवर पाझर तलावाचे काम रात्रदिवस

करून सुमारे पन्नास एकर क्षेत्र ओलीताखाली आणले. या गावी मी लहानपणापासून जात असे. लहान असतानाच हे वेडे धाडस आहे असे आम्हाला वाटत होते. सर्व प्राथमिक शिक्षक व इतर बंधू व त्यांचे कुटूंबिय शाळेनंतर, सुट्टीच्या काळात न थांबता लग्न न करण्याची प्रतिज्ञा घेतली. नोकरी सोडून या कामाला पूर्णवेळ वाहून घेतले होते. शिक्षणापेक्षाही हे काम महत्वाचे आहे याची जाणीव त्यांना झाल्यामुळे , चांगली नोकरी सोडून हालअपेष्टेचे जीवन जाणीवपुर्वक पत्करले. हे गुरूजी आजही हयात आहेत. हा पाझर तलाव पूर्ण व्हायला आणि जलसंधारणाची इतर कामे करायला या मंडळींना दहा वर्षाचा कालावधी खर्च करावा लागला. त्यानंतर त्यांना त्याची फळेही चाखायला मिळाली. आज मागील पिढीतील फक्त तीन म्हातारे उरलेले आहेत.

परंतु ते आज पूर्णपणे समाधानी आहेत. कारण वाटण्या होऊनही प्रत्येक घरी ट्रॅक्टर, फोन, टेलिव्हिजनसारख्या अत्याधुनिक सोयी उपलब्ध आहेत. पूर्वी झोपडीत राहणारे हे कुटूंब आज पक्की सिमेंट कॉक्रीटची घरे करून राहू शकत आहेत आणि मराठा पध्दतीप्रमाणे भरपुर खर्च करून आपल्या मुलीबाळींची लग्ने दिमाखदार पध्दतीने लावु शकत आहेत. याचे कारण त्यांच्या मागील पिढीने जलसंधारणाचे महत्व ओळखून नियोजन केले हेच होय. ग्रामीण भागात जागतिकीकरणाचा फायदा उपटायचा असेल तर पाण्याचे महत्व ओळखून स्वत:च्या हिमतीवर वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रयत्न व्हायला हवेत.

महाराष्ट्रामध्ये सोळा टक्के जमीन ओलीताखाली आहे. बर्वे कमिटीच्या अहवालाप्रमाणे किती प्रयत्न केला तरी महाराष्ट्रातील सिंचनाखालील क्षेत्र तीस टक्क्यापेक्षा जास्त वाढू शकत नाही. याचा अर्थ सुमारे सत्तर ते ऐंशी टक्के क्षेत्र जिराईत पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहणार आहे. या क्षेत्राची पाण्याची गरज दिवसेदिवस वाढणार आहे. आता प्रत्येक गावामध्ये अनेक स्वयंसेवी संस्थांनी जलसंधारणाची कामे हाती घेतली आहेत. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढायला मदत होऊ शकेल. परंतु दुसरीकडे दोनशे– तीनशे फुटांपर्यंत बोअरवेल घेण्याची स्पर्धा सुरू झालेली आहे. त्यामुळे तुला ना मला घाल कुत्र्याला, या अवस्थेप्रमाणे शेतकऱ्यांची नाजुक परिस्थिती निर्माण झालेली आहे. नको ती स्पर्धा सुरू होऊन आधीच बुडीत अवस्थेतील शेती बुडत्याचा पाय खोलात या पध्दतीने तोटयात जात आहे. याला वेळीच आवर घातला नाही तर शेती उजाड पडून शहराकडे धाव घेणाऱ्याची संख्या वाढणार आहे.

महाराष्ट्र सरकारने पाण्याचे महत्व ओळखून अनेक क्रांतीकारक योजना राबवलेल्या आहेत. राळेगणसिध्दीच्या पध्दतीने प्रत्येक गावात जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. ठिबक व तुषार सिंचनासाठी भरपूर सबसिडी देण्यात येत आहे. परंतु परदेशात आढळतात त्या गुणवत्तेचे साहित्य देशी कंपन्या तयार करत नसल्यामुळे हा आतबट्टयाचा व्यवहार ठरू लागला आहे. ठिबक आणि तुषार सिंचनाच्या नळया लोकांनी खुंटीला अडकवून ठेवलेल्या आहेत. दुधाने तोंड पोळल्यामुळे ताकसुध्दा लोक फुंकून प्यायला लागले आहेत. नवीन उपयुक्त तंत्रज्ञानावरील विश्वास उडत चालला आहे.

गेली पस्तीस वर्षे मी सतत शेतकऱ्यांना उपयुक्त ठरतील, त्यांचे श्रम कमी करतील आणि भारतीय शेतीला अत्यंत साहाय्यक ठरतील अशी इटली, जपान, इस्त्राईल, नेदरलॅंड, जर्मनी इत्यादी देशांमध्ये तयार होणाऱ्या मशिनरी जशाच्या तशा आयात करण्याचे प्रयत्न करीत आलो आहे. माझ्या गेल्या पस्तीस वर्षातील लेखातून ही मागणी मी सातत्याने मांडीत आलेलो आहे. परंतु शेतकऱ्यांबद्दलची आस्था नसल्यामुळे जपानमधील कार आयात होऊ लागल्या, मोटारसायकलींचा सुळसुळाट सुरू झाला आणि स्वस्त, टिकाऊ ठिबक साहित्य शेतकऱ्याला जसेच्या तसे मिळू शकले नाही. स्थानिक उद्योगाशी शेतकऱ्यांची गाठ घालून देण्यात आली. नफेबाजीच्या वृत्तीमुळे स्थानिक उद्योगांनी गुणवत्तेला महत्व दिले नाही आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले.

आपले राज्यकर्ते आणि तज्ज्ञ जगभर अभ्यासदौरे करत आहेत. परंतु एकानेही शेतकऱ्याला उपयुक्त ठरणाऱ्या मशिनरीच्या कंपनीशी कोलॅब्रेशन करून भारतात असे उद्योग सुरू केले नाहीत. उदा. आजही इटलीजवळ अत्यंत चांगली, कमी क्षेत्राला उपयुक्त ठरतील असे उफठेर व इतर मशिनरी आहे. इस्त्राईलजवळ मिनी डेअरीची मशिनरी आहे, ठिबक व तुषारसाठी कार्यक्षम यंत्रणा आहे. जपानजवळ लहानशा भात खाचरातही चालतील असे छोटे ट्रॅक्टर आहेत. नेदरलॅंडमध्ये दूध काढण्याची यंत्रे आहेत. जर्मनीत गवत कापण्याचे, ब्राझिलकडे ऊस काढण्याचे यंत्र आहे. आजकाल महाराष्ट्रातील शेतीमध्ये अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. माणूसबळ उपलब्ध न होणे ही एक गंभीर समस्या अलीकडे सर्वच शेतकऱ्यांना जाणवू लागली आहे. त्यासाठी यांत्रिक शेती हा एकच पर्याय होऊ शकतो. परंतु तहान लागल्यावर विहीर खणण्याची आपली परंपरा असल्यामुळे ऊस तोडणीची समस्या निर्माण झाल्यानंतर आम्ही ब्राझिलला जाऊन तोडणीयंत्र विकत घेऊ लागलो आहोत.

भविष्यात ज्या ज्या समस्या निर्माण होतील त्याला तोंड देण्याची कोणतीही यंत्रणा आमच्याकडे अस्तित्वात नाही. भूकंपाच्या वेळी आणि इतर राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी आपल्याकडील नियोजनाचा अभाव ताबडतोब जाणवतो. गुजरातच्या गृहमंत्र्याला भूकंपातील कामामध्ये हजगर्जीपणा झाला हे जाहीरपणे कबुल करावे लागते. त्याच पध्दतीने शेतीच्या बाबतीतही पूर्वीच्या पिढीने हलगर्जीपणा केला असा दोषारोप राजकीय नेतृत्वावर ठेवला जाणार आहे. याची जाणीव ठेवून धोरणे आखण्याची व भावी काळासाठी नियोजन करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

केंद्र सरकारच्या पाण्याच्या खासगीकरणाचा तसेच व्यापार करणाऱ्या धोरणावर मॅगेसेस पुरस्कार विजेते आणि पाणीप्रश्नाचे अभ्यासक राजेंद्र सिंग यांनी जोरदार टीका केली आहे. पाणी हा देशातील नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. पाण्याचे मोफत आणि न्याय वाटप करणे ही सरकारची जबाबदारी आहे. सरकारने पाणी विक्रीयोग्य वस्तू ठरवून परवान्याची सक्ती चालवली आहे. उच्चभ्रू नागरिकांना हजार लिटर पाणी एक रूपयाला द्यायचे , ग्रामीण भागातील नागरिकांना एका बादलीमागे पंधरा रूपये मोजावे लागणे अन्यायकारक आहे. शहरात पाण्याची अमाप उधळपट्टी अ हे. समृध्दीसाठी पाणी आवश्यक आहे. पर्यावरणाच्या व आरोग्याच्या दृष्टीकोनातून गॅट करारामध्ये पाण्याचा विचार करण्यात आलेला आहे. ग्रामीण विकास आणि शेती याचा मुलभूत आधार पाणी आहे.

२) जागतिकीकरण आणि शेतीच्या प्रगतीची दालने :–

एकविसाव्या शतकाचा विचार करता शेती व्यवसायामध्ये आमुलाग्र बदल होण्याची शक्यता दिसते. आतापर्यंत याबाबतचे वैध घेण्याचे प्रयत्न अनेकांनी केलेले आहेत. त्यामध्ये बहुसंख्य लोकांनी जैविक तंत्रज्ञान, जनुक शास्त्रातील प्रगती यावरच भर दिलेला आहे. हे सर्व तंत्रज्ञान उत्पादनवाढीशी निगडीत आहे.

पाश्चिमात्य जगात शोषणाविरहीत बाजारपेठा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झालेले आहेत. त्यातून अवाढव्य साखळी स्टोरेज पध्दतीने जन्म घेतला आहे. एकाच दुकानात जीवनाला लागणाऱ्या सर्व वस्तु विकत मिळत असल्यामुळे भाजीपासून ते अन्नधान्यापर्यंत सर्व वस्तूंची बाजारपेठ एकाच दालनात निर्माण झालेली असते. या दुकानांची गुणवत्तेवर भर असल्यामुळे संपूर्ण जगातून कमी खर्चात उपलब्ध होणाऱ्या वस्तूंच्या शोधात ही मंडळी असतात. सध्या गॅट करारामुळे बाजार व्यवस्थापना अत्यंत सुटसुटीत व सोपी होऊ लागली आहे. त्यामध्ये एकाधिकार तत्व खलास होणार आहे. त्यामुळेच भारतीय शेतीला एक वेगळी दिशा भविष्यकाळात मिळण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

भारतीय संस्कृतीला पाच हजार वर्षाचा वारसा लाभला आहे. आमच्या ऋषीमुनींनी कृषी संस्कृती आणि ऋषी संस्कृती एकत्र करून शेतीक्षेत्रामध्ये भरीव संशोधन केलेले आहे. आयुर्वेदाच्या रूपाने औषधी वनस्पतीच्या बाबतीत बहुमुल्य निरीक्षणे नोंदवली गेली आहेत. नैसर्गिक शेती, नैसर्गिक औषधपध्दती, नैसर्गिक जीवनपध्दती यांचा अत्यंत चांगला समन्वय भारतीय जीवनपध्दतीत दिसून येत आहे. सध्या सेंद्रीय नैसर्गिक शेतीबाबतचे प्रयोग भारतीय ज्ञानावर आधारित असल्याचे त्यांच्या 'वन स्ट्रा रीव्हुलेशन' या पुस्तकात मान्य केले आहे. या शेतीला जर्मनीमध्ये 'ऑरग्यानिक शेती' असे संबोधले जाते. युरोप, ऑस्ट्रेलिया आणि अमेरीकेमध्ये रासायनिक खते निर्माण झालेली आहेत. त्यांनी शेती उत्पादनाच्या बाबतीत जीवनाचे मूल्य लक्षात घेऊन अनेक कीटकनाशके हद्दपार केली आहेत. पूर्वी आपले शेतकरी कीटकनाशकांसाठी कडुलिंब, करंज, तांबाखूचे द्रावण, लाईम सल्फर वॉश, बोर्डो मिश्रण इत्यादी वनस्पतीजन्य कीटकनाशकांचा वापर करत असत. सुधारलेले जगही आज याच व्यवस्थेचा अंगिकार करू लागल्यामुळे अमेरीकेने घाईघाईने कडुनिंब हळद यासारखे पेटंट घेऊन या तंत्राचे व्यापारीकरण करण्याचा डाव आखला होता. आडाख्यांना यश येऊ शकले नाही. त्यामुळेच भारतीय परंपरेतील सर्व चांगल्या वनस्पती, वनौषधी आणि पारंपारीक तंत्रे जतन करण्याची गरज केंद्रीय स्तरावर निर्माण झालेली आहे आणि त्याबाबत जागरूकतेने आपला वारसा संभाळण्याकरता आणि वाढवण्याकरीता नवीन नियम, यंत्रणा आणि मनुष्यबळ निर्माण करण्याची व्यवस्था झालेली आहे.

सध्या संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स संशोधनाबाबत खूप जागरूकता दिसून येते. माहिती तंत्रज्ञान याबाबत बराच गाजावाजा झाला आहे. तरीही खासगी क्षेत्रात आपल्या स्वत:च्या प्रयोगशाळा निर्माण करून, उत्पादनाबाबतची गोपनीयता ठेवून औषधी कंपन्यांनी आपले साम्राज्य उभे केलेले आहे. त्यांच्यामध्ये स्पर्धा असली तरी जगभर औषधी कंपनीची भरभराट चालुच आहे. सध्या औद्योगिक प्रगतीला आहोटी लागून जग चार भिंतींच्या आत शांततामय जीवनाकडे वाटचाल करत आहे. शेती क्षेत्रामधील उत्पादनामुळे माणूस निसर्गाच्या सान्निध्यात येऊ शकतो आणि त्या उत्पादनामुळेच मानवी जीवनाला स्थैर्य आणि शांती मिळू शकते याबाबत बऱ्याच जणांचे एकमत झालेले आहे. सध्या धावपळीमुळे आणि ताणतणावामुळे मानवजात हैराण झालेली आहे. सध्या धावपळीमुळे आणि ताणतणावामुळे मानवजात हैराण झालेली आहे. औद्योगिक प्रगतीमध्ये सुध्दा 'डिमीनेशिंग रिटर्नस' येऊ लागल्यामुळे अनेक उद्योग बंद पडलेले आहेत. भारतातील टाटा, किर्लोस्करसारख्या मोठया कंपन्या

त्यातील ताणतणावामुळे बंद पडण्याचा अवस्थेत आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्या आपले साम्राज्य या कंपन्यांना बगलेत मारून पसरू लागले आहेत. या कंपन्या व्यवहाराच्या बाबतीत तडजोड करीत नसल्यामुळे नवनवीन उत्पादने आणि नवीन बाजारव्यवस्था निर्माण करत आहेत.

३) जागतिकीकरण गरीबी हटविण्याचा एक मार्ग :—

जागतिकीकरणामुळे श्रीमंतांचाच फायदा होईल व गरीब रस्त्यावर येतील, या मानसिकतेमधुन सर्व संघटीत मंडळी, डाव्या विचारसरणीचे, आणि स्वदेशीचे गुणगौरव करणारे उजव्या विचारसरणीचे लोक जागतिकीकरणाला विरोध करीत आहेत. याउलट गॅटमधून बाहेर पडलेला चीन व इतर रशियासारखे साम्यवादी देश, आफ्रिका, लॅटीन अमेरीकेसारखे गरीब देश या प्रक्रीयेशी जुळवून घेण्याचा, डब्ल्यूटीओमध्ये सामील होण्याची धडपड करीत आहेत. यामुळेच देशादेशामध्ये शांतता माजेल, गरिबांचा फायदा होईल, भूकबळी थांबतील अशा 'कॉमन सेन्स' वर आधारित विचार सर्व देश करू लागले आहेत. जगभरचे अर्थतज्ज्ञ दोन बाजूंमध्ये विभागले जाऊन काही लोक जागतिकीकरणामुळे शेती आणि गरीब देशांचे वाटोळे होईल अशी आकडेवारी प्रसिध्द करीत आहेत. तरीसुध्दा गरिबी निर्मूलन करण्यासाठी हा पर्याय वापरून पाहायला काय हरकत आहे असा विचार सर्वसामान्य माणसे करू लागली असल्यामुळे किती प्रचार झाला तरी त्यांचे लक्ष विचलीत झालेले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात शासनामार्फत जी माहिती पुढे आली आणि सध्याही शेतीसंबंधाने जी चर्चा चालू आहे, त्यावरून लहान शेती तोटयात चालते असे निष्कर्ष काढले जात आहेत. त्यामुळेच पूर्वी अनेक उद्योगपतींनी शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने घेऊन साखर कारखाने उभे केले. आज सुध्दा केंद्र सरकारच्या नव्या कृषी धोरणात कंत्राटी शेतीला महत्व दिले गेलेले आहे. महाराष्ट्राचा काही शेती उत्पादनामध्ये वरचा क्रमांक लागतो. पश्चिम महाराष्ट्रात ऊस शेती आणि साखर कारखानदारीमुळे सुस्थिती निर्माण झाली असली तरी जागतिकीकरणामुळे हा व्यवसाय घायकुतीला आला आहे, या लोकांना जागतिकीकरणाच्या समस्येकडे लक्ष न देता सुस्तीत आणि मस्तीत वागत गेल्यामुळे इतर शेतीउत्पादनाकडे इतर फलोद्यान क्षेत्रातील पिकावरही संशोधन करून स्वत:चा हिमतीवर निर्यात व्यापारात जम बसवला आहे. ज्या देशांनी बाजारपेठेचे संवर्धन केले तेथेच नेत्रदीपक प्रगती झालेली आहे. शासनाची जाचक बंधने दूर झाल्यास भारतातील कांदा इतर देशात मोकळेपणे जाऊ शकेल. याच पध्दतीने भारतातील बाजारपेठांना आणि शेतकऱ्यांच्या मालाला अधिक महत्व मिळेल असे भारतरत्न अमर्त्य सेन यांना वाटते. त्यांच्या मते जागतिकीकरण फार मोठी लाभदायक शक्ती आहे. असेच विचार अनेक अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केले आहेत. मार्क्सच्या सिध्दांताप्रमाणे गरीब लोकांना जागतिकीकरण आल्यामुळे कुठलाही तोटा होणार नाही. या देशातील ७० टक्के शेतकरी हा फार मोठा ग्राहक आहे त्याने स्वदेशी, विदेशी याच्याकडे लक्ष न देता आपल्या फायदयापुरते पाहील्यास जागतिकीकरणामुळे त्याला कार्यक्षम अवजारे मिळतील. दिर्घकाळ टिकणारे, कमी किंमतीत आवश्यक असणारे यंत्र व साधने उपलब्ध होवून त्याची कार्यक्षमता कित्येक पटीने वाढेल त्यामुळे जागतिकीकरणातुन येथील शेतकरी काही न गमावता खुप काही कमावू शकेल असे मला प्रामाणिकपणे वाटते.

निष्कर्ष :— एकंदरीत जागतिकीकरण आणि विकास या संदर्भात विचार करता भारत देश आणि जगाला जागतिकीकरणामुळे अनेक तोटे झाले असले तरी अनेक फायदे सुध्दा झाले आहेत हे विसरता येत नाही. भारत देशाच्या संदर्भात विचार करता तसेच जगाचा विचार करता जागतिकीकरणामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली, जागतिकीकरण हे शेतीच्या प्रगतीचे दालन ठरले आहे तसेच जागतिकीकरणामुळे जागतिक पातळीवर गरीबीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. एकंदरीत जागतिकीकरणामुळे भारत देशाच्या तसेच जगाच्या विकासाला चालना मिळाली आहे.

संदर्भग्रंथ :—

१) सी.प. खेर : जागतिक समस्या आशय आणि अनुभव.
२) हेमंत देसाई, महाराष्ट्र टाईम्स जागतिकीकरणाचा अंतर्मुख करणारा : वेध
३) डॉ. वसंत रायपुरकर : आंतरराष्ट्रीय संबंध श्री. मंगेश प्रकाशन नागपूर
४) मधुसूदन दत्तात्रय साठे : जागतिक अर्थव्यवस्था
५) प्रा. श्रीनिवास जोशी : वेध जागतिकीकरणाचा , साईनाथ प्रकाशन, नागपूर

सहयोगी प्राध्यापक श्रीमती सविताबाई उ. देशमुख महाविद्यालय, दिग्रस Email Id :- damodardudhe20d@gmail.com Mob. 9921994901

***

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे भारतीय संस्कृतीमध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास

*किरण चंद्रशेखर कानडे

प्रस्तावना : ज्ञानेश्वरांनी १३ व्या शतकामध्ये म्हटले प्रमाणे हे 'विश्व ची माझे घर' या उक्तीप्रमाणे आज २० व्याशतकामध्ये हे जागतिकीकरणामुळे शक्य झालेय विश्वातील देश हे या प्रक्रियेमुळे एकसंघ बनल्याचे दिसून येते देशाची अर्थव्यवस्था ही जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडली जागतिकीकरणाचा मुख्य उद्देश हा सर्व देशांची सीमा या व्यापार विनिमयास खुल्या करणे हा होता पण फक्त व्यापारच नाही तर त्याबरोबर त्या दोन देशांमध्ये त्यांचे रहन सहन खानपान इत्यादी बरोबरच एकमेकाची संस्कृ ती याचेही आदान प्रदान होताना दिसून येते त्यामुळे जागतिकीकरणाने जग जवळ आले आणि संस्कृतीचेही जागतिकीकरण झाले जागतिकीकरणात अधिक तर लक्ष हे सामाजिक आणि आधुनिक घटकावर दिले जाते ज्यामुळे विविध देशातील संस्कृतीचा संगम होत असल्याचे दिसून येत आहे. विचार प्रत्येक देशाच्या संस्कृतीमध्ये आज मोठ्य प्रमाणात अमुलाग्र बदल झालेली दिसून येत आहेत हे सर्व जागतिकीकरणामुळेच घडून आल्याचे दिसून येते कारण संस्कृतीचे आधार प्रधान झाल्यामुळे आम्ही सोयीस्कर अशा पद्धतीने संस्कृतीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहोत परिणामी जागतिकीकरणामुळे संस्कृतीच्या मूळ स्वरूपामध्ये बदल किंवा परिवर्तन घडवून आल्याचे दिसून येत आहे.

संशोधनाचा हेतू :

१) भारतीय संस्कृतीच्या मूळ ढाच्या किंवा स्वरूप अभ्यासणे.

२) जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे भारतीय संस्कृतीमध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

३) भारतीय संस्कृतीचे मूळ स्वरूप टिकवण्यासाठी उपाययोजना सुचवली.

संशोधन पद्धती : प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

संशोधन स्रोत : प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी दुय्यम साधनसामुग्री म्हणजेच संदर्भ ग्रंथ मासिके विकिपीडिया पुस्तके इत्यादीचा वापर केला आहे.

आशय विश्लेषण :

जागतिकीकरण : जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेची जगाच्या अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रिकरण करणे होय दिपक नायर यांच्या मते देशाच्या राजकीय सीमा मध्ये आर्थिक क्रियांचा विस्तार करणे म्हणजेच जागतिकीकरण होय डॉक्टर यशवंत मनोहर म्हणतात की जागतिकीकरण म्हणजे जगातील वेगवेगळ्या देशांनी परस्पर व्यापार करणे होय.

जागतिकीकरणाची व्याख्या करताना बाईलीस आणि स्मित म्हणतात की जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक आर्थिक औद्योगिक व्यापारी सांस्कृतिक संबंध दर्शवणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरणाची प्रक्रिया भारतामध्ये १९९० पासून सुरू झाली आणि जागतिकीकरण बरोबरच भारतामध्ये खाजगीकरण व उदारीकरण स्वीकारले गेले फक्त व्यापार हा उद्देश असला तरीही व्यापाराबरोबर अनेक गोष्टींची देवाण–घेवाण दोन देशांच्या मध्ये होताना दिसते जागतिकीकरणाचा प्रभाव देशातील विविध घटकांच्या वर पडताना दिसत आहे त्यापैकी एक म्हणजे संस्कृती होय जागतिकीकरणामुळे संस्कृतीत अमुलाग्र बदल झालेली दिसतात खरे तर भारतीय संस्कृती ही भारतामध्ये ब्रिटिश पोर्तुगीज डच यांच्या आगमनानंतर सुरुवात झालेली दिसून येते पण जागतिकीकरणाने या सांस्कृतिक बदलांना मोठ्य प्रमाणात चालना मिळाली डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी भारतीय समाजाचा अभ्यास करताना त्यांना असे दिसून आले की भारतामध्ये असणारा कनिष्ठ समाज हा आपल्यापेक्षा वरिष्ठ समाजाचे अनुकरण करत असून त्यांच्याप्रमाणे आपले रहन सहन ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. या संकल्पनेला त्यांनी संस्कृतीकरण असे संबोधले आहे. याचाच अर्थ भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार करण्या अगोदर पासून भारतीय संस्कृतीमध्ये बदलातला सुरुवात झालेली दिसून येते. माणूस हा एक समाजशील प्राणी असून त्यांनी समाजाच्या विकासासाठी आणि नियंत्रणासाठी संस्कृतीची निर्मिती केली असे म्हणता येईल

जागतिकीकरणाचे प्रकार : जागतिकीकरण हे क्षेत्रानुसार विभागले गेले आहे आणि ह्या विविध क्षेत्रानुसार जागतिकीकरणाचे मुख्य तीन प्रकार पडतात एक आर्थिक जागतिकीकरण दोन राजकीय जागतिकीकरण आणि तीन सांस्कृतिक जागतिकीकरण सांस्कृतिक जागतिकीकरणामध्ये प्रत्येक देशाची संस्कृती ही त्या देशांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक विशिष्ट अशी ओळख असते अनेक संशोधनावरून असे समोर आले आहे की भारतीय संस्कृती ही जगातील इतर देशांच्या पेक्षा जुनी आणि प्रभावशाली आहे. उदा. शिकागोची धर्म परिषद यामध्ये स्वामी विवेकानंदांनी उच्चारलेले शब्द म्हणजे माझ्या बंधुंनो आणि भगिनींनो या वरूनच

भारतीय संस्कृतीचे दर्शन होते. जागतिकीकरणात अधिक तर लक्ष हे सामाजिक आणि आधुनिक घटकावर दिली जाते ज्यामुळे विविध देशातील संस्कृतीचा संगम होतो

संस्कृती : मानवी समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून संस्कृतीकडे पाहिले जाते संस्कृतीमध्ये आचार विचार परंपरा यांचा अंतर्भाव होतो संस्कृतीचा शब्दश: अर्थ संस्कार असा आहे ज्या योगी मनुष्य सुसंस्कृत होतो व मानवी जीवन समृद्ध होती धार्मिक सामाजिक आर्थिक कौटुंबिक इत्यादी विविध क्षेत्रात होत असणाऱ्या प्रगतीला संस्कृती असे म्हणतात राल्फ लिटल संस्कृतीला सामाजिक वारसा असे म्हणतात रॉबर्ट यांनी संस्कृतीला सामाजिक परंपरांचा संग्रह असे संबोधले आहे संस्कृती द्वारे व्यक्तीची जीवन घडत असते आणि मानवाने आपल्या प्रत्येक पिढी गणित संस्कृतीत भर घालण्याची काम केली आहे मानवास सामाजिक नियमांमध्ये बांधून ठेवण्याचे काम संस्कृती करत असल्याचे दिसते.

संस्कृतीची व्याख्या करताना इरावती कर्वे म्हणतात की संस्कार पूर्ण व संस्कार में जीवन जगण्याची देश काल विशिष्ट रीत किंवा पद्धत म्हणजे संस्कृती भारतीय समाजाचा विचार करता भारतीय संस्कृतीस अनन्य साधारण महत्व आहे संपूर्ण विश्वात भारतीय संस्कृती महान आहे असे म्हटले जाते किंबहुना ती आहेच पण जागतिकीकरणाच्या रेट्यात मात्र या संस्कृतीमध्ये अगदी मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. या मुळे संस्कृतीच्या मुळावरच घाव घातला असून संस्कृतीचा मूळ ढाच्या बदलण्याचे काम होत असल्याचे दिसून येते.

जागतिकीकरणामुळे भारतीय संस्कृतीतील परिवर्तन : जागतिकीकरणामुळे मानवावर संस्कार करणारी आणि त्याला नियंत्रणात ठेवणारी संस्कृती मधील विविध घटकांच्या मध्ये बदल होत गेले

भौतिक संस्कृती : भौतिक संस्कृती म्हणजे वस्तू संसाधने आणि जागा जे लोक त्यांची संस्कृती परिभाषित करण्यासाठी वापरतात यामध्ये घरी परिसर चर्च शाळा मंदिर कार्यालय कारखाना इत्यादीचा समावेश होतो संस्कृतीचे हे सर्व भौतिक पैलू त्यांच्या सदस्यांचे वर्तन आणि धारणा परिभाषिक करण्यास मदत करतात जागतिकीकरणामुळे या भौतिक संस्कृती तंत्रज्ञानाची जोड मिळाली. उदा. तंत्रज्ञान हा आजच्या विश्वातील सर्व देशांमधील भौतिक संस्कृतीचा महत्त्वाचा पैलू बनला आहे पूर्वपार चालत आलेल्या पारंपारिक वस्तूंची जागा आज तंत्रज्ञानाने घेतली आहे आमच्या घरातील चूल गेली तिथे गॅस आला घरातील पाटा वरवंटाची जागा मिक्सरने घेतली याबरोबरच घरात फ्रिज वॉशिंग मशीन अशा भौतिक वस्तूंची रेलचेल वाढलेली दिसून येते हे सर्व जागतिकीकरणामुळे घडून आले

अभौतिक संस्कृती : अभौतिक संस्कृतीस अमूर्त संस्कृती असेही म्हणतात. अभौतिक संस्कृतीमध्ये गैर भौतिक कल्पनांचा समावेश होतो. ज्यामध्ये विश्वास, मूल्य, प्रथा, परंपरा, नियमने, लोकरुढी, लोकनीती, नैतिकता, नीतीकल्पना, इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव होतो. भारतीय संस्कृतीमध्ये या सर्व गोष्टींचा अंतर्भाव मोठ्या प्रमाणात आहे. पण काळानुरूप यामध्येही बदल घडून आल्याची दिसते जागतिकीकरणामुळे आमच्या रूढी, प्रथा, परंपरा, मूल्ये, नीतीनियमने, यांना छेद निर्माण झाला पूर्वीच्या मूल्यांमध्ये बदल होऊन आमच्या प्रथा परंपरा बदलत गेल्या. जुन्या सर्वच गोष्टी सोडून आम्ही नाविन्याची कास धरली परिणामी जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात आमची संस्कृती हरवून गेली. भारतीय समाजात असणाऱ्या अनेक प्रथा आणि परंपरा उदा. सती प्रथा, बालविवाह, जातीव्यवस्था यांची ताठरता कमी झाली.

सामाजिक संस्थांच्या मधील बदल : भारतीय समाजात सामाजिक संस्थांना अनन्य साधारण महत्त्व आहे यामध्ये विवाह संस्था कुटुंब संस्था धर्म संस्था शिक्षण संस्था यांच्याकडे प्रामुख्याने महत्वाच्या सामाजिक संस्था म्हणून उल्लेखल्या जातात.

विवाह संस्था : भारतीय समाजात विवाह म्हणजे एक संस्कार मानला गेला आहे विवाहामुळे दोन जीवच नाही तर दोन कुटुंबे एकत्र येतात पण आज मात्र आधुनिक युगात या विवाह संस्थेची अस्तित्व मोडकळीस आल्याचे दिसते विवाह म्हणजे बंधन होय अशी धारणा आजच्या पिढीची होऊन बसली आहे त्यामुळे पाश्चात्य समाजातील विवाह संबंधीच्या कल्पना या जागतिकीकरणामुळे आमच्यापर्यंत येऊन पोहोचल्या आज विवाह हा करार पद्धतीने कॉन्ट्रॅक्ट मॅरे या पद्धतीने केला जातो याही पुढे आज आमच्यामध्ये लिव्ह इन रिलेशन चे प्रमाण वाढली आहे त्यामुळे विवाह संस्थेच्या मुळावरच आघात होत आहे

कुटुंब संस्था : कुटुंब संस्थेस समाजात अनन्य साधारण महत्व असून कुटुंब हे एक सामाजिक सुरक्षेचा महत्त्वाचा घटक आहे. भारतीय समाजात संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती या कुटुंबात दोन–तीन पिढ्यांची लोक एकत्र वास्तव्य करत होती. व्यक्तीच्या मनामध्ये आपल्या कुटुंबाप्रती आदर होता पण आज कुटुंबाची संकल्पनाच बदलत आहे पूर्वीच्या संयुक्त कुटुंबाची जागा आज विभक्त कुटुंबाने घेतली आहे. हम दो हमारे दो या व्यतिरिक्त कोणीही नो अशी भावना बनत चालली आहे.

जागतिकीकरणाच्या प्रवाहात आम्ही आमच्या लोकांना आमच्यापासून दूर ठेवत आहोत कदाचित यामुळेच भारतीय समाजात वृद्धाश्रमांची संख्या झपाट्याने वाढत आहे आमचेच जन्मदाते आज आम्हाला आमच्यावरचा बोजा किंवा परके वाटत आहेत.

धर्म संस्था : विश्वातील असंख्य देशांची धर्म व्यवस्थित मदार होती. धर्माचं प्राबल्य मोठ्या प्रमाणावर होती याला भारत अपवाद नाही पण प्रत्येक ठिकाणी त्याची तीव्रता कमी अधिक होती भारतीय समाजात धर्म धार्मिक कर्मकांडी यांचे स्तोप मोठ्या प्रमाणावर होती धार्मिक कार्यक्रम प्रथा परंपरा यांची जणू रेंचचेलच होती. जागतिकीकरणामुळे आणि विज्ञान–तंत्रज्ञानामुळे जगातील कानाकोपऱ्यातील माहिती मिळू लागली आणि धर्माचे प्राबल्य कमी होत गेली. ज्ञानी लोकांना लोकांनी कर्मकांड करावयास नकार दिला त्यामुळे धार्मिक कल्पना धर्माची शिकवण आणि भीती पाठीमागे पडत गेली. ताठर असणारी धर्म व्यवस्था ही लवचिक बनली.

शिक्षण संस्था : पूर्वी भारतीय समाजात शिक्षण घेण्याचा अधिकार हा विशिष्ट वर्गासच होता शिक्षण हे गुरुकुल पद्धतीनेच मिळत होती. पण विश्वात घडत गेलेल्या विविध घडामोडी नवनवीन लागलेले शोध, विज्ञान व तंत्रज्ञान यांचा वाढता प्रभाव यामुळे शिक्षणाची व्याख्याच बदलली आणि शिक्षण पद्धती ही बदलली जागतिकीकरण प्रक्रियेत शिक्षणाचे विकेंद्रीकरण झाले प्रत्येक विभागाची वेगवेगळे शिक्षण पद्धती अस्तित्वात आली पारंपरिक शिक्षणाची जागा आधुनिक शिक्षण व्यवस्थेने घेतली एकूणच भारतीय समाजातील या प्रमुख सामाजिक संस्थांमध्ये परिवर्तन व बदल घडवून आणण्याचे काम जागतिकीकरणामुळे झाली हे मात्र नक्की

आश्रम व्यवस्था : भारतीय समाजात आश्रम व्यवस्था अस्तित्वात होती ब्रह्मचर्य, ग्रहस्थ, वानप्रस्थ, संन्यास अशी आश्रम व्यवस्था अस्तित्वात होती पण जागतिकीकरणामुळे या व्यवस्थेत ही परिवर्तन घडवून आले. आज कोणीही ब्रह्मचर्याचे पालन करताना दिसत नाही आणि कोणीही गृहस्थाश्रमातून बाहेर पडण्याचे धाडस करत नाही परिणामी ची अशाव्यवस्था आज संपुष्टात आली असेच म्हणावे लागेल.

वैज्ञानिक दृष्टिकोन व अंधश्रद्धा : भारतीय समाजात अंधश्रद्धेचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात होती कोणतीही घटना घडो आम्ही भगत वैदू यांच्याकडे जायच उतारा–केतारा करायचं नवस करायची या सर्वात जागतिकीकरणामुळे बदल घडून आले आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागला विज्ञान तंत्रज्ञान यावर माणूस बोलू लागला लिहू लागला त्याचा वापर करू लागला परिणामी समाजातील अंधश्रद्धा संपुष्टात येऊ लागली

जागतिकीकरणातून आलेली नवी मुल्ये

व्यक्तीचे अवमूल्यन : जागतिकीकरणातून आलेले नवीन मूल्य म्हणजे व्यक्तीचे अवमूल्य होय. भारतीय समाजात लोकांना व्यक्तीला महत्त्व होते पण जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये व्यक्ती स्वत:लाच हरवून बसला. माणसाला आज कोणतीही किंमत उरली नाही उलट व्यक्तीचं अवमूल्य झाल्याचेच दिसून येते ज्याप्रमाणे भौतिक वस्तू उपयोगात नसेल तर फेकून दिली जाते काहीशी त्याच पद्धतीची अवस्था माणसाची होऊन बसली आहे

पैसा केंद्रित व्यवस्था : प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये वस्तू विनिमयाची पद्धत अस्तित्वात होती. यामध्ये व्यक्ती आपल्याकडे असणाऱ्या वस्तूंचे देवाण–घेवाण करून आपल्या गरजा पूर्ण करत होता. परंतु जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे व्यक्ती ऐवजी, वस्तू ऐवजी पैशाला महत्त्व प्राप्त झाले. पैसा हाच केंद्रीभूत मानून माणूस त्याच्या भोवतीच गुरफटू लागला. परिणामी पैशाचे मूल्य मोठ्या प्रमाणात वाढले आणि मानवाचे मूल्य कमी झाले. संपूर्ण व्यवस्थाच पैसा केंद्रित बनली परिणामी सगळीच देवाण–घेवाण पैशाच्या स्वरूपात होऊ लागली आणि समाजात गरीब श्रीमंत ही दुही वाढत गेली.

व्यक्तिवाद : पाश्चात्य संस्कृतीचे महत्त्वाची देन म्हणजे वाढीस लागलेला व्यक्तिवाद होय. आज समाजामध्ये व्यक्ती स्वत:चा विकास साधण्यासाठी कोणत्याही थराला जाताना दिसतो तो सर्वप्रथम स्वत:ला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतो त्यानंतर मग तो इतरांचा विचार करतो समाज, कुटुंब या सगळ्या गोष्टीना तो दुय्यम स्थान देतो मी आणि माझं उरलं तर इतरांचं ही भावना व्यक्तीच्या मनात वाढीस लागली आहे त्यामुळे मानवाचा दृष्टिकोन हा व्यक्तिवादी दृष्टिकोन बनला आहे

चंगळवाद : पाश्चात्य संस्कृतीमुळे भारतीय समाजामध्ये चंगळवाद मोठ्या प्रमाणात वाढला चंगळवादी दृष्टिकोन वाढीस लागल्यामुळे व्यक्तीचे स्वत:वरचे नियंत्रण हरवल्याचे दिसून येते. मौज, मस्ती, मज्जा याकडे लोकांचा कल वाढताना दिसत आहे. परिणामी चंगळवादी संस्कृती वाढीस लागली आहे. बर्थडे सेलिब्रेशन, रिसेप्शन, किटी पार्टी अशा गोष्टींच्यामुळे समाजात जंगलवाद वाढीस लागला आहे. समजाची स्थिती बिकट बनत चालली आहे. पिझ्झा बर्गर सॉफ्ट ड्रिंक हार्ड ड्रिंक व्हिस्की

वोडका यांचे प्रमाण वाढताना दिसत आहे पारंपारिक गोष्टींच्याकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाली आहे परिणामी समाजामध्ये जंगल बात पावताना दिसत आहे

सण उत्सवांचे बाजारीकरण : जागतिकीकरणामुळे भारतीय समाजामध्ये असणाऱ्या विविध प्रथा परंपरांच्या बरोबरच समाजात साजरी केले जाणारे सण उत्सव यांच्यामध्ये परिवर्तन झाल्याचे दिसून येते पूर्वी कोणताही सण साजरी करण्याची एक पद्धत होती. समाजातील सर्व थरातील लोक एकत्र येऊन सण उत्सव साजरे करत होते. मात्र आज सणांचे झालेले बाजारीकरण यामुळे विशिष्ट सण विशिष्ट लोकांची मक्तेदारीच बनले आहेत की काय असे वाटत आहे. पूर्वीच्या पद्धतीत आपणास हव्यातशा पद्धतीने त्यात बदल करून आणला जात आहे. उत्सव साजरा करणे हे आज–काल प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे. उत्सवाच्या नावाखाली चंगळवाद मौजमजा करून घेण्याचे प्रकार वाढले आहेत. पारंपारिक वाद्यांच्या ऐवजी डॉल्बीचा वापर वाढला आहे. उत्सवांच्या मध्ये होणारी अतिष बाजी,सण उत्सव म्हणजे सुट्टी एवढाच अर्थ आजची पडी काढत आहे. यावरूनच जाणवते की सणांचे किती मोठ्या प्रमाणात बाजारीकरण होत आहे.

निष्कर्ष :

१) जागतिकीकरणामुळे संस्कृतीचे आदान प्रदानता वाढीस लागली.

२) जागतिकीकरणामुळे संस्कृतीची परिभाषा बदलली

३) जागतिकीकरणामुळे विज्ञान तंत्रज्ञानाकडे कल वाढत गेला

४) भारतीय समाजातील रूढी प्रथा परंपरा यांना जागतिकीकरणामुळे छेद निर्माण झाला

५) जागतिकीकरणामुळे संस्कृतीचे मूळ स्वरूप बदलले.

६) भारतीय समाजातील सामाजिक संस्थांचे स्वरूप बदलू लागले.

७) समाजामध्ये व्यक्तिवादी दृष्टिकोन वाढीस लागला

८) व्यक्ती ऐवजी पैशाला महत्त्व प्राप्त झाले

९) व्यक्तीची चंगळवादी प्रवृत्ती वाढीस लागली

सारांश:

संस्कृती व्यक्तीला एका निश्चित प्रकारे वर्तन क्रिया करण्यासाठी प्रेरित करीत असते. व्यक्तीचे अधिकार सामाजिक व्यवहार संस्कृती द्वारेच निश्चित आणि निर्धारित होत असतात समाजात उचित अशा वर्तनाला पुरस्कार प्रशस्ती देण्याचे कार्य आणि उचित वर्तन शिकवण्याचे कार्य संस्कृती करीत असते. त्याचप्रमाणे वाईट सवयी अनुचित व्यवहाराला शासन देण्याचे सामर्थ्यही संस्कृतीत असते. पण जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे संस्कृतीची पाळेमुळे उसवली आहेत असे वाटते. व्यक्ती जीवनाच्या दृष्टीने संस्कृतीला अनन्य साधारण महत्व आहे कारण जन्मता व्यक्तीच्या ठिकाणी असणाऱ्या सूप्त शक्तींचा व सुप्त गुणांचा विकास संस्कृतीच्या माध्यमातून होत असतो व्यक्तीच्या बौद्धिकतेचा विकास घडवून आणण्यासाठी भाषा, शिक्षण,मुद्रण, प्रगतंत्रज्ञान, विज्ञान इत्यादी संस्कृतीक गोष्टी सहाय्यभूत होतात. पण आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण यामुळे आज पर्यंत प्रत्येकाने जपलेल्या आप आपल्या संस्कृतीचे अस्तित्व कुठेतरी धोक्यात आले आहे काय असे वाटते.

संदर्भ :

१) जगन कराडे, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन.

२) रमेश पतंगे जागतिकीकरण आणि वंचित समाज,भारतीय विचार साधना

३) सर्जेराव साळुंखे समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन पुणे.

४) सी. प.खेर, जागतिकीकरण समस्या आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन.

५) गजानन खातू, जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय

६) रावसाहेब कसबे, जागतिकीकरण स्वरूप आणि भवितव्य, सुमेध प्रकाशन पुणे.

७) रवींद्र शोभणे, जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन नागपूर

८) विकिपीडिया

९) दैनिक लोकसत्ता

*श्रीमती अ. रा. पाटील कन्या महाविदयालय, इचलकरंजी, मो.न. **8806443231** Email : kckanade2211@gmail.com

***

दृश्यकलेवर झालेला कोरोना महामारीचा परिणाम

*श्री. संतोष बाबासो पाटील

प्रस्तावना :–

'कला म्हणजे विविध घटकांची अनुभूती देणारी मांडणी' अशी कलेची एक व्याख्या केली जाते. कलेचे अनेक प्रकार आहेत. त्यातील 'दृश्यकला' हा एक प्रकार. यामध्ये चित्रकला शिल्पकला या कलांचा समावेश होतो. चित्र शिल्प कला ही आनंद देणारी दृश्यकला आहे. जागतिक स्तरावर चित्रकला आणि शिल्पकलेमध्ये खूप कलाकारानी अवर्णनीय कार्य केले आहे.

भारताच्या कलेचा फार प्राचीन इतिहास आहे. भीमबेटका, बाघ, अजिंठा या ठिकाणची गुहाचित्रे तर वेरूळ, कोणार्क, सांची येथील शिल्पे व वास्तू या कलेची साक्ष देतात. ही चित्र शिल्पे योग्य माध्यमांमध्ये निर्माण झाली. त्यामुळे काळाच्या ओघात ती आजही टिकून आहेत. परंतु त्यापूर्वीपासून च्या कला मानवाच्या जीवनाला समृद्ध करून गेल्या जगातल्या सर्व जुन्या भाषांमध्ये प्राचीन अशी भाषा म्हणजे चित्रभाषा आहे. व या सर्व भाषांच्या लिपींपेक्षा जुनी लिपी म्हणजे चित्र लिपी आहे. हे आता अभ्यासाने सर्वमान्य झाले आहे.

कोणत्याही कार्याच्या पूर्तीसाठी ते कुशलतेने पूर्ण करणे याला कला म्हणतात. कला ही मानवाच्या मनाची एक अभिव्यक्ती आहे. कलेच्या अनेक समाजशास्त्रज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत. प्लेटोच्या मते, 'कला ही सत्याची अनुकृती आहे.' अरस्तू च्या अनुसार 'कला प्रकृतीचे अनुकरण आहे. क्रायडच्या मते कला हे दमन झालेल्या वासनांचे प्रकट रूप आहे.' टॉलस्टॉय म्हणतात, 'कला ही भावनांना क्रिया, रेखा, रंग, ध्वनी आणि शब्दांच्याद्वारे अशा प्रकारे अभी व्यक्त करणे ज्यामुळे जो ती पाहतो त्याच्या मनाला भावेल.' रवींद्रनाथ टागोर यांच्या मते 'कलेमध्येच मनुष्य आपली अभिव्यक्ती करतो.' वरील विचारावंतांच्या कले विषयीच्या व्याख्या वाचल्यानंतर असे लक्षात येते की, कला ही अभिव्यक्त होण्याचे माध्यम आहे.

कलेचे विविध निकषावर वर्गीकरण केले जाते. कलेचे वर्गीकरण दोन निकषांच्या आधारे खालील प्रमाणे केले आहे.

१) उपयोगी कला (उपयोजित कला) – ही कला दैनंदिन गरजांची पूर्ती करते, त्याला उपयोजित कला म्हणतात. उदाहरणार्थ आभूषण, रंगकाम, छपाई या कलेपासून आपल्याला भौतिक सुख मिळते.

२) ललित कला – ललित कलांचा एकमेव उद्देश मानसिक आणि आत्मिक आनंद मिळवणे. यामध्ये सौंदर्याची अनुभूती होते. ललित कलेचे मुख्य पाच प्रकार आहेत. १) चित्रकला २) शिल्पकला (मूर्तिकार), ३)वास्तुकला ४) संगीतकला ५) काव्यकला यामधील चित्रकला या विषयाच्या संदर्भात कलेचा अभ्यास प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये संशोधकाने केलेला आहे. चित्रकला ही दृश्यकला प्रकारामध्ये येते. प्रस्तुत संशोधनाचा निबंधात दृश्यकलेवर कोरोना महामारीचा परिणाम यांचा अभ्यास केला आहे.

उद्दिष्टे –

१) दृश्य कला क्षेत्रावर झालेला कोरोना महामारीचा परिणाम अभ्यासणे.

२) चित्र आणि शिल्प या दृश्य कला क्षेत्राचा इतिहासाचा अभ्यास करणे.

३) चित्रकार आणि शिल्पकार यांच्या आर्थिक जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

४) राष्ट्रीय स्तरावर कोरोना महामारीमुळे चित्रशिल्पकारांच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :–

सदर शोध निबंध लिहिताना वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. एखाद्या व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय व समस्यांचा वास्तविक तथ्याचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करण्याचे कार्य या वर्णनात्मक संशोधन आराखड्यात केले जाते. सदर शोध निबंधासाठी या वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोत जसे शासकीय आणि अशासकीय संस्था यांचे प्रकाशित साहित्य, मासिके, आंतरराष्ट्रीय अहवाल, काही संकेतस्थळे यांचा वापर करण्यात आलेला आहे.

सविस्तर मांडणी :–

दृश्यकलेवर कोरोना महामारीचा खूप परिणाम झालेला दिसून येतो. कोरोना महामारीच्या अगोदरचे दृश्यकला जग आणि नंतरचे जग यामध्ये खूप बदल झालेले दिसून येतात. हे अभ्यासण्या अगोदर आपण उपयोजित कला आणि चित्रकला. शिल्पकला यांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊ.

व्यावहारिक उपयोगासाठी जेव्हा कला राबवली जाते. तेव्हा ती उपयोजित कला होते. आजच्या जाहिरात युगात हा नवा शब्द आहे. हस्तकलेला ती जवळची आहे. वृत्तपत्रातल्या जाहिराती. रेडिओ, टीव्हीवरील जाहिराती, गृह सजावटीसाठी फर्निचर, कपड्यांची फॅशन डिझाईन अशा कितीतरी क्षेत्रात उपयोजित कलेने आपला वेगळा ठसा उमटवलेला आहे. या उपयोजित कलेमधून ज्या नकळतपणे समाजाची मुल्ये व्यक्त होत असतात. जाहिराती बद्दल बोलायचे तर समाजाच्या गरजा वाढवण्याचे काम त्या करत आहेत. उपयोग्य वस्तूंबद्दल शहरापासून खेड्यांपर्यंत अवास्तव आकर्षण त्या निर्माण करत आहेत. आणि या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्याची कोणतीही आर्थिक क्षमता बहुसंख्य समाजामध्ये नाही. त्यामुळे विफलता, गुन्हेगारी प्रवृत्तीलाच प्रोत्साहन मिळण्याची शक्यता अधिक. साबणाच्या वडीपासून टीव्हीपर्यंत वस्तू खरेदी करताना ग्राहकांचे आग्रक्रम काय असतात? मालाचा दर्जा यामध्ये सर्वात शेवटी असतो. सर्वप्रथम तो भावनेला बळी पडतो. त्यामुळे स्वप्न विकणाऱ्या फॅन्टसीला जाहिरातीमध्ये सर्वात पहिले स्थान असते. अशा प्रकारे उपयोजित कलेचा वापर वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असलेला आपल्याला दिसून येतो.

अजंठा वेरूळच्या लेण्यांपासून ते शिवकालीन देवळांपर्यंत मधल्या काळामध्ये चित्रकला व शिल्पकला कशी होती याचे पुरावे आज उपलब्ध नाहीत. त्यामुळे मुघल चित्रशैलीची परंपरा असलेल्या पेशवेकालीन भित्तीचित्रापासून तंजावर, राजा रविवर्मा–जे जे स्कूल ऑफ आर्ट–आधुनिक चित्रकला असा प्रवास दिसतो. एक राजा रविवर्मा याचा अपवाद सोडला तर चित्रकला ही सामान्य माणसापासून दूर राहिली. भांडवली गुंतवणूक आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे एक साधन म्हणून आज उच्चभूंचा चित्रकलेकडे कल वाढला आहे. प्रसार माध्यमांमुळे सामान्य माणसाच्या कानांवरून तरी अतिशय चित्रकारांची नावे गेलेली असतात. पण संगीत साहित्याच्या तुलनेत चित्रकला सामान्य माणसाला आपली वाटत नाही एवढे खरे.

चित्रकलेमध्ये आदिवासी, भारतीय, पर्शियन, पाश्चात्य अशा अनेक कला प्रवाहांचा संगम झालेला दिसतो. आजचे चित्रकार पाश्चात्य संस्कार घेऊन पुन्हा तांत्रिक फॉर्म्सकडे, आदिम आकाराकडे, मिश्यांकडे वळत आहेत. मुख्यत: पाश्चात्य आणि भारतीय जाणीवांची भिन्नता आणि त्यांचा संगम यांची वैशिष्ट्ये पाहणे मनोरंजक ठरेल.

कलेकडे पाहण्याचा पाश्चात्य दृष्टिकोन हा Classical आहे. तर भारतीय दृष्टिकोन पौर्वात्य परंपरा मानणारा आहे. पाश्चात्य अभिजात शैलीचा उगम पाचव्या शतकात ग्रीसमध्ये झाला. रेनेसान्स काळात ख्रिश्चन मूल्यांची जोड मिळाल्यामुळे या अभिजात कलेने नवे मानदंड निर्माण केले.

भारतीय कला ही धर्म आणि जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सौंदर्य हे स्वतंत्र मूल्य नाही. अव्दैतात विलीन होणारा तो साधनरूप सहजोद्गार आहे. व्हिनस, पायेटा अशी शिल्पे अभिजात केलेचे परमोच्य बिंदू आहेत, तर नटराज भारतीय जीवनसौंदर्याचे मूर्त रूप आहे. कलासिकल कलेला रसिकांची आवश्यकता असते. दुसऱ्यांशी होणाऱ्या संवादातून शिल्पाची लयबद्ध आकृती, तिचा पोत अनेक कला अवयवांनी बनलेल्या घटकांचा सुसंवाद जिवंत होतो. विशिष्ट क्षण श्वाश्वत अशा दगडाच्या माध्यमांमध्ये बंदिस्त करण्याचा तो एक प्रयत्न असतो. या उलट भारतीय शिल्प हे रसिक असो अथवा नसो ते असतेच. काळाच्या पलीकडे जाणारे त्याचे आवाहन असते. व्हिनस, लाओकून ही डोळ्यांनी अनुभवण्याची शिल्पे आहेत. तर नटराज अधिक शाश्वत अशा काळाचे दर्शन घडवणारा आहे. 'मंदिरपथगामिनी' या म्हेत्रे यांच्या शिल्पातील स्त्री ची आकृती क्लासिकल शैलीतील आहे. पण तिचे सौंदर्य केवळ रसिकांच्या आस्वादासाठी नाही. रसिकांची दखलही न घेणारी अंतर्भुख अशी तिची दृष्टी आहे. आजच्या चित्रकलेमध्ये या दोन्ही प्रवाहांचा संगम झालेला आढळतो. आकार आणि अवकाश, रंगलेपन, पर्स्पेक्टिव्ह, विरुपीकरण, माध्यम यांच्या उपयोजनामध्ये हा संगम आढळतो. लोक व्यवहार आणि अभिजात कला यांच्यातील सीमारेषा आज पुसट होत चालल्या आहेत. पण आदिम संस्कृतीतील व्यवहार आणि कला यांची एकरूपता त्यात अपेक्षित नाही. त्याऐवजी विविध संवेदनशीलता मधला ताण आणि विघटनच त्यात बऱ्याच वेळा दिसून येते.

या सर्व स्थितीचा आढावा घेतल्यास कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर चित्रकला आणि शिल्पकला या क्षेत्रातसुद्धा खूप बदल झालेले दिसून आले आहेत. कोरोना महामारीनंतर चित्रकला व शिल्पकला या दृकमाध्यमातील कलांच्या अर्थजगत, संस्कृ ती, समाज आणि कलाकार यांच्यावर खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो.

कोव्हिड १९ मुळे जगभरातील माणूस भयाने हादरून गेला. माणसाच्या, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक व्यवस्था कोरोनामुळे कमालीच्या असुरक्षित झाल्या आहेत. तसेच व्यापार क्षेत्र, उद्योग आणि मनोरंजन क्षेत्र ढासळली आहेत. शिक्षण क्षेत्रावर कोरोनाचा खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो. तरीसुद्धा या सर्व परिस्थितीला तोंड देण्याचे काम

माणूस करत आहे. भारतात कोरोना महामारीच्या या प्रसाराला रोखण्यासाठी जवळजवळ पाच टप्प्यामध्ये लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेतला गेला.

त्यामुळे कोरोनाची झळ जशी वेगवेगळ्या क्षेत्रांना बसली आहे. तशीच ती दृश्यकला क्षेत्रालाही बसलेली दिसून येते. चित्र आणि शिल्प या कला क्षेत्रांचा प्रभाव खूप कमी समुदायावर आहे. चित्र आणि शिल्प या दृककला प्रकारांना यापूर्वीच २००५ ची आर्थिक मंदी आणि त्यानंतर २०१६ ची नोटाबंदी यामुळे खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो. त्यामुळे दृ श्यकला क्षेत्रातील आर्थिक व्यवहार बऱ्याच प्रमाणात मंदावले आहेत.

२० मार्च २०२० पासून देशातील कलादालने, वस्तुसंग्रहालये, कला महाविद्यालये कोरनामुळे बंद होती. कोरोना संकट कमी झाले असले तरी ती उघडली तरी प्रदर्शने होण्याची शक्यता कमीच आहे. चित्र प्रदर्शने आणि गॅलरीमध्ये कलारसिक येतील का? असा प्रश्न पडतो आहे. तसेच आर्ट चे चाहते, बायर, क्युरेटर हेही या काळात गॅलऱ्यांकडे फिरकले नाहीत. त्यामुळे काही काळासाठी कला प्रदर्शने ही कलाकारासाठी मोठी जोखीम असेल. या सर्व परिस्थितीमध्ये कलादालनाचा कल हा कलाप्रदर्शने करण्याकडे राहील. कारण आगाऊ पैसे घेऊन त्यांनी जवळपास वर्षभराचे अगोदरचे बुकिंग केलेले असते. त्यामुळे प्रदर्शनी नाही झाले तरी गॅलरी मालकांना त्याचा फारसा फरक पडणार नाही. मात्र जे कलावंत केवळ चित्र आणि प्रदर्शनावर अवलंबून आहेत, त्यांच्यावर या परिस्थितीचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

दृश्यकला क्षेत्राला १९९५ ते २००८ या कालखंडात प्रचंड भरभराट होती. या काळात कलाकृतींची विक्री बऱ्यापैकी होत होती व किंमतही चांगली मिळत होती. याच दशकात प्रसिद्ध चित्रकार एम.एफ.हुसेन यांची चित्रे सर्वत्र चर्चेचा विषय ठरली. त्यांच्या कलाकृती लाखो किमतीला विकल्या जाऊ लागल्या. चित्रकलेला चांगले दिवस यायला सुरुवात झाली. पण २००८ च्या आर्थिक मंदीत ती ओसरली गेली. चित्र प्रदर्शन करण्यासाठी कलाकाराला खूप खर्च येत असतो. त्याला आधी तीन–चार वर्षे खपावे लागते. रंग साहित्य, फ्रेमिंग, प्रसिद्धी वाहतूक अशा अनेक अडचणीतून त्याला जावे लागते. हे सर्व करताना कलाकाराला वेळ, श्रम, पैसा लावावा लागतो. कलाकृतींचा विषय, आशय आणि अविष्कार हा एक वेगळाच विषय असतो. या सर्व प्रक्रियेत कलाकारांच्या कुटुंबालाही त्रास होत असतो. इतके करूनही चित्रांची विक्री झाली नाही तर, कलाकारांच्या अंगावर ही मेहनत व खर्च पडतो. त्यामुळे आर्थिक परतफेडीच्या ताणतणावातच तो कलाकार प्रवाहा बाहेर फेकला जातो.

कोविड १९ च्या प्रादुर्भाव व त्याचा परिणाम हा उद्योग व्यवसायांवर दूरगामी झालेला आहे. बाजारपेठेतील आर्थिक उलाढालीचा दर कमी झालेला आहे. अशा या आर्थिक परिस्थिती कला ग्राहक चित्रकृतीत पैसे गुंतवेल असे वाटत नाही. त्यामुळे नवोदित कलाकारांना याचा फटका बसणार. देशांमध्ये कलाकृतीच्या विक्रीसाठी केंद्रबिंदू असणाऱ्या आर्ट गॅलरा मुख्यत: मुंबई, दिल्ली, चेन्नई, बेंगलोर अशा शहरात आहेत आणि नेमक्या याच शहरांमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव जास्त होतो. त्यामुळे दृ श्यकला क्षेत्रावर याचा दुरगामी परिणाम होणार असेच म्हणावे लागते.

प्रमुख निष्कर्ष :–

१) राष्ट्रीय स्तरांवर कोरोना महामारीचा दृश्यकलेवर मोठा परिणाम झालेला दिसून येतो.

२) राष्ट्रीय स्तरावर चित्र शिल्प आर्थिक व्यवहारांमध्ये ३५टक्के घट झालेली आहे.

३) दृश्य कलेतील आर्थिक बाजारपेठेवर कोरोना महामारीचा परिणाम झालेला दिसून येतो.

४) भारतातील आर्ट गॅलरीच्या उत्पन्नात घट झालेली दिसून येते.

५) दृश्यकला क्षेत्रामध्ये चित्रकाराच्या आर्थिक जीवनावर मोठा परिणाम झालेला आहे.

संदर्भसूची

१) भारतीय कलेचा इतिहास संध्या केतकर, ज्योत्स्ना प्रकाशन, २०१५

२) कॅनव्हास, अच्युत गोडबोले आणि दिपा देशमुख मनोविकास प्रकाशन, २०१५

३) CCRT सेंटर ऑफ कल्चरल रिसोर्स अँड ट्रेनिंग दिल्ली website – www.ccrtiudia.gov.in

४) लोकराज्य मासिक २०११ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन.

५) मैफल रंगाची लेख मालिका दै. महाराष्ट्र टाईम्स

६) मराठी नियतकालिकातील दृश्य कला विचार रमेशचंद्र पाटकर ज्योत्स्ना प्रकाशन, २००९.

*संशोधक विद्यार्थी समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

***

शाश्वत विकास : पर्यावरण संतुलन

*प्रा. अनिता एस गायकवाड

प्रस्तावना:

पृथ्वीभोवती असलेल्या घटकांना आपण पर्यावरण म्हणतो. ज्यामध्ये झाडे, वनस्पती, नद्या, पर्वत, महासागर, तलाव, हवा इत्यादींचा समावेश आहे. पृथ्वीवरील पर्यावरणाचे संतुलित आवरण हे संरक्षक कवच आहे. झाडे आपल्या जीवनात महत्त्वाचे योगदान देतात. कारण आपल्याला शुद्ध ऑक्सिजन फक्त झाडांपासूनच मिळतो. निसर्गामध्ये असलेल्या औषधी वनस्पतींद्वारे विविध रोगांवर उपचार करण्यासाठी आयुर्वेदिक औषधे बनवली जातात. पर्वत आणि नदी नैसर्गिक पावसासाठी उपयुक्त आहेत. अशाप्रकारे झाडांची उपस्थिती, नद्यांची स्वच्छता आणि पर्यावरणाच्या इतर सृष्टींचा समतोल राखणे प्रत्येक सजीवासाठी महत्त्वाचे आहे.1972 मध्ये स्टॉक होम येथे मानवी पर्यावरण या विषयावर भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या, विकास हे पर्यावरण सुधारण्याच्या प्रमुख साधनापैकी एक महत्त्वाचे साधन आहे त्यामुळे जीवन सुसह्य होईल. जगातील फक्त 25 टक्के भाग असलेल्या विकसित सदन राष्ट्राकडून सुमारे 80 टक्के प्रदूषण फैलावले जाते उर्वरित 75 टक्के राष्ट्रांना ते रोखण्यासाठी आर्थिक भार सोसावा लागतो. विकसित राष्ट्रातील लोक त्यांच्या नैसर्गिक साधनांचा अमर्याद वापर करतात त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते संरक्षक ओझोनच्या थराचा नाश होतो आणि पर्यावरण धोक्यात येते. दिवसेंदिवस प्रदूषणाचा विळखा सजीव सृष्टी भोवती आवळला जात असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. कळतंय पण वळत नाही अशी मानवाची अवस्था झाल्यामुळे बिघडत चाललेल्या पर्यावरणात सुधारणा करण्यासाठी आणि त्याचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने स्वतः पासून प्रयत्नांची पराकाष्टा करावयास हवी.

उद्दिष्टे:-

1. पर्यावरणाची सद्यस्थिती जाणून घेणे
2. शाश्वत विकासात पर्यावरणाची भूमिका अभ्यासणे
3. शाश्वत विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण याबाबत उपाय सुचविणे

गृहीतक:-

1. शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धन याबाबतचे विचार मोठ्या प्रमाणात व्यक्त केले जातात परंतु त्यास कृतीची जोड दिसून येत नाही.

2. पर्यावरण संवर्धनातूनच शाश्वत विकास शक्य आहे

संशोधन पद्धती:- प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भ, पुस्तके तसेच इंटरनेट वरील लेख इत्यादी दुय्यम स्त्रोतचा वापर करण्यात आला आहे.

सध्याच्या काळात माणूस आपल्या स्वार्थात गुंतला आहे. पर्यावरण संतुलन बिघडवणार्या घटकाचा वापर तो आपल्या स्वार्थासाठी करत आहे त्यामुळेच आज पर्यावरण रक्षणाचे प्रयत्न अयशस्वी ठरत आहेत. औद्योगिक विकास आणि अनेक कारखान्यांच्या निर्मिती मुळे हवा प्रदूषित झाली आहे. हवा अशुद्ध असताना निरोगी जीवनाची कल्पना करणे व्यर्थ आहे. पाणी मानवाचे जीवन आहे. आज तेच पाणी कारखान्यांच्या टाकाऊ पदार्थांनी दुषित केले जात आहे. पर्यावरणातील झाडांची अंदाधुंद कत्तल पर्यावरण संतुलनात असंतुलन निर्माण करण्यात मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत आहे. अल्पकाळासाठी फायदेशीर ठरणारे कीटकनाशके आणि रासायनिक खतांचे काम कृषी क्षेत्रात सुरू आहे. अशा प्रकारच्या रसायनांचा वापर पर्यावरणासाठी हानिकारक आहे. औद्योगिक विकासाच्या शर्यतीत गुंतलेली सर्व राष्ट्रे स्वत:चा विकास करण्याच्या हेतूने पर्यावरणाला आगीत ढकलत आहेत. मनुष्य आणि पर्यावरण हे दोन्ही घटक परस्परांशी संबंधित आहेत म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्यांना परस्परांपासून वेगळे करणे शक्य नाही. पर्यावरणाचे

अस्तित्व नष्ट होणे म्हणजे मानव जातीचे अस्तित्व नष्ट होणे होय म्हणूनच पर्यावरण हा विषय जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनलेला आहे इ.स. 1972 मध्ये स्टॉक होम येथे झालेल्या जागतिक परिषदेनंतर विकसनशील देशात पर्यावरणाच्या समस्येकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात झाली एखाद्या प्रदेशाचा आर्थिक विकास साधताना पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे याची जाणीव शासन व समाज यांना मोठ्या प्रमाणावर झाली. सामान्यपणे सभोवतालच्या परिस्थितीला आपण पर्यावरण असे म्हणतो. पृथ्वीच्या पृष्ठभागावर वातावरणात आणि पृथ्वीच्या अंतरंगात जे काही सामावलेले आहेत त्या सगळयांचा समावेश पर्यावरणात होतो उदा: जमीन, हवा, पाणी, निरनिराळे वायू, सर्व वनस्पती, सर्व सजीव, खनिजे, नैसर्गिक वायू, खनिज तेल इत्यादी. या सर्वांनी मिळून होणारी परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय पर्यावरणाला इंग्रजी भाषेत Environment शब्दाने ओळखले जाते.मुळातच फ्रेंच भाषेतील Inviron या शब्दाचा अर्थच To Surround असा आहे म्हणजेच सभोवतालची स्थिती.

शाश्वत विकास ही अनेक विविध पैलूंची संबंधित संकल्पना असून ते अनेक अर्थाने ओळखले जाते. 'International union for conservation of nature' या आंतरराष्ट्रीय संस्थेने 1980 मध्ये world conservation strategy नामक अहवाल प्रसिद्ध करून सर्वप्रथम शाश्वत विकासाबाबत विचाराला चालना दिली. या अहवालात सर्वप्रथम शाश्वत विकास हा शब्द उपयोगात आणण्यात आला. पुढे 1987 मध्ये पर्यावरण आणि मानवी विकासातील परस्परावलंबनाचा अभ्यास करणाऱ्या ब्रुटलँड नामक आयोगाने सादर केलेल्या अहवालामध्ये भावी पिढ्यांच्या गरजांचा विचार करून वर्तमानपिडीच्या गरजांची पूर्तता करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. अशी समर्पक व्याख्या केली. शाश्वत विकास ही संकल्पना मानवाने नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर दूरदृष्टीने, विवेकाने करण्याशी संबंधित असून सद्य:कालीन मानवी पिढीच्या भौतिक गरजा पूर्ण करताना भविष्यातील भावी मानवी पिढ्यांना नैसर्गिक साधनसंपत्ती पासून व पर्यायाने विकासापासून वंचित राहून लागू नये याच्याशीही ही संकल्पना संबंधित आहे.ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी पुढील काही घटकांचा आढावा घेणे उचित ठरेल.

1. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन
2. नैसर्गिक साधनसंपत्तीचा काटकसरीने वापर
3. सामाजिक न्याय आणि समतेवर आधारित विकास
4. नैसर्गिक साधन संपत्तीचे योग्य व्यवस्थापन
5. शाश्वत विकास हा पर्यावरणाशी पोषक
6. भौतिक विकासात नैसर्गिक साधन संपत्तीचा पुनर्वापर
7. शाश्वत विकास म्हणजे अनंत काळापर्यंत टिकणारा विकास होय.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास (sustainable development) घडून आणण्यासाठी ग्रामस्थान अभियान सुरू करण्यात आले आहे. भौतिक सामाजिक व आर्थिक या तीन क्षेत्रात शासनाच्या तांत्रिक व प्रशासकीय सहकार्याने लोकांच्या पुढाकाराने हा विकास प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न केला जात आहे.परंतु शाश्वत ग्रामविकास संकल्पना प्रत्यक्षात उतरवताना उच्च प्रतीच्या भौतिक सुविधांची निर्मिती करताना लागणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग पर्यावरणाचा समतोल राखून कसा करता येईल याचाही प्रामुख्याने विचार झाला पाहिजे. रस्ते रुंदीकरणाच्या मोहिमेतून झालेली वृक्षतोड व परिणामी पाणीटंचाई, वीज टंचाई इत्यादी समस्या लातूरवासीयांनी जवळून पाहिल्या आहेत.पर्यावरणाचे संवर्धन जतन व संरक्षण करून समृद्ध व संपन्न गावांची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे. 2010-11 मध्ये शासनाने पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना सुरू केली. परंतु आज आपण पाहतोय पर्यावरण संतुलन ऐवजी पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर होत आहे. आज वायू प्रदूषण जलप्रदूषण माती प्रदूषण औद्योगिक प्रदूषण नगरीय प्रदूषण नद्या नाल्यामध्ये झालेले प्रदूषण याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग सारखे संकट सातत्याने जगासमोर निर्माण होत आहे. सुनामी,चक्रीवादळ, भूकंप, दुष्काळ आणि अकाली मृत्यू इत्यादी घटना सातत्याने वाढत आहेत, याचे प्रमुख कारण म्हणजे पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास होय.

खरे तर निसर्गात स्वतःला स्वच्छ ठेवण्याची क्षमता आहे. नैसर्गिक वातावरण आणि त्यात राहणारे सर्व जीव एकत्रितपणे परिसंस्था बनवतात. पर्यावरणातील घटकाद्वारेच पर्यावरणाचे संतुलन ठेवणे शक्य होते परंतु मानवाचा पर्यावरणीय घटकात वाढलेला हस्तक्षेप पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरत आहे. वाढती जंगल तोड, नवनवीन नगरांचा उदय, कारखाने गिरण्यांमध्ये होणारी वाढ, नद्यांमध्ये होणारे प्रदूषण या सर्व पर्यावरणीय ऱ्हासास मानवच कारणीभूत आहे. प्राचीन काळी पर्यावरण प्रदूषणा सारखी समस्या अस्तित्वात नव्हती झाडे, फुले, पाणी, नदी, नाले पूर्ण पर्यावरण भरभरून सौंदर्याने नटलेले होते. परंतु आज विकासाच्या नावावर तांत्रिक व यांत्रिक पद्धतीने नवनवीन प्रयोग करून मानवाने संपूर्ण पर्यावरण धोक्यात आणले आहे ज्यामुळे आज मानवाचे वर्तमानकालीन जीवनच नव्हे तर भविष्यकाळ ही मोठ्या प्रमाणात प्रभावित होणार आहे. विकसित व शक्तिशाली बनण्याच्या स्पर्धेमध्ये प्रत्येक देश उतरत आहे . स्वतःला शक्तिशाली सिद्ध करण्यासाठी परमाणु बॉम्ब सारखी निर्मिती केली जात आहे. त्याचाच परिणाम म्हणून आज निसर्गातील अनेक घटक नष्ट होत आहे जागतिकीकरणाच्या स्पर्धेत पर्यावरण दुर्लक्षित होत आहे, माणूस विसरून गेला आहे की पृथ्वीवर आज आम्ही जिवंत आहोत ते केवळ पर्यावरणामुळेच. जेव्हा मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाच्या या संतुलित व्यवस्थेत वैमनस्य निर्माण होते, तेव्हा त्याचे विध्वंसक परिणाम वृक्ष, वनस्पती, प्राणी, पक्षी आणि मानव यांच्यावर पडल्याशिवाय राहत नाहीत. पर्यावरणाचा समतोल बिघडवण्यात मानवाची भूमिका कारणीभूत आहे. त्याच्या स्वार्थाने त्याच्या विवेकशक्तीवर विजय मिळवला आहे आणि त्याला तात्काळ लाभ आणि सुखसोयींसाठी प्रेरित केले आहे. त्यामुळे पाणी, जंगल, जमीन, हवा, नदी ही सर्व नैसर्गिक संसाधने जी मानवी जीवनाचा आधार आहेत ती प्रदूषित झाली आहेत.या सगळ्यासाठी आपणही जबाबदार आहोत. पाश्चिमात्य सभ्यतेच्या लोभामुळे, आपल्या खाण्याच्या सवयी आणि आरोग्याबाबत दिवसेंदिवस बेफिकीर होत चाललेल्या भौतिक साधनांच्या आंधळ्या शर्यतीमुळे निसर्ग धोक्यात आला आहे.नद्यांमध्ये सोडले जाणारे घाण पाणी मानवी जीवन रोगग्रस्त बनवत आहे. कारखान्यांमधून निघणारे विषारी वायू मानवी श्वासास धोका निर्माण करत आहे. रस्त्यावर फेकला जाणाऱ्या कचऱ्यातून अनेक विषाणू मानवी जीवनास आजारी बनवत आहेत. ज्या वृक्षांमुळे मानवी जीवन सुरक्षित होते ते वृक्ष आज अंदाधुंदपणे नष्ट केली जात आहे. परिणामी आज निसर्गात ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे.

विशेष म्हणजे पृथ्वीला विनाशाच्या उंबरठ्यावर आणण्यामागे कोणते घटक कारणीभूत आहेत, याचा विचार करण्याचा कोणताही प्रयत्न आजवर झालेला नाही. सध्या उन्हाचा कडाका आणि हवामानात होणारा बदल यामुळे पर्यावरणाच्या रक्षणासाठी गांभीर्याने प्रयत्न केले नाहीत, तर येत्या काही दिवसांत परिस्थिती हाताळणे फार कठीण जाईल, असे संकेत मिळत आहेत. औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेत, घनदाट जंगले नष्ट झाली. त्यामुळे पर्यावरणाचा समतोलही मोठ्या प्रमाणात बिघडला.औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या नव्या संधी खुल्या झाल्या आणि देशाची अर्थव्यवस्थाही बळकट झाली, पण त्याचे नकारात्म पैलू पाहिल्यास आपल्या लक्षात येते की औद्योगिक विकासामुळे आपल्या पर्यावरणाचे प्रचंड नुकसान झाले आहे, ज्याची भरपाई करणे अशक्य आहे. त्या नुकसानीचा परिणाम म्हणून आज परिस्थिती अशी आहे की आपल्या नद्या, समुद्र, पाणी, भूजल, हवा हे सर्व अकल्पनीय पातळीपर्यंत प्रदूषित झाले आहे. प्रत्यक्षात अनेक नद्यांचे अस्तित्वच नाहीसे झाले आहे.रासायनिक घटकांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपीकता सातत्याने कमी होत आहे. कार्बन डाय ऑक्साईडमुळे वातावरणातील तापमानात वाढ झाल्यामुळे डोंगरावरील गोठलेला बर्फ तीव्र वेगाने वितळत आहे, त्यामुळे मोठा अनर्थ घडू शकतो. 2030 पर्यंत तापमानात दोन अंशांपेक्षा जास्त वाढ होईल, असा इशारा शास्त्रज्ञांनी दिला आहे. परिणामी, जिथे समुद्र आणि वातावरणातील आर्द्रतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन होईल, तिथे हिमनद्या वितळल्यामुळे समुद्राच्या पाण्याच्या पातळीत प्रचंड वाढ होईल. यामुळे, हवामान आणि हवामानात मोठे बदल होऊ शकतात, जे गंभीर विनाशाचे कारण बनतील. म्हणूनच शाश्वत विकासाच्या संकल्पनेत अशी प्रक्रिया राबवली जाणे अपेक्षित आहे ज्यामध्ये हे निश्चित केले जाते की वर्तमानपत्रांच्या गरज जा पूर्ण

करण्याबरोबरच भावी पिढीच्या आकांक्षा व आवश्यकता ही पूर्ण करण्यास योग्य अशी परिस्थिती उपलब्ध असावी ज्यावेळी एखादा प्रकल्प राबवला जातो त्यावेळी शाश्वत विकासाच्या संदर्भात खालील मुद्द्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे .

1. तो प्रकल्प जैवविविधतेसाठी योग्य आहे का घातक आहे?
2. यापासून पर्यावरणीय घटकाचे नुकसान तर होणार नाही?
3. या प्रकल्पामुळे लोकसंख्येचा विस्फोट नियंत्रणात आणणे अवघड होणार आहे का?
4. वनक्षेत्राचा विस्तार होईल का?
5. या प्रकल्पामुळे होणाऱ्या लाभ सर्वांना समान आहे का?

या प्रश्नांचा विचार करून जर एखादा प्रकल्प उभा केला जात असेल तर तो नक्कीच पर्यावरणाशी संबंधित हितावह ठरेल.

निष्कर्ष:- विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण यांची सांगड घालण्यासाठी शाश्वत विकास ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील सर्वच राष्ट्रांनी भौतिक आर्थिक विकासाला प्राधान्य देताना नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रचंड अतिरेकी वापर केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास झाला. जागतिकीकरण व नव उदारमतवादी बाजारपेठेतील कार्पोरेट अर्थव्यवस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जंगल यामुळे पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनवलेला आहे शहराची होणारी झपाट्याने वाढ औद्योगीकरण जंगल तोड नद्यांच्या पाण्याचा गैरवापर विषारी रासायनिक द्रव्य इत्यादीमुळे पर्यावरणीय परिसंस्थेमध्ये प्रचंड ढवळाढवळ होत आहे.1980 च्या दशकापासून शाश्वत विकासाची संकल्पना उदयाला येऊन जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी प्रयत्न केले गेले 1972 ची स्टॉक होम परिषद 1992 ची रिओ दि जानिरो परिषद 2002 ची जोन्स वर्ग परिषद , याची साक्ष देतात.जागतिक पातळीवर शाश्वत विकास ही संकल्पना मोठ्या प्रमाणात चर्चिली जात असली तरी शाश्वत विकास साध्य करण्यासाठी जगातील सर्व राष्ट्रांनी व अखिल मानवी समाजाने प्रयत्न करणे आवश्यक आहे तरच शाश्वत विकासाची संकल्पना मूर्त स्वरूपात येऊ शकेल. पर्यावरण संरक्षण ही मानवी आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक बाब आहे म्हणून पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी समाजातील प्रत्येक घटकांने स्वीकारावयास हवी पर्यावरण संरक्षण ही आपल्या श्वासा इतकीच महत्त्वाची गरज आहे. त्यामुळे भारत सरकारने देखील नैसर्गिक साधन संपत्ती व पर्यावरणातील घटकांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी नियम कायदे केलेले आहेत व अमलात आणलेले आहेत अशा कायदेशीर तरतुदीमुळे शाश्वत विकासाला अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे राज्याच्या धोरण विषयक कायद्यात कलम 48 (अ) नुसार प्रत्येक राज्याने आपल्या कक्षेतील पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे कलम 51अ (9) नुसार नैसर्गिक पर्यावरणातील नद्या, ओढे, जंगले व वन्य प्राणी यांचे संरक्षण करणे त्यांची गुणवत्ता वाढविणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आज भारतात पर्यावरण संरक्षण संबंधी 200 पेक्षा जास्त कायदे आहेत. या कायद्याच्या माध्यमातून शासन पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु शासनाबरोबरच पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी नागरिक, स्वयंसेवी संघटना, प्रसार माध्यमे व समाजातील सर्व संघटना, दबाव गट यांचीही आहे. वास्तविक बिघडलेल्या परिस्थितीमध्ये सामान्य जनतेचा काहीही सहभाग नाही. त्यामुळे सर्वसामान्यांना जागरूक करण्याची गरज आहे.

उपाययोजना:-

1. पर्यावरणीय ऱ्हासाचे गांभीर्य लक्षात घेऊन मानवाला या समस्येवर विचारपूर्वक व कृतीपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे त्यासाठी अगोदर ही समस्या अभ्यासपूर्ण पद्धतीने समजून घेऊन काही उपाययोजनांचा विचार करणे आवश्यक आहे
2. आजच्या युवा पिढीमध्ये पर्यावरणाचा ऱ्हास या समस्येची तीव्रता लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे त्यासाठी फक्त पर्यावरण संरक्षण ही मोहीम राबवून चालत नाही तर पर्यावरण संरक्षण ही युवकांची दिनचर्याच बनली पाहिजे.
3. बाल, तरुण, वृद्ध, स्त्री पुरुष या सर्व गटांनी जर पर्यावरण संतुलन राखण्याचा ठाम निर्णय घेतला तर पर्यावरणाचे संवर्धन करणे सहज शक्य आहे

4. पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या घटकात मानव आपले हित पाहत आहे परंतु ते हित नसून मानव जातीचे खूप मोठे नुकसान आहे हे जोपर्यंत तत्वतः आपण स्वीकारणार नाही तोपर्यंत पर्यावरणाचे संवर्धन करणे शक्य नाही
5. पर्यावरणाच्या बिघडत चाललेल्या अवस्थेबद्दल आपण सर्वांनी चिंतित असले पाहिजे, परंतु पर्यावरण संतुलन राखण्यासाठी उपयुक्त अशी जीवनपद्धती विकसित करून त्याचे रक्षण करण्यासाठी तत्पर असले पाहिजे, ही आज आपल्या काळाची मोठी गरज आहे.
6. विद्यार्थी जीवनापासून पर्यावरणाप्रती जागरूकता आणण्यासाठी पर्यावरणाचे शिक्षण औपचारिक व अनौपचारिक रित्या दिले जाणे आवश्यक आहे
7. पर्यावरणीय प्रदूषणाचे नियंत्रण, कचरा व्यवस्थापन, स्वच्छ भारत अभियान समजून घेतले तरच पर्यावरण संरक्षण शक्य आहे
8. नैसर्गिक स्त्रोतांना पर्यायी ऊर्जा स्त्रोतांचा वापर करणे अनिवार्य बनले आहे

संदर्भ:-

1. पर्यावरण शिक्षण : डॉ. प्रकाश सावंत, फडके पब्लिकेशन
2. पर्यावरण अध्ययन : अनुभा कौशिक सी.पी. कौशिक
3. कुलकर्णी किशोर वेद पर्यावरणाचा मोरया प्रकाशन डोंबिवली
4. भराडीया(राठी) पर्यावरण शिक्षण, अरुणा प्रकाशन, लातूर
5. पर्यावरण शास्त्र एक अभ्यास, विराट प्रा तु.म.

Websites:

1. https://www.doubtnut.com/qa-hindi/127307606
2. https://www.punjabkesari.in/aap ki-kalam-se/news/ensure-your-role-in-environmental-protection-813542
3. https://loksanhita.com/other/our-role-in-environmental-protection/

*समाजशास्त्र विभाग, श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय खाडगाव रोड लातूर,
Mobile No: 9881826161, E-mail : anitagkwd18@gmail.com

***

पाणलोट क्षेत्र विकासात पाणी फौंडेशनचे योगदान

*मनिषा बाबुराव भागवत

प्रस्तावना :

जमिनीवर पडणारे पावसांचे सर्व पाणी विशिष्ट नदीला येवून मिळते हे आपणास माहित आहे. ते क्षेत्र म्हणजे त्या नदीच किंवा पाणीसाठयाचे पाणलोट क्षेत्र होय. भूजलाचे चलन वलन जमिनीखाली होत असल्याने भूजल हा कायमच वलय नसलेला विषय आहे. पाण्याचा झालेला अतिप्रमाणातील उपसा आणि त्यामुळे भेडसावणारी भीषण पाणीटंचाई यामुळे भूजल स्त्रोत टिकून ठेवणे आणि पावसाचे पाणी आडवून धरणे आवश्यक आहे. सध्या आपणास पाण्याच्या समस्येची जटिलता पाणीपुरवठा व मागणी यांतील तफावत ही दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसून येते.

आज महाराष्ट राज्याचा विचार केला तर राज्यातील बहुतांश श्शेतीह पर्जन्यावर आधारीत आहे जमिनीची धूप थांबविणे तसेच पडीक जमिन विकसीत करुन ग्रामीण षगातील उत्पन्नाची साधने वाढविणे यासाठी पाणलोट क्षेत्राचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. याद्वारे अनेक शासकीय आणि अशासकीय संस्था आपले योगदान देत असल्याचे दिसून येते.

म्हणजेच एकंदरीत पाणलोट कार्यक्रम योजना राबविण्यासाठी श्शासनाच्या विविध संस्थाप्रमाणे काही अशासकीय संस्था देखील या पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमात सहभागी होवून हा कार्यक्रम लोकाभिमुख करण्याचे प्रयत्न वेळळोवेळी करत आहे.

सन १९९२ मध्ये पाण्याविषयी च्या या व इतर कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शासनाने स्वतंत्र जलसंधारण विभागाची निर्मिती केली आहे. तसेच सामाजिक वनीकरण, लघुपाट बंधारे खाते आणि जलसर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचा समावेश करून तो अधिक सक्षम केला आहे. पाणलोट क्षेत्र विकासामध्ये शाश्वता आणण्यासाठी लोकजागृती करण्याचे अनेक कार्यक्रम देखील राज्य शासनाने हाती घेतले. पाणलोट क्षेत्र विकासातून पाण्याची उपलब्धी वाढते व त्यातून आर्थिक विकास होतो.

संदर्भीय साहित्य परिशीलन :

लॅन्सी फर्नांडिस, पाणी फाऊंडेशनसाठी महत्वाचे म्हणजे त्याचे मार्गदर्शक तत्व आहे, उदा. गावे केवळ जल सुरक्षित आणि समृध्द बनू शकतात, जर ते खरोखरच त्यांच्या स्वत:च्या वाढीचे आणि विकासाचे इंजिन बनले आहे. गावकरी स्वत:च्या विकासाची योजना पाणलोटाच्या कामापासून बनवतात आणि नंतर गावाला समृध्द करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपक्रमामध्ये पदवीधर होतात.

पाणी फाऊंडेशन गावकऱ्यांना प्रशिक्षण देते व वाटर कप स्पर्धेचे आयोजन करते. हे गावकऱ्यांना तांत्रिक साहाय देखील प्रदान करते आणि त्यांना सरकारी अधिकारी आणि योजनांशी संपर्क साधण्यास मदत करते.

उद्दिष्टे :

१) पश्चिम विदर्भातील पाणलोट क्षेत्रामध्ये अशासकीय संस्था मार्फत झालेल्या जलसंधारण कार्याचा अभ्यास करणे.

२) आवर्षण भागातील पाणी टंचाई कमी करण्यात अशासकीय संस्थांच्या भूमीकेचा अभ्यास करणे.

गृहितके :

१) पश्चिम विदर्भ पाणलोट क्षेत्रामध्ये जलसंधारणाच्या कार्यात पाणी फाऊडेंशनचे योगदान अधिक असेल.

२) पश्चिम विदर्भातील आवर्षण ग्रस्त जिल्ह्यांत पाणी फॉऊडेंशन संस्थेचे मदत कार्य अधिक प्रभावी असेल.

संशोधनाचे महत्व :

वाढती लोकसंख्या देशाला भेडसावणारी एक मोठी समस्या आहे. माती प्रदूष, जल प्रदुषण, वायु प्रदुषण, अवर्षण, अतिवृष्टी ही त्या समस्येची आपत्य आहे. यामूळे पृथ्वीवरील पीण्यायोग्य पाण्याचे प्रमाण अल्प होत चालले आहे. भूतलावर उपलब्ध असलेल्या पाण्यापैकी ७० टकके शेतीसाठी, २० टक्के पाणी उद्योगासाठी व १० टक्के पाणी पीण्यासाठी कायमस्वरूपी मिळावे म्हणून पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन महत्वाचे आहे. पाणी व्यवस्थापनामध्ये शासनाला, धोरण कर्त्याला, योजना निर्मात्यांना अशासकीय संस्थाच्या कार्याची माहिती मिळेल. व त्यांना या क्षेत्रातील विकास कामाच्या आखणीत दिशा व गती प्राप्त होईल.

पाणी फाऊंडेशन ची पाणलोट क्षेत्र विकासातील भूमीका :

पाणी फाऊंडेशची स्थापना २०१६ मध्ये 'सत्यमेव जयते' या टी.व्ही. कार्यक्रमाच्या मुख्य टीमने केली. ग्रामीण महाराष्ट्राला दुष्काळ मुक्त करून संपन्न, समृध्द करण्याचा ध्यास त्यांनी घेतलेला आहे. हे गावातील लोकांना एकत्र आणून प्रशिक्षण देतात आणि गावांना दुष्काळा बरोबरच्या या लढ्यात पुढाकार घेण्यासाठी प्रेरणा देते. वाटर कप स्पर्धा घेऊन नागरीकांना पाणी टंचाईच्या समस्येवर मात करण्यासाठी एकजूट व्हायला शिकविते. शासनावर अवलंबून राहण्याचा प्रघात मोडायला शिकविते आणि स्व कष्टाने आपल्या गावाला पाणीदार करण्याचा मान मिळविण्याचा अनुभव देते.

वाटर कप स्पर्धेत सहभागी झालेले महाराष्ट्रातील स्पर्धक गावे २०१६ ते २०१९

वर्ष	२०१६–२०१७	२०१७–२०१८	२०१८–२०१९	२०१९–२०१२०
तालुके	३	३०	७५	७६
गाव	११६	१३२५	४०२५	४७०६

पाणलोट उपचार :

पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरण्यासाठी केलेली कृत्रीम उपाययोजना म्हणजे पाणलोट उपचार होय. उदा. कंटूर बांध,माती नाला बांध पुनरूज्जीवन,कम्पार्टमेंट बांध,ग्रेडेड कंटूर बांध, विहीर पुनर्भरण, गॅबियन स्ट्रक्चर, लहान माती बांध, शोष खड्डा, सलग समतलचर, एल.बी.एस. (अनघड दगडी बांध) माती परीक्षण इत्यादी.

निष्कर्ष :

पाणलोट क्षेत्र विकास म्हणजे जल व मृदासंधारणाची पध्दती होय. वरील पाणलोट उपचार राबविणे हे पाणी फाऊंडेशनचे एकमेव उद्देश आहे. हे साध्य करण्यासाठी शासनाच्या मदतीची अपेक्षा न ठेवता, गावकऱ्यांना प्रशिक्षित करून, एकजूटीतून प्रयत्न करून घेणे, त्यांना शासनाच्या इतर योजनांची माहिती देणे इ. कार्यातून पाणी फाउंडेशनचे पाणलोट क्षेत्रातील योगदान दिसून येते.

सदंर्भ :

१) **लॅन्सी फर्नांडिस (२०२१),** पाणी फाऊंडेशन सामाजिक परिवर्तनासाठी संवादाची शक्ती कशी वापरते, ४ सप्टेंबर २०२१, वेबसाईट– अवॉटरपोर्टल.ओआरजी.

२) ॲग्रोवन सप्ताहिक (सकाळ वृत्तपत्र)

३) लोकराज्य मासिक

४) महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प २०२२–२०२३

*मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम, जि. वाशिम. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

मो.८४४६३५८७७४ E-mail Id :manisha.bhagwat91@gmail.com

***

पर्यावरण शिक्षण – आवश्यकता आणि महत्व

*प्रा. पोकळे एस.एम.

गोषवारा :

पर्यावरण शिक्षण हा पर्यावरणच्या संदर्भात माहिती देणारी आणि माणसाकडुन केल्या जाणा–या विविध कृती बाबत गुणावगुणांच्या आधारावर माहिती देणारी प्रक्रिया आहे. पर्यावरण शिक्षण, प्रत्यक्ष किंवा अपत्यक्षपणे पर्यावरण संरक्षण, संवर्धन आणि सुधारणा या बाबतीत विचार करायला आणि समजून घेण्यास मदत करते. निसर्गाचे माहात्म्य आणि त्यांच्या सगळया साधन संपत्तीचा योग्य त–हेने उपयोग करण्याचे भान प्राचीन काळापासून माणसाला होते. निसर्गाबददलचा आदरभाव त्याच्या जीवनाच्या सामान्य कार्यपध्दतीशी जोडला गेलेला होता. पृथ्वीवरचा प्रत्येक जीव आपले जीवन निसर्गानुकुल पध्दतीनेच व्यतीत करीत होता.

परंतु ज्या पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता आपल्याला भासू लागली आहे. त्या पर्यावरण शिक्षणचा इतिहास हा ५० वर्षाचा आहे. सयुक्त राष्ट्रसंघातर्फे स्वीडनमधल्या स्टॉक होम इथे मानवी पर्यावरणावर १९७२ मध्ये आंतरराष्ट्रीय संम्मेलनावर भरविण्यात आले होते. तो दिवस म्हणजे ५ जून १९७२ म्हणून हा दिवस आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिल म्हणुन साजरा केला जातो. या संम्मेलनाच्या आधारे संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम या समितीच्या सहकार्याने सयुक्त राष्ट्रसंघाच्या शशैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतीक परिषदेने १९७५ पासून आंतरराष्ट्रीय पर्यावरण कार्यक्रम सुरू केला त्यानुसार युगोस्लाव्हियातील बेलग्रेड येथे आंतरराष्ट्रीय पर्यावरण शिक्षण विषयक कार्यशाळा घेण्यात आली, या कार्यशाळेमध्ये बेलग्रेड चार्टर मंजुर करण्यात आले. यामध्ये पर्यावरण शिक्षणाच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला.

रशियात तिबिलिसी शशहरात इ.स. १९७७ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय संम्मेलनात पुन्हा पर्यावरण शिक्षणावर चर्चा होउन त्याची योग्यरित्या अंमलबजावणी करण्याचे निश्चित करण्यात आले. पुढे राष्ट्रीय, क्षेत्रीय, विभागीय स्तरावर कार्यशाळा झाल्या त्यात शिक्षक प्रशिक्षण आणि अभ्यासक्रमाची रचना ठरविण्यात आली. भारतामध्ये १९८५ साली दिल्ली शहरामध्ये पर्यावरण शिक्षणावर आंतरराष्ट्रीय संमेल्लन घेतले. मानवाच्या विविध क्षेत्राशी संबंधीत आहे. याव्दारे आपण आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाची सर्व वैशिष्टे आणि जीवनाच्या विकासासाठी फायदेशीर पैलू जाणून घेउ शशकतो. पर्यावरणीय शिक्षणाव्दारे, जीवनाच्या चांगल्या दर्जा विकासास अनुमती देणारे फायदे प्रदान केले जातात. आपण शोधनिबंधामध्ये पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता, महत्व, उदिष्टे, भारतातील पर्यावरण शिक्षण पर्यावरणाचर नीतीमुल्ये, विकास आणि पर्यावरण, पर्यावरण नीतीचे सुत्रे तसेच पर्यावरण विषयक कायदयाचा आढावा घेणार आहोत.

प्रस्तावना :–

पर्यावरण शिक्षणाचे महत्व आणि त्याची आवश्यकता आज जागतिक स्तरावर सर्वच देशांना सरखीच आवश्यकता निर्माण झालेली आहे. प्रत्येक देश हा वेगवेगळया प्रदुषणाला सामोरे जात असून ज्या वेगाने प्रदुषणाची समस्या निर्माण होत आहेत, त्यांना पुर्वपदावर आणण्यासाठी सुधारणा घढवुन आणणे महत्वाचे आहे. विकसनशील व विकासित देशांच्या पर्यावरण समस्या भिन्न स्वरूपाच्या असल्या तरी पर्यावरण शिक्षण हे प्रदुषण रोखण्याची आवश्यकता आहे. यावर सर्वाचे एकमत आहे. या समस्या लोकसंख्या वाढीमुळे असो की, औद्योगिकरणामुळे असोत त्या आता जटील बनल्या आहेत, यात शंका नाही नैसर्गिक संसाधनांचे बेपुर्वत पध्दतीने शशोषण झाले. त्यामुळे नैसर्गिक खजिनाच लुबाडला जातो आहे. तो पुन्हा उभारला जाणे अशक्यच आहे. पण आता तरी हा विनाश थांबविण्यासाठी हालचाली होत असल्यामुळे निदान आहे, तेवढे तरी पुरवून काटकसरीने उपयोगात आणता येईल.

आपल्याला जर चांगले जीवन जगायचे असेल तर पर्यावरण चांगले ठेवले पाहिजे म्हणजेच पर्यावरण शुध्द आणि चांगले असणे गरजेचे आहे. सगळयांना पर्यावरणाचे महत्च पटले पाहिजे आणि हे महत्व पटविण्यासाठी त्यांच्यात जाणिव निर्माण झाली पाहिजे आणि त्यासाठी पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता आहे. पर्यावरण शिक्षण हे सर्वसामान्य शिक्षण नाही. पर्यावरण समस्या त्यांची कारणे आणि उपाय तसेच भविष्यकाळासाठी घ्यावायाची काळजी यासंबंधी माहिती देणारे शिक्षण म्हणजेच पर्यावरण शिक्षण प्राणीमात्राला व वर्तमानकाळात टिकवून राहवयाचे आणि सुरक्षित भविष्य प्रदान करण्यासाठी पर्यावरण्र शिक्षणाची आवश्यकता आहे.

पर्यावरण शिक्षणाची व्याख्या :–

- ''जैव–भौतिक पर्यावरण आणि त्याच्याशी संबंधीत समस्यांबाबत जाणकार नगरिक निर्माण करणारी प्रक्रिया होय'' **विल्यम स्टॅप**
- ''विद्यार्थ्यांना आपल्या आवतीभोवती असलेल्या मानवनिर्मित व जैविक घटकांचे संरक्षण आणि सकारात्मक कौशल्य निर्माण करणारे शास्त्र महणजेच पर्यावरण शिक्षण होय.''

पर्यावरण शिक्षणाची उदिष्टे :–

१. संपुर्ण पर्यावरण आणि त्याच्याशी संबंधीत घटकांचा अभ्यास करणे.
२. पर्यावरणाशी संबंधीत समस्याविषयी व्यक्ती व समाजाला माहिती मिळण्यासाठी व त्याविषयी आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणे.

संशोधनाची गृहीतके :–

१. पर्यावरणाकडे दुलर्क्ष झाल्यामुळे नैसगिक असमतोल होउन समाजावर त्याचा परिणाम झाला.
२. आज पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता आहे.

संशोधन पध्दती :–

सदरील शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात येणार असून त्यामध्ये प्रामुख्याने क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, शोधनिबंध, इंटरनेट, संदर्भ ग्रंथ आणि इतर माहितीच्या आधारे या विषयाची मांडणी करण्यात येणार आहे.

विकास आणि पर्यावरण शिक्षण :–

औद्योगिक क्रांतीबरोबरच प्रदुषण मोठया प्रमाणवर वाढत असून ते आता क्षणोक्षणी आपला प्रादुर्भाव सोडत असताना दिसत आहे. त्याचा परिणाम सर्व जगाला भोगावा लागत आहे. भविष्यकालीन त्याचे स्परूप आणखीनच हिसंक, विनाशकारी होणार म्हणून पर्यावरण विषयी जनजागृती सर्वच स्तरातून करणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये यांच्या अभ्यासक्रमातून पर्यावरणाचे शिक्षण देण्याची आवश्यकता तसेच तंत्रज्ञान विषयक संस्था, औद्योगिक संस्था या कामासाठी निश्चितपणे सहाय्यभूत ठरतील.

पर्यावरण नीतीमुल्ये :–

पर्यावरण प्रदुषण किंवा निसर्ग परिसराचे प्रदुषणाचा अभ्यास करत असताना तंत्रज्ञानाची बेसुमार वाढ, वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिक वसाहत यामध्ये सातत्याने होत असलेली वाढ यामुळे प्रदुषण वाढत आहे. माणसाच्या आत्मकेंद्रित स्वार्थी वृत्तीमुळे तो आपल्या भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी तो निसर्गाशी आपले असलेले नाते विसरूनन तो चांगले पर्यावरण नष्ट करू लागला आहे. जीवसृष्टीचा नास म्हणजे आपला नाश हे अटळ सत्य असतानी तो आपल्या भौतिक सुखामागे धावत असून त्याला ख–या आंतरिक समाधानाची मनशांतीची जाणीव नाही. हेच सारे प्रश्न निर्माण होण्याचे मुख्य कारण आहे. म्हणुन पुन्हा मानव आणि सृष्टी यांचे नाते जुळवून आणायचे असेल तर पर्यावरण नितीचा मुलभूत दृष्टीकोण स्विकाराला पाहिजे.

१. पर्यावरणाकडे पाहताना एक संकुचित दृष्टीकोनातून न पहता फक्त माझे घर, ग्राम, राज्य किंवा माझा देश असा विचार करणे चुकीचे आहे. कारण जो प्रश्न प्रृथ्वीवरील सर्व जीवप्राण्याच्या दृष्टीने लाभदायक आहे. अशा प्रश्नांचा विचार जागतिक पातळीवरून होणे महत्वाचे असते. हा पर्यावरण नितीचा पहिला नियम आहे.
२. निसर्ग हा मुलस्त्रोत आहे. त्याचे सर्व प्राणीमात्रासाठी योग्य व्यवस्थापन करणे मानवाचे कर्तव्य आहे.
३. मानवाच्या मुलभूत गरजा पुर्ण होण्यासाठी निसर्गाचा समतोल राहणे महत्वाचे असते, कारण निसर्गातील प्रत्येक सजीव आणि निर्जीव घटकांची मानवाला गरज आहे. तशी सर्वांना याची गरज आहे. याचे भान ठेवून निसर्गाचा उपभोग घेतला पाहिजे.
४. पर्यावरण नीतीचा अवलंब करणे, ती पाळणे आता आवश्यक झाले आहे. नीती म्हणजे कायदा नव्हे, कायदा न पाळणारा सापडला तर त्याला शिक्षा होत असते. नीती म्हणजे स्वत:वर स्वत: घालून घेतलेले बंधन, कारण यामध्ये सामाजिक मुल्याचा विचार गृहित असतो. निसर्ग आणि माणूस यांचे नाते आई–मुलाचे असून याच संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी माणसाची आहे. हे विसरता कामा नये.

पर्यावरण नीतीचे पंचवीस सुत्रेः–

पर्यावरणाचे संगोपन आणि संवर्धनसाठी जनजागृती आवश्यक असून पर्यावरण रक्षणाचे काम अनेक देशातून चांगल्या रीतीने पार पाडले जात आहे. नैसर्गिक संसाधनाचा मर्यादित वापर करून विकास साध्य करावयाचा असेत तर सर्व मानव जातींनी पर्यावरण संरक्षणात सहभाग नोंदवणे महत्वाचे आहे. याच अनुषंगाने सुप्रसिध्द पर्यावरणतज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी त्यांच्या संपुर्ण आयुष्यात पर्यावरणविषयक सखोल अभ्यास आणि चिंतन करून पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांनी कसे वागावे आणि शासनाचे धोरण काय पाहिजे स्वयंसेवी संस्था आणि व्यक्ती यांनी काय करायला हवे याबदल पर्यावरण नीतीची पंचवीस सुत्रे मांडली आहेत. यामधून प्रत्येक निसर्ग प्रेमी आणि सर्वसामान्य व्यक्तीला संस्था आणि शासन यांना मार्गदर्शन केले आहे. ती पुढीलप्रमाणे.

१. डोंगर उतारावर शेती बंद करून त्याऐवजी खुप वर्ष जगणारे झाडे आणि चा–याचे पिके लावणे.
२. चराउ रांनाचे आणि वनांचे गावक–यांचा सहभाग आणि संरक्षण करून जळण आणि चा–याची व्यवस्था पुर्ण होईल अशा प्रकारची व्यवस्था तयार करणे.
३. कमी प्रतीच्या वनांमध्ये नवीन झाडे लावण्याचे काम गावक–यांना देणे.
४. बेकायदेशीर जंगलतोड, चो–या, शिकार थांबविण्यासाठी गावांना अनुदान देउन संरक्षणाच्या कामासाठी प्रोत्साहन देणे.
५. वेगवेगळया वनउद्योगांना दिलेल्या मान्यात बंद करणे.
६. वनांवर कच्चा मालावर सबसिडी न देता उद्योगांकडुन त्या मालाची पुर्ण किंमत वसुल करणे.
७. गावक–यांना कच्च्या मालाचे उत्पादन करण्यासाठी सोयी सवलती देउन प्रोत्साहन देणे.
८. जंगलाचे व्यवस्थापन ठेकेदारांना न देता जंगल कामगार सहकारी संस्थांना देणे.
९. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम विशेषत्वाने राबवुन त्यात दीर्घायुष्य झाडे आणि चा–याची पिके लावणे.
१०. विविध विकास प्रकल्पाकडे विस्थापित झालेल्या डोंगरउतारावरील जमीन न देणे.
११. काजु,रबर यांची लागवड करताना आधीची झाडे टिकवणे.
१२. जनावरांना गोठयातच चारा घालणे त्यासाठी चारा उत्पादन वाढविणे.
१३. बुरूडा सारख्या कामगारांनर कच्चमाल देण्यासाठी प्राधान्य देणे. वेत यासारखी पिके त्यांनी स्वत: लावण्यास प्रोत्साहित करणे.
१४. वैशिष्टयपुर्ण, दुर्मिळ वनस्पती, पक्षी–प्राणी व स्थानिक माणसे त्यांची परंपरा, जीवनपध्दती टिकविण्यासाठी कार्यक्रम आखणे आणि त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.
१५. शेती, फलोत्पादनात रासायनिक पदार्थाचा वापर कमी करून सेंद्रिय खतांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
१६. शेतीत विविध पिकांच्या जाती टिकवुन ठेवणे.
१७. पाणलोट क्षेत्र विकास अंतर्गत पाण्याच्या साठयात मत्सय उत्पादन करण्यासाठी कार्यक्रम सुरू करणे.
१८. जलविद्युत निर्मितीसाठी प्रामुख्याने लहान, लहान प्रकल्प हाती घेणे.
१९. औद्योगिक प्रदुषणावर पुर्ण नियंत्रणासाठी कडक कायदे करून त्यांची योग्य अंमलबजावणी करणे.
२०. शेतजमीन व गाळजमीन क्षेत्र खाणींना बंदी करणे.
२१. खाणी बंद केल्यावर त्यासंपुर्ण भागात स्वखर्चाने वनीकरण करण्याची सक्ती खाण मालकावर करणे.
२२. ग्रामीण भागात जळणाचा काटकसरीने वापर व्हावा आणि माणसाच्या आरोग्यावर होणारा अनिष्ट परिणाम टाळावा म्हणून निर्धुर चुल आणि गोबरगॅस यांचा वापर करण्याकडे लक्ष केंद्रित करणे.
२३. आरोग्य शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणे.
२४. शाळा,कॉलेज,विद्यापीठ वैज्ञानिक संस्था व स्वयंसेवी संस्था यांच्या पर्यावरण कार्यक्रम सक्रिय सहभाग वाढविणे.
२५. ग्रामीण आणि शहरी मुला–मुलीवर निसर्ग संस्कार करणे.

पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता :–

१. आपल्या या सौर मंडळात पृथ्वी हा एकच गृह असा आहे की,ज्यावर जीवसृष्टी आहे. त्याला नष्ट होण्यापासून वाचवयाचे आहे. आणि जीवनमात्राला सुख उपलब्ध करून द्यावयाचे आहे.

२. लोकसंख्या ज्या प्रचंड वेगाने वाढते आहे. त्यामुळे निसर्गचक्र डळमळित झाले आहे. हे निसर्गचक्र सुरळित चालवण्यासाठी आणि भावी पिढयासाठी, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी लोकसंख्या नियंत्रित करायला हवी.

३. निसर्गातील संसाधनाचा साठा हा सुध्दा शेवटी मर्यादीतच आहे. त्याचा उपयोग उचित आणि विवेकबुध्दीने व्हावा याची जाणिव लोकांना करून देणे आवश्यक आहे.

४. वृक्ष वनस्पतीच केवळ कार्बनडॉयऑक्साईडचे रूपांतर प्राणवायुत करू शकतात. म्हणून हवेत प्राणवायुचे आवश्यक प्रमाण राहायला हवे आणि कार्बन डॉयऑक्साईडचे प्रमाण वाढल्यास पर्यावरणाचा समतोल टळेल त्यासाठी झाडे लावणे आणि जगवुन मोठी करणे आवश्यक असते. याची माहिती लोकांना समजण्यासाठी करा व करू नका यातून सांगणे महत्वाचे आहे.

५. औद्योगिक क्रांती अत्याधुनिक तंत्रज्ञान–विज्ञानामुळे सुख–सुंविधांची उपकरणे प्रचंड प्रमाणात येउ लागल्याने विविध प्रकारचे प्रदुषण सगळीकडेच पसरले आहे. त्याचे नियंत्रण करण्यासाठी, पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी विविध कार्यक्रम, योजना हाती घेणे आवश्यक आहे. याची जाणीव पर्यावरण शिक्षणामुळेच होणार आहे.

पर्यावरण विषयक कायदे:–

१. जल (प्रदुषण,निवारण आणि नियंत्रण) अधिनियम, १९७४
२. संशोधित अधिनियम, १९७८
३. वायू हवा (प्रदुषण निवारण आणि नियंत्रण) अधिनियम, १९८१
४. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२
५. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९४६

इत्यादी कायदे आणि भारतीय राज्यघटनेचे परिच्छेद २१,४८ अ, ५१ अ (जी) यांचा आधार घेवुन पर्यावरणाचे प्रदुषण रोखण्याचा प्रयत्न करीत असतात.

सारांश :

पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी कायदयाचा आधार घेण्यापेक्षा समाजामध्ये पर्यावरणविषयी जागृत होणे महत्वाचे असून पर्यावरण संरक्षण करण्यासाठी जागतिक पातळीवर नवीन धोरण आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. पर्यावरणाचे महत्व लक्षात घेउन पर्यावरण शिक्षण हे शाळा, महाविद्यालय यांच्या माध्यमातून देवून पर्यावरण प्रेमी पिढी निर्माण करण्याची आवश्यकता आहे. विकास आणि पर्यावरण शिक्षण, पर्यावरणाची नीतीमुल्ये, पर्यावरण नीतीची पंचवीस सुत्रे या सर्व बाबीचा विचार समाजामध्ये व जागतिक पातळीवर होणे अत्यंत महत्वाचे. सुपर्ण मानवी जीवनाचा समतोल राखायचा असेल पर्यावरणाचे संतुलन असणे आवश्यक आहे. त्यामुळे आज पर्यावरण शिक्षणाची आवश्यकता निमार्ण झालेली आहे.

संदर्भ ग्रंथ :–

१. डॉ. माधव गाडगीळ, इंटरनेट निसर्गनियोजन लोकसहभाग.
२. डॉ. बी.पी. वांगीकर– पर्यावरणशास्त्र, कैलास पब्लीकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद जुलै,२००४
३. डॉ. जी.एम. कुलकर्णी, प्रा. पी.पी. दीक्षित, विद्या बुक्स पब्लीकेशन औरंगपुरा, औरंगाबाद जुन,२००४
४. सुनिल पाटील–लढा दुष्काळाशी–सकाळ पेपर्स प्रा.लि. ५९५, बुधवार पेठ, पुणे,२०१३
५. डॉ.रामचंद्र साबळे –शेती आणि हवामान बदल, सकाळ मीडीयर प्रा.लि, ५९५ बुधवार पेठ, पुणे २०१४.
६. जी.एस.भल्ला, अनुवाद मारोती तगमपुरे संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडीया नेहरू भवन, ५ इन्स्टियुशनल एरिया, फेज II, वसंत कुंज, नवी दिल्ली.

***समाजशास्त्र विभाग, प्रमुख, लो.टिळक महाविद्यालय वडवणी, sudhirpokale2011@gmail.com**

***

पाणलोट विकासात पुण्यातील अशासकीय संस्थांचे योगदान (तहान, जिवीत नदी संस्था).

*डॉ. माधवी रेणावीकर,

Abstract

पेपरचे नाव – संशोधन समिती क्रमांक १ महाराष्ट्र सातत्य आणि परिवर्तन पाणलोट विकासात शासकीय अशासकीय संस्थांचे योगदान (नाम Foundation, पाणी Foundation, जलयुक्त शिवार इत्यादी योजना) पाणलोट विकासात पुण्यातील अशासकीय संस्थांचे योगदान (तहान,जिवीत नदी संस्था).

संशोधन पध्दती – प्रस्तुत शोधनिबंधासाठी उपयोगात आणलेली साधनसामग्री दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. त्यामध्ये प्रकाशित ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेटवरील उपलब्ध माहितीचा उपयोग केला आहे. पुण्यामध्ये पर्यावरणा संदर्भात काम करणाऱ्या अशासकीय संस्थातील स्वयंसेवकांशी संवाद साधून मिळालेल्या माहितीचा उपयोग केला आहे.

पाणलोट, शासकीय आणि अशासकीय संस्था या संकल्पना प्रस्तुत शोधनिबंधात वापरल्या आहेत.

पुणे शहरातील तहान, जिवित नदी (Living river fooundation) या दोन अशासकीय संस्थांच्या कार्याचा अभ्यास केला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे जलयुक्त शिवार अभियान, पाणी, नाम फाऊंडेशन या संस्थांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

व्याख्या –

पाणलोट – पाणलोट म्हणजे भृपृष्ठाचे /जमिनीचे असे क्षेत्र ज्यावर पडणारे पावसाचे सर्व पाणी एखादया विशिष्ट नदीस /पाणीसाठयास येऊन मिळते, ते क्षेत्र म्हणजे त्या नदीचे किंवा पाणी साठयाचे पाणलोट क्षेत्र होय. पाणलोट विकास कार्यक्रम मृद आणि जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासनाने १९९२ मध्ये सुरू केला.

शासकीय संस्था – या संस्था शासनाव्दारे चालविल्या जातात.

अशासकीय संस्था – यांना स्वंयसेवी संस्था असेही म्हटले जाते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, बौध्दिक इत्यादी क्षेत्रात लोककल्याणार्थ कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होत. या संस्थांची संघटना एका विशिष्ट हेतूने व उद्दिष्टासाठी केलेली असते आणि त्यात काम करणारे स्वयंसेवक स्वेच्छेने व नि;स्वार्थीपणे कोणतेही काम व मदत करण्यास तयार असतात. अशासकीय संस्था म्हणजे खाजगी स्वयंसेवी संस्था जिचा मुख्य हेतू सामाजिक कार्ये करणे हा असतो. ही संघटना कोणीही चालवू शकते. या संस्थांचा मुख्य विकास अमेरिकेमध्ये झाला. कारण अमेरिकेमध्ये अशी खूप सामाजिक कार्ये केली जातात जी शासनाव्दारे न होता काही संस्थांव्दारे होतात.

अशासकीय संस्थांचे दोन प्रकार आहेत – १) नोंदणीकृत संस्था – अशा संस्थांना शासनाकडूनही मदत होते. अशा संस्थांमध्ये ट्रस्ट, कंपनी, सोसायटी यांचा समावेश होतो.

२) नोंदणी न केलेल्या संस्था – अशा संस्थांची शासनाकडे कोणतीही नोंद नसते. अशा संस्थांशी शासनाचा कोणताही संबंध नसतो.

निष्कर्ष – १) पाणलोट विकासासाठी शासकीय आणि अशासकीय संस्था कार्य करत आहेत. पण ते पुरेसे नाहीत. वैयक्तिक पातळीवर प्रत्येकाने यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२) विकासाच्या कोणत्याही योजनेमध्ये लोकसहभाग महत्वाची भूमिका पार पाडतो. पाणलोट व्यवस्थापन आणि विकासामध्ये लोकसहभाग वाढविणे आवश्यक आहे. प्रत्येक गोष्ट शासनाने केली पाहिजे हा आग्रह सोडून दिला पाहिजे. महाराष्ट्रातील दुष्काळी गावांमध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडूनही पाणी वाहून गेल्यामुळे पाण्याची चणचण भासणाऱ्या गावांमध्ये स्थानिक लोक पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यशस्वी झाले आहेत. हे राळेगणसिध्दी, आंदगाव, नायगाव, घील गाव येथे झालेल्या सामुदायिक प्रयत्नांवरून सिध्द झाले आहे. 'लहान गोष्टी सुंदर आणि औदार्यशील' हे या प्रयोगांवरून दिसून आले.

३) मोठी आणि मध्यम धरणे बांधण्यापेक्षा लघुप्रकल्प हाती घेणे महत्वाचे आहे.

४) भारत जी २० परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवित असताना 'द सत्संग फाऊंडेशन' आणि 'सकाळ माध्यम समूहाच्या' सहकार्यातून 'सिव्हिल २०' गटातील सदस्यांसाठी 'नद्यांचे पूर्नरूज्जीवन आणि पाणी' या विषयावर दोन दिवसीय जल परिषद पुण्यात आयोजित करण्यात आली. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी जलतज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनीही लोकसहभागातून जलसंवर्धन आवश्यक आहे असे मत मांडले. तसेच नद्यांच्या पुर्नरूज्जीवनाचे महत्व अधोरेखीत केले. इतर तज्ञांनी रिव्हर वॉक, स्थानिक लोकांच्या ज्ञानाचा उपयोग करण्यावर भर दिला. यावरून पाणलोट विकासातील लोकसहभागाचे महत्व अधोरेखित होते.

प्रास्ताविक :

भारतामध्ये साधनसंपत्तीचा प्रश्न त्यामध्ये पाण्याचा प्रश्न हा ज्वलंत प्रश्न आहे. भारतामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त शेती पावसावर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील जवळजवळ ८० ते ८५ टक्के शेती मोसमी पावसाच्या लहरींवर अवलंबून आहे.

Indian Council of Agricultural Research नुसार महाराष्ट्रातील १७ टक्के जमिन सिंचनाखाली आहे. शेती उत्पादनामध्ये पाणी हा महत्वाचा घटक आहे. मानव आणि मानवेतर प्राण्यांच्या चिरंजीवी जीवनासाठी पाणी गरजेचे आहे. देशाच्या आर्थिक विकासामध्ये पाणी हा घटक महत्वाची भूमिका बजावितो. विकासासाठी पाण्याचा वापर पूर्ण कार्यक्षमतेने होणे आवश्यक आहे.

पाणी हे गुंतागुंतीचे स्त्रोत आहे. अविनाशी, बदल करता येण्याजोगे स्त्रोत म्हणून पाण्याकडे पाहिले जाते. पाण्याचे चक्र कायम चालू ठेवण्यात परिसंस्था महत्वाची भूमिका बजावते पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पाण्याचे चक्र कायम चालू ठेवण्यासाठी जितके पाणी पृथ्वीच्या पृष्ठभागावरून जाते तितकेच ते परत पृथ्वीमध्ये येणे आवश्यक असते. हे सूर्य, वारा आणि जमिनीचा पृष्ठभाग यावर अवलंबुन असते.

औद्योगिकीकरण, नागरीकरण पक्रियेमुळे तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याचे नियोजन करणे तसेच पाणलोट विकासाची गरज भासू लागली जीवनामध्ये पाण्याला अनेक प्रकारे महत्व आहे. समाजाची संरचना पाण्यावर अवलंबून असते. पाणी नियोजनातील महत्वाचा भाग म्हणजे संरचनात्मक सुविधांचा वापर करून पाणी साठवून सोयीनुसार त्याचा वापर करून, त्यावर प्रक्रिया करून मागणी आणि पुरवठा यामध्ये समन्वय साधणे. घरगुती कामांसाठी, उद्योगधंध्यामध्ये, उर्जा तयार करण्यासाठी, करमणुकीसाठी मानव पाण्याचा उपयोग करतो. यापैकी सर्वात जास्त पाणी शेतीसाठी लागते. आपल्याला केल्या जाण्याऱ्या अन्नपुरवठ्यापैकी ९० टक्के पुरवठा शेतीकडून केला जातो. औद्योगिकीकरण शेती क्षेत्राशी निगडीत असते. त्यामुळे शेतीच्या विकासासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले जातात कावे काढणे ही त्यापैकी महत्वाचा प्रयत्न होय. परंतु जास्तीत जास्त जमिनींनी कालव्यांचे पाणी देणे खर्चिक आहे. मोठया धरणांमुळे सामाजिक आणि पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतात. मोठया प्रमाणावर विस्थापित झालेल्या लोकसंख्येचे पुनर्वसन कोठे करावयाचे हा प्रश्न निर्माण होतो.

खाजगी, कमी खोल विहीर खणून शेतीला पाणीपुरवठा करता येतो. जेथे विहीर खोदणे शक्य नाही तेथे वाहून जाणारे पाणी साठविण्यासाठी शेततळे तयार करून पाणी साठविता येते. जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी, मत्स उत्पादनासाठी, पिण्यासाठी, घरगुती उपयोगासाठी व जनावरांना पाणी पिण्यासाठी शेत तळयाचा उपयोग होतो. 'मागेल त्याला शेततळे' या योजनेअंतर्गत यासाठी महाराष्ट्र शासनाव्दारे अनुदान दिले जाते. शेततळयामुळे शेतामध्ये पाणी साठत नाही आणि जमिनीखालील पाण्याचा ऱ्हासही होत नाही.

संशोधन पध्दती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी उपयोगात आणलेली साधनसामग्री दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. त्यामध्ये प्रकाशित ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेख, इंटरनेटवरील उपलब्ध माहितीचा उपयोग केला आहे. पुण्यामध्ये पर्यावरणा संदर्भात काम करणाऱ्या अशासकीय संस्थातील स्वयंसेवकांशी संवाद साधून मिळालेल्या माहितीचा उपयोग केला आहे. पाणलोट, शासकीय आणि अशासकीय संस्था या संकल्पना प्रस्तुत शोधनिबंधात वापरल्या आहेत.

पुणे शहरातील तहान, जिवित नदी (Living river fooundation) या दोन अशासकीय संस्थांच्या कार्याचा अभ्यास केला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचे जलयुक्त शिवार अभियान, पाणी, नाम फाऊंडेशन या संस्थांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

पाणलोट – पाणलोट म्हणजे भृपृष्ठाचे/जमिनीचे असे क्षेत्र ज्यावर पडणारे पावसाचे सर्व पाणी एखादया विशिष्ट नदीस/पाणीसाठ्यास येऊन मिळते, ते क्षेत्र म्हणजे त्या नदीचे किंवा पाणी साठयाचे पाणलोट क्षेत्र होय. पाणलोट विकास कार्यक्रम मृद आणि जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासनाने १९९२ मध्ये सुरू केला.

पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाची उद्दिष्टे –

१) योग्य भूमि उपयोजन करून जमिनीची धूप थांबवून व मृदेची उत्पादकता वाढवून शेतकऱ्याचा आर्थिक विकास करणे.

२) पाणलोट क्षेत्रात जलसंधारण करणे.

३) नैसर्गिक आपत्ती, पूर, अवर्षण, भूमिपात इत्यादिंना आळा घालणे.

४) आर्थिक विकासातून ग्रामीण विकास करणे.

शासकीय संस्था – या संस्था शासनाव्दारे चालविल्या जातात.

अशासकीय संस्था – यांना स्वंयसेवी संस्था असेही म्हटले जाते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, बौध्दिक इत्यादी क्षेत्रात लोककल्याणार्थ कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होत. या संस्थांची संघटना एका विशिष्ट हेतूने व उद्दिष्टासाठी केलेली असते आणि त्यात काम करणारे स्वयंसेवक स्वेच्छेने व नि;स्वार्थीपणे कोणतेही काम व मदत करण्यास तयार असतात. अशासकीय संस्था म्हणजे खाजगी स्वयंसेवी संस्था जिचा मुख्य हेतू सामाजिक कार्ये करणे हा असतो. ही संघटना कोणीही चालवू शकते. या संस्थांचा मुख्य विकास अमेरिकेमध्ये झाला. कारण अमेरिकेमध्ये अशी खूप सामाजिक कार्ये केली जातात जी शासनाव्दारे न होता काही संस्थांव्दारे होतात.

अशासकीय संस्थांचे दोन प्रकार आहेत. १) नोंदणीकृत संस्था – अशा संस्थांना शासनाकडूनही मदत होते. अशा संस्थांमध्ये ट्रस्ट, कंपनी, सोसायटी यांचा समावेश होतो. २) नोंदणी न केलेल्या संस्था – अशा संस्थांची शासनाकडे कोणतीही नोंद नसते. अशा संस्थांशी शासनाचा कोणताही संबंध नसतो.

पाणलोट विकासात महाराष्ट्र शासनाचे योगदान – जलयुक्त शिवार अभियान – महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे या अभियानाचे मुख्य ध्येय म्हणजे 'पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब माझ्या मालकीचा आहे आणि तो माझ्याच जमिनीत मुरला पाहिजे' असा विश्वास शेतकऱ्यामध्ये निर्माण करणे. शासनाच्या योजनेमध्ये लोकांचा सहभाग हे या अभियानाचे वैशिष्टय आहे. २०१९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेव्दारे एकात्मिक पध्दतीने शाश्वत शेतीसाठी पाणी आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले आहे.

जलयुक्त शिवार अभियानाचे काही प्रमुख उद्येश –

१) पावसाचे पाण गावाच्या शिवारातच अडविणे.
२) भूगर्भातील पाणी पातळीत वाढ करणे.
३) राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करून शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे, सर्वांना पुरेसे पाणी उपलब्ध करण्याची शाश्वतता निर्माण करणे.
४) भूजल अधिनियमाची अंमलबजावणी
५) विकेंद्रीत पाणीसाठा निर्माण करणे.
६) पाणी साठवण क्षमता निर्माण करणरी नवीन कामे हाती घेणे.
७) अस्तित्वात असलेले व निकामी झालेले बंधारे, गावतलाव, पाझरतलाव, सिमेंट बंधारे इत्यादी जलस्त्रोतांची साठवण क्षमता वाढविणे.
८) जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून पाणीसाठा वाढविणे.
९) पाण्याच्या ताळेबंदाबाबत आणि कार्यक्षम वापराबाबत प्रभावी जनजागृती तसेच वृक्षलागवडीस प्राधान्य देणे.

या योजनेनुसार ३९ लाख हेक्टर शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्या होत्या. जलयुक्त शिवार अभियान २० सुरू करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. तीन वर्षात ५ हजार गावे जलसमृध्द करण्यात येणार आहेत.

नाम फाऊडेंशन –

सप्टेंबर २०१५ मध्ये नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांनी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी 'नाम' ही संस्था सुरू केली. शेतकऱ्यांमधील अस्वस्थता दूर करण्यासाठी मानवी चैतन्य निर्माण करण्यामधून नामचे रूपांतर संस्थेतून चळवळीमध्ये झाले. ग्रामीण भागातील दुष्काळ, वाढत्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि सततचा पाणीप्रश्न या समस्यांवर उपाययोजना करणे हे नामचे ध्येय आहे. शेतकऱ्यांना शिक्षण देणे, जमिनी खालील पाणी आणि साठविलेल्या पाण्यामध्ये समतोल निर्माण करणे, सध्या उपलब्ध असलेल्या कालव्यांचे पुररूज्जीवन करणे हे उपाय केले जातात.

यापैकी अनेक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत. वंचित गावांचा विकास आणि देशातील लोकांचा आनंद वाढविणे ह 'नाम' चे ध्येय आहे. संरचना, शिक्षण, रोजगार, अन्न इत्यादीसारख्या विविध मुदयांवर काम करून ग्रामीण क्षेत्रात चिरंजीवी आणि प्रगतीकारक समाज निर्माण करणे हे 'नाम' चे स्वप्न आहे.

संस्थेचे कार्य – शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत देणे तसेच झाडे लावणे, शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन, कृषी केंद्रे, रोजगार केंद्रे असे विविध उपक्रम ही संस्था राबविते आहे. या संस्थेने धोंदलगाव (ता.वैजापूर जि. संभाजीनगर) आणि आमला (जि.वर्धा) ही गावे दत्तक घेतली आहेत. परभणी जिल्हातील झरी या गावात जलसंधारणची कामे 'नाम' ने लोकसहभागातून केली आहेत.

पाणी फाऊडेंशन – आमिर खान आणि किरण राव यांनी पाणी फाऊडेंशन ही संस्था २०१६ मध्ये ना नफा तत्वावर स्थापन केलेली संस्था आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील जनतेला पाण्याच्या तीव्र टंचाईशी सामना करता यावा यासाठी सत्यमेव जयते या टीव्ही माहिकेच्या टीमने पुढाकार घेतला. पाण्याचा तुटवडा हे मानवनिर्मित संकट आहे त्यामुळे या संकटातून बाहेर येण्यासाठी लोकांनीच प्रयत्न करायला हवेत. दुष्काळ दूर करण्यासाठी या मोहिमेत लोकांना सहभागी करून घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि प्रशिक्षित करण्यासाठी संवादाचे माध्यम पुरविणे हे पाणी फाऊडेंशनचे ध्येय आहे. ही संस्था सध्या शास्त्रशुध्द पाणलोट व्यवस्थापन, नेतृत्वगुण आणि समाजसंघटन इत्यादीबाबत प्रशिक्षण देत आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य दुष्काळी भागात संस्थेचे काम चालू आहे. प्रशिक्षणात पाणलोट व्यवस्थापनाविषयी शिकलेली कौशल्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी गावकऱ्यांना दिलेली प्रेरणा म्हणून २०१६ यावर्षी 'सत्यमेव जयते वॉटर कॅम्प' स्पर्धा घेण्यात आली. या संस्थेतर्फे महाराष्ट्रात अनेक जिल्हयात कामे चालू आहेत. पाणलोट विकासासाठी काम करणाऱ्या पुण्यातील अशासकीय संस्था तहान आणि जिवीत नदी.

तहान संस्था – अनेकदा नवीन काही माहिती हवी असेल तर ती मिळविण्यासाठी आपण इंटरनेटचा आधार घेतो. आज समाजमाध्यमांनी आपल्या दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल केले आहेत. आज इंटरनेटवर खरेदी आहे. सल्लामसलत आहे. सामाजिक जाणिवेतून सुरू झालेले काम आहे आणि महाराष्ट्राच्या दुष्काळग्रस्त भागात पाणी पोहोचविण्यासाठी युवकांनी एक चळवळ समाज माध्यमांवर सुरू केली अल्पावधीतच ती लोकप्रिय झाली आहे.

तहान ही संस्था २०१६ पासून जलसंधारणाच्या क्षेत्रात काम करते आहे. लोकांना पिण्याचे स्वच्छ पाणी पुरवत आहे. खेडयांमध्ये तसेच शहरात जलस्त्रोतांचे नियोजन आणि हरित आच्छादन वाढविण्याचे काम करत आहे. पृथ्वीवर कोणीही तहानलेले राहू नये हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. मानवी अस्तित्वासाठीचे पाच प्रमुख घटक आहेत. त्यापैकी एक म्हणजे पाणी कमी प्रमाणात पडणाऱ्या पावसामुळे महाराष्ट्रात पाण्याचा प्रश्न भिषण आहे. त्यामुळे भूजलाची पातळी कमी झाली आहे.

संस्थेचे कार्य – पाण्याशी निगडीत कार्ये –

१) पावसाचे पाणी साठविणे. २) वॉटर वेल्लो व्हिल.

३) वॉटर प्युरिफायर, फिल्टर पुरविणे. ४) Grey Water Recycling.

वृक्षांशी निगडीत कार्ये –

१) वृक्षारोपण २) वृक्ष दत्तक घेणे.

३) नागरी भागात उद्याने तयार करणे. ४) रोपांना पाणी देणे.

पावसाचे पाणी साठविणे –

मानवाचे जीवन पाण्यावर अवलंबून आहे आणि पाण्याची उपलब्धता मानवावर अवलंबून आहे. त्यासाठी पावसाचे पाणी साठविणे महत्वाचे आहे. पावसाचे पाणी गोळा करून ते साठवून त्याचा उपयोग मानव, मानवेतर प्राणी, शेती आणि कारखन्यांसाठी होतो. पावसाचे पाणी वाहून जाण्याआधी गोळा केले जाते. त्यानंतर भूजलाचे कृत्रिमरित्या प्रक्रियेव्दारे पुर्नभरण केले जाते. भारतासारख्या विकसनशील देशासाठी ही पध्दत अतिशय उपयुक्त आहे. या पध्दतीने पाणी साठविण्यासाठी संस्था मदत करते.

वॉटर वेल्लो व्हिल –

युनिसेफच्या निरीक्षणानुसार रोज स्त्रियांचा आणि मुलींचा पाणी भरण्यामध्ये खूप वेळ जातो. ग्रामीण भागातील मुली आणि स्त्रिया उन्हाचे चटके सोसत डोक्यावर जड हंडे, कळशा, घागरी घेऊन पाणी भरतात. तहान संस्थेच्या वॉटर वेल्लो व्हीलने पाणी आणण्याचा भार हलका केला आहे. संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. नीलीमा मोरे यांच्या मते 'वेल्स ऑन व्हिल्स' नावाचे साधन निलकमल कंपनीने विकसीत केले आहे. त्याव्दारे एका वेळेस ४५ लिटर पाणी एका हॅडलच्या सहाय्याने सहजपणे कमी श्रमात ढकलत घरी वाहून नेता येते. आपल्या लहान मुलांना घरी सोडून आदिवासी भागातील माता दूरवरून डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणतात. अशक्त महिलांना दूरवरून पाणी आणताना त्रास होतो. उदगीर तालूक्यातील डोंगर शेळकी येथे तसेच पारनेर तालुक्यातील बाभूळवाडेच्या आदिवासी वस्तीमध्ये तहान संस्थेने या व्हिल्सचे वाटप केले आहे.

सार्वजनिक आरोग्यासाठी स्वच्छ पाणी महत्वाचे आहे. अस्वच्छ पाण्यामुळे कीडनीमध्ये खडा होणे, लिव्हर खराब होण, त्वचारोगासारखे आजार होतात. यावर उपाय म्हणून तहान संस्थेतर्फे ठाणे जिल्हयातील गोरेगाव येथे जिल्हापरिषदेच्या शाळेत वॉटर प्युरिफायर आणि गावातील काही घरांमध्ये कॅडल वॉटर फिल्टर बसविले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांना शुध्द पाणी उपलब्ध होते आहे. न्हाणीघर, शॉवर्स, टब आणि वॉशिंग मशिनमध्ये वापरलेल्या पाण्याचा पुर्नवापर झाडांसाठी करावा यासाठी संस्था प्रयत्न, जागरूकता निर्माण करते. झाडांसाठी हे पाणी उत्तम खत म्हणून काम करते. पण जलाशयात सोडल्यास जलचरांना धोकादायक ठरते. या पाण्याचा पुर्नवापरामुळे परिसंस्थेची उत्पादकता चिरंजीवी बनते. टाकाऊ पदार्थांपासून खत करण्यास संस्था मदत करते.

वृक्ष –

जंगलांचा ऱ्हास ही गंभीर समस्या आहे. पावसाचे पाणी धरून ठेवण्यात वृक्ष महत्वाची भूमिका बजावतात. झाडांमुळे पूर, भूस्खलन यासारख्या समस्यांचे प्रमाण कमी होते. वृक्षांची खोलवर रूजलेली मुळे फील्टरचे काम करतात. प्रदूषके काढून हळूवारपणे जमिनीत पाणी मुरविण्याचे काम करतात. त्यामुळे जमिनीची धूप होत नाही, अतिरिक्त पाणी जमिनीमध्ये जात नाही. परिपक्व, सदाहरित वृक्ष १५००० लीटर पेक्षा पाण्याला दरवर्षी बांध घालतो.

तहान संस्थेव्दारे गावांमध्ये आणि शहरांमध्ये जून ते ऑगस्ट या काळात वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेतले जातात. सध्याच्या वृक्षांची काळजी घेऊन भविष्याची काळजी घेतली जाते. झाड दत्तक घेण्यासाठीचे प्रोत्साहन दिले जाते. अशा तऱ्हेचा कार्यक्रम पुण्यातील तळजाई टेकडीवर घेण्यात आला. यामध्ये ४५० झाडे लोकांनी स्वत;हून दत्तक घेतली आणि ते त्या झाडांची देखभाल करत आहेत. 'झाडे जगवा तहान भागवा' हा उपक्रम तहान संस्थेने तळजाई टेकडीवर राबविला. तहान

संस्थेतील मुलामुलींनी टेकडीवरील झाडांना पाणी घालून येथे फिरावयास येणाऱ्या नागरिकांना जागरूक केले. रविना मोरे म्हणाल्या 'तहान संस्थेच्या माध्यमातून आम्ही मूले एकत्र येऊन पुण्यातील हनुमान व तळजाई टेकडीवर जाऊन झाडांना पाणी घालून ती जगवण्याचे काम करत आहोत'. झाडे लावणे सोपे परंतु जगवणे अवघड असते. यामुळे उन्हाळयात 'झाडे जगवा तहान भागवा' हा उपक्रम संस्थेतर्फे राबविला जातो. तळजाई टेकडीवर सकाळ संध्याकाळी फिरावयास येणारे जेष्ठ नागरिक, निसर्गप्रेमी उन्हाळयात झाडांना वेळोवळी पाणी घालण्याचे काम करतात. काही नागरिक घरून बाटल्यातून पाणी आणून ते झाडांना घालतात. त्यामुळे उन्हाळयातही झाडे तग धरून राहतात.

तळजाई टेकडीवर झाडांना बॅड बांधून 'झाडे लावा झाडे जगवा' असा संदेश देत मैत्री दिन साजरा करण्यात आला. तहान ग्रुप, सेवा ग्रुप, परिवर्तन सामाजिक संस्था यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच यावेळी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' याविषयी निसर्गप्रेमी देवेंद्र काटे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. काटे यांनी झाडांचे महत्व मांडून पर्यावरणाचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

नागरी भागात उद्याने तयार करणे – नागरी पर्यावरणात सर्व प्रकारची रोपे लावून उद्याने तयार करणे ही एक प्रक्रिया आहे त्याला नागरी शेती किंवा नागरी बागकामाशास्त्र असेही म्हटले जाते. नागरी बागकामामुळे अनेक पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्याचे फायदे होतात.

१) अन्नाचे स्थानिक स्त्रोत पुरविले जाते. २) समुदाय आणि कुटुंबे एकत्र येतात. ३) अन्नाच्या मूलाधाराविषयी नागरी मुलांना माहिती मिळते. ४) शहरातील हरित क्षेत्रात वाढ होते. ५) जमिनीची धूप थांबविण्यास मदत होते. ६) हवा आणि पावसाचे पाणी शुध्द होण्यास मदत होते. ७) नागरी जमिनीचे तापमान कमी करते.

निसर्ग मातेला काळजी घेण्याची आणि संरक्षणाची गरज असते. झाडांची काळजी घेऊन आपण तिची काळजी घेतो आहे हे दाखवून दिले पाहिजे.

'तहान' संस्थेव्दारे पथनाटयातून पर्यावरणाविषयी जागरूकता केली जाते. तरूणांचा उस्फूर्त सहभाग, समाजमाध्यमांचा कार्यक्षम वापर ही तहान संस्थेची वैशिष्टये आहेत.

जिवीत नदी – (Living River Foundation (JN))

पुण्यातील जिवीत नदी ही संस्था शहरातील नद्यांच्या संरक्षणासाठी काम करते. ही संस्था म्हणजे पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी वेगवेगळया व्यावसायिक क्षेत्रांमधून एकत्र आलेल्या व्यक्तिंचा गट आहे. प्रख्यात पर्यावरण तज्ञ श्री.प्रकाश गोळे Ecological Society चे माजी विद्यार्थी यांच्या प्रेरणेने या संस्थेची स्थापना २०१४ मध्ये झाली.

Ecological Society चा दीड वर्षाचा पर्यावरणविषयक अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या काही जणांनी नदी पुर्नरूज्जीवनाचे काम करावयाचे ठरविले, त्यासाठी त्यांनी जिवीत नदी हा उपक्रम सुरू केला. सुरूवातीला काही जणांपुरती मर्यादित असलेली ही चळवळ आता चांगलीच रूजली आहे.

पुणे शहरातील मुळा–मुठा नदी टाकाऊ पदार्थांपासून मुक्त करणे, यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, प्रदूषण विरहीत जीवनपध्दतीचा अंगीकार करणे यासाठी वैज्ञानिक आणि पर्यावरणीय योजना तयार करून नद्यांच्या पुर्नरूज्जीवनासाठी आणि चिरंजीत्वासाठी प्रयत्न करणे हे संस्थेचे ध्येय आहे. मुठा नदी ही पुणे शहराची जीवनदायिनी आहे. या नदीमुळेच पुणे शहर अस्तित्वात आले. शहरातील सांडपाणी व कचरा वाहून नेणारा नाला एवढेच तिचे अस्तित्व उरले आहे. तिच्या पुर्नरूज्जीवनासाठी संस्था अनेक उपक्रम राबविते.

मुठाई नदी महोत्सव – लोकांची नदीविषयीची आत्मीयता वाढावी या उद्येशाने संस्था दरवर्षी 'मुठाई नदी महोत्सव' 'भारतीय नदी दिवस' २० नोव्हेंबरला आयोजित करते. हा भारतातील पहिलाच महोत्सव आहे. विविध क्षेत्रातील आणि विविध वयोगटातील लोकांना सहभाग घेता येईल अशा प्रकारे या महोत्सवाची रचना केली जाते. २०१५ मध्ये सर्वप्रथम हे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यानंतर अनेक ठिकाणी हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले 'नदी विस्तार' कार्यक्रमाव्दारे नदीचे पूर्वीचे रूप परत आणण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून पक्षी निरीक्षण, नदी कडून कथन, दिवाळी पहाट, किर्तन आयोजित केले जाते.

'मुठाई रिव्हर वॉक' – 'हेरिटेज वॉक' च्या धर्तीवर आयोजित केलेला मुठा नदीविषयी माहिती देणारा हा कार्यक्रम दर रविवारी घेण्यात येतो. अनेक क्षेत्रातील नागरीक व विद्यार्थी या वॉकमध्ये सहभागी होतात. जनजागृती हा या कार्यक्रमाचा हेतू आहे. मोठया शहरांमध्ये धरणांव्दारे पाणीपुरवठा होतो. त्यामुळे नदी व मानव यांच्यातील जैविक संबंध नाहीसा झाला आहे. नदी मूळ स्वरूपात यावी यासाठी प्रयत्न केले जातात.

विषद्रव्यमुक्त जीवनशैली – मुठा नदीचे ७० टक्के प्रदूषण घरगुती सांडपाण्यामुळे होते. आपण घरात वापरलेले पाणी नदीमध्ये जाताना सांडपाणी म्हणून जाते. आपल्या रोजच्या वापरातील वस्तूंमधील घातक रसायने या सांडपाण्यात असतात. यासाठी

विषद्रव्यमुक्त जीवनशैली अंगीकारणे आवश्यक आहे. या शैलीचा प्रसार संस्था करते. यासाठी पूर्वापार चालत आलेली घरगुती उत्पादने वापरणे पर्यावरण रक्षणसाठी आवश्यक आहे. घातक रसायन विरहीत जीवनशैली अंगीकारणे सोपे जाण्यासाठी संस्थेने घातक रसायन विरहीत नैसर्गिक उत्पादनांचा एक संच तयार केला आहे. या संचाविषयीची सविस्तर माहिती संस्थेच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

संस्थेचे अन्य उपक्रम – आजची मुले ही उद्याची नागरीक आहेत हे लक्षात घेऊन संस्था शाळेतील मुलांसाठी पंचमहाभूतांविषयी माहिती देणारे उपक्रम आयोजित करते. याव्दारे मुलांना निसर्गाशी जोडण्यात मदत होते. नदी ही परिसंस्था अनेक परिसंस्थांशी जोडलेली असल्याने 'नदीचा अभ्यास' हा अभ्यासक्रम शालेय विद्यार्थ्यांसाठी संस्थेने तयार केला आहे.

स्त्रियांचा मोठा सहभाग

जिवीत नदी संस्थेच्या सुमारे ८० ते ९० टक्के सभासद स्त्रीया आहेत. त्याबद्दल संस्थेच्या शैलजा देशपांडे म्हणतात, 'विषयुक्त जीवनशैलीचा प्रसार होण्यात महिलांची भूमिका महत्वाची आहे. गृहिणी ही घराची व्यवस्थापक असते. त्यामुळे या जीवनशैलीची सवय ती घरातील सर्वांना, विशेष करून भावी पिढीला लावू शकते. दिवसभरात रासायनिक पदार्थ वापरण्याचे प्रमाण महिला व मुलांमध्ये अधिक आहे. तिच्यावर रासायनिक पदार्थांचा परिणाम होतो आणि यात बदल घडविण्याचे काम देखील तीच करू शकते. सामाजिक संस्थेत शिस्तबध्द कामकाज आवश्यक असते. कामाची आखणी करण्यात, वेळेचे नियोजन करण्यात महिला आझाडीवर असतात. त्यामुळे संस्थेत महिला जास्त असण्याचा निश्चित फायदा होतो.

निष्कर्ष :

१) पाणलोट विकासासाठी शासकीय आणि अशासकीय संस्था कार्य करत आहेत. पण ते पुरेसे नाहीत. वैयक्तिक पातळीवर प्रत्येकाने यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२) विकासाच्या कोणत्याही योजनेमध्ये लोकसहभाग महत्वाची भूमिका पार पाडतो. पाणलोट व्यवस्थापन आणि विकासामध्ये लोकसहभाग वाढविणे आवश्यक आहे. प्रत्येक गोष्ट शासनाने केली पाहिजे हा आग्रह सोडून दिला पाहिजे. महाराष्ट्रातील दुष्काळी गावांमध्ये मोठया प्रमाणावर पाऊस पडूनही पाणी वाहून गेल्यामुळे पाण्याची चणचण भासणाऱ्या गावांमध्ये स्थानिक लोक पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यशस्वी झाले आहेत. हे राळेगणसिध्दी, आंदगाव, नायगाव, घील गाव येथे झालेल्या सामुदायिक प्रयत्नांवरून सिध्द झाले आहे. 'लहान गोष्टी सुंदर आणि औदार्यशील' हे या प्रयोगांवरून दिसून आले.

३) मोठी आणि मध्यम धरणे बांधण्यापेक्षा लघुप्रकल्प हाती घेणे महत्वाचे आहे.

४) भारत जी २० परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवित असताना 'द सत्संग फाऊंडेशन' आणि 'सकाळ माध्यम समूहाच्या' सहकार्यातून 'सिव्हिल २०' गटातील सदस्यांसाठी 'नद्यांचे पूर्नरूज्जीवन आणि पाणी' या विषयावर दोन दिवसीय जल परिषद पुण्यात आयोजित करण्यात आली. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी जलतज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनीही लोकसहभागातून जलसंवर्धन आवश्यक आहे असे मत मांडले. तसेच नद्यांच्या पुर्नरूज्जीवनाचे महत्व अधोरेखीत केले. इतर तज्ञांनी रिव्हर वॉक, स्थानिक लोकांच्या ज्ञानाचा उपयोग करण्यावर भर दिला. यावरून पाणलोट विकासातील लोकसहभागाचे महत्व अधोरेखित होते.

संदर्भग्रथ :

1) Carson, Rachel, Silent Spring, Lodaon : Hamish Hamilton, 1965 (Fourth Impression) 1972.
2) Gupta, Sunit (Ed), International Encylopaedia of Global Environment and social Development Vol. 1+03 New Delhi : Sarup and sons, 1999.
3) Pawar, S.N. Patil R.B. (Eds.) Sociology of Environment, Jaipur, Rawat Publication, 1998.
4) https:// aaplesarkar. maharstra.gov.in
5) www.wikipedia.org
6) https:// www.bytes of india.com
7) https://www.jeevitnadi.org
8) लोकमत हॅलो लातूर १५ मार्च २०२०
9) लोकसत्ता २५ एप्रिल २०१६, डिसेंबर १२, २०१८
10) maharshtratimes.com , 14 Dec. 2022
11) सकाळ १२ मार्च २०२३

*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे (समाजशास्त्र विभाग) मो. नंबर : ९९२२८९५६०२ E-Mail:madhavi.renavikar@gmail.com

***

ग्राम स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन: नांदगाव गावाचे व्यष्टी अध्ययन

*सुयश पांडुरंग कालकर (B.A.III)

**प्रतिक्षा रमेश गायकवाड (B.A.III)

घोषवारा :

स्वच्छता हा बदलत्या काळातील एक महत्त्वाचा प्रश्न बनत चालला आहे. स्वच्छते विषयी जाणीव जागृती करण्यासाठी शासनाने विविध योजना तयार केलेले आहेत. त्यामधील एक म्हणजे ग्राम स्वच्छता या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात रस्ते सफाई, बंदिस्त नाला पद्धत, सांडपाणी व्यवस्थापन, रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड यासारखी विविध विकास कामे केली जातात. महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्यातील नांदगाव या गावातील ग्राम स्वच्छता व पर्यावरण संवर्धन याचा अभ्यास करत असताना मानवी आरोग्याला पर्यावरणाची व स्वच्छतेची गरज भासते असे दिसून आले. संत गाडगेबाबा व तुकडोजी महाराज यांनी १९ व्या शतकात लोकांना भजन, अभंग व किर्तन या मार्फत स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. गावातील लोकांनी ते आत्मसात करून त्यांच्या गावात ग्राम स्वच्छता व पर्यावरण संवर्धन ही योजना राबवली. आधुनिक काळात मानवास स्वच्छतेची गरज असते हे गावात आम्हाला अभ्यासाला मिळाले. गावात स्वच्छतेचे महत्व जाणून घेऊन विविध उपायोजना राबवले आहेत. ग्राम स्वच्छतेमध्ये गावातील लोकांनी रस्ते सफाई, बंदिस्त गटारे, सांडपाण्याची विल्हेवाट लावणे व घरातील कचऱ्याचे चांगल्या पद्धतीने विघटन करणे अशी अनेक कामे गावातील लोकांनी केले. यामुळे वाढणाऱ्या रोगराईवर नियंत्रण बसू लागले. साथीचे रोग कमी झाल्यामुळे गावातील लोकांचे आरोग्य सुधारले ते निरोगी जीवन जगू लागले. तसेच घरातील कचऱ्याचे विघटन केल्याने गावात इतरत्र पसरणारा कचरा व अस्वच्छता कमी झाली. यामुळे गाव स्वच्छ राहू लागले गावातील लोक कचरा हा गावाने नेमून दिलेल्या घंटागाडीमध्ये ओला व सुका कचरा वेगवेगळया करून टाकतात. त्यामुळे त्यापासून पसरणारे दुर्गंधी कमी झालेली दिसून येते. त्यापासून पर्यावरणाचेही संवर्धन होते. गावामध्ये ग्राम स्वच्छते अंतर्गत गावातील पडीक जमिनीवर वृक्ष लागवड केली आहे. त्यामुळे गावात हरित क्रांती घडून आलेली आहे. गावातील रस्त्याच्या दुतर्फा फुल झाडे लावली आहेत व त्याच्या संवर्धन केले जाते.

प्रस्तावना :

भारतात पूर्वी अस्तित्वात असणारी हडप्पा म्हणजेच सिंधु संस्कृती या संस्कृतीची नगररचना व स्थापत्य अत्यंत प्रगत होते. घरे, तटबंदी, सांडपाण्याची व्यवस्था, स्नानगृहे, नगरांत पाण्याच्या विहिरी अस्तित्वात होत्या. यावरून हडप्पाकालीन संस्कृती प्रगत असल्याचे दिसून येते. हडप्पा संस्कृतीत सांडपाणी व पावसाचे पाणी गावाबाहेर वाहून नेण्यासाठी एक मीटर खोल भुयारी गटारांची व्यवस्था होती. ही गटारे दगड व पक्क्या विटांनी बांधलेली होती. कोणत्याही समकालीन संस्कृतीमध्ये न आढळणारी सांडपाण्याची व्यवस्था हडप्पा संस्कृतीत पाहावयास मिळते. याच प्रमाणे आजच्या युगात स्वच्छता ही काळाची गरज असल्याचे दिसून येत आहे. यासाठी शासनाने विविध योजना तयार करून त्याची अंमलबजावणी केली आहे. त्यातीलच एक योजना म्हणजे "ग्राम स्वच्छता". ही ग्रामीण स्तरावर राबवली जाणारी योजना असून या योजने अंतर्गत गावामध्ये स्वच्छता व विविध विकास कामे केली जातात. ग्राम स्वच्छता व पर्यावरण संवर्धन हे सामाजिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्वपूर्ण आहे. पाणी स्वच्छता पर्यावरण आरोग्य आणि मानवी स्वास्थ्य याचा परस्पर संबंध आहे.

19 व्या शतकात डेबुजी झिंगराजी जानोरकर म्हणजे संत गाडगेबाबा. महाराष्ट्र राज्यातील एक संत, कीर्तनकार आणि समाज सुधारक होते. गाडगे महाराजांची सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयात आवड होते. समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना स्वच्छता आणि चारित्र्य यांची शिकवण गाडगे बाबा देत असत. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. ते ज्या गावात जात प्रथम ते गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता व अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात दर्शविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले.

1981 - 1990 हे दहा वर्षे आंतरराष्ट्रीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता दशक म्हणून जाहीर झाले. भारतात 1 एप्रिल 1981 ते 31 मार्च 1991 हा काळ आंतरराष्ट्रीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता दशक म्हणून जाहीर झाला. 2002 च्या नियोजित आयोगाच्या अहवालात नमूद केले आहे की पूर्ण शासनाने नियंत्रण असलेली केंद्रीकरण झालेल्या आणि पाणी पुरवठा आधारित धोरणे बदलून ती विकेंद्रीय, लोक केंद्रीय आणि मानवास संवेदनशील बनवावी लागतील. अशी जाणीव

वाढल्यामुळे पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या क्षेत्रात 1999 पासून केंद्रीय पातळीवर धोरणात्मक बदल करण्यात आला. संपूर्ण स्वच्छता मोहिमेत या धोरणात्मक बदलांचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते असाच धोरणात्मक बदल महाराष्ट्र राज्यातील देखील दिसून येतो. सन 2000 - 01 पासून संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियान, संत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा व सन 2001 - 02 पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ पंचायत समिती व स्वच्छ जिल्हा परिषद स्पर्धा अशा स्वरूपात राबविण्यात आल्या. तसेच 2002 - 03 पासून स्वच्छतेची व ग्रामविकासाचे निगडित एखाद्या विशिष्ट क्षेत्रात बरे व काम करण्यासाठी ग्रामपंचायतीने जिल्हा विभाग व राज्यस्तरावर विशेष बक्षिसे देण्याचा उपक्रमही सुरू करण्यात आले आहेत.

संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती :

ग्राम स्वच्छता व पर्यावरण संवर्धन : नांदगाव गावाचे व्यष्टी अध्ययन हे या शोधनिबंधाचे शीर्षक आहे.

संशोधन समस्या :- नांदगाव गावात ग्राम स्वच्छतेमुळे झालेल्या सामाजिक व पर्यावरणीय बदलांचा शोध घेणे हे प्रस्तुत अभ्यासासाठीचे समस्या आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :

1) नांदगाव गावात घडून आलेल्या सामाजिक बदलांचा अभ्यास करणे.

2) नांदगाव गावातील पर्यावरण दृष्टिकोनातून मानवी विकासाचा अभ्यास करणे.

3) नांदगाव गावात सुरू असणाऱ्या विविध पर्यावरण पूरक प्रकल्पांचा अभ्यास करणे.

अवलंबलेली संशोधन पद्धती :- संशोधन क्षेत्र प्रस्तुत अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्हा व तालुक्यातील नांदगाव गावाची संशोधन क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे. या गावाची निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे केली आहे. उत्तरदात्याची निवड संशोधनासाठी उपलब्ध कालावधी श्रम आणि वेळ या सर्व बाबींचा विचार करून अपघाती नमुना निवड या नमुना निवड तंत्राचा वापर करून नांदगाव गावाची निवड करण्यात आली. यातून गावातील एका कुटुंबातील एका व्यक्तीचे उत्तरदाता म्हणून निवड करण्यात आले.

माहिती संकलनाची तंत्रे : मुलाखत अनुसूची अभ्यासाचे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्राथमिक स्तरावरची माहिती संकलित करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार केली. तिचे पूर्णतः चाचणी करून त्यात दुरुस्ती केली. याच मुलाखती अनुसूची चा वापर करून 15 उत्तरदात्यांचे प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.

तथ्य संकलन : तथ्य संकलनासाठी सामूहिक निरीक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

अनौपचारिक मुलाखती : गावातील सरपंच उपसरपंच ग्रामविकास अधिकारी महिला मंडळाचे अध्यक्ष व तरुण मंडळाचे अध्यक्ष यांच्या अनौपचारिक पद्धतीने मुलाखती घेतल्या.

माहितीचे उगम स्त्रोत :

प्राथमिक माहितीचे स्त्रोत

स्वतः या गावाला भेट देऊन केलेले निरीक्षण मुलाखत अनुसूच्या साह्याने मिळालेले माहिती तसेच छायाचित्राद्वारे मिळालेले माहिती इत्यादी.

दुय्यम माहितीचे स्त्रोत :

शासकीय परिपत्रके प्रकल्प अहवाल नियतकालिके इंटरनेट ग्रामपंचायत कार्यालयातील अहवाल इत्यादी.

सामाजिक बदल :

ग्राम स्वच्छतेबाबतच्या प्रतिक्रिया : ग्राम स्वच्छतेसाठी गावातील लोकांचा प्रतिसाद चांगल्या प्रकारे मिळाला. लोकांनी आपले सामाजिक कर्तव्य म्हणून आपले घर व परिसर स्वच्छ केला. बचत गटाच्या माध्यमातून गावचे रस्त्याची साफ सफाई करण्यात आली. ग्रामपंचायतीने स्वच्छतेसाठी विविध नियम व अटी देण्यात आल्या आहेत. त्याचे गावातील लोकांनी पालन करताना दिसून आले. सर्वच उत्तरदात्यांच्या माहितीवरून असे दिसून आले की ग्राम स्वच्छते अंतर्गत विविध विकास कामे आजही सुरू आहेत. गावातील स्वच्छता उपक्रमाचे दोन महिन्यातून पाहणी करून त्यात बदल केले जातात. नवनवीन उपक्रम राबवण्यासाठी ग्रामपंचायतीकडून विविध कार्यक्रम राबवले जातात. आत्ताच नव्याने सुरू केलेला उपक्रम म्हणजे गावात ज्याचा वाढदिवस असेल त्या व्यक्तीने एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे.

सहभाग :

गावातील सहा व्यक्तींच्या मुलाखतीवरून ग्राम स्वच्छतेमध्ये पुरुषांचा जास्त सहभाग असल्याचे माहिती मिळाली तर चार व्यक्तींनी स्त्रियांचाही बरोबरीचा सहभाग असल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांची भूमिका : आजच्या विद्यार्थी हे उद्याचे नागरिक असतात. स्वच्छतेमध्ये विद्यार्थ्यांचे भूमिका ही सर्वात महत्त्वाचे असते. गावातील विद्यार्थ्यांनी पोस्ट तयार करून तसेच स्वच्छता पंधरवडा यासारखे विविध कार्यक्रम शाळेच्या मार्फत घेतले गेले.

महिला बचत गटाने केलेले काम : बचत गटाचे मुख्य उद्देश महिलांचे सबलीकरण व त्यांना विविध लघु व्यवसाय सुरू करून देणे हा आहे. गावामध्ये बहुतांश बचत गटामध्ये महिला लोणचे, पापड, गुळ शेंगदाण्याचे लाडू तयार करणे. तर काही महिला शेळीपालन कुक्कुटपालन सुद्धा करताना आढळून आल्या. याबरोबरच तेरा उत्तरदात्यांच्या माहितीवरून बचत गटातून रस्ते सफाई करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्या खालोखालच दोन उत्तरदात्यांच्या मते रस्ते सफाई बरोबरच रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड व त्यांचे संवर्धन हे कामे बचत गटामार्फत केले जातात.

महिला सबलीकरण : 2.6 सारणी वरून महिला सबलीकरणासाठी गावांमध्ये बचत गट सुरू करून त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. तसेच गावामध्ये व्याख्याने शिबिरे यांच्या आयोजनही केले जाते.

आरोग्य शिबिर : 2.2 सारणी च्या वर्गीकरणावरून सात उत्तरदात्यांच्या मते गावामध्ये राबवलेल्या आरोग्य शिबिराचा फायदा 50 ते 75% लोकांनी घेतला असून दोन उत्तरदात्यांच्या उत्तरावरून 70 ते 100% लोकांनी शिबिराचा लाभ घेतला.

टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू : गावाच्या लोकांच्या माहितीवरून असे दिसून आले की टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू तयार करण्यासाठी ग्रामपंचायत कडून प्रोत्साहन केले जाते.

गाव स्वच्छतेचे प्रमाण :- 2.5 सारणी वरून असे दिसून आले की सातत्यता त्यांच्या मते ग्राम स्वच्छते मधून 75 ते 100% गाव स्वच्छ झाले. तर एका उत्तरदात्याच्या मध्ये गावातील स्वच्छता ही फारच कमी प्रमाणात म्हणजेच 25 ते 30 टक्के पर्यंत झाले.

व्यसनाधीनता :- सारणीच्या वर्गीकरणावरून असे दिसून आले की गावामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण 30 ते 50% इतके आहे. व्यसनापासून लोकांना मुक्त करण्यासाठी गावांमध्ये व्यसनमुक्ती केंद्राचे आयोजन करण्यात आले होते. याचा लाभ गावातील पुष्कळ व्यक्तीने घेतला आहे.

विकास कामे :- ग्राम स्वच्छता अंतर्गत 19/10/2015 रोजी ग्रामसचिवालयाचे नवीन इमारत बांधण्यास सुरुवात झाली. यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम दहा लाख इतका खर्च आला. हे काम 16/ 7/ 2016 रोजी पूर्णत्वास आले. यानंतरच 2018 साली प्राथमिक शाळेचे दुरुस्ती करण्यात आले.

पर्यावरणीय बदल :- गावातील व्यक्तींच्या मुलाखतीतून मिळालेल्या माहितीवरून असे दिसून आले की गावातील 70 % लोक नदी व विहीर या प्राथमिक स्त्रोतांचा वापर करतात. तर 30 % लोक बोर चा वापर करतात.

घनकचऱ्याची विल्हेवाट :- गावाच्या निरीक्षणावरून व उत्तरदात्यांच्या माहितीवरून असे दिसून आले की घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण करून त्यातील ओला कचऱ्यापासून खत निर्मिती व सुका कचऱ्याचे घंटागाडीत टाकून त्याची विल्हेवाट लावली जाते.

सांड पाण्याचे नियोजन :- 1.3 सारणी मधील आठ उत्तरदाते घरातील सांडपाणी बंदिस्त गटारांमध्ये सोडतात तर उर्वरित उत्तरदाते सांडपाण्याचा वापर परसबाग फुलवण्यासाठी करतात.

शिल्लक पाणी :- घरातील शिल्लक राहिलेले पाणी हे पिण्यासाठी, दैनंदिन वापरासाठी व परसबागेसाठी वापरतात.

शेण आणि गोमुत्राचे व्यवस्थापन :- गुरांच्या शेणापासून शेतीसाठी खत निर्मिती केली जाते. तसेच काही ठिकाणी शेणापासून गोबर गॅस ची निर्मिती केली जाते. गावातील साधारणपणे सहा टक्के लोक शेणापासून गोबर गॅस निर्माण करतात.

वृक्ष लागवड :- ग्रामस्वच्छता व पर्यावरण संवर्धन योजना राबवण्या अगोदर गावात सर्वत्र घाणेरी गवत पसरले होते. ग्रामपंचायतीने व काही सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन त्याची योग्य ते विल्हेवाट लावली. ग्रामपंचायतीकडून गावामध्ये 500 झाडांची लागवड करण्यात आली व त्याच्या संगोपनाची जबाबदारी ही बचत गट व जिल्हा प्राथमिक शाळा यांना देण्यात आली यामध्ये नारळ, आंबा, चिकू यांसारखे फळ झाले तसेच शोभेची झाडे लावण्यात आली. गावामध्ये घराच्या अवतीभवती परसबागा फुलवल्या आहेत. या बागेमध्ये कोणत्याही रासायनिक खतांचा वापर केला जात नाही.

टाकाऊ प्लॅस्टिकपासून इंधनाची निर्मिती :- गावामध्ये लोकांनी प्लास्टिक बंदी या अंतर्गत कापडी पिशव्यांचा वापर करणे व प्लास्टिकचा वापर कमीत कमी करणे यासारखे कार्यक्रम राबवले आहेत तसेच विविध कार्यक्रमाच्या म्हणजेच व्याख्याने शिबिरे यांच्या माध्यमातून प्लास्टिकचे दुष्परिणाम गावातील लवकरात पर्यंत पोहोचविण्याचे काम देखील

ग्रामपंचायत द्वारे होत आहे. प्लॅस्टिक कचऱ्याचा पुन्हा वापर आणि त्याचे होणारे प्रदूषण टाळता येईल का, या विचारातून गावात टाकाऊ प्लॅस्टिकपासून स्वस्तात आणि कमी प्रदूषण करणाऱ्या इंधन निर्मितीच्या कामास सुरवात झाली. यामुळे गावातील पर्यावरणाला फायदा होत आहे. हा प्रकल्प सुमारे दोन गुंठे जागेत उभा असून या प्रकल्पामध्ये तीन ते पाच कामगार कार्यरत आहेत. हा प्रकल्प उभा करण्यासाठी सुमारे 30 ते 35 लाख इतका खर्च आला होता. यासाठी लागणारा कच्चामाल आसपासच्या गावातून व सांगली वरून आणले जाते. 12 किलो प्लास्टिकचे तुकडे कंटेनर मध्ये टाकून त्याला उष्णता देतात. त्यातून एकीकडे प्लॅस्टिक वितळून त्यातून गॅस बाहेर येतो, तर दुसरीकडे प्लॅस्टिकपासून तेलनिर्मिती होते. यामधून तयार झालेल्या गॅसचा वापर पुन्हा प्लास्टिक वितळवण्यासाठी केला जातो. हे सर्व प्रक्रिया व्हॅक्यूम अंतर्गत केली जाते. या प्रक्रियेतून सुमारे 600 ते 650 लिटर तेल तयार केले जाते. या तेलावर प्रक्रिया करून 400 ते 450 लिटर शुद्ध तेल काढले जाते. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सुमारे 12 ते 13 तास वेळ लागतो प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंटेनर मधून कार्बन काढण्याचे एक काम केले जाते हा कार्बन राखेच्या स्वरूपात असतो.

बायोगॅस :- बायोगॅस म्हणजे जैविक प्रक्रियांमधून बाहेर पडणारा वायू.. जर एखादी जैविक प्रक्रिया ऑक्सिजन विरहित वातावरणात झाली तर बायॉगॅसची निर्मिती होते. सेंद्रिय पदार्थाचे जीवाणूद्वारे हवाविरहित अवस्थेत झालेल्या विघटनानंतर निर्माण होणारा वायू साठविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या साधनास बायोगॅस संयंत्र म्हणतात. यात मिथेन व कार्बन-डाय- ऑक्साईड हे वायू तयार होतात. मिथेन हा वायू ज्वलनास मदत करतो. बायोगॅस गॅसिफायरमधून तयार होणारा प्रोड्युसर गॅस पाणी उपसण्यासाठी, वीजनिर्मितीसाठी, स्वयंपाकासाठी देखील वापरला जातो. बायोगॅस गॅसिफायर संयंत्र विविध कार्यक्षमतेमध्ये उपलब्ध असून गरजेप्रमाणे त्यांचा वापर करता येतो.बायोगॅसमध्ये साधारणपणे ५५ ते ६० % मिथेनचे प्रमाण असते तर उर्वरित भाग कार्बन डायॉक्साईडचा असतो. मिथेन हा ज्वलनशील असल्याने बायोगॅस पण ज्वलनशील असतो. परंतु कार्बन डायॉक्साईड या अज्वलनशील वायूमुळे याची ज्वलन उष्णता शुद्ध मिथेनपेक्षा कमी असते. बायोगॅस हा नमूद केल्याप्रमाणे ज्यांना आपण कुजणे म्हणतो अशा जैविक प्रक्रियांमधून निर्माण होतो. बहुतांशी कुजणाच्या प्रक्रियांमध्ये बायोगॅसची निर्मिती होते. बायोगॅस संकुचित करून लोखंडी सिलिंडरमध्ये भरता येतात. बायोगॅस हा ज्वलनशील असल्याने त्याचा इंधन म्हणून चांगलाच वापर करता येतो. सांडपाणी प्रकल्पातील गाळ बंद टाकीत कुजू दिल्यास त्यातून मोठ्या प्रमाणावर बायोगॅसची निर्मिती होते . या गॅसला साठवून त्याचा इंधन म्हणून वापर करतात. हेच तत्त्व गोबरगॅस प्रकल्पातही वापरतात. गोबरगॅस हा देखील बायोगॅसच आहे.

बायोगॅस हा इंधन म्हणून तयार करता येत असल्याने याची अपारंपारिक उर्जास्रोतात गणना होते. तसेच कचरा निर्मूलन व सांडपाणी शुद्धीकरणामध्ये बायोगॅस हा उप-उत्पादन म्हणून तयार होतो. बायोगॅस करण्यासाठी घराजवळील उंच, कोरडी, मोकळी व बराच वेळ सूर्यप्रकाश मिळणारी, शक्यतो घराजवळ अगर गोठ्याजवळ असणारी जागा निवडतात. ज्या जमिनीखाली पाण्याची पातळी दोन मीटरपेक्षा खाली असते अशी जागा योग्य. निवडलेल्या जागेजवळ झाडे, पाण्याची विहीर, पाण्याचा हातपंप नसतो.

सेंद्रिय पदार्थाचे जीवाणूद्वारे हवाविरहित अवस्थेत झालेल्या विघटनानंतर निर्माण होणारा वायू साठविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या साधनास बायोगॅस संयंत्र म्हणतात. यात मिथेन व कार्बन-डाय- ऑक्साईड हे वायू तयार होतात. मिथेन हा वायू ज्वलनास मदत करतो. बायोगॅस गॅसिफायरमधून तयार होणारा प्रोड्युसर गॅस पाणी उपसण्यासाठी, वीजनिर्मितीसाठी, तसेच स्वयंपाकासाठी देखील वापरला जातो. बायोगॅस गॅसिफायर संयंत्र विविध कार्यक्षमतेमध्ये उपलब्ध असून गरजेप्रमाणे त्यांचा वापर करता येतो.

बायोगॅस वायूमध्ये मिथेन 55 ते 70 टक्के, कार्बन-डाय- ऑक्साईड 30 ते 40 टक्के अल्प प्रमाणात नायट्रोजन व हायड्रोजन सल्फाईड या वायूंचा समावेश असतो. यातील मिथेन हा वायू ज्वलनशील आहे. कोणत्याही प्रकारचे टाकाऊ पदार्थ, जे कुजतात त्यांच्यापासून बायोगॅस तयार होतो. उदा. शेण, घरातील खरकटे अन्न, निरुपयोगी भाजीपाला, पशुविष्ठा, मानवी विष्ठा, इ. पदार्थांचे मिश्रण पाण्याबरोबर करून बायोगॅस संयंत्राच्या प्रवेश कक्षामध्ये पाचक यंत्रामध्ये सोडण्यात येते. पाचक यंत्रामध्ये कालांतराने कार्यक्षम जिवाणू तयार होतात व ॲसिटिक ॲसिड तयार होऊन पाच विभिन्न प्रकारचे जीवाणू तयार होऊन मिथेन व कार्बन-डाय- ऑक्साईड हे वायू तयार होतात. मिथेन हा वायू ज्वलनास मदत करतो व त्याचे उष्णता मूल्य 4700 किलो कॅलरी इ. असते. बांधकामाचा खर्च संयंत्राच्या आकारावर अवलंबून आहे.

दोन घनमीटर क्षमतेचा दीनबंधू प्रकाराचे संयंत्र बांधण्याचा खर्च 40-45 हजार रुपये येऊ शकतो. तरंगती टाकीचे बायोगॅस (फ्लोटिंग डोम) संयंत्राला येणारा खर्चही त्याच्या आकारमानावर अवलंबून आहे. दोन घनमीटर क्षमतेचा खादी ग्रामोद्योग प्रकारच्या संयंत्रासाठी अंदाजित साधारणपणे 45-50 हजार रुपये खर्च होतो.

बायोगॅस संयंत्राची रचना करताना त्यामध्ये हवाबंद, बंदिस्त पोकळी तयार करावी लागते. त्या पोकळीत सेंद्रिय पदार्थ टाकण्याची सोय करावी लागते, तसेच सेंद्रिय पदार्थांपासून तयार होणारा गॅस व खत बाहेर येण्याची व साठविण्याची सोय करावी लागते.

बायोगॅस मधील घटक द्रव्यसंपादन करा :-

कंपाऊंड	आण्विक	सूत्र%
मिथेन	CH4	५०-७५
कार्बन डायऑक्साइड	CO2	२५-५०
नायट्रोजन	N2	००-१०
हायड्रोजन	H2	००- १
हायड्रोजन सल्फाईड	H2SO3	०.१- ५
ऑक्सिजन	O2	०- ०.५

ग्रीन हाऊस शेती :- आजकाल प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या शेतात 12 महिने पीक घ्यायचे आहे आणि ते विकून चांगले पैसे मिळवायचे आहेत. अशा परिस्थितीत हरितगृह शेतीचा वापर करून शेतीतून चांगले उत्पादन घेता येते. या तंत्राने तुम्ही 12 महिने शेती करून भरपूर कमाई करू शकता.

सर्वप्रथम जाणून घ्या ग्रीन हाऊस म्हणजे काय?

ग्रीनहाऊस म्हणजे अशा वातावरणाचा संदर्भ आहे जिथे तुम्ही वातावरण स्वतः नियंत्रित करून सहजपणे पिके घेऊ शकता. हरितगृह शेतीमुळे पिकांची वाढ होऊन उत्पादन वाढण्यास मदत होते. सोप्या भाषेत सांगायचे तर ते पिकांचे जतन करण्याचे तंत्र आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की, हरितगृह तंत्रज्ञान वापरून शेती करण्यात भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा देश आहे. ग्रीन हाऊस शेती हे असेच एक शेतीचे तंत्र आहे. ज्यामध्ये आपण हंगामी पिकांसोबत बिगरहंगामी पिके घेऊ शकतो. हे वर्षभर पिकाची वाढ आणि फुलांचे उत्पादन समृद्ध करण्यास मदत करते. हे पिकांचे संरक्षण करण्यास आणि त्यांना कीड तसेच रोगांपासून मुक्त ठेवण्यास आणि वाढ कायम ठेवण्यास मदत करते. या प्रकारच्या शेतीची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यासाठी फार कमी प्रमाणात पाणी लागते.

हरितगृह शेतीचे फायदे–

१) ऊसच्या मदतीने तुम्ही वर्षभर शेती करू शकता.

२) हरितगृह शेतीमुळे पिकांचे उत्पादन वाढते.

३) नियंत्रित वातावरणात घेतल्याने उत्तम दर्जाची पिके घेता येतात.

4) पिकांवरील कीड व रोगांचे सहज व्यवस्थापन करणे शक्य आहे.

हरितगृह बांधण्याची किंमत –

हरितगृह उभारण्यासाठी प्रति चौरस मीटर सुमारे 750 ते 1000 रुपये खर्च येतो. खर्चाची श्रेणी सामग्रीची गुणवत्ता, स्थान, आकार, आणि रचना यासारख्या काही घटकांवर अवलंबून असते. तुम्ही बांबू, धातूचे पाइप, लाकूड इत्यादींचा आधार सामग्री म्हणून वापरू शकतो. स्टील आणि इतर धातूच्या पाईप्समध्ये इतर सामग्रीपेक्षा जास्त टिकाऊपणा आहे. हरितगृह उभारणे आणि त्याची देखभाल करणे हे खर्चिक असले, तरी त्याचा योग्य वापर केल्यास आपल्याला मोठा फायदा होऊ शकतो.

हरितगृह लागवडीसाठी योग्य पिके –

पालक – पालक हे निरोगी आणि फायदेशीर पीक आहे. ते वाढते, आणि जेव्हा ते कापले जाते तेव्हा ते पुन्हा वाढते. त्यामुळे ग्रीन हाऊस शेतीच्या मदतीने तुम्ही बाजारात पालकापासून चांगला नफा मिळवू शकता.

औषधी वनस्पती– औषधी वनस्पतींचा विचार केला तर सर्वप्रथम आपले मन आयुर्वेदिक गोष्टींकडे जाते. भारतात आयुर्वेदिकांची मागणी कधीच संपू शकत नाही. त्यामुळे हरितगृहाच्या साहाय्याने औषधी वनस्पतींची लागवड केली तर. त्यामुळे तुम्ही वेळेत उठून धावू शकता. तुम्ही थाईम, मिंट, रोझमेरी आणि तुळस पटकन वाढवू शकता. किंवा ग्रीनहाऊसमध्ये कॅलेंडुला, कॅमोमाइल, आले आणि इतर अनेक औषधी वनस्पती तयार होऊ शकतात.

ग्रीनहाऊसमध्ये पिके : टोमॅटो, काकडी, सिमला मिरची, कोबी, वाटाणे, पालक, वांगी, भेंडी, भोपळा, मुळा इ. गुलाब, कार्नेशन, जरबेरा इत्यादी मुख्य फुले आहेत. चांगल्या प्रतीच्या स्ट्रॉबेरीची लागवड ग्रीनहाऊसमध्येही यशस्वीपणे करता येते.

निष्कर्ष

१)नांदगाव गावातील ग्राम स्वच्छता पर्यावरण संवर्धन योजना उत्कृष्टने अमलात आणण्यात आली आहे.
२) स्वच्छ शुद्ध तसेच एक्का च्या पाण्याची गावांमध्ये पिण्यासाठी सोय केली आहे.
३) गावातील सर्व कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. सर्व लोक त्याचा वापर करतात.
४) कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याची व्यवस्था केली आहे.
५) गावातील रस्ते स्वच्छ व सुंदर बनवण्यात आले आहेत.
६) गावातील सर्व गटारे बंदिस्त आहेत व योग्य त्या ठिकाणी शोषखड्डे आहेत त्यामुळे सांडपाण्याची उत्तम सोय आहे.
७) सर्व कारणांमुळे नांदगाव गावातील पर्यावरण व वातावरण मानवी आरोग्यास पोषक असे बनवण्यात आले आहे.
८) पर्यावरण संवर्धन स्त्रियांचे सबलीकरण आणि सामाजिक समस्या निराकारणासाठी अभियानात विविध कार्यक्रम राबवण्यात आले आहेत.
९) ग्रामस्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन यामुळे नांदगाव गावात विविध सामाजिक व पर्यावरणीय जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडून आलेले आहेत.

सारांश

नांदगाव गावामध्ये ग्रामस्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन या योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. स्वच्छ सुंदर व शुद्ध वातावरण गावात निर्माण झाले आहे. गावातील सर्व कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध असल्यामुळे गावातील सर्व लोक शौचालयाचा नियमित वापर करतात घनकचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याची व्यवस्था केली आहे. गावामध्ये घनकचऱ्यापासून बायोगॅसची निर्मिती केली जाते. गावातील रस्ते स्वच्छ व सुंदर बनविण्यात आले आहेत. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यात आली आहेत. गटारे बंदिस्त असून योग्य त्या ठिकाणी शोष खड्डे आहेत. सांडपाण्याचा निचरा उत्तम रितीने केला जातो. गावात पर्यावरण मानवी आरोग्याला पोषक असे बनवण्यात आले आहे. यामुळे प्रदूषण विरहित वातावरण आहे. पर्यावरण संवर्धन, स्त्रियांचे सबलीकरण व सामाजिक समस्या निराकरणासाठी या योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. या योजनेमुळे पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाविषयी सामाजिक जीवनातील महत्त्वपूर्ण बदल घडून आल्याचे दिसून आले. गाव हे स्वच्छ, सुंदर व हरित आहे.

संदर्भ सूची :-

1) महाराष्ट्र शासनाचा अहवाल
2) शोभा पाटील, (२००६)"ग्रामीण महाराष्ट्रातील पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता कार्यक्रम: संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या विशेष संदर्भात जैन्याळ गावाचे व्यष्टीअध्ययन" एम. फील. लघु शोधप्रबंध
3) www.wikipedia.org

***समाजशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा (स्वायत्त), घटक महाविद्यालय के.बी.पी. विद्यापीठ सातारा,**
मो. नं – ९६६५७२४५०६, Emaill -pratiksagaikwad8537@gmail.com

***

महाराष्ट्रातील सातत्य आणि परिवर्तन एक समाजशास्त्रीय अभ्यास

*प्रा. लक्ष्मण बापुराव नैताम

प्रस्तावना –

भौगोलिक विभागानुसार पाडलेल्या व बहूसंख्या मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र होय. राजकीय सोयीच्या दृष्टीने आपण महाराष्ट्र या शब्दाचा वापर करतो. पूर्वी मुंबई इलाख्यात सर्वसाधारणपणे मराठी भाषा या बोलणारे लोकसंख्येने अधिक होते. पुढे भाषावर रचना झाली या तत्वानुसार 1 मे 1960 मध्ये विदर्भ मराठवाडयातील काही प्रदेश मुंबई इलाख्यात समाविष्ट करण्यात आला व महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

19 वे शतक हे महाराष्ट्राच्या व भारताच्या बदलाचे शतक मानले जाते परंतू हा बदल महाराष्टात एकाएकी झालेला आढळून येत नाही. उलट महाराष्ट्राच्या जीवनातील सर्वच क्षेत्रातील बदल घडवून आणण्यासाठी अनेक समाजसुधारकांना विचारवंताना संघर्ष करावा लागला. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात सामाजिक, राजकीय, कृषी, शिक्षण व औदयोगिक क्षेत्रात मोठया प्रमाणात परिर्वतन आहे. आजच्या महाराष्ट्रात राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन होत आहे. उदयोगधंदे दळणवळणांची साधने, विकासात्मक प्रकल्प व विविध प्रकारचे मनोरंजनाचे साधने, पर्यटन यामुळे महाराष्ट्रातील परिवर्तन होत आहे.

संशोधनाची उद्दिष्टये – महाराष्ट्रातील विविध घटकांच्या माध्यमातून झालेले परिवर्तन व बदल अभ्यासणे.

संशोधन आराखडा – प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयांचा वापर करण्यात आला.

तथ्यसंकलनाचे तंत्र – प्रस्तूत संशोधनासाठी दुय्यम तथ्य संकलनातून करण्यात आले. पुस्तके नियतकालिके इंटरनेट इत्यादी.

महाराष्ट्राच्या विकासातील घटक –

1. **भोगोलिक घटक :**

महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने वैभवशाली वारसा असलेले राज्य आहे. प्रदीर्घ ऐतिहासिक परंपरा, समृद्ध सांस्कृतिक, वारसा निसर्गाचा सान्निध्यात लाभलेली प्राकृतिक सौंदर्याची स्थळे यामुळे महाराष्ट्र राज्य जागतिक पर्यटन नकाशावर विराजमान झालेला आहे. अजंठा, वेरूळ, एलिफंटा यासारखी जागतिक कीर्तीची लेणी व शिल्पे, पूणे, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर यासारखी ऐतिहासिक नगरे आहेत. महाराष्ट्राची अध्यात्मीक राजधानी असलेले पंढरपुर, शिर्डी, तुळजापूर, कोल्हापूर, नाशिक, नांदेड, त्र्यंबकेश्वर, पैठण, देहू, आळंदी, जेजुरी अशी अनेक धार्मिक देवस्थाने आहेत. महाबळेश्वर, पाचगणी, लोणावळा, माथेरान ही थंड हवेची व आर्थिक पर्यटन क्षेत्र आहेत त्यामुळे पर्यटनाचा विकास होत आहे.

2. **संत व समाजसुधारकांचे योगदान –**

महाराष्ट्र राज्याला प्राचीन काळापासून संत व समाजसुधारकांचे महाराष्ट्र राज्याला प्राचीन काळापासून संत व समाजसुधारकांचे मोठया प्रमाणात वरदान लाभलेले आहे. महाराष्ट्रात पुढे वारकरी संप्रदाय लोकप्रिय झाला होता. विशेषत: विठ्ठल संप्रदाय, रामदास संप्रदाय, भक्तीसंप्रदाय अधिक महत्त्वाचे होते. या संप्रदायातील संतानी नाम संर्कीतन व भजन, कीर्तनाचा उपयोग धर्मप्रसारासाठी केला. त्यामध्ये विशेषत: संत

तुकाराम महाराज, रामदास, चोखामेळा, गोराकुंभार, संत बहिणाबाई, संत जनाबाई, संत गाडगेबाबा इत्यादी संतांनी समाजपरिवर्तनासाठी कार्य केले. 19 व्या शतकाच्या पुर्वार्धात महाराष्ट्रातील प्रारंभीच्या समाजसुधारकांनी समाज सुधारणेस सुरूवात केली. समाजातील खालच्या वर्गात व ग्रामीण समाजात हे कार्य पोहचू शकले नाही. या दृष्टीने सामाजिक सुधारणेच्या कार्याला महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथम प्रारंभ केला. महात्मा ज्योतीबा फुले आपले सामाजिक चळवळीचे कार्य अखेरपर्यंत सुरू ठेवले. व 1848 मध्ये पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली व महिलांना शिक्षणाचा प्रवाहात आणले. अशा प्रकारे सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा श्री.गणेशा महात्मा ज्योतिबा फुले यांनी महाराष्ट्रात सुरू केला. त्यामुळे पंडिता रमाबाई, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी जनतेला सामाजिक चळवळीने जागे केले.

3. विकासात्मक प्रकल्प –

महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मल्टी मॉडेल इंटरनॅशनल पॅसेंजर ॲन्ड कार्गो हव विमानतळ नागपूर (मिहान) या संमिश्र प्रकल्पाचा विकास करण्याचा निर्णय घेतला या प्रकल्पात नागपूरचे विदयमान देशांतर्गत विमानतळ आंतरराष्ट्रीय प्रवासी आणि कार्गो हब विमानतळ म्हणून विकसित करणे तसेच विमानतळाच्या हद्दीतील एक विशाल विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) समाविष्ट आहे. SEZ (विशेष आर्थिक क्षेत्र) या विमानतळाच्या सीमेवर येऊन MADC 2000 हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रफळ वर एक प्रचंड SEZ विकसित करत आहे. ज्यामध्ये आयटी उदयोग रत्ने आणि दागिने कपडे, इलेक्ट्रीक वस्तू, औषधी प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ यांसारख्या विविध निर्यात केंद्र औषधी आणि इतर कोणत्याही प्रकारचे उदयोग एकावेळी सुमारे 900 ट्रक पार्किंगची सुविध असलेले रोड असलेले विशाल गोदाम खुले स्टॉकयार्ड कोल्ड स्टोरेज इत्यादी सुविधा आहेत.

4. जैतापुर अणुऊर्जा प्रकल्प –

जैतापुर अणुऊर्जा प्रकल्प हा भारतातील प्रस्तावित अणुऊर्जा प्रकल्प आहे. बांधल्यास ती सर्वात मोठी अणुऊर्जा असेल. 9.900 मेगावॅट क्षमतेच्या निव्वळ उत्पादन क्षमतेने जगात निर्माण करणारे स्टेशन 6 डिसेंबर 2010 रोजी दोन तिसऱ्या पिढीतील युरोपियन प्रेशरराइन्ड रिॲक्टरच्या पहिल्या संचाचा बांधकामासाठी करार करण्यात आला आणि आण्विक इंधनाचा पुरवठा फ्रान्सचे अध्यक्ष निकोलस सारकोझी आणि भारताचे पंतप्रधान मनमोहनसिंह यांच्या उपस्थित फ्रेंच राज्य नियंत्रीत आण्विक अभियांत्रिकी फर्म अरेवा SA आणि भारतीय सरकारी मालकीचे सिंग, न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया करारावर स्वाक्षरी केली. प्रस्तावित जैतापुर अणुऊर्जा प्रकल्प भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर आहे. त्याची सरासरी उंची 90 फुट (27 मीटर) आहे. हा प्रकल्प 968 हेक्टर (3.74 चौरस मैल 9.68 किमी जमिनीवर पसरेल. जैतापुर अरबी समुद्रावर आहे. रत्नागिरी जिल्हयातील किनारा महाराष्ट्राच्या नैऋत्य भागात भारत रत्नागिरी जिल्हा हा कोकणचा एक भाग आहे.

5. परळी औष्णीक वीज केंद्र –

परळी औष्णीक वीज केंद्र आहे त्यांत महाराष्ट्राला वीज पुरवठा केला जातो. परळी येथील वीज निर्मिती केंद्रातून 1971 मध्ये प्रत्यक्ष वीज निर्मितीला सुरूवात झाली होती. 2010 साली या ठिकाणी सात संचातून 1190 मेगावॅट वीज निर्मिती होत होती यातून महाराष्ट्राला वीज पुरवठा केला जातो.

6. जायकवाडी धरण :

जायकवाडी धरण हे गोदावरी नदीवर असलेले महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्हयातील एक प्रमुख धरण असून मराठवाडयातील जवळपास 2.40 लाख हेक्टर क्षेत्र या धरणामुळे ओलिताखाली आहे. शेतीसाठी व पिण्यासाठी पाण्याचा उपयोग केला जातो. त्यातून वीज निर्मिती केली जाते.

7. सहकार चळवळ –

सहकार चळवळ ही एक सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. सध्याच्या सामाजिक व आर्थिक व्वयस्थेत क्रांतीकारी बदल घडवून शोषणविरहीत आणि समतेवर आधारलेला नवा समाज निर्माण करणे हे या चळवळीचे अंतिम उद्दीष्टये आहे म्हणून आर्थि व्यवहाराबरोबरच लोकशिक्षणाचे काम सहकारी संस्था करीत असतात. सहकार ही एक प्रवृत्ती असल्याने आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि इतर कोणत्याही व्यवहारात तिचा उपयोग करता येतो. सुरूवातीला ग्राहक भांडारे आणि पतसंस्था यांच्या स्वरूपात सुरू झालेल्या या चळवळीने आता बहुतेक सर्व आर्थिक क्षेत्र व्यापून टाकली आहे.

8. सामाजिक आर्थिक विकास –

महाराष्ट्रातील औदयोगिकरण, नागरीकरण, विकासात्मक प्रकल्प उदयोगधंदे वीज प्रकल्प पिण्याचा पाण्यासाठी व जलसिंचनासाठी मोठे धरणांची बांधणी, लघुउदयो, कुटीर उदयो, शैक्षणिक संस्था, शासकीय आस्थापना, दळणवळण साधनांची निर्मिती महामंडळे, पतसंस्था ग्रामीण भागातील विकासासाठी व नागरिकांसाठी विविध योजना जाहीर केल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासाबरोबर शहरी भागाचा विकास होत आहे.

9. शैक्षणिक घटक –

महाराष्ट्र राज्य शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहे. वेगवेगळे कौशल्य शिकविणारे शैक्षणिकत संस्था आहेत. अनेक शैक्षणिक संस्थामध्ये वेगवेगळे अभ्यासक्रम शिकविले जातात. ग्रामीण भागात गाव तिथे शाळा असल्यामुळे गावाती ल लहान मुले शाळेत जातात तर काही मुले अर्धवट शाळा सोडतात. ग्रामीण भागातील दुर्गम, डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या मुलांसाठी सरकारी व अनुदानीत आश्रमशाळा आहेत. शहराच्या ठिकाणी मुले आणि मुलींसाठी वसतीगृह आहे. आश्रमशाळेत राहून शिक्षण घेत आहेत त्यामुळे शिक्षणातून परीवर्तन होत आहे.

10. राजकीय विकास –

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे हे आपले उद्दिष्ट असल्याने स्पष्ट शब्दांत नमूद केले. पंचवार्षिक योजनांची यशस्वी वाटचाल ही सर्वस्वी ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. लोकशाही तत्वावर सत्तेचे विकेंद्रीकरण घडवून आणण्यासाठी मेहता समितीने पंचायत राज्याची त्रिसुत्री योजना मांडली. यातून असे सुचविले की, ग्रामपातळीवर ग्रामपंचायत, विकास गटाचा पातळीवर पंचायत समिती आणि जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेचा मार्फत कामात एकसुत्रता आणली जावी. सत्तेचा लोकशाही विकेंद्रीकरणावर आधारीत शासन प्रणालीला पंचायत राज्य हे नामामिधान प्राप्त झाले.

महाराष्ट्र सरकारचे पंचायत राज्याची अंमलबजावणी करण्यासाठी श्री.वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली इ.स.1960 मध्ये एक समिती स्थापन केली व त्या समितीने तयार केलेला अहवाल 1961 मध्ये राज्य

सरकार कडे सादर केला. त्यानुसार महाराष्ट्रात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा करण्यात आला. या कायदयाची अंमलबजावणी 1962 ला मे महिन्यात सुरू झाली.

11. ग्रामपंचायत –

महाराष्ट्रात ज्या गावाची लोकसंख्या 600 पेक्षा जास्त आहे अशा गावांसाठी ग्रामपंचायतीची स्थापना करण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे. यात अनूसुचित जाती व अनुसूचित जमातींतील एक पुरूष आणि दोन महिलांचा समावेश असावा. ग्रामपंचायतीत 7 व जास्तीत जास्त 15 सभासद असतात. मुदत 5 वर्षाची असते.

12. पंचायत समिती –

विकास गटाच्या पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या समितीत पंचायत समिती असे नाव दिले. विकास गटातील किंवा तालुक्यातील मतदार संघातून जिल्हा परिषदेवर निवडून आलेले सदरच जिल्हापरिषदेचा प्रत्येक मतदार संघातून निवडणूकीद्वारे निवडून आलेले दोन सदस्य पंचायत समितीच्या सदस्यांची निवड ग्रामपंचायत समितीची अप्रत्यक्ष निवडणूकीने करावी.

13. जिल्हा परिषद –

जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद नावाची समिती स्थापन करून तिच्याकडे जिल्हयातील सर्व व्यवहार सोपवावे. या परिषदेत पंचायत समितीचे अध्यक्ष ते लोकसभा व विधानसभ सदस्य जिल्हा पातळीवर काम करणारे सर्व अधिकारी यांचे सदस्य म्हणून तर जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असावा असे मेहता समितीने सुचविले.

निष्कर्ष – वरील अध्ययनावरून महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा योगदानातून व विकासात्मक प्रकल्प व पर्यटन उदयोगधंदे, विविध शैक्षणिक संस्था व पंचायत राज्य व्यवस्थेमुळे अशा विविध घटकांचा माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील सातत्य व परिवर्तन झाल्याचे दिसून येत आहे.

संदर्भसूची–

1. समाजशास्त्र / सेट/ नेट – 3रा पेपर ले.प्रा.मनोहर तोटरे- विदयाभारती प्रकाशन लातूर -2005
2. प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी ले.प्रा.डॉ. दिलीप खैरनार – डायमंड पब्लिकेशन पूणे -2009
3. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास ले.प्राचार्य अण्णासाहेब गरूड- कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद -1995
4. पर्यटन भुगोल लेखक – डॉ.एस.बी.शिंदे फडके प्रकाशन कोल्हापूर -1997
5. ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार ले.श्री.निवास धूत/ पी.आर. कुलकर्णी – पिंपळापूरे पब्लिकेशन नागपूर – 1990
6. परिवर्तनाचे ग्रामदूत – https://maharashtratimes.com Maharashtra pune.
7. Jaitapur Nuclear power project Wikipedia https://enim. Wikipedia.org.
8. Mihan District Nagpur – https://maharashtratimes.com

*समाजशास्त्र विभाग, बँ. बाळासाहेब खर्डेकर महाविदयालय, वेंगुर्ला जि.सिंधुदुर्ग

***

बदलती जीवनशैली आणि आरोग्य : एक समाजशास्त्रीय अभ्यास

*सानिका कुलकर्णी

गोषवारा :

अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण जगाची रूपरेषा पालटलेली दिसते. औदयोगिकरण, शहरीकरण वाढत असल्यामुळे कामाचे स्वरूप, राहणीमानाचे स्वरूप यात अमुलाग्र बदल घडून आलेला दिसतो. परंतु या वाढत्या स्पर्धेचा आणि भांडवलशाही व्यवस्थेचा गंभीर परिणाम बदलत असलेल्या जीवनशैलीमुळे आरोग्यावर होते आहे. प्रस्तुत शोधनिबंधात बदलत्या जीवनशैलीचा आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तावना :–

''आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्टीकोनातून सुस्थित अशी अवस्था होय न की रोग वा दुबळेपणा यांचा अभाव'' अशी आरोग्याची व्याख्या WHO ने केली आहे. आरोग्य हा मानवाचा जीवनातील अत्यंत मूलभूत आणि महत्वाचा घटक आहे. अनेक सामाजिक प्रक्रियांचा परिणाम मानवी जीवनावर आणि आरोग्यावर होताना दिसत आहे.

व्यक्तीचे शरीर हेच तिच्या अस्तित्वाची खूण आहे. परंतु जागतिकीकरण, उदारीकरण, खुली बाजारपेठ व भांडवलशाही व्यवस्थेमुळे वाढत चाललेल्या स्पर्धेचा गंभीर परिणाम मानवी आरोग्यावर होताना दिसत आहे. काही अभ्यासकांचे असे मत आहे की, सामाजिक, सांस्कृतिक वातावरणातील बदलाशिवाय आरोग्याचा स्तर उंचावता येत नाही. या संदर्भात ग्रहम आणि रीडर या दोन विचारवंतांनी केलेल अध्ययन व त्याद्वारे काढलेले निष्कर्ष स्पष्टपणे असे निर्देशित करतात की, अतिउच्च रक्तदाब (Hypertension), रक्तदाब (Blood Pressure), रक्तवाहिनी संबंधित रोग (Coronary Disease), विविध कर्करोग आणि क्षयरोग यांचा स्पष्ट संबंध कुटुंबाचा सामाजिक, आर्थिक परिस्थितीशी आहे.

बदलत्या जीवनमानानुसार आपला आहार बदलला आहे. जागतिकरणाचा प्रभाव हा खादयसंस्कृतीवर होतो आहे. पाश्चिमात्य, अमेरीकन तसेच अनेक देशांचे अनुकरण होत असल्यामुळे भारतात फास्ट फुड, झटपट, रासानिक दृष्ट्या बनवल्या जाणाऱ्या अन्न पदार्थाचा वापर वाढत चालेला आहे. समकालीन काळात अंतरीक सुंदरता आणि स्वच्छतेपेक्षा बाह्यसैदर्याला जास्त महत्व आल्याचे दिसून येते आणि याचा गंभीर परिणाम आरोग्यावर होताना दिसतो.

पूर्व संशोधित साहित्याचा आढावा:–

बदलत्या सवयी व बदलत्या जीवनशैलीमुळे आपल्या शहरी आयुष्यात अनेक समस्या निर्माण झालेले आहेत, ज्यामुळे असंसर्गजन्य असे रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, स्थूलत्व, सांधेदुखी, मानसिक ताणतणाव अशा प्रकारचे आजार वाढू लागले आहेत. प्रवासात व नोकरीमध्ये वेळ जास्ती खर्च झाल्यामुळे छंद जोपासण्यासाठी किंवा आयुष्यात इतर काही करण्यासाठी त्यांच्या जवळ वेळ उरत नाही. या रोजच्या जीवघेण्या दीर्घ प्रवासात काही चाकरमान्यांना शरीराच्या उत्सर्जन क्रियाही रोखून ठेवाव्या लागतात. स्त्रियांची तर आणखीच कुचंबणा असते. मुंबईसारख्या शहरात याचा कुणीही विचार करताना दिसत नाही. खचखचून भरलेल्या रेल्वे व बस यामुळे टीबी, H1N1 Viral Infection, लेप्रसी यासारखे संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती तर आहेच. तसेच स्थूलपणा, सांधेदुखी, गुडघेदुखी, हृदयविकाराचा झटका असे आजार देखील मोठ्याप्रमाणात वाढताना दिसत आहेत. (डॉ. अविनाश तुपे : महाराष्ट्र टाईमस् लेख)

जागतिकीकरणामुळे संधी वाढल्याने करिअरच्या संकल्पना बदलत आहेत. पगाराचे आकडेही वाढत आहेत. हे आकडे जेवढे मोठे तेवढाच कामाचा ताण अधिक हे नव्याने सांगायला नको. कामाच्या पद्धती व खाण्याच्या सवयींत बदल होत आहेत. नवीन व वेगळी जीवनशैली आपला वेगाने ताबा घेत आहे. काळजीची बाब म्हणजे तरुण पिढीवर त्याचा विपरीत परिणाम होऊन वृद्धापकाळात होणारे आजार हल्ली तारुण्यातच गाठू लागले आहेत. (डॉ. वैशाली जोशी : लोकसत्ता)

विकसित तंत्रज्ञानाने माणसाचे आयुष्य अगदी सोपे होत चालले आहे. ओटयाजवळ उभ्याने स्वयंपाक करणे, डायिनग टेबलवर जेवणे, परदेशी पद्धतीचे स्वच्छतागृह वापरणे, पलंगावर झोपणे, घरात वॉशिग मशीन, मिक्सर, फूड प्रोसेसर, ओव्हन व गिझर ही यंत्रे वापरणे यामुळे रोजच्या कामामध्ये जमिनीवरची उठबस किंवा शारीरिक हालचाल जवळपास बंदच झाली आहे. दारात उभ्या असलेल्या मोटारगाडया किंवा स्कूटरचा वापर, रिक्षा व विविध प्रकारच्या टॅक्सी सेवा यामुळे सर्वांचे चालणे अगदी बंद झाले आहे. माणसाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा आपल्या जीवनात अतिवापर केल्याने त्याचा फायदा होण्याऐवजी तोटाच जास्त होत आहे. ऑफिसमधील बैठे काम, मोबाइल, गेम व समाजमाध्यमांमुळे व्यायाम होतच नाही. आणि यामुळे आरोग्यविषयक समस्या अधिक वाढत आहेत.

अलिकडच्या काही वर्षांत, सामाजिकशास्त्रज्ञ आणि सामाजिक महामारीशास्त्रज्ञांनी त्यांचे लक्ष आरोग्याच्या संदर्भातील सामाजिक आणि सांस्कृतिक चलांच्या वाढत्या श्रेणीकडे वळवले आहे. हे चल वंश/ वांशिकता, लिंग आणि लैंगिक भूमिका, इमिग्रेशन स्थिती आणि संवर्धन, गरिबी आणि वंचितता, सामाजिक नेटवर्क आणि सामाजिक समर्थन आणि मनोसामाजिक कार्य पर्यावरण, सामाजिक वातावरणाच्या एकूण वैशिष्ट्यांव्यतिरिक्त जसे की उत्पन्नाचे वितरण, सामाजिक एकता, सामाजिक भांडवल आणि सामूहिक परिणामकारकता अशा घटकांवर प्रकाशझोत टाकलेला दिसतो. (मर्मोट आणि विलकिन्सन, २००६; बरकमन आणि कावाची, २०००).

मनोसामाजिक कार्य वातावरण – विशेषत: नोकरीच्या ताणतणावाचा संपर्क – हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि मानसिक आजार (मार्मोट आणि विल्किन्सन, २००६) यासह अनेक परिस्थितींच्या प्रारंभाशी जोडलेले आहे. साहित्यात नोकरीच्या तणावाच्या दोन मॉडेल्सकडे विशेष लक्ष दिले गेले आहे: नोकरीची मागणी–नियंत्रण मॉडेल (करासेक आणि थिओरेल, १९९०) आणि प्रयत्न – पुरस्कार असंतुलन मॉडेल (सिग्रिस्ट एट अल., १९८६). मागणी – नियंत्रण मॉडेल असे मानते की हे उच्च मानसिक मागण्या आणि नियंत्रणाची कमी पातळी (कमी निर्णय अधिकार आणि कौशल्य वापर) यांचे संयोजन आहे ज्यामुळे कामगारांमध्ये उच्च शारीरिक ताण येतो आणि त्यामुळे रोगाची सुरुवात होते (जसे की उच्च रक्तदाब आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग.) (मार्मोट आणि विल्किन्सन, २००६). नोकरीच्या मागण्या आणि नोकरीचे नियंत्रण मोजण्यासाठी एक पेन्सिल आणि कागद प्रश्नावली विकसित केली गेली आहे आणि लोकसंख्येवर आधारित अभ्यासात वापरण्यासाठी प्रमाणित केली गेली आहे. (www.uml.edu /Dept/WE/research/icq.)

अध्ययनाची उद्दिष्ट्ये:–

१. आधुनिक सामाजिक प्रक्रियांमुळे बदलत चाललेल्या जीवनशैलीमुळे मानसिक आणि शाररिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणे.

२. समकालीन काळातील बदलत्या सामाजिक पर्यावरणाचा आणि आरोग्य यांचा संबंधाचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती आणि तथ्यांचे विश्लेषण:

या शोधनिबंधासाठी गुणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. या विषयासंदर्भात माहिती संकलनासाठी दैनिक वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, शोधनिबंध, विविध वेबसाईट, मासिके अशा विविध साहित्य सर्वेक्षणातून तथ्य संकलनात दुय्यम स्त्रोताचा संशोधन विषयासाठी उपयोग केला आहे. (खैरनार,२००४)

संकल्पनात्मक चौकट :

रिस्क सोसायटी (जोखीन समाज) जर्मन समाजशास्त्रज्ञ उलरिच बेक यांनी (जोखीम समाज) रिस्क सोसायटीची पध्दतशीर व्याख्या केली आहे. आधुनिकीकरणादवारे ओळखला जाणारे धोके आणि असुरक्षितता यांचा सामना करण्याचा मार्ग प्रेरित करणारा समाज म्हणजे रिस्क सोसायटी (जोखीम समाज) होय. सदयस्थितीला भौतिक विकास प्राप्त करताना अनेक असुरक्षित बाबींशी असा सामना दैनंदिन जीवनात करावा लागतो. जशी जशी पदउन्नती होते, कार्यभार वाढतो तसेच ताण–तणाव वाढत त्याचा शाररिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. (अँथनी गिडनस्)

♦द रिमिशन सोसायटी (माफी सोसायटी)

पूर्ण बरे किंवा पूर्णपणे आजारी नसलेल्या अशा अवस्थेत राहणाऱ्या लोकांची संख्या वाढताना दिसत आहे. द रिमिशन सोसायटी म्हणजे औषधांवर जगणारे लोक आहेत, जे प्रत्यारोपण आणि सर्व प्रकारचा कृत्रिम अवयवांसह कार्य करतात. जे आजारी आहेत हे आपण पाहू शकत नाही आणि काही अर्थाने ते नाहीत, परंतु ते त्यांचा दैनंदिन आरोग्यासाठी तंत्रज्ञानावर अवलंबून आहेत आर्थर फ्रँक (१९९५) याला 'द रिमिशन सोसायटी म्हणतो. फ्रँक, १९९५:८) (जॉन मेकॉनिस : ७५४) सदयस्थितीला या भौतिक तंत्रज्ञानात्मक वाढत्या विकासामुळे अशा प्रकारची ''रिमिशन'' सोसायटी वाढते आहे.

सामाजिक संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर त्याचे विश्लेषण व निर्वचन करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनात वय, शिक्षण, व्यावसाय, उत्पन्न, कुटुंब अशा अनेक चालांचा वापर केलेला आहे.

निष्कर्ष:

प्रस्तुत संशोधन करताना अनेक बाबी जाणवल्या जसे की, जसे जसे तंत्रज्ञानात्मकदृष्ट्या आपण विकसित होत आहोत तस तसे सांस्कृतिक आणि सामाजिक पर्यावरण दूषित होत आहे. 'आरोग्य धनसंपदा' अशी असणारी आपली भारतीय संस्कृती कृत्रिम आणि असुरक्षित होत आहे. भौतिक, आर्थिक विकास हा औदयौगिकीकरण, शहरीकरण हया सारख्या प्रक्रियांने झपाट्याने

होत आहे. परंतु कृत्रिम, रासायनिक घटकांचा वापर वाढत असल्याकारणाने शारिरिक, मानसिक आणि सार्वजनिक आरोग्यविषयक समस्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत.

संदर्भ सूची :

मराठी:–

- प्रा.सोमण. मा. श: सामाजिक संशोधनाची तंत्रे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे.
- खैरनार दिलीप: प्रगत सामाजिक संशोधन पद्धती व सांख्यिकी, डायमंड पब्लिकेशन्स.

लेख

- वर्तमान पत्रातील लेख (सकाळ, लोकसत्ता आणि महाराष्ट्र टाईम्स)
- मराठी विश्वकोश काही आरोग्य संदर्भातील निवडक लेख.

English :-

- Giddens A : Sociology (Philip W. Sutton (7th Edition), Willey.
- Ritzer, George : Sociological Theory, International Edition (5th Edition), Mc - Grow Hill Book Co., 1983.
- Kothari, C. R. (1990). Research Methodology: Methods and Techniques. New Age International (P) Limited.
- Ritzer, G. (2007). The Blackwell Encyclopedia of Sociology. Blackwell Publishing Ltd.
- Macionis John J | Plummer Ken: Sociology: A Global Introduction (5th Edition); Pearson.

Websites:-

- https://pubmed.ncbi.nlm.nih.gov/15677415/
- https://scholar.google.com//
- www.uml.edu/Dept/WE/research/jcq

*संशोधक विध्यार्थी, न्यू आर्ट्स वाणिज्य व विज्ञान महाविधालय, अहमदनगर,मोबाईल क्र.९८८१३०९२४४.

***

शाश्वत विकासासाठी पर्यावरण संरक्षणाची गरज : एक अभ्यास

*डॉ.प्रा.दाडगे सुरेखा वैजनाथराव,

गोषवारा :

तंत्रज्ञान आणि विज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे मानवाचे जीवन सुखमय व सोयी-सुविधांनी परिपुर्ण झालेले आहे. दळण-वळण, औद्योगिक, हवामान, आरोग्य इत्यादी क्षेत्रामध्ये झालेल्या क्रांतीमुळे शहरी व ग्रामीण असा भेदभाव कमी झालेला आहे. आणि हे सर्व विज्ञान व तंत्राज्ञानामुळेच शक्य झाले आहे. आणि हे सर्व विज्ञान व तंत्राज्ञानामुळेच शक्य झाले आहे. प्रत्येकाने स्वत:मध्ये वैजानिक दृष्टिकोन दृढ करुन शाश्वत विकासासाठी निसर्ग व आपल्या गरजा यामध्ये समतोल साधता आले पाहिजे. शाश्वत विकास ही मानवाची गरज आहे. विज्ञान फक्त शाळा, महाविद्यालये आणि पुस्तकामध्ये मर्यादित न राहता ते तळागाळातील लोकापर्यंत पोहचण्याकरीता संशोधक व विज्ञान क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

प्रस्तावना :

नागरिकीकरणाच्या प्रक्रियेचा विचार करताना शाश्वत विकास व पर्यावरणाचे संतूलन व सर्वसमावेशकता यांचा विचार करणे आवश्यक आहे. नागरीकरणाच्या वाढत्या गरजांचा विचार आणि पर्यावरण यांच्यातील परस्पराविरोधी आयाम संबंधीचे वाद आता नवे राहिलेले नाहीत. शाश्वत विकासाच्या दिशेने प्रगती करत असताना निपष्कपातीपणा, क्षमता आणि शाश्वतता अशा विविध घटकांतील समतोल राखणे गरजेचे आहे. शाश्वत विकासा संदर्भात 1) आर्थिक प्रगती, कार्यक्षमता व ध्यैर्य 2) पर्यावरणीय समस्या, संसाधने 3) सामाजिक सबलीकरण संघटन आणि समावेशकता या तीन घटकातील परस्परसंबंधाचे निराकरण ही केले पाहिजे. शाश्वत विकासाची व्यक्ती व तिला आधारभूत असलेल्या सामाजिक घटकातील विस्कळीतपणा यावर मोठया प्रमाणावर वादचर्चा होत असल्या तरी ही यामध्ये आर्थिक व पर्यावरणीय बाबी दुर्लक्षीत केल्या जातात.

आधुनिक जागतिक व्यवस्थेमध्ये पर्यावरणीय सुरक्षा व शाश्वत विकासाचा विचार केंद्र अग्रस्थानी आला आहे. मानव जातीच्या शांततापुर्ण आणि सर्वांगीण शाश्वत विकासासाठी पर्यावरण संरक्षणाची अत्यंत गरज आहे. शाश्वत विकास ही बहुआयामी व परस्परावलंबी संकल्पना आहे. या संकल्पनेत वर्तमान काळातीलपिढी बरोबरच भविष्यातील पिढीचा विचार केला जातो. ही संकल्पना नैसर्गीक साधनसंपत्तीचा विवेक बुध्दीने व दुरदुष्टीने वापर करण्यावर अधिक भर देते. परंतु सध्या होत असलेला विकास कुणाच्या तर विनाशावर अवलंबून आहे. म्हणून शाश्वत विकासाची संकल्पना पर्यावरणाच्या संरक्षणाशिवाय करणे आवश्यक आहे. म्हणून निसर्गाचे तुटलेले संबंध जोडणे आवश्यक आहे.

शाश्वत विकासाची संकल्पना :

शाश्वत विकास म्हणजे हमी देणारा विकास किंवा चिरंतर विकास. येणाऱ्या भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याचे नियोजन करुन पर्यावरणाचा समतोल राखुन वर्तमान पिढीच्या सध्याच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय.

संशोधन अभ्यासाचे उदिष्टे :

1. शाश्वत विकास संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. शाश्वत विकास व पर्यावरण यांचा संबंध अभ्यासणे.
3. शाश्वत विकास व पर्यावरणविषयक सुरक्षितेसाठी उपाय योजना अभ्यासणे.
4. पर्यावरण बदल व शाश्वत विकास उदिष्टे/ध्येय अभ्यासणे.
5. शाश्वत विकासाची गरज व आव्हाने अभ्यासणे.

गृहितके :

1. पर्यावरण विकास व शाश्वत विकास यामध्ये असमानता आहे.
2. पर्यावरण विकास आणि शाश्वत विकास यामध्ये संतुलन राखणे गरजेचे आहे

पर्यावरण बदल व शाश्वत विकासाची उदिष्टे :

पर्यावरण बदल, अन्नाची व्यवस्था व आरोग्य या तीन बाबींना संबोधित करण्यासाठी अनेक पर्याय अस्तीत्वात असले तरी अमंलबजावणी करण्यायोग्य पर्याय आणि शाश्वत विकासाची धोरणे करण्यात अडथळे आहेत. आपल्या करमणुकीसाठी आपण जंगल, पर्वत, नदया, समुद्र, वन्यजीव असलेल्या ठिकाणी जातो व निसर्गाचा आंनद घेतो. पण आपल्या पुढील पिढीच्या भविष्याचे काय हे सुध्दा असाच निसर्गाचा आनंद घेऊ शकतील का, असा विचार आपण केला पाहिजे, शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो सद्याच्या पिढीतील गरजांची पुर्तता करताना भावी पिढीतील गरजांच्या क्षमतेला धक्का न पोहंचवता केलेला विकास होय. आपल्या आर्थिक, पर्यावरणीय व सामाजिक अशा सर्व गरजा, आजच्या पिढीच्या व भावी पिढयांच्याही पुर्ण व्हाव्यात व त्यांच्यात समतोल साधला जावा हेच शाश्वत विकासाचे ध्येय आहे.

शाश्वत विकासाची ध्येय :

भविष्यातील पिढयांना आपण लक्षात ठेवलेल्या संसाधनांचा आनंद घेण्यास सक्षम होण्यासाठी शाश्वत विकासाची पुरेशी विकास म्हणून कल्पना केली जाते. याचा अर्थ कालांतराने संसाधनाच्या उत्खननावर प्रतिक्रिया देण्यास सक्षम असणे. यासाठी शाश्वत विकासाचे ध्येय जागतिक उदिष्टांच्या नावानेही ओळखले जातात. 2030 च्या शाश्वत विकासाचा अजेंडा, आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय क्षेत्रांचा समावेश असलेल्या एकात्मिक आणि अविभाज्य स्वरुपाच्या 17 शाश्वत विकास ध्येय प्रस्तापित करतो.

1. जगातील गरीबी दुर करा.
2. उपासमार संपवा, अन्नसुरक्षा आणि चांगले पोषण मिळवा व शाश्वत शेतीला प्रोत्साहन दया.
3. निरोगी जीवनाची हमी दया.
4. लिंग समानतेतून सर्व महिला व मुलींना सशक्त करा.
5. अजीवन शिक्षण संधीचा प्रचार करा.
6. शाश्वत व्यवस्थापन सुनिश्चीत करा.
7. सर्वांना परवडणारी, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जेची उपलब्धता सुनिश्चीत करा.
8. निरंतर आणि शाश्वत आर्थिक वाढ आणि उत्पादक रोजगार या सर्वांसाठी कामाला प्रोत्साहन दया.
9. लवचिक पायाभुत सुविधा आणि टिकाऊ औद्योगिकरण प्रोत्साहित करणे आणि नवकल्पना प्रोत्साहित करणे.
10. देशातील असमानता कमी करणे.
11. शहरे आणि मानवी वस्ती सुरक्षित, लवचिक आणि शाश्वत बनवा.
12. शाश्वत वापर आणि उत्पादन पध्दतीची हमी.
13. हवामान बदल आणि त्यांचे दुष्परिणाम सोडविण्यासाठी तातडीने कारवाई करा.
14. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी महासागर, समुद्र आणि सागरी संसाधनांचे संरक्षण आणि वापर करा.
15. जंगलाचे शाश्वत व्यवस्थापन करा, जमिनीचा ऱ्हास थांबवा आणि जैविक विविधतेचे नुकसान थांबवा.
16. शाश्वत विकासासाठी शांततापुर्ण आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन दया.
17. अंमलबजवणीची साधने मजबूत करा, शाश्वत विकासासाठी जागतिक भागीदारीला पुन्हा उभारी दया. प्रत्येकाने ही महत्वकांक्षी ध्येये साध्य करणे आवश्यक आहे. विविध परिस्थितीमध्ये शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी सर्व समाजातील सर्जनशीलता, ज्ञान, तंत्रज्ञान आणि संसाधनाची आवश्यकता असते.

शाश्वत विकासापुढील आव्हाने :

1. **लोकसंख्यावाढ :**

जसजशी जगाची लोकसंख्या वाढते आहे. तसेच उपलब्ध असणाऱ्या नैसर्गीक संसाधनावर ताण येतो. आज जगाची लोकसंख्या अंदाजे 7.7 अब्ज आहे व भारताची लोकसंख्या 1.32 अब्ज आहे. इतक्या मोठया लोकसंख्येकडून ज्या वेगाने आज हे नैसर्गीक स्त्रोत वापरले जाते ते पाहता हे स्त्रोत फार काळपर्यंत टिकु शकणार नाहीत.

2. **नैसर्गीक संसाधनाचे शोषण :**

औद्योगिक स्तरावरील नैसर्गीक साधनांचे शोषण हे 19 व्या शतकापासून सुरु झाले. लाकुड, कोळसा, धातु, तेल, नैसर्गीक वायु, जमिनीतील खनिजे, पाणी आणि अशी अनेक संसाधने औद्योगिक व व्यावसायिक उपयोगासाठी, साधनांची प्रगती आणि विकास, राहणीमानातील बदल यामुळे कार्यालय, घरे, उदयोग, शेती यासर्व ठिकाणी निरनिराळया उपकरणांचा वापर होऊ लागला. यामुळे नैसर्गीक संसाधनांचा अतिवापर कमी करणे हे एक आव्हान आहे.

3. **गरिबी :**

अविकसीत व विकसनशील देशात गरिबी हे एक मोठे आव्हान आहे. शाश्वत विकास करताना गरिब व वंचित लोकांच्या मुलभूत गरजाही लक्षात घेतल्या पाहिजेत. त्यामुळे नैसर्गीक संसाधनांचा अतिवापर होऊ लागला.

4. **नैसर्गीक संसाधनांचे असमानवितरण :**

विकसीत देशांतील लोकांचा नैसर्गीक संसाधनांचा दरडोई वापर हा विकसनशील देशातील लोकांच्या वापरापेक्षा 50 पटीने अधिक आहे. एकटया अमेरीकेची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येची फक्त 4 टक्के आहे. तरी ते जगातील संसाधनांपैकी 25 टक्के संसाधने वापरतात. देशांतर्गत पाण्याच्या वापराबाबतही असमानता दिसुन येते. जेव्हा मोठी धरणे बांधली जातात. तेव्हा जंगलाचे मोठे पटटे व लोकांची शेतजमीन वापरली जाते. त्यांचा उदरनिर्वाह या शेतजमिनीवर अवलंबून असतो. धरणांमुळे लोकांना इतरत्र विस्थापित व्हावे लागते.

5. **शिक्षण व बेरोजगारी :**

अशिक्षितता हे शाश्वत विकासापुढील एक मोठे आव्हान आहे. गुणवत्तापुर्ण शिक्षण नसल्यामुळे त्यांना चांगला रोजगार मिळत नाही. देशातील लोकसंख्या वाढ हे एक बेराजगारीचे कारण आहे.

6. **शासकीय धोरणे :**

शाश्वत विकासाची उदिष्टे, ध्येय साध्य करण्यासाठी सरकारला काही कठोर निर्णय घ्यावे लागतील व विविध योजनांची अंमलबजावणी करावी लागेल. वस्तुचे उत्पादन करताना त्याची पर्यावरणीय मुल्ये लक्षात घेऊन सर्व वस्तुच्या किमंतीची पुर्नरचना करावी लागेल.

शाश्वत विकासात व्यक्तीची/शासनाची भुमिका :

1. प्रत्येक व्यक्तीची भुमिका :

शाश्वत विकासाच्या वाटेवर जायचे असेल तर आपण आपले सर्व स्त्रोत जसे की, अन्न, वस्त्र, कागद, पाणी, ऊर्जा, वने, जमीन इत्यादी आपल्या पातळीवर अगदी काळजीपुर्वक वापरले पाहिजेत. अगदी सोप्या पायऱ्या वापरुन व 4R ची तत्वे वापरुन आपण हे दैनंदिन जीवनात करु शकतो. वस्तुंच्या वापरातील 4R तत्वे अशी आहेत. Reduce (वापर कमी करा) Reuse (पुर्नवापर करा) Recycle (पुनर्चक्रीकरण) Recover (पुर्नप्राप्ती करा)

2. समुदायाची भमिका :

कोणतेही गाव किंवा समुदाय यांच्या गावाचा कायापालट करु शकतात. यासाठी त्यांना प्रेरणा देणारी एखादी घटना किंवा व्यक्ती कारणीभुत होते. गावाची सदभागातून शाश्वत विकास व समृध्दी साधणारे राळेगणसिध्दी हे गाव उत्तम व आशादायक उदाहरण आहे.

3. शासनाची भुमिका :

शाश्वत विकासाची सर्व उदिष्टे साध्य करण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी सरकारने काही धोरण व कार्यक्रम निश्चीत केले आहेत. ते पुढील प्रमाणे

1. स्वच्छ भारत अभियान :

2 आक्टोबर 2014 रोजी पंतप्रधानांनी देश स्वच्छ करण्याच्या हेतूने हा कार्यक्रम सुरु केला. हा कार्यक्रम शाश्वत विकास उदिष्ट क्र. 16 वर आधारित आहे. याचा उद्येश प्रत्येक कुटूंबाला स्वच्छतेच्या सुविधा मिळाव्यात असा आहे.

2. बेटी बचाओ बेटी पढाओ योजना :

ही योजना 22 जानेवारी 2015 रोजी पंतप्रधान यांनी सुरु केली ही योजना शाश्वत विकास उदिष्ट क्र. 5 वर आधारित आहे. मुलींचे प्रमाण कमी होणे व शिक्षणाची संधी न मिळणे यावर ही योजना लक्ष केंद्रीत करते.

3. **उज्वल विकास योजना, पंतप्रधान आवास योजना :**

उज्वल विकास योजना योजना ही 1 मे 2016 रोजी पंतप्रधान यांनी सुरु केली. यामध्ये दारिद्रय रेषेखालील 5 कोटी कुटुंबातील महिलांना गॅसची जोड करुन दिली. आरोग्यावर परिणाम होणाऱ्या दुष्पपरिणामकारक सोयींना दुर करुन धुरविरहीत सोयी उपलब्ध करुन दिल्या.

पंतप्रधान आवास योजनेत भारत सरकारने पुढाकार घेऊन गरिबांना परवडणाऱ्या दरात घरे देण्यासाठी ही योजना बनवली. 2022 पर्यंत 2 कोटी लोकांना घरे देण्याचे कार्य या योजने अंतर्गत करण्यात आले. अशा अनेक भुमिका शाश्वत विकासासाठी शासन व समाजातील व्यक्ती बजावत आहेत.

निष्कर्ष :

1. समाज आणि पर्यावरण, वातावरण यांच्यातील समाधानकारक नातेसंबंध साध्य करण्यासाठी, संभाव्य संघर्ष कमी करण्यासासाठी मानवी क्रिया आणि संसाधनाच्या वापरावरील स्पर्धेमुळे जे बदल घडु शकतात त्यासाठी वेळेवर तरतुद केली पाहिजे.
2. शाश्वत विकास पर्यावरणाच्या आवश्यकतामध्ये स्थिरता आणतो हे भविष्यातील पिढयांसाठी वापरण्यायोग्य संसाधने उपलब्ध करते. शाश्वत विकास हा निसर्गाने दिलेल्या संसाधनाचे जतन करण्याचा एक अदभूत मार्ग आहे.
3. दैनंदिन जीवनातील एक महत्वाचा हिस्सा म्हणजेच निसर्ग म्हणूनच निसर्गाने दिलेली साधन संपत्ती काळजीपूर्वक सांभाळली पाहिजे. शाश्वत विकास या संकल्पनेमध्ये नैसर्गीक घटकांचा विचार केला असता. निसर्ग ही मानवाला मिळालेली देणगी आहे. त्याच्यामुळे मानवी जीवनाला एक आकार व अस्तिव प्राप्त झाले आहे. परंतू मानव स्वत:च्या विकासासाठी निसर्गाचा प्रमाणापेक्षा जास्त वापर करत आहे. त्यावर उपाय म्हणून पर्यावरणाचे शिक्षण सर्वांना देऊन त्याचा प्रचार केला पाहिजे. दैनंदिन व्यवहारात पर्यावरणाचा विचार, आचरणात आणले पाहिजे. आर्थिक विकासापेक्षा मानवाच्या विचार प्रणालीचा विकास होणे गरजेचे आहे. हाच योग्य विचार मानवाला खऱ्या अर्थाने सुखी ठेवणारा व भविष्याचा विचार करणारा शाश्वत विकास योग्य ठरेल.

संदर्भ सुची :

1. डॉ.प्रतिभा शांताराम कदम, 'शाश्वत विकास ध्येय ओळख'
2. डॉ.एस.भंगाले, 'शाश्वत विकास आणि पर्यावरण शिक्षणासाठीचे शिक्षण' सक्सेस पब्लीकेशन, पुणे
3. डॉ.व्ही.जे.पाटील (2001) प्रो.संभाजी पाटील, 'शाश्वतता आणि विकास, प्रशांत पब्लीकेशन,
4. नवानाथ मोरे, 'पर्यावरण आणि विकास' मैत्री पब्लीकेशन

***समाजशास्त्र विभागप्रमुख, कै.बा.पा.ए.महाविद्यालय, उदगीर** Email- surekhadadge@gmail.com

Mob.८२०८२८४८४५

***

शाश्वत विकासात पंचायतराजची भुमिका

*प्रा.धिमधिमे के.एम

भारतात पंचायत राजला ऐतिहासाके स्थान आहे. प्राचीन भारतात स्वत्र्य आणि स्वंयपुर्ण पंचायत अस्तित्वात होत्या. यांचा उल्लेख साहित्यात आढळुन येतो. प्राचीन ग्रामपंचायतीच्या कामाचे वर्णन वेद, रामामण, जैन, बौध्द साहित्यात त्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच कौटील्याचे अर्थशास्त्र तसेच शिलालेख वरुन ही ग्रामपंयायतीच्या कार्यचा उल्लेख केलेला दिसुन येतो. भारत हा खेड्याचा देश म्हणुन ओळखला जातो. आजही भारतात 65% लोक हे खेड्यात राहतात. खेड्यातील लोक एकत्रित येऊन एखाद्या प्रश्नावर समस्येवर विचारविनिमय करीत असत त्यालाच ग्रामसभा असे म्हणत या सभेंत सभासद संख्या आडसर ढरु लागली त्यामुळे यातुन पाच सभासद निवडव्यात येत असत त्यालाल पुढे पंचायत हे नाव देण्यात आले. या पंचायतीमध्ये प्रौढ, ज्ञान संपन्नी, चारित्र्यसंपन्न, वृध्द व्यक्तीचा समावेश असे. पंचायतील मधील सभासद हे निर्णय घेताना बदुमताने घेत असत हा निर्णय गावातील लोकांना बंधन कारक असे.

प्राचीन भारतातील अर्थव्यवस्था ही ग्रामीण अर्थव्यवस्था होती. त्यामुळे ते एक प्रशासनाचे अविभाज्य अंग म्हणून ग्रामपंचायत ओळखली जाई. भारतात राजेशाही होती परंतु ग्रामपंचायतीच्या माध्यामातुन राजा आपला कारभार करीत असे त्यामुळे दैनंदिन कामात राजाचा हस्तक्षेप नव्हता. गावातील प्रमुखास जनता आणि राजा यांच्यात मध्यस्थीची भुमिका पार पाडवी लागत असे. ही भुमिका पार पाडताना त्याला अनेक कार्य करावे लागत गावाचे सरंक्षण करणे, गावातील लोकसंख्या शेत जमिन महसुल व मालकी हस्तातरण संबंधीच्या नोंदी ठेवणे इत्यादी कार्य करावी लागत असत.

प्राचीन ग्रामपंचायतीच्या विघटनाला सुरुवात मध्ययुगीन कालखंडापासुन झाली. मुस्लीम राज्यकर्त्याने ग्रामपंचायतीची स्वंयपुर्णत व स्वयत्ता नष्ट्र केली. ग्रामपंचायतचे हक्क आणि अधिकार काढुन घेण्यात आले त्याठिकाणी मुकदम किंवा मुखिया यांची नेमणुक करण्यात आली. मोगल कालीन कालाखंड हा पंचायतीच्या दृष्टिने अंधकारमय कालखंड म्हणुन ओळखला जातो.

भारतात 23 जुन 1757 च्या प्लासीचा लढाईनंतर ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा साम्राज्य विस्तार वाढत गेला आणि मोगल साम्राज्याच अस्त झाला. ब्रिटीशांच्या काळात सतेच्या केद्रिंकतरणामुळे ग्रामीण स्वायतता आणि स्वंत्रपूता नष्ट झाली. प्रभावशाली असणाऱ्या ग्रामपंचायती निष्प्रभ झाल्या. ब्रिटीशानी शेतसारा गोळा करण्यासाठी अधिकाऱ्याची नेमणुक केली. शेतसाऱ्यातुन मिळणारे उत्पन्न, ग्रामपंचायतीला मिळणे बंद झाले. न्यायदानाचे काम ग्रामपंचायतीचे काढुन न्यायालयाकडे देण्यात आले. सत्तेच्या केद्रिकरणामुळे ग्रामपंचायतीची व्यवस्था कमकुवत झाली. म.गांधी यांनी सत्तेचे विकेद्रीकरणासाठी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 26 जानेवारी 1950 ला राज्यघटना अस्तित्वात आली. राज्यघनेत राज्य आणि संघराज्य यांचा तपशील होता. जिल्हा-तालुका व गावपातळीवर शासन कसे करावे यांची तरतुद नव्हती.ग्रामपंचायतीचा उल्लेख नव्हता. के संथानम यांच्या सुचनेनुसार धोरणविषय तत्वामध्ये पंचायतीचा समावेश करण्यात आला.

1951 पासुन पंचवार्षिक योजनेची सुरवात झाली. या योजनेत ग्रामीण विकासाला महत्वाचे स्थान देण्यात आले. 1952 मध्ये सामुहिक विकास कार्यक्रम व 1953 मध्ये राष्ट्रिय विस्तार सेवा योजनाच्या माध्यमातुन ग्रामीण सार्वजणीक विकास घडवुन आणण्यासाठी लोकांचा सहभाग घेणे आवश्यक होते. परंतु या दोन्ही योजनेला लोकांचा सहभाग मिळाला नाही या योजेनेला अपयश आले. या योजनेचे मुख्यमापन करण्यासाठी 1957 साली बलवंतराव महेता समिती स्थापन करण्यात आली. या समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी जिस्तरीय यंत्रना

निर्माण करण्याची सुचना केली 1957 ते 1980 पर्यंन अनेक समित्या नेमण्यात आल्या. शेवटी 1991 मध्ये पंचायतराज संबंधी निधेमक मांडण्यात आले 2 एप्रिल 1993 पासुन 73 व 74 व्या घटना दुरुस्ती कायदा अंमलात आला. आणि पंचायतराजला घटनातक दर्जा देण्यात आली.

उदिष्टे

1. पंचायतराज व्यवस्थेचा अभ्यास करणे.

2. पंचातराजच्या माध्यमातुन झालेला शाश्वत विकास पहाणे.

* शाश्वत विकासात पंचायतराज भुमिका.

शाश्वत विकास हा भविष्यकालीन आंतरराष्ट्रीय विकास संबंधीत ध्येयाचा संच आहे ही ध्येय युनायटडे नेशन्स ने नोंदविली असुन त्याची शाश्वत विकासासाठी जागतिक ध्येय अशी बढती करण्यात आलेली आहे 2015 पासुन 2030 पर्यंत ही ध्येय लागु होती. एकुण 107 ध्येये असुन या ध्येयासाठी 169 विशिष्ट ध्येय आहेत. 15 ऑगस्ट मध्ये 193 देशांनी मान्यता दिलेली आहे.

ब्रिटीशाच्या कालंखडात पंचायत व्यवस्था मोडकळीस आली होती. तीचे पुर्नजीवन स्वातंत्र्यानंतर भारतात बलवंतराव महेता समतीने 1959 मध्ये पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली. 1993 पासुन 73 वी घटना दुरुस्तीकरुन पंचातराजला सत्ता व अधिकाराचे हंस्तातरण करण्यात आले. आर्थिक विकास आणि समाजिक न्याय देण्यासाठी विविध योजना लागु करण्याचे जबाबदारी सोपवण्यात आली. आणि धटनेत 11 व्या सुचीचा समाविष्ट करण्यात आली.

1) आर्थिक विकास :-

ग्रामीन आर्थिक विकासात पंचायतराज महत्वाची भुमिका बाजावित आहे. दारिद्रय निमुर्लन कार्यक्रम राबवणे, भुसुधारणा करणे, लघुसिंचन, पशुपालन, लघु उद्योग, कुटीर उद्योग, इत्यादी कार्यक्रम पंचायतराजच्या माध्यमातुन राबविले जातात. त्यामुळे ग्रामीण भागात विकास साधला जात आहे.

2) शिक्षण विषय कार्य :-

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार करण्याचे महत्वपुर्ण कार्य ग्रामपंचायत करते शिक्षणातील पायाभूत घटक म्हणजे इमारत यांची व्यवस्था ठेवण्याचे काम ग्रामपंचायत करते. शिक्षणासाठी लागणारे साधन साम्रगी तसेच क्रिडागणे यांची व्यवस्था ग्रामपंचायती मार्फत केले जाते.ग्रृथालये, सार्वजनिक वाचनालय यांची सोय करणे. शिक्षणासाठी वरील प्रमाणे महत्वपुर्ण कार्य पंचायतराजच्या माध्यमातुन केले जातात.

3) आरोग्य विषयक कार्य :-

पंचायतराजच्या माध्यमातुन आरोग्यविषयक कार्य पार पाडली जातात. कोणतेही संक्रमण संसर्गजन्या रोगाचे उद्रेक फैलाव होऊ नये म्हणुन उपायोजना करने. माणसाना आणि पशुनां प्रतिबंधक लस देणे. सार्वजनिक स्वच्छातेच्या माध्यमातुन सार्वजनिक आरोग्यची काळजी घेण्यासाठी सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवणे, शौचालय बांधणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे. पिण्यासाठी शुध्द पाण्याचा पुरवठा करणे, सार्वजनिक रस्ते, गटारी, बांध, तळे, विहीरी, इत्यादी कार्य करते. सार्वजनिक जागाची स्वच्छता राखणे, ग्राम स्वच्छता राखणे, इत्यादी कार्य सार्वजनिक आरोग्य विषयक कार्य ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन पार पाडले जातात.

4) कृषी विषयक कार्य :-

ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन कृषी विषयक कार्य करताना महत्वाची भुमिका पार पाडावी लागते. पडीक व ओसाड जमीनी लागवडी खाली आणणे, सुधारीत बि-बियानाची वापरासाठी प्रोत्साहन देणे, पिकांसंबधी प्रयोग करणे,

पिकांचे संरक्षण करणे, रासायनिक खते सेंद्रीय खते ग्रामात उपलब्ध करणे त्यांच वाटप करने इत्यादी कार्य ग्रामपंचायती मार्फत केली जातात.

5) समाजकल्याण विषयक कार्य :-

ग्रामातंर्गत असलेल्या अपंग निराश्रीत आणि आजारी असलेल्याना साहाय देण्याचे काम ग्रामपंयायतीला करावे लागते. मागास व्यक्तीच्या कल्याण कार्यक्रमाची अमलबजावणी करणे, अस्पृश्यता निवरनासंबधी जगजागृती करणे, दारुबंदीला उत्तेजन देणे, महिला बालकण्याण संबधीचे कार्यक्रम आखुन त्या अंतर्गत पोषण आहार, अंगणवाडी, इत्यादीची सोय करणे, हे सर्व समाजकल्याण विषयक कार्य ग्रामपंचायतीच्या माध्यमातुन केले जातात.

6) दळण व सर्वजनिक कार्य :-

ग्रामीण भागत सार्वजनिक रस्ते तयार करणे, गटारे, बांध व पुल बांधणे, सुस्थितीत राखणे व दुरुस्ती करणे, रस्त्याच्या बाजुला, बाजाराच्या जागी वृक्षरोपन करणे, त्यांची जोपसना करणे, धर्मशाळा बांधने व त्याची व्यवस्था राखणे, गावात दिवाबत्ती करणे, इत्यादी महत्वपुर्ण कार्य ग्रामपंचायती माध्यमातुन म्हणजेच लोक सहभागातुन केले जाते.

निष्कर्ष :-

1) शाश्वत विकासात ग्रामपंचायतीची भुमिका महत्वपुर्ण आहे.

2) पंचायतराजच्या माध्यमातुन शाश्वत विकासाची प्रत्यक्ष अंमलवाणी होते.

3) पंचायतराजच्या माध्यमातुन शास्वत विकास करणे शक्य आहे.

सारांश :

आधुनिक काळात मोठ्या प्रमाणा औद्योगीकरण, नागरीकरण यांचे झपाट्याने वाढ होत आहे. नागरिकरणामुळे नविन वस्त्याची वाढ होत आहे. औद्योगीकरणामुळे नविन औद्यागिक वसाहाती निर्माण होत आहेत. नविन उद्योग उभा करण्यासाठी जमीन, पाणी आणि मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड होत आहे. यामुळे हवा, पाणी यांचे प्रदुषण वाढत आहे यांचा अनिष्ट परिणाम समाजातील प्रत्येक घटकावर होताना दिसुन येतो.

शाश्वत विकासात ग्रामपंयातीची भुमिका महत्वपुर्ण राहलेली आहे. करण ग्रामपंचायतीच्या कार्ययातुन ती शाश्वत विकासाच्या योजना पुरक आहेत. ग्रामपंचायती शिवाय विकास करणे अशक्य आहे. प्रत्येक कामाची प्रत्यक्ष अंमलंबजावणी करण्याचे काम ग्रामपंचायत करते. पाणी वापरासंबंधी जागृती, स्वच्छते विषयी, आरोग्य विषयी जगृती, शिक्षण विषयक कामे आणि महिला पुरुष समानता हे ध्येय जर प्रत्यक्षात आणाच्या दृष्टीकोनातुन प्रयत्न करण्यात येतात. पर्यावरणा विषयी एक व्यक्ती एक झाड ही संकल्पना ग्रामपातळीवरुन राबवुन लोकसहभाग वाढविल्यास भारताचा शाश्वत विकास होण्यास वेळ लागणार नाही.

संदर्भ :-

1) पंयातराज व ग्रामिण विकास – प्रा.जे.बी.नाडे कैलास पब्लिकेशन औरंगाबाद – 2016

2) भारतीय ग्रामीण समाजशास्त्र डॉ.दिलीप खैरनार विद्या बुक्स पब्लिकेशन औरंगाबाद – 2010

3) भारतीय समाज विकास कोश खंड स.मा.गर्गे महेता पब्लिकेशन हाऊस – पुणे

***समाजशस्त्रा विभाग प्रमुख, सरस्वती महाविद्यालय,केज, ता.केज जि.बीड**

***

भारतीय नागरिकांचे मूलभूत अधिकार

*प्रा. सुधाकर माटे

Abstract :-

Fundamental Rights Of Indian Citizens | भारतीय नागरिकांचे मूलभूत अधिकार Fundamental Rights Of Indian Citizens: Fundamental Rights (मूलभूत हक्क) हे एखाद्या व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या देशातील प्रत्येक नागरिकाचे हक्क आहेत. भारतीय राज्यघटनेत, जगातील सर्वात मोठा संविधान, भारतीय नागरिकांचे Fundamental Rights कलम 12 ते 35 पर्यंत भाग 3 अंतर्गत भारताच्या घटनेत प्रदान केले गेले आहेत. घटनेत दर्शविलेले सहा मूलभूत अधिकार अमेरिकेच्या राज्यघटनेकडून घेण्यात आले. सुरुवातीला 7 मूलभूत अधिकार होते परंतु नंतर 44 व्या घटनादुरुस्ती, 1978 अंतर्गत "मालमत्तेचा अधिकार-Right to Property" रद्द करण्यात आला. प्रत्येक नागरिकाला त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव असणे आवश्यक आहे जे योग्य स्पष्टीकरणासह खाली सूचीबद्ध केले गेले आहेत. १९५० साली अंमलात आलेले भारतीय संविधान मुख्यत्वे १९३५ च्या भारत सरकार कायद्यावर आधारित आहे. १९३५ सालच्या या कायद्यान्वये भारताच्या अंतर्गत स्वशासनाचा पाया घातला गेला होता. ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट टली यांच्या शिष्टमंडळाच्या स्वतंत्र भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यासाठी एका मसुदा समितीच्या स्थापनेविषयीच्या कल्पनेस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांनी सहमती दर्शविली होती. १९४६ च्या उन्हाळ्यात या समितीची स्थापना झाली व तिची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली तर फ्रँक अँथनी यांच्या उपाध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथील संविधान सभागृहात झाली. ११ डिसेंबर रोजी सर्व सदस्यांच्या सहमतीने डॉ. राजेंद्रप्रसाद यांची अध्यक्षस्थानी तर आशुतोष मुखर्जी यांची उपाध्यक्ष स्थानी निवड करण्यात आली. हे सभागृह आज सेंट्रल हॉल या नावाने परिचित आहे. पहिल्या बैठकीला ९ महिलांसह एकूण २११ सदस्य उपस्थित होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर अल्पकाळ या समितीने भारताचे प्रतिनिधी या रूपात काम केले होते.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापन झाली. मसुदा समिती ही सर्वात महत्त्वाची समिती होते. हिचे काम संविधान निर्मिती करणे हे होते. अनेक बैठकांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेद्वारे स्वीकारला गेला. त्यामुळे भारतात २६ नोव्हेंबर हा दिवस "भारतीय संविधान दिन" म्हणून साजरा केला जातो. नागरिकत्व, निवडणुका व अंतरिम संसदेविषयीचे आणि इतर काही तात्पुरत्या बाबी तत्काळ लागू झाल्या. संविधान संपूर्ण रूपाने २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस "भारतीय प्रजासत्ताक दिन" म्हणून साजरा केला जातो.

Introduction :-

भारताचे संविधान (अन्य नावे भारताची राज्यघटना, भारताची घटना) हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हे दस्तऐवज मूलभूत राजकीय संहिता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार आणि सरकारी संस्थांची कर्तव्ये आणि मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे आणि नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करणारी चौकट मांडतो. हे जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय संविधान शिल्पकार म्हटले जाते.हे संवैधानिक वर्चस्व प्रदान करते (संसदीय वर्चस्व नाही, कारण ते संसदेऐवजी संविधान सभेने तयार केले होते) आणि लोकांद्वारे त्याच्या प्रस्तावनेत घोषणेसह स्वीकारले गेले. संसद राज्यघटनेला डावलू शकत नाही.हे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताच्या संविधान सभेने स्वीकारले आणि २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. राज्यघटनेने भारत सरकार कायदा १९३५ ची जागा देशाचा मूलभूत प्रशासकीय दस्तऐवज म्हणून घेतली आणि भारताचे अधिराज्य हे भारताचे प्रजासत्ताक बनले. संवैधानिक स्वायत्तता सुनिश्चित करण्यासाठी, त्याच्या रचनाकारांनी कलम ३९५ मध्ये ब्रिटिश संसदेचे पूर्वीचे कायदे रद्द केले. भारत २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन म्हणून आपले संविधान साजरे करतो.

संविधान भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, आणि लोकशाही प्रजासत्ताक घोषित करते, तेथील नागरिकांना न्याय, समानता आणि स्वातंत्र्य आणि बंधुत्वाला चालना देण्यासाठी प्रयत्नांची हमी देते. १९५०चे मूळ संविधान हेलियमने भरलेल्या केसमध्ये नवी दिल्लीतील संसद भवनात जतन केले आहे. आणीबाणीच्या काळात १९७६

मध्ये ४२व्या घटनादुरुस्ती कायद्याद्वारे "धर्मनिरपेक्ष" आणि "समाजवादी" हे शब्द प्रस्तावनामध्ये जोडले गेले.List of Fundamental Rights of Indian Citizens | भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्कList of Fundamental Rights Of Indian Citizens: भारतातील प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत हक्कांची (Fundamental Rights) संपूर्ण यादी येथे आहे.

Heading and Footnotes :-

Indian Constitution: Framing, Sources, Parts, Articles and Schedules

भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क (Fundamental Rights-Mulbhut Adhikar)

अ. क्र. मूलभूत अधिकार (Mulbhut Adhikar) संविधानाचा अधिकार

1. समानतेचा अधिकार (कलम- **14** ते **18) Right To Equality**

(Article- 14 to 18) कलम 14- कायद्यासमोर समानता

कलम 15- धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या आधारावर भेदभावाचा निषेध

कलम 16- सार्वजनिक रोजगारातील संधीची समानता

कलम 17- अस्पृश्यता निर्मूलन

कलम 18- शीर्षकांचे निर्मूलन

2. स्वातंत्र्याचा अधिकार (कलम- **19** ते **22) Right To Freedom**

(Article- 19 to 22) कलम 19- बोलण्याचे स्वातंत्र्य, अभिव्यक्ती, चळवळ

कलम 20- गुन्ह्यांसाठी दोषी ठरण्यापासून संरक्षण

कलम 21- जीवनाचा हक्क आणि वैयक्तिक स्वातंत्र्य

कलम 22- अटक किंवा ताब्यात घेण्यापासून संरक्षण

3. शोषणाविरुद्धचा अधिकार (कलम- **23** आणि **24) Right Against Exploitation**

(Article- 23 & 24) कलम 23- तस्करी आणि जबरदस्ती काम लावण्यापासून/करून घेण्यापासून संरक्षण, कलम 24- बालमजुरीवर बंदी

4 धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (कलम- **25** ते **28) Right To Freedom of Religion** (Article- 25 to 28) कलम 25- एखाद्याच्या स्वतःच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य

कलम 26- धार्मिक गोष्टी व्यवस्थापित करण्याचे स्वातंत्र्य

कलम 27- धर्माच्या प्रचारासाठी कर आकारणी नाही

कलम 28- संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण किंवा धार्मिक उपासनेला उपस्थित राहण्यासाठी स्वातंत्र्य

5 सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (कलम **29** आणि **30) Cultural & Educational Rights (Article 29 & 30)** कलम 29- अल्पसंख्याकांचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी कलम 30 – अल्पसंख्यांकांचा शैक्षणिक संस्था चालविण्याचा हक्क

6 घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम **32) Right To Constitutional Remedies (Article 32)** कलम 32- हक्कांच्या अंमलबजावणीसाठी उपाय

Constitution Of India: Interesting Unknown Facts To Know

Fundamental Rights: Right To Equality (Article 14 to 18) | समानतेचा अधिकार (कलम 14 ते 18) Fundamental Rights Right To Equality

Right To Equality (Article- 14 to 18):

कायद्यासमोर समानता आणि कायद्यांचे समान संरक्षण (कलम 14)

धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या आधारावर भेदभावाला मनाई (कलम 15)

सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत संधीची समानता (कलम 16)

अस्पृश्यता निर्मूलन आणि त्याच्या प्रथेला प्रतिबंध (कलम 17)

लष्करी आणि शैक्षणिक वगळता शीर्षकांचे निर्मूलन (कलम 18)

भारतीय राज्यघटनेने अनुमती दिलेल्या समानतेच्या अधिकाराला अपवाद म्हणजे: एखाद्या राज्याचे राष्ट्रपती किंवा राज्यपाल कोणत्याही न्यायालयाला उत्तरीय नाहीत.

Important Articles of Indian Constitution

Fundamental Rights: Right To Freedom (Article- 19 to 22) | स्वातंत्र्याचा अधिकार (कलम- 19 ते 22) Fundamental Rights Right To Freedom

Right To Freedom (Article- 19 to 22):

स्वातंत्र्यासंबंधी सहा अधिकारांचे संरक्षण (कलम 19):

(I) भाषण आणि अभिव्यक्ती

(II) शांततेत आणि निशस्त्र एकत्र जमणे

(III) संघटना किंवा सहकारी संघ तयार करणे

(IV) संपूर्ण भारताच्या प्रदेशात मुक्तपणे फिरणे

(V) देशाच्या कोणत्याही भागात स्थायिक होणे

(VI) कोणत्याही व्यवसायाचा सराव करा किंवा कोणताही व्यापार किंवा व्यवसाय करणे

गुन्ह्यांसाठी दोषी ठरण्याच्या संदर्भात संरक्षण (कलम 20)

Tables , Figures and Equations :-

जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण (कलम 21) : कोणत्याही व्यक्तीला आपल्या जीवनापासून किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले जाणार नाही

प्राथमिक शिक्षणाचा हक्क (कलम 21अ) : यामुळे 6 ते 14 वर्षांच्या मुलांसाठी शिक्षणाचा हक्क हा मूलभूत अधिकार आहे.

काही प्रकरणांमध्ये अटक किंवा ताब्यात घेण्यापासून संरक्षण (कलम 22) : अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला अशा अटकेच्या कारणांची माहिती न देता ताब्यात घेतले जाणार नाही.Fundamental Rights: Right Against Exploitation (Article- 23 & 24) | शोषणाविरुद्धचा अधिकार (कलम- 23 आणि 24) Fundamental Rights Right Against Exploitation

Right Against Exploitation (Article- 23 & 24):

तस्करी आणि जबरदस्ती काम लावण्यापासून/ करून घेण्यापासून संरक्षण, मानवामध्ये रहदारी आणि भिकारी आणि इतर तत्सम प्रकारची जबरी कामगार निषिद्ध आहेत.

कारखान्यांमध्ये मुलांना रोजगार देण्यास मनाई करणे इत्यादी (कलम २४) कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही धोकादायक नोकरीत गुंतलेल्या १४ वर्षांखालील कोणत्याही मुलाला नोकरी देता येत नाही.

Constitution of India: Interesting Unknown Facts to Know Fundamental Rights: Right To Freedom of Religion (Article- 25 to 28) | धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (कलम- 25 ते 28)

Fundamental Rights Right To Freedom of Religion

Right To Freedom of Religion (Article- 25 to 28):

विवेकाचे स्वातंत्र्य आणि मुक्त व्यावसायिक, सराव आणि धर्माचा प्रसार (कलम 25)

धार्मिक गोष्टी व्यवस्थापित करण्याचे स्वातंत्र्य (कलम 26) कोणत्याही धर्माच्या संवर्धनासाठी कर भरण्यापासून स्वातंत्र्य (कलम 27)- राज्य कोणत्याही विशिष्ट धर्म किंवा धार्मिक संस्थांच्या संवर्धनासाठी किंवा देखभालीसाठी कोणत्याही नागरिकाला कोणताही कर भरण्यास भाग पाडू शकत नाही. काही शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण किंवा उपासनेला उपस्थित राहण्याचे स्वातंत्र्य (कलम 28)Fundamental Rights: Cultural & Educational Rights (Article 29 & 30) | सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (कलम 29 आणि 30)

Fundamental Rights Cultural & Educational Rights

Cultural & Educational Rights (Article 29 & 30):

अल्पसंख्याकांच्या भाषा, पटकथा आणि संस्कृतीचे संरक्षण (कलम 29) जेथे एक धार्मिक समुदाय अल्पसंख्याकांमध्ये आहे, तेथे राज्यघटना त्याला आपली संस्कृती आणि धार्मिक हितसंबंध टिकवून ठेवण्याची सक्षम करते.

अल्पसंख्याकांना शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार (कलम 30)- अशा समुदायांना आपल्या आवडीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार आहे आणि अल्पसंख्याक समुदायाने राखलेल्या अशा शैक्षणिक संस्थेशी राज्य भेदभाव करणार नाही.Fundamental Rights: Right To Constitutional Remedies (Article 32) | घटनात्मक उपायांचा अधिकार (कलम 32) Fundamental Rights Right To Constitutional Remedies

Conclusion :- Right To Constitutional Remedies (Article 32): डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी घटनात्मक उपायांच्या अधिकाराला "संविधानाचा आत्मा (Soul of Constitution)" असे म्हटले आहे.मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी न्यायव्यवस्थेला Writs जारी करण्याचे अधिकार आहेत. सर्वोच्च न्यायालय भारताच्या क्षेत्रात कोणत्याही व्यक्ती किंवा सरकारविरूद्ध मूलभूत हक्कांच्या अंमलबजावणीसाठी आदेश जारी करू शकते किंवा रिटचे अनुसरण करू शकते:(I) हबीस कॉर्पस : हे अधिकारी किंवा एका खासगी व्यक्तीला जारी केले जाते ज्याने त्याच्या ताब्यात दुसऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. त्याला कोणत्या कारणास्तव बंदिस्त केले गेले आहे हे न्यायालयाला कळवण्यासाठी नंतरचे न्यायालयात हजर केले जाते.(II) मॅन्डॅमस : याचा शब्दशः अर्थ कमांड असा होतो. हे त्या व्यक्तीला त्या व्यक्तीने काही सार्वजनिक किंवा कायदेशीर कर्तव्य पार पाडण्यासाठी आज्ञा देते जे त्या व्यक्तीने करण्यास नकार दिला आहे.(III) मनाई : उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला ही रिट जारी केली आहे. कामकाज प्रलंबित असताना ते जारी केले जाते.(IV) सर्टिओरी : न्यायालय किंवा न्यायाधिकरणाचा आदेश किंवा निर्णय रद्द करण्यासाठी न्यायालये किंवा न्यायाधिकरणांविरुद्धही ही रिट जारी केली जाते. आदेश दिल्यानंतरच ते जारी केले जाऊ शकते.(V) को वॉरंटो : ही एक कार्यवाही आहे जिथे न्यायालय दाव्याच्या कायदेशीरतेची चौकशी करते. यात उच्च न्यायालय एखाद्या सार्वजनिक अधिकाऱ्याला बेकायदेशीरपणे पद प्राप्त केल्यास काढून टाकू शकते.

References :-

- संजय राऊत :- भारतीय राज्यघटना :- नांदेड :-अभंग प्रकाशन स्पर्धा परीक्षा
- र. प. वराडकर :- भारतीय राज्यघटना :- मानवी हक्क आणि मानवी अधिकार कायदा:- पुणे:- निराली प्रकाशन
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर :- भारतीय राज्यघटना:- दिल्ली:- भारत सरकार
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर :- भारतीय राज्यघटना :- दिल्ली :- भारत सरकार

*महिला कला महाविद्यालय उमरेड जि.नागपूर sudhakarmate@gmail.com 9970239295

***

किन्नर समुदायाचे सामाजिक विकासातील समावेशन: एक समाजशास्त्रीय दृष्टीकोन

*डॉ. वीणा राणी .पी,

परिचय :

संविधानाने भारतातील सर्व नागरिकांना समता, बंधुता आणि लोकशाही या मूल्यांचे समर्थन केले आहे. प्रत्येक नागरिकाला मूलभूत हक्क आणि कर्तव्ये दिली आहेत. तसेच, वंश, धर्म, जात, पंथ, लिंग इत्यादींच्या नावावर कोणत्याही व्यक्तीसोबत भेदभाव करू नये असे संविधान म्हणते. तथापि, विविध कारणांमुळे काही समुदाय त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून आणि सामाजिक संधींपासून वंचित राहतात. ट्रान्सजेंडर समुदाय हा जगभरातील अशा वंचित समुदायांपैकी एक आहे आणि विशेषतः भारतीय समाज आहे.

उद्दिष्टे:

१. सामाजिक बहिष्कार आणि समावेशाची संकल्पना समजून घेणे.

२. किन्नर समुदायाच्या सामाजिक समावेशाच्या मार्गातील समस्या स्पष्ट करणे.

३. किन्नर समुदायाच्या सामाजिक समावेशाच्या प्रक्रियेतील प्रमुख क्रियाकलाप ओळखणे.

अध्ययन **पद्धती:**

प्रस्तुत अध्ययन हे विविध पुस्तके, जर्नल्स, वर्तमानपत्रे, लेख आणि वेब स्रोतांद्वारे संकलित केलेल्या संसाधनांच्या दुय्यम तथ्य विश्लेषणावर आधारित आहे.

तथ्यांचे विश्लेषण:

अत्यंत हिंसाचार आणि असहिष्णुतेच्या संदर्भात, भारतातील पुरुष ते महिला ट्रान्सजेंडर्ससाठी उपलब्ध असलेली एकमेव सांस्कृतिक जागा म्हणजे हिजडा, जोगप्पा, शिवशक्ती समुदाय. या समुदायांना भेडसावलेल्या एकाकीपणाची प्रचंड भावना लक्षात घेता, त्यांच्यापैकी बरेच लोक सांत्वन किंवा आशेच्या शोधात शहरात स्थलांतरित होतात जेव्हा त्यांना कळते की त्यांच्यासारखे इतर लोक मोठ्या शहरांमध्ये राहतात. यामुळे हिजडा समाजाची मोठ्या प्रमाणात संख्या शहरात वास्तव्यास आहे. यांचे इतर काही लोक खेडे किंवा लहान शहरांमध्ये आणि फक्त लहान भौगोलिक भागात स्थित आहेत. उदाहरणार्थ जोगप्पा किंवा जोगती प्रामुख्याने उत्तर कर्नाटक, उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण महाराष्ट्रात राहतात.

तथापि, किन्नर हे आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊन घरी परतल्यानंतर कुटुंबाचा त्यांच्या विषयीचा दृष्टीकोन बदलतो. काही प्रकरणांमध्ये किन्नरांच्या कुटुंबाला आर्थिक आधार देण्याच्या त्यांच्या क्षमतेमुळे कुटुंबात त्यांच्या परतीचे स्वागत केले जाते, तर काहींमध्ये, हिजड्यांचे आता लैंगिक कार्य करत असल्याची वस्तुस्थिती स्वीकारणे अधिक कठीण जात आहे. जोगप्पाला अनेकदा धार्मिक आणि अगदी कौटुंबिक मान्यता असते पण कुटुंबातील इतर अनेक हक्क जसे की वारसा, कौटुंबिक इत्यादी बाबींमध्ये त्यांना नाकारले जाते.

भारतातील पुरुष-ते-स्त्री ट्रान्स-जेंडर लोक पारंपारिकपणे समुदायामध्ये स्वतःला संघटित करतात. किन्नर समुदाय या संरचनेत वृद्ध किन्नर किंवा अरावणीला 'गुरु' (किंवा अनेक चेला (तरुण, नव्याने दीक्षा घेतलेल्या किन्नर/अरवाणी) सह माता-प्रतिमा तिच्या सहकाऱ्यांच्या रूपात दर्शविल्या जातात. तेथे विस्तृत विधी केल्या जातात. जे एखाद्याचा जमाती मध्ये प्रवेश करण्यासाठी आणि शिष्य म्हणून स्वीकृती देण्यासाठी केले जातात. हे विधी, त्यांच्या पौराणिक-धार्मिक आधारांसह, त्यांना नातेसंबंधाच्या संरचनेत बांधतात ज्यामध्ये नातेसंबंध, भूमिका आणि कर्तव्ये दोन्ही स्पष्टपणे सुचविल्या जातात आणि स्पष्टपणे पार पाडल्या जातात. या कर्तव्यांमध्ये शिष्यांद्वारे गुरूंना दिलेली श्रद्धांजली यांचा समावेश होतो. भीक मागणे, लैंगिक कार्य किंवा इतर प्रकारचे रोजगार, वर्तन आणि पोशाख यांच्या संदर्भात समुदायाच्या नियमांचे पालन करणे आणि प्रेमळ भक्ती इ. प्रकारचे कार्य किन्नर करतात.

गुरुंनी तरुण शिष्यांसाठी मार्गदर्शन, भावनिक आधार आणि गर्भपात करण्याबाबत सल्ला देणे अपेक्षित आहे. ही सामुदायिक रचना, देशाच्या उत्तरेकडील प्रदेशांच्या तुलनेत दक्षिण भारतात कमी बंधनकारक आहे, तरीही कुटुंब आणि समुदाय म्हणून संघटित कसे व्हावे यासाठी किन्नारांसाठी काही वास्तविक-जगातील (आणि मान्यतेने कठोर श्रेणीबद्ध आणि समस्याप्रधान) प्रारूप प्रदान करते. सार्वजनिकरित्या किन्नर ही ओळख स्थापित करणे अवघड आहे. या क्षणी हे

लक्षात घेतले पाहिजे की जमात व्यवस्था गुरू आणि शिष्य यांच्यात वारंवार हिंसक आणि जबरदस्ती वर्तन वाढवते, मोठ्या सामाजिक कलंकाच्या संदर्भात पैसे कमविण्याच्या आणि समुदायाच्या सदस्यांना पाठिंबा देण्याच्या दबावामुळे कमी प्रमाणात जोगप्पा आणि काही स्त्री-पुरुष ट्रान्स-जेंडर समुदाय (शिव-शक्ति, पार्वती इ.) देखील जटिल सामाजिक संरचना असलेल्या समुदायांमध्ये राहतात.

ट्रान्सजेंडर लोकांना तृतीय पंथी समजले जाते. सहसा त्यांना त्यांची लिंग ओळख किंवा लिंग अभिव्यक्ती आणि नियुक्त केलेले लिंग यांच्यात विसंगत अनुभव येतो. यात लिंग विचित्र लोकांचा समावेश असू शकतो ज्यांची ओळख केवळ पुरुष किंवा स्त्रीलिंगी नाही. ट्रान्सजेंडर लोक स्वतःला विषमलिंगी, समलैंगिक, उभयलिंगी, अलैंगिक इत्यादी म्हणून ओळखतात किंवा पारंपारिक लैंगिक अभिमुखतेचे लेबल अपुरे किंवा अनुपयोगी मानतात.

'सामाजिक बहिष्कार' या शब्दाचा वापर अलिकडचा आहे. उत्तर आयर्लंडमध्ये, सामाजिक बहिष्काराची व्याख्या अशी केली गेली आहे, 'श्रम, बाजार आणि कल्याण व्यवस्थेसह प्रक्रियांचा एक संच, ज्याद्वारे व्यक्ती, कुटुंबे, समुदाय किंवा अगदी संपूर्ण सामाजिक गटांना त्यांच्याकडे ढकलले जाते किंवा त्यांना वंचित ठेवले जाते. वंचित समाज यात केवळ भौतिक बहिष्कारच नाही तर सामाजिक आणि नागरी जीवनात पूर्णपणे त्यांना सहभागी होण्याच्या संधी नाकारणे देखील समाविष्ट आहे. फ्रान्सच्या रायन लिनियरच्या मते, समाजातील अशा गटांमध्ये मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती, वृद्ध व्यक्ती, अत्याचारित मुले, अपराधी, एकल पालक, बहु-समस्या असलेली कुटुंबे आणि स्त्रिया, दलित आणि ट्रान्सजेंडर समुदायांसारखे सीमांत गट यांचा समावेश होतो. हे गट म्हणजे सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत गट आहेत ज्यांना शिक्षण, रोजगार आणि इतर सुविधांपासून वंचित ठेवून समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जाते.

सामाजिक समावेशन म्हणजे सरकार आणि नागरी समाजाने समाजातील त्या उपेक्षित आणि वंचित गटांना शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग आणि इतर सुविधांच्या क्षेत्रात आरक्षणाच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू केलेल्या प्रक्रियेचा संदर्भ आहे. ज्याद्वारे त्यांचा समावेश समाजाच्या मुख्य प्रवाहात केला जाऊ शकतो. विकास करा आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हा. याला सकारात्मक किंवा संरक्षणात्मक भेदभाव असेही संबोधले जाते जे विशेषत: त्या गटांसाठी असलेल्या विविध कार्यक्रम आणि योजनांद्वारे लागू केले जाते.

ट्रान्सजेंडर समुदाय हा असाच एक वंचित गट असल्याने, त्यांचे अस्तित्व, ओळख, आदर आणि समाजातील सामान्य माणसांसारखे सन्माननीय जीवन जगण्यासाठी समान संधींची गरज निर्माणकरण्यासाठी कठोर संघर्ष करत आहे. आतापर्यंत, ट्रान्सजेंडर्सना असे समजले आहे की त्यांना सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन, आर्थिक जीवन, राजकारण आणि निर्णय प्रक्रियेत प्रभावीपणे भाग घेण्यापासून वगळण्यात आले आहे.

आजपर्यंत, ट्रान्सजेंडर कार्यकर्त्यांद्वारे पुराव्यावर आधारित वकिली कृती आराखडा तयार केला जाऊ शकतो किंवा धोरणकर्त्यांद्वारे संभाव्य कायदेशीर उपाय शोधले जाऊ शकतात असा कोणताही एक व्यापक स्त्रोत नाही. छळ, हिंसा, सेवा नाकारणे, आणि ट्रान्सजेंडर व्यक्तींविरुद्ध रोजगार, घरे आणि सार्वजनिक निवास या क्षेत्रांमध्ये अन्यायकारक वागणूक याविषयी स्थानिक माध्यमांमध्ये वेळोवेळी चर्चा झाली असली तरी धोरणात्मक निर्णयाचे समर्थन करण्यासाठी पुरेसे मजबूत आणि यथार्थ प्रयत्न झाले नाहीत. ट्रान्सजेंडर्सना भेडसावणाऱ्या समस्या विविध प्रकारच्या असतात. त्यापैकी काही अशा आहेत; ज्यामध्ये भेदभाव, शैक्षणिक सुविधांचा अभाव, बेरोजगारी, निवारा, एचआयव्ही काळजी आणि स्वच्छता यांसारख्या वैद्यकीय सुविधांचा अभाव, नैराश्य, संप्रेरक गोळ्यांचा गैरवापर, तंबाखू आणि अल्कोहोलचा गैरवापर, विवाह, मालमत्ता, निवडणूक अधिकार, दत्तक घेणे यासंबंधीच्या समस्या.

निष्कर्ष आणि सूचना:

१. सर्व माणसे स्वतंत्र आणि समान सन्मानाने जन्माला आली आहेत आणि लैंगिक प्रवृत्ती किंवा लिंग ओळखीच्या आधारावर भेदभाव न करता मानवी हक्कांचा उपभोग घेण्याचा त्यांना हक्क असला पाहिजे.

२. असा कोणताही भेदभाव न करता प्रत्येकाला कायद्यासमोर समानता आणि कायद्याचे समान संरक्षण मिळण्याचा हक्क आहे.

३. ट्रान्सजेंडर हे देखील समाजाचा भाग आहेत आणि त्यांना इतर व्यक्तींप्रमाणे समान अधिकार आहेत हे मान्य केले पाहिजे.

४. किन्नराना त्यांच्या वर्ग आणि लिंगावर आधारित भेदभाव ट्रान्सजेंडर समुदायाला भारतीय समाजातील सर्वात अशक्त आणि वंचित गटांपैकी एक बनवतो.

त्यांचा विकासाच्या प्रक्रियेत समावेश करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारी आणि अशासकीय संस्थांनी अनेक पावले उचलण्याची गरज आहे. त्यापैकी काही खाली सूचीबद्ध आहेत:

उपाययोजना:

१. ट्रान्सजेंडर व्यक्तींचे जनगणनेमध्ये योग्यरित्या दस्तऐवजीकरण करणे आवश्यक आहे.

२. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात शिक्षण, निवडणुका आणि नोकऱ्यांमध्ये वैधानिक आरक्षणाची गरज आहे.

३. उच्च शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षणाच्या सुविधांद्वारे त्यांना सक्षम आणि उन्नत करणे आवश्यक आहे जेणेकरून त्यांची कमाई आणि समाजात त्यांची स्थिती सुधारली जाईल जेणेकरून समाजात त्यांची स्वीकार्यता वाढेल.

४. ट्रान्सजेंडर हे आरोग्य जोखीम आणि अडथळ्यांना बळी पडत असल्याने, त्यांना आरोग्य विमा आणि दवाखाने यांसह योग्य वैद्यकीय सुविधा पुरवणे आवश्यक आहे, जेथे विनामूल्य किंवा अनुदानित उपचार उपलब्ध केले जावेत.

५. कायदा मंत्रालय आणि सामाजिक न्याय मंत्रालय आणि राज्य सरकारांनी ट्रान्सजेंडर लोकांच्या वंचितांची ओळख करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक सुधारणांवर काम करणे आवश्यक आहे.

संदर्भ:

- *Benjamin, H. (1966). The transsexual phenomenon. New York: Julian Press, page 23.*
- *Gilbert, Michael A. (2000). "The Transgendered Philosopher". International Journal of Transgenderism.*
- *Stryker, Susan. Introduction. In Stryker and S. Whittle (Eds.), The Transgender Studies Reader, New York: Routledge, 2006. 1–17*
- *Susan Stryker, Stephen Whittle, The Transgender Studies Reader (ISBN 1135398844), page 666: "The authors note that, increasingly, in social science literature, the term "third gender" is being replaced by or conflated with the newer term "transgender."*
- *The Search for the Best Estimate of the Transgender Population (NY Times)*
- *Transgender Rights (2006, ISBN 0816643121), edited by Paisley Currah, Richard M. Juang, Shannon Minter*
- *UNCW: Developing and Implementing a Scale to Assess Attitudes Regarding Transsexuality.*
- *Valentine, David. Imagining Transgender: An Ethnography of a Category, Duke University, 2007*

*सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र अध्ययन आणि संशोधन विभाग, महाराणी क्लस्टर विद्यापीठ, बंगलोर

***

उपेक्षित महिलांचे सामाजिक सक्षमीकरण – बंगळुरूच्या विशेष संदर्भात: एक सामाजिक अभ्यास

*डॉ. आदिनारायणप्पा .एन.ए,

प्रस्तावना:

उपेक्षित समाजगटांचा आणि विशेषत: महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचा विकास आणि सक्षमीकरण हे संविधानाने दिलेले आश्वासन आहे. शिक्षण, आरोग्य, संसाधनांमध्ये प्रवेश, सहभाग आणि निर्णय घेणे या मूलभूत गरजा आहेत आणि सामाजिक सशक्तीकरण मोजण्यासाठी सर्वात प्रभावी साधने देखील आहेत. विशेषत: शैक्षणिक विकास, आरोग्य सेवांची सुलभता, रोजगार आणि उत्पन्न निर्मिती उपक्रमांद्वारे आर्थिक सक्षमीकरण आणि एकंदर परिणाम म्हणून दारिद्र्य निर्मूलन याद्वारे सामाजिक सशक्तीकरण साध्य करणे ही सर्वात जास्त मागणी आहे. या गटांना त्यांचे हक्क मुक्तपणे वापरता येतील, त्यांच्या विशेषाधिकारांचा उपभोग घेता येईल आणि आत्मविश्वास आणि सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज आहे. शोषण, दडपशाही आणि वंचित आणि उपेक्षित गटांना संरक्षण प्रदान करणे, विषमता दूर करणे सुनिश्चित करणे, समान वितरणाद्वारे विकासाचे फायदे त्यांच्या पर्यंत का पोहोचले नाहीत याची खात्री करणे हा सरकारने सुरू केलेल्या बहुतेक विकास प्रकल्पांचा मुख्य अजेंडा आहे.

नियोजित विकासाच्या प्रक्रियेद्वारे सामाजिक बदलाचे एजंट म्हणून त्यांची क्षमता आणि क्षमता विकसित करण्यासाठी समान अधिकार, फायदे आणि संसाधनांमध्ये प्रवेश आणि सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक न्यायाचा दृष्टिकोन स्वीकारून हे शक्य होऊ शकते. विविध धोरणे आणि कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे वंचित आणि उपेक्षित गटांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्याच्या चालू प्रक्रियेला गती देणे त्यांना समाजाच्या इतर भागांच्या बरोबरीने आणणे आवश्यक आहे. दुर्बल घटकातील महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणाचे साधन म्हणून बचत गटांची निर्मिती आणि कार्यप्रणालीकडे पाहिले जाते.

उद्दिष्टे:

सध्याचा अभ्यास बचत गटांच्या निर्मिती आणि कार्यामध्ये सामाजिक सक्षमीकरणाच्या पैलूंचा परस्पर संबंध जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. पुढे, सामाजिक सक्षमीकरण पैलू म्हणून शिक्षण, आरोग्य, संसाधनांमध्ये प्रवेश, सहभाग आणि निर्णय घेणे याविषयी बचत गटाच्या सदस्यांचे ज्ञान आणि समज यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला जातो.

कार्यपद्धती:

१. प्राथमिक तथ्य संकलन - मुलाखतीचे वेळापत्रक, व्यष्टी अध्यन आणि निरीक्षण पद्धत.

२. दुय्यम तथ्य संकलन – ग्रंथालय आणि संदर्भ साहित्य, वृत्तपत्रे, जर्नल्स इ.

तथ्यांचे विश्लेषण:

कुटुंब, समाज आणि राज्यासाठी महिलांच्या प्रयत्नांचे अतुलनीय महत्व आहे, परंतु ते नेहमीच अदृश्य राहिले आहे. स्वातंत्र्याच्या वेळी घोषित केलेले एकूण साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही; शैक्षणिक गळती, शिक्षणावरील आयोग आणि समित्या, महिलांच्या शिक्षणाबाबतची द्विधा मनस्थिती आणि उच्च शिक्षणातील शिस्तीत होणारे बदल हे गंभीर प्रश्न आता गंभीर आहेत. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने प्रसिद्ध केलेला लिंग अंतराचा अभ्यास, ज्या क्षेत्रांमध्ये कमी विकसित देश लैंगिक समानतेमध्ये मागे आहेत त्यावर प्रकाश टाकताना, विकसित अर्थव्यवस्थांमध्ये स्त्री-पुरुषांमधील मोठी तफावत देखील दर्शवते. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, भारत 53 व्या क्रमांकावर असून, राजकीय सशक्तीकरणामध्ये (24) त्याच्या लीगपेक्षा कितीही वर स्कोअर करत अक्षरशः शिडीच्या तळाशी आहे. आरोग्य आणि आरोग्यामध्ये, देश 34 व्या क्रमांकावर आहे; आर्थिक संधी मध्ये 35; आर्थिक सहभागामध्ये 54; आणि शैक्षणिक प्राप्तीमध्ये धक्कादायक 57.

विकासाचे जवळजवळ सर्व सिद्धांत सातत्याने असा युक्तिवाद करतात की समाजातील दुर्बल घटकांतील लोकांच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी शिक्षण हा एकमेव महत्त्वाचा घटक आहे. विशेषत: मुली/महिलांना आणि सर्वसाधारणपणे शहरी गरिबांना शिक्षणाचे फायदे पोहोचवल्याचा दावा सरकार करत असले तरी, त्याचा किरकोळ परिणाम झालेला दिसतो. गैर-सरकारी संस्था देखील अनेकदा गरीब लोक आणि महिलांना शिक्षण देण्यासाठी त्यांचे प्रयत्न केंद्रित करण्याचा दावा करतात परंतु, डेटा ते उघड करत नाही. शहरी जीवनात त्यांचा पुरेसा संपर्क असूनही शिक्षणाचे ध्येय शहरी गरीब आणि महिलांपर्यंत पोहोचलेले नाही. शहरी गरीब भागात शिक्षण घेऊन जाऊ इच्छिणाऱ्या लोकांसाठी अजूनही पुरेशा संधी आहेत. प्राथमिक शिक्षण सोडून तथाकथित सरकारी अनुदानित उच्च शिक्षण शहरी गरिबांपर्यंत पोहोचलेले नाही.

तक्ता: ४ .५ शैक्षणिक रचना

Education by Zone

Education	zone East	West	North	South	Central	Total
Illiterate	0	2	3	0	1	6
	.0	2.5	3.8	.0	1.3	1.5
Lit-Informal	2	1	2	0	1	6
	2.5	1.3	2.5	.0	1.3	1.5
Pry(1-4)	2	7	10	4	4	27
	2.5	8.8	12.5	5.0	5.0	6.8
Middle(5-7)	18	23	18	13	23	95
	22.5	28.8	22.5	16.3	28.8	23.8
High Sch(8-10)	36	32	31	38	34	171
	45.0	40.0	38.8	47.5	42.5	42.8
PUC	14	10	8	17	9	58
	17.5	12.5	10.0	21.3	11.3	14.5
Dip/Tch	3	4	2	4	3	16
	3.8	5.0	2.5	5.0	3.8	4.0
Degree	4	1	5	2	4	16
	5.0	1.3	6.3	2.5	5.0	4.0
Professional	1	0	1	2	1	5
	1.3	.0	1.3	2.5	1.3	1.3
Total	80	80	80	80	80	400
	100.0	100.0	100.0	100.0	100.0	100.0

42.8 टक्के उत्तरदाते हायस्कूलपर्यंत शिकलेले आहेत, दक्षिण झोन सर्वाधिक 47.5 टक्के आणि पश्चिम झोन सर्वात कमी 40 टक्के असल्याचे तक्त्यामध्ये दिसून येते. 23.8 टक्के नमुन्याचे माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षण झाले आहे. आपण येथे काही महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतो की निरक्षर आणि अनौपचारिक साक्षरांची टक्केवारी खूपच कमी आहे, म्हणजे प्रत्येकी 6 टक्के, जे दर्शविते की निरक्षरांची संख्या हळूहळू कमी होत आहे. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की SHG सदस्यांचा वयोगट साधारणपणे 18-50 आहे आणि म्हणूनच खूप कमी निरक्षर आढळण्याचे हे देखील एक कारण असू शकते आणि याचा अर्थ असा देखील होतो की सुशिक्षित लोकांना या गटांचे सदस्य बनण्यास अधिक रस आहे. ते गटांच्या कार्यपद्धतीबद्दल चांगले समजतात आणि क्रियाकलापांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे भाग घेतात. परंतु नंतर हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की सदस्यांमध्ये उच्च शिक्षित लोकांची संख्या खूप कमी आहे याचा अर्थ असा होतो की एकतर उच्च शिक्षित लोकांना कमी शिकलेल्या लोकांमध्ये मिसळणे सोयीचे वाटत नाही किंवा त्यांना सदस्य बनण्याची आवश्यकता वाटत नाही. या गटांना त्यांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून. सामाजिक संशोधनामध्ये व्यवसायाचा विस्तृतपणे शोध घेण्यात आला आहे. हे उत्पन्न ठरवते आणि म्हणूनच समाजातील एखाद्याची सामाजिक स्थिती. असे मानले जाते की एखादी व्यक्ती खरोखर काय आहे हे तो जे करतो त्यावर अवलंबून असतो. एखाद्या व्यक्तीचे काम केवळ त्या संस्थेतच नव्हे तर बाहेरही त्याची स्थिती ठरवते. औद्योगिक समाजशास्त्रज्ञ (ब्राऊन, 1974) असा युक्तिवाद करतात की कामगार स्थितीबद्दल तीव्र चिंता दर्शवतात, इतकी की ते बऱ्याचदा कामगार आपल्या स्थितीला घाबरून जातात. ज्याप्रमाणे व्यवसाय एखाद्या व्यक्तीचे उत्पन्न आणि म्हणून सामाजिक स्थिती निर्धारित करतो, असे मानले जाते की ते सामाजिक प्रतिमेवर देखील प्रभाव पाडतात जी लोक दैनंदिन परिस्थितीत इतरांशी संवाद साधतात (मार्टिन, 1975). (प्रा. वाय. नारायण चेट्टी, 2004)

शहरी गरीब लोक काही आर्थिक क्रियाकलापांमध्ये स्वतःला जवळजवळ गुंतवून ठेवण्यासाठी ओळखले जातात जे प्रामुख्याने मॅन्युअल, अकुशल आणि अर्ध-कुशल असतात. मात्र हे उपक्रम त्यांना उपजीविका करण्यासाठी उपयुक्त ठरतात. नमुन्याच्या व्यावसायिक रचनेशी संबंधित डेटा विश्लेषणास विशेष महत्त्व प्राप्त होते कारण SHG निर्मितीचा मुख्य उद्देश त्याच्या सदस्यांचा आर्थिक विकास आहे. अकुशल मॅन्युअल मजूर (बांधकाम, घरगुती कामगार, शौचालय साफसफाई, ड्रेनेज साफसफाई, रस्ता साफसफाई, लोडिंग आणि अनलोडिंग, शेती आणि बागकाम इ.), कुशल मॅन्युअल मजूर (चित्रकार, गवंडी, इलेक्ट्रीशियन, मेकॅनिक, सुतार, चामडे कामगार, बीडी, अगरबत्ती मेकिंग, प्लंबर, बाहुली बनवणे आणि झरी काम इ.), अर्ध-कुशल मॅन्युअल कामगार - सरकारी कर्मचारी, सेवा कामगार आणि छोटे व्यवसाय (भाजी विक्रेता, आईस कँडी विक्रेता, फुगा विक्रेता आणि कागद विक्रेते इ.), व्यवसाय (टेलरिंग शॉप, रेशन दुकान ,

इलेक्ट्रिक शॉप, चिकन आणि मटण केंद्र, STD शॉप इ.), शिक्षक, सेल्स पुरुष, गृहिणी, सरकारी कर्मचारी आणि इतर खालच्या स्तरावरील आणि अधीनस्थ सेवांचे यजमान.

तक्ता: 4.6 - नमुन्याची व्यावसायिक रचना

Occupation

Occupation	zone					Total
	East	West	North	South	Central	
Manual Labourer	10	2	14	1	10	37
	12.5	2.5	17.5	1.3	12.5	9.3
Skilled Labourer	21	1	16	16	11	65
	26.3	1.3	20.0	20.0	13.8	16.3
Petty Business	3	2	4	3	2	14
	3.8	2.5	5.0	3.8	2.5	3.5
Business	6	1	5	3	4	19
	7.5	1.3	6.3	3.8	5.0	4.8
Industrial workers	13	10	13	25	14	75
	16.3	12.5	16.3	31.3	17.5	18.8
Teacher	3	4	2	6	0	15
	3.8	5.0	2.5	7.5	.0	3.8
House wife	22	59	25	25	39	170
	27.5	73.8	31.3	31.3	48.8	42.5
Govt employee	2	1	1	1	0	5
	2.5	1.3	1.3	1.3	.0	1.3
Total	80	80	80	80	80	400
	100.0	100.0	100.0	100.0	100.0	100.0

तक्त्यावरून असे दिसून येते की, शहरात पती-पत्नी दोघांनाही आपले कुटुंब चालवण्यासाठी काम करावे लागते आणि त्यामुळे एकूण नमुन्यापैकी 57.5 टक्के या ना त्या नोकरीत आहेत आणि उर्वरित 42.5 टक्के गृहिणी आहेत. यापैकी 9.3 टक्के अंगमेहनत करणारे मजूर आहेत आणि 16.3 टक्के कुशल कामगार आहेत, तर नमुन्यातील फारच कमी प्रमाणात अध्यापन (3.8%) आणि सरकारी नोकरी (1.3%) यांसारख्या सेवा व्यवसायात गुंतलेले आहेत. पुढे, सुमारे 3.5 टक्के क्षुल्लक व्यवसायात तर 4.8 टक्के व्यवसायात गुंतलेले आहेत. नमुन्यापैकी सर्वाधिक म्हणजे 18.8 टक्के औद्योगिक रोजगारात गुंतलेले आहेत. नागरीकरणाच्या सिद्धांतांचा असा तर्क आहे की शहरीकरण वाढीसह लोकसंख्येच्या व्यावसायिक वितरणात बदल होतो. कृषी आणि संबंधित मॅन्युअल प्राथमिक व्यवसायांमधून मुख्यतः शिक्षण संशोधन, आरोग्य, वाहतूक, दळणवळण, हॉटेल आणि मनोरंजन यासारख्या सेवा व्यवसायांमध्ये बदल होतो परंतु काही उदाहरणे. बंगळुरू शहरातील झोपडपट्ट्यांची लोकसंख्या केवळ प्राथमिक कामांवरच अवलंबून राहते आणि प्रत्यक्षात त्यांना रोजगार मिळतो हे खरोखरच आश्चर्यकारक आहे.

गटात बैठका घेत असताना, एकता निर्माण करणे आणि जिवंतपणासाठी मोठी दृष्टी असणे महत्त्वाचे आहे. असे दिसून आले की त्यांना अधिक आत्मनिर्भरतेसाठी आणि अधिक दृश्यमानतेसाठी एकमेकांसोबत काम करायला आवडेल. बऱ्याच भागात, महिलांनी आरोग्याच्या, विशेषत: मुलांच्या खराब आरोग्यासमोर असहायतेबद्दल बोलले होते आणि असे म्हटले होते की अशा वेळी आवश्यक ती आर्थिक मदत बचत गटाने केली आहे. स्वयं-मदत गटांच्या स्थापनेपूर्वी, ते बाह्य निधीमध्ये प्रवेश करण्यास सक्षम नव्हते.

जवळजवळ सर्व सदस्य ठाम होते आणि त्यांनी स्वयं-सहायता गटांवर मागितलेल्या माहितीला थेट प्रतिसाद देण्याचा मुद्दा मांडला. स्वयं-सहाय्यता गट हे ओझे नसून इतर सर्व कामांबरोबरच स्वयं-सहायता गटाची कामेही करू शकतात, असे या प्रतिनिधींना वाटले. त्यांना असे वाटले की सेल्फ हेल्प ग्रुप हे शिकण्याचे व्यासपीठ आहे आणि त्यामुळे त्यांना आनंद होतो. सेल्फ हेल्प ग्रुप्समुळे महिलांवरील ओझे वाढले नाही का, असे त्यांना विचारले असता, त्यांनी तिखट उत्तर दिले, "नाही, आमच्यावर कोणताही भार नाही. आम्ही मीटिंगला जातो कारण आम्ही शिकतो. परिणामी आम्ही शिकवतो. पिण्याचे पाणी व इतर समस्या सोडविण्यासाठी आम्ही परिसरातील नगरसेवकांकडे जातो. पूर्वी आम्ही आमच्या सासूबाईंना घाबरायचो, याचा अर्थ असा नाही की आम्ही त्यांचा आदर करत नाही, पण आता आम्हाला जे

योग्य वाटते ते आम्ही करतो. ते सामर्थ्य केवळ आपल्याकडे आता पैसा आहे या वस्तुस्थितीतून आलेले नाही, तर त्यांच्या वृत्तीमध्ये सामूहिक शक्ती आणि धैर्य आहे या वस्तुस्थितीतून आले आहे."

महिलांनी त्यांच्या नियमित स्वयं-मदत गटाच्या क्रियाकलापांसह, अकाली जन्म आणि गर्भपात/गर्भपात यासारख्या समस्यांवर देखील चर्चा केली. पुढे, ते कुटुंब नियोजन पद्धती, त्यांच्या मुलांना लसीकरण, शालेय शिक्षण इत्यादींबद्दल देखील चर्चा करतात. काही बचत गटांमध्ये त्यांनी सांगितले की सुरुवातीला त्यांना फारच बोलता येत नाही. सुरुवातीला ते सदस्य होण्यासाठी पुढे आले नाहीत. महिला खूप बोलकी आणि ठाम झाल्या आहेत. पूर्वी, जेव्हा बाहेरचे लोक त्यांच्या गटांना भेट देत असत तेव्हा स्त्रिया त्यांच्या पतींना किंवा मुलांना त्यांच्याशी बोलण्यास सांगत असत. आता ते स्वतः पुढे येतात आणि बाहेरच्या लोकांशी चर्चा करण्यात निश्चिंत असतात. बँकर्स आणि त्यांना भेट दिलेल्या इतरांशी त्यांच्या संवादाबाबतही असेच विधान आहे. स्वयं-सहाय्यता गटामुळे जवळजवळ सर्वच महिलांनी त्यांचे विश्व रुंदावल्याचे सांगितले. शहरी लोकसंख्येची विषम रचना लक्षात घेता, जेथे विविध जाती समूह राहतात, स्त्रियांनी नोंदवले की स्वयं-मदत गटाने त्यांना समस्यांवरील जाती ओलांडून एकत्र येण्यास मदत केली आहे.

सक्षमीकरणाचा दृष्टीकोन कोणत्याही कार्यक्रमात चांगल्या प्रकारे समाकलित होण्यासाठी कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांचा सहभाग अंतर्भूत करणे आवश्यक आहे आणि शक्ती संरचनेशी संबंधित समस्या देखील हाताळल्या जातात. मर्यादित उद्दिष्टे आणि उद्दिष्टांसह लक्ष्यित अंमलबजावणीपासून संपूर्ण वैचारिक बदल स्त्रियांना त्यांची प्राधान्ये आणि गरजा सांगू देत नाहीत. तथापि, महिलांना कौटुंबिक आणि समुदायामध्ये बोलता येण्यासाठी सामाजिक घटक विचारात घेतले पाहिजेत आणि सक्षम वातावरणासाठी परिस्थिती निर्माण केली पाहिजे ज्यामुळे हे घडू शकेल. सक्षमीकरणासाठी, पुरेशा प्रतिनिधित्वाद्वारे निर्णय घेण्यामध्ये आणि नियोजनात महिलांचा आवाज असणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या आरक्षणामुळे तळागाळातील सुमारे एक दशलक्ष महिलांना प्रतिनिधित्व मिळू शकले, ज्यांनी समाज परिवर्तनात अत्यंत महत्त्वाची उत्प्रेरक भूमिका बजावली. राज्य विधिमंडळ आणि संसदेत समान प्रतिनिधित्व महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया अधिक मजबूत करेल.

सक्षमीकरणाचा मुद्दा स्थानिक, सामाजिक आणि आर्थिक संरचनांमध्ये प्रवेश आणि नियंत्रणाशी घनिष्ठपणे जोडलेला आहे. महिलांना सक्षम बनवायचे असेल तर याची खात्री करणे आवश्यक आहे

अ) पैसा, क्रेडिट इ. सारख्या संसाधनांचा समान प्रवेश आणि वितरण.

ब) शिक्षणात प्रवेश.

क) आरोग्य/पोषणात प्रवेश

ड) पाणी आणि स्वच्छतेसाठी प्रवेश

निर्णय घेण्याची शक्ती ही अशी एक पैलू आहे जी महिलांची स्थिती खरोखर सुधारली आहे की नाही हे शोधण्यात मदत करते. समाजाचे पितृसत्ताक स्वरूप पाहता, असे दिसून येते की एकीकडे, प्रयत्न करूनही 28.25 टक्के उत्तरदाते सहमत आहेत की कुटुंबातील त्यांच्या स्थितीत अद्याप कोणताही बदल झालेला नाही. त्यांच्या कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांना 'बोलण्यासाठी शब्द नाही' आणि अजूनही पुरुष सदस्य आणि सासरच्या लोकांच्या हातात आहे. दुसऱ्या बाजूला, हे लक्षात घेणे मनोरंजक आहे की त्यांच्यापैकी सुमारे 54.75 टक्के लोकांचे मत आहे की त्यांना त्यांच्या कुटुंबात मान्यता मिळाली आहे आणि अन्नपदार्थ तयार करणे किंवा मुलांना शाळेत पाठवणे यासारखे निर्णय घेताना त्यांचे मत विचारण्यात आले आहे. तथापि, असे म्हणता येईल की सदस्यत्वामुळे त्यांना योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यास मदत झाली आहे.

उत्तरदात्यांशी झालेल्या चर्चेतून हे अगदी स्पष्ट आहे की जवळजवळ सर्वच (99%) सहमत आहेत की ते त्यांच्या मुलांसाठी चांगल्या आणि सुधारित राहणीमानासाठी उच्च आकांक्षा विकसित करण्यास सक्षम आहेत. 90.5 टक्के प्रतिसादकर्त्यांनी त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात स्वयं-सहायता गटांचे सदस्य म्हणून सशक्त असल्याचे म्हटले आहे ज्याची मागील प्रकरणामध्ये तपशीलवार चर्चा केली आहे. त्यांच्यापैकी उर्वरित ९.५ टक्के लोकांनी त्यांच्या स्थितीत कोणतेही लक्षणीय बदल झाल्याचे आढळून येत नसल्याचे म्हटले आहे. गटांच्या बैठकींमध्ये चर्चा आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतल्याने त्यांची चांगली आणि वाईटाकडे पाहण्याची दृष्टी सुधारली आहे आणि उर्वरित 1.25 टक्के प्रतिसादकर्त्यांना असे वाटते की गट सदस्यत्वाचा त्यांच्या चांगल्या आणि वाईट बद्दलच्या विचारांवर फारसा प्रभाव पडला नाही. .

निष्कर्ष :

सेल्फ-हेल्प ग्रुपच्या सदस्यांना आज केवळ संसाधनांपर्यंतच प्रवेश नाही तर त्यांनी त्यांच्या विकासासाठी संसाधनांचा वापर करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्ये देखील आत्मसात केली आहेत ज्यामुळे त्यांना सक्षम बनवले जाते.

अभ्यासातून हे स्पष्ट होते की स्वयं-मदत गट सामाजिक पैलूंमध्ये सदस्यांना सक्षम बनविण्याच्या मार्गावर आहेत यात शंका नाही. जरी बहुतेक उत्तरदात्यांकडे केवळ मूलभूत शिक्षणाची पातळी आहे, तरी ते महत्त्व समजण्यास सक्षम आहेत आणि ते त्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यास मदत करत आहेत. व्यवहार्य उत्पन्न निर्माण करणाऱ्या क्रियाकलापांमुळे आर्थिक सुधारणा झाल्या आहेत आणि उत्पन्नाची पातळी वाढली आहे आणि सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांनी सुरू केलेल्या अनेक आरोग्य योजनांमुळे आरोग्य सेवांपर्यंत त्यांची सुलभता अधिक चांगली झाली आहे. आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिसादकर्त्यांच्या सहभागाची पातळी त्यांच्या सदस्य नसलेल्या समकक्षांच्या तुलनेत चांगली आहे. तथापि, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय निर्णय घेताना महिलांच्या उपेक्षिततेच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. नियोजन प्रक्रियेत सामाजिकदृष्ट्या उपेक्षित गटांचा सहभाग सुनिश्चित करणे केवळ लाभार्थी म्हणून नव्हे तर गरजा-आधारित कार्यक्रम/प्रकल्प तयार करण्यात सहभागी होण्यासाठी तसेच त्या कार्यक्रमांची स्वतःहून अंमलबजावणी, पर्यवेक्षण आणि देखरेख करणे खूप मोठे काम आहे. इच्छित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी.

ग्रंथलेखन:

- Andersen, M. L. (1994). Thinking about women: Sociological perspectives on sex and gender (Fourth edition). New York: MacMillan Publishing.
- The Human Development Report (United Nations Development Programme, 2001)
- Census of India 2001: Data from the 2001 Census, including cities, villages and towns (Provisional), Census Commission of India.
- Environment & Urbanization Vol 12 No 1 April 2000 35 BANGALORE, Governance, economic settings and poverty in Bangalore, Solomon Benjamin).
- Dynamics of Trade Unions in India by Prof. Y. Narayana Chetty, Anmol Publishers, pp 82
- Bandarge.A.1995. Empowerment, Economic and Political Weekly, March – 13, 589-97.
- Banerjee, Nirmala (2002): 'Gender Budgeting: An Exploratory Note', A paper presented at the workshop, on Gender Budgeting, organised jointly by Sachetana and the Jadhavpur School of Women's Studies, Calcutta, January 31 to Feb 1.
- Beneria, L. (ed). 1982. Women and development: the sexual division of labour in rural society. New yark: praeger.
- Beneria, L. and G.Sen 1981. 'Accumulation, reproduction and women's role in Economic development- Bosarup revisited', signs, 7(2)-279 – 98

*सहयोगी प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभाग प्रमुख, शासकीय प्रथम श्रेणी महाविद्यालय, सिडलघट्टा, कर्नाटक

***

झोपडपट्ट्यांमधील उपेक्षित गटांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती - बेंगळुरू शहराचा सामाजिक अभ्यास

*डॉ. लता बी.आर.

प्रस्तावना:

झोपडपट्ट्यांकडे प्रामुख्याने सामाजिक-अव्यवस्थापनाचे ठिकाण म्हणून पाहिले गेले आहे. मध्यम शहरे आणि लहान शहरांमध्ये पसरू लागलेल्या झोपडपट्ट्यांच्या अव्याहत वाढीचे सर्वात मुख्य कारणांपैकी एक म्हणजे ग्रामीण शहरी स्थलांतर. झोपडपट्ट्यांमध्ये उपेक्षित गट आणि उपेक्षित गटांच्या तडजोडीचे नमुने जात, भाषा, प्रादेशिक आणि नातेसंबंधांवर अवलंबून आणि निश्चित केले जातात. प्रस्तुत शोधनिबंधात उपेक्षित गट आणि उपेक्षित गटांबद्दलचे ज्ञान वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. झोपडपट्टी हे ड्रेनेज, सरकारी रिकाम्या जागा, कामाची ठिकाणे आणि शहरातील इतर बेबंद प्रदेशांभोवतीचे निवारे असमान आणि अनियोजित शहरी वाढीचे कारण आणि परिणाम म्हणून विकसित होतात. प्रस्तुत शोधनिबंधात झोपडपट्टीतील लोकांचे शिक्षण, व्यवसाय, उत्पन्न, कौटुंबिक आकार यासारख्या बदलांवर आधारित झोपडपट्ट्यांमधील उपेक्षित गट आणि उपेक्षित गटांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न केल्या गेला आहे.

उद्दिष्टे:

१. झोपडपट्ट्यांमधील उपेक्षित गटांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. नमुना लोकसंख्येची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी आणि जीवनशैली यांच्यातील परस्परसंबंधाचे विश्लेषण करणे.

संशोधन पद्धती:

१. प्राथमिक तथ्य संकलन- मुलाखतीचे वेळापत्रक, केस स्टडी आणि निरीक्षण पद्धत.

२. दुय्यम तथ्य संकलन - ग्रंथालय आणि संदर्भ साहित्य, वृत्तपत्रे, जर्नल्स इ.

३. तथ्यांचे विश्लेषण आणि प्रस्तुतीकरण - वेगवेगळ्या चलांवर आधारित सारणी.

तथ्यांचे विश्लेषण:

अनियोजित वाढीमुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेत, शहरे ओव्हरटाईम, निर्जन वस्ती, झोपडपट्ट्या आणि अनियमित आणि अव्यवस्थित मानवी वसाहतींची केंद्रे बनली आहेत. हे ज्ञात सत्य आहे की शहरीकरणाचा एक भाग म्हणून, विकसनशील जगातील परीघावरील-शहरी झोपडपट्ट्यांमध्ये अपुरा निवारा, जास्त गर्दी, पिण्याचे पाणी आणि स्वच्छता नसणे, दूषित अन्न आणि घरातील प्रदूषण हे सर्वात मोठे पर्यावरणीय धोके आहेत. मानवी लोकसंख्येत. जीवनाची गुणवत्ता खालावली आहे जी अस्वच्छ राहणीमान आणि अपुऱ्या आर्थिक संसाधनांवरून दिसून येते. लोकसंख्येच्या जलद वाढीमुळे गरिबी आणि नैसर्गिक आणि पर्यावरणीय संसाधनांचे असमान/अनियमित वितरण वाढले आहे. शहरी वातावरणातील झोपडपट्ट्यांच्या वाढीचा अभ्यास करण्याचा, उपेक्षित गटांच्या रचनेचा अभ्यास करण्याचा आणि झोपडपट्ट्यांमधील या अल्पसंख्याक गटांच्या राहणीमानाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी व्यष्टी अध्ययन आणि निरीक्षण पद्धतीसह संरचित मुलाखतीचे वेळापत्रक वापरले गेले. पुढे, ग्रंथालय आणि संदर्भ साहित्य, वृत्तपत्रे, जर्नल्स इत्यादीद्वारे उपलब्ध दुय्यम तथ्यांचे पुनरावलोकन केले गेले आहे. तथ्यांच्या आधारे, वेगवेगळ्या व्हेरिएबल्सवरील तक्त्या तयार केल्या गेल्या आहेत आणि डेटाचे विश्लेषण आणि अर्थ लावला गेला आहे. अभ्यासातून काढलेले प्रमुख निष्कर्ष आणि निष्कर्ष खाली दिले आहेत.

झोपडपट्ट्यांची वाढ ही कोणत्याही प्रकारे मोठ्या शहरांपुरती मर्यादित नाही. ते लहान आणि मध्यम शहरांमध्येही वेगाने पसरले आहेत. म्हणून **क्लिनर्डने झोपडपट्ट्यांच्या स्वरूपाचे समर्पक वर्णन केले आहे;अपुरी घरे, कमी सुविधा, जास्त गर्दी आणि गर्दी ही झोपडपट्टीचे वैशिष्ट्य आहे.** पुढे, ते म्हणतात की, झोपडपट्टीतील लोक त्यांची स्वतःची संस्कृती विकसित करतात जी एक उप-संस्कृती आहे. ज्यामध्ये नियम आणि मूल्यांचा संच आहे, जो खराब स्वच्छता आणि आरोग्य पद्धती, विचलित वर्तन, उदासीनतेचे वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म आणि सामाजिक अलगाव यामध्ये प्रतिबिंबित होते. झोपडपट्टी मुख्य प्रवाहातील समाजापासून अलिप्त असते आणि तिला कनिष्ठ समजले जाते आणि बाहेरील जगातील लोक त्यांच्याकडे संशयास्पदतेने पाहतात. झोपडपट्ट्यांच्या वाढीमुळे सध्याच्या नागरी मूलभूत सेवा आणि पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण पडत आहे. शहरी भागात झोपडपट्ट्यांचे अस्तित्व ही जगभरातील जवळपास सर्व महानगरांना भेडसावणारी प्रमुख समस्या आहे आणि भारतीय शहरेही त्याला अपवाद नाहीत. झोपडपट्ट्यांच्या वाढीचे एक कारण वारंवार नोंदवले गेले आहे. **ग्रामीण-शहरी स्थलांतर, रोजगाराच्या संधींचा अभाव, पीक अपयश, दुष्काळ, पूर आणि ग्रामीण भागातील शेती आणि संबंधित व्यवसायांशी संबंधित इतर नैसर्गिक आपत्तींमुळे ग्रामीण भागातील लोकांना गावे आणि शहरांमध्ये जाण्यास भाग पाडले आहे.** शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या उच्च विशिष्ट तांत्रिक नोकऱ्या पार

पाडण्यासाठी आवश्यक कौशल्ये, ज्ञान आणि प्रशिक्षणाशिवाय, बहुतेक ग्रामीण स्थलांतरित लोक शोधू शकतात. **अनौपचारिक आणि असंघटित क्षेत्रांमध्ये विविध प्रकारच्या अनौपचारिक नोकऱ्या जसे की इमारत बांधकाम, क्षुल्लक व्यापार आणि व्यवसाय, घरगुती सेवा, विक्रेते, फेरीवाले आणि इतर कमी पगाराच्या आणि मॅन्युअल क्रियाकलापांचा मेजवानी.** अपरिहार्यपणे या लोकांना जिथे जिथे हक्क न मिळालेल्या जमिनी आढळतात तिथे त्यांना आश्रय मिळतो, तरीही ते स्थिर आणि शाश्वत जीवनासाठी तिथे प्रयत्न करतात.

राहणीमान:

झोपडपट्ट्यांचा आणखी एक पैलू म्हणजे झोपडपट्ट्यांच्या वाढीचे पर्यावरणीय परिणाम आणि झोपडपट्ट्यांच्या लोकसंख्येतील अभूतपूर्व वाढ. इतर माणसांप्रमाणेच झोपडपट्टीतील लोक ते राहतात त्या वातावरणात खूप हस्तक्षेप करतात. त्यांची भाकरी बाहेर काढण्यासाठी ते स्वतःला विविध प्रकारच्या क्रियाकलापांमध्ये गुंतवून घेतात ज्याचा थेट परिणाम पर्यावरणावर होतो आणि शेवटी वेगाने **झोपडपट्टीतील लोकांचे अध:पतन, नैराश्य आणि अशक्तीकरण**. यामुळे त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांना त्यांच्या जीवनशैलीचे आणि राहणीमानाचे केवळ स्वतःचेच नव्हे तर जगू शकणाऱ्या इतर लोकांच्याही कल्याणासाठी असलेल्या प्रतिकूल परिणामांच्या विस्तृत श्रेणीचे कोणतेही ज्ञान, जागरूकता नाही असे दिसते. झोपडपट्ट्यांच्या परिसरात. मुख्य प्रवाहातील नागरी वस्ती असलेल्या झोपडपट्ट्यांची भौतिक जवळीक पाहता,**गंभीर-आरोग्य - शहरी लोकांना ज्या धोक्यांचा सामना करावा लागतो आणि ते वाढत्या प्रमाणात असुरक्षित होऊ शकतात, त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.**

जिवंत वातावरण म्हणजे वास्तविक ठोस जीवन परिस्थिती ज्यामध्ये इतर गोष्टींचा समावेश होतो. **घरे बांधण्यासाठी वापरली जाणारी सामग्री, घरांचा प्रकार, राहण्याची जागा, घराची स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता, लैंगिक जीवन, पाण्याचा वापर आणि साठवण आणि झोपडपट्टीतील रहिवासी कोणत्या प्रकारचे अन्न वापरतात याबद्दल बोलू नये म्हणून यजमान किंवा अस्तित्वाच्या इतर भौतिक परिस्थिती आणि इतर खाण्याच्या सवयी ज्या जोडण्याची गरज नाही, त्यांचा थेट परिणाम आरोग्यावर होतो**. सजीव पर्यावरण आणि आरोग्य यांच्यातील जिव्हाळ्याचा संबंध लक्षात घेता हा दुवा तपासण्याचा प्रयत्न केला जातो. अभ्यास क्षेत्राच्या नमुना लोकसंख्येवरून राहण्याच्या जागेबद्दल गोळा केलेली आकडेवारी हे उघड करते. **56 टक्के लोकसंख्या सुमारे 10X10 अंतराळात राहते,** तर 38 टक्के **त्यापैकी सुमारे 10X15 जागा आहे आणि त्यापैकी फक्त 6 टक्के लोकांकडे सुमारे 20X10 जागा आहे जे दर्शविते की त्यांच्याकडे राहण्यासाठी अतिशय नाममात्र जागा आहे.**. घराच्या मालकीचा विचार केल्यास, अर्ध्याहून अधिक नमुन्यांमध्ये ते राहत असलेल्या घरांची मालकी आहे, म्हणजे 51.6 टक्के आणि उर्वरित नमुना म्हणजे 48.4 टक्के भाड्याच्या घरांमध्ये आहेत.

गृहनिर्माण परिस्थिती ही आणखी एक महत्त्वाचा चल आहे. अपुरी घरांची उपलब्धता आणि **घरांच्या खराब परिस्थितीमुळे बरेच धोके निर्माण होतात**. गरीब कुटुंबांमध्ये सहसा संसाधनांचा अभाव असतो ज्यामुळे ते परिस्थिती टाळू शकत नाहीत ज्यामुळे त्यांचे राहणीमान खराब होऊ शकते. गजबजलेल्या वस्त्यांमधील गरीब लोकांना वारंवार पिण्याच्या पाण्याचा अपुरा पुरवठा सहन करावा लागतो.**पिण्यायोग्य सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा अभाव**, ओव्हर-पंपिंग आणि भूगर्भातील पाणी कमी करून त्यांच्यावर अवलंबून राहण्यास आणि ओव्हरड्रॉव्ह करण्यास भाग पाडते. सध्याच्या नमुन्यात 46 टक्के कच्च्या घरात राहतात, फक्त 20 टक्के पक्क्या घरात राहतात आणि उर्वरित 34 टक्के झोपड्यांमध्ये राहतात. **याचा अर्थ असा होतो की बंगळुरूच्या झोपडपट्ट्यांमधील राहणीमान अत्यंत निकृष्ट आहे.**

झोपडपट्टीतील लोक काही आर्थिक क्रियाकलापांमध्ये जवळजवळ गरज नसताना स्वतःला गुंतवून ठेवण्यासाठी ओळखले जातात. **मुख्यत: पुरुष, मॅन्युअल, अकुशल आणि अर्ध-कुशल**. हे उपक्रम त्यांना उपजीविका मिळवण्यासाठी उपयुक्त असले तरी काही परिणाम घडवून आणतील ज्याचे नियंत्रण न केल्यास पर्यावरणावर विपरित परिणाम होईल. उदाहरणार्थ: टॅनिंग ॲक्टिव्हिटींमुळे तेथे काम करणाऱ्या लोकांना गंभीर आरोग्य जोखीम जसे की विविध प्रकारच्या ऍलर्जीक त्वचेच्या गुंतागुंतांना सामोरे जावे लागते. तंबाखूच्या सततच्या संपर्कात राहिल्यामुळे बिडी कामगारांच्या मुलांना श्वासनलिकेचा आजार होतो, काही उल्लेख करण्यासाठी. या शक्यता लक्षात घेता, नमुन्याच्या व्यावसायिक रचनेशी संबंधित तथ्यांच्या विश्लेषणास विशेष महत्त्व प्राप्त होते. अकुशल मॅन्युअल मजूर (बांधकाम, घरगुती कामगार, शौचालय साफसफाई, ड्रेनेज साफसफाई, रस्ता साफसफाई, लोडिंग आणि अनलोडिंग, शेती आणि बागकाम इ.), कुशल मॅन्युअल मजूर (चित्रकार, गवंडी, इलेक्ट्रीशियन, मेकॅनिक, सुतार, लेदर कामगार, विडी , अगरबत्ती बनवणे, प्लंबर, बाहुली बनवणे आणि झारीचे काम इ., अर्ध-कुशल मॅन्युअल कामगार-सरकारी कामगार, सेवा कामगार आणि किरकोळ व्यवसाय (भाजी विक्रेता, आईस कँडी विक्रेता, फुगा विक्रेता आणि कागद विक्रेते इ.), व्यवसाय (टेलरिंग) दुकान, रेशन दुकान, इलेक्ट्रिक शॉप, चिकन आणि मटन सेंटर, एसटीडी शॉप इ.), शिक्षक, सेल्स पुरुष, गृहिणी, सरकारी कर्मचारी आणि इतर खालच्या स्तरावरील आणि अधीनस्थ सेवांचे यजमान.

अभ्यासातून, असे दिसून आले आहे की बहुतेक नमुने हाताने काम करणाऱ्या व्यवसायात गुंतलेले आहेत, तर नमुन्यातील खूपच कमी प्रमाणात शिकवणे, विक्री, घरी काम करणे आणि सरकारी नोकरी यासारख्या सेवा व्यवसायात गुंतलेले आहेत असा काहींचा उल्लेख आहे. नागरीकरणाच्या सिद्धांतांचा असा तर्क आहे की शहरीकरण वाढीसह लोकसंख्येच्या व्यावसायिक वितरणात बदल होतो. कृषी आणि संबंधित मॅन्युअल प्राथमिक व्यवसायांमधून मुख्यतः शिक्षण संशोधन, आरोग्य, वाहतूक, दळणवळण, हॉटेल आणि मनोरंजन यासारख्या सेवा व्यवसायांमध्ये बदल होतो परंतु काही उदाहरणे. बंगळुरू शहरातील झोपडपट्ट्यांची लोकसंख्या केवळ प्राथमिक कामांवरच अवलंबून राहते आणि प्रत्यक्षात त्यांना रोजगार मिळतो हे खरोखरच आश्चर्यकारक आहे. हा शोध फारच आश्चर्यकारक नाही आणि भारतातील नागरीकरणाचे सामाजिक स्वरूप प्रतिबिंबित करते. ग्रामीण कर्नाटकातील विशेषतः बंगळुरू शहराच्या शेजारील जिल्ह्यांमध्ये तीव्र दुष्काळी परिस्थितीमुळे झोपडपट्टीतील रहिवासी मोठ्या प्रमाणात स्थलांतरित झाले आहेत. यामुळे शहरी लोकसंख्येतील वाढ ही झोपडपट्ट्यांच्या अव्याहत वाढीमुळे झोपडपट्ट्यांच्या लोकसंख्येच्या वाढीमुळे होत असल्याचा आभास आणखी दृढ होतो. इतकेच की, शहरी लोकसंख्येतील असमानता शहरे आणि शहरांमध्ये सामाजिक अखंडतेवर गंभीर परिणामांसह वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे. एकीकडे अशक्त, संपत्ती-कमी आजारी अस्वच्छ गरीब आणि दुसरीकडे अत्यंत श्रीमंत श्रीमंत वर्ग. शहरी गरिबांच्या आकारमानात झालेली अभूतपूर्व वाढ आणि त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यात सरकार आणि महापालिका प्रशासनाची असमर्थता पाहता शहरी पायाभूत सुविधांवर अभूतपूर्व दबाव पडणे अपरिहार्य आहे आणि त्यानंतर होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाचे घातक परिणाम आहेत.

डेटा हे देखील दर्शविते की एकट्या मागास जातीच्या लोकांना झोपडपट्टीत राहण्याची गरज नाही कारण आतापर्यंत असे मानले जात आहे. याचा अर्थ कालांतराने झोपडपट्ट्यांच्या सामाजिक रचनेत काही बदल झाले आहेत. यावरून हे देखील दिसून येते की लोक राहण्यासाठी जागा मिळवण्यासाठी आणि डोक्यावर छप्पर मिळविण्यासाठी खूप संघर्ष करतात. विकासाची पातळी विचारात न घेता सर्व जातीचे लोक नमुन्यात आढळतात. झोपडपट्ट्यांमध्ये फक्त मागासवर्गीय आणि मागासवर्गीयच राहतात असे मानणे आता खरे नाही.

निष्कर्ष:

१. निकृष्ट घरे, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यामुळे आरोग्याला धोका निर्माण होत आहे.

२. हा अभ्यास झोपडपट्ट्या, शहरीकरण आणि गरिबी यांच्यातील गुंतागुंतीचे आणि बहुआयामी संबंध उलगडून दाखवतो.

३. सरकार आणि स्वयंसेवी संस्थांकडून अनेक प्रयत्न करूनही, साक्षरता, स्वच्छता इत्यादी सामाजिक विषयांवर त्यांची जागरूकता खूप कमी आहे.

४. तथापि, हे लक्षात घेणे मनोरंजक आहे की केवळ निम्न जातीच्या लोकांनीच झोपडपट्टीत राहणे आवश्यक नाही कारण आतापर्यंत असे मानले जात होते.

५. याचा अर्थ कालांतराने झोपडपट्ट्यांच्या सामाजिक रचनेत काही बदल झाले आहेत.

६. बंगळुरूच्या झोपडपट्ट्यांमधील राहणीमान अतिशय दयनीय आहे.

संदर्भ ग्रंथ:

- ***Adinarayanappa .N.A,*** *2008, Urbanization, Slums & Environmental Health, Anmol Publications New Delhi*
- ***Dhadave M.S.*** *1988, Sociology of slum, Archives Books, New Delhi-55*
- ***Dr. K.N. Venkatarayappa*** *1972, Slums [A Study in Urban Problems] Sterling publishers. (p) LTD. New Delhi. PP: 3,4,5,6.*
- *Govt. of Karnataka 2011 Census, Bangalore. Govt. press*
- *Rajeev Koshal, 1996, Population Growth and Family welfare Programmes in India, APH Publication Corporation. New Delhi.*
- *Sunil kumar, Snigeo Shikura, Hideki Harada, 2003, Living Environment and Health of urban poor, Journal: Economic and political weekly, Vol : 6 No.Aug-2003. Samiksha Trust publication.*

*सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र अध्ययन आणि संशोधन विभाग, महाराणी क्लस्टर विद्यापीठ, बंगलोर.

***

पर्यावरण श्रम आरोग्य आणि वैशिक समाज

कृषक समाज आणि स्थित्यंतरे : शेती विषयक कामगारांच्या समस्या

*प्रा. डॉ दिवाकर एच. उराडे

प्रस्तावना

मानवी समाजात मुलभुत व्यवसायापैकी शेती व्यवसाय एक समजला जातो. मानवाच्या भटक्या जीवनाला शेतीमुळेच स्थिरता लाभली हा कायम चालणारा व्यवसाय आहे. संपूर्ण भारताची अर्थव्यवस्था शेती उद्योगावर अवलंबून असते. ज्या राष्ट्राकडे भरपूर पाणी मुबलक व सुपीक जमीन आहे तो देश शेतीप्रधान समजला जातो. प्रतीकूल परिस्थीतीतही तंत्रज्ञान सहकार्य जिदद यांच्याद्वारे प्रगतीकडे नेता येतो. प्रथम काळात स्थलांतरीत शेती पदधत होती. नंतर नदीच्या काठावर नंतर पाण्याच्या बाजूला शेतीची प्रगती झाली. आज शेत जमीनीकडे पाणी असे दृष्य दिसते. जमीनीची मशागत करूण पिक काढणे म्हणजे शेती होय. आज या क्षेत्रात पशू पालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय व वनशेती यांचाही समावेश होतो. शेतीचे दोन प्रकार एक मागास शेती व दोन प्रगत शेती असे प्रकार आहे. हवामान, जमीनीचा प्रकार, क्षेत्रफळ मानवी बळ वापरलेले तंत्र अवजारे येणारे उत्पादन व त्यांचा दर्जा हेतू यावर मागासलेपणा व प्रगती अवंलंबून असते त्यावर शेतीवर काम करणा–या कामगारांचे उत्पादन अवलबूंन असते. शेतकरी जर उत्पादन जास्त घेतल्यास त्याचा मोबदला कामगारांना मिळतो. शेत जमीन लहान असल्यास पाणी पुरवठा मर्यादित किवा बारमाही असते. हाताने, कुदळीने पेरणी केली जाते या शेतीवर केवळ कुटुंबाचा उदर निर्वाह होतो. विषुववृत्तिय प्रदेश, आसाम, मध्यप्रदेशातील डोगंराळ भाग, आफ्रिका देश अशा ठिकाणी झुम शेती केली जाते, तर प्रगत शेतीत उदर निर्वाह व व्यापार हे दोन हेतू असतात. विविध हंगामात पिके धेवून तिथे आधुनिक अवजारे तंत्रज्ञान संशोधन कृत्रिम खते पाणीपुरवठा यांचा वापर होतो व पिके घेतात. दाट लोकसंख्या वस्तित कमीत कमी शेत जमीनीचे जास्त पिके घेतात. कमी लोकसंख्या व विस्तीर्न प्रदेशात शेती केली जाते. डोगंराळ भागातही शेती केली जाते. त्यामुळे शेतीसंबधी कामगारांचे प्रश्न समोर येतात.

शेतीचे प्रकार : (पर्जन्यमान, पाणीपुरवठा, तंत्रज्ञान हेतू पिक प्रकार हे घटक लक्षात घेवून)

अ) मागास शेती	**ब) प्रगत शेती**
१.केवळ उदर निर्वाह	१.जिरायत, २. बागायत किवा कोरडवाहू किवा पाटाची, ३. यांत्रिक किवा विस्तीर्ण,
२.भटकी स्वरूपाची	४.मळयाची, ५.दुग्ध शेती, ६.मिश्र शेती, ७.सदन किवा श्रम शेती

याचबरोबर पिक घेण्याच्या पद्धती व पिकवर्गनुसार एक पिक, द्वितीय पिक, बहु पिक आंतर पिक, धान्य पिक, गडीत धान्याची, धंनदा पिकाची, फळाची, फुलांची, वनशेती (वनऔषधी) यांचा समावेश होतो.

उद्दिष्टये

१. कामगारांच्या समस्या कोणत्या स्वरूपाच्या आहेत
२. हरित क्रांतीचे ऋण व परिणाम सांगता येईल
३. पडित जमीनीचा प्रश्न व कामगारांचा प्रश्न
४. कामगारांचे दैनदिन जिवनमान फक्त मुलभुत गरजा पूर्ण करणारेच आहेत
५. शेती म्हणजे काय? तसेच त्याचप्रकारचे स्पष्टिकरण करता येईल

गृहितकृत्ये किंवा उपकल्पना

१. शेतीविषक कामगारांच्या समस्या हया शेतीशी निगडीत आहेत
२. शेतमजुरांना शेती उद्योगधंदयात वर्षभर रोजगारांची संधी देउ शकते
३. शेतीवर काम करणा–या श्रमीकांना सन्मानपुर्वक जिवनमान जगता येते हे बघणे
४. शेतमजुर कामगारांचे जिवनमान फक्त मुलभुत गरजा पूर्ण करण्यापर्यत मर्यादित आहे.
५. शेतकरी कामगार हा रोजगारासाठी स्थलांतर करतो

संशोधन पदधती

वरील संशोधन प्रकल्प हा वर्णनात्मक पदधती व मुलाखत अनुसुची संशोधन पदधतीद्वारे पूर्ण केलेला आहे.

तथ्यांचे विश्लेषण

शेतीविषयक कामगांराच्या समस्या हया शेती व भारतातील जातिव्यवस्था यांच्याशी सबंधीत आहे. पूर्वी शेती उत्तम व्यापार मध्यम व कनिष्ठ शेती नौकरी अशी म्हण समाजव्यवस्थेत प्रचलित होती म्हणून शेतकरी कामगार हा शिक्षणाकडे दुर्लक्ष करताना दिसतो. अजुनही उच्च शिक्षणाचे प्रमाण हे तिस टक्कयाच्या आसपास आहे. कामगाराच्या अनेक समस्या आहेत. आरोग्य विषयक प्रश्न आर्थिक सामाजिक सांस्कृतिक राजकिय धार्मिक व शिक्षण विषयक प्रश्न अशा विविध समस्या त्यांच्या दिसतात.

कामगारांच्या समस्या

१. वर्षभर रोजगार शेतीमध्ये न मिळणे सर्व ठिकाणी वर्षभर शेती होत नाही
२. हंगामी शेती म्हणजेच काही काळ घरी रिकामे राहावे लागते
३. रोजगार मिळविण्यासाटी स्थलांतर करणे
४. मुलांच्या शिक्षणांचा प्रश्न आज उच्च व तंत्रज्ञान शिक्षण महाग आहे. फक्त बारावी पर्यत मोफत शिक्षण आहे.
५. सामाजिक जिवनात सामाजिक सांस्कृतिक प्रश्न
६. कामगारांचे वाढते कर्जबाजारीपणा व व्यसनाधिनता असणे
७. शेतमालास मिळणारा अल्प भाव असणे ज्यामुळे मजुरी कमी मिळते
८. सरकारची अनास्था शेतकरी कामाबददल सरकार उदासीन असणे
९. नैसर्गिक आपत्ती येणे कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ पडतो. किटननाशकाचा प्रादुर्भाव हवामानातील अनियीमत बदल, जर त्यांच्या शरीरावर होणारे परिणाम व कामगारांना काम न मिळणे
१०. कृषि जागतीकीकरणाचा कृषि जिवनावर प्रभाव पडणे जसे बहुराष्ट्रिय कंपन्या मोठया प्रमाणात ग्रामीण क्षेत्रावर आक्रमण करीत आहेत. काही राज्यातील जमीनीच्या हस्तांतरण झालेले आहे. या कंपन्या रोख पिके घेतात म्हणूनच कामगारांच्या अन्न सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झालेला आहे.
११. शिक्षण व तंत्रज्ञानाचा अभाव शेतीत काम करणारा शेतमजुर आजही निरक्षर व अज्ञानी आहे. त्यामुळेच तो अंध विश्वास, धर्मप्रियता, कर्मकांढ, भविष्य, नशिब यावर विश्वास ठेवतो, म्हणून प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करूण आपली उन्नती करू शकत नाही.
१२. जातीय पुंजीवाद व सर्वकष राष्ट्रिय कृषि धोरणाचा अभाव : भारतात पिक नियोजन कृषी तंत्रान भांडवल पुरवठा बाजारपेठा आयात निर्यात बाबत अजूनही केंद्र सरकार सर्वसमावेशक धोरण अवलंब करीत नाही. म्हणून शेतकरी शेतमजूर यांच्या हातात बाजारपेठ नाहीत. शेती मालाची किंमत ही निर्धारित नसते त्याचा परिणाम उद्योगपती व्यापारी श्रिमंत व शेतकरी शेतमजुर गरीब अशी रचना आहे. उदा. कांदे बाजारात १०रू कि. घेतो शेतक—याकडून घेतो व विकताना ते ४० रू विकतो परिणामी शेतमजूरी जास्त मिळत नाही उदा. १५० ते २०० महीलांची शेतमजूरी.
१३. अल्पभुदारक कामगारांचे प्रश्न: अल्पभुदारक शेतमालक हा शेतमजुरच असतो. १ ते २ एकर पर्यत जमीन असते. वर्षभर त्यावर तो गुजरान करू शकत नाही अशावेळी त्याला रोजगारासाठी अन्य ठिकाणी जावे लागते. तिथे त्यांना चांगल्या प्रतीचे जिवनमान जगता येत नाही. कसेतरी ३ ते६ महीने राहून तो पुन्हा मुळ गावी परत येतो उदा. मिरची कापूसतोड कामगार
१४. अपर्याप्त जलसुविधांचा अभाव असणे: काही ठिकाणी बारमाही पाण्याची व्यवस्था नाही त्यामुळे कामगारांना शेतीत काम मिळत नाही.
१५. व्यापारी लोकांची हुकुमशाही : व्यापारी लोक मनमान्य तसे शेतमालाला भाव देतात. कधीकधी शेतमालाचे व्यापारी पैसेही देत नाहीत. अशावेळी कामगारांना उपाशी राहावे लागते. कर्ज काढावे लागते. बाजारभावानुसार वस्तुला भाव मिळत नाही.
१६. केंद्रशासनाच्या कामगारासबधी चुकिच्या योजना कार्यान्वित असणे.

तक्ता क्रमांक — १ : विदर्भातील शेतमजुरांची मुलाखतीद्वारे घेतलेली माहिती

अ. क्रं.	भूमीहिन	अल्पभुदारक	अत्यल्प भुदारक	मध्यम शेतकरी	एकूण
१	५४	२८	२२	१६	१२०
टक्केवारी	४५	२३.३३	१८.३३	१३.३४	१००

वरील कोष्टकावरून भूमीहिनांचे प्रमाण ४५ टक्के अल्पभुदारकांचे २३.२२ टक्के, अत्यल्पभुदारकांचे १८.३३ टक्के, मध्यम शेतकरी १३.३४ टक्के हे मुलाखत घेणा–या मजुरांचे प्रमाण आहे. राज्यात १०.०५ कोटी शेतक–यांपैकी ६.५ कोटी अल्प व अत्यल्प भुदारक आहेत. त्यांचे प्रमाण ५८ टक्के आहेत. शेतमजुरांची क्षमता ८.०३ कोटी आहे. तर शेतीसाठी शेतमजुरांची टंचाई व मजुरीचे दर वाढत आहे. डाळींबे, द्राक्षे, पेरू, आंबा, आवळा, चिक्कू, मोसंबी, केळी, संत्री या पिकांना काढण्यासाठी व विक्री करण्यासाठी कामगारांची गरज असते राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र पाहिजे पण २४ टक्के आहे. ते कमी होवून १७ टक्के पर्यंत खाली आले आहे. तर चंद्रपूर गडचिरोली जिल्हयात अनुसूचीत जाती जमातीची लोकसंख्या ५४ टक्के असून ते विशेषत: शेतकरी कामगार आहेत. भूमीहिन लोक हे पूर्णपणे शेती व्यवसायावर अवलंबून आहेत ज्यांच्याकडे १ एकर व हेक्टर पेक्षा कमी जमीन आहेत ते अल्पभुदारक शेतमजूर यांना शेती बरोबर काम केल्याशिवाय जमतच नाही अत्यल्प भुदारक हे शेतीबरोबर अन्य काम करावे लागते. मध्यम स्वरूपाचे शेतकरी हे १ हेक्टर ते ५ एकर पेक्षा जमीन कमी आहे ते संख्येने कामगारच आहेत. ते शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसाय कमी प्रमाणात करतात, ते सुद्धा काम करण्यासाठी स्थलांतर करतात. उसतोड, सोयाबीन कापणे, कापूस वेचणे, मिरची तोडणे, तेंदूपत्ता तोडणे, बोध भराई करणे, घर बांधणी, माती खोदणी, निंदण व रोवणे करणे, कापणी व बांधणी करणे वगेरे कामे करावी लागतात. विशेषत: हे लोक अनुसूचीत जाती जमाती व इतर मागासवर्गीय घटकातून जास्त प्रमाणात आहेत त्यांचे प्रमाण जवळपास ९० ते ९२ टक्के आहेत. थोडीफार जमीन असूनही त्यांना कामगार म्हणून काम केल्याशिवाय पोट भरत नाही. अशी परिस्थिती आहे.

उपाययोजना

१ शेतकमूरांची किमान वेतनाची मागणी मंजूर करणे. कमीत कमी १५ हजार वेतनाची सोय करणे

२ बारमाही सिंचन व्यवस्था निर्माण करणे जेणेकरूण त्यांना वर्षभर काम गावीच मिळेल

३ ग्रामीण क्षेत्रात बारमाही विज पुरवठा मोफत देणे

४ शेतीसाठी मजुरांना भांडवल पूरवठा करणे

५ लघुउद्योग व शेतीसाठी २ टक्के व्याजाने पतपुरवठा करण जेणेकरूण कामगारांना आर्थिक फायदा करता येईल. उद्योग वाढीस मदत होईल.

६ एकात्मिक शेती संकल्प योजनेद्वारे शेतमजुरांना संधी देणे

७ भूमीहिन मजुरांना शेंती लिजवर उपलब्ध करूण देणे

८ बाजारपेठ व बाजारभावाची माहिती कामगार शेतक–यांना लवकर देणे

९ रेल्वे व दळणवळणाची साधने ग्रामीण व डोंगराळ क्षेत्रात निर्माण करणे

१० वनक्षेत्रात वाढ करणे नविन झाडे लावणे

११ फळबाग लागवड क्षेत्र वाढत आहे ते निर्यातक्षम बणविणे व वाढ करणे

१२ राज्यात चोपण व खारवटयुक्त जमीनीत वाढ होत आहे त्यामुळे शेतमजुरांना विज्ञान तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे.

१३ राज्यातील ७२ लाख हेक्टर क्षेत्र पडीत व ओसाड आहे ते पिकाखाली आणने.

१४ सर्व कामगाराना विमाकक्षेत आणणे व प्रत्येक ५ व्यक्तिच्या कुटुंबाला ४ हजार ते ५ हजार मानधन देणे.

१५ टिकावू जमीनीपैकि ४२.५० टक्के जमीनीची घूप मोठया प्रमाणात झाली आहे म्हणून जमीनीचा पोत व प्रत सुधारणा कार्यक्रम राबविणे

१६ धान उत्पादक शेतकरी शेतमजूर यांना लघू उद्योग काढण्यास मदत करणे व तांदूळ निर्यातिस केंद्र सरकारची परवानगी देणे.

१७ मुंबई, दिल्ली, पंजाब, हरीयाना, उ प्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात व महाराष्ट्र हे राज्य कांदा उत्पादक क्षेत्र आहेत तेथे कामगारांना सन्मान पूर्वक संधी देवून कांदा उत्पादक कामगांराना बाजारभावानुसार कांदयाची किमंत देणे.

महत्व

वरील संशोधन शेतीविषयी कामगारांच्या समस्यांशी जाणिव करूण देण्यासाठी महत्वपूर्ण आहे. शेतीशीसंबधी कामगारांचे प्रश्न प्रशासनास सोडविण्यास शासन प्रशासनाला मदत होईल यादृष्टिने महत्व आहे. कामगार हा सामाजिक सांस्कृतिकदृष्टया मागासलेला असून त्यांचे प्रश्न जगापुढे आणण्यासाठी मदत होते. शासन व प्रशासनाच्या विविध योजना पूर्ण

करण्यासाठी उपयुक्त आहे. जमीनीची लागवड क्षमता सरासरी २.२१ हेक्टर असून अल्प भुदारक व अत्यल्प भुदारक शेतक–याचे प्रमाण भविष्यात वाढणार आहेत त्यादृष्टिने उपयुक्त आहे.

निष्कर्ष

१. वरील संशोधनाने हे लक्षात येते की कृषीविषयक कामगाराच्या समस्या या शेती व शेती व्यवसायाशर बहुतांशीपणे निगडीत आहेत हे गृहितकृत्य बरोबर आहे.

२. शेतमजुरांना शेती उदयोग काही ठिकाणी वर्षभर रोजगार देतो जिथे सुपिक जमीन मोफत विज उपलब्ध आहे, पण बहुतांशवेळा कामगारांना स्थलांतर करावे लागते हे उपकल्पना बरोबर आलेली नाही.

३. श्रमिकांना शेती व शेतीसबंधी रोजगाराव्यतिरीक्त इतर ठिकाणी रोजगाराठी जावे लागते तिथे त्यांना चांगले जिवनमान जगता येत नाही हे गृहितकृत्य खरे ठरले.

४. अल्पभुदारक व अत्यल्पभुदारक मध्यम शेतकरी कामगार हे रोजगारासाठी हंगामी शेतीचा काळ संपला की रोजगारासाठी इतर ठिकाणी राज्यात किवा पर राज्यात जातात. हे गृहितकृत्य सत्य ठरले आहे. आज कामगाराना जागतिकीकरण उदारीकरण खाजगीकरण धोरण प्रभावाने त्यांचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे अन्यथा भांडवलशाहीत जिवन जगणे कठिण आहे.

संदर्भ ग्रंथसुची

१. भारतीय समाज संरचनात्मक समस्या ले. डॉ बी एम क–हाडे, प्रका. पिंपळापूरे प्रकाशन २०११

२. आदिम जमातीचे समाजशास्त्र : ले. डॉ बी एम क–हाडे, प्रका. पिंपळापूरे प्रकाशन २०१३

३. शास्त्रीय संशोधन पदधती : ले. डॉ बी एम क–हाडे, प्रका. पिंपळापूरे प्रकाशन २००६

४. भारतीय समाज प्रश्न व समस्या : ले डॉ प्रदीप आगलावे प्रका. श्री साईनाथ प्रकाशन नागपूर २००९

५. पर्यावरण अभ्यास : ले डॉ नारायण चौधरी व इतर प्रका. आनंद यादव व्यवस्थापक ग्रं नि केंद्र य च म मु विद्यापीठ नाशिक २०१५

६. भारतातील सामाजिक चळवळी : ले घनश्याम शाह अनु. प्राची चिकटे २०११

७. दै देशोन्नती वर्तमान पत्र दि. १९/०९/२०२३ संपादित अग्रलेख

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, रा म गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सावली जि. चंद्रपूर
संपर्क – ९४२२१९३५०८ ईमेल – diwakarurade1968@gmail.com

***

नागरीकरणाच्या प्रक्रियेचा भारतीय समाजावरील प्रभाव

*डॉ. गावडे एस. एम.

गोषवारा :

नागरीकरण ही सार्वत्रिक प्रक्रिया आहे. जगातील बहुतांशी देशात ती कमी अधिक प्रमाणात सुरु आहे. नागरीकरणाची प्रक्रिया पाश्चिमात्य देशात औद्योगिक क्रांतीनंतर सुरु झाली. भारतामध्ये देखील हया प्रक्रियेला १९ व्या शतकात सुरुवात झाली. भारताचा विचार करावयाचा झाल्यास भारत हा खेडयांचा देश, कृषिप्रधान देश. भारतातील बहुसंख्य लोक खेडयातच राहून आपला पारंपारिक शेती व्यवसाय पारंपारिक पद्धतीनेच करीत असत. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा कशातरी भागत होत्या. प्रगतीला फारसा वाव नव्हता परंतु औद्योगिक क्रांतीनंतर भारतातही नवनवीन उद्योग व्यवसाय आले. उद्योगधंदयांचे केंद्रीकरण होऊ लागले. यंत्रतंत्राचा मोठया प्रमाणात वापर केला जावू लागला. उत्पादनामध्ये वाढ झाली. या सर्वाचा परिणाम म्हणून रोजगाराच्या संधी वाढल्या. तेथे मनुष्यबळ कमी पडू लागले. त्यामुळे स्वाभाविकच खेडयापाडयातील लोक रोजगाराच्या निमित्ताने या उद्योगधंदयाकडे वळू लागले. हळूहळू याचे प्रमाण वाढतच राहील. त्यामुळे उद्योगनगरातील संख्या वाढून ती मोठी शहरे बनू लागली. शहरांची संख्या व शहरातील वाढती लोकसंख्या यातुन वाहतूकीची समस्या, प्रदूषण, कचरा प्रश्न, सांडपाणी व्यवस्थापण, गुन्हेगारी, झोपडपट्टी, वेश्याव्यवसाय यांसारखे प्रश्न निर्माण झाले. तर खेडयातून लोक मोठया प्रमाणात शहरात जावू लागल्यामुळे खेडयातील संयुक्त कुटुंबाचे विघटन, वृद्धांचा प्रश्न, शेतीव्यावसायाकडे दूर्लक्ष यासारखे प्रश्न निर्माण झाले. पण त्याचबरोबर पितृसत्ताक एकाधिकरशाहीचा ऱ्हास, स्त्रियांच्या दर्जात वाढ, जातीयता कमी होण्यास मदत, व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य, यांसारखे काही सकारात्मक परिवर्तन देखील झाले.

त्यामुळेच सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून या दोन्ही बाबींचा विचार करण्यात आला आहे.

प्रस्तावना :—

भारतात प्राचीन काळापासून नगरे होती. परंतु नागरीकरणाची प्रक्रिया नव्हती. पाश्चिमात्य देशांमध्ये नागरीकरणाला औद्योगिक क्रांतीनंतर सुरूवात झाली. भारतामध्ये या प्रक्रियेला १९ व्या शतकापासून सुरूवात झाली. भारत हा कृषीप्रधान देश व खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे पूर्वी शेती, गृहउदयोग व इतर क्षेत्रात पारंपाररिक साधने, प्राणी व मनुष्यशक्तीचा मोठया प्रमाणात वापर केला जात असे. पण यांत्रिकीकारणामुळे कारखाना पध्दती विकसित झाली. मनुष्यबळाऐवजी यंत्राचा वापर केला जाऊ जागला. यंत्रे कोळसा, तेल, व विजेच्या सहाय्याने चालू लागल्यामुळे उत्पादने मोठया प्रमाणात घेतले जाऊ लागले. या सर्व उत्पादनांच्या साधनांचे केंद्रीकरण शहरात झाल्यामुळे शहरे वाढू लागली. अनेक सोयी सुविधा व नोकरीची रोजगाराची संधी मोठया प्रमाणात शहरात निर्माण झाल्यामुळे व दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता यामुळे नागरिकरणांची प्रक्रिया सुरू झाली.

नागरीकरणाची प्रक्रिया जागतिक असली तरी विकसित देशात याची गती जास्त आहे. भारतात याची गती सुरूवातीला कमी असली तरी अलिकडील काही दशकात यांचे प्रमाण वाढ असल्याचे दिसून येते. विशेषत: भारतातील कलकत्ता, मुंबई, दिल्ली, मद्रास, हैद्राबाद, अहमदाबाद, बेंगलोर, कानपूर, पुणे, लखनौ, आणि नागपूर यासारख्या शहरात लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. याशिवाय इतरही शहरात दिवसेंदिवस खेडयापाडयातील लोक शिक्षण, नोकरी, रोजगाराच्या निमित्ताने येऊन राहत आहेत. काही आपल्या गावातून शहरात येऊन जाऊन करित आहेत. या सर्व प्रक्रियेमुळे भारतीय समाजातील काही समस्या कमी होण्यास मदत झाली. तर या नागरिकरणाच्या प्रक्रियेमुळे नविन समस्याही निर्माण झाल्या. त्यामुळेच सदर शोध निबंधाच्या माध्यमातून कोणत्या समस्या कमी झाल्या व कोणत्या नवीन समस्या निर्माण झाल्या. याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्दिष्टये :—

१) नागरिकरणाची प्रक्रिया अभ्यासणे २) नागरिकरणाची कारणे अभ्यासणे

३) नागरिकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतीय समाजातील कोणत्या समस्या कमी होण्यास मदत झाली यांचा अभ्यास करणे.

४) नागरिकरणातून निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे

गृहितके :—

१) नागरिकरणामुळे जातियता कमी होण्यास मदत झाली. २) नागरिकरणामुळे स्त्रियांच्या दर्जात वाढ झाली.

३) नागरिकरणामुळे कुटुंब व्यवस्थेवर परिणाम झाला.

४) नागरिकरणामुळे झोपडपटटया, गुन्हेगारी, वेश्या व्यवसाय, वाहतूकीची समस्या इ. समस्या निर्माण झाल्या.

संशोधन पध्दती :– सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपायोग करण्यात आला आहे. तसेच तथ्य संकलनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

नागरिकरणाचा अर्थ :–

नागरिकरण कशाला म्हणतात हे अभ्यासत असताना विल्यम स्कॉट यांच्यामते लोकसंख्येचे ग्रामीण भागातून नागरी भागाकडे स्थलांतर होणे. व परिणामी ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात राहणाऱ्यांचे प्रमाण वाढत जाणे म्हणजे नागरीकरण तर ई. ई. बर्गेल यांनी ज्या प्रक्रियेत ग्रामीण समुदायाचे नागर समुदायात रूपांतर होते त्याला नागरीकरण म्हणतात असे म्हटले आहे.

नागरिकरणाचा थोडक्यात अर्थ समजून घेतल्यानंतर नागरिकरण का घडून येते? ग्रामीण भागातील लोक शहराकडे का जातात? अलिकडे याचे प्रमाण का वाढत आहे? याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपणास नागरीकरणाची कारणे किंवा नागरीकरणाच्या वाढीस कोणते घटक कारणीभूत आहेत? याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

नागरीकरणाची कारणे :–

१) औद्योगिकरण :– औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाच्या साधनात मोठया प्रमाणात बदल झाला. कारखाना उत्पादन पध्दती उदयास आली. विविध उद्योगधंदयाचे केंद्रीकरण शहरात झाले. परीणामी ग्रामीण भागातील लोक नोकरी व रोजगाराच्या निमित्ताने शहराकडे आकर्षित झाले.

२) दळणवळणाच्या साधनांत वाढ :– औद्योगिक क्रांतीनंतर मोटार, ट्रक, रेल्वे, जहाज, विमान, यांसारखी वाहतुकीची साधने तसेच टपाल, तारायंत्र, दूरध्वनी, फॅक्स, इंटरनेट इत्यादी संप्रेषणाची साधने निर्माण झाली. त्यामुळे नागरिकरणाची प्रक्रिया वाढीस लागली.

३) शिक्षण :– मोठया शहरात अगदी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत व पारंपारिक शिक्षणापासून ते पाश्चात्य व व्यावसायिक शिक्षणापर्यंत सर्व शिक्षणाच्या सोयी सुविधा मोठया प्रमाणात निर्माण झाल्यामुळे नागरीकरणाची प्रक्रिया वाढीस लागली.

४) व्यापार व्यवसाय :– एखादा व्यापार किंवा व्यवसाय करण्यास पोषक वातावरण ग्रामीण भागापेक्षा शहरात जास्त असल्यामुळे नागरीकरणाची प्रक्रिया वाढीस लागली.

५) धार्मिक क्षेत्र :– काही ठिकाणांना व गावांना धार्मिक महत्व असल्यामुळे शहरात नागरीकरणाची प्रक्रिया वाढल्याची दिसते. उदा. वाराणशी, मथुरा, अलाहाबाद इ.

६) पर्यटन केंद्र :– एखादया ठिकाणाला नैसर्गिक देणगी लाभल्यामुळे असे ठिकाण अनेक लोकांचे आकर्षण केंद्र बनते. त्यामुळे तेथे जाणाऱ्यांची संख्या वाढते. परिणामी त्याठिकाणी दुकाने, हॉटेल, खानावळ, लॉज अशी केंद्रे सुरू होतात.

७) मनोरंजन व इतर सुखसुविधा :– शहरात कारखाने, दुकाने, रस्ते, बाजारपेठा तसेच चित्रपटगृहे, नाटयगृहे, उद्याने, क्रिडांगणे, व्यायामशाळा अशा अनेक सोयीसुविधा असल्यामुळे नागरिकरणाची प्रक्रिया घडून येते.

यासारख्या अनेक कारणामुळे दिवसेंदिवस खेडयातून शहरात जावून स्थायिक होण्याचे व खेडयातून शहरात सतत येण्याजाण्याचे लोकांचे प्रमाण वाढतच असल्याचे दिसून येते. भारतातील अनेक कुप्रथा किंवा समस्या सोडविण्यासाठी समाजसुधारकांनी संपूर्ण हयातभर प्रयत्न करूनदेखील त्यांना म्हणावे तेवढे यश आले नव्हते. परंतु या नागरिकरणाच्या प्रक्रियेमुळे आपोआपच काही समस्या कमी होण्यास मदत झाली. पण त्याचबरोबर एकाच ठिकाणी वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शहरात काही समस्या तर लोकसंख्या कमी कमी होऊ लागल्यामुळे खेडयात काही नवीन निर्माण समस्या झाल्या आहेत. या दोन्हीचाही येथे थोडक्यात आढावा घेऊ. प्रथमता नागरीकरणाच्या प्रक्रियेमुळे पारंपारिक भारतीय समाजातील कोणत्या समस्यांची तीव्रता कमी झाली याचा अभ्यास करू.

नागरीकरणाचा सकारात्मक परिणाम :–

१) पितृसत्ताक एकाधिकारशाहीचा ऱ्हास :–

परंपारिक कुटुंबसंस्थेत पती किंवा पिता हा कुटुंब प्रमुख असे. कुटुंब प्रमुखाच्या आदेशानुसारच कुटुंबातील सर्व निर्णय होत. त्याचा आदेश सर्वांनी पाळणे बंधनकारक होते. परंतु नागरी समाजातील कुटुंबामध्ये अजूनही पति किंवा पिता हाच कुटुंबप्रमुख असला तरी कोणताही निर्णय घेताना त्याला पत्नीच्या, मुलांच्या इच्छा आकांक्षाचा आवडी निवडीचा विचार करूनच निर्णय घ्यावा लागतो. सर्वांच्या चर्चेला, मताला येथे महत्व प्राप्त झाले आहे.

२) स्त्रियांच्या दर्जात वाढ :– परंपारिक भारतीय समाजात पुरूष घराबाहेरील कामे करून पैसा कमवित असे तर स्त्री घरातील कामे व मुलेबाळे सांभाळण्याचे काम करीत असे. येथे पुरूष मिळविता, पुरूष आणि स्त्रियांची कामे भिन्नभिन्न होती. पुरूष करीत असलेले काम श्रेष्ठ तर स्त्रियांचे काम कनिष्ठ मानले जाई. त्यामुळे स्त्रिचा दर्जादेखील कनिष्ठ समजला जात असे.

परंतु नागरी समाजात शिक्षणाच्या सोयीसुविधांचा उपयोग करून स्त्रिया सुशिक्षित बनल्या आहेत. नोकरी व्यवसाय करू लागल्या आहेत. त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता आली आहे त्यामुळे हे काम पुरूषांचे व हे काम स्त्रिचे असा भेदभाव न करता दोघेही अर्थार्जन, मुलेबाळे सांभाळणे, स्वयंपाक करणे यासारखी कामे करीत आहेत. परिणामी स्त्री–पुरूष श्रेष्ठ–कनिष्ठ असा भेदभाव कमी होण्यासा मदत झाली.

३) जातीयता कमी झाली :–

शहरामध्ये वाढती लोकसंख्या, प्रवास, करमणुकीची केंद्रे, बँका, बाजारपेठा येथील गर्दी, इ. मुळे पूर्वीच्या काळी सोवळे ओवळे पाळले जात होते ते कमी होण्यास मदत झाली. नोकरी, शिक्षण, व्यवसायाच्या, निमित्ताने स्त्री–पुरूष दोघेही दिर्घकाळ घराबाहेर असल्यामुळे मिळेल ते पाणी, चहा, नाष्टा, जेवण करण्यासाठी हॉटेलमध्ये जाणे. तसेच या सर्व ठिकाणी जात पाहून मैत्री करण्यापेक्षा जो माणूस आपणास उपयोगी आहे तो मित्र किंवा सहकारी. मग तो कोणत्याही धर्माचा किंवा जातीचा असला तरी चालेल. हा विचार रूढ होत असल्यामुळे जातीयता कमी होण्यास मदत झाली.

४) व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य :–

परंपारिक भारतीय समाजात व्यवसाय करण्यासाठी लागणारी गुणवत्ता किंवा आवड याचा विचार न करता जात महत्वाची मानली जात होती. परंतु नागरी समाजात जातीच्या आधारे कामाची वाटणी किंवा नोकरी दिली जात नाही तर त्या व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या गुणकौशल्याला महत्व दिले जाते. तसेच शहरात कोणीही कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असते.

५) कुटुंबाच्या कार्यात बदल :–

परंपारिक भारतीय समाजात स्वयंपाक करणे, मुलांना जन्म देणे, त्यांचे पालनपोषण करणे, त्यांना पारंपारिक कौशल्य शिकविणे, करमणूक, संस्कार, वृध्दांचे संगोपन करणे यासारखी अनेक कामे कुटुंबालाच पार पाडावी लागत होती. परंतु आता नागरी समाजात विविध शिक्षण संस्था, मंडळे, क्लब, संघटना, पाळणागृहे, वृध्दाश्रम, करमणुक केंद्रे इ. च्या माध्यमातून पूर्वीची कुटुंबाची कार्ये पार पाडली जातात. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आपला वेळ आपल्या आवडी निवडीनुसार खर्च करण्यास व व्यक्तिविकास करून घेण्यास स्वातंत्र्य मिळाले आहे.

वरीलप्रमाणे नागरीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतीय समाजात काही सकारात्मक बदल झाल्याचे दिसून येते. याशिवाय अजूनही अनेक सकारात्मक बाबी आपणास सांगता येतील परंतु येथे काही ठळक मुद्दयांचा विचार केला आहे.

नागरीकरणाची प्रक्रीयेमुळे पारंपारिक भारतीय समाजात वरीलप्रमाणे अनेक परिवर्तन जरी झाले असले तरी या प्रक्रियेमुळे काही दुष्परिणाम किंवा काही नवीन समस्या देखील भारतीय समाजात किंवा विशेषता नागरी व ग्रामीण समाजात निर्माण झाल्याचे दिसून येते ते खालीलप्रमाणे :–

नागरीकरणाचे दुष्परिणाम :–

भारतीय समाजात नागरीकरणाच्या प्रक्रियेत दिवसेंदिवस जी वाढ होत आहे त्यामुळे त्याचा ग्रामीण व शहरी समाजावर दुष्परिणाम होत आहे ती असा

१) वृध्दांच्या समस्या :–

नगरीकरणामुळे अनेक तरूण–तरूणी नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने शहरात जातात व तेथेच स्थायीक होतात. शहरातील महागाई, वाढत्या जागेची टंचाई, मिळणारा तोकडा पगार यामुळे ते आपल्या वृध्द आई–बापांना शहरात आणू शकत नाहीत. जरी आणले तरी त्यांना आपल्या घरी न ठेवता वृध्दाश्रमांत ठेवू लागले आहेत. याचा परिणाम भारतीय संस्कृतीत वाढलेल्या मातापित्यांच्या वर होऊन त्यांचा वृध्दापकाळ दु:खमय वेदनादायी बनत आहे.

२) व्यक्तिवादी दृष्टिकोन वाढत आहे :–

नागरी समाजात हवे ते शिक्षण, व्यवसाय, नोकरी मिळू लागली तसेच पैसा व प्रतिष्ठा मिळू लागल्यामुळे त्याला कुटुंबाचे महत्व वाटत नाही. त्याच्यामध्ये मीपणाची भावना निर्माण होत आहे. आईवडीलांची इच्छा आकांक्षा, बहीण–भावाची जबाबदारी याकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे.

३) खेडी ओस पडू लागली :–

दिवसेंदिवस शहरातील वाढते आकर्षण, नोकरी, व्यवसाय, शिक्षण, करमणुकीची सुविधा इ. मुळे तरूणवर्ग शहराकडे आकर्षित होत आहे. तसेच शहरात राहील्यामुळे जीवनमान उंचावते, प्रगती होते. गावात राहिल्यास विकास खुंटतो अशी अनेकांची मानसिकता झाल्यामुळे गावे ओस पडु लागली आहेत. शेती व्यवसाया करणे कमी पणाचे मानले जावू लागले. शेतीमध्ये कामगार मिळेनासे झाले. ग्रामीण मुलांचा लग्नाचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे.

४) शहरात झोपडपट्टीची समस्या :–

सर्वच शहरात दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असली तरी मुंबई, दिल्ली यासारख्या काही शहरात तर खूपच लोकसंख्या वाढत आहे. परिणामी तेथे राहत्या जागेची टंचाई मोठया प्रमाणात असण्यामुळे आर्थिक उत्पन्न कमी असणारे लोक शहरातील रेल्वे स्टेशनच्या शेजारी, पुलाखाली, सांडपाण्याच्या शेजारी झोपडया बांधून अगदी दाटीवाटीने राहतात. तेथे अनेक जाती–धर्माची, व्यवसायाची, स्वभावाची, गुन्हेगारी प्रवृत्तीची लोक राहात असल्यामुळे सतत भांडण तंटा, उघडयावर शृंगार, गुन्हयाच्या घटना घडतात. त्यातुन बालमनावर विपरीत परिणाम होतात. आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात, अनैतिकता वाढीस लागते.

५) वाहतुकीची समस्या :–

खेडयातून शहराकडे जाण्याच्या क्रियेमुळे रस्त्यावरील व शहरातील रस्त्यावरील वाहनांची संख्या व पायी चालत जाणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढल्यामुळे अपघात, ट्रॅफिक जाम होणे यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

वरील काही समस्यांबरोबरच प्रदूषणाची समस्या, सामाजिक नियंत्रणाची समस्या, भिकाऱ्यांची समस्या, गुन्हेगारीची समस्या, वेश्या व्यवसाय इ. अनेक समस्यांचे मूळ नागरीकरणाच्या प्रक्रियेत असल्याचे दिसून येते.

एकूणच नागरीकरणाची प्रक्रिया व नागरी करणाचा भारतीय समाजावरील प्रभाव हा विषय तसा व्यापक आहे. याची जाणीव अभ्यासकाला आहे. त्यामुळे येथे थोडक्यात नागरीकरणाची समस्या समजावून घेवून याबाबत काही निष्कर्ष मांडले आहेत. ते खालीलप्रमाणे

निष्कर्ष :–

१) नागरीकरणाच्या प्रक्रियेमुळे व्यक्तिविकासाला चालना मिळाली असली तरी ग्रामीण विकासाची गती मंदावली आहे.

२) नागरीकरणामुळे जातीयता कमी होण्यास आणि स्त्रीयांचा दर्जा उंचावण्यास मदत झाली.

३) नागरीकरणामुळे कृषिप्रधान असणाऱ्या भारतामध्ये शेतीकडे व शेतीव्यावसाय करणाऱ्यांकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे.

४) नागरीकरणामुळे झोपडपट्टीची समस्या, गुन्हेगारी, वाहतूकीची समस्या, प्रदूषणाची समस्या, वाढता कचरा, सांडपाणी, वेश्याव्यवसाय, साथीचे रोग इ. अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

उपाय :–

शासनाने नागरीकरणाच्या प्रक्रियेचा वाढता वेग, ग्रामीण भागातील घटत असणारी लोकसंख्या व शहरातील वाढती गर्दी यातून निर्माण होणाऱ्या विविध समस्यां याचा अभ्यास करुन खेडयातील तरुण खेडयातच कसे राहतील याचा विचार करून त्यासाठी त्यांना शहरातील चांगल्या दर्जाचे शिक्षण, रोजगार, सोयीसुविधा, करमणुकीची साधने आरोग्य सुविधा इ. उपलब्ध करुन दिल्यास वरील प्रश्न सुटायला निश्चितच मदत होईल.

संदर्भ :–

१) प्रा. वैद्य वसंत : भारतीय सामाजिक समस्या : विश्वभारती प्रकाशन, नागपूर – १२
२) काळदाते सुधा : भारतातील सामाजिक समस्या : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स
३) संगवे विलास (संपादक) : भारतातील सामाजिक समस्या : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
४) खडसे भा. की. : भारतीय सामाजिक समस्या : श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
५) प्रा. कोंडेकर ए. वाय. : भारतीय सामाजिक समस्या : फडके प्रकाशन, कोल्हापूर

*सहाय्यक प्राध्यापक, एस. जी. एम. कॉलेज, कराड.

***

जागतिक पर्यावरणासमोरील स्थानिक आव्हाने

*बाबुराव जाधव

सारांश :

या लेखात स्थानिक पातळीवर जीवन जगणा–या आदिवासी समूहाची पर्यावरणात्मक समस्या आणि आव्हाने यावर चर्चा करण्यात आलेली आहे. आज पर्यावरण हा विषय जागतिक स्वरूपाचा झालेला आहे. जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर पर्यावरण संवर्धनासाठी अनेक नियोजन सभा, समित्या, सम्मेलने यांच्या माध्यमातून पर्यावरणावर चर्चा होतांना दिसून येते. तर पर्यावरण संवर्धनासाठीचे नियम, अटी, कायदे जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर केले जातात. तर या प्रक्रियेत स्थानिक भुभागावर, निसर्गाच्या सानिध्यात आणि पर्यावरण संवर्धनासाठी आपले जीवन यतीत करणा–या शेतकरी, आदिवासी आणि महिला यांचा सहभाग, मते, प्रश्न आणि समस्या यांचा विचार केला जात नाही. तर त्यांच्यावर जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर घेतलेले निर्णय लादण्याचा प्रयत्न केला जातो. प्रस्तुत संशोधन लेख हा गुणात्मक संशोधन पध्दतीवर आधारित आहे. संदर्भ साहित्य, साहित्याचे पुन:लेखन आणि प्रत्यक्ष आदिवासी बहुल भागातील आदिवासी गावांना दिलेल्या क्षेत्रिय भेटी, आदिवासी समूहाच्या घेतलेल्या मुलाखती आणि समूह चर्चा, यावर आधारित माहितीवर या संशोधन लेखाची मांडणी करण्यात आलेली आहे. जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या पर्यावरणविषयी मतप्रवाह, विचार आणि दृष्टीकोण यात स्थानिक आदिवासी समूह आणि त्यांच्या समस्या व प्रश्न यांच्याकडे कशा पध्दतीने दुर्लक्ष होत आहे, तसेच या स्थानिक पातळीवर जीवन जगणा–या आदिवासी जमाती मूलभूत अधिकारापासून वंचित राहत आहेत. या संशोधन लेखातून पर्यावरणात्मक समस्या आणि आव्हाने यावर चर्चा करण्यात आलेली आहे.

प्रस्तावना

प्रस्तुत संशोधन लेचा हा संशोधकाने आदिवासी बहुल पाच निवडक गावात केलेल्या संशोधनावर आधारीत आहे. या संशोधनपर लेखात संशोधकाने त्याला आलेल्या क्षेत्रिय कार्याच्या अनुभवावर वर्जिततेच्या समस्येचे विवेचन केलेले आहे. हा अभ्यास आदिवासी बहुल पाच निवडक गावच्या क्षेत्रीय कार्याच्या अनुभवावर आधारीत आहे. अध्ययनासाठी निवडलेले गावे ही किनवट तालुक्यातील असून, या गावात संशोधकाने अर्धसहभागी निरीक्षण, मुलाखत आणि गटचर्चा इत्यादी साधनांचा उपयोग करून गुणात्मक माहिती प्राप्त केलेली आहे. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या पर्यावरण संवर्धन, जतन, यात आदिवासी यांची भूमिका आणि सहभाग याकडे नियोजन कर्त्यांनी दुर्लक्ष केलेले दिसून येते. प्रस्तुत लेखात या बाबीवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. जागतिक स्तरावर पर्यावरण या विषयावर १९७२ पासून चर्चा सुरू झाली. तसे पाहिल्यास पर्यावरण हा अतिशय गुंतागुंतीचा आणि क्लिष्ट विषय आहे. त्याला अनेक बाजू असलेल्या दिसून येतात. सामाजिकशास्त्रामध्ये पर्यावरणाच्या अभ्यासाला १९७० पासून सुरूवात झालेली दिसून येते. कारण समाजशास्त्रातील पहिल्या पीढीतील अभ्यासकाने किंवा अभिजात समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक तथ्ये (Social fact) हा समाजशास्त्राचा अभ्यास विषय निश्चित केलेला होता, त्यामुळे समाजशास्त्रातील अभ्यासकांनी नैसर्गिक तथ्ये (Natural fact) कडे दुर्लक्ष केलेले दिसून येते. परंतु अलिकडच्या काळातील पर्यावरणवादी, अभ्यासक सामाजिक आणि नैसर्गिक तथ्ये यांच्यातील परस्पर सह संबंधाचा अभ्यास करत आहेत. असे असले तरी, जागतिक पातळीवर अभ्यास करणा–या पर्यावरणवादी अभ्यासकामध्ये पर्यावरणाविषयी मतभेद असलेले दिसून येतात. आशिया खंडातील पर्यावरणवादी अभ्यासकांनी निसर्ग आणि स्थानिक शेतकरी, आदिवासी आणि महिला यांच्यातील परस्पर जैविक सह संबंध आणि नाते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. यातूनच पर्यावरणाचे समाजशास्त्र (sociology of Environment) या शाखेत पर्यावरण आणि समाज यांच्यातील संबंध समजून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

साहित्य सर्वेक्षण

बुटेल (१९८७) यांच्या मते, ऑगस्ट कॉम्ट, कार्ल मार्क्स आणि एमिल दुर्खिम यांनी पर्यावरणीय अभ्यासकाकडे दुर्लक्ष केले. परंतु पुढे १९७० नंतर डण्लॉप आणि कॉटन (१९७८) यांच्या मते, पर्यावरणीय समाजशास्त्रज्ञांनी मुक्त वर्तन (Leisure behaviour) संसाधनाच्या व्यवस्थापनाची समस्या (Problems of resource management) आणि पर्यावरणीय चळवळ (Environmental movements) सामाजिक चळवळी, पर्यावरणवादी शास्त्रज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पर्यावरणीय समस्या समोर आणल्या. जागतिक स्तरावर ज्या पर्यावरणीय समस्या समोर आल्या, त्यापेक्षा स्थानिक पातळीवरील समस्या हया वेगळया स्वरूपाच्या होत्या. जागतिक स्तरावरील पर्यावरणवादी अभ्यासकांनी या समस्यांकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे दक्षिण आणि आशिया खंडातील पर्यावरणवादी अभ्यासकांनी वेगळी भूमिका मांडली आहे. भारतीय समाजाच्या संदर्भात चिपको, अपिको आदिवासी आणि शेतकरी चळवळीने सामाजिक समाजशास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेतले. समाजशास्त्रज्ञांमध्ये १९७० च्या नंतर पर्यावरणाच्या अभ्यासाला सुरूवात झाली असली तरी, भारतातील राधाकमल मुखर्जी, जे.सी. कुमारआप्पा आणि वेरिअर वेल्विन यांनी १९५० ते १९६० च्या दशकात पर्यावरणाविषयी आपली मते मांडलेली दिसतात. राधाकमल मुखर्जी यांनी

(१९४२) सामाजिक परीस्थिकी ही संकल्पना मांडली. रामचंद्र गुहा यांनी त्यांच्या लेखात यांच्या कार्याचा आढावा घेतलेला दिसून येतो. रामचंद्र गुहा आणि जे. मरिटीन आलीअर (१९८८) यांनी जागतिक स्तरावरील पर्यावरणवादाचे विश्लेषण पुढील विविध भागात केलेले दिसून येते, जसे उत्तरेकडील पर्यावरणवाद, दक्षिणेकडील पर्यावरणवाद, गरीबांचा पर्यावरणवाद, श्रीमंताचा पर्यावरणवाद इत्यादी याशिवाय इतरही पर्यावरणवादाची चर्चा होतांना दिसून येते. मुळ पर्यावरणवादी, गांधीवादी पर्यावरणवाद, मार्क्सवादी पर्यावरणवाद आणि स्त्रीवादी पर्यावरणवाद. अर्ने कल्लंठ आणि गीयारद पियार्सन (१९८८) यांनी आशिया खंडातील पर्यावरणवादी चळवळीचा अभ्यास केला. बारी जान (१९९९) यांनी पर्यावरणवादाचे विश्लेषण केले. वंदना शिवा यांनी (१९९७) स्त्रीवादी पर्यावरणवाद मांडला. एकंदरीत, आज पर्यावरणाचे समाजशास्त्र हि एक विकसीत ज्ञानशाखा म्हणून पुढे येत आहे. यातून अनेक विचार विमर्श समोर येत आहेत.

संशोधनाचे उद्देश:

१) पर्यावरणचे समाजशास्त्र या दृष्टीकोणातून जागतिक पर्यावरण आणि स्थानिक पर्यावरण समजून घेणे.

२) स्थानिक पातळीवर जीवन जगणा–या आदिवासी समूहाचे स्थानिक आव्हाने शोधून काढणे.

संशोधन पध्दती:

वरील संशोधनाचे उद्देश, संशोधनाचा दृष्टीकोण आणि संशोधनासाठी निवडलेले अध्ययन क्षेत्र इत्यादीच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन आराखडयाची रचना करण्यात आलेली आहे. या संशोधनासाठी गुणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे. सहेतुक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करून किनवट आदिवासी बहूल तालुक्यातील पाच आदिवासी गावाची निवड करण्यात आलेली आहे. ही निवड करत असतांना या भागात जीवन जगणा–या आदिवासी जमातीचे प्रतिनिधित्व करणा–या आदिवासी गावांची निवड करण्यात आली आहे. अध्ययनासाठी निवड केलेल्या गावात घोंगरवाडी जवरला, दरसांगवी, निखातेवाडी आणि गोकुळवाडी या गावाचा समावेश आहे. तसेच या गावात गोंड, कोलाम, परधान, अंध आणि भिल्ल जमातीचे लोक जीवन जगतांना दिसून येतात. संशोधकांनी या भागात २०१८, २०२० आणि २०२२ या तीन वर्षात हिवाळी आणि उन्हाळी सुटटयामध्ये क्षेत्रिय कार्यासाठी भेटी दिलेल्या आहेत. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने या पाच गावातील आदिवासी पुरूष, महिला आणि युवक यांच्या मुलाखती आणि त्यांच्यासोबत गटचर्चा करून माहिती प्राप्त केलेली आहे. तसेच प्रत्यक्ष क्षेत्रिय भेटी, निरीक्षण आणि सखोल मुलाखतीच्या माध्यमातून गुणात्मक माहिती प्राप्त केलेली आहे. तसेच संदर्भीय साहित्य, पुस्तके आणि लेख यांच्या माध्यमातून संशोधन लेखाशी निगडीत माहितीचे संकलन केलेले आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून पर्यावरणाचे समाजशास्त्र या ज्ञानशाखा अंतर्गत गरीबांचा पर्यावरणवाद (Environmentalism of the poor) या दृष्टीकोणाचा वापर केला आहे.

पर्यावरणाविषयी जागतिक दृष्टीकोण:

जागतिक स्तरावर १९७२ साली Limits to growth (1972) हा अहवाल प्रकाशित करण्यात आला. या अहवालामुळे समाजशास्त्रज्ञांना एक नवी दिशा मिळाली. या अहवालातून अनेक पर्यावरणात्मक समस्या समोर आल्या. यामुळे सामाजिक प्रभाव मुल्यांकन करणे महत्वाचे वाटु लागले. याच दरम्यान रसेल कार्सन (१९६२) यांनी The Silent Spring नावाचे पुस्तक लिहिले. त्यामुळे युरोपीयन राष्ट्रातील नियोजनकर्ते पर्यावरणाविषयी जागरूक झाले. सर्वप्रथम जागतिक स्तरावर १९७२ साली पहिली जागतिक परिषद (Human Environment) या नावाने स्टाकहोम या ठिकाणी घेण्यात आली. या परिषदेला भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी उपस्थित होत्या. नंतर १९८७ साली बर्टलाण्ड कमीशन स्वीडनमध्ये घेण्यात आले. या परिषदेमध्येच शाश्वत विकास (Sustainable Development) ही संकल्पना मांडण्यात आली. पुढे १९९२ मध्ये वसुंधरा परिषद घेण्यात आली. त्यानंतर सातत्याने दर दहा वर्षांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिक परिषदा होत असलेल्या दिसून येतात. या परिषदामधून हवामान बदल, प्रदुषण, वातावरणातील बदल, कार्बन उत्सर्जन, ओझानचा –हास, वन–हास, जैवविविधतेतील घट, प्राणी, पशु, पक्षी, नदी, पर्वत अशा अनेक पर्यावरणात्मक बाबीची चर्चा आंतरराष्ट्रीय पातळीवरून होत असलेली दिसून येते. पर्यावरण बदलास जागतिक स्तरावरून नेहमीच श्रीमंत राष्ट्रतील नियोजन कर्त्यांनी सातत्याने गरीब देशातील गरीब लेकांना दोषी ठरवण्यात आलेले दिसून येते. तसेच गरीब राष्ट्रतील लोकांच्या गरजा याकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते.

एकंदरित, जागतिक स्तरावर विकसीत राष्ट्र व श्रीमंत लोकांनी व भांडवलशाहीचा पुरस्कार करणा–या पर्यावरणवादी समुहानी दारिद्रय, अधिक लोकसंख्या यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवर जास्त भार पडत आहे. त्यामुळे गरीब राष्ट्रातील लोकांनी आपली लोकसंख्या नियंत्रणात ठेवली पाहिजे. तसेच आपल्या समाजातील दारिद्रयाचे उच्चाटन केले पाहिजे, तर पर्यावरणातील भार कमी होईल. तर दुसरीकडे दक्षिणेतील व आशिया खंडातील समुह हे युरोपमधील भांडवलशाही, कारखानदारी, वाढती स्पर्धा, उपभोगवादी संस्कृती, जास्तीत जास्त नफा कमावणे, भांडवलशाहीचा विस्तार, वसाहतवाद यातुनच पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. वाढती कारखानदारी व उद्योग यामुळेच प्रदुषण, हवामान बदल, ओझेनच्या थरातील छेद इत्यादी प्रश्न निर्माण

झालेले आहेत. एकंदरीत पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी अनेक कायदे, नियम आणि अटी तयार करण्यात आल्या. तसेच ज्या वनस्पती, पशु, पक्षी आणि प्राणी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांना पुन:जीवीत करण्यासाठी विशेष मोहीम, उपक्रम आणि कार्यक्रम हाती घेण्यात आले. यातुनच वनाचे, वाघाचे, हत्तीचे, पशुचे, पक्षाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यावर भर देण्यात आला. तर दुसरीकडे, शेतकरी, आदिवासी, महिला, भटके आणि ज्या जाती आणि समुह जल, जंगल आणि जमीन यावर अवलंबून आहेत. तसेच हे सामाजिक समूह ते ज्या भौगोलिक स्थानिक भागात जीवन जगत असतात, तेथील वनसंपदा, नैसर्गिक साधन संपत्ती यावर अवलंबून असतात. पिढयानपिढया हे समूह निसर्गाशी एकनिष्ठ राहून त्यांनी नेहमीच वनसंपदा आणि साधनाचे नैसर्गिक संरक्षण आणि संवर्धन केले आहे, यातूनच वनराई विकसीत झालेल्या दिसतात. आदिवासी शेतकरी आणि महिला या जल, जमीन आणि जंगल यांची पूजा करतात.

जागतिक पर्यावरणवादातून समोर आलेल्या बाबी : जागतिक स्तरावर सातत्याने ज्या परिषदा, सभा आणि सम्मेलने घेण्यात आली, त्यात उत्तरेकडील राष्ट्रानी नेहमीच दक्षिणेकडील राष्ट्राना पर्यावरण –हासासाठी दोषी ठरवले. त्यांच्या मते, गरीब राष्ट्रातील लोकांचे दारिद्रय दुर करण्यासाठी त्यांना जास्त संसाधनाची आवश्यकता आहे. तर या राष्ट्रांनी आपली लोकसंख्या नियंत्रणात ठेवलेली नाही. त्यामुळेच त्यांना जास्त संसाधनाची आवश्यकता आहे. एकंदरीत, आज जागतिक स्तरावर पर्यावरण या विषयाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या वाद, विवाद आणि चर्चा विश्वात, स्थानिक पातळीवर, प्रत्यक्ष जीवन जगणा–या आदिवासी, शेतकरी आणि महिला यांच्या समस्या आणि प्रश्नांची चर्चा झाली पाहीजे. स्थानिक समूहाच्या दृष्टीकोणातून पर्यावरणाचे विश्लेषण करून समस्यांचे निराकरण करण्यात यावे. पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली अनेक कडक कायदे, नियम व अटी निर्माण करून प्रशासनाने स्थानिक लोकांच्या उपजिवीकेवर आणि रोजगारावर अनेक बंधने लादलेले दिसून येतात. स्थानिक लोकांनी आपल्या आवश्यकतेनुसार नैसर्गिक संसाधनाचा उपयोग केलेला आहे. आपल्या मूलभूत गरजा पुर्ण करणे हाच त्यांचा उददेश असलेला दिसून येतो. म्हणूनच नेहमीच स्थानिक समूह, आदिवासी, महिला आणि शेतकरी यांनी जल, जंगल आणि जमीन यांचे संगोपन आणि जतन केलेले आहे. तसेच त्यांना विविध जैवविविधतेबद्दल ज्ञान अवगत असलेला दिसून येतो. या इतदेशीय ज्ञानाला कायदा प्रशासन आणि नियोजन कर्त्यांनी करून घेतला पाहीजे.

स्थानिक पातळीवरील पर्यावरणाविषयी दृष्टीकोण: एकंदरीत, स्थानिक पातळीवरील जीवन जगणा–या सर्व सामान्य सामाजिक समूह यांचा पर्यावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोण हा जागतिक व राष्ट्रीय आणि समाजातील श्रीमंत, भांडवलशाही व उद्योजक यांच्यापेक्षा वेगळया स्वरूपाचा असलेला दिसून येतो. निसर्ग आणि आदिवासी, शेतकरी आणि महिला यांच्यातील सहसंबंध अनेक अभ्यासकांनी मांडलेला दिसून येतो. याच अनुषंगाने या अभ्यासासाठी निवड केलेल्या क्षेत्रिय कार्यातील स्थानिक आदिवासी, शेतकरी आणि महिला यांच्या समस्या या त्यांच्या दैनंदिन जीवनाशी, रोजगाराशी आणि सांस्कृतिक जीवनाशी निगडीत असलेल्या दिसून येतात. आज प्रशासन, वनविभाग आणि स्थानिक आदिवासी समूह याच्यात अनेक वाद, विवाद निर्माण झालेले दिसतात.

अध्ययन क्षेत्रातील निरीक्षणे आणि वास्तव: एकंदरीत, पर्यावरण या विषयाच्या अनुषंगाने चर्चा केल्यास, त्यातून अनेक वाद, विवाद आणि दृष्टीकोण समोर येतांना दिसून येतात. प्रस्तुत अध्ययनासाठी जवरलर, गोकूलवाडी, निखातेवाडी, दरसांगवी आणि घोगरवाडी या गावाची निवड करण्यात आली. या गावातील आदिवासी समाजातील समुदाय प्रमुख, वयोवृध्द व्यक्ती, तरूण आणि महिला यांच्याशी केलेल्या गट चर्चा, सखोल मुलाखती यामधून पुढील बाबी समोर आल्या. पर्यावरणाच्या संदर्भात वनाचे संरक्षण व्हावे, म्हणून संयुक्त वन व्यवस्था, वन समित्या, वन संरक्षण समित्या प्रत्येक गावी स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच १९९६ साली PESA सुधारीत पंचायत विस्तार कायद्यायची निर्मिती करून आदिवासी भागातील ग्रामपंचायतींना विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच २००६ च्या वन हक्क कायद्यानुसार आदिवासी बांधवांना जमीन हस्तांतर करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. या सर्व कायद्याअंतर्गत स्थानिक आदिवासी समूहांना सहभागी करून घेण्यात आलेले आहे. एकीकडे अशा विविध तरतुदी असल्या तरी मात्र प्रत्यक्ष या कायद्याची स्थानिक पातळीवर व्यवस्थितपणे व पारदर्शकपणे अंमलबजावणी होतांना दिसून येत नाही. अजूनही निरणने वाडीतील अंध आदिवासी बांधव त्यांच्या गावाचा PESA मध्ये समावेश झालेला नाही. तर २००६ च्या वन हक्क कायद्यानुसार अजुनही घोगरवाडी गावातील लांकांना वनजमीनी प्राप्त झालेल्या नाहीत.

जवरला, दरसांगवी, घोगरवाडी या गावातील आदिवासी शेतकरी वन्य प्राण्यांच्या शेतातील पिकावरील हमला यापासून त्रस्त आहेत. गोकुळवाडी व इतर आदिवासी गावातील आदिवासी शेतकरी सुगीच्या दिवसात पिकांचे संरक्षण करण्यासाठी रात्रभर शेतीचे रक्षण करत जागे असतात. वनजीव संरक्षण कायद्याअंतर्गत आदिवासींना प्राण्यांची शिकार करता येत नाही. शासनाने आरक्षित केलेल्या वन विभागात गुरे चारता येत नाही. तसेच या आरक्षित वनातुन गौण वनउत्पादने संकलीत करता येत नाहीत. वनविभागाचे कर्मचारी सातत्याने आदिवासी समाजावर पाळत ठेवून असतात. ख–या अर्थाने वनाचे जे राजे आहेत, त्यांनाच

आज वन कायदे आणि शासकीय धोरणांनी वनाबाहेर काढलेले दिसून येते. एकंदरीत, जागतिक पातळीवर ठरलेले व तयार केलेले नियम व अटी स्थानिक पातळीवर लादण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्थानिक लोकांचे प्रश्न हे दैनंदिन जीवनाशी निगडीत आहेत. त्यामुळेच आशिया खंडातील अनेक पर्यावरणवादी अभ्यासकांनी गरीबांचा पर्यावरणवाद (Environmentalism of poor) मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'गरीबाचा पर्यावरणवाद' या दृष्टीकोणातून स्थानिक पातळीवर जीवन जगणा–या आदिवासी बहुल गावातील आदिवासी बांधव अनेक समस्यांना तोंड देत आहेत. पर्यावरण बचावच्या नावाखाली आदिवासी समूहाच्या परंपरागत जीवनपध्दतीवर अनेक कडक निर्बंध लादले आहेत. आरक्षित वनामध्ये आदिवासींना प्रवेश नाही. तसेच त्यांना त्यांच्या गुरांना या क्षेत्रात घऊन जाता येत नाही. पशु, पक्षी आणि प्राणी यांच्याठी आरक्षित असलेल्या वनात सुध्दा आदिवासींना प्रवेश नाही. ज्या धोरणात पशु, पक्षी, वृक्ष आणि प्राणी यांचे संगोपण केल्या जाते, तर दुसरीकडे आदिवासी समूह अन्न, वस्त्र, पाणी आणि रोजगार यासाठी भटकतो, रोजगारासाठी स्थलांतर करतो. याकडे राज्यकर्ते, शासन आणि प्रशासन यांना वेळ भेटत नाही. तर दुसरीकडे आदिवासी विकास, कल्याण आणि सबलीकरणासाठी असलेल्या योजनांचा फायदा पण आदिवासी समूहांना मिळत नाही. प्रशासनाची उदासिनता, दप्तरदिरंगाई आणि भ्रष्टाचार इत्यादीमुळे आदिवासीसाठी असणा–या योजनांची व्यवस्थित अंमलबजावणी होत नाही. आदिवासी बांधवातील अज्ञान, लाजाळूपणा, नेतृत्वाचा अभाव यामुळे शासकीय योजनांच्या लाभापासून हा समूह वंचित राहतांना दिसून येतो. या अनुषंगाने अध्ययनासाठी निवड केलेल्या गावात विविध प्रकारची समस्या आणि आव्हने आढळून आली. त्यात घोगरवाडीतील आदिवासी महिलांना दर वर्षी उन्हाळयात पाण्यासाठी दोन ते तीन किलोमीटर पायी चालत जाऊन पाणी भरावे लागत आहे. तसेच घोगरवाडीला लागून असलेल्या शिव शक्तीनगर कोलाम आणि गोंड वस्तीला अजुनही पक्का रस्ता उपलब्ध करून देण्यात आला नाही. तसेच निखातेवाडीतील महिलांना मोफत गॅस सिलेण्डर मिळाले नाही. अध्ययनासाठी निवड करण्यात आलेली पाचही गावे जंगलाला लागून असल्यामुळे येथील शेतकरी वन प्राण्याच्या पिकावरील हल्याने त्रस्त आहेत. नेहमीच वनविभागाकडे तक्रार करून सुध्दा पिकाची नुकसान भरपाई मिळाली नाही. उन्हाळयातील पाणीटंचाई, वनांचा होत असलेला –हास व वृक्षतोड आणि वनांना लागणारी आग इत्यादीमुळे वनप्राण्यांचे वनाबाहेरील क्रमण आणि आक्रमण यात वाढ झालेली आहे. यातून प्राणी आणि मानव यांच्यात संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो. यात मुळ पर्यावरणवादी, पशु, पक्षी, वृक्ष प्राणी आणि जैवविविधिता यांच्या संगोपणाची आणि संवर्धनाची बाजू घेतांना दिसून येतात. तर मानवतावादी दृष्टीकोणाचा पुरस्कार करणारे अभ्यासक मानव जगला पाहीजे, त्यांच्या मूलभूत गरजा पुर्ण झाल्या पाहीजेत, अशी भूमिका मांडतांना दिसून येतात. तसेच या बाबीची चर्चा जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर झाली पाहीजे.

समारोप:

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील प्राप्त झालेल्या माहीतीच्या आधारे आपण असा निष्कर्ष काढू शकतो की जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर पर्यावरणाच्या अनुषंगाने जे नियम, अटी, कायदे तयार केले जातात, त्यात स्थानिक पातळीवर जीवन जगणा–या आदिवासी समूह त्यांच्या गरजा, आवश्यकता, त्यांचे परंपरागत ज्ञान, कौशल्य यांचा विचार केला जात नाही. वरच्या पातळीवरून नियम, कायदे आणि धोरण लादण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणूनच स्थानिक पातळीवर जीवन जगणा–या आदिवासी समूहाच्या गरजा, आवश्यकता, ज्ञान, कौशल्य यांचा वन, जल आणि जमीन व्यवस्थापनासाठी वापर करून घ्यावा. तरच स्थानिक पातळीवर पर्यावरणाचे संवर्धन व जतन योग्य प्रकारे करता येईल.

संदर्भ:

- Arne Kalland and Gerard Person, (1998), Environmental Movements in Asia, Nordic Institute of Asian Studies, Curzon.
- Barry, John, (1999), Environment and Social Theory, Rutedulge Publishations.
- Carson, Rachel, (1962) Silent Spring, Houghton-Mifflin, Boston.
- Buttel, F.H (1987), " New Direction in Environmental Sociology, Annual Review of Sociology, 13: 465-488.
- Catton, Dunlap (1978), Environmental Sociology: A New Paradigm, The American Sociologist,13, 41-49.
- Mukherjee, Radhakamal, (1942), Social Ecology, London,Longmans, Green and Co.
- Vandana, Shiva, (1997), Women in Nature in (ed) in The Women, Gender and Development Reader of Nalini Visvanathan. Zuban, New Delhi.
- Guha Ramchandra and J Martinez–Alier,(1988), Varieties of Environmentalism, Oxford University Press, New Delhi.
- Village and Town Directory Part XII A&B, (2011), Nanded District Handbbok'.

*सामाजिकशास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
मो.९९७५८११०४१ Email:jadhavbs08@gmal.com

***

महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्या

*डॉ. राजेंद्र फकिरा बगाटे,

गोषवारा:

वृध्दत्व ही मानवी जीवनातील अंतिम, अटळ आणि सार्वत्रिक स्वरुपाची घटना आहे. एकविसाव्या शतकाची सगळ्यात मोठी खूण म्हणजे हे शतक वयोवर्धनाचे आहे. आज आरोग्याच्या दृष्टीने विज्ञानाने अनेक रोगावर मात केलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आज मनुष्याचे आयुर्मान वाढलेले आढळते. एकीकडे ही जरी चांगली बाब असली तरी आज नव्याने वृध्दत्व ही समस्या निर्माण झाली आहे. त्यांचबरोबर वृध्दत्वातून वृध्दांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. भारतात एकोणीसाव्या शतकापर्यंत वृध्दांसंबधी कोणताही प्रश्न नव्हता परंतु २१ व्या शतकात मात्र वृध्दांच्या समस्येसंबंधी, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालीके, त्रैमासिके इत्यादीत वृध्दांच्या समस्या मांडल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाचे विवेचन होत आहे. अमेरिका, इंग्लड, फ्रान्स, डेन्मार्क, रशिया इत्यादी देशात वृध्दांची समस्या अनेक शतकांपासून आजतागायत अस्तित्वात आहे. भारतात ज्येष्ठ लोकांचा प्रश्न शहर महानगरात प्रकर्षाने दिसतो. परंतु आता ग्रामीण समुदायातही ह्या समस्येचे गांभीर्य वाढलेले आहे. एकट्या ज्येष्ठ व्यक्तींचा प्रश्न ग्रामीण क्षेत्रात प्रत्ययास येत नाही. मात्र शहरी समुदायात एकट्या वृध्दांचा प्रश्न जटिल झाला आहे. यामुळे वृध्दांना वृध्दाश्रमात रहावे लागत असून अनेक प्रश्न आणि आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश हा महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेणे आणि वृध्दाश्रमांत वृध्दांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्यविषयक सोईसुविधांचा आढावा घेणे हा असून प्रस्तुत संशोधनाचे अध्ययन क्षेत्र हे भारतातील महाराष्ट्र राज्य असून संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील ५१ वृध्दाश्रामांमध्ये राहणाऱ्या एकूण २४०० वृध्द उत्तरत्यांपैकी २५ टक्के म्हणजेच ६०० उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

मुख्य शब्द: वृध्द, आरोग्य, समस्या, वृध्दाश्रम

प्रस्तावना:

वृध्दत्व ही मानवी जीवनातील अंतिम, अटळ आणि सार्वत्रिक स्वरुपाची घटना आहे. सातत्याने वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या हे जागतिक लोकसंख्येचे वैशिष्ट्ये आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढत जात आहे तसतशी वृध्दांच्या लोकसंख्येतही वाढ होत आहे. घटता जन्मदर व मृत्यूदर यामुळे वृध्दांचे प्रमाण वाढत आहे. या वाढत्या वृध्दांच्या लोकसंख्येमुळे वृध्द ही समस्या निर्माण झाली आहे. "एकविसाव्या शतकाची सगळ्यात मोठी खूण म्हणजे हे शतक वयोवर्धनाचे आहे."[१] म्हणजेच या शतकात वृध्दांच्या लोकसंख्येत मोठ्य प्रमाणात वाढ होणार आहे. "संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या पाहणीनुसार भारतात इ.स. २०२५ साली ज्येष्ठ लोकांची संख्या १७ कोटी ७४ लाख होईल. ही संख्या जगातील ज्येष्ठ लोकांच्या १५ टक्के इतकी असेल. आता जगातील ६० टक्के ज्येष्ठ नागरिक विकसनशील देशात राहतात."[२] लोकसंख्या संक्रमणामुळे देशाला जसा लोकसांख्यिकी लाभांशाचा फायदा होतो, अगदी तसेच कालांतराने नवीन आव्हानांना देखिल सामोरे जावे लागते. या अनेक आव्हानांपैकी लोकसंख्येतील वृध्दांचे वाढते प्रमाण हे एक महत्वाचे आव्हान आहे.

"जगात इ. स. २०१९ मध्ये एकूण ७० कोटी वृद्ध लोक राहत आहेत. याचाच अर्थ म्हणजे आज वृध्दांची संख्या १० टक्के आहे. इ. स. २०५० मध्ये जगात एकूण १५० कोटी वृद्ध असतील."[३] "२०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये १० कोटी ज्येष्ठ–वृध्द (६० वर्षावरील) जनता आहे, तर सध्या देशामध्ये १२ कोटी वृध्द असून पुढील १० वर्षात म्हणजेच २०३० मध्ये ही संख्या ३० कोटीच्या घरात जाणार आहे."[४] आज आरोग्याच्या दृष्टीने विज्ञानाने अनेक रोगावर मात केलेली आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आज मनुष्याचे आयुर्मान वाढलेले आढळते. एकीकडे ही जरी चांगली बाब असली तरी आज नव्याने वृध्दत्व ही समस्या निर्माण झाली आहे. कारण वृध्दापकाळी या वृध्दांची सुश्रुषा कोण करणार? त्यांची काळजी कोण घेणार? हा मोठा प्रश्न आज कुटुंबासमोर निर्माण झाला आहे. यामुळे कुटुंबामध्ये सतत वाद होऊन वृध्दांना वाईट वागणूकीला सामोरे जावे लागत आहे. त्यांचबरोबर वृध्दत्वातून वृध्दांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. यातूनच त्यांना एकलकोंडे जिवन जगावे लागत आहे किंवा घरदार सोडून त्यांना वृध्दाश्रमात राहावे लागत आहे. "इ. स. १९५० मध्ये भारतात मनुष्याचे आयुर्मान हे ४१ वर्ष

होते. १९९० मध्ये ते ६२ वर्षापर्यंत वाढलेले असून इ.स. २०२३ मध्ये ७० वर्षापर्यंत जाईल. सध्या जगातील एकूण २० देशातील मनुष्याचे आयुर्मान हे ७२ वर्ष आहे. आजच काही प्रगत राष्ट्रांतील वृध्दांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या २० टक्क्यांपर्यंत वाढलेली आहे."[५] त्यामुळे वृध्दांचे वेगवेगळे प्रश्न आणि समस्या गंभीर होत आहेत. त्या सोडविण्याकडे लक्ष जावे आणि वृध्दांचे आयुष्य आनंदमय चौतन्यमय व्हावे यासाठी प्रत्येक राष्ट्राने, त्या दिशेने कार्य करण्याची गरज आहे.

वयोवर्धन (Aging) ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. जन्माला येणारा प्रत्येक माणूस जन्मल्यापासून वार्धक्याच्या दिशेने वाटचाल करतच असतो. परंतु "ज्यावेळी जगातील लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढू लागले त्यावेळेला या प्रश्नाची दखल राज्यकर्त्यांनी विशेषत: नियोजन मंडळाने आणि सामाजिक कार्यकत्यांनी घेतली. वयोवर्धन हा काही केवळ सामाजिक प्रश्न नाही, तर आजच्या राज्यकर्त्यांपुढे असणारे ते एक मोठेच आव्हान आहे."[६] म्हणून आज वृध्दांकडे लक्ष देण्याची गरज आहे. "वयोवर्धन हा केवळ संख्याशास्त्राचा विषय नाही, तो आपल्या संस्कृतीशी संबंधित आहे. इतकेच नव्हे तर हा विषय भारताच्या विकासाशीही प्रत्यक्षपणे जोडलेला आहे. प्रत्येक समाजामध्ये त्या समाजातील ज्येष्ठांना कसे वागविले जाते, हे त्या त्या समाजाची सांस्कृतिक पातळी दाखविणारे महत्वाचे गमक आहे."[७] एकूण विचार करता असे दिसते की, "कोणताही ज्येष्ठ माणूस त्याला जर आर्थिक संरक्षण नसेल किंवा त्याला समाजात सामावून घेतले जात नसेल तर अशी ज्येष्ठ माणसे एकटी पडतात आणि त्यांचे आयुष्य म्हणजे केवळ एक हेतुहीन अस्तित्व, केवळ वनस्पतीसम जीवन किंवा एक प्रकारे ते त्यांचे सामाजिक मरणच होते. जशी वर्षे जातात, तसतसे आपले सहकारी, सहयोगी काळाच्या पडद्याआड जातात. सामाजिक संबंध तुटत जातात, आपल्या सुखदु:खाची वाटणी करायला किंवा सुखदु:खाच्या चार गोष्टी बोलायला कोणी उरत नाही, आणि अशा वेळी ही ज्येष्ठ माणसे स्वत:ला घरावरचा किंवा समाजावरचा आपण बोजा आहोत असे मानू लागतात. त्यांना वाटते की, आपला समाजाला कुठलाच उपयोग नाही, आपण मरत नाही म्हणून जगतो आहोत, एक प्रकारचे परावलंबी, घरावरचे व समाजावरचे ओझे होऊन जीवन जगतो आहोत."[८] याच्या उलट आज वाढते आयुर्मान किंवा दीर्घायुपणा ही मानव जातीच्या दृष्टीने एक प्रचंड महत्वाच्या विजयाची निशाणी आहे. "वाढते तंत्रज्ञान, वैद्यकीय संशोधनाने घेतलेली झेप, नवनव्या औषधांचे शोध, त्यामुळे वयोवर्धन आणि दीर्घायुपणा ही या नव्या युगाची एक नांदीच आहे. पण वाढलेल्या या वयाचा उपयोग समाजाला होतो का? या दृष्टीने ज्येष्ठांच्या प्रश्नांकडे सारे जग आता बघत आहे. या मनुष्यबळाचा समाजविकासाच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल किंवा अनुभवाच्या या प्रचंड खजिन्याचा समाजाच्या सुखासाठी कसा उपयोग करून घेता येईल? आपण आपल्या जीवनात केवळ वर्षे वाढवतो, का त्या वाढलेल्या वर्षाना जीवनाची चेतना देतो ? असा विचार आज जगभर सुरू झाला आहे"[९] या दृष्टीने वयोवर्धनाचे आव्हान समाजाला कसे स्विकारता येईल, ज्येष्ठांचा सामाजिक सहभाग कसा वाढेल आणि त्यांचे आयुष्य सुखद कसे होईल याचा विचार केला जात आहे.

आधुनिक भारतातील 'वृध्दांची समस्या' ही एक ज्वलंत समस्या आहे. "भारतीय समाजात संयुक्त कुटुंबाचा होत आलेला ऱ्हास आणि अर्थव्यवस्थेतील परिवर्तनातून ही एक नविन समस्या निर्माण झाली. या समस्येची तिव्रता भारतासोबतच चिनसारख्या देशालाही जाणवत आहे. नवीन नवीन उपाययोजना वृध्दांसाठी योजण्याचा कार्यक्रम सुरूवात झालेला आहे. वृध्दांचा प्रश्न प्राचीन काळात नव्हता, कारण वृध्द हे वय कुटुंबाचे संरक्षण करीत होते. भारतात एकोणीसाव्या शतकापर्यंत वृध्दांसंबधी कोणताही प्रश्न नव्हता परंतु २१ व्या शतकात मात्र वृध्दांच्या समस्येसंबंधी, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालीके, त्रैमासिके इत्यादीत वृध्दांच्या समस्या मांडल्या जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाचे विवेचन होत आहे. अमेरिका, इंग्लड, फ्रान्स, डेन्मार्क, रशिया इत्यादी देशात वृध्दांची समस्या अनेक शतकांपासून आजतागायत अस्तित्वात आहे. म्हणून त्या देशात वृध्दाश्रम, वृध्दत्व वेतन, वृध्द सहाय्यता इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात. वृध्दांची समस्या आता केवळ एकाच देशाची नसून ही एक जागतिक समस्या निर्माण झालेली आहे."[१०] म्हणूनच या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे.

वृध्दांच्या समस्येचे जागतिक स्वरूप लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने १९९९ हे आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ लोकांचे वर्ष म्हणून घोषित केले होते. लोकांचे लक्ष ह्या समस्येकडे वेधले जाऊन त्या संदर्भात निश्चित योजनांची आखणी व कार्यान्विकारण व्हावे असा उद्देश त्यामागे होता. "भारतात ज्येष्ठ लोकांचा प्रश्न शहर महानगरात प्रकर्षाने दिसतो. परंतु आता ग्रामीण समुदायातही ह्या समस्येचे गांभीर्य वाढलेले आहे. एकट्या ज्येष्ठ व्यक्तींचा प्रश्न ग्रामीण क्षेत्रात प्रत्ययास येत नाही. मात्र शहरी

समुदायात एकट्या वृध्दांचा प्रश्न जटिल झाला आहे."[११] यामुळे वृध्दांना अनेक प्रश्न आणि आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

प्राचीन भारतीय समाजात संयुक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात होती. तरुण व्यक्तीला प्रसंगानुरुप उपदेष व मार्गदर्शन वृध्द व्यक्तीलाच करावे लागत असे. त्यामुळेच कुटुंबाला वृध्दांचा आणि वृध्दांना कुटुंबाचा आधार होता. तरुण पिढी अर्थार्जनाचे काम करत असल्यामुळे वृध्दांच्या मार्गदर्शनाचा, अनुभवाचा, उपदेशाचा उपयोग या तरुण पिढीला होत असे. परंतु आज जागतिकीकरण, आधुनिकीकरण, औद्योगिकरण व तसेच नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबपध्दतीत अमुलाग्र बदल होऊन विभक्त कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आली. विभक्त कुटुंबात पती–पत्नी व त्यांची अविवाहित मुले राहत असल्याने वृध्दांची त्यांना अडचण वाटु लागली आहे. शिक्षणाच्या प्रसारामुळे वय किंवा वृध्द या घटकांपेक्षा गुणवत्ता पात्रता आणि प्राविण्यता यांना महत्व प्राप्त झाले त्यामुळे वृध्दांचे महत्व, कमी होऊन त्यांच्यावर वृध्दाश्रमात राहण्याची वेळ येत आहे.

वृध्दाश्रम म्हणजे काय?

"वृध्दाश्रम हे अशा प्रकारचे रहिवाशी केंद्र असते की ज्यामध्ये ६० वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्या किमान २५ व्यक्तींची सोय केली जाते. निवाऱ्याची गरज असणाऱ्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील वृध्द व्यक्तींनाही वृध्दाश्रमात प्रवेश दिला जातो."[१२]

संशोधनाची उद्दिष्टे:

१. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांच्या वैयक्तिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेणे.

३. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्यविषयक सोईसुविधांचा आढावा घेणे.

गृहितकृत्ये:–

१. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांच्या आरोग्याची स्थिती वाईट आहे.

२. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांना अनेक आरोग्यविषयक समस्या भेडसावतात.

३. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांना आरोग्यविषयक सोईसुविधा उपलब्ध नाहीत.

संशोधनाचे अध्ययन क्षेत्र:

प्रस्तुत संशोधनाचे अध्ययन क्षेत्र हे भारतातील महाराष्ट्र राज्य एवढेच मर्यादीत करण्यात आलेले आहे.

संशोधन आराखडा:

प्रस्तुत संशोधनामध्ये 'वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा' अवलंब करण्यात आला आहे.

नमुना निवड पध्दती:

महाराष्ट्र राज्यातील सद्यस्थितीत सुरू असलेल्या एकूण ५१ वृध्दाश्रामांमध्ये राहणाऱ्या एकूण २४०० वृध्द उत्तरत्यांपैकी २५ टक्के म्हणजेच ६०० उत्तरदात्यांची 'सहेतुक नमुना निवड पध्दतीचा' वापर करून संशोधनासाठी नमुना म्हणून निवड केलेली असून हे तथ्य संकलन मे २०१९ ते नोव्हेंबर २०१९ मध्ये करण्यात आलेले आहे.

तथ्य संकलनाच्या पध्दती:

१) प्राथमिक स्त्रोत:

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासकार्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामध्ये 'मुलाखत अनुसूची' या साधनाचा उपयोग केला आहे.

२) दुय्यम स्त्रोत:

दुय्यम स्त्रोतांमध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखान, वर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासिके, वेगवेगळे अहवाल, इंटरनेट इत्यादी उपलब्ध स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची वैयक्तिक स्थिती कशी आहे आणि त्यांना कोणकोणत्या आरोग्यविषयक समस्या भेडसावत आहेत हे शोधण्याचा प्रयत्न केलेला असून हे पुढील माहितीवरून अधिक स्पष्ट होईल.

तक्ता क्र. १ - महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्द उत्तरदात्यांची वैयक्तिक माहिती

(एकूण ६०० उत्तरदाते, महाराष्ट्र राज्य, मे – नोव्हेंबर २०१९)

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे शिर्षक	पर्याय	वृध्दांची संख्या	टक्केवारी
१.१	वृध्द उत्तरदात्यांचा वयोगट	६०–६९ वर्षे	२२३	३७.२
		७०–७९ वर्षे	२३३	३८.८
		८०–८९ वर्षे	१२४	२०.७
		९० पेक्षा जास्त वर्षे	२०	०३.३
१.२	वृध्द उत्तरदात्यांचे लिंग	स्त्री	३२०	५३.३
		पुरुष	२८०	४६.७
१.३	वृध्द उत्तरदात्यांचे शिक्षण	अशिक्षित	१६९	२८.२
		प्राथमिक	१८०	३०.०
		माध्यमिक	१३१	२१.८
		उच्च माध्यमिक	४५	०७.५
		प्दवी	५७	०९.५
		पदव्यूत्तर	११	०१.८
		प्रौढ शिक्षित	०७	०१.२
१.४	वृध्द उत्तरदात्यांचा वैवाहिक दर्जा	टविवाहित	११२	१८.७
		थ्ववाहित	१४२	२३.७
		विधवा	२१७	३६.२
		विधुर	९९	१६.५
		घटस्फोटित	१६	०२.७
		परित्यक्ता	१४	०२.३
१.५	वृध्द उत्तरदात्यांचा जात प्रवर्ग	खुला	३५८	५९.७
		अनुसूचित जाती	५९	०९.८
		अनुसूचित जमाती	०७	०१.२
		इतर मागास प्रवर्ग	११८	१९.७
		भटक्या विमुक्त जाती/जमाती	४०	०६.७
		विशेष मागास प्रवर्ग	१८	०३.०
१.६	वृध्द उत्तरदात्यांचा धर्म	हिन्दु	५१२	८५.३
		बौध्द	४१	०६.८
		जैन	२४	०४.०
		शिख	०९	०१.५
		ख्रिश्चन	०९	०१.५
		मुस्लिम	०५	००.८
		एकूण	**६००**	**१००.०**

सदरील तक्ता क्र. १.१ वरुन असे दिसते की, महाराष्ट्र राज्यातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी ६० ते ६९ वर्षे या 'तरुण वृध्द' (Young Old) वयोगटातील ३७.२ टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर ७० ते ७९ वर्षे या मध्यम वृध्द (Middle

Old) वयोगटातील ३८.८ टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर ८० ते ८९ वर्षे या 'वृध्द–वृध्द' (Old – Old) वयोगटातील २०.७ टक्के वृध्द उत्तरदाते आहेत. तर ९० व त्यापेक्षा जास्त वर्षे' या 'अतिशय वृध्द' (Oldest Old) वयोगटातील ३.३ टक्के वृध्द उत्तरदाते असलेले दिसून येतात. यावरून आपणास असे म्हणता येईल की वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन संशोधने, शासनाची कल्याणकारी राज्याची संकल्पना यामुळे आज जन्मदरात व मृत्युदरात घट होत असल्यामुळे आज व्यक्तीची आयुर्मयादा दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहे आणि ती येत्या काळात सतत वाढतच राहणार आहे हे आपल्याला वरीलप्रमाणे दिसून येते. तसेच तक्ता क्र. १.२ चा विचार करता असे दिसते की, ५३.३ टक्के 'स्त्री' उत्तरदात्या असून ४६.७ टक्के उत्तरदाते 'पुरुष' असलेले दिसून येतात. म्हणजेच महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या एकूण वृध्दांमध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे. तर तक्ता क्र. १.३ चा विचार करता असे स्पष्ट होते की, प्राथमिक शिक्षण घेतलेले ३० टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण अशिक्षित २८.२ टक्के, माध्यमिक २१.८ टक्के, उच्च माध्यमिक ७.५ टक्के, पदवी ९.५ टक्के, पदव्यूत्तर १.८ टक्के आणि प्रौढ शिक्षित १.२ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. यावरून असे म्हणता येते की, महाराष्ट्रात जसजसा शिक्षणाचा स्तर उंचावत जातो तसतसे वृध्दामधील शिक्षणाचे प्रमाण कमी असलेले दिसून येते. तर तक्ता क्र. १.४ वरून असे दिसते की, महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये 'अविवाहित' वृध्द उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण १८.७ टक्के एवढे आहे. तर 'विवाहित' वृध्द उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण २३.७ टक्के एवढे आहे, तर ५२.७ टक्के वृध्द उत्तरदात्यांच्या जोडीदारांचा मृत्यू झालेला असून त्यामध्ये ३६.२ टक्के 'विधवा' असून १६.५ टक्के विधुर असलेले दिसतात, तर २.७ टक्के वृध्द उत्तरदाते घटस्फोटित आढळले आहेत, तर २.३ टक्के परित्यक्ता वृध्द महिला आहेत. वरील तक्त्याचा विचार करता असे दिसते की, 'विवाहित' वृध्द उत्तरदाते ८१.३ टक्के असून हे प्रमाण 'अविवाहित' १८.७ टक्के उत्तरदात्यापेक्षा अधिक आहे. यावरून आपणास असे दिसते की, भारतीय समाजामध्ये विवाह करणे अनिवार्य मानलेले आहे. यावरून आपणास विवाहाची अनिवार्यता हे भारतीय समाजाचे वौशिष्टये स्पष्ट होते. तसेच तक्ता क्र. १.५ वरून असे दिसते की, 'खुल्या' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण ५९.७ टक्के आहे, तर 'अनुसूचित जाती' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण ९.८ टक्के आहे, तर 'अनुसूचित जमाती' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण १.२ टक्के आहे, तर 'इतर मागास' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण १९.७ टक्के एवढे आहे, तर 'भटक्या विमुक्त जाती जमाती' या प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण ६.७ टक्के एवढे आहे तर 'विशेष मागास' प्रवर्गातील वृध्द उत्तरदात्यांचे प्रमाण ३ टक्के एवढे आहे. तसेच तक्ता क्र. १.६ चा विचार करता असे दिसते की, 'हिंदू' या धर्मातील सर्वाधिक म्हणजेच ८५.३ टक्के वृध्द उत्तरदाते असून हे प्रमाण 'बौध्द' ६.८ टक्के, जैन ४ टक्के, सिख व ख्रिचन अनुक्रमे १.५ टक्के व मुस्लिम ०.८ टक्के या सर्व धर्मांतील उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. हे प्रमाण जास्त असण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रात 'हिंदू' धर्मीयांची लोकसंख्या सर्वाधिक असल्यामुळे वृध्दाश्रमात राहण्याचे प्रमाणही 'हिंदू' धर्मीयांमध्ये अधिक असणे साहजिकच आहे.

तक्ता क्र. २ महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्द उत्तरदात्यांच्या आरोग्यविषयक समस्या

(एकूण ६०० उत्तरदाते, महाराष्ट्र राज्य, मे – नोव्हेंबर २०१९)

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे शिर्षक	पर्याय	वृध्दांची संख्या	टक्केवारी
२.१	'सद्यस्थितीत आरोग्याची स्थिती कशी आहे'	चांगली	२४६	४१.०
		वाईट	३५४	५९.०
२.२	उत्तरदात्यांना असणाऱ्या स्वास्थ्यासंबंधी समस्या	रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास	३१५	५२.५
		मनोनियंत्रणाचा अभाव	६५	१०.८
		मलावरोध	१२	२.०
		लघवीचा त्रास	१९	३.२
		अपचनाचा त्रास	६७	११.२
		रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास + मनोनियंत्रणाचा अभाव +. मलावरोध +. लघवीचा त्रास +. अपचनाचा त्रास	३	०.५

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे शिर्षक	पर्याय	वृध्दांची संख्या	टक्केवारी
		रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास + लघवीचा त्रास +. अपचनाचा त्रास	५	०.८
		रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास + मनोनियंत्रणाचा अभाव	६४	१०.७
		रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास + मलावरोध + अपचनाचा त्रास	३	०.५
		मनोनियंत्रणाचा अभाव + मलावरोध	२	०.३
		रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास + अपचनाचा त्रास	४	०.७
		एकही नाही	४१	६.८
२.३	उत्तरदात्यांना पुढीलपैकी कशाशी संबंधित आजार आहेत'	डोळ्यांशी	१७६	२९.३
		हाडांशी	१०३	१७.२
		घशाशी	२५	४.२
		छातीशी	२६	४.३
		पोटाशी	२२	३.७
		डोळ्यांशी + हाडांशी + घशाशी + छातीशी + पोटाशी	४६	७.७
		डोळ्यांशी + पोटाशी	५	०.८
		डोळ्यांशी + हाडांशी + घशाशी + पोटाशी	१०	१.७
		डोळ्यांशी + हाडांशी	१०७	१७.८
		हाडांशी + छातीशी	७	१.२
		हाडांशी + घशाशी	१	०.२
		मेंदुशी	४	०.७
		डोळ्यांशी + छातीशी	४	०.७
		डोळ्यांशी + घशाशी	१०	१.७
		डोळ्यांशी + मेंदुशी	१	०.२
		डोळ्यांशी + हाडांशी + पोटाशी	५	०.८
		डोळ्यांशी + हाडांशी + मेंदुशी	१	०.२
		त्वचेशी	१	०.२
		एकही नाही	४६	७.७
२.४	'उत्तरदात्यांना पुढीलपैकी एखादा आजार आहे का'	मधुमेह	४५	७.५
		कर्करोग	३	०.५
		रक्तदाब	१७७	२९.५
		अर्धागवायू	३३	५.५
		मुतखडा	४९	८.२
		मुळव्याध /भगेंद्र	४१	६.८
		हृदयविकार	१४	२.३
		मधुमेह + मुतखडा + मुळव्याध/भगेंद्र	२	०.३
		मधुमेह + रक्तदाब	४१	६.८
		मधुमेह + रक्तदाब + हृदयविकार	८	१.३

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे शिर्षक	पर्याय	वृध्दांची संख्या	टक्केवारी
		मधुमेह + हृदयविकार	३	०.५
		मधुमेह + रक्तदाब + अर्धागवायू	१०	१.७
		कर्करोग + रक्तदाब	४	०.७
		अर्धागवायू + हृदयविकार	२	०.३
		मधुमेह + मुतखडा	२	०.३
		रक्तदाब + अर्धागवायू + मुळव्याध/भगेंद्र	१	०.२
		रक्तदाब + मुतखडा	१	०.२
		एकही नाही	१६४	२७.३
२.५	'उत्तरदात्यांना कोणता असाध्य आजार आहे'	स्तनाचा कर्करोग	२	०.३
		क्षयरोग (टी.बी.)	५	०.८
		आंधळेपणा	३६	६.०
		हृदयविकार	४	०.७
		बहिरेपणा	११	१.८
		अर्धागवायू	४९	८.२
		फेफरे	८	१.३
		दमा	१	०.२
		मानसिक समस्या	६	१.०
		पोलिओ	१	०.२
		एकही नाही	४७७	७९.५
२.६	'उत्तरदात्यांची स्मरणशक्ती कशी आहे'	खूप चांगली	६९	११.५
		चांगली	२६२	४३.७
		मध्यम	१००	१६.७
		काही प्रमाणात चांगली	१०८	१८.०
		काहीच लक्षात राहत नाही	६१	१०.२
		एकूण	**६००**	**१००.०**

महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांची आरोग्यविषयक समस्या अभ्यासत असतांना सदरील तक्ता क्र. २.१ वरून असे दिसते की, सद्यस्थितीत आमच्या आरोग्याची स्थिती वाईट आहे असे उत्तर देणारे ५९ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण सद्यस्थितीत आमच्या आरोग्याची स्थिती चांगली आहे असे उत्तर देणाऱ्या ४१ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. हे प्रमाण अधिक असण्याचे कारण म्हणजे वृध्दावस्थेमध्ये व्यक्तीला आरोग्याच्या बाबतीत अनेक समस्यांचा सामना करावा लागतो त्यामुळे आमच्या आरोग्याची स्थिती वाईट आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत. तसेच वरील तक्ता क्र. २.२ वरून असे स्पष्ट होते की, आमच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास होत आहे असे उत्तर देणारे ५२.५ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण इतर स्वास्थ्यासंबधी समस्या सांगणाऱ्या उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. यावरून असे दिसते की वार्धक्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास होतो व वृध्दांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते. तसेच तक्ता क्र. २.३ वरून असे स्पष्ट होते की, आम्हाला डोळ्यांशी संबंधित आजार आहे असे उत्तर देणारे २९.३+७.७+०.८+१.७+१७.८+०.७+१.७+०.२+०.८+०.२=६०.९ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण इतर अवयवांशी संबधित आजार सांगणाऱ्या उत्तरदात्यांपेक्षा अधिक आहे. यावरून आपल्याला असे म्हणता येते की, वार्धक्यामुळे वृध्दांना डोळ्यांशी संबंधित आजार जास्त प्रमाणात होत असतात. तसेच तक्ता क्र. २.४ वरून असे दिसते की, आम्हाला 'रक्तदाब' हा आजार आहे असे उत्तर देणारे २९.५+६.८+१.३+१.७+०.७+०.२+०.२=४०.४ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण इतर आजार सांगणाऱ्या उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे. म्हणजेच वृध्दवस्थेत वृध्दांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते हे यावरून स्पष्ट होते. तसेच तक्ता क्र. २.५ वरून असे दिसते की,

आम्हाला अर्धांगवायू हा असाध्य आजार आहे असे उत्तर देणारे ८.२ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आम्हाला इतर असाध्य आजार आहेत असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांच्या प्रमाणाच्या तुलनेत अधिक आहे. तसेच तक्ता क्र. २.६ वरून असे दिसते की, वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी आमची स्मरणशक्ती चांगली आहे असे उत्तर देणारे ४३.७ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमची स्मरणशक्ती खूप चांगली ११.५ टक्के, मध्यम १६.७ टक्के, काही प्रमाणात चांगली १८ टक्के आणि आमच्या काहीच लक्षात राहत नाही असे उत्तर देणाऱ्या १०.२ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात सर्वाधिक आहे.

तक्ता क्र. ३. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्यविषयक सोईसुविधा

(एकूण ६०० उत्तरदाते, महाराष्ट्र राज्य, मे – नोव्हेंबर २०१९.)

तक्त्यांचे क्र.	तक्त्यांचे शिर्षक	पर्याय	वृध्दांची संख्या	टक्केवारी
३.१	'वृध्दाश्रमात उत्तरदात्यांच्या तब्येतीची कोण काळजी घेते	जोडीदार	४१	६.८
		कर्मचारी	१३६	२२.७
		मित्र	१२३	२०.५
		मुलगी	१	०.२
		कर्मचारी + मित्र	३४	५.७
		बहिण	१	०.२
		भाऊ	१	०.२
		कोणीच नाही	२६३	४३.८
३.२	वृध्दाश्रमात उत्तरदात्यांची वैद्यकीय तपासणी किती दिवसांनी केली जाते.	आठवड्याला	३०१	५०.२
		पंधरा दिवसांनी	४३	७.२
		महिन्याला	१५७	२६.२
		केवळ आजारी पडल्यावरच	२५	४.२
		वैद्यकीय तपासणी केलीच जात नाही	७४	१२.३
३.३	'वृध्दाश्रमात आरोग्यविषयक कोणत्या सोईसुविधा उपलब्ध आहेत'	दवाखाना	१००	१६.७
		रुग्णवाहिका	११३	१८.८
		प्राथमिक आरोग्य केंद्र	४	०.७
		दवाखाना + रुग्णवाहिका	७२	१२.०
		दवाखाना + रुग्णवाहिका +जीम	११	१.८
		एकही नाही	३००	५०.०
३.४	उत्तरदात्यांची प्रकृती चांगली रहावी यासाठी योग्य ती काळजी घेतली जाते का	होय	३११	५१.८
		नही	२८९	४८.२
३.५	उत्तरदाते वृध्दाश्रमातील जेवणाबाबत समाधानी आहेत का?	होय	३३४	५५.७
		नही	२६६	४४.३
३.६	'वृध्दाश्रमातील कर्मचारी प्रशिक्षित आहेत का?'	होय	२६३	४३.८
		नही	३३७	५६.२
३.७	'वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यज्ञांकडून परिसर स्वच्छ ठेवला जातो का?'	होय	३२१	५३.५
		नही	२७९	४६.५
		एकूण	**६००**	**१००.०**

महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्यविषयक सोईसुविधा अभ्यासत असतांना सदरील तक्ता क्र. ३.१ वरून असे दिसते की, वृध्दाश्रमात राहत असतांना आमच्या तब्बेतीची कोणीच काळजी घेत नाही असे उत्तर देणारे ४३.८ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमच्या तब्बेतीची काळजी आमचा जोडीदार घेतो असे उत्तर देणाऱ्या ६.८ टक्के, तब्बेतीची काळजी कर्मचारी घेतात असे उत्तर देणाऱ्या २२.७ टक्के, मित्र काळजी घेतात असे उत्तर देणाऱ्या २०.५ टक्के, मुलगी, बहिण, भाऊ काळजी घेते असे उत्तर देणाऱ्या अनुक्रमे ०.२ टक्के आणि कर्मचारी + मित्र काळजी घेतात असे उत्तर देणाऱ्या ५.७ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. तसेच तक्ता क्र. ३.२ वरून असे दिसते की, वृध्दाश्रमात आमची वैद्यकीय तपासणी आठवड्याला केली जाते असे उत्तर देणारे ५०.२ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण वृध्दाश्रमात आमची वैद्यकीय तपासणी पंधरा दिवसांनी केली जाते असे उत्तर देणाऱ्या ७.२ टक्के, दर महिन्याला केली जाते, असे उत्तर देणाऱ्या २६.२ टक्के, केवळ आजारी पडल्यावरच वैद्यकीय तपासणी केली जाते असे उत्तर देणाऱ्या ४.२ टक्के तर वृध्दाश्रमात आमची वैद्यकीय तपासणी केलीच जात नाही, असे उत्तर देणाऱ्या १२.३ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे, यावरून असे म्हणता येईल कि महाराष्ट्रातील वृद्धाश्रामामध्ये दर आठवड्याला वृद्धांची वैद्यकीय तपासणी केली जाते. तसेच तक्ता क्र. ३.३ वरून असे दिसते की, आम्ही राहत असलेल्या वृध्दाश्रमात कोणत्याच आरोग्यविषयक सोईसुविधा उपलब्ध नाहीत असे उत्तर देणारे ५० टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण दवाखाना १६.७ टक्के, रुग्णवाहिका १८.८ टक्के, प्राथमिक आरोग्य केंद्र ०.७ टक्के, दवाखाना व रुग्णवाहिका १२ टक्के आणि दवाखाना, रुग्णवाहिका व जीम १.८ टक्के ह्या आरोग्यविषयक सोईसुविधा उपलब्ध आहेत असे उत्तर देणाऱ्या उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरुन आपणास असे म्हणता येऊ शकते की महाराष्ट्रातील वृध्दाश्रमामध्ये वृध्दांसाठी आरोग्यविषयक सोईसुविधांचा अभाव दिसतो. तसेच तक्ता क्र. ३.४ वरुन असे स्पष्ट होते की, आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जाते असे उत्तर देणारे ५१.८ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण आमची प्रकृती चांगल राहावी यासाठी वृध्दाश्रमात योग्य ती काळजी घेतली जात नाही असे उत्तर देणाऱ्यज्ञा ४८.२ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे. यावरून आपणास असे म्हणता येईल की वृध्दाश्रमात वृध्दांच्या प्रकृतीची योग्य ती काळजी घेतली जाते. तसेच तक्ता क्र. ३.५ वरुन असे स्पष्ट होते की, वृध्दश्रामतील जेवणाबाबत आम्ही समाधानी आहोत असे उत्तर देणारे सर्वाधिक म्हणजेच ५५.७ टक्के उत्तरदाते असून ४४.३ टक्के उत्तरदाते जेवणाबाबत असमाधानी आहेत. तसेच तक्ता क्र. ३.६ वरुन असे स्पष्ट होते की, आम्ही राहत असलेल्या वृध्दाश्रमातील कर्मचारी प्रशिक्षित नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक म्हणजेच ५६.२ टक्के उत्तरदाते आहेत, यावरून आपणास असे म्हणता येते की वृध्दाश्रमामध्ये प्रशिक्षित कर्मचारी नसल्यामुळे वृध्दांची हेळसांड होते त्यासाठी वृध्दाश्रमामध्ये प्रशिक्षित कर्मचारी असणे आवश्यक आहे. तसेच तक्ता क्र. ३.७ वरुन असे स्पष्ट होते की, आम्ही राहत असलेल्या वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांकडून वृध्दाश्रमाचा परिसर स्वच्छ ठेवला जातो असे उत्तर दणारे ५३.५ टक्के उत्तरदाते असून हे प्रमाण परिसर स्वच्छ ठेवला जात नाही असे उत्तर देणाऱ्या ४६.५ टक्के उत्तरदात्यांच्या प्रमाणात अधिक आहे.

प्रमुख निष्कर्ष:—

१. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये ७०—७९ वर्षे या मध्यम वृध्द (Middle Old) वयोगटातील उत्तरदाते सर्वाधिक म्हणजेच ३८.८ टक्के आहेत.

२. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये स्त्री वृध्दांचे प्रमाण अधिक म्हणजेच ५३.३ टक्के एवढे आहे.

३. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये हिंदू धर्मियांचे व खुल्या प्रवर्गातील उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहे.

४. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये विवाहित उत्तरदात्यांचे प्रमाण ८१.३ टक्के असून त्यामध्ये विधवांचे प्रमाण अधिक (३६.२ टक्के) आहे.

५. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांमध्ये प्राथमिक शिक्षण घेतलेल्या वृध्दांचे प्रमाण अधिक आहे.

६. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी सद्यस्थितीत आरोग्याची स्थिती वाईट असणाऱ्या वृद्धांचे प्रमाण अधिक (५९ टक्के) आहे.

७. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी आमच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास होत आहे असे उत्तर देणाऱ्या वृद्धांचे प्रमाण अधिक (५२.५ टक्के) आहे.

८. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी आम्हाला डोळ्यांशी संबंधित आजार आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक (६०.९ टक्के) उत्तरदाते आहेत.

९. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी आम्हाला 'रक्तदाब' हा आजार आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक (४०.४ टक्के) उत्तरदाते आहेत.

१०. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी आम्हाला अर्धांगवायू हा असाध्य आजार आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.

११. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांपैकी आमची स्मरणशक्ती चांगली आहे असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.

१२. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांपैकी आमच्या तब्बेतीची कोणीच काळजी घेत नाही असे उत्तर देणारे सर्वाधिक उत्तरदाते आहेत.

१३. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत राहणाऱ्या वृध्दांची वैद्यकीय तपासणी दर आठवडयाला केली जाते असे उत्तर देणारे सर्वाधिक (५०.२ टक्के) उत्तरदाते आहेत.

१४. महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत कोणत्याच आरोग्यविषयक सोईसुविधा उपलब्ध नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक (५० टक्के) उत्तरदाते आहेत.

१५. आमची प्रकृती चांगली राहावी यासाठी महाराष्ट्रातील वृध्दाश्रमांत योग्य ती काळजी घेतली जाते असे उत्तर देणारे सर्वाधिक ५१.८ टक्के उत्तरदाते आहेत.

१६. महाराष्ट्रातील वृध्दश्रामतील जेवणाबाबत आम्ही समाधानी आहोत असे उत्तर देणारे सर्वाधिक म्हणजेच (५५.७ टक्के) उत्तरदाते आहेत.

१७. आम्ही राहत असलेल्या वृध्दाश्रमातील कर्मचारी प्रशिक्षित नाहीत असे उत्तर देणारे सर्वाधिक म्हणजेच (५६.२ टक्के) उत्तरदाते आहेत.

१८. आम्ही राहत असलेल्या वृध्दाश्रमातील कर्मचाऱ्यांकडून वृध्दाश्रमाचा परिसर स्वच्छ ठेवला जातो असे उत्तर दणारे सर्वाधिक (५३.५ टक्के) उत्तरदाते आहेत.

अशा प्रकारे प्रस्तुत शोधनिबंधातून महाराष्ट्रातील वृध्दाश्रमात राहणाऱ्या वृध्दांच्या आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संदर्भ सूची:–

१. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशौली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ४५.

२. खडसे भा. कि., (२००४), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ. क्र. १४६.

३. United Nations] Department of Economic and Social Affairs Population Division, (२०१९), 'World Population Ageing 2019 Highlights', New York, United Nations, पृ. क्र. ०५.

४. महराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद, सोमवार, दिनांक, १३ जुलै २०१५, पृ. क्र. ०५.

५. लिमकर सुधाकर, (२००५), 'आरोग्य संवाद', औरंगाबाद, संवाद प्रकाशन, पृ. क्र. ६१.

६. गोखले शरच्चंद्र, (२०१२), समाधानी वार्धक्य, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०५.

७. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०४.

८. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०४–०५.

९. गोखले शरच्चंद्र, (२०१२), वार्धक्य, जराविज्ञान आणि जीवनशैली, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, पृ. क्र. ०५–०६.

१०. गंदेवार एस.एन., (२००४), भारतीय समाज: वादातीत विषय आणि समस्या, लातूर, विद्याभारती प्रकाशन, पृ.क्र. १३३.

११. खडसे भा. कि., (२००४), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाऊस, पृ. क्र. १४४.

१२. सांगोलकर दत्ता (२०१४), 'मानवी हक्क', पुणे, जिज्ञासा प्रकाशन. पृ.क्र. १५७.

*पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग तथा सहाय्यक प्राध्यापक, मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. ईमेल– bagate.rajendra3@gmail.com मराठी समाजशास्त्र परिषद, अजिव सभासद क्र. ९३९

***

जागतिकीकरण: युवक आणि विचलनाची उपसंस्कृती

*विनोद श्रावण शेंडे

गोषवारा: *जागतिकीकरण ही सर्वच घटकांवर प्रभाव करणारी प्रक्रिया आहे. त्याचा विशेषत: भारतातील युवा पिढींवर झालेला आहे. प्रत्येक देशातील सर्वात महत्वाची शक्ती म्हणजे यूवक. त्यांना कशाप्रकारचे पोषक वातावरण निर्माण केले जाते हे त्या त्या समाजव्यवस्थेवर अवलंबून असते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय यूवकांमधील संस्कृती आणि विचलनाची उपसंस्कृती कशाप्रकारे बदलत गेली. युवकांच्या राहणीमानात, शैक्षणिक आणि व्यवसायावर देखील परिणाम झालेला आहे. याचा प्रामुख्याने अभ्यास करण्यात आला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत संपुर्ण स्तरांवर सकारात्मक व नकारात्मक परिणाम झाल्याचे निदर्शनात आले आहे. संबंधीत माहीती संकलीत करण्यासाठी दुय्यम तत्रांचा वापर करण्यात आला आहे. युवक विचलीत का होतात याची कारणे देखील शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या पेपरची पूर्तता करण्यासाठी यापुर्वी ज्यांनी संबधित विषयासंदर्भात अभ्यास केला आहे त्या समाजशास्त्रज्ञांचा, संशोधकांचा आणि साहीत्याचा आढावा घेण्यात आला आहे. समाजातील निश्चित केलेली मूल्ये आणि प्रमाणके व्यक्ती कशाप्रकारे पालन करतो त्यानुसार त्याच्या एकूणच व्यक्तीमत्वावर परिणाम होतो. युवकांच्या जीवनामध्ये येणाऱ्या परिस्थीतीला तोंड देतांना यशस्वी न झाल्यास नैराश्यता निर्माण होते. अशा परिस्थतीत वाईट मार्गाचा अवलंब करण्यासाठी वेगळा समुह निर्माण केला जातो. त्यावेळी केलेल्या व्यवहाराला उपसंस्कृती असे म्हटले आहे. व्यक्ती विचलीत झाल्यास चांगला विचार न करता मद्यपान, अंमली पदार्थाच्या आहारी गेल्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीकडे जात असल्याचे आढळून आले.*

मुख्यशब्द:—जागतिकीकरण, भारतीय यूवक, संस्कृती व विचलनाची उपसंस्कृती

प्रस्तावना:

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपुर्ण जग एकामेकांच्या जवळ आले. सर्वात महत्वाची बाब म्हणजे जगातील सर्व देशांना एकत्र आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. त्याचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम देखील झाला आहे. १९८०मध्ये सोवियत देशात विघटन निर्माण झाले. त्याचा परिणाम संपुर्ण देशावर झाला. भारताचे तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी २४ जुलै १९९१मध्ये गॅट करारावर स्वाक्षरी करून स्विकारला. त्यामध्ये उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण अशाप्रकारचे धोरण निश्चित केले त्यालाच एलपीजी ही संकल्पना म्हणून पुढे आली. त्यामध्ये खऱ्या अर्थाने आपल्या देशाचा कशाप्रकारे विकासात्मक परिवर्तन घडून येईल हे महत्वाचे ध्येय ठरविण्यात आले होते. या प्रक्रियेमध्ये जगात आर्थिक बाजारपेठ खुले करून विकास करता येईल हा मुख्य हेतू होता, परंतु मागील बाविस वर्षाचा आढावा घेतल्यास असे लक्षात आले की श्रीमंत व गरीबांमध्ये दरी निर्माण होत गेली आहे. ही बाब खऱ्या अर्थाने समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून या संशोधन पेपर मध्ये सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. जागतिकीकरणामुळे विशेषकरून आपल्या देशातील युवकांवर संस्कृतीचा सर्वात जास्त प्रमाणात प्रभाव झाला आहे.

मानवाला जीवन जगत असतांना एक विशिष्ट पद्धती निर्माण करणे आवश्यक आहे. त्याकरीता आवश्यक गरजांची पुर्तता करण्यासाठी विविध साधने, उद्योगधंदे, रोजगार असणे आवश्यक आहे. तेव्हाच आपले जीवन सुखरूप बनू शकते त्याकरीता मानवाने आलेल्या परिस्थितीतून संस्कृती तयार केली आहे. लहानपणापासून सामाजिकरणाच्या माध्यमातून मुलामुलींना सक्षम बनविले जाते. त्याला प्रत्येक बाबींची जाणीव करून दिली जाते. या सामाजिक संकल्पना संपुर्ण भूतलावर जीवन व्यतीत करीत असणाऱ्यांना मानवाला लागू होणाऱ्या असतात, परंतु त्या त्या देशातील वातारणानुसार भिन्नता असल्याचे आढळून येते. जागतिकीकरणामुळे आपल्याला वेगवेगळया प्रकारचे उद्योगधंदे करणे आणि वस्तुंची देवाणघेवाण करणे सरळ सोपे केले होते. याचा विकसनशील देशांना नवनवीन आर्थिक उलाढाल करण्यास संधी मिळाल्या. याचा आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनांवर प्रभाव झालेला आहे. समाजात निश्चित असणाऱ्या व्यवस्थेनुसार कार्य आणि वर्तन करावे लागते. परंतु काही लोकांना आपले ध्येय साध्य करणे शक्य नसते त्यामुळे त्या व्यवहारांना सामाजिक विचलन असे म्हटले जाते.

संशोधनाचे उद्देश:–

१. जगतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे.

२. युवकांमधील विचलनाची उपसंस्कृती कशी विकसीत होत गेली ती जाणून घेणे.

३. भारतीय युवकांवर झालेल्या परिणामाचे अध्ययन करणे.

संशोधन पद्धती:–

जागतिकीकरण आणि भारतीय युवकांतील विचलनाची उपसंस्कृती संदर्भात अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक आणि निदानात्मक आराखडा तयार करून दुय्यम तथ्यांच्या आधारावर निश्चित केला आहे.

जागतिकीकरणाची संकल्पना:

सर्वात पहिल्यांदा मार्शल मैकलुहान यांनी १९६० मध्ये जागतिक खेडयांच्या आधारावर जागतिकीकरणाचा परिचय करून दिला आहे.समाजामध्ये निर्माण झालेल्या घटनांना अनुभवाच्या आधारावर विशिष्ट पद्धतीने माहितीचे संक्षिप्त रूपात मांडणी केली जाते त्याला संकल्पना म्हटले आहे. मॅकलेलॅंड यांनी 'तथ्यांचे सारस्वरूपात विश्लेषण' आणि पी. व्ही यंग यांच्या मते 'तथ्यांचे वर्गीकरण आणि त्याला गुणवैशिष्टये पुढे ठेवून नांव दिले जाते' त्याला या समाजशास्त्रज्ञांनी 'संकल्पनेची' परिभाषा केली आहे. या आधारावर जागतिकीकरणाची संकल्पना अनेक विचारवंतांनी केलेली आहे त्यांचा संदर्भ यामध्ये घेण्यात आला आहे.

जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जगाचे एका मोठया बाजारपेठेत रूपांतरित होण्याची प्रक्रिया होय. यामध्ये वस्तू आणि सेवा तसेच भांडवल आणि श्रम यांच्या व्यापारावरील निर्बंध उठवून जागतिक पातळीवर व्यापार खुले करण्याची प्रक्रिया सामावलेली आहे. या प्रक्रियेची सुरूवात १९व्या शतकापासून झाली. भांडवलशाहीची वाढ, उपलब्ध सागरी दळणवळण, टेलिग्रामपासून ते २०व्या शतकातील उपलब्ध हवाई मार्ग, दूरध्वनी, संगणक, बहुराष्ट्रीय कंपन्या, व्यापार आणि गुंतवणुकीवरील निर्बंध कमी करण्यातून ही प्रक्रिया सुरू झाली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सेवांचा उदय आणि पुढे व्यापार जागतिक पातळीवर खुले झाल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जलद गतीने होत चालली आहे.

रॉबर्टसन यांनी जे स्थानिक आहे ते जागतिक आहे आणि जे जागतिक ते स्थानिक आहे या प्रक्रियेला 'विशिष्टीतेचे सार्वत्रीकरण' आणि सार्वत्रीकतेचे विशिष्टीकरण' या रूपाने मांडणी केली आहे. आजच्या परिस्थितीत जग हे संपूर्ण जागतिक खेडे बनले आहे आणि त्याचा 'विचार जागतिक आणि कृती राष्ट्रीय' असाच नारा देत असल्याचे दिसते. ग्लोबल आणि लोकल यातून ग्लोकल बनले आहे. त्यामुळे अरेनाज यांनी यास 'हायब्रीडायझेशन' असे संबोधले आहे. जागतिकीकरणाचा सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम झालेला दिसतो. कुटुंब व्यवस्था, विवाह संस्था, स्त्री–पुरूषामंधील संबंध, जाती, जनजाती, बोली भाषा इ. सामाजिक घटकांमध्ये सामाजिक स्थित्यंतरे घडून येत आहेत. जागतिकीकरणामुळे लहान मुले, यूवकांचा वर्ग आणि वृद्धांच्या जीवनमानावर प्रभावित होत आहे. ग्राहकवादाच्या प्रभावातून नव समाज आकार घेत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे लोकांच्या जीवनाचा सांस्कृतिक आकृतिबंध बदलत असून पाश्चात्य देशातील कपडयांचा पेहराव, फास्टफूड, फ्रेंच व्हिस्की, इंग्लिश पॉप संगीत याबाबतीत नेहमी परिचयाच्या झालेल्या आहेत. विशेषत: यूवा पिढी या गोष्टींना प्रभावित होत असून, नवनवीन जीवन जगण्याच्या पद्धती निर्माण करीत आहे. अनेक विचारवंतांनी जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट केला आहे. ॲथनी गिडन्स यांनी ''जगातील विविध लोकांमध्ये आणि क्षेत्रांमध्ये वाढत असणारी पारस्पारिकता आणि परस्परनिर्भरता म्हणजे जागतिकीकरण होय.'' अशाप्रकारची पारस्पारिकता आर्थिक आणि सामाजिक संबंधातील तसेच स्थळ काळातील अंतर कमी करते. मार्टिन अल्ब्रो आणि एलिझाबेथ किंग यांच्या मते, ''जगातील लोकांचा एकाच जागतिक समाजात समावेश केला जातो.'' बायलिस आणि स्मिथ, ''जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व्यापारी, सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.'' एन वाटर्स (२००१), ''सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेवरील भौगोलिक मर्यादा कमी होते आणि लोक अधिक जागरूक होत असतात असे मत मांडले आहे.'' यावरून हे स्पष्ट होते की सामाजिक बदलांच्या प्रक्रियेतून समाजामध्ये भेदभाव कमी होत असून स्थानिक आणि जागतिक स्तरावर एकत्रित झाले आहे. जागतिकीकरण म्हणजे उत्पादनांचा, तंत्रज्ञानाचा, माहितीचा आणि नोकऱ्यांचा इतर राष्ट्रांमध्ये प्रसार करणे. जागतिकीकरणाला भांडवलशाही जगाच्या प्रणालीमध्ये परिवर्तन करण्याची प्रक्रिया म्हणूनही बघीतले

जाते. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक आणि सामाजिक आयोगाच्या मते, वस्तू, भांडवल, सेवा आणि श्रम यांचा प्रवाह सुलभ करण्यासाठी राष्ट्रांच्या सीमांमधील अडथळे काढून टाकणे किंवा कमी करणे म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिक स्तरावर आपल्या कल्पना, वस्तू, सामाजिक संबंध आणि सर्वात महत्वाच्या संघर्षामधील एकाच आणि निरंतर होणऱ्या परिणामाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. आर्थिक दृष्टिकोनातून त्यामध्ये परदेशी थेट गुंतवणूक करणे, व्यापार, भांडवलाचा प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांचा प्रचार–प्रसाराच्या माध्यमातून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी मुक्त केले आहे. गीलपीन यांनी ''प्रभुत्वशाली राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांवर आपली अर्थव्यवस्था आणि संस्कृती लादण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे जागतिकीकरण असे म्हटले आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून विकसनशील देशामध्ये नवनवीन आर्थिक बाजू निर्माण करणे त्याकरीता त्या त्या सरकारचे असणारे नियंत्रण शिथील करणे. भारतात देखील टप्याटप्याने प्रत्येक क्षेत्रात खाजगीकरण केल्या जात आहे.

युवक आणि विचलनाची उपसंस्कृती:

सामाजिकरणाच्या माध्यमातून किशोरावस्थेपासून ते मध्यमवर्गापर्यंतच्या काळाला युवक म्हणून ओळखले जाते. तरुणांमध्ये उत्साह, जोश, साहस आणि व्यवहारांमध्ये भिन्नता असल्याचे आढळून येते. यावरून वयोगटाच्या वैशिष्ट्यांवरून तरुणांची एक निश्चित व्याख्या करण्यात आली आहे संयुक्त राष्ट्र संघाच्या राष्ट्रीय युवक धोरणानुसार २००३ मध्ये युवकांना १५ ते ३५ वर्षे वयोगटातील असल्याचे नमूद केले आहे. जागतिक लोकसंख्येच्या अहवालावरून भारतातील युवकांची संख्या ३५.६ कोटी, चीनमधील युवकांची संख्या २६.९ कोटी, आहे त्यानंतर त्याखालील इंडोनेशियामध्ये ६.७ कोटी, तर अमेरिकेतील युवकांची संख्या ६.५ कोटी आहे यावरून हे स्पष्ट होते की जगातील इतर देशांपेक्षा तरुणांची संख्या सर्वात जास्त भारतामध्ये आहे. आपल्या देशाची समृद्धी करण्याचे कार्य युवकांच्या गुण कौशल्ये, सुदृढ आरोग्य, निर्णयक्षमता आणि वर्तमान परिस्थितीत वास्तविकता निवडण्याची क्षमता ज्या युवकांमध्ये असते तेच देशाला उज्वल भविष्य निर्माण करू शकतात. वरील परिस्थिती निर्माण करण्यासाठी मूलभूत गरजा, शिक्षण, सुरक्षा, आरोग्य, रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. युवक हाच त्या देशाची मोठी संपत्ती आणि शक्ती म्हटले जाते. आधुनिक काळात युवकांमध्ये विचलित वर्तनाची समस्या निर्माण झाली आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक असमानता, भारतीय समाजात लोकशाहीचा विकास होत असताना किशोरवयीन मुलांमध्ये नकारात्मक प्रतिक्रिया निर्माण होतात. एक अन्याय प्रस्थापित व्यवस्थेच्या तत्व विरुद्ध बंड करतात बरेच वेळा हा निषेध विशेषत: धोकादायक स्वरूपात विकसित होतो. ज्यामुळे केवळ युवक क्रांतिकारक नव्हे त्या संपूर्ण समाजाला धोका निर्माण होत असते.

उपसंस्कृतीचे सर्वात आधी अध्ययन शिकागो स्कूल मधून झाले असून यामध्ये विचलन आणि अपराध याविषयी व्याख्या केली आहे. सामाजिक अवस्था सिद्धांताला सुरूवात करतांना त्यांनी असे म्हटले आहे की, उपसंस्कृतीची मुख्य संस्कृती सोबत असणारी सामाजीकरणाची कमतरता आणि दुसरे म्हणजे मॉडल्सचा अवलंब केल्यामुळे उदयास आली. कोहेन हे स्पष्ट करतात की, प्रत्येक उपसंस्कृतीची आपली एक भाषा, शैली आणि आचार–विचार असते आणि ते आपली वेगळी ओळख निर्माण करते. त्यालाच कोहेनने ''कॉर्नर बॉयज'' असे म्हटले आहे. एका विशाल भारतीय समाजाच्या अंतर्गत जे अनेक समूह आहेत त्यांच्या त्यांच्या संस्कृत्या या वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तेव्हा एकाच समाजातील विभिन्न समूहांच्या ज्या समूहविशिष्ट संस्कृती असतात, त्यांना उपसंस्कृती असे म्हणतात. परदेशात स्थायिक झालेले लोक आपल्यामूळे देशाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये आपल्याबरोबर घेऊन तिथे जातात व तेथील संस्कृतीचे काही घटक ते आत्मसात करतात व दोहोंचे मिश्रण होऊन निराळीच संस्कृती अस्तित्वात येते तिलाही ''उपसंस्कृती'' असे म्हणतात.

समाजातील काही उपसंस्कृत्या मात्र संपुर्ण समाजाच्या प्रस्थापित संस्कृतीला आव्हान देणाऱ्या असतात. जी उपसंस्कृती समाजाच्या प्रस्थापित संस्कृतीला आव्हान देणारी असते तिला प्रति संस्कृती किंवा काउंटर कल्चर असे म्हणतात. उदा. हिप्पी संस्कृती, संघटीत गुन्हेगारांच्या टोळ्यांची संस्कृती, यावरून असे स्पष्ट होते की, जगातील समाजांमध्ये अनेक सांस्कृतिक भिन्नता आहे. शेवटी, आपण सहजपणे पाहू शकतो की, एका समाजातून दुसऱ्या समाजामध्ये बदल होतांना आढळून येतो. केनियाच्या ग्रामीण भागातील एका तरुणीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मुंबईतील सर्वात जास्त लोकसंख्येच्या शहरांपैकी एक असलेल्या वयोवृद्ध पुरुषापेक्षा खूप वेगळा असणे स्वाभाविक आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक संस्कृतीची स्वत:ची अंतर्गत भिन्नता असते. डेविड रिजमैनने १९७९ मध्ये सबकल्चर: द मीनिंग ऑफ स्टाइल मध्ये डिक हेब्डिगे यांनी तर्क दिला की, उपसंस्कृति सामान्य स्थितीतील विनाश आहे. १९९५ मध्ये थॉर्नटन, पियर बॉर्डियू यांनी, उपसांस्कृतिक पुंजीला त्या सदस्यांव्दारा अर्जित सांस्कृतिक

ज्ञान आणि वस्तुमध्ये वर्णन केले आहे. २००६ मध्ये केन गेल्डर यांनी उपसंस्कृतिला प्रतिसंस्कृतिशी वेगळे करण्यासाठी म्हटले आहे. उपसंस्कृतिला ओळखण्यासाठी गेल्डर यांनी सहा प्रकार सांगीतले आहे. १.बऱ्याचदा कामाविषयी नकारात्मक दृष्टिकोन. २. समवयस्कांसोबत नकारात्मक किंवा व्दिपक्षीय संबंध. ३. घरातील संपत्तीपेक्षा बाहेरच्या जगाशी जास्त संपर्क. ४. घरातील लोकांशी भावनिक नाते कमी असून बाहेरच्या लोकांसोबत जास्त असते. ५. जीवन जगण्याच्या शैलीचा अतिरेक आणि अतिशयोक्तीचा संबंध. ६.सामान्य जीवन आणि सामुहिकतेवरील बंधने नाकारणे.

उपसंस्कृती ही मोठ्या संस्कृतीतील एक लहान सांस्कृतिक गट असून, उपसंस्कृतीतील लोक मोठ्या संस्कृतीचा एक भाग आहेत. परंतु एका लहान गटामध्ये त्यांची विशिष्ट ओळख देखील आहे. युनायटेड स्टेट्समध्ये हजारो उपसंस्कृती अस्तित्वात आहेत. वांशिक आणि वांशिक गट त्यांच्या वारशाची भाषा, अन्न आणि रीतिरिवाज सामायिक करतात. इतर उपसंस्कृती सामायिक अनुभवांद्वारे एकत्रित आहेत. बाइकर संस्कृती मोटारसायकलच्या समर्पणाभोवती फिरते. काही उपसंस्कृती समाजाच्या बहुसंख्य लोकसंख्येपेक्षा भिन्न असलेले गुणधर्म किंवा प्राधान्य असलेल्या सदस्यांद्वारे तयार केली जाते. बॉडी मॉडिफिकेशन कम्युनिटी मानवी शरीरात टॅटू, छेदन आणि प्लास्टिक सर्जरीचे विशिष्ट प्रकार यासारख्या सौंदर्यात्मक जोडांना स्वीकारते. युनायटेड स्टेट्समध्ये, किशोरवयीन मुले सहसा सामायिक तरुण ओळख विकसित करण्यासाठी उपसंस्कृती तयार करतात. पण उपसंस्कृती बँडचे सदस्य एकत्र असले तरीही, ते अजूनही मोठ्या समाजाला ओळखतात आणि त्यात सहभागी होतात. अशा परिस्थितीत युवक मद्यपानाच्या आहारी जातात म्हणूनच त्यातून बाहेर काढण्यासाठी अल्कोहोलिक ॲनोनिमस ही संस्था जागतिकस्तरावर कार्य करीत असून त्यांना मानसिक आधार देतात.

समाजशास्त्रज्ञ उपसंस्कृतींना प्रतिसंस्कृतीपासून वेगळे करतात, जी लोकं उपसंस्कृतीचा एक प्रकार आहे जे मोठ्या संस्कृतीचे काही नियम व मूल्ये नाकारतात आणि जगण्यासाठी त्यांचे स्वत:चे नियम आणि निकष विकसित करतात, काही वेळा मोठ्या समाजाच्या बाहेर कार्य करणारे समुदाय देखील तयार करतात. स्कीनी जीन्स, चंकी चष्मा आणि विंटेज लोगो असलेले टी–शर्ट अमेरिकन हिपस्टर ही आधुनिक युनायटेड स्टेट्समध्ये ओळखण्या योग्य व्यक्ती आहे. प्रामुख्याने महानगरीय भागात आधारित, काही वेळा न्यूयॉर्क शहरातील विल्यम्स बर्ग शेजारच्या हॉटस्पॉट्स भोवती क्लस्टर केलेले, हिपस्टर्स मुख्य प्रवाहाला नकार देऊन स्वत:ची ओळख निर्माण करतात. एक उपसंस्कृती म्हणून, हिपस्टर्स यू.एस. संस्कृतीतील अनेक मूल्ये आणि विश्वासांना तिरस्कार करतात आणि व्हिंटेज कपडे फॅशनला आणि संपत्ती आणि शक्तीपेक्षा बोहेमियन जीवनशैलीला प्राधान्य देतात. तरुण, मध्यमवर्गीय तरुणांमध्ये हिपस्टर संस्कृती ही नवीन प्रवृत्ती असल्याचे भासत असले तरी, या गटाची सुरुवात १९०० च्या दशकापासून झालेली आहे.

हिप्पी उपसंस्कृती ही मूलत: एक तरुणांची चळवळ आहे. जी १९६० च्या दशकाच्या मध्यात युनायटेड स्टेट्समध्ये उदयास आली आणि जगभरातील इतर देशांमध्ये त्वरीत पसरली. 'हिप्पी' हा शब्द, हिपस्टरपासून व्युत्पन्न झालेला, सुरुवातीला न्यूयॉर्क शहरातील ग्रीनविच व्हिलेज आणि सॅन फ्रान्सिस्कोच्या हाईट–ॲशबरी जिल्ह्यात स्थायिक झालेल्या बीटनिकसाठी अर्थात परंपरांना विरोध करणारे लोक म्हणून वापरला गेला. हिप्पींच्या सुरुवातीच्या विचारसरणीमध्ये बीट पिढीच्या प्रतिसंस्कृती मूल्यांचा समावेश केला होता. काहींनी त्यांचे स्वत:चे सामाजिक गट आणि समुदाय तयार केले ज्यांनी मानसिक रॉक ट्यून ऐकले, लैंगिक क्रांती स्वीकारली आणि चेतनेची पर्यायी अवस्था प्राप्त करण्यासाठी गांजा, चरस, अफीम, हेरॉइन, ब्राउन शूगर आणि एलसीडी सारखी औषधे प्रामुख्याने वापरली जातात. लोकप्रिय संगीत, दूरचित्रवाणी, चित्रपट, साहित्य आणि कला यांच्यावर प्रभाव टाकून हिप्पींच्या फॅशन आणि मूल्यांचा संस्कृतीवर मोठा प्रभाव पडला. १९६० च्या दशकात व्यापक चळवळ झाल्यापासून, हिप्पी संस्कृतीचे अनेक पैलू समाजाच्या मुख्य प्रवाहात शोषले गेले आहेत. हिप्पींनी जोडलेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेला व्यापक मान्यता मिळाली आहे आणि पौर्वात्य तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक संकल्पना मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांपर्यंत पोहोचल्या आहेत. हिप्पी परंपरा समकालीन संस्कृतीत असंख्य रूपांमध्ये पाहिली जाऊ शकते, निरोगी खाण्यापासून ते संगीत उत्सव, समकालीन लैंगिक संस्कृती आणि अगदी सायबर स्पेस क्रांतीपर्यंत निर्माण झाल्याची आढळून येते.

डॉ शामचरण दुबे यांनी विद्यार्थी आणि युवकांमध्ये अंतर केलेले नाही त्यांची जन्मभूमी, अभिमुखता आणि त्यांचा दृष्टीकोन यामध्ये काय फरक आहे याविषयी युवकांच्या उपसंस्कृती संदर्भात स्पष्टीकरण केले आहे. "The Restive Students Strands and Themes in Contemporary Youth Culture" १९७२ मध्ये भारतातील युवकांच्या संस्कृतीवर सविस्तर विश्लेषण केले आहे. १. हिप्पींचे अनुकरण करणारे भारतीय युवक २.पाश्चिमात्यीकरण आणि मुख्य प्रवाहापासून वेगळे असणाऱ्या

कुटुबांतील युवक ३. समाजातील मध्यम आणि निम्न दर्जा असलेल्या स्तरातील युवक ४. शिक्षित असणाऱ्या प्रथम पिढीतील युवकांचा असा मोठा समूह, ज्यांच्या आई वडिलांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळालेला नव्हता. भारतीय संस्कृती पुर्ण विश्वाला आकर्षित करते पण भारतातील युवा पिढीच आपल्या संस्कृतीपासून दुर होतांना दिसत आहे. रोज आपण पाश्चात्य संस्कृतीला आत्मसात करीत असून भारतीय संस्कृती पुस्तके आणि कथांमधूनच वाचायला मिळणार की काय अशी शंका यायला लागली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या संस्कृतीचे रक्षण करणे होय, त्याग, सम्मान, संयम, सत्य, अहिंसा, अध्यात्म हे घटक संस्कृतीची एक वेगळी ओळख निर्माण करतात. एकेकाळी आपण आपल्या संस्कृतीवर गर्व करीत होतो परंतू आज स्थिती बदलली आहे. आजची तरूण पिढी पश्चिमीकरणाकडे आकर्षित होत असून आपली एक नविन संस्कृती म्हणजेच ''उपसंस्कृती'' तयार करीत आहे. राहणीमान, जीवनशैली, खानपान सोबतच प्रमाणके आणि मुल्यांना बाजुला सारून नविन समाज निर्माण करू इच्छित आहे. आजची युवा पिढी विचलित उपसंस्कृतीकडे वळलेला दिसतो.

परिणाम:

ज्या देशात व्यक्ती वास्तव्य करतो त्या भौगोलिक पर्यावरणानुसार जीवन व्यापन करीत असतात. थंड प्रदेशात राहणारे जसे की अमेरिकेतील वर्तनविषयक मुल्ये अन्य देशावर लादल्या जात आहे. भारतीय तरूणांवर खानपान, पेहरावांमधील बदल, मद्यपान आणि अंमली पदार्थांचे सेवन इ. सवयीचा परिणाम होत चालला आहे. मॅकडोनाल्ड या कंपनीने फास्टफूडच्या संदर्भात विकसनशील देशातील समाजात सेवन करण्याची पद्धती वाढत चालली आहे. या कपडयांचा सर्वात जास्त वापर करीत असल्यामुळे आपल्या आरोग्याची समस्या निर्माण होत आहे. भारतीय युवकांमध्ये जागतिकीकरणामुळे मूल्यांसोबतच विवाह, कुटुंब, शिक्षण, धर्म, रूढी परंपरावर देखील परिणाम झाला आहे. करिअर बनविण्यासाठी विवाह उशीरा करणे, समलिंगी संबंध प्रस्थापीत करणे आणि त्याची मान्यता देणे, लग्न न करताच युवक युवती सोबत राहणे, विवाह केल्यानंतर मूलांना जन्म होउ न देणे, आई वडिलांविषयीच्या कर्तव्याबाबत दुर्लक्ष करणे इ. मुल्यांमध्ये बदल झाला आहे. बुद्धिमान तरूण उच्चशिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यास प्राधान्य देतात आणि त्यातील अनेक विद्यार्थी शिक्षण पुर्ण झाल्यावर नोकरीच्या निमित्ताने कायमचे वास्तव्य करू लागले आहे. पालकांना आपली मुले अमरिकेत वास्तव्यात हि गोष्ट प्रतिष्ठेची वाटु लागली आहे. यावरून अमेरिकन संस्कृतीचा आपल्या देशातील मूल्यांवर प्रभाव व प्रसाराची गती वाढत चालली असल्याचे लक्षात येत आहे. जागतिकीकरण संस्कृतीचा एक महत्वाचा वाहक आहे. यामुळे समाजात व्यक्तीवाद व भौतिकवाद वाढला आहे. आजच्या काळात पारंपारिक मूल्यांमध्ये आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरण ही मूल्ये अधिक महत्वाची वाटू लागली आहेत. खानपानामध्ये बर्गर व पिझ्झासारख्या परकिय खाद्यपदार्थांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रात मोठया प्रमाणात बदल झाला आहे. २००५ पासून शैक्षणिक क्षेत्रातील परदेशी संस्था स्थापीत करण्यात आली आहे. जागतिकीकरणामुळे मोठया प्रमाणात गळे कापू स्पर्धा निर्माण झाली आहे. जगातील विकसित देशांना सर्वात जास्त फायदा झाला तर अविकसित देशांवर वाईट परिणाम झाला आहे. स्थानिक संस्कृतीवर प्रभाव होत असून तसेच बेरोजगारी आणि सामाजिक क्षेत्रांवर परिणाम झाला आहे.

निष्कर्ष:

वरील विषयाच्या संदर्भात केलेले विश्लेषण आणि तथ्यांच्या आधारावरून असे म्हणता येईल की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपल्या देशाने केलेल्या करारावरून असे लक्षात येते की, आर्थिक बाजू सक्षम करण्याचे भक्कम प्रयत्न केल्या गेले परंतु मागासवर्गातील लोकांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजा जसे की, आरोग्य, शिक्षण, रोजगार याकडे दूर्लक्ष करण्यात आले. यामुळे भावी पिढींवर अर्थात युवकांच्या व्यक्तिमत्वावर सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रकारचा परिणाम झाला आहे. भारतीय समाज व्यवस्थेत मुख्यत: १९५० नंतर युवकांमध्ये एक वेगळी उपसंस्कृती निर्माण झाली आहे. त्यामुळे दोन वेगवेगळया पिढयांमध्ये अर्थात कुटुंबातील जुन्या आणि नवीन पिढीमध्ये संघर्ष वाढत चालला आहे. अलीकडे प्रत्येक क्षेत्रात खाजगीकरण केल्यामुळे सर्वच प्रकारच्या पैलूंवर असुरक्षिततेची भावना देखील निर्माण झाली आहे.

संदर्भ:

१. आहूजा राम, आहूजा मुकेश (२०१५): विवेचनात्मक अपराधशास्त्र, रावत पब्लिकेशन्स, जयपुर पृ.२८८–२८९
२. लोकसत्ता, जून १०, २०२१
३. काळदाते सुधा, गोटे शुभांगी (२००६): गुन्हेगारी समाजशास्त्र (अपराधशास्त्र), श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ.५६–५९

४. रावत हरिकृष्ण (२०१२): समाजशास्त्र विश्वकोश,रावत पब्लिकेशन्स जयपुर, पृ.३५२,३९६
५. नागला, बी.के. अनुवादक भार्गव, नरेश(२०१९): भारतीय समाजशास्त्रीय चिन्तन, रावत पब्लिकेशन्स जयपुर, पृ. ३६०—३६४
६. कित्ता, पृ.क्र. १४५
७. आगलावे, प्रदीप(२०१५): भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.५४—५५
८. Jan Nederveen Pieterse (1994): International Sociology Vol.9 No.2 pp.161-184
९. Youth in India(2017): Central Stastistics Office, Ministry of Statistic and Programme Implementation Govt. of India (Social Statistic Division) p.n. 3-4
१०. Haralambos, M. with Heald, R. (2017): Sociology Themes and Perspectives, Oxford University Press, New Delhi pp. 498-499
११. https://rwu.pressbooks.pub/rothschildsintrotosociology/chapter/pop-culture-subculture-and-cultural-change
१२. https://en.wikipedia.org
१३. https://allforyou.in/

* समाजशास्त्र विभाग, एच. बी. टी. आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर.

***

मराठी समाजशास्त्र परिषद
(नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र/२७-८३ औरंगाबाद)

-: कार्यालयाचा पत्ता :-

अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा – समाजशास्त्र विभाग, सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ
विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा-४४१९१२.

-: कार्यकारी मंडळ :-

अध्यक्ष : **डॉ.राहुल भगत,**
प्राध्यापक व विभाग प्रमुख, एस.एन.मोर महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा.

सचिव : **डॉ.अशोक बोरकर,**
प्राध्यापक व विभाग प्रमुख, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

कोषाध्यक्ष : **डॉ.धनंजय सोनटक्के,**
प्राध्यापक व विभाग प्रमुख, प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा.

सदस्य : **डॉ.आनंद आंबेकर,** मुंबई विद्यापीठ, मुंबई.

सदस्य : **डॉ.किरण सुरवसे,** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदस्य : **डॉ.अर्जुन जाधव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य : **डॉ.मारोती बामणे,** स्वा.रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सदस्य : **डॉ.प्रतिभा बिरादार,** अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

सदस्य : **डॉ.मधुकर चाटसे,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

सदस्य : **डॉ.हरीश पेटकर,** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

सदस्य : **डॉ.रवींद्र वाघ,** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

सदस्य : **डॉ.अमोल पाटील,** एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

सदस्य : **डॉ.विठ्ठल चव्हाण,** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सदस्य : **डॉ.प्रवीण घोडेस्वार,** य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.

प्रकाशक : **डॉ.राहुल भगत,**
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा - समाजशास्त्र विभाग, सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि.भंडारा-४४१९१२.

प्रकाशक : डॉ. राहुल धवल,
अध्यक्ष, मराठी अध्यापक परिषद, प्रमुख – मराठी विभाग, सेठ नथिमल और जवा, वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा-४४१९१२.